‘प्रबोधन’मधील प्रबोधनकार

प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख

संपादन : सचिन परब



खंड १

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

‘प्रबोधन’मधील प्रबोधनकार

प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख

खंड १

संपादन : **सचिन परब**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

एन ४००६--१

‘प्रबोधन’मधील प्रबोधनकार
प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख
खंड १

पहिली आवृत्ती : १६ ऑक्टोबर २०२१ (प्रबोधन शताब्दी)

संपादन : सचिन परब
संपादन समन्वय : अभिजित सोनावणे
मुखपृष्ठ चित्र : संजय मोरे
मुखपृष्ठ रचना आणि मांडणी : पुष्पराज पोपकर

प्रकाशक : सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५
© प्रकाशकाधीन

मुद्रक : व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड स्टेशनजवळ, चर्नी रोड,
मुंबई - ४००००४

किंमत : रुपये ५२३.००

या पुस्तकात व्यक्त झालेली मते लेखक आणि संपादक यांची असून, या मतांशी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ तसेच महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

संपादन मार्गदर्शक

रणधीर शिंदे
ज्ञानेश महाराव
विश्वंभर चौधरी
सुनील कर्णिक

एन ४००६--१अ

'मराठी बहुजन समाजाला आपल्या निधड्या लेखनाने आणि वक्तृत्त्वाने जागृत करण्याचे जे थोर सामाजिक कार्य केशव सीताराम ठाकरे यांनी केलेले आहे, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे महाराष्ट्रवासीयांचे कर्तव्य आहे. आजपर्यंत ठाकरे यांनी लिहिलेले सर्व प्रबोधक आणि तेजस्वी वाङ्मय एकत्रित करून ग्रंथरूपाने जर प्रकाशात आले, तर महाराष्ट्राची सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या कामी या बंडखोर ब्राह्मणेतराने एका कालखंडात केवढी तेजस्वी कामगिरी करून ठेवलेली आहे, हे महाराष्ट्राला कळून आल्यावाचून राहणार नाही. अशा मान्यतेचा आणि गौरवाचा मुजरा महाराष्ट्र या कलमप्रभूला मोठ्या आनंदाने करेल!'

- आचार्य प्रल्हाद केशव अत्रे,

साप्ताहिक नवयुग,

१६ सप्टेंबर १९४५

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मा. मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

शुभेच्छा संदेश

‘प्रबोधन’ विचारांचा वसा आणि वारसा जतन करूया

महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळी आणि त्यातील प्रबोधन परंपरा यांचा उल्लेख ‘प्रबोधन’च्या उल्लेखाशिवाय अपूर्णच राहील. या ‘प्रबोधन’मुळेच केशव सीताराम ठाकरे यांना प्रबोधनकार अशी ओळख मिळाली. ‘प्रबोधन’चे हे शताब्दी वर्ष आहे. या निमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ‘प्रबोधन’मधील लेखांचा संग्रह प्रकाशित करीत आहे, याचे मोठे समाधान आहे.

‘प्रबोधन’चा शतकमहोत्सव साजरा करताना एक मोठा पटही डोळ्यांसमोरून तरळून जातो. प्रबोधनकारांसाठी ‘प्रबोधन’ हे केवळ एक नियतकालिक नव्हते. तर ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होते. त्यांचा जीवनमार्ग होते. प्रबोधनकारांची ‘प्रबोधन’ प्रकाशनामागची तळमळ आणि त्यासाठी त्यांनी केलेली धडपड विलक्षण प्रेरणादायी आहे. त्याविषयीच्या प्रबोधनकार आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या चर्चा, संवाद मी ऐकले आहेत. आम्हा सर्वांसाठी ही संस्कार शिदोरीच आहे. संपादक प्रबोधनकारांची ग्रंथसंपदा, लेखनशैली आणि त्यांची भूमिका महाराष्ट्राच्या पत्रकारितेचे वेगळेपण सांगणारी अशीच आहे. त्यांचे जीवन आणि लेखन यांची शैली एकरूप अशीच होती. ‘प्रबोधन’मधील अनेक विचार आजही

संदर्भनीय ठरतील, असे आहेत. प्रबोधनकारांच्या विचारांचा हा वसा आणि वारसा जतन करण्याची गरज आहे.

'प्रबोधन'मधील अप्रकाशित लेखांमुळे प्रबोधनकारांचे लेख आणि भूमिका नव्या पिढीसमोर येईल, अशी अपेक्षा आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या उभारणीत योगदान दिलेल्या महान विभूतींचे विचार, साहित्य आणि ग्रंथसंपदा वेगवेगळ्या निमित्तांनी तरुणांसमोर आणावे लागतील. यातूनच पुरोगामी विचारांचा जागर होईल. त्यासाठी 'प्रबोधन'च्या निमित्ताने सुरू झालेली मालिका यापुढेही सुरूच राहील, असा विश्वासही व्यक्त करतो.

प्रबोधनकारांच्या विचारांचा समृद्ध वारसा पुढच्या पिढीपर्यंत नेण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने घेतलेला पुढाकारही निश्चितच अभिनंदनीय आहे. मंडळाच्या पुढील उपक्रमांना तसेच 'प्रबोधन'मधील लेखसंग्रह ग्रंथनिर्मिती आणि त्याच्या प्रकाशनास मनःपूर्वक शुभेच्छा!

□□□

सुभाष देसाई
मा. मंत्री,
मराठी भाषा विभाग, उद्योग, खनिकर्म,
महाराष्ट्र राज्य

शुभेच्छा संदेश

विचारापाठोपाठ आसूड उगारणारे फक्त प्रबोधनकारच!

विसावे शतक उगवले तेच महाराष्ट्रात प्रबोधन युग घेऊन. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, न्या. महादेव गोविंद रानडे, पंडिता रमाबाई, म. जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, गोपाळ गणेश आगरकर आणि प्रबोधनकार ठाकरे. किती नावे घ्यावीत? या सर्वांनी प्रस्थापित व्यवस्थेला मुळापासून गदागदा हलवले. अन्यायाला वाचा फोडली. सत्यशोधक बनून 'बाबा वाक्यं प्रमाणम्' म्हणायला नकार दिला. या सर्वांना प्रस्थापित मुखंडांनी सुखाने जगू दिले नाही.

जसजसा समाज जागा होऊन या आधुनिक विचारांकडे कान टवकारून पाहू लागला, तसतसा समाजजीवनाच्या मानगुटीवर घट्ट बसलेला रूढीवाद मागे हटू लागला. राजा राममोहन रॉय यांच्या बंगालप्रमाणेच किंबहुना त्याहून सकस आणि रसरशीत असे हे परिवर्तन होते. हे सर्व महाराष्ट्रात घडले. युरोपात असेच घडले तेव्हा 'रेनेसान्स' म्हणून त्याला जागतिक इतिहासात चिरंतन स्थान मिळाले. ते भाग्य महाराष्ट्रपुत्रांच्या वाट्याला आले नाही. खरे तर ही क्रांती कोणत्याही कसोटीवर जागतिक महत्त्वाच्या घटनेहून कमी नव्हती. पण देशानेच जिथे महाराष्ट्राची यथोचित दखल घेतली नाही, तेथे जगाला कोण जाब विचारणार? असो.

वर नामोल्लेख केलेले समाजसुधारक थोर खरेच. पण या प्रभावळीत प्रबोधनकारांचे स्थान खास वेगळे. पुस्तकी पांडित्यापुरता त्यांचा सुधारकी बाणा थांबला नाही. मांडलेल्या प्रत्येक विचाराला दादांनी कृतीची जोड दिली. हे करताना त्याची पुरेपूर किंमत मोजली. हुंडाबंदीविरोधात त्याकाळी अनेकांनी विचार मांडले; पण प्रबोधनकार तेवढ्यावर थांबले नाहीत. वैचारिक पुरोगामित्वाला सगळेच माना डोलवत होते. पण त्याचवेळी हुंड्याची देवाणघेवाण सर्रास सुरू होती. प्रबोधनकार नुसत्या वैचारिक बदलावर संतुष्ट होण्याऱ्यांपैकी नव्हते. त्यांनी प्रत्यक्ष कृतीचा आसूड हातात घेतला. ज्या लग्नात हुंडा घेतला आहे, अशी माहिती मिळे तेथे त्यांचा आसूड कडाडलाच. अशी हुंडाग्रस्त लग्ने त्यांनी स्वतः मंडपात घुसून उधळून लावली. संख्येने या घटना कमी असतील; पण ती दहशत शेवटी कामी येत गेली. महाराष्ट्रात हुंडाबंदीचा पुरस्कार होऊ लागला.

अशा सुधारणांमुळेच आपला प्रदेश पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखला जाऊ लागला. आज तुम्ही आम्ही तसे अभिमानाने म्हणत असतो. ही ताकद प्रबोधनकारांनी दाखवून दिली. या शक्तीचा परिचय करून देण्याच्या उद्देशानं सचिन परब यांनी 'प्रबोधनकार डॉट कॉम' हे संकेतस्थळ सुरू केले आणि निष्ठेने चालविले. त्यांची साप्ताहिक 'मार्मिक'मधील लेखमाला हेच कार्य करीत आहे. 'प्रबोधन' नियतकालिक मोजकी वर्षेच प्रकाशित झाले. विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर तसे प्रबोधन मुंबई, पुणे, सातारा अशा जमेल त्या ठिकाणाहून प्रसिद्ध झाले. त्याचे एकूण ९५ अंक निघाले, तरी आजमितीस ९१ अंक अभ्यासू मंडळींच्या हाती लागले. अजून चार अंकांचा शोध सुरूच आहे. १९२१ मध्ये डरकाळी फोडणाऱ्या 'प्रबोधन'चे हे शताब्दी वर्ष. राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाअंतर्गत येणाऱ्या 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ने प्रबोधन नियतकालिकामधील शतकापूर्वी प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह प्रकाशित करायचे ठरविले. ग्रंथ संपादनासाठी सचिन परब यांच्याखेरीज या विषयाचा ध्यास घेतलेली अन्य व्यक्ती कोण आढळणार?

आता हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. माझ्या मराठी भाषा विभागाचे हे मी भाग्य समजतो. प्रबोधनकारांचे नातू मुख्यमंत्रिपदी विराजमान असताना हे विचारधन नव्याने समोर येत आहे, हा विलक्षण योग. सुधारकांची मांदियाळी निर्माण करणारा महाराष्ट्र या ग्रंथाचे कसे स्वागत करतो, हे पाहाण्यास मी उत्सुक आहे.

□□□

डॉ. विश्वजित कदम
मा. राज्यमंत्री,
मराठी भाषा विभाग, सहकार, कृषी, सामाजिक न्याय,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ,
महाराष्ट्र राज्य

शुभेच्छा संदेश

मराठी पत्रकारितेतील 'प्रबोधन' हे सुवर्णपान

महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या 'प्रबोधन' मासिकाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'मार्फत त्यातील निवडक लेखांचा संग्रह प्रकाशित होणे हे समयोचित आहे.

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी संपादित केलेल्या 'प्रबोधन' नियतकालिकाचा पहिला अंक दिनांक १६ ऑक्टोबर १९२१ला प्रकाशित झाला होता. यंदा 'प्रबोधन'चे शताब्दी वर्ष साजरे होतेय. महाराष्ट्रातल्या पुरोगामी चळवळीत 'प्रबोधन' नियतकालिकाचे योगदान महत्त्वाचे आहे. 'प्रबोधन'च्या ६ वर्षांच्या कालावधीत ९५ अंक निघाले. ही संख्या कमी असली तरी ते महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने 'प्रबोधन पर्व' होतं. प्रबोधनकार ठाकरे यांनी 'प्रबोधन'च्या माध्यमातून जात आणि धर्माच्या नावावर सुरू असलेल्या विषमतेवर केलेला प्रहार आजही क्रांतिकारक आहे.

'प्रबोधन' मासिकाचे आणि सांगली-सातारा जिल्ह्याचे ऋणानुबंध वेगळे आहेत. सत्यशोधक चळवळीचे महत्त्वाचे विचारवंत म्हणून प्रबोधनकरांनी १०० वर्षांपूर्वी पूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला होता. त्यांचा प्रभाव पश्चिम महाराष्ट्रावर आणि त्यातही जुन्या सातारा जिल्ह्यावर होता. गावोगावी भाषणे

करून त्यांनी हा भाग पिंजून काढला होता. त्यामुळे त्यांची पुस्तके आणि 'प्रबोधन'चे अंक सांगली जिल्ह्यातल्या मिरज तालुक्यातल्या काकडवाडी गावात सापडले. 'प्रबोधन'चे तिसऱ्या वर्षातले १७ अंक हे सातारा रोड जवळच्या पाडळी या गावातून प्रसिद्ध झाले आहेत. याचे ऐतिहासिक महत्त्व माझ्या दृष्टीने वेगळे आहे. हे आमच्या परिसराशी असलेले प्रबोधनकारांचं शंभर वर्षांपूर्वीचे नाते या संग्रहातून वाचकांना कळणार आहे, याचा आनंद आहे.

शिक्षण क्षेत्रातले प्रेरणास्थान कर्मवीर भाऊराव पाटील हे प्रबोधनकार ठाकरे यांचा उल्लेख आपला गुरू म्हणून करत. 'रयत शिक्षण संस्थे'ला मदत उभी करून देण्यासाठी प्रबोधनकारांनी थेट महात्मा गांधी यांच्याकडे धाव घेतली होती. 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ने प्रबोधनकार ठाकरे यांची पुस्तके यापूर्वीच पाच खंडांत प्रकाशित केली आहेत. त्याच्या नव्या आवृत्त्याही मंडळानं आणल्या आहेत. त्यामुळे प्रबोधनकारांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहचत आहेत; मात्र प्रबोधनकारांच्या विचारांचा गाभा असलेल्या 'प्रबोधन' नियतकालिकातील लेख नव्या पिढीतील अभ्यासकांना उपलब्ध होणे, ही काळाची गरज आहे. ती या संग्रहामुळे पूर्ण होत आहे, याचा मला आनंद वाटतो. त्याग आणि संघर्षामुळे शब्दाला ताकद मिळू शकते. बहुजन समाजाला प्रेरणा आणि आत्मविश्वास देणारे 'प्रबोधन' हे समाजाभिमुख पत्रकारितेचे उदाहरण आहे. त्यामुळेच 'प्रबोधन' हे मराठी पत्रकारितेतील सुवर्णपान आहे.

प्रबोधनकारांचे नातू उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना या पुस्तकाचे प्रकाशन होणे, हा दुग्धशर्करा योग अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे. 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'च्या वतीने काढण्यात येणाऱ्या 'प्रबोधन'मधील लेखांच्या या संग्रहास माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा!

□□□

‘प्रबोधनकार डॉट कॉम’चं स्वप्न
ज्यांच्यामुळे पूर्ण झालं ते
खासदार **राहुल रमेश शेवाळे**
यांच्या मैत्रीला अर्पण

- संपादक -

॥ अनुक्रमणिका ॥

निवेदन : डॉ. सदानंद मोरे / १८
कृतज्ञता / १९
संपादकीय : सचिन परब / २१

वर्ष १ : (१६ ऑक्टोबर १९२१ - ०१ ऑक्टोबर १९२२)

अंक १ : प्रबोधनाचें ध्येय / ६५
उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत / ६८
धन्य पार्वतीबाई धन्य ! / ७४
विविधज्ञान विस्तारचा विक्षिप्तपणा / ७७
अंक २ : संस्कृतीची निवड / ८०
सीमोल्लंघन करा. दसरा गेला, दिवाळी आली / ८४
अंबाबाईचा नायटा / ८८
अंक ३ : शिवराया प्रणिपात कराया ब्रिटानिया आली / ९७
राष्ट्रघातक्यांची परिषद अथवा भिक्षुकशाहीचें बंड / १०२
अंक ४ : दसरा गेला आणि दिवाळीहि गेली ! / १०७
अंक ५ : मानसिक दास्याविरुद्ध बण्ड (लेखांक १ ला) / ११३
सायन्स आणि मानवजाति / ११७
कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / १२०
अंक ६ : मानसिक दास्याविरुद्ध बण्ड (लेखांक २ रा) / १२५
हुंड्यावर बहिष्कार / १२९
अंक ७ : मानसिक दास्याविरुद्ध बण्ड (लेखांक ३ रा) / १३१
मुळशीपेटा सत्याग्रह / १३५
अंक ८ : मानसिक दास्याविरुद्ध बण्ड (लेखांक ४ था) / १४०
अंक ९ : दरिद्री गडकरी आणि श्रीमंत जोशी / १४६
अंक १० : मानसिक दास्याविरुद्ध बण्ड (लेखांक ५ वा) / १५२
वीर प्रभाकर स्मारक / १५७
अंक ११ : चिरंजीव आद्य हिन्दु मिशनरी / १६१
कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / १६६
आश्रयदात्यांच्या चरणी नम्र निवेदन / १७१

अंक १२ : समाज-सुधारकांचें दिव्य (लेखांक १ ला) / १७३
अंक १३ : समाज-सुधारकांचें दिव्य २ (लेखांक २) / १७९
बेटा देहू, आस्ते कदम / १८३
कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / १८६
अंक १४ : समाजसुधारकांचे दिव्य (लेखांक ३ रा) / १८८
वज्रशुची / १९३
दिवाळी गेली ! पण झालें काय? (लेखांक १ ला) / १९७
विद्वान् नापिताच्या तुंबड्या / २००
अंक १५ : दिवाळी गेली ! पण झालें काय? (लेखांक २ रा) / २०३
सर्चलाईट विझाला ! / २०७
पाद्रांचा पाजीपणा / २१२
कमलबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / २१७
अंक १६ : अस्पृश्य जनांसाठीं कै. शाहुमहाराज छत्रपति यांनीं काय केलें ? / २२०
बुद्ध देवाची कामगिरी / २२३
राष्ट्राळलेल्या तरुण विद्यार्थ्यांचा अध:पात / २२८
अंक १७ : मुळशी आणि राष्ट्रीय / २३४
आर्यांच्या विवाहविधीची चिकित्सा (लेखांक १ ला) / २४०
अंक १८ : उत्तिष्ठत जाग्रत ! उठा जागे व्हा !! / २४४
शाबास भगिनींनो शाबास ! / २४७
अंक १९ : आर्यांच्या विवाहविधीची चिकित्सा (लेखांक २ रा) / २५३
क्रिश्चन धर्माचें दिवाळें वाजणार ! / २५७
अंक २० : जगावें कीं मरावें? एवढाच प्रश्न उरला आहे / २६२
कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / २६७
अंक २१ : आश्रयदात्यांशी हितगुजाचे बोल / २६८
मराठ्यांचा इतिहास फांसावर चढला / २७०
कृष्णं वन्दे जगद्गुरुम् / २७५
अंक २२ : फर्ग्युसन कॉलेजांतील टिळक मेमोरियल / २८०
आई / २८१
श्री. विनायक लक्ष्मण भावे यांचें विश्वामित्री इतिहास-संशोधन (लेखांक १ ला) / २८४
अंक २३ : शूर वीर प्रभाकर सुळे / २९१
शिवाजी ब्राह्मण होता / २९२
तुमचा खेळ होतो, पण आमचा जीव जातो ! / २९५
अंक २४ : दिग्विजयासाठीं सीमोल्लंघन केलेंच पाहिजे / ३००
हृदयाविष्करण : हें पुष्प देवा तुजला वहातों / ३०५

वर्ष २ : (१६ ऑक्टोबर १९२२ - १ ऑक्टोबर १९२३)

अंक १ : विश्वामित्री इतिहास - संशोधन (लेखांक २ रा) / ३१३
भाऊबिजेची ओवाळणी / ३१८
बाजीप्रभूचा इंग्रजी पोवाडा / ३२२
होळकर सरकार, इकडे लक्ष द्या / ३२४
कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / ३२६

अंक २ : ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची चिकित्सा (लेखांक १ ला) / ३२९
विश्वामित्री इतिहास-संशोधन (लेखांक ३ रा) / ३३४
दृष्टीकोणाचा एक मासला / ३३९

अंक ३ : केसरीदादांची कळकळ / ३४४
विश्वामित्री इतिहास संशोधन (लेखांक ४ था) / ३४७
ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची चिकित्सा (लेखांक २ रा) / ३५०

अंक ४ : ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची चिकित्सा (लेखांक ३ रा) / ३५५

अंक ५ : ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची चिकित्सा (लेखांक ४ था) / ३६१
कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / ३६७
सातारच्या पापग्रहाचे प्रबोधनावर कायस्थी गंडांतर / ३६८

अंक ६ : दुनिया झुकती है! / ३९०
कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / ३९७

अंक ७ : आत्मविकास आणि संक्रमण / ४००
कलमबहाद्दरांस शेलापागोटें / ४०५

अंक ८ : गोविंदाग्रज शाहीराची कामगिरी / ४०८

अंक ९ : कायदेबाजी व कज्जेदलाली / ४१५
पुराणकारांचे आधुनिक सांप्रदायी / ४२०

अंक १० : शिमग्याची बोंब / ४२५

अंक ११ : नवमतवादाग्रणी लोकहितवादी (लेखांक १ ला) / ४३०
ॲडवोकेट चित्रे यांचा साहेबशाही थैमान / ४३४

अंक १२ : कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / ४३७
नवमतवादाग्रणी लोकहितवादी (लेखांक २ रा) / ४४१
आपला दाम पारखून घ्या / ४४६

अंक १३ : शिवछत्रपतींचा लोकसंग्रह / ४४९
अंक १४ : अद्‌भुतचि कार्य करणे / ४५५
बेळगांवकर बांधवांची सेवा / ४६१
हिन्दुधर्म नामर्द कां? / ४६३
सार्वजनिक हिताचा प्रश्न / ४६७
अंक १५ : फॅशन, प्रतिष्ठा कीं बेशरमपणा? / ४७१
धर्मच जबरदस्त पाहिजे / ४७४
प्रतापगडच्या भवानीवर संकट / ४७८
अंक १६ : मन गुलाम म्हणून मानव गुलाम ! / ४८२
कायस्थ-मराठा मिश्रविवाह / ४८६
अंक १७ : जपान राष्ट्रांचे प्रबोधन (लेखांक १ ला) / ४९५
मद्राशांचा सुळसुळाट / ५००
अंक १८ : जपान राष्ट्राचें प्रबोधन (लेखांक २ रा) / ५०५
साखऱ्या भटाची वानी, अक्षि निरमल गंग्येचं पानी / ५०८
अंक १९ : जपान राष्ट्राचें प्रबोधन (लेखांक ३ रा) / ५१६
अंक २० : हितगुजाचे बोल / ५२१
जपान राष्ट्राचें प्रबोधन (लेखांक ४ था) / ५२४
अंक २१ : 'राष्ट्रीय' निशाणाचा हट्टाग्रह (लेखांक १ ला) / ५२९
अंक २२ : 'राष्ट्रीय' निशाणाचा हट्टाग्रह (लेखांक २ रा) / ५३४
अंक २३ : कलमबहाद्दरांस शेलापागोटें (पुस्तक परिचय) / ५३८
इतिहासाची पुनरावृत्ति / ५४२
अंक २४ : सार्वजनिक धंद्यांचें आणि व्यवसायांचें अमेरिकन आचार-नीतिशास्त्र / ५४७
कलमबहाद्दरास शेलापागोटें (पुस्तक परिचय) / ५५१
हे पुष्प देवा तुजला वहातों / ५५२

निवेदन

महाराष्ट्राच्या संदर्भात काही चर्चा सुरू असल्यास 'पुरोगामी महाराष्ट्र' हा शब्दप्रयोग हमखास केला जातो. हा पुरोगामी महाराष्ट्र आभाळातून पडला नाही. त्याला पुरोगामी बनवण्याच्या प्रक्रियेत काही विचारवंतांची आयुष्ये खर्ची पडली आहेत. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परंपरेत असणारे अखेरचे नाव म्हणजे अर्थातच केशव सीताराम ठाकरे हे होय. ठाकरे यांनी ज्या माध्यमातून हे कार्य केले त्याचे नाव 'प्रबोधन'. म्हणून तर ठाकरे यांची प्रबोधनकार ठाकरे अशी ओळखच निर्माण झाली. 'प्रबोधन' या नियतकालिकाचा पहिला अंक मुंबईहून १६ ऑक्टोबर १९२१ या दिवशी प्रसिद्ध झाला. म्हणजेच २०२०-२१ हे 'प्रबोधन'चे शताब्दी वर्ष होय. या शताब्दीच्या निमित्ताने सचिन परब यांनी संपादित केलेला 'प्रबोधन'मधील प्रबोधनकार' हा त्रिखंडात्मक ग्रंथ वाचकांना सुपूर्द करण्यात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत आहे. 'प्रबोधन'चे एकूण ९५ अंक प्रकाशित झाले होते. त्यातील ९१ अंक सचिन परब यांनी परिश्रमपूर्वक उपलब्ध केले. संपादनाला दीर्घ प्रस्तावना लिहून 'प्रबोधन' व प्रबोधनकार यांच्या गुणवैशिष्ट्यांवर प्रकाशझोत टाकला.

महाराष्ट्रामधील ब्राह्मणेतर चळवळीला बुद्धिप्रामाण्यवादी रूप मिळवून देण्यातही प्रबोधनकारांचा वाटा आहे. ही चळवळ 'प्रबोधन'सारख्या नियतकालिकांमुळेच यश प्राप्त करू शकली. त्यांच्यापैकी बडोद्याचे पत्रकार भगवंतराव पाळेकर यांच्या 'जागृति' साप्ताहिकातील लेखांचे संपादन मी केले असल्यामुळे असे काम किती जिकिरीचे असते, याचा मलाही अनुभव आहे. त्यामुळे सचिन परब यांचे विशेष अभिनंदन.

डॉ. सदानंद मोरे

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

कृतज्ञता

दहा वर्षांपूर्वी 'प्रबोधनकार डॉट कॉम'च्या निमित्ताने **शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे** यांच्याशी माझी तीनदा सविस्तर भेट झाली. पहिल्याच भेटीत त्यांनी प्रबोधनकारांविषयीचे खूप संदर्भ मला दिले. त्यात 'प्रबोधन'च्या पहिल्या दोन वर्षांच्या फायली होत्या. प्रबोधनकारांची पुस्तकं आधी वाचली होती; पण 'प्रबोधन'च्या अभ्यासाची ही माझी सुरवात होती. बाळासाहेबांशी प्रबोधनकारांविषयी झालेल्या चर्चेचे संदर्भ आता 'प्रबोधन'मधल्या लेखांचं संपादन करताना उमगत जात आहेत. त्यांनी दिलेली जबाबदारी आपल्या हातून काही अंशी तरी पूर्ण होत आहे, अशी भावना या क्षणी मनात आहे. यापुढेही प्रबोधनकारांविषयीचे इतरही सगळं अप्रकाशित लेखन असंच पुस्तक रूपाने वाचकांसमोर आणू शकलो, तर मी स्वतःला धन्य समजेन.

मुख्यमंत्री **उद्धव ठाकरे** यांनी माझ्यावर विश्वास ठेवून 'प्रबोधनकार डॉट कॉम'साठी संदर्भ मिळवून देण्यात वारंवार मदत केली. दहा वर्षांपूर्वीच्या या गोष्टींचं महत्त्व आता लक्षात येत आहे.

मराठी भाषा विभागाचे मंत्री **सुभाष देसाई** यांनी प्रबोधन शताब्दीच्या निमित्ताने प्रबोधनकारांच्या अप्रकाशित साहित्याचे खंड प्रकाशित करण्याची कल्पना मांडली आणि त्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली. प्रत्येक टप्प्यावर बारकाईने लक्ष घालून प्रोत्साहन दिलं, ते माझ्यासाठी फार महत्त्वाचं होतं.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे आभार. मंडळाचे अध्यक्ष **डॉ. सदानंद मोरे** यांनी माझ्यावर विश्वास दाखवला. काम करताना जिथे अडलो, तिथे मार्गदर्शन केलं. मंडळाच्या सचिव **मीनाक्षी पाटील** यांनी लक्ष घालून हे काम माझ्याकडून करून घेतलं.

साप्ताहिक चित्रलेखाचे संपादक **ज्ञानेश महाराव** यांनी त्यांच्याकडचे 'प्रबोधन'चे अंक दिलेच; पण त्यांचं प्रबोधनकारांविषयीचं लिहिणं आणि बोलणं नवी दिशा देणारं ठरलं. ते सोबत नसते, तर हे काम माझ्याकडून पूर्ण झालं नसतं.

राज्याच्या ग्रंथालय संचालक **शालिनी इंगोले** आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, भारत इतिहास संशोधन मंडळ आणि इतर ग्रंथालयांमधले 'प्रबोधन'चे अंक उपलब्ध करून दिले.

ज्येष्ठ पत्रकार **डॉ. अनंत गुरव** यांनी 'प्रबोधन'वर पीएचडीसाठी केलेल्या संघर्षाचा मी साक्षीदार आहे.

त्यांनी 'प्रबोधन'वर केलेलं संशोधन हे या विषयावरचं पहिलंच विद्यापीठीय संशोधन आहे, त्यामुळं त्याचं मोल या ग्रंथासाठी खूपच आहे. त्यांनी त्यांच्याकडचे 'प्रबोधन'चे अत्यंत दुर्मिळ अंकही मला दिले. ते मला इतक्या सहजपणे मिळाले नसते, तर कोरोनाकाळात त्या अंकांचा इतरत्र माग काढणं शक्य नव्हतं.

डॉ. विठ्ठल घुले, डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. मनीष देशमुख हे प्रबोधनकारांवर पीएचडी करणारे संशोधक आणि प्रबोधनकारांवर लेखन केलेले इतर अभ्यासक यांच्यामुळं माझं काम सोपं झालं. साधे पोस्टमन असूनही प्रबोधनकारांवर महत्त्वाचा दस्तावेज गोळा करणारे अभ्यासक **धर्मपाल कांबळे** यांची आठवण आज येणं स्वाभाविक आहे. **प्रा. महावीर मुळे** यांनी काकडवाडी, ता. मिरज, जि. सांगली येथील प्रबोधनकारांच्या साहित्याचा साठा जतन करून ठेवला, म्हणून आज ते आपल्याला वाचायला मिळालं. प्रबोधनकारांचे शिष्य **पंढरीनाथ सावंत** यांचे उपकार तर प्रबोधनकारांच्या अभ्यासकांना कधीच फेडता येणार नाहीत.

सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक **अमर हबीब** यांनी योग्य वयात माझी प्रबोधनकारांच्या साहित्याशी पहिली ओळख करून दिली. त्या साहित्याने मला माझ्या जगण्याचा रस्ता दाखवला.

अभिजित सोनावणे याने या ग्रंथासाठी हजारहून अधिक पानांच्या टायपिंगचा पसारा आवरला. **पुष्पराज पोपकर** यांनी पानांच्या लेआऊटचं किचकट काम वेळेत केलं. **संजय मोरे** यांनी कव्हरसाठी देखणं पोर्ट्रेट करून दिलं. दहा वर्षांपूर्वी 'प्रबोधनकार डॉट कॉम'साठी काम करताना मित्र **सिद्धार्थ मोकळे** याने 'प्रबोधन'चे अनेक अंक मिळवले होते. **दर्शन आंब्रे** याने अंकांचे फोटो काढण्याचं कठीण काम चिकाटीने केलं होतं.

या सगळ्यांविषयी, माझ्या कुटुंबाविषयी आणि या कामाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भाग असलेल्या प्रत्येकाविषयी मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो.

सचिन परब
१५ ऑगस्ट २०२१

संपादकीय

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे. महाराष्ट्राच्या इतिहास आणि भूगोलालाही वळण लावणारी थोर व्यक्तिमत्त्वं विसाव्या शतकात होऊन गेली, त्यातलं एक महत्त्वाचं नाव. महात्मा फुले यांच्या सत्यशोधनाचा विचार पुढं नेणारे आक्रमक विचारवंत, भिक्षुकशाहीचा कर्दनकाळ ठरलेले समाजसुधारक, हुंड्यासारख्या चालीरितींविरुद्ध उभे ठाकलेले सामाजिक कार्यकर्ते, मराठी पत्रकारितेला नवी दिशा देणारे संपादक, जातनिष्ठ इतिहास लेखनाचा फोलपणा दाखवून इतिहासाची नवी मांडणी करणारे इतिहासकार, महाराष्ट्रभर सातत्याने फिरून विद्रोहाची पेरणी करणारे ज्वलंत वक्ते, समाज सुधारणांना जनसामान्यांपर्यंत पोचवण्यासाठी सर्वस्व पणाला लावणारे नाटककार, दिग्दर्शक आणि निर्मातेही, मोजक्याच पण ठसकेबाज भूमिका करणारे लक्षवेधी अभिनेते, सार्वजनिक नवरात्रोत्सवाचे संस्थापक, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांचे गुरुतुल्य मार्गदर्शक, संयुक्त महाराष्ट्र प्रत्यक्षात आणण्यासाठी वयाच्या सत्तरीत तुरुंगवास भोगणारे आंदोलनाचे नेते, गेल्या अर्धशतकापेक्षाही जास्त काळ महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी असणाऱ्या ठाकरे कुटुंबाचे प्रेरणास्थान, याशिवाय लेखक, कवी, संगीतकार, सतारवादक, पटकथालेखक, चित्रकार, फोटोग्राफर, शिक्षक, उद्योजक, विक्रेते, जनसंपर्क अधिकारी अशा विविध भूमिकांत वावरलेल्या अफाट बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचं कर्तृत्व शब्दांत पकडणं कठीण आहे.

'प्रबोधन' शताब्दी वर्ष

प्रबोधनकारांचा जन्म १७ सप्टेंबर १८८५ आणि मृत्यू २० नोव्हेंबर १९७३चा. त्यांना ८८ वर्षांचं दीर्घायुष्य लाभलं. हा बहुरंगी माणूस एका आयुष्यात अनेक आयुष्यं जगला. पण त्यात त्यांची ओळख बनलं ते त्यांनी संपादित केलेलं 'प्रबोधन' हे नियतकालिक. १६ ऑक्टोबर १९२१ ला 'प्रबोधन' नियतकालिकाचा पहिला अंक मुंबईहून प्रकाशित झाला. त्याला २०२१च्या १६ ऑक्टोबरला शंभर वर्षं होतील. त्याला धरून २०२०च्या १६ ऑक्टोबरपासून 'प्रबोधन' शताब्दी वर्षं साजरं करण्याची कल्पना सर्वात आधी 'साप्ताहिक चित्रलेखा'चे संपादक ज्ञानेश महाराव यांनी मांडली. आदल्याच वर्षी साजऱ्या झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपादित 'मूकनायक' पाक्षिकाच्या शताब्दीची पार्श्वभूमी याला

होती. २६ ऑक्टोबर २०२०च्या 'चित्रलेखा'त प्रबोधन शताब्दीचं महत्त्व सांगताना महाराव लिहितात, 'प्रबोधनकारांचे विचार हे मानसिक प्रगतीला चालना देणारे आहेत. अत्याधुनिक विज्ञानाचं प्रतीक असलेला कम्प्युटर वापरण्याचा प्रारंभही फुलं वाहून - नारळ फोडून (सॉरी वाढवून... तेही श्रीफळ आहे ना!) करणाऱ्या आजच्या तरुणांना तर प्रबोधनकारांच्या विचारांची नितांत गरज आहे. प्रबोधनकारांचे ९०-१०० वर्षांपूर्वीचे विचार आजही आवश्यक वाटावेत, ही अभिमानाने सांगण्यासारखी बाब नाही. तथापि, स्वतःला हायफाय, सुधारणावादी, कट्टर धर्म-राष्ट्रवादी म्हणवणाऱ्यांनी आपल्या भूमिकेचा कस पाहण्यासाठी प्रबोधनकारांचे विचार अवश्य वाचावेत.'

मात्र हे वर्ष कोरोनाच्या जागतिक साथीमुळे काळवंडलेलं असल्यामुळं शताब्दी वर्ष उत्साहानं साजरं करण्यावर अनेक मर्यादा आल्या. तरीही काही प्रयत्न झाले. 'प्रबोधन' शताब्दी साजरी करण्यासाठी 'प्रबोधनकार डॉट कॉम' या वेबसाईटने १६ ऑक्टोबर २०२० पासून प्रबोधनकारांवरील ११ ऑनलाइन व्याख्यानं आयोजित केली. ज्येष्ठ पत्रकार हरीश केंची यांच्या प्रयत्नातून 'संवाद' या संस्थेने पुण्याच्या बालगंधर्व नाट्यमंदिरात २० ते २६ जानेवारी २०२१ या काळात 'प्रबोधन शतकोत्सवा'चं आयोजन केलं. त्यात विविध मान्यवरांची व्याख्याने, प्रदर्शन, लघुपटाचं प्रक्षेपण, नाट्यगीत गायन असे कार्यक्रम झाले. महाराष्ट्र सरकारच्या 'मराठी भाषा विभागा'चे मंत्री सुभाष देसाई यांनी १ डिसेंबर २०२० रोजी ऑनलाईन बैठक घेऊन हे वर्ष साजरं करण्याच्या सूचना एकत्र केल्या. त्यानुसार 'प्रबोधनमधील प्रबोधनकार- प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख' हा ग्रंथ प्रकाशित होत आहे.

आजही 'प्रबोधन' महत्त्वाचं

'प्रबोधन' नियतकालिकाने घडवलेली जागृती हा महाराष्ट्राच्या समाज प्रबोधनाच्या, समाज सुधारणेच्या आणि पत्रकारितेच्या इतिहासाचा फार महत्त्वाचा भाग आहे. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीयुगाला सामोरं कसं जावं याविषयी महाराष्ट्र गोंधळलेला होता. त्याचबरोबर वेदोक्त प्रकरण आणि त्यातून निर्माण झालेला ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद टोकाला गेल्याने महाराष्ट्र हादरलेला होता. या पार्श्वभूमीवर 'प्रबोधन'चा जन्म झाला. त्यानंतरच्या म्हणजे १९२०च्या दशकातल्या जवळपास नऊ वर्षांतील महत्त्वाच्या नोंदी 'प्रबोधन'मधे आहेत. किंबहुना 'प्रबोधन' हा या सगळ्या सामाजिक आणि राजकीय घुसळणीचा एक भाग आहे. पहिल्या महायुद्धानंतर अमेरिका आणि जपान यांचा महासत्ता म्हणून होणारा उदय, असहकार आंदोलन, मोपल्यांचा मलबार येथील हिंसाचार, खिलाफत चळवळ या राष्ट्रीय पातळीवरच्या घडामोडी, तसंच १९२३च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका, त्यामुळं ब्राह्मणेतर चळवळीतल्या हालचाली, ब्राह्मणी वर्चस्ववाद्यांच्या कारवाया, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यांमुळे झालेले वाद, मुळशी सत्याग्रह, या महाराष्ट्रातल्या घडामोडींवर प्रबोधनकार ठाकरे यांच्यासारख्या महाराष्ट्रभर उत्तम जनसंपर्क असलेल्या अभ्यासू संपादकाने केलेली भाष्यं हा आज एक ऐतिहासिक दस्तावेज आहे.

तसंच लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे अशा या काळातील व्यक्तिमत्त्वांशी संबंधित ऐतिहासिक नोंदीही या लेखांमधे वाचता येतात. शिवाय स्वतः प्रबोधनकार ठाकरे यांचं चरित्रही

त्यांच्या साहित्यातून समोर येतं ते महत्त्वाचं आहे. १६ सप्टेंबर १९४५ मधे 'नवयुग' साप्ताहिकातल्या लेखात आचार्य प्र. के. अत्रे सांगतात, 'आजपर्यंत ठाकरे यांनी लिहिलेले सर्व प्रबोधक आणि तेजस्वी वाङ्मय एकत्रित करून ग्रंथरूपाने जर प्रकाशात आले तर महाराष्ट्राची सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या कामी या बंडखोर ब्राह्मणेतराने एका कालखंडात केवढी तेजस्वी कामगिरी करून ठेवलेली आहे, हे महाराष्ट्राला कळून आल्यावाचून राहणार नाही. अशा मान्यतेचा आणि गौरवाचा मुजरा महाराष्ट्र या कलमप्रभूला मोठ्या आनंदाने करील!'

महाराष्ट्रातल्या सामाजिक संघर्षाचा तपशीलवार पट 'प्रबोधन'मधून उभा राहतो, तो अधिक महत्त्वाचा आहे. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या ग्रंथात रा. के. लेले म्हणतात, 'ठाकरे यांच्या 'प्रबोधन' पत्राची कारकीर्द अवघी पाच-सहा वर्षांचीच होती; पण तेवढ्या अल्पावधीत त्याने केलेली वृत्तपत्राच्या व सामाजिक चळवळीच्या क्षेत्रांतील कामगिरी न विसरता येण्यासारखी आहे. ठाकरे ह्यांच्या पत्राचे स्वरूप राजकीय प्रश्नांवर भर देणारे नव्हते. आगरकरांप्रमाणे सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करणारे हे पत्र होते. आगरकरांच्या सामाजिक सुधारणांचा पाया अत्यंत शास्त्रशुद्ध होता; पण त्यांनी ज्या सुधारणांचा पुरस्कार केला, त्या पांढरपेशा वर्गापुरत्याच मर्यादित होत्या. त्यांच्या सुधारणावादाचे आवाहन बहुजन समाजापर्यंत पोचले नाही. त्यांनी म. जोतीराव फुले यांनी प्रसृत केलेले विचार व केलेले कार्य ह्यांची दखल घेतल्याचेही आढळत नाही. या दृष्टीने पाहिले तर ठाकरे ह्यांनी 'प्रबोधना'द्वारा ज्या सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला त्या अधिक व्यापक होत्या... या दृष्टीने ह्यांचे 'प्रबोधन' आगरकरांच्या पुढे काही पावले गेलेले होते.'

'प्रबोधन'ने त्याच्या प्रकाशनकाळात महाराष्ट्रावर कसा प्रभाव टाकला, हे पुढे दिलेल्या समकालीन पत्रकारांचे दोन उतारे वाचून कळू शकेल. १९३०च्या दरम्यान नागपूरहून ॲड. गोविंदराव प्रधान, शांतारामपंत देशपांडे आणि गोपाळराव दळवी मिळून 'जनता' नावाचं नियतकालिक काढत. या 'जनता'ने ९ जानेवारी १९३०च्या अंकात 'प्रबोधन'विषयी आपला अभिप्राय दिलेला आहे, 'प्रबोधनाने पांच वर्षांत आपल्या निर्भीड व कल्पनारम्य लिखाणाने महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून दिली. प्रबोधनकार ठाकरे व त्यांची तडफदार लेखणी महाराष्ट्राच्या चिरपरिचयाची आहे. त्यांची लिखाणे म्हणजे त्रस्त जिवांचे हाल पाहून भडभडून आलेल्या अंतःकरणाचे पडसाद आहेत. त्यांच्या लेखांतील प्रत्येक ओळींत व अक्षरांत धर्म व राजकारण ह्यांच्या नावाखाली छलवाद करणाऱ्या स्वार्थी सोद्यांचा निषेध दर्शविणारा जळजळीत संतापातिरेक दिसून येतो. मि. ठाकरे यांचे लिखाण म्हणजे डायनॅमिट. ते भटशाही, लाटशाही व भांडवलशाही यांच्या अभेद्य ठरलेल्या स्वार्थी तटांना आपल्या लेखणीच्या सुरुंगाने पार उडवून देते.'

आचार्य अत्रे 'प्रबोधन'विषयी लिहितात, 'अच्युतराव कोल्हटकर यांच्या 'संदेश' या पत्राने महाराष्ट्रात जी जागृती आणि खळबळ केली, तशाच प्रकारची खळबळ ठाकरे यांच्या प्रबोधनने करून सोडली, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. सदर मासिकामध्ये पाच-सहा वर्षेपर्यंत निरनिराळ्या सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक विषयांवर खळबळीत लेखमाला आणि निबंध लिहून ठाकरे यांनी बहुजन समाजाचे अक्षरशः प्रबोधन केले, यात संशय नाही. भिक्षुकी वृत्तीच्या आणि सनातनी दृष्टीच्या ब्राह्मण समाजावर अनेक निकराचे हल्ले त्यांनी आपल्या या पाक्षिकात चढविले, त्यामुळे

'कोदण्डाच्या टणत्कारा'पासून ब्राह्मण विद्वानांत अप्रिय झालेले त्यांचे नाव अधिकच तीव्रतेने त्या समाजाच्या डोळ्यांत सलू लागले. तथापि, सनातनी भिक्षुक समाजात हे जितके अप्रिय ठरले, तितकेच ब्राह्मणेतर समाजामध्ये ते लोकप्रिय होऊन बसले.'

'प्रबोधन'कारांनी मराठी समाजातले अनेक दोष १०० वर्षांपूर्वी दाखवलेले आहेत, जे आजही जसेच्या तसे आहेत. हुंड्याच्या विरोधात त्यांनी आंदोलन केलं; पण आजही हुंडा थांबलेला नाही. भिक्षुकशाहीच्या विरुद्ध त्यांनी रणशिंग फुंकलं होतं; पण आज जुनीच भिक्षुकशाही नवे मुखवटे घालून तसंच शोषण करते आहे. महाराष्ट्रातील इतिहास अजूनही स्वजातिभिमानाच्या चिखलात रुतून बसलाय. महिला सक्षमीकरणाची प्रबोधनकार सांगत असलेली निकड अजूनही कायम आहे. पूर्वीइतकी तीव्र अस्पृश्यता उरली नसली तरी जातिभेदाचे दुष्परिणाम महाराष्ट्र अजूनही भोगतोच आहे. महाराष्ट्रातल्या तरुणाला 'मानसिक गुलामगिरीविरुद्ध बंड' करण्याची ताकद आजही प्रबोधनकारांचे हे लेख देऊ शकतात. बहुजनवाद, हिंदुत्ववाद, गांधीवादच नाही तर कम्युनिझमविषयी आजच्या संदर्भात विचार करताना त्यांचा दृष्टीकोन महत्त्वाचा ठरतो. मात्र हे प्रबोधनकारांचं 'प्रबोधन'मध्ये प्रकाशित झालेलं लिखाण आजच्या अभ्यासकांसाठी आणि वाचकांसाठी उपलब्ध नव्हतं. 'प्रबोधन'चे अंक अत्यंत दुर्मिळ झाले आहेत. त्यामुळं हे 'प्रबोधन' शताब्दीच्या निमित्ताने पुन्हा प्रकाशित करणं, ही काळाची गरज होती. नियतकालिकांमधे प्रकाशित लिखाण खूप महत्त्वाचं असलं तरी ते दीर्घकाळ टिकण्यात अडचणी असतात. त्या तुलनेत त्यातील लिखाण पुस्तकरूपाने एकत्र आणल्यास त्याचं जीवनमान वाढतं आणि आजच्या डिजिटल युगात तर ते कायमस्वरूपी चिरंतन होऊ शकतं.

लेख जसेच्या तसे वाचकांसमोर

'प्रबोधन'चा पहिला अंक १६ ऑक्टोबर १९२१ ला प्रकाशित झाला. पहिली दोन वर्षं म्हणजे १९२१-१९२२ आणि १९२२-१९२३ या प्रकाशन वर्षांत 'प्रबोधन' मुंबईतून पाक्षिक म्हणून नियमित प्रकाशित झालं आहे. दोन्ही वर्षी दर महिन्याच्या १ आणि १६ तारखेला 'प्रबोधन' प्रकाशित होत असे. या दोन वर्षांचे मिळून ४८ अंक उपलब्ध आहेत. तिसऱ्या प्रकाशन वर्षात 'प्रबोधन' सातारा रोडहून प्रकाशित होऊ लागलं. १९२३-१९२४ या प्रकाशन वर्षाचेही पाक्षिक म्हणून पहिले १८ अंक सलग निघाले आहेत. त्यानंतर 'प्रबोधन' दहा महिने प्रकाशित होऊ शकलं नव्हतं. चौथ्या वर्षापासून 'प्रबोधन' मासिक बनून पुण्याहून प्रकाशित होऊ लागलं. चौथ्या वर्षात एप्रिल १९२५ पासून मे १९२६ या १४ महिन्यांत 'प्रबोधन'चे १२ अंक प्रकाशित झाले. पाचव्या प्रकाशन वर्षातला पहिला अंक जुलै १९२६ चा आहे. तेव्हापासून नोव्हेंबर १९२७ पर्यंत दहा अंक प्रसिद्ध झालेत. त्यानंतर तब्बल दोन वर्षांचा खंड आहे. ऑक्टोबर १९२९ मधे पाचव्या प्रकाशन वर्षांचा ११-१२ वा जोडअंक प्रकाशित झालाय. सहाव्या प्रकाशन वर्षात नोव्हेंबर १९२९ पासून मार्च १९३० पर्यंत सलग पाच अंक प्रकाशित झाले आहेत. त्यानंतर कोणतीही घोषणा न करता 'प्रबोधन' बंद पडलं. अधिक नेमकेपणानं बोलायचं तर त्यानंतर 'प्रबोधन'चा कोणताही अंक आज उपलब्ध नाही.

याचाच अर्थ 'प्रबोधन'चे पहिल्या प्रकाशन वर्षांत २४, दुसऱ्या प्रकाशन वर्षात २४, तिसऱ्या प्रकाशन वर्षात १८, चौथ्या प्रकाशन वर्षात १२, पाचव्या प्रकाशन वर्षात १२ (एक जोडअंक असल्यामुळे खरंतर अकराच) आणि सहाव्या प्रकाशन वर्षात ५ अंक प्रकाशित झालेले आढळतात.

ऑक्टोबर १९२१ ते मार्च १९३० या ८ वर्षं ५ महिने कालावधीत 'प्रबोधन'चे ९५ अंक प्रकाशित झालेत. ग्रंथालयं आणि वैयक्तिक ग्रंथसंग्रहातून त्यापैकी ९१ अंक या ग्रंथासाठी उपलब्ध झाले. हे अंक कुठून आणि कोणाकडून मिळाले याची नोंद कृतज्ञता या शीर्षकाखाली प्रस्तावनेच्या आधी वेगळी केलेली आहे. मात्र तिसऱ्या वर्षातले १, २, ३ आणि ९ हे सातारा इथे प्रकाशित झालेले अंक उपलब्ध होऊ शकले नाहीत.

या उपलब्ध अंकांमधले प्रबोधनकार ठाकरे यांनी लिहिलेले लेख या संग्रहात समाविष्ट केलेले आहेत. यात या अंकांमधले सगळे अग्रलेख आहेतच. तो काळ संपादकाने एकहाती लेखन करण्याचा होता. प्रबोधनकारही प्रबोधनमधला बरासचा मजकूर स्वतःच लिहीत असत. त्यामुळं संपादक सोडून इतर लेखकानं लेख दिल्यास त्याचं नाव लेखाच्या वर किंवा खाली नोंदवलं जात असे. छोट्या स्फुटांना नाव देणं योग्य वाटत नसलं तरी लिहिणाऱ्याचं टोपण नाव किंवा निदान आद्याक्षरं तरी छापलेली असत. त्यामुळं असं कोणतंही नाव नसलेलं सगळं लिखाण हे संपादकानं लिहिलेलं असे. 'प्रबोधन'मधेही हा शिरस्ता पाळलेला दिसतो. सहसंपादकाचं टिपण असेल तरी त्याखाली सहसंपादक असं लिहिलेलं आढळतं. त्यामुळं एखादा सहसंपादक 'प्रबोधन'मधले अग्रलेख किंवा इतर नाव नसलेले लेख लिहीत असण्याची शक्यता कमीच असावी. त्यामुळं ज्यावर 'बायलाइन' नाही, ते सगळे लेख प्रबोधनकारांचे मानावे लागतात. या निकषानुसार प्रबोधनकारांचे असलेले लेख, स्फुट लेख, अनुवाद, श्रद्धांजलीपर टिपणं, पुस्तक परिचय, पोवाडा आणि वाचकांसाठी लिहिलेली निवेदनं या लेखसंग्रहात घेतलेली आहेत. थोडक्यात प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधे लिहिलेले जास्तीत जास्त लेख, कोणतीही निवड न करता जसेच्या तसे अभ्यासकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न यात केला आहे. त्यात कोणतेही बदल केलेले नाहीत. त्याचं वेगळं वर्गीकरणही केलेलं नाही. अंकांच्या प्रकाशनाच्या काळानुसार एकेका अंकातले लेख ओळीने मांडले आहेत. त्यातलं व्याकरण जुनंच ठेवलं आहे. कागद जुना झाल्यामुळं किंवा फाटल्यामुळं कुठं शब्द किंवा वाक्यं वाचता आली नाहीत, तिथं तसं स्पष्टपणे नोंदवलेलं आहे. प्रबोधनकारांची भाषा जहाल आणि विचार टोकदार असल्यामुळं क्वचित ठिकाणी एखाद्याच्या भावना दुखावू शकतात. त्याऐवजी त्या काळाच्या आणि परिस्थितीचा संदर्भ लक्षात घेऊन या परिवर्तन घडवणाऱ्या विचारांचं महत्त्व लक्षात घ्यावं.

प्रबोधनकारांचं अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्याचा उद्देश या ग्रंथनिर्मितीमागे आहे. प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधल्या अनेक लेखांची पुस्तकं किंवा पुस्तिका छापल्या. त्यातली ज्यांची पुस्तकं आज उपलब्ध आहेत, ते 'प्रबोधन'मधले लेख या संग्रहात वगळलेले आहेत. एस. सी. मुकर्जी यांनी लिहिलेल्या 'द डिक्लाइन अँड फॉल ऑफ द हिंदूज' या इंग्रजी ग्रंथाचा प्रबोधनकार ठाकरे यांनी 'हिंदू धर्माचा ऱ्हास आणि अधःपात' या नावाने अनुवाद केला होता. तो ग्रंथ 'प्रबोधन'मधे टप्प्याटप्प्याने लेख स्वरूपात प्रकाशित झाला होता. 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'च्या प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मयाच्या चौथ्या खंडात हा संपूर्ण ग्रंथ दिलेला आहे. त्यामुळं ते लेख या संग्रहात घेतलेले नाहीत. शिवाय 'वैदिक विवाहविधीचे संशोधन', 'साताऱ्याचे दैव आणि दैवाचा सतारा', 'बजरंगी सोटा', 'टेम्प्ट्रेस', 'महामायेचे थैमान' या लेखांची झालेली पुस्तकं 'प्रबोधन प्रकाशन'ने गेल्या वर्षीच पुस्तकरूपाने उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळं त्याचाही समावेश या संग्रहात नाही. मात्र 'आई'

आणि 'देवळांचा धर्म, धर्माची देवळे' हे दोन लेख त्यातले विचार तसंच शैलीमुळे 'प्रबोधन'ची ओळख ठरले आहेत. त्यामुळे त्यांचं महत्त्व लक्षात घेता, ते लेख पुस्तकरूपाने उपलब्ध असूनही अपवाद म्हणून या संग्रहात ठेवणं आवश्यक वाटलं. 'दगलबाज शिवाजी' हा लेखही पूर्वी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला होता. मात्र तो आता वाचकांसाठी उपलब्ध नसल्याने या संग्रहात घेतलेला आहे.

डॉ. अनंत गुरव हे 'केशव सीताराम ठाकरे यांच्या 'प्रबोधन' या नियतकालिकाचा अभ्यास' या अप्रकाशित पीएच.डी. प्रबंधात लिहितात, 'प्रबोधन' नियतकालिकाची संपादकपदाची जबाबदारी सांभाळताना केशव ठाकरे यांनी अनेक टोपण नावांनी विविध विषयावर लिखाण केले आहे. केशव ठाकरे यांनी वापरलेले टोपणनाव आणि लेखाची नावे पुढीलप्रमाणे आहेत. **भारतभृत्य** - कृष्णचारित्र्यावरील दोन आक्षेप, हुंड्याची हुंडादी, **नूर** - शेवटी येळकोट केलाच पाहिजे, **ऐदी उद्योगी** - विचार तरंग, **निर्विकल्प** - ब्राह्मणांचा देव परशुराम, कालाय तस्मै नमः, चळवळ जरा गारठलेली दिसते, **हेमगर्भ** - हेमगर्भाच्या मात्रेचे वळसे, **सवाई दादोबा** - विनोदाचे पान, **हेमगर्भ सहाणपूरकर** - हेमगर्भाचे वळसे.' मात्र ही टोपणनावं प्रबोधनकारांचीच असल्याचा कोणताही भक्कम संदर्भ डॉ. गुरव देत नाहीत. ते सांगतात, 'या लेखातील टीकेचा रोख, त्यातील उपमा, समस्येवर सुचविलेल्या उपाययोजना, सरकारी नोकरांबद्दलचे मत लक्षात घेता हे केशव ठाकरे यांनी केलेले लिखाण आहे हे समजून येते.' डॉ. गुरव यांनी सांगितल्याप्रमाणे या लेखांत ठाकरे शैली आहेच. पण त्यामुळे हे लेख प्रबोधनकारांनीच लिहिल्याचं सिद्ध होत नाही किंवा गृहीतही धरता येत नाही. अनेकदा अंकातला बहुतेक मजकूर एकहाती लिहिणारे प्रबोधनकार या विषयांसाठी टोपण नाव का घेतील, याचं कारण सापडत नाही. त्यामुळं हे लेख या संग्रहात घेतलेले नाहीत.

पत्रकारितेच्या प्रबोधनाची पार्श्वभूमी

इंग्रजी शाळेत जात असताना प्रबोधनकारांनी मुंबईच्या रस्त्यावर विकत घेतलेल्या पॉकेट एन्सायक्लोपीडियातून दोन लेख मराठीत अनुवादित केले होते. त्यातला एक 'वृत्तपत्रांची उत्पत्ती' असा होता आणि तो त्या काळात लोकप्रिय असलेल्या 'करमणूक' साप्ताहिकात त्यांच्या नावासह प्रसिद्ध झाला होता. तो आज उपलब्ध नसल्यामुळे त्यात काय लिहिलं असेल याचा फक्त अंदाज बांधता येतो. प्राचीन काळातल्या ज्युलियस सीझरची ॲक्टा डायरना ही सरकारी पत्रकं, मध्ययुगातली न्यूजलेटर्स, छपाईच्या शोधानंतरच्या हॅण्डबिल, कोरंट आणि गॅझेट या वर्तमानपत्रांच्या पूर्वरूपांचा आढावा त्यात असू शकेल. १६२१ मधे इंग्लंडमधल्या अगदी प्राथमिक स्वरूपाच्या वृत्तपत्राची सुरुवात झाली, हा इतिहासही त्यात असू शकेल. ही पत्रकारितेची पार्श्वभूमी 'प्रबोधन'ची पार्श्वभूमी समजून घेतानाही उपयुक्त ठरते.

ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली तेव्हा तिने छपाईबरोबरच वर्तमानपत्रंही आणली. जेम्स ऑगस्टस हिकी या कंपनीच्या माजी नोकराने भारतातलं पहिलं वर्तमानपत्रं जन्माला घातलं. २९ जानेवारी १७८०ला 'बेंगाल गॅझेट' किंवा 'हिकीज जर्नल' हे इंग्रजी साप्ताहिक सुरू झालं. त्यानंतर १९ वर्षांनी म्हणजे १७८९ मध्ये मुंबईत 'बॉम्बे हेरॉल्ड' हे इंग्रजी पत्रं निघालं. पुढच्या वर्षी निघालेल्या 'बॉम्बे कुरियर' या इंग्रजी वृत्तपत्रात काही मराठी जाहिराती मोडी लिपीत होत्या. ही सगळी वृत्तपत्रं इंग्रजच काढत. कोलकात्यात गंगाधर भट्टाचार्य हे १८१६ मधे 'बेंगॉल गॅझेट' हे वृत्तपत्र सुरू करणारे पहिले

भारतीय ठरले. कोलकात्याजवळच्या श्रीरामपूर येथील बॅप्टिस्ट मिशनऱ्यांनी धर्मप्रसारासाठी 'समाचार दर्पण' हे बंगाली साप्ताहिक २३ मे १८१८ला सुरू केलं. ती भारतीय भाषेमधल्या पत्रकारितेची सुरुवात होती. राजा राममोहन रॉय यांच्या 'संवाद कौमुदी' आणि 'मिरात उल अखबार' यांनी या पत्रकारितेला देशी स्वरूप मिळवून दिलं.

इथे मुंबईतही इंग्रजी आणि त्यानंतर पारशांमुळे गुजराती वर्तमानपत्रं सुरू झाली होती. त्याची प्रेरणा घेऊन २० जुलै १८२८ला 'मुंबापूर वर्तमान' हे मराठी वर्तमानपत्र सुरू झालं. पण त्याच्याविषयी फारशी माहिती आज उपलब्ध नाही. विद्वान समाजसुधारक बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ला 'दर्पण' हे पाक्षिक सुरू केलं. त्यात मराठीबरोबरच इंग्रजी मजकूरही असायचा. चार महिन्यांनी ते साप्ताहिक रूपात सुरू झालं. जुलै १९४०मधे सुरू झालेलं 'मुंबई अखबार' हे साप्ताहिक पूर्ण मराठी असं पहिलं वर्तमानपत्रं ठरलं. त्यानंतर 'प्रभाकर', 'ज्ञानसिंधु', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश' अशा वर्तमानपत्रांनी मराठी वर्तमानपत्रांचा प्रवाह बळकट केला. तेव्हापासून 'प्रबोधन'च्या आरंभापर्यंतचा काळ 'इंदुप्रकाश', 'विविध ज्ञानविस्तार', 'नेटिव ओपिनियन' , 'सुबोधपत्रिका', 'दीनबंधु', 'केसरी', 'सुधारक', 'करमणूक' , 'काळ', 'दिनमित्र', 'भाला', 'राष्ट्रमत', 'संदेश', 'जागृती', 'विजयी मराठा', 'मूकनायक', 'लोकमान्य' या वर्तमानपत्रांनी गाजवला.

सत्यशोधकी पत्रकारितेचा जोमदार प्रवाह

डॉ. जयसिंगराव पाटील आणि डॉ. रमेश जाधव यांनी 'निवडक विजयी मराठा' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत या काळातल्या मराठी वर्तमानपत्रांना पाच प्रवाहांमधे विभागलं आहे.

एक - केवळ लोकशिक्षण आणि मनोरंजनाचा वसा घेऊन सुरू झालेल्या बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण'पासून पहिला प्रवाह सुरू होतो.

दोन - ब्राह्मणेतरांची दुःखं अधिक प्रभावीपणे वेशीवर टांगण्याची सामाजिक बांधिलकी मानून अवतरलेला कृष्णराव भालेकरांचा 'दीनबंधु' आणि त्या परंपरेतली पत्रं.

तीन - त्याआधीचा ख्रिश्चन धर्माचा प्रसार आणि प्रचार हेच उद्दिष्ट समोर ठेवून अस्तित्वात आलेला 'ज्ञानोदय' आणि इतर ख्रिश्चन पत्रं.

चार - केवळ राजकीय स्वातंत्र्य हाच ध्यास घेऊन जन्मास आलेला लोकमान्य टिळकांचा 'केसरी' आणि त्या गटातली पत्रं.

पाच - पाचवा प्रवाह म्हणून भाऊ महाजन यांचा 'प्रभाकर' आणि गोपाळ गणेश आगरकरांचा 'सुधारक' यांचा उल्लेख करता येईल.

यात 'प्रबोधन' कोणत्या प्रवाहातलं नियतकालिक आहे? तर त्याला निर्विवादपणे यातल्या दुसऱ्या म्हणजे सत्यशोधकी प्रवाहातलं नियतकालिक मानायला हवं. पण त्याच बरोबर 'प्रभाकर' आणि 'सुधारक' यांच्या समाजप्रबोधन करणाऱ्या पत्रांच्या पाचव्या प्रवाहाशीही ते जोडलेले होते. प्रबोधनकारांवर सर्वाधिक प्रभाव असलेल्या लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांची गाजलेली शतपत्रे ही 'प्रभाकर'मध्येच प्रकाशित झाली होती आणि प्रबोधनकार आगरकरांचे कट्टर समर्थकही होते. त्याचबरोबर विदेशी ज्ञान देशबांधवांपर्यंत घेऊन जाण्यासाठी आग्रही असणाऱ्या दर्पणकारांच्या प्रवाहाचंही त्यांना वावडं नव्हतं. तसे लेख प्रबोधनमधे प्रकाशित झालेले आढळतात. मात्र 'प्रबोधन'

ख्रिश्चन पत्रांपासून फटकून राहतं आणि 'केसरी' गटाच्या प्रवाहाच्या विरुद्ध दोन हात करताना दिसतं.

महात्मा जोतीराव फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्माच्या तत्त्वज्ञानाची प्रेरणा घेऊन सत्यशोधकी नियतकालिकांचा जोमदार प्रवाह सुरू झाला. आजही या विचारांची नियतकालिके आणि अनियतकालिके प्रकाशित होत असतात. या प्रवाहाविषयी 'सत्यशोधकीय नियतकालिके' या ग्रंथात डॉ. अरुण शिंदे लिहितात, 'सत्यशोधक विचारांचा व चळवळीचा प्रचार, प्रसार करण्यासाठी १८७७ ते १९३० या काळात सुमारे साठहून अधिक नियतकालिके निघाली. 'दीनबंधु' , 'दीनमित्र', 'शेतकऱ्याचा कैवारी', 'विजयी मराठा', 'जागृति', 'राष्ट्रवीर', 'हंटर', 'प्रबोधन' , 'नवयुग', 'ब्राह्मणेतर', 'कैवारी', 'भगवा झेंडा' इत्यादी नियतकालिकांनी सत्यशोधकांचा लढा वैचारिक पातळीवर लढविला. तत्कालीन पांढरपेशांच्या नियतकालिकांपेक्षा सत्यशोधक चळवळीच्या नियतकालिकांची उद्दिष्टे, त्यांमधील लेखन, वाङ्मय व बातमीपत्रे पूर्णतः भिन्न होती. या नियतकालिकांमुळे बहुजन समाजाच्या पत्रकारितेची एक अत्यंत सकस व लोकनिष्ठ परंपरा मराठीत पहिल्यांदाच निर्माण झाली.'

या परंपरेची सुरुवात महात्मा फुलेंच्या हयातीतच झाली. त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांनी १ जानेवारी १८७७ ला 'दीनबंधु' हे सत्यशोधकी विचारांचं पहिलं नियतकालिक सुरू केलं. काही वर्षांचा खंड वगळता ते १९३३ पर्यंत सुरू राहिलं. १९०८ ते १९३३ या काळात तानुबाई बिर्जे या मराठा समाजातील विदुषींनी त्याचं संपादकपद भूषवलं. खुद्द जोतीरावांनी 'सत्सार' नावाच्या अनियतकालिकाचे दोन अंक प्रसिद्ध केले. त्यानंतर भालेकरांचे भाचे गणपतराव पाटील यांच्या 'दीनमित्र'ने ही लढाई पुढे नेली. पण गणपतराव यांचं अवघ्या सत्ताविसाव्या वर्षी निधन झालं. कृष्णराव भालेकरांनी आपला मुलगा गणपतरावांच्या पत्नीला दत्तक दिला. तेच दीनमित्रकार मुकुंदराव पाटील होत. भालेकरांनी गणपतरावांच्या मृत्यूमुळे बंद पडलेला 'दीनमित्र' सुरू राहावा म्हणून १९१०ला अहमदनगर जिल्ह्यातल्या सोमठाणे इथे छापखाना थाटला. पण त्या धावपळीतच त्यांचं निधन झालं. तेव्हा त्यांनी तरुण मुकुंदरावांकडून वचन घेतलं, की किमान बारा वर्षं तरी हे नियतकालिक सुरू ठेवशील. त्यानंतर अनेक संकटांना तोंड देत अत्यंत ध्येयनिष्ठेने त्यांनी १९६८ पर्यंत सलग ५७ वर्षं 'दीनमित्र' चालवलं. ज्या गावात एसटीही जात नव्हती त्या तरवडी या गावातून सर्वस्व पणाला लावून 'दीनमित्र' चालवताना विचारांवरची निष्ठा अढळ ठेवली. मृत्यूशयेवर वृत्तपत्र सुरू ठेवण्याचं वचन घेणाऱ्या आणि ते वचन पूर्ण करण्यासाठी एकहाती संघर्ष करणाऱ्या या बापलेकांचं मराठी पत्रकारितेतलं महत्त्व सर्वोच्च मानावं लागेल.

'दीनबंधु', 'सत्सार', 'दीनमित्र' पाठोपाठ आलेल्या सत्यशोधक चळवळीतल्या नियतकालिकांचा आढावा अरुण शिंदे यांच्या ग्रंथात आहे. त्यातली ऑक्टोबर १९२१ पर्यंत प्रकाशित झालेली नियतकालिकं अशी - गुलाबसिंह कौशल यांचं 'राघव भूषण' (स्थापना वर्ष १८८८), कृष्णराव भालेकरांचं 'अंबालहरी' (१८८९), दामोदर सावळाराम यंदे आणि संतुजी आवटे यांचं 'शेतकऱ्याचा कैवारी' (१८९२), भास्करराव जाधव यांचं 'मराठा दीनबंधु' (१९०२), बळवंत पिसाळ यांचं 'विश्वबंधु' (१९११), कृष्णाजी चौधरी यांचं 'सत्योदय' (१९१५), वा. रा. कोठारी यांचं 'जागरूक' (१९१७), भगवंतराव पाळेकर यांचं 'जागृति' (१९१७), अण्णासाहेब लठ्ठे यांचं 'डेक्कन रयत' (१९१६), नारायण विभुते यांचं 'सत्यप्रकाश' (१९१९), श्रीपतराव शिंदे यांचं 'विजयी मराठा' (१९२५), बाबूराव कैवारी

यांचं गरिबांचा 'कैवारी' (१९२०), दत्तोजीराव कुरणे यांचं 'भगवा झेंडा' (१९२०), सखाराम सावंत आणि दिनकरराव जवळकर यांचं 'तरुण मराठा' (१९२०), शामराव भोसले आणि सहकाऱ्यांचं 'राष्ट्रवीर' (मे १९२१). याचा अर्थ प्रबोधनची सुरवात होईपर्यंत सत्यशोधकी नियतकालिकांचा प्रवाह महाराष्ट्राच्या गावागावांत प्रभाव टाकू लागला होता. प्रामुख्याने छत्रपती शाहू महाराज आणि महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या राजाश्रयामुळे या नियतकालिकांची संख्या सतत वाढत होती.

महात्मा फुलेंच्या शिकवणुकीला अनुसरून ही नियतकालिकं समता, बंधुता आणि बुद्धिप्रामाण्य या तत्त्वांचा प्रसार करत होती. शेतकऱ्यांना सावकारांच्या, धर्माला पुरोहितशाहीच्या, देवाला पुजाऱ्यांच्या आणि समाजाला अंधश्रद्धेच्या जोखडातून सोडवण्यासाठी त्यांचा लढा होता. अस्पृश्यता आणि जातिभेदाचं उच्चाटन, धर्मचिकित्सा, इतिहासाचं पुनर्लेखन, स्त्रीपुरुष समानता असे अनेक महत्त्वाचे विचार ती मांडत होती. वैचारिक दृष्टीनं पाहता प्रबोधनकार याच प्रवाहातले होते; पण तरीही त्यांनी सत्यशोधकी विचारांपेक्षा वेगळी मतंही 'प्रबोधन'मधे मांडली. त्याचा संदर्भ घेऊन अरुण शिंदे सत्यशोधकी नियतकालिकांच्या प्रवाहामधलं 'प्रबोधन'चं स्थान निश्चित करताना सांगतात, 'हाडाचा पत्रकार असणाऱ्या के. सी. ठाकरे यांनी प्रबोधनमधून सत्यशोधक चळवळीस पूरक भूमिका घेतली. सत्यशोधक समाजाच्या विचारानुरूप लेखन केले. सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीतील दोषांवर कडक टीका करून चळवळ निकोप होण्यासाठी प्रयत्न केले. के. सी. ठाकरे व 'प्रबोधन' पूर्णतः सत्यशोधकी मतांचे नसले तरी त्यांची भूमिका व कार्य सत्यशोधक चळवळीला प्रेरक, प्रोत्साहक व दिशादर्शक ठरले, हे निर्विवाद!'

प्रबोधनकारांवरील अभ्यासाचे स्रोत

प्रबोधनकारांचं कर्तृत्व आणि विचार अभ्यासकांच्या दृष्टीने कायम दुर्लक्षित राहिले, अशी खंत नेहमी व्यक्त केली जाते. 'राजर्षि शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे' या ग्रंथात डॉ. जयसिंगराव पवार लिहितात, 'राजर्षि शाहू छत्रपतींवर आता उदंड साहित्य प्रकाशित होत आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांचीही मराठीत, इंग्रजीत अनेक चरित्रे प्रकाशित होत आहेत. त्या मानाने प्रबोधनकारांचे चरित्र मात्र उपेक्षित राहिले आहे. सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, वृत्तपत्रीय चळवळ अशा अनेक चळवळी गाजविणारे आणि समाजप्रबोधन, काव्यशास्त्रविनोद, इतिहाससंशोधन, ललितकला इत्यादी क्षेत्रांत लीलयेने संचार करणारे प्रबोधनकार महाराष्ट्रात अजूनही उपेक्षित का राहावेत, हा खरोखरच समाजशास्त्रीय संशोधनाचा विषय आहे.'

एका विचारधारेच्या चाकोरीत किंवा चौकटीत अडकणं प्रबोधनकारांना मान्य नव्हतं. त्यामुळं आजही कोणत्याही एका विचारधारेचे किंवा वादाचे चष्मे घालून त्यांच्या चरित्राकडे बघता येत नाही. ते एकाच वेळी बहुजनवादी असतात आणि त्याच वेळी हिंदुत्ववादीही असतात. प्रबोधनकार म्हणून आवडणाऱ्यांना त्यांचं ठाकरे असणं डाचत होतं आणि ठाकरे म्हणून प्रेमात असणाऱ्यांना त्यांच्या प्रबोधनकार असण्याचा विटाळ होता. त्यामुळं त्यांच्या स्वतंत्र विचारमार्गाचा अनुयायीवर्ग निर्माण झाला नाही. परिणामी महाराष्ट्राच्या प्रबोधनपर्वातल्या अभिजनी विचारवंतांप्रमाणे त्यांच्यावर अभ्यास झालेला दिसत नाही; पण सत्यशोधक परंपरेतले कृष्णराव भालेकरांपासून रा. ना. चव्हाणांपर्यंतचे अनेक विद्वान विचारवंत मोठं कर्तृत्व करूनही अभ्यासकांकडून पूर्णपणे दुर्लक्षित राहिले. तितकंही

दुर्लक्ष प्रबोधनकारांच्या बाबतीत झालं नाही. प्रबोधनकारांचे चिरंजीव शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे पुढच्या पिढ्यांपर्यंत त्यांचं नाव तरी पोहचत राहील. त्यातून त्यांच्यावर थोडाफार हा होईना पण अभ्यास होत राहिला. प्रबोधनकारांच्या विचारांचे महत्त्वाचे अभ्यासक ज्ञानेश महाराव याविषयी लिहितात, 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे वडील, उद्धव व राज ठाकरे यांचे आजोबा, आदित्य ठाकरेंचे पणजोबा म्हणून त्यांचं नाव घेतलं जातं. ही ओळख खरीच आहे; पण पुरेशी नाही. प्रबोधनकारांच्या तडफेनेच सत्यशोधक पत्रकार म्हणून मुकुंदराव पाटील, खंडेराव बागल, श्रीपतराव शिंदे, दिनकरराव जवळकर, भगवंतराव पाळेकर, शामराव देसाई यांनी पत्रकारिता केली. पण त्यांच्या कार्याची नाही चिरा, नाही पणती अशी स्थिती आहे.'

प्रबोधनकारांच्या अभ्यासासाठी त्यांनी लिहिलेलं साहित्य हा सर्वांत महत्त्वाचा संदर्भ आहे. त्यातही त्यांचं 'माझी जीवनगाथा' हे आत्मचरित्र त्यांच्या आयुष्यातल्या साधारण १९४० पर्यंतच्या म्हणजे वाडिया मुविटोन कंपनीत नोकरीला लागेपर्यंतच्या घटना अगदी सविस्तर मांडतं. त्यात कौटुंबिक प्रसंगांची वर्णनं नाहीत, तर आठवणी सांगण्याच्या निमित्ताने महाराष्ट्राचा सामाजिक इतिहासच आहे. 'प्रबोधन'च्या प्रवासातल्या घडामोडींचं तपशीलवार वर्णन त्यात असल्याने 'प्रबोधन'च्या अभ्यासकांसाठी ते फारच महत्त्वाचं आहे. त्याशिवाय त्यांच्या 'शनिमहात्म्य' या पुस्तकात 'प्रबोधन'च्या प्रकाशन काळातल्याच घटनांचा इतिहास रंजकपणे नोंदवलेला आहे. शिवाय 'जुन्या आठवणी' या पुस्तकातही त्यांच्या आयुष्याचे काही कवडसे सापडतात.

प्रबोधनकार ठाकरे यांचं साहित्य दीर्घकाळ उपलब्ध नव्हतं. हे लक्षात घेऊन 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'ने १९९७ पासून २००७ पर्यंत प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मयाचे पाच खंड प्रकाशित केले. त्यात त्यांची महत्त्वाची पुस्तकं वाचकांना उपलब्ध झाली.

पहिला खंड - यात 'माझी जीवनगाथा', 'जुन्या आठवणी' ही आत्मचरित्रपर दोन पुस्तकं आहेत.

दुसरा खंड - 'प्रतापसिंह छत्रपति आणि रंगो बापूजी' हे महत्त्वाचं चरित्र या खंडात आहे.

तिसरा खंड - 'संगीत सीताशुद्धी', 'टाकलेलं पोर', 'संगीत काळाचा काळ', 'खरा ब्राह्मण', 'संगीत विधिनिषेध ही प्रबोधनकारांची पाच नाटकं यात आहेत.

चौथा खंड - या खंडाचं शीर्षक 'हिंदुत्व' असं आहे. 'हिंदुधर्माचे दिव्य आणि संस्कृतीचा संग्राम', 'हिंदुजनांचा ऱ्हास आणि अधःपात', 'देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे' ही तीन पुस्तकं या खंडात आहेत.

पाचवा खंड - 'ग्रामण्याचा साद्यंत इतिहास', 'भिक्षुकशाहीचे बंड', 'कोदण्डाचा टणत्कार अथवा भारत इतिहास संशोधक मंडळास उलट सलामी' हे तीन महत्त्वाचे संशोधनात्मक ग्रंथ या खंडात आहेत.

या खंडांची नवी आवृत्ती 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'ने उपलब्ध करून दिली आहे. 'प्रबोधन प्रकाशन'ने २०१९च्या प्रबोधनकार जयंतीच्या निमित्ताने सात पुस्तकांत प्रबोधनकारांचे अप्रकाशित ग्रंथ उपलब्ध करून दिलेत. त्या पुस्तकांमधे असलेली पुस्तकं - 'शनिमहात्म्य', 'वक्तृत्व कला आणि साधना', 'शेतकऱ्यांचे स्वराज्य', 'बजरंगी सोटा', 'टेम्प्ट्रेस', 'महामायेचे थैमान', 'श्रीसंत गाडगेबाबा', 'स्वाध्याय संदेश', 'कुमारिकांचे शाप', 'रायगड : यात्रा, दर्शन, माहिती', 'पावनखिंडीचा

पोवाडा', 'आई', 'सातारचे दैव का दैवाचा सतारा', 'पोटाचे बंड - माणसातले सुरवंट', 'वैदिक विवाह विधी'. याशिवाय 'दगलबाज शिवाजी' ही पुस्तिका 'नवता प्रकाशन' आणि 'सनय प्रकाशन' यांनी पुनर्प्रकाशित केली होती. प्रबोधनकारांचे संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या काळातील लेखांचा संग्रह प्रबोधन प्रकाशननेच 'घाव घाली निशाणी' या नावाने प्रकाशित केला आहे. शिवाय अजय कुदळे यांनी दैनिक मराठामधले प्रबोधनकारांचे लेख 'संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील प्रबोधन' या नावाने एकत्र केले आहेत. तसेच त्यांनी 'मार्मिक'मधे लिहिलेल्या लेखांचा संग्रह 'ऊठ मऱ्हाठ्या ऊठ' हा पुनर्प्रकाशित होऊनदेखील आता उपलब्ध नाही.

विद्यापीठीय संशोधनाच्या पातळीवर प्रबोधनकार ठाकरे यांच्यावर पीएचडीचे पाच प्रबंध झालेले आढळतात.

१. **डॉ. गोपाळ डिवरे** यांनी 'केशव सीताराम ठाकरे यांची साहित्यिक कामगिरी' या विषयावर अमरावती विद्यापीठातून १९९०ला डॉक्टरेट मिळवली.

२. परभणीच्या **डॉ. विठ्ठल घुले** यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून' 'प्रबोधनकार ठाकरे आणि त्यांचे सत्यशोधक चळवळीला योगदान' या विषयावर २००२ ला पीएचडी मिळवली. डॉ. घुले यांनी संपादित केलेले 'प्रबोधनकारांचे शनिमहात्म्य' हे पुस्तक २०१५ला प्रकाशित झालं आहे.

३. आजरा येथील **डॉ. नवनाथ शिंदे** यांनी 'शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर' इथून २००६ ला प्रबोधनकार ठाकरे यांचे 'महाराष्ट्रातील सामाजिक विचारांचे योगदान : एक समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयावर डॉक्टरेट मिळवली. त्याआधीच त्यांनी 'सत्यशोधक विचाराची तळपती तलवार प्रबोधनकार ठाकरे' हे पुस्तक लिहिलेले होते. ते आता 'प्रबोधनकार ठाकरे : कार्य आणि कर्तृत्व' या नावाने उपलब्ध आहे. शिवाय त्यांचा पीएचडीचा प्रबंध 'प्रबोधनकार ठाकरे : सामाजिक व सांस्कृतिक क्रांतीचा ज्वालामुखी' या नावाने प्रकाशित झालाय. तसंच त्यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्यावर लिहिलेला एक एकपात्री प्रयोग पुस्तकरूपाने प्रकाशित झाला आहे.

४. पत्रकार **डॉ. अनंत गुरव** यांनी 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा'तून 'केशव सीताराम ठाकरे यांच्या प्रबोधन या नियतकालिकाचा अभ्यास' या विषयावर २०१५ला पीएचडी केली आहे. हे प्रबोधन नियतकालिकावर झालेलं पहिलंच संशोधन आहे.

५. २०१७ ला **डॉ. मनीष देशमुख** यांनी 'संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा'तून 'प्रबोधनकार उर्फ केशव सीताराम ठाकरे यांच्या कार्याचे ऐतिहासिक परीक्षण' या विषयावर डॉक्टरेट मिळवली आहे.

१९९५ च्या महाराष्ट्रातील सत्तांतरानंतर प्रबोधनकारांवरच्या अभ्यासाला अधिक चालना मिळालेली दिसते. समग्र साहित्याचे खंडही त्याच काळात प्रकाशित झाले. तर पुरोगामी पत्रकार आणि अभ्यासकांनी प्रबोधनकार उजेडात आणण्याचा प्रयत्न केला. त्यात ज्ञानेश महाराव संपादित 'प्रबोधनकारांचे ज्वलंत हिंदुत्व' हे पुस्तक विशेष गाजलं. त्याचं प्रकाशन बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते झालं. या पुस्तकात प्रबोधनकारांची दोन भाषणं आणि तीन पुस्तकं यातले उतारे संदर्भासह दिलेले आहेत. महाराव यांच्या 'ठाकरे फॅमिली' या पुस्तकातही प्रबोधनकारांविषयी बरीच माहिती आहे. प्रख्यात एकपात्री कलाकार रंगनाथ कुलकर्णी यांनी प्रबोधनकारांच्या साहित्यातले छोटे वेचे शोधून त्यांचा संग्रह 'प्रबोधनकार

ठाकरे यांच्या वैचारिक ठिणग्या' या नावाने संपादित केला. याशिवाय 'हिंदू ब्राह्मणी संस्कृतीचा मर्मभेदी दंभस्फोट' हे ज्येष्ठ पत्रकार मधू शेट्ये यांचं छोटेखानी पुस्तकही प्रबोधनकारांच्या विचारांची नव्याने ओळख करून देणारं आहे. एक साधे पोस्टमन असणाऱ्या धर्मपाल कांबळे यांनी 'प्रबोधनकार-व्यक्तित्व, कार्य, साहित्य' हे जवळपास ६०० पानांचं पुस्तक प्रबोधनकारांच्या बहुआयामी कर्तृत्वाचा तपशीलवार आढावा मांडतं. चांद शेख संपादित 'गस्त'चा २०१३चा दिवाळी अंक प्रबोधनकार ठाकरे विशेषांक होता. त्यात प्रबोधनकारांवर वेगवेगळ्या अभ्यासकांचे १५ लेख आहेत.

याशिवाय महावीर मुळे यांचं 'सत्यशोधक प्रबोधनकार आणि कर्मवीर' तसंच डॉ. जयसिंहराव पवार यांचं 'राजर्षि शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे' ही पुस्तकं प्रबोधनकारांच्या आयुष्यातला एक वेगळा तरीही महत्त्वाचा पैलू आपल्या समोर ठेवतात. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' - रा. के. लेले, 'सत्यशोधकीय नियतकालिके' - अरुण शिंदे, 'सत्यशोधक साहित्याचा इतिहास' - श्रीराम गुंदेकर, 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' - य. दि. फडके, 'लोकमान्य ते महात्मा' - सदानंद मोरे या ग्रंथांमधे प्रबोधनकारांविषयी महत्त्वाची माहिती आणि मतं वाचता येतात.

प्रबोधनकारांचे चिरंजीव बाळासाहेब ठाकरे यांनी स्वतंत्रपणे प्रबोधनकारांविषयी लिहिलेलं नसलं तरी त्यांचं प्रबोधनकारांवरचं एक भाषण 'विचारांचं सोनं' या पुस्तकात उपलब्ध आहे. तसंच त्यांच्या 'फटकारे' या व्यंगचित्रसंग्रहाच्या सुरुवातीलाच 'मी व्यंगचित्रकार कसा झालो?' हे मनोगत छापलं आहे. त्यात प्रबोधनकारांविषयी वाचता येतं. ते अधिक तपशिलात प्रबोधनकारांचे दुसरे चिरंजीव श्रीकांत ठाकरे यांच्या 'जसं घडलं तसं' या आत्मचरित्रात आहे. तसंच प्रबोधनकारांसोबत दीर्घकाळ राहिलेले त्यांचे शिष्य पंढरीनाथ सावंत यांच्या आत्मचरित्रात 'मी पंढरी गिरणगावचा'मध्ये प्रबोधनकारांवर दोन हृद्य प्रकरणं आहेत. याशिवाय आचार्य अत्रे, धनंजय कीर यांच्या आत्मचरित्रात प्रबोधनकारांविषयी काही प्रसंग वाचता येतात. तसंच भाई माधवराव बागल, आचार्य अत्रे, वा. सी. बेंद्रे, श्री. शं नवरे, विद्याधर गोखले, य. दि. फडके, वि. वा. शिरवाडकर, नामदेव ढसाळ यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्याविषयी लेख लिहिले आहेत. त्यात काही महत्त्वाचे संदर्भ सापडतात.

प्रबोधनकार असे घडले

या सगळ्या संदर्भांमधून प्रबोधनकारांचं सापडणारं आयुष्य फारच अद्भुत आहे. ते 'प्रबोधन'मधले लेख वाचण्याआधी किंवा अभ्यासण्याआधी समजून घेणं आवश्यक ठरतं. ते इथं सविस्तर मांडता येणं शक्य नसलं तरी त्यांच्या विचारांची तसंच एक पत्रकार म्हणून जडणघडण कशी झाली, त्याचा गोषवारा दिलेला आहे.

प्रबोधनकारांची जन्मतारीख १७ सप्टेंबर १८८५. जन्मगाव पनवेल. तेव्हा हे काही मोठं शहर नव्हतं; पण खेडेगावही नव्हतं. रस्ते आणि समुद्री वाहतुकीचं केंद्र असल्यामुळे ते कोकणाचं प्रवेशद्वार होतं. त्यामुळे साधारण पेशवाईपासून तरी हे व्यापाराचं केंद्र बनलं होतं. विशेषतः तांदूळ, भाज्या, बैलगाडीची चाकं यासाठी ते प्रसिद्ध होतं. संत तुकारामही इथे मिरच्या विकायला आले होते, अशी एक कथा आहे. १८५२ सालापासून शहराला नगरपालिका आहे. ती महाराष्ट्रातल्या सर्वांत जुन्या नगरपालिकांपैकी एक आहे. तेव्हा पनवेलहून मुंबईला आतासारखं रस्त्याने जाता येत नसलं तरी पनवेल शहराजवळच्याच उलवे जेट्टीतून मुंबईतल्या भाऊच्या धक्क्याला समुद्र मार्गाने जाणं सोयीचं होतं.

प्रबोधनकारांचं पनवेल हे ना धड शहर ना धड गाव. प्रबोधनकारांचा बालपणीचा काळ ना धड एकोणिसाव्या शतकाच्या मानसिकतेचा ना धड विसाव्या शतकातला, ज्या समाजात जन्मले तो चांद्रसेनीय कायस्थ प्रभू हा पांढरपेशा असूनही ब्राह्मण किंवा ब्राह्मणांमधली पोटजात नसलेला. अशा सर्वच दृष्टीने स्थित्यंतराच्या, संक्रमणाच्या आणि सांध्यावरच्या वातारवणात ते लहानाचे मोठे झाले. आजोबा रामचंद्र ऊर्फ भिकोबा हे स्मॉल कॉज कोर्टात नोकरी करण्यासाठी पनवेलला आले आणि शेवटपर्यंत इथेच राहिले. ते देवीभक्त साधुपुरुष म्हणून प्रसिद्ध होते. पण सिद्धींच्या मागे लागून आधुनिक शाक्तांकडे सर्वसामान्यपणे आढळणारी उग्रता त्यांच्याकडे नव्हती. उलट बावीस वर्षं केलेल्या पंढरीच्या वारीमुळे निःस्पृह लोकसेवेचं व्रत त्यांनी पाळलं. त्या काळात काही लोकांनी पैसे कमावण्यासाठी प्लेगदेवी बनवली होती. ती रेड्यावर बसून गावोगाव फिरून पैसे गोळा करत असे. भिकोबा म्हणजे तात्या अंगण झाडताना ती समोर आली. त्यांनी तिचा खोटेपणा उघड करून पळवून लावलं. प्रबोधनकारांवर अंधश्रद्धेवर प्रहार करण्याचे संस्कार तेव्हाच होत होते. तात्या काशीला गेलेले असताना एका पंड्याने सांगितलं की मागतो तेवढी दक्षिणा देत नसाल तर मंत्र म्हणणार नाही. त्यामुळे तुमचे पूर्वज नरकात जातील. त्यावर तात्यांनी खड्ड्यात गेलं ते श्राद्ध म्हणत त्याला फटकारलं, 'आमच्या पूर्वजांच्या स्वर्ग नरकाच्या किल्ल्या तुझ्या हातात आहेत का?' मग पंड्याने त्यांच्यासमोर लोटांगणं घातली. हा प्रहार अंधश्रद्धेबरोबरच भिक्षुकशाहीवरही होता.

आजोबांपेक्षाही आजीने त्यांच्यावर जास्त प्रभाव टाकला. आजीला ते बय म्हणायचे. तिनं जात पात धर्म याच्या पलीकडे जाऊन साठ वर्षं सुईणीचं काम केलं. मी जन्मभर जातपात आणि हुंड्याचा विरोध केला, त्याची प्रेरणा ही बयच, असं प्रबोधनकार म्हणतात. शाळेतून परतताना एका महाराची सावली छोट्या केशवच्या अंगावर पडली. 'आता ठाकरे विटाळला', असं सोबतची ब्राह्मण मुलं ओरडू लागली. ते बयने ऐकलं. त्यांच्यातल्याच अभ्यंकर नावाच्या मुलाला पुढे ओढलं. त्याची सावली केशववर पाडली. 'महाराच्या सावलीने महार होतो, तर ब्राह्मणाच्या सावलीने आमचा दादा ब्राह्मण झाला', हे तिने त्या मुलांना सांगितलेलं तत्त्वज्ञान 'श्यामची आई'च्या आधी पंधरा वर्षं आणि दोन पावलं पुढं होतं. शिवाय तिच्या आग्रहामुळेच बलिप्रतिपदेला दिवाळी मागायला येणाऱ्या अस्पृश्य बायकांना ठाकरेंच्या घरात बोलावून त्यांच्या हातून मुलांना ओवाळलं जायचं. पुढं गावात एक महार जातीचे सुभेदार राहायला आले. इंग्रजी पाचवीत असलेले प्रबोधनकार त्यांच्या घरी जाऊन चहा पित. त्यामुळं गावात वादळ उठलं. तक्रार घेऊन येणाऱ्यांना बयने सुनावलं, 'माणसाच्या हातचा चहा पिण्यात धर्म कसा बुडतो? चहाच्या कपात बुडण्याइतका आपला धर्म म्हणजे काय टोलेगंड्याची कवडी आहे वाटतं?' धर्माची ही व्यापक संकल्पना प्रबोधनकारांना पुढं मार्गदर्शक ठरली. उतारवयात दादरला वस्तीला असताना बयचं निधन झालं. तेव्हा सगळ्या जातींचे हिंदू तसंच मुसलमान आणि ख्रिश्चनही खांदा द्यायला आले होते.

वडील सीताराम ऊर्फ बाळा असेच सगळ्यांच्या मदतीला धावून जाणारे. त्यांची नोकरी गेली तरी हरहुन्नरीपणा जपत छोटे उद्योगधंदे केले. त्याचा प्रभाव प्रबोधनकारांवर मोठा होता. त्यामुळे नऊ ते पाच मध्यमवर्गीय पांढरपेशा परोपजीवीपणाला प्रबोधनकारांनी आयुष्यभर चाट दिली. अनेक उद्योग केले. गावात आग लागली की सगळ्यात आधी सीतारामपंतच सर्वस्व विसरून धावून जायचे. गावात

प्लेग आला. तेव्हाही असेच धावून गेले; पण प्लेगने त्यांनाच गाठलं. वडील वारले तेव्हा प्रबोधनकार अवघे सोळा सतरा वर्षांचे होते; पण वडिलांपेक्षाही आई जानकीबाईंचा प्रभाव मोलाचा होता. तिने अभ्यासाचे आणि स्वाभिमानाचे संस्कार दिले. प्रबोधनकारांना एकदा लॉटरी लागली. तेव्हा वडिलांना १५ रुपये पगार असताना लॉटरीतून ७५ रुपये मिळणार होते; पण आईने ती रक्कम नाकारली. तिचा आग्रह होता की आपल्याला कष्टाचीच भाकरी हवी. पुढं प्रबोधनकारांनी राजकीय कार्यकर्ते बनून देणग्या गोळा करणाऱ्या फंडगुंडांना नेहमीच ठोकलं. हा संस्कार आजही हरामाचे हसे मागणाऱ्यांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी उपयोगी आहे.

ठाकरे सीकेपी असल्यामुळे लहानपणी एखाद्या ब्राह्मण शाळासोबत्याच्या घरी पाणी मागितलं की तो पाणी तपेलीतून आणायचा, ओटीच्या खाली उभा ठेवून ओंजळीत ओतायचा. मित्राची आई ती तपेलीही न धुता आत घेऊ द्यायची नाही. सुरुवातीला प्रबोधनकारांना हे कळायचं नाही. कळायला लागलं तेव्हा त्यांनी सोवळेपणाची टिंगल उडवायला सुरुवात केली. ती जन्मभर उडवली. वडिलांच्या कचेरीतल्या मंडळींनी एका ब्राह्मण बेलिफाच्या घरी धुंधुरमासानिमित्त सकाळच्या जेवणाचा कार्यक्रम होता. वडिलांसोबत केशवही गेला होता. तेव्हा ब्राह्मणांची एक पंगत. दुसरी या दोन ठाकरेंची. तर भालेराव आडनावाचे आणखी एक कारकून तिसरीकडेच बसले होते. वाढणाऱ्या बायका वरून टाकत. जेवण झाल्यावर वडील दोघांचं खरकटं स्वतःच स्वच्छ करू लागले, तेव्हा प्रबोधनकार चिडले. त्यांचा सवाल होता, 'हे ब्राह्मण आपल्याशी निराळेपणाने वागतात तर आपण त्यांना आपलेपणाने का वागवायचे?' तेव्हा त्यांचं वय होतं अवघं आठ वर्षं.

प्रबोधनकारांची पहिली चळवळ इंग्रजी शाळेत असतानाच सुरू झाली. गाडगीळ नावाचे उत्तम शिकवणारे अपंग शिक्षक होते. त्यांना हंगामी म्हणून काढून टाकण्यात आलं. त्यासाठी इंग्रजी पाचवीत शिकणाऱ्या केशवने विद्यार्थ्यांच्या सहीचा अर्ज म्युन्सिपाल्टीला केला आणि त्यांची नोकरी वाचवली. अगदी लहान असतानाच जरठ बाला विवाहाच्या पंगतीत जेवताना ते मुद्दामून 'म्हातारा इतुका न अवघे पाऊणशे वयमान' हे पद गात असत. दहा-बारा वर्षांच्या मंजू या बालमैत्रिणीचं लग्न पासष्ट वर्षांच्या म्हाताऱ्याशी लावलं म्हणून त्यांनी वयाच्या दहाव्या वर्षी लग्नाचा मांडव पेटवून दिला होता.

एक पत्रकार म्हणून जडणघडण

प्रबोधनकारांच्या आईने प्रबोधनकारांना वाचनाची आणि त्यातही वर्तमानपत्र वाचनाची सवय लावली. त्या शेजारपाजारहून वर्तमानपत्रं गोळा करून आणत. त्यात 'दैनिक मुंबई वैभव', 'इंदूप्रकाश', 'करमणूक', 'केरळ कोकीळ', 'जगत्समाचार' अशी नियतकालिकं असायची. ती सहा वर्षांच्या केशवला मोठमोठ्याने वाचावी लागत. वाचताना आई कठीण शब्दांचे अर्थ सांगायची. शब्दोच्चार, आरोह अवरोह यावर तिचं लक्ष असायचं. उच्चार चुकला की डावा गाल लाल व्हायचा. प्रसिद्ध कादंबरीकार ह. ना. आपटे यांचं 'करमणूक' हे साप्ताहिक त्या काळात लोकप्रिय होतं. काशीबाई कानिटकर यांना लिहिलेल्या पत्रात हरिभाऊंनी 'करमणूक'चं वर्णन 'आबालवृद्ध घेतील असा पेपर' असं केलंय. त्यातच पुढं कंसात लिहिलंय ते महत्त्वाचं आहे, 'केसरी कितीही उत्कृष्ट असला तरी कुणबी, माळी घेतील असा नाही.' अशा साप्ताहिकात प्रबोधनकारांचे पहिले लेख छापून आले.

आजीबरोबर मुंबईत फिरताना फूटपाथवर त्यांना 'पॉकेट एन्सायक्लोपीडिया' नावाचं छान पुस्तक

सापडलं. त्यात खूप वेगवेगळ्या विषयांवरची मनोरंजक माहिती होती. त्यातल्या छत्र्यांची उत्पत्ती आणि वर्तमानपत्रांची उत्पत्ती अशा दोन प्रकरणांचा त्यांनी इंग्रजीतून मराठीत अनुवाद केला आणि 'करमणूक' साप्ताहिकाला पाठवून दिला. तो छापून आला आणि आपटेंनी त्यांना कौतुक करणारं पत्रही लिहिलं. इंग्रजी इयत्तांमधे शिकू लागल्यावर हे घडलंय. म्हणजे प्रबोधनकार वयाने मोठे नव्हतेच. त्या वयात त्यांचे लेख 'करमणूक'मध्ये प्रकाशित होत राहिले. प्रबोधनकारांनी या खटाटोपाचं वर्णन 'अखेर लागलीच हाताला छापशाई' असं केलंय. पण 'करमणूक'मध्ये लेख छापून येण्यावर त्यांचं समाधान झालेलं नव्हतं. त्या वयातही ते स्वतंत्र साप्ताहिक काढण्याचा विचार करत होते. ते छापायचं कसं याची कल्पना त्यांच्या हुनरबाज डोक्याला मामलेदार कचेरीत सापडली, 'मामलतदार कचेरीत नोटिसा, हुकूम, फर्माने छापण्याचे काम एक शिपाई करीत असे. कारकून जांभळ्या शाईने कागदावर हुकूम लिहायचा. ओल्या टीपकागदावर शिपाई तो कागद अलगद ठेवून लोखंडी दाबयंत्रात दाबायचा. लिहिलेला मजकूर उलटा टीपकागदावर उठायचा. मग त्यावर कोरे कागद भराभर ठेवून दाबयंत्रात दाबून तो भराभर पन्नास-पंचाहत्तर प्रती अस्सल बरहुकूम छापायचा.' हेच तंत्र वापरून प्रबोधनकारांनी एक घरगुती दाबयंत्र तयार केलं. स्वतः मजकूर लिहिला. त्याला चित्र आणि नक्षीने सजवलं. आणि 'साप्ताहिक विद्यार्थी' तयार झाला. त्याच्या पन्नास प्रती काढून शाळेत विद्यार्थी आणि शिक्षकांना वाटल्या. असे चार-सहा अंक काढले. पनवेलमध्ये पहिलं साप्ताहिक हे १९५०च्या सुमारास निघालं. तेही अल्पायुषी निघालं. १९६७ला 'किल्ले रायगड' हे दीर्घकाळ चाललेलं पहिलं साप्ताहिक पनवेलमधून सुरू झालं. हे लक्षात घेता एकोणिसाव्या शतकातच प्रबोधनकारांनी केलेल्या 'साप्ताहिक विद्यार्थी'च्या प्रयोगाचं मोल लक्षात येतं.

वडिलांची नोकरी सुटल्यावर प्रबोधनकार शिक्षणासाठी वडिलांच्या मामांकडे मध्य प्रदेशात देवासला राहिले. तिथल्या शाळेत परीक्षेसाठी आलेल्या शिक्षणाधिकारी आर. एच. गनियन साहेबाने त्यांना विचारलं की, 'तुला काय बनायचंय?' तेव्हा त्यांनी उत्तर दिलं होतं, 'एडिटर.' तेव्हा प्रबोधनकार १६ वर्षांचे असावेत, असा अंदाज बांधता येतो. त्या वयात त्यांचं संपादक बनणं नक्की झालं होतं. पुढं मुंबईत आल्यावर ते 'इंदुप्रकाश' या लोकप्रिय दैनिकात लिहीत होते. त्यांनी पहिली नीट नोकरी केली तीच तत्त्वविवेचक छापखान्यात असिस्टंट शास्त्री म्हणजे असिस्टंट प्रुफरीडर म्हणून. लक्ष्मण नारायण जोशी हे तेव्हाचे प्रसिद्ध कवी, लेखक, नाटककार या छापखान्यात हेडशास्त्री म्हणजे मुख्य प्रुफरिडर होते. त्यांनी प्रबोधनकारांना अल्पजीवी वर्तमानपत्रांसाठी नाव न देता लिहिण्याचं कौशल्य शिकवलं. ते काम त्यांनी पैशासाठी केलं; पण त्यातून त्यांना नियतकालिकं काढण्याची तांत्रिक अंगं समजत गेली.

आजोबांच्या मृत्यूमुळं प्रबोधनकारांना हे सोडून पनवेलला परतावं लागलं होतं. तिथं उपजीविकेसाठी त्यांना आधार मिळाला तो 'इंदुप्रकाश' छापखान्याचे दामोदरशेठ सावळाराम यंदे यांचा. साप्ताहिक 'इंदुप्रकाश'मधल्या लिखाणातून त्यांना थोडंफार उत्पन्न मिळालं. त्याच बरोबर ते ठाण्याच्या 'जगत्समाचार' या साप्ताहिकात तर अग्रलेखासह अंकातलं बहुतेक सगळं स्फुटलेखनही करत. त्यातून प्रबोधनकारांचा लेखनाचा रियाज होत होता, शिवाय बऱ्यापैकी कमाईही होत होती. पण त्यापेक्षीही मोठी कमाई होती ती म्हणजे 'केरळकोकीळ'कार कृष्णाजी नारायण आठल्ये यांचा सहवास. 'केरळकोकीळ' हे त्यांचं मासिक दीर्घकाळ लोकप्रिय होतं. आठल्ये फक्त संपादकच नव्हते, तर रसाळ

वक्ते, लोकप्रिय कवी आणि लेखक, पोर्ट्रेट चित्रकार, फोटोग्राफर अशी त्यांची बहुढंगी ओळख होती. या सगळ्याच गोष्टींचे हुन्नर त्यांनी प्रबोधनकारांना शिकवले. लोकहितवादींचं चरित्र, विवेकानंदांच्या साहित्याचा अनुवाद आणि ज्युलवर्नच्या 'टू द मून अँड बॅक' या दीर्घकथेचा अनुवाद करून विज्ञानकथा या साहित्यप्रकाराची मराठीला करून दिलेली ओळख, या तीन गोष्टी त्यांचं वेगळेपण दाखवून द्यायला पुरेशा आहेत. तितकंच प्रबोधनकार त्यांना गुरू का मानत, हे दाखवून द्यायलाही पुरेशा आहेत.

आठल्येंनी शिकवलेल्या कौशल्यांच्या जोरावर आपण आयुष्य यशस्वी करायचं, हे प्रबोधनकारांनी ठरवलं. ते त्यांनी तसं करूनही दाखवलं. आठल्ये यांनी दिलेला हा आत्मविश्वास ही गुरूने शिष्याला दिलेली सगळ्यात महत्त्वाची शिदोरी होती. 'केरळकोकीळ'चं जे वर्णन उपलब्ध आहे, त्यानुसार त्याचा 'प्रबोधन'च्या रचनेवरही प्रभाव झाल्याचा निष्कर्ष काढता येतो. विशेषतः अनुवादित साहित्य आणि विषयाचं वैविध्य या बाबतीत तरी. आठल्ये 'केरळकोकीळ'मध्ये 'कलमबहाद्दरांस शेलापागोटे' नावाचं पुस्तक परीक्षणांचं सदर चालवायचे. त्याच नावाचं आणि स्वरूपाचं सदर प्रबोधनकारांनीही 'प्रबोधन'मध्ये लिहिलं. फेब्रुवारी १९२७च्या 'प्रबोधन'च्या अंकात प्रबोधनकारांनी कृष्णाजी आठल्येंना श्रद्धांजली वाहिली. त्यात लिहिलंय, 'दादांची व आमची कांही विशिष्ट मते यावज्जन्म कधि जुळली नाहीत. अनेक वेळा दोघांत कडाक्याची चर्चा व भांडणेही होत. परंतु तेवढी लाट गेली की लगेच आमच्या परस्पर प्रेमादरांची गंगा पूर्ववत निर्मळ वाहू लागे... केवळ मते जुळत नाहीत किंवा दोन परस्परविरुद्ध दिशांनी विचारांचा प्रवाह वाहतो, एवढ्याच सबबीवर दक्षिणोत्तर तोंडे फिरविणाऱ्या आजकातल्या मताभिमानी बृहस्पतींना दादा आठल्ये आणि केशव ठाकरे या दोन ब्राह्मण ब्राह्मणेतर व्यक्तींतले प्रेमाचे रहस्य उलगडून दाखविणे फार कठीण काम आहे.'

याच काळात ते सांगलीकर नाटक मंडळीत कामाला लागले. तिथे त्यांचं काम तालीम मास्तरांना म्हणजे मुख्य दिग्दर्शकाला मदत करण्याचं होतं. तसंच कंपनीत आलेल्या नाटक आणि गीतांत आवश्यकतेनुसार बदल करून देण्याची जबाबदारीही होती. त्यांचं प्रसिद्ध झालेलं पहिलं पुस्तक एक नाटकच होतं, 'संगीत सीतास्वयंवर'. त्याच सुमारास त्यांनी 'ध्रुव' आणि 'मंगलतारा' ही दोन नाटकं लिहिली असल्याचं वा. सी. बेंद्रे यांनी नोंदवून ठेवलं आहे. वडिलांमुळे त्यांच्यावर नाट्यप्रेमाचे संस्कार झालेले होतेच. नाटक कंपनीत राहिल्याने त्यांच्यात नाटक मुरत गेलं. त्यातून ते एक उत्तम परफॉर्मर बनले. त्यांनी संपादकासह अनेक भूमिका आयुष्यात वठवल्या. त्या प्रत्येक ठिकाणी त्यांच्यातला परफॉर्मर जागा असायचा. क्षेत्र कुठलंही असो दणक्यात केलेलं नाट्यमय सादरीकरण हे त्यांचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य होतं. ते त्यांच्या साध्यात साध्या टिपणातही सापडतं आणि इतिहास संशोधनासारख्या रूक्ष मांडणीतही. त्यांच्या वक्तृत्वात तर ते होतंच पण नावीन्यपूर्ण आंदोलनांमधेही होतं.

सांगलीकर नाटक मंडळीत असतानाच्या पंढरपूर आणि विजापूर अशा दोन शहरांतल्या मुक्कामांचं वर्णन त्यांनी केलं आहे. विशेष म्हणजे त्या दोन्ही ठिकाणी अनोळखी असणारे त्यांचे चाहते वाचक त्यांना शोधत आल्याचे उल्लेख आहेत. म्हणजे त्यांच्या वेगवेगळ्या नियतकालिकांत लिखाणाचा एक चाहतावर्ग तयार झाला होता. ते एकाच नाटक कंपनीत राहिले नाहीत. सतत कंपन्या बदलत राहिले. या मधल्या काळात त्यांनी फेरीवाल्यांसारखे पैसे घेऊन ग्रामोफोनचे कार्यक्रम करण्याचा व्यवसायही

केला. त्यासाठी ते सहा ते सात महिने जळगावात होते. त्या काळात त्यांचा घरोबा 'प्रबोधचंद्रिका' साप्ताहिकाचे संपादक नारायण नरसिंह ऊर्फ नानासाहेब फडणीसांशी झाला. आजही १४० वर्षांपेक्षा जास्त काळ हे साप्ताहिक त्यांच्या पुढच्या पिढ्यांनी सुरू ठेवलं आहे. पण नानासाहेबांची ओळख 'काव्यरत्नावलीकार' हीच होती. कारण 'काव्यरत्नावली' मासिकाच्या ४८ वर्षांत ४५४ अंकांच्या १० हजार ४५ पानांमधे त्यांनी ६५० कवींच्या १ लाख ८३ हजार कविता प्रकाशित केल्या.

नानासाहेबांनी केलेली आणखी ऐतिहासिक गोष्ट म्हणजे त्यांनी प्रबोधनकारांमधला संपादक नेमका हेरला आणि त्यांना एक मासिक सुरू करायला लावलं. प्रबोधनकार म्हणतात तसं जळगाव ही त्यांच्या पत्रव्यवहाराची जन्मभूमी ठरली. तिथे त्यांनी 'सारथी' नावाचं मासिक सुरू केलं. प्रबोधनकार याचं श्रेय नानासाहेबांना देताना म्हणतात, 'माझ्या पत्रव्यवसायाचा श्रीगणेशा नानांनीच हात धरून काढविलेला आहे.' याचा अर्थ नानासाहेबांनी त्यांना अंक छापून तर दिलाच असेल. पण लेखन, संपादनाचे धडेही दिले असावेत. जळगावात असताना 'सारथी'चे चार-पाच अंक निघाले. त्यानंतर मुंबईत येऊन त्यांनी पुढे वर्षभर हे मासिक सुरू ठेवलं. प्रबोधनकारांच्या नोंदीनुसार हे सगळं १९०६-०७ मधे घडत होतं. याचा अर्थ प्रबोधनकार अवघ्या २१-२२व्या वर्षी संपादक बनले. सरकारच्या निर्बंधांमुळे 'सारथी' बंद करावं लागलं. त्यामुळे ते पुन्हा ग्रामोफोन आणि नाटकाच्या धंद्यात जात येत राहिले. त्याच काळात त्यांनी कोल्हापुरात काही महिने एक छापखानाही चालवला.

ही त्यांची धावपळ त्यांच्या लग्नानेच थांबवली. जानेवारी १९१० मधे त्यांचं लग्न अमरावतीतल्या अचलपूरमधील मंजुळा गुप्तेंशी झालं. संसारासाठी त्यांनी मुंबईत अनेक छोट्या-मोठ्या नोकऱ्या आणि धंदे केले. त्यात पहिल्या महायुद्धाच्या काळातल्या मंदीपुढे नाइलाज म्हणून सार्वजनिक बांधकाम खात्यातल्या इलेक्ट्रिक इंजिनिअरच्या ऑफिसात सरकारी नोकरी केली. ते करताना त्यांचे हरहुन्नरी व्यवसाय सुरूच होते. त्यात लिखाणाशी संबंधित कामं सांगायची तर 'कामगार समाचार' या साप्ताहिकात 'अगाध किती विधिकरणी' नावाची एक क्रमशः कथाही लिहिली. त्यांनी बरीच वर्षं मुंबईतल्या बातमीदारांसाठी भाषणाचं शब्दशः रिपोर्टिंग करून दिलं. त्यानंतर त्यांनी 'वक्तृत्वशास्त्र' हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. १३ मे १९१८ मधे प्रकाशित झालेला हा ग्रंथ या विषयावरचा मराठीतला पहिलाच ग्रंथ असल्यामुळे लोकमान्य टिळकांपासून अनेकांनी त्याचं कौतुक केलं. त्यानंतर काही महिन्यांनी त्यांनी समर्थ रामदासांचं छोटेखानी इंग्रजी चरित्र 'लाइफ अँड मिशन ऑफ रामदास' हे लिहिलं.

कोदंडाच्या टणत्काराचा टर्निंग पॉइंट

प्रबोधनकारांचं बुकबाजीचं व्यसन म्हणजे अफाट वाचन सुरूच होतं. पिंड आधीच चळवळ्या होता. त्यात घरातून क्रांतिकारी विचारांचे संस्कार झाले होते. त्यात लोकहितवादी, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर आणि रॉबर्ट इंगरसॉल यांच्या वाचनाने बंडखोरी अधिक पक्की झाली होती. ब्राह्मणांच्या ब्राह्मणेतरांवरच्या सामाजिक अन्यायाचा प्रतिकार करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. ती त्यांची मानसिकता पुढील शब्दांत व्यक्त झालीय, 'मी चांगला वक्ता आहे. खंबीर लेखक आहे. समाजातले अन्याय मी उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. बहुजन समाजाच्या बाजूने लिहिणारा बोलणारा खमक्या वक्ता लेखक कोणीही नाही. मी स्वस्थ का बसावे? याच सुमारास जातिवर्चस्वाच्या संदर्भाने

तर्र झालेल्या काही विद्वान ब्राह्मणश्रेष्ठींनी पांढरपेशा ब्राह्मणेतर जमातींना आणि काही ब्राह्मण जातींनाही क्षुद्रत्वाच्या किंबहुना शूद्रत्वाच्या खाईत ढकलून, त्यांना हिंदू समाजात बदनाम करण्याचा विद्वत्ताप्रचुर चंग बांधला.'

यात प्रबोधनकारांचा अंगुलीनिर्देश इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्याकडे आहे. तो काळ राजवाडेंच्या कारकिर्दीतला शिखराचा काळ होता. 'सत्यशोधकी साहित्याचा इतिहास'मधे डॉ. श्रीराम गुंदेकर लिहितात, 'वि. का. राजवाडे यांचा इतिहास आणि संशोधनावरील अधिकार सर्वमान्य होता. ते लिहितील आणि सांगतील तेच सत्य, असे मानले जात होते. त्यांच्या लेखनाचा प्रतिवाद सहसा केला जात नव्हता.' अशा राजवाडेंनी भारत इतिहास संशोधन मंडळाच्या चौथ्या वर्षाच्या अहवालात 'कायस्थदीप' या पुस्तकावर एक २२ पानी लेख छापला. त्यात चांद्रसेनीय कायस्थ प्रभू म्हणजे सीकेपी समाजाची कुळी हीन असल्याचा आरोप केला. शिवाय संभाजीराजांचा खून, पेशवा नारायणरावाचा खून, दुसऱ्या बाजीरावाच्या विरुद्ध इंग्रजांशी संगनमत आणि सातारच्या गादीचे शेवटचे छत्रपती प्रतापसिंह यांना सिंहासन सोडावं लागणं या चार गोष्टींसाठी सीकेपींना जबाबदार धरलं होतं. कायस्थ विरुद्ध चित्पावन या स्वराज्यापासूनच्या संघर्षाचा हा भाग आहे आणि त्यात कोणताही आधार नसताना सीकेपी समाजाची बदनामी केली जात आहे, हे प्रबोधनकारांच्या लक्षात आलं. त्याचा राग येऊन त्याचा प्रतिवाद करणारी भाषणं महाराष्ट्रभर दिली. त्यातून सीकेपी समाज जागा झाला. त्यांनी राजवाडेंचं संशोधन खोडून काढणारं पुस्तक लिहायचं ठरवलं. त्याचं कारण ते सांगतात, 'एका काळच्या सत्तामदाने शिरजोर झालेले ब्राह्मण पंडित, इतिहास संशोधनाच्या किंवा आखणी कसल्या तरी फिसाटाच्या पांघरुणाखाली कायस्थादी ब्राह्मणेतरांवर आणि अनेक चित्पावनेतर ब्राह्मणांवरही हल्ले चढवायला सवकलेले आहेत. त्यांचा एकदा कायमचा पुरा बंदोबस्त केलाच पाहिजे या हिरीरीने मी 'कोदण्डाचा टणत्कार हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले.' कोदण्डाचा टणत्कार अर्थात भारत इतिहास संशोधन मंडळास उलट सलामी' हे तडाखेबंद पुस्तक १७ नोव्हेंबर १९१८ला प्रकाशित झालं. आचार्य अत्रे सांगतात तसं 'राजवाडे यांच्या लिखाणाविरुद्ध किंवा त्यांच्या संशोधनाविरुद्ध ब्र काढण्याचीही त्यावेळी महाराष्ट्रातल्या विद्वानांची छाती नव्हती. पण ठाकरे यांनी ते धाडस करून राजवाडे यांच्यावर पहिले हत्यार उगारले आणि महाराष्ट्रावर एक बाँबगोळा टाकला.'

अत्यंत धारदार शैलीने आरोपांच्या चिंधड्या उडवतानाच आपल्या विधानांच्या समर्थनात आधारांची चळत उभी करायची, असं यातल्या प्रतिवादाचं स्वरूप होतं. त्यामुळे या टणत्काराने अनेकांची झोप उडाली. हा हल्लाच तसा तिखट होता. उदाहरणादाखल, 'राजवाड्यांच्या या बहुमोल कामगिरीचे त्यांच्या चित्पावनी हृदयाने पार मातेरे केले आहे, असे कष्टाने म्हणावे लागते. मेंढी दूध देते पण लेंड्यांनी घाण करते, असलाच हा प्रकार आहे. ते कष्टाळू संग्राहक आहेत, पण प्रामाणिक संशोधक नव्हेत. ते जेव्हा संशोधकी घमेंडीने संग्रहित कागदपत्रांतील मजकुराची ठरवाठरव करू लागतात आणि चिकित्सेच्या दिमाखाने विधानाची अंडी उबऊ लागतात, तेव्हा मोडतोड तांबापित्तलवाल्याने केमिकल अनालायझारयचे काम करण्याचा आव घालण्यासारखा मूर्खपणा त्यांच्या हातून घडत असतो.' या ग्रंथाच्या सहा हजार प्रती अवघ्या पंधरा दिवसात संपल्याचा दावा प्रबोधनकारांनी केला आहे. कारण प्रबोधनकारांचा हा प्रतिवाद फक्त सीकेपींचा उरलेला नव्हता, तर तो ब्राह्मणी संशोधकांच्या बदनामीमुळे

अस्वस्थ असलेल्या सगळ्याच ब्राह्मणेतरांचा झाला होता. प्रबोधनकार दुसऱ्या आवृत्तीच्या प्रास्ताविकात सांगतात तसं हे पुस्तक ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचं रहस्य अचूक पटवणारं हँडबुक बनलं होतं.

कोदण्डाच्या टणत्काराचा महाराष्ट्रावर काय प्रभाव पडला, याचं वर्णन आचार्य अत्रेंनी केलं आहे, 'या पुस्तकातील ठाकरे यांच्या बिनतोड पुराव्याला आणि कोटिक्रमाला उत्तर देण्याची खुद्द राजवाडे यांचीदेखील प्राज्ञा झाली नाही. मान खाली घालून त्यांना आपला पराभव मुकाट्याने कबूल करणे भाग पडले. सर यदुनाथ सरकार यांनी आपल्या शिवचरित्रात या पुस्तकाचा गौरवपर उल्लेख केलेला आहे. या पुस्तकाच्याच आधारावर भारत इतिहास संशोधन मंडळाची वार्षिक तैनात मुंबई सरकारने अगदी परवा-परवापर्यंत बंद केलेली होती. ठाकरे यांचा हा कोदण्डाचा टणत्कार सबंध महाराष्ट्रात कित्येक दिवस तरी गाजून राहिला होता. त्या पुस्तकाच्या हजारो प्रती महाराष्ट्रात घरोघर खपल्या आणि त्यांच्या प्रकाशाने महाराष्ट्रातील निद्रिस्त ब्राह्मणेतर जनता एकदम जागृत झाली. त्यामुळे एक निधड्या छातीचा लढवय्या लेखक आणि प्राणघातक प्रहार करणारा टीकाकार म्हणून ठाकरे यांचे नाव एकदम प्रामुख्याने महाराष्ट्रापुढे आले आणि द्रोणाचार्यांना आपल्या तेजस्वी शरसंधानाने कोदण्डधारी अर्जुनाने जसे हतवीर्य करून टाकले, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील मी मी म्हणणाऱ्या सुप्रतिष्ठित इतिहासाचार्यांना आणि संशोधकांना आपल्या कोदण्डाच्या टणत्काराने गर्भगळीत करून त्या कोदण्डधारी कायस्थ कलमबहाद्दराने त्यांच्यावर मात केली.'

राजवाडे प्रकरणाने प्रबोधनकारांच्या आयुष्यात मोठाच टर्निंग पॉइंट आणला. त्याने त्यांच्या सामाजिक क्रांतिकारक जीवनाला खऱ्या अर्थाने सुरुवात केली. महाराष्ट्रभरातल्या ब्राह्मणेतर चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी त्यांची भाषणं ठिकठिकाणी आयोजित केली. त्यांच्या कामाकडे प्रबोधनकार ओढले गेले. शिवाय त्याला छत्रपती शाहू महाराजांची प्रेरणाही होती. विशेष म्हणजे प्रबोधनकार सांगतात तसं, व्याख्यानांच्या दौऱ्यात प्रबोधनकारांना बहुजन समाजाच्या हलाखीचा आणि भिक्षुकशाही पिळवणुकीचा साक्षात्कार झाला. त्यातून आणखी दोन अभ्यासपूर्ण ग्रंथ पुढच्या काही महिन्यांत जन्माला आले. पहिला 'ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास अर्थात नोकरशाहीचे बंड' आणि दुसरा 'भिक्षुकशाहीचे बंड','कोदण्डाचा टणत्कार'मधे प्रामुख्याने ब्राह्मणी इतिहास लेखनाला धक्का दिला होता. तर या दोन ग्रंथांमध्ये बहुजनी इतिहास लेखनपद्धतीचा पाया रचला गेला.

'प्रबोधन'चा पहिला अंक

याच दरम्यान वेदोक्त प्रकरण गाजत होतं. जातवर्चस्ववादाचं हिडीस रूप महाराष्ट्र बघत होता. त्यातून प्रबोधनकारांचीही विचारचक्रं सुरू होती. त्यातून ते एका निष्कर्षापर्यंत पोचले, ब्राह्मणेतर समाजाची पहिली गरज ही भिक्षुकशाहीच्या सापळ्यातून मुक्तता ही आहे. दुसरीकडे छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेने सत्यशोधकी नियतकालिकं सुरू करण्याचा धडाका सुरू होता. प्रबोधनकारांचा तर छत्रपती शाहूंशी आत्मीय स्नेह निर्माण झाला होता. त्यातून प्रबोधनकारांनी १९२१च्या सप्टेंबर महिन्यात स्वतःचं वृत्तपत्र काढण्याचा निर्णय घेतला. सरकारी नोकरांना पुस्तक लिहिणं, छापणं किंवा वर्तमानपत्रं काढण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे प्रबोधनकारांनी राजीनामा द्यायचं ठरवलं. ते तेव्हा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरच्या ऑफिसात रेकॉर्ड सेक्शनचे हेडक्लार्क म्हणून काम करत होते. ऑफिसमधले रेकॉर्ड नीट ठेवण्यात झालेला गोंधळ त्यांनीच निस्तरला होता.

त्यामुळे मुंबईचे चीफ इलेक्ट्रिकल इंजिनिअर विल्यम स्टूअर्ट मेंटिथ यांना त्यांना सोडायचं नव्हतं. त्यांनी त्यातून एक मार्ग शोधला. मुंबई इलाख्याचे चीफ सेक्रेटरी एल. रॉबर्टसन यांनी प्रबोधनकारांना भेटायला बोलावलं. त्यांच्याशी चर्चा करून चीफ सेक्रेटरींनी अपवाद म्हणून वर्तमानपत्र काढण्याची परवानगी दिली. प्रबोधनकार सांगतात, 'कर्दनकाळ ब्रिटिश सरकारच्या अमदानीत सरकारी नोकरी असताही वर्तमानपत्र काढण्याची खास परवानगी मिळविणारा मीच पहिला नि अखेरचा गव्हर्नमेण्ट सर्वण्ट आहे.'

'प्रबोधन'चा पहिला अंक १६ ऑक्टोबर १९२१ला प्रसिद्ध झाला. त्या पहिल्या अंकाचं वर्णन करायचं झालं तर ती साधारणपणे ए फोर आकाराची आठ पानं होती. पहिल्या पानावर 'प्रबोधन' असा ठसठशीत लोगो आहे. त्या अक्षरांच्या मागे सूर्य उगवताना दिसतोय. सूर्याच्या बरोबरच एका बाजूला शाईची दौत आणि लेखणी, तर दुसऱ्या बाजूला तलवार दाखवलीय. लोगोच्या खाली अगदी बारीक अक्षरात वैद्य अशी इंग्रजी सही आहे. वार्षिक वर्गणी अडीच रुपये आणि किरकोळ अंकाची किंमत दोन आणे आहे. लोगोच्या खाली इंग्रजीत प्रबोधनच्या स्वरूपाचं वर्णन केलेलं आहे. PRABODHAN - Fortnightly Journal Devoted to the Social, Religious and Moral Regeneration of the Hindu Society. त्याखाली स्वामी विवेकानंदांनी प्रसिद्ध केलेलं उपनिषदांमधलं सूत्र आहे, उत्तिष्ठित जाग्रत प्राप्य वरान्निबोधत. त्याखाली Vol. १. वर्ष १ले. No. 1. अंक १ला अशी नोंद आहे. छापण्याचं ठिकाण दादर - मुंबई असं लिहिलंय. तारीख अशी लिहिलीय. १६ ऑक्टोबर १९२१. श्रीशिवराज शक २४८. त्या काळात प्रचलित असणारा शालिवाहन शक आणि त्याची तिथी लिहिलेली नोंद मात्र केलेली नाही. पहिलं सगळं पान त्या वेळच्या पद्धतीनुसार जाहिरातींनी भरलेलं आहे. त्यात विशेष म्हणजे कोलकात्याच्या इंडियन रॅशनलिस्टिक सोसायटीची जाहिरात आहे. त्या जाहिरातीत संघटनेचं सदस्य बनण्याचं तसंच प्रकाशनं विकत घेण्याचं आवाहन आहे. त्याशिवाय परळच्या स्टार फार्मसीचं स्टार एग्युमिक्श्चर, दादरच्या मनोहर कंपनीचा निलगिरी चहा, त्याच कंपनीचा हनुमान बार सोप, राजाराम लिखिते यांनी छापलेली पुस्तकं यांच्या जाहिराती आहेत. तळाला प्रिंटलाईन आहे, Printed by C. S. Deole, at the Bombay Vaibhav Press, Servants of India Society's Home, Sandhurst Road, Girgaon, Bombay. Published by Keshav Sitaram Thackeray, 20, Miranda's Chawl, Lady Jamshetji Road, Dadar, Bombay.

दुसऱ्या पानापासून दोन उभ्या कॉलमातला मजकूर सुरू होतो. त्यात 'प्रबोधनाचे ध्येय' हा पहिला लेख एका पानापेक्षा थोडा मोठा आहे. लागूनच गो. म. चिपळूणकर यांचा 'विसाव्या शतकांतील सामाजिक व धार्मिक सुधारकांची कर्तव्ये' हा लेख आहे. त्याचा आकारही पहिल्या लेखाइतकाच आहे. त्यानंतर येणारा अग्रलेख 'उत्तिष्ठित जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' या ब्रीदवाक्यालाच मथळा करणारा आहे. तो साधारण अडीच पानांचा आहे. त्यानंतर कोणाचंही नाव नसलेले एकेका पानाचे दोन लेख आहेत. पहिल्या लेखात पार्वतीबाई आठवले यांच्या अमेरिका दौऱ्याचा गौरव आहे. त्या महर्षी कर्वेंच्या महिला शिक्षण संस्थेसाठी निधी गोळा करण्यासाठी अमेरिकेला गेलेल्या आहेत. पाठोपाठ 'विविधज्ञानविस्तारा'वर दमदार टीका केलीय. शेवटी वर्गणीदारांना वर्गणी आणि पोस्टाच्या व्यवहाराविषयी एक छोटं विनंतीवजा आवाहन केलेलं आहे. पहिल्याच अंकात प्रबोधनकारांनी आपली

अंक काढण्यामागची भूमिका स्पष्ट केलीय. शिवाय महिला सक्षमीकरणासारखा विषय हाताळून आपले अग्रक्रम सांगितलेत. तसंच ब्राह्मणी वर्तमानपत्रांना उत्तर देण्याची तयारीही दाखवून दिलीय. साधारणपणे पुढची दोन वर्षं 'प्रबोधन'चं स्वरूप अशाच प्रकारचं आहे. त्यात पुढे स्वतंत्र कविता, अनुवाद, पुस्तक परिचय यांची भर पडलीय. तिसऱ्या अंकापासून पहिल्या पानावर जाहिरातींच्या बरोबर अंकातल्या लेखांची छोटी अनुक्रमणिकाही आहे.

'प्रबोधन' कशासाठी?

'प्रबोधन'च्या पहिल्या अंकात त्याची भूमिका स्पष्ट करणारे दोन लेख आहेत. पहिला 'प्रबोधनचे ध्येय' या नावाचा आहे. फक्त त्या लेखाचीच नाही, तर 'प्रबोधन'चीच सुरुवात कवी वसंतविहारी यांच्या कवितेने होते. त्यामुळे या कवितेशिवाय 'प्रबोधन'वरचं कोणतंही लिखाण पूर्ण होऊ शकत नाही. या कवितेत 'प्रबोधन'च्या ध्येयाचं सार आलं आहे.

समाजकार्यी स्वधर्मतत्वी सदा शिलेदार।
प्रजापक्षनवमतसंवादी राजस सरदार।
विशिष्टपंथप्रवर्तकांची व्यर्थ न करि पूजा।
व्यक्तीचा नच मिंधा, बंदा सत्याच्या काजा।।
विश्व निर्मिले जयें दयाळें त्या जगदीशाला।
भिउनी केवळ, नच अन्याला, लागे कार्याला।।

प्रबोधनकारांनी 'बुद्धिदाता आणि विघ्नहर्ता श्रीगणेशदेवाच्या चरणी अनन्यभावाने माथा ठेऊन' 'प्रबोधन'ची सुरवात केलीय. याचं काही जणांना आश्चर्य वाटू शकेल. त्याला कारण पुढच्या काळात सार्वजनिक गणेशोत्सवाला केलेला विरोध असू शकतो. प्रबोधनकारांनी अभ्यास आणि अनुभव याच्या आधारे आपली विकसित झालेली समज त्या त्या काळात मोकळेपणाने व्यक्त केली आहे. त्यामुळे एकच गोष्ट धरून ठेवणाऱ्या पोथीबाज मठ्ठ पत्रपंडितांसारखं जडत्व त्यांच्या लिखाणात नाही. उलट त्यांच्या लिखाणाला गतिमानता आहे. प्रबोधनकार अस्सल पत्रकारासारखं त्या त्या दिवसावरचं आपलं मत मांडत जातात. तापलेल्या लोखंडावर हातोडा मारून परिस्थितीला आकार देण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे ते विरोधाभासी वाटत असलं तरी महत्त्वाचं ठरतं. अर्थात त्यामुळे त्यात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखी समग्र विचारधारा सापडत नाही किंवा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि जागृतिकार भगवंतराव पाळेकरांसारखी विचारांची समतोल मांडणी मिळत नाही. तरीही प्रबोधनकारांच्या विचारांचं मोल तसूभरही कमी होत नाही. उलट परिवर्तनाच्या चळवळीत त्यांच्या विचारांनी आपलं काम चोख पार पाडलेलं दिसून येतं.

'आधी सामाजिक सुधारणा की आधी राजकीय स्वातंत्र्य', टिळक-आगरकर वादात हा मुद्दा ऐरणीवर आला. त्यानंतर महात्मा गांधींनी सामाजिक सुधारणांना स्वातंत्र्य चळवळीचा भाग बनवेपर्यंत प्रत्येक विचारवंताला त्यावर आपलं मत स्पष्टपणे मांडणं गरजेचं ठरत होतं. त्यानुसार प्रबोधनकारांनी आपलं स्पष्ट मत सामाजिक सुधारणांच्या पारड्यात टाकलेलं दिसतं. ते लिहितात, 'स्वराज्याची लॉटरी म्हणजे मूठभर मोठ्या माशांना बाकीच्या अनंत धाकट्या मासोळ्यांना गिळण्याचा सनदपट्टाच होय, यात आम्हाला संशय वाटत नाही. सामाजिक उच्चनीच भेदभाव, आपण व आपला समाज

इतर सर्व समाजांपेक्षा उच्च दर्जाचा मानण्याची नाना फडणिशी आणि धार्मिक क्षेत्रांत भिक्षुकशाहीची दिवसाढवळ्या चालविलेली भांगरेगिरी, या सर्व राष्ट्रविनाशक, समाजविध्वंसक व दास्यप्रवर्तक दोषांचा आमूलाग्र नायनाट झाल्याशिवाय स्वराज्याचे अमृत प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने जरी हिन्दुस्थानाच्या घशांत कोंबले तरी त्यापासून त्याचा लवमात्र उद्धार होणार नाही.' स्वकीयांचं राज्य आलं तरी सामाजिक धार्मिक गुलामगिरी संपत नाही, हे महाराष्ट्राचा इतिहासच सांगतो, असा दावा ते करतात. धार्मिक म्हणजेच सामाजिक गुलामगिरीचा विरोध याचा 'प्रबोधन'चं एक महत्त्वाचं ध्येय म्हणून उल्लेख आहे.

'प्रबोधन' हा कट्टर नवमतवादी असल्याचं ते सांगतात. पुराणमतवाद्यांकडे दुर्लक्ष करण्याचा इरादा ते व्यक्त करतात. पण त्याचवेळेस हिंदू साम्राज्य उभं करण्याची महत्त्वाकांक्षाही लपवून ठेवत नाहीत. ते सांगतात, 'चालू घडीचा मामला असा आहे की सर्व भेदभावांचा सफाई संन्यास करून हिन्दुजनांनी निरलस भ्रातृभावाने आलेल्या व येणाऱ्या परिस्थितीशी तोंड देऊन आपले हिन्दुत्व, आपले आत्मराज्य, कायम ठेवून हिन्दु साम्राज्याच्या विशाळ आकांक्षांनी हिन्दी राष्ट्राचे विराट हृदय चबचबीत भिजवून सोडले पाहिजे.' त्यावेळेस 'प्रबोधन' हे कोणत्याही एका विचारधारेचा नसल्याचंही ते स्पष्ट करतात. 'प्रबोधन जितका कट्टा नवमतवादी आहे तितकाच तो पक्का स्वराज्यवादी आहे. जितका राष्ट्रीय वैभवाचा महत्त्वाकांक्षी आहे, तितकाच तो सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या पुरस्कर्त्यांचा कट्टा द्वेष्टा आहे. महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या कोणत्याही पक्षाचा प्रबोधन सांप्रदायिक नाही अथवा त्यांच्या मतांचा मिंधा गुलाम नाही. प्रबोधन सत्याचा भोक्ता आहे.' कळप कितीही उच्च ध्येयाने भारलेला का असेना, पण त्याचा भाग न बनण्याचा 'प्रबोधन'चा निर्धार तेव्हाच्या इतर विचारवंतांपेक्षा वेगळा आहे. त्यांना विचारांनी जवळच्या असलेल्या ब्राह्मणेतर चळवळीवर किंवा हिंदू मिशनरी सोसायटीवरही ते टीका करायला मागेपुढे बघत नाहीत. त्यामुळे ते स्वतंत्रपणे एकांडे शिलेदार बनून लढत राहताना दिसतात. 'प्रबोधन'चं एक वर्ष पूर्ण झाल्यावर लिहिलेल्या लेखात ते या भूमिकेचा आढावाही घेतात. ते लिहितात, 'देशाच्या स्वराज्य मुमुक्षू अवस्थेत प्रचलित चळवळींकडे एका विशिष्ट चिकित्सक दृष्टीने पाहण्याची एक नवीन दिशा प्रबोधनाने दाखविली आहे. त्यासाठी स्वीकारलेला सत्य प्रतिपादनाचा निर्भीड बाणा महाराष्ट्रीय जनतेच्या पचनी कसा काय पडतो, याची प्रथमतः आम्हाला शंका वाटत होती. परंतु चार-पाच अंक निघतात न निघतात तोच आश्रयदात्यांच्या वाढत्या संख्येने त्या शंकेची पूर्ण निवृत्ति झाली'. पुढच्या वाटचालीत प्रत्येक टप्प्यावर ते हेच विधान उद्धृत करतात आणि याचं आपण पालन करत असल्याची ग्वाही देतात. दुसऱ्या प्रकाशन वर्षाच्या शेवटच्या अंकात 'प्रबोधन'च्या ध्येयाचा वेगळ्या शब्दांत पुनरुच्चार करताना ते लिहितात, 'देशाच्या कोनाकोपऱ्यात जरा कोठे फट झाले की त्यावर चुटकीसारखे डझनवारी कालमांचे लेख खरडण्याचे काम प्रबोधनाचे नव्हे. ठिकठिकाणची बातमीपत्रे किंवा वर्तमानसारे देण्यासाठी प्रबोधनाचा जन्म नव्हें. ते काम आमच्यापेक्षा आमची इतर भावंडे उत्कृष्टपणे पार पाडीत असतातच. देशाच्या परिस्थितीचे रंग आतांशा इतके झपाझप बदलत आहेत, की कोणता रंग खरा कोणता खोटा, हे निश्चयाने सांगणेसुद्धा धाडसाचे होऊन बसले आहे. अशा अवस्थेंत प्रत्येक महत्त्वाच्या परिस्थितीकडे चिकित्सक दृष्टीने पाहून निश्चित विचारांची निष्पत्ति कशी करावी याची दिशा दाखविण्याचे कार्यच आजपर्यंत प्रबोधन करीत आलेले आहे, आणि हेच त्याचे धोरण पुढेही अबाधित राहील.'

पहिल्या अंकातलं संपादकीय तर प्रबोधनकारांनी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू म्हणजेच सीकेपी समाजाला उद्देशूनच लिहिलेलं दिसतं. त्यांच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष काढत त्यांना देशहितासाठी उभं राहण्याचं आवाहन त्यांनी केलंय. महाराष्ट्रातल्या प्रत्येक समाजाने स्वतःची सुधारणा केली तर महाराष्ट्र सुधारेल आणि देशही सुधारेल, असं सूत्र त्यांनी मांडलंय. त्यानुसार त्यांनी मराठा समाजाने अल्प काळात केलेल्या प्रगतीचं उदाहरणही दिलंय. त्यात प्रत्येक समाजाने आपापली नियतकालिकं काढल्याचा संदर्भ त्यांनी दिलाय, 'एकट्या मराठा बांधवांनी चालविलेली साप्ताहिके व मासिके जवळजवळ २५ असून, त्यांचा लोकप्रिय 'विजयी मराठा' लवकरच दैनिक होणार आहे... त्याचप्रमाणे पांचकळशी, भंडारी, वंजारी, तेली, तांबट, लोहार, सुतार, यांनी, फार काय पण, धेड, महार, मांग यांसारख्या आमच्या अवनत देशबांधवांनी आज शेकडो वृत्तपत्रे व मासिके चालवून आपल्या ज्ञातीच्या संघशक्तीला बेसुमार थरारून सोडले आहे'. त्यात सीकेपी मागे पडला आहे आणि सीकेपी समाजातले दोष घालवून जागृती आणण्याचं काम 'प्रबोधन' करणार असल्याचंही त्यांनी सांगितलंय. शेवटी ते सीकेपींनी आवाहन करतात, 'भरतभूमीच्या सौभाग्याकरितां, हे कायस्थ संघा, तूं जर खरा क्षत्रिय असशील तर पूर्व इतिहासाला स्मरून राष्ट्रीय कामगिरी करण्यासाठी उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत.'

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत, हे 'प्रबोधन'चं ब्रीद असल्याचं इथे लक्षात घ्यायला हवं. प्रबोधनकार सांगतात त्याप्रमाणे सीकेपी समाजाची लोकसंख्या तेव्हा ५० हजार असावी. सीकेपी हे स्वतःला क्षत्रिय मानतात. तरीही ते पांढरपेशा आहेत. पत्रव्यवहार आणि कारकुनी हे त्यांचं परंपरागत काम आहे. पण त्यांनी शिवकाळात तलवारीनेही मोठा पराक्रम गाजवलेला आहे. अशा सीकेपी समाजात नवी जागृती निर्माण करण्याचं काम प्रबोधनकारांनी केलं. त्यासाठी त्यांना 'प्रबोधन'ची मोठी मदत झाली. 'प्रबोधन'च्या आधीही इंग्रजी बुलेटिन काढून ते सीकेपींना सुधारणांसाठी आवाहन करत होतेच. त्यांनी 'प्रबोधन'मधून सीकेपींच्या बदनामीच्या इतिहासाच्या बदनामीचा प्रत्येक प्रयत्न हाणून पाडला. त्यातून सीकेपींमध्ये पूर्वजांच्या इतिहासाविषयी स्वाभिमान उभा केला. दादाजी नरसप्रभू, बाजीप्रभू देशपांडे, रंगो बापूजी असे इतिहासातले अनेक आदर्श जवळपास शून्यातून उभे केले. शिवाय दरोडेखोरांशी सामना करताना मृत्युमुखी पडलेल्या प्रभाकर सुळे यांच्या स्मृती जपण्यासाठीही प्रयत्न केले. समाजाच्या संस्थांच्या भोंगळ कारभारावर टीका करून तो लोकाभिमुख करायला भाग पाडलं. लग्नात होणारा खर्च आणि हुंडा पद्धतीविरुद्ध आंदोलन करून त्याला आळा घातला. विधवाविवाह आणि आंतरजातीय विवाहांना चालना दिली. समाजातल्या उत्तम कवी, लेखकांना मंच मिळवून दिला. काही अपवाद वगळता देशभर पसरलेल्या सीकेपी समाजानेही त्यांना चांगला पाठिंबा दिल्याचं आढळतं. सीकेपी समाजातल्या अनेकांनी प्रबोधनचे वर्गणीदार, देणगीदार, जाहिरातदार, संपादनाच्या कामातले सहकारी, लेखक, पत्रलेखक म्हणून प्रबोधनच्या बऱ्यावाईट दिवसांत साथ दिली. असा एखाद्या समाजातला एकगठ्ठा वाचक नसताना नियतकालिक चालवणं त्या काळात व्यावहारिकदृष्ट्या शक्य नव्हतं. पूर्वायुष्यात प्रबोधनकारांना सीकेपी समाजाच्या संस्थांकडून वाईट अनुभव आलेले असतानाही त्यांनी या समाजाच्या प्रगतीसाठी लढा दिला. त्यांनी १९४५ पासून अखिल भारतीय चां. का. प्रभुहितवर्धक संस्थेसाठी 'समाजसेवा' हे मासिक पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळ चालवल्याचा संदर्भ सापडतो. सीकेपींनी राजकारणात सक्रिय व्हावं, असा आग्रह त्यांनी 'प्रबोधन'मध्ये सातत्याने

मांडला आहे. तोच विचार बाळासाहेब ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबाने यांनी प्रत्यक्षात आणलेला दिसतो. त्यांनाही सीकेपी समाजातून कार्यकर्ते अनेक मिळाले पण नेते फारच कमी मिळाले. त्यात उदाहरणादाखल डॉ. हेमचंद्र गुप्ते, सतीश प्रधान, आनंद दिघे किंवा सध्याचे आमदार विलास पोतनीस यांचा उल्लेख करता येईल. काँग्रेसचे माजी खासदार शरद दिघे हे आणखी एक उदाहरण.

'प्रबोधन'चा प्रवास : दादर ते सातारा

प्रबोधनकारांनी लग्न करून १९१०ला दादरमध्ये बिऱ्हाड थाटलं. तेव्हा दादर टुमदार गावच होतं. आज मुंबईचं केंद्र म्हणून दादरच्या झालेल्या विकासात प्रबोधनकारांचं महत्त्वाचं योगदान आहे. गरिबीमुळे प्रबोधनकारांना पनवेलनंतर बारामती, मध्य प्रदेशातलं देवास, कल्याण, कोल्हापूर, सातारा, पुणे, कर्जत, भिवंडी अशा निरनिराळ्या गावांत आपला संसार थाटावा लागला. शेवटी ते वांद्र्याला आले. पण दादर हीच त्यांची खरी कर्मभूमी होती. 'प्रबोधन'ची जन्मभूमीही दादर हीच होती. 'प्रबोधन'च्या कामासाठी प्रबोधनकारांनी दादरमधल्याच खांडके बिल्डिंगमध्ये एक ब्लॉक भाड्याने घेतला होता. तिथे अनेक तरुण प्रबोधनकारांकडे ओढले गेले. अभ्यास करण्यासाठी ते दिवसभर तिथेच असत. त्यातून 'स्वाध्यायाश्रम' नावाची संस्था सुरू झाली. त्यात प्रबोधनकार दर रविवारी वक्तृत्वशास्त्राच्या प्रशिक्षणाचे वर्ग घेत. शिवाय इतरही विद्वानांची भाषणं, कविता वाचन, गायन, असे कार्यक्रम आयोजित केले जात. 'स्वाध्यायाश्रमा'च्या तरुणांनीच 'गोविंदाग्रज मंडळ' स्थापन करून पाच पुस्तकंही काढली. त्यात प्रबोधनकारांच्या काही लेखांचा संग्रह असणारा 'स्वाध्याय संदेश'ही होता. शिवाय दर पंधरवड्याला प्रकाशित होणाऱ्या 'प्रबोधन'च्या अंकांचं पॅकिंग करण्यासाठी २०-२५ तरुण रात्र जागवत. त्यातल्या चर्चा आणि वादविवादांमुळे 'प्रबोधन नाईट' गाजत असे.

या तरुणांनी 'हुंडा विध्वंसन संघ' स्थापन करून मुंबईत एक वादळच निर्माण केलं होतं. प्रबोधनकार तर वयाच्या २२ व्या वर्षापासून म्हणजे १९०७ पासून हुंडाविरोधी प्रचार करत होते. या संघटनेने प्रामुख्याने सीकेपी समाजातली हुंडा घेऊन होणारी लग्नं उधळून लावली. हुंडा निषेधाची गाणी गात मोठ्या मिरवणुका काढल्या. गाढवाच्या वराती घेऊन लग्नाच्या ठिकाणी हल्लाबोल केला. १९२२-२३च्या लग्नसराईत २०-२५ लग्नात 'हुंडा विध्वंसन संघा'ने धुमाकूळ घातला होता. या आंदोलनाला 'प्रबोधन'चा सक्रिय पाठिंबा होता. खरं तर 'प्रबोधन'च्याच नेतृत्वात हे सुरू होतं. हुंडा विरोधामागचा विचार 'प्रबोधन'नेच समजावून सांगितला होता. हुंडा घेऊन लग्न करणाऱ्यांची नावं 'प्रबोधन'मध्येच प्रसिद्ध होत. संघाच्या कारवायांच्या बातम्याही छापून येत. शिवाय हुंडा न घेता लग्न करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी 'वधू पाहिजे'च्या जाहिरातीही 'प्रबोधन'मध्ये छापून येत. त्यात संपर्कासाठी 'प्रबोधन कचेरी' असा पत्ता दिलेला असे. पुढे प्रबोधनकार अचानक साताऱ्याला गेल्यामुळे हे सगळे उपक्रम बंदच पडले. पण त्याची पुण्याई कायम राहिली. वा. सी. बेंद्रे सांगतात तसं प्रबोधनकारांनी आंदोलनं करून हुंड्याच्या व्यापारी मनोवृत्तीपासून सीकेपी समाजाला परावर्तित केलं. तर श्री. शं. नवरे सांगतात, 'पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढलेल्या 'समाज समता संघा'ला निष्ठावंत कार्यकर्ते पुरविण्याचे काम मुख्यतः स्वाध्यायाश्रम याच संस्थेने केले.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत सुरुवातीच्या काळात अनेक सीकेपी तरुण सक्रिय दिसतात. त्याची तयारी प्रबोधनकारांनी करून घेतली होती.

याच काळात प्रबोधनकारांनी सरकारी नोकरी सोडली. त्यासाठी प्रबोधनकारांच्या आईचा विशेष

आग्रह होता. त्या नेहमी सांगत की वेळ आली तर भीक माग पण इंग्रज सरकारची नोकरी करू नकोस. सरकारने परवानगी दिल्यामुळे 'प्रबोधन' सुरू ठेवण्यात तांत्रिकदृष्ट्या अडचण काहीच नव्हती. पण प्रबोधनकारांच्या मनाला ते पटत नव्हतं. ते लिहितात, 'एकीकडे नोकरी नि दुसरीकडे बहुजन समाज जागृतीचे कार्य, अशा परस्परविरुद्ध दोन टोकांवरच्या डगरीवरचा कसरती खेळ माझ्या स्वभावाला पटेनासा झाला. सद्सद्विवेकबुद्धी सारखी टोचण्या देऊ लागली. सभांतून सरकारी धोरणांवर टीका करायची आणि प्रबोधनात मानसिक दास्याविरुद्ध बंड या विषयावर स्पष्टोक्तीची लेखमाला लिहायची, हे मला सहन होईना.' सरकारच्या नोकरीला लाथ मारून बहुजन समाजाच्या सेवेला वाहून घे, असं त्यांच्या स्वाभिमानी मातोश्री सांगत होत्याच. प्रत्यक्ष राजीनाम्याची तारीख 'शनिमहात्म्य' या पुस्तकात येते, ती अशी, '१६ डिसेंबर १९२१ पासून मानसिक दास्याविरुद्ध बण्ड ही लेखमाला सुरू झाली आणि तिचा ५ वा अग्रलेखांक ता. १ मार्च १९२२ ला प्रसिद्ध होण्यापूर्वीच ता. १० फेब्रुवारी १९२२ रोजी दुपारी बरोबर १२ वाजता, राहू, शनि आणि मंगळ या त्रिकुटाचे मेतकूट जमताच, अपमानाच्या क्षुल्लक सबबीवर मी ताडकन सरकारी नोकरीच्या दास्याची जाडजूड रौप्यशृंखला तोडून, तज्जन्य मानसिक दास्याविरुद्ध प्रत्यक्ष बंड केले.' केवळ आपले विचार आणि कृती यात तफावत राहू नये, यासाठी अडीचशे रुपये मासिक पगाराची नोकरी सोडून पुन्हा गरिबीत उडी घेणारा संपादक विरळाच. त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबाने केलेल्या त्यागाची दखल मात्र इतिहासाने हवी तशी घेतलेली नाही.

'प्रबोधन'ला मिळणाऱ्या प्रतिसादामुळे त्यांना 'प्रबोधन'ची पानं आणि प्रती वाढवण्याची इच्छा होती. स्वतंत्र छापखाना नसल्यामुळे त्यांच्या या मनसुब्यात अडचणी येत होत्या. छत्रपती शाहूंनी त्यासाठी २० हजार रुपये देणगी आणि २० हजार रुपये बिनव्याजी कर्ज देण्याची तयारी दाखवली होती. पण त्यांच्या निधनामुळे ते होऊ शकलं नाही. त्यानंतर 'प्रबोधन'चे एक चाहते आत्माराम चित्रे यांनी काळबादेवी इथे छापखानाही उभारून दिला. तिथे कामही सुरू झालं. पण महिन्याभरातच चित्रेंचंही निधन झालं. त्यामुळे तोही प्रयत्न फोल ठरला. ही कहाणी प्रबोधनमध्ये छापून येताच साताऱ्यातील उद्योजक धनजीशेठ कूपर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना प्रबोधनकारांकडे पाठवले. कर्मवीरांना गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पैसे हवे होते. त्यासाठी किर्लोस्कर कंपनीतल्या अनुभवाच्या जोरावर त्यांनी कूपर यांच्या गुंतवणुकीच्या आधारे एक नांगरांचा कारखाना सातारा रोड स्टेशनजवळ पाडळी गावात उभारला होता. मॉण्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणांमुळे देशात १९२३ला लोकल कॉन्सिलच्या निवडणुका होणार होत्या. त्या कूपरना लढवायच्या होत्या. त्यासाठी प्रबोधनकारांसारखा हरहुन्नरी आणि प्रसिद्ध पत्रकार आपल्यासोबत असला तर उत्तम, असा विचार करून कूपर यांनी प्रबोधनकारांसमोर एक उत्तम प्रस्ताव ठेवला. हवा तसा छापखाना, हवा तितका पैसा, राहण्यासाठी घर, कारखान्याच्या जाहिरात खात्याची जबाबदारी, 'प्रबोधन'च्या धोरणात लुडबुड नाही, सन्मानवेतन म्हणून दरमहा १५० रुपये, शिवाय छापखान्याच्या निव्वळ नफ्यात अर्धा वाटा. त्याला भुलून प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'चा कारभार साताऱ्याला हलवण्याचा निर्णय घेतला.

निवडणुकीच्या दरम्यान प्रबोधनकारांनी कूपर यांच्या गटातले भास्करराव जाधव यांच्याविरोधात भूमिका घेतली. तसंच त्यांनी 'अस्पृश्यांनो, स्पृश्यांपासून सावधान' असं स्फुट 'प्रबोधना'त लिहून बॉम्ब टाकला. त्यापाठोपाठ कर्मवीरांनी नांगर स्वस्तात विकण्याचा आग्रह प्रत्यक्षात आणला होता.

परिणामी या दोघांच्या विरोधात कूपर यांनी षड्यंत्र रचायला सुरवात केली. त्यात प्रबोधनकारांनी साताऱ्याच्या छापखान्यातला माल पुण्याला नेऊन तिथे छापखाना काढल्याची कुजबुज कूपरच्या जवळचे लोक करू लागले. ते कानावर पडताच प्रबोधनकारांनी सगळा हिशेब देऊन कफल्लकपणे सातारा सोडला. प्रबोधनप्रेमी रामचंद्र उर्फ बापूसाहेब चित्रे यांनी पुण्यात कर्जात बुडालेला एक छापखाना विकत घेतला होता. त्याचा व्यवहार करण्यासाठी छापखान्याचा मालक, ज्याचा उल्लेख प्रबोधनकार 'गायतोंड्या भट' असा करतात, सातारा रोडला प्रबोधनकारांना भेटायला आला होता. तो आला त्याच दिवशी प्रबोधनकारांच्या एका मुलीचं डायरियाने अचानक निधन झालं. तिचे अंत्यसंस्कार करत असतानाच घाईत असलेल्या छापखाना मालकाशी जड हृदयाने व्यवहाराच्या गोष्टीही करत होते. ते बघून प्रबोधनकारांच्या पत्नीने त्यांना सुनावलं, 'प्रबोधनापुढे पोटच्या गोळ्याची सुद्धा यांना तिडीक येत नाही.' तो उद्वेग स्वाभाविक असला तरी ते एका अर्थाने प्रबोधनकारांच्या ध्येयनिष्ठेला अभिवादन होतं.

साताऱ्यात प्रबोधनकार साधारण नऊ महिने राहिले. या काळात 'प्रबोधन'ची दादरमध्ये बसलेली घडी पूर्ण विस्कटली. त्यांचं व्यावहारिक आणि कौटुंबिक नुकसानच झालं. पण याच काळात प्रबोधनकारांना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातल्या राजकारण आणि चळवळींचा जवळून अनुभव घेता आला. ब्राह्मणेतर चळवळीची मुंबईहून लांबवरून दिसली नसती अशी बाजू त्यांना पाहता आली. विशेष म्हणजे छत्रपती शाहूंच्या निधनानंतर या चळवळीला आलेल्या मर्यादा त्यांच्या लक्षात आल्या. साताऱ्यातून त्यांनी 'प्रबोधन'चे १७ अंक काढले. या सगळ्या अंकांची पृष्ठसंख्या पहिल्या दोन वर्षांपेक्षा दुप्पट म्हणजे १६ इतकी होती. त्यात चार ते सात पानं इंग्रजी मजकूर असे. लोगोचा एक भाग म्हणून संपादक केशव सीताराम ठाकरे असं छापायची सुरुवात पहिल्याच वर्षीच्या तिसऱ्या अंकापासून झाली होती. जुन्या लोगोसह तीच पद्धत नवीन अंकातही सुरू असलेली दिसते. 'उत्तिष्ठित... 'हे ब्रीदवाक्य लोगोच्या खाली असायचं, ते लोगोच्या वर करण्यात आलं. तर लोगोच्या खाली प्रबोधनची ओळख PRABODHAN - Fortnightly Journal Devoted to the Social, Religious and Moral Regeneration of the Hindu Society. इतकीच छापून येत असे. त्यात भर पडली ती अशी, A radically rational organ exposing the correct phases of Maharashtrian Movement. पण ही दोन्ही इंग्रजी वाक्यं तिसऱ्या वर्षाच्या सोळाव्या अंकापर्यंतच आहेत.

'प्रबोधना'चा पुण्यातला संघर्ष

साताऱ्यातून प्रकाशित झालेल्या तिसऱ्या वर्षाच्या १७व्या अंकातच पुढचा अंक पुण्यातून प्रकाशित होणार असल्याची घोषणा झाली. त्यानुसार प्रबोधनकारांनी सदाशिव पेठेत घर आणि बुधवार पेठेत छापखाना असा संसार थाटला. पण पुण्यातल्या सनातनी ब्राह्मणांनी मूळ मालकाला छापखाना प्रबोधनकारांना न देण्यासाठी उचकवलं. त्याला बळी पडून त्याने छापखान्याला टाळं लावलं. सनातन्यांनी 'प्रबोधन'च्या नावाची पाटीही भररस्त्यात जाळली. वर पुण्यात 'प्रबोधन'ला जाळून खाक करू अशी शेखी मिरवली. त्यामुळे पुण्यातच 'प्रबोधन'चा छापखाना उभारण्याची प्रतिज्ञा प्रबोधनकारांनी केली. तोवर 'प्रबोधन'चा तिसऱ्या वर्षाचा शेवटचा एकच अंक प्रकाशित होऊ शकला. प्रबोधनकारांनी नव्या छापखान्यासाठी कर्ज आणि देणग्या मिळवल्या. त्यातून सदाशिव पेठेत छापखाना उभा करण्याची

तयारी झाली. पण प्रबोधनकारांनी मुंबईतून विकत घेऊन पाठवलेलं ट्रेडल मशीनचं चाक रेल्वेने पुण्यात पोहचेपर्यंत तुटलं. इतर पार्टही खिळखिळे झाले. तरीही धीर न सोडता प्रबोधनकारांनी भांडवल उभं करण्यासाठी धावाधाव सुरूच ठेवली. त्यासाठी मुंबईत असताना धावपळीमुळे ते आजारी पडले. शरीराचा उजवा भाग प्रचंड वेदना देऊ लागला. त्याचबरोबर डेंग्यू, कावीळ आणि मूळव्याधीने हल्ला केला. त्यातून बाहेर यायला चार महिने लागले. अर्धी मशिनरी पुण्यात, उरलेली अर्धी मुंबईत दुरुस्त होतेय, कारागिरांचे पगार थकलेत, उपचारासाठीही पैसे नाहीत अशी भयंकर परिस्थिती होती. पण यातून बाहेर येत १९२५च्या जानेवारीत ते कसेबसे पुण्याला पोचले. पुन्हा 'प्रबोधन' उभं करण्याच्या प्रयत्नांना लागले. पुढच्या चार महिन्यांत मशीन सातवेळा तुटलं. इतरही अडचणी येतच राहिल्या.

या सगळ्या अडचणींतून मार्ग काढत ९ महिन्यांच्या खंडानंतर 'प्रबोधन' १९२५च्या एप्रिल महिन्यात पुन्हा एकदा सुरू झालं. 'प्रबोधनला देवाज्ञा झाली' अशी टीका करणाऱ्यांना 'प्रबोधन'ने नव्याने सुरुवात करून उत्तर दिलं. चौथ्या महिन्याचा पहिला अंक हा आता पाक्षिक नसून मासिक होता. पानांची संख्या ४० होती. पुढे नोव्हेंबर १९२७ पर्यंत ३२ महिन्यांत 'मासिक प्रबोधन'चे २२ अंक निघाले. त्याचसोबत प्रबोधनकारांनी ३१ ऑगस्ट १९२७ पासून 'लोकहितवादी' हे नवीन साप्ताहिकही सुरू केलं. त्याचा शेवटचा तेरावा अंक पुण्याहूनच डिसेंबर १९२७ला निघाल्याचा उल्लेख 'शनिमहात्म्य'मधे आहे. म्हणजे जून १९२४ ला पुण्यात आल्यापासून नोव्हेंबरमधे मुंबईत परतेपर्यंत प्रबोधनकार अनंत अडचणींवर मात करत आणि सनातन्यांच्या नाकावर टिच्चून 'प्रबोधन' जगवत राहिले. त्याचं श्रेय त्यांनी त्यांचे सहसंपादक बापूसाहेब चित्रे आणि प्रभाकर चित्रे, मारुती हराळे, बापूराव वझे, दिनकर सुरुडकर या छापखान्यातल्या कर्मचाऱ्यांना दिलं आहे. बापूसाहेब चित्रे यांचं मे १९२६ मधे क्षयरोगामुळे निधन झाल्याने प्रबोधनकारांना धक्का बसला होता. त्याच्याही फार आधी दत्ता देशमुख या त्यांच्या खंद्या सहकाऱ्याला वडिलांच्या मृत्यूमुळे 'प्रबोधन' कायमचं सोडावं लागलं होतं. 'प्रबोधन'च्या चौथ्या वर्षाच्या आठव्या अंकापासून 'प्रबोधन'चा लोगो बदलला. 'प्रबोधन'च्या नावामागचा सूर्य जाऊन त्याजागी तराजू आणि ग्रंथ यांची रेखाटणं आली. प्रबोधनकारांनी सातव्या अंकात 'कलम, समशेर आणि तागडी' असा लेख लिहून या बदलाची वैचारिक भूमिका आधीच मांडली होती. शिवाय 'प्रबोधन'चं आधीचं संस्कृत ब्रीदवाक्य आणि 'प्रबोधन'च्या स्वरूपाचं वर्णन करणारी इंग्रजी वाक्यं काढून त्या ठिकाणी 'लोकहितवादी पण स्वतंत्रमतवादी' असं मराठीतलं दणदणीत वाक्य दिसू लागलं.

प्रबोधनकार पुण्यात होते त्या काळात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद अगदी टोकाला पोहोचला होता. पुण्यात पुतळ्यांचं राजकारण सुरू होतं. आधी छत्रपती शिवाजी महाराज, पाठोपाठ लोकमान्य टिळक आणि नंतर महात्मा फुले यांचे पुतळे उभारण्यावरून वाद झाले होते. त्यातून गणेशोत्सवात मेळ्यांमधल्या गाण्यांमधून दोन्ही बाजूंनी होणाऱ्या दर्जाहीन टीकेने त्यात तेल ओतलं. त्यावर दिनकरराव जवळकर यांनी लिहिलेल्या 'देशाचे दुष्मन' या पुस्तिकेने एकच गोंधळ उडवला. त्यात लोकमान्य टिळकांच्या मुलांनी गायकवाड वाड्यातल्या गणपतीसमोर अस्पृश्यांचा मेळ्याचा कार्यक्रम करून भर टाकली. या काळात प्रबोधनकार पुण्यात असल्यामुळे केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर हे ब्राह्मणेतर पक्षाचे तरुण नेते त्यांना भेटण्यासाठी जवळपास दररोज 'प्रबोधन' कचेरीत येत. शिवाय लोकमान्य टिळकांचे

सुपुत्र रामभाऊ आणि श्रीधरपंत हेही असत. त्यामुळे या सगळ्याचे सूत्रधार प्रबोधनकारच असल्याचा समज पुण्यात पसरला होता. विशेषतः 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक प्रबोधनकारांनीच लिहिलं असल्याचं अनेकांना वाटत होतं. त्याविषयी य. दि. फडके लिहितात, 'जवळकरांची शब्दकळाही ठाकऱ्यांच्या शब्दकळेसारखी तिखटजाळ आणि वाचताना प्रतिपक्षीयांना ठसका लागावा अशी होती... ब्रह्मवांत्युत्पन्न टिळक - चिपळूणकर असा जवळकरांनी केलेला उल्लेख ठाकऱ्यांची आठवण करून देणारा होता. कारण ब्रह्ममुखोत्पन्नऐवजी ब्रह्मवांत्युत्पन्न हा शब्द म्हणजे प्रबोधनकारांनी मराठी भाषेत टाकलेली नवी भर होती. प्रबोधनकारांप्रमाणेच जवळकरांनीही कोकणस्थ पेशव्यांवर तुफान हल्ला चढवताना कायस्थ प्रभूंची तरफदारी केली होती. ठाकऱ्यांच्या प्रमाणेच जवळकरांनाही राम गणेश गडकऱ्यांच्या भरजरी भाषेने भुरळ घातली होती. देशाचे दुष्मन हे प्रकाशित झाल्यानंतर त्यावर दिनकर शंकर जवळकरांचे नाव असले तरी ते प्रबोधनकार ठाकरे यांनीच लिहिले आहे, अशी भालाकार भोपटकर वगैरे टिळक पक्षीयांची समजूत होती. त्यामुळे खुद्द प्रबोधनकारांनी ज्ञानप्रकाशमध्ये पत्र लिहून तो मी नव्हेच अशा आशयाचा खुलासा केला.'

प्रबोधनकारांचा छापखाना अगदी ब्राह्मणी वस्तीमध्ये असल्याने त्यांना या सगळ्याचा त्रास भोगावा लागत असे. धमकी देणारी पत्रं तर आधीपासून सुरूच होती. एका धनवडे आडनावाच्या तरुणाने सरदार बावडेकरांच्या मुलीची छेड काढल्याने १९२६च्या ऑगस्ट महिन्यात पुणे तापलं होतं. त्या घटनेच्या निषेधाच्या सभेवरून येणाऱ्या सनातन्यांनी प्रबोधनच्या छापखान्यावर जाऊन जवळपास दोन तास शिव्याशाप दिले. कारखान्याच्या नावाचा फलक खाली पाडला. त्यानंतर पुढच्याच आठवड्यात प्रबोधनकार पर्वतीजवळ फिरायला गेले असताना तीन चार जणांनी लाठीहल्ला केला. पण प्रबोधनकारांनी वॉकिंग स्टिकमधली गुप्ती बाहेर काढल्याने ते पळून गेले. खोटी निमंत्रणपत्रिका बनवून छापखान्याला पोलिसी प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्नही केला गेला. गोडबोले नावाचा एक गुंड प्रबोधनकारांना भेटायला आला. छापखान्यातल्या कामगारांमुळे तो काही करू शकला नाही. पुढे पोलिसांना सांगून त्याचा बंदोबस्त करावा लागला. त्यांच्या लिखाणाला प्रक्षोभक ठरवून कोर्टात जाण्याचेही प्रयत्न केले. छापखान्यात आगीचा गोळा टाकून कागदाच्या थप्प्यांना आगही लावण्यात आली. शिवाय मेलेली कुजलेली कुत्री दारासमोर फेकण्यात आली. एकदा तर मेलेलं गाढवही टाकण्यात आलं. अनेकदा पैसे देऊनही छपाईसाठी चांगला कागद मिळून दिला जात नसे. तसंच पुण्यातल्या ब्राह्मण एजंटांनी 'प्रबोधन'वर बहिष्कारही घालून बघितला. 'प्रबोधन'चे अंक विकाल तर 'केसरी', 'ज्ञानप्रकाश'चे अंक मिळणार नाहीत, असा दबाव त्यांनी विक्रेत्यांवर आणला. पण 'प्रबोधन' छापखान्यातल्या कामगारांनी चौकाचौकात विक्री करून त्यावर मात केली. तसंच चांगलं कमिशन दिल्याने विक्रेतेही नरम पडले. अनेकदा तर अंक वाचकांपर्यंत जाऊ नयेत यासाठी एकगठ्ठा विकतही घेतले जात.

या सगळ्या अडचणींवर मात करत प्रबोधनकार पुण्यात 'प्रबोधन' चालवत होते. कोणत्याही मोठ्या जातीचा, सत्ताधाऱ्याचा किंवा चळवळीचाही थेट पाठिंबा नसताना पुण्यात भिक्षुकशाहीच्या विरोधात संघर्ष करणं महाकठीण होतं. त्यासाठी प्रबोधनकारांसारखा वीर योद्धाच हवा होता. खुद्द सदाशिव पेठेत राहून ब्राह्मणेतरी विचारांचे 'प्रबोधन'चे २२ आणि 'लोकहितवादी'चे १३ अंक प्रकाशित करणं, यासाठीची हिंमत कळण्यासाठी तो काळ समजून घ्यावा लागेल. या काळामुळे प्रबोधनकारांना

सनातनी ब्राह्मणी विचारांमधला जहरी विखार अनुभवता आला. त्याचे समाजावरचे दुष्परिणाम जवळून बघता आले. त्याचा खोलवर विचार करत त्याच्या मुळापर्यंत जाता आले. पुण्याने प्रबोधनकारांच्या विचारांमधले विरोधाभास संपवत त्यांना महात्मा फुलेंच्या विचारांच्या अधिक जवळ नेलं. त्याचं दर्शन 'प्रबोधन'च्या पाचव्या वर्षांच्या अंकांमध्ये दिसू लागलं. 'देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे' या एका लेखाचा दाखला त्यासाठी पुरेसा आहे.

'प्रबोधन'चं शेवटचं पर्व : पुन्हा दादर

चौथ्या वर्षाच्या काळात प्रबोधनकारांनी इंदूरचे राजे तुकोजीराव होळकर यांना खुनी ठरवणाऱ्या बावला मुमताज प्रकरणावर आपली लेखणी जोरात चालवली. सगळी ब्राह्मणी वर्तमानपत्रे होळकरांना राजपदावरून खाली खेचण्यासाठी आक्रमक झाली होती. त्याला उत्तर देणारं कुणी नसल्यामुळे प्रबोधनकार होळकरांची बाजू घेऊन या वादात उतरले. त्यांच्या लेखांना तुफान प्रतिसाद मिळत असल्याने त्यांची पुस्तकंही काढली. तीदेखील हजारोंच्या संख्येने विकली गेली. त्यातल्याच 'टेम्प्ट्रेस' या इंग्रजी पुस्तकात 'द बॉम्बे क्रॉनिकल' या वर्तमानपत्राचे प्रख्यात ब्रिटिश संपादक बी. जी. हॉर्निमन यांच्यावर टीका केली होती. त्यामुळे चिडून त्यांनी प्रबोधनकारांच्या विरोधात मुंबईतल्या कोर्टात अब्रूनुकसानीचा खटला दाखल केला. त्यासाठी वकील द्यायला प्रबोधनकारांकडे पैसे नव्हते. त्यामुळे 'प्रबोधन'चे अनेक प्रेमी मदत करण्यासाठी पुढे आले. याच खटल्यासाठी ७ नोव्हेंबर १९२७ला मुंबईत आल्यावर प्रबोधनकार पुन्हा एकदा गंभीर आजारी पडले. ते एकटेच नाहीत तर पत्नी, मुली आणि मुलगा असं संपूर्ण कुटुंबच वेगवेगळ्या आजारांनी ग्रस्त झाले. त्यामुळे मुंबईत अडकलेले प्रबोधनकार पुन्हा 'प्रबोधन' चालवण्यासाठी पुण्यात जाऊ शकले नाहीत.

'प्रबोधन' जवळपास दोन वर्षं बंद होतं. त्यानंतर ते १९२९च्या दसऱ्याला पुन्हा सुरू झालं. त्या अंकाला क्रान्त्यंक असं नाव होतं. किल्ल्यातून बाहेर येणारा वाघ त्यावर दिसत होता. प्रबोधनकार नावाच्या वाघानेही नव्याने डरकाळी फोडली होती. पुण्याच्या दत्तात्रेय छापखान्याचे नारायण वैद्य यांनी छपाई आणि प्रकाशनाची जबाबदारी घेतली होती. तर प्रबोधनकार हे फक्त संपादक होते. नोव्हेंबर १९२९ पासून मार्च १९३० पर्यंत 'प्रबोधन'चे पाच अंक निघालेले दिसतात. त्यानंतर 'प्रबोधन'चा अंक सापडत नाही. 'प्रबोधन' बंद करण्यात येत असल्याची घोषणा केलेली नाही. 'माझी जीवनगाथा' या आत्मचरित्रात प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'शी संबंधित इतर घडामोडींची तपशीलवार चर्चा आहे. पण त्यात 'प्रबोधन' मुंबईतून पुन्हा कसं सुरू केलं आणि ते सहा अंकात कसं बंद पडलं, याच्याविषयी काहीही सांगितलेलं नाही. फक्त उदरनिर्वाहासाठी 'प्रबोधन'चा छापखाना आधी भाड्याने दिल्याचा आणि नंतर विकल्याचा उल्लेख आहे. पण या व्यवहारात मित्रांनी फसवल्यामुळे प्रबोधनकारांच्या हातात काहीच लागलं नाही. या काळात प्रबोधनकारांनी 'शनिमहात्म्य' आणि 'शेतकऱ्यांचे स्वराज्य' ही दोन महत्त्वाची पुस्तकं लिहिली. दोन्ही पुस्तकं त्या काळात अत्यंत लोकप्रिय झाली होती. शिवाय दादरमध्ये सार्वजनिक गणेशोत्सवातले ब्राह्मणी वर्चस्व मोडीत काढण्यासाठी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत चालवलेली चळवळ आणि त्यातून सार्वजनिक नवरात्रोत्सवाची सुरुवात या त्यांच्या सार्वजनिक जीवनातल्या महत्त्वाच्या घडामोडी 'प्रबोधन'च्या याच टप्प्यात झाल्यात.

'प्रबोधन'च्या शेवटच्या पर्वात म्हणजे नोव्हेंबर १९२७ ते मार्च १९३० या दरम्यान 'प्रबोधन'चे

फक्त सहाच अंक निघालेले आहेत. पण त्यात वेगळे प्रबोधनकार दिसतात. 'प्रबोधन'ची सुरुवात ईशस्मरणाने करणारे 'प्रबोधन'कार नोव्हेंबर १९२९च्या अंकात नवी सुरुवात करताना लिहितात, 'कोणत्याही कार्याच्या प्रारंभी - मग ते बॉम्ब फेकण्याचे असो नाहीतर बोंब मारण्याचे असो - कोणत्या तरी देवदेवतेचे नामस्मरणपूर्वक वन्दन करण्याचा हिन्दुजनांचा शिष्ट संप्रदाय आहे. यापूर्वीच्या माझ्या प्रत्येक ग्रंथारंभी हा शिष्टाचार मी भक्तिपूर्वक इमानेइतबारे पाळलेला आहे... पण प्रागतिक मनुष्याने मतांच्या ठरावीकपणाला चिकटून बसण्याइतका मनाचा दुबळेपणा दाखविणे म्हणजे जगात जगण्याची आपली नालायकी सिद्ध करण्यासारखे आहे. कालपर्यंत मी देवदेवतांचे अस्तित्व मानणारा होतो. आज मी देवविषयक सर्व भावनांच्या छाताडावर बॉम्ब फेकणारा लालबुंद क्रान्तिकारक बनलो आहे.' मार्च १९३०च्या शेवटच्या अंकात ते लिहितात, 'प्रबोधन निरीश्वरवादी आहे. त्याचे सत्यशोधन सत्यशोधक समाजाच्याही पुढे गेलेले आहे. देव मानवात दलाल नको, या काथ्याकुटापेक्षा देवालाच उखडला तर दलाल उरतोच कोठे?' इथे 'प्रबोधन'च्या लिखाणाचं एक वर्तुळ पूर्ण होतं.

'प्रबोधन'नंतर प्रबोधनकार तब्येतीमुळे हवा बदलासाठी कर्जत इथे राहायला होते. तिथूनच त्यांच्या नाट्यव्यवसायातल्या दुसऱ्या इनिंगची सुरुवात झाली. त्यानंतर त्यांनी कधीच स्वतःचं नियतकालिक चालवलं नाही. १९३७-३८ साली त्यांनी मालती तेंडुलकर यांच्या 'प्रतोद' या साप्ताहिकाचं संपादन जवळपास वर्षभर केलं. त्या व्यतिरिक्त ते कधी संपादकही नव्हते. तरी प्रबोधनकारांनी कोल्हापूरच्या 'सेवक'पासून जळगावच्या 'बातमीदार'पर्यंत अनेक नियतकालिकांत लेख लिहिले. विशेषतः संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात त्यांच्यातला कार्यकर्ता पत्रकार वयाच्या सत्तरीतही महाराष्ट्राने बघितला. त्या वयातही त्यांचं लेखन प्रचंड गाजलं. शेवटी त्यांच्या चिरंजीवांनी काढलेल्या 'मार्मिक' या व्यंगचित्र साप्ताहिकात प्रबोधनकारांनी आपला अनुभव ओतलेला दिसतो. त्यात त्यांनी भरपूर लिहिलंदेखील. 'ऊठ मऱ्हाठ्या ऊठ' आणि 'माझी जीवनगाथा' ही त्यांची पुस्तकं त्यातूनच जन्माला आलीत. 'प्रबोधन'चा हा प्रवास बघताना महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदारांनी प्रबोधनकारांच्या साठीनिमित्त लिहिलेल्या दोन ओळी नोंदवाव्याशा वाटतात, 'आमचे केशवराव फिरले पुष्कळ, पण ठरले कोठेच नाहीत. यांतच त्यांचे सारे गुणहि आले आणि दोषही आले.'

'प्रबोधन'च्या तडाखेबंद भाषेची वैशिष्ट्यं

ठाकरी भाषा ही गोष्ट आज महाराष्ट्रात सगळ्यांना माहीत आहे. त्याला प्रबोधनकारांनी जन्म दिलेला आहे आणि 'प्रबोधन'च्या माध्यमातून ही ठाकरी भाषा महाराष्ट्रभर पसरली. त्या भाषेची सगळी वैशिष्ट्यं आपल्याला या संग्रहातल्या लेखांतून बघायला मिळतील. सडेतोड शब्दांमधून व्यक्त होणारी प्रामाणिक तळमळ हे त्यांचं खरं सौंदर्य आहे. त्यामुळे ज्यांना या भाषेचे तडाखे बसले, अशांनीही तिचं कौतुक केलेलं आढळतं. प्रबोधनकारांच्या भाषाशैली विषयीच्या अनेक अभिप्रायांची चिकटवही बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून मला मिळाली होती. त्यातले हे निवडक अभिप्राय इथे देणं आवश्यक वाटतं. त्यातून 'प्रबोधन'च्या भाषेची सगळी महत्त्वाची वैशिष्ट्य आपोआप नोंदवली जातात.

प्रबोध, धुळे : लेखणीच्या जबरपणात उभ्या महाराष्ट्रात रा. ठाकऱ्यांची बरोबरी क्वचितच कोणी करू शकतो, ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

भारत, गोवा : महाशय ठाकरे यांची विचारसरणी सर्वसंमत असते असें जरी म्हणता येत नसले,

तरी त्यांच्या भाषासरणीत झळकत असलेले तेजस्वी ओज अद्वितीय असते, याविषयी दुमत असणे शक्य नाही.

केसरी, पुणे : प्रबोधनकारांची लेखणी म्हणजे ज्वालामुखीचा भडका. त्याच्यापुढे आपपर भेद काहीच नाहीत.

सेवक, कोल्हापूर : ठाकरे यांनी संपादन केलेली कीर्ती त्यांच्या विशिष्ट लेखनपद्धतीच्या पोटी जन्म पावलेली आहे. त्यांच्या भाषेत जोम आहे, तडफ आहे. त्यांच्या विचारसरणीत स्वतंत्रपणा आहे, ताजेपणा आहे, जिव्हाळा आहे, म्हणूनच त्यांच्या लिखाणाची पक्कड विचारी मनाला जाणवते.

मन्वंतर, यवतमाळ : रा. ठाकऱ्यांची लेखणी म्हणजे अश्वत्थाम्याची झणझणीत तरवार. जोरदार मराठी भाषा लिहिणारा त्यांच्यासारखा लेखक दुसरा आजकाल नाही.

जागृति, बडोदा : रा. ठाकरे यांचे लेखन अंतःकरणाच्या कळकळीचे असल्याने वाचकांच्या हृदयास जाऊन भिडते. रा. ठाकऱ्यांच्या भाषेत शब्दावडंबरापेक्षा जिवंतपणाच अधिक असल्याने वाचकांच्या मनोवृत्ती एकदम जाग्या होतात.

परीक्षक, बेळगाव : मे. ठाकरे यांच्याशी कोणाचे कितीही मतभेद असोत, आमचेही आहेत, पण त्यांच्या लेखांत जो अत्यंत वंदनीय गुण आहे तो त्यांच्या अंतःकरणांतील तीव्रतम खऱ्या कळकळीचा निस्पृहपणा, निर्भिडपणा किंबहुना निर्दयीपणा होय. आणि या त्यांच्या श्रेष्ठ गुणाच्या जोडीस शोभणारी अशीच त्याची अप्रतिम भाषासरणीही आहे. निर्भय निस्पृहपणा व सुंदर भाषाप्रभुत्व ही त्यांच्या लेखांत दृष्टीस पडतात.

ज्ञानप्रकाश, पुणे : रा. ठाकरे यांची आपली प्रगमनशील मते सणसणीत रीतीने मांडण्याबद्दलची प्रसिद्धी आज कित्येक वर्षे जनतेत दुमदुमीत आहे. सामाजिक अशी कोणतीही बाब असो, तीवरील त्यांची मते ठणठणीत रीतीने व्यक्त व्हावयाची, हे साधारणतः ठरल्यासारखेच आहे. त्यांच्या भाषेत जशी ओजस्विता असते तशीच वाचकांच्या मनास गंमत वाटेल अशी तिची घडणही असते. जुन्यापुराण्या कल्पनांबद्दल त्यांना जसा तीव्र स्वरूपाचा तिरस्कार वाटतो, त्याचप्रमाणे तो व्यक्त करण्यासंबंधांतही ते कशाचीही पर्वा बाळगीत नाहीत. स्वमतनिदर्शनार्थ त्यांच्या हातून होणारी शब्दयोजना कधीही सौम्य किंवा मिळमिळीत अशी आढळून येत नाही. प्रसंगवशात समर्पकता, संगति किंवा सद्भिरुची यांचा भंग झाला तरी त्यांची शब्दयोजना दणदणीत असते आणि त्यांचे लेखन सर्वसामान्य वाचकांस स्वादिष्ट वाटते.

ना. ह. आपटे, कोरेगाव, सातारा : श्री. ठाकरे यांची लेखणी जितकी तडफदार आहे तितकीच कटुतिक्त आहे. ती जितकी स्वयंप्रकाशी आहे, तितकीच मुर्दाडांचे डोळे दिपवणारी आहे. ती जितकी धडाडीची आहे तितकीच मेलेल्या मनाला पुनः जिवंत करणारी आहे. त्यांच्या लेखणीत गडकरी नाहीत, चिपळूणकर नाहीत, परांपजे नाहीत किंवा आणखी एखादा ज्ञात अज्ञात लेखक नाही. परंतु लोकहितवादींची कळकळ तिच्या कांडीत भरलेली आहे. चिपळूणकरांच्या भाषेचा जिवंतपणा तिच्या मुखांत आहे आणि आगरकरांचा सडेतोडपणा तिच्या अणकुचीत आहे.

आचार्य अत्रे, संपादक, नवयुग साप्ताहिक : अच्युतराव कोल्हटकरांप्रमाणेच ठाकरे यांची मराठी लेखनशैली तडफदार, तडाखेबंद आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. ठाकरे यांच्या प्रत्येक शब्दावर आणि

वाक्यावर त्यांच्या वीरश्रीयुक्त व्यक्तिमत्त्वाचा ठणठणीत आणि दणदणीत ठसा उमटलेला आहे... मराठी साहित्यांतील शैलीबाज लेखकांमध्ये ठाकरे यांचा क्रम पुष्कळच वर लागेल यांत शंका नाही.

पां. वा. गाडगीळ, संपादक, दैनिक लोकमान्य : ठाकरे यांची लेखणी तिखट पण तडफदार असून ते मार्मिक व रसग्राही टीकाकार आहेत. प्रबोधन मासिकात व इतरत्रही त्यांनी लिहिलेले कित्येक टीकात्मक चर्चात्मक निबंध टिकाऊ वाङ्मयाच्या दर्जाचे आहेत.

प्रबोधनकारांनी हाताळलेल्या विषयांची विविधता

'प्रबोधन'मधील प्रबोधनकारांच्या लिखाणाची महत्त्वाची पार्श्वभूमी मांडण्याचा प्रयत्न आतापर्यंत केला आहे. त्याचा उपयोग प्रबोधनकारांचं लिखाण वाचताना होऊ शकतो. मात्र त्यांच्या लिखाणाचं परीक्षण करण्याची ही जागा नाही. आज शंभर वर्षांनंतर प्रत्येक वाचकाने आणि अभ्यासकाने ते स्वतः करावं, अशी अपेक्षा आहे. मात्र प्रबोधनकारांनी हाताळलेल्या विषयांचा परिचय करून देताना काही निरीक्षणं पुढे मांडलेली आहेत. सर्व प्रकारच्या गुलामगिरीच्या विरोधात प्रचंड एल्गार पुकारण्याचं एक सूत्र धरून प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'च्या अंकांत विविध विषय हाताळले. भारतात धर्माने समाजाच्या सर्व पैलूंना घेरल्यामुळे सामाजिक चिकित्सेसाठी धार्मिक चिकित्सा महत्त्वाची होती. त्यामुळे प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधे केलेल्या लिखाणात धर्मचिकित्सा हे महत्त्वाचं सूत्र आढळून येतं. फक्त वा-वा करणारा तो वानर आणि का म्हणून प्रश्न विचारणारा तो माणूस, अशी व्याख्या करत ते सर्व प्रकारच्या चिकित्सेचा आग्रह धरतात. ब्राह्मण स्वतःचं वर्चस्व निर्माण करण्यासाठी धर्माचा उपयोग करत असल्याचा आरोप ते करतात. भटशाही, भिक्षुकशाही, पेशवाई, भटी थोतांड अशी भाषा वापरत ते त्यावर तुटून पडतात. ब्राह्मणांवर टीका करताना ते त्यांच्यातल्या लोकहितवादी, भागवत, आगरकर, गोखले अशा अनेकांचा गौरव करताना दिसतात. अश्वघोषकृत वज्रसूचीचा अनुवाद आणि संदर्भ देऊन ते उत्तम चारित्र्याच्या प्रत्येकाला ब्राह्मण ठरवतात. त्याचबरोबर सुरुवातीच्या लेखांमध्ये हिंदू मिशनरी सोसायटीच्या आणि महर्षी दयानंद यांच्या प्रभावात ते स्वतःला आर्य म्हणवून घेण्यात धन्यता मानतात; पण पुढे या सगळ्याच्या पलीकडे जाऊन देव, धर्म, वेद यांना उडवून लावतानाही दिसतात. विवेकवाद आणि विज्ञानाचा आग्रह धरत ते हिंदू धर्मातल्या अंधश्रद्धांवर कोरडे ओढतात. ते हे सारं उघडपणे आणि बिनधास्त करू शकतात. कारण हिंदू धर्माविषयी असणारा अत्यंत अभिमान ते कुठेच लपवत नाहीत. मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मगुरूंनी घडवलेल्या धर्मांतरावर ते तुटून पडतात. या दोन्ही धर्मांतल्या अंधश्रद्धांवर आणि पुरोहितशाहीवर हिंदू धर्मातल्या कुप्रथांइतकेच हल्ले चढवतात. मोपल्यांचा हिंसाचार, खिलाफत चळवळ, स्वामी श्रद्धानंद यांची हत्या, गोव्यातील सेंट फ्रान्सिस झेवियर यांच्या प्रेताच्या दर्शनासाठी होणारी गर्दी अशा विषयांवरही त्यांची लेखणी जोरात चालते. त्यांच्या हिंदुत्वामुळे त्यांना एकप्रकारे हिंदू धर्मातल्या चुकीच्या गोष्टींवर टीका करण्याचा हक्क मिळतो. त्यातून बहुजनी हिंदुत्वाचं एक वेगळंच वैचारिक रसायन त्यांच्या लेखांतून बघायला मिळतं.

'ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी, धरावे पोटाशी बंधूपरी' या महात्मा जोतीराव फुलेंनी सत्यशोधक चळवळीच्या मुळाशी मांडलेल्या विचारांशी ते फारसे सहमत दिसत नाहीत. मात्र सहाव्या वर्षातल्या हिंदवी नीळकण्ठीझमच्या लेखांत त्यांचा सूर थोडा बदललेला दिसतो. 'माझी जीवनगाथा'मध्ये त्यांनी त्याचं सार सांगितलंय, 'सागर मंथनातून निघालेले हलाहल शिवशंकराने असूरपणे प्राशन केले म्हणून

नीळकण्ठ नाम प्रसिद्ध झाले. शंकराने ही जी धडाडी दाखविली तिचे नीळकण्ठीझम. आजकाल हिंदुस्थानावर अनेक बहादर आहे का त्याने आपल्या नीळकण्ठीझमने अनेक झम आपल्या पचनी पाडून त्यांना हिंदुत्वाची दीक्षा दिलेली आहे... आक्रमणाला समोर येईल त्या संस्कृतीतले चांगले घ्यायचे आणि चोथा भिरकावून द्यायचा, हा नीळकण्ठीझमचा धर्म आहे. हिंदुस्थानावर अनेक परधर्माची परचक्रे आली. त्या सगळ्यांना पचनी पाडून हिंदू धर्म आणि संस्कृती आजही आपापल्या पायांवर ताठ उभी आहे. यातले मर्म शोधणाऱ्यांना ते हिंदवी नीळकण्ठीझममध्येच सापडेल, इतरत्र नाही.' सुरुवातीला गजानन वैद्यांच्या हिंदू मिशनरी सोसायटीचा थेट प्रभाव सापडतो. त्यांच्याविषयी प्रबोधनकार लिहितात. ते त्यात सक्रियही आहेत. ते त्यांच्या वैदिक विवाहविधीत संशोधन करून प्रसिद्धही करतात, पण त्याचवेळेस सोसायटीच्या कारभारावर अगदी खरपूस टीका करतानाही दिसतात. मात्र बुद्ध धर्माविषयी त्यांचा सॉफ्ट कॉर्नर आहे. मात्र ते त्याला हिंदू धर्माचाच बंडखोर भाग मानतात. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धर्मात धर्मांतर करण्याची घोषणा केली, तेव्हा त्यांनी त्याचं समर्थन करणारा लेख 'साप्ताहिक संदेश'मध्ये लिहिलेला आहे. संतांच्या चळवळीलाही ते सनातन्यांच्या विरुद्ध केलेली बंडखोरी मानतात. संत तुकारामांची पालखी पुण्यात बघितल्यावर त्यांनी या एकीचा उपयोग देशाच्या उभारणीसाठी केला गेला पाहिजे, असं मत व्यक्त केलंय. समर्थ रामदास यांच्याविषयी ते इतर सत्यशोधकांप्रमाणे टीका करत नाहीत. उलट त्यांच्याविषयी आदर व्यक्त करतात. पण छत्रपती शिवरायांच्या स्वराज्य उभारणीत रामदास स्वामींच्या योगदानाविषयी त्यांची मतं बदलत गेलेली आढळतात.

सर्व प्रकारच्या जातिभेदाच्या विरोधात प्रबोधनकारांची लेखणी तलवारीपेक्षाही भेदक होते. अस्पृश्यतेला तर ते विरोध करतातच; पण अस्पृश्यांना ते राजकीय मार्गदर्शन करतात. ब्राह्मणी वर्तमानपत्रांतून होणाऱ्या जातिभेदाचा प्रतिवाद करताना ते कुणाचाही मुलाहिजा बाळगत नाहीत. महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाविषयीचं 'प्रबोधन'मधलं लिखाणही वाचण्यासारखं आहे. ते ब्राह्मणेतर चळवळीची बाजू घेऊन ब्राह्मणांशी भांडतात. पण ब्राह्मणेतर चळवळीतल्या चुकांवर टीकाही करतात. ब्राह्मणेतर चळवळीने मिळवलेल्या यशात मराठ्यांनी इतर ब्राह्मणेतर जातींना सामावून घ्यावं, अशी त्यांची भूमिका आहे. त्यासाठी ते भास्करराव जाधवांसारख्या दिग्गजाचाही सामना करतात. इतकंच नाही तर छात्रजगद्गुरू पीठाच्या निमित्ताने याच मुद्द्यावरून ते छत्रपती शाहूंनाही दोष द्यायला मागेपुढे पाहत नाहीत. अर्थात छत्रपती शाहूंशी असलेला त्यांचा स्नेह आणि त्यांच्याविषयी असलेला आदर दाखवणारे लेख 'प्रबोधन'मध्ये आहेतच. मुळात 'प्रबोधन' उभं राहिलं ते शाहू महाराजांच्या प्रेरणेने. पण दुसऱ्याच अंकात ते त्यात 'अंबाबाईचा नायटा'सारखा ऐतिहासिक लेखही लिहितात. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या चरित्रपर लेखात आणि त्यानंतर झालेल्या वादातही शाहू महाराजांविषयीचं लेखन मुळातून वाचायला हवं. आपल्या समोर असलेल्या विषयात एखाद्याची चूक वाटली, तर ते त्यांच्याशी असलेली मैत्री किंवा आधीचं कर्तृत्व याचा कोणताही विचार करत नाही. जे चुकीचं आहे, ते चुकीचंच अशी त्यांची भूमिका असते. कर्मवीर प्रबोधनकारांना गुरूच मानत. रयत शिक्षण संस्थेची सगळी योजना दादरच्या प्रबोधन कार्यालयात बनली होती. त्यामुळे 'प्रबोधन'मधे कर्मवीरांविषयी केवळ आपुलकीचेच शब्द आहेत.

'प्रबोधन'ची सुरुवात होण्याआधीच लोकमान्य टिळकांचा मृत्यू झालेला होता, तरीही त्यांच्याच विचारांचं प्रभुत्व पुण्यावर होतं. त्यामुळे टिळक आणि केसरी हे प्रबोधनकारांच्या दांडपट्ट्याच्या टप्प्यात वारंवार येतात. ते टिळकांचा उल्लेख लोकमान्य असा चुकूनही करत नाही. कै. (कैलासवासी), प. वा. (परलोकवासी), क्वचित लो. मा. (लोकमान्य) आणि बहुतेक वेळा नुसतं टिळक किंवा बाळ गंगाधर टिळक असंच ते म्हणतात. यावरून त्यांचा टिळकांकडे बघण्याचा दृष्टीकोन लक्षात येईल. महात्मा गांधींविषयीही त्यांना विशेष प्रेम नाही. असहकार आंदोलन, सत्याग्रह, अहिंसा यांचा मार्ग त्यांना पटत नाही. त्यांना गांधींजींची व्यक्तिपूजा होते, असं वाटतं. त्याचा ते विरोध करतात. पण गांधीजींनी राजकीय चळवळींमधलं ब्राह्मणांचं एकहाती वर्चस्व संपवून ब्राह्मणेतरांना संधी दिली, यासाठी एक ब्राह्मणेतर म्हणून गांधीजींविषयी त्यांना प्रेमही आहे. त्यामुळे ते टिळकांइतक्या पोटतिडकीने गांधीजींवर तुटून पडत नाहीत.

प्रबोधनकारांसमोरचा सर्वांत मोठा आदर्श हा लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचा आहे. त्यांच्यावर प्रबोधनकार संधी मिळेल तेव्हा भरभरून लिहितात. त्यांचे लेखही 'प्रबोधन'मधे पुनर्मुद्रित करण्यात आलेले आहेत. तसंच राजारामशास्त्री भागवतांच्या मांडणीविषयीही प्रबोधनकारांना प्रचंड आदराने व्यक्त होताना दिसतात. शिवाय त्यांचा एक लेखही प्रबोधनकारांनी शेवटच्या अंकांमध्ये पुन्हा छापला आहे. त्या तुलनेत प्रबोधनकार महात्मा फुलेंविषयी लिहिताना आढळत नाहीत. अर्थात त्यांच्याविषयी प्रबोधनकारांना आदर आहेच. एके ठिकाणी ते जोतिरावांचा उल्लेख पुरुषोत्तम असा करतात. सत्यशोधक चळवळीविषयीचा त्यांचा जिव्हाळाही लपून राहत नाहीत. पण ते तिच्यावर टीका करण्याचं स्वातंत्र्य राखून ठेवतात. मुकुंदराव पाटील यांनी सत्यशोधक समाज अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून केलेलं भाषण ते मागवून आवर्जून छापतात. रॉबर्ट इंगरसॉल या अमेरिकन तत्त्ववेत्त्याचाही त्यांच्यावर प्रभाव आहे. त्यांच्या विवेकवादाची पाठराखण प्रबोधनकार करतात. पण त्याच्या कर्तृत्वाची किंवा विचारांची सविस्तर ओळख करून देताना आढळत नाहीत.

इतिहास हा प्रबोधनकारांच्या आवडीचा विषय. 'प्रबोधन'मधल्या लिखाणाचा मोठा भाग इतिहासाने व्यापलेला आहे. 'प्रबोधन' सुरू होण्याआधी लिहिलेल्या ग्रंथांमुळे प्रबोधनकारांची ओळख बहुजनांच्या नजरेतून नवा इतिहास लिहिणारा इतिहासकार अशी झालेली आहे. त्यामुळे ते सूत्र पुढे नेत ते 'महाराष्ट्र सारस्वतकार' म्हणून प्रसिद्ध असलेले वि. ल. भावे यांनी केलेली सीकेपींच्या इतिहासाची बदनामी खोडून काढतात. छत्रपती शिवाजी महाराजांना ते परमेश्वर म्हणतात. शिवाजी महाराजांविषयी असलेलं आत्यंतिक प्रेम प्रबोधनच्या पानापानांवर पाहता येतं. पण तिथेही ते चिकित्सक वृत्ती सोडत नाहीत. शिवशाहीच्या कारभाराची चिकित्सा करताना ते शिवाजी महाराजांचे त्यांच्या दृष्टीने असलेले काही दोषही दाखवून देतात. अर्थात शिवाजी महाराजांच्या अमराठी टीकाकारांना ते सोडत नाहीत. पुढे याच संदर्भात त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरूंनाही सोडलेलं नाही. इतिहासकारांचे ब्राह्मणी कंपू छत्रपती संभाजी राजांच्या बदनामीचे डाव रचत असलेले प्रबोधनकार पाहत होते. त्यावर त्यांनी वा. सी. बेंद्रे आणि वि. स. वाकसकर या इतिहासकारांकडून त्या बदनामीला उत्तर देणारे अभ्यासपूर्ण लेख लिहून घेतले. कदाचित या विषयावरचे ते पहिलेच लेख असावेत. हे 'प्रबोधन'चं मराठी इतिहास लेखनामधलं एक महत्त्वाचं पण दुर्लक्षित योगदान आहे. त्यावर प्रबोधनकारांनी एक छोटी नाटिकाही लिहिली आहे.

छत्रपतींचं स्वराज्य हे संभाजी महाराजांमुळे नाही, तर पेशवाईमुळे बुडालं, हा दावा त्यांनी सातत्याने केला आहे. 'प्रबोधन'च्या इतिहासविषयक लिखाणाचे सगळ्यात मोठे नायक रंगो बापूजी हे आहेत. 'छत्रपती प्रतापसिंह आणि रंगो बापूजी' या त्यांच्या १९४८ साली प्रकाशित झालेल्या महान ग्रंथांची मुळं 'प्रबोधन'मध्ये आहेत. शाहू महाराजांच्या प्रेरणेने त्यांनी प्रतापसिंहांचा छळ आणि त्यांना राज्य मिळवून देण्यासाठी रंगो बापूजींनी दिलेला लढा हा इतिहास सातारा परिसरात भाषणांमधून सांगितला. त्याची दोन शब्दांकनं 'प्रबोधन'मध्ये आहेतच. शिवाय रंगो बापूजींविषयी पत्रं, भाषणं असं संदर्भ साहित्यही दिलंय. '१०० वर्षांपूर्वीचा इतिहास' म्हणून त्यांनी हा इतिहास मांडायला सुरुवातही केली होती. पण अडचणींमुळे त्यांना तो मांडता आला नाही. वीस वर्षांनंतर ते या विषयाला न्याय देऊ शकले.

हुंड्याची अन्यायी रूढी, बालविवाह आणि विधवाविवाह या विषयांवर प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'मधून सातत्याने लिखाण केलंय. फक्त लिहून शांत न बसता त्यासाठी आंदोलन उभारून दाखवलं. सक्षमीकरणासाठी महिलांनीच पुढं येऊन जुन्या चालीरितींची जोखडं फेकून द्यायला हवीत, असा आग्रह ते धरतात. शिवाय त्यांनी त्या काळात कुटुंब नियोजनाची आवश्यकता सांगणारा लेखही 'प्रबोधन'मध्ये छापलाय. पण प्रबोधनकारांना दहा अपत्यं होती, हेही नजरेआड करून चालणार नाही. गोव्यामधील देवदासींचा प्रश्न महाराष्ट्रासमोर मांडून 'प्रबोधन'ने एक मोठं योगदान दिलं. मोतीराम जांबवलीकरांसारख्या देवदासी समाजातल्या महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना त्यासाठी 'प्रबोधन'ने लिहायला लावलं. प्रबोधनकार स्वतः या समाजाच्या परिषदेसाठी गोव्याला गेले. त्यांनीही या विषयावर लिहिलं. मुली देवाला अर्पण करण्याच्या शेषविधीवर बंदी घालण्याचा पहिला अर्ज प्रबोधनकारांनीच गोव्याच्या गव्हर्नरला दिला. प्रबोधनकारांनी तरुणांमधले न्यूनगंड घालवण्यासाठी, त्यांच्यात उद्योजकी मानसिकता निर्माण व्हावी यासाठी तसंच आत्मविश्वास मिळवण्यासाठी काही लेख लिहिले आहेत. जपान, अमेरिका, तुर्कस्थान, चीन, रशिया या देशांमधल्या घडामोडींवरही 'प्रबोधन'मध्ये लेख आहेत. अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेल्या विष्णू विठ्ठल ओक यांचं लिखाण प्रबोधनकारांनी अग्रलेख म्हणून छापलं. याशिवाय मुळशी सत्याग्रहाविषयी प्रबोधनकारांनी काही स्फुटं लिहिली आहेत. ते सत्याग्रहाच्या विरोधात होते. मुळशी धरणात गेलेल्या जमिनीचा मोबदला जमीनदार आणि सावकारांना न मिळता शेतकऱ्यांना मिळायला हवा, अशी भूमिका त्यांनी घेतली होती.

तिसऱ्या वर्षांत 'प्रबोधन' साताऱ्यात प्रसिद्ध होत होता तेव्हा मराठीबरोबरच इंग्रजी लेखही प्रकाशित होऊ लागले. तसंच चौथ्या वर्षात बावला मुमताज प्रकरणातही काही इंग्रजी लेख 'प्रबोधन'मध्ये आले. त्यात प्रबोधनकारांचं इंग्रजीवरचं प्रभुत्व दिसून येतं. 'प्रबोधन'मध्ये प्रबोधनकारांच्याच तोडीचे अनेक लेख इतर लेखकांनीही लिहिलेले आहेत. त्यात गो. म. चिपळूणकर, वा. सी. बेंद्रे, कृष्णराव बाबर, नारायण वाळवेकर, बापूसाहेब चित्रे, मोरेश्वर देशमुख यांनी नावं घ्यायला हवीत. प्रबोधनकारांचे धाकटे भाऊ यशवंतराव यांनीही एक लेख लिहिला आहे. लोकमान्य टिळकांचे सुपुत्र श्रीधर टिळक यांनी 'हिंदू जनांचा ऱ्हास आणि अधःपात' या प्रबोधनकारांच्या अनुवादित ग्रंथाचं परीक्षण लिहिलं आहे. किसन फागुजी बनसोडे आणि पांडुरंग घटकर या नागपुरातल्या दोन महार समाजातल्या वक्त्यांची भाषणंही प्रबोधनकारांनी आवर्जून छापली आहेत. वसंतविहार ऊर्फ जोशीबुवा, विनायक बर्वे ऊर्फ कवी आनंद,

गो. गो. अधिकारी ऊर्फ कमलावर, नारायण केशव बेहेरे आणि कुमार यशोद या कवींच्या कवितांना 'प्रबोधन'मध्ये भरपूर जागा मिळाली आहे. प्रबोधनकारांनी स्वतःही 'प्रबोधन'मध्ये दोन पोवाडे लिहिले आहेत. चौथ्या वर्षाच्या चौथ्या अंकात 'वीररत्न बाजीप्रभू देशपांडे' या नावाने त्यांच्या शौर्यावरचा पोवाडा शाहीर केशव या नावाने प्रबोधनकारांनी लिहिलाय. तर १२ ऑक्टोबर १९२६च्या अंकात 'विजयादशमीचा संदेश' या नावाने प्रसिद्ध झालेला दुसरा पोवाडा रमाकांत या नावाने आहे. त्यात प्रबोधनकारांचा वादळी बाणा फार उत्कटपणे व्यक्त झालाय. वानगीदाखल एक कडवं,

देव धर्म हे भटी सापळे घातक झाले देशा ।
मोडा तोडा उलथुनि पाडा उखडा त्यांच्या पाशा ।।
धर्मावाचुनि प्राण न जाई देवाविण नच अडते ।
आत्मशक्ती खंबीर तयाच्या त्रिभुवन पाया पडते ।।

दोन वर्षांच्या खंडानंतर आलेल्या 'प्रबोधन'च्या अंकात छापून येऊनही हा लांबलचक पोवाडा तेव्हा गाजला होता. त्याची पुस्तिकाही बाजारात आली होती. प्रबोधनकारांनी वाचकांना केलेली निवेदनं हाही 'प्रबोधन'मधला वाचनीय भाग आहे. प्रत्येक वर्षाच्या शेवटी प्रबोधनकारांनी वर्षाचा आढावा घेतलाय. तिसऱ्या वर्षापासून आलेल्या एकामागून एक संकटांबद्दलही त्यांनी वाचकांशी हितगुज केलंय. वर्गणी देण्याविषयीची निवेदनं तर अनेक आहेत. मदत देणाऱ्यांच्या याद्या आहेत तशाच वर्गणी बुडवणाऱ्यांही याद्या आहेत. इतर नियतकालिकांना भेट अंक पाठवण्यावरून स्पष्ट खुलासे आहेत. तसंच लेखकांनी लेख पाठवताना त्यात जास्त उद्गारवाचक चिन्हं वापरू नयेत, असंही सांगितलंय. वाचकांच्या पत्रांनाही 'प्रबोधन'मध्ये स्थान आहे. त्यात मालवणपासून इंदूरपर्यंतचे वाचक आहेत. त्याला वाचकांचे पार्लमेंट, लोकमताच्या पार्लमेंटात, संपादकीय टपालाची पेटी अशी आकर्षक शीर्षकं दिलेली आढळतात. अनंत गुरव यांनी केलेल्या मोजणीनुसार 'प्रबोधन'मध्ये वाचकांची एकूण ८४ पत्रं प्रकाशित झालीत. तसंच त्यांनी 'कलमबहाद्दरांस शेलापागोटे' या शीर्षकाखाली वेगवेगळ्या अंकात एकूण १०२ पुस्तकांचे परिचय मोजलेत. वाचकांची दिशाभूल होऊ नये म्हणून या सदरासाठी प्रबोधनकार बरीच मेहनत घेत. प्रत्येक पुस्तक ३-४ चांगल्या वाचकांना वाचण्यासाठी पाठवत. त्यांच्या मतांची गोळाबेरीज करून 'प्रबोधन'चा अभिप्राय प्रसिद्ध होई. यातले बरेचसे परिचय हे प्रबोधनकारांनी स्वतः लिहिलेले आहेत. त्यात त्यांची सडेतोड शैली वाचायला मिळते. प्रसिद्ध लेखकांच्या पुस्तकांऐवजी चांगल्या पण दुर्लक्षित पुस्तकांचा परिचय करून देण्याकडे प्रबोधनकारांचा कल दिसून येतो. 'प्रबोधन'मधल्या जाहिरातींमधून त्या काळातल्या जीवनशैलीतील बदलांचा अंदाज बांधता येतो.

'प्रबोधन' आणि शिवसेना

आजच्या संदर्भात विचार करतानाही 'प्रबोधन'चे विचार आणि शैली अद्याप ताजी असल्याचं जाणवतंच. परिस्थिती बदलली असली तरी जात धर्म पोथ्यांचा त्याग करून निव्वळ माणुसकीला आपलंसं करण्याचा विचार आजही तितकाच उपयुक्त आहे. त्याचबरोबर आजच्या महाराष्ट्राशी 'प्रबोधन'चा सांधा शोधताना महाराष्ट्रातला एक महत्त्वाचा पक्ष असणाऱ्या शिवसेनेवरचा 'प्रबोधन'चा प्रभाव लक्षात येतो. आमचं हिंदुत्व शेंडी जानव्याचं नाही, असं शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे नेहमी म्हणत असत. त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि नातू कॅबिनेट मंत्री आदित्य

ठाकरे हेदेखील हे वाक्य भाषणांमधून सांगतात. बदललेल्या राजकीय परिस्थितीत या वाक्याचं महत्त्व महाराष्ट्राच्या एकंदर राजकारणाच्या दृष्टीनेही आहे. आता या शेंडी जानव्याच्या नसलेल्या हिंदुत्वाचं मूळ आपल्याला प्रबोधनकारांमध्येच शोधत जावं लागतं. बहुजनी हिंदुत्वाचे मूळपुरुष म्हणून आपल्याला प्रबोधनकारांकडे बघता येतं. बहुजनवाद आणि हिंदुत्ववाद यांचा फारच क्वचित आढळणारा समन्वय त्यांच्या विचारांध्ये आहे. हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन या तिन्ही धर्मांतल्या पुरोहितशाहीला आव्हान देताना वेगळ्याच विचारांचं रसायन तयार झालेलं दिसतं. मुस्लिमांवर केलेली टीका ही 'प्रबोधन' आणि शिवसेना या दोघांचीही दीर्घकाळ ओळख होती. त्याशिवाय सर्वसामान्यांना लगेच आपली वाटेल, अशी ठाकरी भाषा आणि संवाद साधल्यासारखं पण ज्वलंत वक्तृत्व या गोष्टीही प्रबोधनकारांकडूनच शिवसेनेला मिळाल्यात. सीमोल्लंघनाचं महत्त्व सांगणारे प्रबोधनकारांचे 'प्रबोधन'मधले लेख वाचले की शिवसेनेचा मेळावा दसऱ्याला का होतो, हे लक्षात येतं. बाळासाहेब ठाकरेंची व्यंगचित्रं, श्रीकांत ठाकरेंचं संगीत आणि उद्धव ठाकरेंचा कॅमेरा या तिन्ही गोष्टी प्रबोधनकारांकडून आलेल्या आहेत.

प्रबोधनकारांचे दुसरे चिरंजीव श्रीकांत ठाकरे यांच्या आत्मचरित्रात आधी 'मार्मिक' आणि नंतर 'शिवसेना' या दोन्हींच्या जन्मकथा आहेत. त्या अशा, 'न्यूज डे' मधून आमचे बंधू बाहेर पडल्यावर काय करायचं हा प्रश्न उभा राहिला. पण प्रबोधनकारांनी एक मंत्र दिला होता की माणसाने कधीही हताश होऊन जाऊ नये. नव्या क्लृप्त्या काढाव्यात. त्याप्रमाणे बंधूंनी एक डमी तयार केली. शंकर्स विकली होतं, पण आपण दुसरं चांगलं काढलं तर. त्याचं नाव होतं, 'कार्टूनिस्ट'. मोठ्या बंधूंनी दादांच्या कानावर ही गोष्ट घातली. तेव्हा दादा म्हणाले, इंग्लिशमध्ये नको, कारण मजकुरासाठी साऊथ इंडियन लोकांच्या पाया पडावं लागेल. तुला अनुभव आलाच आहे. तेव्हा मराठीत काढा! बंधूंना हा विचार एकदम पसंत पडला. झालं. आमचं नावासाठी डोकं सुरू झालं. तिरंदाज ठेवावं की अंजन? भाऊ दादांकडे गेला. दादा स्वस्थ खुर्चीवर बसले होते, म्हणाले, 'मार्मिक!' मी बाहेर गेलो होतो. आल्यावर त्याने मला सांगितलं. दादांच्या तोंडातून ब्रह्मवाक्यच यायचं नेहमी. काय नाव मार्मिक! मर्मभेद करणारं व्यंगचित्र साप्ताहिक.'

'मार्मिक'ची रचना, भाषाशैली यावर प्रबोधनकारांचा थेट प्रभाव दिसून येतो. 'मार्मिक'मध्ये प्रबोधनकारांनी लिहिलंही खूप. ४०-५०च्या दशकात ते जळगावहून प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिक 'बातमीदार'मध्ये 'वाचकांचे पार्लमेंट' नावाचं सदर चालवायचे. लोकांचे प्रश्न आणि प्रबोधनकारांची नेमकी उत्तरं असं त्याचं स्वरूप होतं. तसंच एक सदर 'मार्मिक'मध्येही चाललं. 'कलमबहाद्दरांस शेलापागोटे' या पुस्तक परिचयाच्या प्रबोधनकारांच्या 'प्रबोधन'मधल्या सदरात श्रीकांत ठाकरेंच्या 'सिनेप्रिक्षान' या 'मार्मिक'मधल्या सिनेमाच्या परीक्षणाच्या सदराच्या लोकप्रिय शैलीची मुळं शोधता येतात. 'मार्मिक'मधून मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला जात होता. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळू लागला. बाळासाहेब ठाकरेंची भाषणंही होऊ लागली. त्यालाही तुफान प्रतिसाद मिळत होता. प्रबोधनकार स्वतः ती भाषणं ऐकायला जात. त्यापुढची गोष्ट श्रीकांत ठाकरे सांगतात, 'कुणी म्हणालं की साहेब, तुम्ही विचार दिल्याने मराठी मनं पेटून उठलीत. त्यांना तुम्ही अधिक जवळ आणण्यासाठी एखादा पक्ष स्थापन करा. पण बंधूंच्या डोक्यात एक निराळीच कल्पना होती. त्यांनी प्रबोधनकारांना ही कल्पना सांगितली. ते म्हणाले, 'तू असं कर. एक संघटना काढ!' बंधू म्हणाले

नाव काय द्यायचं? दादा मागच्याप्रमाणे एक ब्रह्मवाक्य बोलले, शिवसेना!' शिवसेनेच्या स्थापनेच्या सभेतच प्रबोधनकार ठाकरेंनी माझा बाळ मी महाराष्ट्राला अर्पण करतो, असं म्हणत बाळासाहेबांना महाराष्ट्राचा बनवलं. त्याच सभेत प्रबोधनकारांनी भाषणात सांगितलं होतं की माझा संप्रदाय वेगळा आहे आणि बाळासाहेबांचा वेगळा आहे. तरीही शिवसेनेच्या जडणघडणीत प्रबोधनकारांचं महत्त्वाचं योगदान होतंच.

सर्वांत महत्त्वाचं म्हणजे स्थानिय लोकाधिकारवाद हा शिवसेनेच्या विचारांचा प्राण मानायला हवा. स्थानिक मराठी माणसाला नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळायला हवं, ही शिवसेनेची कायम मागणी आहे. आश्चर्य वाटेल पण शिवसेनेच्या स्थापनेच्याही चार दशकं आधी 'प्रबोधन'मध्ये प्रबोधनकारांनी हीच मागणी केलीय. १६ जून १९२३च्या प्रबोधनमध्ये प्रबोधनकारांनी 'मद्राशांचा सुळसुळाट', 'स्थानिक रहिवाशांचा कोंडमारा', 'मद्राशी आणि महाराष्ट्रीय' आणि 'मद्राशांचा बोजा मुंबईवर का?' अशी एकाच विषयावरची चार स्फुटं लिहिली आहेत. ती मुळातून वाचण्यासारखीच आहेत. आणि ती एकदा वाचली की शिवसेनेची मुळं 'प्रबोधन'मध्ये कशी सापडतात, हे कळतं.

महाराष्ट्राचा ठेवा महाराष्ट्राला सादर

एका महान महाराष्ट्र सुपुत्राची ही विचारसंपदा पुन्हा एकदा महाराष्ट्राला सादर करताना मोठा आनंद होत आहे. शंभर वर्षं हा छोटा कालावधी नसतो. त्यातही वेगाने बदलणाऱ्या आताच्या जगात तर नाहीच नाही. असं असताना एका नियतकालिकात छापून आलेल्या शब्दांची ताकद काळाला पुरून टिकून राहते. किंबहुना काळाच्या आताच्या वळणावर अधिकच महत्त्वाची ठरते, ही थोरवी खूप आहे. महाराष्ट्राने जपून ठेवलेला महाराष्ट्राचा ठेवा महाराष्ट्राला सादर करण्यासाठी आपण निमित्त असणं, ही माझ्यासारख्या साध्या पत्रकारासाठी मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. संशोधनाचा आणि अशा प्रकारच्या संपादनाचा कोणताही अनुभव पाठीशी नसताना मी हे मोठं धाडस केलेलं आहे. प्रबोधन शताब्दीचा मुहूर्त गाठण्यासाठी काही महिन्यांच्या अवधीत जवळपास १४०० पानांचा ऐवज उभा करणं, हे मोठं आव्हान होतं. त्यात कोरोनाचा काळ परीक्षा बघणारा होता. छोटे छोटे संदर्भ मिळवण्यातही खूप अडचणी आल्या. टायपिंग, प्रूफरीडिंगसाठी बरीच धावपळ करावी लागली. कोरोनामुळे न सापडलेले चार अंक शोधण्यासाठी पुरेसे प्रयत्न करता आले नाहीत, याचीही चुटपुट आहे. आम्ही आमच्या परीने प्रयत्न केलेत. पण चुका राहून गेल्या असणारच. त्यासाठी आम्हाला माफ करा.

या ग्रंथांच्या संपादनाच्या धावपळीत प्रबोधनकार ठाकरे नावाचा डोंगराएवढा मोठा माणूस मला अधिक उमगत गेला. त्यांचा संघर्ष मला एक पत्रकार म्हणून ताकद देऊन केला. मी समृद्ध होत गेलो. त्यासाठी मी या ग्रंथाचा मनापासून ऋणी आहे.

सचिन परब
१५ ऑगस्ट २०२१

वाचण्याआधी

'प्रबोधन'चा पहिला अंक १६ ऑक्टोबर १९२१ला प्रसिद्ध झाला. मार्च १९३०ला 'प्रबोधन'चा शेवटचा अंक निघाला, तोही अंक थांबवण्याची कोणतीही अधिकृत घोषणा न होता. म्हणजे 'प्रबोधन' प्रसिद्ध होण्याचा एकूण कालावधी ८ वर्षं ५ महिने होता, असं म्हणता येईल. अर्थातच 'प्रबोधन' सलग प्रकाशित होत नव्हतं. त्यात पहिल्यांदा दहा महिन्यांसाठी आणि डिसेंबर १९२७ पासून दोन वर्षांसाठी 'प्रबोधन' बंद होतं. या कालावधीच्या दरम्यान प्रकाशन वर्षानुसार एकूण सहा वर्षं 'प्रबोधन'चे अंक प्रकाशित झालेत. त्यात 'प्रबोधन'चे एकूण ९५ अंक प्रकाशित झालेत. त्यापैकी ९१ अंक या 'प्रबोधन'मधील प्रबोधनकार' प्रकल्पासाठी उपलब्ध झाले आहेत. त्यातील पुस्तकरूपाने सध्या उपलब्ध नसणारे प्रबोधनकारांचे सर्व लेख तीन खंडांमध्ये घेण्यात आलेत.

'प्रबोधन'च्या अंकामध्ये असणारा प्रबोधनकारांचा प्रत्येक लेख जसाच्या तसा या खंडात घेण्याचा प्रयत्न आहे. त्यात इतर कोणताही निकष लावलेला नाही. उपलब्ध लेख अंकांच्या प्रकाशन वर्षानुसार एकामागून एक सलग मांडण्यात आलेत. त्याचं विषयवार कोणतंही वर्गीकरणही केलेलं नाही. हे लेख काळाचा संदर्भ समजून घेऊन वाचावेत, अशी अभ्यासकांकडून अपेक्षा आहे. वाचनाच्या सोयीसाठी सर्व छोट्या मोठ्या लेखांची तीन खंडांमध्ये मांडणी करण्यात आली आहे.

खंड १

'प्रबोधन'च्या पहिल्या दोन प्रकाशन वर्षांमध्ये पाक्षिक म्हणून प्रसिद्ध झालेल्या ४८ अंकांमधले प्रबोधनकारांचे लेख पहिल्या खंडात आहेत. हा काळ 'प्रबोधन'साठी स्थैर्याचा काळ होता. 'प्रबोधन'चं जन्मस्थळ दादरमध्येच यातले सगळे अंक प्रकाशित झालेत. त्यामुळे आपल्या ओळखीच्या परिसरात ओळखीच्या वाचकांपर्यंत 'प्रबोधन' पोहोचत होता. या काळात 'प्रबोधन'च्या कचेरीत येणाऱ्या दादरमधील तरुणांची एक संघटनाच उभी राहिली होती. तिच्यामधून 'प्रबोधन'ने हुंड्याविरुद्ध आंदोलन

चालवलं. सामाजिक, धार्मिक विषयांवर तिखट मतं मांडली. खोट्या इतिहासाविरुद्ध एलगार पुकारला. ते सगळं या खंडातल्या लेखांमध्ये आपल्याला वाचता येईल.

खंड २

स्वतःचा छापखाना हाती नसल्यामुळे 'प्रबोधन'च्या विस्ताराला मर्यादा येत असल्याचं प्रबोधनकारांच्या लक्षात आलं होतं. छत्रपती शाहू महाराजांच्या निधनामुळे स्वतंत्र छापखाना उभारण्याचं त्यांचं स्वप्न भंगलं होतं. त्यात सातारा येथील उद्योजक राजकारणी खानबहादूर धनजीशेठ कूपर यांनी छापखाना उभारून दिल्यामुळे त्यांनी 'प्रबोधन'चं स्थलांतर सातारा शहराजवळच्या पाडळी या गावी केलं. तिथे त्यांच्यासोबत कर्मवीर भाऊराव पाटील होते. कूपर यांच्याशी वाद होण्याआधी साताऱ्यातून 'प्रबोधन'चे १७ अंक निघाले. त्यापैकी ४ अंक आता उपलब्ध नाहीत. साताऱ्यानंतर चौथ्या वर्षी 'प्रबोधन' पुण्यातून प्रकाशित होऊ लागलं. आता ते मासिक स्वरूपात होतं. 'प्रबोधन'चे एप्रिल १९२५ ते मे १९२६ या चौथ्या प्रकाशन वर्षात १२ अंक प्रकाशित झाले. हा पुण्यातला काळ 'प्रबोधन'साठी प्रचंड संघर्षाचा गेला. त्या संघर्षाने प्रबोधनकारांना नव्याने लढण्याचं बळ दिलं. अत्यंत संघर्षमय असलेल्या तिसऱ्या आणि चौथ्या प्रकाशन वर्षांच्या अंकांमधले लेख या दुसऱ्या खंडात आहेत. त्यात प्रबोधनकारांचे काही इंग्रजी लेखही आहेत.

खंड ३

पाचव्या प्रकाशन वर्षातले १२ अंक आणि सहाव्या प्रकाशन वर्षातले ६ अंक अशा 'प्रबोधन'च्या एकूण १८ मासिक अंकांतले प्रबोधनकारांचे लेख या खंडात वाचता येतील. पुण्यातल्या वास्तव्याने प्रबोधनकारांना महाराष्ट्रातल्या समाजवास्तवाची खोल समज अनुभवता येत होती. त्यातून घडलेली विचारक्रांती या खंडांमधल्या लेखांमध्ये वाचता येते. त्यात 'देवळांचा धर्म धर्माची देवळें', 'दगलबाज शिवाजी', 'हिंदवी नीळकण्ठीझम', 'क्रांतीचे कुलपी बॉम्ब' हे लेख प्रबोधनकारांच्या विचारांचं दर्शन घडवणारे आहेत. त्यामुळे संख्येने कमी असूनही या खंडातले लेख महत्त्वाचे ठरतात.

काही सूचना

- 'प्रबोधन'मधील प्रबोधनकारांचे लेख सध्याच्या प्रचलित व्याकरणाऐवजी तेव्हाच्या म्हणजे १०० वर्षांपूर्वीच्या व्याकरणाप्रमाणेच इथे छापले आहेत, याची नोंद घ्यावी.

- 'प्रबोधन' सुरू असण्याच्या काळातही व्याकरणाचे नियम बदलले असण्याची शक्यता आहे किंवा प्रबोधनकारांनी स्वतःहून नवे भाषिक बदल अंकासाठी स्वीकारले असण्याची शक्यता आहे, त्यामुळे सुरुवातीच्या अंकांमध्ये असणारी अनुस्वाराची भाषा नंतरच्या काळात कमी होताना दिसते.

तसेच काही शब्दांचे उकार आणि वेलांटी यातही फरक आढळून येतो. अशा वेळेस मूळ प्रतींत जे आहे, ते आणि तेच ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, याचीही वाचकांनी नोंद घ्यावी.

- तसेच काही शब्द वेगवेगळ्या पद्धतीनं लिहिले गेले आहेत, असंही निरीक्षण आहे. उदाहरणार्थ म्हणून आणि ह्मणून, सामाजिक आणि सामाजीक. असं आढळलेल्या ठिकाणी मूळ अंक प्रमाण मानण्यात आला असून त्यात असलेल्या शब्दांप्रमाणेच ते पुस्तकात येईल, याची काळजी घेतली आहे.

- मूळ अंकात कदाचित टाइपसेटिंगच्या झालेल्या गोंधळामुळे किंवा अन्य काही कारणांमुळे काही शब्द चुकीचे छापले गेले आहेत, असं जाणवलं. त्या अत्यंत स्वाभाविक चुका झालेले शब्द फक्त बदलून घेतले आहेत, उदा. धोडा ऐवजी घोडा.

- काही ठिकाणी उपलब्ध अंकांमध्ये एखादा शब्द, काही शब्द, काही वाक्यं किंवा काही पॅरेग्राफ वाचता येत नाहीत, तिथे तितका मजकूर तसाच रिकामा सोडला आहे. ✻ अशी खूण देऊन तिथे तसं स्पष्ट म्हटलं आहे.

- कोणताही लेख वाचण्याआधी शक्यतो, संबंधित लेख छापून आलेल्या अंकाचं वर्षं ध्यानात घ्यावं. त्यानुसार संबंधित काळाचा संदर्भ लावल्यास आशय आणि विषयाचं आकलन करणं सोपं जाईल, असं वाटतं.

- संपादक

प्रबोधन वर्ष १

एकूण अंक २४

पहिला अंक : १६ ऑक्टोबर १९२१

चोविसावा अंक : १ ऑक्टोबर १९२२

लेख

प्रबोधनाचें ध्येय

समाजकार्यीं स्वधर्मतत्वीं सदा शिलेदार ।
प्रजापक्षनवमतसंवादी राजस सरदार ।।
विशिष्टपंथप्रवर्तकांची व्यर्थ न करि पूजा ।
व्यक्तीचा नच मिंधा, बंदा सत्याच्या काजा ।।
विश्व निर्मिलें जयें दयाळें त्या जगदीशाला ।
भिउनी केवळ, नच अन्याला, लागे कार्याला ।।

वसंतविहार

श्रीमन्मंगल गणाधिपतये नमः बुद्धिदाता व विघ्नहर्ता श्रीगणेशदेवाच्या चरणीं अनन्यभावानें माथा ठेवून सर्व मानवजातीची म्हणजे पर्यायानें त्या अखिल-व्यापक श्री भगवंताची चरणसेवा करण्यासाठीं प्रबोधन प्रगट होत आहे. प्रबोधन हा पक्का नवमतवादी आहे. नवयुगांत या अफाट हिन्दी राष्ट्रानें सर्व जगाला चकित करून सोडण्यासारखी अननुभूत कर्तबगारी, उदात्त प्रगमनशीलता आणि विश्वव्यापक धर्माचें साम्राज्य प्रसृत करण्याची प्रेमपूर्ण तडफ दाखवावी, अशी प्रबोधनाची महत्वाकांक्षा आहे. ही साध्य होण्यासाठीं हिन्दु समाजाच्या धार्मिक व सामाजिक जीवनांत उदारपणा, लवचिकपणा व 'आत्मवत् सर्व भूतेषु' असला भ्रातृभाव यांची खरीखुरी जाणीव उत्पन्न करण्याची कामगिरी प्रथम चोंखाळण्याचें प्रबोधनानें ठरविलें आहे. ही कामगिरी पार पाडीत असतां जीर्णमतवाद्यांकडून होणाऱ्या अनेक अडथळ्यांची त्यानें आगाऊच खूणगांठ बांधून ठेविली आहे. परंतु या लोकसत्ताक नवयुगाच्या घसळामुसळींत नवमताशिवाय इतर कोणत्याहि मताचा मुळींच टिकाव लागणार नाहीं, ही प्रबोधनाची बालंबाल खात्री असल्यामुळें आणि जीर्णमतवाद्यांशीं वांझोडा वादविवाद करणें म्हणजे देवानें दिलेल्या बहुमोल आयुष्याची माती करणें अशी त्याची भावना असल्यामुळें, पुराणमताभिमानी बांधवांकडे पूर्ण दुर्लक्ष करण्याचें त्यानें ठरविलें आहे. आजचा प्रसंग असा बिकट आहे कीं हिन्दूंना साऱ्या जगाशी तोंड देऊन जगावयाचें आहे. आजची घटका अशी आहे की हिन्दूंच्या संस्कृतीची मान साऱ्या जगाच्या राजकारणाच्या चापांत सांपडली आहे. चालूं घडीचा मामला असा आहे कीं सर्व भेदभावांचा सफाई

एन ४००६--५

संन्यास करून हिन्दुजनांनीं निरलस भ्रातृभावानें आलेल्या व येणाऱ्या परिस्थितीशीं तोंड देऊन आपलें हिन्दुत्व, आपलें आत्मराज्य, कायम ठेवून हिन्दु साम्राज्याच्या विशाळ आकांक्षांनीं हिन्दी राष्ट्राचें विराट हृदय चबचबीत भिजवून सोडलें पाहिजे.

राजकीय सुधारणा झाली म्हणजे इतर सर्व सुधारणा आपोआप होतील, या गोंडस तत्वावर प्रबोधनाचा मुळींच विश्वास नाहीं. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रें गुलामगिरीच्या आचारविचारांनीं चिडचिडलेलीं; बौद्धिक क्षेत्रांत जाणतेपणाचा मक्ता मूठभर सुशिक्षितांच्या हातीं, बाकीं सर्वत्र अज्ञानाची अमावास्येची काळीकुट्ट रात्र; औद्योगिक चतुराई ठार मेल्यामुळें आर्थिक बाबतींत सर्वत्र पसरलेलें दैन्य आणि दास्य; अशा विचित्र परिस्थितींत राजकीय स्वातंत्र्याची अपेक्षा म्हणजे राजकारणाची जुगार खेळणाऱ्या जुगारूंची सट्टेबाजी होय. अर्थात् या जुगारांत येनकेनप्रकारेण हिन्दुस्थानच्या स्वराज्याचें तट्टू यदाकदाचित् जिंकलेंच, तर ती स्वराज्याची लाटरी म्हणजे मूठभर मोठ्या माशांना बाकीच्या अनंत धाकट्या मासोळ्यांना बिगरपरवाना गिळण्याचा सनदपट्टाच होय, यांत आम्हांला मुळींच संशय वाटत नाही. सामाजिक उच्चनीच भेदभाव. आपण व आपला समाज इतर सर्व समाजांपेक्षा उच्च दर्जाचा मानण्याची नाना फडणिशी व धार्मिक क्षेत्रांत भिक्षुकशाहीची दिवसाढवळ्या चालविलेली भांगरेगिरी, या सर्व राष्ट्रविनाशक, समाजविध्वंसक व दास्यप्रवर्तक दोषांचा आमूलाग्र नायनाट झाल्याशिवाय स्वराज्याचें अमृत प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें जरी हिन्दुस्थानाच्या घशांत कोंबलें, तरी त्यापासून त्याचा लवमात्र उद्धार होणार नाहीं. राजकारणाचा आत्मा डिप्लोमसींत ऊर्फ सट्टेबाजींत असतो. या सट्टेबाजीची हारजीक जुगारूंच्या वाममार्गी डांवपेंचांच्या भरती ओहटीवर अवलंबून असते. महाराष्ट्रीयांनीं ही राजकारणी सट्टेबाजी सुमारें तीनशें वर्षें मनमुराद खेळलेली आहे. सुरवातीलाच या सट्टेबाजीची बोहणी बेसुमार खणखणूं लागल्यामुळें त्यांचे डोळे उरफटले व शुद्ध राजकीय उलाढालींवरच रूमशामवर भगवे झेंडे फडकविण्याची त्यांची राक्षसी महत्वाकांक्षा, टोपकरांसारख्या कसलेल्या किमयेगारांशीं त्यांची गांठ पडतांच, ठिकच्या ठिकाणीं जळून खाक झाली. पुण्यस्मरण श्रीशिवछत्रपतींच्या हिन्दवी स्वराज्य स्थापनेच्या उषःकालापासून तों हलवायाच्या घरांवर तुळशीपत्र ठेवणाऱ्या पाजी श्रीमंताच्या स्वराज्यतर्पणाच्या कुटिल घटके पर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास नुसता वरवर जरी चाळला तरी आपल्याला एकच मुख्य गोष्ट लक्षांत येईल कीं सामाजिक व धार्मिक गुलामगिरीचा नायनाट मुळींच न करतां, नुसत्या राजकारणी सट्टेबाजीवर खराखुरा राष्ट्रोद्धार होणेंच शक्य नाहीं. सामाजिक व धार्मिक गुलामगिरी कडक सीलबंद ठेवून राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याची शेखी मारणारे लोक एकतर मूर्ख असले पाहिजेत अथवा अट्टल लुच्चे असले पाहिजेत; यापेक्षां तिसरी भावनाच संभवत नाही.

प्रबोधनाचा जन्म ज्या कलमांतून झाला आहे, त्या कलमानें यावज्जन्म कधीं स्वराज्यद्रोह केलेला नाहीं. स्वराज्यद्रोह हें या कलमाचें ब्रीदच नव्हे व तसें त्याचें बीजहि नव्हे. स्वराज्यतर्पणाचे स्वराज्यद्रोही रोखे खरडणारें चांडाळ कलम तें हें नव्हे. हें कायस्थाचें कलम आहे. या ऐतिहासिक कलमानें हिन्दवी स्वराज्यस्थापनेच्या मंगल वार्तेचा दिव्य संदेश आसेतुहिमाचल प्रसृत करण्याची खरीखुरी राष्ट्रीय सेवा बजावली आहे. या लेखणीनें खोटें कर्म करण्याऐवजीं केवळ स्वराज्यासाठीं हत्तीच्या पायाखालीं आपल्या भक्तांच्या मस्तकाचा बळी दिलेला आहे. या लेखणीनें गणोजी शिर्क्याला दाभोळच्या वतनाची फारकत चिठी स्वयंस्फूर्तीनें लिहून देऊन, आपल्या सर्वस्वनाशाच्या पुण्याईनें छत्रपति राजाराम महाराजांची

जिंजीच्या वेढ्यांतून सहकुटुंब सुटका केली. याच लेखणीच्या फटकाऱ्यानें शाहूचे पाय छत्रपतींच्या सिंहासनाला लागले आणि त्याच फटकाऱ्याने पुढें बाळाजी विश्वनाथाला कारकुनाचा पेशवा बनविले. बाजीरावानंतर पेशवाईच्या गादीचा वारसा जेव्हां घड्याळाच्या लंबकाप्रमाणें हेलकावे खाऊं लागला, तेव्हांहि याच लेखणीनें त्या लंबकाची गति चुटकीसरशी थोपवून नानासाहेबाच्या आंगावर पेशवाईची वस्त्रे चढविलीं. या इतिहासप्रसिद्ध लेखणीनें निरलस भ्रातृभावानें हिंदवी स्वराज्याच्या आदीपासून अन्तापर्यंत स्वराज्याची सेवा एकनिष्ठेनें बजावलेली आहे. कायस्थांच्या कलम-समशेरीचा आजच्या 'राष्ट्रीय' युगांत जरी कांहीं बोलबाला नसला, तरी पेशवाईच्या स्वार्थी होमांत बळी पडलेल्या हिन्दवी स्वराज्यासाठीं थेट विलायतेला जाऊन सतत आठ वर्षें झगडणाऱ्या स्वराज्यवादी कायस्थ वीराच्या लेखणीची शाई अझून वाळलेली नाहीं आणि हत्यारांच्या कायद्यानें जप्त झालेल्या ढाल तलवारींना माखलेलें कायस्थ वीरांचें रक्तहि अझून गोठलेलें नाहीं, एवढें प्रांजळपणें नमूद करण्याची प्रबोधन संधी घेत आहे. प्रबोधन जितका कट्टा नवमतवादी आहे तितकाच तो पक्का स्वराज्यवादी आहे; जितका राष्ट्रीय वैभवाचा महत्वाकांक्षी आहे, तितकाच तो सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या पुरस्कर्त्याचा कट्टा द्वेष्टा आहे. महाराष्ट्रांत प्रचलीत असलेल्या कोणत्याहि पक्षाचा प्रबोधन सांप्रदायिक नाहीं अथवा त्यांच्या मतांचा मिंधा गुलाम नाहीं. प्रबोधन सत्याचा भोक्ता आहे. जेथें जेथें सत्य दिसेल, तेथें तेथें प्रबोधनाचा माथा अत्यंत उत्कट उमाळ्यानें सर्वांच्या आधीं विनम्र होईल. सर्व सज्जनांचा प्रबोधनाला आशीर्वाद असावा.

□□□

अग्रलेख

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत

उठा, जागे व्हा आणि भगवंतानें दिलेले वर नीट समजून घ्या. औपनिषदिक सुवर्णयुगकाळीं ज्या दिव्य मंत्रानें भरतखण्डाला जगाचा जगद्गुरु बनविलें, तोच मथळ्यावरील दिव्य औपनिषदिक मंत्र आज आमच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय जीवनांत चैतन्य ओतण्यासाठीं पुनश्च आसेतुहिमाचल वातावरणांत संचार करूं लागला आहे. नव स्वातंत्र्ययुगात आतां लवकरच उगवणार म्हणून जिकडे तिकडे पुनर्घटनेची एकच गडबड उडून राहिली आहे. संघशक्तीची जाणीव सर्वत्र बेसुमार थरारूं लागली आहे. भगवंतानीं आपल्याला कोणकोणते वर दिलेले आहेत, आपले जन्मसिद्ध अधिकार व हक्क कायकाय आहेत आणि ते हक्क आपण कां व कसे गमाऊन बसलों, याचीं कोडीं सोडविण्यांत प्रत्येक जण चूर होऊन गेला आहे. एकीकडे उन्नत देशबांधव परकीय दास्याचे पाश तोडून टाकण्याची शिकस्त करीत आहेत, तर दुसरीकडे याच उन्नत देशबांधवांनीं उन्मत्तपणानें चिरकालीन दास्यांत डांबून टाकलेले अवनत देशबांधव त्यांच्या सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या शृंखळा खडाखड उखडून भगवंतानीं आपणांस कोणते वर दिलेले आहेत, याचें मोठ्या धिटाईनें संशोधन करूं लागले आहेत. आज घटकेस देशांत जी चळवळ सुरूं आहे तिचें किंचित् बारकाईनें पृथःकरण केलें तर असें आढळून येतें की सर्वत्र जरी राष्ट्रकार्य राष्ट्रकार्य असा एकच ध्वनि निघत आहे तरी महाराष्ट्रांतील प्रत्येक समाज आपापल्या विवक्षित जातिसंघाच्या हिताचें संरक्षण करण्यासाठीं मोठ्या खबरदारीनें, शिस्तीनें व नेटानें अहोरात्र प्रयत्न करीत आहे; आणि खऱ्या राष्ट्रहिताच्या दृष्टीनें हे प्रयत्न खरोखरच प्रशंसनीय होत. कारण, 'प्रत्येकजण जर आत्मसुधारणा करण्याची शिकस्त करील, तर राष्ट्रसुधारणा चुटकीसरशी होईल,' हे स्माईल्सचें तत्व यांत प्रधान आहे. मात्र अशा प्रकारचे प्रयत्न करीत असतांना स्वतःच्या घरच्या मुलींच्या मंगळागौरी व मुलांच्या मुंजी या राष्ट्रीय मंगळागौरी व राष्ट्रीय मुंजी असें भासविण्याचा जो मोह कित्येक पुढारलेल्या समाजांत अनावर झालेला आहे, तो मात्र चिळस आणणारा आहे. जात ही धार्मिक किंवा धर्ममान्य संस्था नव्हे. राष्ट्राचें सामाजिक जीवन सुसंघटित चालावें म्हणून एका काळीं यदृच्छेनें निर्माण झालेली ती सामाजिक संघसंस्था आहे. ब्राह्मण क्षत्रिय वैश्यादि हक्कांचे सनदपट्टे जन्मसिद्ध नसून गुणकर्मसिद्ध असल्यामुळें, जन्मतः किंवा जातितः ब्राह्मण्याची वा क्षत्रियत्वाची कोरडी

प्रौढी मिरविणें म्हणजे भगवंताचा उघड उघड द्रोह होय. हा भगवद्रोह करणाऱ्यांना भगवंताचे वर कधींही प्राप्त होणार नाहींत. आपण जातितः कोठच्याहि संघाचे घटकावयव असलों तरी व्यक्तिशः गुणकर्मप्रवृत्तीनें कोण आहोंत, हें सिद्ध करून दाखविण्याचा व त्याप्रमाणें प्रत्यक्ष वर्तन करण्याचा 'सेल्फ डिटरमिनेशन' चा आत्मनिर्णयाचा हक्क-भगवंताचा वर - प्रत्येक व्यक्तिमात्रास आहे. हा नवयुगाचा मंत्र धिःकारणाऱ्यांची मात्र यापुढें धडागत दिसत नाहीं. व्यक्तिशः आत्मोन्नति साधण्याचा जसा कोठेंच अटकाव नाहीं, तसा जातिशः समाजोन्नति करणें म्हणजे स्वराज्यद्रोह अथवा राष्ट्रद्रोह करणें असें बाष्कळ विधान करण्यांतहि मोठा शहाणपणा नाहीं. या दृष्टीनें महाराष्ट्रांतल्या असंख्य जातिसंघांनीं स्वतंत्रपणें उन्नतीचा मार्ग चोखाळण्यास कंबरा बांधल्यास, तें एक अभिनंदनीय राष्ट्रकार्यच होय. तंबोऱ्याच्या चार तारा निरनिराळ्या वाजविल्या तर पंचम षड्ज जाड व खर्ज असे निरनिराळे ध्वनि देतात खऱ्या, परंतु त्यांचा एकसमयावच्छेदें झणत्कार केल्यास साऱ्या विश्वाला मोहनी घालणारें मधुर संगीत त्यांतून निर्माण होतें. जातिसंघांच्या वरपांगी व एकांगी भिन्नतेमुळें गांगरून जाऊन या संघांचाच तिरस्कार करणाऱ्यांनीं वरील तंबोऱ्याची उपमा नीट विचारांत घ्यावी. मात्र, असें होणें शक्य आहे, नव्हे, बऱ्याच जातिसंघांच्या बाबतींत तें खरेंहि आहे, कीं कित्येक तारा मोठ्या नाठाळ आढळतात. कित्येक बदसूर असतात, कित्येक गंजलेल्या असतात आणि कित्येक अहंमन्यतेच्या पिळांनीं पिळवटल्यामुळें अगदीं तुटावयासहि झालेल्या असतात. अशा प्रसंगीं संघहितेच्छु राष्ट्रधूरीणांचें कर्तव्य जितकें स्पष्ट आहे, तितकेंच तें उघड आहे. आपल्या विशिष्ट संघाच्या हृदयाची तार जर बदसूर बनली असेल तर तिच्या कानाच्या खुंट्या मोठ्या कुशलतेनें पिरगाळून तिला एकतानता येण्याइतका नाजूक तणावा दिला पाहिजे. ती जर जीर्णमताच्या वाळवीमुळें गंजलेली असेल तर स्नेहपूर्ण विचारांचा तिजवर हात फिरवून नवमताच्या पॉलीश पेपरनें तो गंज घासून टाकला पाहिजे. ती जर अहंमन्यतेच्या ताठ्यानें ताठर बनली असेल, तिला गुंडाळी पडलीं असतील, तर मोठ्या कुशलतेनें ती गुंतागुंत एक तर सोडविली पाहिजे, नाहींतर ती जुनाट कुझकी तार अज्जीबात तोडून तिच्याऐवजीं नवीन बसविली पाहिजे, म्हणजे छातिठोकपणानें आपल्या जातिसंघाची नव्या धोरणावर पुनर्घटना केली पाहिजे.

आमच्या मराठे बांधवांत अलीकडे एकाकी इतकी भयंकर जागृति झालेली आहे, आपले सामाजिक धार्मिक त्याचप्रमाणें राजकीय हक्क संरक्षण करण्याची इतकी तीव्र जाणीव त्यांच्यांत थरारली आहे कीं त्यांच्या चळवळींचा प्रतिध्वनि आतां क्षुल्लक खेड्यापाड्यांतून सुद्धां बिनचूक उमटूं लागला आहे. ज्या मराठ्यांच्या संबंधानें बोलतांना कै. टिळक ''नांगऱ्या'' हें विशेषण योजीत असत, तोच मराठा समाज अत्यंत अल्पावधींत कट्टा ''राजकारणी'' बनून, सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्यासाठीं काच्या कसून टिळकीय संप्रदायाच्या राजकारणी मल्लांशीं चार हात करायला सार्वजनिक आखाड्यांत उतरला आहे. एकट्या मराठे बांधवांनीं चालविलेलीं साप्ताहिकें व मासिकें जवळजवळ २५ असून, त्यांचा लोकप्रिय 'विजयी मराठा' लवकरच दैनिक होणार आहे. त्यांच्या शिक्षणसंस्थांचीं जाळीं देशावर व कोंकणांत ठिकठिकाणीं पसरलीं असून, शेंकडों सुशिक्षित तरुण मराठे स्वार्थत्यागपूर्वक त्यांची जोपासना करण्यासाठीं पुढें सरसावले आहेत. त्याचप्रमाणें पांचकळशी भंडारी वंजारी तेली तांबट लोहार सुतार यांनीं, फार काय पण, धेड महार मांग यांसारख्या आमच्या अवनत देशबांधवांनीं आज शेंकडों वृत्तपत्रें व मासिकें चालवून आपल्या ज्ञातीच्या संघशक्तीला बेसुमार थरारून सोडलें आहे.

ज्या समाजानीं हातांत पूर्वी कधीं लेखणीहि घेतली नव्हती व ज्यांच्या गतेतिहासाचा शेंडा बुडखासुद्धां कोणाला उमगला नाहीं, असे आणखीहि कित्येक समाज निवळ संघशक्तीच्या जोरावर चालूं मन्वंतरांत आपल्या स्पृहणीय कर्तबगारीनें वर्तमानकाळच्या इतिहासाचीं पानें भराभर रंगवून सोडीत आहेत.

चैतन्य, मग तें सामाजिक असो वा धार्मिक असो किंवा राजकीय असो, तेथें भक्तजनांना साह्य करायला 'गरुडावरि बैसोन माझा कैवारी' येतोच येतो. देव भावाचा भुकेला असेल; परंतु चैतन्यावर, लोकाजागृतीवर, चळवळीवर त्याचा कृपाकटाक्ष, भावाच्या जोरावर देव मिळविणाऱ्या भक्तांच्या हांकेला ओ देण्याच्या पूर्वींच पडतो. म्हणूनच समर्थ म्हणतात कीं सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील त्याचें । परि आधी भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ।। सध्यांचा काळच असा आहे कीं या चालुं हंगामांत जो निजून राहील, तो कायमचाच निजून राहील, त्याच्या अवनतीला मृत्यू नाहीं व पुनर्जन्महि नाहीं. या राष्ट्रोद्धाराच्या उषःकालीं जे जे समाज अस्तन्या मागें सरसावून आत्मोद्धाराच्या आंखाड्यांत उतरतील तेवढे सारे क्षत्रिय वीर म्हणून भावी नवयुगांत जगद्वंद्य होतील; जें मानापमानाचें गांठोडें उरांशीं बाळगून अहंमन्यतेच्या कोंपऱ्यांत घुंगट मारून पडतील, ते सारे शूद्र ठरतील. प्रचलीत काळाचा झपाटाच इतका जबरदस्त आहे कीं त्या झपाट्याच्या सोसाट्याबरोबर चालण्याची जे जे समाज हिंमत धरतील, त्यांचाच तेवढा टिकाव लागणार आहे, बाकीच्यांचे कालचक्राच्या घरटांत वस्त्रगाळ पीठ पडल्याशिवाय मुळींच राहणार नाहीं. या दृष्टीने मराठे आदिकरून आमच्या सर्व महाराष्ट्रीयन बांधवांच्या आत्मोन्नतीच्या आणि आत्मोद्धाराच्या ज्या चळवळी यदृच्छेनें चालूं झालेल्या आहेत, त्याबद्दल प्रत्येक व्यापकविचारी त्यांचें सकौतुक अभिनंदनच करील.

परंतु अलीकडे बऱ्याच लोकांना आश्चर्य वाटत आहे तें चांद्रश्रणीय कायस्थ प्रभु समाजाच्या गाढ उदासीनतेबद्दल होय. याचें कारण उघड आहे. हा समाज लहान लहान म्हणतात तरी त्याची लोकसंख्या जवळजवळ ५० हजारांची आहे; आणि लोकसंख्येच्या अत्यल्प प्रमाणानें त्यानें १७ व्या व १८व्या शतकांत केलेली देशसेवा अद्भुतरम्य व अतुल असल्याची साक्ष इतिहास देत आहे. असल्या दिव्य पुण्याईच्या समाजांत सध्यां शोचनीय अनावस्था व उदासीनता कां वावरावी, याचें सर्व कायस्थेतर महाराष्ट्रीय समाजांना फार आश्चर्य वाटतें. या आश्चर्याचें पृथःकरण अनेकजण अनेक तऱ्हांनीं करतात आणि अखेर कांहीं तरी निर्णय काढून आपल्या मनाचें समाधान मानतात; परंतु खऱ्या वस्तुस्थितीवर यत्किंचितहि प्रकाश पडत नाहीं. खरी वस्तुस्थिति काय आहे, याचें दिग्दर्शन प्रबोधन यथावकाश करणारच आहे. तथापि सध्यां एवढें म्हटलें म्हणजे पुरे आहे कीं हा समाज इतर बांधव समजतात तितका कांहीं झोंपीं गेलेला नाहीं. त्याची उदासीनता व अंतर्भूत अनावस्था मुळींच नाकबूल न करितां आम्हीं एवढेंच म्हणतों कीं त्यांच्या कारणांचे धागेदोरे फार निराळ्या प्रकारचे आहेत. बुद्धिमत्तेच्या बाबतींत हा समाज कोणत्याहि इतर सुसंस्कृतब्रुव समाजाला हार जाणार नाहीं. याच्या कर्तबगारीची तडफहि कांहीं कमी तीव्र नाहीं. सारांश, राष्ट्रकार्य करण्यास लागणारे सर्व सद्गुण या समाजांत आज घटकेला उत्कटत्वानें वास करीत आहेत; या बाबतींत अगदींच कांहीं संन्याशाच्या लग्नाची शेंडीपासून तयारी करायला नको. बहुजनसमाज हा केव्हांहि झाला तरी अज्ञानमग्न उदासीन आणि निष्क्रीय असल्यासारखाच दिसणार; परंतु त्यावरून सबंध समाजाच्या संस्कृतीची अजमावणी करूं म्हटलें तर महाराष्ट्रांतल्या कोणत्याहि बोलक्या मुक्या, चळवळ्या ऐदी, किंवा अपटुडेट आउटऑफडेट समाजाला

संस्कृतीचें शिफारसपत्र पटकविणें बरेंच अवघड जाईल. कायस्थ समाज शिस्तवार संघटीत बनलेल्या चित्पावन समाजाप्रमाणें निष्कारण वा सकारण वाचाळतेचा ओरडाओरडा करीत नाहीं. त्याची चळवळ ऊर्ध्वमुखी नाहीं. त्याची उन्नति क्रमशः पद्धतशीर पायरीपायरीनें आपोआप होत आहे. कायस्थ संघ अझून असावा तितका संघटीत व कार्यक्षम बनलेला दिसत नाहीं, हें खरें; तथापि त्यावरून तो निर्जीव आहे किंवा कुचकामाचा आहे हें विधान चावटपणाचें वा मत्सरीपणाचें नसलें तरी मूर्खपणाचें खास ठरेल. हा समाज इतर सर्व महाराष्ट्रीय समाजांप्रमाणेंच धार्मिक, सामाजिक व आर्थिक बाबतींतल्या अनेक दोषांनीं चिडचिडलेला आहे. या दोषांचा नायनाट करण्याचें कार्य समाजसुधारक धिम्मेपणानें करीतच आहेत व प्रबोधनसुद्धां कोणाहि मोठ्या छोट्यांची भाडभीड न धरितां हें जागृतीचें कार्य करण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं.

श्रीमद्रामकृष्ण परमहंस यांच्या सुलभवेदान्त नामक ग्रंथांत एक मनोवेधक चुटका दिलेला आहे. आकाशांत अंतराळीं होमा नांवाचे कांहीं पक्षी रहातात. ते कधींहि पृथ्वीतलावर येत नाहींत. त्यांचा सर्व प्रकारचा आयुष्क्रम व संसार वरच्यावर अंतराळींच चाललेला असतो. ते आपलीं अंडीं सुद्धां वर हवेंतच घालतात. अर्थात् अंडीं घातल्याबरोबर तीं पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळें भराभर खालीं कोंसळूं लागतात. या कोंसळण्याच्या सोंसाट्यांतच तीं खडाखड फुटून त्यांतून निघालेलीं होमा पक्ष्यांचीं पिल्लें सुद्धां गुरुत्वाकर्षणामुळें पृथ्वीकडे खेंचलीं जातात. परंतु इतक्यांत त्या पिल्लांचें आत्मज्ञान जागृत होऊन, 'अरे? आम्ही होमा पक्ष्यांचीं पिल्लें; इकडे खालीं पृथ्वीकडे कां अवनत होत चाललों?' या नुसत्या विचाराच्या जोरावरच तीं चटकन आपले पंख उभारून पुनश्च उंच अंतराळांत उड्डाण करून जातात. या छोट्या चुटक्यांत अध्यात्मदृष्ट्या कांहीं रहस्य असलें तरी यांत अवनत व्यक्ती, समाज वा राष्ट्र यांच्या पुनर्घटनेची खरी गुरुकिल्ली आहे, यांत संशय नाहीं. अवनतीच्या कल्पनेनं निराशामग्न झालेल्या व्यक्तीनें वा समाजानें होमा पक्षांच्या पिल्लांचा हा आत्माज्ञान-प्रबोधनाचा मंत्र अक्षयीं चिंतनांत ठेविल्यास त्यांचें उन्नतींत इतक्या चमत्कारिक रीतीनें पर्यवसान होईल कीं त्यांचं त्यांनाच आश्चर्य वाटूं लागेल. नुसत्या अवनतीच्या कल्पनेनें जेवढी अवनति होते, तेवढी आजुबाजूच्या परिस्थितीनेंहि होत नाहीं, असा मानसशास्त्रवेत्त्यांचा ठाम अभिप्राय आहे. म्हणूनच ''कल्पनेची बाधा न होत कोणे काळीं । ही संतमंडळी सुखी असो'' हें भरतवाक्य आमच्या भजनी मंडळींच्या तोंडीं चिरंजीव होऊन बसलें आहे. कल्पनाशक्ति ही जितकी विधायक आहे तितकीच ती विघातकहि आहे. विधायक असतांना ती देवतेप्रमाणें उन्नतीचे पडदे भराभर मोकळे करून आपल्या भक्ताला नंदनवनाच्या ऐश्वर्याचें सौख्य देते आणि तीच एकदां विघातक बनली म्हणजे वाळवीप्रमाणें भक्ताच्या मनोवृत्तीला आंतून पोंखरून वाटेल त्या परिस्थितीच्या कुविचारांच्या धक्क्यांनी त्याला पुरा खिळखिळा करून सोडते. अशा या विघातक स्थितींत व्यक्तीनें, समाजानें किंवा राष्ट्रानें होमा पक्ष्यांच्या पिल्लांप्रमाणें उपरतीची जर उचल केली नाहीं, तर मात्र त्या व्यक्तींचे समाजाचें किंवा राष्ट्राचें मरण फार दूर नाहीं हें खास समजावें.

चान्द्रश्रेणीय कायस्थ प्रभु समाजाची सांप्रत जर कांहीं अवनतावस्था असेल तर ती त्याच्या विघातक कुकल्पनेचेंच फळ असलें पाहिजे. हा समाज जर परस्परांविषयीं अनुकंपारहित असेल तर त्याचेंहि मूळ परस्परांविषयींच्या कुकल्पनेंतच सांपडेल. तो सांप्रत निराशेच्या गर्तेत कोंसळून एखाद्या निराश्रित अभाग्याप्रमाणें त्राहि माम् पाहि माम् म्हणून हृदयभेदी किंकाळ्या मारीत असेल, तर उन्नतीच्या

कड्यावरून कांहींतरी दिशाभूल झाल्यामुळें त्याचें पाऊल घसरलें असलें पाहिजे, यांत संशय नाहीं. सांपत्तिक दृष्टीनें कदाचित् हा समाज कंगाल झाला असेल, शारीरिक दृष्ट्या इतर अनेक समाजांप्रमाणेंच तो सर्वस्वीं हतबल झाला असेल, किंवा कुकल्पनेच्या मायेचें आवरण पडल्यामुळें बौद्धिक बाबतींतहि त्याचें तट्टू फारसें पुढें पुढें आलेलें दिसत नसेल; तथापि एवढ्याच बाह्य कारणांमुळें चां. का. प्रभू समाज ठार मेलां आहे, असें कोणी विधान केल्यास त्याला कांहीं तरी मेंदूचा रोग झाला असावा. या समाजाचें आजला जरी सर्व वैभवसर्वस्व नष्ट झालेलें असलें आणि चालूं धकाधकीच्या मामल्यांत त्याला कांहीं महत्वहि उरलें नसलें, तरी त्याचा गतेतिहास जोंपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत चां. का. प्रभु समाजाच्या पुनर्जागृतीबद्दल निराशेचे सुस्कारे टांकण्यांत फारसा पुरुषार्थ नाहीं. हा इतिहासहि कांहीं अगदी जरठजीर्ण अथवा पुराणपुरुषाइतका प्राचीन नाहीं. अगदीं कालपरवाचा. ताजा गरमागरम आहे. राष्ट्राच्या आयुष्यात शतकांना जर दिवसांच्या मापानें मापलें तर कायस्थ प्रभूंच्या पराक्रमाचा इतिहास काल परवांपलीकडे नेतांच यावयाचा नाहीं. मावळांत उदय पावणारें व साऱ्या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात हमामा घालणारें कायस्थ प्रभूंचें क्षात्रतेज म्हणजे जिवंत निखारा आहे. या निखाऱ्यावर सांप्रत उदासीनतेची राख सांचल्यामुळें, कायस्थ प्रभूंच्या कर्तबगारीचे कोळसे पडले या समजुतीनें त्याला लाथ मारण्याचें पोरकट कृत्य करण्यांतच लोकमान्यतेचा मोक्ष मिळवूं पहाणाऱ्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे हातपाय कसे होरपळून निघाले, तें वाचकांस खुलाशानें सांगणें नकोच. एका संस्कृत कविवर्यानें म्हटलें आहे :-

निद्रामीलितलोचनो मृगपतिर्यावद् गुहां सेवते ।
तावत्स्वैरममी चरंतु हरिणाः स्वच्छंदसंचारिणः ।।
उन्निद्रस्य विधूतकेसरसटाभारस्य निर्गच्छतो ।
नादे श्रोत्रपथं गते गतधियः संत्वेव दीर्घायुषः ।।

अर्थ - जोंपर्यंत सिंह हा निद्रिस्त होत्साता गुहेचा आश्रय करून आहे, तोंवर हे स्वच्छंद संचार करणारे हरीण चोहोंकडे फिरोत; पण तो एकदां जागा होऊन आंपलें आयाळ झाडून बाहेर निघाला व त्याची गर्जना कानीं पडली, म्हणजे हे मूढ मृग दीर्घायु असोत म्हणजे मिळविली !

चां. का. प्रभु समाजाला ज्या अर्थी भूतकालाचा उज्वल असा इतिहास आहे, त्या अर्थी त्याला उज्वलतम नसली तरी उज्वलतर भविष्याची आशा खास आहे. वर्तमान काळ हा त्याच्या संक्रमणावस्थेचा काळ आहे. संक्रमणावस्थेंत कर्तबगारीचें बीज जीव धरून अंकुराच्या रूपानें फोंफावण्यास सिद्ध होत असते. नवयुगाची रम्य उषा आतां उगवली आहे. पहांटेचा मंद प्रबोधन-वायु सर्वत्र संचार करूं लागला आहे. राष्ट्रीय विचारांचें दंहिवर आपल्या मौक्तिक बिंदूंचा सर्वत्र सडा घालीत आहे. प्रच्छन्न बुद्धिमत्ता आतां जागृत होऊन, 'पूर्व दिशेला हा हृदयाल्हादक प्रकाश कसला पडला आहे?' याची चवकशी करण्यासाठीं पिलपिल करणाऱ्या नेत्रांनों रम्य उषेच्या हांसऱ्या चेहेऱ्याकडे निरखून पहात आहे. हिन्दी राष्ट्राच्या आपत्तीची काळीकुट्ट रात्र आत्मानात्म विचारांची कोडीं सोडविण्यांत जागून काढणारे संत, तरुण भारताला जागृत करून, त्यांना भूपाळ्या म्हणावयास बसवून, आपण प्राच्यवैभवाच्या उगवत्या सहस्त्रकराला अर्ध्यप्रदान करण्यासाठीं सिद्ध होऊन बसले आहेत. पुरुषांच्या जोडीनें स्त्रीवर्गसुद्धां खडबडून जागा होऊन, राष्ट्रमंदिराला अवधूत करून श्रृंगारण्यासाठीं सडासंमार्जन कवण्यारांगोळ्या

घालतांना एकमेकींशीं कुशलतेची चडाओढ करण्यांत गुंग झाला आहे. अशा रीतीनें सारें हिन्दी राष्ट्र, नव्हे - सारी पूर्वेकडील दुनिया जागी होऊन उषःकालीन् राष्ट्रकार्याची लगबग करीत असतां, एकवेळ असल्याच राष्ट्रकार्याची धुरा स्वयंस्फूर्तीनें आपल्या शिरावर घेतल्यामुळें, इतिहासांत अमर होऊन राहिलेला चां. कायस्थ प्रभु समाजच तेवढा गाढ निद्रित पडलेला आहे, हें विधान चमत्कारिकच नव्हे काय? कांहींहि असो! भरतभूमीच्या सौभाग्याकरितां, हे कायस्थ संघा, तूं जर खरा क्षत्रिय असशील तर पूर्व इतिहासाला स्मरून, राष्ट्रीय कामगिरी करण्यासाठीं -

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत.

□□□

लेख

धन्य पार्वतीबाई धन्य !

नारियोंकु निंदो नहीं नारी नरकी खान ।
जिस खानिसे पैदा हुवे राम कृष्ण हनुमान ।।

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तव देवताः' या सूत्राचा अवमान ज्या घटकेपासून भरतपुत्रांनीं करण्यास सुरवात केली त्या घटकेलाच त्यांच्या राष्ट्रीय वैभवाची माती झाली. आतां ज्या क्षणापासून पश्चात्तापित भारत स्त्रीवर्गाच्या उन्नतीचा प्रश्न हाती घेईल त्या क्षणींच त्यानें उद्यांच्या साम्राज्याचा पाया ठोंकला असें समजावें. 'अबलोन्नति' हा संधि कोणत्या शहाण्यानें केला असेल तो असो, स्त्रियांना 'अबला' म्हणण्यांतच सत्याचा खून पाडण्याचें दृष्ट कृत्य आपण करीत आहोंत, त्याची त्या शहाण्याला दाद नसावी असें वाटतें. स्त्रिया अबला असतात कीं सबला असतात हें इतिहास शिकवील. परंतु स्त्रियांना अबला करून मग त्यांच्या उन्नतीबद्दल गुजराथी रडगाणें गाण्यांत मोठासा सबल पुरुषार्थ साधेल असें मुळींच नाहीं. उलट त्यांना अबला म्हणणें व त्यांच्या उन्नतीकरितां प्रयत्न करण्याची शेखी मिरविणें यांत, आणि एखाद्या जेत्यानें जित राष्ट्राला हतबल करून नंतर स्वराज्याच्या हप्तेबंदी खुराकावर त्याला सज्ञान, सशक्त व स्वावलंबनी करणें यांत विशेष फरक तो काय? स्त्रीवर्गाचा औपनिषदिक व भारतकालीन इतिहास पाहिला तर त्यांची कर्तबगारी सर्वशक्तिपूर्ण व मर्दपणाचा टेंभा मिरविणाऱ्या पुरुषांपेक्षांहि सामर्थ्यवान् असल्याचें डोळसाला स्पष्ट दिसेल. परंतु त्यांचा अवमान करण्याची अवदसा ज्या वेळी पराभूत पुरुष वर्गाला आठवली त्याच वेळीं त्यांना अबला ही संज्ञा लावण्याचें मुर्दाड धाडस जन्माला आलें. ते कांहींहि असो, स्त्रियांच्या उन्नतीचा प्रश्न आतां राष्ट्रीय चळवळींतील एक अत्यंत महत्वाचा भाग होऊन राहिला आहे ही मोठ्या आनंदाची, त्याचप्रमाणें अभिमानाची गोष्ट आहे. गेल्या अर्धशतकांत प. वा. डॉ. आनंदीबाई जोशी या विदुषीपासून तों तहंत् विद्यगान श्री. सरोजिनी नायडू पर्यंतच्या सबला भगिनींनीं आपल्या उदात्त चारित्र्यानें अकल्प्य धाडसानें व कौतुकास्पद बुद्धिसामर्थ्यानें असें सप्रमाण पटवून दिलें आहे कीं औपनिषदिक इतिहासाची पुनरावृत्ति या भरतखंडांत लवकरच होणारा. जुन्या इतिहासांत रजपुत स्त्रियांच्या धाडसी पराक्रमाच्या अनंत गोष्टी आपण वाचतों. जोहारासारख्या अमानुष यज्ञांत त्यांनीं आपल्या सर्वस्वाचा आत्मयज्ञ केल्याचीं उदाहरणें वाचून व

ऐकून आपल्या हृदयांत खेदमिश्रित कुतुहलाच्या उर्मी उठतात. परंतु सात समुद्र उल्लंघन करून बौद्धिक सामर्थ्याच्या जोरावर अहंमन्य पाश्चात्यांच्या छावण्या भराभर काबीज करून, हिन्दु संस्कृतीचा, हिन्दु तत्वज्ञानाचा व हिन्दुधर्माचा झेंडा त्यांच्या नांकावर टिचून उभारून मायदेशाची वर्णनीय कामगिरी करणाऱ्या डॉ. आनंदीबाई, श्री. सरोजिनीबाई, या विदुर्षीप्रमाणेंच भारतीय इतिहासाला आमच्या भगिनीं पार्वतीबाई जर आठवल्या नाहींत तर तो इतिहास कशाचा? श्री. पार्वतीबाई या कांहीं वर्षांपूर्वी प्रो. कर्व्यांच्या इंडियन उइमेन्स युनिव्हर्सिटी तर्फे पाश्चात्य देशांतील लोकमत जागृत करण्यासाठी अमेरिकेला गेल्या होत्या, त्या नुकत्याच तिकडे व युरोपांत दिग्विजय मिळवून स्वदेशीं परत आल्या आहेत. पार्वतीबाईंचा पूर्व इतिहास आणि आतां अमेरिका, इंग्लंड, पारीस सारख्या ठिकाणीं त्यांनी स्वतःच्या कतबगारीवर मिळविलेल्या दिग्विजयाचा इतिहास जो कोणी लक्षपूर्वक तुलना करून पाहील, तो देखील आमच्याप्रमाणेंच स्त्रियांना अबला मानणाऱ्या शहाण्याचे कान उपटायला कमी करणार नाहीं. हिन्दी स्त्रियांच्या वतीनें केवळ स्वावलंबनाच्या जोरावर पार्वतीबाईसारख्या 'यःकश्चित्' दिसणाऱ्या एका हिन्दु विधवेनें अमेरिकेला जाण्याचें धाडस करावें, ठिकठिकाणी अनेक व्याख्यानें देऊन तिकडील लोकमत जागृतीच्या कामधेनुपासून फंड गोळा करून इकडे युनिव्हर्सिटीकडे पाठवावा आणि हिन्दी स्त्रियांच्या उन्नतीकडे अमेरिकन, इंग्लिश, फ्रेंच राष्ट्रांचें लक्ष वेधावें, ही असामान्य कामगिरी बजावणारी स्त्री व शिवछत्रपतींची माता जिजाबाई किंवा राघोबा दादाच्या हातांत कांकणें भरणारी अहल्याबाई यांत आम्हांला तरी कांहीं भेद दिसत नाहीं. कार्याचें स्वरूप भिन्न असलें तरी त्याच्या महत्वाचा कस केव्हांहि एकजिनसीच असतो. पार्वतीबाई अमेरिकेला गेल्या तेव्हां त्यांना प्रो. धर्मानंद कोसंबी यांची न्यूयॉर्क पर्यंत सोबत लाभली. परंतु तेथें त्यांनी पार्वतीबाईला सोडल्या दिवसापासून त्यांची वार्ता इकडे कांहींच नव्हती. मध्यंतरीं आम्ही आमचे परममित्र प्रो. चिपळूणकर यांच्या पाशीं त्यांची विचारपूस केली, तेव्हा त्यांच्याकडूनहि कांहीं कळे ना. ते म्हणाले How could we trace a drop in that unfathomable ocean of America - त्या अमेरिकेच्या महासागरांत या थेंबाचा पत्ता आपणांस कसा लागणार? परंतु धन्य आमचा प्यारा हिन्दुस्थान ! त्याची कर्तबगार कन्या असे हजारों महासागर रोंरावत तिच्यावर कोंसळले म्हणून ती थोडीच बुडणार आहे ! हिंन्दुस्थानची संस्कृति कच्च्या कुंभाराची कच्ची माती नव्हे !! हिन्दु तत्वज्ञान उपऱ्या भुसाऱ्याच्या वखारींतलें भुसाचें पोतें नव्हे. हिन्दु धर्म हा गुलामांचा धर्म नव्हे. विष्णुगुप्त चाणक्याचें सूत्र पहा. चाणक्य ठणकावून साऱ्या जगाला सांगतो कीं 'न तु एव आर्यस्य दासभावः' आर्यजन कधींहि कोणाचे गुलाम होणार नाहींत. मग ही आमची पोलादी निश्चयाची आर्यकन्याच कशी अमेरिकेच्या पचनीं पडणार? आर्य या शब्दांतच साम्राज्यजेतृत्व रसरसत आहे. आर्यजननीच्या अभिमानी लेकरांनीं आपला आत्मघातकी संकुचित बाणा दूर झुगारून देऊन, धार्मिक सामाजिक व राजकीय गुलामगिरीचे पाश तडातड तोडून किंचित् सीमोल्लंघन करण्याची तडफ दाखवावी कीं दिग्विजयश्रींनें माळ घातलीच म्हणून समजावें. दिग्विजय हा हिन्दुस्थानचा जन्मसिद्ध हक्क आहे; म्हणूनच गेल्या तीन हजार वर्षीच्या अवधींत शेंकडों भिन्न भिन्न संस्कृत्या जगतीतलावर जन्मून कालवशांत मृत्यु पावल्या; पण हिन्दु संस्कृती अझूनहि काळाला टक्कर देऊन ताठ आहे तशीच उभी आहे. निराशावाद्यांनी या प्रमेयावर किंचित् डोकें खाजवावें अशी प्रबोधनाची प्रार्थना आहे.

पार्वतीबाईंनीं हिन्दी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटी करितां अमेरिकेंतून २५०० रुपये फंड जमा करून

पाठविला व तिकडील भगिनींकडून दरसाल दोन हजार रुपये नियमित देणगी येण्याबद्दल कायमची व्यवस्था केली आहे. त्यांनीं अमेरिकेंत हिन्दी स्त्रियांच्या उन्नतिबद्दल विलक्षण लोकमतजागृति केली आहे. याचें एकच ठळक उदाहरण म्हणजे इंटरनॅशनल कँग्रेस ऑफ वर्किंग उइमेन, १४२३ न्यूयॉर्क आवेन्यु, वॉशिंग्टन, या संघाच्या अध्यक्षानें पार्वतीबाईंना जें एक पत्र लिहिलें आहे. त्यांत म्हटलें आहे की ''आपण कृपा करून हिन्दी वस्तु, तिकडील औद्योगिक अहवाल वगैरे सर्व गोष्टींची माहिती बिनचुक पुरविण्यास मात्र विसरूं नका. आम्हीं मोठ्या आनंदानें त्या आमच्या पत्रांत प्रसिद्ध करीत जाऊं.'' न्यूयॉर्कच्या अनेक वजनदार प्रातिनिधीक संस्थांपुढें पार्वतीबाईंनी शेंकडों व्याख्यानें दिलीं. सोरोसिस क्लबनें जगविख्यात वॉल्डार्फ आस्टोरिया नामक हॉटेलांत जंगी मेजवानी देऊन पार्वतीबाईंचा ५०० सभासदांकडून जानेवारीच्या १ ल्या तारखेस मोठा सन्मान केला. गॅमट क्लबांत त्यांनीं नट, नायक व वाजिंत्रविशारद मंडळीपुढें व्याख्यान दिलें. उन्हाळ्यांत साऱ्या युनायटेड स्टेस्ट्स मधून टीचर्स कॉलेज ऑफ न्यूयॉर्क येथें जमणाऱ्या शिक्षक मंडळीपुढेंही त्यांनीं हिंदुस्थानविषयक माहितींचें व्याख्यान देण्याची संधि दवडली नाहीं. ब्रैन मॉर क्लब, सिविक क्लब, लेबर टेंपल, आंतर्राष्ट्रीय स्त्रियांची लेबर कॉन्फरन्स इ. संस्थांनीं पार्वतीबाईंचा मोठा सन्मान करून त्यांचीं व्याख्यानें मोठ्या कळकळीनें ऐकून घेतली. लंडनमध्यें शेक्सपियर हट मध्यें हिन्दी लोकांच्या समूहापुढें व्याख्यानें दिलीं. तेथें हजर असलेल्या हिन्दी भगिनींनीं पार्वतीबाईंना जागच्या जागी १० पौंडांची देणगी दिली.

पारीसमध्यें पार्वतीबाईंनीं फ्रेंच भगिनींची सहानुभूति मिळविण्यांत बरेंच यश मिळविलें असून, तेथील अनेक मोठमोठ्या राष्ट्रीय प्रातिनिधिक संस्था व विद्वान् पंडित यांचाही परिचय करून घेतला. हिन्दी स्त्रिया पारीसला अभ्यास, प्रवास, किंवा कांहीं शोध लावण्यासाठीं गेल्यास त्यांना सर्वतोपरी मदत करण्यास अनेक संस्था आतां उद्युक्त आहेत; आणि एवढ्यासाठी Association des Hindous de Paris, (26Rue Lamartine) या संस्थेनें कुमारी नवरोजी यांना आपले अध्यक्ष निवडिलें आहे.

श्री. पार्वतीबाईंनीं आपल्या या त्रिखंडी दौऱ्यांत अमेरिकेंतले बहुतेक सारे मोठमोठे कारखाने, शाळा, वसतीगृहें इ. नीट बारकाईनें पाहिले. या त्यांच्या अनुभवाचा फायदा हिन्दु राष्ट्राला अत्यंत होईल, यांत संशय नाही. पार्वतीबाई यांनी पैशाचें पाठबळ नसतांहि अमेरिकेला जाऊन एवढें उत्कृष्ट ज्ञान मिळविण्याची जी धडाडी दाखविली, ती महाराष्ट्राच्या भगिनीवर्गाला शोभेशीच आहे. तेथें गेल्यावर त्यांना जेव्हां पैशाचा तुटवडा पडला तेव्हां फिझिक्सचे प्रो. आठवल्यांच्या या कर्तबगार मातोश्रीनें भिक्षावृत्तीचें लाजीरवाणें जिणें न पत्करतां चेंबरमेड, वेट्रेस व दहा अमेरिकन कुटुंबातील मुलांचा गव्हर्नेस ही कामें करून पैसा मिळविला व आपलें उद्दिष्ट कार्य मोठ्या चिकाटीनें तडीस नेऊन, त्या आतां विजयशाली होऊन स्वदेशीं परत आल्या आहेत. पार्वतीबाईंच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा हिन्दीराष्ट्र करून घेईल अशी आम्हांला उमेद आहे. श्री. पार्वतीबाई यांना ईश्वर चिरायु करो व त्यांच्या हातून महाराष्ट्रीय भगिनींच्या निसर्गजात कर्तबगारीला योग्य तो स्फूर्ति प्राप्त होवो !!

□□□

स्फुट लेख

विविधज्ञान विस्तारचा विक्षिप्तपणा

साठी आणि बुद्धि नाठी. ही म्हण माणसांप्रमाणेंच नियतकालिकांनाहि कधिं काळीं लागूं पडेल, अशी आमची कल्पना नव्हती. परंतु जुलै १९२१ च्या अंकांत वि. ज्ञा. वि. या मासिकानें प्रो. गोविंद गोपाळ टिपनीस यांच्या नेमणुकीबद्दल जें पोरकट अभिनंदन केलें आहे, तें वाचल्यास या दीडशहाण्या मासिकाच्या वाढत्या आयुष्याबरोबर त्याच्या बुद्धीला ओहटी लागल्याचें कोणाच्याहि प्रत्ययाला येईल. ज्यावेळीं महाराष्ट्रांत नियतकालिकांचा फारसा प्रसार नव्हता व जनता सध्यां इतकी वाचनप्रिय बनलेली नव्हती, त्यावेळीं 'एरंडोऽपि द्रुमायते' असें हें एक मासिक उपस्थित झालें. त्यानें वाङ्मयाची सेवा बऱ्या प्रकारची केली आहे, याबद्दल कोणाचाहि मतभेद नाही. परंतु काकतालीय न्यायाने ५० वर्षे जगल्यामुळें या मासिकाला आतां आपल्या बुढ्ढेपणाचा एवढा ताठा आला आहे, कीं टाळक्यावरचे पांढरे केस ही आपली सिल्वर ज्युबिली साजरी करण्याची सनदच आहे असें त्याला वाटणें निसर्गाला फारसें सोडून नाही. परंतु वासरांत लंगडी गाई शहाणी या न्यायानें पूर्वी एकवेळ बृहस्पतिपदावर कांहीं मूठभर शहाण्यांनीं चढविलेल्या या वृद्ध कपीनें सांप्रतच्या सर्वांगीण जागृतीच्या काळीं आपल्या एकांड्या शहाणपणाची फारशी किंमत ठरविण्याचें धाडस करूं नये. तुमचे ते ऱ्हस्वदीर्घ अनुस्वार विसर्गादि नियम पाळणारे दीड डझन गद्य लेखक व अर्धा डझन कालीदास घेऊन साहित्यसंमेलनाचें वार्षिक पौराणिक लळीत खुशाल नाचवीत बसा; त्याबद्दल कोणी तुमच्या पायांतल्या पैंजणांना हात घालणार नाहीं. परंतु वृद्धपणामुळें क्षय लागलेल्या आपल्या कोत्या अकलेच्या जोरावर या नवयुगीन् जनतेपुढें आपल्या विक्षिप्तणाचें प्रदर्शन करण्याचें पोरकट धारीष्ट अतःपर न कराल तर त्यांतच तुमच्या वृद्धपणाचा कांहीं बोज राहील. वि. ज्ञा. विस्तारानें भुजंगनाथाची ऐट आणणें त्याच्या शीलाला शोभत नाहीं.

विस्ताराचे खंदे संपादक 'अभिनंदन' या सदराखाली म्हणतात ''गेल्या मे च्या अंकांत आमच्या एका व्यवसायबंधूच्या मृत्यूची दुःखद खबर देण्याचें अप्रिय काम केलें. या अंकांत आमचे दुसरे एक व्यवसायबंधू महाराष्ट्र साहित्याचे संपादक रा. रा. गोविंद गोपाळ टिपणीस यांस एल्फिन्स्टन कालेजांत मराठीचे अध्यापक नेमल्याची आनंदायक बातमी देण्यास आम्हांस मोठा आनंद वाटतो.'' अरेरे !! केवढा संकटाचा पर्वत या विस्तारावर कोंसळला ! गेलीं पन्नास वर्षे जगल्यामुळें शेंकडों विद्वान्

लेखकांचें व कविवर्यांचें श्राद्ध घालण्याचें भाग्य निरंतर भोगण्यास सवकलेल्या या फाजील चिरंजीव आजोबाला गेल्या मे महिन्याप्रमाणेंच जून जुलै आगष्ट महिन्यांत आपल्या व्यवसायबंधूंचें श्राद्ध घालण्याचा मामुली सुप्रसंग न येतां प्रो. टिपणीसासारख्यांच्या नेमणुकीचें अभिनंदन करण्याचा कुप्रसंग यावा ना? बरें, कुप्रसंग तर कुप्रसंग. पण तो तरी विस्ताराच्या मठांतल्या एकाद्या ऱ्हस्वदीर्घ्या व्युत्पन्न पंडीताबद्दल यावा ! तेंहि नाहीं. मग विस्ताराचार्याच्या पोटांत दुःखाच्या मागोमाग नाटकी आनंदाचा वायूगोळा कां उठूं नये ! अभिनंदनाची ही प्रस्तावना विस्तारकर्त्यांनी जर अशी केली असती का, ''गेल्या महिन्यांत आमच्या एका व्यवसायबंधूच्या मृत्युबद्दल लिहितांना आम्ही शुद्धीवर होतों, परंतु या जुलैमध्यें आम्हीं चिलीम ठोंकल्यामुळें दुसऱ्या एका व्यवसायबंधूचें अभिनंदन करीत आहोंत'' तर तें कांहींतरी सत्याला धरून झालें असतें व प्रस्तावनेंतील विक्षिप्तपणावर लोकांची श्रद्धाहि बसली असती. एकाच्या मृत्युची दुसऱ्याच्या अभिनंदनाशी सांगड घालणाऱ्या विस्तारकर्त्याच्या अकलेची तारीफ त्याचे ऱ्हस्वदीर्घे लाळघोटे पंडीतच करूं जाणें.

पुढें विस्तारकार म्हणतात ''रा. टिपणीस यांचें व्यक्तिशः जरी आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करितों तरी त्यांच्यापेक्षां जास्त योग्यतेचा इसम या नवीनच अस्तित्वांत आलेल्या परंतु महत्वाच्या जागेसाठीं मुंबई शाळा खात्याला मिळाला नाहीं, या बद्दल आम्हांस वाईट वाटतें.'' विस्ताराच्या या मूर्खत्वदर्शक ज्ञानविस्ताराचे कान 'स्पष्टवक्त्यानें' ३० सप्टेंबरच्या इंदुप्रकाशामध्यें चांगलेच उपटले आहेत, तेव्हां त्यांना अधिक तणावा देऊन लांब करण्यांत अर्थ नाहीं. मूर्ख मुंबई सरकार ! 'नष्टस्मृतिसाम्राज्या' सारख्या मराठी भाषेचा खून पाडणाऱ्या भिकारड्या भाषांतरांच्या चोंपड्या प्रसविणाऱ्या विस्तारकंपूतल्या ऱ्हस्वदीर्घ्या पंडितांपैकीं एकाची नेमणूक मराठी प्रोफेसरशिपच्या जागेवर न करतां, कोठचा आणला हा महाडसारख्या खेड्यांतला टिपणीस ! विस्ताराचा फणसवाडी मुगभाट म्हणजे विद्वान पंडितांचा बाजारहाट ! तो सोडून मुंबई सरकारनें रेवदंड्याची खाडी ओलांडून पोलादपुराहून महाडच्या टिपणीसाकडे कशाला बरें धांव घेतली? रावसाहेब मोरमकरांना तें भेटलें तर त्यांनीं आपल्या जुनाट अचुक गुणकारी पंडितांच्या वखारींतून एकादा सकलगुणांलंकृत पंडीत मुंबई सरकाराच्या ओटींत घातला असता.

रा. टिपणीसांच्या नेमणुकीचें गुणवैषम्य दाखविण्यासाठी विस्तारकर्त्यांनी रा. श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर यांच्या डेक्कन कॉलेजांतल्या तसल्याच नेमणुकीबद्दल मोठ्या आढ्यतेनें वाहवा केली आहे. रा. चाफेकरांच्या लेखनक्रियेच्या जोडीनें त्यांच्या पदरीं वक्तृत्वकलेची भाडोत्री जोड बांधण्यांत विस्तारकारांनीं आपल्या उदार मनोवृत्तीचें कर्णभांडार फोडलें आहे. रा. चाफेकर लेखक आहेत, ते व्याख्यानेंहि देतात; पण त्यांच्या आंगीं वक्तृत्व कल्पिणें म्हणजे कावळा व कोकीळ यांतला भेद न समजण्या इतका मूर्खपणा व्यक्त करणें होय. या मूर्खपणावर ''चांगला चाललेला वकिलीचा धंदा सोडून प्रस्तुतची अध्यापकाची जागा पत्करण्यांत त्यांचें मातृभाषेवरील प्रेमहि दिसून येतें.'' या धडधडीत खोट्या शेऱ्यानें कळस चढविला आहे. रा. चाफेकरांची वकिली किती 'चांगली' चालत असे, त्याबद्दल इतर तालुक्यांतला चाफेकरांचा वणवण दौरा बाद केला तरी परतवाडा (एलीचपूर) चे त्यांचे घरवाले रा. दामले मास्तर पेनशनर यांच्याकडे रावसाहेब मारेमकरांनीं खुलासा केला असता तर बरें झालें असतें. रा. दामले हे जरी मृत्यु पावले आहेत, तरी त्यांच्या चिरंजीवाकडे अथवा ज्यांच्या पुढें रा. चाफेकरांच्या वकीलीचा 'चांगलेपणा' दुगाण्या झाडीत 'चालत' असे, ते सबजज्ज रावसाहेब मुकुंदराव राघव पाठक

(हल्लीं मुक्काम आकोला) यांच्याकडे तपास केल्यास ते अझून ही या घोडदौडी वकीलीचा पुरावा देतील. अशा प्रकारचा असत्यपूर्ण विपर्यास वाचून इतर ठिकाणचे लोक जरी कांहीं वेळ फसले, तरी हा 'चांगल्या चाललेल्या वकीलीचा' पुरावा वाचून परतवाड्याचे विस्ताराचे वाचक त्याच्या तोंडांत शेण घालतील, याची तरी त्यानें पर्वा करायची होती !! रिकाम्या न्हाव्याप्रमाणें घरच्या कुडांना तुंबड्या लावीत बसण्यापेक्षां प्रस्तुतची प्रोफेसरकीची नेमणूक म्हणजे रा. चाफेकरांना ऐन आणीबाणीच्या वेळीं सहाय्यार्थ धांवून आलेली कामधेनु वाटत असली पाहिजे, रा. टिपणीसांना घरची शेतवाडी ईश्वरकृपेनें इतकी रगड आहे की प्रोफेसरकी जावो अथवा राहो, घर बसल्या वाङ्मयसेवा आजदीनपर्यंत केली तशी ते मरे पर्यंत करतील, यांत मुळींच शंका नाहीं.

□□□

वर्ष १ : अंक २ : १ नोव्हेंबर १९२१

अनुवाद

संस्कृतीची निवड

(With Compliments to I. R. S.)*

मूळ लेखक : **धनपतिनाथ दास, कलकत्ता.**

संक्रमणाचा काळ क्षणिक असतो. मात्र अखेर आम्ही अशा स्थितीप्रत येऊन पोंचतों कीं आम्हाला भविष्यत्कालचें दृश्य अथवा मार्ग स्पष्टपणें दिसूं लागतात. पुनर्घटनेच्या कोणत्याही प्रश्नाचा विचार करतांना आपल्याला बहुजनसमाज (masses) अवश्यमेव विचारांत घेतला पाहिजे. राष्ट्राची खरीखुरी शक्ति बहुजनसमाजांतच केंद्रीभूत झालेली असते. अर्थात् पुनर्घटनेची जी योजना या समाजाला वगळते, तिला अपयश आल्याशिवाय कधीहि राहणार नाही. जे जे आर्थिक, सामाजिक, प्रजाजननविषयक किंवा राजकीय प्रश्न या समाजाच्या पुढें असतील ते अत्यंत समधात बुद्धीनें व न्यायीं दृष्टीनें चोंखाळून प्रथम सोडविले पाहिजेत.

जनता आपल्या आंखलेल्या मार्गानें पुढें पुढें जात असतांनाच संस्कृति उर्फ सुधारणा जन्म पावते; किंवा निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे जनतेच्या नानाविध चळवळींतूनच संस्कृतीचा जन्म होत असतो. आज आम्ही संक्रमण स्थितीतून जात आहों. अशा वेळीं, आमची संस्कृति कोणत्या स्वरूपाची असावी? ती शुद्ध पाश्चिमात्य असावी, की शुद्ध पौर्वात्य असावी, अथवा या दोन्हीच्या मिश्रणानें बनलेली असावी? या प्रश्नाचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे.

आपण कोण? या जाणिवेचा जो आत्मप्रत्यय, अथवा समाजसंस्था स्थापन करण्यांत मानवजातीचा जो हेतू, त्याची पूर्णता व्हावी, हें संस्कृतीचें साध्य आहे. या दृष्टीनें पाहतां भू-विभागाप्रमाणें संस्कृतीहि भिन्नरूप असावी या कल्पनेला थारा मिळत नाहीं. संस्कृतीचे असे विभाग पाडणें म्हणजे कलहाला

*'इंडियन रॅशनलिस्ट सोसायटी'च्या सहकार्याने

रस्ता मोकळा करून देंण्याप्रमाणेंच आहे. ज्या ज्या मानववंशांनीं (races) आपली संस्कृति आपल्या समकालीन इतर मानववंशाच्या संस्कृतीपेक्षां श्रेष्ठ आहे असें समजून आपल्या भोंवती एकलकोंडेपणाचें एक जाळें विणून घेतलें, त्यांच्या इतिहासावरून हें स्पष्टपणें दिसून येतें की त्या त्या मानववंशांना अशा एकलकोंडेपणामुळेंच एकदम उतरती कळा लागून त्यांची सर्व संस्कृति लयाला गेली; त्यांच्या उज्वल भूतकालची स्मृति मात्र नामशेष राहिली, एवढेंच. कांहीं मानववंशांनी आपली संस्कृति दुसऱ्यांवर बळजबरीनें लादण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यामुळें कलहाचें बीज पेरलें गेलें.

पहिल्या तऱ्हेचें - एकलकोंडेपणाचें - उदाहरण म्हणजे आमचा भिक्षुकवर्ग किंवा शास्त्रीवर्ग. हे शास्त्री हिंदु संस्कृतीच श्रेष्ठ आहे, या समजुतीला उराशीं बाळगून सद्यःकालीन इतर संस्कृतींविषयीं अत्यंत अनास्था दाखवितात, व केव्हां केव्हां इतकें शोचनीय अज्ञान प्रदर्शित करितात कीं तें ऐकून त्यांच्याविषयीं व त्यांच्या कार्यकारणभावाच्या तार्किक व विद्वत्ताप्रचुर प्रतिपादनाविषयीं आपला आदर अगदीं नष्ट होतो.

एका राष्ट्रानें आपली संस्कृति दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न केल्यामुळें रक्तपाताचा प्रसंग कसा ओढवतो, व त्याचें पर्यवसान 'राष्ट्रसंघ' स्थापण्यांत कसें होतें तेंहि आम्हाला दिसून आलेंच आहे. 'राष्ट्रसंघ' व 'पवित्र मित्रमंडळ (Holy Alliance) यांच्यांत इतकें साम्य आहे की गत इतिहासाची पुनरावृत्तीच होत आहे की काय अशी भीति वाटल्याशिवाय राहत नाही. संस्कृतींचा जेव्हां याप्रमाणें संकुचित अर्थ केला जातो तेव्हां सांप्रदायिक हट्टवाद (Dogmatism) बळावतो, व लागलाच त्याच्या पायावर पाय ठेवून कलह तयारच असतो. 'पूर्व म्हणे तत्वज्ञानप्रिय आहे व पश्चिम विध्वंसप्रिय आहे' हें रडगाणें ऐकून ऐकून आम्हांला आतां कंटाळा आला आहे. ज्यांच्या तत्वज्ञानापुढें पश्चिमेंने आपण होऊन नम्रतापूर्वक मान वांकविली तो मानववंश आतां नष्ट झाला आहे. कँट व हेजेल या तत्ववेत्त्यांप्रमाणेंच उपनिषत्कालीन् ऋषीसुद्धां आपल्या परिस्थितीविषयीं अनास्था दाखवीत नसत किंवा जगापासून अथवा संपत्तीपासून दूरही राहत नसत. विद्वानांना आश्रय देणाऱ्या जनकराजाच्या दरबाराची भव्यता त्या काळाला अनुरूपच होती. त्या वेळचे तत्वज्ञानी अध्यात्मप्रतिपादनांत गढून गेले असतांनाच जीवनाच्या दुसऱ्या व्यावहारीक बाजूंकडे पाहणारे व तत्संबंधीं प्रमेयें सोडविणारे होते. परंतु आमच्या आजकालच्या तत्वज्ञानाचा राष्ट्राच्या प्रत्यक्ष जीवनाशीं कांहींहि संबंध उरलेला नाही, व ज्याविषयीं आम्हीं फार बढाई मारतों तो आमचा वेदांतांतला संन्यास म्हणजे आळस व निरुद्योग या द्वयीला दिलेलें दुसरें नांवच होय. आम्ही इहलोकापेक्षां परलोकाचीच जास्त काळजी वाहत असतों.

तत्वज्ञानाच्या या हेत्वाभासमूलक कल्पनेनें आम्ही मनुष्याच्या कार्यक्षमतेचें क्षेत्र फारच आकुंचित केलें आहे. इहलोकापेक्षां परलोकींच खरें सुख प्राप्त होणार असल्यामुळें या पंचमहाभूतात्मक जगाची पर्वा नाहीं केली तरी चालेल, हा आमचा दृढविश्वास. अर्थात् हातापायांत बेड्या ठोंकून जखडबंद केलेल्या दैत्याप्रमाणें आमच्या राष्ट्राची शक्ति नाहक खर्च होत आहे ! आपल्या शेजाऱ्याच्या सुखदुःखाची बिलकुल पर्वा न करितां ईश्वरचिंतनांत काल घालविणारा मनुष्यच तेवढा ईश्वरास प्रिय असतो, आणि ज्ञात प्रमेयांच्या मर्यादा वाढविण्याकरितां व जगाला सुंदर सुंदर तत्वें मिळवून देण्याकरितां आपल्या प्रयोगशालेंत सर्व आयुष्य घालविणारा शास्त्रज्ञ, किंवा आपल्या कष्टमय शोधांनीं मनुष्याचें आयुष्य वाढविण्याकरितां प्रयत्न करणारा भिषक् ईश्वराला प्रिय नसतो, असें म्हणण्याला आधार

एन ४००६--६

काय? तथापि, आजकाल जगावर जास्त उपकार करणाऱ्या शास्त्रज्ञांपेक्षां लांबलचक भगवीं वस्त्रें परिधान करणाऱ्या गोसावड्यालाच बहुजनसमाजाकडून जास्त मान मिळत असतो. वस्तुतः एकांतीं ईश्वरचिंतनांत मग्न असणाऱ्या संन्याशापेक्षां सृष्टीचें निस्सीम (infinite) स्वरूप मनावर बिंबविणारा शास्त्रज्ञच जनतेला जास्त प्रिय असला पाहिजे !

हें युग सत्यान्वेषकांचें आहे. वर्तमान युगाच्या या स्वभावसिद्धीकरितां जो प्रयत्न करीत नाही त्याला आम्ही मान देणें श्रेयस्कर नाहीं. हिंदुस्थानांत येथलीच संस्कृति पुनः प्रस्थापित करण्याचें आमचें ध्येय आम्हीं ठरविलें तर तिचें स्वरूप कसें काय असावे, हा प्रश्न पुढें उभा राहतो. जिला साधारणतः 'ब्राह्मण संस्कृति' असें नांव दिलें जातें तिच्या पुनरुज्जीवनाची गोष्टच काढायला नको. ब्राह्मणसंस्कृतीचें पुनरुज्जीवन म्हणजे अत्यल्पसंख्याकांची संस्कृति बहुसंख्यांक जनतेवर लादण्याची बळजबरीच होय. शिवाय ती संस्कृति तरी कांहीं सात्विक? कसास लावली तर अत्यंत जुलुमी व अविचारमूलक असल्याचें आढळून येईल. या ब्राह्मणी संस्कृतीला डोक्यावर बसवून मानवांच्या स्वभावसिद्ध हक्कांना व जीवनांतील नैसर्गिक प्रेमळपणाला तिलांजुली देण्यास बहुजनसमाज केव्हांही कबूल होणार नाहीं. सामाजिक स्पृश्यास्पृश्यतेचें मंडण करणाऱ्या संस्कृतीचें खंडण करण्यास आणखी पुरावा शोधायलाच नको. एकाच अपराधाकरितां ब्राह्मणांना व ब्राह्मणेतरांना निरनिराळ्या शिक्षा सांगणारी किंवा वेद ऐकणाऱ्या शूद्राच्या कानांत उकळतें शिसें ओतण्याचा हुकूम फर्मावणारी मनुस्मृति अतःपर कोणालाही मान्य होणें शक्य नाहीं. अपराध करणाऱ्या इंद्रियालाच शिक्षा करण्याचा आंव दाखवून त्यायोगें सर्व शरीराचा नाश करणारी शिक्षा सांगणाऱ्याच्या शारीरज्ञानाचें मात्र कौतुक करावें तितकें थोडेंच !

रामराज्यांत एक शूद्र योगाभ्यास करीत होता म्हणून बापापूर्वी मुलाला मृत्यु आला असें आम्हाला मोठ्या गंभीरतेनें सांगण्यांत येतें. अशा अपराधाकरितां त्या शूद्राचा शिरच्छेद करण्याचा हुकूम सोडणाऱ्या रामाच्या 'रामराज्याची' तहान हल्लीं कोणाला लागली असेल ती असो. वरील कथेंतील कार्यकारणसंबंध काय तो समजत नाहीं व ती सर्व कथा रूपकात्मक मानली तरी अशा कल्पनेला जन्म देणाऱ्या रामायणाच्या कर्त्याचें अभिनंदन करणें आमच्याच्यानें होणार नाही.

मनुस्मृति व रामराज्य हीं दोन ब्राह्मण संस्कृतीचीं उच्चतम ध्येयें आहेत; आणि तेवढीं दोनच त्या संस्कृतीचें पुनरुज्जीवन करण्यापासून आम्हाला परावृत्त करण्यास पुरेशीं आहेत. महंमदीय संस्कृतीचें पुनरुज्जीवन करण्याच्या मार्गातही पुष्कळ अडचणी आहेत. परंतु या दोन्ही संस्कृतींतून जीर्णमतवादाचा (orthodoxy) भाग काढून टाकल्यास व वर्तमान युगाला अनुरूप असे त्यांत बरेचसे फेरफार केल्यास, त्या दोन्हींतही पुष्कळ उपयुक्त असा भाग आम्हाला आढळेल.

युरोपीय शास्त्रज्ञांच्या शोधांनी निसर्गाच्या पुष्कळ अज्ञात शक्ति ज्ञात झाल्या आहेत व मानवसृष्टीच्या कल्याणाकरितां त्यांचा कसा उपयोग करून घ्यावा हेंही कळून आलें आहे. जपाननें आपल्या संस्कृतीची चाणाक्षपणें निवड केली म्हणूनच तें राष्ट्र आजला सुखी व वीर्यवान् झालें आहे.

या शोधांचा उपयोग विध्वंसनाकडे केला जातो असा एक आक्षेप वरचेवर घेतला जातो, आणि गेल्या युद्धांमध्यें लढाऊ राष्ट्रांतील शास्त्रज्ञ विध्वंसक अस्त्रांचा शोध लावण्यांत एकसारखे गुंतले होते हेंहि प्रसिद्धच आहे. परंतु या ठिकाणीं, कलहाचें बीज मानवी स्वभावांतच रुजलेलें असतें हें आम्ही विसरतों. शास्त्रीय शोधांच्या जोरावर चाललेलें हें विध्वसंक युद्ध होण्यापूर्वी काय युद्धेंच होत नव्हती?

रगड होत होती. जीवनकलह आणि समर्थाचा सवाई सोटा या दोहोंतून राष्ट्राराष्ट्रांतील परस्पर वैर जन्माला येत असतें. हा नियम साऱ्या विश्वालाच लागूं आहे. जोपर्यंत कलहाच्या बीजाचें उच्चाटन झालें नाही तोपर्यंत कलह उद्भवतांच त्याचा नाश करून मानव सृष्टीला पुनः आपला प्रगतीचा मार्ग आक्रमूं देण्याचें साधन जनतेच्या हातांत असणें अत्यंत हितावह आहे. आम्हांला आमचें स्थान अढळ ठेवावयाचें असल्यास युरोपियांकडून जें शिकावयाचें तें शिकून आमच्या प्रकृतीला अनुरूप असा त्याचा आमच्या संस्कृतींत परिपाक करणें आवश्यक आहे. स्वतः युरोपानें पौर्वात्य धर्माचा स्वीकार करून त्याला आत्मसात करून टाकलें आहे कीं नाहीं? त्यानें त्या धर्माला आपल्या शोधक बुद्धीची जोड करून दिली आहे.

राष्ट्राराष्ट्रांतील विचारांचा व संस्कृतींचा विनिमय करून ज्यांत सर्व मानवजातीचा अभेदबुद्धीनें समावेश होईल असा एक पंथ स्थापन करणें यांतच मानवजातीचा तरणोपाय आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचा पौर्वात्य तत्वज्ञानाशीं संगम करून देणें हें आमचें श्रेष्ठ कर्तव्य आहे. या संगमांतूनच जगांत शांतता प्रस्थापित करणारी व मानवजातीच्या अननुभूत कर्तव्याची पूर्णता करणारी संस्कृति जन्माला येईल.

□□□

एन ४००६--६अ

अग्रलेख

सीमोल्लंघन करा
दसरा गेला, दिवाळी आली

दसरा आला व गेला. सध्यां आपण दिवाळी साजरी करीत आहोंत. तीपण २-३ दिवसांनीं जाणार. हें असें दरसाला होतच असतें. परंतु गोडगोड पक्वान्नांचा फडशा पाडण्यापलीकडे आपण विशेष कांहीं करीत नसतों. दसरा म्हणजे काय, सीमोल्लंघनाचा अर्थ काय, दिवाळींतल्या नर्कचतुर्दशीचें माहात्म्य काय, आणि या मंगल दिवसांचा आपण आत्मोद्धारार्थ व राष्ट्रोद्धारार्थ कसा उपयोग करून घ्यावयाचा, या गोष्टींकडे विशेषतः सर्व हिन्दु बांधवांचें लक्ष वेधावें, हा या लेखाचा प्रयत्न आहे. आपण नुकतीच विजयादशमी साजरी केली. एकमेकांना आपट्याचीं किंवा शमीचीं पानें देऊन 'सोनें' देण्याचा फार्स केला. गांवाच्या सीमेपर्यंत जाऊन, सीमोल्लंघन केलें या भावनेनें, अक्षरशः हात हालवीत घरीं परत आलों. पण, भगिनी बांधवहो, हा विजयादशमीचा नुसता फार्स केला, थट्टा केली; हा विजयादशमीच्या उत्पत्तीचा कल्पनेचा अपमान झाला. या सणाचें महत्व केवढें आहे -

विजयादशमी सण विजयाचा वैभव शौर्याचा
चैतन्याची ज्योत भडकवी प्रताप आर्यांचा
ज्या दिवसानें दक्षिणप्रांता महा-राष्ट्र केलें
शिवरायाचें निशाण भगवें अटकेला नेले ।।

असें या दिवसाचें राष्ट्रीय दृष्ट्या महत्व फार आहे. विजयादशमीच्या पौराणिक कल्पनेवर कोणाचा विश्वास असो वा नसो, श्रीशिवशाहीच्या उदयापासून तों त्याच्या दुर्दैवी अस्तापर्यंत या पुण्यकारक राष्ट्रीय दिवसानें महाराष्ट्राच्या निसर्गजात मर्दुमकीचें चैतन्य केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, तर सात समुद्र उल्लंघून रूमशाम विलायत चीन जपानपर्यंत सरसहा दीडशें वर्षें अव्याहत थरारून सोडण्याची कामगिरी बजावलेली आहे. हिंदूंच्या सर्व सणांत दसऱ्याचें महत्व कोहीनुराइतकें आहे. यांत आमच्या साम्राज्यजेतृत्वाच्या महत्वाकांक्षेचें बीज धमधमत आहे. आह्मी हिन्दुजन आज घटकेला बाह्यतः कितीही बेकीखोर, राष्ट्रहितपराङ्मुख आणि दास्यप्रिय दिसत असलों, तरी श्रुत्युपनिषदादि दिव्य ग्रंथप्रणित्या आर्यांच्या जगत्साम्राज्याच्या महत्वाकांक्षेचा आत्मा आमच्या अंतर्यामीं अभेदभावानें अझूनहि उसाळ्या मारीत आहे, ही गोष्ट प्रत्येक हिन्दुमात्रानें आपल्या छातीला हात लावून पडताळून घ्यावी. आज

आमच्या या दिव्य आत्म्यावर कुकल्पनेचें आवरण पडल्यामुळें, तो वसुदेव देवकी प्रमाणें बंदीखान्यांत पडला आहे. त्याच्या हातापायांत ग्रंथप्रामाण्याच्या पोलादी बेड्या खळखळत असून, उच्चनीच भेदाच्या खरबडीत प्रावरणांनीं त्याचें सर्वांग सोलवटून निघालें आहे. द्वैताच्या घरटांत आप्तस्वकीयांचें पीठ पाडण्याचें निंद्य कार्य करीत असतांना त्याच्या आंगांतून जातिभेदाचा घाम वरचेवर चिघळत आहे व त्यामुळें सोलवटलेल्या आंगावरच्या जखमा दिवसेंदिवस अधिकाधिक फदफदत आहेत. या सर्व आपपरविघातक दैन्यावस्थेंतून चटकन् मुक्त कसें व्हावें, याचा अचुक गुणकारी मंत्र आमचा दसरा दरसाल कानीं कपाळीं ओरडून जातो. पण तिकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. हा दिव्यमंत्र म्हटला म्हणजे

सीमोल्लंघन करा

हा होय. सीमोल्लंघन हा भूतमात्राचा जन्मसिद्ध हक्क आहे. गर्भावस्थेंतील हालापेष्टा व गुलामगिरीच्या यातना या एकजिनसी असतात. त्या कायमच्या टाळण्यासाठीं सीमोल्लंघन हा एकच उपाय, एकच तोडगा व एकच मंत्र आहे. या मंत्राचा संदेश जगांतल्या यच्चावत् मानवी समाजांना देण्याचें पुण्यकार्य हिन्दूंच्या उपनिषत्कार आर्यपूर्वजांनीं केलेलं आहे. उठा, जागे व्हा आणि भगवंतानीं दिलेले वर प्राप्त करून घ्या. हा मंत्र अभेद भावानें साऱ्या दुनियेला देण्याची उदार कामगिरी आर्यसंघानेंच केलेली आहे. हिन्दुसाम्राज्याचा आद्यसूत्रधार आर्य चाणक्य यानें हीच भावना ' न तु एव आर्यस्य दासभावः ' आर्यजन कदापिहि गुलाम होणार नाहींत, या सूत्रानें साऱ्या जगाला जाहीर करून, त्यांना आर्यसंघांत एकजीव करण्याचा श्रीगणेशा आपल्याला चालून दिला. तत्कालीन् आर्यजनांनीं सीमोल्लंघन करून आर्यधर्माचें, आर्यसंस्कृतीचें आणि आर्यविद्येचें मिशनरी लोण उपलब्ध जगाच्या कानाकोंपऱ्यांत नेऊन भिडविलें आणि सर्व जगाला जगाला सामाजिक धार्मिक औद्योगिक सर्वच बाबतींत आर्यसम्राटाचें जगद्गुरुत्व कबूल करायला लावलें.

विजयादशमीच्या सीमोल्लंघनाचा हा दास्यविमोचक मंत्र वरचेवर मानवजातीला देण्याचें कार्य आमचे संत ऊर्फ राष्ट्रशाहीर करीत आले. या सज्जनांनीं कोणत्याही विरोधी सत्तेचा तिलप्राय मुलाजा न राखतां, सीमोल्लंघनाचा मंत्र बेधडक उच्चारून दाखविला. आर्यजन आपल्या उत्कृष्ट ध्येयापासून च्युत होत असलेले पाहून या संतांचा सज्जन आत्मा कळवळला आणि त्यांनी प्रचलित परिस्थितीचें जबरदस्त तट फोडून सीमोल्लंघन करण्यास इतरांना धैर्य यावें ह्मणून आपल्या सौख्यावर रखरखीत निखारे ठेवण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. त्यांनीं ग्रंथप्रामाण्याची पर्वा ठेविली नाहीं. रूढीपुढें मान वांकविली नाहीं. स्मृतींना फाजील महत्व दिलें नाही. मनुष्यकृत भेदभावांचा दिमाख चालूं दिला नाहीं किंवा परिस्थितीच्या उंचसखलपणामुळे त्याच्या अंतःकरणांत आशेचे वा निराशेचे धक्केहि बसले नाहींत. स्वतः सीमोल्लंघन करणार व इतरांकडून करविणार या त्यांच्या आत्मविश्वासाचा पारा जो एकदां अत्युच्च बिंदूला जाऊन भिडला तो अनंत अत्याचारांच्या, निष्ठुर बहिष्काराच्या किंवा असहननीय निंदेच्या प्रखरतेनें सुद्धां लवमात्र वितळला नाहीं. आमचे हे सीमोल्लंघनी संतकवि म्हणजे एकप्रकारचे नवमतवादी बंडखोरच होत. या बंडखोरांचा आद्यप्रवर्तक ह्मटला ह्मणजे ज्ञानदेव होय आणि -

निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई ।।

एकनाथ नामदेव तुकाराम ।।

ही त्या गुप्तकटांतली मेंबर मंडळी होत. या गुप्तकट्या बंडखोरांना ठेंचण्यास जीर्णमतवादी महात्म्यांनीं

जंग जंग पछाडले, परंतु नवमतवादाच्या नशिबीं अपजयाचें काजळ फांसण्यास ब्रह्मदेवच विसरल्यामुळें, त्या काजळीच्या वारसाचा हक्क सरळ रेषेंत जीर्णमताभिमान्यांच्याच पदरांत पडला; आणि या बंडखोर संतांनीं संघशक्तीच्या जोरावर एकच लगट करून नाना मतें आणि पाखंडें, कर्मठता अति बंडें, त्यांचीं ठेचावीं तोंडें, असा जाहीरनामा घरोघर फडकविला. नवमतवादी संतांची ही उज्वल परंपरा थेट चालूं घटकेपर्यंत एकसहा फोंफावत वाढतच आहे. एकोणीसाव्या शतकांत या नवमताचा अग्रमान महात्मा राजा राममोहन रॉय यांनीं पटकवला आणि त्याचा तडफीचा पुरस्कार सर्व भरतखंडभर करण्याचें पुण्यकार्य केशव चंद्रसेन, बाबु बंकिमचंद्र चतर्जी, श्रीरामकृष्ण परमहंस, रावबहादुर देशमुख (लोकहितवादी), राजारामशास्त्री भागवत, ज्योतिराव फुले, गोपाळराव आगरकर, वामनराव मोडक, जस्टिस रानडे, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, डॉ. भांडारकर, गोपाळ कृष्ण गोखले या महात्म्यांनीं केलें. विसाव्या शतकाच्या उषःकाली हिन्दुजनता केशवसुताच्या तुतारीनें खडबडून जागी होते न होते तोंच Bee चा 'डंका' झडला आणि राष्ट्राच्या कर्तव्याकाशांतून 'तेजाचे तारे तुटले.' आळसाची आत्मघातकी पांघरुणें झुगारून देऊन तरुण महाराष्ट्र 'ही काय भानगड आहे?' म्हणून बाहेर ओसरीवर उठून येतो तोंच -

शुद्ध सत्य हृदयांत धरा, तेजाचा उपदेश करा.
मायामय कारागारा, तोडा मोडा पार करा.
आचारांची प्रौढि नसे, सत्य ठसावें करा असें.
धर्मपताका घ्या हातीं, व्हा केवळ तेजोमूर्ती.
व्हा सगळ्या विश्वा नेते, धर्मतत्व आमुचें हें तें

अशी हात उभारून गंभीर गर्जना करणारा बालकवीचा 'धर्मवीर' प्रसन्न मुद्रेनें पुढें उभा. त्याच्या जोडीला पहातो तों नव्या मनूंतील शूर असा मी नवा शिपाई आहे, कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहे असे म्हणून मिशांवर पीळ देत केशवसुताचा 'नवा शिपाई' ताठ छाती करून उभाच. परंतु नुसतीं तत्वें ऐकून मान डोलवीत बसण्याचा काळ उरलेला नसल्यामुळें, टीचभर आयुष्यांत हिमालयाएवढी कामगिरी करण्याचा राष्ट्रोद्धाराचा तांतडीचा प्रश्न, धर्मवीर व नवा शिपाई यांच्या जोडीनेंच तरुणां पुढें हडसून खडसून मांडण्यासाठीं रूढींचें सीमोल्लंघन हाच समाजाचा दसरा अशी गर्जना करीत 'गोविंदाग्रज' पुढें सरसावला. या पद्यानें आप्तस्वकीयांच्या कठोर निंदेची, विद्वानांच्या उपहासाची, जीर्णमतवाल्यांच्या कोल्हेकुईची किंवा लाळघोट्यांच्या स्तुतिपाठांची बिलकुल पर्वा न करतां, चला रूढिवर आतां घसरा, जुन्या मतांचा जाळा कचरा, श्रुतिस्मृतींना आतां विसरा, कसले पूर्वज घेऊन बसला? हे नवमताचे विचार तरुण महाराष्ट्रापुढें शक्य तितक्या स्पष्ट व खणखणीत भाषेंत मांडले. खरा महाराष्ट्रीय आणि सच्चा कायस्थबच्चा !

कै. बा. गं. टिळकांच्या पश्चात् महाराष्ट्र सांप्रत सच्च्या गुरूच्या कच्च्या चेल्यांनीं गजबजून राहिलें आहे. अशा स्थितींत तरूण महाराष्ट्रानें सीमोल्लंघनाच्या बाबतींत जर कच खाल्ली तर ती महाराष्ट्राच्या नांवाला काळीमा फांसल्याशिवाय रहाणार नाहीं. महाराष्ट्र हा दुभंग होणारा बंगाल नव्हे, एका बोटावरली थुंकी दुसऱ्या बोटावर उडविणारा दुतोंड्या पंजाब नव्हे, न हिन्दुर्न यवनः असा मध्यप्रांत नव्हे, प्रत्येक उगवत्या सूर्याला वंदन करून 'तुम्ही तर फारच तेजस्वी आहांत हो !' असली नाटकी तोंडपुजा करणारा

कर्नाटक नव्हे, किंवा बाहेरून अपटुडेटपणाचा दिमाख मिरवून आंत जीर्णमतांनीं सडून गेलेला मद्रास नव्हे. महाराष्ट्र हा महा-राष्ट्र आहे. त्यानें समाजकारण धर्मकारण राजकारण इत्यादि सर्व कारणांच्या क्षेत्रांत केवळ हिन्दुस्थानाचेंच नव्हें तर साऱ्या जगाचें कर्णधार झालें पाहिजे - आपण तरुणांनीं त्याला कर्णधार केलें पाहिजे. या पुण्यकार्यात जे जे कोणी श्रुतिस्मृतींचे किंवा मेल्या माणसांच्या मृत वचनांचे दाखले देऊन तुमचा तेजोभंग करण्याचा किंवा हेतुविपर्यास करण्याचा प्रयत्न करतील त्यांना बेधडक तुडवित चला.

नेट धरा धीराचा जबरा ।
खुल्या मनाचा अबलक घोडा
जीन नको उप्लाणी सोडा
जेरबंद बा लगाम तोडा
सीमोल्लंघन कालच दसरा ।।
चला निघूं द्या असली स्वारी ।
जुनाट पोकळ नगारखाना
उंटावरला कुणी शहाणा
वाजवितां त्या आधीं हाणा
घ्या कृष्णाची करीं तुतारी ।।

हे नवयुगिन् नवमतवादी राष्ट्रशाहीरांचे कळकळीचे बोल तुमच्या हृदयांत चांगलें भिनूं द्या. धर्माच्या नांवाखालीं अशिक्षित जनतेच्या आदरयुक्त भावनेचा गैरफायदा घेऊन, त्यांना गुलाम बनविणाऱ्या घरच्या चोरांचा प्रथम बंदोबस्त करा. 'धर्म' एवढ्या शब्दोच्चारानेंच तुमच्या कंबरेचे टांके ढिले पडून तुह्मी वाटेल त्या गांवगुंडाच्या भजनीं लागतां आं !

मेल्या धर्माचें हें भूत ।
पाहुनि बसला कां रे भीत
नव्या मताचे भालाईत
घोडे आपुले या उडवीत
ना तरि रडते व्हा राऊत ।।

परंतु ही रडत्या राउताची वीण महाराष्ट्रभूच्या कुसव्यांत आजपर्यंत कधीं थरारली नाहीं व पुढें आचंद्रार्क थरारणार नाहीं. म्हणून अखेरची एवढीच विनवणी कीं -

रूढीच्या किल्ल्यावर स्वारी ।
अगरकरांची झडवा नौबत
भागवतांची धराच हिंमत
केशवचंद्राचें घ्या चिलखत
फुंका कृष्णाचीच तुतारी ।।

□□□

स्फुट विचार

अंबाबाईचा नायटा

नायटा केव्हांहि झाला तरी वाईटच; त्यांतल्या त्यांत अंबाबाईचा नायटा ह्मणे फारच वाईट. कोल्हापुरची इतिहासप्रसिद्ध अंबाबाई अनेक शतकांचा आपला बौद्धपणा टाकून कोल्हापुरी चळवळ्यांच्या चळवळींत आपल्या चिडचिडणाऱ्या नायट्याची चुरचुरीत फोडणी घालण्यासाठीं आतां जागृत झाली आहे. हें अंबाबाईचें देवस्थान मोठें जागृत खरें ! कांहीं दिवसांपूर्वी दोन तीन मराठे जातीच्या मुलांनीं गाभाऱ्यांत जाऊन या जागृत अंबाबाईची भिक्षुकाच्या मध्यस्तीशिवाय पूजा केली. या गोष्टीमुळें भिक्षुक पुजाऱ्यांनीं 'अंबाबाई विटाळली' असा भयंकर कोलाहल केला. मराठा? ब्राह्मणेतर? आणि त्यांच्या पोरांनीं या भिक्षुकशाहीच्या तुरुंगांतल्या शुद्ध अंबाबाईची स्वतः पूजा करून तिला अशुद्ध करावी? कोल्हापुरापासून पुण्यापर्यंत एकच हाहाःकार उडाला. राष्ट्रीय केसरीकारसुद्धां अंबाबाईच्या या विटाळाला 'भयंकर अत्याचार' मानून आपल्या मामुली विवेकभ्रष्टतेच्या हुंदक्यांत मोठमोठ्यानें हेल काढून रडूं लागले. भिक्षुकशाहीच्या कंपूंत एवढ्या जबरदस्त निराशेच्या धरणीकंपाचे धक्के बसूं लागले की ज्या इंग्रज सरकारला त्यांनीं 'सैतानी' ठरविलें आहे, त्यांचे बूट चाटण्यासाठीं भिक्षुकी जिव्हा तारायंत्रांतून भराभर लांबलचक झाल्या. इंग्रज सरकार जर 'अन्यायी, अत्याचारी व सैतानी' आहे तर त्यांच्या गव्हर्नराकडे किंवा रेसिदंट प्रतिनिधीकडे अंबाबाईच्या नायट्याची दाद मागण्यासाठी 'राष्ट्रीय' प्राण्यांनी लगट करावी हा शुद्ध बेशरमपणा असला तरी तो आजपर्यंतच्या त्यांच्या चारित्र्याला साजेशोभेसाच आहे. आह्मांला फार आशा होती कीं या अंबाबाईच्या नायट्याच्या बाबतींत करवीरकर छत्रपति कांहीं मुत्सद्दगिरी दाखवितील. परंतु ज्या मराठा समाजाचे ते 'जन्मसिद्ध' नायक आहेत, ज्या समाजाचा राजकीय सामाजिक व विशेषतः धार्मिक दर्जा उन्नतावस्थेला नेण्याचें कर्तव्यकंकण महाराजांनीं उघडउघड आपल्या हातीं चढविलें आहे आणि ज्यानीं क्षात्रजगद्गुरूच्या एका नवीनच पीठाला निर्माण करण्याची धडाडी व मनोधैर्य प्रत्यक्ष दाखविलें आहे, त्या छत्रपती सरकारनें आपल्या पोलीस खात्याकडे अंबाबाईचा हा नायटा बरा करण्याची कामगिरी सोंपविलेली पाहून फार वाईट वाटतें. वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अनेक पत्रव्यवहारावरून आतां असें समजतें की या कोल्हापुरी पोलीसांनीं नुकतीच तेथील हायस्कुलांतून कांहीं मराठे जातीचे विद्यार्थी अंबाबाईंच्या नायट्याच्या

संशयानें पकडून नेले आहेत. ही गोष्ट जर खरी असेल तर ती अस्पृश्योद्धार करण्याच्या कामीं सक्रीय मनोधैर्य दाखविणाऱ्या छत्रपति सरकारच्या चारित्र्याला कलंकीत करणारी आहे. ही राजनीति नव्हे, समाजनीति नव्हे व धर्मनीति तर नव्हेच नव्हे. मुख्य वादाचा प्रश्न एवढाच कीं अंबाबाई ही हिन्दुधर्माची एक देवता आहे; तिचें देऊळ जैनांनीं बांधलेलें असो नाहीं तर बौद्धांनीं खोदलेलें असो, तें हिन्दु देवतेचें हिन्दु देऊळ आहे. अर्थात् हिन्दु म्हणविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला - मग ती ब्राह्मण असो, क्षत्रिय वैश्य शूद्र असो, ब्राह्मणेतर किंवा ब्राह्मणेतरेतर असो - त्या देवतेची पूजा अर्चा स्वतः करण्याचा अधिकार आहे. हा अधिकार ज्या देवळांत मान्य केला जात नाहीं, जेथले देव व देवता या भिक्षुकी जेलरांच्या तुरुंगवासांत खितपत पडल्या आहेत, ज्यांचें पूजन मराठ्यांसारख्या उच्चवर्णीय क्षत्रीयांसहि करतां येत नाहीं, जेथें दुराग्रही जातिभेद नाठाळ पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें महाद्वारावर ब्राह्मणेतरांवर बेगुमानपणें तुटून पडत आहे, असल्या देवळांना पवित्र धार्मिक स्थानें समजण्यापेक्षां उनाडटप्पूंचे पांजरापोळ मानायला कांहीं हरकत नाहीं; आणि असल्या या भिक्षुकी तुरुंगांत पडलेल्या देवांना व देवतांना सडकेवरच्या मैलफलांग दर्शक दगड धोंड्यांपेक्षां फाजील महत्वहि कोणी देऊं नये. ज्या अंबाबाईला भिक्षुकांची कैद झुगारून देतां येत नाहीं, ती अंबाबाई आम्हां दीन दुबळ्यांचे भवपाश तोडणार ती काय ! ही शोचनीय दुःस्थिति पाहिली म्हणजे हिन्दु देवळें जमीनदोस्त करणारे अफझुलखान औरंगझेब एके प्रकारानें मोठे पुण्यात्मे होऊन गेले असें वाटूं लागतें.

एक अनुकरणीय उदाहरण

स्वतः उद्धरोनी जगा उद्धरावें, हा जो प्रबोधनाचा ध्येयमंत्र आहे, त्याला अनुसरूनच 'समाजसेवा हीच ईशसेवा' या दृष्टीनें आपला प्रपंच नीटनेटका करून परमार्थाचा विवेक पाहणारीं जीं अनेक स्त्री पुरुषें आहेत, त्यांतच आमच्या भगिनी सौ. सरस्वतिबाई मोरेश्वर दोंदे यांची गणना होते. एक निश्चित कार्य पुढें ठेऊन तत्प्रित्यर्थ कायावाचामनें झटणारी मंडळी विरळा; परंतु पति आणि पत्नि या दोघांनीहि स्वार्थत्यागपूर्वक एखाद्या कार्यास, गाजाबाजा न करितां, वाहून घेतल्याचीं उदाहरणें केव्हांहि कौतुकास्पदच होते. श्री. मोरेश्वर दोंदे बी. ए. यांनीं आधीच आपणांस शिक्षणकार्यास वाहून घेऊन, गोखले एज्युकेशन सोसायटींत अत्यंत अल्प वेतनावर शिक्षणदानाचें कार्य चालविलें आहे. त्यांच्या सुशील पत्नी सौ. सरस्वतिबाई विनावेतन मुंबईच्या गिरणी कामगारांच्या बायकांत साक्षरतेचा प्रसार करण्यासाठीं झटत असतात. मुंबईच्या या हीन दीन देशबंधुभगिनींच्या उन्नतिसाठीं सोशल सर्विस लीगनें निरनिराळ्या भागांत सेंटर्स उघडले असून त्यांत अल्प वेतनावर व विनावेतन अनेक स्वार्थत्यागी तरुण काम करीत असतात. मोठ्या आनंदाची गोष्ट कीं, आमच्या बऱ्याच चां. का. प्रभु तरुणांनी या खऱ्याखुऱ्या देशसेवेला आपणांस वाहून घेतलें आहे. आमच्या भगिनी सरस्वतिबाई दोंदे या गिरणींतील बायकांस शिक्षण देऊन, शिवाय त्यांच्या घरोघर फिरून त्यांना आरोग्यरक्षण, बालसंगोपन इत्यादि अनेक महत्वाच्या गोष्टीचें ज्ञान करून देत असतात. हा त्यांचा क्रम आज बरेच दिवस अखंड

चालूं असून त्याचा त्यांनीं कधींहि उच्चार केला नाहीं. खऱ्या राष्ट्रकार्याचें मर्म येथेंच असतें. सौ. सरस्वतीबाईंचें उदाहरण आमच्या सर्व हिंदु भगिनींनीं अवश्य अनुकरण करण्यासारखें आहे. ज्ञानासारखें साऱ्या जगाला पावन करणारें दुसरें अमृत नाहीं. तें अमृत सरस्वतीच देत आहे. इतर अन्नपूर्णा भगिनीनीं या अमृताच्या प्राशनानें स्वयें उद्धरोनी जगा उद्धरण्याची लगबग करावी.

ही पहा हिन्दु मुसलमानांची एकी

मोपल्यांच्या अराजक बंडांत जीं अनेक अत्याचारीं कृत्यें घडून आलीं, तीं आतां आस्ते आस्ते उजेडांत येत आहेत. तीं ऐकून शांतताप्रिय जनतेला तर त्वेष येईलच येईल, पण म. गांधीच्या सात्विक नेतृत्वाखाली स्वधर्मीयांचे कांही विशिष्ट राजकीय उद्देश पार पाडण्याच्या गुप्त उद्देशानें अनत्याचारित्वाचें निशाण फडकविणाऱ्या आमच्या हिंदी इस्लाम बांधवांनीं शरमेनें खालींच मान घातली पाहिजे. मोपल्यांनीं बळजबरीनें अनेक हिंदु कुटुंबांना मुसलमानी धर्माची दीक्षा देण्याचा जो राष्ट्रघातकी अत्याचार केला, त्यावर आधीं कोणाचा विश्वासच बसे ना. प्रत्येक शहाणा असें ठांसून प्रतिपादूं लागला कीं असहकारद्वेष्ट्यांनीं ही नुसती हूल उठविली आहे. नंतर या हुलीचें स्थित्यंतर 'फार कांहीं बाटवाबाटव झाली नाहीं, तीन लोक बाटविले व तेही स्वखुषीनें' येथपर्यंत आलें. पुढें तीन आंकड्याचें तीन तेरा होऊन तेरा सक अठ्याहत्तर जबरीचीं उदाहरणें झाल्याचें एका अधिकारी मुसलमान पुढाऱ्यानें अल्लाकी कसम खाऊन भीतभीत कबूल केलें. म. गांधी शाब्दिक निषेध करून स्वस्थ बसले व इतर मुसलमान पुढारी 'मूर्ख कुठचे मोपले ! त्यांनीं असें करायला नको होतं. पण आमच्या शांतिपूर्ण असहकारवादाचा दिव्य संदेश त्यांच्यापर्यंत पोहचविण्याचा सरकारनेंच आम्हांला प्रतिरोध केला. आम्ही काय करणार?' असे उद्गार काढून गप्प राहिले. आतां जी माहिती उपलब्ध होत आहे त्यावरून ही बळजबरीच्या बाटवाबाटवीची वावटळ शेंकड्यांनीं उड्या मारीत गेली असें स्पष्ट सिद्ध होत आहे. या अनिष्ट प्रकारामुळें हिन्दु मुसलमानांच्या ऐक्याचा जो डांगोरा पिटला गेला होता, तो फोलकट व कृत्रिम असल्याचें आतां अत्यंत स्पष्ट रीतीनें सिद्ध होत आहे. हिन्दूंच्या बौद्धिक सामर्थ्याचा आपल्या दणकट शरीसामर्थ्याशीं मिलाफ करून घेऊन, या संयुक्त शक्तीच्या जोरावर, स्वराज्याच्या नांवाखालीं खिलाफतीचें भिजकें कांबळें वाळविण्याची हिन्दी मुसलमान बांधवांनीं जी खटपट चालविली होती - व सध्यां आहेहि-त्या हिन्दु-मुसलमान-ऐक्याचा भोंपळा मोपला लोक इतक्या लवकर फोडतील, अशी मात्र कोणाचीच कल्पना नव्हती. मोपल्यांचें हें हिन्दुधर्माविरुद्ध बंड त्यांच्या धर्मकल्पनेला विसंगत नसल्यामुळें, त्यांना दोष देण्यांत अर्थ नाहीं. जगांतील मिशनरी धर्मीच्या इतिहासांत इस्लामी धर्म अत्यंत कडवा. परंतु कडूं कारलें साखरेंत घोळलें आणि तुपांत तळलें तरी अखेर त्याचा कडवेपणा कधीं जात नाहीं, एवढी जाणीव सुद्धां गांधीसारख्या महात्म्यास ऐनवेळीं सोडून जावी, हें हिन्दु धर्माचें व हिन्दुसंस्कृतीचें खडतर दुर्दैव म्हटलें पाहिजे. राष्ट्रहिताच्या दृष्टीनें हिन्दु-मुसलमानांची एकी हा कितीहि कल्पनारम्य विषय असला तरी तात्पुरत्या कार्यसौकर्याकडे लक्ष पुरवून

विळ्या भोपळ्याचें एक गांठोडें बांधण्यांत विळ्या भोपळ्याचें परस्पर कोटकल्याण कोणच्या अनर्थांत होतें, याचें प्रत्यंतर मोपल्यांच्या बंडावरून खासें घेतां येण्यासारखें आहे. महात्मा गांधी हे उच्च दर्जाचे तपस्वी आहेत. त्यांचा 'आत्मवत् सर्व भूतेषु' बाणा अत्यंत स्तुत्यर्ह व स्पृहणीय आहे. परंतु या त्यांच्या दैवी प्रवृत्तीचा परिणाम असुरी मायेंत भिजून चिंब झालेल्या त्यांच्या इस्लाम दोस्तांवर मुळींच झाला नाहीं, हें खुद्द अल्लीबंधूंच्या कराची कोर्टातील उर्मट वाणीनें व खुनशी वर्तनानेंच सिद्ध होतें. सर्प विंचू नारायण परि वंदावे दुरून. परंतु गांधी आपल्या सात्विक भावनेच्या शुद्ध दुर्बिणींतून सारें जग पहात असल्यामुळें, तें त्यांना आपल्याप्रमाणेंच सत्वगुणानें थबथबलेलें दिसल्यास नवल नाहीं. दुर्दैव या हिन्दु राष्ट्राचें कीं महात्मा गांधीसारख्या परमहंसाच्या हातीं खट्याळ राजकारणाचीं कोडीं सोडविण्याचें कार्य येऊन पडावें !

मलबारांत मोपले व महाराष्ट्रांत टोपले

मलबारांत शेंकडों हिन्दु कुटुंबें मोपल्यांच्या अत्याचारास बळी पडली. त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर इस्लामधर्माच्यां दीक्षेची बळजबरी करण्यांत आली. याकूब हुसेन सारखे समधात मुसलमानभाई म्हणतात कीं असले बळजबरीनें बाटविलेले लोक महंमदानुयायी मुलसमान होत नाहीत व आमचे वर्णाश्रमवादी म्हणतात कीं ते बाटले, फुकट गेले, जिवंत असून मेले, ते हिन्दु नव्हते. पुराणकाळीं त्रिशंकूवर असलाच कांहींतरी प्रसंग आल्यामुळें बेटा मध्यंतरी लोंबकळत पडला नसेल ना? न हिन्दु र्न यवनः ही म्हण आजपर्यंत सुभाषितांत वाचीत होतों, पण तिचें अक्षरशः प्रत्यंतर या पुण्यश्लोक मोपल्यांनीं दाखविलें खरें ! मोपल्यांनीं हिन्दुजनांवर इस्लाम धर्माची बळजबरी तर केलीच केली, पण हिन्दु स्त्रियांवरहि प्राणघातक बलात्कार केल्याचें वृत्तपत्रांवरून समजतें. या गोष्टींत वास्तविक म्हटलें तर चमत्कारीक असें कांहीं नाहीं. मुसलमांनी रियासतींची ही पुनरावृत्ति आहे. हिन्दूंच्या धर्मांतराच्या इतिहासांत मुसलमानांची बळबजरी व क्रिस्त्यांची गुळचट फसवेगिरी, या दोन गोष्टी अबाधित सिद्धांताप्रमाणें ठळक दिसतात. मलबारांत मोपले आज उपटले, पण महाराष्ट्रांतले बाटे हिन्दु उर्फ क्रिस्ती टोपले आज कित्येक वर्षे हाच धंदा करीत आहेत. फरक एवढाच की मोपल्यांचें होत आहे उघड उघड बंड आणि या बाट्या टोपल्यांचा सारा कारभार गुपचूप व थंडाथंड !

डॉ. कुर्तकोटी बोलले

हिन्दु टोपल्यांच्या गुपचूप बंडावर बिनतोड तोडगा प्रथम उत्तर हिन्दुस्थानांत पूज्यपाद महर्षि श्री दयानंद सरस्वति यांनीं चढवला. त्यानंतर अगदीं अलीकडे महाराष्ट्रांत त्याचा छातीठोक प्रयोग आद्य हिन्दुमिशनरी गजाननराव भास्कर वैद्य यांनीं चालूं केला. हिन्दु मिशनरी सोसायटीच्या स्थापनेच्या

दिवशीं डॉ. कुर्तकोटींचा 'पूर्ण सहानुभूती'चा विद्युत्संदेश येऊन थडकला. त्यावरून त्यांना महाराष्ट्रीय काळ्यागोऱ्या टोपल्यांच्या कायदेशीर अनत्याचारी बंडाविषयीं पूर्ण खात्री पटली होती. पण पुढे डॉक्टर शंकराचार्यांच्या गादीला रामराम ठोंकून बाहेर पडल्यावर त्यांना पुण्याचें वारें लागलें आणि ते 'तत्व मान्य पण तपशील अमान्य' या खुळचट 'राष्ट्रीय' बाण्याला बळी पडले. स्वामी जरी काळाच्या ओघाबरोबर पाऊल टांकण्यास नाखूष असले तरी काळाला त्यांची काय पर्वा ! तो झपाट्यानें पुढें पुढें चाललाच आहे. स्वामी जरी मनु याज्ञवल्क्य देवलादि स्मृत्यांच्या कैदखान्यांत खितपत पडले असले, तरी काळानें त्या केव्हांच लाथाडून झुगारल्या आहेत. याच काळाच्या उदरांतून मोपल्यांचें बंड जन्माला आलें. त्याच्या अत्याचारानें स्वामींचें हृदय किंचित् कळवळलें, हा देखील त्या काळाचाच प्रताप. नागपुरास भरलेल्या एका सभेंत स्वामीनीं ह्या पतितपरावर्तनाविषयीं आपलें मत स्पष्ट सांगितलें कीं या मलबारस्थ हिन्दु भगिनी बांधवांना खुशाल हिन्दु धर्मात परत घ्यावें. नुसते धर्मातच नव्हे तर त्यांच्या जातींतहि परत घ्यावें. या तिकडील धर्मगुरु जर कांहीं हालचाल करणार नाहींत तर स्वामी स्वतः तिकडे जाऊन हें महत्कार्य करणार आहेत. ही तर हिन्दु मिशनरीवर ताण होऊं पहात आहे ! आंधळा मागतो एक डोळा, तर देव त्याला दोन देऊन आणखी कपाळावर एक तिसरा देतो, यांतलीच ही सारी काळाची करणी !! हिन्दुमिशनरी सोसायटी परावर्तनी जीवाला फक्त 'धर्म' देते, पण आमचे स्वामी धर्म देऊन वर आणखी जातहि देतात. ठीक आहे. आनंद आहे. एवढें झालें तरी अखेर एक गोम राहिलीच. स्वामींनीं हा निर्णय देवलस्मृतीच्या आधारानें दिला. अझूनसुद्धां हें मानसिक गुलामगिरीचें भूत स्वामीना हांकलतां येत नाहीं. अझूनसुद्धां श्रुतिस्मृतीच्या तोंडाकडे पहाण्याचें दास्य यांना झुगारतां येत नाही; आणि हे स्वतःला स्वामी म्हणवितात. स्वामी कोणाला म्हणावें? जो दास नाही तोच स्वामी. डॉ. कुर्तकोटी तर मृत स्मृत्यांचे बंदे गुलाम ! हे कसले स्वामी? ते जर स्मृत्यांची थडगीच उकरीत बसतील तर सारा जन्मच त्यांत जायचा. मग धर्मोन्नति केव्हां करणार आणि जगदुद्धारानें आपले जगद्गुरुत्व कसें सार्थ करणार ! आमची डॉ. कुर्तकोटींना विनंति आहे कीं मृत स्मृत्यांचीं आंतडी धुण्याचें हें ओंगळ कार्य टाकून देऊन, नवयुगाची नवीन कुर्तकोटीस्मृति लिहिण्याचें नैतिक धैर्य दाखवा. आमचे डॉक्टर प्राचीन मनु देवलापेक्षां खात्रीनें हिणकस नाहींत. देवलाचार्यांना दोन डोळे होते, डॉ. कुर्तकोटी आचार्यांना काय एकच आहे? देवल मनुष्य कुर्तकोटी पण मनुष्यच. डॉ. कुर्तकोटी मनावरच घेतली तर हिन्दु धर्माचें पांग फेडतील. परंतु आतां या पतितपरावर्तनाच्या प्रश्नांत ते जी धडाडी दाखवितील, त्यावरच त्यांच्या भावी संन्यासी ऐश्वर्याची सारी भवितव्यता अवलंबून आहे. येथें त्यांनीं कच खाल्ली रे खाल्ली कीं स्वामींचा अवतार संपलाच मानायला कांहीं हरकत नाहीं.

अखिल भारतीय कायस्थ परिषद

फरुक्काबाद येथें ११ ऑक्टोबर रोजीं अखिल भारतीय कायस्थ परिषदेचें अधिवेशन मोठ्या थाटानें पार पडलें. अध्यक्ष श्री. मुनशी नारायण प्रसाद M. L. C. यांच्या भाषणांतले कांहीं ठळक मुद्दे

विचारार्ह आहेत. अध्यक्ष म्हणाले ''कायस्थांच्या जात्युन्नतीचा प्रश्न इतर हिंदु समाजापासून विभक्त करण्याचें धोरण आत्मघातकी आहे. हिन्दु समाजाच्या पुनर्घटनेंत समरस झाल्यानेंच कायस्थ संघाची उन्नति होईल. इतर जातीशीं फटकून वागण्यांत अर्थ नाहीं. राष्ट्रसेवा हाच कायस्थांचा गुणधर्म किंवा कुळधर्म आहे. आणि या दृष्टीनें पाहिलें तर आज आपल्या कायस्थ संघांत लॉर्ड सिंहासारखें गव्हर्नर, सर जगदीश चंद्र बोससारखे शास्त्रज्ञ चमकत आहेत, ही मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे.'' मि. सच्चिदानंद सिंह बिहारचे एक्झिक्युटीव कौथ्न्सलर नेमल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें. अध्यक्षानीं मिश्रविवाहाचा कळकळीनें पुरस्कार करून, राक्षसी हुंडा पद्धतीचा त्वेषानें तिरस्कार केला. अखेर, सरकारशीं व इतर हिंदी समाजांशीं सहकारानें वागून, आधुनीक काळांतल्या विद्या व शास्त्रें यांत पारंगत होऊन कायस्थांच्या पिढीजात बुद्धिवैभवाचें तेज वृद्धिंगत करण्याबद्दल त्यांनीं तरुण कायस्थांची विनवणी केली. महाराष्ट्रीय कायस्थांपैकीं कोणी प्रतिनिधी या वार्षिक अधिवेशनाला पाठविण्याची बुद्धि कधिंकाळीं जागृत होईल काय? एकलकोंड्या सोंवळेपणाची कैद आजवर भोगली तितकी पुरे झाली. आतां काळाकडे नजर देऊन उदासीन सुतकी बाणा लाथाडून थोडें सीमोल्लंघन करा.

हिन्दु भगिनींची जागृति

नुकतीच कराचीला सामाजिक सुधारणा परिषद भरली होती, त्यावेळीं सौ. सरस्वति देवी नांवाच्या एका विदुषीनें जें व्याख्यान दिलें, त्याचा गोषवारा येथें देत आहों. त्यावरून हिन्दु राष्ट्रांत खऱ्या राष्ट्रीय विचारांची दिशा दाखविणारी शक्ति एक वर्षांत मिळणाऱ्या स्वराज्याच्या धांगडधिंग्याखालीं अगदींच कांहीं हद्दपार झाली नाहीं, एवढें व्यक्त होतें. सौ. सरस्वति देवी म्हणाल्या ''माझ्या पूर्वीच्या दोन वक्त्यांनीं स्त्रियांना मुळींच शिक्षण देऊं नये म्हणून केलेलें प्रतिपादन खरोखरच विलक्षण होय. स्त्रिया शिक्षणसंपन्न झाल्या तर त्यांचा डामडौल वाढून त्या खर्चीक ऊर्फ उधळ्या बनतील, हा त्यांचा आरोप प्रत्यक्ष परिस्थितीशीं ताडून पाहिल्यास अज्जीबात खोटा ठरतो. अपवाद ह्मणजे सामान्य नियम नव्हेत! हा उधळेपणाचा आरोप खराच मानला तर त्याची जबाबदारी बायकांपेक्षां पुरुषांच्याच माथीं पडेल. स्त्रीशिक्षणाविरुद्ध बोलणारांचा पूर्वी एक काळ होता; पण आता तो मनु उरलेला नाही. बायकांना रखेल्या किंवा गुलामांप्रमाणे चालत्या बोलत्या जंगम मिळकती मानण्याचा पूर्वी संप्रदाय होता; पण बायकांत आत्माजागृति उत्पन्न होऊन त्या आपले माणुसकीचे हक्क मागण्या इतक्या धीट होऊं लागतांच, या संप्रदायीकांचे डोळे खाडकन् उघडले. पण पुरुषांनीं आपण होऊन कांहीं बायकांची गुलामगिरी नष्ट करण्याचें पुण्य संपादन केलें नाहीं ! तुह्मीं आतां मोठमोठ्यानें 'स्वराज्य पाहिजे, स्वराज्य पाहिजे' म्हणून हांकाट्या मारीत आहांत; पण लक्षांत ठेवा जोंपर्यंत आह्मीं स्त्रिया-हिन्दुस्थानांतली अर्धीअधिक लोकसंख्या-शारिरीक व मानसीक दास्यांत खितपत पडलों आहों, तोपर्यंत तुह्मांला स्वराज्य मिळणें शक्य आहे काय? मोठमोठे वीर, राष्ट्रभक्त आणि सद्गुणी शूर पुत्रकन्या प्रत्यक्ष शिक्षणानें निर्माण करण्याचें कार्य आम्हां स्त्रियांच्याच हातीं असतें. परंतु जेथें माताच आपल्या घरोघरीं तुरुंगांत पडल्या

आहेत, आणि शूर केवढ्या म्हणाल तर मांजरानें म्यौं केलें तर भेदरून जाणाऱ्या, अशा स्त्रियांच्या पोटीं उत्तम शूर नागरीक निर्माण होण्याची आशा बाळकणें मूर्खपणाचें आहे. हिंदुस्थानांतल्या स्त्रिया जर शिक्षित असत्या तर हिंदुस्थानाची अवनति कधींच झाली नसती. तुम्हां पुरुषांना दरसाल कॉन्फरन्स भरवितां येते, परंतु मुलींना उत्कृष्ट प्रकारचें सांगोपांग शिक्षण देणारी शाळा मात्र उघडतां येत नाहीं. हिन्दु स्त्रियांवर पुरुषांनी लादलेल्या बंदीवासामुळें हिन्दुस्थानांत कोठें काय चाललें आहे, त्याची त्यांना दादसुद्धां नसते. मुलींना शारिरीक व्यायाम शिक्षण देणारी एक तरी शाळा कुठें आहे कां? व्रतें वैकल्याचें शिक्षण घेऊन स्त्रीधर्म पार पाडण्याचा तो जुना मनु सीतेच्या काळाला शोभला; पण आतां तो काळ उरला नाहीं. आतां स्त्रियांना उदार शिक्षण मुबलक मिळून त्यांची पुरुषांच्या तोडीनेंच आत्मिक मानसिक बौद्धिक व शारिरीक परिणति केल्याशिवाय तुम्हांला गत्यंतरच उरलेलें नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेवा. आतां मी कराचीच्या अवनत (डिप्रेस्ट) बांधवांकडे वळते. फिजी बेटांतल्या हिंदी मजुरांच्या छळाबद्दल तुमची एवढी मोठी हांकाटी निरंतर चालते. परंतु तसलाच किंबहुना त्यापेक्षां अधिक छळ तुम्ही हिन्दु लोक येथल्या अवनत बांधवांवर करण्यास मात्र मुळींच दिक्कत बाळगीत नाहीं. धन्य तुमच्या न्यायप्रियतेची आणि मनोवृत्तीच्या समतेची ! या कराचींतल्या रयतेवर परकीयांकडून होणारा छळ पाहिला, तर स्वतः हिंदी लोकांचा हिंदी लोकांकडून होणारा छळ शतपट अधिक निंद्य आहे.'' स्वदेशाभिमानी सज्जनांनीं सौ. सरस्वति देवीच्या उद्‌गारांचें अवश्य मनन करावें. स्त्रियांच्या व्यायामशिक्षणाबद्दल स्वतंत्र संस्था काढण्याचा आद्यमान बडोद्याचे सन्मानीय बंधु प्रो. माणिकराव व भगिनी सौ. दिघे यांनीं मिळविला आहे. ही गोष्ट ऐकून देवी सरस्वती बाईंना आनंद होईल.

कायस्थजन आणि राजकारण

कायस्थप्रभूंच्या विद्यमान चारित्र्याचें बारकाईनें पर्यालोचन केलें तर कोणताहि सत्यवादी निस्पृहपणानें हाच निर्णय काढील कीं उंदरांची पिल्लें खिळ्यांशीं खेळ न खेळण्यांत जितका शहाणपणा दाखवितात, तितकाच व तेवढाच शहाणपणा कायस्थजन राजकारणाला अस्पृश्य मानण्यांत गेलीं ५० वर्षे दाखवीत आले आहेत. राजकारण अस्पृश्य आहे कीं कायस्थच अस्पृश्य आहेत, हा प्रश्न आतां जवळ जवळ सुटल्या सारखाच आहे. तथापि कायस्थांनीं राजकारणाचा विटाळ मानणें, आणि ब्राह्मणांनी व क्षत्रियांनी अनुक्रमें ब्रह्मविद्येचा व क्षत्रियकर्माचा हव्यास सोडणें, हे प्रकार सारखेच निंद्य होत. सध्यां कायस्थांपैकीं राजकारणाच्या क्षेत्रांत एक दोन, फार झाले तर अर्धा डझन, लोक वावरत असले, म्हणजे सारा कायस्थसमाज राजकारणांत आहेच, असलें चकारींचें विधान करतां यावयाचें नाहीं. या अत्यल्पसंख्य राजकारणी कायस्थांना जमेंत धरून आम्ही असें छातीठोक विधान करतों कीं कायस्थसमाजानें आपला राजकारणीपणा म्हणजेच कायस्थबाणा आज सफाई हातचा दवडीला आहे. कायस्थ या नांवाचा इतिहासच असा आहे की त्यांत जर राजकारणाचा आत्मा नसेल, राष्ट्रसेवेची तळमळ नसेल, स्पष्टोक्तीचा तडफ नसेल, सत्याचा प्रज्वलीत अभिमान नसेल, जीर्णमताची

चिळस नसेल, नवमताची चाड नसेल, नवयुगांतलें नवमत निर्माण करून त्याला देशाच्या सर्वांगीण सुधारणेच्या निरनिराळ्या कालव्यांत त्याचे पाट सोडण्याची हिम्मत नसेल, तर 'कायस्थ' हा शब्द शब्दकोशांतून व लोकव्यवहारांतून अज्जिबात काढून टाकण्यांतच त्या उज्वल कीर्तीच्या शब्दाच्या इतिहासाची अब्रु बचाविल्यासारखें होईल. पूर्वीच्या अंधाऱ्या युगांतला इतिहास बाद केला आणि श्रीशिवछत्रपतींच्या महाराष्ट्र साम्राज्याच्या उषःकालापासून तों प्रभु रंगो बापूजींचें हिन्दवी स्वराज्याचें पहिलें डेप्युटेशन विलायतेस जाईपर्यंत, राष्ट्राच्या राजकारणांत कायस्थच अग्रेसर होते. सूत्ररूपांत सांगायचें तर महाराष्ट्राचीं राजकारणी कोडीं सोडविण्यासाठींच कायस्थसमाजाला राष्ट्रानें वेळोवेळीं हांक मारलेली आहे. राष्ट्राच्या राजकारणाच्या धमन्यांतून शुद्ध स्वदेशाभिमानाचें ताजें तापट रक्त सणाणत सळसळविण्याचें कार्य जर कायस्थ करणार नाहींत, तर त्यांनीं याउपर आपल्या कायस्थ उपाधीला जाहीर मूठमाती देण्याचें धारिष्ट तरी दाखवावें. प्रत्येक उगवत्या सूर्याला लोटांगणें घातलीं, सरकारी नोकऱ्यांचीं सर्व खातीं कायस्थ कारकुंड्यांनी गजबजून सोडलीं, कांहीं पांचपंचवीस मुखदुर्बळ एलेल्बींनी सबजज्जांच्या जागा पटकविल्या, शंभर दीडशयांनीं ठिकठिकाणचे वकीलांचे बार भरले, आणि सात आठांनीं कांहीं स्वदेशी संस्थानांतून स्टेटकारभाऱ्यांच्या खुर्च्या खतविल्या, म्हणजे कायस्थ बाण्याची सार्थकता होत नाहीं. हीं कामें इतर लोकसुद्धां कायस्थांपेक्षां अधिक वरचढ बुद्धिमत्तेनें करीत आहेत. मग कायस्थांचा कायस्थपणा विशेष तो काय? बरें, इतकी स्थिति असूनसुद्धां राजकारणाचें नांव निघतांच 'छे छे छे छे, ही भानगड आम्हांला नको !' असे उद्गार काढण्यांत पुढारी म्हणविणाऱ्या मोठमोठ्या बृहस्पतींची आपापल्या पगड्या व उपरणी झाडण्यापर्यंत पाळी यावी, या नामर्दपणाचा व कायस्थ शब्दाच्या शुद्ध राजकारणी इतिहासाचा कसा काय मेळ घालायचा, याचें उत्तर राजकारणद्वेष्टे कायस्थ पुढाऱ्यांनी अवश्य द्यावें, असें आम्ही त्यांना जाहीर आव्हान देतों. गेल्या १०० वर्षे राजकारणाच्या शोचनीय व निंद्य उदासीनतेनें कायस्थांच्या राजकारणी बुद्धिमत्तेचे अंकूर जाळून कायस्थ समाजाला खर्डेघाशा हमालांची वखार बनविण्यांत कायस्थपुढाऱ्यांनी अक्षम्य असा समाजद्रोह व राष्ट्रद्रोह केलेला आहे. कायस्थबाण्याचा राजकारणी आत्माच या पुढारीब्रुवांनीं चिरडल्यामुळें, प्रचलीत नवयुगांत कायस्थतरुणांचा पदोपदीं तेजोभंग होत आहे आणि राजकारणाच्या क्षेत्रांत अवश्य लागणारा शीला (Character) चा दणकटपणा त्यांच्या नसांतून नष्ट केल्यामुळें त्यांचा हरघडी असहननीय अपमान होत आहे. या तेजोभंगांतून व अपमानांतून निघणारे तामसी त्वेषाचे शाप मृत पुढाऱ्यांच्या आत्म्यांना आंच देऊं शकतील कीं नाहीं, हें कांहीं आम्हांला सांगवत नाहीं; परंतु जुन्या घडणीच्या नवमतविद्वेषी विद्यमान् पुढाऱ्यांना मात्र - त्यांनी नवयुगानुसार आपल्या वर्तनांत फरक केला नाहीं तर - दिवसाढवळ्या खाक करायला सोडणार नाहींत ! हा अतिप्रसंग येऊं नये अशी आमची इच्छा आहे. पदव्यांच्या श्रीमंतीच्या किंवा सरकारदरबारी अधिकाराच्या जोरावर पुढारपण मिरविणाऱ्या निःसत्व कायस्थाचा महत्वाकांक्षी तरुणांकडून अपमान होऊं नये, अशी आमची फार इच्छा आहे. म्हणून राजकारणाच्या क्षेत्रांत अस्सल कायस्थाच्या बाण्यानें कार्य करणाऱ्या समर्थ गुप्ते कोतवाल प्रभृतीनीं लवकरच एक 'कायस्थ प्रभु पोलीटिकल लीग' स्थापन करून कायस्थतरुणांच्या फोंफावणाऱ्या राजकीय आकांक्षाना योग्य तें वळण व शिक्षण देण्याची तजवीज करावी व या समाजाचा राजकीय दृष्ट्या झालेला अधःपात वेळींच सांवरून धरावा, अशी कायस्थ तरुणांच्या वतीनें प्रबोधनाची प्रार्थना आहे. कायस्थ राजकारणी नसेल तर तो कायस्थच नव्हे !

माझा तो बाब्या आणि लोकाचा कारटा

मोपल्यांच्या अत्याचारांमुळें देशोधडीस लागलेल्या असहाय लोकांची दुर्दशा स्वतः पाहण्यासाठी सुप्रसिद्ध जनसेवक सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे अध्वर्यु श्री. गोपाळराव देवधर हे नुकतेच मलबारांत जाऊन परत आले. एकंदर हाल अपेष्टांचें त्यांनीं दिलेलें वर्णन वाचून हृदय शाबूत असलेल्या कोणाहि मनुष्याला तेथील दुःखद परिस्थितीची तंतोतंत कल्पना आल्याशिवाय राहणार नाहीं. सर्व हिंदवासीयांनीं या मलबारस्थ दुर्दैवी बांधवांच्या सहाय्यार्थ दहा लाख रुपयांपर्यंत सांपत्तिक मदत करावी अशी श्री. देवधरांनीं कळवळ्यानें सर्व राष्ट्राची याचना केली आहे आणि ही याचना सर्व हिंदी व आंग्ल नियतकालीकांनीं जाहीर करण्याचें कार्य जोरानें चालविलें आहे. हा प्रश्न शुद्ध भूतदयेचा आहे. यांत परोपकाराशिवाय व अंतःकरणाच्या शुद्ध तळमळीशिवाय कोणतीहि अन्य भावना नाहीं. इतकें असून सुद्धां या कार्यात कै. गोखल्यांच्या सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटींतल्या श्री. देवधरांनी - लॉर्ड विलिंग्डनादि गव्हर्नरांशी सहकार्यानें वागणाऱ्या देवधरांनीं - पुढाकार घेतल्यामुळें त्यांच्या या प्रस्तुतच्या निवळ भूतदेयच्या कार्यावर विपर्यासाची काजळी ओतण्याचें नीच कार्य करण्यासाठीं कांहीं नॅशनेलिस्ट ह्मणविणाऱ्या मंडळींनीं पुढें यावें, ही गोष्ट कोणाहि स्वदेशाभिमान्याचें अंतः करण व्याकूळ करण्यासारखीच आहे. आजपर्यंत कै. गोखल्यांच्या सोसायटीनें असलीं राष्ट्रकार्यें अनेक केलीं आहेत; किंबहुना हीं कार्यें करण्यासाठींच या सोसायटीचा जन्म झालेला आहे. परंतु आजपर्यंत या सोसायटींत फंडगुंडांचे बण्ड झाल्याचा दाखला नाहीं; अगर आह्मी अमूक केलें आणि अमूक केलें अशी चव्हाट्यावर ढोलकें घेऊन कधिं तिनें आत्मस्तोमाचे तमाशे माजविले नाहींत. राजकीय बाबतींत या सोसायटीचीं मतें प्रचलित वातावरणाशीं कदाचित् अन्योन्यसंवादी नसतील. परंतु एवढ्याच कारणामुळें सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी व तिच्या छत्राखालीं प्रामाणिकपणानें सार्वजनिक हिताचीं कार्यें करणारी मंडळीं हीं 'कवडी मोल' कशीं ठरतात, हें कोणी समाजवून सांगावें. श्री. देवधर हे विलिंग्डनचे 'डियर फ्रेंड' आहेत, ते राजकर्त्याशीं सहकारानें वागणारे आहेत, त्यांच्यावर भरंवसा आहे, एवढ्याचमुळें त्यांच्या किंवा त्यांच्या सोसायटीच्या हातून देशसेवेची राष्ट्रकार्यें घडणेंच शक्य नाहीं, असलें विधान करणें हें 'नॅशनॅलिस्ट ह्मणविणाऱ्या प्राण्यांना मुळींच शोभत नाहीं. देवधरांना मल्याळी भाषा येत नाहीं, मग मलबारांत त्यांना खरी हकीकत कसली कपाळाची समजणार? ते विलिंग्डनचे मित्र आहेत ह्मणून ते या दहालाखी फंडाच्या जोरावर सरकारच्या बगलेंत घुसून असहकारी चळवळीला तोंडघशीं पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत. असलीं विधानें करणारांचा आपला राष्ट्राभिमान-भावनेवर फाजील विश्वास आहे असें ह्मणणें प्राप्त पडतें. भावी लोकशाहीच्या वृक्षाच्या मुळांशीं असल्याच द्वैत भावनेचा मसाला जर पडावयाचा असेल, तर तो लोकशाहीचा कल्पवृक्ष न होतां कल्पांतवृक्ष होत आहे, अशी आह्मी धोक्याची नम्र सूचना देतो. मतभिन्नता व कार्य-पद्धत-भिन्नता हींच जर राष्ट्रीय पक्षाच्या दृष्टीनें राष्ट्रद्रोहाचा आरोप सिद्ध करण्यापुरती पातकें असतील तर त्यांच्या कुत्सित शिव्याशापांची पर्वा न करितां आह्मीं स्पष्ट ह्मणतो कीं जनाब, देहली तो बहोत दूर है !

□□□

वर्ष १ : अंक ३ : १६ नोव्हेंबर १९२१

अग्रलेख

शिवराया प्रणिपात कराया ब्रिटानिया आली

सृष्टीच्या जन्मापासून तिनें अनंत वेळां अरुणोदयाचा मंगल सोहळा आपल्या डोळ्यांनीं पाहिला. ज्या एकजिनसी प्रेमसूत्रांत परमेश्वरानें सारी स्थावर जंगम दुनिया निगडित केलेली आहे, त्या प्रेमसूत्राशीं आपल्या निष्कलंक मृदुल हृदयाची तार एकतान करून, अनेक महाकवींनीं आपल्या ओजस्वी प्रेमोद्धारांचे अर्घ्य अरुणोदयकाळीं स्वयंप्रकाशी तेजोनिधीला अर्पण करून, खुलत्या मनोवृत्तीला चालत्या बोलत्या काव्यांत प्रतिबिंबित केलें. मानवी अंतःकरण हें जात्याच काव्यमय असतें. अशा कोट्यवधि अंतःकरणांच्या काव्यप्रवृत्तीला स्फूर्तीचें सहाय नसल्यामुळें त्यांना अरुणोदयाचा सोहळा जरी दृश्य शब्दचित्रांत व्यक्त करवला नाहीं, तरी सौंदर्यबहरानें प्रफुल्लित झालेल्या मुग्ध तरुणीच्या मुग्ध भावनांप्रमाणें त्यांनीं आपल्या हृदयांना डोळ्यांत केंद्रीभूत करून आनंदाश्रूच्या एकच टिपक्यानें अरुणाचें स्वागत केलें. अरुणोदयाचा हा मंगल सोहळा सृष्टीच्या अंतापर्यंत असाच चालणार. दिवसामागून रात्र आणि रात्रीमागून दिवस, या सनातन क्रमानुसार राष्ट्रांच्या चरित्रांत स्वातंत्र्यामागून गुलामगिरी व गुलामगिरीच्या पाठोपाठच स्वातंत्र्य, हा भरती ओहटीचा क्रम अखंड चालूं असलेला स्पष्ट दिसतो. ज्या अरुणानें एक दिवस हिन्दूंच्या विजयनगर साम्राज्याची धडाडलेली होळी पाहिली, त्याच अरुणाला पुढें एक दिवस त्याच हिन्दुसाम्राज्याचा जरीपटका उजळ माथ्यानें रायगडावर फडफडतांना पाहून त्याला अदबीनें मुजरा करावा लागला. हिन्दुधर्माच्या ज्वलज्जहाल अभिमानाच्या पायीं शरीरावयवांचे राईराईएवढे तुकडे होऊन, रट रट उकळणाऱ्या क्षत्रिय रक्ताच्या पुरांत अस्ताव्यस्त पडलेलें शंभूछत्रपतींचें प्रेत ज्या अरुणानें आरक्त डोळ्यांनीं पाहिलें, त्याच अरुणाला मानी मऱ्हाठ्यांच्या राजकारणी कर्तबगारीचें व दिल्लीपतीच्या पहारेबंद अंतःपुरांत घुसून स्वप्नसृष्टींत सुद्धां त्याच्या काळजाचें पाणीपाणी करणाऱ्या भाल्याच्या तिखट पात्याच्या पराक्रमाचें इंद्रतुल्य प्रदर्शन जिंजीच्या किल्ल्यावर एकवटलेलें दिसलें. कडव्या इस्लाम सत्तेच्या धांगडधिंग्याला छातिठोक पायबंद चढवून रायगडची राजलक्ष्मी सातारच्या अजिंक्य ताऱ्यावर स्थापन करणाऱ्या शाहुछत्रपतींचा राज्यारोहण सोहळा पाहून ज्या अरुणानें समुद्रवलयांकित वसुंधरेवर आनंदाच्या सुवर्णाश्रूंचा सडा घातला, त्याच अरुणाला छत्रपतींच्या सत्तासूर्याला पेशवाईचें खग्रास ग्रहण लागलेलें पाहून, सारी दुनिया दुःखाश्रूंच्या मुसळधार वर्षावानें धायधाय रडत बसलेली पहाण्याचा कुप्रसंग आला. हिन्दुपदपातशाहीच्या

एन ४००६--७

पुनरुज्जीवनाच्या ज्या अव्यक्त परंतु प्रत्यक्ष भासमान चैतन्यानें प्रचंड सह्याद्रीचे उंच उंच कडे व दरीखोरीं गदागदा हालवून, मावळच्या रखरखीत धुळीच्या कणाकणांतून काळाचे काळ असे कर्दनकाळ मावळे निर्माण केले; ज्या चैतन्याच्या हिंमतीवर तानाजीनें सिंहगडाच्या नरडीचा घोंट घेतला; ज्या चैतन्याच्या वावटळींत सुरतपाक सुरतेचा नखरा उतरून सारा गुजराथ प्रांत महाराष्ट्राचा दर्यालगत देवडीवरचा हुजऱ्या बनला; ज्या चैतन्यानें राष्ट्रांतल्या व्यक्तिमात्राला गुणकर्माच्या पुण्यांशानुसार उदयांस आणून, जन्मसिद्ध श्रेष्ठकनिष्ठ भावनेचा गागाभट्टा समक्ष मुरदा पाडला व जातिभेद-राक्षसाच्या रक्ताचा टिळा श्रीशिवछत्रपतींच्या कपाळीं रेंखून हिन्दुपदपातशाहीच्या पुनरुज्जीवनाचा संदेश जाहीर करणाऱ्या तोफांचा सरबत्तीचा दणदणाट जगाच्या कोनाकोंपऱ्यात नेऊन भिडविला; त्याच तेजःपुंज उदार क्षात्रचैतन्याला पेशव्यांच्या संकुचित व स्वार्थी अशा ब्राह्मणी संस्कृतचें खग्रास ग्रहण लागतांच, हिन्दूंच्या राष्ट्रीय महत्वाकांक्षेचें कपाळ पानपतास फुटलें. इतर अनेक गुणकर्मजन्य राष्ट्रशक्तींचा समूळ उच्छेद करून, शुद्ध भिक्षुकी वर्चस्वाची एकमुखी सत्ता राष्ट्राच्या बोकांडीं बसली असतां त्या राष्ट्राच्या सर्व संस्कृतीचा अल्पावकाशांत निःपात कसा होतो, याचीं ठळक ठळक उदाहरणें जगांतल्या मुख्यमुख्य राष्ट्रांच्या इतिहासांत कितीहि असलीं, तरी भिक्षुकी सत्तेच्या एकमुखी वर्चस्वानें झालेलें पानपताच्या अधःपाताइतकें चिळस आणणारें उदाहरण पूर्वी कधीं झालें नाहीं व पुढें कधींहि न होवो ! पेशव्यांच्या भिक्षुकी सत्तेनें महाराष्ट्राच्या शिवशाहीला पानपतास तोफेच्या तोंडीं देऊन तिच्या राइराइ एवढ्या ठिकऱ्या ठिकऱ्या केल्यानंतर, महाराष्ट्राच्या राजकीय धार्मिक व सामाजिक जीवनांत अनेक भिक्षुकी उत्सवमूर्तींनीं आपल्या गुणकर्मसिद्ध अत्याचारी प्रवृत्तीची रग जिरवून घेतली. या अत्याचारांचा इतिहास इतका अलीकडचा आहे, व त्याची परंपरा चालविणारे इतके अभिमानी सांप्रदायिक आज घटकेला सुद्धां आमच्या उघड्या डोळ्यांसमोर बेशिस्त नाचत आहेत कीं हा दुष्ट ऐतिहासीक चित्रपट स्मृतिआड करूं म्हटलें तरी होत नाहीं. श्रीशाहुछत्रपतींच्या छत्राखालीं एकवटलेल्या मऱ्हाटेशाहीच्या वैभवकाळापासून तों पापस्मरण चिंतामणी सांगलीकर, बाळा नातू प्रभृति नरपशूंनीं छत्रपति प्रतापसिंहाची व त्याच्या बरोबरच शिवछत्रपतींच्या छत्रचामरसिंहासनाची होळी करीपर्यंतच्या बीभत्स भेसूर व मनोवृत्ति प्रक्षुब्ध करणाऱ्या लांबलचक ऐतिहासिक चित्रपटाचे निरनिराळे देखावे ज्या अरुणानें पाहिले, त्याच अरुणाला येत्या १९ नवंबरच्या दिवशीं

शिवराया प्रणिपात कराया ब्रिटानिया आली

हा नवयुगांतला कल्पनातीत मंगल सोहळा पाहण्याचा कपिलाषष्ठीचा योग लाभणार आहे. हा योग अरुणाला लाभूं नये; या योगाचें प्रदर्शन निमकहराम पेशव्यांच्या पुण्यांतील शनिवार वाड्याच्या छाताडावर भरलें जाऊं नये; ज्या कृतघ्न वाड्यांतल्या कृतघ्न नोकरांनीं आपल्या धन्याचा विश्वासघात करून हिन्दुपदपातशाहीचा खून केला, त्याच वाड्याच्या नांकासमोर, गेल्या महायुद्धांत धारातीर्थी पतन पावलेल्या मराठे वीरांचें स्मारक व श्रीशिवछत्रपतींचा भव्य स्मारक पुतळा उभारण्यासाठीं कृतज्ञ बुद्धीनें येणाऱ्या ब्रिटानियेच्या प्रतिनिधीला या सोहळ्याचें पुण्य लाभूं नये, म्हणून या स्मारकामुळें भिक्षुकशाहीवर बहुजन समाजरूपीं लोकशाहीची होणारी मात गर्भीतल्या गर्भीत मारण्याची चळवळ नाना फडणीसांच्या सांप्रदायिकांनीं सुरूं केली आहे. प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हातून होणाऱ्या स्मारकांच्या या प्राणप्रतिष्ठेमुळें भिक्षुकशाही सांप्रदायिकांनीं भोळ्या भाबड्या अज्ञ जनतेवर पांघरून ठेविलेल्या मोहजालप्रतिष्ठेचा प्राण जाणार आहे. जें काम शेंकडों उलट सुलट कवट्यांच्या इतिहासकारांच्या हातून घडलें नाहीं, तें काम

प्रिन्स ऑफ वेल्सच्या हातून आज काळच घडवून आणीत आहे. खरें म्हटलें तर हा प्रसंगच असा आहे कीं या महायोगांत महाराष्ट्रांतल्या सर्व भेदांनीं मज्जन स्नान करून अभेद व्हावें. सर्व पंथांनीं या प्रयागांत द्वैताला मूठमाती देऊन अद्वैत व्हावें. ब्राह्मण ब्राह्मणेतरांनीं श्रीशिवरायांची शपथ घेऊन खुल्या दिलानें महाराष्ट्रीय म्हणून राष्ट्रसेवेसाठीं एकमेकांत समरस व्हावें. ब्राह्मणांनीं निरिच्छ भावनेनें क्षत्रियांना 'या बसा' म्हणावें. क्षत्रियांनीं त्यांना वंदन करून त्यांचा मान राखावा. दोघांनीं मिळून वैश्यजनांचा सत्कार करावा आणि सर्वत्रांनीं शूद्र अस्पृश्य बांधवांची जाहीर क्षमा मागून कृत पातकांना पश्चात्तापित आनंदाश्रूच्या धबधब्याखालीं पार बुडवून टाकावें. अशी ही अमृतसिद्धीची पर्वणी वारंवार येत नसते. या पर्वणीला लाथाडण्याइतका अमृतद्वेष्ट्या राष्ट्रद्रोह्यांचा मुर्दाडपणा जरी उतास जात असला, तरी खऱ्या राष्ट्रहितेच्छूंनीं या मुर्दाडांचा कान वेळींच पिळण्याची खबरदारी घेणें अवश्य आहे. आम्ही करूं तेंच राष्ट्रकार्य, बोलूं तीच राष्ट्रवाणी आणि सांगूं तोच राष्ट्रोद्धारक मंत्र, अशा धाटणीच्या चळवळी म्हणजे लोकशाहीच्या तत्वाची नागडी उघडी विटंबना होय. मराठे बांधवांच्या एकमुखी प्रयत्नानें यशस्वी होऊं घातलेल्या पुण्याच्या श्रीशिवस्मारकाला, म. गांधींच्या असहकारयोगाचें ग्रहण लागल्यामुळें कमकुवत निस्सत्व व हतबल ठरलेल्या वाचाळ पुणेकर बांधवांचा, असहकारितेच्या दांभिक सबबीचा विरोध म्हणजे २०व्या शतकांतला पेशवाई परंपरेच्या भुताटकीचा जीर्णोद्धार होय. या अनिष्ट परंपरेचा अभिमान जोंपर्यंत हरघडी डोकें वर काढीत आहे तोंपर्यंत महाराष्ट्राला भाग्याचे दिवस लाभणे शक्य दिसत नाहीं. आजला जे असंख्य भेद व पंथ महाराष्ट्रांत एकमेकांच्या उरावर बसून त्याच्या खऱ्याखुऱ्या राष्ट्रीय जीवनाचे धिंडवडे काढीत आहेत, त्या सर्वांना या उर्मट परंपरेचेंच खत पडत आहे. महाराष्ट्राच्या वैभवाची चाड असणाऱ्या सर्व भगिनी बांधवांनीं, अतःपर आत्मवंचन न करितां, या स्वराज्यद्रोही पेशवाई परंपरेचा कांटा उचकून झुगारण्याचें नैतिक धैर्य अवश्य दाखविलें पाहिजे.

श्रीशिवाजी महाराज नवमतवादी नवयुगाचे सूत्रधार, मृत झालेल्या राष्ट्राला जिवंत करणारे धन्वंतरी आणि आत्मतेजानें दगडधोंड्यांना सुद्धां चैतन्याचे कल्पतरू बनविणारे जादुगार होऊन गेले. अर्थात् त्यांच्या नवमतवादी पराक्रमाच्या बरोबरच त्यांच्या चारित्र्याचा विपर्यास करणारा जीर्णमतवाद हातांत काजळीचें काळें मडकें घेऊन लपत छपत त्यांच्या मागोमाग पाठलाग करीतच होता. हेतूंचा विपर्यास, कर्तबगारीची बीभत्स हेटाळणी व वृद्धिंगत होणाऱ्या वैभवाची निंदा, या गोष्टी नवमतवाद्यांची प्रियकर लेणीं होत. शिवाजी महाराजांवर या लेण्यांचा वर्षाव करण्याच्या कामीं मुसलमान व इंग्रज बखरकारांच्या जोडीनेंच महाराष्ट्रांतल्या जीर्णमतवाद्यांनी आपल्या मत्सरी बुद्धीला असूयेच्या सताड मैदानावर बेफाम नाचविण्यास मुळींच कमी केलें नाहीं. खाफीखानानें शिवाजींच्या चरित्राचा 'काफीर शैतान नरकांत गेला' या शेऱ्यानें समाचार घेतला, इंग्रज बखरकारांनीं त्याला 'डोंगरांतला उंदीर, खुनशी व विश्वास घातकी' ठरविलें, मोक्षदात्या भिक्षुकशाहीनें त्याला 'शूद्र' वर्गांत ढकूलन दिलें आणि जे मराठे बांधव आज श्रीशिवभक्तीनें उचंबळून जाऊन त्याच्या स्मारकाचा पाया ब्रिटीश शहाजाद्याच्या हातून परवां बसविणार, त्यांच्या समशेरबहाद्दर वाडवडिलांनीं राज्यारोहणाच्या आदल्या दिवसापर्यंत शिवाजीच्या वाढत्या वैभवाला आपली संमति सुद्धां दिली नाहीं. या सर्व गोष्टींची आठवण झाली म्हणजे स्वकीय परकीयांच्या विरोधांना बिलकुल न जुमानतां, केवळ आत्मसामर्थ्याच्या जोरावर सह्याद्रीच्या धुरोळ्यांतून हिन्दुपदपातशाहीची टोलेजंग सृष्टी निर्माण करणाऱ्या आद्यछत्रपतींच्या चारित्र्याचें कौतुक करावें तितकें

एन ४००६--७अ

थोडेंच. असे वाटल्या शिवाय राहणार नाहीं.

प्रस्तुतचा स्मारकाचा योग असहकारवादाच्या योगांतच येत असल्यामुळें आणि असहकारवादाच्या बाह्य धुमश्चक्रीनें परकीयांबद्दलचा ज्वज्जहाल द्वेष सर्वत्र फैलावला असल्यामुळें, या शिवस्मारकापासून निष्पन्न होणाऱ्या चांगल्या गोष्टी कोणास न दिसल्या, अथवा कोणी त्या पाहण्याचा यत्नच केला नाहीं तर त्यांत कोणीहि विस्मयचकित होण्याचें प्रयोजन नाहीं. गेल्या २५ वर्षांतल्या हिंदी राजकीय चळवळींच्या उत्पत्ति स्थिति लयींचा इतिहास ज्यांनीं निर्विकार चित्तानें अभ्यासिला आहे, त्याला प्रस्तुतची असहकारवादाची चळवळ मुळींच चमत्कारीक वाटणार नाहीं. 'अद्वेष्टा सर्व भूतानाम्' हें आमचें ब्रीदवाक्य म्हणून असहकारवादीजन खुशाल कंठशोष कशात, त्यांना द्वेष बुद्धीची नांगी पाजळून धरल्याशिवाय असहकारितेचा प्रसारच करतां येणें शक्य नाहीं. विकारवशता हें प्रत्येक भल्याबुऱ्या चळवळीचें मीठ असतें. या मिठाच्या जोरावर जनतेच्या भावना गदागदा हालवावयाच्या असतात. जनता भावनावश झाल्याशिवाय तिच्या हातून कोणतीहि चळवळ चालविण्याचें कार्य घडत नाहीं; आणि भावनावशतेला प्रेमापेक्षां द्वेषाचेंच खाद्य अधिक आवडणें हा मानवी स्वभावाचा गुणधर्मच असल्यामुळें, विश्वव्यापक प्रेमावर असहकारवाद खेळविण्याचें खूळ साध्याभोळ्या खुळ्या किंवा बिलंद स्वार्थपटु लोकांशिवाय इतरांस नीटसें पटणार नाहीं. असो. सांप्रत असहकारवादामुळें प्रचलित झालेल्या ब्रिटीश राष्ट्राबद्दलच्या कडकडीत द्वेषाचें क्षेत्र सोडून शहाजाद्यांच्या हातून होणाऱ्या श्रीशिवस्मारकांतून आपणांस काय चांगलें घेतां येण्यासारखें आहे तें पाहूं.

शिवाजीच्या चरित्राचा व चारित्र्याचा आजपर्यंत जितका गर्हणीय विपर्यास व मानखंडना झालेली आहे, तितका विपर्यास व मानखंडना जगांतील कोणत्याहि स्वराज्यसंस्थापकाची झालेली नाहीं. इंग्लंड राष्ट्र हें स्वतःस स्वातंत्र्याचें भोक्तें म्हणवितें. पृथ्वीतलावर स्वातंत्र्य भोगणारे व इतरांना स्वातंत्र्य देणारे हरीचे लाल काय ते आम्हीच, अशी यांची गर्वोक्ति ऐकून ऐकून आमचे कान अगदीं किटून गेले आहेत. ब्रिटन लोक कधींहि गुलाम होणार नाहींत, अशी या ब्रिटिश केसरीची गुरकावणी इंग्रजी प्रायमराच्या चोपड्यापासून तों पार्लमेंटांतील ब्ल्यू बुकापर्यंत सर्व लहान थोर ग्रन्थांतून आजपर्यंत मनमुराद ऐकूं येत असते. परंतु स्वातंत्र्याच्या लंब्याचवड्या वल्गना करणाऱ्या ब्रिटिश केसरीचा गेल्या दोनशें वर्षातला स्वातंत्र्य-संसार इतिहासाच्या दुर्बिणींतून पाहिला, तर पारतंत्र्यांतून कर्तबगारीच्या व आत्मसामर्थ्याच्या जोरावर स्वातंत्र्य मिळविणाऱ्या प्रत्येक मर्द वीराची त्यानें आपल्या तीक्ष्ण नखाच्या पंजांचे फटकारे मारमारून अत्यंत निर्दयपणानें विटंबना केल्याचे दाखले त्या संसाराच्या चव्हाट्यावर अनेक दिसतात. ज्या जोन ऑफ आर्कच्या पुतळ्यासमोर मार्सेलीसचें फ्रेंच राष्ट्रगीत ब्रिटिश वाद्यांतून वाजवून, ब्रिटिश सिंहाच्या छाव्यांनीं तिचा जयजयकार करण्यासाठीं आपापल्या टोप्या काढून तिला मुजरा करण्याचा वार्षिक संप्रदाय सुरू केला आहे, त्या जोन ऑफ आर्क वीरांगनेचे ब्रिटिश सिंहानें कसकसे धिंडवडे काढले, या गोष्टी बदललेल्या दृष्टिकोनाला आज जरी दिसूं शकल्या नाहींत, तरी इतिहासांचा चष्मा चढविल्यास त्या धिंडवड्यांचा बीभत्सपणा वाटेल त्या आंधळ्याच्या खास प्रचितीस येईल. शेंदाड बोरबोन राजांच्या लाथांबुक्यांखालीं धुळीस मिळालेल्या फ्रेंच राष्ट्रांत आत्मसामर्थ्याच्या चैतन्याची फुंक मारून त्याला खडबडून जिवंत करणाऱ्या नरेंद्र नेपोलियनाची विल्हेवाट याच स्वातंत्र्यप्रिय ब्रिटिश केसरीनें कशी लाविली, त्याचा इतिहास फ्रेंचराष्ट्र आज जरी विसरलें असलें, तरी ब्रिटिश सिंहाच्या

त्या अधम कर्माची आठवण इतिहास मात्र कदापि विसरणार नाहीं. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. सारांश ब्रिटिश सिंहाच्या तोंडून एखाद्या राष्ट्राच्या स्वातंत्र्योपासक नरेन्द्राला शाबासकी मिळण्याचें भाग्य सशाच्या शिंगप्राप्तीइतकेंच सोपें आहे, असें विधान करण्यास साहित्याचा तुटवडा मुळींच पडणार नाहीं. दृष्टिकोन बदललल्यामुळें असो, परिस्थितीची लाट उसळल्यामुळें असो किंवा काळाच्या करणीचा प्रभाव असो, ज्या ब्रिटन देशाच्या बखरकारांनीं शिवाजींची आपापल्या बखरींतून मनसोक्त निंदा केली, ज्या ब्रिटिश मुत्सद्यांना चोर, लुटारू, दगलबाज या शिवाय शिवाजीला दुसरें विशेषणच लावायला आढळलें नाहीं आणि पेशवाई मुशींतून निर्माण झालेल्या अनेक नराधमांच्या चिथावणीचा फायदा घेऊन ज्या ब्रिटिश लोकांनीं शिवाजींच्या शेवटल्या वंशजाचें एखाद्या सामान्य गुन्हेगाराप्रमाणें हालहाल करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं, त्याच ब्रिटिश राष्ट्राच्या प्रतिनिधीच्या हातून, त्याच स्वातंत्र्यभूमीच्या उद्यांच्या नरेशाच्या हातून, त्याच शिवछत्रपतींच्या स्मारकाचा पाया बसविण्याचा परवां होणारा मंगल प्रसंग म्हणजे महाराष्ट्राच्या राष्ट्रीय जीवनांत घडून येणारा कल्पनातीत चमत्कार होय. प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हातून बसविला जाणारा शिवाजीस्मारकाचा पाया हा महाराष्ट्राच्या नवचैतन्याच्या इभ्रतीचा ब्रिटानियेकडून होणारा अद्भुत सन्मान होय. राज्यारोहणप्रसंगीं इंग्रजांच्या प्रतिनिधीनें रायगडावर स्वतः जाऊन सिंहासनाधिष्ठित शिवरायाला अदबीनें अर्पण केलेल्या रत्नजडित आंगठीचें तेज परवांपासून खरें खुरें चमकूं लागेल. स्वतःच्या प्राणापेक्षांहि प्यार असलेल्या आपल्या शिवबाचा होणारा हा सन्मान पाहण्यासाठीं सर्व ज्ञात अज्ञात मावळ्यांचे आत्मे शहाजाद्यांच्या भोंवतीं गराडा घालून उभे राहतील. स्वराज्याची आणभाक करणारा दादजी नरस प्रभू आनंदातिशयाचे हुंदक्यांवर हुंदके देत स्मारकाच्या कोनशिळेला घट्ट मिठी मारून बसेल. सय्यद बांड्याला तमंचाच्या एकाच फटकाऱ्यानें गारद करणारा जिवा महाल्या, सिंहगडाची नरडी रगडणारा तानाजी, उदयभानूचा कोथळा फोडणारा शेलार मामा, पावन खिंडीला पावन करणारा बाजी, स्वामिभक्तीपुढें ऐहिक वैभवाला कःपदार्थ मानणारा बाळाजी, कर्नाटकापासून कुलाब्याच्या दांडीपर्यंत भीमथडी घोडेस्वारांचा हुतूतू घालणारा नेताजी, पुरंदरच्या सौभाग्यासाठीं दिल्लीरखानाची बाजी न पत्करतां स्वदेहाचे राई राईएवढे तुकडे करून घेणारा रणगाजी मुरारी, समुद्रावर इतस्ततः भटकणाऱ्या दर्यावर्धींची जंजिऱ्याच्या नाक्यावर नांक दाबून रग जिरविणारा दर्यासारंग मायनाक, आपल्या पतित मनोवृत्तीला राष्ट्राभिमानाची वांकण देऊन चाकणच्या किल्ल्यावर प्रसिद्धीस आलेला फिरंगोजी नरसाळा, हे सारे महाराष्ट्र देवीचे प्यारे वीर महावीर या स्मारक समारंभाच्या वेळीं त्रैलोक्यांत होणाऱ्या शिवछत्रपतींच्या अभिनव जयजयकाराचा गजर करण्यासाठीं सूक्ष्म देहानें परवा पुण्यास हजर राहतील. ब्रिटानियेकडून श्रीशिवछत्रपतींचा होणारा हा अपूर्व सन्मान म्हणजे हिन्दुपदपातशाहीच्या पुनरुज्जीवनाचा उषःकाल होय. नवयुगाच्या नवचैतन्याचा हा अरुणोदय आहे. या अरुणाची प्रभा महायुद्धात पतन पावलेल्या महाराष्ट्रीय वीरांच्या रक्तानें लालभडक रंगून निघालेली आहे. या अरुणोदय काळीं महाराष्ट्रांतील सर्व पंथभेदांनीं आपापल्या द्वैतभावनांना तिलांजुली देऊन, मागील इतिहासावर पडदा सोडावा; मागले एकमेकांचे अपराध उदार मनानें विसरून जावे आणि नवयुगांतला महाराष्ट्राचा इतिहास पूर्वींपेक्षांहि भडक रंगांत रंगविण्याची सर्वांनीं एकदिलानें शिकस्त करावी, असें या श्रीशिवस्मारकाचें महात्म्य आहे. त्याचा तरुण महाराष्ट्रानें अवश्य विचार करावा.

□□□

स्फुट विचार

राष्ट्रघातक्यांची परिषद अथवा भिक्षुकशाहीचें बंड

वाचक म्हणतील कीं, या नांवाच्या स्वतःच्या पुस्तकावर आम्ही स्वतःच अभिप्राय देत आहोंत कीं काय? परंतु तसा प्रकार आमच्या हातून होणार नाहीं. जी गोष्ट सत्य आहे, उघड्या डोळ्यांना स्पष्ट दिसत आहे व पदोपदीं प्रत्यक्ष अनुभवाला येत आहे, तिच्याबद्दल वास्तवीक कोणीं अभिप्रायच द्यावा लागत नाहीं; किंवा कोणाच्या उलटसुलट अभिप्रायानें त्या खऱ्या गोष्टींचें रूपहि कांहीं बदलत नाहीं. आश्चर्य वाटतें तें हेंच कीं, आम्हीं केवळ एका पुस्तकाचें नांव 'भिक्षुकशाहीचें बंड' असें ठेविलें; परंतु अस्पृश्यता असमानता व अधर्मता हिंदुस्थानांतून कायमची हद्दपार करण्याचें वीरकंकण हातीं बांधून, कायावाचामनें आपल्या तपस्सामर्थ्यानें आसेतुहिमाचल सारा देश हादरून सोडणाऱ्या महात्मा गांधींच्या नाकावर टिच्चून पुण्यावांईच्या भिक्षुकांनीं ब्राह्मण्यसंरक्षणाच्या सबबी खालीं मात्र कऱ्हाड येथें गेल्या महिन्यांत भिक्षुकशाहीचें बंड प्रत्यक्ष केलें. ब्राह्मण्यसंरक्षण परिषदेचा हा फार्स गुदस्त सालीं पंढरपुरास जन्माला आला. त्या वेळीं ह्या परिषदेच्या कोडग्या चालकांनीं आपल्या अतिपवित्र ब्राह्मण्याच भेसूर सूर काढून आपल्या अकलेचा शिमगा लौकिकी फाल्गुनाच्या धुळवड शेणवडी पेक्षां रेंसभरहि भिन्न नाहीं हें सिद्ध करून दाखविलें. त्या वेळीं केसरीकंपू शिवाय इतर सत्यप्रिय पत्रांनीं या परिषदेचा निषेधच केला होता. ब्राह्मण्यसंरक्षण हें राष्ट्राच्या जीवनाला अत्यंत आवश्यक आहे. ब्राह्मण हें राष्ट्ररूपी विण्याच्या चार तारांतील पंचमाची तार होय. या तारेचें पुनरुज्जीवन व संरखण करणें हें प्रत्येक राष्ट्रहितेच्छूचें आद्यकर्तव्य होय. परंतु कऱ्हाडपंढरपुरास परिषदेचा तमाशा करणाऱ्या मुर्दाड भिक्षुकशाहीची ब्राह्मण्याची व ब्राह्मण्यसंरक्षणाची कल्पना पाहिले म्हणजे या राष्ट्रघातक्यांच्या सुजलेल्या गर्वाची व कुजलेल्या मनोवृत्तीची ज्याला चिळस येणार नाहीं, तो मुक्त तरी असला पाहिजे किंवा पशु तरी असला पाहिजे. एकीकडे महात्मा गांधी राजकीय क्षेत्रांत हिंदु मुसलमानांच्या शेंडी दाढीची गांठ घालून राष्ट्रीय ऐक्याच्या अशक्य प्रमेयाला शक्यतेचा वांक देऊं पहात आहेत, तों तिकडे हे कूपमंडूक भिक्षुक मेल्या ब्राह्मण्याचें मढें उराशीं आवळून ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचा कलहाग्नी अधिकाधिक भडकाऊन देण्याचा राष्ट्रद्राही धंदा उघड माथ्यानें चालवीत आहेत. इकडे धार्मिक व सामाजिक क्षेत्रांतल्या अन्यायांचें उच्चाटन करून अस्पृश्य बांधवांना समानतेनें वागवा म्हणून महात्मा गांधी प्रत्यक्ष आचरणानें

एकसारखा कंठशोष करीत आहेत, तों तिकडे हीं भिक्षुक भुतें ब्राह्मण्यसंरक्षणाच्या सबबीखालीं खुद्द हिन्दुधर्मीयांतच हेकेखोरपणानें दुहीची आग चेतवून देण्यास मुळींच शरमत नाहींत. विशेष आश्चर्य म्हटलें म्हणजे वेळीं अवेळीं देशभक्तीचा व राष्ट्रप्रेमाचा धबधबा ज्यांच्या तोंडांतून धो धो कोसळत असतो त्या इरसाल 'राष्ट्रीय' पत्रकारांना मात्र या भिक्षुकशाहीच्या बंडांत राष्ट्रद्रोह मुळींच दिसत नाहीं. एरवीं सातारा जिल्ह्याच्या कोनाकोपऱ्यांतल्या खेड्यांत एकाद्या ब्राह्मण कुळकर्ण्याच्या घरीं प्लेगचा उंदीर मरून पडला, तर त्याचें पातक एकाद्या सत्यशोधकी मराठ्याच्या पदरीं बिनचुक बांधण्यासाठीं आपल्या पत्राचे कालमच्या कालम खर्ची घालणारे राष्ट्रीय पत्रकार, कऱ्हाडच्या या राष्ट्रघातक्यांच्या परिषदेबद्दल मूग गिळून कां बसतात, याचा उलगडा होत नाहीं. नाहीं म्हणायला यंदाच्या वर्षी केसरीकार मात्र या आक्षेपांतून किंचित् निसटले आहेत. पटेल बिलावर गुणकर्मसिद्धीची व संस्कारनिर्णयाची भिक्षुकी छाननी करण्यांत मनमुराद कलमसुख घेणारा केसरी इतक्या लवकर शुद्धीवर येईल असें कोणासही वाटलें नव्हतें. प्रस्तुत परिषदेवर केसरीनें व्यक्त केलेल्या स्फुटांत बाह्यतः जरी बरीचशी निस्पृहता दिसतें, तरी परिषदेच्या चालकांची कान उघाडणी करतांना केसरीनें आपलीं नखें प्रथम शनिवार वाड्याच्या बुरुजावर घांसून तीं पुरीं बोथट बनल्यानंतरच केसरीनें आपला पंजा भिक्षुकशाहीच्या कानशिळावर हळूंच ठेवून, थप्पड मारण्याचा कुशल बहाणा केलेला आहे, हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. तथापि जातिमात्र ब्राह्मणाच्या कल्पनेवरून गुणकर्मसिद्ध ब्राह्मण्यावर उडी मारण्यांत केसरीनें व्यक्त केलेल्या प्रस्तुत विचारक्रांतीबद्दल केसरीदादांना प्रबोधन साष्टांग प्रणिपात घालीत आहे.

यंदाच्या ब्राह्मण्यसंरक्षण परिषदेचा जलसा सुप्रसिद्ध जीर्णमतवादी बापटशास्त्री यांच्या नेतृत्वाखालीं कऱ्हाड, जिल्हा सातारा, येथें नाचविण्यांत आला. या रिकामटेकड्या परिषदेचें कार्य पाहिलें म्हणजे खिसेकातरूंनीं, प्रवाशांचे गळे कापणाऱ्या ठगांनीं, आणि भरदिवसा गांवें लुटणाऱ्या दरोडेखोरांनीं आपापल्या धंद्याच्या संरक्षणासाठीं व भरभराटीसाठीं निरनिराळ्या परिषदा भरवून, ठराव पास करून, 'कायदेशीर इलाज' करण्यासाठीं कमेट्यांना अधिकार देण्याचा उपव्याप अंमलांत कां आणूं नये? असा प्रश्न सहाजिकच उद्भवतो. बापट-परिषदेनें जे बारा ठराव पास केले आहेत त्यांपैकीं तीन चार वाचकांच्या माहितीकरतां खालीं देत आहोंतः-

(१) कुल, संस्कार, विद्या व शील या चार गुणांनीं युक्त तें ब्राह्मण होय.

(६) कोल्हापूरच्या श्रीमहालक्ष्मीच्या देवालयांत शिरून कांहीं ब्राह्मणेतरांनीं देवीस स्पर्श करून पूजा वगैरे केली, असें वर्तमानपत्रावरून समजतें. ही गोष्ट होणें आजपर्यंतच्या वहिवाटीविरुद्ध असल्यामुळें ती न होण्याकरितां कायदेशीर इलाज करण्यास कार्यकारी मंडळास ही सभा अधिकार देत आहे.

(८) ब्राह्मण लोकांनीं अस्पृश्यांना त्यांच्या धर्माप्रमाणें धर्मशिक्षण वगैरे देऊन त्यांची उन्नति करावी.

(९) कायदेकौन्सिलांतील बिनसरकारी सभासद हे देशांतील अल्पसंख्यांक मतदारांचे प्रतिनिधी असल्यामुळें सर्व जनतेचे प्रतिनिधी ह्मणून हिताहिताचे, विशेषतः धर्माचे बाबतींत जोशीबिल, मिश्रविवाह बिल यासारखीं बिलें आणण्याचा अधिकार त्यांना नाहीं, असें या सभेचें स्पष्ट मत आहे.

(१०) आजपर्यंत ज्यांचा ज्यांच्याशीं रोटीबेटी व्यवहार चालू आहे त्या विरहित इतरांशीं रोटी-बेटी व्यवहार करूं नये असें या सभेचें मत आहे.

(११) ब्राह्मणांमधील विद्यमान ब्राह्मणांचा (?) योग्य आदर करून जातिमात्र ब्राह्मणांमध्ये

ब्राह्मणाची अभिवृद्धि करणें हें या परिषदेचें ध्येय आहे.

वरील ठरावांतील भिक्षुकी विचारसरणीचा सांगोपांग समाचार आमच्या 'भिक्षुकशाहीचें बंड' या पुस्तकांत आधींच घेतलेला असल्यामुळें त्याचे चर्वितचर्वण पुन्हां येथें नको. तथापि आम्ही बापट शास्त्र्यांना एवढेंच बजावून ठेवतों कीं, कुल संस्कार विद्या आणि शील एवढ्याच भांडवलावर जर तुमच्या ब्राह्मण्याचा डोला अवलंबून असेल, तर पेशवाईच्या उत्पत्ति-स्थिति-लयाचा इतिहास प्रथम पाताळांत नेऊन गाडा आणि मग कुलशीलाच्या वल्गना करण्यासाठीं आपल्या जिव्हेला स्वैर सोडा. बापटी-परिषदेच्या ठरावांना कोणताहि समंजस स्वदेशाभिमानी धिःकारांचा आहेर केल्याशिवाय राहणार नाहीं हें जरी खरें, तथापि त्या ठरावांत व्यक्त झालेल्या राष्ट्रविघातक सडक्या विचारांचा सर्व हिन्दुमात्रांनीं तात्काळ निषेध न केल्यास भिक्षुकशाहीचें हें भूत राष्ट्रीय आकांक्षांची होळी केल्याशिवाय मुळींच राहणार नाहीं. ज्ञानप्रकाशकार या भिक्षुकशाहीच्या बंडाला 'स्वराज्यद्रोह्यांची परिषद' असें समर्पक नांव कां देतात, आणि ब्राह्मण्यसंरक्षणाच्या सौभाग्यासाठीं रडणाऱ्या बापटी कपूच्या अर्वाच्यपणाला पाहून सुबोध पत्रिकाकार 'ढळढळीत वैधव्य बरें' असे खेदोद्गार का काढतात, याचा वाचकांनीं निर्विकार चित्तानें व शांतपणानें विचार करावा. 'भिक्षुकशाहीचें बंड' एवढ्या शब्दोच्चारालाच नांकें फेंदारणाऱ्या बृहस्पतींना आम्ही पुनः पुनः बजावून ठेवतों की भिक्षुकशाहीची तरफदारी आणि लोकशाहीची पुराणें या दोन परस्परविरुद्ध भावना एकाच अंतःकरणांत वास्तव्य करीत असतील, तर तें अंतःकरण पेशव्यांच्या बासनांतलेंच असेल !

ब्राह्मण कोण ?

आम्हीं वर म्हटलेंच आहे कीं राष्ट्राच्या जीवनाला क्षत्रिय वैश्यादि शक्तींप्रमाणेंच ब्राह्मण्याचीहि आवश्यकता आहे. परंतु बापटी परिषदेच्या ब्राह्मण्याची कल्पना मात्र केव्हांहि या हिन्दुराष्ट्रानें मान्य केलेली नाहीं, असें इतिहासावरून स्पष्ट दिसतें. 'जात' ही मुळीं आधीं धार्मिक संस्थाच नव्हे किंवा संस्कारनिर्णयाचा प्रश्न प्रथम जेव्हां आर्यजनांत उत्पन्न झाला तेव्हां 'जात' ही भिक्षुकी चीज जन्मालासुद्धां आली नव्हती. अर्थात् जातिमात्र ब्राह्मण्य किंवा क्षत्रियत्व हे लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकणारे शुद्ध आत्मवंचक ढोंगधत्तुरे होत. बापटी परिषदेच्या जातिमात्र ब्राह्मण्याच्या कल्पना किती फोल आहेत याबद्दल अनेक प्राचीन ग्रंथांतले आधार त्यांच्या तोंडावर फेंकतां येतील. परंतु या दूराग्रही मंडळींचें सारें शिक्षण एका विशिष्ट संकुचित पद्धतीनें असल्यामुळें, व या कूपमंडुकांना आपल्या टीचभर कूपापलीकडे आणखी कांहीं जग आहे याची कल्पनाच नसल्यामुळें, यांच्याशीं वादविवाद करणें म्हणजे काळाचा व शक्तीचा अपव्यय होय. स्वामी दयानंद सरस्वति या महात्म्यानें आपल्या 'सत्यार्थप्रकाश' ग्रंथांत या प्रश्नाचा सांगोपांग विचार केलेला आहे. वाचकांनीं कोणाहि लब्धप्रतिष्ठिताच्या प्रतिकाराची पर्वा न करितां हा ग्रंथ मुद्दाम वाचावा अशी विनंती आहे. त्याचप्रमाणें मि. हॉजसन् नामक शोधकानें सन १८२९ मध्यें तिबेटांत मिळविलेला अश्वघोषकृत 'वज्रशुची' नामक ग्रंथ रा. बापटशास्त्री यांच्या

वाचनांत आला असता तर जातिमात्र ब्राह्मण्याचें स्तोम माजविण्याइतकें त्यांच्या परिषदेचे कान लांब झालेच नसते. आम्ही या वज्रशुचीचें भाषांतर लवकरच क्रमशः देणार आहोंत.

राष्ट्रांतलें ब्राह्मण्य नष्ट झालें तर राष्ट्रहि नष्ट होतें. जर आमचें हिन्दुराष्ट्र आज जिवंत आहे तर त्याचें ब्राह्मण्य कांहीं मेलें नाहीं, हें सिद्ध होतें; मग त्याच्या संरक्षणाचा प्रश्नच येतो कोठें? राष्ट्राच्या राष्ट्रीय जीवनांत ओजस्तेज अखंड सणाणत ठेवण्याच्या कामीं ज्या ज्या व्यक्तींनीं आजपर्यंत तपश्चर्या केली ते सारे ब्राह्मण. ज्ञानेश्वरापासून तों चोखामेळ्यापर्यंत सारे संत हे खरे ब्राह्मण होत. सजनकयासी, शेखमहंमद, कबीर, चैतन्य, रामकृष्णपरमहंस, दयानंद, विवेकानंद, रामतीर्थ, हे सारे आमच्या राष्ट्रांतल्या ब्राह्मण्याचें उत्कृष्ट नमुने होत. राष्ट्रांत स्वातंत्र्याची कल्पना खेळवून त्याला 'उत्तिष्टत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' अशी हांक मारून सावध करणारे टिळक, व्यर्थ गाजावाजा न करितां कार्याकरितांच कार्य करणाऱ्यांचा रामदासी धाटणीवरचा संघ निर्माण करणारे गोखले, 'भूतजात अवघे नारायण' या तत्वाचा प्रत्यक्ष दृश्य सृष्टींत प्रयोग करून दाखविणारे जगांतल्या सर्व शास्त्रज्ञांचे जगद्गुरु सर राय व जगदीश चंद्र, यांत्रिक क्षेत्रांत पाश्चात्यांचें नांक खालीं करणारे शंकरराव भिसे, वेदांतामध्यें कोणासहि हार न जाणारे डॉ. खेडकर, परकीय मिशनरी धर्मांवर कुरघोडी चढवून हिन्दुधर्मानुयायांच्या भयंकर क्षयाला थोपविणारे आद्य हिन्दुमिशनरी गजाननराव वैद्य, राजकीय सामाजिक धार्मिक बाबतींत साऱ्या जगाच्या ज्ञानसागराला आपल्या हाताच्या मुठींत ठेवणारे लाला लजपतराय, इत्यादि अनंत नररत्नें हीं आमच्या हिंदमातेच्या कंठावर रुळणाऱ्या मौक्तिक हारांतले ब्राह्मण-कोहीनूर होत. यांच ब्राह्मणांच्या ब्राह्मण्यानें राष्ट्र जिवंत आहे. यांच्या ब्राह्मण्याचें संरक्षण करायला परिषदा नकोत, व्याख्यानें नकोत, ठराव नकोत व कमेट्यांची खटपटहि नको. या ब्राह्मण्याची परंपरा अखंड वहाणारी आहे. आम्ही बापट शास्त्र्यांना विचारतों कीं तुमच्या कंपूंत म. गांधींच्या तोडीचा तपस्वी ब्राह्मण एक तरी आहे काय? डॉ. भांडारकरांच्या विद्वतेच्या तोडीचा एक तरी पंडीत आहे काय? शिंद्यांच्या जोडीला जोड देणारा एखादा तरी अनाथोद्धारक महात्मा ब्राह्मण आहे काय? सरजॉन उड्रॉफच्या आध्यात्मिक ज्ञानाची बरोबरी करणारा एकतरी प्राणी आहे काय? सिस्टर निवेदितेच्या चरणापाशीं येण्याचें धाडस करणारी एकतरी विदुषी तुमच्या संग्रहीं आहे काय? रवींद्रनाथ टागोरच्या जीवन चरित्रांतला शतांश आणि परमपूज्य ऋषींद्र अरविंद यांच्या तपश्चर्येचा सहस्रांश तरी आकलन करण्याची तुमची लायकी आहे काय? कशाला मारतां ब्राह्मण्यसंरक्षणाच्या बाता? ब्राह्मण्य संरक्षण करण्याची तुमची तोंडेंच नव्हत. ह्मणे ''ब्राह्मण लोकांनीं अस्पृश्यांना त्यांच्या धर्माप्रमाणें धर्मशिक्षण वगैरे देऊन त्यांची उन्नति करावी'' अस्पृश्यांचा धर्म कोणत्या बापटी स्मृतींत लिहिला आहे हो बापटशास्त्री? आणि त्यांच्या उन्नतीची आजच कशी तुह्मां इरसाल ब्राह्मणांना आठवण झाली? आधी स्वतःचें कर्म धुवून काढा आणि मग इतरांच्या कवट्यांची उन्नति करण्याची शेखी मारा. स्वतःच्या सडक्या मनोवृत्तीनें आज तुम्हीच अस्पृश्यांपेक्षां अस्पृश्य बनला आहांत, तिकडे जरा लक्ष पुरवा आणि मग जगद्गुरुत्वाच्या मेलेल्या हक्कांना जिवंत करण्याचा यत्न करा. जातिमात्र ब्राह्मण्याचें वा क्षत्रियत्वाचें स्तोम माजविणारा मनु मागेंच मेला.

मुळशीपेटा सत्याग्रह

'शिवाजीच्या मावळ्या'चें नांव पुढें करून या सत्याग्रहाचें लोण महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत नेऊन भिडविण्याची चळवळ सांप्रत जोरानें सुरू आहे. शिवाजी व मावळे या दोन शब्दांत विशेष जादु असल्यामुळें या चळवळीचा परिणाम जनतेवर तीव्र प्रमाणांत होणार यांत संशय नाहीं. परंतु या जादूच्या मोहनी खालीं मुळशीपेट्यांतल्या मावळ्यांचें खास हित कितपत साधलें जाईल याची वानवा दिसते. तपास करतां असें आढळून येतें की मुळशींतल्या शेंकडा ८५ मावळ्यांच्या जमिनी आज कित्येक वर्षे ब्राह्मण व गुजर सावकारांच्या घरांत गहाण पडलेल्या असून, 'मावळ्यांची मालकी' ह्मणजे 'म्हातारा नवरा कुंकवाला आधार' एवढी नाममात्रच आहे. गहाण पडलेल्या जमिनी ह्मणजे माशांनीं गिळलेलीं माणकें असतात. आणि त्याचा परत ताबा मिळणें ही गोष्ट अशक्य कोटीच्याहि पलीकडची होय. मावळ्यांनीं जमिनीच्या प्रेमानें आणि पोटाची खळगी भरण्याच्या अनिवार्य आवश्यकतेनें जमिनीची लागवड करावी, पीक काढावें, सावकारी हिशोबाच्या बिनबुडाच्या रांजणाची भर करण्याचा यत्न करीत रहावा व सावरकर उदार मनानें (?) तोंडावर फेंकील तेवढे दाणे चाऊन चमडीच्या झोंपडीला लागलेली आग बुझविण्याची शिकस्त करावीं, हेंच 'शिवाजीच्या मावळ्यांचे' प्रस्तुत चरित्र आहे. वाचकांनीं कृपा करून इतकें लक्षांत ठेवावें की मुळशीवर फिरणारा टाटाचा झपाटा योग्य की अयोग्य हा प्रश्न येथें आह्मीं विचारार्थ घेत नाहीं. प्रस्तुतचा मुद्दा एवढाच आहे की मुळशीवर उद्यां जरी जलप्रलय झाला तरी ज्यांच्या जमिनी आधींच सावकारी प्रलयाखाली मागेंच जमीनदोस्त होऊन गेल्या आहेत, त्या 'शिवाजींच्या मावळ्यां'ची अधिक भयंकर हानी ती काय होणार? उलट टाटाच्या रामरगाड्याखालीं मुळशीचें पीठ झालेंच, तर नुकसान-भरपाईच्या पिठाच्या कच्च्या पक्क्या भाकरी 'शिवाजीच्या मावळ्यां'च्या पोटांत न उतरतां, ब्राह्मण गुजर सावकारांच्या घशांकडे धांव घेणार. शिवाजीचे मावळे, शिवाजीचे मावळे हा मंत्र तोंडपाठ म्हणत गांवोगांवीं मुळशीपेटा सत्याग्रहाचे मेळे खेळविणाऱ्या देशभक्तांना आम्ही एवढीच विनंती करितों कीं शिवाजीच्या मावळ्यांबद्दल तुम्हांला जर खरोखरच कांहीं कळवळा आला असेल, तर मेळ्याचा उपक्रम सध्यां बंद ठेऊन, वरील ब्राह्मण गुजर सावकारांकडे अडकलेली मावळ्यांच्या जमिनींचीं गहाण खरेदीखतें पैदास करून, त्यांचीं नांवनिशीवार यादी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करा आणि पुण्यामुंबईस एक जंगी जाहीरसभा भरवून विलायती कापडांच्या होळीप्रमाणें या गहाणखतांची जाहीर होळी करा. सारांश, शिवाजीचे मावळे आपल्या वाडवडिलार्जित जमिनीचे खरेखुरे मालक आहेत अशी महाराष्ट्रांतल्या जनतेची बिनतोड खात्री पटवून द्या. नाहींतर प्रस्तुतची सत्याग्रहाची चळवळ गुलाम व गरजू मावळ्यांना जबरीनें पुढें करून या चक्रवाढी ब्राह्मण व गुजर सावकारांनींच आपल्या स्वार्थासाठीं चालविली आहे व 'शिवाजीचे मावळे' हा जादूचा मंत्र लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं तुम्ही बडबडत आहांत, असा आक्षेप आल्याशिवाय रहाणार नाहीं. मेळेवाल्यांनों, प्रथम गहाणखतें मिळवून त्यांची होळी करा आणि मग 'शिवाजीचे मावळे' लोकांबद्दल प्रेम व्यक्त करा.

□□□

अग्रलेख

दसरा गेला आणि दिवाळीहि गेली !

शके १८४३ सालाचा दसरा आला आणि गेला व तो गेला नाहीं तोंच त्याच्या मागोमाग दिवाळीहि येऊन तशीच निघून गेली ! सूर्य उगवतो आणि मावळतो. रात्र येते आणि निघून जाते. हें सृष्टीचें रहाटगाडगें जसें अनंत काळ चाललें आहे तसेंच आम्हां हिंदु लोकांचे सण अथवां आम्हां हिंदूंचेच कां, हिंदूप्रमाणेंच हिंदुस्थानांत रहाणाऱ्या मुसलमान आणि पारशी, बुद्ध आणि जैन, इस्रायल आणि ख्रिस्ती, सारांश आम्हां सर्वच हिंदी जनांचे सण मनुष्यनिर्मित असले तरी ईश्वरीसूत्रानें चालणाऱ्या सृष्टीच्या रहाटगाडग्यासारखे काळाच्या गतीबरोबर आपल्याहि फेऱ्या करीत असलेले पाहून विचारी माणसाच्या अंतःकरणाला पीळ पडल्यावाचून रहात नाहीं.

इतर दिवसांप्रमाणेंच सण जर नुसते येतील आणि जातील, त्यांच्या ठिकाणीं जर कांहीं विशेष दिसून येणार नसेल, तर ते सण तरी कशाचे? संक्राती ग्रहणें वगैरे ह्या पर्वण्या आहेत. पर्वण्या म्हणजे सृष्टीच्या रहाटगाडग्यांतील विशेष प्रकारचे दिवस ! सूर्य मकर राशीला आला म्हणजे मकर संक्रांतीचें पर्व येतें. सूर्य चंद्र जगड्व्याळ भ्रमणाच्या तडाक्यांत छायेनें आच्छादिले गेले म्हणजे त्यांच्या ग्रहणाच्या पर्वण्या होतात. असलीं कित्येक पर्वे दरसाल येतात आणि जातात. तीं येणें आणि जाणें हा सृष्टिनियम आहे. मनुष्याचा त्यांत कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं. पाऊस पडला म्हणजे अखिल भूपृष्ठ हिरवें गार दिसूं लागतें, जिकडे तिकडे गवतच गवत माजतें आणि ऋतुमानाप्रमाणें होणाऱ्या वनस्पति उगवून त्या आपल्या पल्लवांनीं आणि कुसुमांनीं सृष्टिदेवतेच्या सौंदर्याला नितांत खुलवून सोडितात ! हा सारा प्रकार ईश्वरी नियमांप्रमाणें घडत असतो. मनुष्यप्राण्याला प्रौढी मिरविण्यासारखें त्यांत कांहीं नसतें. पण तोच मनुष्य प्राणी जेव्हां जमीन नांगरून आणि तिच्यांत अवश्य तीं खतें घालून ईश्वरी सूत्राप्रमाणें पडणाऱ्या पर्जन्याचा अथवा मोठमोठ्या नद्या प्रचंड बंधाऱ्यानें आडवून त्यांच्या पाण्याचा उपयोग त्या जमिनींत आपल्या योगक्षेमास अवश्य लागणारीं पिकें उत्पन्न करण्याकडे करितो; भूपृष्ठाप्रमाणेंच समुद्राच्या तळाशीं, तेथें सतत वास करणाऱ्या मत्स्यादि जलचरांपेक्षांही जास्त सौलभ्यानें संचार करून, निसर्ग नियमांप्रमाणें तेथें उत्पन्न होणारी अनर्घ्य मौक्तिकें आणून आपल्या गृहदेवतेला भूषवितो; राक्षसीयंत्रांच्या सहाय्यानें पृथ्वीचें उदर विदारण करून तेथें निसर्गतः वास करून राहिलेले नानाप्रकारचे धातू, विविध

जातीचीं रत्नें आणि मीठ, कोळसे, तेलें वगैरे सारखीं निरनिराळीं खनिज द्रव्यें, पाताळाच्या आश्रयानें राहिलेल्या नागास आपल्या बाहुबलानें उखडून काढणाऱ्या वीर्यशाली खगाधिपाप्रमाणें भूपृष्ठावर आणून त्यांचा उपयोग आपली संसारयात्रा सुखदायी करण्याकडे करितों; तेव्हां ही त्याची करामत पाहून ईश्वर देखील चकित होतो ! सण ही असल्या मानवी पराक्रमाचीं स्मारकें आहेत. सण हे असले पराक्रम करण्याकडे मानवी प्रवृत्ति वळविण्याचीं अमोघ साधनें आहेत. सण हे तेजस्वी पुरुषांना आत्मोद्धाराचा मार्ग दाखविणारे अखंड दीप्तिवान तेजोगोल आहेत. सण हे स्फूर्तीचे निधि आहेत. सणांमध्यें इतिहास सांठविलेला आहे. सणांच्या ह्या तेजोगोलांत आमचे तेजस्वी पूर्वज उभे राहून आमच्या प्रस्तुतच्या विपत्कालांत आमच्या ठिकाणीं कर्तव्याची जाणीव उत्पन्न करीत आहेत, आम्हाला आमच्या कर्तव्याचा मार्ग दाखवीत आहेत आणि मोठ्या आस्थेनें व तीपेक्षांहि मोठ्या आशेनें 'भारतसंतानांनों निजता काय ! जागे व्हा, उठा, आमचा आशिर्वाद घ्या आणि आपल्या कर्तव्याला लागा' असें प्रत्येक सणाच्या वेळीं मोठ्या कंठरवानें आमच्या कानीं कपाळीं ओरडून सांगत आहेत. मनुष्यकृत सणांत हें असलें गूढ रहस्य भरलें आहे. पण आम्हां हतभाग्यांना तें काय होय ! आमचे सण येतात आणि इतर दिवसांप्रमाणेंच आमच्या अंतःकरणावर किंवा आचरणावर कोणत्याहि प्रकारचा ठसा न उठवितां निघून जातात. तोंडाचा वारा एका बाजूनें फुंकणींत शिरतो आणि दुसऱ्या अंगानें बाहेर निघून जातो. वारा फुंकून फुंकून आमचीं फुफ्फुसें मात्र अत्यंत क्षीण होतात, पण गेलीं शेंकडों वर्षे केवळ कोळशासारखे काळे ठिक्कर बनलेले आमचे विचार प्रज्वलित होऊन आपलें प्रखर तेज कांहीं प्रकट करीत नाहींत.

ज्याला मिळेल त्यानें चार पक्वान्नावर यथास्थित ताव मारावा, रोज भाकरीवर गुजराण करणाऱ्यांनीं पोळी खावी, अर्धपोटी रहाणारांनीं कसें तरी पोटभर जेवावें आणि उपास काढणाऱ्या बहुसंख्याक हिंदवासीयांनीं कोंडा धोंडा जें मिळेल त्याची जठराग्नीला आहुती देऊन त्याची आग शमविण्याचा प्रयत्न करावा, ह्मणजे सण साजरा झाला ! गेलीं कित्येक शतकें आह्मीं आर्यावर्तांतले आर्य आपले सण अशाच रीतीनें साजरे करीत आलों आहों ! सणांचें मढें हें अशा रीतीनें शृंगारण्यांत काय अर्थ आहे? सणाच्या नासक्या बेलटावर असली बेगड चिकटवून, त्याच्या तोरणांनीं आह्मीं आपलीं घरें अगदीं राजपुत्राच्या स्वागतार्थ सुशोभित केलेल्या बोरीबंदर स्टेशनाप्रमाणें भूषविली तरी त्याला आज पिढ्यानुपिढ्या आलेली स्मशानकला थोडीच नाहीशी होणार आहे ? ती नाहींशी व्हावी अशी जर मनःपूर्वक इच्छा असेल तर आह्मीं आपल्या सणांची गूढ रहस्यें ओळखून, ते सण ज्या ज्या कार्याकरितां आमच्या पूर्वजांनीं अमलांत आणिले असतील तीं तीं कार्यें कालावर नजर देऊन पूर्ण करण्याचा प्रयत्न आह्मीं सर्वांनीं एक जुटीनें केला पाहिजे.

हिंदूंच्या कित्येक सणांना भिक्षुकशाहीनें आपल्या बंडाच्या झेंड्याखालीं जरी व्रतवैकल्याचें स्वरूप देऊन, सुखार्थ लालचावलेल्या मानवी मनाला इह पर लोकीं इच्छित फलप्राप्तीची आशा आणि आपल्या चरितार्थाची सोय ह्या दोहोंचीं साधनें बनवून सोडिलें आहे, तरी बहुतांशीं त्यांच्या तडाक्यांतून निभावून निघालेले असे गुढीपाडव्यापासून रंगपंचमीपर्यंत निदान आठ दहा तरी सण सांपडतील. त्यांच्या गूढार्थाचे आविष्करण करून समाजामध्यें प्रबोधन व्हावें या हेतूनें हा लेख लिहून, गेल्या विजयादशमीपासून आतांपर्यंत येऊन गेलेल्या दोन तीन सणांसंबंधानें यथावकाश विचार करण्याचें निश्चित केलें आहे.

विजयादशमी. हे शब्द किती स्फूर्तिदायक आहेत ! ह्या दिवशीं प्रस्थान ठेवून प्रभु रामचंद्रानें रावणाच्या बंदीवासांत (पतिचरणाच्या दर्शनार्थ अहोरात्र अस्वें ढाळीत बसलेल्या) परम पावन सीतादेवीची सुटका करून तिचें ईप्सित पूर्ण केलें. याच सुमुहूर्तावर शमीवृक्षावर विश्रांति घेत पडलेलीं आपलीं शस्त्रास्त्रे धारण करून, गीताधर्मानुयायी कृष्णभक्त पांडवांनीं, सती द्रौपदीसारख्या तेजस्वी कुलांगनेच्या पवित्र चारित्र्यावर रखरखीत निखारे ओढण्यास धजावलेल्या मदोन्मत्त दुराचारी दुर्योधन दुःशासनादि कौरवांस आणि त्यांच्या पक्षास मिळालेल्या भीष्मद्रोणादिकांस ह्या पवित्र आर्यभूमींतून कायमचे हाकलून लावले. याच दिवशीं रणबहादर महाराष्ट्रींयांनीं शत्रुदमनार्थ स्वाऱ्या करण्याचा उपक्रम ठेवून हिंदवी स्वराज्याची स्थापना आणि वाढ केली. आज आह्मीं श्रीराम, कृष्ण, पांडव आणि मराठे यांचे वंशज ह्या विजयादशमीच्या दिवशीं कोणता दिग्विजय करतों? पांडवांनीं शमीवृक्षावरून आपलीं हत्यारें काढलीं ह्मणून आह्मीं त्या वृक्षाच्या, किंवा ज्या देशांत पूर्वी सोन्याचा धूर निघत होता त्या देशांत तमाखूचा धूर काढण्याच्या कामीं आह्मांस मदत करणाऱ्या आपट्याच्या झाडाच्या फांद्या आणून त्यांचें पूजन करितों आणि 'शमी शमयते पापम् शमी आयुष्यवर्धनम्' असले असत्यपूर्ण मंत्र म्हणून आपल्या पापाचें क्षालन आणि आपल्या भूभारभूत आयुष्याचें वर्धन व्हावें म्हणून भिक्षुकाच्या हातावर चार दोन आणे दक्षिणा टिचवितो ! भारतवासी आर्यांना निःस्वातंत्र्यच काय पण कायमचे निर्वीर्य करण्याचा जणूं काय विडाच उचलून आलेल्या ब्रिटीश मुत्सद्यांनीं स्वातंत्र्याबरोबरच आमच्या जवळ असलेल्या जुन्यापुराण्या, मोडक्या तोडक्या आणि तांब लागून गंजून गेलेल्या हत्यारांवरही गदा आणिली आणि कोणतेंहि हत्यार जवळ बाळगणें सुद्धां कायद्यानें गुन्ह्याच्या सदरांत आणिलें. अशा स्थितींत दुष्टनिर्दालनार्थ शस्त्रास्त्रें धारण करणाऱ्या अर्जुनाची नक्कल, आम्हीं आमचे बिळे कोयते आणि चाकू काऱ्या विजयादशमीच्या दिवशीं साफसूफ करून त्यांचेंच पूजन करून, करीत असलों तर नवल कशाचें ! हत्यारांचा कायदा ह्या आयुधांना अजून हत्यारें म्हणत नाहीं हें आमच्या शेतकऱ्यांचें, कारकुनांचें आणि शिंपी दादाचें मोठें भाग्यच समजलें पाहिजे ! शमीचें आणि हत्यारांचें पूजन करण्याचा हा प्रकार झाला. हत्यारांचें स्थान जसें विळ्या कोयत्यांना मिळालें तसेंच आमच्या सुवर्णभूमींतील सोन्याचें स्थान आपट्यानें पटकावलें आणि विजयादशमीच्या शुभ दिवशीं सोनें म्हणून आम्हीं आपट्याचीं पानें आपल्या इष्टमित्रांना नजर करूं लागलों. अशा स्थितींत आपट्याच्या पानांच्या विड्या फुंकून त्यापासून निघालेला धूर म्हणजे सोन्याचाच धूर ! असा सोन्याचा धूर आर्यभूमींत रगडून निघत असतां, दादाभाई प्रभृति आमचे देशबांधव हिंदुस्थान दरिद्री झालें असें म्हणाल्यास त्यावर कोण कसा भरंवसा ठेवणार ! (दिग्विजयार्थ आमचे पूर्वज बद्धपरिकर होऊन विजयादशमीच्या अत्यंत मंगल अशा दिवशीं वेशीच्या बाहेर शिबिरामध्यें जाऊन रहात. आज ह्या गोष्टीचेंहि अनुकरण आह्मीं करितों. ताशे वाजंत्री लावून मिरवत मिरवत गांवाबाहेरच्या एखाद्या बजरंग बळीच्या देवळांत जाऊन त्याच्या टाळक्यावर आपट्याचीं चार पानें वाहिलीं कीं झालें सीमोल्लंघन !)

दसरा हा जगदंबेचा उत्सवदिन आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नऊ दिवस अहोरात्र जगदंबेची आराधना करणें आणि तिच्या प्रीत्यर्थ यजन याजन करणें हा त्या नवरात्र महोत्सवाचा कार्यक्रम. जगदंबा ह्मणजे जगाची आई. ती आपल्या सर्व लेकरांकडे-यच्चयावत् प्राणीमात्राकडे वात्सल्य प्रेमानें पहाते. सापत्नभाव तिच्या ठिकाणीं नाहीं. ब्राह्मण तेवढा स्वतःचा लाडका लेक आणि महार ह्मणजे सवतीचा

कारटा, असें तिला वाटत नाहीं. असें असतां आजच्या नवरात्र महोत्सवांत काय होतें ? अस्पृश्य जातींना देवळाचा उमरठा ओलांडण्याची बंदी होते ती काय म्हणून ? जगज्जननी अंबाबाईच्या ठिकाणीं असा भेदभाव कां दृष्टीस पडतो ? हा भेदभाव तिच्या ठिकाणीं नसून आपणांस श्रेष्ठ ह्मणविणाऱ्या जातीच्या लोकांनींच तो तिच्या मंदिरांत उत्पन्न केला आहे. ही मानवीविषमता ज्या वेळीं आमच्या देवतांच्या पवित्र ठिकाणांतून नाहींशी होईल त्यावेळींच त्यांच्या मूर्तीच्या ठिकाणीं खरी देवकला प्रादुर्भूत होईल आणि आम्हांला त्यांच्या अर्चनाचें फळ मिळेल. त्या जगन्मातेला आम्हांप्रमाणेंच प्रिय असलेल्या तिच्या सात कोटी लेंकरांस - आम्हीं आपल्या बंधूंस - जों पर्यंत तिच्या चरणाचें वंदन करूं देणार नाहीं, तिच्या पूजनाला प्रतिबंध करूं, इतकेंच काय पण तिच्या मंदिराची पायरीहि ओलांडूं देणार नाहीं, तोंपर्यंत आमची मातृभक्ति म्हणजे केवळ ढोंग आहे असें वाटून ती आम्हां केवळ जन्मानेंच थोर म्हणविणाऱ्या घमेंडखोरांच्या अर्चन पूजनाला कवडीचीहि किंमत देणार नाहीं. आम्हीं आपल्या बंधूंशीं करीत असलेली ही प्रतारणा पाहून भवानी आम्हांवर रागावेल. तिचा हा कोप हेंच आमच्या अधःपाताचें कारण नसेल असें तिचा कोणता भाविक भक्त आम्हाला अगदीं छातीठोक सांगण्यास समर्थ आहे.

जगाची ही जननी, प्राणीमात्रांकडे समदृष्टीनें पहाणारी ही त्यांची माता, एखाद्या क्रूर श्वापदापमाणें कोंबड्या बकऱ्यासारख्या निरुपद्रवी प्राण्यांच्या संहारानें संतुष्ट होते अशी कल्पना करून आम्हीं तिच्या नांवानें त्यांचे बळी देऊन आपली मांसभक्षणलालसा तृप्त करून घेतों. हें असलें अनार्यांचें कर्म आम्हां आर्य म्हणविणारांस शोभतें काय? यानें आमच्या शीलाला कमीपणा येतच नाहीं काय? विजयादशमीच्या दिवशी देवाच्या नांवानें देण्यांत येणाऱ्या ह्या बळींचे आत्मे त्यांना बळी देणाऱ्या आमचा विजयच चिंतीत असतील नाहीं बरें ?

महिषासुरासारख्या दुष्ट राक्षसाचा संहार करून जगज्जननीनें जगाचें संकट दूर केलें. आज ह्या गोष्टीचें स्मारक म्हणून आम्हीं ह्या तिच्या महोत्सवांत, आमच्या देशाचें जीवन अशा शेतीच्या कामाला अत्यंत उपयोगी पडणाऱ्या महिषाचा बळी तिला तिच्या संतोषार्थ (?) अर्पण करितों. धन्य धन्य आमचें कार्यकारण ज्ञान, धन्य धन्य आमची स्मारकविषयक कल्पना, धन्य धन्य आमची भूतदया आणि धन्य धन्य आमची देवपूजा ! विजयादशमीच्या शुभ प्रसंगीं आमच्या अकलेचा हा मोठाच दिग्विजय म्हणावयाचा !

आतां आपण ह्या सणांतील राहिलेल्या एका भागाचा, ह्मणजे सीमोल्लंघनाचा विचार करूं. दिग्विजयार्थ नगरवेशीबाहेर पडणाऱ्या पूर्वजांचें अनुकरण ह्मणून मंगल वाद्यांनिशीं आपली स्वतःची मिरवणूक काढून आह्मीं आज सीमोल्लंघन करीत असतों हें आमच्या पूर्वजांच्या सीमोल्लंघनाचें अधम अनुकरणच नाहीं काय? आज आह्मीं आपल्याला जरी अगदीं शांतिब्रह्माचे अवतार अजातशत्रु धर्मराज समजत असलों, तरी मन एव मनुष्याणां शरीरस्थी महान् रिपुः आमच्या शरीरांत वसत असलेला हा मनोरूपी प्रबल शत्रु आह्मीं जिंकला आहे काय? हा शत्रु आपल्या वसतिस्थानाला नानाप्रकारचीं काल्पनिक सुखें देण्याकरितां आमच्या हृदयांत नानाविध वासनांचा उद्भव करून त्यांच्या प्राप्त्यर्थ आमचा बुद्धिभ्रंश करितो आणि आमच्या इंद्रियांकडून शेंकडों अनन्वित कृत्यें घडवितो. आज तो ज्याला नखशिखांत यूरोपियन पेहेराव पेहरावयास लावितो, त्यालाच उद्यां शुद्ध स्वदेशी खानदानी (?) खादीचा पोशाख चढवून गांधींचा अनुयायी ह्मणून गांवभर मिरवावयास लावतो. आतां तो ज्याच्या

हातांकडून एखाद्या अधिकाऱ्याची थुंकी झेलवितो, त्याच्याच जिव्हेला थोड्या वेळानें एखाद्या गिरणीच्या मैदानांत असहकारितेची बडबड करावयास लावतो. आज तो ज्याच्या जिव्हेकडून अस्पृश्यतानिवारणावर व्याख्यानें झोडवितो, त्याच्याच हाताला त्याच अर्थाच्या लेखावर सही करते वेळीं थरथर कांपावयास लावितो. ज्याच्या पायांकडून तो तीर्थयात्रा करवितो, त्याच्याच पायांकडून त्याच तीर्थाच्या ठिकाणीं वारांगनांचे जिने चढवितो. ज्या तोंडाकडून तो वेदपठण करवितो त्याच तोंडाकडून मद्याचे घोट घेववून त्याला अद्वातद्वा बडबडावयास लावतो. असला हा भयंकर शत्रु जिंकण्याचा प्रयत्न आम्हीं विचारवंत मनुष्य प्राण्यांनीं अवश्य केला पाहिजे आणि त्याकरितां ह्या विजयादशमीच्या सुमुहूर्तावर आम्हीं आपल्या भोंवतालच्या मानवी मायेची सीमा जरूर उल्लंघन केली पाहिजे. त्या सीमेमुळेंच आम्हांला आम्हीं सबळ असून दुर्बळ आहों असें वाटतें. याच अटकेमुळें आम्हांला आम्हीं विक्रमशाली असून पराक्रमशून्य आहों असें वाटतें. फार तर काय आमच्या ठिकाणीं प्रत्यक्ष ईश्वरीतेज आत्मरूपानें स्फुरण पावत असतां, याच सीमेमुळें आम्हीं आपणांस अगदींच निस्तेज समजत असतों. ही असली आम्हांस दुर्बल, पराक्रमहीन आणि तेजोरहीत बनविणाऱ्या सीमेची भ्रामक मर्यादा जर विजया दशमीच्या दिवशीं आह्मी उल्लंघन केली नाहीं तर ढोलक्यांच्या दणदणाटांत काढलेल्या पोकळ मिरवणुकी केवळ निष्फलच समजल्या पाहिजेत. ही असली अगदीं आमच्या हृदयाच्या नजीकची सीमा ज्याला उल्लंघितां येत नाहीं, ही सीमा ओलांडून आपल्या अंतर्यामीं वसत असलेल्या शत्रूस जिंकण्यास जो समर्थ नाहीं, तो देशाच्या सीमा उल्लंघण्यास आणि देशाच्या शत्रूला धुळीचे दिवे चारण्यास केवळ असमर्थच असला पाहिजे आणि याच साठीं मायेच्या निरासाचें आणि मनोजयाचें महत्त्व आमच्या तत्त्ववेत्त्या पूर्वजांनीं विशेष प्रकारें वर्णन केलें आहे !

आह्माला जें दुसरें सीमोल्लंघन केलें पाहिजे तें आमच्या अज्ञानावस्थेंत तत्कालिन समाजाग्रणी ह्मणविणाऱ्यांनीं आह्मां भोवतीं घातलेल्या आचारांच्या सीमेचे. हे आचार आज आम्हा स्वतःस, स्वतःच्या कुटुंबांतील माणसास, आमच्या समाजास आणि पर्यायानें आमच्या देशास घातक होत असल्याबद्दल आमची पदोपदीं कितीहि खातरी पटत असली तरी सुद्धां ही आचारसीमा उल्लंघन करण्या इतकें नीतिधैर्य आमच्या ठिकाणीं नसावें, राजकीय दास्यांतून मुक्त होणाऱ्यांनीं सदा सर्वदा ह्या आचारपदास्यांत खितपत पडावें, ही खरोखरच अत्यंत केविलवाणी स्थिति आहे ! ह्या लाजिरवाण्या स्थितींतून मुक्त होण्याकरितां कित्येक शतकांपूर्वी आह्माभोवतीं घातलेल्या आमच्या आत्मोन्नतीला अडथळा करणाऱ्या सीमा बेधडक उल्लंघन केल्या पाहिजेत.

रूढी राक्षसीनें पोसलेल्या ह्या आचारांचे आणि शरीरस्थ मनःशत्रूनें निर्माण केलेल्या मायिक अशा सीमांचें उल्लंघन करणें हेंच खरें सीमोल्लंघन. यापुढें, वाजंत्री लावून मिरवत मिरवत गांवाबाहेर जाऊन गांवाची सीमा उल्लंघण्यापेक्षां, विजयादशमीच्या सणाच्या दिवशीं हें असलें सीमोल्लंघन करण्याचा प्रारंभ आह्मीं केला पाहिजे. ज्ञान हें प्रस्तुत युगांतील प्रचण्ड प्रभावशाली हत्यार आहे. काळाच्या प्रभावाने ह्या हत्यारांवर इतर हत्यारांप्रमाणें गंज न चढतां तें काळाच्या गतीबरोबर अधिकाधिक उज्ज्वल होत जातें आणि कोणी केवढाहि मुत्सद्दी असला तरी त्याला तें आपणांपासून हिसकावून घेण्याचें सामर्थ्य नसतें. हे हत्यार सर्व आबालवृद्ध स्त्री पुरुष हिंदवासीयांनीं आपल्या हातांत घेण्याचा उपक्रम पुढील विजयादशमीस केला पाहिजे.

जातीभेद कोणत्याहि कारणानें उत्पन्न झालेले असोत आणि धर्मपंथ निघण्याचे हेतु कांहींहि असोत, ऋषींच्या कुळांप्रमाणेंच आज ह्या गोष्टीचीं मुळें उकरीत बसून लेखणीचा आणि जिव्हेचा शोष करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. ईश्वराला जशा सर्व जाती आणि धर्म सारखे, तसाच सर्व जातींना आणि धर्मांना ईश्वर सारखाच पूज्य आणि सारखाच दर्शनीय आहे. आजची विषमता कोणीहि निर्माण केलेली असली तरी ती मनुष्यनिर्मित आहे, ईश्वरनिर्मित नाहीं, ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन हिंदमातेला आपली माता समजणारा-नुसता कंठशोष करून वंदे-मातरम् ह्मणून ओरडणारा नव्हे-कोणत्याहि जातीचा असो अथवा कोणत्याहि धर्माचा असो, आह्मांला तो आमचा बंधु वाटतो ही गोष्ट आह्मीं केवळ शब्दांनींच नव्हे तर प्रत्यक्ष आचारांनीं सर्वांच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे. हिंदुस्थानांतील देवळें आणि मशिदी, चर्चे आणि अग्याऱ्या हिंदी जनांची पवित्र सस्थानें झालीं पाहिजेत आणि 'देव बाटतो किंवा देवस्थानें भ्रष्ट होतात,' ह्या भ्रामक कल्पना नाहींशा झाल्या पाहिजेत म्हणजे आमच्या जगदंबेच्या नांवाचें सार्थक होईल आणि आमचा नवरात्र महोत्सव त्या जगदंबेच्या प्रसन्नतेस कारण होईल.

सारांश, ज्या विजयादशमीच्या सणाच्या दिवशीं आम्हीं आपल्या मायेच्या सीमा उल्लंघन करून आपल्या मनावर विजय मिळवूं, ज्या दिवशीं आत्मोन्नतीच्या आड येणाऱ्या रूढीच्या सीमा आक्रमण करण्या इतकें मनोधैर्य आम्हांमध्यें उत्पन्न होईल, ज्या दिवशीं हिंदुस्थानांतील प्रत्येक स्त्री पुरुष आपल्या हातांत देदीप्यमानं ज्ञानाचें हत्यार घेऊन अज्ञानरूपी इतस्ततः धुडगूस घालणाऱ्या शत्रूचा निःपात करण्याला तयार होईल आणि ज्या दिवशीं आम्हीं आपसांतील मानवनिर्मित जातीचे आणि धर्माचे भेद दूर झुगारून देऊन हिंदी बांधव म्हणून एकमेकांस प्रेमानें भेटूं, ज्या दिवशीं हिंदुस्थानांतील शमीचीं आणि आपट्याचीं पानेंच काय पण येथील प्रत्येक रजःकण सोनें बनून हिंदुस्थान आपल्या पूर्व वैभवानें संपन्न होऊन जगांतील प्रत्येक देश त्याला मोठ्या प्रेमादरानें वंदन करील, तोच खरा दसऱ्याचा सण आणि तीच खरी विजयादशमी ! अशी विजयादशमी लौकरच उगवून हिंदमाता विजयी होवो असें चिंतून आणि पुढें दिवाळीच्या सणाविषयींचे आपले विचार केव्हांतरी व्यक्त करण्याचें अभिवचन देऊन हा बराच लांबलेला लेख येथें संपवितों.

□□□

अग्रलेख

मानसिक दास्याविरुद्ध बण्ड

(लेखांक १ ला)

मनुष्य प्राणी हा जात्याच मोठा बण्डखोर आहे. किंबहुना परमेश्वराचें प्रतिनिधित्व मिरविणारी आम्हा मानवाची आत्मज्योत हीच वास्तवीक बण्डखोर प्रवृत्तीची आदिमाया असल्यामुळें, मनुष्याच्या बण्डखोरपणाची जबाबदारी थेट परमेश्वराकडेच जाते. तात्विक दृष्टीनें विचार केला तरी बण्डखोरपणाचा संदेश मनुष्याला परमेश्वराकडूनच मिळालेला आहे आणि त्याची अंमलबजावणी मातेच्या गर्भांतल्या सूक्ष्म पिंडावस्थावस्थेपासून तों जन्माच्या पाठोंपाठच येणाऱ्या मरणाच्या शेवटल्या क्षणापर्यंत मनुष्य यथामति यथाशक्ति करीतच असतो. वेदान्ताच्या भाषेंत बोलायचें तर प्राणी गर्भाशयाच्या कोठडींत हातपाय जखडून बंदींत पडलेला असतो तेव्हां एखाद्या डिप्लोमॅट मुत्सद्याप्रमाणें वेळ मारून नेण्यासाठीं मुकाट्यानें 'सोऽहम् सोऽहम्' (तोच मी आहे) असें म्हणत असतो. सतत नऊ महिनें सोऽहम्ची अखंड प्रतिज्ञा केल्यामुळें परमेश्वर-जेलर त्यावर खुष होऊन त्याची तुरुंगांतून मुक्तता करतो. तुरुंगाच्या बाहेर एकच पाऊल पडतें न पडतें तोंच बेटा 'कोऽहम् कोऽहम्' चा (कोण मी ? आणि कोण तूं ?) असा एकच कोलाहल करून गुरूच्या तंगड्या गुरूच्या गळ्यांत घालतो; आणि परमेश्वराच्या हातावर हात मारून सांगतो कीं तूं जर एकपट बण्डखोर असशील तर हा तुझा पट्टशिष्य दसपट बण्डखोर आहे, हें खूप ध्यानांत ठेव. मनुष्याची ही प्रवृत्ति सृष्टीचें स्पृहणीय लेणें आहे. मनुष्यानें या प्रवृत्तीचा जर संन्यास केला, तर परमेश्वरानें निर्माण केलेल्या या नानारत्ना वसुंधरेचा प्राण व्याकूळ होईल, तिच्या उत्पत्तिकाळापासून तों वर्तमान घडीपर्यंत फोंफावत चाललेल्या इतिहासाचा प्रचंड ओघ वाळून सुकाठाक पडेल, सारांश मानवी प्राण्याच्या बण्डखोर प्रवृत्तीचा ऱ्हास हा साऱ्या अनंत सृष्टीचा अधःपात केल्याशिवाय रहाणार नाहीं. डॉ. रवींद्रनाथ टागोर म्हणतात कीं 'या जड सृष्टीवर साम्राज्यसत्तेची हुकमत चालविण्याची शक्ति परमेश्वरानें मानवांच्या मनोवृत्तीला दिलेली आहे.' आत्मबंधन किंवा आत्ममोक्ष ही स्थिति आपल्या मनाच्या आधीन आहे. मनोवृत्ती जशी उंच अंतराळांत उड्डाण करूं शकते, तशी ती नीचतम गर्तेत अवनतहि होऊं शकते. अविच्छिन्न स्वातंत्र्य किंवा गाळीव गुलामगिरी या दोनहि स्थिति मनाच्या वरचढ अथवा निर्बळ कार्यक्षमतेवर अवलंबून असतात. एवढ्याच करितां बाह्य परिस्थितीच्या उलटसुलट भरती ओहटीच्या लाटांनीं व्यक्तीच्या चरित्राचें बाह्यांग जरी दुखावलें किंवा सुखावलें, तरी

एन ४००६--८

मनाचा कोट अभंग शाबूत ठेवण्याचा सर्व सज्जन तत्ववेत्त्यांनीं कंठरवानें उपदेश केला आहे. समर्थ रामदासानीं एवढ्याच साठीं 'जनाचे श्लोक' न लिहितां 'मनाचे श्लोक' प्रचलित केले. बेकन सुद्धां the mind is the man मन ह्मणजेच मानव, असें ह्मणतो. अर्थात् मानवांची बरी वाईट स्थिति ही त्यांच्या मनाच्या उन्नत किंवा अवनत दशेवरच अवलंबून असते. येथें सुद्धां आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं उन्नत किंवा अवनत स्थिति ही स्थिरावस्थेपेक्षां पुष्कळ बरी. घड्याळाचा लंबक थेट उजवीकडे नाहीं तर थेट डावीकडे असो, त्याच्यांत परावर्तनशक्तीचा जोर तरी असतो; पण लंबक मधोमध येऊन स्तब्ध उभा राहिला कीं घड्याळाचे बारा वाजले, हें कोणीहि सांगूं शकतो. गुलाम राष्ट्रें स्वतंत्र होतील व कर्मन्यायानें स्वतंत्र राष्ट्रें गुलाम होतील; परंतु ना स्वतंत्र ना गुलाम असली निष्क्रीय राष्ट्रें समाज वा व्यक्ती ठार मेल्याच ह्मणून समजावें. निष्क्रीयता हें मेल्यामनाचें चिन्ह असतें. मनच मेलें कीं मानव तरी कोठें उरतो? ह्मणून मनाची चिच्छक्ति, मनाची विचारणा शक्ति, मानवाची विवेकबुद्धि क्षत्रियाच्या समशेरीप्रमाणें सदैव पाजळून ठेवली पाहिजे. मनुष्याची चिकित्सक बुद्धि जावत्काळ कार्यक्षम आहे, पाणीदार आहे, तरतरीत पाजळून ठेवली आहे, तावत्काळ त्याला कोणच्याहि प्रकारच्या गुलामगिरीच्या सांथीचा ताप बाधा करणार नाहीं. अमेरिकेंत गुलामांचा व्यापार सुरू होता, त्यावेळीं कोट्यवधि नीग्रोजन विवेकभ्रष्ट अशा स्थिरावस्थेंत खुशाल कुजत होते. परंतु जेव्हा महात्मा बूकर टी. वाशिंग्टन् 'विवेकशक्तीची समशेर पाजळा' असा संदेश घेऊन त्यांच्यांत अवतरला, तेव्हां सूर्यापुढें जसें धुकें पळतें, तशी गुलामगिरीची माया नीग्रोसमाजाच्या चिकित्सक विवेकोदयाबरोबर कोठच्या कोठें पसार झाली. कपटपटु राजकारणी सट्टेबाजी न करतां, अत्याचारी प्रवृत्तीचा लवलेशहि शिंतोडा उडवून न घेतां, किंवा रक्तपाताचा, कलहाचा अथवा मत्सराचा प्रसंग स्वप्नांतहि न आणतां, पशुवत् गुलामगिरींत कुजणाऱ्या समाजबांधवांना बिनमोल इभ्रतीचे सुसंस्कृत नागरीक बनविणारा महात्मा बुकर हा आधुनिक युगांतला एक अद्वितीय चमत्कार होऊन गेला. या चमत्कारांतलें बीज हेंच आहे कीं मनुष्यानें आपली चिकित्सक विवेकबुद्धी जर जागृत ठेवलेली असेल, तर तो कोठच्याहि बऱ्यावाईट बाह्य स्थितींत सुद्धां पूर्ण स्वतंत्र असा राहून आत्मोद्धाराबरोबरच जगदुद्धारहि करण्यास समर्थ होतो. विवेकशक्तीचा पराक्रम इतका दांडगा असल्यामुळेंच बहुसंख्यांकांच्या गुलामगिरीवर स्वतांच्या वैभवाचे टोलेजंग बुरूज उभारणारे अल्पसंख्यांक दूरदृष्टी जेते जितांच्या विवेक बुद्धीला, चिकित्सक विचारणा शक्तीला, ह्मणजे त्यांच्या मनाला लंजूर करण्याकडे आपल्या युक्तिसर्वस्वाची शिकस्त करीत असतात. शारिरीक गुलामगिरीपेक्षां मानसिक गुलामगिरी फारच भयंकर, मानसीक गुलामगिरी ह्मणजे मनाचें मरण आणि मनाचा मृत्यू ह्मणजे माणुसकीचा संपूर्ण अधःपात होय. मानसीक गुलामगिरीचीं प्राण घातक बीजें धर्माच्या क्षेत्रांत फार लवकर रुजतात आणि या कामीं राजकारणी चाणक्यांना भिक्षुकशाहीच्या मदतीची अपेक्षा फार असते. याचें कारण भिक्षुकशाहीचे पंचप्राण जनतेच्या मानसीक दास्यावरच जिवंत रहात असल्यामुळें, यदाकदाचित् शुद्ध राजसत्ताधाऱ्यांनीं पृथ्वीवर लोकशाहीचें साम्राज स्थापन करण्याची महत्वाकांक्षा जरी बाळगिली तरी राजा व प्रजा यांच्या या एकमुखी संयुक्त उद्देशाला हाणून पाडण्यासाठीं प्रतिकाराची टक्कर मारायला भिक्षुकशाही खवळलेल्या सर्पाप्रमाणें फूत्कार टाकायला सोडणार नाहीं. अशा प्रसंगीं शास्त व शासित यांना राष्ट्रोद्धाराचीं इतर सर्व कार्यें एका बाजूला ठेवून, धर्माच्या क्षेत्रांत मस्तवाल झालेल्या भिक्षुकशाही सर्पाचे दांत पाडण्यासाठीं एक जुटीनें प्रयत्नांची शिकस्त करावी लागते.

याचीं अनेक उदाहरणें आपल्याला इतिहासांत सांपडतील. हिन्दुस्थानावर आजपर्यंत अनेक परचक्रें आलीं, राज्यक्रांत्या झाल्या व राष्ट्रीय जीवनाच्या मूलभूत तत्वांवर प्राणघातक आघातहि झाले. परंतु भिक्षुकशाहीच्या सोंवळ्या धार्मिक गुंडगिरीनें हिन्दु राष्ट्राचा जेवढा अधःपात झाला आहे, तेवढा इतर कशानेंहि झालेला नाहीं. याचें कारण परचक्रांनीं बाह्य स्थितीचे कितीहि ढलपे सोलवटून काढले असले, तरी राष्ट्राच्या मनोवृत्तीची मुंडी पिरगाळण्याचें राष्ट्रद्रोही कर्म भिक्षुकशाहीनेंच केलेलें आहे. राष्ट्राची विचारणा शक्ति भिक्षुकशाहीच्या स्वार्थी चक्रांत पिळवटून आतां तिचें प्राणोत्क्रमण होणार, असें दिसतांच वेळोवेळीं नवमतवादानेंच पुढें सरसावून तिचें संरक्षण केलें आहे.

हिन्दु धर्माच्या इतिहासांत राष्ट्रीय विवेकाच्या प्राणरक्षणासाठीं खऱ्या लोकशाहीचा प्रभाव जर कोणी दाखविला असेल आणि धार्मिक क्षेत्रांतल्या उदारतम भावनेनें सामाजिक व राजकीय जीवनांत पूर्ण स्वातंत्र्य, योग्य तो लवचिकपणा आणि वैयक्तिक बुद्धिविकासाला वांव दिला असेल तर तो फक्त गौतमबुद्धाच्या बौद्ध धर्मानेंच होय. बौद्ध धर्मानें भिक्षुकी धर्माचीं कणखर हाडकीं चेंचून काढून हिन्दु धर्माला कांहीं शतकें खऱ्या लोकशाहीचें वैभव दाखविलें. धार्मिक प्रदेशांत सर्व मानव बंधु एकाच दर्जाचे ठरविल्यामुळें, भिक्षुकशाहीनें आपल्या आत्मवर्चस्वाच्या स्तोमासाठीं सामाजिक प्रदेशांत उभारलेले जातिभेदाचे टोलेजंग तट आपोआप जमीनदोस्त झाले आणि त्या तटांच्या दगडमातीच्या ढिगाराखालीं ब्राह्मणांची भिक्षुकी इभ्रत जिवंत गाडली गेली. आजला विसाव्या शतकांत नामधारी ब्राह्मणांच्या भिक्षुकशाहीच्या राष्ट्रीय गुंडगिरीचा जो धिंगाणा चालूं आहे, त्याच मासल्याचा भिक्षुकी धिंगाणा क्षत्रिय राजपुत्र गौतम बुद्ध याचा अवतार होण्यापूर्वी हिंदुस्थानांत आपल्या वेदोक्त वर्चस्वाची धूळवड शेणवड खेळण्यांत कोणासहि जुमानिनासा झाला होता. या वेळीं भिक्षुकशाहीनें क्षत्रियादि त्रैवर्णिकांना बौद्धिक सामर्थ्यात लंजूर करून राजकारणाचे सर्व धागेदोरे आपल्या हातीं ठेविले होते, इतकेंच नव्हे तर हिन्दुजनांच्या सर्व धार्मिक कृत्यांचे ते अपदच्युत कायम मक्तेदार बनले होते. अर्थात् मक्तेदारींत ज्या ज्या फंदफिसाटांचा अंतर्भाव नेहमींच होत असतो, त्या त्या सर्वांचा भिक्षुकशाहीनें शेंकडा सव्वाशंभर अंमल करायला सोडलें नाहीं. वाटेल तशा अटींच्या दक्षिणा दानें व अग्रहार उपटणें, नाना तऱ्हेचे नवीन नवीन बीभत्स आचार उत्पन्न करून लोकांत देवभोळेपणा माजविणें व यज्ञयागांतील दारूबाजी व मांसबाजी यथेच्छ उपभोगणें अशीं सोंगेढोंगें बुद्धपूर्वकालीन् भिक्षुकशाहीनें इतकी माजविलीं होतीं की देवाला धत्तुरा दाखवून देवाच्या ऐवजीं हेच चाण्डाळ भिक्षुक चालते बोलते भूदेव होऊन बसले. मंत्रतंत्रांचीं, यज्ञांतल्या बेसुमार पशुहत्त्येचीं आणि दारुबाजीचीं एवढीं जबरदस्त बंडें हिन्दु धर्माच्या पवित्र क्षेत्रांत धुमाकूळ घालूं लागलीं कीं त्यांनीं सारा हिन्दुधर्म रुधिरप्रिय व अट्टल दारुबाज बनवून सोडला. यज्ञांतील हत्येची मर्यादा घोडा गाई बैल टोणगे ह्यशीवरच न थांबतां, अखेर नरयज्ञापर्यंत तिची राक्षसी मजल गेली. याशिवाय जातिभेदाचा आणि भिक्षुकी वर्चस्वाचा तर इतका बडेजाव भिक्षुकशाहीनें माजविला कीं ब्राह्मण ह्मणजे ब्रह्मदेवाचा बाप होऊन बसला व इतर लोक म्हणजे त्याच्या पायांतले वहाणा जोडे बनले. उपनिषत्काळीं ज्या क्षत्रियांनीं आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर आत्मविद्येचा शोध लावून त्याचीं सनातन तत्वें शोधून काढली व वरचढ भिक्षुकशाहीला आपल्या पायतणांची शागिर्दी करण्या भाग पाडलें, ते क्षत्रिय लोकसुद्धां या वेळीं हतवीर्य बनलेले होते. क्षत्रियांचीच जेथें हतवीर्यता, तेथें वैश्य शूद्रांची स्थिति काय असेल याची कल्पना तरी करावी किंवा

एन ४००६--८अ

तो इतिहास मुळांतच वाचावा. भिक्षुकशाहीनें हिन्दुधर्माची तर मनस्वी चिटंबना चालवलेली; आणि बहुजनसमाजाचा सनातन वाली जो क्षत्रिय वर्ग तो भिक्षुकी कारस्थानांच्या जाळ्यांत गुरफटून हतबल झालेला ! अशा परिस्थितीत तरणोपाय काय? हा प्रश्न सर्वत्र उत्पन्न झाला. चिकित्सक विवेकबुद्धि येथें जागृत झाली. प्रश्न उपस्थित होण्याचीच आधीं फार मारामार पडते. पण एकदां प्रश्न निर्माण झाला कीं त्याचें उत्तर निसर्गदेवता तेव्हांच देते. जगांतील अखिल वाङ्मयांतल्या असंख्य शब्दश्रेणींत कां या एकाच अक्षरानें आजपर्यंत जो पराक्रम व जी क्रान्ति घडवून आणली आहे, ती कोणत्याहि मुत्सद्याच्या, तपस्व्याच्या, तत्ववेत्त्याच्या किंवा तरवार बहाद्दराच्या बुद्धिसर्वस्वानें घडवून आणलेली नाहीं. कां? हा मानसीक दास्याच्या चिंधड्या चिंधड्या उडविणारा दिव्य ईश्वरी मंत्र आहे. मनुष्यांत जर कां नसेल, तर त्याला मनुष्य म्हणतांच येणार नाहीं. ज्याला कां आठवला किंवा कां ची महति उमगली, तो नर झाला व लवकरच नारायण होणार ही खूणगांठ बांधावीं. एरवीं बहुतेक सर्व माणसें वा वा (वाहवा) करण्यांत गुंगणारीं अंधश्रद्धाळू माणसें असतात; म्हणजे त्यांना कां चा चिकित्सकपणा परिचित झालेला नसतो, तीं वानरें असतात. मनुष्य जेव्हां वा-नराचा कां-नर होतो, तेव्हांच त्याला स्वातंत्र्याची खरी जाणीव होऊन मानसीक गुलामगिरीच्या ओंगळपणाचा त्याला तिटकारा येऊं लागतो. कोणत्याहि परिस्थितीबद्दल कां? हा प्रश्न विचारण्याची हिंमत ज्या व्यक्तींत अगर समाजांत उत्पन्न होते, तीच व्यक्ति व तोच समाज जागृत झाला असें समजावें. वा वा ! ही गुलामगिरीची मेंढरी निशाणी व कां कां? हा खऱ्या माणुसकीचा ट्रेडमार्क होय. वानें अज्ञानाची खूण पटते तर कां डोळस ज्ञानाची साक्ष पटवितो. बुद्धपूर्वकाळीं भिक्षुकशाहीनें हिन्दु धर्माला जें एक रुधिरप्रिय रानटी धाटणीचें वळण लावलें व आपला बडेजाव माजविण्यासाठीं सामाजिक व राजकीय बाबतींत सुद्धां नाहीं नाहीं ते फंद उपस्थित केले, त्यांवर बहुजनसमाज व विशेषतः क्षत्रिय वर्ग जेव्हां कां? म्हणून पृच्छा करण्यास उद्युक्त झाला, तेव्हांच हिन्दु धर्माच्या पूर्व दिग्भागीं नववविचाराचा संदेश देणारी नवयुगाची रम्य उषा हंसत हंसत आली व थोड्याच अवधींत तिच्या पाठोंपाठ क्षत्रिय शाक्य कुलांतला तेजोराशी आर्यभानू गौतम बुद्ध साऱ्या जगतितलावर आपल्या डिमॉक्रॅटिक धर्माचा दिव्य प्रकाश पाहूं लागला. हा सर्व कां? मंत्राचा प्रताप.

□□□

लेख

सायन्स आणि मानवजाति

वेस्टमिन्सटरमध्यें राजयक्ष्म्याच्या समाचारार्थ भरलेल्या अंतर्राष्ट्रीय परिषदेच्या पहिल्याच बैठकींत जगांतील सुधारलेल्या बहुतेक सर्व भाषांतून चाळीस वक्त्यांचीं भाषणें झालीं, हा खरोखर कालमहिमा म्हटला पाहिजे. गेलीं हजारों वर्षे ज्या बलिष्ठ रोगानें सर्व मानवजातीस त्राहि भगवन् करून सोडलें आहे, त्याला कायमची मूठमाती कशी देतां येईल या एकच विचारानें प्रेरित होऊन इतक्या भिन्न भिन्न राष्ट्रसंस्कृतीचे लोक एकत्र जमल्याचा हा पहिलाच प्रसंग होय ! ब्रिटिश राज्याचे प्रतिनिधी म्हणून लॉर्ड कर्झन या सभेस हजर होते. ते सर्व सभासदांस उद्देशून म्हणाले कीं ''आपण सर्व मानवजातीची एका भयंकर आपत्तींतून सुटका करण्याकरितां जमलां आहां. नुसत्या ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंड मध्येंच आठवड्यास एक हजारपर्यंत जीव एका क्षयरोगास बळी पडत आहेत. दुसऱ्या देशांतील अनर्थ याही पेक्षां शोचनीय आहेत.''

लॉर्ड साहेबांचे हे शब्द विचार करण्यासारखे आहेत. भौतिक शास्त्रे मानवजातीच्या प्रत्यक्ष कल्याणास कशीं पोषक आहेत, हें त्यावरून चांगलेंच स्पष्ट होतें. शास्त्रज्ञ लोकांना एकट्या क्षयरोगासारख्या बलाढ्य राक्षसाशींच तोंड द्यावयाचें आहे, असें तरी थोडेंच आहे? असले कोट्यवधि शत्रू आज मानवजातीच्या बोकांडीं बसले आहेत. कांहीं वेदोनारायण भौतिक शास्त्रांच्या भयंकर परिणामाकडेच फक्त बोट दाखवून अर्वाचीन शास्त्रांची आणि शास्त्रज्ञांची टवाळी करण्यांत मोठा आनंद मानतात. खुद्द इंग्लंडचा विचार केला तरी लॉर्ड लिस्टर या एकट्या महात्म्यानें केलेली मानव जातीची सेवा तेथल्या पन्नास हजार भिक्षुक भूदेवांच्या (?) सेवेपेक्षां कनिष्ट ठरविण्याचे धाडस कोणी करील काय? मानवजातीला पोंखरणाऱ्या क्षयाच्या वाळवीचा नायनाट करण्याच्या कामीं या महात्म्यानें आपलें सर्व बिनमोल आयुष्य खर्ची घातलें.

मृत्यूला भीषणतम बनविण्यांत भिक्षुकशाहीचा हातखंडा आहे; कारण त्यावर त्यांचें पोट अवलंबून आहे. परंतु लिस्टर, सिंपसन आणि त्यांचे पुण्यशील सहकारी यांनीं मृत्यूचा अर्धाअधिक भयानकपणा नष्ट केला आहे. मृत्यु टाळणें जरी अशक्य असलें तरी मृत्युपूर्वीच्या अनंत आधिव्याधींच्या यातना पुष्कळ कमी करण्याचें श्रेय यांच्या अलौकीक शोधांना मिळालें आहे. एकोणिसाव्या शतकांत

धर्मभोळेपणामुळें जितके जीव मारले गेले त्यापेक्षां कितीतरी अधिक जीव या शास्त्रज्ञांनीं आपल्या अलौकिक शोधांच्या जोरावर वांचविले आहेत.

रोगांच्या कारणांच्या मीमांसपद्धतींत गेल्या दोन पिढ्या या शास्त्रज्ञांनीं विलक्षण क्रांती घडवून आणलेली आहे. लुईपाश्चयूरच्या कामगिरीचा क्षणभर विचार केला तर मन थक्क होऊन जातें ! हा विलक्षण संशोधक प्रथम रसायन शास्त्राचा अभ्यासी होता. नंतर त्याला स्फटिकाकृतीच्या विषयांत (Crystallography) लक्ष घालावेसें वाटलें. नंतर आंबण्याची क्रिया (Fomentation) कोणत्या कारणांमुळें घडते याचा त्यानें शोध लाविला. मद्यांतील रोगबीजांचा तपास लावून रेशमाच्या किड्यांच्या रोगासंबंधीं शोध केला. पुढें कोंबडीं बदकें मेंढरें गुरें आणि शेवटी मनुष्यें यांच्या रोगांवर त्याच्या मोहिमा सुरु झाल्या. त्यानें पटाईत डिटेक्टिवाप्रमाणें रोगांच्या आद्यकारणांचा पाठलाग करून, सांथीच्या रोगांचे रोगजंतु दृश्य व व्यक्त स्थितींत निराळे काढून दाखविले. रोग म्हणजे दैवी आपत्ति मानणाऱ्या शहाण्या पंडीतांच्या आणि जरीमरी, पटकी, देवी, मोठ्या बाया, धाकट्या बाया इत्यादि मूर्खपणाच्या प्रकारांवर अंध विश्वास ठेवणाऱ्या भोळसटांच्या डोळ्यांत चांगलेंच अंजन घातलें. जिवंत शरीरांत रोगांची जशी वाढ होते तशी हुबेहूब वाढ प्रयोगनलिकेत (Test tubes) पाश्चूरनें करून दाखविलेली पाहून, त्याचे सहकारी मित्र सुद्धां आश्चर्यानें चकित होऊन गेले. पाश्चूरच्या Anthrax आणि rabies यांबद्दलचे शोध तर इतके अपूर्व आहेत कीं खरोखर ह्या महनीय फ्रेंच गृहस्थानें सर्व जगावर उपकाराचें प्रचंड ओझें घातलें आहे.

पीररो नांवाच्या गृहस्थानें १८९४ व डिप्थीरिया अँटिटॉक्झिनचा शोध लावल्यापासून लक्षावधि बालकांचे प्राण वांचले. ज्या संग्रहणीच्या राक्षसी रोगानें १८७८ त प्रिन्सेस ॲलिस आणि तिचीं मुलें यांसारख्या राजवाड्यांतील जीवांचे बळी घेतले, त्याला आज भिकार झोपड्यांतील बालकासही स्पर्श करण्याचें धाडस होत नाहीं, इतका तो आज हतबल झाला आहे. हा या शास्त्रज्ञ महात्म्यांचा केवढा बरें उपकार? माल्टा फीव्हरचें एका वेळीं युरोपांत केवढें प्रस्थ असे. एकदां रोगी यानें पछाडला म्हणजे त्यास ११२ दिवस इस्पितळांत पडून रहावें लागे व बाहेर पडल्यावर सुद्धां त्याचें आयुष्य जवळजवळ निरुपयोगी होत असे. परंतु सर रॉबर्ट ब्रूसनें ह्या तापाची हकालपट्टी करून असंख्य खलाशांना आणि सैनिकांना उपकृत केलें आहे. असेंच एकदां देवीच्या रोगानें प्रलयाग्नीप्रमाणें युरोप भस्मसात् करून टाकण्याचा प्रसंग आणला होता. परंतु शास्त्रानें देवीच्या तंगड्या आतां पार मोडून टांकल्या आहेत. देवीच्या ओंगळ पुळ्यांचा कबिला मानवीमुखावर मुक्काम करतांना अलिकडे फारसा आढळून येत नाही.

पनामाच्या वसाहतींत शास्त्रानें असाच एक मोठा विजय संपादन केला. डॉ. लेसेप्स नांवाच्या प्रख्यात इंजिनियरला पनामाचा कालवा बांधतांना मुख्य अडचण भासली ती ही कीं तापानें पटापट मरणारे शेंकडो मजूर वाचावे कसे. अमेरिकन सैन्यांतील भिषग्वरांनी त्या साथीच्या कारणांचा छेडा लावून तिचें उच्चाटन केलें नसतें तर मानवी कारागिरीचा हा अद्भुत नमुना (पनामा कालवा) आपणांस कधींच पहावयास मिळाला नसता. हल्लीं पनामा तापाची खाण नसून जगाच्या व्यापाराचें माहेरघर बनलें आहे आणि याचें सारें श्रेय इंजिनिअर्स पेक्षां डॉक्टरांसच अधिक आहे.

आज सर्व प्रकारच्या तापापासून होणारी मृत्युसंख्या अगदीं कमी झाली आहे. टैफस, टैफॉइड,

कॉलेरा, नवज्वर वगैरे रोग तर आतां शास्त्रज्ञांनीं आपल्या मुठींत ठेवले असून, पहिल्या तिघांना लवकरच पृथ्वीवरून काळें तोंड करावें लागेल. पूर्वी संग्रहणीनें शेंकडा ५० रोगी मरत. आज फार झालें तर शेंकडा ४ मरतात.

एकंदरींत शास्त्रे हीच मानव जातीच्या उद्धारास व तारणास कारण आहेत. त्यांनीं क्षयरोगाच्या जंतूंपासून राष्ट्राचें दुधदुभतें संरक्षण करून आमचे प्राण वांचविले व प्लेग कॉलेरा ह्यांस चार पावलें दूर कसें ठेवावें हें शिकविलें. गेल्या महायुद्धांत अनेक प्रकारच्या रोगांपासून शिपायांचा आणि खलाशांचा बचाव मुख्यतः या नवीन शास्त्रांच्या योगानेंच झाला. युरोपमध्यें भिक्षुक वर्ग कांहीं धर्मसमजुतींच्या लंगड्या सबबीवर विशेषतः क्लोरोफार्मच्या उपयोगाचा जोरानें निषेध करतो. परंतु या पोटभरूंचें ज्ञान व कुंवत अकटोविकटो असल्यामुळें, त्यांच्या निषेधाला आतां कोणीहि शहाणा पुशीत नाहीं; आणि शास्त्रज्ञ मंडळींच्या कृत्यांवर तुमचा काय अभिप्राय आहे, म्हणून कोणी यांना विचारीतहि नाहीं. असल्या रानवट भिक्षुकांनीं सायन्सवर केलेली अनधिकारी टीका ऐकून घेण्याइतके सुसंस्कृत लोक थोडेच मेंग्ये बनले आहेत? क्रिस्ती भिक्षुकशाहीचीं वस्त्रे आंगावर चढलीं म्हणजे सुधारणेचा किंवा संस्कृतीचा मुलामा आपोआपच चढतो, असें थोडेंच आहे?

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

व्यवसाय बंधू

प्रबोधन निघाल्यापासून त्यानें शिष्टाचारानुसार सर्व व्यवसायबंधूंना भेट दिली. पैकीं, हितवाद, कुलाबा समाचार, लोकमित्र, आर्यभानु, राष्ट्रवीर, विजयी मराठा, सुबोधपत्रिका, चैतन्य, स्वधर्म, प्रफुल्लता, मधुकर, महाराष्ट्र साहित्य, लोकनायक, समाजसेवक, दैवज्ञ प्रबोधिनी, महाराष्ट्र, जागृति, गोसेवक, नापितोदय, सुबोधमाला, हिंदुमिशनरी, संजीवन इत्यादि बांधवांनीं प्रबोधनास परत भेटी दिल्या. नमस्काराची नमस्कारानेंच संभावना करण्यांत शिष्टांच्या शिष्टपणाचा चांगुलपणा व्यक्त होत असतो. हा चांगुलपणा ज्यांच्या ठायीं नसेल, त्यांच्याकडे विनाकारण अंक पाठविण्यापेक्षां उत्तेजनार्ह अशा उत्साही मोफत वाचनालयांना तेवढे अंक पाठविले तर सत्कार्यी तरी लागतील. अशा हेतूनें प्रतिभेट न देणाऱ्या २५ बेदरकार व्यवसाय बंधूंकडे जाणारे अंक आतां बंद केले आहेत व लोकोपयोगी मोफत वाचनालयांना ते मोफत पाठविण्याचें ठरविलें आहे. असल्या संस्थांनी अर्ज करावे. कित्येक व्यवसायबंधु 'अभिप्रायार्थ' विनंती करतात. ही पद्धत आह्मांला बरी वाटत नाहीं. व्यवसायबंधूंवर कोणच्याहि प्रकारचा बरावाईट अभिप्राय प्रबोधन कदापि देणार नाहीं. प्रतिभेटीची पोंच हाच सर्व कलमबहाद्दरांनीं शेल्यापागोट्याचा आहेर समजावा.

अभिनव प्रभुरत्नमाला

कायस्थ प्रभु ज्ञातींत अनेक वर्णनीय नरनारी रत्नें चमकून गेलीं; परंतु या रत्नांची माला कुशलतेनें गुंफणारा मालाकार मात्र अझून निर्माण झाला नाही. मागें श्री. मुजुमदार यांनीं 'प्रभुरत्नमाले'चा प्रथम खण्ड प्रसिद्ध केला. त्यानंतर 'माझ्याजवळ बरेंच साहित्य आहे, माझ्याजवळ पुष्कळ कागदपत्रें आहेत' या वल्गनांपलीकडे त्यांच्या हातून विशेष कांहींच घडलें नाहीं. प्रत्यक्ष खडाविषयीं आज अभिप्राय देण्याचा प्रसंग नाहीं. तथापि श्री. मुजुमदार हे मुजुमीच्या कामांत कदाचित् वाकबगार असले, तरी मालाकार या नात्यानें त्यांची प्रभुरत्नमालेची कामगिरी 'कांहींच नव्हतें त्यापेक्षां झालें हेंच बरें !' एवढ्यापुरतीच प्रशंसनीय ह्मणावयास हरकत नाहीं. प्रस्तुतचा 'अभिनव' प्रभुरत्नमालेचा यत्न श्री. विनायक सीताराम जयवंत मु. दादर या व्यासंगी लेखकांनीं हातीं घेतला आहे. त्यांतलें १ लें रत्न

कविवर्य (?) बजाबा रामचंद्र प्रधान यांचें चरित्र हें होय. या ४८ पानांच्या छोट्या पुस्तकांत तीन सुबक फोटो दिलेले आहेत. खुद्द चरित्रलेखनाविषयीं इतकेंच म्हणतां येईल की कै. बजाबांच्या चरित्राचें योग्य तितकें साहित्य लेखकाला न मिळाल्यामुळें, बऱ्याचशा भारूड मजकुरानें पुस्तक सजविण्यापलीकडे गत्यंतरच उरलें नाहीं. तथापि जी प्रत्यक्ष चरित्रविषयक माहिती दिली आहे, ती मात्र अत्यंत विश्वसनीय व उत्कृष्ट आहे. २४ पानानंतर कै. बजाबांच्या गद्यपद्य लेखनांतले निवडक उतारे दिले आहेत; मराठी भाषेच्या उत्क्रांतीचा तुलनात्मक अभ्यास करणाऱ्यांना ते उपयोगी पडतील.

कै. बजाबांची वाङ्मयाची सेवा ही सार्वजनिक कामगिरी असल्यामुळें केवळ 'अभिनव प्रभु रत्नमाला' या नांवाला बिचकून न जातां मराठी भाषेच्या अभिमान्यांनींहि हें पुस्तक संग्रही ठेवणें योग्य होईल. पुस्तकाची किंमत ८ आणे असून तें ग्रंथकार श्री. जयवंत, ८ मिरांडाची चाळ, दादर येथें विकत मिळतें.

आर्यभानूचा ऋष्यंक

दीपावलीच्या निमित्तानें कोल्हापूरच्या आर्यसमाज शाखेच्या आर्यभानू साप्ताहिकानें हा विचारपरिप्लुत ऋष्यंक प्रसिद्ध केला आहे. त्यांत चौदा विद्वानांचे हिंदु धर्माच्या थोरवीबद्दल, स्वामी दयानंदांच्या धर्मविषयक राष्ट्रीय कामगिरीबद्दल आणि हिन्दु तत्त्वज्ञानाच्या सार्वकालिक उपयुक्ततेबद्दल अत्यंत स्फूर्तिजनक लेख आलेले आहेत. पुण्याच्या अनेक नाठाळ विद्वानांनीं श्रीमद्दयानन्दांचा उपमर्द केल्यादिवसापासून दक्षिण महाराष्ट्रांत आर्यसमाजाच्या हिन्दु धर्मविषयक उदारमतवादाची अस्सल सत्यशोधक चळवळ कधीं काळीं थरारेल, अशी अपेक्षा करण्यास जागा नव्हती. परंतु राजाराम कॉलेजच्या उल्कापाताच्या घडामोडींत कोल्हापुरकर छत्रपतींच्या हातून आर्यसमाजाच्या दिग्विजयाचा झेंडा यदृच्छेनें दक्षिण महाराष्ट्रांत रोंविला गेला; आणि आर्यसमाजाची विश्वव्यापक तत्त्वें आतां या प्रांतांत जोमानें प्रसृत व्हावयास लागलीं आहेत. ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. प्रस्तुत ऋष्यंक या चळवळीच्या जोमाचेंच एक दृश्य फळ आहे. या फळाचा स्वाद विचारी सज्जनांना खात्रीनें आनंद देईल. या अंकाची किंमत फक्त दोन आणे असून आर्यभानूच्या आश्रयदात्यांस तो बक्षीस मिळतो. मागविण्याचा पत्ता :- श्री. हरी सखाराम तुंगार, संपादक आर्यभानू, कोल्हापूर.

श्रीराममारुती महाराज यांचें चरित्र

प्रस्तुत पुस्तक 'कल्याणकर कोणी तरी' नें आमच्याकडे 'अभिप्रायार्थ' पाठविलें आहे. 'कोणी तरी' नें एक रुपया खर्चून हें पुस्तक पाठविण्याचा स्वार्थत्याग करितांना आपलें खरें नांव कां दडवून ठेवावें, याचें आश्चर्य वाटतें. प्रकाशकाकडून जरी हें पुस्तक आमचे भेटीस आलें नाहीं, तरी या पुस्तकाबद्दल आमचें मत काय असावें, अशी पृच्छा करणारीं पांचसहा सन्माननीय गृहस्थांची पत्रें आलीं आहेत. म्हणूनच 'कोणीतरी' च्या प्रेमळ विनंतीचा फायदा घेऊन या पुस्तकाबद्दलचें आमचें स्पष्ट मत येथें नमूद करीत आहोंत. प्रस्तुत चरित्र प्रसिद्ध होतांच, त्याच्याबद्दल वाचकवृंदांच्या तोंडून अत्यंत निराशेचे व निषेधाचे निघालेले उद्गार खुद्द श्री राममारुतींच्या उत्सप्रसंगीं अनेकांनी ऐकिले. पुस्तक समग्र वाचतां ग्रन्थकारानें आपलें नांव कोंठेंच न देण्याची घेतलेली खबरदारी अत्यंत प्रशंसनीय म्हटली पाहिजे. संतांचीं चरित्रें लिहिण्यासाठी असले अर्वाच्य ग्रन्थकार पृथिवीतलावर असतात, याची दाद संतमंडळींना अजून लागली नसावीसें दिसतें. नाहींतर अट्टल शिष्यत्वाच्या पांघरुणाखाली आपल्या सात्विक चारित्र्याची असली विटंबना करून घेण्यापेक्षां त्यांनीं आपल्या संतवृत्तीला विशेष व्यक्त करण्याचें धाष्टर्य खचित दाखविलें

नसतें. श्रीराममारुती महाराज यांच्या निकट परिचयाची हजारों मंडळी आज हयात आहे. त्यांच्या दिव्य रामभक्तीचा प्रेमळ सोहळा अनेकांनीं अनेक वेळां अनुभविला आहे. परंतु त्याच सोहळ्याचें प्रस्तुत चरित्रांत काढलेले धिंडवडे, ह. भ. प. पांगारकरांनीं त्या धिंडवड्यांची उचललेली बिन शेंड्या बुडख्याची तळी, ग्रन्थकारानें आपल्या विद्वत्तेचा ठिकठिकाणी सावडलेला कचरा, अकराव्या प्रकरणांत 'साधुत्वाच्या गोष्टी' सांगण्यांत भक्तमंडळींनी आपल्या मूर्खपणाचा थाटलेला बाजार पाहिला, ह्मणजे प्रस्तुत चरित्र हे 'श्रीराममारुती महाराज भिवंडीकर' यांचें चरित्र नसून, शांताराम विठ्ठल गुप्ते, वामनराव प्रधान, गोपाळराव राजे, शिवरामभाऊ गुप्ते वगैरे ठराविक देवजीधसाड्यांचा हा धुडगूस होय, असें ह्मटल्याशिवाय गत्यंतरच उरत नाहीं. दुर्दैव त्या श्रीराममारुतीमहाराजांचें कीं, त्यांच्या चरित्राचा व चारित्र्याचा प्रसार करण्यासाठी मक्याची कणसें, डब्यांतले लाडू, काफीचे पेले, काकडीच्या कापट्या, एग्यू मिक्श्चरच्या बाटल्या, अत्तराच्या कुप्या आणि पाण्याचें मिटर, असल्या आश्चर्यकारक सामुग्रीच्या जोरावर स्वतःच्या पुण्याईचें ढोलकें पिटणारे प्रचारक लाभले. या पुस्तकाची किंमत एक रुपया असून तें कोणीकडे विकत मिळतें कोण जाणें ! कारण पुस्तकांत मुमुक्षु कचेरीच्या पत्त्याशिवाय दुसरा स्पष्ट पत्ता कोठेंच आढळत नाहीं. कदाचित् प्रेस आक्टाप्रमाणें छापणें भागच असलेल्या 'रा. गोविंद कृष्ण प्रधान, पनवेल यांनीं प्रसिद्ध केलें,' एवढ्या वाक्यावरून तें रा. प्रधान यांचेकडे विकत मिळत असावें असें दिसतें.

गोविंदाग्रज मण्डळाचा कवनगुच्छ

सध्यांचा काळ चळवळींचा आहे आणि नीट काळजीपूर्वक निरीक्षण केलें तर त्या सर्वांची एकट्या राजकीय दिशेकडेच धांव घेण्याची लगेधूम सुरू असल्याचें दिसून येतें. राजकीय चळवळ ही सर्व चळवळींचें शीर्ष आहे; परंतु इतर चळवळींकडे दुर्लक्ष झाल्यास-हातपाय छातिपोट कानडोळे यांची नीट बरदास्त न ठेवल्यास-हें शीर्ष कुचकामाचेंच ठरेल. आमच्या राष्ट्रीय जीवनांत राजकीय प्रश्नांच्या जोडीनेंच सामाजिक धार्मिक आर्थिक शैक्षणिक औद्योगिक वाङ्मयविषयक वगैरे सर्वच चळवळी मोठ्या नेटानें व जोरानें चालविल्या पाहिजेत. या दृष्टीनें पाहिलें तर कै. राम गणेश गडकरी ऊर्फ गोविंदाग्रज यांच्या काव्य व नाट्यविषयक राष्ट्रसेवेचें स्मारक म्हणून पांचसहा उत्साही तरुणांनी स्थापन केलेल्या 'गोविंदाग्रजमण्डळ' संस्थेनें मराठी काव्यप्रसाराचा जो उद्योग हातीं घेतला आहे, त्याचें कौतुक करावेंसें वाटतें. बहुतेक सुशिक्षित तरुणांचीं मनें राजकीय चळवळीकडे वेधून, ते त्या क्षेत्रांत पूर्ण बहकल्यामुळें भावी आयुष्यांत जवळ जवळ निकामी ठरल्याचीं उदाहरणें आतां शेंकडों दाखवितां येतील. हा दोष राजकीय क्षेत्राचा नसून, अर्ध्याकच्चा अनुभवशून्य परंतु विकारवश बनलेल्या तरुणांच्या आततायी उतावीळपणाचा असतो, हें लक्षांत असावें. गोविंदाग्रज मण्डळाच्या तरुण चालकांनीं राष्ट्रसेवेचंच ध्येय आपल्यापुढें अढळ ठेविलें आहे; परंतु एकदम कॉलेजांतल्या खोलींतून राजकीय रिंगणांत गोलांटी उडी मारण्याचा उपव्याप न करतां, आस्ते आस्ते अनुभवाची कमावणी करण्याचा त्यांनीं स्तुत्य उपक्रम पत्करिला आहे. वाङ्मयसेवा ही राष्ट्रसेवाच होय. विशेषतः कवींच्या राष्ट्रसेवेचा दर्जा राजकीय चळवळीपेक्षांहि फार वरच्या दर्जाचा आहे. कवींच्या स्वार्थत्यागाची कल्पना आपणांस सहज करतां येत नाहीं. आंग्ल कविवर्य शेले ह्मणतो कीं Most wretched men are cradled into poetry by wrong; They learn in suffering what they teach in song.

राष्ट्रशाहीरांनीं राष्ट्रजागृतीचा कर्णा फुंकल्याशिवाय राष्ट्रसेवकांच्या कर्तबगारीला स्फूर्तीच चढत नाहीं. कविजनांच्या आत्मयज्ञावरच राष्ट्रसेवकांच्या स्वार्थत्यागाचे मनोरे उभारले जातात. कवींना या दुनियेंत अगोचर असें कांहींच नाहीं. ते आपल्या दिव्य दृष्टीची फेंक भविष्य काळाच्या कमाल मर्यादेपर्यंत सहज लीलेनें झुगारून, स्वराष्ट्राच्या उद्यांपरवांच्या राष्ट्रीय वैभवाचें तपशीलवार चित्र आधींच आपल्या कल्पनेनें रंगवून सोडतात. पॉलिटीशियन्स व पोएट्स (राजकारणीजन व कविजन) यांत श्रेष्ठ कोण? या वादाचें उत्तर 'पोएट्स' असेंच द्यावें लागेल. पॉलिटिशियन्स हे स्वतः राबणारे कुशल इंजिनियर्स असतील; परंतु त्यांच्या कर्तव्याचा तपशीलवार प्लॅन तयार करण्याची गुरुकिल्ली पोएट्सच्या हातीं असते व त्या प्लॅनबरहुकूमच राजकारणी इंजिनिअर्सना आपल्या कर्तव्याचीं पावलें संभाळून टाकावीं लागतात. अर्थात् राष्ट्राच्या बऱ्या वाईट घटनेचे आद्यसूत्रधार राजकारणीजन नसून शाहीरजनच होत. म्हणूनच कालाईलनें म्हटलें आहे कीं 'The poet is a heroic figure belonging to all ages; whom all ages possess, when once he is produced.

सांप्रत भरतखंड ज्या संक्रमणावस्थेंतून पार पडण्याचा शिकस्तीचा यत्न करीत आहे, त्या यत्नांचीं पावलें कशी पडलीं पाहिजेत, याचा नवयुगाचा प्लॅन घेऊन दिग्विजयाच्या महत्वाकांक्षेनें जी नवमतवादी शाहीरसेना आज फोंफावत बाहेर पडली आहें, त्या सेनेचे कॅप्टन-जीर्णमतवादी 'राजकारण' कर्त्याचे सख्खे बंधु-ज्वलज्जहाल नवमतवादी 'केशवसुत' हे होत. (एकाच मातेच्या उदरांतून निर्माण झालेल्या या दोघां भावांची परस्परविरुद्ध मानसिक संस्कृति पाहिली कीं कुल शीलाच्या वलगनांवर वर्णविशेष संस्कृतीचें ढोंलकें बडविणाऱ्या प्राण्यांची कींवच येते.) केशवसुतानें महाराष्ट्रांत नवयुगाच्या अरुणोदयाची गगनभेदी तुतारी फंकतांच भावी राष्ट्रवैभवाचीं गोड स्वप्नें पहाण्यांत तल्लीन झालेला नवमतवादी शाहीरसंघ खडबडून जागा झाला आणि त्यानें त्या स्वप्नांची रसाळ व ओजस्वी वाणीनें काढलेलीं शब्दचित्रें गोविंदाग्रज मण्डळानें या नयनमनोहर 'कवनगुच्छां' त संकलींत केलेलीं आहेत. श्री. देशमुख आपल्या 'समर्पण' पत्रिकेंत म्हणतात, ''महाराष्ट्र-शारदा संतकवीं बरोबर टाळमृदुंगाच्या ध्वनींत ब्रह्मानंदांत रंगली, शाहीरांच्या बरोबर डफतुणतुण्याच्या तालसुरांत वीरश्रीनें सजली, आणि आधुनिक कवींबरोबर प्रणयरसांत भिजली, पण बेताल झाली नाहीं. काय असेल तें असो हिला शाहीरशाही पुन्हा आवडूं लागली आहे. शिवाजी, बाजी, तानाजी, इ. पोवाडे ती नव्या स्फूर्तीनें गाऊं लागली आहे आणि 'महाराष्ट्राचें निशाण' रोवून राष्ट्रशाहीरांस आव्हान करीत आहे.'' हा अनुभव कवनगुच्छाचा परिमळ घेणाऱ्या प्रत्येक रसिकास आल्याविना रहाणार नाहीं. या गुच्छांत बालकवि ठोमरे, गोविंदाग्रज, सोनाळकर, Bee, आनंद, विरकूड इ. २० कवींच्या निवडक निवडक कविता प्रसिद्ध केल्या आहेत. कवितांचा अनुक्रमच असा ठरविला आहे कीं बालकवींच्या नितांत प्रेमळ काव्यौघापासून वाचक तल्लीन होत्साता जसाजसा पुढें पुढें जातो तों विरकुड आनंद शाहीरांच्या गगनचुंबीत स्फुर्तीबरोबरच नकळत उंच वातावरणांत अलगज आनंदाच्या गिरक्या मारीत रहातो. आशेचे आम्ही भालाइत । बसणार नाहीं शोकांत असल्या दिव्य आशावादी वीरांच्या 'जीवाचें मोल' सांठविलेला हा कवनगुच्छ प्रसिद्ध केल्याबद्दल महाराष्ट्रशारदा गोविंदाग्रज मण्डळास आशीर्वाद देईल. साहित्यसंमेलनाच्या तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या अभिनव काव्यमालेवर या गोविंदाग्रज-मालेनें आपली कउी बिनतोड चढविली यांत संशय नाहीं. तरुण महाराष्ट्रानें या कवनगुच्छाचा एकवार अवश्य स्वाद घ्यावा

म्हणजे -

शून्यांतुनि ब्रह्मांड निघालें स्तंभीं नरहरि कडकडले ।

तेंवि निशाणा ! तव पदरांतुनि महाराष्ट्र जन्मा आलें ।।

ही कल्पनातीत घटना कशी घडली, याचा गोड आत्मानुभव त्याच्या हृदयाला गुलगुल्या केल्याशिवाय खास राहणार नाहीं. कवनगुच्छाची किंमत दीड रुपया असून तो गोविंदाग्रज मण्डळ, मिरांडाची चाळ, दादर येथें विकत मिळतो.

□□□

अग्रलेख

मानसिक दास्याविरुद्ध बण्ड

(लेखांक २ रा)

धर्माच्या कल्पना निरनिराळ्या देशांत भिन्न भिन्न असतात. नीति अनीतीच्याहि व्याख्या देशपरत्वें विविध असतात. मोक्षसाधनाचे मार्ग धर्मकल्पनांप्रमाणेंच निरनिराळे सांगितलेले आढळतात. तथापि, क्रिस्ती, इस्लाम व हिन्दु हे तीन प्रचलीत प्रमुख धर्मच जरी विचारार्थ घेतले, तरी एक विशेष गोष्ट त्या सर्वात ठळक दिसून येते ती हीच कीं त्यांच्या क्षेत्रांत मानसिक दास्याचीं निरनिराळीं जाळीं पसरविण्याचें निंद्य कार्य भिक्षुकशाहीच करीत असते. पापपुण्याच्या काल्पनीक व मनुष्यकृत निर्वेधांची जरब दाखवून मनुष्यमात्राच्या ईश्वरदत्त स्वतंत्र बुद्धिमत्तेची मुस्कटदाबी करण्याचें घाणेरडें कर्म धर्माच्या क्षेत्रांत भिक्षुकशाहीनें आजवर जेवढें केलें आहे, तेवढा रक्तपात व अत्याचार शेंकडों नादीरशहांच्या हातून प्रत्यक्ष युद्धक्षेत्रांतसुद्धां घडलेला नाहीं. खुद्द इस्लामशाहीच्या डुकरमुसंडीचाच इतिहास पहा. त्यांनीं धर्माच्या नांवावर शुद्ध धर्माज्ञा ह्मणून हिन्दुस्थानाच्या नरड्यावर प्रत्यक्ष तलवार धरली, हिंदूच्या स्वतंत्र बादशाहीचा विध्वंस करून तिच्या उरावर चांदताऱ्याची आधिभौतिक सत्ता मनमुराद नाचविली' हिन्दु भिक्षुकशाहीनें आत्मवर्चस्वार्थ मुद्दाम फैलावलेल्या भांडकुदळपणाचा व आपपरभेदाचा फायदा घेऊन कोट्यवधि हिन्दूंना मुसलमान बनविले, आणि सांपडेल त्या मार्गानें लोकसंग्रह करून हिन्दूंचा अधःपात हिन्दूंच्याच हातून करविला. तथापि इस्लामी सत्तेच्या धांगडधिंग्यांत झालेल्या हिन्दुजनांच्या आधिभौतिक ऱ्हासाची तीव्रता, खुद्द हिन्दु भिक्षुकशाहीच्या हातून झालेल्या हिन्दूंच्या आध्यात्मिक अवनतीच्या नुकसानीपुढें 'खंडींत रती'च ठरते. हाच प्रकार प्रचलीत क्रिस्त्यांच्या टोपलेशाहींतसुद्धां जशाचा तसाच अनुभवास येत आहे. याचें कारण या परकीय बाह्य संस्कृतींच्या आघातांनीं आमचें बाह्यांग कितीहि सोलवटलें, कितीहि रक्तबंबाळ झालें, तरी आमचा अंतरात्मा जर शाबूत जीवंत असेल, तर या बाह्य जखमा भरून येण्यास कांहीं कठीण नाहीं; फार झालें तर थोडा कालावधि अधिक लागेल, इतकेंच. अंतरात्मा शाबूत असल्यावर पुनरुज्जीवनाबद्दल मुळींच निराश व्हायला नको. परंतु हिन्दूंच्या चारित्र्यांत हा अंतरात्माच बेपत्ता आहे. स्वजातिवर्चस्वासाठीं हपापलेल्या भिक्षुकशाहीनें जनतेच्या धर्मप्रेमाचा फायदा घेऊन तिच्या मनाची मुंडी पिरगाळल्यानंतरच हिन्दुस्थानावर परचक्रांची टोळधाड आह्मांला चारी मुंड्या चीत करण्यासाठीं येऊन कोसळली. भिक्षुकशाहीनें आत्मवर्चस्वाच्या

वस्त्रगाळ स्वार्थासाठीं हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय मनाची मुंडी मुरगाळून जनतारूप जनार्दनाला मानसिक गुलाम बनविल्यावरच हिंदुस्थान देश परकीय टोळधाडीला बळी पडलेला आहे, हें इतिहासासिद्ध तत्व डॉ. कूर्तकोटींचे प्रपितामह जरी वरून खालीं आले तरी त्यांना सप्रमाण खोडून टांकतां येणार नाहीं. चातुर्वर्ण्याचें ढोलकें बडवून भिक्षुकी सत्तेच्या पुनर्घटनेसाठीं हिन्दुधर्म परिषदेच्या भुताटकीचा खेळ खेळणाऱ्या खेळाडू शंकराचार्यांना आमचा असा सवाल आहे, कीं धर्माच्या बाबतींत हिन्दुधर्मियांनीं शंकराचार्यांच्याच अनुशासनाची अपेक्षा केली पाहिजे, असें तुमचे परंपरागत विधान जर अझूनहि आपण पुढें पुढें करीत असाल, तर त्या विधानाच्या मुस्कटांत भडकावून आम्ही तुम्हांला स्पष्टस्पष्ट विचारतों कीं ज्या वेळीं इस्लामी गिधाडें हिन्दुस्थानाच्या छाताडावर बसून हिन्दुधर्माचीं आंतडीं कचाकच तोडीत होतीं, त्यावेळीं तुमच्या गादीवरचे परात्तर गुरू कोणत्या दिग्विजयांत गुंतले होते? कराचीच्या कोर्टात 'मी जगद्गुरू आहें, मी उभा राहाणार नाहीं, माझ्या आसनावर बसूनच बोलेन' वगैरे भिक्षुकी आत्मप्रौढीच्या लंब्याचौड्या वल्गना करणाऱ्या व्यंकटप्पा शंकराचार्याचा कान धरून विचारलें पाहिजे, कीं लेका खिलाफतीच्या नाटकी प्रेमाच्या उकळीनें इतका जो तूं उकडून उकडून शिजला आहेस, त्या तुझें परात्पर खापरपणजे, गुजराथेंतील सिद्धपुरच्या एक लाख हिन्दूंचीं जानवीं तघलखानें अवघ्या सहा तासांत जाळून त्यांना मुसलमान केले, त्यावेळीं कोठें जाऊन दडले होते? या मागील गोष्टी सोडून दिल्या तरी गेल्या ५०-७५ वर्षांत सर्व हिंदुस्तानभर बोकाळलेल्या क्रिस्ती टोपल्यांच्या साळसूद बण्डाविरुद्ध या जागद्गुरू ह्मणविण्यास न शरमणाऱ्या प्राण्यांनीं कधीं एक ब्र तरी काढला आहे काय? पतितपरावर्तनाबद्दल देवल स्मृतीच्या वचनाच्या धाग्यानें मलबारांतल्या मोपल्यांच्या धार्मिक अत्याचाराला पायबंद लावण्यासाठीं स्वतः धांवून जाण्याची शाब्दिक गुरकावणी दाखविणाऱ्या डॉ. कूर्तकोटींना व त्यांच्या पूर्वींच्या वॅगनलोडभर शंकराचार्यांना मोपल्यांचें बण्ड होईपर्यंत देवलस्मृति धुंडाळण्याची बुद्धीच होऊं नये, हें बुद्धिमांद्याचें लक्षण कीं सत्तामदाची धुंदी? म. गांधींचा असहकारवाद ह्मणजेच आद्य शंकराचार्यांचा अद्वैतवाद, असल्या बिनमोल विद्वत्तेचें दुकान मुंबईच्या कमर्शल म्युझियममध्यें थाटणाऱ्या डॉ. कूर्तकोटींना म. गांधीचा अस्पृशोद्धारच तेवढा अचूक नापसंत कां पडतो, याची मिमांसा वाचकांनीं किंचित् स्वतंत्र बुद्धीनें केल्यास, हीं जगद्गुरूची धेंडें ह्मणजे भिक्षुकशाहीप्रणित मानसीक गुलामगिरीचे सनदशीर प्रवर्तक होत, असा प्रत्यय त्यांना आल्याविना रहाणार नाहीं. आद्यशंकराचार्यांची कामगिरी बाद केली, तर त्यांच्या गादीवरील एकाहि अनुयायानें हिन्दुधर्माच्या (वृद्धीची तर गोष्टच नको पण) संरक्षणाची काडीमात्र पर्वा केलेली दिसत नाहीं. उलट मयत लेलेशास्त्र्यांसारख्या शेंकडों भिक्षुकशाही गुंडांच्या गुण्डगिरीला वेळोंवेळीं उचलून धरून या जगद्गुरूंनीं राष्ट्रांतल्या मानसीक दास्याचे जेरबंद अधिकाधिक आंवळण्याचेंच राक्षसी कर्म केलें आहे.

अनियंत्रित निर्भेळ राजसत्ता व परंपरागत सनदशीर धर्मगुरुसत्ता यांच्या हातून जनतेचें कल्याण झाल्याचीं उदाहरणें अपवादात्मकच सांपडतील. चंद्रगुप्त मौर्य, अशोक, हर्ष, शिवाजी, रामदास, नानक, दयानंद सरस्वति इ. उदाहरणें लोकोत्तर म्हणूनच अपवादादाखल मानायची. परंतु वास्तवीक, राजसत्ता व धर्मसत्ता या दोघांनीं जगांत भयंकर प्रळय मांडल्याचीं उदाहरणें म्हणजेच सारा इतिहास म्हटलें तरी चालेल. त्यांतल्या त्यांत एकमुखी राजसत्ताच जेव्हा धर्मसत्तेंत समरस होते किंवा एकमुखी धर्मसत्तेच्या हातांत राजसत्तेचीं सूत्रें सांपडतात, तेव्हां तर जनतेला दे मायधरणी ठाय अशी बोंब मारायलासुद्धां

उजगर रहात नाहीं. लोकशाहीच्या कल्पना एका काळीं ग्रीक राष्ट्रांत ज्या दिसल्या, त्या कित्येक शतकश्रेणीनंतर आमच्या दृष्टीला आज कोठें पुसट पुसट दिसत आहेत. खऱ्या लोकशाहीचा रामरगाडा अझून पुढेंच आहे. तथापि लोकशाहीचा उषःकाल झाल्यामुळें भारतीय जनता खडबडून जागी झाली आहे व सर्वांगीण दास्याच्याविरुद्ध बण्ड पुकारणारा तिचा सलामीचा पहिला कर्णा वर्तमान घटकेला यच्चावत् दास्यप्रवर्तकांच्या काळजाला थरथर थरथर कंपायमान करीत आहे. खुद्द महाराष्ट्रापुरतेंच बोलायचें तर भिक्षुकशाहीच्या दास्यप्रवर्तक बण्डाविरुद्ध मोहिमा कधींच सुरू झाल्या असून, नित्यशः त्यांच्या चकमकी झडतच आहेत. मानसीक दास्यविमोचक सुधारकांचा संघ दिवसेंदिवस झपाट्यानें वाढत आहे व त्याच्या विविध चळवळींचे मोर्चे भिक्षुकशाहीच्या पर्वतीला इतके बेमालूम जाऊन भिडले आहेत कीं वेढ्यांत सांपडलेल्या भिक्षुकशाहीला आपल्या प्राणान्तीच्या किंकाळ्या मारण्यासाठीं ब्राह्मण्यसंरक्षण व हिंदुधर्मपरिषदांसारखे हस्तीदंती प्रयत्न करण्याचा प्रसंग येऊन बेतला आहे. हिन्दुस्थानांत स्वराज्याची चळवळ जोरांत सुरू झाली कीं ''आम्हीं तरी कुठें तुमच्या स्वराज्याच्या आकाक्षांच्या विरुद्ध आहोंत? हिन्दुस्थानला स्वराज्य देणें हें तर आमचें कध्धी कध्धीपासूनच ठरलेलें आहे. तें आमचें ध्येयच आहे.'' असें बादशाही फर्मान येथल्या नोकरशाहीनें काढून लोकांचीं तोंडें बंद करण्याचा प्रयत्न करणें आणि भिक्षुकशाहीविरुद्ध चळवळ सुरूं झाली कीं ''या. आपण सारे या हिन्दुधर्म परिषदेंत बसा. मला राजसत्तेचा अधिकार द्या. मी लोकशाहीच्या विरुद्ध थोडाच आहे? मी मोठा उदारमतवादी आहें. माझें धार्मिक नायकत्व कबूल करा. मी चातुर्वर्ण्याचे सर्व घाणेरडे कपडे धुवून त्यांची चापून चोपून इस्तरींत घडी बसवतों. पण आडदांडपणा करूं नका. हा धर्माचा प्रश्न आहे. धर्माच्या बाबतींतील निर्णय बहुमतानें होत नाहींत, ते शास्त्र प्रमाणावरूनच ठरत असतात. आणि शास्त्राचा गड्डा मजजवळ आहे. अर्थात् धर्मांत लोकशाहीची खमंग फोडणी घालणारा कुशल आचारी काय तो मीच आहे.'' अशा अर्थाचे डॉ. कूर्तकोटींचें बरळणें, या दोन गोष्टींची कुंडली एकाच प्रकारच्या पापग्रहांनीं चिडचिडलेली दिसत नाहीं काय? प्रतिस्पर्ध्याच्या चळवळीचा जोर वाढला, कीं त्याच्या सुराला सूर मिळवून, किंबहूना त्याच्यापेक्षां दुप्पट बोंबाबोंब करून आपल्या पातकांवर पांघरूण घालण्याची कला भिक्षुकशाहीला फार छान साधलेली आहे. याचें प्रत्यंतर शोधायला अंधाऱ्या युगाचा इतिहासच कांहीं उलटसुलट करायला नको. महात्मा गांधींची असहकारितेची चळवळ हरदासी गोष्टींतल्या सोन्यानें मढविलेल्या वरवंट्याप्रमाणें जेव्हां पुण्याच्या भिक्षुकशाही कंपूच्या छाताडावर बिनमुर्वत आदळूं लागली, तेव्हां त्यांनीं सुद्धां याच मार्गाचें अवलंबन केलें. गांधी एकपट ओरडले कीं यांनीं दसपट आरडावें, त्यांनीं एक प्रतिज्ञा केली की यांनीं शंभर प्रतिज्ञा कराव्या, गांधींनीं म्हटलें खादी वापरा कीं, पुणेंकरांनीं ओरडून म्हणायचें, 'अहो खादी खादीचशी काय ! वेळ आली तर लोकमान्यांचा महाराष्ट्र गोणपाट वापरील.' झालें, भोळसट गांधी खुष झाले. बोलाचीच कढी, बोलाचाच भात, जेवुनियां तृप्त कोण झाला? अर्थात् असहकारितेच्या या भिक्षुकशाही ढोंग्यांना आपल्या लोकमान्यतेच्या उपासाचें पारणें, अखिल निखिलाचा सफेता फासून, अकोल्यास जाऊन सोडावें लागलें. डॉ. कुर्तकोटी हे कन्नडदेशस्थ असले तरी जात्याच तैलबुद्धीचे असल्यामुळें त्यांनीं पुणेकरांची पुणेरी भिक्षुकशाही फारच झटपट उचलली. हल्लीं त्यांची सुरू असलेली लोकशाहीचीं पुराणें हीं वरच्या मासल्याचीच भिक्षुकी आरडाओरड होय. मलबारांत मोपल्यांचें बंड सुरू होतांच देवलस्मृतीला कांखेंत मारून 'हा पहा आतां चाललों मलबारांत'

असें नुसते शब्दोच्चार करतांच आमचे बावळट हिन्दु मिशनरीकार स्वामींच्या पायावर कपाळ घासूं लागले. परंतु हंगामी वल्गना करून लोकमान्यता मिळविण्याची ही पुणेरी भिक्षुकशाहीची युक्ति डॉ. साहेबांनीं उपयोगांत आणली, हें हिन्दुमिशनरीकारांना अझून तरी उमगलें आहे कीं नाहीं कोण जाणें. तोंडाची वाफ दवडून संवग लोकप्रियता मिळत असल्यास डॉ. कुर्तकोटी मलबारच्याहि पुढें धूम ठोकायला थोडेच कमी करणार आहेत ! परंतु त्यांनींहि खूप ध्यानांत ठेवावें कीं शुद्ध शाब्दिक वलग्नांवर हुरळून जाऊन भजनी लागणारी जनता आतां दिवसेंदिवस सशाच्या शिंगाइतकी महाग होत आहे. डॉ. साहेबांना आमची आग्रहाची विनंति आहे कीं वाणीप्रमाणें करणी करून दाखविण्याची हिंमत जर तुमच्या मनगटांत असेल, तर चातुर्वर्ण्याची उलटी बसलेली कवटी सुलटी करण्यापूर्वी किंवा देवलाचार्यांच्या डोक्यावर बसून मलबारची यात्रा करण्याऐवजीं खुद्द महाराष्ट्रांतल्या महाराष्ट्रांत पतितपरावर्तनाची दहा बारा उदाहरणें आपल्या मठाच्या तर्फे घडवून आणण्याचें मनोधैर्य दाखवा. पुराणांचीं पारायणें व लोकशाहीचीं व्याख्यानें आतां पुरे !

□□□

स्फुट लेख

हुंड्यावर बहिष्कार

प्रबोधनाच्या ४ थ्या अंकांत श्री. देशमुख यांचा 'लग्नसराई आली !' त्या लेखानें जागृतीचें काम बरेंच केलें. ठिकठिकाणाहून अनेक जातींच्या वाचकांकडून हुंडापद्धतीचा निषेध करणारीं पत्रें व लेख आतांपर्यंत बरेच आले व येत आहेत. त्या सर्वांची हुंड्याच्या घातकीपणाबद्दल एकवाक्यता आहे. परंतु विवेचनाच्या विधानांत विशेष कांहीं नाविन्य नसल्यामुळें, हे लेख छापण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हुंड्याच्या साधक बाधक प्रमाणांचा आतांपर्यंत इतका कीस निघाला आहे की खंडणमंडणार्थ आणखी एखादा नवीन मुद्दा जन्माला येईल असें आम्हांला वाटत नाहीं. बहुतेक सर्व लेखांची छाननी केली तर त्यांत लेखनकलेच्या हौशीपेक्षां अथवा जुनेच मुद्दे नव्या शब्दयोजनेच्या पोषाखांत मांडण्यापेक्षां अधिक कांहीं दिसत नाहीं. त्यांतल्या त्यांत कर्जतचे वकील श्री. यशवंत अनंत गुप्ते यांनीं सुचविलेली विवाहविधीची सुधारणा व बागणी (जि. सातारा) येथील मराठी अध्यापक श्री. कृष्णाजी भाऊराव बाबर यांचा कन्याविक्रयाची परिस्फुटता करणारा लेख हे विचारार्ह दिसले. श्री. बाबर यांच्या पत्रांत खेड्यांपाड्यांतील गोरगरीब मराठे समाजांतील हुंड्याचा प्रघात अगदीं उलटा असल्याचें उघड होत असल्यामुळें, त्यांचें पत्र दुसरीकडे छापलें आहे. सुशिक्षित म्हणविणारे आपल्या पुत्राचा विक्रय करतात, तर अशिक्षित समाजांत मुलींचें लिलांव करण्यात येत असतें. दोनहि प्रकार परस्परभिन्न असले तरी त्यांत हुंडा हबकण्याची राक्षसी बुद्धी अन्तर्भूत आहेच.

अर्थात् समंजसांनीं या दोघांचाहि तीव्र निषेध करून या दुष्ट रूढींच्या प्रवर्तकांना रक्तपित्याप्रमाणें समाज-बहिष्कृत केल्याशिवाय दुसरा अन्य उपाय या क्षणी तरी सुचवितां यावयाचा नाहीं. हुंडाविषयाचें खंडण-मंडण करणाऱ्या सर्वांना मॉडर्न रिव्ह्युचे संपादक श्री. रामानन्द चतर्जी यांच्या खालील स्पष्टोक्तीचा पुनश्च आहेर करणें बरें. असें आम्हांला वाटतें. कुमारी स्नेहलतेच्या आत्मयज्ञप्रसंगी श्री. चतर्जी पुत्रविक्रय करणाऱ्या नराधमांना उद्देशून म्हणाले ''तुमच्या सारखे शायलॉक सासरडे आमच्या कन्यांना मुळींच नकोत. विवाह ग्रन्थी जुळविण्यास उच्च व सभ्य मनोवृत्तीचे सद्गृहस्थ आम्हांला आढळेपर्यंत खुशाल स्वस्थ बसण्याची आम्हांला हिंमत आहे. असले गृहस्थ जर कोठें आम्हांला मिळालेच नाहींत, तर आमच्या मुली आनंदानें खुशाल घरोघर अविवाहित ठेवून देऊं. त्याची आम्हांला

एन ४००६--९

पर्वा नाहीं. परंतु विवाहासारख्या मंगल कार्यांत ज्यांना नुसता पैसाच पहावयाचा असतो, स्त्रीजातीच्या इभ्रतीची ज्यांना लवमात्र क्षिति वाटत नाहीं, किंवा विवाहविधींत अन्तर्भूत असलेल्या अध्यात्माची व प्रेमाची महती ज्यांना उमजत नाहीं, असल्या खाटकांच्या हातांत आमच्या मुलींच्या माना देण्यापेक्षां त्या अविवाहित स्थितींत घरच्या घरीं राहिल्या तर काय वाईट.'' कसाहि आणि केवढाहि विचार केला, तरी या समाजविध्वंसक प्रघाताविरुद्ध कडकडीत सामाजिक बहिष्कार या शस्त्राचा प्रयोग करण्याची वेळा आतां खास आली आहे.

पुत्रविक्रय किंवा कन्याविक्रय यांपैकीं कोणती ना कोणती रूढी हिन्दु समाजांतील प्रत्येक जातींत बोकाळलेली आहेच. अशा सर्व समदुःखी समाजांनीं सामाजिक बहिष्काराचें शस्त्र अवश्य उपयोगांत आणावें. आतां लेख खरडण्याचे व व्याख्यानें देण्याचे दिवस उरलेले नाहींत. साधक बाधक प्रमाणांच्या किसण्या अतःपर लाथाडून टाकल्या पाहिजेत. नवीन युगांतरांत पोटच्या पोरांचा विक्रा करणारे नराधम समाजांतून आमूलाग्र उखडून टाकले पाहिजेत. सामाजिक बहिष्काराच्या बाबतींत इंदोर येथील कायस्थ तरुणांनीं व तेथील स्थानिक पुढाऱ्यांनीं नुकताच एक प्रयोग यशस्वी करून दाखविला. तेथील एका कायस्थ खाटकानें आपल्या पोरट्याची किंमत पांचशें रुपये ठरवून स्वतांच्या शायलॉकी सुळावर गडावरील एका गरजु गडकऱ्याची मुंडी लटकविण्याचें ठरविलें. ही गोष्ट तरुण मंडळींना समजतांच श्री. रामचंद्र राजाराम गडकरी व श्री. म. के. कर्णिक इ. तरुणानीं मित्र मंडळींचें साहाय्य घेऊन पुत्रविक्रय करणाऱ्या संभावित शायलॉकाचे सुळे दांत विनम्रतम विनंतीच्या कानसीनें घासण्याचा उपक्रम केला. सामोपचाराचे सर्व प्रयत्न हरल्यानंतर, मुद्द्याला मुद्दा व गुद्द्याला गुद्दा देण्याच्या मामुली भानगडींत न पडतां पुढाऱ्यांनीं ताबडतोब श्री. केशवराव गणेश कर्णिक वकील यांचे अध्यक्षतेखालीं १९१२-२१ रोजीं सभा भरवून गुन्हेगार प्रतिष्ठितांचा निषेध केला. इतकेंच नव्हे, तर तेथील अठ्ठाविस सद्‌गृहस्थांनीं एक शपथपत्रिका छापवून तिच्या प्रती सर्व शहरांत वांटल्या. ही शपथपत्रिका आज इतरत्र छापली आहे. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, वधूवरांच्या लग्नगृहांना कडकडीत बहिष्कार पडून, लग्नाला, भोजनाला किंवा वरातीला कोणीहि इसम गेला नाहीं, आणि 'अशा लग्नांचे समारंभ स्मशानयात्रेसारखे सुने वाटतील' हा श्री. देशमुख यांचा उद्गार तेथें अक्षरशः अनुभवास आला. आमची इंदोरकर मंडळींना अशी आग्रहाची विनंति आहे, कीं त्यांनीं या बहिष्कारशस्त्राचा प्रयोग चालूं असलेल्या लग्नसराईंत मोठ्या नेटानें, धैर्यानें, शिस्तीनें व शांतपणानें पुढें चालवून या समाजविध्वंसक हुंड्याला कायमची मूठमाती देण्याचें उदाहरण सर्व हिन्दुसमाजाला घालून देण्याचा मान पटकवावा.

□□□

अग्रलेख

मानसिक दास्याविरुद्ध बण्ड

(लेखांक ३ रा)

प्रामाण्य - मग तें कसलेंहि व कोणतेंहि असो, तेंच दास्य. व्यक्तिप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य, लोकाचारप्रामाण्य, कल्पनाप्रामाण्य, पदवीप्रामाण्य, इत्यादि प्रामाण्यांच्या सेना मानसिक दास्यप्रवर्तकच होत. इतकेंच नव्हे तर प्रामाण्य हा शब्दच मुळीं दास्य गुलामगिरी या अर्थानेंच अस्तित्वांत आणलेला आहे. आद्य शंकराचार्य ही लोकोत्तर विभूति होऊन गेली व त्या विभूतीच्या ज्ञानप्रसारक कर्तबगारीबद्दल कोणीही झाला तरी आदरपूर्वक प्रणाम करण्यास कांकूं करणार नाहीं. परंतु आद्य शंकराचार्य लोकोत्तर ह्मणून त्यांच्या गादीवर बसलेला व बसणारा प्रत्येक सांप्रदायिक गुलालपोटाहि लोकोत्तर मानण्याची जबरी म्हणजे व्यक्तिप्रामाण्य किंवा पुरुषप्रामाण्य. या प्रामाण्या इतकी घाणेरडी गुलामगिरी हीच. हें प्रामाण्य भक्तजनांना कान असून ऐकण्याची बंदी करतें, तोंड असून न बोलण्याची सक्ति करतें आणि क्षणोक्षणीं सद्सद्विवेक बुद्धीचा कोंडमारा करण्यास शिकवितें. व्यक्तिप्रामाण्याची गुलामगिरी किती चिळस आणणारी असते, याचें प्रत्यंतर धर्मगुरूंच्या भोंवतीं गोंडा घोळणाऱ्या किंवा एखाद्या बड्या संस्थानिका भोंवतीं खोटें स्मितहास्य धारण करून लाळ घोटणाऱ्या मंडळींच्या हालचालींचें किंचित् निरीक्षण केल्यास तेव्हांच येईल. जगद्गुरूच्या गादीवरील निःसत्व दण्डधारी असूनसुद्धां स्वतःस जसें ईश्वराचे खास अवतार मानतात, तसें या विसाव्या शतकांतले आमचे बरेच हिंदी संस्थानिक आपणांस परमेश्वराचे अंश समजतात. या त्यांच्या कल्पनेला उचलून धरून तिचे थेर माजविणारे लाळघोटे कोणत्याहि काळीं मुबलक असल्यामुळें या परमेश्वरी अंशांनीं आपल्या हातच्या सत्तेच्या जोरावर वाटेल तसल्या खेळखंडाबांचा हैदोस आजपर्यंत नाचविलेला आहे. कोणी कितीही कुबेर असला तरी पायांत घालण्यासाठीं सोन्याचा दागिना कधीं करवीत नाहीं. सुवर्ण ही श्रेष्ठतम धातु आहे. तिला पाय लावणें ह्मणजे प्रत्यक्ष लक्ष्मीला लाथ मारण्यासारखें आहे, असें सर्व जगांत मानतात. परंतु सातारकर थोरल्या शाहु छत्रपतींनीं हट्ट घेतला कीं आह्मी जर ईश्वराचे अंश - म्हणजे प्रत्यक्ष ईश्वर - आहोंत; तर आमच्या पायांत सोन्याचा तोडा कां नसावा ? वादीहि तेच आणि संवादीहि तेच. आजूबाजूच्या विवेकभ्रष्ट गुलामांनीं हस्तांजुली जोडून हँ हँ हँ करण्याचाच काय तो अवकाश, बोलबोलतां छत्रपतींच्या चरणद्वयावर सोन्याचे तोडे चढलेच. आद्य शंकराचार्य दिवसा मशाली लावून

एन ४००६--९अ

हिंडत, ह्मणून डॉ. कुर्तकोटीनींहि तसेंच करावें; श्रीशिवाजी महाराजांना शिवाचे अवतार मानतात, ह्मणून त्यांच्या प्रत्येक वंशजानें तीच भावना स्वतःविषयीं मानावी; आणि समर्थ रामदास हे मारुतीचे अवतार, ह्मणून त्यांच्या वंशजानें सज्जनगडावर जमलेल्या यात्रेकरूं पुढें उगाच बुभुःकार करीत मिरवावें, हे मानसिक गुलामगिरीचे हिडीस मासले होत. परमेश्वरी अवताराचें रहस्य काय असेल तें असो; तथापि मिसेस ॲनि बेझंटनें कृष्णमूर्तींतून मैत्रेयावतार उत्पन्न होणार म्हणून केलेल्या वल्गना जशा पोरकट, तशा मारुतीच्या बेंबटांत टिळकांचा अवतार उपटल्याच्या गप्पाहि हलकटच. एकाद्या संस्थानिकाला राजर्षि बनविणें, एकाद्या मठाधिपतीला याज्ञवक्ल्याचा अवतार मानणें किंवा वल्लभाचार्याच्या गादीवर बसणारा प्रत्येक ठोंब्या श्रीकृष्ण भगवंताचा खुद्द अवतार मानून गोकुळ अष्टमीच्या रात्रीं गावांतल्या सगळ्या गोपिकांनीं त्याच्या 'सेवाने माटे' गर्दीच गर्दी उडविणें, असलीं चिळस आणणारीं कृत्यें म्हणजे व्यक्तिप्रामाण्याची धाडशी अवलाद होय. मानवी समाजांत गुलामगिरीची महामारी प्रसृत करण्याच्या कामीं निरनिराळ्या प्रामाण्यांच्या पुण्याईची सेन्सस घेतली तर व्यक्तिप्रामाण्याइतकं एकलहरी जलाल दास्य दुसरें आढळणार नाहीं. आजपर्यंत या दास्याचीं जाळीं जाळीं सर्वत्र फैलावण्याच्या कामीं सांप्रदायिक एकमुखी धर्मसत्ता व वंशपरंपरागत निरंकुश राजसत्ता यांनीं मुख्यत्वें पुढाकार घेतलेला आढळतो. प्रत्येक कृत्याला पावित्र्याचा मुलामा चढविल्या शिवाय जनता आपल्या गुलामगिरीच्या जोखडाखालीं केव्हांहि निमूटपणें मान देणार नाहीं, हें या प्रामाण्यविभूषित व्यक्तींना पूर्ण अवगत असल्यामुळें, त्यांना आपल्या दैवी अंशत्वाची टिमकी आपल्या गुलाम हस्तकांच्या हातून पिटविण्याची विद्या कोणी शिकवावी लागत नाहीं. 'राजा विष्णूचा अवतार आहे' इ. सूत्रें व्यक्तिप्रामाण्याच्या अनंत भक्तांनींच जनतेमध्यें फैलावलेलीं आहेत. इंग्लंडच्या राजाचा हस्तस्पर्श झाला कीं मोठमोठे दुःसाध्य रोग सुसाध्य होतात, या वेडगळ कल्पनेचा पगडा युरोपियनांवर अझूनसुद्धां बराच आहे. हैद्राबादचे प. वा. निजाम साहेबांना वऱ्हाडचे लोक तर खुद्द पैगंबर मानीत असत. कोणाला सर्पदंश झाला कीं मांत्रिकाला बोलावण्यापूर्वी रोग्याच्या नांवानें निजामाला टेलीग्राम पाठवीत असत व निजाम साहेब ''रोगी अल्लाच्या मेहेरबानीनें आतां दंशमुक्त होईल'' असा उलट जबाब पाठवीत. हा जबाब त्या दंशित माणसाला वाचून दाखविला कीं ह्मणे लगेच तो खडखडीत बरा होत असे. हटातटानें पटा रंगवुनि मठाची उठाठेव करणाऱ्या संत महंतांच्या दरबारीं असले प्रकार तर खंडोगणती होत असतात. हे प्रकार घडवून आणण्याचें कार्य निगर्गट्ट व बिंलद सिद्धसाधकांच्या हातीं असल्यामुळें व्यक्तिप्रामाण्याच्या गुलामगिरीची किंचित् सुद्धां शंका श्रद्धाळु जनतेला येत नाहीं.

सांप्रत हिन्दुजनता नानाविध प्रामाण्यांच्या गुलामगिरींत गिरफ्दार झालेली आहे. ही गुलामगिरी दृश्य नसल्यामुळें तिच्या समाजविध्वंसक परिणामाकडे जनतेचें लक्ष वेधणें प्रत्येक समाजहितवाद्याचें कर्तव्यच आहे. हें कर्तव्य कटुतम आहे, कठोरहृदयी आहे, कर्त्याला लोकमान्यतेच्या चढत्या उतरत्या घसरंडीवर लोळविणारें आहे; पण तें अत्यावश्यक असल्यामुळें कोणीतरी केलेंच पाहिजे. केल्याविण कांहीं होत नाहीं ! मानसिक दास्याविरुद्ध बण्ड आतां केलेंच पाहिजे. नानाविध प्रामाण्यांच्या पावित्र्याचे ढोंगी मुखवटे फाडले पाहिजेत आणि शुद्ध विवेकशक्तीच्या जोरावर जनैक्य व जनहितवर्धक समाजधर्माची पुर्घटना केली पाहिजे, ही विचार व आचारजागृति आतां हिन्दुसमाजांत दिवसेंदिवस पुष्कळच थरारत आहे. पुनर्घटनेची भूक सपाटून लागली आहे; परंतु संघटनेकडे व शिस्तीकडे दुर्लक्ष होत असल्यामुळें,

दुष्काळांतल्या माणसाला एकदम पंचपक्वान्नांचें ताट हातीं लागतांच अधाशीपणानें खा खा करून जसा प्राणासच मुकण्याचा प्रसंग येतो, तोच प्रकार येथेंहि होण्याचा बराच संभव आहे. याचा दाखला म्हणजे मराठे बांधवांनीं निर्माण केलेली क्षात्र जगद्गुरूची गादी हा होय. ब्राह्मण जगद्गुरूचें दास्य नको ह्मणून क्षात्रजगद्गुरूचें पीठ निर्माण करणें, ह्मणजे जुन्या गुलामगिरीच्या त्रासांतून मुक्त होण्यासाठीं नव्या गुलामगिरीचें जोंखड पत्करण्या सारखेंच आहे. समाजोन्नतीसाठीं किंवा धर्मोन्नतीसाठीं शंकराचार्याचा एक मठच पाहिजे, त्यावर कोणीतरी एक मठपतीच पाहिजे, ही कल्पनाच मुळीं मानसिक दास्याची स्पष्टस्पष्ट निशाणी आहे. गुलामगिरीचा नायनाट गुलामगिरीनें होत नसतो. शिवाय, वर्णाश्रमवादी ब्राह्मण-जगद्गुरूच्या मानसिक दास्यप्रवर्तक भिक्षुकशाहीला जमीनदोस्त करण्यासाठीं थेट तसल्याच तत्वांवर उभारलेल्या क्षात्रजगद्गुच्या मठाला निर्माण करणें, ह्मणजे जोंखडासाठींचे देवानें आपल्याला मान दिली आहे ही कल्पना दृढमूल झालेल्या बैलानें नाऱ्या तेल्याच्या घाण्याला रामराम ठोंकून पिऱ्या तेल्याच्या गोंडस घाण्याला स्वतःस जुंपून घेण्यासारखें आहे. मठ आला कीं मठाधिपति आले; मठाधिपति आले कीं सांप्रदाय सुरू झाला; सांप्रदायाच्या मागोमाग सांप्रदायीं गुलामगिरी ठेवलेलीच. अर्थात् क्षात्रजगद्गुरूच्या मठाचा अनाठायीं खटाटोप करणारे आज जरी या नवीन परिस्थितींत कांहीं समाधान मानीत असतील, तरी निदान व्यक्तिप्रामाण्याची मुर्वत राखण्यासाठी त्यांना कालवशात् एका नवीन स्वरूपाच्या भिक्षुकशाहीच्या गुलामगिरींत बिनतोड जखडून पडल्याशिवाय गत्यंतरच उरणार नाहीं. आज घटकेस त्यांना ब्राह्मणी ग्रन्थप्रामाण्य मान्य नसलें, तरी क्षात्रग्रन्थप्रामाण्याचा रामरगाडा भविष्यकाळीं त्यांना टाळतांच येणें शक्य नाहीं हें त्यांनीं पूर्ण लक्षांत ठेवावें. ग्रन्थप्रामाण्याची बेडी सुज्ञजन तेव्हांच तोडूं शकतात, परंतु व्यक्तिप्रामाण्याची उरावरील धोंड निस्तरण्याचें काम फार कठीण आहे. धर्मसंरक्षणासाठीं जगद्गुरूच पाहिजेत ही कल्पनाच मुळीं विवेकवादासीं विसंगत आहे. मानसिक दास्य म्हणतात तें हेंच. आणि या दास्याची आवश्यकता वादार्थ क्षणभर गृहीत धरली, तरी आद्यशंकराचार्यांनीं आपल्या चतुर्पीठांची स्थापना करण्यापूर्वी धार्मिक व सामाजिक संजीवनाचें कार्य संघटीत रीतीनें हिन्दुस्थानांत होतच नव्हतें कीं काय? जर तें उत्तम होत असल्याची साक्ष इतिहासांत आहे आणि जगद्गुरूंच्या सांप्रदायानें जनतेचा भिक्षुकशाही गुलामगिरींत प्राणघातक कोंडमारा केल्याचा दाखला जर आज ढळढळीत आपल्या डोळ्यांसमोर आहे, तर जुन्या धाटणीच्या दास्यप्रवर्तक संप्रदायाची वेसण झुगारून देऊन, निषेधानें किंवा प्रतिकाराच्या तडफीनें, नव्या धाटणीच्या संप्रदायाच्या जोखडाखालीं मान देण्यांत कोणत्या स्वातंत्र्याची अपेक्षा आमचे मराठे बान्धव करीत आहेत कोण जाणे? या आमच्या लिहिण्यानें कोणी आपला असा कुग्रह करून घेऊं नये कीं ब्राह्मण-जगद्गुरू वा क्षात्रजगद्गुरू यांच्या गादीवरील विद्यमान पुरुषांबद्दल आह्मांला कांहींच आदर नाहीं. वास्तवीक त्यांच्याबद्दल किंवा कोणाबद्दलहि अनादर व्यक्त करणें बरें नव्हे. हे जगद्गुरू (?) कितीहि ज्ञानी असले तरी ते एका विशिष्ट संप्रदायाचे प्रवर्तक बनल्यामुळें त्यांच्याहि नशिबाची सांप्रदायिक गुलामगिरी चुकत नाहीं. डॉ. कुर्तकोटी (हे कोणत्या मठाचे मठपति आहेत हें अझून खुद्द त्यांनाच सिद्ध करावयाचें आहे.) काय कमी विद्वान् आहेत? त्यांच्याइतके विद्वान खरोखरच विरळा. पण त्यांची आज काय अवस्था आहे? भिक्षुकशाहीच्या पचनीं पडलेला हा उमदा महाभागवत लोकमान्यतेच्या चोरबाजारांत लिलांवानें विकला जात आहे. याचें कारण सांप्रदायिक दास्य व अनेक प्रामाण्यांची मानसिक गुलामगिरी हेंच होय. पंजाबमेलला एकच

राक्षसी इंजीन लावा किंवा दहा लावा, त्यांचा वेग ताशीं ६० मैलांचा असो नाहींतर ६००० मैलांचा असो; त्यांच्या नशिबाचें रूळांचें दास्य कांहीं टळत नाहीं आणि अखेर ती जशी ठराविक रस्त्यांनीं ठराविक वळसे घेत ठराविक मुक्कामालाच जाऊन आदळते, तोच प्रकार मठाच्या व सांप्रदायाच्या उठाठेवींत असतो. हें नीट लक्षांत आलें तर भावी लोकशाहीच्या वातावरणांत हिन्दुसमाजाचें जीवन सुयंत्रित राखण्यासाठीं ठिकठिकाणीं बाजलेलीं ही मानसिक दास्यप्रवर्तक सांप्रदायिक कळकीची बेटें आमुलाग्र उखडून कां टांकली पाहिजेत, याचें अधिक विवरण करायला नको.

सर्व हिन्दी राष्ट्राला स्वराज्यप्राप्ती करून देण्यासाठीं अस्तन्या सरसावून स्वातंत्र्याच्या गर्जना करणारी राष्ट्रीय सभासुद्धां व्यक्ति स्वातंत्र्याचे व राष्ट्रस्वातंत्र्याचे पोंवाडे गातां गातां तिच्याहि चळवळीची भिंगरी अखेर व्यक्तिप्रामाण्यावरच येऊन रिंगण्या मारूं लागली. नुकत्याच झालेल्या अहमदाबादच्या अधिवेशनानें म. गांधींना राष्ट्रीय सभेच्या मठाधिपतीचे जे सर्वाधिकार दिले आहेत, त्यामुळें व्यक्तिप्रामाण्याचा म्हसोबा अखेर राष्ट्रीय सभेच्याहि बोकांडी बसण्यास चुकला नाहीं, हें उघड होत आहे. आतां राष्ट्रीय सभा म्हणजे गांधींचा सांप्रदाय होय. राष्ट्रांतल्या व्यक्तिमात्राला अतःपर राष्ट्राच्या बऱ्या वाईटाची काळजी करण्याचे प्रयोजन नाहीं. मठाधिपति महात्मे जे जे फर्मान् सोडतील, त्याची त्यांनीं अंमलबजावणी केली, म्हणजे झालें. असें कां आणि तसें कां असले प्रश्न विचारण्याचा अधिकार आतांत कोणास नाहीं. गांधींच्या रामराज्यांत सीतेच्या पातिव्रत्याबद्दल शंका घेणारा धोबी महालक्ष्मीच्या धोबीघाटावर आपटून धोपटून लंबा केला जाईल. सारांश, मानवी मनाच्या स्वतंत्र विचारसरणीला जें स्वतंत्र वातावरण लागत असतें, तें मठाची व मठाधिपतींची स्थापना होऊन त्यांच्या पोटीं जन्माला आलेल्या सांप्रदायाच्या कडेकोट निर्बंधांच्या कुंपणांत लाभणें केव्हांहि शक्य नसतें. व्यक्तिप्रामाण्याचें स्तोम माजवून लिलावांच्या दरानें आपलीं मनें विकणाऱ्या स्वयंमन्य गुलामांना स्वातंत्र्यदेवीनें वरल्याचें स्वयंवर जगाच्या इतिहासांत घडल्याचा दाखला नाहीं.

□□□

स्फुट विचार

मुळशीपेटा सत्याग्रह

प्रबोधनाच्या १६/११/२१ च्या अंकांत या विषयावर लिहिलेलें एक स्फुट बऱ्याच देशभक्तांना एरंडेलाच्या डोसाप्रमाणें तर कित्येकांना मिरचीच्या धुरीप्रमाणें झोंबलें असल्यास कांहीं नवल नाहीं. स्वभावधर्माप्रमाणें बरें वाईट वर्तन ठेवण्याच्या कोणाच्याहि स्वातंत्र्याविरुद्ध प्रबोधन कधींहि आक्षेप घेणार नाहीं. मात्र खरी वस्तुस्थिति व्यक्त करण्याच्या कामीं कोणाच्या निन्दा स्तुतीची तो पर्वा ठेवणार नाहीं. मुळशी पेट्यांत सत्याग्रहाची धामधूम माजविणाऱ्या चळवळ्या देशभक्तांच्या हेतूंबद्दल आम्हांला प्रथमपासूनच शंका आहे. याचें कारण त्या चळवळ्यांची सुप्रसिद्ध परंपरा हें होय. म्हणून साधक बाधक गोष्टीचा विचार करून त्या वेळी आम्ही स्पष्ट नमूद केलें होतें कीं, ''मुळशांवर उद्यां जरी जलप्रलय झाला तरी ज्यांच्या जमिनी आधींच सावकारी प्रलयाखालीं मागेंच जमीनदोस्त होऊन गेल्या आहेत, त्या 'शिवाजीच्या मावळ्यांची' अधिक भयंकर हानी ती काय होणार? उलट टाटाच्या रामरगाड्या खालीं मुळशीचें पीठ झालेंच, तर नुकसान-भरपाईच्या पिठाच्या कच्च्या पक्क्या भाकरी 'शिवाजीच्या मावळ्यांच्या' पोटांत न उतरतां, ब्राह्मण गुजर सावकारांच्या घशांकडेच धांव घेणार'' ता. ७-१-२२ च्या लोकमान्यांत जी 'मुळशी पेट्यांची हालहवाल' प्रसिद्ध झाली आहे, तींत आमचें विधान अक्षरशः खरें ठरल्याचाच दाखला आढळतो. ''मुळशी पेट्यांत सावकारी नात्यानें शेंकडों मावळ्यांच्या जमिनी गहाणवजा विश्वासखरेदी असून (विश्वास काय, खरेदी काय, गहाणवजा काय, सगळाच चमत्कार ! सावकारी शब्दव्युत्पत्तिप्रदीप अजब खरा !!) त्या जमिनी सावकार लोक आपल्या मालकीच्या म्हणून बेधडक टाटा कंपनीस देत आहेत. कांहीं सावकारांनीं बरेच पैसे घेतल्याचें बिंग बाहेर पडलें.'' असें लो. मा. चा बातमीदार ह्मणतो. यामुळें टाटाविरुद्ध प्रत्यक्ष आणि सरकारविरुद्ध अप्रत्यक्ष सत्याग्रह करण्यास सिद्ध केलेल्या मावळ्यांना अखेर मुळशींतल्या हरामखोर सावकारांच्याच विरुद्ध सत्याग्रह पुकारावा लागला आहे व सुमारें ३००-३५० मावळे सावकारांच्या घरी धरणें धरून बसले आहेत. वास्तवीक ही बातमी कांहीं नवीन नव्हे. एक महिन्यापूर्वी पुण्याच्या विजयी मराठा पत्रांत सावकारांच्या या हरामखोरीचे चाळे पुराव्यानिशीं सप्रमाण प्रसिद्ध झालेले होते. परंतु या

अपवित्र ब्राह्मणेतर पत्रांतील मजकुरावर सोंवळ्या लोकांचा विश्वास बसावा कसा? आतां त्याच गोष्टीवर लोकमान्यशाहीचा सोंवळा छाप पडत आहे; त्यांकडे तरी झोळीवाले, मेळेवाले व भिक्षुकीपत्रप्रामाण्यांत गुरफटलेले पवित्र गुलाम लक्ष देतील, अशी आशा आहे.

विवेकवाद

विवेकवाद सारस्वत प्रसारक मंडळीच्या स्थापनेबद्दल एका विद्वान् 'विवेकवादी' गृहस्थाची विनंतिपत्रिका आज इतरत्र छापिली आहे, तिकडे वाचकांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. विवेकवाद (Rationalism) या विषयावर युरोप व अमेरिकेंत गेलीं ५० वर्षे अनेक विद्वान् लेखन व भाषणद्वारें लोकजागृतीचें कार्य फारच मोठ्या प्रमाणावर करीत आहेत व R. P. A. Series चे ग्रंथ हिंदुस्थानांतल्या अनेक आंग्ल भाषाभिज्ञांच्या विचारांस उत्क्रान्त करण्यास कारणीभूत झालेले आहेत. अमेरिकेंतल्या विवेकवादी मुद्रक संस्थेनें सामाजिक धार्मिक व राजकीय विषयांवरील निस्पृह चिकित्सक वाङ्मय प्रसारानें सारें जग गदगदा हालवून सोडलेलें आहे. नुसत्या एकट्या इंगरसॉलच्या ग्रंथांनीं क्रिस्ती धर्माच्या धर्मतत्वांचे इतके धुडके धुडके उडविले आहेत की प्रत्यक्ष हॉवित्झर तोफांच्या माऱ्यानें सारीं क्रिस्ती चर्चें जमीनदोस्त झालीं तरी परवडलीं, (कारण तीं पुन्हां बांधतां तरी येतील !) परंतु इंगरसॉलच्या लेखांना व व्याख्यानांना तोंड देणें नको, अशी प्रत्यक्ष स्थिति आजहि आहे. इंगरसॉलचे ग्रंथ म्हणजे क्रिस्ती मिशनऱ्यांच्या छाताडावर बसलेले व हूं म्हणतांच भयंकर स्फोट करणारे अंधश्रद्धाविध्वसंक बाँब गोळेच होत. पाश्चिमात्य क्रिस्तानुयायी वेळीं रखरखलेले निखारे आनंदानें मिळतील, पण इंगरसॉलचा नुसता वास येतांच 'न्यायाच्या दिवसा'ची वाट न पाहतां तडक नरकाकडे जीव घेऊन पळतील. असल्या ग्रंथांचीं मराठीत भाषांतरें होणे अत्यंत जरूरीचें आहे. आज महाराष्ट्रांतसुद्धां विवेकवादी स्वतंत्रमताचा प्रादुर्भाव आस्ते आस्ते बराच झालेला आहे. या मताच्या व्यक्तिकरणार्थ विवेकवाद सारस्वत प्रसारक मंडळासारख्या संस्थेची अत्यंत जरूरी आहे. प्रथमारंभीं नुसता भाषांतराचा उपक्रम जरी या मंडळानें केला तरीं देखील तो श्लाघ्यच ठरेल. (मात्र असलीं भाषांतरें 'दाभोळकर सीरीज'च्या वळणावरचीं 'हाडकांचीं गांठोडी' मात्र नसावीं !) या कामीं सांपत्तिक मदतीची जेवढी जरूर आहे, त्यापेक्षां विवेकवादी सहायक मंडळींच्या संघशक्तीची आवश्यकता फार आहे. अशा धोरणावर कलकत्त्यास सर जॉन उड्रॉफ या विद्वान् पंडिताच्या अध्यक्षतेखाली इंडियन रॅशनॅलिस्टिक सोसायटी स्थापन झालेली असून, तिच्या मासिक बुलेटीननें विवेकवाद प्रसाराचें कार्य इंग्रजी भाषेंत व्यवस्थित चालविलेलें आहे. बंगाली तरुणांप्रमाणें महाराष्ट्रीय तरुण बंधु व भगिनी असली एखादी संस्था स्थापन करून नेटानें चालविण्याचें पुण्य संपादन करतील, अशी आम्हाला अपेक्षा आहे.

सत्तेशिवाय शहाणपण नाहीं

शहाणपणा पुष्कळ असला, पण हातांत सत्ता नसली तर शहापणाची विक्री होत नाहीं, शहाणपणाला बुरशी बाजते. डॉ. कुर्तकोटींची अवस्था अशीच झालेली आहे. त्यांच्यापाशी शहाणपण (म्हणजे विद्वत्ता) रगड आहे, पण हातांत सत्ताच नाही. त्यामुळें त्यांनीं आपल्या विद्वत्तेला सवलतीच्या दरानें जरी विक्रीस काढली आहे, तरी तिला यावी तितकी मागणी नाहीं. विद्वत्तेचा पुरवठा भिक्षुकशाहीनें करावा आणि इतरेजनांनी तिच्या 'ट्रेडमार्का'ला पाहून तो बिनतक्रार खरेदी करावा, अशी आजपर्यंत वहिवाट होती. परंतु इतरेजनांना आतां स्वावलंबनाचा महामंत्र पटल्यामुळें, त्यांनी भिक्षुकी पुरवठ्याला जवळजवळ कायमचाच बहिष्कार घातला आहे; अर्थात् भिक्षुकी शहापणाच्या वखारी आतां ठिकच्या ठिकाणीं कुझतात कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे. म्हणून हिन्दुधर्म परिषदेच्या द्वारें कांहीं तरी सत्ता पटकविण्याचा डॉ. कुर्तकोटींनी गेल्या नागपूरच्या अधिवेशनांत कस्सून प्रयत्न केला. बरोबरच आहे. सत्तेशिवाय शहाणपण नाहीं. पण शहाणपण असलें म्हणजे सत्ता येतेच असेंहि नाहीं. तथापि सत्ता पाहिजे हा कटाक्ष विशेष प्रामुख्यानें डॉ. साहेबांच्या भाषणांत पुढें पुढें येत होता. ज्या काळीं जनता भिक्षुकी दास्यांतच मोक्षाचे समाधान मानण्याइतकी अजाण व अप्रबुद्ध होती, अशा काळांत डॉ. कुर्तकोटींचा अवतार वास्तवीक व्हायला पाहिजे होता. म्हणजे त्यांच्या श्वासोच्छ्वासागणित अनंत सत्तेचे ताम्रपट वादळांतल्या वाळूप्रमाणें त्यांच्या पायांशी येऊन कोसळले असते. पण आतां काय? आतांच्या जनतेची जागृति पाहिली तर ही सत्ताप्राप्तीची शर्यत कशी काय जिंकली जाईल याची जबरदस्त शंका येते. प्रयत्न खुशाल करावे, त्यांत कोणी हात धरणार नाहीं; परंतु भिक्षुकी सत्तेच्या चापांत मान अडकविल्यामुळें हिन्दुराष्ट्राच्या झालेल्या अधःपाताचें स्पष्ट चित्र नजरेसमोर असतां, बहुजनसमाज याउप्पर कोणत्याहि भिक्षुकाचार्याच्या हातीं कसलीहि सत्ता देण्यापूर्वी दहा सोडून शंभर अंक मोजल्या शिवाय खास रहाणार नाहीं. क्षेत्र राजकीय असो, सामाजिक असो, किंवा धार्मिक असो, त्यांत भिक्षुकशाहीच्या तंत्रमंत्रांच्या अनुशासनाचा मुलाजा बहुजनसमाज अतःपर चालूं देईल, हें तर संभवतच नाहीं. भिक्षुकी वर्चस्वाच्या ओंजळीनें पाणी पिण्याचे दिवस आतां गेले. उलट भिक्षुकशाही परंपरेचे भक्त वेळींच शुद्धीवर येऊन देशकालवर्तमानानुसार आपल्या आचार व विचारसरणींत जर योग्य सुधारणा करणार नाहींत, तर लवकरच त्यांना अस्पृश्यांच्या पंक्तीस जाऊन बसण्याचाच प्रसंग येण्याचा बराच संभव आहे. डॉ. कूर्तकोटींना सत्ता पाहिजे. कशाला? आजपर्यंत धर्मगुरु (?) बुवांनीं खऱ्या खोट्या सत्तेच्या जोरावर ग्रामण्यांचे जे अनन्वित पाशवी अत्याचार केले, त्यांची विसाव्या शतकांतली सुधारलेली आवृत्ति अंमलांत आणण्यासाठीं काय? भिक्षुकी सत्तेची शिलकी रग जिरवून घेण्यासाठीं पुनश्च पेशवाई सत्ता प्रस्थापित व्हावी व बहुजनसमाजानें ब्राह्मणी वर्चस्वाच्या जात्यांत निमूटपणें स्वतःस भरडून घ्यावें, हाच एकंदर खटपटींचा गुप्त उद्देश दिसतो. म्हणे हातीं सत्ता द्या. कशाला? पुण्याच्या बुधवार चौकांत दैवज्ञांच्या अंगांवर उकळते तेल ओतून त्यांची होळी करायला? बापटशास्त्र्यांना नीळकंठ शास्त्री थत्ते, बाळा नातू, चिंतामणी सांगलीकर इ. महात्म्यांचे अधिकार देऊन, दक्षिण महाराष्ट्रांतल्या क्षत्रिय मराठ्यांच्या संस्थानांची राखरांगोळी करायला? शुक्ल यजुर्वेद्यांची घरें दारें लुटायला? हाती सत्ता घेऊन करणार काय?

शूद्र ठरविलेल्या क्षत्रिय मराठ्यांना अस्पृश्य ठरविणार; अस्पृश्यांना पशुपक्षी कीटक ठरविणार; कां 'कायस्थं नहि विश्वसेत्' या राजवाडीस्मृतीच्या जोरावर आधींच 'साम्राज्य द्रोही' ठरविलेल्या कायस्थांना रामोशी बेरडांच्या यादींत ढकलणार? ब्राह्मणेतराची नुसती सावली पडल्यास देवळांतल्या देव देवीला प्रायश्चित्त देऊन परमेश्वराचें पतितपरावर्तन करणाऱ्या तुम्हां ब्रह्मदेवाच्या बापांना जनता आतां पूर्ण ओळखीत आहे. उगाच सत्तेच्या उपासमारीचें प्रदर्शन मांडून स्वतःचा उपहास करून घेऊं नका, एवढेंच आमचें सांगणें आहे.

मरत्या कोंबड्याचा तडफडाट

इंदोर येथील हुंडाबहिष्काराच्या चळवळींत सामील असणाऱ्या कित्येक तरुणांना 'डिफेमेशन'ची धमकी दाखविण्यासाठीं एक विद्वान् एलेल्बी शहाणे पुढें येत आहेत. हे स्वतः तरुण आहेत, विद्वान् असलेच पाहिजेत-एरवीं एलेल्बी होतील कसें? स्वतः रसिक असून काव्यप्रेमी आहेत, विशेषतः गोविंदाग्रजाचे ते अनन्य भक्त म्हणवितात, आणि त्यांच्या नवमतवादाबद्दल वकील मजकूर मोठमोठीं व्याख्यानेंहि देतात. सध्यांच्या हुंडाप्रकरणांत ते शायलॉकी लाडवांच्या मेजवानानें उपकृत झालेले असल्यामुळें बुंदीशीं क्रियानष्ट न होण्याचा त्यांचा निश्चय वकीली धंद्याला साजेशोभेसाच आहे. परंतु त्यांच्या कायदेबाजीला धूप घालणारी पिढी मागेंच मेली आहे, एवढेंच या शहाण्या कज्जेदलालाच्या नजरेस आम्ही आणीत आहोंत. सध्यां तुरुंगांची पर्वा न करणारी जनता जेथें कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् माबाप सरकारला सहज लीलेनें बगलेंत मारीत आहे, तेथें तुम्हां वकील-कस्पटांच्या समन्स वारंटीच्या धमक्यांवर तिरस्कारानें थुंकण्यासहि तरुणजनांस फुरसद किंवा इच्छा नाहीं, हें आमच्या एलेल्बी शहाण्यानें पूर्ण लक्षांत ठेवावें. राजकारणाच्या क्षेत्रांत अन्याय्य दडपशाहीला तोंड देऊन केवळ सत्यासाठी धिटाईनें आपण होऊन तुरुंगांत घुसणाऱ्या तरुणांची सेना ज्या देशांत चुटकीसरशी सहस्रावधि झालेली आहे, त्या देशांत सामाजिक व धार्मिक क्षेत्रांतल्या हरामखोरांच्या बण्डाला तोंड देतांना आनंदानें तुरुंगांत जाणाऱ्या स्वावलंबी स्वयंसेवकांचा यापुढें मुळींच तुटवडा पडणार नाहीं. एलेल्बीच्या कायदेबाजीला भिण्याचा मनु आज सरणावर जळूं घातला आहे. अन्यायाला नामशेषसुद्धां उरूं न देण्यासाठीं हिन्दीराष्ट्रानें आपलें विराट स्वरूप पूर्ण व्यक्त केलें आहे. अशा स्थितींत वकीलसाहेब, पोटांत रिचविलेल्या बुंदीच्या क्रियाकर्मांतराच्या नादीं लागाल, तर जगांत आपली छीः थूः करून घ्याल. वकील वैश्या व वैदू या तीन वकारांना तरुणपिढी पूर्ण जाणून आहे. उगाच मरत्या कोंबड्याचा तडफडाट दाखवितां कोणाला?

प्रबोधनाची पृष्ठें वाढवा

अशा प्रकारची सूचना करणारीं बऱ्याच प्रेमळ आश्रयदात्यांचीं आम्हांला पत्रें येत आहेत. या सूचनेबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहों. तथापि एकंदर परिस्थितीचा विचार करतां आश्रयदात्यांची

संख्या बरीच वाढल्याशिवाय या प्रेमळ सूचनेस मूर्तस्वरूप येणें जवळजवळ दुरापास्त आहे. आश्रयदात्यांची सहानुभूति व आमचें स्वावलंबन यांवरच प्रबोधनाचा संसार चालावयाचा असल्यामुळें, प्रबोधनाच्या कार्याच्या भावी सुधारणा अमलांत येणें हें सर्वस्वी आश्रयदात्यांच्या साहाय्यावरच अवलंबून आहे. जागेची अडचण प्रथमपासूनच आम्हांला जाणवत आहे, अनेक महत्वाचे लेख जडान्तःकरणानें नाइलाजास्तव बाजूला ठेवावे लागतात. बॅ. मूकर्जींचा हिन्दुजनांचा ऱ्हास व अधःपात, डॉ. टॉगोर यांचा 'संस्कृतींचा संगम' मि. चतर्जीकृत 'अदूरदर्शी विवाह' आणि 'विवेकवाद म्हणजे काय' वगैरे अत्यंत उत्कृष्ट व उज्ज्वल प्रतिभेचे निबंध तयार असूनसुद्धा छापण्याची सवड होत नाहीं. कलमबहाद्दरांस द्यावयाच्या शेल्यापागोट्यांचा मला मोठा गठ्ठा मुद्रणालयाचा 'पासपोर्ट' कधी मिळतो याची वाट पहात स्वस्थ बसला आहे. आश्रयदात्यांनीं मनावरच घेतलें तर आठ पृष्ठांच्या ऐवजीं प्रबोधन सोळा पृष्ठांचाहि निघूं शकेल. या दिशेनें कांहीं संघटित प्रयत्न व्हावा, म्हणून आजच्या अंकांत कांहीं हस्तपत्रिका आमच्या ग्राहकांच्या सेवेशीं सादर करित आहोंत. त्यांचा योग्य तो उपयोग करून प्रत्येकानें आम्हांला आणखी दोन दोन आश्रयदाते मिळवून दिले, तर स्वावलंबनी प्रबोधनाला आपलें उद्दिष्ट कार्य विशेष नेटानें चालविण्यास हुरूप येईल. प्रेमळ बन्धुभगिनी प्रबोधनाच्या या विनंतीचा योग्य तो विचार करतील अशी आशा आहे.

□□□

अग्रलेख

मानसिक दास्याविरुद्ध बण्ड

(लेखांक ४ था)

मन मनुजाचें कारण स्वातंत्र कयाला तसेंच दास्याला ।। या सूत्राची मीमांसा पहिल्या लेखांकांत केलेली वाचकांस स्मरत असेलच. दास्याची दृश्य अदृश्य जाळीं पसरविणाऱ्यांना ही मनाची मख्खी दृष्टीआड करून भागत नाहीं; उलट आपल्या कारवाईचा मारा बिनचूक मनावर कसा होईल इकडे त्यांचें लक्ष एकवटलेलें असतें. मन मारलें कीं मानव मेला; मग जगाच्या दृष्टीनें तो चालताबोलता, रडताहंसता किंवा धांवतापळता जिवंत प्राणी मानला जाई ना का, त्याची विशेष पर्वा नाहीं. मन मेलेलीं माणसें आपल्या जिवंतपणाच्या सिद्धीकरितां वाटेल त्या चळवळी करीत, दास्यप्रवर्तक गुंड महाशय त्यांच्याकडे कधींहि लक्ष देत नाहींत. कारण त्यांना पक्कें माहित असतें कीं या चळवळ्यांचें मन आह्मीं आधींच ठेंचून काढलेलें आहे ! मनाला ठेंचण्याची कृति बिनचुक व बिनधोक कशी यशस्वी करतां येते हें पहाणारांना ग्रंथप्रामाण्याबद्दल कस्सून विचार करावा लागेल. व्यक्तिप्रामाण्याच्या खालोखाल-किंबहुना बरोबरीनें-ग्रंथप्रामाण्य हें माणसांना जिवंतपणीं व मृतावस्थेचा प्रत्यक्ष अनुभव दाखविणारें दुसरें दास्यप्रचारक जरूर आहे; आणि या जहराची तिडीक हिन्दुजनांच्या अगदीं जिवाग्रीं जाऊन भिनलेली आहे. ग्रंथप्रामाण्याचा आवार मिळाला नाहीं कीं आमच्या हातपायाच्या नाड्या आंखडल्या; मग धडधडीत उगवलेला सूर्य डोळ्यांना दिसत असूनसुद्धां रात्र पडल्याची निर्लज्ज साक्ष द्यायला आमचे गुलाम मन कधींहि मागें पुढें पहाणार नाहीं. उदाहरणार्थ अस्पृश्योद्धाराचाच प्रश्न घ्या. एवढे मोठे जगाचे गुरु डॉ. कुर्तकोटी. अस्पृश्योद्धाराचें ग्रंथप्रामाण्यच सांपडलें नाहीं म्हणून त्यांनीं सुद्धां अखेर 'झालें. माझी कंबर खचली. माझा नाइलाज आहे.' म्हणून हात टेंकलेच कीं नाहीं? स्वतंत्र बुद्धिवादाच्या गप्पा झोकणारे आणि चातुर्वर्ण्याच्या मढ्याला हिन्दुधर्म परिषदेचा फुंकर घालून जगवूं पाहणारे हे वैदुराज बसलेच ना अखेर कपाळाला हात टेकून? ग्रंथप्रामाण्याच्या गुलामगिरीचा केवढा हा जबरदस्त परिणाम !! दुसरें उदाहरण म्हणजे कलियुगांत क्षत्रिय वैश्यांचें उडालेलें तळपट हें घ्या. 'कलियुगांत क्षत्रिय वैश्य उरलेले नाहींत' असा भिक्षुकशाही लेखणीचा एकच फटकारा धर्मग्रंथांत उमटतांच अस्सल क्षत्रियांच्या पाणीदार तलवारी बोथट पडून वैश्य जनांच्या तागड्यांच्या तंगड्या आपोआप त्यांच्याच गळ्यांत पडाव्या, इतकेंच नव्हे तर शरिरांत खेळत असलेल्या वैश्य व क्षात्र तेजाच्या रक्ताचासुद्धां

त्यांना स्वतांलाच जबरदस्त संशय उत्पन्न व्हावा, हा भिक्षुकशाही दास्यप्रवर्तकांचा केवढा बिनतोड विजय झाला बरें ! काना मात्रा वेलांट्यांचे सात आठ शब्द जुळवून बनविलेलें खोडसाळ सूत्र तें काय, आणि त्याच्या मंत्रानें वाघ सिंहांचे बच्चे आपल्याला बकऱ्यामेंढरांची अवलाद समजतात काय ! परंतु यावर असा कोणी विचार करीत नाहीं कीं कलियुगाचा हा महिमा एकट्या हिन्दुस्थानाच्याच बोकांडीं कां? जपान चीन अमेरिका जर्मनीच्या नरड्यावर कां नाहीं? कलीच्या प्रभावाची जादु तिकडे चालत नाहीं कीं काय? इकडे मात्र क्षत्रिय वैश्यांचें उच्चाटन व्हायचें आणि तिकडच्या वैश्यांनीं येथें येऊन आब्राम्हण चांडाळांना चुटकीसरसे हिंगमिऱ्यांच्या गोणीखालीं रगडून त्यांच्यावर क्षत्रियतेजाची साम्राज्यसत्ता गाजवायची, हा प्रकार तरी काय आहे? गद्धा आमचा कली कीं यांचा राजकीय सौदा बली? काय आहे तरी काय हें प्रकरण? आतां आमचे बंधु दिवेकर शास्त्री ह्मणतात क्षत्रिय वैश्य हिंदुस्थानांत आहेत. मात्र त्यांनीं जगद्गुरूंच्या हातचें प्रायश्चित्तादाखल 'वांइच् वांइच् श्यान' खावें म्हणजे झालें. क्षात्र किंवा वैश्यवृत्तीचे लोक जगांत असणें किंवा नसणें, ही गोष्ट कोणाच्या आस्तिनास्ति वादानें किंवा प्रायश्चित्तार्थ गोमुत्राचे हौद आणि ताज्या गोमयाचे गोळे डोळे मिटून घशाआड करण्यावर थोडेंच आहे. महायुद्धाच्या सुरवातीला कै. टिळकांच्या राजनिष्ठेला भयंकर उकळी फुटली आणि 'सैतानी' सरकारला मदत करण्यासाठीं राष्ट्रानें द्रव्य व रक्त द्यावें अशी त्यांनीं याचनापूर्वक चळवळ केली. तेव्हां दक्षिण महाराष्ट्रांतून निरनिराळ्या ब्राह्मणेतर जातींचीं जी हजारों तरूण मंडळी फ्रान्सच्या समरभूमीवर लढण्यासाठीं भराभर सिद्ध झाली, त्यांच्या क्षात्रबाण्याच्या सिद्धीकरितां कोणकोणच्या जगद्गुरूंच्या मठांतले किती गोमुत्राचे बुधले आणि प्रायश्चित्तविधीच्या स्मृतिग्रंथांचीं किती पातडीं पुढें सरसावलीं होतीं, याची यादी दिवेकर शास्त्र्यांपाशीं किंवा डॉ. कुर्तकोटीपाशीं आहे काय? सारांश, अमुक वर्ण कलियुगांत आहे आणि अमुक नाहीं ही भाषाच मुळीं मूर्खपणाची नसली तरी लुच्चेपणाची खास आहे. क्षत्रिय वैश्यांच्या उच्चाटनाच्या स्मृतिपुराणोक्त प्रामाण्यानें आणि त्या प्रामाण्याच्या पचनीं क्षत्रिय वैश्यजन पडल्यानें हिन्दुस्थानचा राजकीय व आर्थिकदृष्ट्या भयंकर अधःपात झाला. अर्थात् या अधःपाताच्या पापाचें माप नीट सरळ रेषेंत भिक्षुकशाही स्मृतिकारांच्या पदरांत जाऊन पडत आहे.

मनु याज्ञवक्ल्यपराशरादिकांच्या नांवानें कित्येक कारस्थानी भिक्षुकी प्राण्यांनीं लिहून ठेविलेली स्मृत्यांचीं खोडसाळ पातडीं हीं ग्रंथप्रामाण्याच्या क्षेत्रांत अग्रगण्य होत. या स्मृतिग्रंथांचें वास्तविक स्वरूप काय आहे हे त्यांची उत्पत्ति कोणी कां व कशाला केली, याची स्पष्ट कल्पना बहुजनसमाजाला मुळींच नसल्यामुळें, किंवा त्या कल्पनेची जाणीव त्याला करून देण्याचें कोणी आजपर्यंत मनावर न घेतल्यामुळें, या ग्रंथांतील शब्दोच्चाराच्या जोरावर भिक्षुकशाही सांप्रदायिकांची गुलामगिरी अझूनहि निर्वेध धिंगाणा घालीत आहे. भिक्षुकशाहीनें हिन्दुराष्ट्राचें मन ठार मारून त्याचा सर्व बाजूंनीं अधःपात करण्याच्या कामीं स्मृतिपुराणादि ग्रंथांचाच मुख्यत्वें उपयोग केलेला आहे; आणि भिक्षुकी दास्याला जिवंत गाडण्याची चळवळ जसजशी अधिकाधिक जोरांत येत आहे, तसतशीं चिंतामणराव वैद्यांसारख्या अष्टपैलु नानाफडणीसांना स्मृतींच्या झोंपड्या शाबूत राखण्यासाठीं जीवापाड धडपड करणें भाग पडत आहे. याचें कारण हेंच कीं बहुजनांत मानसिक गुलामगिरीचा फैलाव करणाऱ्या स्तोत्र महात्म्यादि पुराणनुयायी भिक्षुकी ग्रंथांचा आत्मा या नानाविध स्मृत्यांत एकत्रित झालेला आहे आणि स्वातंत्र्येच्छु हिन्दुजनांनीं या आत्म्याची होळीपुनव करतांच सर्व भिक्षुकशाही ग्रंथप्रामाण्याचा किल्ला एकजात

जमीनदोस्त होऊन भिक्षुकशाही वर्चस्वाचीहि राखरांगोळी होणार. हातीं पडलेल्या सत्तेचा संन्यास प्राणान्तापेक्षांहि अवघड असतो. अर्थात् ब्राह्मणांच्या वर्चस्वाला आग लागत आहे असें स्पष्ट उमजूं लागतांच, सारासार विचाराला कोपरखळी देऊन, स्मृतिग्रंथांची वकिली करण्यासाठीं आपल्या पूर्वींच्या सर्व विद्वत्तेवर व विचारांवर रखरखीत निखारे ठेवायला चिंतामणराव वैद्यासारखे पंडीत मोठ्या हमरीतुमरीनें आतां पुढें सरसावूं लागल्यास त्यांत आह्मांला तरी कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. बहुजन समाज जरी अशिक्षित आहे तरी शिक्षणाचा प्रसार आस्तेआस्ते सर्वत्र होत आहे. 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त फलप्राप्त्यर्थम्' ची गारुडी विद्या काय आहे, हें आतां दिवसेंदिवस बऱ्याच मोठ्या प्रमाणावर नागवें उघडें होत आहे; आणि हें ज्ञान जसजसें जनांत फैलावत जाईल, धर्मग्रंथांचा चिकित्सक संशोधनपूर्वक स्वाध्याय तरुणतरुणींत बळावत जाईल, तसतसें भिक्षुकी गुलामगिरीचें एकेक अंग लुलें पडत जाऊन अखेर धुळींत समरस होईल. श्रुति (ह्मणजे वेद) व स्मृतिग्रंथ यांच्या अंतरंगाची छाननी करतांना, मद्रासचे सुप्रसिद्ध पंडित श्री. ए. महादेवशास्त्री ह्मणतात, ''ऋषींच्या निर्विकार व समतोल मनोवृत्तींत ज्या सनातन सत्यतत्वांचें प्रकटीकरण झालें, त्या तत्वांना वैदिक धर्म अथवा श्रुति असें ह्मणतात, आणि एका विवक्षित काळाकरितां, सामान्य अनुभवावरच भिस्त ठेवून तत्कालीन समयाचारांच्या कांहीं ठोकळ ठरविलेल्या नियमांच्या संग्रहाला स्मृति असें ह्मणतात. ह्मणून स्मृतीचा अधिकार श्रुति (वेदा) इतका नाहीं. अशास्त्रसिद्ध गोष्टी व विशिष्ट कालचे सामाजिक आचार यांचाच प्रामुख्यानें स्मृतींत समावेश होतो व या संबंधाचे नियमच तींत असतात, म्हणून स्मृत्यांचा समावेश श्रुतिमर्यादेंत होत नाहीं. (त्या श्रुतिबाह्य आहेत.) अर्थात् त्या बदलूं शकतात व शास्त्रीय शोध जसजसे होत जातात व सामाजिक परिस्थिति बदलली जाते, त्याप्रमाणें स्मृत्यांत सुधारणाहि करतां येते. स्मृतीची व जनरूढीची मान्यता असलेले समयाचाराचे असे कितीतरी नियम स्मृतींत आहेत, कीं ज्यांना श्रुतींत व शास्त्रात (Science) आधार नाहीं; इतकेंच नव्हे तर कांहीं धडधडीत श्रुतिप्रामाण्याला व सायन्सला अगदी विरोधी असतात. याचें कारण शोधूं गेल्यास तें (नजर किंवा घोड) चुका, विशिष्ट कार्याचें औचित्य, दुर्वासना, गर्व किंवा मत्सर यांतच सांपडणार.'' श्रुति स्मृतींतील हा भेद वाचकांनीं नीट लक्षांत ठेवावा. स्मृतिग्रंथांत प्रतिपादन केलेल्या तत्वांना सनातनत्वाचा मुलामा देण्याची चलाखी जेथें जेथें दृष्टीस पडेल तेथें तेथें भिक्षुकशाही डावपेंचाचें गुप्त कारस्थान अस्तित्वांत आहे, याची खुशाल खुणगांठ बांधावी; मग या सनातनत्वाचा पुराणिक कोणी लोकमान्य असो, दे. भ. असो, वे. शा. सं. असो, नाहींतर एखादा जगद्गुरु असो. वर्तमान समयाचाराचें नियमन करणारी ब्रिटिश राज्यसत्तेची स्मृति इंडियन पिनल कोड ही होय. या स्मृतींत अथपासून इतिपर्यंत सनातन तत्वें भरलेलीं आहेत, यांतील नियम त्रिकालाबाधित आहेत, ते बदलण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं; विवेकाची किंवा युक्तिवादाची कसोटी या पिनल कोड स्मृतीला लावणाऱ्यांनीं बिनशर्त ब्रिटिश साम्राज्याच्या हद्दपार व्हावें, असें जर एखादा चिंतूनाना बरळूं लागला, तर त्याच्या विद्वत्तेची तारीफ करण्यापूर्वी त्याच्या मेंदूवर मोहरीचें पलिस्तर मारण्याची लगबग आधीं केली पाहिजे. नुकतेंच महात्मा गांधी यांनी हिन्दुधर्मासंबंधानें सामान्यत्वें असें विधान केलें होतें कीं सांप्रत हिन्दुधर्माचें स्वरूप अत्यंत विकृत असें झालें आहे आणि विवेकबुद्धीला व नैतिकप्रेरणेला धर्मग्रंथांतील जो भाग स्पष्टपणें विसंगत असेल तो अजिबात झुगारून द्यावयाला मी मागेंपुढें पाहणार नाहीं. गांधींचा हा सणसणीत विवेकवाद आज कांहीं नव्यानेंच जनतेपुढें आला आहे

असें नव्हे. गांधींच्या पूर्वीं समतोल वृत्तीच्या अनेक महात्म्यांनीं या मताचा नुसता उच्चारच नव्हे, तर प्रत्यक्ष आचारहि करून दाखविलेला आहे आणि असल्या महात्म्यांच्या मालिकेंतले दिव्य मेरुमणी म्हटले म्हणजे महर्षी दयानन्द सरस्वती हे होत. आणखी इतर महात्मे जरी क्षणभर बाजूला ठेवले, तरी राजकीय बाबतींत चिन्तूनाना प्रभृति पंडित महाशय ज्यांच्या मांडीला मांडी भिडवून मोटारीवर मोटारी उडवीत असतात, त्या लाला लजपत रायांचें मत सुद्धां महात्मा गांधींच्या मताप्रमाणेंच असल्याचें सुप्रसिद्धच आहे. न्याशनल एज्युकेशन नामक ग्रंथाच्या ७८ पृष्टावर लालाजी म्हणतात ''धर्मशास्त्रांसंबधानें म्हणाल तर मी स्पष्टच म्हणतों कीं आमचे सामाजिक व धार्मिक नियम पूर्वी काय होते, याची निदान ओळख करून घेणें हें कितीहि श्रेयस्कर असलें, तरी हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आमच्या धर्मशास्त्रावरच्या प्रचलित उपलब्ध स्मृत्या अर्धकच्च्या, खुळचट असंबद्ध आणि परस्पर विरुद्ध कल्पनांनीं नुसत्या सडलेल्या आहेत.'' लालाजी प्रमाणेंच डॉ. रवीन्द्रनाथ टागोर, डॉ. सुब्रह्मण्य अय्यर इत्यादि अनेक ज्ञानी जनांचीं मतें महात्मा गांधींच्या मताला पाठबळ देणारीं असून महर्षी दयानन्दांच्या सत्यार्थप्रकाश ग्रंथांत तर गांधींच्या विचारसरणीचा साधार व सोपपत्तिक असा भरपूर पुरस्कार केलेला आहे. परंतु गांधींच्या इतर राजकीय मतांत आमूलाग्र सामील होऊन 'सैतानी' सरकारवर तोंडसुख घेण्यांतच चतुर्थाश्रमाची सांगता मानणाऱ्या डॉ. कुर्तकोटींना महात्मा गांधींचीं हिन्दुधर्मविषयक मतें काडेचिराइताच्या काढ्याप्रमाणें कडु लागलीं आणि नागपुरास धर्मपरिषदेच्या मंडपांत त्यांनीं त्या मतांचा आपल्या भाषणांत मोठ्या निधड्या छातीनें निषेध केला. 'निधड्या' म्हणण्याचें कारण स्वधर्मकारांनींच त्याबद्दल विशेष स्तुति केली आहे. ता. २२/१२/२१ च्या अंकांत स्वधर्मकार म्हणतात ''म. गांधीजी विरुद्ध बोलणें प्रस्तुत किती धोक्याचें आहे हें एखाद्या वक्त्यासच विचारावें ! पण या राष्ट्रीय वीरानें धार्मिक बाबतींत हात घालणें अवास्तव आहे, असा आमच्या निर्लोमी स्पष्टवक्त्या धर्मगुरूंनीं अभिप्राय दिला.'' म. गांधींचा मोर्चा जोंपर्यंत भिक्षुकी इभ्रतीच्या निर्भेळ स्वराज्याच्या गाडग्याकडे फिरला नव्हता, तोंपर्यंत त्यांची निर्व्याज स्तुति करायला कुर्तकोटी कंपूच्या जिव्हा कधींच थकल्या नाहींत. परंतु राजकीय बाबीबरोबरच सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रांतल्या भिक्षुकशाही गुंडगिरीच्या विरुद्ध महात्मा गांधींच्या बिनमुर्वत निर्णयाचा शह लागतांच डॉ. कुर्तकोटींच्या पाठोपाठ आमचे कल्याणकर नाना फडणीस आपल्या रामायण महाभारताची पुण्याई खर्ची घालून श्रुतिस्मृतिपुराणोक्त भिक्षुकशाहीची वकिली करण्यास आतां पुढें सरसावले आहेत. आतांपर्यंत दाखवायच्या दातांचें प्रदर्शन झालें. त्यामुळें विद्वत्तेची आणि लोकमान्यतेची विक्री सपाटेबंद झाली, उपटसुंभ रावबहादुर पदवीप्रमाणें भारताचार्य या महतीची कायमची थप्पी बसली, खऱ्या खोट्या निस्पृहतेचा व लोकमान्यतेचा डांगोरा पिटला गेला, असें पाहून हें भारताचार्य भिक्षुकी महात्मे आतां आपले खायचे दांत बाहेर काढूं लागले आहेत. म. गांधींच्या नवमतवादाला डॉ. कूर्तकोटींनीं किंचित् विरोध दाखवितांच, त्याला आमच्या भारताचार्यांनीं कीर्तन मासिकांत (व. ३ अंक १) एक लेख खरडून आपल्या भिक्षुकी विद्वत्तेची कुबडी दिली आहे. भारताचार्य आपल्या श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची शपथ खाऊन म्हणतात :- ''श्रुति कोणास हल्लीं समजत नाहींत असें जर महात्मा यंग इंडियांत म्हणत असतील तर तें चुकीचें आहे; आणि माझ्या reason (बुद्धि) आणि Moral sense (सद्सद्विवेक) यांना जो अर्थ पटणार नाहीं, तो मी मान्य करणार नाहीं असें जर ते सरसहा म्हणत असतील तर तें अधिक चुकीचें आहे. आर्ष (ऋषिप्रणीत) वाक्य प्रमाण हा

पहिला सिद्धांत ठरल्यावर, अमुक वाक्य माझ्या 'रीझन'ला आणि 'मॉरल सेन्स'ला पटत नाहीं असें जर कोणी हिंदु ह्मणूं लागला तर त्यानें हिंदुधर्माच्या बाहेर जावें. महात्मा गांधी हे राजकीय चळवळींत सर्वांनाच पूज्य आहेत, पण ते आपला हा फॅड (कल्पनाराक्षस) धर्मशास्त्रांत घुसवूं पहात असतील तर तें चुकीचें होईल.'' म. गांधीनीं विवेकवादाचा एकच गुद्दा भिक्षुकशाहीच्या नांकाडावर सज्जर ठेवून देतांच, तिच्या दाखवायच्या दांतांचें पीठ होऊन हे खायचे दांत आतां असे बाहेर पडत आहेत. आह्मी रा. वैद्यांना स्पष्ट विचारतों कीं तुमच्या विद्वत्तेच्या मुरवतीसाठीं आम्ही वादार्थ आर्षवाक्यप्रामाण्याचें दास्य पत्करलें, तरी आर्षवाक्याची व्याप्ती तुम्ही काय ठरविली आहे? ती श्रुतिपुरतीच आहे कीं श्रुतीची कुंपण ओलांडून ती खुद्द गीतारहस्यापर्यंत व तुमच्या 'दुर्दैवी रंगू' पर्यंत येऊन भिडलेली आहे? आर्षवाक्यांचें प्रामाण्य मानलें तरी भारत पुराणस्मृत्यादि भिक्षुकी ग्रंथ आर्ष ठरवितांना प्रथम तुमच्या सद्सद्विवेक बुद्धीचा खून पाडून, तिच्या प्रेताला स्वतःच्या विद्वत्तेच्या पाचोळ्यांनीं भडाग्नि द्यावा लागेल ! इतिहास पुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् असलीं सूत्रें वाटेल त्याला वाटेल तेव्हां रचून धर्मग्रंथांत घुसडून देतां येतात. आजला कै. टिळकांना तर तुह्मी राष्ट्रीय गुंडांनीं नुसते ऋषीच्याच नव्हे तर खुद्द देवाच्या पंक्तीला नेऊन बसविले आहे व त्यांच्या 'अवतार कृत्याचा पोरखेळ' खुशाल निर्लज्जपणानें डोक्यावर घेऊन इतस्ततः हुंदड्या घालीत आहांत. यावरून टिळकांचे लेख व्याख्यानें व ग्रंथ हे आर्ष किंवा ईश्वरप्रणित मानून त्यांच्या दास्यांत जनांनीं आपली मान सनातन अडकवून ठेवायची कीं काय? वेदांतर्गत सनातन तत्वांचें 'उपबृंहण (support) करण्याकरितांच भारत पुराणांचा उपयोग आहे, पण नवीन धर्माधर्म सांगण्याचा किंवा सांगितलेले बदलण्याचा अधिकार कोणासहि नाहीं,' ही आपली भिक्षुकी मल्लीनाथी जर मान्य केली, तर मत्स्यपुराणांत स्वतःच्या पत्नीचें दान पुरोहिताला करण्याची आणि भारतांत द्रौपदीप्रमाणें प्रत्येक बाईनें पांचपांच नवरे करण्याची 'आर्ष' पद्धति अमलांत आणण्याची एखादी राष्ट्रीय चळवळ आपल्या कंपूंतून जन्माला येत आहे कीं काय? बरें, भारत व रामायण हे ग्रंथ जर आर्ष होते, तर त्यांची चिकित्सक दृष्टीनें छाननी व फोडणी करण्यांत आपण आजपर्यंत जी चतुराई दाखविलीत ती कां? कुंतीच्या कानांतून कर्ण जन्मला, द्रोणभर रेतांतून द्रोणाचार्य उपजले, कृष्णाला चार हात होते व रावणाला दहा तोंडें होतीं, इ. मजकूर अक्षरशः खरा म्हणून आजपर्यंत लोक शिरसावंद्य मानीत होतेच कीं नाहीं? मग तुम्हाला त्यांतल्या आक्षिप्त प्रक्षिप्ताचें सगळें अवडंबर चव्हाट्यावर आणून फोडण्याची काय जरूर होती? स्मृतिग्रंथांनासुद्धां आपल्या चिकित्सेची बाधा झाल्याशिवाय राहिलेली नाहीं. आणि आतां या श्रुतिबाह्य अनार्ष ग्रंथांची वकिली करण्यासाठीं सरड्याप्रमाणे रंग बदलतां आं ! म्हणे, रीझन व मॉरल सेन्सचा कोणी उपयोग करील त्यानें हिन्दुधर्माच्या बाहेर निघून जावें. केवढी ही धमकी, काय हा मगरूरपणा आणि किती हा उन्मत्तपणा ! जणुं काय हिन्दुधर्म म्हणजे वैद्यांची खासगत वाडवडिलार्जीत इस्टेटच. 'तुम्ही हिन्दुधर्माच्या बाहेर आतांच्या आत्तां चालते व्हा; तुम्ही जैन आहांत आणि जैन हे हिन्दु असावेत, असा जरी लो. मा. नीं. गुळचट अभिप्राय मागें एकदां व्यक्त केला आहे, तरी माझें मत तसें नाहीं. मी भारताचार्य डॉ. कुर्तकोटींच्या काषायवस्त्रांची शपथ घेऊन सांगतों कीं तुम्हीं वेदबाह्य संप्रदायाचें असल्यामुळें हिन्दु नाहींत; सबब आमच्या सोंवळ्या हिन्दुधर्मात ढवळाढवळ करण्याची तुम्हाला साफ गरज नाही.'' असा स्पष्टस्पष्ट सवाल म. गांधींना टाकण्याची वैद्यांची किंवा डॉ. कुर्तकोटींची छाती आहे काय? असेल तर तेवढें 'निधड्या' छातीचें धैर्य दाखवा. उगीच

'गोषांतल्या सुंदर स्त्रियां'चा हा 'निशाचरांचा प्रेमविलास' नको. अस्पृश्यासंबंधानें वैद्य महात्म्यांचा अभिप्रायहि असाच खरपूस आहे. ''अस्पृश्यतेसंबंधानें श्रुतिस्मृति वचनें आहेत, तीं झुगारून देऊन नवीन वाक्य बनविण्याचा कोणासहि अधिकार नाहीं.'' वाचकहो, ही मुक्ताफळें पहा. या मुक्ताफळांचे शिंपले कोण? तर राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देऊन लोकशाही स्वराज स्थापन करण्याची पुराणें झोडणारे श्री. लोकमान्य लोकश्री चिंतामणराव वैद्य ! या सर्व विवेचनावरून विवेकवादाच्या जळजळीत झळीनें भिक्षुकशाही छावण्यांची कशी होरपळ होत चालली आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईलच. हिन्दुधर्मपरिषदेचें लळीत नाचविणाऱ्या गुंडांच्या गुंडगिरीचे भिक्षुकशाही दांत लोकशाहीच्या मुखवट्याखाली कसे लपून बसले आहेत, हें दिवसेंदिवस अधिक व्यक्त होत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. अर्थात् हेंहि आतां सिद्धच झालें कीं हिन्दुधर्मपरिषदेंत ज्यांना भाग घ्यायचा असेल त्यांनीं प्रथम आपल्या चिकित्सक विवेकबुद्धीचें दिवाळें फुंकून नंतर या भिक्षुकशाही गुलामांच्या गुलाम परिषदेंत निर्लज्ज हिन्दु या नात्यानें हजर रहावे आणि ज्यांना आपल्या विवेकाचीच महती अधिक वाटत असेल त्यांनीं ताबडतोब हिन्दुधर्माच्या बाहेर निघून जावें. नवरा मरो, नवरी मरो, भटाची दक्षिणा मिळाली म्हणजे झालें. तद्वतच हिंदुधर्म मरो, लोक मरोत, आम्हां भिक्षुकांचें वर्चस्व अबाधित राहो म्हणजे झालें !

□□□

एन ४००६--१०

अग्रलेख

दरिद्री गडकरी आणि श्रीमंत जोशी

गेल्या २३ जानेवारी रोजीं, नाटककार राम गणेश गडकरी, कवि गोविंदाग्रज आणि विनोदी लेखक बालकराम ह्या असामान्य गुणत्रय विभूषित निरनिराळ्या तीन नावांनी आबालवृद्ध स्त्रीपुरुष मराठी वाचकांस आदरपूर्वक परिचित असलेल्या कै. गडकऱ्यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्रांत कित्येक ठिकाणीं सभा भरविण्यांत आल्या. बडोदें हें शहर जरी गुजराथेंत मोडत असलें तरी तें एका विख्यात महाराष्ट्रीय महाराजांच्या राजधानीचें ठिकाण असून खुद्द महाराज साहेबांस आणि त्यांच्या लाखों प्रजाजनांस त्यांच्या मातृभाषेचा-मराठीचा-विशेष अभिमान आहे आणि तिच्या उन्नत्यर्थ सरकारी प्रयत्नांप्रमाणेंच सहविचारणी सभेसारख्या खासगी संस्थांच्या द्वारेंहि तेथें सतत प्रयत्न चालू आहेत. अर्थात् हा स्मृतिदिन बडोद्यासहि पाळण्यांत आला. रा. दाजी नागेश आपटे ह्या विद्वान रसिकवर्यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरविण्यांत आली. प्रो. जोशी हे प्रमुख वक्ते होते. ह्या सभेची इंदूच्या बातमीदाराकडून आलेली हकीकत ता. ३१ जानेवारीच्या इंदुप्रकाशांत प्रसिद्ध झाली आहे. त्यांतलें प्रो. जोशी यांचें भाषण वाचून शहाणपण जसें वयावर नसतें तसेंच तें विश्वविद्यालयाच्या पदवीचें लांबलचक पुच्छ धारण करण्यावरहि नसतें असें आढळून फार खेद वाटला.

रा. जोशी हे जर संस्थानच्या महसुली खात्यांत नोकर असते, तर रात्रंदिवस कराव्या लागणाऱ्या आकडेमोडींत रसिकते बरोबरच त्यांच्या सभ्यतेचीहि मान मोडून गेली असें समजून आम्हीं त्यांची कीव केली असती. ते जंगलखात्यांत असते तर असल्या जंगली माणसांच्या नादी लागा कशाला? असें समजून आम्हीं स्वस्थ बसलों असतों. ते मीठखात्यांत असते तर त्यांचे उद्गार खारटच असणार ह्मणून आम्हीं त्यांची गय केली असती. अबकारी खात्यांतला मनुष्य अपकार करण्यास प्रवृत्त झाला असता तर आह्माला नवल वाटलें नसतें. रा. जोशी जर पोलीस अथवा मिलिटरी खात्यांतले कामगार असते तर आम्हीं त्यांची ही हडेल हप्पी पाहून गार होऊन बसलों असतों. पण त्यांच्या मागें प्रोफेसर ही पदवी आहे! ते नुसतेच प्रोफेसर असते तरी त्यांच्या बडबडीकडे आम्हीं लक्ष दिलें नसतें. पण महाराजांनीं त्यांच्या मागें असलेल्या पदव्यांच्या शेपटाकडे पाहून भावी पिढीच्या शिक्षणाचें, त्यांच्या मनांस योग्य वळण लावून ती उन्नत करण्याचें आणि त्यांच्या ठिकाणीं ज्ञानलालसा उत्पन्न करण्याचें

अत्यंत जबाबदारीचें काम सोंपविलें आहे; ते आमच्या तरुणांचे गुरु आहेत, ते त्यांना ज्ञानदान करणारे आहेत, त्यांच्या ठिकाणीं सदभिरुचि उत्पन्न करणारे आहेत, ते त्यांचें आणि त्यांच्या द्वारें आमच्या राष्ट्रांचें शील बनविणारे आहेत. रा. जोशी हे महाराज साहेबांच्या मेहरबानीनें आज अशा थोर हुद्यावर आहेत आणि म्हणूनच केव्हांहि लिहितांना किंवा बोलतांना केवळ आपल्या पुच्छाच्या घमेंडीवर न जातां त्यांनीं आपल्या जबाबदारीकडे पाहिलें पाहिजे. परवांच्या भाषणांत त्यांनी तसें केलें नाही. व्याख्याते म्हणून ते केवळ आपल्या पोकळ पदव्यांच्या घमेंडीवर गेले आणि अध्यक्ष रा. आपटे यांच्या बरोबर कॉलेजांतील ज्या वर्गांत गडकरी शिकत होते त्याच वर्गांत त्या नंतर सहा वर्षांनीं ते माझ्या बरोबर होते ही गोष्ट त्यांनीं मोठ्या आढ्यतेनें आपल्या श्रोतृवृंदास कळविली! 'गडकरी अभ्यासांत कुशल नव्हते' 'ते अभ्यास मुळींच करीत नसत' 'त्यांनीं प्रिव्हियसच्या पुढें मजल मारली नाहीं.' इत्यादि ही प्रोफेसर साहेबांच्याच तोंडून बाहेर पडलेलीं मुक्ताफळें आहेत! पण तीं अशीं कोणत्या हेतूनें पाघळलीं हें कांहीं समजत नाहीं. रा. गुर्जर आणि रा. कमतनूरकर ह्या दोघांनीं कै. गडकऱ्यांचीं लहान लहान चरित्रें लिहिलीं आहेत. रा. गुर्जर म्हणतात ''गडकरी यांनीं मॅट्रिक पर्यंतचा सारा अभयास अवघ्या दोन अडीच वर्षांत, अत्यंत विलक्षण प्रतिकूल परिस्थितींत पुरा केला, यावरून त्यांची बुद्धिमत्ता किती तीव्र, सूक्ष्म व विशाल आणि हिंमत किती दांडगी होती, याची वाचकांना चांगलीच कल्पना येईल.'' ह्या अवतारणानें प्रो. साहेबांचीं मुक्ताफळें कोणी जोंधळे म्हणून सुद्धां पदरीं बांधतील असें वाटत नाहीं. कै. गडकऱ्यांना लोकांनीं ठरवून दिलेलीं पुस्तकें ठराविक पद्धतीनें घोकून चार दोन पदव्या संपादन करून विद्वत्तेचें केवळ प्रदर्शन करावयाचें असतें तर त्याच कॉलेजांत कदाचित् ते ह्या प्रोफेसरांना प्रोफेसर ह्मणून शिकवितांनाच दिसले असते. पण त्यांची युनिव्हर्सिटी निराळी होती आणि प्रिव्हियस पास होतांच त्यांनीं त्या युनिव्हर्सिटीकडे आपला मोर्चा फिरविला. तेथें त्यांनीं ईश्वरनिर्मित पुस्तकाचें - ह्या सृष्टीचें - मोठ्या बारकाईनें अध्ययन केलें. त्यांना दुसऱ्या ग्रंथकारांची तिसऱ्यानें सांगितलेलीं पुस्तके चौथ्याच्या लहरीप्रमाणें शिकावयाची नव्हती. स्वत: ग्रंथ निर्माण करून लोकांस त्याचे पाठ द्यावयाचे होते आणि त्याप्रमाणें त्यांनीं ते दिले; हें आज त्यांच्या ग्रंथांचा जो अभूतपूर्व गतीनें प्रसार होत आहे त्यावरून खुद्द प्रो. जोशांनाहि कळून येईल, मग इतरांना कळेल यांत काय नवल आहे! प्रो. जोशांनाहि कळून येईल, मग इतरांना कळेल यांत काय नवल आहे! प्रा. जोशांचे ते एक अभ्यास न करणारे आणि अभ्यासांत अकुशल असे सहाध्यायी होते. कॉलेजांत नेमिलेल्या पुस्तकांवर घोंट्या मारून रा. जोशांनीं अभ्यास केला; त्यांत आपलें कौशल्य दाखविलें आणि शेवटीं नोकरी धरून ते एका कॉलेजांतील लहानशा खोलींत पांच पन्नास विद्यार्थ्यांना शिकविणारे प्रोफेसर बनले. पण कै. गडकऱ्यांच्या कृतींतलें मर्म त्यांचा उपहास करणाऱ्या जोशांना कळलें नाही. त्यांच्या अभ्यासाचें पुस्तक जसें मोठें होतें तसेंच त्यांच्या अध्यापनाचें क्षेत्र आणि त्यांचा विद्यार्थीवर्गहि फार मोठा होता. महाराष्ट्र हें त्यांचें अध्ययनक्षेत्र आणि मराठी जाणणारे अबालवृद्ध हा त्यांचा विद्यार्थीवर्ग! हें वैभव मिळविण्याकरितां गडकऱ्यांनीं, जोशांना मोक्षसाधन वाटत असलेल्या पण वस्तुत: गडकऱ्यांस त्यांच्या ध्येयाला अपुऱ्या पडणाऱ्या अशा क्षुल्लक कॉलेजांतील, शिक्षणाची हेळसांड केली ह्यांत काय बिघडलें? शिक्षणच पहावयाचें असेल तर तें शेक्सपिअरनें किती संपादन केलें होतें? कै. हरी भाऊ आपट्यांनी कॉलेजांत काय केलें? ज्यानें जें कार्य केलें त्या कार्याला योग्य असें शिक्षण त्याला मिळालें असलें ह्मणजे झालें, ही साधी गोष्ट प्रा.

एन ४००६--१०अ

जोशी यांनी विचारांत घेतली असती तर त्यांनीं कै. गडकऱ्यांवर असली कुत्सित टीका केली नसती.

यानंतर प्रो. साहेबांनीं आपला मोर्चा गडकऱ्यांच्या नाटकाच्या परीक्षणाकडे वळवून 'प्रेमसंन्यास' लोकांना आवडलें नाहीं ह्मणून वाईट; 'पुण्यप्रभाव' आणि 'एकच प्याला' हीं लोकांना आवडलीं म्हणून चांगलीं; 'भावबंधन' आजारीपणांत लिहिलें गेलें म्हणून वाईट आणि 'राजसंन्यास' प्रो. साहेबांनीं पाहिलें नाहीं सबब वाईट-वाईट नव्हे-त्याबद्दल त्यांना कांहींच सांगतां येत नाहीं! हें परीक्षण प्रो. साहेबांनीं संपादन केलेल्या अक्षरश: बहुमोल शिक्षणाला साजेसेंच आहे ह्मणायचें. जें नाटक लोकांना आवडलें तें उत्तम म्हणावयाचें ही नाट्यपरीक्षणाची कसोटी लावतांना शेक्सपिअरच्या नाटकांच्या परीक्षणावर प्रसिद्ध झालेले शेंकडों ग्रंथ पाहिल्याचें तरी त्यांनी स्मरावयाचें होतें. परीक्षणाचें काम जर इतकें सोपें असतें तर ते ग्रंथ निर्माण होण्याचें तरी कारण काय होतें? लोकांना जें नाटक आवडेल तें चांगलें, असेंच सांगावयाचें होतें तर तें सांगण्याची तसदी प्रो. साहेबांनीं घेतली नसती तरी बरें झालें असतें. कै. माधवराव पाटणकरांची आणि राज्यांचीहि नाटकें विशिष्ट वर्गांतील लोकांना फार आवडतात. तीं पहाण्यास लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमतात आणि त्यांचे प्रयोग करणाऱ्या नाटकमंडळीस हजारों रुपये मिळतात. अर्थात् प्रा. साहेब ह्या नाटकांचा नंबर कै. गडकऱ्यांच्या कांहीं नाटकांच्या बरोबरीस तर कांहीं नाटकांच्या वर लावणार! धन्य आहे जोश्यांच्या मार्मिकतेची!

ज्यांना कै. गडकरी आपलें लेखनगुरु समजत असत व ज्यांनीं कित्येक नाटकें लिहून महाराष्ट्र वाङ्मय आणि मराठी रंगभूमि यांस आलंकृत केलें आहे, त्या रा. कोल्हटकरांनी 'भावबंधन' नाटकाला प्रस्तावना लिहून, मृत्युशय्येवरून केलेल्या गडकऱ्यांच्या विनंतीप्रमाणें, त्या नाटकांतील पद्येंही केलीं आहेत प्रस्तावनेंत रा. तात्यासाहेब कोल्हटकरांनीं ह्या नाटकाच्या रचनेसंबंधानें येणेंप्रमाणें माहिती दिली आहे:-

''नाटक लिहिण्यास सुरवात त्यांच्या मृत्यूच्या सुमारें एक वर्षापूर्वीं होऊन त्याचे जवळ जवळ चार अंक व पांचव्या अंकाचा पहिला प्रवेश एवढा भाग सुरवातीपासून सव्वा महिन्यांतच पूर्ण झाला.'' पुढें एके ठिकाणी ते म्हणतात:-

''जे अनेक गुण प्रतिभावान् कवि व यशस्वी नाटककार या नात्यांनीं कै. गडकऱ्यांच्या ठायीं वसत होते ते प्रस्तुत प्रमाणांत व उज्ज्वल स्वरूपांत निर्दशनास येतील.''

प्रो. साहेबांना लोकांच्या आवडीचीच कसोटी ह्या नाटकास लावून पहाणें असेल, तर गेल्या दोन वर्षांत बलवंत संगीत मंडळीनें ह्या नाटकाच्या प्रयोगावर हजारों रुपये मिळविले आहेत, इतकेंच नव्हे तर संजीवनी मंत्राप्रमाणें ह्या नाटकानें त्या मंडळीला पुनर्जन्म दिला आहे, असें आम्हीं त्यांस अगदीं खात्रीनें सांगतों. 'प्रेमसंन्यास' नाटक गेलीं दहा वर्षें रंगभूमीवर जें टिकाव धरून राहिलें आहे तें केवळ त्याच्या लोकप्रियतेमुळेंच !

आपण समाजसुधारणेचे कट्टे द्वेष्टे आहोतं असें भासवून आपल्या श्रोतृवृंदाकडून प्रोफेसर जोशांना टाळ्या मिळवावयाच्या होत्या; असें त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या भाषणाच्या ओघावरून दिसतें. त्यांची ती इच्छा पूर्ण झाली किंवा नाहीं हें समजत नाही. तथापि त्यांनी हें लक्षांत ठेवावें कीं कोणी कितीहि कंठशोष केला तरी जगांतला कोणताहि समाज त्याच्या उत्पत्तिपासून समाप्तिपर्यंत एका अवस्थेंत राहूं शकत नाहीं. परिस्थितीप्रमाणें त्याला बदलणारे महात्मे निर्माण होतात आणि तो बदलत जातोच! नव्हे,

तो बदललाच पाहिजे असा ईश्वरी नियम आहे. त्याला प्रतिबंध करण्याचें सामर्थ्य कोणाहि व्यक्तीच्या आंगीं नाहीं. जो मनुष्य समाज सुधारणेच्या विरुद्ध आहे तो समाजाचा हितशत्रु आहे. कै. केशवसुत आणि गडकरी यांनीं आपले विचार आपल्या ग्रंथांच्या द्वारें जनतेपुढें मांडले. प्रोफेसर साहेबांना जर स्वत:चे म्हणून कांहीं विचार असतील, लोकांच्या आवडी नावडीवरच यापुढें अवलंबून रहाणें जर त्यांना आपल्या पदवीला शोभत नाहीं असें वाटत असेल, तर त्यांनीं लोकरूढी म्हणजे काय तें एकदां ठरवून तिला सावरून धरण्याचा प्रयत्न करावा. केवळ केशवसुत आणि गडकरी याच्या सारख्या सुधारणावादी लेखकांना चमत्कारीक वृत्तीचे किंवा एक्सेंट्रिक म्हणून त्यांची निंदा करण्यानें भागावयाचें नाही.

कै. गडकऱ्यांच्या नाटकांत 'अश्लीलतेची छटा मारते आणि त्यांनीं आपल्या पात्रांना कोणी न दिलेलीं वा ऐकलेलीं नांवें वापरलीं आहेत' असे दोन आरोप प्रोफेसर मजकुरांनीं गडकऱ्यांवर केले आहेत. ह्यांपैकीं पहिला आरोप सपशेल खोटा आहे. हें आपलें धाडसी विधान सामर्थ्य असेल तर साधार सिद्ध करावें, असें आम्हीं रा. जोशांस आव्हान करतों. दुसरें विधान सत्य आहे. आज रूढ नसलेलीं काही नांवें गडकऱ्यांच्या नाटकांत आलीं आहेत ही गोष्ट खरी आहे. पण त्यावरून गडकऱ्यांना विक्षिप्त म्हणणारे जोशीच विचारविहीन ठरतात! आपल्या पात्रांना गोकूळ, वृंदावन, तळीराम इत्यादि नांवें देणारे गडकरी जर विक्षिप्त, तर शारङ्गरव, शारद्वत, प्रियंवदा, निपुणिका, पेलव, सहजन्या, कौमुदिका, बकुलावलिका इत्यादि नांवें आपल्या नाटकपात्रांस देणारा कालिदास; दुर्मुख, भांडायन, सोघातक कामन्दकी, अवलोकिता, लवङ्गिका, कपालकुण्डला, अघोरघण्ट इत्यादि नावें देणारा भवभूति, सुंदरक, रुधिरप्रिय, वसागंधा इत्यादि नांवें देणारा भट्ट नारायण; राक्षस, विराधगुप्त, मदंत इत्यादि नांवें देणारा विशाखदत्त; कादंबरी, महाश्वेता, पुण्डरीक इत्यादि नांवें देणारा बाणभट्ट; रदनिका, मदनिका इ. नांवें देणारा शूद्रक, असे सारेच नाटककार, फारतर काय पण विष्णूला सहस्र नांवें देणारा आठरा पुराणांचा कर्ता महर्षि व्यास देखिल आमच्या पुराणप्रिय जोशीबोवांना गडकऱ्यांच्या पंक्तीला विक्षिप्त म्हणून बसवावा लागेल. मग चमक नमक आणि क्षय वृद्धीचे जनक ह्मणून नांवाजलेले देशभक्त नाटककार खाडीलकर विक्षिप्ताग्रणी ठरतील, यांत आश्चर्य कशाला! विशेषनामाचा कोश मनुष्यनिर्मित आहे आणि तो मनुष्यजाति अस्तित्वांत असेपर्यंत सारखा वाढत जाणार. त्याची वाढ खुंटविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे मूर्खपणा आहे हें शहाण्या जोशांना कसें कळत नाहीं!

नंतर जोशी महाराज गडकऱ्यांच्या स्थितीकडे वळले आहेत. गडकरी दारिद्री होते. ते पुण्याच्या घाणेरड्या भागांत एका बोळांत रहात असत. ते दिवसांतून आठ वेळां चहा घेऊन त्यावरच जेवणाचें भागवीत. ह्या सर्व गोष्टी जशा खऱ्या असतील, तशा त्याच्या उलट प्रो. जोशी श्रीमंत आहेत, ते बडोद्याच्या अगदीं उत्कृष्ट भागांत राजवाड्यासारख्या किंबहुना आपल्या सौंदर्यानें राजवाड्यासहि लाजविणाऱ्या मंदिरांत रहातात, पन्नास वेळां अटीव केशरी दूध पितात आणि दिवसांतून तीन किंवा अधिक वेळा पंचपक्वान्नांचें भोजन झोडतात याहि गोष्टी खऱ्या असतील. पण पुढें काय? गडकऱ्यासारखी एक ओळ तरी लिहिण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं आहे काय? तें सामर्थ्य संपत्तींत, उत्तुंगशिखर मंदिरांत आणि पंचपक्वान्नांत नाहीं ही गोष्ट जगांतील ग्रंथकारांच्या चरित्राचे पाठ घेतलेल्या प्रोफेसरांस कळत नसेल, तर त्यांनीं आपल्या नांवापुढची पदवी सोडावी म्हणजे यापुढें तरी आमच्या विश्वविद्यालयाची नामोशी बंद होईल आणि असहकारितावादित्वाचें भाग्य अनायसेंच त्यांच्या पदरांत पडेल !

प्रो. जोशांनीं आपल्या ह्या पांडित्यपूर्ण प्रवचनावर पुढील पापोक्तीनें परमावधीचा कळस चढविला आहे. ते म्हणतात:-

''स्टँडर्ड ऑथर्सचे ग्रंथ ते कधींच वाचीत नसत. कारण त्यांची कल्पना व विचार उचलले तर लोकांना कळून येईल.''

याचा अर्थ गडकरी हे साहित्य भाण्डाराचे केवळ चोरच नव्हे तर ती चोरी जिरविण्याच्या कामांत वाकबगार असे महाबिलंदर होते, असा होतो. आधारावाचून केलेल्या असल्या धाडसी कुत्सित विधानावर टीका करीत बसण्यापेक्षां असली एखादी चोरी प्रोफेसर साहेबांना उमगलीं असल्यास त्यांनीं कृपा करून ती उघडकीस आणावी इतकीच आमची त्यांस आव्हानपूर्वक विनंति आहे.

कै. गडकऱ्यांनीं 'स्टँडर्ड आथर्स' वाचलें नव्हतें. हें जोशांचें विधान किती खोटें आहे तें उपरिनिर्दिष्ट चरित्रांतील खालीं दिलेल्या माहितीवरून कळेल. -

१ फग्युर्सन कॉलेजमध्यें रहात असतां, निजण्यापूर्वी एखाद्या पुस्तकाचीं निदान पन्नास पानें तरी वाचून झालींच पाहिजेत असा त्यांनीं निश्चय केला होता.

२ पुण्याच्या नाट्यसंग्रहालयांतून त्यांनीं व्हिक्टरह्यूगोचे ग्रंथ वाचले. हा त्यांचा विशेष आवडता नाटककार होता.

३ आपलीं पुस्तकें कोणासहि बाहेर न देणाऱ्या एका गृहस्थाच्या घरीं दररोज ११ वाजल्यापासून सायंकाळीं पांच साडेपांच वाजेपर्यंत जाऊन त्यांनीं मोरोपंताचा समग्र काव्यसंग्रह वाचला. ज्याला मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवावयाचें असेल त्यानें मोरोपंताचा नीट अभ्यास केला पाहिजे असें त्यांचें ठाम मत होतें.

४ संस्कृत कवींत कालिदास हा त्यांचा अत्यंत आवडीचा कवि होता. शाकुंतल नाटकाचें मोल पृथ्वीच्या किंमतीनेंहि करतां येणार नाहीं असें त्यांना वाटत असे. ह्या नाटकावर एक प्रचण्ड टीका लिहून ह्या नाट्यखनींतील आजपर्यंत कोणाला न दिसलेले हिरे बाहेर काढण्याचा त्यांचा विचार होता.

५ मार्क ट्वेन ह्या जगप्रसिद्ध अमेरिकन विनोदी लेखकाचा अभ्यास गडकऱ्यांनीं अगदीं कस्सून केला होता. आर्टेमस वार्ड ह्या विनोदी लेखकाचाहि त्यांना विशेष नाद लागला होता. डिकिन्स त्यांचा फार आवडता होता.

६ इंग्रजी कवींपैकीं विशेषत: शेले, कीटस, बायरन, वर्डस्वर्थ, ब्राउनिंग वगैरे आधुनिक कवींच्या काव्यांचें गडकऱ्यांनीं केलेलें परिशीलन विशाल होतें. गुजराथी कवींपैकीं राजकवि कलापियां जबद्दल त्यांना आदरपूर्वक प्रेम वाटत असे.

यानंतर जोशीबोवा आपल्या पुराणप्रियतेमुळें एका जातीकडे वळले! ग्रंथकाराला जात नसते. तो प्रथम सर्व जातींचा शिष्य असतो आणि योग्यता संपादन केल्यावर तो सर्व जातींचा गुरु होतो. ज्ञानेश्वर ब्राह्मण होता, ह्मणून एकटे जोशी महाराज जर ज्ञानेश्वरीवर आपला हक्क सांगूं लागतील. तर एखादा वारकरी महार देखिल ती त्यांच्या हातून हिसकावून घेतांना त्यांच्या जानव्याच्या ब्रह्मगांठीची पर्वा करणार नाहीं. गडकरी जरी कायस्थ प्रभु जातींत जन्मले असले तरी ते आज महाराष्ट्राचे कवि आहेत. महाराष्ट्राचे विनोदी लेखक आहेत. महाराष्ट्राचे नाटककार आहेत. त्यांची किंवा त्यांच्या सारख्या दरिद्रावस्थेंत असलेल्या कायस्थ प्रभु जातींत जन्मलेल्या कवीस मदत करण्याची प्रो. साहेबांची कळकळ

प्रशंसनीय आहे. पण त्या बद्दलची विनंति त्यांनीं कायस्थ प्रभुजातीसच उद्देशून केली असल्यामुळें त्या कळकळीचें खरें कुत्सित स्वरूप बाहेर पडलें. प्रोफेसर साहेब, जगांत काय चाललें आहे त्याचें थोडें अवलोकन करा आणि आतां तरी आपल्या आंगीं मुरलेला हा जातिमत्सर गाडून टाका, इतकीच आपणांस शेवटची विनंति करून हा बराच लांबलेला लेख संपवितों.

□□□

अग्रलेख

मानसिक दास्याविरुद्ध बण्ड

(लेखांक ५ वा)

ग्रंथप्रामाण्याच्या बाबतींत प्रथम इतका खुलासा करणें अवश्य आहे कीं विवेकवाद कोठच्याहि ग्रंथांतील सत्य व सनातन तत्वांच्या विरुद्ध केव्हांहि नसतो; मग तें तत्व प्राचीन ग्रंथांत आढळो वा कालच्या एकाद्या नवीन आधुनिक ग्रंथांत सांपडो. परंतु अमुक एक ग्रंथ व्यासाचा अगर पराशराचा म्हणून त्याला आमूलाग्र डोक्यावर घेऊन नाचविण्याचें कृत्य मात्र त्याच्या हातून होणार नाहीं. विवेकाला व नैतिक प्रेरणेला जो भाग संमत नसेल, त्याला लाथेच्या ठोंकरीनें झुगारून देण्यांत विवेकवादी जितका निर्दय व निस्पृह असतो, तितकाच तो विवेकमान्य भागाला योग्य तो सन्मान देण्यांत मानाचा मोकळा व दिलदार असतो. विवेकवाद्याची चिकित्सक विवेचक दृष्टी जीर्णमतवाद्यांना विघातक वाटते खरी; परंतु ती दृष्टी धांवत्या कलौघाशीं समगामी असल्यामुळें कालांतरानें तिचा खराखुरा विधायकपणा नवयुगांतलें नवचैतन्य उत्पन्न करण्यास कारण झाला, अशी खुद्द काळाचीच साक्ष इतिहासांत स्पष्ट उमटते. या सिद्धांताची पूर्ण जाणीव नवमतवाद्याला असल्यामुळें

आहे विस्तीर्ण पृथ्वी विविध जन तसे काळ ना ज्यास अंत ।
त्यामाजीं मत्कृतीचा कुणि तरी निपजे एक भोक्ता नितांत ।।

या भवभूतीच्या सूक्तानुसार आपलें विवेकवादप्रसाराचें कार्य निश्चयानें करीतच रहातो. कोणत्याहि काळांतील नव्या जुन्याच्या झगड्याचा इतिहास पहा, त्यांत जुन्यानें नव्याचा पदोपदीं निंद्य उपमर्द केलेलाच आढळेल. 'विधायक' व 'विघातक' या दोन शब्दांच्या कोट्या जीर्णमतवादानेंच उलटसुलट लढविलेल्या आढळतात. परंतु अखेर काय? अखेर नांक मुठींत धरून जीर्णमताला नवमताच्याच पचनीं पडावें लागलेलें आहे. ही इतिहासाची साक्ष आतां यापुढें खोटी ठरणार, हें जर खरें मानलें तर पूर्वेचा सूर्य एखाद्या ३१ दिसेंबरपासून पश्चिमेकडे उगवूं लागणार, ही गप्प तरी कां खोटी मानावी?

हिन्दूंचे धर्मग्रंथ विकृत केल्यामुळें त्यांच्या आचरांतहि भ्रष्टतेचें प्रमाण मनस्वीं वाढलेलें आहे, ही गोष्ट पुष्कळ समंजस मंडळींना पटलेली असते; तथापि लोकाचार व रूढी यांवर प्रतिकाराची चढाई करण्याचें नैतिक धारिष्ट त्यांच्या आंगीं नसल्यामुळें, वकीली धाटणीची कांहीं तरी उत्तरें देऊन वेळ मारून नेण्यापलीकडे त्यांना गत्यंतरच नसतें. असल्या लोकांना सत्याच्या चाडीपेक्षां बेगडी

लोकमान्यतेची चाड अधिक असते आणि लोकमताला ढका न लावतां नवमतवाद प्रसार करण्याची त्यांची आकांक्षा असते. जुन्याला न दुखवितां, नव्याच्या वाटेला न जातां, आस्तिनास्ति वादाच्या फंदांत न सांपडतां, लोकमताच्या वाऱ्याप्रमाणें शिडें फडफडविणारीं हीं उभयान्वयी अव्यायें सुधारणेच्या कार्यांत जीर्णमतवाद्यांपेक्षाहि फारच घातकी असतात. थिऑसफीकल सांप्रदायांत या उभयान्वयी अव्ययांचा भरणा रगड असतो. पुराणादि ग्रंथांत दिसणारें हिन्दुधर्माचें स्वरूप बाह्यात्कारीं जरी चमत्कारिक, बीभत्स आणि विकृत दिसत असलें तरी त्याचा गर्भितार्थ फार उदात्त थोर व गंभीर आहे; म्हणून त्यांतील रहस्य शोधण्याचा सर्वांनीं यत्न करावा, असें बहुतेक सर्व थिऑसफिस्टांचें ह्मणणें असतें. प्रामाण्यांच्या बाबतींत तर या पंथाइतका भरंवसाट भरकटलेला पंथ साऱ्या जगांत हाच. या बेट्यांना असेल नसेल तितके सर्व ग्रंथप्रामाण्य शिरसावंद्य आणि सर्वांत त्यांना 'ए ग्रेट फंडामेंटल प्रिन्सिपल' - रहस्यपूर्ण मोठें आद्यतत्व रसरसलेलें दिसत असतें. तात्विक दृष्ट्या असल्या प्रकारची भावना कितीहि स्तुत्य असली, तरी त्यामुळें विवेकवादाची म्हणजेच सत्यशोधनाची खरी प्रगति केव्हांहि होणें शक्य नाहीं, हेंच आजच्या लेखांकांत या थिऑसफीकल संप्रदायाकडे वळण्याचें कारण होय. आम्हांला या संप्रदायाबद्दल फार आदर आहे. इतकेंच नव्हे तर हिन्दुधर्म हा विषय काय आहे याचें प्रबोधन आमच्या जीवनचरित्रांत जर प्रथमच कोणी केलें असेल तर तें सुमारें वीस वर्षांपूर्वी याच संप्रदायानें केलें, हें केव्हांहि कृतज्ञ बुद्धीनें नमूद करण्यास आम्हांला संकोच वाटणार नाहीं. अर्थात् 'मानसिक दास्याविरुद्ध बण्ड' उभारतांना ओघानेंच या पंथांतील कांहीं ठळक ठळक दोषाविरुद्ध कलमानें चढाई केलीच, तर आमचे अनेक थिऑसफिस्ट बंधु आमच्यावर द्वेषाचा आरोप करणार नाहींत अशी अपेक्षा आहे. प्रश्न द्वेषाचा किंवा प्रेमाचा नसून तत्वाचा आहे. प्रेम आंधळें असतें. तत्वशोधनाचें काम डोळे मिटून होत नसतें. भटांभिक्षुकांच्या स्वार्थलोलुपतेमुळें नि:सत्व व निर्जीव बनलेल्या आणि अज्ञ जनतेच्या बेफिकीरीमुळें बिनवारसी झालेल्या हिंदु धर्मांचा या थिऑसफिस्टांनीं जगांत काहीं मान वाढविला आणि त्यांतील उत्कृष्ट तत्वांकडे विचारी लोकांचें लक्ष वेधून घेतलें ही गोष्ट जितकी खरी आहे, तितकीच हिंदी जनतेची अंधश्रद्धा अधिक तीक्ष्ण करून तिला पापपुण्याच्या जाळ्यांत पूर्वीपेक्षां अधिक गुरफाटून टांकलें आहे, हीहि गोष्ट खोटी नव्हे. थिऑसफीनें हिंदुधर्मांच्या प्राचीन व्यापकपणाचा जीर्णोद्धार केला, असें वरवर पाहतांच वाटणें सहाजीक आहे; परंतु तिच्या अंतरंगाची छाननी करतांच ही गोष्ट अक्षरश: खोटी ठरते. हिंदुधर्मांत कालवशात् घुसडल्या गेलेल्या यच्चावत् इष्ट अनिष्ट सर्वंच गोष्टींचें एकाच तारस्वरांत मंडन करण्याचा थिआसफीनें उपक्रम सुरू करून इतर जगाबरोबर हिंदुंचीहि सहानुभूति मिळविण्याचा यत्न केला- असें केल्याशिवाय वास्तवीक त्यांना गत्यंतरच नव्हतें! - तथापि त्यामुळें त्यांनीं हिंदु धर्मांवर कांहीं विशेष प्रकाश पाडला, असे म्हणणें बरेंच धारिष्टाचें होईल. उलटपक्षी हिंदुधर्मांत भिक्षुकी मनोवृत्तीनें पोंखरून ठेवलेलीं काळोखाचीं खिंडारें या थिआसफीस्ट योग्यांच्या फलटणीनीं अधिकच अंधारपूर्ण करून ठेवलीं आहेत. थिआसफीच्या द्वारें साऱ्या जगावर विश्वबंधुत्वाचा सर्चलाईट पाडणाऱ्या या संप्रदायाची एक विशेष गोष्ट नजरेस येते ती ही कीं ज्यानें ज्यानें या संप्रदायाचा गंडा हातांत बांधला तो तो भेंड्याच्या भाजीप्रमाणें पुळपुळीत, मळमळीत आणि लिवलिवीत बनलेला दृष्टीस पडतो. पूर्वाश्रमीचे स्वतंत्र बाण्याचे फों फों करणारे तेजस्वी लोक थिआसफीचा गंडा मनगटावर चढतांच किंवा नव्या मैत्रेयावताराचा त्रिशूळ त्यांच्या छातीवर लटकतांच त्यांची सारी रग ठिकच्या

ठिकाणीं जीरून ते शेळ्यामेंढ्या कां होतात, हा एक मुद्दा आम्ही विचारी सज्जनांपुढें मननासाठीं मांडतों. थिआसफीस्टांप्रमाणें आम्हांला डोळे मिटतांच मेल्या माणसांचे किंवा जिवंत भूतांचे आत्मे दिसण्याचें योगसामर्थ्य आंगीं नसल्यामुळें, हें असें कां होतें हें जरी सप्रमाण सांगतां आलें नाहीं, तरीपण हें असें शेंकडा पावणेशंभर बाबतींत प्रत्यक्ष उदाहरणांनीं दाखवितां येणें शक्य आहे. थिआसफीच्या विद्यमान कर्णधार मिसेस ॲनी बेझंट बाई जितक्या खवळलेल्या वाघिणीप्रमाणें किंवा पिसाळलेल्या मांजरीप्रमाणें तल्लखपणा गाजवितात, तितकेच त्यांचे अनुयायी नंदी बैलांप्रमाणें नुसते मान हालविणारे दिसतात. हा परिणाम कशाचा? योगसामर्थ्याच्या अतिरेकाचा, अत्युत्कट धर्मप्रवृत्तीचा कीं थिआसफिकल सांप्रदायिक गुलामगिरीचा? ज्या वैदिक धर्माची ध्वजा इतर सर्व धर्मांपेक्षां अधिक उंच पेलून धरण्याचा या महाशयांचा प्रघात आहे, त्या वैदिक धर्माचा पराक्रमच असा आहे कीं त्याचा कट्टा अनुयायी

मारीन पन्नग मिं फोडिन शेषटाळू ।

भूगोल हा उलथितां मज नाहिं वेळू ।।

असल्या गर्जनांनीं दशदिग्भागांची कानठाळीं पार बसवून टांकणारा मर्द केसरीच बनतो. मग हे थिआसफीस्ट योगीच तेवढे असे नेभळे कसे? स्वामी दयानंद सरस्वतीचा आर्यसमाज पहा. तेथें त्यांच्या सांप्रदायांत तुम्हांला एकहि मेंढरूं सांपडणार नाहीं. सारे वाघ आणि सिंहच! असत्याचा चेंदामेंदा करतांना ते सत्याशिवाय जगांतल्या कोणत्याहि मानवी किंवा दानवी सत्तेच्या सहानुभूतीची पर्वा करीत नाहींत; किंवा एखादें कटुतम सत्य आहे, त्याचें उद्घाटन केल्यास बहुजनसमाजाच्या मेहेरबानीला आपला समाज पारखा होईल, असल्या गोष्टींची पर्वा करून कोणताहि आर्यसमाजी केसरी आपल्या कर्तव्यकर्माची पंजाबाहेर काढलेलीं तीक्ष्ण नखें कदापिहि आंत ओढून घेणार नाहीं. आर्यसमाजाच्या पंजाबांतील धार्मिक प्रबोधनानें राजकीय जागृतीचें केवढें असामान्य कार्य तिकडें केलें आहे, हें प्रस्तुत परिस्थितीच सांगत आहे. हिन्दु धर्मांतल्या अनिष्ट गोष्टींचा सफाई संन्यास करण्यांत आर्यसमाज केव्हांहि आपल्या न्यायनिष्ठुरतेंत अणुरेणू कमी करीत नाहीं. थिआसफीला आपल्या संप्रदायाचा संसार हिंदूंच्या सहानुभूतीच्याच भांडवलावर चालविणें प्राप्त असल्यामुळें, हिन्दु धर्मांतील हिऱ्यांच्या जोडीनें त्यांतल्या कोळशांनाहि खोट्यनाट्या अध्यात्मगप्पांच्या दोरखंडांत ओंवून स्वत:च्या गळ्यांत घालून घ्यावें लागतें. थिआसफीचा आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर हिन्दूंच्या बऱ्या वाईट सर्व रीतीभातींची मनमुराद स्तुति करण्यांतच तिच्या शक्तिसर्वस्वाला खर्ची पडावें लागलें आहे. पुष्कळ वर्षांपूर्वीं लाहोरच्या 'ट्रिब्यून' पत्रानें याबद्दल सूचनावजा एक लेख लिहून असा इषारा दिला होता कीं 'The Theosophical Society will, we fear, only flatter the vanity of the Hindus, and serve to keep them where they are." आजपर्यंतचा अनुभव पाहिला तर ही भीति अक्षरश: खरी ठरल्याचेंच कबूल करावें लागेल. हिंदूंच्या सामाजिक धार्मिक किंवा राजकीय स्थितीबद्दलचीं मिसेस बेझंटबाईचीं व्याख्यानें वाचलीं कीं त्यांत हिंदूंच्या खऱ्याखोट्या श्रेष्ठत्वाची मनसोक्त स्तुति सपाटून असायची. हिंदूंच्या श्राद्धपक्षादि विधींपासून तों विधवा भारदण्याच्या 'वेदोक्त' पद्धतीपर्यंत जिकडेतिकडे 'ए ग्रेट फंडामेंटल प्रिन्सिपल' रसरसलेलें त्यांना दिसतें. पाश्चात्यांची निंदा करून अवास्तव स्तुतीनें अजागळ हिंदूंना हरभऱ्याच्या झाडावर चढविण्यांत या पंथानें लोकोत्तर 'मिशनरी कावा' साधला आहे. हिंदूंच्या पुरणामतवादाच्या म्हसोबाला आपल्या फाजील स्तुतिपाठाचीं कोंबडीं बकरीं अर्पण करकरून

थिआसफीनें आपले हातपाय हिंदुस्थानांत व मुख्यत्वें जीर्णमतवादी मद्रास इलाख्यांत पसरले. बेझंट बाई एकदां का आर्यांच्या चारित्र्यावर आपल्या काव्यपूर्ण वक्तृत्वाचे फवारे उडवूं लागल्या कीं हिंदुस्थानाच्या इतिहासांतलीं मध्यंतरीचीं एकदम दोन हजार वर्षे वितळून जातात आणि क्रिस्ती शकापूर्वीच्या हजार वर्षांतले आर्य स्त्रीपुरूष खुशाल चालू विसाव्या शतकांत जिवंत होऊन आसेतुहिमाचल वेदोपनिषदांचीं पारायणें करूं लागतात. हिन्दूंचीं घरें अहिल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी सावित्र्यांनीं अगदीं गजबजून जातात. घरोघर यज्ञकुंडें प्रज्वलीत होऊन त्यांची त्रिकाळ जोपासना चालूं असलेली दिसते. हिंदूंची खेडेगांव पंचायत तर काय इंग्लंडच्या पार्लमेंटाच्या व अमेरिकेंतल्या प्रजासत्ताक पद्धतीच्या थोबाडींतच मारायला उठते. युधिष्ठीर प्रतापसिंह पृथ्वीराजांचा तर साऱ्या घरोंघर एकजात झपाट्यानें चालल्याचें स्पष्ट दिसतें. महारवाड्यांतल्या महारांपासून तों गायकवाड वाड्यांतल्या महा 'राष्ट्रीय' ब्राह्मणांपर्यंत सर्वांच्या अंतर्बाह्य वर्तनांत मनुस्मृतीचा खमंग मसाला रसरसून भरलेला आढळतो. हिंदूंचें राजकीय ज्ञान व राज्यव्यवस्थेची कर्तबगारी सध्यांहि इतकी जाज्वल्य बनते कीं रस्त्यांतलीं पोरेंटारें व उनाडटप्पू हेसुद्धां सहजगत्या पॉलिटिक्स बोलूं शकतात. अहाहा! केवढे हो आह्मी विसाव्या शतकांतले हिंदुआर्य शहाणे आहोंत! स्वर्गांत आणि आमच्यांत अंतर काय तें फक्त दोनच बोटांचे! तेंहि जर या बेझंटबाई आपल्या दिव्य योगसामर्थ्यानें छाटून टांकतील, तर आम्ही हिंदुलोक हां हां म्हणतां हातांत जानव्याची गांठ धरून स्वराज्य मिळवूं. थोडक्यांत सांगायचें म्हणजे भिक्षुकी आत्मवर्चस्वाच्या पुराणांतल्या व्यासोवाच गप्पा आणि स्तुतिप्रिय हिंदूंच्या पोंकळ गर्वाला फाजील उत्तेजन देणाऱ्या या थिऑसफीच्या गप्पा, यांत कसलाहि फरक नाहीं.

विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं उदारमतवादाचा व विश्वात्मैक्य भावाचा पुरस्कार करणाऱ्या बेझंट बाई विधवांच्या पुनर्विवाहावर बोलतात, तेव्हां नाशिक वाईच्या भटांच्याहि जीर्णमतावर ताण करतात. त्याचप्रमाणें असवर्ण-विवाहावरचे त्यांचे विचार पाहिले कीं या बाई कोण आहेत, याचा उलगडा प्राकृत साळ्या भोळ्यांना होणें कठीण; दररोज खोल्यांचीं कवाडें लावून मेल्या माणसांच्या आत्म्यांचा पाठलाग करणारे त्यांचे भगतच तो उलगडा करूं जाणें! ॲनि बेझंटबाई ह्मणतात, अहो शहाण्या हिंदूंनो! नका हो नका या विधवांच्या पुनर्विवाहाची किंवा असवर्ण विवाहाची गोष्ट काढूं. हिंदु स्त्रियांना केवढाले मोठमोठे सामाजिक हक्क आहेत, त्यांचा कौटुंबिक दर्जा केवढा मोठ्ठा, अहो त्या देवता आहेत देवता, त्यांची दैवी संपत्ति तर अप्रतिम आहे, साऱ्या जगाच्या पाठीवर फिरफिरून मी आपले जोडे फाडले आहेत, पण मला अशा स्त्रिया कुठ्ठंकुठ्ठं सुद्धां पाह्यला मिळाल्या नाहींत. तुझी जर या नसत्या फंदांत पडाल तर उद्यां सावित्री कोर्टांत काडी मोडण्याचा दावा पेश करतांना दिसेल आणि पोटगीच्या खर्चासाठीं सीता आपल्या चांभार नवऱ्याशीं दिवाणी कज्जा लढतांना दृष्टीस पडेल.

कर्मवाद, पुनर्जन्मवाद, अवतारवाद आणि आनुवंशिक संस्कारवाद हे बेझंट बाईंचे अत्यंत आवडीचे विषय आहेत व यांवर त्यांची नर्तनकुशल रसवंति एकदां का तांडवनृत्य करूं लागली कीं, जरठजीर्ण पाट्यावरवंट्यानें ठेंचून ठेंचून बनविलेलें पुराणांतल्या वांग्यांचें 'भरीत' अप्रगतशील जीर्णमतवाद्यांनीं सुद्धां मिटक्या मारमारून खावें; त्यांत निमित्तमात्र पडलेल्या स्पष्टोक्तीच्या लवंगी मिरचीनें रवमतवादी जहाल सुधारकांच्या जिव्हेचीही तृप्ति व्हावी आणि व्याख्यानप्रिय श्रोत्यांनीं बाईंच्या वक्तृत्वाची तारीफ करीत घरोघर निघून जावें, असा हा उघड उघड आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ आहे. कट्टा जीर्णमतवादी

किंवा कट्टा नवमतवादी एकवेळ परवडतो, परंतु एकीकडे स्पर्शास्पर्श, श्राद्धपिंडपक्ष, विधवाविवाह व असवर्णविवाहनिषेध इत्यादि जीर्णमतांची पाठ थोपटून, दुसरीकडे नवमतवाद्यांनाहि चुचकारून खुष ठेवण्याची ही वटवाघुळी पोंलिसी पाहिली, ह्मणजे ट्रिब्यून पत्राचें भविष्य खोटेंच होतें असें ठरविणें बरेंच अवघड जाईल.

'पुराणें म्हणजे शिमगा' असें स्पष्ट मत प्रतिपादन करणारे स्पष्ट वक्ते एकवेळ या महाराष्ट्रांत होऊन गेले. कै. आगरकरांनी शनिमहात्म्याची यथास्थित झाडझडती घ्यायला कमी केलें नाहीं आणि कै. लोकहितवादी देशमूख व कै. राजारामशास्त्री भागवत यांनींहि खुद्द पुराणांचीं टाळकीं चेचून काढायला कमी केलें नाहीं. स्वामी दयानंदांची या बाबतींतली कामगिरी चिरस्मरणीय अशीच झालेली आहे. ही सर्व मंडळी कोणी माथेफिरू किंवा बदमाष नव्हती. परंतु या महात्म्यांनीं धिटाईनें पुढें केलेला पुराणप्रामाण्याचा निषेध अलीकडे मंदावण्याचें कारण थिऑसफीकल गडबडगुंड्यांत असावें, असा संशय आल्यास तो अनाठायींच होईल असें नव्हे. थिऑसफिस्ट मंडळींचा पुराणांवर भर विशेष. त्यांत त्यांना हिंन्दुधर्माचें रहस्य अपरंपार दिसतें. नुकताच एक-दोघा थिऑसफिस्टांनीं सत्यनारायणाच्या पोथीची 'सुधारलेली आवृत्ति' काढण्याचा उपद्व्याप चालविल्याचें ऐकतों. उद्यां परवां शिवलीलामृताबद्दलहि असाच यत्न होत असल्याचें वृत्त कानीं पडेल; कोणी सांगावें? पुराणांचा जन्म कां झाला, यावर सामान्यत: असें उत्तर मिळतें की श्रुत्युपनिषदादि ग्रंथांतील गूढ, ज्ञान अडाणी पामर जनांना आणि अक्षरशत्रू (?) बायाबापड्यांना उमगणार नाहीं, ह्मणून कथा गोष्टीच्या रूपानें तें 'दिव्य ज्ञान' स्पष्ट सुलभ आणि सोपें करण्यासाठीं पुराणांचा अवतार झाला. आतां पहावें तां या पुराणांच्याहि बाह्य कवचांना फोडून आंतला रहस्यमेंदु शोधून काढण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे! मूळग्रंथापेक्षां टीकाग्रंथच अधिक गूढ आणि घोटाळ्याचे! मग पुराणांनीं जन्म घेऊन केलें तें काय? पुराणांतलें ह्मणे रहस्य पहावें. त्यांतल्या असंख्य उघड उघड बीमत्स आचकट विचकट कथांचें 'दिव्य रहस्य' काय आहे, हें कोणी विवेकाला पटेल असें स्पष्ट करून सांगत नाहीं; पुराणीक बोवा तर जेहेत्ते कृष्णाची रासक्रीडा अक्षरश: खरी मानून मोठ्या शृंगारीक अवसानानें बाया बापड्यांच्या पुढें आपलीं प्रवचनें झोडीत असतात. आमची या रहस्यवाद्यांना विनंति आहे कीं ज्या शिवलिंगोप्तत्तीची संस्कृत भाषेंतली बीभत्स कथा मराठींत इंग्रजींत किंवा कोणत्याहि प्राकृत भाषेंत भाषांतर करतांना मोठमोठ्या विद्वानांनीं शरमेनें आपल्या लेखण्या खालीं ठेवल्या, त्या कथेचें 'दिव्य रहस्य' काय आहे, हें त्यांनीं कोठें तरी एकदां प्रसिद्ध करून आम्हांला कळविण्याची तसदी घ्यावी. सध्यां येथेंच विराम करणें बरें.

□□□

स्फुट विचार

वीर प्रभाकर स्मारक

गेल्या वर्षी मार्चच्या ५ व्या तारखेस माटुंगा येथें मकराणी पठाणांनीं घातलेल्या दरोड्याच्या वेळीं सुळे बंधूंनी जो वर्णनीय पराक्रम दाखविला व त्यांतील वीर प्रभाकरानें जो अपूर्व आत्मयज्ञ केला, त्याच्या स्मारकाबद्दलची मुंबईतील प्रतिष्ठित नागरिकांची विनंतीपत्रिका आज दुसरीकडे छापली आहे. तिकडे सर्व हिंदु मुसलमान बांधवांचें लक्ष जाईल, अशी आशा आहे. सशस्त्र पठाणांच्या बंदुकीला पाहून जेथें शेंकडों लोक भेदरून जाऊन आपापल्या खोल्यांत दडून बसतात, तेथें सुळे बंधू आपल्या हातांतल्या क्षुल्लक 'वॉकिंग् स्टिवक्स' (हातछड्यां) च्या जोरावर हिंमतीनें वीस सशस्त्र पठाणांवर निधड्या छातीनें चालून जातात, हें चित्र पहा; आणि गेल्या नवंबर महिन्यांतल्या मुंबईच्या दंग्याच्या वेळीं हिन्दुकुलस्त्रियांची अधम पारश्यांनीं चालविलेली विटंबना निर्लज्ज उघड्या डोळ्यांनीं पहाणाऱ्या हिन्दूंच्या दशेचें चित्र पहा. आपल्या बायकापोरांचें, मालमत्तेचें आणि अब्रूचें संरक्षण करण्यासाठीं घरादारांवर 'पठणांचे पहारे' ठेवण्याची जाहीर सूचना करण्यापर्यंत आम्हां हिन्दूंच्या अध:पाताची शिकस्त व्हावी आं? स्वराज्याकरितां चाललेल्या आमच्या चळवळी, व्यासपीठावरील तीं ज्वलज्जहाल वीररसात्मक व्याख्यानें आणि हमरी तुमरीची एकमेकांतलीं विविध मतभिन्नत्वाचीं तीं जोरदार भांडणें या सर्वांची आमच्या मानसिक व शारिरीक अध:पातार्शी निर्भीडपणें तुलना करतांच, मनांत काय काय विचार उचंबळूं लागतात, चित्ताच्या व्यग्रतेची कशी परमावधि होते आणि भविष्यकाळच्या इतिहासाचा काळाकुट्ट भेसूर पर्वत आपली छाती कशी दडपून टाकितो, याचा प्रत्यय हृदय व सारा सार विचार शाबूत असणारांनीं अवश्य घेण्याचा यत्न करावा. 'युद्धस्य कथा रम्या' या न्यायानें सुळे बंधूंच्या पराक्रमावर आपण स्तुतिपाठाचा पर्वतप्राय खच करूं; त्यांच्या शरीराला विदीर्ण करणाऱ्या पठाणी कट्यारींच्या जखमांगणित एकेक अद्भुत वीररसात्माक काव्य रचूं; दुबारी बंदुकीच्या काळमुखांतून सणाणत निघालेल्या व निमिषार्धांत मर्द वीर प्रभाकराच्या मर्दानी छातींत जाऊन घुसणाऱ्या वाघमार गोळीच्या वेगाला जिंकणाऱ्या चापल्यानें आह्मी व्याख्यानश्रेणीची परवड रचूं किंवा तारुण्याच्या जोमाचें ताजें तापट रक्त फोंफावत बाहेर पडून त्या धारातीर्थांत धाडकन कोसळून पडलेल्या त्या तरुण मर्दांच्या तेजस्वी पराक्रमाबद्दल आपण मोठ मोठाले लेख लिहूं. परंतु एका असहाय्य अबलेवर

होणाऱ्या प्राणघातक बलात्काराचा सक्रीय प्रतिकार करण्याच्या कामीं ज्या स्फूर्तीनें सुळे बन्धूंच्या मर्दुमकांचा सिंधु निमिषमात्रांत बेसुमार खवळला, त्या स्फूर्तीचें चित्र कोणता रविवर्मा रंगवूं शकेल, त्या स्फूर्तीचें पृथक्करण कोणता गज्जर करूं शकेल आणि या स्फूर्तींची जिवंत प्राणप्रतिष्ठा कोणता टाटा करूं शकेल! सुळे बन्धूंचें शौर्य मानवी स्मरणशक्तीच्या आयुर्मर्यादेइतकें अल्पायुषी नव्हे. त्यांचा पराक्रम व आत्मयज्ञ इतिहासानें हस्तांजुलींत झेलून आपल्या संग्रहींच्या निवडक वीररत्नांच्या दालनांत त्याची संभावना केली आहे. वीर प्रभाकराच्या आत्मयज्ञाचें स्वरूप इतकें व्यापक आहे आणि त्याचे परिणाम इतके सर्वस्पर्शी आहेत कीं, हा वीर जातीभेदाचे क्षुद्र तट लाथाडून आपल्या उदात्त कर्तबगारीने यच्चावत् महाराष्ट्रीय बन्धुभगिनींच्या आन्तरीच्या शुद्ध आदरास पात्र होऊन बसला आहे. असल्या मर्दाचें स्मारक बालचमूच्या स्थापनेंत झाल्यास सध्याच्या तरुण पिढीला शौर्यसागर नागरिक बनविण्याची ती एक उत्तम संस्था अस्तित्वांत येईल आणि गेल्या नवंबरच्या दंग्यांत प्रत्ययास आलेल्या दौर्बल्याची पुनरावृत्ति तरुण हिन्दूंच्या हातून होणार नाही. या स्मारकाबद्दल सक्रीय पुनरावृत्ति तरुण हिन्दूंच्या हातून होणार नाहीं. या स्मारकाबद्दल सक्रीय सहानुभूति दर्शविणाऱ्या सज्जनांनीं आपापल्या रकमा श्री. द्वारकानाथ राजाराम वैद्य B. A. L. C. E. चेअरमन 'वीर प्रभाकर स्मारक कमिटी' राजाराम व्हिला, व्हिन्सेंटरोड, दादर, या पत्त्यावर पाठवाव्या.

ते नव्हत, त्यांचेच बंधु

प्रबोधनच्या गेल्या अंकांत ७२ पृष्ठावर कुर्ला क्लबच्या सेक्रेटरी बद्दल जो मजकुर लिहिला गेला आहे त्याबद्दल श्री. मल्हार विनायक चिटणीस असें कळवितात कीं, वीर प्रभाकर स्मारक कमिटींतलि प्रतिष्ठित नागरिकांवर आक्षेप घेणारे क्लबाचे सेक्रेटरी नागनाथ वासुदेव सोनाळकर हे नसून त्यांचे बन्धु श्री. बाबुराव वासुदेव सोनाळकर हे होत. या बाबतींत श्री. नागनाथ यांचेंहि 'मी सेक्रेटरी नाहीं,' अशा खुलाशाचें पत्र आलें आहे. एका भावाच्या ऐवजी दुसऱ्याचें नांव चुकून पडल्यामुळें आम्हांला वाईट वाटतें. नांवाचा घोटाळा आडनांवाच्या साम्यावरून झालेला आहे. तथापि आमच्या टीकेंत सोनाळकर या नांवाबरोबरच क्लबाचे सेक्रेटरी असा स्पष्ट उल्लेख होता; व आमची टीका मुख्यत्वें व्यक्तीपेक्षां सेक्रेटरीच्या जबाबदारीलाच उद्देशून होती हें सांगणें नको. तथापि नामसादृश्यामुळें असो, भावाभावांच्या भ्रांतिकृत चमत्कारामुळें असो, बातमीदाराच्या गैरसमुती मुळें असो, किंवा कशामुळेंहि असो, 'क्लबाचे सेक्रेटरी म्हणून' बाबुराव वासुदेव सोनाळकर या खऱ्या नांवाऐवजी त्यांच्या सख्ख्या बन्धूंचें नागनाथ वासुदेव सोनाळकर हें खोटें नांव चुकून पडलें, या बद्दल प्रबोधन फार दिलगीर आहे. छापखान्यांतील भूतांप्रमाणें बातम्यांचेंहि भूत वर्तमानपत्रांच्या मागें असतें. या भूतानें प. वा. दादाभाई नौरोजींचा मृत्युलेख केसरीच्या हातून आगाऊ तीन दिवस लिहवून घेतला. या भूतानें कोठच्याशा एका मयत तांबे शास्त्र्याला टिळकांचा तात्यापंतोजी बनविलें. या भूतानें ७।२।२२ च्या केसरींत गृह्यसंस्काराखाली एका प्रतिष्ठित गृहस्थाचा मृत्यु घडवून लगेच १४।२।२२ च्या अंकांत तो सुरक्षित जिवंत असल्याचें सिद्ध

केलें. एका संगीत नाटकाच्या बाबतींत मुमुक्षुकर्ते लक्ष्मणराव पांगारकर यांच्यावर 'अहो! मी तो नव्हे' असा खुलासा करण्याचा प्रसंग याच भूतानें आणला. तेव्हां त्याच भूतानें प्रबोधनांत बाबुरावाच्या ऐवजीं त्यांचे सख्खे बन्धु नागनाथ उभे केलें तर त्यांत का नवल? असो. ते नाहीं. त्यांचे भाऊ; कोणी का क्लबाचे सेक्रेटरी असतना, थिएटर मधील प्रकार सर्वस्वी अक्षम्य व निंद्य यांत मात्र मुळींच शंका नाही. अर्थात् कुर्ला क्लब याबद्दल आपली बाजू कशी काय सांवरतो ते पहावयाचें आहे.

विष्णु विठ्ठल ओक

श्री. विष्णु विठ्ठल ओक B. A :- हे आमचे परममित्र गेल्या महिन्याच्या सुरुवातीला जरनॅलिझम् व कॉमर्स यांचें उच्च ज्ञान मिळविण्याकरितां जपानमार्गे अमेरिकेला निघून गेले. श्री. ओक अल्पवयी असून त्यांचें आजपर्यंतचें चरित्र उत्कटतम स्वावलंबन तत्वानें रसरसणारें व मेदबुद्धिशून्य सार्वजनिक कल्याणासाठी तळमळणारें असें असल्याचा आमचा गेली १२ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी मॅट्रिकपासून बीएपर्यंतचा अभ्यास स्वावलंबनाच्या कडकडीत तपश्चर्येनेंच पुरा पाडला. बिकट प्रसंगीं रस्त्यावर वर्तमानपत्रें विकून चण्याकुरमुऱ्यावर दिवस काढलें; परंतु स्वाध्यायांत व्यत्यय येऊं दिला नाही किंवा निष्कारण कोणाजवळ तोंड वेंगाडून आपल्या मानीपणाला कलंक लावला नाहीं. विद्यार्थी दशेंतसुद्धां सार्वजनिक महत्वाचीं अनेक उपयुक्त कामें त्यांनीं केलीं. कुर्ला स्टेशनवरचे प्लॅटफॉर्म आज ज्या उत्तम स्थितीत आहेत, त्याला श्री. ओक यांचीच खटपट सर्वस्वी खर्ची पडलेली आहे. G. I. P. च्या एजंटाकडून निराशा झाल्यावर श्री. ओकांनी थेट रेल्वे बोर्डापर्यंत मोठ्या चिकाटीचा झगडा केला आणि जळके कोळशे पसरलेल्या धक्क्यांच्या ऐवजी कॉंक्रीट सिमेंटचे प्रशस्त प्लॅटफॉर्म कंपनीला बांधण्यास भाग पाडले. प्रिव्हिअसच्या वर्गांला कालीदासकृत ऋतुसंहार हे अश्लील संस्कृत काव्य ठेवल्यानें तरुणतरुणींच्या मनोवृत्ति बिघडतात, या मुद्यावर त्यांनीं युनिवर्सिटीच्या सिनेटपर्यंत झगडा चालवून त्या पुस्तकाची हकालपट्टी केली. B. B. C. I. रेल्वेवर विद्यार्थ्यांच्या हंगामी तिकिटा (Season Tickets) फक्त चर्चगेटवरच मिळत असत; त्या विरुद्ध चळवळ करून ती सर्व स्टेशनांवर मिळण्याचा बंदोबस्त श्री. ओकांनींच केला. अशीं अनेक लोकोपयोगी कार्यें त्यांनी मुकाट्यानें निंदास्तुतीची पर्वा न करतां केलेलीं आहेत. B. A. झाल्यावर त्यांनीं अमेरिकेंत जाण्याचा निश्चय केला. जवळ तर फुटकी कवडीहि नाहीं. पण तेवढ्यानें गांगरून हताश होणाऱ्यांपैकी श्री. ओक नव्हते. त्यांनी 'दानशूर' ह्मणून गाजलेल्या श्रीमंत महात्म्यांचा अनुभव घेण्याचा निश्चय केला व लवकरच 'जें सारें पिवळें चकाकत असें ते सर्व सोनें नसे' हा प्रत्यय त्यांना आला. तथापि थोडी बहुत रक्कम जमतांच त्यांनीं प्रयाणाची तयारी केली, परंतु आयत्या वेळी एका बड्या 'चॅरिटी' संस्थेनें नकारघंटा वाजविल्यामुळें गुदस्त सालीं त्यांचा बेत रहित झाला, त्यानंतर ते एक पंचा, एक सदरा व ऐक वेळ जेवण अशा संन्यस्थ वृत्तीनें रहात असत. या जानेवारींत त्यांनीं पुन्हां नेटाची धडपड करून केवळ प्रवासापुरती रक्कम जमतांच मोठ्या धडाडीनें ते थर्ड क्लासनें जपानला रवाना झाले. श्री. ओकांचा स्वभाव अत्यंत करारी, उद्यमशील व

काटक असून त्यांच्या स्वार्थत्यागाच्या व लोकसेवेच्या कल्पना फारच उच्च दर्जाच्या आहेत. अशा तरुणास महाराष्ट्रांतील श्रीमंत श्रीमंतांनी सांपत्तिक हातभार लावल्यास एक उदात्त मनोवृत्तीचा सुसंस्कृत लोकसेवक निर्माण केल्याचें पुण्य त्यांना लागेल. या बाबतींत पत्रव्यवहार करणें किंवा रकमा पाठविणें त्या प्रिन्सिपाल निळकंठ विष्णु कोल्हटकर B. A. दादर इंग्लिश स्कूल या पत्त्यावर पाठवाव्या.

□□□

अग्रलेख

चिरंजीव आद्य हिन्दु मिशनरी

पतितपावनाचे दास । तेहि पावन करिती जगास ।
ऐशी हे प्रचीत मनास । बहुतांच्या आली ।। समर्थ.

स्थावरजंगम जगताला निश्चयानें बिनमुर्वत गिळून फस्त करणाऱ्या काळाला सर्वभक्षक ह्मणतात, तें अक्षारश: खरें आहे. अनंत मन्वंतरांची चटणी तोंडीं लावून शेंकडों युगानुयुगांना आपल्या विश्वव्यापी उद्गंत रिचविणाऱ्या काळापुढें कोणत्याहि सत्तेची मात्रा लक्षमात्र चालत नाहीं; म्हणूनच 'कालाय नम:' असा एकजात सर्व तत्ववेत्त्यांनीं काळास प्रणीपात ठोकलेला आहे. काळाचा जबडा जसा सर्वव्यापी आहे. तशी त्याची जिव्हा व दाढा या बेगुमान आहेत. त्यांना कोणत्याहि गोष्टीच्या प्रचंडत्वाची किंवा क्षुद्रत्वाची मुळींच क्षिति वाटत नाहीं किंवा रुची अरुचीची पर्वा भासत नाहीं. मोठमोठीं विस्तृत साम्राज्यें घशाखाली लोटतांना काय, किंवा एखाद्या अज्ञान खेड्याचें उच्चाटन करतांना काय; एकादा जगज्जेता शिकंदर किंवा अशोक दाढेखाली काडकन् फोडतांना काय, किंवा मातीमोल लांबलचक आयुष्याला कंटाळून निर्जन वनांत मारणाऱ्या भणंग भिकाऱ्याला झटपट गिळतांना काय; मर्यादित बुद्धिमत्तेच्या जोरावर सृष्टींतील गूढ आद्यतत्वांचा शोध लावून सृष्टीविधात्या परमेश्वरावर बेछूट मात करणाऱ्या ज्ञानेश्वराला बोल बोलतां अल्पवयांत कोवळ्या काकडीप्रमाणें गट्ट करतांना काय किंवा 'देवा माझे डोळे मिटव रे लवकर' अशी रात्रंदिवस याचना करीत अज्ञान व दारिद्र्यांत खितपत पडलेल्या शतायुषी प्राण्यावर 'देवज्ञे'चा उपकार करतांना काय; काळाला योग्यायोग्यतेची किंवा बऱ्यावाईटाची चाडच नसते. काळाची झांपसुद्धां इतकी जबरदस्त कीं हजारों वर्षें वैभवपूर्ण साम्राज्यसत्ता गाजविलेल्या जगव्यापी राष्ट्रांची स्मृतिसुद्धां त्यानें आज अक्षरश: नामशेष केलेली आहे. केवढें प्रचंड तें रोमन साम्राज्य, किती विशाळ ती ग्रीक संस्कृति, चंद्रगुप्त मौर्य सम्राटाचा केवढा तो दरारा, अशोकाच्या धर्मसंवर्धनाची कसली ती त्रिखंडव्यापी मिशनरी चळवळ, माधवारण्यांनीं स्थापन केलेल्या विजयनगरचा काय तो त्रिभूवन-निनादित बोलबाला, मुष्क हिन्याच्या अत्तराप्रमाणें साऱ्या युरोप आशियाभर दणाणणारी दिल्लीच्या मोगल बादशाहीची केवढी ती ऐश्वर्याची लकाकी; पण आजला त्यांच्या नाममात्र स्मृतीशिवाय विशेष काय उरलें आहे बरें? सिनेमाच्या चित्रपटप्रमाणें या दृश्य सृष्टींत हे निरनिराळे

एन ४००६--११

चित्ताकर्षक देखावे निर्माण करण्याची ज्या काळाला लहर आली, त्या काळाच्या उदरसागरांतच त्या देखाव्यांच्या लहरी अखेर विलीन झाल्या!

काळाचा दांत कितीहि तीक्ष्ण असला आणि त्याचा दंश कितीहि स्मृतिविध्वंसक असला तरी त्याच्या तीक्ष्ण दंशाला दाद न देतां त्याच्या नांगीला बोथट करण्यांत महशूर असें एक तत्व या मर्त्यलोकांत आहेच आहे. मर्त्य मानवांना अमर करण्यांत, त्यांना चिरंजीव बनविण्यांत, याच तत्वानें प्रत्यक्ष काळाशीं त्रिकालाबाधित झगडा चालवून त्यावर आपल्या पराक्रमाचा बिनतोड शह ठेऊन दिला आहे. या तत्वानें मृत्यु लोकच्या इतिहासाला जिवंत ठेविलें आहे. काळाच्या अक्राळविक्राळ दाढा या तत्वाचें पीठ करण्यास धजावतांच खुद्द त्यांचेंच पीठ पाडण्याचा प्रसंग काळाच्या पूर्ण अनुभवाचा असल्यामुळें, या तत्त्वाच्या वाटेस सहसा जाण्याच्या भानगडींत तो पडत नाहीं. मृत्युलोकींच्या अनंत कटुतम आधीव्याधींच्या जहरांतसुद्धां अखेर अमृताचा स्वाद निर्माण करणारा मसाला याच तत्त्वाचा असतो. मानवी सत्ताधाऱ्यांच्या जुलमी अत्याचारांस बळी पडलेल्या देवभक्तांच्या किंवा देशभक्तांच्या रक्ताच्या थेंबागणित अनंत देवभक्त व देशभक्त निर्माण करणारें तत्व तें हेंच. या तत्वाच्या उपासकांचे देह जरी सृष्टीक्रमानुसार नष्ट होतात, तरी त्यांच्या तत्वोपासनेचा अग्नि विझविण्याचें कार्य खुद्द सर्वविध्वंसक काळालाहि आजपर्यंत शक्य झालें नाहीं. हा अग्नि विझत तर नाहींच, पण धांवत्या काळाच्या सोंसाट्यानें उलट अधिकाधिक चेतविला मात्र जातो. असें हें अजिंक्य तत्व तरी कोणतें? आणि या तत्वाचे उपासक ते कोण? या मर्त्य जगांतलें अमर्त्य तत्व म्हटलें म्हणजे सत्य हे होय आणि या तत्वाच्या उपासकांना सत्यशोधक असें म्हणतात.

सत्य सर्वव्यापी आहे. मानवजातीच्या उत्क्रांतीला सहायभूत अशा सर्व क्षेत्रांचा इतिहास सत्यशोधकांनीं आपल्या निष्काम कर्तव्यानेंच आजपर्यंत रंगवून, आपण चिरंजीव आहोंत असे खुद्द सर्वभक्षक काळाच्या तोंडून वदवून घेतलें. सत्यशोधकांचा इतिहास अत्यंत विस्तृत आहे. किंबहुना असेंच म्हणणें अधिक श्रेयस्कर होईल कीं जगाच्या प्रगतीचा इतिहास हाच सत्यशोधकाचा इतिहास होय. विद्वज्जनांनीं देवाला अनेकवचनीं नटविला तरी तो एकवचनी 'एक देवच' आहे, हें सत्यशोधन उपनिषत् ग्रंथद्वारें जाहीर करणाऱ्या जनकादि सत्यशोधकांपासून तों विद्यमान सत्याग्रही महात्मा गांधीजींपर्यंत ही सत्यशोधकांची ऐतिहासिक परंपरा अखंड चालूच आहे. मूलत: सत्य तत्वच बिनमुर्वत असल्यामुळें त्याच्या उपासकांच्या चारित्र्यांत आग्रहीपणाची ताठर प्रवृत्ति विशेष आढळल्यास कांहीं नवल नाहीं. या आग्रही प्रवृत्तीमुळें सर्व सत्यशोधकांचा, सामान्य जनतेच्या अंधश्रद्धेच्या जोरावर, सत्ताधाऱ्यांकडून अनन्वित छळ, उपहास व कित्येक वेळां प्राणहानीहि झाल्याचें इतिहासांत नमूद आहे. सत्यशोधकांचा सत्याचा संदेश त्यांच्या समकालीन जनतेला सर्वस्वी रुचल्याचें व पचल्याचें उदाहरण दुर्मिळ आहे. आमच्या प्राचीन इतिहासावर पुराणांचा कचरा सांवडल्यामुळें त्याच्या खऱ्या स्वरूपाचा थांग लागणें जरी दुरापास्त झालें आहे, तरी युरपमध्यें सत्यशोधकांच्या छळाचा इतिहास असून स्वच्छ राहिलेला आहे. तिकडील जनतेनें सत्यशोधक येशूला क्रॉसवर टांगून ठार मारलें. ब्रूनोला भर चव्हाट्यावर उभा जाळला, कोणाचे डोळे काढले, कोणाचे कडेलोट केले, कोणाला उपासमारीनें मारले, वगैरे अगणित अमानुष अत्याचार केले. निरनिराळ्या क्षेत्रांतील सत्यशोधकांचीं अशा रीतीनें प्राणहत्या झाली, तरी त्यांच्या सत्यतत्वाची हानी मुळींच न होतां, वाऱ्याच्या सोसाट्यानें विस्तवाची क्षुल्लक ठिणगी जशी

बोलबोलतां भयंकर प्रळयाग्नींत रूपांतर पावते, तशी त्यांच्या मिशनची तीव्रता त्यांच्या प्राणहानीनें किंवा उपहासानें दिवसेंदिवस अधिकाधिक तिखट होत जाते. सत्यशोधकाचा बाणा सतीच्या वाणाप्रमाणें आहे. सत्याची कसोटी ह्मणजे सत्यशोधकाच्या जीवाचें दिव्य होय. त्याला सत्यापुढें प्राणाची तमा लवमात्र नसते. लोकमान्यतेची त्याला पर्वा नसते. त्याच्या बाजारांत निंदास्तुतीची किंमत एकच ठरते. त्याची दृष्टी उच्च सत्याच्या केंद्रावर खिळलेली असल्यामुळें, पायाखालीं वावरणाऱ्या 'खालमुंड्या मुलुखधुंड्या' जनतेच्या लौकिकी आचार विचारांच्या धसळामुसळीकडे सत्यशोधकाचें लक्षच रहात नाहीं; किंवा आपल्या सत्याग्रहामुळें एखाद्या सत्ताधाऱ्याच्या नाकाडावर आपला पाय पडत आहे, एकाद्या धर्ममार्तंडाच्या छाताडावर आपल्या सत्यशोधनाची धोंड पडून त्याचा जीव कासावीस होत आहे, किंवा आगापीछा न पहातां निवळ हुल्लड करण्यांतच जीवित साफल्य मानणाऱ्या अंधश्रद्धाळू जनतेच्या झुकत्या लहरीवर स्पष्टोक्तीचा पाय तिरपा पडल्यामुळें त्यांत आपला पूर्ण कपाळमोक्ष होणार आहे, याची क्षितिसत्यशोधक महात्म्यांस मुळींच नसते. देह जावो अथवा राहो पांडुरंगीं माझा भावो. पांडुरंग सत्याचा असतो. त्या सत्यासाठीं जीवितसर्वस्वावर पाणी सोडणारा सत्यशोधक चिरंजीव कां म्हणूं नये?

गुदस्त सालच्या होळी पौर्णिमेच्याच दिवशीं महाराष्ट्रांतील एका चिरंजीव सत्यशोधकाचा देह भस्मीभूत झाला. त्या रात्रीं सर्व हिन्दुजनता ठिकठिकाणीं होळ्या पेटवून निर्लज्ज बीभत्स शब्दोच्चारानें खरोखर हिन्दु धर्माचा शिमगा करीत असतां, 'हिन्दुधर्मो विजयताम्' या महत्वाकांक्षेच्या आमरण गर्जना करणाऱ्या धर्मकेसरीच्या मृण्मय देहाला अग्निदेवाच्या स्वाधीन करण्यासाठीं मुंबईच्या सोनापुरांत दोनतीनशें हिन्दु बांधवांचा समूह खिन्न मनानें जमला होता. वेदोपनिषत्प्रणेत्या आर्यपूर्वजांच्या उज्वल कीर्तीला काळोखी आणणारा, मानवजातीला लज्जित करणारा, सभ्यतेचें वस्त्रहरण करणारा, संस्कृतीची राखरांगोळी करणारा, शरमेलाहि शरण आणणारा शिमग्याचा शंखनाद करण्यांत सर्व नामहिन्दुजन गर्क असतांना, 'अहो हा हिन्दुधर्म नव्हे; ही आर्यांची नीति नव्हे; ही आर्यसंस्कृती नव्हे; ही आर्यांची नीति नव्हे; ही आर्यसंस्कृति नव्हे; महाराज, शुद्धीवर येऊन शुद्ध मनानें हिन्दुधर्मांचें शुद्ध स्वरूप पहा' असा आमरण कण्ठशोष करून देहत्याग करणाऱ्या आद्य हिन्दुमिशनरीचें प्रेत सोनापुरांत अग्नयेस्वाहा होत होतें. उपजणें मरणें न चुके नरा या सनातन नियमानें गजाननराव वैद्य आतां या मर्त्यलोकांतून जरी नष्ट झाले असले, तरी त्यांच्या मिशनचें मिशनरी उर्फ लोकसंग्रही सत्यतत्व अधिकाधिक पुष्ट होऊन बळावत आहे. देह नष्ट झाला तरी देहाचें कार्य नष्ट करण्यास सर्वभक्षक काळहि समर्थ नाहीं, मग ओंट घटकेची काशीराम करणाऱ्या मर्त्य मानवी सत्ताधाऱ्यांची कोटश्च कीटकांची ती काय प्रतिष्ठा! सर्वभक्षक काळाच्या उदरांत आजपर्यंत अनेक धर्मभक्त, राष्ट्रभक्त, समाजभक्त सत्यशोधकांचे देह पचनीं पडले, परंतु त्यांच्या सत्यशोधन प्रवृत्तीनेंच अखेर त्यांना चिरंजीव केलें. चिरंजीव वैद्य हे नुसते आडनांवाचे वैद्य नसून खरेखुरे वैद्य होते. त्यांनी आजन्म राष्ट्रधर्म समाजधर्म यांचा कसोशीनें स्वाध्याय करून, हिन्दूंच्या सर्वांगीण प्रकृतीच्या नाडीवर हात ठेवतांच, त्यांना एकदम भयंकर धक्का बसला. पण चाणाक्ष व धुर्त वैद्याप्रमाणें ते बोलले नाहींत. हिन्दुराष्ट्र क्षयामुळें मरणाच्या दारीं धरणें धरून बसलें आहे, त्यावर वेळीच उपाय न केला तर या जगतितलावर हिन्दु औषधालासुद्धां रहाणार नाहीं, हे गजाननराव वैद्यांनी बिनचूक ताडलें व खऱ्याखुऱ्या अस्सल लोकसंग्रही तत्वाचे इंजेक्शन देण्यासाठी त्यांनीं हिन्दु मिशनरी

एन ४००६--११अ

सोसायटीचा दवाखाना उघडला. या कार्याची सुरुवात करतांना या सत्यशोधक वैद्याने आपलें धोरण पूर्ण सत्याग्रहीच ठेवलें. हिन्दूंच्या राष्ट्रीय अस्तित्वाला बाधक असणाऱ्या निरनिराळ्या रोगग्रंथीवर शस्त्रप्रयोग करतांना त्यांनी रोग्याच्या अकांडतांडवाकडे लक्ष दिले नाही. लोकमताच्या झंझावातामुळें त्यांचा हात रेंसभरसुद्धां कंपित झाला नाही. हिन्दूंच्या जिवाग्री भिनलेल्या रोगांवर तोंडचोबडेपणाच्या मलमपट्ट्या लाऊन, त्यांच्या वेदनांवरच आपल्या स्तोमाची प्राणप्रतिष्ठा चालविणाऱ्या मानवदेहधारी श्वानांच्या भुंकण्यानें वैद्यांचें काळीज थरथरलें नाहीं. अचुक चुकारी ॲक्चुअरीच्या आंकडेमोडीचे नांगडे मोडण्यास त्यांनीं कमी केलें नाही, किंवा राष्ट्रीयत्वाचा उदो उदो करण्याचा हक्क स्वत: पुरतांच 'रिझर्व' करणाऱ्या वर्तमानपत्री जगद्गुरूंच्या बऱ्यावाईट अभिप्रायांकडे त्यांनीं लक्ष दिलें नाही. हिन्दु मिशनरीनें जन्म घेऊन पहिलाच जो शब्द उच्चारला तो हा:-

We come for Service

'सज्जनहो, मी आपली सेवा करायला आलों आहे. सेवा हेंच माझें ध्येय व मिशन. हिन्दुस्थानासारखा देश, हिन्दुधर्मासारखा धर्म, हिन्दुसंस्कृतीसारखी उज्वल संस्कृति, त्यांचे जगाच्या कल्याणाला काम आहे; म्हणून त्यांचें संरक्षण व्हावें व तें आम्हीं करावें हें उचित होय. तें करण्यासाठीं अन्तरात्मा मार्ग दाखवील त्या मार्गानें जाऊं व देवाची आणि सत्कार्याची सेवा करूं. हिन्दुधर्म हा जगाचा धर्म व्हावा, तो जन्मावर अवलंबून नसावा, पृथ्वीभर त्याचा प्रसार व्हावा, हाही विचार नवजीवनदेवतेच्या संचारकार्यांतीलच होय. नवजीवनदेवते, तुझी इच्छा हा हिन्दु मिशनरीचा वेद, तुझी आज्ञा हें त्याचें शास्त्र, तुझी सेवा हा त्याचा धर्म. ऋषींनीं प्रकट केलेला धर्म सनातन धर्म होय. तेथें भेदाभेद नाहीं. तो भक्कम अशा प्रेमाच्या पायावर आहे. व असा जो कांहीं धर्म तो हिन्दु मिशनरीचा हिन्दुधर्म होय. व हाच देवाचा हिन्दुधर्म होय. हिन्दु धर्माची इतकी योग्यता असून त्याची आज पायमल्ली होत आहे ती न व्हावी व त्याचा हिन्दुस्थानांतच काय पण सर्व जगांत मान वाढावा, हा हिन्दु मिशनरी सोसायटीचा आद्य हेतु आहे, व तो कोणाहि हिन्दुला पटण्यासारखा आहे.'' या मूलतत्वांप्रमाणें सतत तीन साडेतीन वर्षें कायावाचामनें अहर्निष झगडून वैद्यांनीं हिन्दु समाजाच्या आंगांत लोकसंग्रही बाण्याचें इंजेक्शन मोठ्या कुशलतेनें, शांतपणानें परंतु सत्याग्रही निश्चयानें दिलेंच दिलें. या इंजेक्शनचा योग्य तो परिणाम हळूंहळूं यापुढें एक मोठें अभिनव राष्ट्रीय वातावरण निर्माण करणार आहे.

वैद्यांच्या सत्यशोधनानें त्यांना चिरंजीव केलें आहे. या एकनिष्ठ सत्यशोधकाला हिंन्दुराष्ट्राच्या इतिहासांत अढळपद मिळालें आहे. असें तें सत्यतत्व तरी कोणतें, याचा थोडक्यांत उल्लेख करून या लेखाला कृष्णार्पण करूं. सध्या सारें जग एका विलक्षण मुशींत वितळूं घातलें आहे. मानवजातीची उत्क्रांन्ति घडवून आणण्याच्या जगड्व्याळ कार्याची लगबग आज सर्वत्र सुरू आहे. हा जबरदस्ताच्या टिकावाचा काळ असल्यामुळें, हिंदुजनता या महाप्रळयकाळीं टिकाव धरून राहण्याइतकी जबरदस्त आहे कीं नाहीं, या दृष्टीनें तिच्या नाडीवर वैद्यांनीं हात ठेवतांच त्यांना 'मुळींच नाहीं' असें उत्तर मिळालें. अर्थात् 'कां नाहीं? कां नसावी?' या प्रश्नांची मालीका सुरू होऊन अपायावर उपाय करण्याकडे त्यांची स्वाभिमानी प्रवृत्ति तात्काळ वळली. इतिहासाच्या दुर्बिणींतून हिंदुसमाजाच्या अंतर्बाह्य रचनेचें सूक्ष्म निरीक्षण करून, तत्वज्ञानाच्या 'एक्स रे' मधून त्याच्या रुधिराभिसरणाचें त्यांनीं पृथ:करण केलें आणि बिनचूक निदान केलें कीं 'लोकसंग्रहाच्या मिठाच्या अभावामुळें हिन्दु समाजांतील चैतन्य गतप्राण होत आहे; त्यांत वेळींच तें

मीठ न घातल्यास हिन्दुराष्ट्र बोलबोलतां सफाई नष्ट होईल.' अर्थात् हिन्दुधर्मियांत 'मिशनरी स्पिरीट' निर्माण करून, खऱ्या खुऱ्या लोकसंग्रहाची चटक त्यांना लाविल्याशिवाय हा भावी अध:पात टळणार नाहीं, या सत्याच्या संशोधनाचा संदेश आसेतुहिमाचल पुकारण्यासाठीं

होवो जगाचा गुरु आर्यधर्म

देवा जगीं वाढवि हिन्दुधर्म

हें गाणें गाऊन लोकसंग्रही प्रबोधनाचें कार्य करणारी हिन्दु मिशनरी सोसायटी त्यांनीं स्थापन केली. वैद्यांच्या कार्याची महति मोपल्यांचें बण्ड होईपर्यंत हिन्दूंना फारशी पटली नाहीं. उघडच आहे. कोणत्या सत्यशोधकाच्या सत्यशोधनाची महति त्याच्या समकालीनांनीं आजपर्यंत मान्य केली आहे? हिन्दूंच्या राष्ट्रीय अध:पाताचें मर्म त्यांच्या लोकसंग्रही बाण्याच्या निवृत्तींत आहे, याचें सोपपत्तिक विवेचन आम्हीं हिन्दु धर्माचें दिव्य नामक पुस्तकांत केलेलें आहे, तें पुनश्च परिशीलन करण्याची वाचकांनी तसदी घ्यावी. या पुस्तकाची हिन्दुजनांना 'ओळख' करून देतांना वैद्य ह्मणतात:- ''हिन्दुधर्माला इतिहास आहे हें फार थोड्यांच्याच लक्षांत येतें. पुराणमतवाद असा आहे कीं आम्ही अनादि कालापासून आहों तसेंच आहों. प्रस्तुतचा लेख वाचीत असतां वाचकांना नवी दृष्टी येईल व ते नव्या दृष्टीनें हिन्दुधर्माकडे पहावयास सिद्ध होतील. ग्रंथ, सिद्धान्त आणि लोकसंग्रह असे तीन ओघ हिन्दुधर्माच्या इतिहासांत आहेत. ग्रंथ अनेक, ते एकाच दिवशीं प्रगट झाले नाहींत; सिद्धान्त हे एकाचीं अनेक रूपें, पण तीं प्रगट झालीं भिन्न भिन्न काळीं; हिन्दुलोक हें अनेक शतकांच्या संग्रहानें झाले आहेत. हे तीनहि ओघ अनेक शतकें वहात आले आहेत. पण तिसऱ्या ओघाला उच्चनीचता इतिहासांत फार आलेली दिसते. हिंदुजन ग्रंथांना जपतात; ते कांहींसे सिद्धांतांना जपतात; पण ते लोकसंग्रहाचा विचारच करीत नाहींत. लोकसंग्रहाच्या बाजूचा ओघ जर सुकून वाळून गेला, तर दुसरे दोन असून नसून सारखेच.'' लोकसंग्रहाचा त्रिकाळ घौशा गाजविणाऱ्या अनेक उत्तुंग पुढाऱ्यांनासुद्धां वैद्यांच्या कार्यांचें महत्व नीट समाजावून देण्यासाठीं परिस्थितीला मोपल्यांच्या बण्डाला जन्म द्यावा लागला. या बण्डाचा इतिहास म्हणजे मुसलमानी रियासतीची पुनरावृत्ति होय. शिवाजीच्या वेळच्या इस्लामी धांगडधिंग्यांत आणि ब्रिटीश अंमदानींतल्या मोपल्यांच्या बण्डांत केंसभरसुद्धां फरक नाहीं. या बण्डानें वैद्यांच्या मिशनरी सत्यतत्वाची महति अधिकच सिद्ध करून दाखविली आहे. परंतु मोपल्यांच्या बण्डावर देवलस्मृतीची जडीबुट्टी लावण्याची शाब्दिक फुशारकी मारणाऱ्या डॉ. कुर्तकोटींना हिन्दुधर्मपरिषदेच्या तमाशांत हिन्दु मिशनरी सोसायटीच्या कार्याचा नुसता उल्लेख सुद्धां करण्याची बुद्धि होऊं नये, हा विसरभोळेपणा कीं जातीवंत मुर्दाडपणा? वैद्यांच्या मृत्यूला ता. १३-३-२२ रोजीं एक वर्षं पूर्ण झालें. अशीं अनेक वर्षें येतील व जातील. परंतु हिन्दूंच्या राष्ट्रीय टिकावासाठीं या चिरंजीव सत्यशोधकानें सत्याग्रहानें पुढें केलेल्या लोकसंग्रहवादाचा मिशनरी बाणा हिन्दुजनांमध्यें जर अझूनहि थरारणार नाहीं, तर हृदयांत धर्माभिमानाचा हिन्दुमहासागर कितीहि खवळलेला असला तरी जिव्हेला अखेर हाच दु:खोद्गार स्पष्ट काढावा लागेल कीं जनाब देहली तो सचमुच बहोत दूर है. वैद्यांचा आत्मा हिन्दुजनांच्या कानींकपाळीं हेंच ओरडत असेल कीं 'बांधव हो, मोपल्यांच्या बण्डाचा नीट विचार करा आणि लोकसंग्रहाची कांस धरा. यांतच तुमचा तरणोपाय आहे.''

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

कै. बापुजी रघुनाथ दिघे (जन्म १७७२ मृत्यु १८३५)
ग्वालेर व धारचे दिवाण, यांचे जीवन चरित्र

हें उत्कृष्ट ऐतिहासिक पुस्तक चरित्रनायकाचे खास वंशज श्री. दत्तात्रय अमृतराव दिघे B. A. LL. B. यांनीं इंग्रजींत लिहिलें आहे. ऐतिहासिक वीररत्नांच्या चारित्र्याचे जुने पुराणे कागद नीट संशोधन करण्याची तर गोष्टच नको, पण संगोपन करण्याच्याहि कामांत महाराष्ट्रीय कायस्थ समाज अत्यंत बेदरकार झाला आहे. बरें. ज्यांच्या हातीं कांहीं कागदपत्र यदृच्छेनें लागतात ते बव्हाणींतले कुत्रे बनतात. स्वत:ला त्या कागदपत्रांचा जीर्णोद्धार करण्याची अक्कल नाहीं व दुसरा कोणी करीत असेल त्याला ते देण्याची बुद्धि नाहीं! असलीं एक दोन कुत्रीं साताऱ्यास व बडोद्यास सर्वांच्या परिचयाचीं आहेत. मराठी स्वराज्यांत कायस्थ समाजानें जी विलक्षण कर्तबगारीचीं कामें केलीं त्यांच्या जीर्णोद्धाराच्या देवडीवर हकनाहक बसलेलीं हीं कुत्रीं सणसणीत लगुडप्रहारानें दूर हांकलून घातल्याशिवाय बराचसा महत्वाचा इतिहास उजेडांत येणें दुरापास्त झालें आहे. खुद्द कायस्थ समाजाची स्थिति पाहिली तर पोंकळ वाचीवीर्यत्वापलीकडे आज त्यांच्यापाशीं कसलेंहि भांडवल शिल्लक नाहीं. एखादें राजवाडे प्रकरण उपस्थित झालें कीं त्यांच्या इतिहासप्रेमाचा लोंढा वक्तेबाजीच्या फेंसानें भरपूर फसफसत ठाणें पुणें मुंबईंतीलच नव्हे, तर वऱ्हाड मध्यहिन्दुस्थानांतील सारीं मोठमोठीं शहरें मारे पार आकंठ बुडवून काढतो. पण तेवढा हंगाम गेला कीं जिकडे पहाल तिकडे मसणवटींतील शांतता. व्यसनातिरेकानें भणंग भिकारी बनलेल्या, परंतु वरपांगी सुखवस्तुत्वाची ऐट मारण्याची संवय असलेल्या लोकांची गोष्ट सोडली, तरी परमेश्वरानें संतत संपत यथेच्छ दिलेल्या लोकांनाहि ऐतिहासिक कार्यक्षेत्रांत झगडणाऱ्या दुबळ्यांना हातभार लावण्याची बुद्धि होत नाहीं. अधिकारी साहेबलोकांचे बूट पुसून त्यांना पार्ट्या देण्यांत शेंकडों रुपयांचें शेण करणारे परंतु स्वज्ञातीच्या इतिहासाचें आठ बारा आण्याचें चोपडें खरेदी करतांना कॅपिटल एक्स [X] प्रमाणें वांकडीं तोंडें करणारे रावसाहेब रावबहादुर या समाजांत पुष्कळ आढळतात. सारांश इतिहासाच्या जीर्णोद्धाराच्या बाबतींत खुद्द कायस्थांचाच जेथें सुतकी बाणा, तेथें त्या इतिहासाला इतरे जनांनीं उर्मटपणानें लाथाडण्याचा क्रम स्वीकारल्यास त्यांच्याकडे काय दोष? अशी खरीखुरी परिस्थिति असतांना, श्री. दत्तोपंत दिघ्यांनीं

आपल्या एका पूर्वज नवरत्नाचा इतिहास प्रस्तुत पुस्तकाच्या उत्कृष्ट कोंदणांत जडवून जगापुढें मांडण्यांत एक पवित्र कर्तव्यकर्म निर्हेतुक बुद्धीनें बजाविलें आहे, असेंच म्हणावें लागतें.

या पुस्तकाला श्रीमंत एम्. व्ही. किबे M. A. M. R. A. S. या सुप्रसिद्ध इतिहासशास्त्रविशारदांनीं त्रोटक परंतु चिकित्सक अशी प्रस्तावना जोडली आहे. याशिवाय प्रो. जोहरी (कॅनॅडियन मिशन कॉलेज), चीफ जस्टिवस कीर्तने. प्रो. रावळ, मि. लॉर्ड सुपरिटेंडंट ऑफ एनथॉग्रफी (मध्य हिंदुस्थान), बॅरिस्टर जैनी, प्रो. जदुनाथ सरकार इ. अनेक विद्वानांनीं या ऐतिहासिक पुस्तकाचें कौतुक केलेलें आहे. चरित्रविषयाची मांडणी दहा अध्यायांत ठाकठीक केलेली असून, विषयप्रतिपादनाची शैली आणि भाषेची आकर्षक हातोटी यांचा उत्कृष्ट मिलाफ झाल्यामुळें, इतिहासासारखा रुक्ष विषयसुद्धां कादंबरींतल्या नवलकथेइतका रसाळ व गोड बनला आहे. श्री. दिघे हे मॅजिस्ट्रेट असल्यामुळें कायद्यांच्या किचकटींत रात्रंदिवस झगडत असून सुद्धां, त्यांनीं एखाद्या कसलेल्या रसिकाग्रणीप्रमाणें इंग्रजी भाषा नाजुक गुलाब पुष्पगुच्छवत् झेललेली पाहून कौतुक वाटतें. प्रथम धारानगरीचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास थोडक्यांत चटकदार देऊन, ग्रंथकार चरित्रनायकाकडे वळले आहेत. ठिकठिकाणी अस्सल दस्तऐवजी पुरावे व निरनिराळ्या तात्विक ग्रंथांतील वचनें देऊन नायकाच्या स्वभावाचा व क्रमश: परिणत पराक्रमाचा परिपोष अत्यंत हृदयंगम वठविण्यांत आला आहे. खर्डेघाशा कारकुनाच्या दर्जापासून तों धारानगरी व ग्वालेर राज्यांच्या सौभाग्याचा आत्मा होऊन बसणाऱ्या बापुजी रघुनाथ प्रभुनें, येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाचा फायदा घेऊन, असजिवी मसिजीवी बाण्यानें कलमसमशेरीचा पराक्रम कसा गाजविला आणि स्वकीय परकीयांच्या विरोधाला न जुमानतां निश्चयाच्या बळानें रंकाचा राव कसा झाला, याचें उत्कृष्ट चित्र ग्रंथकारानीं फारच प्रमाणबद्ध रेंखाटलें आहे. पुस्तकाची किंमत फक्त १० आणे असून, तें श्री. दत्तात्रय अमृतराव दिघे B. A. L L. B. फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट, धार दरवाजा, महू C. I. येथें मागणी केल्यास मिळेल.

विश्वब्रह्मकुलोत्साह अथवा विश्वब्राह्मणांचा इतिहास

लेखक वे. शा. सं. बाळशास्त्री रावजीशास्त्री क्षीरसागर. विश्वब्राह्मण संज्ञेखालीं पंचाल दैवज्ञ इत्यादिकांचा समावेश होतो. या ज्ञातीचा धार्मिक सामाजिक व राजकीय इतिहास या प्रचंड ग्रंथांत १० विस्तृत संग्रहांच्या (प्रकरणांच्या) द्वारें सरळ मुद्देसूद व खंडनमंडनपर प्रवृत्तीनें ग्रथित केलेला आहे. श्रुति स्मृति पुराणांतर्गत प्रत्येक वाक्य प्रामाण्य मानणाऱ्या वाटेल त्या विद्वानांस दैवज्ञ पंचालादि विश्वब्राह्मणांचें ब्राह्मण्य बिनशर्त मान्य करण्यास भाग पाडण्याइतका हा ग्रंथ उत्कृष्ट लिहिला गेला आहे. याला आधारभूत असलेल्या ग्रंथांची नुसती यादी किंवा उतारेच पाहिले, तर ग्रंथकार हे नुसते पोकळ 'वे. शा. सं.' पदवीधर नसून, अक्षर: खरेखुरे वेदशास्त्रसंपन्न आहेत. इतकेंच नव्हे तर त्यांचें इंग्रजी, कानडी, तेलंगी व तामिल ग्रंथांचें परिशीलनहि उत्कृष्ट आहे. या ग्रंथाचा विशेष हा आहे कीं वरवर हा जरी एका विशिष्ट ज्ञातीच्या इतिहासाचा ग्रंथ आहेसा वाटतो, तरी त्यांतील माहिती सर्वांना उपयुक्त संग्रहणीय व मननीय आहे. ४ थ्या संग्रहांतील प्राचीन राजघराण्यांची माहिती कोणत्याहि इतिहासभक्तास आवडल्याशिवाय रहाणार नाहीं. ग्रामण्यविषयक ८ वा संग्रह बहुतेक श्री. ठाकरे कृत 'ग्रामण्यांचा साद्यंत इतिहासा'वरच रंगविलेला आहे. विश्वब्रह्मकुलोत्साहा इतका महाराष्ट्रांतील कोणत्याहि जातीचा सप्रमाण विस्तृत इतिहास मराठी भाषेंत आजपर्यंत आह्मांला आढळला नाहीं. सरकारनें व बडोदे म्हैसूर इ. विद्याप्रेमी संस्थानांनीं हा प्रचंड ग्रंथ आपल्या लायब्रऱ्या करितां मंजूर करण्या जोगा आहे. ग्रंथाची किं.

७।। रुपये असून तो ग्रंथकाराकडे ३९९ गणेशपेठ पुणें शहर या पत्त्यावर विकत मिळतो.

दु:खाश्रुहार

या हृदयभेदी काव्याचें जनकत्व श्री. दत्तात्रय भिमाजी रणदिवे (सं. संजीवन) या सुप्रसिद्ध कवीकडे आहे. प्रस्तुत कवि बऱ्याच वरच्या दर्जाचे आहेत, हें महाराष्ट्राला तरी नव्यानें सांगणे नको. प्रस्तुत काव्यहि त्यांच्या नांवलौकिकास साजेसें आहे. यांतील एक उतारा पहा.

हरपला हिंदमातेचा । तो एकमात्र सत्पुत्र
स्वातंत्र्यदेविचें तुटलें । मंगलमय मंगलसूत्र
राष्ट्रीय भावनेचा हो । आशांकुर दग्ध समूळ
जागृत सत्यप्रीतीचें । सर्वस्वीं पुसलें मूळ
निष्काम देशभक्तीही । हा हंत ! निराश्रित झाली
जाज्वल्य न्यायनिष्ठेचा । ध्वज गळुनी पडला खालीं
उरला नच निर्भयतेला । भारतांत कोठें थारा
हो सुधारणादेवीचा । अस्तंगत पंचाप्यारा
हरपला मर्द छातीचा । समतेचा पाठीराखा
रणिं पडला मानवतेचं। फांकडा शिपाई बांका
प्रगतीचा झुकला तोल
हिंदच्या तुऱ्याचें गोल
हरपलें मोति बिनमोल । दीनांचा गेला वाली ।।

वरील उद्गार प. वा. टिळकांसंबंधींच असणार, याबद्दल कोणालाहि शंका येणार नाहीं. कृतयुगापासून तों चालू कलीयुगापर्यंत त्रिखंड पृथ्वींत स्तुत्यर्ह असे एकटे काय ते टिळकच, अर्थात् लोकमान्यांच्या मृत्युवर एवढें रसाळ काव्य आणि त्याचा केसरींत गाजावाजा कसा नाहीं? राष्ट्रीय टाळकऱ्यांची या काव्याच्या स्तुतिपाठावर बेभान गर्जना कां झाली नाहीं? टिळक महाविद्यालयाच्या भारवाहकानें या काव्यग्रंथांची पुडकीं टेक्स्ट बुकें म्हणून वाहून कां आणली नाहींत? वगैरे प्रश्न पुण्यपत्तनस्थ राष्ट्रीय प्रामाण्याचे कट्टे गुलाम खात्रीनें विचारतील. काव्यांत प्रसाद आहे, रचना रसाळ आहे, विकारांचा जिवंतपणा आहे. मग या काव्याबद्दल राष्ट्रीय पक्षांत ठराविक गर्जना कां नाहीं? याला उत्तर हेंच कीं हें काव्य प. वा. टिळकांच्या मृत्यूला उद्देशून नसून, भिक्षुकशाहीच्या काळजाचा थरकांप उडविणाऱ्या प. वा. डॉ. नाय्यरच्या मृत्युबद्दल आहे. पुण्याच्या शनिवारांत उमलून बुधवारांत फुलणाऱ्या 'राष्ट्रीय प्रेममालेचें' हें 'सुगंधित पुष्प' नसून, या तोंडचोंबडे प्रेमाचा खोटा मुखवटा उचकून झुगारणाऱ्या सत्यशोधक वाङ्मय मालेचें हें पुष्प आहे. या पुस्तकाच्या मळपृष्ठावर डॉ. नाय्यरची भव्य मूर्ति मुद्रित केलेली असून, तें पान उघडतांच कंसाला ज्याप्रमाणें कृष्ण, त्याप्रमाणें केसरीला जळीं स्थळीं काष्टीं पाषाणीं त्रिकाल दिसणारा त्यांचा सुप्रसिद्ध वैरी जो कोल्हापुरचा छत्रपति त्याची तसबीर आढळते. या सर्व कारणसमुच्चयामुळें प्रस्तुत काव्याचा भिक्षुकशाही कंपूंत बोलबाला झाला नाहीं, तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ह्या पक्षाला कै. गोखल्यांसारखा थोर विभूतीच्या - निधनाची तर गोष्टच राहूं द्या - वार्षिक पुण्यतिथीच्या निमित्तानें सुद्धां आदराचे चार शब्द लिहिण्याइतका मनाचा मोठेपणा ब्रह्मदेवच

द्यायला विसरला, त्यांच्या पचनीं डॉ. नाय्यरविषयक काव्य कसचें पडणार! पक्षाभिमान सोडून या काव्याकडे पाहिलें तरी 'काव्य' या दृष्टीनें तें केव्हांहि सरस ठरेल यांत शंका नाहीं. विषयाच्या दृष्टीनें मात्र भिक्षुकशाहीने त्याला हात लावणें आणि पतंगानें दीपज्योतीला स्पर्श करणें सारखेच होईल. डॉ. नाय्यर यांच्या कळकळीच्या नेतृत्वाखालीं मद्रासच्या ब्राह्मणेतर संघाची केवढी जबरदस्त संघटना झाली आणि अस्पृश्योद्धाराच्या कामीं या महात्म्यानें किती सक्रीय धडाडी दाखविली, तें आज त्रिखंड विश्रुत आहे. अशा खऱ्याखुऱ्या लोकनायकाचा अन्त झाल्यामुळें कवि तळमळून म्हणतात:-

या वर्णाश्रमवाद्यांनो । या तुमची पिकली पोळी
पेटवा सुखानें आतां । राष्ट्राची आपुल्या होळी
त्या कट्ट्यावैऱ्या तुमच्या । घातली यमानें गोळी
घ्या, फिरवा गल्लोगल्लीं । आपली करंटी झोळी
चल गुलामगिरि, ये पुढतीं । नुरला तुज आतां काच
चल घाल देशभर पिंगा । चालूं दे नंगा नाच
सैताना ब्राह्मण्याच्या । कां अझुनि टाकिशि न ताळ
तो गेला आतां तुमचा । सर्वांचा कर्दनकाळ
जनतेस तीर्थ पाजाया । कर पुढतीं आपुले पाय
म्हण भारतराष्ट्रा दुसरा । नच याहुन तरणोपाय
धूर्तते, आटत चल जलदी । पोतडी तुझी ती खोल
घे काडि फिरव भंवतालीं । हं छू: मंतर चल बोल
खाशा हांडीबागांचा । झडकरी मेळवी मेळ
कर सुरू उशिर कां करिशी । नव देशभक्तिचा खेळ
एकेक माजवी खूळ
जननयनीं फेंकी धूळ
हें नजरबंदिचें मूळ । संधी तुज नामी आली ।

डॉ. नाय्यर व त्यांचें कार्य यांबद्दल आदरबुद्धि असणाऱ्यांनीं हें पुस्तक अवश्य वाचावें. किं. ६ आणे. पत्ता : संजीवन कचेरी ११२ वेताळ पेठ, पुणें शहर.

मुसलमान आणि मराठी भाषा

हें छोटेखानी पुस्तक महाराष्ट्र-भाषाप्रवीण इस्लाम बंधु श्रीयुत शिकंदर लाल आतार मु. बागणी जि. सातारा यांनीं 'मुसलमान बंधूंत मराठीचा प्रचार वाढविण्याचें कामीं कांहींतरी विधायक कार्य व्हावें' या उद्देशानें लिहिलें आहे. श्री. आतार यांनीं एकूण ५ मुद्यांवर आपले उदात्त विचार स्पष्ट व्यक्त केले आहेत. 'मराठीचे मुसलमान लेखक' व 'इस्लामद्वेषी वाङ्मयास आळा घालण्याची जरूरी' हे मुद्दे त्यांनी योग्य हंगामांत महाराष्ट्रीयांपुढें मांडण्यांत स्तुत्य समयवूचकता दाखविली आहे. सांप्रत हिन्दु मुसलमानांच्या एकीचा प्रश्न राष्ट्रापुढें आहे; त्याचीहि कळकळीची छटा या निबंधांत अथेति बरीच उमटली आहे, यांत नवल नाहीं. परंतु हा प्रश्न नुसत्या भाषेच्या मुद्यावर किंवा इस्लामी वाङ्मयावर मराठी पेहराव चढविल्यानें सुटेल असें आम्हांला मुळींच वाटत नाहीं. वास्तवीक, हिन्दुमुसलमानांची एकी पाहिजे असें आपण

बोलतांच, त्यांची बेकी खरोखरच आहे कीं काय, असल्यास ती कां कधीं व कशी झाली, इत्यादि मुद्यांचा सविस्तर विचार व्हावयास पाहिजे. तसेंच भाषा, धर्म, आचार, संस्कृति, रक्त, राष्ट्रीय दर्जा यांपैकीं कोणत्या बाबतींत ही एकी घडून येणें शक्य आहे, याचीहि भवति न भवति झाली पाहिजे. 'अल्लाचे शेवटचे नवी आरबी आहेत. आम्ही त्या शेवटच्या नबीची शिष्यमंडळी. यामुळें आह्माला आरबाचा त्याग करतां येणार नाहीं... महाराष्ट्रांतील बहुतेक (?) मुसलमानांची मातृभाषा उर्दू हीच आहे. मराठी ही त्यांची व्यवहार भाषा आहे.' असें श्री. आतार म्हणतात. परंतु या विधानांत इतिहासाचें जितकें गाढ अज्ञान आहे तितकाच वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. महाराष्ट्रांतल्या मुसलमानांची मातृभाषा म्हणे उर्दू! ही गोष्ट जर खरी मानली तर आधीं मातृभाषा या शब्दाची व्याख्या ठरविण्याचा प्रसंग येऊन बेतला म्हणायचा? उर्दू ही मातृभाषा, मराठी ही व्यवहारभाषा, इंग्रजी ही राजभाषा, गुजराथी ही तागडीभाषा असले शाब्दिक डोंबारी खेळ खेळून अत:पर चालणार नाहीं. 'क्यौं रे बामुलमिया, अंवऱ्या सकालीं तुम् किधर जेल्ता' असली अस्सल उर्दू मातृभाषा बोलणारे मुसलमान मात्र महाराष्ट्रांत हजारों सांपडतात. आरब संस्कृतीचा कैवार घेतांना श्री. आतार यांनीं ऐतिहासिक सत्याकडे अगदींच पाठ फिरवूं नये. हिन्दुस्थानांतील मुसलमान म्हणविणाऱ्यांचा धर्म जरी भिन्न असला, तरी शेकडा ९८ मुसलमान हिन्दु संस्कृतीचेच आहेत, ही गोष्ट विसरूं म्हटलें तरी त्यांचे प्रचलित आचार विचार विसरूं देणार नाहींत, हें श्री. आतार यांनीं लक्षांत घ्यावें. म. गांधींनी हिंदी राजकारण व खिलाफत प्रकरण यांचा चिवडा बनवून, त्यांत हिन्दु मुसलमान एकीची शाब्दिक फोडणी देण्यापूर्वी, खिलाफत ही चीज काय आहे, हें महाराष्ट्रांतल्या किती आमुलमियांस माहीत होतें कोण जाणें! मुसलमानांत मराठीविषयी 'आत्मीय भाव' उत्पन्न करण्यावरच जर घोडें अडलें असेल, तर त्याला दुडकी धांव मारायला लावणें एका चुटकीचें काम आहे. परंतु हाय ! श्री. आतार समजतात तितका हा प्रश्न कागदी घोड्यांच्या सर्कशीचा नव्हे. रक्त जर पाण्यापेक्षां जाड असेल, तर हिन्दुमुसलमान द्वैताचा प्रश्न हृदयहीन लेखन वक्तृत्वाच्या शाब्दिक धबधब्यांनीं धुण्याचा यत्न न करतां, सहृदयतेनें व निष्पाप वृत्तीनें, भिन्न बाह्यांगाची पर्वा न करतां, नसांतील रक्ताला आपल्या एकजिनसी रक्तपरिमाणूंशीं एकतान होण्याची मोकळीक देण्यानेंच सुटणार आहे. हिन्दूंच्या भिक्षुकशाही धर्ममार्तंडाच्या गाढवपणामुळेंच हिन्दु मुसलमानांच्या ऐक्याचा प्रश्न आज या भरतखंडाच्या बोकांडीं वसला आहे. धर्म, संस्कृति, सामाजिक आचार विचार, राजकीय परिस्थिति इ. निरनिराळ्या दृष्टीनें हा हिन्दु मुसलमान ऐक्याचा विचार आमूलाग्र ऐतिहासिक आधारानें सिद्ध करण्याचा सविस्तर यत्न हिन्दु आणि मुसलमान या नवीन ग्रंथद्वारें करण्यांत आम्ही गेले पांच सहा महिने मग्न आहोंत व लवकरच हा ग्रंथ जनतारूप जनार्दनाच्या सेवेसाठीं प्रसिद्ध करूं. तेव्हां येथे श्री. आतार यांच्या निबंधाचा घेतला एवढा सत्कार पुरे. पुस्तकाची किंमत फक्त चार आणे असून तें प्रत्येक हिन्दुमात्रानें अवश्य वाचण्यासारखें आहे.

जागा थोडी व्याप मोठा :- असल्यामुळें बऱ्याच कलमबहाद्दरांचा शेल्यापागोट्याचा आहेर दिरंगाईवर पडतो. (१) राधेय कर्ण (२) छत्रपति (पोवाडा), (३) नाईकांचे बोल, (४) भारतीय युवाओंकी शरीर-रक्षा. (५) उन्नतीचा राजमार्ग अथवा सत्यशोधक समाजाचीं तत्त्वें, (६) संघव्यायाम इ. पुस्तकांच्या लेखकांचा सत्कार पुढील अंक करील.

□□□

निवेदन

आश्रयदात्यांच्या चरणी नम्र निवेदन

प्रबोधनाचा हा १२ वा अंक आज श्रीभगवंताच्या कृपेनें वाचकांच्या सेवेला रुजू होत आहे. पहिल्या वर्षाचा अर्धा पल्ला तर झेपला. बोलून चालून नवमतवादाच्या प्रबोधनाचें कार्य लोक-अमान्य. त्यांतून विशिष्ट पंथ-प्रवर्तकांची व्यर्थ न करि पूजा । व्यक्तीचा नच मिंधा, बंदा सत्याच्या काजा ।। हा पडला प्रबोधनाचा बाणा. अर्थात् त्याचे कार्य धिमेधिमेच चालणार. प्रतिकारांविषयी तर इतकेंहि सांगायला कांही हरकत नाहीं की प्रतिकाराची मालिका प्रबोधन कचेरीच्या उंबरठ्यापासून तों आमच्या प्रेमळ आश्रयदात्यांच्या उंबरठ्यापर्यंत बिनतोड लागलेली आहे. तथापि कर्तव्यप्रेमामुळें प्रतिकारांकडे दुर्लक्ष करून प्रबोधन आपलें विवेक-वादाचें कार्य निमूटपणें करीत आहे. छापखान्यांतील मित्रांच्या कृपेनं आतांपर्यंत तरी प्रबोधनानें नियमितपणाच्या बाबतींत आश्रयदात्यांचा टपका घेतलेला नाहीं.

कोणत्याहि काळच्या प्रबोधनकाराची स्थिति अनुकंपनीयच असते. त्याचें कार्य थरारणें किंवा जन्मतांच मरणें या गोष्टी त्याच्या अल्पसंख्य सहानुभूतिकर्त्याच्या मनोवृत्तीवरच अवलंबून असतात. सांप्रत आमची स्थिति अशीच आहे. वाणीप्रमाणें करणी ठेवण्याची जबाबदारी रात्रंदिवस डोळ्यांसमोर आहे. 'मानसिक दास्याविरुद्ध बण्ड' पुकारणाऱ्या प्रबोधनकाराच्या पायांतली पावणे दोनशें रुपयांची सरकारी नोकरीची दास्यशृंखळा अवघ्या ३ मिनिटांत ता. १०-२-२२ रोजीं खाडकन् कां तोडली गेली हें याचें प्रत्यंतर होय. जनतारूप जनार्दनाची आमरण निर्व्याज सेवा करण्याचा प्रबोधनकाराचा मनोदय तोच जनार्दन शेवटास नेईल. सांप्रत स्वतःचा लौकिकी संसार व प्रबोधनाचा जनसेवेचा संसार अशा दुबारी संसाराचें गाडें आम्हीं एकहातीं हांकीत आहोंत.

संसार ह्मणचे शुद्ध पैशाचा खेळ. प्रबोधनाचा संसार प्रेमळ आश्रयदात्यांच्या कृपेवरच चालावयाचा. आमच्या नम्र विनंतीला मान देऊन पुष्कळ आश्रयदात्यांनी आपआपली वर्गणी मनीआर्डरनें पाठवून दिली. या सर्व सज्जनांचे प्रबोधनावर महदुपकार झाले. त्यांच्या चरणांना आमचें वंदन असो. तथापि अझूनहि बऱ्याच आश्रयदात्यांनी आमच्या विनंतीकडे मेहरनजर केल्याचें दिसत नाही. दुबळ्या प्रबोधनानें कर्तव्यप्रेमाच्या जोरावर पहिल्या वर्षाचा अर्धा प्रवास बिनतक्रार नियमीत केला व प्रत्येक अंकासोबत 'वर्गणी पाठवा' अशी विनंति करून दोन वेळां खास सूचनापत्रेंहि पाठविलीं. अशा आश्रयदात्यांनीं

आतां तरी आत्मकर्तव्याची जाणीव जाणून आपापली वर्गणी ताबडतोब मनी ऑर्डरनें रवाना करण्याची कृपा करावी. ज्यांना यापुढें प्रबोधन नको असेल त्यांनी तसें स्पष्ट कळवावें व १२ अंकाबद्दल प्रत्येकीं ८२ प्रमाणें रु.१-८-० म. ऑ.नें पाठवावें; परंतु परस्पर प्रेमाच्या व्यवहारांत मुग्धता नसावी.

जनार्दनाचा स्वयंसेवक,
केशव सीताराम ठाकरे,
संपादक-प्रबोधन.

□□□

अग्रलेख

समाज-सुधारकांचें दिव्य

(लेखांक १ ला)

"Today the boldest Hindu reformer admits that to attempt practical reform in his indivisual capacity is like cutting his own throat and courting the destruction of his innocent family."
- Late Mr. Malabari.

दिव्याची कल्पना कितीही दिव्य असली तरी त्याच्या तपशीलाचा इतिहास भयंकर असतो. दिव्याशिवाय कोणत्याहि गोष्टीची वास्तवीक योग्यता सिद्ध होत नाहीं. सोन्यासारखी धातुश्रेष्ठ धातु, पण तिलाहि दिव्याचा कस लागल्याशिवाय तिचा नंबर सिद्ध होत नाहीं. शंभर नंबरी सोन्याची लगड आपण मोठ्या कौतुकानें हातीं घेऊन तिच्या तेजाची स्तुति करतों. तिची किंमत करतों परंतु त्या दिव्य स्थितीला येण्यापूर्वी लगडीला प्रखराग्नीच्या ज्वाळांत आपल्या देहाचें भयंकर दिव्य करून घ्यावें लागलेलें असतें, ही गोष्ट आपण विसरून जातों. जी गोष्ट सोन्याची तीच इतर सर्व मानवी व्यवहाराची. मानव जातीची आजला जी कांहीं दृश्यादृश्य उत्क्रान्ति झालेली आहे, ती अनंत क्रान्तिकारक तत्वांच्या व तत्ववेत्त्यांच्या दिव्यावर उभारलेली आहे. या दिव्याच्या तपशीलाचाच इतिहास आपण पाहूं लागलों, तर बिनशर्त आपणांस हेंच कबूल करावें लागेल कीं प्रत्येक सुधारणेच्या पायांत सुधारकांच्या रक्ताचे पूर खर्ची पडलेले आहेत. मानवांची उत्क्रान्ति मानवी रक्तावरच झालेली आहे. बण्ड क्रान्तीचें असो वा उत्क्रान्तीचें असो, त्याच्या समरांगणावर मानवी रक्ताचा सडा पडल्याशिवाय कधींहि रहात नाहीं. हें सनातन तत्व आहे. क्रान्तिकारक बण्डांत मानवी रक्ताचे पाट वहातांना दृष्टीला उघड दिसतात; उत्क्रान्तीच्या बण्डांत ते बण्डखोर सुधारकांच्या देहांतल्या देहांत जिरून खाक होतात, ह्मणून दिसत नाहींत, एवढेंच. नव्हे, अशीहि अनेक उदाहरणें दाखवितां येतील कीं शांतीच्या व अनत्याचाराच्या मार्गानें सुधारणा करूं पाहणाऱ्या उत्क्रान्तिवाद्याला आपल्या कार्यसिद्धीकरितां स्वत: कण्ठस्नानाचें दिव्य भोगावें लागलेलें आहे. सारांश, मानवांच्या उन्नतीला उजळ करण्याची महत्वाकांक्षा ज्यांच्या हृदयांत उचंबळत असेल, त्यांनीं आपल्या सर्वस्वावर प्रथम तिलांजुली दिल्याशिवाय गत्यंतरच नाहीं, असा मानवी सृष्टीचा इतिहास कण्ठरवानें ओरडून सांगत आहे. विशेषत: जीर्ण मतवादानें सडलेल्या

व भिक्षुकी गुलामगिरींत अडकलेल्या हिंदुस्थानांतल्या हिन्दु सुधारकांना तर या दिव्यांतून निसटण्याची लवमात्र आशा नाहीं. ह्मणूनच, जन्मानें पारशी परंतु मनानें पूर्ण हिंदु असे प. वा. मलबारीशेट यांनीं आमरण हिंदुसमाजसुधारणेच्या प्रश्नांत आपल्या तनमनधनाचें दिव्य करून अखेर मथळ्यावरील उद्गार काढले कीं ''आज प्रत्येक हिन्दु सुधारकाची अशी खात्री पटलेली आहे कीं एखादी सुधारणा प्रत्यक्ष घडवून आणण्याच्या कामीं स्वत: झगडणें ह्मणजे स्वत:च्या गळ्यावर सुरी फिरवून आपल्या निरपराधी कुटुंबाचा सर्वस्वनाशच करून घेण्यासारखें आहे.'' हिन्दु समाजसुधारणेच्या कोणत्याहि क्षेत्रांत झगडण्यास सिद्ध झालेल्या किंवा सिद्ध होऊं पहाणाऱ्या नवमतवाद्यानें मलबारी शेटचे हे उद्गार अवश्य नीट मनन करावे. या उद्गारांत अतिशोक्ति नाहीं किंवा वस्तुस्थितीचा विपर्यासहि नाहीं. हिन्दुसमाजाच्या काळजाला भिनलेली भिक्षुकशाही इतकी मुर्दाड आहे आणि शेंकडा ९४ निरक्षरतेमुळें तिच्या अमंगल जीर्णमताचा हिन्दुसमाजावर पडलेला अंमल इतका भयंकर आहे कीं राष्ट्रीयत्वाच्या मुखवट्याखालीं वावरणाऱ्या दांभिकांच्या हातीं आज जर खरोखर कांहीं राजसत्ता असती तर त्यांनीं प्रो. कर्व्यांना ब्रूनोप्रमाणें सप्तशृंगीच्या मैदानांत उभे जाळलें असते; डॉ. कुर्तकोटीच्या हातून विठ्ठल रामजी शिंद्यांचा सखाराम हरी गुप्त्याप्रमाणें वेदोक्त कडेलोट केला असता; गोखल्यांना केळकरांच्या हातून गोळी घालून, चिंतुनाना वैद्यांच्या हस्तें सर भांडारकरांना राखेचा तोबरा दिला गेला असता; भारत इतिहास-संशोधक मंडळाच्या कार्यालयासमोर ब्राह्मणेतरांना 'साम्राज्यद्रोही' व 'शूद्र' ठरविण्याचा राष्ट्रीय महोत्सव मोठ्या धडाक्यांत उरकून, गायकवाड वाड्याच्या चौकांत गुंजाळ आवट्यांच्या हस्तें कोल्हापूरच्या छत्रपतीच्या आंगाला पलीते लावून जिवंत जाळण्याचा विधी खुद्द लोमांच्या जयजयकारांत पार पडला असता. महाराष्ट्रांत सार्वजनिकत्वाचे धिंगाणे घालणाऱ्या या 'राष्ट्रीय' नामधारी कंपूच्या वामलीला ज्यांच्या पूर्ण परिचयाच्या आहेत, त्यांना तरी निदान हीं आमचीं विधानें अतिशयोक्तीचीं वाटणार नाहींत. पुष्कळांना या गोष्टींचा पुरावा उघड्या डोळ्यांना दिसत असूनसुद्धां, फक्त स्पष्टोक्तीचें धाडस करवत नाहीं, इतकेंच. कोठच्याहि सुधारणेच्या कामीं लोकमत तयार करण्यासाठीं नियतकालिकांचें साधन सांप्रत रूढ आहे. परंतु त्या क्षेत्रांतसुद्धांभिक्षुकशाही गुंडांचे 'राष्ट्रीय' वाममार्ग आहेतच. ज्या नियतकालीकाचा संपादक ब्राह्मण ह्मणविणाऱ्या आईबापाच्या पोटीं जन्माला आलेला नसेल, तें नियतकालीक बेछुट 'ब्राह्मणेतर' ब्लॅकलिस्टांत पडतें, तें 'राष्ट्रीय' ठरत नाहीं, तें 'सार्वजनिक' होऊं शकत नाहीं, तें ब्राह्मणी पत्रकारांच्या 'परत भेटीस लायख' होत नाहीं, किंवा लोकशिक्षणाच्या बाबतींतही तें पात्र ठरत नाहीं; असा एक 'राष्ट्रीय' नियमच ठरून गेला आहे. या नियमाच्या पचनीं पडन गोमयवत् बनलेल्या बऱ्याचशा अब्राह्मणांनाहि असलीं नियतकालीकें हातांत घेणें म्हणजे महाराची सांवली पडल्याइतकाच अशौचाचा भ्रम झाल्यास नवल नाहीं; मग त्यांतले विचार कितीहि लोकमान्य, विचारार्ह किंवा सर्वस्पर्शी असोत! शिवाय, नुसत्या धंद्याच्या दृष्टीनें जरी विचार केला, तरी तेथें सुद्धां ब्राह्मणेतर पत्रांची मुस्कटदाबी करण्याचीं 'राष्ट्रीय' यंत्रें चालूंच असतात. सन १९०८ सालच्या धामधुमींत 'ज्ञानप्रकाश विकाल तर केसरी विकायला मिळणार नाहीं' या राष्ट्रीय धमकीच्या मंत्रानें मवाळ पत्रांची जहाल राष्ट्रीयांनीं मुसकटदाबी केल्याचें पुष्कळांना माहीत आहे. आजला जहाल-मावळांचा चुरशीचा सामना मागें पडून, त्याची जागा ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादानें पटकावली आहे. ब्राह्मणेतर पत्रांचा जोरहि दिवसेंदिवस वाढत आहे. अशा वेळीं तर 'राष्ट्रीय मुस्कटदाबी' यंत्र किती जोरांत सुरू असेल याची वाचकांनीं कल्पनाच

करावी. 'प्रबोधन पत्र विकायला घ्याल तर लोकमान्य विकायला मिळणार नाहीं' हा अनुभव स्वत: आह्मांला आला आहे. एरवीं दोन महिनेपर्यंत प्रबोधनाचे दीड दोनशेंपर्यंत किरकोळ खपणारे अंक ताबडतोड 'खपत नाहीं' से कसे होतात? आणि 'हल्लीं रस्त्यावर अंक कां मिळत नाहींत?' अशा पृच्छेचीं अनेक पत्रें आमच्याकडे कां येतात, हें एक मोठें गूढच म्हटलें पाहिजे. अगदीं ताजी 'राष्ट्रीय' वाममार्गाची बातमी म्हणजे पुणे मुन्सिपालटीच्या इलेक्शनची. 'मतदारांच्या याद्या अपुऱ्या, मेल्या माणसांचीच नांवें जास्त, ब्राह्मणेतरांचीं नांवें मुद्दाम गाळलेलीं, अशा पुण्याच्या एका अट्टल ब्राह्मणी पक्ष्यानें तयार केलेल्या होत्या.' (श्री शिवाजी. २१-३-२२) याबद्दल म्यु. चे 'राष्ट्रीय' अध्यक्ष दे. भ. लखुनाना आपट्यांना श्री. बाबुराव जगतापकडून पुणें कोर्टांत सक्षौर प्रायश्चित्त घेणें भागच पडलें. दुनिया झुकती भली व 'राष्ट्रीय' झुकवते भले.

समाजसुधारणेच्या व विचारप्रसाराच्या बाबतींत पहिली मोठी धोंड म्हटली म्हणजे बहुजनसमाजाच्या निरक्षरतेची. साधारणत: शहरांतून यसफ्यसवाल्यांचा गजबजाट बराच दिसतो खरा, तथापि साक्षरतेच्या प्रमाणाचा पारा अझून शेंकडा ६ च्या वर मात्र मुळींच चढलेला नाहीं, हे लक्षांत असावें. शेंकडां ९४ निरक्षरता आणि त्यावर भिक्षुकी जीर्णमतानें निर्माण केलेल्या भोळसट व खुळचट आचारविचारांचा भक्कम बसलेला पगडा, अशा शोचनीय स्थितींत कोणतीहि सुधारणा सामुदायिक अथवा व्यक्तिश: थरारण्याचें कार्य अत्यंत दुष्कर होऊन बसलें आहे. निरनिराळ्या समाजांच्या वार्षिक 'समाजोन्नति' परिषदांचे फार्स पहा, किंवा सुसंघटित (?) अशा नॅशनल सोशल कॉन्फरन्सांचीं नाटकें पहा; शाब्दिवक फाफटपसाऱ्यापलीकडे त्यांत विशेष कांहीच नसतें. याचें कारण हेंच कीं बुद्धीचा विकास करून विवेकाची महती पटवून देणाऱ्या खऱ्याखुऱ्या शिक्षणाचाच आमच्यांत पूर्ण अभाव आहे. जी कांहीं थोडी बहुत साक्षरतेची यसफ्यस चळवळ शहरांतून दिसते, ती सारी Little learning is a dangerous thing (थोडें ज्ञान मसणघाण) या मासल्याचीच आढळते. बरें, जे कोणी उच्च पदवीधर विद्वान् असतात, त्यांना तर आकाशसुद्धां ठेंगणें झालेलें असतें. त्यांचा हात गगनाला पोचल्यामुळें पायाखालच्या लक्षावधि अज्ञान बंधुभगिनींच्या हतबल स्थितीकडे लक्ष पुरविणें त्यांना बेइभ्रतीचें वाटतें. बरोबरच आहे. उच्च कल्पनांच्या वातावरणांत भराऱ्या मारणाऱ्या या गरुडांनीं जमिनीवर सरपटणाऱ्या किडामुंग्यांची पर्वा राखावी तरी कशी? बरें, पर्वा राखण्याची कांहीं बुद्धि झालीच तर या उच्च कोटींतील विद्वानांचा उच्च विचारवाद नीच कोटींतील कोटश्चकीटकांना समजत नाहीं व उमजतहि नाहीं. अर्थात् या विद्वानांचीं समाजोन्नति परिषदेंतील व कॉन्फरन्सच्या पॅडलमधलीं रसभरीत व्याख्यानें 'इकडून तिकडे गेलें वारें' अशा मासल्याच ठरल्यास त्यांत आश्चर्य कसलें? तात्पर्य, बुद्धीचा विकास करणाऱ्या शिक्षणाचा मोठ्या नेटानें प्रसार झाल्याशिवाय कोणत्याहि सुधारणेचें पाऊल फारसें पुढें पडणें शक्य नाहीं.

प्रचलीत शिक्षणपद्धतींत जर कांहीं ठळक दोष असतील तर त्यांत बुद्धिमांद्य हा दोष प्रमुख आहे; आणि तो बहुतेक साक्षर मनुष्यांत बऱ्याच मोठ्या प्रमाणांत स्पष्ट दिसून येतो. नुसतें बुद्धिमांद्यच असतें तर परवडलें असतें, परंतु त्याच्या जोडीला अहंमन्यतेचा दुर्गुण जडल्यामुळें, अडाणी एक वेळ पत्करला परंतु हे पदवीधर पंडीत नकोत, असें ह्मणण्याचे प्रसंग वारंवार आले नसते. प्रचलीत शिक्षणाचा मसालाच असा आहे कीं त्याच्या गिरणींतून बाहेर पडणारा माल कारकूनगिरीशिवाय इतर कामीं उपयोगीच पडायचा नाहीं. या शिक्षणाला 'पोटभरू शिक्षण' असें ह्मणण्याचा प्रघात आहे, परंतु तो

आतां बंद पाडून त्या ऐवजीं 'भिकमाग्ये शिक्षण' ह्मटलें तर तें वर्तमान वस्तुस्थितीशीं खास सार्थ ठरेल. कारण उच्च पदवीधरापासून तों मातृक्लेशन परिक्षा दिलेल्या व देणाऱ्या 'उमेद' वारांपर्यंत एकालाहि आपलें पोट इभ्रतीनें भरतां येणें सध्यां शक्य नाहीं. आह्मांला कोणी Hewers of wood and drawers of water (लांकुडतोड्ये व पाणक्ये) म्हटलेलें मुळींच खपत नाहीं; परंतु इंग्रजी वाघिणीचें दुध पिऊन सुद्धां आमची मन:स्थिति लांकुडतोड्याइतकीहि उत्कान्त कां झाली नाहीं, याचा सुशिक्षित म्हणविणारांनीं विचार करायला नको काय? इंग्रजी विद्येला वाघिणीचें दुध म्हणतात तें कांही खोटें नाहीं किंवा त्या दुधाचा पराक्रमहि असातसा नाहीं. परंतु आपल्याला वाघ व्हावयाचें आहे या निश्चयानें त्या दुधाचा घोट घेण्याची बुद्धीच नसल्यामुळें, दुग्धप्राशनोत्तर डुरकण्या फोडणाऱ्या वाघाऐवजी ब्यँऽऽ करणाऱ्या मेंढराचें रूप प्राप्त झालें तर त्यांत काय नवल? इंग्रजी शिकायचें कशाला? तर नोकरीसाठीं. बीए झालोंच म्हणून एलेल्बीचा कोर्स पुरा करून यावज्जन्म वकीलीशीं नॉन्कोऑपरेशन करीत आयुष्य कंठणारे 'ब्रीफलेस बॅरिस्टर' प्रत्येक गांवच्या कोर्टांत गाड्यावरी आढळतील. मास्टर ऑफ आर्ट (विद्यापति) ह्मणविणारांची स्थिति तर पुसूंच नये. सारांश, शिक्षणसंस्कारांच्या मुशींतून तळून पोळून निघालेल्या विद्वानांचीं मनेंसुद्धां अखेर संस्कारहीन विकासहीन आणि निर्बलच रहावीं, हा विसाव्या शतकांतील विचारार्ह असा हिंदी चमत्कार आहे. हे विचार वाचून बरेच पदवीधर आमच्यावर गरम होतील, व कांहींजण आपल्या पदव्यांच्या 'इभ्रतके वास्ते' प्रबोधनावर बहिष्काराची सूचनाहि आणतील. परंतु खरी वस्तुस्थिती स्पष्ट व्यक्त करण्याच्या कामीं प्रबोधन कोणाच्याहि निंदास्तुतीची पर्वा बाळगणार नाहीं. मग बहिष्कार घाला, वर्गणी बुडवा, काय वाटेल तें करा. निस्पृहस्य तृणं जगत्.

नाताळच्या व ईस्टरच्या हंगामांत ठिकठिकाणीं भरणाऱ्या निरनिराळ्या जातींच्या 'समाजोन्नति' परिषदांचा इतिहास आतां चिकित्सापूर्वक अभ्यासण्याची वेळ आली आहे. या परिषदांमुळें त्या त्या समाजाची उन्नति कितपत झालेली आहे ती ज्यांनीं त्यांनीं आपल्या मनांशींच विचारावी. खुद्द परिषदेच्या हंगामांत मात्र भगिनी बांधवांच्या नांवानें विविध सुधारणांच्या ठरावांचा नुसता मुसळधार पाऊस कोंसळतो, विषयनियामक सभेंत ठरावांतील कानामात्रावेलांट्यावर वादविवादांची पानपतच्या लढाईची धुमश्चक्री माजते, निवडक निवडक 'सुशिक्षित' पदवीधरांच्या शाब्दिक पांडित्याने सभागृहांतील वातावरण दुमदुमून जातें आणि शेवटच्या दिवशीं चमचमीत मेजवानीनें परिषदेच्या नाटकाचें भरतवाक्य होऊन, परस्पराभिनंदनाच्या बत्तिशी थाटांत हा 'समाजोन्नती' मामला ठिकच्या ठिकाणीं खुंटीवर अडकविला जातो. या नंतर सबंध वर्षभर किंवा परिषदेच्या पुनरागमनायच काळापर्यंत मद्यपाननिषेधावर वक्तेबाजी गाजविणारे गटारांत लोळले, हुंडानिषेधाच्या व्याख्यात्यांनीं रगड हुंडे हबकले, धर्माचरणांवरच्या पुराणिकांनीं वेश्यागमनासारखें पातक केलें, बालविवाहनिषेध कर्त्यांनीं आपल्या अजाण कोंवळ्या पोरी घाईघाईनें कशाबशा उजवल्या आणि औद्योगिक किंवा शैक्षणिक फंडप्रवर्तक आढ्याला तंगड्या लावून स्वस्थ बसले, तर त्यांचे कान पिळायला मात्र एकहि कमिटी किंवा 'प्रतिष्ठित पुढारी' जिवंत असल्याची बातमी लागत नाहीं. निरनिराळ्या ठरावांवर डरांव डरांव करणारे बेडुकमामा परिषदेचा पावसाळा संपतांच जर अदृश्य होतात, तर पुढच्या आठमाही रखरखीत हिंवाळ्यांत व धगधगीत उन्हाळ्यांत त्या ठरावांची टरफलें पडून त्यांचें सरपण बनल्यास, या शोचनीय स्थितीबद्दल कोणी किती रडावें एवढाच प्रश्न पेस्तरशिल्लक उरतो. ज्या 'समाजोन्नति' परिषदांचे ठराव खुद्द त्या त्या समाजांतील व्यक्तीमात्र

पाळूं इच्छित नाहीं किंवा ते पाळण्यास लावण्याइतकी सत्ताक्षमता ज्या परिषदांच्या हातीं येऊं शकत नाहीं, असल्या परिषदांचीं नाटकें भरवून लाखों रुपयांचें शेण करण्याची खोड कधीं सुटेल ती सुटो ! समाजसुधारणा हा प्रश्न कितीहि हृदयंगम व (सामुदायिक नसला तरी) व्यक्तिश: प्रबोधनदर्शक असला, तरी सध्यां रूढ झालेला परिषदांचा मार्ग सामाजिक उत्क्रान्तीच्या बाबतींत सर्वस्वीं नालायक ठरला आहे, इकडे परिषत्प्रिय हिन्दुजनांचें लक्ष वेधणें आमचें कर्तव्य आहे. परिषदांचा फोलणा पूर्ण पटलेल्या अर्धकच्चा विश्वासु मंडळींचा यावर असा सवाल येतो कीं समाज सुधारणेच्या कामीं परिषदा जरी अपयशी ठरल्या आहेत तरी त्यांच्या अधिवेशनांमुळें विचारविनिमय होऊन सामान्य जागृतीचें कार्य बरेच होतें. ही समजुत चुकीची आहे. तुकाराम नाटकामुळें हिन्दुसमाजांत भक्तीरहस्याचा जेवढा ओघ पाघळतो, राणा भीमदेवमुळें जेवढी वीरश्री थरारते आणि एकच प्याल्यामुळें जेवढे दारूचे पिठे दारुड्यांच्या दुष्काळानें बंद पडतात, तेवढाच आणि तसलाच जागृतीचा परिणाम परिषदांच्या नाटकांपासून होतो. परिषदांचीं खेंकटीं रंगवून नाचविणारे 'सुशिक्षित'च असतात. त्यांना आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन इतर ठिकाणीं करणें शक्य नसलें तरी तें आपल्या अल्पज्ञ बांधवांपुढें मांडण्यासाठीं स्वजातीच्या 'समाजोन्नति' परिषदेची रंगभूमि सताड मोकळी सांपडते. नाटकांतली तुकारामाची भूमिका वठविणाराला जसें दारू ढोंसणें बेशरमपणाचें वाटत नाहीं, तसें या 'समाजोन्नती'ची वक्तेबाजी करणाऱ्या शहाण्यांना ज्या ठरावांवर ते बोलतात किंवा मत देतात त्याविरुद्ध बेधडक वर्तन करतांना जनाची नाहीं पण मनाचीसुद्धां लाज वाटत नाहीं. नाटकांतले नाटक्ये तर बोलून चालून आचारी पाणक्यांच्या परंपरेंतले; पण हे सुशिक्षित समाजनेते उत्क्रान्तिप्रद इंग्रजी वाघिणीच्या परंपरेंतले असूनहि त्यांची सदसद्विवेकबुद्धि अशी मेलेली कशी? चांगले शिकलेसवरलेले पंडीतच जेव्हा आपल्या वाणीच्या व करणीच्या व्यभिचाराकडे समजून उमजून पाठ फिरवितात, तेव्हां इतर अल्पशिक्षित अनुयायांनी रूढ परंपरेप्रमाणें जुनाट रूढींच्या चक्रांत अंधश्रद्धेनें गिरक्या मारण्याचा सपाटा चालवला, तर त्यांच्याकडे काय दोष? सारांश, बुद्धिविकास करून विवेकवादाची महती पटविणाऱ्या शिक्षणाशिवाय केवळ यांत्रिक पद्धतीने पदवीभार वहाणाऱ्या सुशिक्षितांकडून समाजोन्नतीच्या कार्यांत सामुदायिक सहकारी प्रयत्न होणें शक्यच दिसत नाही. उलट पक्षीं त्यांच्याकडून सामुदायिक विरोधच आजपर्यंत होत आला आहे. उदाहरणार्थ, दोनच गोष्टी घ्या. मद्यपान आणि हुंडा. हे दोन प्रश्न इतके क्षुल्लक परंतु नीच आहेत कीं आमच्या सुशिक्षितांची विवेकबुद्धि जर खरोखरच जिवंत असती तर या समाजविध्वंसक दोषांचा कधींच नायनाट झाला असता. एकाद्यज्ञा जातीच्या 'समाजोन्नति' परिषदेनें मद्यपाननिषेधाचा ठराव जाहीर रीतीनें चर्चेला घेणें हें जितकें निर्लज्जपणाचें आहे, तितकेंच पुत्रविक्रय किंवा कन्याविक्रय करणाऱ्या हुंडानिषेधाचें काम अत्यंत लाजीरवाणें आहे; आणि या दोन नीच गोष्टींचें आपल्या समाजांतून निश्चयानें उच्चाटन करण्याचें नैतिक सामर्थ्य जर सुशिक्षितांत नसेल तर 'धि:क् धि:क् तयांचें जिणें' असे उद्गार कां कोणी काढूं नये? इतक्या क्षुल्लक सुधारणा स्वत:च्या टीचभर जातींत सामुदायिक संघशक्तीनें ज्यांना घडवून आणतां येत नाहींत, किंवा स्वत:च्या विवाहप्रसंगीं हुंडा हबकण्यास लालचटलेल्या पूर्वजपरंपरेच्या रानटी प्रवृत्तीची मुंडी निश्चयानें मुरगाळण्याचें नैतिक बल ज्यांच्या आंगीं नाहीं, असलीं सुशिक्षित मंडळी राजकारण क्षेत्रांतल्या सरकारच्या बनियेगिरीवर निषेधाचे वाग्बाण सोडण्यास प्रवृत्त झालेली पाहून, त्यांच्या बुद्धिमांद्याबद्दल रडूं आलें नाहीं तरी हसूं मात्र आल्याशिवाय रहात नाहीं.

एन ४००६--१२

सामाजीक उत्क्रान्तीचा इतिहास पाहिला तर त्याची कमावणी निरक्षर किंवा साक्षरांच्या सामुदायिक चळवळीनें झालेली नसून, स्वतंत्र बुद्धिमत्तेच्या असहाय व्यक्तीच्या आत्मत्यागावरच झालेली आहे. या आत्मत्यागी सत्यशोधकांनीं उत्क्रान्तीचें एक विशिष्ट सत्यतत्व विवेशक्तीनें मंथन करून सिद्ध करावें, त्याचा संदेश जनतेला धिटाईनें सांगावा, जनतेनें क्रूर उपहासानें त्याची हुर्रेवडी करावी, सत्ताधाऱ्यांनीं त्यांच्या हुल्लडीचा पुरस्कार करून त्या सत्यशोधकांचे हालहाल करावे किंवा प्राणहानी करावी; आणि त्यांच्या फणफणणाऱ्या रक्ताचा सडा अखेर पृथ्वीवर पडला कीं मग हुल्लडखोर उपहासकांनीं त्या दुर्दैवी सत्यशोधकांचे उपासक बनावे, हा कार्यक्रम अझूनपर्यंत सनातन आहे तसाच चालूं आहे. सत्यशोधकांची प्राणहानी न होतां त्यांच्या सत्यतत्वाचा प्रसार त्यांनीं 'याच देहीं याच डोळां' पाहिल्याचीहि उदाहरणें नाहींत असें नाहीं. परंतु प्राणहानीपेक्षांहि भयंकर अशा विविध छळांच्या यातना मात्र एकाहि सत्यशोधक सुधारकाला टाळतां आल्या नाहींत, हें विसरतां कामां नये. या महात्म्यांनीं साक्षरांच्या संघटीत प्रतिकाराच्या मुसंडीची दिक्कत बाळगिली नाहीं, निरक्षरांच्या हुल्लडीची पर्वा ठेविली नाहीं किंवा सत्ताधाऱ्यांच्या शस्त्रास्त्र सामुग्रीची क्षिति मानली नाहीं. आपलें तत्व सत्यपूर्ण आहे, त्याची समाजधारणेला आज अत्यंत जरूरी आहे; परंतु आपण असहाय, कोणाचीहि सहानुभूति नाहीं, विद्वानांचा दांडगा विरोध, सत्ताधाऱ्यांची करडी नजर; इतकी जाणीव असूनसुद्धां सामाजीक, धार्मिक व राजकीय क्षेत्रांत उत्क्रान्तिवाद थरारविणाऱ्या प्रसिद्ध सुधारकांचा मनोरंजक इतिहास पुढील लेखांकांत देण्याचें ठरवून हा लांबलेला लेखांक येथे समाप्त करूं.

□□□

अग्रलेख

समाज-सुधारकांचें दिव्य
(लेखांक २)

मागील लेखांत (१) उत्क्रांतीचा इतिहास उत्क्रांतिवाद्याच्या रक्तानें लिहिला जातो व (२) उत्क्रांति सामुदायिक संघशक्तीनें जन्माला येत नसून वैयक्तिक आत्मत्यागांतच तिची उत्पत्ति होते, असे दोन मुद्दे विवेचनार्थ घेतले होते. उत्क्रांतीचें साध्य साधण्यासाठीं किती खडतर आत्मत्यागाची तपश्चर्या उत्क्रांतिवाद्याला करावी लागते, सामुदायिक तोंडपुज्या अनुयायित्वापुढें तो कसा तोंडघशी पडतो आणि अखेर सत्ताधाऱ्यांच्या प्रतिकारी शक्तीला तो बिनचुक बळी कसा पडतो, याचा हृदयभेदी व मनस्संतापकारक इतिहास आज आपल्या उघड्या डोळ्यांसमोर घडत आहे. तेव्हां प्रस्तुत लेखमालेंतले विचार वाचकांच्या विचारसरणींत पचनीं पडायला कठीण जाणार नाहींत अशी आशा आहे. प्राचीन काळचीं सत्यशोधकांचीं ऊर्फ उत्क्रांतिवाद्यांचीं उदाहरणें शोधण्याचा खटाटोप न करतां, आपण फक्त गेल्या दीड दोन शतकांचाच इतिहास विचारांत घेऊं आणि त्यावरून पाहूं कीं आजपर्यंत कोणती सुधारणा जनतेच्या सामुदायिक संघशक्तीनें जन्मली व थरारली आहे. जनतेचा पाठिंबा असल्याशिवाय, निदान बहुमत असल्याशिवाय, कोणत्याहि सुधारणेचा कायदा सरकारनें पसार करणें अन्यायाचें आहे, असें वारंवार प्रतिपादन करून आपल्या देशभक्तीचें नाटक नटविणाऱ्यांचा असें करण्यांत काय हेतु असतो, याची एकदा स्पष्ट कल्पना विचारवंतांना होणें अवश्य आहे.

प्रत्येक गोष्टीला बरी आणि वाईट अशा दोन बाजू असतात. कोणतीहि स्थिति सर्वस्वीं चांगली किंवा आमूलाग्र वाईट ह्मणणें धाडसाचें आहे. इंग्रेजांची हिन्दुस्थानावरची बादशाही सर्वस्वीं चांगली ह्मणून वाखाणणें हा जसा लाळघोट्यांचा बेहद्द बेअक्कलपणा होईल, तसा तिला आमूलाग्र सैतानी ठरविणाऱ्या वावदुक देशभक्तांचा गाळीव राष्ट्रीयपणाहि होईल. इंग्रजांचें राज्य हा कांहीं अयाचित चमत्कार, आकस्मिक अपघात किंवा शर्यतींतल्या भरंवशाच्या घोड्याला झालेला टोणगा नव्हे. हा आमच्या दोषांचा नायटा आहे, कुकर्माचें फळ आहे आणि सनातन कर्मन्यायानें प्राप्त होणारें आमच्या राष्ट्रीय दुष्कर्मींचें गुलामगिरीच्या अध:पातांत मिळालेलें बिनतोड प्रायश्चित्त आहे. या प्रायश्चित्ताच्या वेदनांतच आमच्या बंधविमोचनाचा मंत्र आहे. इंग्रजी सत्तेमुळें आमच्यांत परावलंबनाचा दोष हाडीमासीं भिनला गेला, ही गोष्ट जितकी खरी आहे, तितकीच पाश्चात्य विद्येमुळें स्वतंत्र विवेकवादाची

एन ४००६--१२अ

आमच्यांत जागृति झाली, हीहि गोष्ट कांहीं खोटी नाहीं. आज आपल्या देशांत जो कांही थोडा बहुत स्वतंत्र बाण्याचा विवेक वाद दृष्टीस पडतो त्याचें श्रेय पाश्चात्य संस्कृतीला देणेंच न्याय व इष्ट आहे; मग 'ह्मातारा नवरा कुंकवाला आधार' या न्यायानें उपनिषदांचें हंगामी कुंकूं लावून आपल्या पुराणमतवादाचें वैधव्य छपविण्याचा जीर्ण मताभिमानी कितीहि प्रयत्न करोत! एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच इंग्रजी विद्या वाघिणीचें दूध पिऊन विचारस्वातंत्र्याच्या डुरकण्या फोडणारा हिंदी वाघ ह्मटला ह्मणजे राजा राममोहन राय हा होय. हिंदुसमाजाला शारिरीक व मानसीक दास्यांत जखडून टाकणाऱ्या मुर्दाड भिक्षुकशाहीच्या नरड्यावर प्रतिकाराचा पहिला लत्ता प्रहार हाणणारा विवेकवाद्यांचा मुकुटमणी हाच. याचें नांव सतीच्या रानटी चालीच्या विध्वंसनाच्या इतिहासाशीं निगडीत असल्याचें सर्वांस माहितच आहे. सतीच्या चालीचा इतिहास ह्मणजे भिक्षुकशाही जुलुमाचा कडेलोट होय. सामुदायिक सुधारणावादाची वेळीं अवेळीं टिमकी वाजविणाऱ्या भिक्षुकशाही राष्ट्रीयांना आणि त्यांच्या ओजळीनें पाणी पिणाऱ्या बांडगुळांना आमचा असा सवाल आहे कीं, राजा राममोहन रायनें आपल्या सर्वस्वावर रखरखीत निखारे ठेवून, सामाजीक व धार्मिक गुंडांच्या अत्याचारांस निधड्या छातीनें तोंड देऊन, हिंदु समाजांतील गतधवा आया बहिणी मुली सुनांना जिवंत जाळण्याच्या वेदोक्त पद्धतीविरुद्ध सरकारी कायदे कौंसिलाच्या कायद्याचा फटकारा भिक्षुकशाहीच्या छाताडावर उमटविण्यापूर्वी सतीच्या चालीविरुद्ध हिंदु समाजाकडून कोणकोणते सामुदायिक संघटनेचे प्रयत्न झाले ते त्यांनीं सप्रमाण दाखवून द्यावें. हिन्दु धर्माचें तोंड काळें करणाऱ्या सतीच्या प्रघातापासून तो परवां प्रो. लठ्ठी यांनीं बुटाच्या टांचेनें कौन्सिलांत फोडलेल्या जोशांच्या वतनदारी नासक्या सुपारीपर्यंत सामाजिक उत्क्रांतीची एकहि गोष्ट हिन्दु समाजाच्या हातून सामुदायिक संघशक्तीनें घडून आलेली नाहीं, ही एकच इतिहाससिद्ध गोष्ट हिन्दूंच्या भिक्षुकशाही गुलामगिरीचें द्योतक आहे. राजा राममोहनराय सारख्या निधड्या छातीच्या सत्याग्रही सत्यशोधकानें आपल्या सर्वस्वाचा होम करून, गतभर्तृका हिन्दु भगिनींचा नवऱ्याच्या सरणावर प्रत्यक्ष होणारा होम, सरकारी कायद्याची मदत घेऊन जर विझविला नसता, तर चालू घटकेला सुद्धां आपल्या आया-बहिणी, कसाईखान्यांतल्या गाई ह्मशीप्रमाणें, जिवंत जाळतांना हिन्दु जनांच्या कठोर हृदयाला भूतदयेचा लवमात्रहि कंप सुटला नसता; इतकी त्यांची मनोवृत्ति निगरगट्ट बनविण्याचें पुण्य भिक्षुकशाहीनें संपादन केलेलें आहे. विधवाकेशवपनाचा नाशिकचा भिक्षुकशाही कसाईखाना जिवंत राहणें हीच या गोष्टीची साक्ष होय.

राजा राममोहन रायनें ब्रिटिश रियासतीच्या आगमनाचा फायदा घेऊन इंग्रजी विद्येंत अन्तरभूत असलेल्या विवेकवादाच्या जोरावर हिन्दु जनांची सामाजीक राजकीय व विशेषत: धार्मिक उन्नति करण्याची जितकी भरीव राष्ट्रीय कामगिरी निवळ स्वावलंबनाच्या जोरावर बजाविलेली आहे, तितकीहि त्या कार्याकरितां सध्यां अस्तित्वांत असलेल्या निरनिराळ्या संघांच्या हातून सामुदायिक शक्तीनें सुद्धां आजला बजाविली जात नाहीं. राजा राममोहनला सतीच्या रानटी प्रघाताविरुद्ध बंड करण्याची स्फूर्ति त्यांच्या चुलत्याच्या मृत्यूनें झाली. चुलतीवर त्यांचें अत्यंत प्रेम. परंतु तत्कालिन भिक्षुकशाही धर्मान्वयें त्याच चुलतीला चुलत्याच्या सरणावर जिवंत जाळल्याशिवाय मयत चुलता स्वर्गास जाणे शक्य नसल्यामुळें, त्या बाईच्याहि बलिदानाची तयारी झाली व अखेर तो बलीदानाचा रानटी विधि पाहून या तरुण सत्यशोधकानें कोणाहि छोट्यमोठ्याची भाडभीड न धरितां सतीच्या प्रघाताला कायमची मुठमाती

देण्यासाठीं आपल्या स्वाध्याययंत्राला तीव्र वेग दिला आणि त्याच्या जोरावर ओजस्वी वाग्लेखनास्त्राचा जीर्ण मताभिमान्यांवर भयंकर हल्ला चढविला. शेवटीं सतत अठरा वर्षें झगडून ४ दिसेंबर १८२९ रोजी लॉर्ड वुइलियम बेंटिंगच्या हस्तें सतिप्रतिबंधाचा कायदा करविला व हिंदु धर्माची अब्रु रक्षण केली. राजा राममोहनराय यांचे नवमतवादी विचारपरिप्लुत ग्रंथ आज सर्व जगाला त्यांच्या अचाट कर्तृत्वाची साक्ष पटवीत आहेत, ही गोष्टी खरी; परंतु त्या कर्तृत्वाला उठाव देणारा मागील पडदा त्या महात्म्याच्या रक्तानें लाल भडक रंगून निघालेला आहे, ही गोष्ट एकाएकीं आपल्या लक्षांत येत नाहीं. नवमतविद्वेषी (कॉन्झरवेटिव) हिन्दु समाजांत सुधारणेचा मार्ग कसकसल्या प्राणघातक संकटकंटकांनीं गजबजलेला असतो, याचें प्रत्यंतर पाहूं इच्छिणारांनीं राममोहनच्या चिरंजीव कर्तबगारीचा स्वाध्याय करण्यापूर्वी, त्या लालभडक पडद्याच्या परिमाणूंचे पृथक्करण करणेंच श्रेयस्कर होईल. त्याचें सामुदायिक प्रबोधनाचें कार्य अपयशी कसें ठरलें, त्याच्या सद्धेतूंचा जाणून बुजून विपर्यास करण्याच्या कामीं भिक्षुकशाहीनें आपले जंग कसे पछाडले, बाह्यात्कारी विद्वत्तेचा तोरा मिरविणाऱ्या, परंतु अन्तर्यामीं भिक्षुकशाही मतानें सडून कुजून गेलेल्या, पंडितांनीं त्याचा अनिर्वाच्य छळ कसकसा केला, आणि अखेर निंदास्तुतीची पर्वा न ठेवतां, लोकमान्यतेच्या मोहाला बळी न पडतां, किंवा तात्पुरत्या आर्थिक लाभाची क्षिति न बाळगितां, केवळ सत्यासाठीं सत्याग्रहाच्या तडफेनें, शुद्ध आत्मत्यागावर, आपल्या निश्चित नवमताची प्राणप्रतिष्ठा या सत्यशोधक वीरानें कशी केली, याचें शिक्षण विचारवंतांनीं त्या लालभडक पडद्यापासून घेतलें पाहिजे.

सतीचा कायदा, विधवा पुनर्विवाहाचा कायदा, संमतिवयाचा कायदा किंवा बसू-पटेल-गौर यांच्या अपयशी मिश्रविवाहाच्या कायद्यापर्यंत हिन्दुसमाजसुधारणेच्या प्रयत्नांचा कोणताहि इतिहास पहा, त्यांत सामुदायिक संघशक्तीनें अथवा विद्वान मानल्या गेलेल्या पंडितवर्गानें त्या कामीं लवमात्र सहानुभूति दर्शविण्याचें पुण्य केव्हांहि संपादन केलें नाहीं असें आढळून येईल. तथापि, एकट्या दुकट्या निश्चयी सुधारकानें स्वावलंबनाच्या जोरावर एखादी सुधारणा रंगारूपास आणली कीं, तिचें गोडवे गायला (अथवा स्पष्ट शब्दांत ह्मणायचें ह्मणजे, आपल्या मूर्खपणाच्या काळ्यावर सफेदी चढवायला) मात्र मग वाटेल तितके टाळकरी अनुयायी त्याच्या भोंवतीं जमा होतात. याला उदाहरण घ्यायचें तर प्रो. कर्वे व चिरंजीव आद्यहिन्दुमिशनरी गजाननराव वैद्य, या दोन सत्य शोधकांचीच कामगिरी घ्या. विधवापुनर्विवाह, अनाथबालिकांचें शिक्षण आणि स्त्रीवर्गाचें उच्च शिक्षण या तीन नवमतवादी विषयांवर सामुदायिक मत जागृत करण्याचा खटाटोप प्रो. कर्वे जर करीत राहिले असते, तर त्यांच्या हातून आज झाली इतकी कामगिरी खचित झाली नसती. गजाननराव वैद्य हे जर हिन्दु मिशनरी सोसायटीच्या कार्याबद्दल जगद्गुरूंच्या आज्ञापत्रांची किंवा टिळकांच्या अभिप्रायाची पर्वा करीत बसले असते, तर त्यांची लोकसंग्राहक राष्ट्रीय कामगिरीची कल्पना त्यांच्या मृत्यूबरोबरच सती गेली असती. जो हिन्दुमिशनरी विषय आज साऱ्या हिन्दु समाजाच्या मनींमुखीं रात्रंदिवस खळबळ उडवीत आहे आणि ज्याकरितां सक्रीय प्रबोधनाचें कार्य करण्यासाठीं सर्व मतांच्या पक्षांतले अध्वर्यु आज अहमहिकेनें अस्तन्या सरसावून पतितपरावर्तनाच्या क्षेत्रांत पुढें येत आहेत, तोच हिन्दु मिशनरी विषय गजाननराव वैद्यांनी श्री. अनंतराव पिटकर यांच्या मार्फत कै. टिळकांपुढें ठेवतांच, त्यांनीं ''तुम्हीं प्रयोग करून पहा, तो कसा काय यशस्वी होतो हें पाहून मग मी आपलें मत कळवीन'' अशा प्रकारचा संदिग्ध

भ्याड संदेश वैद्यांना पाठवावा, यावरून कोणाला काय बोध घेतां येण्यासारखा असेल तो खुशाल घ्यावा. वास्तविक, अस्पृश्योद्धारावर व्याख्यानांची परवड रचणाऱ्या, चांभाराचा गणपती स्वत:च्या गाडींतून नेल्याची फुशारकी मारणाऱ्या, परंतु अस्पृश्योद्धाराच्या शपथपत्रिकेवर सही करण्यास हात मागें घेणाऱ्या टिळकांच्या बऱ्यावाईट अभिप्रायाची आजपर्यंत एकाहि नमवतवाद्यानें पर्वा बाळगलेली नाहीं. फार दूर कशाला, डॉ. कुर्तकोटींच्या छत्राखालीं पतितपरावर्तनाची जी फंडगुंडी चळवळ डॉ. मुंजे प्रभृतीनीं चालविलेली आहे, त्या चळवळीच्या श्रुतिस्मृत्योक्त पुराणांत हिन्दुमिशनरी सोसायटीच्या कार्याचा किंचितसुद्धां उल्लेख न करण्याची त्यांची हातोटी, वाचकांनीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्याप्रमाणेंच प्रो. लठ्ठे यांचें 'जोशीबिल' कौन्सिलांत पास होतांच त्याचें पुण्य भटजोशांच्या सामुदायिक प्रतिकारनिवृत्तीच्या पदरीं बांधण्याची केसरीकारांची राष्ट्रीय चतुराई याच गोत्राची आहे. हें सांगणें नलगे. मिश्रविवाहाच्या कायद्यावर दुतोंडी तांडव करणाऱ्या केसरीकडून जोशीबिलाच्या विजयावर असली शेणपोतेऱ्याची सारवासारव झाली नसती, तर तेंच आश्चर्य ठरलें असतें. सारांश, नवमतवादाचीं बीजें हिन्दुसमाजांत रुजविण्याच्या कामीं आपल्या आत्मत्यागाचें खत घालून बहुजनसमाजाची मनोभूमिका तयार करण्यासाठीं अनेक विचारवंत तरुणांनीं सत्यशोधनाच्या क्षेत्रांत धिटाईनें पाऊल टाकण्याची ही वेळ आहे. राजकीय स्वातंत्र्याला मार्ग चोखाळण्यासाठीं अनेक सत्यशोधकांची व सत्याग्रही नवम तवाद्यांची हिन्दभूमातेला आवश्यकता आहे. तिची 'सत्याची हाक' रविंद्राच्या तुतारीनें आणि महात्मा गांधींच्या सर्वस्वत्यागानें आसेतुहिमाचल निनादित झाली आहे. तिला तरुण भारताकडून आर्यत्वाला शोभेल असा सक्रीय जबाब मिळाला पाहिजे.

□□□

स्फुट विचार

बेटा देहू, आस्ते कदम

हिन्दु धर्माविरुद्ध मोपल्यांनी केलेल्या अत्याचारांबद्दल 'विशेष विचार' करतांना आमचे प्रियबंधु स्वधर्मकार फाल्गुन व. ४ शके १८४३ च्या अंकांत ह्मणतात, ''मलबारांत हिन्दूंचें प्रमाण मुसलमानांपेक्षां तिप्पटीनें जास्त असतां कांही थोड्या मोपल्यांनी बेधडकपणें हिन्दूंच्या घरांत शिरून त्यांची मालमत्ता वगैरे लुबाडून त्यांना सररहा मुसलमानी धर्माची दीक्षा द्यावी व हिन्दूंनीं निमूटपणें हें सोसावें, इतकी स्वाभिमानशून्यता, इतका नेभळेपणा हिन्दूंच्या आंगीं कोणत्या कारणाने आला, याचा विचार सर्व समाजशास्त्रवेत्त्यांनीं करणें जरूर आहे.'' अरेरे, हा विचार स्वधर्मकारांना सुचविण्याच्या कामगिरीचें पुण्य अखेर मोपल्यांच्या पदरांत पडावें अं? कांहींहि असो, बेटा देहू, आस्ते कदम! या विषयाचा विचार या पूर्वी पुष्कळ विचारवंतांनीं करून ठेविलेला आहे; दुर्दैव एवढेंच कीं धार्मिक बाबतींत नॉन-को-ऑपरेशनचा हंगामी खेळ खेळणाऱ्या धर्मवंतांना समाजशास्त्रवेत्त्यांच्या व नवमतवादी सुधारकांच्या सूचनांकडे लक्ष देण्याची लहर आजपर्यंत लागली नाही. राष्ट्रीय सामाजिक परिषदांतील विद्वान सुधारकांचें हिन्दूंच्या अध:पतनमीमांसेचे गेल्या दोन तपांतले कळकळीचे विचार जर आमच्या धर्मगुंडांनीं सहानुभूतिपूर्वक विचारांत घेतले असते, व आचारांत उमटविण्याचा शक्य तो प्रयत्न केला असता, तर आज डॉ. कुर्तकोटी सारख्या जगाच्या गुरूला हिन्दुंच्या अध:पतनाची गुरुकिल्ली शोधण्यासाठी मलबारांतील मोपल्यांचें शिष्यत्व पत्करण्याची वेळा खास आली नसती. प्रार्थनासमाजीय, आर्यसमाजीय व इतर समाजसुधारकांनीं या बाबतींत वेळोवेळीं या विषयाची मीमांसा करून निश्चित सूचना अनेक वेळां केल्या. परंतु न कर्त्याचा वार शनिवार या धोरणानें भिक्षुकशाहीच्या प्रवर्तकांनी 'आधीं सामाजिक कीं राजकीय' या वादाच्या वंध्यामैथुनांत आपल्या सोन्यासारख्या आयुष्याची माती करून खऱ्या राष्ट्रहिताचीहि राखरांगोळी करण्यास कमी केलें नाहीं. आमच्या स्वधर्मकारांना मूठभर मोपल्यांनीं मलबारभर हिन्दूंची बोलबोलतां रेवडी कां उडविली, यांचें कारण त्यांच्या तोलाच्याच महापंडितांकडून समजून घेण्याची इच्छा असेल, तर त्यांनी डॉ. रवीन्द्रनाथ टागोर यांचे सामाजिक विषयपर ग्रन्थ वेळांत वेळ काढून एकवार अवश्य वाचावे. 'नॅशनॅलिझम्' नामक ग्रन्थांत रवीन्द्रनाथ ह्मणतात, ''या जहाल लोकांच्या ध्येयांत पाश्चात्य इतिहासाचा मसाला पडलेला आहे. हिन्दुस्थानाच्या

विशेष निकडीच्या गोष्टींबद्दल त्यांना मुळींच सहानुभूति नाहीं. आमच्या सामाजिक घटनेंत कांही असे विशिष्ट दोष आहेत कीं त्यामुळें आम्ही हिन्दुजन परक्यांशी तोंड देण्याच्या बाबतींत कमकुवत बनलेलों आहोंत, ही ढोबळ व सिद्ध गोष्टसुद्धां त्यांच्या गळीं उतरत नाहीं... आमचे सामाजिक निर्बन्ध सध्यांसुद्धां जुलमी आहेत, इतकें कीं, त्यांच्यामुळें माणसें भ्याड व नामर्द बनत आहे... हिन्दुस्थानापुढचा मुख्य व खरा प्रश्न ह्मटला ह्मणजे राजकीय नसून सामाजीक आहे. शुद्ध राजकीय चळवळीवर माझा मुळींच विश्वास नाहीं... प्रचलित सामाजिक आचार व विचारांनीं आमच्यांत परावलंबन व आत्मश्रद्धेचा पूर्ण अभाव उत्पन्न केला आहे; याला मुख्य कारणें ह्मटलीं म्हणजे हिन्दुस्थानांतल्या जातिभेदाच्या दडपशाहीचा धिंगाणा आणि सध्यांच्या मन्वंतरांत कालविपर्यासी व भरंवसाट ठरलेल्या दंतकथामूलक ग्रंथांच्या प्रामाण्यावर डोळे झांकून विश्वास ठेवण्याची ऐदी संवय हीं होत. अर्थात् ही कारणें आमूलाग्र उखडून टांकण्याचा आज आम्हीं भारतवासियांनीं विचार केला पाहिजे.'' स्वधर्मकारांना पडलेली अडचण वरील उद्गारांनी दूर होईल अशी आम्हांला आशा आहे.

फंडगुंडांचे बंड

ही शब्दरचना संदेशकारांनीं जरी नवीन प्रसविलेली आहे, तरी खुद्द फंडगुंडांचा इतिहास १८९६ सालाइतका जुना आहे. फक्त पूर्वी हें बंड पोटांतल्या पोटांत जिरत असे, व आतां संदेशकासारखा कोणी खप्पी भेटल्यामुळें गुंडांचें नरडें दाबतांच तें वेळोवेळी ओठांतून बाहेर पडतें, इतकेंचि ! अलीकडे हे फंडांचें बंड इतकें बेसुमार बोकाळलें आहे की ज्याच्याकरितां फंड नको असा एकहि विषय उरलेला नाही. १८९६ सालच्या शिवाजीस्मारक फंडापासून तो सध्यां चालू असलेल्या टिळक स्वराज्य फंडापर्यंत शेंकडों फंड या राष्ट्रीय गुंडांनीं आजपर्यंत जमा करून त्यांची वाटेल तशी विल्हेवाट लावलेली आहे. हे विचार सुचण्याचें कारण श्री. डागे या नांवाच्या गृहस्थानीं ज्ञानप्रकाशमधून टिळक स्वराज्य फंडाच्या घोटाळ्याचा केलेला परिस्फोट हे होय. आम्हांला फार आशा होती कीं निदान म. गांधींनी काढलेल्या या फंडांत फंडगुंडपणा शिरणार नाहीं ! परंतु आतां प्रसिद्ध होत असलेल्या भानगडीमुळें राष्ट्रीय नांवाखालीं कसकसले ढोंगधत्तरे पडद्याआड चाललेले असतात, याची जर जनतेनें वेळींच जाणीव बाळगली नाहीं, तर त्याला अंधश्रद्धेचा कडेलोट यापेक्षां दुसरें काय नांव द्यावें? प्रो. शिवरामपंत परांजपे यांनीं बऱ्याच वर्षांपूर्वी आपल्या काळपत्रामार्फत जमविलेला शेंकडों रुपयांचा 'धर्मांतर निवारण फंड' गडप केल्याचा स्फोट डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी नुकताच केला आहे. पैसाफंड, टिळक ज्युबिलीफंड, टिळक पर्सफंड वगैरे अनेक फंडांच्या बंडांचीं खेंकटीं जनतेपुढें आहेतच. त्यांत डॉ. मुंजेप्रभृतींच्या पतितपरावर्तनाच्या पन्नासहजारीं फंडाचा आणखी एक धोंडा श्रद्धाळु जनतेच्या उरावर लादला जात आहे. जवळ फुटकी कवडीसुद्धां नसतांना कै. गजाननराव वैद्यांनीं हिन्दुमिशनरी सोसायटीमार्फत पतितपरावर्तनाची एवढी अवाढव्य कामगिरी केली कीं, तिचे दणके इंग्लंड अमेरिकेच्या मिशनरी संस्थांच्या छाताडावर आज प्रत्यहीं प्रत्यक्ष वसत आहेत; आणि आमच्या डॉ. कुर्तकोटींना

मात्र ठणठणीत पन्नास हजाराचा तोडा हातांत आल्याशिवाय देवलोक्त पतितपरावर्तनाचें कार्य करतांच येऊं नये; हें मोठें आश्चर्य नव्हे काय? हीनदीन झालेल्या रयतेनें वावदुकांच्या वक्तृत्वशैलीला बळी पडून घासांतला घास काढून या गुंडांच्या थैल्या भराव्या आणि त्या थैल्यांत अखेर स्वार्थसाधू किड्यांचा बुजबुजाट उत्पन्न व्हावा, ही शोचनीय स्थिति कधीं पालटेल ती पालटो. आम्हाला अशी बातमी समजली आहे की, मुंबईचे एक दे. म. दंतवैद्य इंन्द्रधनुष्य नांवाच्या एका राष्ट्रीय दैनिकासाठी फंडाचें जाळें पसरून सावजें पकडण्याच्या खटपटींत आहेत. पैशाच्या वारेमाफ उधळपट्टीला आळा घालूं इच्छिणाऱ्या विचारवंतांनीं सावध असावें.

ज्ञानकोशकारांचा उपद्व्याप

मिश्र विवाहाचे सक्रीय पुरस्कर्ते आणि भारतीय ज्ञातिविषयक ज्ञानाच्या विद्वत्तेवर 'डॉक्टर' बनलेल्या श्रीयुत केतकरांनीं चालविलेला ज्ञानकोश प्रकाशनाचा खटाटोप सर्वश्रुतच आहे. ज्ञानकोशांत कोण कोणते विषय यावेत, व कोणते येऊं नयेत, या वादाशीं आह्मांला कांहीं कर्तव्य नाहीं; तथापि भिकारड्या पुराणांच्या आधारांवर उभारलेले अनंत जातिभेद आमूलाग्र उलथून पाडण्याची हिन्दुजनांत अल्पप्रमाणांतच कां होईना - चळवळ चालली असतांना निरनिराळ्या जातींचा उच्चनीचतेचा मामला निश्चित करण्याचा हायकोर्टी अधिकार ज्ञानकोशकार आपल्याकडे घेऊं पहात आहेत, असें दिसतें. गोवर्धन ब्राह्मणासंबंधानें अशाच प्रकारचा वाद अलीकडे सुरू झाल्याचें तज्जातीय संजीवन नामक नवीन मासिक पुस्तकावरून सिद्ध होतें. अमुक जाति श्रेष्ठ कां, ती ब्राह्मण कशावरून, त्यांचें बीज शुद्ध कशावरून, अशा प्रकारचे प्रश्न विचारून निर्णय ठरविण्याचा अधिकार युरपीयन बाईचें पाणीग्रहण करणाऱ्या पंडितानें आपण होऊन घेणें ही बेशरमपणाची कमाल होय. या बाबतींतले स्पष्ट विचार आह्मीं पुढील अंकीं व्यक्त करूं. परंतु पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळानें आपल्या जन्मजात मुर्दांड स्वभावानुरूप कायस्थ प्रभूंना साम्राज्य द्रोही, मराठी स्वराज्याला आग लावणारे, व अकरमाशा भेसळी उत्पत्तांचे ठरविण्याचा राजवाड्यांचे हस्तें जो स्वराज्यद्रोही उपक्रम करून महाराष्ट्रांत जातिभेदाचा प्लेग माजविण्याचें पुण्य मिळविलें, त्या चळवळीची डॉ. केतकर यांनीं आठवण ठेवावी आणि महाराष्ट्रांतील असंख्य जातींच्या उच्चनीचतेचा निर्णय ठरविण्याचा आगांतुकी व्यापार बंद ठेवावा, अशी आमची त्यांना प्रेमाची सूचना आहे. संजीवन मासिकाच्या संपादकांनाहि आमची अशी सूचना आहे कीं, त्यांनी एकदां नानासाहेब पावगीकृत भारतीय साम्राज्याचा भाग ८ उत्तरार्ध अवश्य वाचावा, ह्मणजे डॉ. केतकरांच्या पूर्वी या पावगी महाशयांनीं गोवर्धन ब्राह्मणांना कोठच्या दर्जावर नेऊन बसविलेले आहे, हें समजून येईल.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

राधेयकर्णचरित्र

ले. श्री. विनायक सदाशीव वाकसकर. महाभारतांतील नायकनायिकांची चरित्रें चिकित्सक दृष्टीनें विवेचन करून निरनिराळ्या स्वतंत्र ग्रंथांच्या द्वारें लिहिण्याचा कोणी प्रयत्न केला, तर तो वाङ्मयवृद्धीच्या दृष्टीने कौतुकास्पद होईल, यांत संशय नाही. प्रस्तुत पुस्तक याच दिशेचा एक प्रयत्न आहे. भीष्म, युधिष्ठीर, श्रीकृष्ण किंवा अर्जुन यांपैकी एखादा ठरीव परंतु कृत्रिम भडक रंगांत रंगविलेला नायक प्रस्तुत लेखकानें न घेतां, तेजस्वी परंतु मानी, शूर परंतु गर्विष्ठ, दाता परंतु प्रसंगी अत्यंत अनुदार अशा परस्परविरोधी गुणांमुळें खराखुरा मनुष्य वाटणाऱ्या कर्णाला आपल्या कथानकासाठी नायक निवडण्यांत श्री. वाकसकरांचें योजनाचातुर्यं वाखाणण्यासारखें आहे. याच्याच जोडीनें सहजसुलभ व स्वतंत्र विचारपद्धतीच्या भाषाशैलीची जोड जर मिळाली असती तर या पुस्तकाच्या उत्कृष्टपणाच्या दुधांत क्लिष्टपणाचा मिठाचा खडा पडला नसता. कर्णचरित्र महाभारतांत जसें आहे तसेंच येथें वर्णिलें आहे असें लेखक प्रस्तावनेंत सांगतात. पण 'जसें आहे तसें' घेण्याची बळजबरी या इतिहासचिकित्सक लेखकांवर कोणी केली न कळे. श्री. वाकसकर यांच्या इतर लेखांत दृष्टोत्पत्तीस येणारा स्वतंत्र बाण्याचा विचारवाद त्यांनीं उपयोगांत आणला असता, तर महाभारतांत घुसडलेल्या बऱ्याच बांडगुळ्या मजकुराचा विसंतपणा त्यांना खात्रीनें टाळतां आला असता. प्रस्तावनेंत कर्णाला कर्मवादाचा पुरस्कर्ता व दैववादाचा तिरस्कर्ता बनवून पुस्तकांत जेथें तेथें त्याला ''दैव बलवत्तर आहे, प्राक्तन श्रेष्ठ आहे; भवितव्यता समर्थ आहे'' अशा अर्थाची रडगाणीं जाड्या टाइपांत गावयास लाविलें आहे. प्रयत्नवादाची तरफदारी मुळींच नाहीं असें नाहीं, पण प्रमाणांत अगदींच थोडी. मोरोपंतांच्या आर्याभारताचा विशेष उपयोग केला आहे असेंही लेखक प्रस्तावनेंत सांगतात. पण पंतांच्या वर्णनचातुर्यापेक्षां त्यांचा मुख्य अवगुण म्हणजे क्लिष्ट व संस्कृत शब्दांचा उपयोग हा मात्र प्रस्तुत पुस्तकांत विशेष दृग्गोचर होतो. 'किन्निमित्त' 'तत्तुल्य' 'परचाप श्रुति कुशलता' 'आनृण्य' 'सूच्यर्ग (ग्र?), 'त्रतरक्षणपटु' 'विजयश्रीपति' 'चापगुणझणत्कार' 'न्यस्तायुध' 'स्ववधोद्युत' वगैरे शब्दप्रयोग आमच्या म्हणण्याची साक्ष पटवितील. विशेषणांच्या मालिका, उपमा, उत्प्रेक्षा व अतिशयोक्ति यांच्या रेलचेळीमुळें व असहज कल्पना यांच्या

योगानें एकादें संस्कृत पुस्तकच आपण वाचीत असल्याचा भास होतो न होतो तोंच चटकन् एखादे ठिकाणीं विसाव्या शतकांतील इतिहासभिज्ञ व विवेचक दृष्टीची चमक अनुभवाला येऊन मी इंद्रप्रस्थांत आहे कीं मुंबईत आहे असा वाचकाला भ्रम पडतो. कित्येक ठिकाणीं व्याकरणाचे बेसुमार हाल झाले आहेत. पाठीमागें लागलेल्या विशेषणांच्या सैन्याला भिवून पुष्कळशा वाक्यांत कर्ताच नापत्ता झाला आहे. असो, एक नवीन दिशा या दृष्टीनें पाहतांना पुस्तक एकंदरींत बरें झालें आहे असेंच म्हटलें पाहिजे. आमची श्री. वाकसकरांना अशी विनंति आहे की त्यांनी आर्याभारत व महाभारत फळीवर ठेऊन नंतर स्वयंस्फूर्तीने व स्वतंत्र विचारानें जर इतर भारतीय चरित्रे रंगविली तर ती खास उत्कृष्ट व उपयोगी होतील !

पुस्तकाची किंमत एक रुपया असून तें क्षीरसागर आणि मंडळी; हेन्सरोड भायखळा; मुंबई नंबर ११ येथें विकत मिळतें.

□□□

अग्रलेख

समाज सुधारकांचे दिव्य
(लेखांक ३ रा)

सुधारणा म्हटली की तेथें कांही तरी नवीन कल्पना, नवीन आचार, नवीन विचार व नवीन वाद येतोच येतो. याच स्थित्यंतराला आम्हीं नवमतवाद असें म्हणतों. नवमतवादाचा जन्म म्हणजे जीर्णमतवादाचा मृत्यू. एकाचा उदय तोच दुसऱ्याचा अस्त. अशी ही जगत्घटनेच्या दुव्याची सांखळी एकाद्या यंत्राप्रमाणें अखंड चालत आलेली आहे. नवमतवादानें आपले डोळे उघडल्यावर जीर्णमतवादानें जान जान पछाडून आपले डोळे न मिटण्याचा कितीहि हिय्या केला तरी तो व्यर्थ होता आणि एखाद्या आशाळभूत थेरड्याप्रमाणें त्याचा प्राण जातां जाईनासा झाला, तर अखेर बिचाऱ्याला डोळे उघडे ठेऊन प्राण सोडावा लागतोच लागतो. तथापि चिवट मांस शेवटचा श्वास सोडतां सोडतां सुद्धां तंगड्या झाडायला कमी करीत नाहीं आणि प्राणान्तीच्या या लाथाळ्यांत त्याच्या एखाद दुसऱ्या वैऱ्याला (चुटपुटती कां होईना!) ठोंकर लागली म्हणजे घशांत गंगोदक पडल्याइतका गारवा त्याला येऊन, जेमतेम - अगदींच नाइलाज म्हणून - डोळे उघडे ठेवून तो प्राण सोडतो. जन्माला येऊन स्वत:च्या हातून जर कांहीं लहान मोठी कामगिरी झाली नाहीं, तरी नवमतवाद्यांचा छळ करण्याच्या कामीं ज्या हुल्लडी चालचलाऊ देभ वेशासं प्रभृतीकडून सबंध वर्षभर निरनिराळ्या रंगाढंगांत चालूं असतात, त्या हुल्लडीची होळी अखंड धडाडत ठेवण्यासाठीं आपल्याहि विद्वत्तेची एखादी शेणी किंवा ढोकळा त्या होळींत टांकून, कर्मयोगाची पुण्याई मिळविणारे गाळीव किंवा पाळीव जीर्णमतवादी लोक कोण, याची माहिती मिळविणारांनीं केसरीच्या सर्व फायल्या चाळाव्या आणि मेलेल्या माणसांपैकी जेवढे 'सार्वजनिक कामांत पडत असत' तेवढे निवडून काढावे म्हणजे झालें. पूर्वीं महाराष्ट्रांत असा काळ होता आणि अझूनहि कांहीं ठिकाणीं तो प्रघात आढळतो - कीं केसरी पत्र ढुंगाला धाबळी लाऊन टट पप करीत वाचणारे भक्त होते. इरसाल ब्राह्मणांची गोष्ट सोडून दिली तरी केसरीचा शब्द म्हणजे वेदवाक्य मानणारे स्वाभिमानशून्य ब्राह्मणेतर प्राणी आजलाहि बरेच आढळतात. यांत आम्हीं त्या तसल्या ब्राह्मणेतरांना दोष देत नाहीं. ते तरी बिचारे काय करणार? स्वत:च्या पत्नीचें 'लगीन' लावण्यापासून तों गर्भदानविधि करण्यापर्यंत ज्यांची सारी अक्कल जटांभिक्षुकांच्या धार्मिक हुकमतीकडे कित्येक पिढ्या गहाण पडलेली आहे, त्यांनीं केसरीचें प्रामाण्य 'देवबाप्पा प्रामाण्य' मानल्यास आश्चर्य विषाद

किंवा खेद यांना जागाच उरत नाहीं. केसरीनें निर्माण केलेल्या व शेंकडों भिक्षुकी पत्रांनीं वाढविलेल्या राष्ट्रीयपणाची खरी मख्खी त्याचा मूळपुरुष विष्णुशास्त्री चिपळूणकर, मुख्यगुरू बाळ गंगाधर टिळक, जाडजूड निबंधमाला, करोडों रुपयांचे फंड किंवा भिक्षुकाच्या असंतुष्ट वृत्तीप्रमाणें भरंसाट वाढणारा केसरी, यांत नाहीं; तर हा कंपू जीर्णमतवादाचा भुइकोटकिल्ला आहे, यांतच त्याची लोकमान्यता, अवतारीपणा आणि राष्ट्रीयपणा रसरसलेला आहे. राष्ट्रांत नवीन चैतन्य निर्माण केलेल्या पुण्याईचा राष्ट्रीय पक्षाशीं गांधर्व लावण्याची उनाडटप्पू दे.भ. प्राण्यांची कारवाई पाहून कित्येक प्रामाण्यशिलेदार कौतुकाच्या रूपांत बेहोष डुंबूं लागतात. हें अगदीं सहाजीक आहे. खुरांड्यांतल्या खबुतरांना दास्याची किंवा सत्यासत्य-निर्णयाची पर्वा असणार कशी? त्यांना गटर्र घुम् गट् गटर्र घुम् एवढाच मंत्र तोंडपाठ असतो. परंतु जीर्णमतबाद ही चीजच अशी आहे कीं तिच्या बाजाराला अंधश्रद्धाळु हिन्दुस्थानाशिवाय दुसरें फलदायी मार्कीटच जगांत नाहीं; जिकडे अनुयायांची बेसुमार हुल्लड उडालेली असेल तिकडे जीर्णमताचा गूळ राष्ट्रीयपणाच्या खोबऱ्याबरोबर मनमुराद वाटण्याचा रमणा चालूं आहे, असें खुशाल अनुमान काढावें आणि एवढ्याचसाठीं ''अहो मेजॉरिटी मेजॉरिटी (बहुसंख्य मत) म्हणजे तुम्ही काय समजतां? मेजॉरिटी म्हणजे पोंकळ डोक्यांच्या मूर्खांचा बाजार असें मी समजतों.'' असे उद्गार स्वामी विवेकानंदांनी काढले. [What you call majority, is mainly composed of fools and men of common intelect.] आमच्या बाजूला केवढें प्रचंड बहुजनमत आहे तें पहा, ह्मणून राष्ट्रीय गुंडांची जी वेहोवेळीं वाचाळपंचविशी चालते तिचें खरें स्वरूप हें असें आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं जन्माला घातलेला केसरीपक्ष, जहालपक्ष किंवा अलीकडे नवीन बारशानें ठरविलेला राष्ट्रीयपक्ष पक्का नाठाळ नवमतविद्वेषी पक्ष म्हणून याचा दुलौकीक त्याच्या जन्मकाळापासून लोकविश्रुत आहे. चिपळूणकरांना 'मराठी भाषेचे शिवाजी' अशी एक पदवी त्यांच्या भगतांनीं दिली होती; आणि एवढ्यावरच त्यांच्या कपाळीं राष्ट्रनेत्या शिवाजीचा सर्व शिवाजीपणा ठोकण्यांत त्यांच्या भगत झोटींगांच्या लेखण्या व जिव्हा अझून सुद्धां शरमत नाहींत. शास्त्रीबुवा मराठी भाषेचे कदाचित् शिवाजी असूं शकतील, परंतु भिक्षुकशाहीस्तोम माजविण्याच्या कामीं ते औरंगझेबाचे दुसरे खास अवतार होते, ही गोष्ट मात्र वाटले तशी सिद्ध करून दाखवितां येईल. स्वामी दयानन्दांची या आचराटानें केलेली निर्भत्सना मराठी भाषेच्या बरणींतच अझून पर्यंत कुजत पडली आहे म्हणून बरें. त्यांच्या एखाद्या परम भक्तानें तिचा इंग्रजी तर्जुमा करून लाला लजपतरायना अर्पण करून पहावा कीं बत्तीशी लाल रंगून तोंडावरहि हिरवें पिवळें राष्ट्रीय इंद्रधनुष्य झटकन् उमटल्याखेरीज रहाणार नाहीं. त्या वेळीं नवीनच जन्माला आलेल्या सत्यशोधक समाजाला उलटी बाळगोळी देऊन त्याच्या बारशालाच त्याचें तेरावें उरकिण्याचा केवढा अट्टाहास या भिक्षुकी सुलतानानें केला तो दस्तऐवजीं शाबूत आहे. त्या वेळीं त्या 'मराठी भाषेच्या शिवाजी'ला कोठली इतकी कल्पना कीं २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत हाच सत्यशोधक समाज प्रबुद्ध व बलिष्ठ होऊन आपल्याच घमेंडखोर संप्रदायाच्या मानगुटीवर बसणार आहे म्हणून? मराठी भाषेचे शिवाजी पडले कीं नाहीं; सगळीं शिवाजीची ताकद लेखणीच्या टोकांत आलेली; मग उशीर कशाला? हाण लेखणीचा फटकारा कीं कर ब्राह्मणेतर चळवळीला नेस्तनाबूद, उभार भिक्षुकशाहीचा झेंडा आणि बोल नाना फडणीसकी जय. स्वजातीशिवाय इतरांचें वर्चस्व चालूंच द्यायचें नाहीं, कोणी कांहीं नवीन मत प्रतिपादूं लागला तर त्याला पाखांडी ठरवून त्याच्याविरुद्ध जुन्या मताच्या कुत्र्यांची सेना भोंकण्यास

चिथवायची, त्याची निर्भत्सना करून त्याच्या मताचा विपर्यास करण्यासाठीं धडधडीत असत्याचाहि अवलंब करायचा, इत्यादि जे नानाविध वाममार्ग आज राष्ट्रीयपणामुळें पूर्ण राष्ट्राळून गेले आहेत, त्यांच्या जनकत्वाचा मान या शिवाजीशास्त्र्यांकडे आहे. कोल्हापूरच्या बर्वे प्रकरणाची हैबत खावून बिछान्याच्या समरांगणावर शास्त्रीबुवांना देवाज्ञा झाल्यावर त्यांचा संप्रदाय पुढें चालविण्याचें राष्ट्रीय कार्य टिळकांनीं हातीं घेतलें आणि तें त्यांनीं मंडालेस रवाना होईपर्यंत गुरूसे चेला सवाई असेंच बजावलें. टिळकांच्या आयुष्यांत दोन परस्परविरुद्ध अशी स्थित्यंतरें घडलीं, एक मंडाले - पूर्व टिळक (Pre-mandalay Tilak) आणि दुसरें मंडाले-उत्तर टिळक (Post-mandalay Tilak). टिळकांची खरी महति वाढली ती पोष्टमंडाले टिळकपणामुळें. तरीसुद्धां मरतां मरता भिक्षुकी प्रायश्चित्तापुढें मान वाकवून पोस्ट-मंडाले टिळकपणाला प्रीमंडालेपणाचें गालबोट लावलेंच! प्रीमंडाले टिळकांचा टिळकपणा शुद्ध 'राष्ट्रीय' स्वच्छ भिक्षुकी आणि अस्सल घाशीरामी. या आमदानींत त्यांनीं आपल्या नवमतविद्वेषाच्या धुंदींत जे जे भिक्षुकी अत्याचार केले त्यांचा पाढा येथें वाचण्याची आवश्यकता नाहीं. या अत्याचारांचा वीट आल्यामुळेंच प्रिन्सिपाल आगरकरांना आपल्या राष्ट्रसेवेचा मार्ग निराळा काढावा लागला. प्रि. आगरकर यांनीं आपल्या सुधारक पत्रांतून केसरीच्या हस्तिदंती राष्ट्रीयपणाचा बोजवारा अनेक वेळां चव्हाट्यावर फोडला. परंतु आगरकर जातिवंत नवमतवादी असल्यामुळें त्यांना राष्ट्रीयांच्या मामुली मुर्दाड उपहासाशिवाय दुसरें कसलेंहि प्रत्युत्तर मिळालें नाहीं. सामाजिक व धार्मिक सुधारणेचे, अस्पृश्योद्धाराचे वगैरे ज्या प्रश्नांच्या पोपटपंची गाथा पाठ म्हणत राष्ट्रीयगुंड आज महाराष्ट्रभर बेफाम बोकळत आहेत, तेच प्रश्न आगरकरांनीं सुधारकांतून जेव्हां आपल्या नि:स्पृह व खणखणीत भाषेनें लोकांपुढें मांडण्याची सुरुवात केली, तेव्हां हेच राष्ट्रीय प्राणी त्यांची कुचाळी करीत होते. म्हणे, आगरकरांची सुधारणा राष्ट्राला खाड्यांत घालील, त्यांची भाषा शिवराळ, त्यांतलीं विधानें माथेफिरू, विचार बाष्कळ इत्यादि ठरावीक सांच्याची राष्ट्रीय मुक्ताफळें तेव्हां टिळकांचा केसरी ओकीत होता. आतां बिचाऱ्यांच्या छाताडावर गांधी बसल्यामुळें स्वत:ची वांति स्वत:च धुण्याचा प्रसंग येऊन बितला आहे. खुद्द टिळकांचीं मतें महाराष्ट्राला कितपत मानवलीं तें कांही सांगतां येणार नाहीं; पण त्यांच्या नवमतवादी प्रतिस्पर्ध्याची (आगरकरांचीं) मतें मात्र टिळकांच्या स्वयंपाकगृहापर्यंत बेधडक घुसली, हें सिद्ध करून दाखविणें फांरसें कठीण नाहीं.

प्रत्येक सुधारकाची व सुधारणेची नालस्ती करणें हा पुण्याच्या राष्ट्रीय पक्षाचा जन्मसिद्ध हक्क आहे, व तो त्यांनीं मनमुराद बजावून घेतला आहे. सामाजीक समता, अस्पृश्योद्धार, जातिभेद निरसन वगैरे मोठमोठ्या तत्वांवरचीं त्यांचीं आजकालचीं पुराणें म्हणजे शुद्ध जुलमाचा रामराम आहे, हस्तिदंतीचा तमाशा आहे, सैतानाचा बायबलपाठ आहे. ज्यांची परंपराच मुळीं विष्णुशास्त्र्याची, त्यांच्या हातून यापेक्षां अधिक तें काय होणार ! गांधींच्या असहकारवादाच्या बाबतींत या राष्ट्रीयांनीं पोटभर वाचाळपंचविशी करून खुद्द गांधीलाच उलट गणेशटोपी घातल्याचें प्रत्यंतर अगदीं गरमागरम ताजें आहे. आम्ही कोणाचीहि भाडभीड न धरतां स्वानुभवानें स्पष्ट म्हणतों कीं पुण्याचा राष्ट्रीय पक्ष म्हणजे महाराष्ट्राच्या पाठीवर बाजलेलें काळपुळीचें करट आहे. हें करट आमूलाग्र कांपून काढल्याशिवाय महाराष्ट्राला भाग्याचे दिवस येणें आचंद्रार्क शक्य नाहीं. आगरकर-स्मृतीच्या दिवशीं होणाऱ्या सहभोजनावर गलिच्छ टीकांचा भडीमार करणारे हे राष्ट्रीय बोकेसंन्याशी काय म्हणे म. गांधीचा अस्पृश्योद्धार पार पाडणार ! पार पाडणार कीं ठार मारणार, हें भविष्य करायला पुण्याच्या रघुनाथ पंडिताच्या विद्वत्तेवर

जप्ति आणण्याची जरूर नाहीं. सक्तीच्या स्त्रीशिक्षणाविषयीं पुण्यांतल्या कुलीन स्त्रियांनीं मिरवणूक काढली असतां, यांच्या आंगांवर लपून छपून शेणगोळे मारणारे हे शिखंडी राष्ट्रीय शिक्षणाच्या अलीकडे केवढ्या लंब्याचौड्या गप्पा झोंकीत असतात! केवढे मोठे त्यांचें तें टिळक महाविद्यापीठ, किती जाडजाड त्यांचे कार्यवाहक, पीठाच्या शाखा तर काय, ठिकठिकाणीं मारुती म्हसोबा मारवाड्याप्रमाणें पसरलेल्या. पण ठिकाणावर काय आहे? शेंदूर फांसून देव बनविलेला धोंडा आणि त्याचा गांवभटक्या गुरव ! ही विद्यापीठें फंडगुंडी प्रकरणांतलीच एक मयचेष्टा आहे, हें आमच्या प्रिय वाचकांनीं नीट लक्षांत ठेवावें.

राष्ट्रीय सुधारणेच्या मार्गांत राष्ट्रीय पक्षाची ही धोंड निर्माण होऊन, तिचा नवमतविध्वंसक राष्ट्रीयपणा सुरू होतांच, त्याच्या छातीवर पाय देऊन उभा रहाणारा पहिला महाराष्ट्रीय नवमतवादी म्हणजे लोकहितवादी या टोपणनांवानें प्रसिद्ध असलेले रावबहादुर गोपाळराव हरी देखमुख हे होत. अलीकडच्या पिढीला या विद्वान् सत्यशोधकाची आठवण मुळींच नाहीं असें दिसतें. एकदां आम्हीं एका उच्च पदवीधर ब्राह्मण गृहस्थांना त्यांच्याबद्दल विचारलें, तेव्हां डोळ्यांवरचा चष्मा चटकन् कपाळावर सरकावून किंचित् सर्वज्ञतेच्या घमेंडींत म्हणाले "What Lokahitavadee? Who was that devil? (काय लोकहितवादी? हा कोण गद्दा प्राणी होत बुवा?)'' नंतर किंचित् स्मरण शक्ति तणावून ते पुन्हा म्हणाले "Ah I see. If I am not mistaken, your lokahitavadi was presumable the same donkey cudgelled by great Shastree Boa (हां हां समजलों. विष्णु शास्त्री चिपळूणकरांनीं झोडपून लंबा केला तो हाच गद्धा असावा.)'' गोपाळराव देशमुखांसारख्या अद्वितीय पंडिताला 'गद्धा' म्हणणारे हे पदवीधर 'गद्धे' सांप्रत (फक्त दिवसां) नखशिखांत खादीमय बनून पुण्यास आपल्या देशभक्तीचा विक्रा करीत असतात. असो. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतीचा, धार्मिक तात्विक ऐतिहासिक ग्रंथांचा आणि प्रत्यक्ष लोकस्थितीचा कस्सून स्वाध्याय करणारे आणि तदनुराधानें शुद्ध स्वदेशाभिमानपूर्वक अनेक ग्रंथ लिहून लोकांत प्रबोधनाची खळबळ उडविणारे व्युत्पन्न नवमतवादी रा. ब. लोकहितवादी हेच होत. यांनीं कमीत कमी ५० वर उपयुक्त ग्रंथ मराठी भाषेंत लिहिले. त्यांचा स्वभाव पराकाष्ठेचा निस्पृह व कडकडीत असे आणि त्याची झांक त्यांच्या सर्व लेखनांतून विशेष आढळते. यांचा स्वाध्याय नामक एकच ग्रंथ कोणी वाचला तरी रावबहादुरांच्या अचाट बुद्धिमत्तेची व बहुश्रुततेची साक्ष पटेल. यांनीं इतिहासविषयक ग्रंथहि अनेक लिहिले. त्यांचा गुजराथ देशाचा इतिहास, ऐतिहासिक गोष्टी वगैरे ग्रंथ अझूनहि अत्यंत लोकप्रिय आहेत. सरकारनें त्यांची नेमणूक इनाम कमिशनवर केल्यावेळीं त्यांनीं सातारचें दप्तर नीट लक्षपूर्वक अभ्यासिलें. मराठी स्वराज्याचा नाश करण्याच्या कामीं आपल्या जातभाईंनीं कसकसलीं घाणेरडीं कारस्थानें केलीं याचें दस्तऐवजीं प्रत्यंतर त्यांना मुबलक आढळतांच, या निस्पृह स्वदेशाभिमानी गृहस्थानें कोणाचीही भाडभीड न धरतां आपल्या एका पुस्तकांत असा स्पष्ट शेरा मारून ठेविला कीं :- ''ज्या कोणास या हिंदुस्थान देशाची उन्नति व्हावी अशी इच्छा असेल, त्यानें प्रथम या चित्पावनांस देशाच्या बाहेर पार हुसकून लावले पाहिजे.'' ऐतिहासिक गोष्टींच्या नवीन आवृत्त्यांतून या वाक्याला अलीकडे चाट मिळाला आहे, हें सांगायला नकोच! रावबहादुरांचीं मतें इतकीं प्रगमनशील होतीं कीं धार्मिक व सामाजीक सुधारणांविषयीं त्यांचे विचार चालूं घटकेला सुद्धां ताजेतवाने दिसतात. असल्या दूरदृष्टी नवमतवाद्याचे ग्रंथ विष्णुशास्त्र्यासारख्या जीर्णमतवाद्यापुढें येतांच त्यांच्या पायाची तिडीक मस्तकाला जाणें अगदींच अपरिहार्य होतें. शास्त्रीबुवांनीं

निबंधमालेंत लोकहितवादीचा समाचार घेऊन आपल्या नाठाळ पक्षाचें सौभाग्य राखण्याचा यत्न केला खरा, परंतु लोकहितवादी हेहि पक्के शेरास सव्वाशेर असे त्यास भेटले. प्रतिस्पर्ध्याची निंदा करून हंगामी शिमग्याच्या धुळवड शेणवडीनें व शंखध्वनीच्या कोलाहलानें स्वपक्ष मत संरक्षण करण्यांत शास्त्रीबुवानें जरी तात्पुरता विजय मिळविला, तरी आज घटकेला त्यांच्या भक्तमंडळाशिवाय इतरांत त्यांच्या सडक्या निबंधांचा कांहींही बोज राहिलेला नाहीं. प्रथम, लोकहितवादींचें कांहीं ग्रंथ निर्विकार चित्तानें अभ्यासावे आणि मग विष्णुशास्त्र्यांचे निबंध मालेंतील लोकहितवादीविषयीं 'राष्ट्रीय' अकांडतांडव वाचावें, ह्मणजे शास्त्रीबोवा हे मराठी भाषेचे शिवाजी नसून खऱ्याखुऱ्या राष्ट्रहिताचे चंद्रराव मोरे होते हें सिद्ध होईल. लोकहितवादींचे सर्व ग्रंथ काळजी पूर्वक स्वाध्यायांत आणण्याची आज वेळ आली आहे. निर्णयसागर छापखान्यानें आपल्या पूर्व लौकिकास स्मरून त्यांच्या सर्व ग्रंथांच्या नवीन आवृत्त्या प्रसिद्ध करण्याचें पुण्य संपादन करावें अशी त्यांस आमची प्रार्थना आहे. प्रबोधनाच्या वाचकांस लोकहितवादींच्या कांहीं उत्कृष्ट निबंधांचा परिचय लौकरच करून देऊं.

□□□

लेख

वज्रशुची

जगद्गुरू जो मंजुघोष त्याचें कायावाचामनें स्तवन करून मी (त्याचा शिष्य) अश्वघोष, (अनेक) शास्त्रांच्या आधारानें वज्रशुची नामक ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ करितों.

ज्यांत धर्म आणि अर्थ सांगितलेला आहे ते तुमचे वेद आणि स्मृत्या या चांगल्या व विश्वसनीय आहेत आणि त्यांत जेथे जेथें मतमतांतराचा झगडा असेल, तेवढा भाग त्याज्य व अविश्वसनीय आहे, असें प्रथमत: खुशाल गृहीत धरून चाला. तरीसुद्धां चतुर्जातींत ब्राह्मण काय तो श्रेष्ठ, हें विधान त्या ग्रंथांवरून मुळींच सिद्ध होत नाहीं.

मला प्रथम हें सांगा की ब्राह्मण ब्राह्मण म्हणजे तें काय? काय जीव म्हणजे ब्राह्मण, कां जात जन्म कुल देह ज्ञान आचार कर्म किंवा वेदज्ञान म्हणजे ब्राह्मण्य? (काय ब्राह्मणाची व्याख्या काय तुमची?)

जीव (जीवित) हेंच ब्राह्मण, असें जर तुमचें विधान असेल, तर त्या विधानाला वेदांत तर कोठेंच कांहीं आधार नाहीं, कारण, वेदांत स्पष्ट म्हटलें आहे की :-

ओम् । सूर्य: पशुरासीत । सोम: पशुरासीत ।

इन्द्र: पशुरासीत । पशवो देवा: ।।

आद्यन्ते देवा: पशन: । श्वापाका अपि देवा भवन्ति ।। सूर्य चंद्र इंद्रादि देवता प्रथम 'पशु' होत्या; दुसऱ्या कांहीं देवता प्रथम पशूच होत्या, मग त्या नंतर देव बनल्या; अहो फार काय पण, नीचांपेक्षां नीच असे जे श्वपाक (कुत्र्याचें मांस खाणारे) ते सुद्धां देव झाले. या पुराव्यावरून जीव किंवा जीवित म्हणजे ब्राह्मण नव्हे, हें स्पष्ट सिद्ध होतें. हेंच तत्व आणखी महाभारतांतील पुराव्यानेंहि अधिक स्पष्ट होतें. त्यांत एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं कालींजल टेंकडी वरील सात शिकारी व दहा हरीण; मानसरोवरावरील एक बदक (राजहंस); शरद्वीपांतील एक चकवाक, हे सर्व कुरुक्षेत्रांत ब्राह्मण असे जन्माला आले आणि वेदविद्यापारंगत झाले, मनू देखील आपल्या धर्मशास्त्रांत (?) असें म्हणतों कीं, ''चतुर्वेद व त्यांची आंगें व उपांगें यांत प्रवीण असलेला जो कोणी ब्राह्मण शूद्रापासून दक्षिणा किंवा इतर दान घेईल, त्याला १२ जन्म गाढवाचे, ६ जन्म डुकराचे आणि ७० जन्म कुत्र्याचे येतील.'' यावरून हें उघडच होत आहे कीं, जीवित हें कांहीं ब्राह्मण्य नव्हे अगर ब्राह्मण्याचा पुरावाहि नव्हे;

एन ४००६--१३

नाहीतर हे असले विचित्र प्रकार कां घडते?

आतां, तुमचें असें म्हणणें असेल कीं ब्राह्मण हें आईबापावर, जन्मावर किंवा जातीवर अवलंबून आहे - म्हणजे ब्राह्मण व्हायला ब्राह्मण आईबापांच्या पोटींच जन्म घेतला पाहिजे; तर स्मृतीमधील एका सर्वप्रसिद्ध श्लोकानें या तुमच्या म्हणण्याचा पोंकळपणा तेव्हांच उघड होत आहे. या श्लोकांत म्हटलें आहे कीं, अचल मुनीचा जन्म हत्तीच्या पोटीं, केशपिंगलाचा घुबडाच्या पोटीं, अगस्ति मुनीचा अगस्त्याच्या फुलापोटीं, कौशिक मुनीचा गवताच्या पोटीं, कपिलाचा माकडाच्या पोटी, गौतममुनीचा शालतरूवरील वेलीच्या पोटीं, द्रोणाचार्यांचा मडक्याच्या पोटीं, तैत्तिरी ऋषीचा खबुतराच्या पोटीं, व्यास मुनीचा कोळणीच्या पोटीं, कौशिकाचा शूद्रिणीच्या पोटीं, विश्वामित्राचा चांडाळणीच्या आणि वसिष्ठाचा जन्म वेश्येच्या पोटी असे हे जन्म झालेले प्रसिद्ध आहेत. यांपैकी एकाचाहि बाप अथवा आई ब्राह्मण नव्हती (मनुष्य योनीसुद्धां कित्येकांना लाभली नाही. भा. क.) तथापि या सर्व मंडळींना तुम्हीं ब्राह्मण्याच्या सदरांत ढकलून दिलें; यावरून असा निष्कर्ष निघतो कीं ब्राह्मण हें आईबाप, जाति अगर ग्रंथांतले आधार यांवर अवलंबून नसून तें लोकमान्य उत्पत्तीचें एक चिन्ह आहे. यावर अझूनहि तुमचें असें ह्मणणें असेल की, ज्याचे आईबाप दोघे ब्राह्मण तो ब्राह्मण, तर मग (या व्याख्येप्रमाणें) शूद्राचें पोरसुद्धां ब्राह्मण होण्याचा संभव आहे. कसें तें स्पष्ट सांगायला माझी ना नाही; पण त्यामुळें तुम्हीं मात्र नाकें फेंदारूं नका.

ब्राह्मण आईबापाच्या पोटीं जन्मलेला तो ब्राह्मण असेंच तुमचें म्हणणें ना? येथें एक मोठी शंका आहे. 'ब्राह्मण आईबाप' म्हणतांना अगदीं गाळीव शुद्ध आणि खरे खुरे ब्राह्मण आईबाप असाच तुम्ही अर्थ घेतां ना? मग महाराज या व्याख्येप्रमाणें ब्राह्मणी अवलाद कधीच संपुष्टांत आलेली आहे, हें नीट लक्षांत ठेवा. ब्राह्मणांच्या बापजाद्यांचा इतिहास पाहिला तर त्यांच्या पत्न्यांनीं कुविचारानें शूद्रांशीं व्यभिचार केल्याचा जो दाट संशय (इतिहासप्रसिद्ध) आहे, त्या संशयाच्या तडाख्यांतून एकसुद्धां ब्राह्मण धड सुटणार नाहीं, अर्थात् खरा बाप जर शूद्र तर नुसती आई ब्राह्मण आहे एवढ्याच सबबीवर त्या (शूद्र अवलादी) पोराला ब्राह्मण म्हणता येईल काय? मुळींच नाहीं. यावरून मीं असें विधान काढतों की, ब्राह्मण्य हें कांहीं जन्मावर अवलंबून नसतें. या विधानाला मानवधर्म ग्रंथाचाहि आधार आहे. तो ग्रंथ म्हणतो कीं जो ब्राह्मण मांस खाईल तो तात्काळ ब्राह्मण्यापासून च्युत होतो; जो ब्राह्मण मेण, मीठ व दूध विकतो तो तीन दिवसांत शूद्र होतो.

या सर्व विवेचनावरून जन्माचा आणि ब्राह्मण्याचा काडीमात्र संबंध नाहीं असें नाहीं कां तुम्हांला वाटत? ब्राह्मण्य जर जन्मावरच निश्चित होणारें असतें, तर तें नीच प्रकारच्या कर्मानें एकाकीं पतित व भ्रष्ट कां हो होतें? आकाशांत उडणारा घोडा पृथ्वीवर उतरतांच एकदम डुक्कर बनल्याची कथा तुम्ही कधीं ऐकिली आहे काय? अशक्य!

शरीर हें ब्राह्मण आहे, असें आतां म्हणतां? तेंहि सपशेल खोटें ठरत आहे. शरीर जर ब्राह्मण म्हटलें, तर ब्राह्मणाचें प्रेत सरणावर जाळतांच प्रत्यक्ष अग्नीवर खुनाचा आरोप शाबीत धरणें प्राप्त आहे; त्याचप्रमाणें ज्या ज्या आप्तेष्टांनीं तें प्रेत अग्नीच्या स्वाधीन केलें ते सर्व खुनांत साथीदार म्हणून जबाबदार धरले पाहिजेत. या तुमच्या विचारसरणीत जितका मूर्खपणा आहे, तितकाच पुढील विधानांतहि आहे. आई क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र कोणीहि असली तरी हरकत नाही; पण बाप जर

ब्राह्मण असेल तर त्याच्या मुलाला खुशाल ब्राह्मण म्हणावें; कारण किती झालें तरी बापाच्या हाडाचें हाड व मांसाचें मांस आहेना? काय हें राक्षसी विधान ! कधीं कोणी ऐकलें होतें? पुन्हा, यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान प्रतिग्रह आणि इतर दुसरीं पवित्र कृत्यें हीं सारीं ब्राह्मणाच्या देहापासूनच निर्माण झालीं असतात, नव्हे का? तर मग तो ब्राह्मणाचा देह नाश पावला कीं त्या साऱ्या कृत्यांचे गुणधर्म सुद्धां नाश पावतात काय? 'मुळींच नाही' असें तुम्ही उत्तर द्याल. अर्थात् असें जर होत नाहीं, तर ब्राह्मण्य हें देहावर मुळींच अवलंबून नाहीं.

बरें, ज्ञानामुळें ब्राह्मण होतो, अशी तुमची आतां जबानी आहे कां? ही तर अगदींच चुकीची आहे. कां? कारण ही विचारसरणी जर खरी धरली तर ज्ञानप्राप्तीच्या जोरावर पुष्कळ शूद्रसुद्धां ब्राह्मण होऊं शकतील. चतुर्वेद, व्युत्पत्तिशास्त्र, मीमांसा, सांख्य, वैशेषिक व ज्योतिष तत्वज्ञानांतले पंडिताग्रणी झालेले पुष्कळ शूद्र माझ्या माहितीचे आहेत; परंतु त्यापैकीं एकालाही कधीं कोणी ब्राह्मण ह्मटलेलें नाहीं. यावरून ब्राह्मण हें ज्ञानावर अवलंबून आहे, असें मुळींच सिद्ध होत नाहीं.

आचारानें ब्राह्मण्य सिद्ध होतें, असें तुमचें म्हणणें आहे काय? हे विधान तर सपशेल खोटें आहे. कारण तें जर खरें असतें तर पुष्कळ शुद्र ब्राह्मण बनले असते. नट, भाट, कैवर्त आणि भांड लोक पहा. मोठमोठे कष्ट सोसून ते नेहमीं कडकडीत धर्माचार पाळीत असतात. या लोकांचा आचार इतका उत्तमोत्तम असून त्यांच्यापैकीं एकालाहि चुकूनसुद्धां कधीं कोणी ब्राह्मण म्हटलेलें नाही. यांवरून हें सिद्धच होतें कीं आचार हा कांही ब्राह्मण्याचा पुरावा किंवा चिन्ह नव्हे.

कर्मांवरून ब्राह्मण होतो असें तुम्ही म्हणतां काय? मी म्हणतों मुळींच नाही. कारण वर दिलेलीं विधानें या ठिकाणीं तर विशेष ठसठशीत लागूं पडतात. अर्थात् कर्मांवरून ब्राह्मण बनतो ही कल्पनाच येथें टिकाव धरूं शकणार नाहीं.

वेद पठण केल्यानें एखादा मनुष्य ब्राह्मण बनतो, अशी आपली समजुत आहे काय? असेल तर ती अजीबात खोटी आहे. ऋक्, यजस्, साम आणि अथर्व या चारी वेदांत रावण राक्षस पारंगत होता, हें तर प्रसिद्धच आहे; आणि रावणाच्या वेळीं यच्चावत् सर्व राक्षस वेदाभ्यास करीत असत. परंतु त्यामुळें एखादा राक्षस ब्राह्मण झालो असें कांही तुम्ही म्हणत नाही. यावरून हें सिद्धच होतें कीं वेदपठणानें कोणी ब्राह्मण बनत नसतो.

तरमग ब्राह्मण ब्राह्मण म्हणतात तो प्राणी तरी कोण आहे? वेदपठण, संस्कार, आईबाप, कुल, कर्म यांपैकी एकाच्याहि योगानें जर ब्राह्मण्य प्राप्त होत नाही, तरमग होतें तरी कशानें? मला असें वाटतें कीं कुंद फुलांच्या बर्फवत् शुभ्रर्णाप्रमाणें ब्राह्मण हा एक निष्कलंक गुण आहे. ज्याच्या योगानें पाप विनष्ट होते तें ब्राह्मण्य हा एक निष्कलंक गुण आहे. ज्याच्या योगानें पाप विनष्ट होते तें ब्राम्हण्य. त्यांत व्रत, ता, नियम, उपवास, दान, दम, शम आणि संयम इत्यादिकांचा अन्तर्भाव होतो. जो मनुष्य अविवेक, अहंकार, संग, परिग्रह, राग आणि द्वेष यांपासून पूर्ण निवृत्त असतो तोच ब्राह्मण असें वेदांत म्हटलेलें आहे. शिवाय सर्व शास्त्रांतहि असें लिहिलें आहे कीं, सत्य, तप, इंद्रियनिग्रह आणि दया हीं ज्याच्या ठिकाणीं आढळतील तो ब्राह्मण; यांच्या विरुद्ध गुणांचा मनुष्य चांडाळ समजावा. ब्राम्हण्याचें दुसरें लक्षण म्हटलें म्हणजे त्याचा जन्म देव, मानव, किंवा पशुकोटींतून कां होईना, त्यानें स्त्रीसंभोगापासून सर्वस्वी अलिप्त असलें पाहिजे. शुक्राचार्य याच्याहि पुढें जाऊन सांगतात कीं देवांना जातीची पर्वा

एन ४००६--१३अ

नसते; अधमाधम गणलेल्या जातींत जन्म घेतलेल्या सज्जनाला ते ब्राह्मणच समजतात. या सर्वांवरून मी असा निष्कर्ष काढतों की जन्म, जीवित, शरीर, ज्ञान, धर्माचारपरिपालन, किंवा कर्म यांचा ब्राह्मण बनविण्याच्या कामीं कवडीचाहि उपयोग होत नाहीं.

शूद्राला प्रव्रज्येचा (संन्यासधर्माचा) अधिकार नाहीं, व त्या ऐवजीं त्यांनें विनम्र भावानें ब्राह्मणांची सेवा करून रहावें असें एक तुमचें विधान आहे. याचें कारण काय तर म्हणे चातुर्वर्ण्याच्या यादींत शूद्रांचें नांव शेवटीं येतें व म्हणून तो नीच ठरतो. वाहवा ! हा तुमचा कोटीक्रम फार छान आहे बुवा. याला पोरकट म्हणावें कीं अश्लील म्हणावें हेच समजत नाहीं. बरें, हा कोटीक्रम खरा मानला तर इन्द्रालासुद्धां नीचांतल्या नीच कोटींत ढकलायला कांही हरकत नाही. कारण पर्णीसूत्रांमध्यें इन्द्राला कुत्र्याच्याहि खालीं नमूद केलेला आहे. (श्व-पुर-मघवन्), लिहिण्याच्या अगर बोलण्याच्या क्रमपद्धतीवरून कोणत्याही व्यक्तीचा अगर प्राण्याचा दर्जा उच्च नीच ठरविणें व्यवहार्य होणार नाहीं. उमामहेश, दंतोष्ठ या शब्दरचनेवरून पार्वती महेशापेक्षां मोठी मानायची, कीं दातांना ओंठांपेक्षां वडील मानायचें? सुटसुटीत उच्चार व्हावा म्हणून व्याकरणाला साजेशोभेसा शब्दयोजनेचा क्रम उच्चनीचतेचा दर्शक होऊं शकत नाहीं. दातांचा जन्म कधीं ओंठाच्या आधीं होत असतो वाटतें? कां शिवाच्या आधीं पार्वती जन्माला आली असें तुमचें धर्मज्ञान शिकवितें? अर्थात् शुद्र तेवढा नीच व ब्राह्मण तेवढा उच्च व सर्वाधिकारसंपन्न; कां? तर चातुर्वर्ण्याच्या शब्दयोजनेंत ब्राह्मणच नंबर पहिला लागला व शूद्राचा शेवटी आला, हा कोटीक्रम मूर्खपणाचा अतएव फोल ठरतो. तेव्हा शूद्रानें विनम्र भावानें ब्राह्मणाची सदैव सेवाच करून राहिलें पाहिजे, या तुमच्या दुराग्रही प्रतिपादनाला कसलाहि आधार नाहीं आणि ब्राह्मणा इतकाच शूद्रालाही प्रव्रज्येचा अधिकार आहे असें सिद्ध होतें.

१ शिवाजी महाराजांच्या शूद्र घराण्यांत ज्या ज्या वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांनीं पुरोहीतपणा करून हव्यकव्याच्या सांगतेकरितां करोडों रुपयांच्या दक्षिणा व जहागिऱ्या मिळविल्या, ते सारे या वेळीं गाढवाच्या डुकराच्या किंवा कुत्र्याच्या योनींत जन्म घेऊन फिरत असतील; कदाचित् दक्षिण महाराष्ट्रांत सध्यां दिसणारीं गाढवें व डुकरें ही त्या वेदशास्त्रसंपन्नांचेच खास अवतार नसतील कशावरून? आतां तरी वे. शा. संपन्नांनीं कोल्हापूरच्या शूद्र राजाच्या दक्षिणा हबकून आपल्या सोन्यासारख्या नरदेहाला गाढव डुकरांच्या योनींत ढकलण्याचें महापाप करूं नये, अशी शिफारस आहे.

□□□

लेख

दिवाळी गेली ! पण झालें काय ?

(लेखांक १ ला)

काय झालें? काहींच झालें नाही !! दसऱ्याच्या मागोमाग वीस दिवसांनीं दिवाळी आली आणि चक्रनेमी क्रमानें चार महिन्यापूर्वीच, दिवाळीचा सण साजरा करण्यांचें कांहीं एक साजरें न करितां निघूनहि गेली ! साजरें म्हणजे कल्याण. दिवाळीचा सण आला, आम्हीं तो यथाशक्ति साजराहि केला पण त्या लबाड सणानें आमचें कांहींच कल्याण केलें नाहीं. सणानें तुमचें कल्याण केलें नाहीं आणि जोपर्यंत तुमच्या मनांत नसेल तो पर्यंत ह्या जगांत तुमचें कल्याण किंवा अकल्याण करण्याचें सामर्थ्य कोणाच्याहि आंगी नाही. फार कशाला, असलें सामर्थ्य राजपुरुषांच्या आंगीं नाहीं, एखाद्या सार्वभौम सत्ताधारी राजाच्या आंगीं नाहीं, इतकेंच नव्हे, पण परमेश्वर अवतार घेतो असें मानिलें, तरी त्या देवावतारी व्यक्तीच्याहि अंगांत तुमचें बरें वाईट करण्याचें सामर्थ्य नाहीं. हें अलौकिक सामर्थ्य, ही अद्भुत शक्ति केवळ तुमच्या मनाच्या ठिकाणी वास करीत आहे. मन चंगा तो काथवटमें गंगा. प्रत्यक्ष विष्णूच्या चरणांपासून निर्माण होऊन शिवाच्या मस्तकावर आरूढ झालेली त्रैलोक्याला पावन करणारी गंगा, तुम्हीं केवळ आपल्या मन: सामर्थ्यानें तुमच्या स्नानगृहांत, अगदी तुम्हीं आपल्या घंगाळांत आणून त्या बिचाऱ्या गरीब पात्राचें 'गंगालय' हे नांव सार्थ करून दाखवाल! मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयो: तुम्हाला सर्वथैव मायापाशांत गुरफटून टाकण्याचें किंवा ते पाश कालियाबंधाप्रमाणें तटातट तोडून टाकण्याचें सामर्थ्य तुमच्या मनाच्या आंगीं आहे. तुम्हीं म्हणजे तुमचें मन. तेंच तुमचा मित्र आणि तें मनच तुमचा शत्रु! येवढ्याचकरितां 'मन करारे प्रसन्न' ह्या सर्व सिद्धिदात्या मनाला प्रसन्न ठेवा असा उपदेश सत्पुरुषांनीं केला आहे.

जी गोष्ट एका व्यक्तीची तीच एका राष्ट्राची. राष्ट्राच्या मनोवृत्ति एकवटल्या पाहिजेत, त्या उदयोन्मुख बनल्या पाहिजेत आणि त्या प्रसन्न किंवा उल्हसित व्हावयास पाहिजेत. तरच त्या राष्ट्राचे सण, त्याचे उत्सव त्याच्या चळवळी आणि त्याच्या संस्था इच्छित कार्य करून त्याला कल्याणप्रद होतात; नाहींतर दसरा दिवाळी सारखे सण तेथें सालोसाल येतात आणि जातात. राष्ट्रीय भावनेचा लेशहि नसून कागदोपत्रीं आणि भाषण संप्रदायांत राष्ट्रीय ह्मणून गाजणारे नवे नवे शेकडों उत्सव हमेश ज्या जागांवर मोठ्या थाटामाटानें होतात त्या जागांप्रमाणेंच उत्सवांत भाग घेणाऱ्या व्यक्तींच्या वृत्ति

उत्सवसमाप्तीबरोबर पुन: पूर्ववत उदास करून समाप्त होतात. समर्थ रामदास ह्मणतात कीं चळवळीच्या ठिकाणीं सामर्थ्य असतें. पण त्या चळवळीला ते म्हणतात तसें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे. आमच्यांतील चळवळ्यांचा भगवंत भगें पडून झडून गेलेला ! त्याला बाहू नाहींत आणि मांड्याही नाहींत! तेव्हां नुसत्या मुखापायाचा भगवंत मुखानें बडबडणार आणि पायानें त्या बडबड्यांच्या पुढें धावून त्यांची हांजी हांजी करणार. असल्या 'मुखमस्तीति वक्तव्यम' तोंड आहे म्हणून वाटेल तें भकणाऱ्या परमेश्वराच्या अधिष्ठानामुळें आमच्या चळवळी केवळ फोल ठरतात आणि सूर्योदयाबरोबर मोठ्या जोमानें उगवून त्याच्या अस्ताबरोबर मागें मागमूसहि न ठेविणाऱ्या कांहीं वनस्पतीप्रमाणें कार्याचा अल्पांशहि मागें न ठेवितां आणि आपल्या उदयांत आणि अस्तांत विशेष कालक्षेप न करितां 'के-स्तु' ह्या अति संक्षिप्त संध्येप्रमाणे आमच्या संस्था 'उ-स्त' अथवा अगदी स्पष्ट लिहावयाचें म्हणजे 'उध्वस्त' होतात. दया (उदयास) त्यांच्यामध्यें कोठें दिसूनच येत नाही, जेथें दया नाहीं तेथें प्रेम नाही. अर्थात ज्या ठिकाणीं दया आणि प्रेम या दोन दैवी सद्गुणांचा अभाव आहे त्या ठिकाणीं निष्ठुरता आणि द्वेष ह्या शैतानी दुर्गुणांचें साम्राज्य असल्यास नवल नाहीं. जी स्थिति आमच्या चळवळींची आणि संस्थांची तीच आमच्या सणांची झाली आहे. आमच्या चळवळींत जसें सामर्थ्य नाही आणि आमच्या संस्थांत जशी कार्यक्षमता नाही, तसेंच आमच्या सणांत सामर्थ्य नाहीं आणि कार्यक्षमताहि नाही. उत्सव असो, सण असो, संस्था असो की चळवळ असो जेथें तेथे निष्ठुरता आणि द्वेष यांचाच हुतूतू चाललेला दिसतो.

दिवाळीच्या सणाचा आरंभीचा दिवस धनत्रयोदशी असून अखेरचा दिवस भाऊबिजेचा आहे. धनत्रयोदशीच्या दिवशीं सर्वांनी आपणांजवळ असलेल्या धनाची पूजा करावयाची असते. ज्या देशांत कोट्यावधि लोक अर्धपोटी रहातात आणि लक्षावधि लोकांची उपासमार होते, त्या देशांतील लोकांनीं धनाजी पूजा कशी करावयाची? निर्धन देशांत धनत्रयोदशी कसली आणि धनाचीं पूजा तरी कसली ! एका काळी आर्यावर्तांतील लोक गाई हेंच आपलें धन समजून त्याला गोधन म्हणत असत आणि धनत्रयोदशीच्या दिवशीं आमचे ऋषी ह्या गोधनाची पूजा करीत. पण आज त्या गोधनाची पूजा वांद्र्याच्या कसाईखान्यांत कसायांच्या सुऱ्याच्या तीक्ष्ण पाण्यानें होत असून, अर्ध्यप्रदाना ऐवजी तेथें ह्या गोधनाच्या रक्ताचे पाट वहात आहेत आणि तेथें होणाऱ्या गोप्रदानानें लाखों गोमांसभक्षक आपली क्षुधा शांत करीत आहेत.

धनत्रयोदशीच्या दिवशीं धन म्हणून ज्याप्रमाणें गोपूजन होत असे त्याप्रमाणें प्रतिपदेचे दिवशीं स्वतंत्रपणें गोपूजन म्हणूनच तें करण्यांत येत असे.

गीतवादित्र घोषेण नग्रेन्नगर बाह्यत:

आनायच गृहं पाश्चात्कुर्यास्त्रीराजनाविधिम्

आणि एवं नीराजनं कृत्वा सर्वपापै: प्रमुच्यते. ह्या पुजनाच्या योगानें आपलीं सर्व पापें नाहींशी झाली असेंहि मानण्यांत येत होतें. ह्याशिवाय वसुबारस किंवा वाघबारस आणि पोळा हेहि आपणांमध्यें गोक्रीडनाचे आणि गोपूजनाचे महत्त्वाचे सण मानिलेले होते. ज्या देशांतील शेंकडा ऐशीं लोक शेतकीवर उपजीविका करीत आहेत त्या देशांत गोपूजनाचें इतकें महत्त्व असणे अत्यंत आवश्यक आहे. हा पूजनाचा प्रकार आज जरी सर्वत्र मोडत आला असला तरी कित्येक ठिकाणीं तो अक्षरश: पाळला जात

आहे. पण एखादी गोष्ट अक्षरश: पाळणें वेगळें आणि तिचा हेतु समजून ती पाळणें वेगळें. हेतूप्रमाणें ज्या ठिकाणां वर्तन असेल त्या ठिकाणीं तें अक्षरश: आहे किंवा नाहीं हें पहाण्याची आवश्यकता नाहीं. तुम्ही गो-पूजन करा किंवा करूं नका, पण गोपालन करा म्हणजे झालें ! पुराणांतर्गत गोपूजनाचा अर्थ आम्हीं इतकाच समजतों, आज सर्व पापांपासून मुक्त होण्याच्या इच्छेनें गाईची पूजा करावयाची आणि त्यांच्या पुढ्यांत पोटभर वैरण आहे की त्या उपाशी मरताहेत हें सुद्धां पहावयाचें नाहीं अथवा त्यांना जास्त किंमतीच्या लालचीनें एखाद्या कसायाच्या पदरांत ओवाळावयाचें, असलें गोपूजन साफ नको.

अलीकडे भिक्षा मागून आणि फंडाकरितां पेट्या फिरवून जमविलेल्या द्रव्यावर गोरक्षण करणाऱ्या कांहीं संस्था निघाल्या आहेत, ह्या संस्था जें कार्य करीत आहेत त्या संबंधानें सवडीप्रमाणें एका स्वतंत्र लेखमालेंत लिहिण्याचा आमचा विचार असल्यामुळें आज फक्त त्यांचा मार्ग आह्माला पसंत नाहीं व त्यांजकडून व्हावें तसें गोरक्षणाचें कार्य होत नाहीं इतकें मात्र आह्म येथें स्पष्टपणें नमूद करितों.

पुराणांना धार्मिक पुस्तकें समजून त्यांच्या आधारावर लोकांना मानसिक दास्यांत जखडून टाकणारांनीं तसें खुशाल करावें; पण त्यांनीं हे पक्कें लक्ष्यांत ठेवावें कीं, सांप्रतचें युग हें श्रद्धायुग नाही, विचारयुग आहे. पुराणांनी स्वर्गाला जितका मातीमोल केला आहे, तितकाच नरकालाहि पण सहज गम्य केला आहे. अशा स्थितीत स्वर्गाची लालूच अथवा नरकाची भीति पुराणांत सांगितलेल्या पुण्यकर्मांकडे जनतेची प्रवृत्ति करील किंवा त्यांत सांगितलेल्या पापकर्मापासून तिला परावृत्त करील, असें समजणें केवळ मूर्खपणाचेंच आहे.

आश्विन वद्य त्रयोदशीला जसा धनपूजनाचा विधि सांगितला आहे. तसाच वद्य चतुर्दशीच्या दिवशीं प्रात:काळीं अभ्यंगस्नानाचा विधि वर्णिला आहे. ब्राह्मपुराण ह्मणतें :- प्रात:स्नानं तु य: कुर्याद्यमलोकं न पश्यति असें स्नान करणाराला यमलोक पहाण्याची पाळी कधींच येत नाहीं. आणि:-

बलात्क राद्धठाद्वापि शिष्टसत्वान्न करोति चेत्

तैलाभ्यंगं चतुर्दश्यां रारवं नरकं व्रजेत्-सनत्कुमार संहिता.

जो कोणी मुद्दाम, हट्टानें अथवा प्रतिष्ठितपणानें चर्तुदशीच्या दिवशीं तैलाभ्यंग करणार नाहीं तो रौरव नरकांत जाईल. फक्त चतुर्दशीच्या स्नानावर स्वर्ग नरकाची द्वारें खुली करणारीं हीं पुराणें धर्मांचें आंग माना म्हणून सांगणारे नाना फडणीस यावर काय म्हणतात तें पाहण्यासारखें आहे हिंवाळ्यांत प्रात:काळीं केलेलें अभ्यंगस्नान कांतिवर्धक आणि आरोग्यकारक असले तर तसें सांगा; लोक दिवाळीचे चार दिवसच काय पण हिवाळ्यांचे चार महिने देखील तें मोठ्या सुखानें करतील. पण त्याला स्वर्गाचें आशिष आणि नरकाची भीति सांगाल तर तुमच्या त्या बालखिल्याच्या सांगण्याला देखील आतां कोणी जुमानणार नाहीं हें पक्कें लक्ष्यांत ठेवा. आज शेकडों वर्षें पुराणांवर भरंसा ठेवणारे आणि त्याला शिमगा समजणारे दिवाळीच्या सणाकरितां म्हणून असली स्नानें करीत आहेत अर्थात् त्यांचीं गर्दी होऊन स्वर्गांत रहाणाऱ्या देवांना स्थानत्याग करावा लागला असेल आणि संयमनीपतीचे सारे नरक ओस पडले असतील !

(अपूर्ण)

□□□

स्फुट विचार

विद्वान् नापिताच्या तुंबड्या

ज्ञानकोशकारांनीं हिंदु समाजांतील निरनिराळ्या जातींचा उच्च नीच दर्जा ठरविण्याची जी आगंतुकी चालविली आहे, त्याबद्दल त्यांना मागल्या अंकीं आम्ही प्रेमाची सूचना केलीच आहे. जातींचा प्रश्न सांप्रत इतका नाजूक होऊन बसला आहे आणि तद्विषयक मतमतांतराचा एवढा भयंकर गोंधळ माजला आहे, कीं उच्चनीचतेचा निर्णय करण्यासाठीं प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचा बाप जरी खालीं उतरला तरी त्याचें थोबाड फुटल्याशिवाय राहणार नाही; मग नुसते निबंध खरडून डॉक्टर पदवी मिळविणाऱ्या अमेरिकेच्या वारकऱ्यांची बत्तीशी शिल्लक राहील किंवा नाहीं याची शंकाच आहे. खरें ह्मटलें तर असले जातिविषयक प्रश्न ज्ञानकोशांत आलेच नाहींत, तर त्यामुळें ज्ञानकोशाच्या संपादकांवर फारशी मोठी आपत्ती येऊन कोसळेल असें वाटत नाही. उलटपक्षी हल्लीं सुरू असलेल्या गोवर्धन ब्राह्मणांच्या वादाप्रमाणें किंवा चार वर्षांपूर्वीच्या कायस्थ प्रभु विरुद्ध राजवाडे प्रकरणाप्रमाणें जर नसते वाद उत्पन्न होऊं लागतील, तर त्यापासून निर्माण होणारी आपत्ति केवळ ज्ञानकोशालाच नव्हे, तर संबंध महाराष्ट्राला भोगायला लागल्याविना खास राहणार नाही. जातींजातींत सलोखा उत्पन्न करण्याचे तत्वज्ञान सांगणारे केसरीकारासारखे राष्ट्रीय गुंड वेळ येतांच स्वत:चा चित्पावनी कावा कसा व्यक्त करितात हें राजवाडे प्रकरणावरून महाराष्ट्राला कळून चुकलेंच आहे. कायस्थ समाजाला आपल्या स्वत्वाची जर कांहीं चाड असती, त्यांच्या लाजलज्जेचें जर वाटोळें झालेलें नसतें आणि असल्याचा प्रतिकार करण्याची त्यांची पौरुषत्वाची तडफ ठार मेलेली नसती, तर राजवाडे प्रकरणाच्या बाबतीत भारत इतिहास संशोधक मंडळाला त्याच्या कार्यालयासाठी खणलेल्या पायांत जिवंत गाडल्याशिवाय ते खास राहिले नसते. परंतु प्रतिकाराची चळवळ भर जोमांत असतां प्रतिपक्षाच्या दुटप्पी थापांस बळी पडून कायस्थ समाजांतील कांही भ्याड व नार्मद पुढाऱ्यांना ऐन वेळीं शांतिब्रह्मत्वाची अवदसा आठवल्यामुळें नरसोपंत केळकरांच्या तोंडबोंबड्या जाहिरनाम्याला मान देऊन ज्ञातीच्या इतिहासाची मान कापण्याचें काळेंकुट्ट यश त्यांनी संपादन केलें. ज्ञानकोशकारांचा सांप्रतचा कमेटीचा फार्स म्हणजे ग्रामण्याच्या धुसगुसाची सुधारलेली अमेरिकन आवृत्ति होय. आम्हीं तर असेंच स्पष्ट म्हणतों की, इतिहास-संशोधनाच्या बुरख्याखालीं जी गोष्ट भा. इ. सं. मंडळाला साधली नाही, ती ज्ञानकोशाच्या मुखवट्याखालीं शक्य

करून दाखविण्याचा हा कुटिल प्रयत्न आहे. या प्रयत्नाची पावलें, राष्ट्रहिताकडे लक्ष ठेवून विवेकानें जर नीट टाकलीं नाहींत तर त्याचे परिणाम फार भयंकर होतील. आज जो प्रसंग ज्ञानकोश मंडळानें गोवर्धन ब्राह्मणांवर आणिलेला आहे, तोच प्रसंग क्रमश: महाराष्ट्रांतील सर्व जातींवर येणार आहे. आणि गोळक हे ब्राह्मण आहेत कां? कायस्थ क्षत्रिय कीं शूद्र? दैवज्ञ ब्राह्मण कशावरून? अशा प्रकारचें प्रश्न जाहीर रीतीनें होऊं लागलें कीं, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद पुरवला, परंतु हा चित्पावन-चित्पावनेतर वाद नको, असें होऊन विनाकारण जातिमत्सराचा अग्नि भडकविला जाईल. आमची फार अपेक्षा होती की डॉ. केतकरांसारख्या विवेकसंपन्न गृहस्थांच्या हातून जाति-भेद निर्मूलनाचें कांहीं तरी भरीव कार्य होईल. परंतु त्यांच्या अध्वर्युत्वाखाली चाललेला जातिनिर्णयाचा हा खेळखंडोबा पाहून मन खिन्न होतें. अमकी जात उच्च आणि तमकी नीच असले वाद उपस्थित करण्याचें दुष्कर्म पावगी सारख्या रिकामटेकड्या पेनशनरांनीं केलेलें एकवेळ परवडेल; परंतु ज्ञानकोंशातहि तसलीच खेंकटीं ग्रथित होऊं देण्यापेक्षां तो विषयच अजिबात वगळावा किंवा ज्ञानकोशाचीच भ्रूणहत्या करावी, हेंच योग्य होईल. विचारवंतांस अधिक काय लिहावें?

बोकेसंन्याशांची मैफल

पेण जिल्हा कुलाबा येथें नुकत्याच भरलेल्या दुसऱ्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेच्या ठरावांच्या नकला कार्यकारी मंडळाकडून आमचेकडे अवलोकनार्थ आल्या आहेत, त्यांचा आह्मीं आभारपूर्वक स्वीकार करितों. ठरावांचें सामान्य स्वरूप शुद्ध आशीर्वादात्मक पाहून प्रांतिक परिषदेचा एवढा मोठा महागडा खटाटोप करणारांची कोणासही कींवच येईल. वडीलांनीं घालून दिलेलें बाळबोध वळण सोंवळें नेसून जस्सेंच्या तस्सें घटवीत बसणाऱ्यांनीं राष्ट्राच्या उलट्या कवटीची सुलटी घटना करण्याचा दिमाख मिरविणें यापुढें तरी सोडून द्यावें, विशेषत: ज्या परिषदांत राष्ट्रीय लोक आणि त्यांचे मूठभर ब्राह्मणेतर बगलबच्चे यांचेंच प्राधान्य जास्त, त्या परिषदा प्रांत-मत-निदर्शक कशा होऊं शकतात हे आह्मांला समजत नाही. कोणच्याही प्रकारची चळवळ करणें हा ब्राह्मणवर्गांच्या हातचा जरी मळ झालेला असला तरी तेवढ्यावरून त्यांनीं सर्व राष्ट्राच्या प्रतिनिधित्वाच्या आगांतुकीची कणिक मळीत बसणें यापुढें तरी अफाट ब्राह्मणेतर समाजाला केव्हांही मान्य होणार नाही. मुळशी पेट्याबद्दलचा ठराव शुद्ध फंडगुंडी आहे. प्रत्येक जिल्ह्यानें स्वयंसेवकांचा व हजार हजार रुपयांचा पुरवठा करावा असला हस्तीदंती ठराव पास करण्यांपेक्षा ''ज्या ज्या सावकारांकडे मावळ्यांच्या जमिनीं खरेदीगहाण पडल्या असतील त्या त्या सावकारांकडून सर्व खरेदी गहाण पत्रें सोडवून मावळ्यांना आपल्या जमिनीचे खरेखुरे मालक बनविण्याची ही परिषद खटपट करील'' असा ठराव पास केला असता तर परिषदकारांच्या कळकळीचा अस्सलपणा तरी व्यक्त झाला असता ! परंतु जेथें सारी भटा भिक्षुकांचीच गर्दी तेथें शुष्काशुष्क आशिर्वादाशिवाय काय फलनिष्पत्ती होणार? स्वराज्यप्राप्तीचा ठरविलेला कार्यक्रम असाच 'असावें नसावें' आशिर्वादात्मक आहे. खादीचा प्रसार करावा, हिंदु मुसलमानांची एकी असावी, अस्पृश्यता

काढून टाकण्याची व्यवस्था व्हावी, हे मामूली ठराव करण्यासाठी प्रांतिक परिषदेच्या नाटकाचा खटाटोप कशाला पाहिजे? या बाबतींत श्रीयुत भोपटकर यांनीं केलेली उपसूचना बरीच निश्चित आणि सक्रीय स्वरूपाची होती. परंतु पोकळ आशिर्वादाचे मंत्रघोष करणाऱ्या भिक्षुकसंन्यांशांच्या संख्याबळापुढे पुण्यांतील चातुर्मास, यागांतील बोंकडाप्रमाणें भोपटकरांच्या उपसूचनेचा निकाल लागावा यांत नवल तें काय? ज्यांना कांही करायला नको त्यांनी नुसती आशिर्वादाची वाचाळपंचविशी करूं नये तर काय करावें? ४ थ्या ठरावांतील चवथें कलम असें आहे:- ''अस्पृश्यतेचा दोष काढून टाकून जातीजातींतील व धर्माधर्मांतील तंटे नाहींसे होऊन सर्वांमध्यें पूर्णपणें प्रेमभाव उत्पन्न होईल अशी व्यवस्था करावी.'' जवळ जवळ मृत्युपत्राची भाषाच ही !! आणि ही व्यवस्था करणार कोण? तर ज्यांच्या हरामखोर बापजाद्यांनी वेदोक्त पुराणांची खेंकटी नाचवून मराठी स्वराज्याला आग लावली, प्रामण्यासारखे धार्मिक तंटेबखेडे करून हिंदु राष्ट्रांत फूट पाडली आणि खोटेनाटे धर्मग्रंथ लिहून हिंदु समाजांत अस्पृश्यतेचा उदररोग निर्माण केला, ते हे राष्ट्रीय भिक्षुक! या ठरावावर राष्ट्रीय कंपूने शास्त्री बनविलेल्या कवड्यांनी आपली कवडी किंमतीची अक्कल अखेर पाघळलीच, ह्मणे, अस्पृश्यता हा सामाजीक प्रश्न असल्यामुळें त्याचा वाद प्रांतिक परिषदेसारख्या राजकीय संस्थेंत नको. महात्मा गांधीलाही मूर्ख ठरविणाऱ्या या गद्धयाचे कान त्या ठिकाणीं एकानेंही उपटूं नयेत हें मोठें आश्चर्य आहे. राजकीय संस्थेंत अस्पृश्यतेचा सामाजीक प्रश्न घ्यावयाचा नाहीं तर खादीसारखा आर्थिक प्रश्न तरी शेण खायला कां घेतां? सारा सिद्धसाधकांचा चोरबाजार ! ब्राह्मण ब्राह्मणेत्तर वाद मिळविण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली आहे. या ठरावाची चर्चा चालली असतानां राष्ट्रीय खाडीलकरांच्या तोंडांत आंबट चिंचेचे बोटुक पडल्यासारखें झालें असेल. ब्राह्मणेतरांच्या चळवळीला केसरीच्या रकान्यातून फूटबॉल प्रमाणें टांचा मारण्यास सवकलेल्या या राष्ट्रीय महाशयाच्या नाकासमोर त्याच चळवळीचा शहानिशा करणारी कमिटी जन्माला येत असतांना बिचाऱ्याला टांचा घासण्याचा प्रसंग यावा हें दुर्दैव नसून कृतकर्माचा विपाकच समजला पाहिजे. ब्राह्मण ब्राह्मणेतरांचा वाद मिटविण्यासाठी कमिटीसुद्धां मोठी राष्ट्रीयच निवडली गेली आहे ! त्यांत सातारचे सोमण वकील आहेत, कोणी पु. गो. जोशी आहेत, व्यावहारीक अनुभवाचे शरीराइतकेच दुबळे असणारे दत्तोपंत घारपुरे आहेत, आणि भोपटकर सेक्रेटरी आहेत. हे चौघे भिक्षुकच झाले. तेव्हां कमिटीला 'सार्वजनीक' स्वरूप येण्यासाठी एक ब्राह्मणेत्तर पात्र निवडून काढलें. तें कोणतें? तर लष्करच्या भाकऱ्या भाजणारे, स्वसमाजद्वेष्टे बाबुराव फुले हें तें फुलपात्र होय. असली ही लांडग्यांची पंचकडी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद मिटवायला निघाली आहे. या वादाचें खरें प्रचंड स्वरूप अझून राष्ट्रीयांना पटलें तरी नसावें किंवा पटलें असल्यास त्याचा कबूल जबाब देण्याइतका चिमटा तरी त्यांच्या काळजाला बसला नसावा. ह्मणूनच त्यांच्या राष्ट्रीय टायल्या अझून बंद पडलेल्या नाहींत. सारांश, पेणची परिषद ह्मणजे शुद्ध बोकेसंन्याशांची मैफल झाली असें म्हणण्यास हरकत नाही.

□□□

लेख

दिवाळी गेली ! पण झालें काय ?

(लेखांक २ रा)

अमावास्येच्या दिवशींहि असेंच स्नान करावें, पितर आणि देव यांची पूजा करावी, पार्वण श्राद्ध करून विप्रांना मिष्टान्न भोजन द्यावें, सायंकाळीं लक्ष्मीपूजन करावें, इत्यादि विधि पुराणकारांनीं सांगितले आहेत. ह्याच दिवशीं बलीच्या कारागृहांतून देवदेवतांची मुक्तता झाली, म्हणून दीपोत्साह करावा आणि कैदेंत श्रम पावलेल्या लक्ष्मीला उत्तम शय्या घालून निजवावें :-

न कुर्वंति नरा इत्थं लक्ष्म्या ये सुखसुप्तिकाम्
धनचिंताविहीनास्ते कथं रात्रौं स्वपंति हि

जे लोक अशा रीतीनें लक्ष्मीला सुखशय्येवर निजविणार नाहींत त्यांना दारिद्र्यामुळें रात्रीची स्वस्थ झोंप लागणार नाही. ह्या शहाण्या पुराणकाराला हिंदुस्थानाचे लक्ष्मी कायमची निजली नसून आज यूरोप अमेरिका आणि जपान यांच्या कैदेंत पडली आहे, ही गोष्ट कशी कळली नाही? आज आम्हाला तिला सोडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आम्हांला जशी झोंप नाहीं तशी आम्हीं तिला झोंप घेऊं देतां कामा नये. ती हिंदुस्थानांत आली पाहिजे आणि आम्हीं आपल्या अखंड प्रयत्नांनीं तिला सदोदित जागृत ठेविली पाहिजे. सारांश आज आम्हांला लक्ष्मीला निजवून स्वस्थ झोंप लागणार नाहीं. ह्या व्रताऐवजीं आम्हीं स्वदेशीचें व्रत स्वीकारलें पाहिजे. स्वदेशाचें औद्योगिक बल वाढविलें पाहिजे. देशांतलें कलाकौशल्य उर्जीतावस्थेस आणिले पाहिजे आणि ह्या मार्गानें परदेशाकडे धांव घेत जाणाऱ्या हिंदी लक्ष्मीला तिच्या झिंज्या खेंचून आम्ही हिंदुस्थानांत ठेविलें. परदेशाच्या कैदखान्यांतून तिची सुटका केली, तरच आम्हाला स्वस्थ झोंप लागेल !

सनत्कुमार संहिताकार म्हणतात, ह्या दिवसांत बलीचें राज्य असतें. करितां राजानें लोकांस मनसोक्त वागण्याबद्दल द्वाही फिरवावी. हे शहाणे पुढें म्हणतात :-

वारांगनादिगमनं स्पृष्टास्पृष्टादि भक्षणम्
अन्यांबरधृतिश्चापि द्यून्मद्यंच न दुष्यति

पंचमहापातकांत गणलेलीं पातकें देखील ह्या दिवसांत निर्दोष ठरतात, इतकेंचि नाहीं तर तीं धर्म म्हणून गणलीं जातात आणि त्यांचें आचरण न करणारांचे-

वृथास्तेषां धर्मास्युर्नात्र संशय:

सर्व धर्म वृथा ठरतात. आज मद्यपानाविरुद्ध मोहीम चालविण्याची आमची तयारी असतां आम्हीं असल्या अनीति-प्रोत्साहक पुराणांना कंवटाळून बसणें म्हणजे शुद्ध आत्मघातकीपणा आहे. आमच्या सांप्रतच्या दिवाळींत आम्हीं सर्व देशभर मद्यपानाला आळा घालून निर्भयतेचा झेंडा फडकाविला पाहिजे.

या पुढील दिवस कार्तिक शु. प्रतिपदेचा. हिलाच बलिप्रतिपदा असें म्हणतात. ह्या दिवशीं मागील संवत्सराचा आढावा काढून नव्या वर्षाची शिल्लक उतरण्याची वहिवाट सर्व व्यापारी वर्गांत आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे जसा शकारंभाचा दिवस तसा हा सवदारंभाचा दिवस आहे. नाण्याच्या शिलकेप्रमाणें ह्या दिवशीं आचरणाची शिल्लक उतरण्याचा उपक्रम आम्हीं केला पाहिजे आणि नाण्याच्या देवघेवीच्या आढाव्याबरोबर आम्हीं गेल्या वर्षांत केलेल्या कार्याकार्याचा आढावा पाहिला पाहिजे.

ह्या दिवशीं बलिमुद्दिश्य दीयंते दानानि मुनिपुंगवा: बलीच्या निमित्तानें आम्हीं ब्राह्मणांना दान धर्म केला पाहिजे असें वालखिल्य ऋषि सांगतात. बारसें असो कीं बारावें असो, हव्य असो कीं कव्य असो, व्रत असो कीं उद्यापन असो, लग्न असो कीं केशवपन असो, त्याला ब्राह्मण पाहिजे आणि ब्राह्मण म्हटला कीं त्याला आणि त्याच्या बरोबर त्याच्या जातभाईंना कचकावून दक्षिणा दिल्यावाचून आमच्या कार्याची सफलता नाहीं. बळीचा सण आणि त्यांत ब्राह्मणाना दान धर्म !

बलिप्रतिपदेच्या दिवशींहि अभ्यंग स्नान आहेच. वसिष्ठ म्हणतो ह्या दिवशीं तैलाभ्यंग न करणारे नरकं प्रतिपद्यत: नरकांमध्यें जातात. द्यूतानें पांडवांचा नाश झाला. द्यूतामुळें सती द्रौपदीचा छळ झाला आणि द्यूतामुळेंच भारतीयुद्ध होऊन भरतखंड निर्योध झालें ! पण पुराणकार म्हणतात शंकराच्या कुटुंबांत कलह माजविणारें द्यूत या दिवशीं सर्वांनीं खेळलें पाहिजे आणि-

तस्मिन् द्येते जयो यस्य तस्य संवत्सरं जय:

ह्या दिवशीं द्यूतक्रीडेंत ज्यांना जय मिळेल ते सर्व वर्षभर विजयी होतील! आमच्या भावी जयापजयाचा काटा अशा रीतीनें दिवाळींत आम्हाला जुगार खेळण्यास लावून त्यावर अवलंबून ठेवणारा हा शहाणा ग्रंथकार जुगाराची बंदी कायद्यानें झाली पाहिजे असें म्हणणाऱ्या आम्हांस आमचा धर्मप्रणेता वाटावा हें मोठेंच आश्चर्य आहे. एका प्रकारच्या जुगाराची बंदी कायद्यानें पूर्वीच झाली असल्यामुळें हा ग्रंथकार म्हणतो त्याप्रमाणें आजदेखील आम्हीं आपल्या भावी जयापजयाचें भविष्य त्याच्या ताजव्यानें तोलून पहात नाहीं; पण इंग्रज लोकांच्या चैनीखातर चालू असलेल्या शर्यतीचें जुगार वर्षांतून तीनशें पासष्ट दिवस खेळून आम्हीं आपल्या अल्प स्वप्प धनाचा आणि त्याबरोबरच आपल्या बायका मुलांच्या भवितव्यतेचा जो खेळखंडोबा चालविला आहे, तो बंद करण्याचा प्रयत्न करून आम्हीं ज्या दिवशीं ह्या विलायती जुगाराला अखेरची मूठमाती देऊं तोच दिवस आमच्या खऱ्या दिवाळसणाचा ठरेल.

अलीकडे होत असलेल्या मुलांच्या खेळांच्या सामन्यांतून टग ऑफ वॉर नांवाचा एक खेळ असतो. हा खेळ परदेशांतून आपणांमध्यें आला अशी पुष्कळांची समजूत असेल. परंतु कार्तिक शु. प्रतिपदेच्या दिवशीं वष्टिकाकर्षण नांवाचा जो खेळ खेळावा असें सनत्कुमार संहितेंत सांगितलें आहे, तो खेळ म्हणजे हा टग ऑफ वार चाच होय. वष्टिका ह्मणजे 'स्थूल रज्जु' किंवा दोरखंड आणि त्याचें 'कर्षण' ह्मणजे ओढणें. हे दोरखंड कशाचें करावें, तें किती बळकट आणि नवें असावें, तसेंच दोन बाजूला खेचणारे गडी समसंख्या द्वयो: कार्या सर्वेपि बलवत्तरा: समसंख्या आणि बळकट कसे असावे, खेळाची

जागा कशी असावी, जयापजयाच्या निर्णय रेखा कशा काढाव्या, निर्णय कसा द्यावा वगैरे ज्या गोष्टी सांगण्यांत आल्या आहेत, त्या पाहिल्या ह्मणजे हा खेळ मूळचा आमचा असून येथूनच तो इतर देशांत गेला असला पाहिजे अशीच दृढ समजूत होते. प्रतिपदेच्या दिवशीं हा खेळ खेळतांना-

तामेकतो राजपुत्रा हीनवर्णास्तथैकत:

सोलाच्या एका बाजूस राजपुत्र आणि एका बाजूस हीनवर्ण मानिलेल्या लोकांची मुलें असावींत व हीं दुसरी मुलें विजयी झालीं असतां-

जयोत्र हीनजातीनां जयो राज्ञस्तु वत्सरम्

एक संवत्सरभर राजा विजयी होईल असें समजावें असें ह्या ग्रंथकाराचें म्हणणें आहे. ही फलश्रुति अमान्य म्हणून जरी बाजूला ठेविली तरी वष्टिकाकर्षण (Tug of war) हा आमचा खेळ आहे. खेळामध्यें उच्चीनीच आणि श्रीमंत गरीब अशीं सर्व दर्जाची मुलें एकत्र आणि मोठ्या प्रेमानें खेळत असत. राजांना आपल्या प्रजाजनांत सामर्थ्य असावें असें वाटून तें त्यांच्या आंगचें सामर्थ्य खेळाच्या निमित्तानें अजमावून पहात असत आणि प्रजाजनांच्या मुलांनीं आपल्या मुलांवर विजय मिळविण्यांत ते धन्यता मानीत असत. ह्या गोष्टी अगदीं उघड होतात.

याच दिवशीं अन्नकूट म्हणजे नाना प्रकारच्या अन्नाचा पर्वत रचून गोवर्धनोत्सव करावा, ब्राह्मणभोजनें घालावीं, दक्षिणा वाटाव्या वगैरे विधी सांगितले असून, ते न केल्यास कार्तिकस्नानादि पूर्वाचरित पुण्यकर्माचें फळ नष्ट होतें असें वर्णन आहे.

दीपावलीच्या सणांतील शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीज ! यम आणि यमुना हीं भावंडें असून सूर्याची अपत्यें. कार्तिक शुद्ध द्वितीयेचे दिवशी यमुनेच्या निमंत्रणावरून यमराज आपल्या भगिनीकडे भोजनास गेले. सबब ह्या दिवशीं

अस्यां निजगृहे पार्थ न भोक्तव्यमतो नरे :

कोणीहि आपल्या घरीं जेवूं नये-

यत्नेन भगिनीहस्ताद्भोक्तव्यं पुष्टिवर्धनम्

प्रयत्नानें बहिणीकडे जाऊन तिच्या हातचें चमचमीत जेवण जेवावें. ज्याला अनेक भगिनी असतील त्यानें धाकट्या बहिणीकडे जेवावें. धाकटी नसेल तरच थोरलीकडे जावें. सख्खी बहीण नसेल तर सावत्र, ती नसेल तर चुलत, नसेल तर मामेबहीण आणि तीहि नसेल तर मावस बहीण इत्यादि अनुक्रम सांगून पुराणकारांनीं प्रपन्निका म्हणजे मित्रभगिनीकडे भोजनास जावें, फार तर काय पण ती नसल्यास कोणाही स्त्रीला आणि तिच्या अभावी गाईला अथवा नदीला बहीण मानून जेवावें असें सांगितलें आहे. जो ह्या दिवशीं अशा रीतीनें भोजन करणार नाहीं न कुर्याद्वर्षजं पुण्यं नश्यतीति रवे: श्रुतम्. त्याचें एका वर्षांतील सर्व पुण्य नष्ट होईल आणि जी स्त्री या दिवशीं आपल्या बंधूला आदरपूर्वक भोजन घालणार नाहीं या न कुर्याद्विनश्यंति भ्रातर: सप्त जन्मसु तिला सात जन्म बंधुसुख मिळणार नाहीं असें पद्म पुराणकर्ते म्हणतात.

वास्तविक पहातां धनत्रयोदशी आणि ही यमद्वितीया यांचा संबंध केवळ हे दिवस दिवाळीच्या तीन दिवसांच्या आगेमागें आल्यामुळेंच त्या सणाशीं जोडला गेला आहे. बळीराजाच्या तीन दिवसांच्या महोत्सवाशीं त्यांचा कांहीं एक संबंध नाहीं. पण आतां ज्या अर्थी शेकडों वर्षाच्या रूढीनें हा संबंध

जडला आहे त्याअर्थी दिवाळीचा सण आम्हीं त्यांतील ग्राह्याग्राह्य गोष्टींचा विचार करून साजरा केला पाहिजे आणि मन:सामर्थ्यानें त्या सणापासून आपलें साजरें करून घेतलें पाहिजे. इतकें सांगून आणि पुढें सवडीप्रमाणें नुकत्याच गेलेल्या पाडव्याच्या सणासंबंधानें लिहिण्याचें अभिवचन देऊन, सांप्रतच्या रूढीमुळें आमचें दिवाळें काढण्यास कारणीभूत होत असलेल्या ह्या दिवाळीच्या सणाची येथेंच रजा घेतों.

□□□

अग्रलेख

सर्चलाईट विझाला !

नेपोलिअन बोनापार्टचें एक वचन आहे कीं 'या जगाचें नियंत्रण कल्पना करीत असतें.' जर जोशुआ रेनॉल्डस ह्मणत असे कीं ''सर्व कला मर्यादित आहेत; पण या जगांत अनियंत्रित, मोकाट सुटलेली व त्रिभुवनांत वाटेल तेथें बिनधोक जाणारी येणारी जर एखादी चीज असेल, ती ती कल्पनाच होय.'' मानवांचे सर्व बरे वाईट व्यवहार, त्यांच्या सर्व चळवळी, उलाढाली, युद्धें या कल्पनाशक्तीच्या स्प्रिंगवरच आपापल्या हालचाली करीत असतात. ही स्प्रिंग आकुंचित झाली तर कलुषाकबजीच्या मताप्रमाणें करंगळीच्या आंगठींत हिरकणीप्रमाणें बसवितां येते; तोच तिनें आपला व्याप वाढविण्याचें मनांत जर का आणलें, तर साऱ्या विश्वाला गिळून तिची वृद्धीची भूक कायमच्या कायम रहाते. सुखाचा सुकाळ करण्यासाठीं मनुष्य आपल्या कल्पनेला शक्य तितका आत्यंतिक तणावा देऊन वाढवीत असतो. आपलें काव्य अजरामर व्हावें, इतर कवींच्या कल्पना-भांडारापेक्षां माझ्या काव्यांतलीं कल्पना-चातुर्याचीं रत्नें विशेष मोलवान व झगझगित ठरावीं आणि माझ्या कल्पनेच्याइतकीं उंच भरारी या जगांत कोणालाहि मारतां येऊं नये, यासाठीं कविजन आपल्या कल्पकतेला वावडीप्रमाणें अंतराळांत उंचउंच भिरकावीत असतात. राजकारणाचे डांवपेंच लढविण्यासाठीं मुत्सद्दी जन आपल्या कल्पनाचातुर्यांचा एक धागा शक्य तितका खोल पाताळांत गाडतात, तों दुसरा धागा साऱ्या जगाचीहि दृष्टि चकेल इतका उंच झुगारून देतात. ज्या मर्यादित बुद्धिमत्तेच्या रवीनें कल्पनेच्या अफाट व अगाध सागराचें मंथन करून मानवांनीं खुद्द परमेश्वराची लांबीरुंदी उंची मापण्यास कमी केलें नाहीं, त्याच कल्पना-मंथनांतून आज बीनतारी संदेशयंत्राचें रत्न त्यांनीं पैदा केलें आणि आणि पृथ्वीच्या पार अंतराळांत असणाऱ्या शनिमंगळादि ग्रहांवरील रहिवाश्यांशीं, रोटीबेटी व्यवहार शक्य नसला तरी निदान, संदेशव्यवहार करण्याची उमेद बाळगिली आहे. सारांश, हृदयाशीं संतत धडधडणाऱ्या आत्मरामाच्या चैतन्यशक्तीच्या पाटाला पाट लाऊन बसणाऱ्या कल्पनाशक्तीनें आम्हा मानवांची सारी धडपड अव्याहत धडधडत ठेविली आहे. कल्पनेच्या मंत्राचा संदेश आला कीं आम्हीं आमच्या मनाच्या स्वराज्यांत हव्या त्या बातबेताचे गगनचुंबीत मनोरे भराभर रचतांना आपल्या ताकडीकडे पहात नाहीं, बुद्धीच्या मर्यादितपणाची कुंपण आड आली तरी त्याची पर्वा करीत नाहीं, आणि विशेष आश्चर्याची

व हास्यास्पद गोष्ट ह्मणजे आमचें आयुष्य क्षणभंगुर आहे, पाण्याचा बुडबुडा आहे, बिजलीची नुसती चमक आहे, ही गोष्ट आह्मी पार विसरून जातों. कल्पनाशक्ति स्वतंत्र, तर मनुष्य पडला सर्वस्वीं परतंत्र. कल्पना चिरंजीव आणि विश्वव्यापी, तर आह्मी मर्त्य आणि मर्यादित. बसल्या जागीं कल्पनेच्या जोरावर आह्मीं पाताळनिवासी अमेरिकांनाना आश्चर्यानें थक्क करूं. कल्पनेंच्या सहाय्यानें फिरत्या पृथ्वीला तागडींत तोलून, चंद्राच्या क्षयवृद्धीचीं गणितें बोलबोलतां फटाफट सोडवूं. पण कल्पना शक्तीच्या धाग्याइतका आह्मां मानवांच्या आयुष्याचा धागा दणकट टिकाऊ व चिरंजीव नसल्यामुळें, आमच्या जिवाचा दिवा विझला रे विझला कीं कल्पनेच्या भांडवलावर चाललेल्या मनोरथाच्या व्यापाराचें दिवाळें चुटकीसरसें वाजतें. बातबेताचे किल्ले धडाधड कोंसळतात. महत्वाकांक्षेच्या ठिकऱ्याठिकऱ्या उडतात. पसरलेल्या व्यापांचें प्राण काळवंडूं लागतात आणि कोठच्या कोठें या मर्त्यमानवाची संगत धरून अखेर मी खाड्यांत पडलें, ह्मणून पश्चात्तापाच्या झटक्यानें झीट येऊन कोसळणाऱ्या कल्पनाशक्तिच्या दणक्यानें सारें जग हादरूं लागतें.

श्रीमन्महाराज शाहू छत्रपतींची निधनवार्ता ऐकून गेल्या ६ मे रोजीं साऱ्या जगाला याच दणक्याचा अनुभव आला. छत्रपतींचें घराणें व तक्त हीं महाराष्ट्राच्या विशुद्ध प्रेमाचीं पूज्य दैवतें आहेत. या दैवतांकडे आशापूर्ण नेत्रांनीं आपल्या भाग्योदयाच्या सूर्यप्रकाशाची वाट महाराष्ट्र आतुरतेनें पहात असतो. करवीरकर छत्रपति महाराष्ट्राच्या पुनर्घटनेचे आत्मा होते. यामुळें तर त्यांच्या आकस्मिक निधनवार्तेचा धक्का महाराष्ट्राला अत्यंत भयंकर प्रमाणांत भासल्यास नवल नाहीं. महाराजांच्या अनपेक्षित मृत्यूमुळें स्वत: त्यांच्या कल्पनाशक्तीचा संचार बोलबोलतां अकल्पनीय स्थितींत जरी ठिकच्याठिकाणीं गतिशून्य झाला, तरी तिच्या तीव्रगामी यंत्राचा एकाकी स्फोट झाल्यामुळें, साऱ्या जिवंत दुनियेच्या कल्पनाशक्तीला त्या स्फोटानें गदगदा हालवून

एक दिन जाना रे भाई

या कबीराच्या उक्तीचें प्रत्यक्ष प्रत्यंतर आणून दिलें. आशावादाची घमेंड मारणारांना कांहीं वेळ तरी निराशेच्या दर्यांत गटंगळ्या मारण्यास भाग पाडण्यासारखा हा चमत्कार घडला. महाराजांच्या मृत्यूनें साऱ्या विवेकी जगाची कल्पनाशक्ति आश्चर्यानें व निराशेनें स्तिमित झाली. महाराजांच्या चरणसेवेंत हयात घालविणाऱ्या हुजऱ्यांपासून तों राजकारणाच्या क्षेत्रांत 'बेस्ट अलाय्' (उमदा दोस्त) मानणाऱ्या जॉर्ज बादशहापर्यंत सर्वांचीं अंत:करणें, महाराजांच्या आकस्मिक निधनामुळें, दुभंगलीं आहेत. शाहू छत्रपती हे राजपुरुषांत, समाज-सुधारकांत, विद्याप्रसारकांत आणि अस्पृश्योद्धारकांत सक्रीय तडफडीचे अग्रणी असल्यामुळें, त्या त्या क्षेत्रांतल्या लोकांच्या महत्वाकांक्षेला बसलेला जबरदस्त धक्का कदाचित् स्वार्थमूलक ह्मणून, आपण त्यांच्या शोकमग्न स्थितीकडे कानाडोळा केला तरी क्षणभर क्षम्य ठरेल. परंतु वाचकहो, विचार करा. ज्या छत्रपतींची स्वारी नुसत्या शिकारीला निघाली तरी कमींत कमी ५० माणसांचा परिवार सहज बरोबर असायचा; भराभर सुटणाऱ्या ज्यांच्या सरकारी व खासगी हुकुमांची ताबिली करण्यासाठीं दिवाण साहेब, प्रायवेट सेक्रेटरी, खानगी कारभारी यांची फलटण जय्यत असें; त्या सर्व समर्थ महाराजांच्या अंतकाळीं त्यांच्या प्रिय राणीसाहेब लाडके युवराज किंवा खास विश्वासु दिवाणसाहेब यांपैकीं एकालाहि त्यांच्या पुण्यदर्शनाचा अखेरचा लाभ लाभूं नये, हा विपरीत दैवयोगाचा वज्राघात त्यांनीं कसा काय सहन केला असेल, तो त्यांचा त्यांनाच माहित ! त्या बिचाऱ्यांच्या

काळजांतून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या असतील, शोकातिरेकाच्या पहिल्याच किंकाळी त्यांचा आवाज नष्ट झाला असेल आणि हृदयांत दु:खाचा दर्या दुथडी तुफान खवळल्यामुळें त्यांचे खडपे खडपे उडाले असतील ! राणीसाहेब झाल्या काय, युवराज झाले काय, कागलकर खानवीलकर असले काय किंवा दिवाणसाहेब सबनीस असले काय; त्यांचे लौकिकी अधिकार कांहींहि असले तरी तीं बोलून चालून तुह्मा आह्मांप्रमाणें माणसेच ना ! अधिकाराच्या टेकड्यांच्या चढणी उतरणी कितीहि उंचनीच असल्या, तरी विकाराचें मैदान कोठेंहि पाहिलें तरी सरधोपट सपाटच आढळणार !

श्री मन्महाराज शाहु छत्रपति हे एक असे द्वितीय पुरुषश्रेष्ठ होते कीं ते अनेकांना अनेक रंगांत दिसत असत. नानाविध लोक त्यांना नानाविध दृष्टीनीं पहात असत व ते त्यांना तसे दिसतहि असत. नव्हे, आम्ही स्पष्टच म्हणतों कीं ते खरोखरच नानारंगीं महापुरुष होते. पण त्यांत मुख्य खुबी मात्र ही असे कीं प्रत्येक रंगांत त्यांचें प्राविण्य त्यांच्या प्रतिस्पर्ध्याला जागच्या जागीं चारी मुंड्या चीत करण्याइतकें शंभर नंबरी तेखदार असे. चित्पावनांना ते वैऱ्याप्रमाणें दिसत, देशस्थांना धार्मिक क्षेत्रांतल्या बंडखोरांप्रमाणे भासत, मुंबई व हिन्दुस्थान सरकारला ते 'प्यारे दोस्त' असत, ब्राह्मणेतरांना ते मायबाप वाटत, तर अस्पृश्यांना ते खास परमेश्वराचे अवतारच भासत असत. आज हिन्दुस्थानांत लॉर्ड डलहौशीच्या पाट्यावरवंट्यांतून बचावलेलीं संस्थानें व संस्थानीक कांहीं थोडथोडके नाहींत. पण त्या सर्वांची बुद्धिमत्ता एकांगीच. शाहु महाराजांचें गाडें अगदींच न्यारें ! क्षेत्र राजकीय असो, सामाजिक असो, धार्मिक असो किंवा कसलेंहि असो, त्यांत महाराजांचें प्राविण्य तुफानी मेघगर्जनेप्रमाणें दाणादाण उडविल्याशिवाय राह्यचेच नाहीं. एखाद्या चळवळींत कोल्हापूर सरकारची उडी पडली कीं

वाघोबाची स्वारी आली रे आली

असा सर्व प्रतिस्पर्ध्यांना एकजात दांडगा वचक बसत असे. असला हा 'महाराष्ट्राचा पटाईत वाघ' दुर्दैवाने एकाएकीं शांत झाल्यामुळें अनेक चळवळी व संस्था यांचें चैतन्यच नष्ट होतें कीं काय अशी वाजवी भीति आज उत्पन्न झाली आहे. त्यांच्या दीर्घसूत्री कल्पनाशक्तीनें उभारलेल्या अनेक मनोरथांच्या इमारती ठिकठिकाणीं अपूर्ण स्थितींत पडलेल्या आहेत. लोकजागृतीच्या चैतन्याचीं बीजें सर्व महाराष्ट्रभर पेरून, त्यांपैकीं कित्येकांचीं जोमदार रोपडीं व टवटवीत कळ्या त्यांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिल्या, हें खरें; तथापि त्या इमारतींची पूर्णता करणें व ठिकठिकाणच्या नानाविध चैतन्याच्या रोपड्यांना वडिलांच्या मागें पाणी खत घालून त्यांचे मोठमोठे वृक्ष बनविण्याची कामगिरी सरळ रेषेंत श्रीमद्युवराज उर्फ आमचे नवीन छत्रपति राजाराम महाराज यांच्यावरच येऊन पडत आहे, हें सांगणें नको.

वरवर पाहिलें तर छत्रपतींच्या निंदकांची संख्या बरीच असावी, असा समज होतो; पण हा समज खोटा आहे. प्रत्यक्ष प्रमाणावरून असें सिद्ध होईल कीं त्यांच्या निंदकांचा आरडाओरडा राष्ट्रीय मुशींतला असल्यामुळें त्याचा आवाज रिकाम्या घागरीप्रमाणें जरी बराच घुमतो, तरी छत्रपतींच्या चहात्यांची व त्यांना माबाप किंवा देवाप्रमाणें मानणाऱ्या लोकांची संख्या मोजवणार नाहीं इतकी अफाट आहे. प्रस्तुत प्रसंगीं छत्रपतींच्या निंदकांच्या कारस्थानांची परिस्फुटता आम्ही करूं इच्छित नाहीं; तथापित एवढें मात्र सांगणें प्राप्त आहे कीं हा निंदकांचा संप्रदाय महाराष्ट्रांत स्थापन करण्याचें पुण्य पुण्याच्या केसरीनें मिळवून, आपल्या विशिष्ट समाजाची छत्रपति-द्वेषाची परंपरा अखंड पुढें चालविली आहे. खुद्द टिळक हयांत असतांना अहिनकुलवत्

एन ४००६--१४

निदान बराच सभ्यपणानें चालत असे. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर श्री. नरसोपंत केळकरांनीं महाराजांना 'स्वराज्यद्रोही छत्रपति' ठरविण्याचा जो पोरकट उपव्याप केला आणि कित्येक बेअक्कल मराठ्यांना हातीं धरून रस्त्यावर त्यांना धोंडे मारविण्याचा व खोट्या फिर्यादी करून त्यांच्या अब्रूला मलीन करण्याचा, आपल्या राष्ट्रीय पक्षाच्या पंखाखालीं, जो अश्लाघ्य नातुशाही प्रयत्न केला, त्यामुळें तर केसरीच्या राष्ट्रीयत्वाचा हलकटपणा बहुजनसमाजास अधिकच सप्रमाण प्रत्ययास आला. ज्या वेळीं केसरीचें 'स्वराज्यद्रोही' आर्टीकल महाराजांनीं वाचलें, तेव्हां ते खदखदा हंसले व ह्मणाले "Poor chap ! Politics is not so cheap !!" (मूर्ख बेटा ! राजकारणाचा मामला इतका सवंग झालेला नाहीं.) महाराजांच्या निंदकांची रिक्रुटभरती केसरी कंपूकडून जसजशी होत असे, तसतशी त्यांच्या चहात्यांची व भक्तांचीहि संख्या सहस्र पटीनें वृद्धिंगत होत असे.

श्रीमंत सयाजीराव गायकवाडाप्रमाणें छत्रपतींनीं 'तत्राप्'चीं व्याख्यानें फारशीं झोडलीं नाहींत. श्री. बाबासाहेब इचलकरंजीकरांप्रमाणें इंग्रजी मराठी ग्रंथसंभार प्रसविला नाहीं. तथापि त्यांचें ज्ञान अगदीं 'अपटुडेट्' असे. दररोज भोजनोत्तर हिन्दुस्थानांतलीं कांहीं प्रसिद्ध वर्तमानपत्रें ते आपल्या रीडरकडून नियमीत वाचवून घेत असत. त्यांची स्मरणशक्ति इतकी अचाट असे कीं १५-१५ वर्षांपूर्वी झालेल्या संभाषणांतलीं वाक्यें ते जशीच्या तशी बिनचूक पाठ ह्मणून दाखवीत असत. सरकारी प्रकरणांच्या बाबतींत रेफरन्स सांगण्यांत तर त्यांनीं शेंकडों वेळां आपल्या रेकॉर्डकीपरलाहि चकवायला सोडलें नाहीं. कोण व्यक्ति कोठें काय काय चळवळ करीत असते याची माहिती त्यांना भरपूर असे. याचें एकच उदाहरण देतों. सन १९०३ सालीं छत्रपति महाराज दिल्ली दरबारासाठीं दिल्लीस गेले होते. तेथें त्यांना रायबहादुर भाईसाहेब गुप्ते यांची आठवण झाली. त्यावेळीं रा. ब. गुप्ते इंदोरचे नायब कारभारी व सेनापति होते. स्वत:च्या कर्तबगारीनें प. वा. व्हिक्टोरिया महाराणी एडवर्ड बादशहा यांच्या खास पंक्तीचा बहुमान मिळविणाऱ्या रायबहादुरांना महाराजांनीं ताबडतोब बोलावणें पाठविलें. गुप्ते येतांच, भरदरबारांत त्यांना छत्रपतीनीं खडी ताजीम देऊन ह्मटलें ''आह्मां राजे लोकांकरितां, आपल्या मालकांकरितां, आपलें सर्वस्व खर्ची घालणारा मायचा पूत-सच्चा कायस्थ बच्चा-कसा आहे, तो प्रत्यक्ष पहाण्याची इच्छा झाल्यामुळें आपणांस भेटीकरितां बोलावून आणलें.'' सारांश, शाहु महाराजांची बुद्धिमत्ता सर्वांगश्रीमंत, तीक्ष्ण आणि अत्यंत जागरूक असे.

परंतु महाराजांची कीर्ति महाराष्ट्रेतिहासाच्या मंदीरांत अजरामर ठेवण्यासारखें लोकोत्तर कार्य त्यांनीं जें केलें, तें ब्राह्मणेतरांची सामाजिक व धार्मिक पुनर्घटना हें होय. आद्य छत्रपति शिवाजी महाराजांच्या वेळेपासून तों सातारच्या शेवटल्या प्रतापसिंह छत्रपतीच्या दुर्दैवी नाशापर्यंत, जी गोष्ट एकाहि तक्तनशीन छत्रपतीला साध्य झाली नाहीं, ती गोष्ट शाहु महाराजांनीं बोलबोलतां यशस्वी करून दाखविली. भिक्षुकशाहीचें बण्ड मोडून ब्राह्मणेतर समाजांना स्वत:चें सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्य जाहीर करण्याइतकें नैतिक धैर्याचें चैतन्य अखिल महाराष्ट्रांत थरथरविण्याची महाराजांनीं जी अद्भुत कामगिरी बजावली आहे, तिचें महत्व राष्ट्रीय प्राण्यांच्या नातुशाही धांगडधिंग्यामुळें आज जरी कोणाच्या नीटसें ध्यानांत येणार नाहीं, तरी धांवत्या काळाच्या टांचाखालीं भिक्षुकशाही चाणक्यांच्या कारस्थानाचा चेंदामेंदा उडतांच, सारा हिन्दु समाज, सारें हिन्दु राष्ट्र, सारी विवेकी दुनिया आद्य छत्रपती इतक्याच

गौरवानें शाहु छत्रपतींच्या नांवाचा आदरपूर्वक गौरव करतील. कुत्र्याच्या शेपटाप्रमाणें मनाची सनातन वक्रता धारण करणारे केसरीकर महाराजांच्या मृत्युलेखांत साळसूदपणाचे नक्राश्रु गाळतांना ह्मणतात कीं ''धर्मशास्त्र, राजकारणशास्त्र, समाजशास्त्र या तिन्हीमध्यें वक्र (?) बुद्धीचा नांगर खोल घालून सत्तेच्या बळावर शाहुमहाराजांइतकी हल्लींच्या काळांत दुसऱ्या कोणीहि विचारी जमीन उलथी पालथी केली नसेल. त्यांनीं केलेल्या मेहनत-मशागतीनें कोणत्या प्रकारचें पीक आलें हें लोकांना दिसतच आहे.'' या उद्गारांतली वक्रोक्ति व व्यंगोक्ति क्षम्य मानून, आह्मीं केसरीकारांना नम्रपणें बजावून सांगतों कीं खरोखरच महाराजांच्या नानाविध चळवळींनीं दक्षिण महाराष्ट्रांत जें मुबलक पीक आलें आहे, तें इतकें जोमदार व सकस आहे कीं त्याचा मृत्यु महाराजांच्या मृत्यूनें होणारा नव्हे. तें पीक 'लोकांना दिसत आहे' तुह्मांला भासत आहे आणि जसजसा अधिक काळ लोटेल तसतसें तें नातुप्रासादिक राष्ट्रीय भिक्षुकांच्या उरावर थैथै नाचणारहि आहे. हें पीक ह्मणजे पुणेरी देशभक्तांचें पीक नव्हे. हें पीक ह्मणजे राष्ट्रीयांच्या कुप्रसिद्ध तोंडचोंबडेपणाचें पीक नव्हे. हें दीनदुनियेच्या जागृतीचें पीक आहे. भिक्षुकशाही बण्डाचा समूळ विध्वंस करणाऱ्या अस्सल लोकशाही चैतन्याचें अमर्त्य चैतन्य आहे. वांकड्या दरांत वांकडी मेंख मारणाऱ्या कर्तबगार छत्रपतींच्या पटाईत कल्पनाशक्तीचा हा थैमान आहे. या थैमानचा हादरा महाराजांच्या हयातीतच एवढा जबरदस्त प्रसृत झालेला आहे कीं त्यांच्या मृत्यूची बातमी पोहचतांच ज्या तुमच्या सातारकर अधम सांप्रदायिकांनीं पेढ्यांची खैरात वाटली, त्या अधमांचें किंवा खुद्द तुमचें, सातारा जिल्ह्यांतल्या एखाद्या खेडेगांवांत जाऊन फंडासाठीं फुटकी कवडी किंवा स्वराज्य प्रवचनावर मुठभर डाळतांदूळ मिळविण्याचें मात्र आतां तोंड नाहीं. तथापि तुमच्या दिवाभीती लीला बंद व्हाव्या अशी आह्मी सूचना करणार नाहीं. ''सूक्ष्म दृष्टीनें पहाणाऱ्या तत्वज्ञान्यास मनुष्यस्वभावाच्या शास्त्रांत अनेक अपूर्व सिद्धांत सुचविण्याइतकी विपुल सामुग्री महाराजांनीं आपल्या चरित्रानें पुरविली आहे.'' हा केसरीकारांचा शेरा मात्र आम्हीं साभार मान्य करतों.

शाहुमहाराजांच्या मृत्यूनें एक पट्टीचा राजकारणी मुत्सद्दी, खंबीर समाजसुधारक, धैर्यवान् धर्मक्रान्तिकार, सक्रीय अस्पृश्योद्धारक, जगप्रसिद्ध पहिलवान, निधड्या छातीचा शिकारी, राष्ट्रीय पक्षाच्या कारस्थानी मार्गांतला कांटा आणि दीनदुनियेच्या भवितव्यतेवर प्रकाश पाडणारा सर्चलाईट नाहींसा झाला, असेंच ह्मटलें पाहिजे. नवीन छत्रपति सरकार आपल्या कीर्तिमान् वडिलांचे उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून, त्यांच्या सर्व अपूर्ण राहिलेल्या मनोरथांच्या इमारती 'सवाई शाहु' तडफीनें पूर्ण करून, आपलें पवित्र कर्तव्यकर्म बजावतील, अशी आह्मांला उमेद आहे. कै. छत्रपतींच्या आत्म्याला जगदीश चिरकाल शान्ति देवो !!

□□□

एन ४००६--१४अ

स्फुट विचार

पाद्र्यांचा पाजीपणा

हिन्दु मिशनरी सोसायटीतर्फे हिन्दुधर्माच्या माहेर घरीं परत आलेल्या कोळी बान्धवांपैकीं डुबीबाई नाखवा या वृद्ध बाई १५ एप्रिल रोजीं मृत्यु पावल्या. मरणसमयीं त्या हिन्दुधर्मीयच असल्यामुळें त्यांचें प्रेत अग्निसमर्पण करण्यासाठीं सोनापूरच्या स्मशानांत नेण्यांत आलें. इतक्यांत एका पाद्र्याने धांवत धांवत जाऊन सोनापूरच्या कारकुनाचा कान चावला की मयत बाई पूर्वी क्रिस्ती होती; तेव्हां तिचें प्रेत स्मशानांत कसें जाळूं देणार? सोनापूरांतला कारकून जरी हिन्दु असला तरी बोलून चालून मुडदेफरास. आला मुडदा, घे त्याचें नांव टिपून, दे त्याला जाळण्याची परवानगी. हा बिचाऱ्याचा धंदा. शुद्ध बचंभटजीचा अवतार. एक बचंभटजी होते. गांवांत कोणीही मेला, तरी त्याची स्मशानक्रिया करायला केव्हांहि बचंभटजीच जायचे. अर्थात् त्यांना बोलवावयास येणारी मंडळी नेहमीं स्मशानयात्रेकरूच असायचे! दुर्दैवानें एक दिवस बचंभटजीच्या नातलगांच्या घरीं लग्न निघालें. तेव्हां रीतीप्रमाणें तो नातलग बचंभटजींना निमंत्रण करण्यासाठीं कुंकमांकित अक्षता, करवल्या वगैरे बरोबर घेऊन, त्यांच्या ओसरीवर गेला, आणि बचंभट बचंभट म्हणून हांका मारूं लागला. बचंभटाच्या टाळक्यांत रात्रंदिवस स्मशानविधीचें मंत्र घुमत असायचे. ते दरवाजा न उघडतां आंतूनच ओरडून ह्मणतात, ''अहो ओरडतां किती. तुह्मी स्मशानांत पुढें व्हा, सरण बिरणरचा, प्रेत वर चढवा, मी आलोंच.'' याच मासल्याचें आमचें सोनापुरांतलें हिंदु कारकून. त्यांचें सारे जग मुडदे लाकडे आणि सरण, एवढेंच. हिंदु मिशनरी सोसायटी म्हणजे काय, पतितपरावर्तन म्हणजे काय, याची त्या बेट्याला दाद कोठली ! शिवाय आकाशांतल्या बापाच्या प्रतिनिधींनी येऊन कान चावलेला ! डुबी बाईंची प्रेतयात्रा भजनाचे टाळ वाजवीत सोनापुरच्या दरवाजाशीं येतांच या बचंभटजीनीं त्यांना मज्जाव केला. पाद्र्यानें ओढून लांब केलेले बचंभटजीचे कान श्री. आनंदरावजी नाखवा यानीं आखूड करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. सरते शेवटीं श्रीमंत रावजी शंकरशेट (सोनापूरच्या व्य. मं. चे अध्यक्ष) यांची लेखी परवानगी आणून प्रेताचें दहन यथाविधी करण्यांत आलें. या प्रकरणाची सविस्तर हकिगत २४।४।२२ च्या हिंदु मिशनरींत प्रसिद्ध झाली आहे. पतितपरावर्तनी जनांना हिन्दुत्वाचे सर्व अधिकार प्राप्त होतात किंवा नाही, याचा निर्णय ठरविणारा असला एखादा मासलेवाईक खटका केव्हांतरी उडणारच होता आणि तो अखेर उडून

त्याचा समाधानकारक निर्णय श्रीमंत रा. सा. रावजीशेट यांच्या हातूनच लागला, याबद्दल स्वर्गस्थ नानाशंकरशेट आनंदाश्रु गाळीत असतील. परंतु या प्रकरणांत पाद्र्यांनीं जो लत्कोडगेपणाचा लांडा कारभार केला, तो मात्र अत्यंत तिरस्करणीय होय. काळे किंवा पांढरे झगे घालून येशूच्या नांवावर असलीं पाजीपणाची कृत्यें करणारे भक्त साऱ्या हिन्दुस्थानभर बोकाळलेले पाहून आकाशांतला बाप आपला ऊर बडवीत बसला असेल. समजा, एकाद्या क्रिस्त्याचें प्रेत मुद्दाम किंवा नकळत हिन्दूंच्या स्मशानभूमींत जाळलें गेलें असतें, तर क्रिश्चन धर्मावर कांहीं एटना ज्वालामुखी कोसळला नसता. फार झालें तर, न्यायाच्या दिवशी ती मयत व्यक्ति आकाशांतल्या बापाच्या दरबारांत गैरहजर राहती तर त्यांत पाद्र्यांच्या बापाचें काय जातें? आम्ही या पाद्र्यांना विचारतों कीं ज्या वेळीं तुमचे काका नारायण वामन टिळक वारले, त्या वेळीं त्यांनी 'माझ्या प्रेताला काळ्या कपड्याचा विटाळ होऊ देऊं नये व माझें प्रेत हिन्दूंच्या पद्धतीप्रमाणें अग्नीला समर्पण करावें' असें मृत्युपत्र लिहून ठेवलें व त्या मृत्युपत्राची त्यांच्या पत्नीनें व चिरंजीवानें अक्षरश: अमंल बजावणी केली. त्या वेळीं पाद्रीजनहो, मेल्या मुडद्याच्या आत्म्याच्या तारणाची तुमची कळकळ कोठें गेली होती? त्या वेळी 'रेव्हरंड साहेबांचें प्रेत, लक्ष्मीबाई, येशू क्रिस्ताकडे पाहून, क्रिस्ती धर्माच्या अब्रुसाठीं, क्रिस्तायणाच्या इभ्रतीसाठीं आपण जाळूं नका,' अशी विनंति करण्यासाठीं तुम्हां पाद्र्यांची कां छाती झाली नाहीं? डुबीबाईसारख्या अल्पशिक्षित समाजांतील लोकांच्या परावर्तनाचा सूड घेण्यासाठी असलीं भ्याड आणि नामर्दपणाचीं कारस्थानें मात्र करतां काय? कोळी बांधवांच्या अशिक्षितपणाचा, व्यसनातिरेकाचा व मूढतेचा फायदा घेऊन त्यांचें हिन्दुधर्मांत होणारे पतितपरावर्तन तुम्ही पाद्र्यांनीं बेवड्याच्या बाटल्यांच्या तटानें अडवून धरिलें आहे, हें आम्ही जाणून आहों. परंतु उत्क्रांतिचक्र आतां उलटें फिरलें आहे. त्याच्या गतीकडे लक्ष देऊन आपला शहाणपणा विशेष पाघळूं न देण्यांतच तुमच्या धर्माची झांकली मूठ सव्वा लाखाची राहील हें ध्यानांत ठेवा.

जनार्दनाच्या सेवेची संधि

गेल्या एप्रिल महिन्याच्या २८-२९-३० रोजीं सर्व हिन्दुस्थानभर श्रीशिवाजी महाराजांचा जयंत्युत्सव फारच मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यांत आला. शिवाजी महाराज हे असे अद्वितीय राष्ट्रवीर होऊन गेले आणि त्याचें चारित्र्य इतकें देदिप्यमान आहे कीं कोणत्याहि राष्ट्रानें या हिंदी राष्ट्रवीराला आपला कुलस्वामी अथवा राष्ट्रस्वामी म्हणून खुशाल राष्ट्रमंदिरांत पुजावा. विशेष कौतुकाची गोष्ट ही कीं यंदा मुंबईच्या पारशी राजकीय सभेनें आमच्या शिवाजी महाराजांची जयंति मोठ्या थाटामाटानें साजरी केली. महाराजांच्या चारित्र्याविषयीं जे विलक्षण कुग्रह जुन्या हेकड व कोत्या दृष्टीच्या परकीय बखरकारांनीं प्रचलित केले होते, त्या सर्वांना ब्रिटीश साम्राज्याच्या उद्याच्या बादशहांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेपुढें टोपी काढून साष्टांग प्रणिपात घातल्या घटकेपासून, अखेरची तिलांजली मिळाली. शिवराया प्रणिपात कराया ब्रिटानिया आली हा जो कल्पनातीत योगायोग १९-११-२१ रोजीं घडून आला, त्याचे

सुपरिणाम वाढत्या प्रमाणांवर लवकरच सर्वत्र दिसूं लागतील व शिवजयंतीचे व राज्यारोहणाचे समारंभ केवळ हिन्दुस्थानांतच नव्हे, तर अफगाणीस्थान, तुर्कस्थान, जपान, चीन, एशिआटिक व युरोपियन राष्ट्रांमध्येंहि, मोठ्या अहमहमिकेनें साजरे होत असल्याचा सोहळा पहाण्याचें भाग्य आपणांस लाभेल, अशी आशा करण्यास पुष्कळ जागा आहे.

या उत्सवपर्वण्यांत जनसेवकांना जनार्दनाची सेवा करण्याचें पुण्य लाभत असतें. तर अनेक जनसेवकांप्रमाणें यंदा आम्हांलाहि अनेक ठिकाणचीं आग्रहाची आमंत्रणें आली. परंतु एका व्यक्तीला अनेक ठिकाणीं जाणें शक्य नसल्यामुळें, आमच्या इतर ठिकाणच्या प्रेमळ बांधवांची निराशा करून आम्हांला साताऱ्यास जावें लागलें. दादर ठाणें मुंबई वऱ्हाड येथल्या मित्रांच्या विनंतीला नाइलाजानें नकार द्यावा लागला, याबद्दल त्यांची आह्मी अंत:करणपूर्वक क्षमा मागतो. सातारचा श्रीशिवजयंत्युत्सव यंदा ब्राह्मणेतर संघानें फारच मोठ्या प्रमाणावर साजरा केला. ब्राह्मण मंडळींत कांहींहि विशेष हालचाल नव्हती. व्याख्यानप्रसंगीं मात्र ते बरेच हजर असत. परंतु ता. ७-५-२२ च्या लोकमान्य दैनिकांत जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे, तो मात्र एकतर्फी खोटा व बनावट आहे, हें आह्मी स्वानुभवानें सांगतो. एका ठिकाणच्या प्रत्यक्ष अनुभवावरून असें विधान करण्यास कांही हरकत नाहीं कीं राष्ट्रीय पत्रांत प्रसिद्ध झालेले इतर ठिकाणचे रिपोर्टहि असेच निवळ कागदी, बनावट व खोटे असावे. लोकमान्यांतला रिपोर्ट अक्षरश: खरा की खोटा याचा खुलासा सातारचे वकील श्री. सोमण व श्री. घाणेकर यांनीं आपल्या सद्‌सद्विवेकबुद्धीला स्मरून करावा अशी आह्मीं त्यांना विनंति करतों. ब्राह्मणेतर संघामार्फत झालेल्या प्रचंड उत्सवांत सर्व जातीच्या जनतेनें सक्रीय भाग घेतला होता. आमच्या तीनहि व्याख्यानांना २ ते ३ हजारापर्यंत जनसमुदाय जमत असे व मुसलमान बांधवांचीहि गर्दी बरीच असे. आमची वेडीवांकडी सेवा सातारच्या जनतारूप जनार्दनानें गोड करून घेतली आणि समारंभांत व्यत्यय आणण्याच्या 'राष्ट्रीय कारस्थानांना बळी न पडतां, तीन दिवस आमचीं व्याख्यानें कळकळीनें ऐकून घेऊन, आह्मांला प्रेमानें निरोप दिला, याबद्दल सर्व भगिनी बांधवांच्या चरणी कृतज्ञांत:करणानें आह्मी माथा ठेवितों. आमच्या तीन व्याख्यानांचा साद्यंत रिपोर्ट 'विजयी मराठा' पत्राच्या बातमीदारानें घेतला आहे. तो प्रसिद्ध झाल्यास पुरवणीरूपानें प्रबोधनाच्या वाचकांच्या चरणीं सादर रुजूं करूं.

हुंडेबाजांवर बहिष्कार कसा घालावा?

अशी पृच्छा करणारीं कांहीं पत्रें आम्हांला आलेलीं आहेत. पिकेटिंगवर सध्यां तरी भरंवसा ठेवतां येत नाहीं. दारूबाजीचें उच्चाटण करण्याच्या कामीं पिकेटिंग फोल ठरल्याचें उदाहरण अगदीं ताजें आहे. या कामी लोकमत-जागृतीचीं जेवढीं साधनें असतील तेवढींच सध्यां उपयोगांत आणावीं. हुंडेबाजी ही दारूबाजी इतकीच घाणेरडी व्यसनाची चाल आहे, हें ज्यांना मन:पूर्वक वाटत असेल, त्यांनीं पुत्रविक्रय किंवा कन्याविक्रय करणाऱ्या अधमाधमांशीं असहकारिता स्वत: पुकारून, समान मनोधर्माच्या नातेवाईकांस व मित्रांस, विशेषत: आपल्या व त्यांच्या घरांतील स्त्रियांस त्या शायलोंकी

विवाहांवर कडकडीत बहिष्कार घालण्यासाठीं मनधरणी करावी. हुंडेबाज लोक दारुबाजांप्रमाणेंच सामाजिक अध:पात करीत असतात, नीतिमत्तेला लाथाळतात व पर्यायानें राष्ट्रद्रोहाचें पातक करितात, हें आतां अगदीं हडसून खडसून सिद्ध झालेलें आहे. अर्थात् हुंडेबाजांच्या घरीं भोजनास जाणें ह्मणजे गोमांसभक्षणा इतकेंचि घोर महापातक करणें आहे, हा विचार ज्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला पटत असेल, त्यांनीं निमूटपणें स्वत: बहिष्कार व्रताचें आचरण स्थानिक क्षेत्रांत घालून दाखवावें. अशीं १०-१२ उदाहरणें जर जागोजाग घडून येतील, तर त्याचा परिणाम फलदायी होईल. अट्टल दारुबाज सुद्धां दारु पितांना लपूनछपून पितो. प्रतिष्ठित 'टेंपरन्स' वाले (मितपानवादी) लोकसुद्धां कॉग्नॅकचीं बुचें खोलीचें दार लावल्यानंतर खोलतात. याच रीतीनें नि:शब्द परंतु सक्रीय प्रतिकाराच्या व असहकारितेच्या चळवळीमुळें हुंडेबाज अधम गुपचूप हुंडा घेऊं लागले, तरीहि ती काय थोडी थोडकी सुधारणा झाली? खवदाडांत मुस्कट फिरवून दारू ढोंसणांराना जसे एवढें खास पटलेलें असतें कीं दारू पिणें हें घोर पातक आहे, तसेंच चोरून हुंडा घेणाऱ्यांना आपण कसलें भयंकर समाजद्रोही पातक करीत आहोंत, ही जाणीव उत्पन्न झाल्याशिवाय कशी राहील? सर्व हुंडाविरोधक बांधवांना अशी आग्रहाची विनंति आहे कीं कुमारिकांचे शाप हें पुस्तक त्यांनीं स्त्रीवर्गाकडून अवश्य वाचवून घ्यावें अगर मुद्दाम वाचून दाखवावें. हुंडाप्रतिकाराच्या बाबतींत कुमारिकाच जेव्हा दृढनिश्चय करतील व सर्व स्त्रीवर्ग त्यांच्या बाजूनें प्रतिकाराची मोहीम करण्यास सिद्ध होईल, तेव्हांच हुंडेबाज शायलॉकांच्या लीला बंद पडतील. भगिनींनो, प्रबोधन आपल्या सहायाची प्रणितापूर्वक याचना करीत आहे.

ही प्रतारणा कां?

नुकतीच श्रीशिवजयंति सर्वत्र साजरी झाली. शिवरायाच्या गुणगायनप्रसंगीं त्या राष्ट्रवीराचा हिन्दवी स्वराज्याचा मनोरथ ज्या अनेक कायस्थ नरनारींनीं आपल्या प्राणांचे बळी देऊन यशस्वी केला, त्यांची आठवण तुरळकच कोठें कोणाला झाली. शिवजयंतीच्या मुहूर्तावर 'शिवछत्रपती'चें नांव धारण करून निघालेलें पुण्याचें दैनिक व त्यांतील 'आजचा दिवस' हा लेख पहा. शिवशाहीच्या इतिहासाचें पर्यालोचन करतांना या पट्ठ्या लेखकानें चुकून सुद्धां एखाद्या कायस्थ वीराच्या नांवानें आपली लेखणी विटाळूं दिली नाहीं. हा लेख 'संपादकीय' दिसतो. तो तसा असो वा नसो, त्यांत त्या लेखकाचें एक तर इतिहासविषयक अज्ञान किंवा कायस्थांविषयीं तिटकारा मात्र स्पष्ट व्यक्त झाला आहे. 'रामदास किंवा दादोजी कोंडदेव आणि शिवाजी' यांचा परस्पर संबंधांचा नास्तिपक्ष सिद्ध करण्याच्या कामीं श्री. केळुसकरासारख्या एकाद्या विद्वान् मराठा इतिहासकारानें जरी कदाचित् 'अजिंक्य पत्र' मिळविलें असलें, तरी कायस्थ वीरांना चाट देऊन श्रीशिवरायाचें चरित्र रंगविणाऱ्या चित्रकाराला एखादें शेंबडें पोरसुद्धां एकाक्ष किंबहुना आंधळा ठरविल्याशिवाय रहाणार नाहीं, हें शिवछत्रपतिकर्त्यांनीं खूप ध्यानांत ठेवावें. शिवाजीमहाराजांच्या राज्यारोहणप्रसंगी ज्याला बाळाजी आवजी चिटणीसाची आठवण होत नाहीं; जिंजीच्या प्रकरणांत खंडो बल्लाळाचें नांव सुचत नाहीं, बहिरोबाचा आत्मयज्ञ लक्षांत येत नाहीं;

किंवा नातू कंपूकडून सातारच्या सिंहासनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होत असतांना, घरादारावर तुळशीपत्र ठेवून, छत्रपतीसाठीं रानवन करणाऱ्या कायस्थ वीरांची ज्याला दाद लागत नाहीं, त्याचें स्मृतियंत्र बरेच गंजलेलें असले पाहिजे खास. प्रस्तुत लेखकाचें एक विधान तर हसूं येण्यासारखें आहे. ''संभाजीच्या वधानंतर धनाजी जाधव, संताजी घोरपडे, खंडेराव दाभाडे, राजाराम महाराज, ताराबाईंसाहेब यांनीं जिवापाड मेहनत करून, काहीं कांहीं वेळीं तर राखेचे तोबरे सोसून... प्रचंड मोंगल सेनासागर पार कोरडा ठणठणीत करून टाकला.'' जीते रहो पट्ठे ! जिंजीच्या इतिहासावर हा एक नवीनच प्रकाश पडला. राजाराम महाराज व ताराबाई साहेब यांनीं राखेचे तोबरे सहन केले अं? छत्रपतीच्या पायाला कांटा लागतांच आपल्या देहाची पायघडी करण्याचा ज्याच्या कुळाचा कुळधर्म व प्रतिज्ञा तो खंडोबल्लाळ काय हजामती करीत होता रे लेखका ? ज्याच्या धोरणी, मुत्सद्देगिरीवर जिंजीचें कारस्थान सफाई पार पडलें, त्याच्यासाठीं ज्यानें पोटचा गोळा बळी दिला, खुद्द आपल्या भाच्यावर (राजाराम महाराजावर) तलवार उपसून मोंगलाच्या वतीनें जिंजीचा कोंडमारा करीत बसणाऱ्या गणोजी शिर्क्याला ज्यानें दाभोळच्या वतनाची फारकत चिठी लिहून देऊन छत्रपतीची त्या कोंडमाऱ्यांतून सुटका केली व शिवशाहीची नौका बुडतां बुडतां आत्मयज्ञाच्या पुण्याईवर वाचविली, त्या खंडोबल्लाळाची तुला आठवण होऊं नये काय? धिक् तुझें इतिहासाचें ज्ञान आणि धिक् तुझी लेखणी! राखेचा तोबरा खंडो बल्लाळनें सोसला. तापल्या तव्यावर खंडो बल्लाळ उभा राहिला. राजाराम महाराज नव्हे, संताजी नव्हे व धनाजीहि नव्हे. बेट्या, चुरचुर लेखणी चालविण्यापूर्वी जरा कंबर मोडून इतिहास तरी वाच. इतिहास म्हणजे सत्याची धगधगित आग. ती बापाला बाप म्हणत नाहीं, मग चुलत्याला काका कोठची म्हणायला? ज्या कायस्थ समाजानें श्रीशिवरायाच्या तक्ताचा अभिमान धरून अव्वलपासून अखेर पर्यंत आपल्या रक्ताचा सडा घातला त्या कायस्थ समाजांतील एकाहि स्वार्थत्यागी नरवीराचें नांव गौरवपूर्वक उच्चारण्याची, शिवछत्रपतिकार, तुह्मांला विस्मृति झालेली पाहून, श्रीशिवरायांनीं तुमचा पहिला अंक निघतां क्षणींच टपटपा रक्ताचे अश्रु कींहो गाळले असतील !! छत्रपतीच्या तक्तासाठीं आपल्या ऐहिक सर्वस्वावर रखरखीत निखारे ठेवणारे तत्कालिन कायस्थ वीर, आतांच्या कायस्थांप्रमाणें पोटानें नाडल्यामुळें राजनिष्ठेचा नाटकी फार्स करणारे नव्हते बरं. आद्यछत्रपतीनें 'बाळाजी माझा प्राण आहे' असे ज्या चिटणिसाबद्दल उद्गार काढले, त्या चिटणिसाच्या घराण्यांतील एकूणएक पुरुषाने केवळ त्या उद्गारासाठीं शेवटच्या छत्रपतीच्या कारकीर्दीपर्यंत आपल्या आत्मयज्ञानें छत्रपतींचें सिंहासन झेलून धरण्यांत कर्तव्याची तिळमात्र प्रतारणा केली नाहीं. शिवरायाच्या स्वराज्यकल्पनेची जाणीव मराठे बान्धवांत होण्याच्या पूर्वीच ज्या दादजी नरस प्रभूनें शिवाजी महाराजांच्या हातावर हात मारून स्वराज्य स्थापनेची आणभाक केली, त्याच दादजीच्या घराण्यांतील औरस वंशजानें - रंगो बापुजी गुप्ते यानें- शेवटच्या छत्रपतींच्या पदच्युततेविरुद्ध थेट विलायतेपर्यंत प्राणांतीचा झगडा झगडण्यांत आपल्या कर्तव्यांत अणुरेणू प्रतारणा केली नाहीं; आणि शिवछत्रपतीचें नांव घेऊन, दीनदुनियेच्या उद्धारासाठीं, सत्याची समशेर पाजळीत, सत्यशोधनाचा मंत्र महाराष्ट्रांत प्रसृत करण्यासाठीं निघालेल्या पुण्यपत्तनस्थ दैनिक बान्धवा, तुझ्या पहिल्याच अंकाला भारत इतिहास संशोधक मंडळाच्या भिक्षुकशाही प्रतारणेची बाधा झालेली पाहून, स्वर्गस्थ शिवरायाला काय बरें वाटलें असेल?

□□□

पुस्तक परिचय

कमलबहाद्दरांस शेलापागोटें

शीघ्र ध्वनिलेखन पद्धति

अथवा मराठी शॉर्टहॅन्ड शिकण्याचें पुस्तक. हें प्रोफेसर वासुदेव सीताराम बेंद्रे, मेडॅलिस्ट, १५४ शनिवार पेठ, पुणें शहर, यांनीं तयार करून प्रसिद्ध केलें आहे. किंमत अडीच रुपये.

गेलीं १२ वर्षें आह्मी स्वत: स्लोन सिस्टिमनें रिपोर्टरचें काम करीत असल्यामुळें असल्या तद्विषक शास्त्रीय पुस्तकावर अभिप्राय देण्याचा अधिकार मराठी क्षेत्रांतील इतर नियतकालिकांच्या संपादकांपेक्षां आह्माला विशेष पोंचतों, हें प्रथम सांगितलें पाहिजे. या कामीं ओळखीच्या एखाद्या सटरफटर लघुलेखकाची अभिप्रायार्थ मनधरणी करण्याची आम्हाला जरूर नाहीं. मराठी भाषेसाठीं, किंबहुना अखिल हिन्दी भाषांसाठीं सशास्त्र ध्वनि लेखन पद्धतीची उणीव किती भासत आहे आणि त्या उणीवेसाठी शेंकडों देशभक्त वक्त्यांची मान हकनाहक फांसावर कशी लटकलीं जात असते, हें गेल्या २५ वर्षांतल्या राजकीय खटल्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. वक्त्याचें वक्तृत्व घोडदौडानें किंवा पंजाब मेलदौडीनें प्रमाणबद्ध चालत असतें व इकडे रिपोर्टर (रिपोर्टर कसले! पोर्टरच ते !!) मधली मधली कांहीं तुटकीं वाक्यें कसबशीं - कांहीं मोडींत, कांहीं बाळबंदीत, कांहीं कांहींतरी विचित्र खुणा करून- घेत असतात. मग निवांतपणें घरी जाऊन कसला तरी भलतासलता त्रिशंकु मजकूर वक्त्याच्या तोंडांत कोंबून आला रिपोर्ट सजवितात. खुद्द सरकारी रिपोर्टरांची ही स्थिति, तेथें वसंतहेमंतादि व्याख्यानमालांच्या प्रसंगीं रिपोर्टर नात्यानें स्वतंत्र टेबलांवर हातपाय ताणून बसणाऱ्या वृत्तपत्री पोर्टरांची अवस्था काय सांगावी? राजकीय खटल्यांत पुराव्यासाठीं आलेल्या मराठी व्याख्यानांचा एकहि सरकारी रिपोर्ट न्यायमंदीरांत आजपर्यंत विश्वसनीय मानला गेलेला नाहीं, ही गोष्ट येथें विशेष लक्षांत ठेवली पाहिजे. उलट, फेरतपासणीच्या प्रसंगीं एकूण एक मराठी रिपोर्टराची (?) भंबेरी उडून त्याची बेशुद्ध पडण्यापर्यंत पाळी आल्याचे दाखले कमी नाहींत. आतांशीं तर सरकारी रिपोर्टरांनीं असा खाक्या धरला. आहे कीं त्यांना जेवढें शब्द अगर वाक्यें 'ऑब्जेक्शनेबल' आक्षेपार्ह वाटतील, तेवढीच ते टिपून घेतात, बाकीच्या मजकुराची ते पर्वाच करीत नाहींत. म्हणजे कोणता भाग आक्षेपार्ह आणि कोणता नाहीं हें ठरविण्याचा सेशन कोर्टी मामला हे रिपोर्टरच आपल्याकडे आपल्या अधिकारांत घेत असतात, असाच

या प्रकाराचा सरळ अर्थ निघतो. हें आह्मी स्वानुभवावरून लिहित आहोंत. सारांश, मराठी भाषेकरितां शास्त्रशुद्ध व व्याकरणशुद्ध पायावर उभारलेली ध्वनिलेखन पद्धति अस्तित्वांत नसल्यामुळें ज्ञानाच्या व भाषणस्वातंत्र्याच्या क्षेत्रांत आजपर्यंत भयंकर उत्पात घडत आहेत. ही परिस्थिति पालटविण्याच्या कामीं प्रो. बेंद्रे यांचा प्रस्तुत ग्रंथ अद्भुत क्रान्ति घडविल्याशिवाय खास रहाणार नाहीं.

लघुलेखन व ध्वनिलेखन या दोन भिन्न भिन्न क्रिया आहेत, हें पुष्कळांच्या गळीं नीट उतरल्याचें दिसत नाहीं. लघुलेखन ह्मणजे संक्षिप्त लेखन [Abbreviated longhand] होय व ध्वनिलेखांत शब्दांचा अक्षरांचा किंवा अवयवांचा विचार नसून, जसा ध्वनि होईल तसें त्याचें विवक्षित चिन्ह उमटवावयाची क्रिया. हिलाच फोनोग्राफी असें ह्मणतात. उदाहरणार्थ During या इंग्रजी शब्दाचा उच्चार कांहींजण ड्यूरींग करतात व कांहीकांहीं ड्यूरींग करतात. याचें स्पेलींग जरी During असले तरी ध्वनिलेखकानें जसा उच्चार ऐकूं येईल तशीच ध्वनिलेखनांत खूण केली पाहिजे, हें उघड आहे. प्रो. बेंद्रे यांचें पुस्तक बाहेर पडेपर्यंत पूर्वी या दिशेनें प्रयत्न करणाऱ्या श्री. मानकरप्रभृतीच्या पद्धतींत हा भेद कोणी नीटसा ध्यानांत न घेतल्यामुळेंच त्यांच्या पद्धति पुस्तकांतल्या पुस्तकांत राहिल्या. श्री. मानकर यांची पद्धति पिटमनच्या पद्धतीवर बसविलेली होती. पण पिटमन् जरी आपल्या पद्धतीला 'फोनोग्राफी' असें नांव देतो, तरी ती फोनोग्राफीच नव्हे; फार झालें तर तिला शॉर्टहॅन्ड उर्फ लघुलेखनकला म्हणतां येईल. पिटमनमध्यें ग्रॅमलॉग्ज (एक किंवा अनेक शब्दसमुच्चयासाठीं ठरविलेल्या स्वतंत्र खुणा) चा एवढा भयंकर सुळसुळाट आहे कीं त्याची एक भली भक्कम डिक्शनरीच बनलेली आहे. शिवाय सरकारी कोडांच्या शेंकडों नियमांत सुधारणा, पुरवणी, गाळणीं, चाळणी, करणाऱ्या लंगोट्या जशा दर आठवड्यास पुडकीं भरभरून येतात, तशीं पिटमनच्या नव्यानव्या ग्रॅमलॉग्जची लठ्ठलठ्ठ पार्सलें दर आठवड्यास बिचाऱ्या विद्यार्थ्यांच्या टाळक्यावर येऊन आदळत असतात. हें कांहीं ध्वनिलेखन पद्धतीचें चिन्ह नव्हे.

प्रो. बेंद्रे यांनीं प्रस्तुत मराठी शीघ्रध्वनिलेखनकला बनविण्याचें कार्य स्लोन डुप्लोयन सिस्टिमच्या आधारानें केलें आहे. मराठी भाषेचें व्याकरण वाक्प्रचार इत्यादि गोष्टी पूर्ण विचारांत घेऊन व वर सांगितलेला लघुलेखन व ध्वनिलेखन यांतील भेद बिनचुक अवगाहन करून या पद्धतीची निश्चित स्थापना केली आहे. पुस्तकाचे एकूण तेरा धडे असून, प्रत्येक धड्यांत कांहीं सोपे नियम उदाहरणांसह देऊन, धड्याच्या शेवटीं त्या नियमांची परिस्फुटता करणारीं उदाहरणें दिलेलीं आहेत. शिक्षकाच्या साहाय्याशिवाय घरबसल्या मराठी शीघ्रध्वनिलेखन कोणालाहि अभ्यासितां येईल, हें ग्रंथकाराचें धोरण अत्यंत अभिनंदनीय आहे. मराठी व्याख्यानांचे शब्दश: विश्वसनीय रिपोर्ट घेण्याची आज जी अडचण सर्वत्र भासत आहे, ती या पुस्तकाच्या योगानें समूळ दूर करण्यांत प्रो. बेंद्रे यांनीं कौतुकास्पद विजय मिळविला आहे. प्रस्तुत पद्धतीच्या हस्तलिखितावर अनेक सरकारी अधिकाऱ्यांनीं पसंतीचा शिक्का मारलेलाच होता, आतां आम्हांला आशा आहे कीं, मुंबई सरकार या पद्धतीचा स्वीकार करून प्रवीण मराठी ध्वनिलेखक तयार करण्याचा उपक्रम करील. इंग्रजी भाषेच्या रिपोर्टराचें काम करून स्वतंत्रपणें उदरनिर्वाह करणारे जसे शेंकडों लोक आज आढळतात, त्याप्रमाणेंच या पद्धतीनें तयार झालेल्या मराठी ध्वनिलेखकांना घरबसल्या स्वतंत्रपणें आपला चरितार्थ चालविण्यास सध्यांच्या चळवळीच्या काळांत कठीण जाणार नाहीं. मराठी शाळेंतील शिक्षकांनीं व विद्यार्थ्यांनी या पद्धतीनें मराठी ध्वनिलेखनकला शिकून आपल्या कर्तबगारींत एका अद्भुत क्वॉलिफिकेशनची भर घालावी अशी आमची त्यांना आग्रहाची

सूचना आहे. साधारण बुद्धीच्या निश्चयी विद्यार्थ्यास ही कला अवघ्या एका महिन्यांत हस्तगत करतां येणें शक्य आहे. राष्ट्रीय जागृतीच्या वर्तमानकाळीं आपली सर्वांगसंपूर्ण मराठी ध्वनिलेखन पद्धति मायभाषेच्या चरणीं अर्पण करण्याचा अग्रमान प्रो. बेंद्रे यांनी मिळविला, याबद्दल प्रबोधन त्यांना धन्यवाद देत आहे.

□□□

टिपण

अस्पृश्य जनांसाठीं कै. शाहुमहाराज छत्रपति यांनीं काय केलें ?

अस्पृश्योद्धाराच्या *वलगना अलीकडे म. गांधींच्या चळवळीमुळें बऱ्याच फैलावल्या आहेत; परंतु खुद्द असहकारवाद्यांनीं किंवा राष्ट्रीयत्वाचे डोंबारी ढोलकें पिटणाऱ्या राष्ट्रीयांनीं अस्पृश्यांचा उद्धार कोठें कसा व किती केला आहे, हें त्यांनींच सिद्ध करून दाखवावें. परंतु कोल्हापूर संस्थानांत अस्पृश्योद्धार प्रत्यक्ष कसा अंमलांत आला, हें वाचकांना कै. शाहु छत्रपतींच्या खालील अनेक हुकुमांवरून दिसून येईल.*

सं. प्रबोधन

(१) ''हुजूरच्या असें पाहण्यांत आलें कीं, अस्पृश्यांना व स्पृश्यांना शाळाखात्यांत निरनिराळ्या तऱ्हेनें वागविलें जातें व अस्पृश्यांना शाळा खात्याच्या इमारतींच्या कंपाउंडाच्या आंत येऊं दिलें जात नाहीं. सरकारी इमारती खासगी उपयोगासाठीं दिलेल्या नसल्यामुळें अस्पृश्यांना तुच्छतेनं वागवण्याचा कोणालाहि हक्क नसून अस्पृश्यांची प्रत्येक तऱ्हेनें काळजी घेतली पाहिजे. शिक्षणसंस्था गरीब लोकांकरितां असून गरिबांतील गरीब जे अस्पृश्य त्यांना समतेच्या पायावर वागविणें योग्य आहे. ते कर देतात तर मग त्यांना वाईट रीतीनें कां वागवावें? हुजूरची अंत:करणपूर्वक इच्छा आहे कीं, शाळखात्यांतील ज्या खासगी किंवा सरकारी संस्थांना ग्रँट इमारती किंवा 'फी ग्राऊंड वगैरे रूपानें मदत मिळते त्यांनीं स्पृश्य वर्गांपेक्षां अस्पृश्यांना जास्त ममतेनें व आदरानें वागवावें. कारण स्पृश्य लोक कोणत्याहि प्रकारें शिक्षणांत आपला मार्ग काढूं शकतात; परंतु अस्पृश्यांना तें असाध्य असल्यामुळें कोणताहि मार्ग नाहीं. जर अस्पृश्यांना समतेनें वागविलें नाहीं, तर मग तो प्रिन्सिपाल अगर खालच्या दरजाचा शिक्षक असो, त्याला जाब द्यावा लागेल आणि खासगी संस्थांना जी मदत मिळते ती काढून घेण्यांत येईल.

''हुजूरची मन:पूर्वक इच्छा आहे कीं, मिरजेचें अमेरिकन मिशन्, सेंट झेविअर, वुइल्सन कॉलेज व बंगलोर, पांचगणी येथील मिशन स्कुलें किंवा आर्यसमाजांच्या शाळा, कॉलेजें व गुरुकुलें, रेल्वे व सरकारी अधिकारी हे जसे स्पृश्यास्पृश्य हा भेदभाव ठेवित नाहीत, त्याप्रमाणें संस्थानांतील विद्याखात्यानें

वागावें, सरकारी मदत मिळणाऱ्या कोणत्याहि शाळेंत एखादा अस्पृश्य वर्गांचा विद्यार्थी आला तर संभावीत गृहस्थाप्रमाणें आदरपूर्वक वागून त्याला शाळेंत घेण्यांत यावें.

''शाळाखात्यांतील कोणा इसमाची असें करण्यास हरकत असेल तर त्यानें हा हुकूम झाल्यापासून सहा आठवड्यांचे आंत आपला राजीनामा पाठवावा; अर्थात् त्याला पेनशन मिळणार नाही. मदत मिळणाऱ्या शिक्षण संस्थेची हरकत असेल तर त्याचीहि ग्रँट किंवा इतर मदत दरबार बंद करील, प्लेग्राउन्ड, इमारती किंवा दुसरी स्थावर जंगम मिळकत जी संस्थान काढून त्यांना देण्यांत आलेली आहे तिजवर जबर कर बसेल. जर एखादी खासगी शिक्षण संस्था देणगी देणाऱ्याच्या इच्छेविरुद्ध जाईल तर देणगीतील स्थावर अगर जंगम मिळकतीवर शेंकडा ७ कर बसेल, किंवा देणगी देणाऱ्याच्या किंवा त्याच्या वारसाच्या इच्छेप्रमाणें एक शिष्यवृत्ती ठेविली जाईल. कोणत्याहि शिक्षकानें मग तो काम करून कितीहि थकलेला असो, अस्पृश्य विद्यार्थी शाळेंत येतांच त्याला अवश्य मदत करावी.''

(सही) शाहू छत्रपति.

(२) ''कोल्हापूर इलाख्यांतील रेव्हिन्यू, ज्युडिशिअल आदिकरून सर्व अधिकाऱ्यांनीं आमच्या संस्थानांत जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमानें व समतेनें वागविलें पाहिजे. जर कोणा अधिकाऱ्यांची वरीलप्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्यानें हा हुकूम पोहोंचल्यापासून सहा आठवड्यांच्या आंत नोटीस देऊन राजीनामा द्यावा. त्याला पेनशन मिळणार नाही. आमची अशी इच्छा आहे कीं, आमच्या राज्यांतील कोणाहि इसमाला जनावराप्रमाणें न वागवितां मनुष्याप्रमाणें वागवावें.

''आमची फार इच्छा आहे की, आमच्या अधिकाऱ्यांनीं मिशनरी, आर्यसमाजिष्ट, रेल्वे व गव्हर्नमेंट अधिकाऱ्यांचें या बाबतींत अनुकरण करावें.''

(सही) शाहू छत्रपति.

(३) ''हुजूरच्या असें पाहण्यांत आलें आहे कीं, अस्पृश्यांना व स्पृश्यांना धर्मार्थ दवाखान्यांत निरनिराळ्या तऱ्हेनें वागविण्यांत येऊन अस्पृश्यांना दवाखान्याचें इमारतींतील कंपाउंडमध्येंसुद्धां येऊं दिलें जात नाही. सरकारी इमारती या कांही कोणाला सॅनिटोरिअम म्हणून दिलेल्या नसल्यामुळें अस्पृश्यांना इतक्या तुच्छतेनें वागविण्याचा कोणालाहि हक्क नाही. इतकेंच नव्हे तर अस्पृश्यांची हरएक तऱ्हेनें काळजी घेतली पाहिजे. धर्मार्थ संस्था गरीब लोकांकरितां असून गरिबांतील गरीब अस्पृश्यांना समतेच्या पायावर वागविणें योग्य आहे. हुजूरची अंत:करणपूर्वक इच्छा आहे कीं स्टेट मेडिकल अधिकाऱ्यांनीं पाश्चात्याचें त्यांतल्या त्यांत मिरजच्या अमेरिकन मिशनचें अनुकरण करावें. एखादा रोगी मग तो स्पृश्य किंवा अस्पृश्य असो तो दरवाज्यांत येतांच त्याला सभ्य गृहस्थाप्रमाणें वागवून त्याची तपासणी करावी व त्याला जनावरांप्रमाणें बाहेर न घालवितां उपचारासाठी दवाखान्यांत पाठवावें. मेडिकल खात्यांतील कोणा इसमाची असें करण्यांत हरकत असेल तर त्यानें हा हुकूम झाल्यापासून सहा आठवड्यांच्या आंत आपला राजीनामा पाठवावा. अर्थात् त्याला पेनशन मिळणार नाही.''

(सही) शाहू छत्रपति.

(४) ''करवीर इलाख्यांत (जहागिरी सोडून) अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असतात त्या सर्व येत्या दसऱ्यापासून बंद करण्यांत याव्या व अस्पृश्यांच्या मुलांस सरकारी शाळांतून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेंच दाखल करून घेत जावें. सरकारी शाळांतून शिवाशिव पाळण्याची नसल्यामुळें सर्व जातींच्या व धर्माच्या मुलांस एकत्र बसविण्यांत येत जावें.''

(सही) शाहू छत्रपति.

(५) ''सर्व सार्वजनिवक इमारती, धर्मशाळा, रेस्टहॉऊसीस, सरकारी अन्नछत्रें वगैरे ठिकाणी व नदीचे पाणुते सार्वजनिवक विहिरी येथें कोणच्याहि मनुष्यप्राण्याचा विटाळ मानण्याचा नाहीं, ख्रिश्चन पब्लिक बिल्डींगमध्ये सार्वजनिक विहिरीवर जसें अमेरिकन मिशनमध्यें डॉ. व्हेल व वॉनलेस हे सर्वांना एकसहा व समतेनें वागवितात त्या प्रमाणेंच येथेंहि कोणाचाहि विटाळ न मानितां वागविण्याचें आहे. तसें न झाल्यास गांवकामगार, पाटील, तलाठी यांना जोखीमदार धरलें जाईल. सदरचा हुकूम ग्याझिट करावा.

(सही) शाहू छत्रपति.

□□□

अग्रलेख

बुद्ध देवाची कामगिरी

बरोबर २५११ वर्षे झालीं. वैशाख शुद्ध पौर्णिमेचा दिवस. हिन्दु राष्ट्राच्या चरित्रांतला एक परम मंगल, स्फूर्तिदायक आणि अभिमानोत्तेजक दिवस होय. अडीच हजार वर्षांपूर्वी याच दिवशीं हिन्दु राष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, नैतिक व राजकीय जीवनांत आत्मतेजाचें चैतन्य ओतून प्रबोधनाची अननुभूत चळवळ निर्माण करणारा महात्मा गौतम बुद्ध बुद्धदेव म्हणून जगद्रंगभूमीवर येऊन उभा ठाकला. या दिवशीं सर्व जगभर ठिकठिकाणीं बुद्धानुयायी बांधव बुद्धदेवाचें भजनपूजन करण्यासाठीं एकत्र होतात व त्यानें निर्माण केलेल्या विश्वव्यापी प्रबोधनाच्या दिव्य कामगिरीचें मुमुक्षु वृत्तीनें चिंतन करतात. वास्तवीक, बुद्धदेव आम्हां हिन्दूंचा. हिन्दु धर्मांत मिशनरी चैतन्य ओतून त्याला साऱ्या जगाचा जगद्गुरु केलें बुद्धदेवानीं. आज नाहीं नाहीं तरी जगाच्या पाठीवर पन्नास कोटींच्या वर बुद्धानुयायी भगिनी बांधव दररोज 'नमो बुद्धाय' म्हणून बुद्धदेवाला प्रणिपात करीत असतात. असें असतां, हिन्दुस्थानचा बुद्धदेव कीं बुद्धदेवाचा हिन्दुस्थान, हा सोपा प्रश्न सुद्धां हिन्दु म्हणविणारांना कधिं सुचूं नये, हें कालम ाहात्म्य होय. परंतु या कालमहात्म्यावर विचारशक्तीची मात करून बुद्धदेवाच्या कामगिरीची कृतघ्न हिन्दुस्थानाला आठवण देण्याचा उपक्रम यंदा मुंबईच्या कांहीं विचारी सज्जनांनीं ता. १०-५-२२ रोजीं बुद्धजयन्ती साजरी करून केला, याबद्दल प्रबोधन त्या सर्व सज्जनांच्या चरणीं साष्टांग प्रणिपात घालीत आहे.

गेल्या जयन्तीच्या विशेष हा होता कीं बुद्धदेवाचें स्मरण करण्यासाठीं जमलेल्या मंडळींत अनेक पक्षांचे, अनेक मतांचे आणि अनेक राष्ट्रांचे प्रतिनिधि एकाच भावनेनें एकत्र झाले होते. भेदांतच अभेद हें जें बुद्धदेवाच्या कामगिरीचें रहस्य तें या ठिकाणीं यदृच्छेनें प्रत्यक्ष व्यक्त झालेलें दिसलें. जपान राष्ट्राचे दरबारी वकीलसाहेब आपल्या पत्नीसह हजर होते. सारांश, पृथ्वीवरील निरनिराळीं राष्ट्रें एकजीव होण्याचा संभव जितका बुद्धदेवाच्या चरित्ररहस्यांत आहे, तितका श्रीकृष्णाच्या नाहीं आणि क्रिस्ताच्या तर नाहींच नाहीं, हे लक्षांत येईल. बुद्धदेवांनीं आपल्या कामगिरीचें क्षेत्र हिंदुस्थानापुरतेंच आकुंचित ठेविलें नाहीं. त्यानीं सर्व भेदांचा पूर्ण संन्यास करून हिंदुस्थानाची कोंडी फोडली आणि

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मन: ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवा: ।।

या व्यापक धोरणानें त्यांनीं साऱ्या जगाला 'आपलें' केलें. प्रस्तुत जयंतीचा उपक्रम असाच दरसाल नियमित होईल आणि त्या बरोबरच बुद्धदेवाच्या संप्रदायाचा इतिहास अध्ययन करण्याची अभिरुची तरुण तरुणींत बळावत जाईल, तर हिंदूंच्या प्राणत्राणपरायण विविध चळवळींत लुप्त झालेलें मिशनरी चैतन्य खात्रीनें पुनश्च थरारल्याविना रहाणार नाहीं.

सांप्रत हिंदुराष्ट्र पुनरुज्जीवनाच्या संक्रमणावस्थेंत आहे. त्याचें सामाजिक व धार्मिक जीवन सडलेलें असून, राजकीय बाबतींत तें गुलाम बनलेलें आहे. अनेक मतांतरांचा सर्वत्र गोंधळ माजल्यामुळें विवेकवादाची बीजें रुजविण्याचें कार्य कठीण होऊन बसलें आहे. अनेक शतकांच्या भिक्षुकशाही वर्चस्वामुळें सारी जनता अक्षरशत्रू राहिली आहे आणि त्यांच्या अज्ञानावर चरणाऱ्या भिक्षुकी पोळांनीं तिच्यांत धर्मांच्या नांवावर मानसिक दास्याचें जहर फैलावून आपल्या वर्चस्वाची कडेकोट तटबंदी केलेली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या सध्यां चालूं असलेल्या नानाविध चळवळी एकपक्षी, एकांगी व एकाक्ष असल्यामुळें, मूढ जनतेच्या जागृतीनें उत्पन्न झालेला दास्यविरोधी ज्वालामुखी त्या चळवळींना ठिकठिकाणीं विरोधाच्या ज्वाळांनीं अडवून धरीत आहे. अशा प्रसंगीं हिन्दु राष्ट्राला बुद्धदेवाचें विस्मरण होतांच कामां नये. ज्या बुद्धदेवानें एक वेळ याच भरतखंडाला असल्याच परिस्थितींत तारलें व साऱ्या दुनियेचा सम्राट बनविलें, तो बुद्धदेवच आतां हिन्दु राष्ट्राच्या धुरेवर येऊन उभा राहिला पाहिजे.

बुद्धपूर्वकालीं हिन्दुराष्ट्राची जी स्थिति होती तींत आणि आतांच्या स्थितींत रूपभिन्नतेपेक्षां कसलाहि फरक नाहीं. भिक्षुकशाहीचें बण्ड आतांप्रमाणेंच त्या वेळीं फार शिरजोर झालें होतं. धर्माच्या नांवाखालीं वाटेल तसले अत्याचार करण्यास ब्राह्मण लोक पक्के निर्ढावलेले होते. क्षत्रिय वैश्यांचा तेजोभंग करून, त्यांना सर्व बाबतींत ब्राह्मणांचे गुलाम बनविण्याचें भिक्षुकी कारस्थान त्यावेळीं पूर्ण यशस्वी झालें होतं. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रांतच केवळ नव्हे, तर राजकीय क्षेत्रांतहि, ब्राह्मण आपल्या भूदेवत्वाच्या सबबीवर क्षत्रियांना खेंटराप्रमाणें लेखूं लागले होते. खुद्द क्षत्रिय वैश्यांची जेथें ही स्थिति, तेथें गरीब बिचाऱ्या शूद्रांची व अस्पृश्य जनांची काय बडदास्त ब्राह्मणांनीं ठेविली असेल, याची कल्पना आम्ही करून दिलीच पाहिजे असें नव्हे. सर्वच बाबतींत भिक्षुकशाही शिरजोर झाल्यामुळें ब्राह्मणेतरांच्या नशिबाला शारिरीक व मानसिक गुलामगिरीपेक्षां दुसरें काय येणार? ब्राह्मण म्हणजे भूदेव, ब्राह्मण जात म्हणजे राष्ट्र, त्यांच्या बऱ्यावाईट स्वार्थी आत्मस्तोमाच्या चळवळी म्हणजे राष्ट्रीय चळवळी, आणि ब्राह्मणेतर जनता, तिच्या आकांक्षा, तिचे हक्क इत्यादि प्रकार म्हणजे ब्राह्मणांच्या पायांतलीं पायतणें, या वर्तमान भिक्षुकशाही कल्पनेचा राक्षसी धागा थेट बुद्धपूर्वकालीन् इतिहासापर्यंत बिनतोड जाऊन भिडलेला आढळतो. धर्माच्या क्षेत्रांतल्या भिक्षुकी वर्चस्वाच्या कल्पना हुबेहूब मनुस्मृति टायपाच्या. मंत्रतंत्रांचें बण्ड बेसुमार माजलेलें. सर्व जग देवाच्या स्वाधीन, देव मंत्रांच्या आधीन, मंत्र ब्राह्मणांच्या स्वाधीन, म्हणून जेहत्ते ब्राह्मण हे भूदेव होत, ही जी मनुस्मृतीची भिक्षुकी घमेंड आजचेहि ब्राह्मण नि:शंकपणें मारण्यास शरमत नाहींत, तिची अक्षरश: अंमलबजावणी त्या वेळीं ब्राह्मणेतरांवर ब्राह्मण गाजवीत असत. आतांप्रमाणेंच त्या काळीं ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रादि जाती जन्माच्या अपघातावरूनच ठरविण्यांत येत असत. खुद्द ब्राह्मणांची दिनचर्या पाहिली तरी मंत्रवेत्तेपणाची व मंत्ररक्षणार्थ लागणाऱ्या

आत्मशुद्धीची जरी ते तोंडीं वल्गना पुष्कळ करीत, तरी त्यांचे आचारविचार आतांच्या नामधारी ब्राह्मणांइतकेच क्षुद्र व निकृष्ट असत. तथापि बहुजन समाज आतां प्रमाणेंच निरक्षर मूढ व भोळसट असल्यामुळें, त्याची मनोवृत्ति अंधश्रद्धेची धूळ फेकून आंधळी करणे तत्कालीन् भूदेवांना फारसें कठीण गेलें नाहीं. उलट या अंधश्रद्धेच्या जोरावर ब्राह्मणेतरांना मंत्रतंत्रांच्या यंत्रांत सफाई पिळून त्यांचीं चिपाडें करण्याची कामगिरी ब्राह्मण भूदेव दिवसाढवळ्या करीत असत.

मंत्रतंत्रांच्या जोडीला दुसरें एक शस्त्र ब्राह्मणांनीं हस्तगत करून ठेवलें होतं. तें म्हणजे दैवी शक्ति मिळविण्यासाठीं यज्ञयाग करणें हें होय. यज्ञयागानें देव संतुष्ट होतात व माणसांच्या दैवाच्या उलट्या कवट्या सुलट्या बसवितात ही आर्य लोकांची कल्पना वेदकाळापासूनची आहे. तिचा पोकळपणा हडसून खडसून सिद्ध झाला असून, पुत्रासाठीं कमेष्टी यज्ञ करणारे भाट्ये आणि जर्मनीचा नायनाट होण्यासाठीं फणसवाडींत खंडोगणति तूर आळणारे हरेश्वर महादेव पंडीत असले यज्ञयागप्रमाण्याचे भक्त असूनसुद्धां बरेच आढळतात; मग तुळशीची हजार पानें सत्यनारायणाला वाहून, किंवा शेंदराच्या पट्ट्यानें धोंड्यांत उद्भवलेल्या म्हसोबाला कोंबड्या बकऱ्यांचा नैवेद्य दाखवून भरभराटीची फलश्रुति मागणारे लोक कितीतरी असतील. असो. अनेक शतकांच्या प्रघातामुळें पशुहत्त्येचे निरनिराळे यज्ञ यथासांग करणें, ही एक त्यावेळीं मोठ्या कुशलतेची कला होऊन बसली होती व ती सफाईंत वठविण्याची गुरुकिल्ली आपल्या हातींच ठेवण्यासाठीं ब्राह्मणांनीं दाखविलेली धूर्तता त्यांच्या लौकिकास शोभेशीच होती. हल्लीं जसें बारसें असो, बारावे असो, तेरावे असो, मुंज असो, लग्न असो, नाहींतर स्मशानक्रिया असो, तेथें भट हा पाहिजेच, तसेंच त्या काळीं यज्ञ म्हटला कीं भटाची पायधरणी केल्याशिवाय गत्यंतरच नसे. मग हा भट नुसता कवाइत्या असला तरी त्याची आतां प्रमाणेंच कोणी खंत मानीत नसत. यज्ञांत कोणत्या पशूंची किती हत्या करावी, याज्ञिकानें सोमदारूचे किती बुधले फडशा पाडावे, कोणत्या यज्ञांत यजमानांकडून किती दक्षिणा हबकावी, इत्यादी मामले शुद्ध 'येदोक्त' असल्यामुळें भट सांगेल ती पूर्व दिशा अशा प्रकार सर्वत्र असे. सारांश, मंत्रतंत्राप्रमाणेंच यज्ञयांगांच्या बाबतींत तत्कालीन भिक्षुकशाहीचें वर्तन इतकें रानटी, राक्षसी व रुधिरप्रिय होतें कीं त्याचीं वर्णनें वाचून कसाईखान्यांतल्या खाटकांच्या हृदयालासुद्धां द्रव आल्याविना राहणार नाहीं. मंत्रतंत्र, उपासतापास, यज्ञयाग इत्यादिकांत होणाऱ्या अत्याचारांनींच त्यांची विफलता बऱ्याच विवेकी लोकांना त्या वेळींसुद्धां पटली होती व ते त्याविरुद्ध निषेधाचा पुष्कळ जळफळाटहि करीत. परंतु भिक्षुकशाहीनें 'सार्वत्रिक' केलेल्या, कित्येक शतकांच्या प्रघातानें रूढीमान्य झालेल्या, बहुजनसमाजाच्या नित्य आचरणानें आंगवळणीं पडून 'लोकमान्य' बनलेल्या धर्मकल्पना किंवा सामाजिक चालीरीती कितीहि बाष्कळ व निरर्थक वाटल्या तरी त्याविरुद्ध सक्रीय प्रतिकाराची चढाई करण्याचें धारिष्ट कोणासहि होईना. हल्लींसुद्धां विधवाकेशवपनासारखी घाणेरडी चाल अविचारी व अनीतीची आहे, हें पटलेलें असून सुद्धां, वेळ येतांच चांगलें चांगले शहाणेसुर्ते त्या रूढीला मान देतातच ना? एखाद्या शतकाची नुसती जाणीव होऊन भागत नसते, तर त्याला बेदम चापून जिवंत गाडण्याइतका आत्मविश्वासाचा जोर निषेधकाच्या मनगटांत असावा लागतो. तथापि गुपचुप निषेधाची शक्ति अगदीच कांहीं वाया जात नाहीं. एकाद्या जुलमाविरुद्ध उघडउघड बण्ड झालेलें पुरवलें, कारण त्याचा मोक्ष तडकाफडकी लावतां तरी येतो; पण गुप्त असंतोष जर का जनतेच्या हृदयांत घर धरूं लागला, तर त्याच्या आस्मिक स्फोटानें ब्राह्मण्डाचेहि राईराई

एन ४००६--१५

एवढे तुकडे होतात. भिक्षुकशाहीनें धर्माला अट्टल दारुबाज, मांसाहारी व अत्याचारी बनविल्यामुळें उत्पन्न झालेल्या गुप्त असंतोषाच्या स्फोटांतून बुद्धदेवाचा अवतार झाला आणि त्यानें आत्मसंशोधित नवमतवादाच्या एकाच मुसंडीनें भिक्षुकशाहीचा मुर्दा पाडला.

नवमतवादाच्या इतिहासांत एक गोष्ट विशेष स्पष्ट आढळून येते कीं जेव्हां जेव्हां जनतेला भिक्षुकशाही दास्यांतून मुक्त करण्याचे प्रसंग आले, तेव्हां तेव्हां क्षत्रिय वीरच पुढें सरसावलेले दिसतात. धर्मस्थापना घ्या, सामाजिक पुनर्घटना घ्या किंवा राजकीय स्वातंत्र्य घ्या, क्षत्रियांची उडी त्यांत पडल्याशिवाय तें कार्य यशस्वी झाल्याचा दाखला नाहीं. शिवाय ब्राह्मणांतील उत्तम पुरुषांचीं कार्यें आणि क्षत्रिय वीरांचीं कार्यें यांत एवढा भेद असतो कीं पहिला जात्याच संकुचित मनोवृत्तीचा असल्यामुळें त्याच्या कार्याचा व्याप शंकराचार्यांच्या संप्रदायाप्रमाणें गांवठाणाच्या कुपणाइतकाच असतो आणि क्षत्रियाची मनोवृत्ति त्याच्या महत्वाकांक्षेप्रमाणें मोकाट दिलदार असल्यामुळें त्याच्या कार्याची पकड महात्मा बुद्धदेवाप्रमाणें साऱ्या पृथ्वीला कंवटाळते. ब्राह्मणांचें वाचीवीर्यत्व आणि क्षत्रियांचे सव्यसाची धनुर्धारित्व इतिहासप्रसिद्ध आहे. धर्मस्थापना करावी क्षत्रियांनीं आणि तिचा विध्वंस करण्याचें पुण्य मात्र मिळवावें ब्राह्मणांनीं. क्षत्रियांनीं स्वराज्य कमवावें आणि ब्राह्मणांनीं तें गमवावें, हा अनुभव तर अगदीं काल परवांचा; मात्र परंपरा फार प्राचीन काळची.

गौतम बुद्धाच्या चरित्रांत असा एक विशेष आहे कीं त्याला जगाच्या इतिहासांत दुसरी तोड नाहीं. एकूणएक तत्ववेत्त्याची प्रवृत्ति तत्वशोधनाकडे वळविण्यास त्यांची आपत्ति कारण झालेली आढळते; पण गौतम बुद्ध राज्यवैभवाच्या उत्कृष्ट उत्कृष्ट सुखोपभोगांत गुलाबाच्या फुलाप्रमाणें झेलला जात असतां, आजुबाजूला पसरलेल्या जगाच्या दु:खानें विव्हळ झाला आणि तत्वशोधनाकडे वळला. जगाच्या दु:खासाठीं स्वत:च्या सुखावर निखारे ठेवणारा देवाचा अवतार मानण्यापेक्षां प्रत्यक्ष देवच कां मानूं नये? राजपुत्र असतांना त्यानें स्वधर्माचें शक्य तेवढें शिक्षण भिक्षुकशाही विद्वानांपासून मिळविलेंच होतें. पुढें सर्वसंगपरित्याग केल्यानंतर त्यानें तत्कालीन् पंडीतांपाशीं तत्वज्ञान व योग यांचेंहि ज्ञान मिळविलें; परंतु त्याचें कांहीं समाधान झालें नाहीं व ज्या दु:स्थितीचें उच्चाटन करण्यासाठीं त्यानें एवढा आत्मयज्ञ केला, तें साधन तर त्याला हस्तगत होण्याची मुळींच आशा दिसे ना ! अखेर पंडीतांच्या पोपटपंची परंपरेला आणि देह विनाकारण झिजवून आत्मज्ञानाची आशा लाविणाऱ्या हटयोगाच्या हट्टाला त्यानें लाथाडून स्वत:च्या पायावर उभे रहाण्याचा निश्चय केला. अर्थात् आत्मसामर्थ्यांचा जोर उत्पन्न होतांच त्याला गयेस आत्मसाक्षात्काराचा अनुभव येऊन, त्याच्या नवमतवादाची योजना सिद्ध झाली व आत्मविश्वासाच्या बळावर या योजनेची मात्रा जगाच्या दु:खावर देण्याचा त्यानें कृतसंकल्प केला. बुद्धदेवाच्या संप्रदायाचीं तत्त्वें काय होतीं व त्यानें त्यांच्या जोरावर रुधिरप्रिय व दास्यप्रवर्तक भिक्षुकशाहीच्या कचाट्यांतून आर्यधर्माचा बचाव कसा केला, याची विस्तृत माहीती येथे देणें शक्य नाहीं. परंतु इतकें म्हटलें म्हणजे पुरें कीं भूतदयेच्या भांडवलावर आणि सुरुवातीला फक्त पांच अनुयायी मिळवून बुद्धदेवानें आपल्या नवमतवादाचा प्रसार एवढा जबरदस्त केला कीं वादविवादाची एकहि सरबत्ती न झाडतां, त्यानें थोड्या वर्षांतच भिक्षुकशाहीला चीं चीं करायला लावलें. त्यानें आपल्या संघाचे दरवाजे आब्राह्मणचाण्डाळांना मोकळे सोडून मानवजातीचा अभेदभावाचा एक विश्वव्यापक भ्रातृसंघ तयार केला. सर्वांना आत्मज्ञानाची मुबलक खैरात समसमान झाल्यामुळें श्रेष्ठकनिष्ठ, उच्चनीच,

स्पृश्यास्पृश्य या भेदांना तात्काळ गति मिळाली व आर्यधर्माचें खरें विशुद्ध, लोकसंग्रही व उदात्त स्वरूप जगाच्या निदर्शनास आलें. बौद्धधर्म हा आजला जरी निराळा धर्मपंथ असा आपणांस भासतो तरी बुद्धदेवानें निराळा धर्म मुळींच काढला नाहीं. जुन्या धर्मावर चढलेलें कुविचाराचें कीट काढून टाकलें मात्र. म्हणजे बौद्धधर्म हा सुधारलेला हिन्दुधर्म होय. बुद्धदेवाच्या उदार क्षत्रियवृत्तीचें त्याच्या आत्यंतिक भूतदयेंत उत्तम मिश्रण झाल्यामुळें, त्याच्या संघाचीं तत्वें क्षत्रिय लोकांना तात्काळ मानवलीं व ते भराभर त्याचे अनुयायी झाले. वैश्यांचाहि हाच प्रकार. बिचाऱ्या शूद्रांचा व अस्पृश्यांचा आनंद काय विचारावा! त्यांना बुद्धदेव ईश्वरापेक्षांहि प्रिय वाटला. क्षत्रियादि त्रैवर्णिक बुद्धाचे अनुयायी झाले असें नव्हे, तर धर्माच्या नांवाखालीं होणाऱ्या भिक्षुकशाहीच्या अत्याचारांस विटलेले आणि बुद्धाचा विवेकवाद विचारान्तीं पटलेले हजारों ब्राह्मणसुद्धां अखेर बुद्ध जगद्गुरूच्या संघांत सामील झाले. विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे आर्यांचा धर्म फक्त आर्यांकरितां, इतरांकरितां नव्हे, ही जी संकुचितपणाची कोंडी भिक्षुकशाहीनें निर्माण केली होती, ती कोंडी फोडून पृथ्वीवर वाटेल त्या राष्ट्रांतला, वाटेल त्या जातीचा व वाटेल त्या संस्कृतीचा मनुष्य, त्याची इच्छा असेल तर, आपल्या संघांत बिनतक्रार समाविष्ट करून घेण्याचा मिशनरी उपक्रम प्रथम बुद्धदेवानें चालूं केला आणि लोकसंग्रहाच्या या तत्वाच्या जोरावर पुढें त्याच्या एकनिष्ठ अनुयायांनीं सारी ज्ञात दुनिया पादाक्रान्त केली.

बुद्धदेवाच्या चळवळीला धार्मिक बण्ड ह्मणण्यापेक्षां सामाजिक बण्ड हेंच नांव अधिक शोभतें. त्यानें वेदप्रणित धर्मतत्वांचा निषेध केला नाहीं, तर त्यांचा खरा अर्थ काय आहे तो जनतेला उघड करून दाखविला. यज्ञयागांचा खरा अर्थही त्यानें शिकविला. स्वत: प्रबुद्ध राजपुरुष असल्यामुहें, बुद्धदेवाच्या उपदेशांत राजकारणाची दूरदृष्टी तर विशेष चमकत होती. बुद्धदेवाच्या नवमतवादि प्रचंड चळवळीनें भिक्षुकशाहीचें वर्चस्व सर्वस्वीं जमीनदोस्त झालें व त्यामुळें बुद्धदेवावर भिक्षुकशाही जळफळाट करूं लागली, हें खरें; परंतु ज्या वेदप्रणित धर्माच्या प्रतिनिधित्वाची ऐट भिक्षुकशाही मारीत असे त्याच धर्माचें शुद्ध स्वरूप बुद्धदेवानें सर्वत्र प्रसृत केल्यामुळें ब्राह्मणांना आपली बाजू सावरतां सावरतां नकोसें झालें. बुद्धदेवानें वेदप्रणित कल्पनांच्याच आधारावर आर्यसंघाची व्यापक धोरणावर पुनर्घटना केली आणि कालमानाला अनुसरून धर्माचें द्वार सर्वांना अभेदभावानें मुक्त सोडलें. शुद्ध आचारविचारांची महति धर्माप्रमाणेंच राजकारणाच्या क्षेत्रांत त्यानें विशेष प्रतिपादन केल्यामुळें राष्ट्राच्या जीवनांत अध्यात्माच्या जोडीनें अर्थवादहि थरथरला. तत्वज्ञानाच्या शुष्क अवडंबरापेक्षां त्याचा प्रत्यक्ष उपयोग राष्ट्राच्या चारित्र्यांत केल्यामुळें राष्ट्राच्या भाग्योदयाचा प्रवास भराभर होत गेला.

बुद्धदेव आमचे आहेत. त्यांचीं धर्मतत्त्वें आमचीं आहेत. कालविपर्यासामुळें आम्ही आजवर बुद्धदेवाला विसरलों होतों. आज त्यांची आम्हांला आठवण झाली. हिन्दुस्थान बुद्धदेवांचा आहे, बुद्धदेव हिन्दुस्थानचे आहेत. ते हिन्दु राष्ट्राला कसे विसरतील? आपल्या एकदेशियत्वाची कोंडी फोडून हिन्दुस्थान आशिया खंडांतील बुद्धानुयायी राष्ट्रांशीं सहकारिता करील, तर 'एशियन नेशन्स लीग' सारखा प्रचंड पराक्रमी संघ निर्माण होऊन त्याच्या द्वारें बुद्धदेवांची मिशनरी चळवळ साऱ्या जगाला पुनश्च पादाक्रांत करून हिंन्दु धर्माला जगाचें जगद्गुरुपद प्राप्त व्हायला उशीर लागणार नाहीं.

बुद्धदेवा, लवकर या.

□□□

एन ४००६--१५अ

स्फुट विचार

राष्ट्राळलेल्या तरुण विद्यार्थ्यांचा अध:पात

सन १९०७-०८ सालच्या बांब प्रकरणाच्या धामधुमींत, जहालांच्या राष्ट्रीय बरळण्यामुळें मार्थी भडकलेले शेंकडों तरुण विद्यार्थी हकनाहक अत्याचारी कसे बनले, देशभक्तीच्या खोट्या कल्पनेच्या भरीं भरून काळ्या पाण्यावर रवाना कसे झाले आणि सुटून परत आल्यावर खुद्द बंगाली राष्ट्रीयांच्या जोड्याशींहि उभे राहण्यास कुपात्र कसे ठरले, याच्या करुणकहाण्या त्याच पश्चात्तापित तरुणांनीं अनेक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केल्याच होत्या. बांब कटांतला मुख्य माथेफिरू बिरेंद्र घोस हा काळेपाणी भोगून परत आल्यावर त्यानेंहि आपल्या मूर्खपणाचा पश्चात्ताप व्यक्त करणारें विस्तृत पत्र अनेक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केल्याचें पुष्कळांच्या स्मरणांत असेलच. त्यांत त्यानें देशभक्तीच्या पोकळ फुग्याची, जहालांच्या राष्ट्रीयपणाची आणि स्वराज्य प्राप्तीसाठीं अत्याचाराच्या निष्फळतेची खूप खरडपट्टी काढून तरूण विद्यार्थ्यांना असल्या राष्ट्रीय चळवळींपासून अलिप्त रहाण्याचा कळकळीचा इषारा दिला होता. बंगालच्या अत्याचारी राष्ट्रीय चळवळीमुळें अध:पात झालेल्या शेंकडों तरुण विद्यार्थांची करुण कहाणीची पत्रें लाहोरच्या 'सिविल ॲन्ड मिलिटरी गॅझेट' पत्राच्या कचेरींत संग्रह केलेलीं आहेत. म. गांधीनीं जेव्हां असहकारी चळवळीची तळी उचलण्यासाठीं पुनश्च या तरुण विद्यार्थ्यांना 'मांजराच्या डावल्या' (Cat's paw) बनविण्याचा 'हिमालयन घोडचुकी'चा उपद्व्याप केला, त्या वेळींसुद्धां सदर्हू पत्रानें दोनचार निवडक प्रसिद्ध बंगाली तरुण विद्यार्थ्यांच्या अध:पाताच्या करुणकहाण्यांचीं पत्रें प्रसिद्ध करून राष्ट्रीय गुंडांना हंगामी इषारा दिला होता. पण सात महिन्यांत स्वराज्य कमविणाऱ्या या देवदूतांनीं त्या इषाऱ्याची पर्वा केली नाहीं आणि हजारों विद्यार्थ्यांना भावनोत्तेजक व्याख्यानांनीं पूर्ण भारून त्यांच्या अध:पाताची व सर्वस्वनाशाचीं पुण्याई जोडली. असहकारी चळवळीच्या फंदांत पडल्यामुळें बंगाल्यांत हजारों विद्यार्थ्यांच्या आयुष्याची माती झाली आहे. गांधी आपल्या सात्विक वृत्त्यनुसार 'झाली ही माझी हिमालयाएवढी घोडचूक झाली !' असें ह्मणून स्वस्थ बसले खरे, पण या हजारों तरुणांच्या जीविताच्या झालेल्या मातीवर त्यांच्या सात्विकपणाची पुण्याई आतां कितीहि घांसली तरी काय निष्पन्न होणार ! 'सैतानी' सरकारच्या शाळा सोडतानां राष्ट्रीय शाळांत तुमची व्यवस्था करण्यांत येईल, स्वराज्यासाठीं प्राण देण्याचा अग्रमान तुमचा आहे, हिन्दमाता तुमच्या पराक्रमाचीं वाट पहात

आहे, वगैरे राष्ट्रीय गप्पा झोडणारे संत महंत विद्यार्थ्यांना खाड्यांत ढकलून आपण पुन्हां असहकारितेच्या तत्वाच्या न् तपशीलाच्या दिवाणखानी चर्चा करीत बसायला मोकळेच्या मोकळे ! परस्परा पावणे तेरा होऊन पाहुण्याच्या टाळक्यानें विंचु ठेंचण्यांत हिन्दुस्थानांतला राष्ट्रीय पक्ष पक्का वाकबगार आणि त्यांतल्या त्यांत पुणेरी राष्ट्रीयांची परंपरा तर काय अस्सल बाळाजीपंत नातूच्या संप्रदायाची इतरांची मुलें यांच्या मायावी लेखन व्याख्यानांस भुरळून ठार मेली तरी त्यांचें सुहेर सुतक यांना थोडेंच आहे? स्वत:ची कारटीं पोरटीं मात्र 'सैतानी' शाळेंत गेलीं किंवा खुद्द विलायतेंत सैतानी शिक्षण घेत बसलीं, तर त्या विषयीं मात्र या गुंडांना लवमात्र शरम वाटायची नाहीं. ता. १७-५-२२ च्या नागपूर येथील हितवाद पत्रावरून असें समजतें कीं नुकत्याच पेटावलेल्या असहकारितेच्या यज्ञांत हकनाहक बळी पडलेल्या बंगालच्या शेंकडों तरुण विद्यार्थ्यांनी काँग्रेस कमिटी व सेंट्रल खिलापत कमिटी यांच्याकडे आपल्या अध:पाताच्या करुण कहाणीचा एक निषेधक स्पष्टोक्तीचा अर्ज पाठविला असून, त्याच्या नकला सर्व हिन्दी वृत्तपत्रांत प्रसिद्धहि केल्या आहेत. एकाच पिढीच्या अमदानींत दुर्दैवी इतिहासाची पुनरावृत्ती इतक्या झटपट व लागोपाठ झाल्याचें उदाहरण पूर्वीच्या इतिहासांत आढळत नाहीं. आणि या पुनरावृत्तीच्या घिसाडघाईचें पुण्य राष्ट्रीय पक्षाशिवाय आजपर्यंत दुसऱ्या कोणास लाभलेंहि नाहीं. वांब प्रकरणांतील तरुणांच्या ऐहीक महत्वाकांक्षांचे वाटोळें होऊन त्यांना समाजाचा, आप्तेष्टांचा व गांवकऱ्यांचा तिरस्कारपूर्ण बहिस्कार व त्यावरच सरकारच्या कायदेबाज नजरेची कडकडीत फोडणी भोगण्याचे कपाळीं आल्यामुळें, आजला त्यांची स्थिति जिवंत असून मेल्यासारखी झाली आहे; इतकेंच नव्हे, तर ज्या जहालांच्या उठावणीनें त्यांनीं अत्याचाराच्या जोरावर स्वराज्यप्राप्तीसाठीं आपल्या जीवाची तमा बाळगली नाहीं, ते जहाल पुढारी त्या हतभागी तरुणांना आपल्या खेटरांपाशीं सुद्धा येऊं देत नाहींत. ही दु:स्थिति केवळ एका बंगालपुरतीच नसून हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं एकजात एकजिनसी पहावयास मिळते. महाराष्ट्रांत तर तिचा अनुभव सर्वत्रांना आहेच. प्रस्तुतचे असहकारी तरुण विद्यार्थी आपल्या निषेधाच्या जाहीर खलीत्यांत ह्मणतात कीं असहकारीतेच्या प्रक्षुब्ध चळवळीच्या धामधुमीनें राष्ट्रीय विद्यालयांचे ठिकठिकाणीं फुगविलेले फुगे सांपत्तिक मदतीच्या व एकनिष्ठ कार्यकर्त्यांच्या अभावीं सर्वत्र फटाफट फुटत असल्यामुळें त्यांच्या विद्यार्जनाला जबरदस्त धक्का बसून त्यांच्या महत्वाकांक्षेची राखरांगोळी झाली आहे. खिलाफत व काँग्रेस या संस्थांच्या दोनहि वेळच्या आव्हानाला मान देऊन शुद्ध स्वदेशप्रेमानें असहकारीतेच्या यज्ञांत त्यांनीं भराभर उड्या घेतल्या व तुरुंगाची क्षिति बाळगिली नाहीं किंवा पोलीसांच्या सोटेशाहीखालीं हाडांचे पीठ होत असतांना स या ग्रहाच्या तत्वासाठीं त्यांनीं दु:खाची एक किंकाळीसुद्धां मारली नाहीं. त्यांची अशी आशा होती कीं राष्ट्राकरितां त्यांच्या हातून होणाऱ्या स्वार्थत्यागाची बूज राष्ट्रीय पक्षाकडून ठेविली जाईल. परंतु आज त्यांना अनुभव अगदींच उलटा येत आहे. (They expected that their splendid sacrifices would be recognised, but they now find that they have been thrown overboard and all their services forgotten.) कैदेंतून सुटल्यावर या हतभागी तरुणांनी आपल्या भवितव्यासाठीं राष्ट्रीय चळवळ्यांच्या मुलाखती घेण्याचा प्रयत्न केला. हे चळवळ्ये पुढारी घोड्यावर असल्यामुळें या बिचाऱ्यांना त्यांची मुळीं भेट होईना. जेमतेम भेट होतांच पुढाऱ्यांनीं त्यांच्या स्वार्थत्यागाचें कौतुक करण्याऐवजीं उलट त्यांची बिनपाण्यानें केली आणि राष्ट्रीय शिक्षणाच्या व्यवस्थेबद्दल शिरा ताणताणून केलेल्या प्रवचनांची कांहींही

शरम न बाळगितां, तुमचे तुह्मीं पाहून घ्या, आह्मांला काय विचारतां? असला रोखठोक जबाब देऊन त्या तरुणांना तोंडघशीं पाडलें. (They were sternly rebuked and their request goes unheeded as some of the leaders now hold that no education should be given to them.)

या एकंदर प्रकाराला बेशरमपणा किंवा सैतानी नीचपणा यापेक्षां दुसरी यथायोग्य शब्दयोजना यावेळीं तरी आह्मांला निदान सुचत नाहीं. देशांतील हजारों उमेदवार तरुणांच्या जीविताची राखरांगोळी करून असहकारीतेसारखे हंगामी ढोंगधत्तुरे नाचविणाऱ्या राक्षसांना कोणती उपमा द्यावी हें विचारी सज्जनांनींच ठरवावें. परंतु, उपमा कोणती द्यावयाची हा प्रश्न महत्वाचा नसून 'सैतानी' ब्रिटीश सरकारची उचलबांगडी झाल्यावर राष्ट्रीय पक्षाच्या टाळ्यांच्या कडकडाटांत स्थापन होणाऱ्या गांधी स्वराज्यांत या सैतानी शिलेदारांचा महमद तघलखी अंमल हिंदुस्थानावर चालावयाचा आहे ही महत्वाची गोष्ट मात्र विचारांत घेण्यासारखी आहे. सदर्हू तरुण विद्यार्थ्यांच्या करुण कहाणींतील शेवटलें वाक्य वाचून त्यांच्या मन:स्थितीची आपल्याला स्पष्ट कल्पना होते. ते ह्मणतात ''आमच्या भावी आयुष्याची माती होऊं नये ही एकच गोष्ट या पुढाऱ्यांच्या मनावर बिंबवण्याची आमची इच्छा आहे. राष्ट्रकार्याकरितां जेव्हां ह्मणाल तेव्हां आह्मी वाटेल तो स्वार्थत्याग करायला अझूनही तयार आहो. पण, मेहेरबान, अज्ञानी दगड धोंड्याप्रमाणे उनाडटप्पू ह्मणून मात्र या जगांत दिवस कंठण्याची आमची मुळींच इच्छा नाहीं.'' (What we intend to impress upon them is not to utterly ruin our future life, we are ready to serve our National cause, whenever we shall be call upon to do so, but we do not like to be ignorant rabble.)

महाराष्ट्रांतील राष्ट्रीय शिक्षणाच्या ढोंगधत्तुऱ्याला बळी पडलेल्या, पडत असलेल्या, किंवा पडूं इच्छिणाऱ्या तरुणांना वरील हकीकतीवरून जो कांहीं बोध घेतां येण्याजोगा असेल तो खुशाल घ्यावा.

फंडगुंडांचें बंड

पेण येथें प्रसिद्ध होणाऱ्या कुलाबा समाचार साप्ताहिकांत (ता. २०-५-२२) खालील एक स्फुट प्रसिद्ध झालें आहे.

''पेण येथें लो. टिळक आले होते त्या वेळीं जमा झालेल्या पैशांपैकीं सुमारें २५० रु. शिल्लक आहेत. हे रुपये वास्तविक त्या वेळीं खजिनदार नेमलेले श्रीमंत बापूसाहेब कोल्हटकर यांजकडेच जमा व्हावयास पाहिजे होते. परंतु ते त्यांच्याकडे आजपर्यंत कधींच जमा झालेले नाहींत असें तपास केल्यावरून समजतें. वरील रक्कम आज तीन वर्षे धूळ खात पडली आहे. तरी ती ज्यांच्याजवळ आहे त्यांनीं तिचा सव्याज भरणा खजिनदरांकडे ताबडतोब करावा अशी आमची तयास सूचना आहे. या संबंधात पुन: लिहिण्याचा कटु प्रसंग आमच्यावर येणार नाहीं अशी आह्मांस आशा आहे.'' कुलाबा समाचारकर्त्याचे आह्मीं प्रथम या गौप्यस्फोटाबद्दल आभार मानतों आणि एवढेंच सुचवितों कीं टिळकांच्या नांवानें जम विलेले लाखो रुपयांचे फंड ज्या महाराष्ट्रांत राष्ट्रीय पक्षानें बोल बोलतां गडप केले तेथें पेणचा अडीचशें

रुपयांचा फंड तेथील स्थानिक गुंडांच्या पोटांतून तुमच्या स्फुटामुळें बाहेर पडला काय किंवा सफाई पचनीं पडला काय, दोहोंचीहि महाराष्ट्राला सारखीच किंमत ! असें शेंकडा गणपतीचे फंड महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं कितितरी जमा झाले आणि गडप झाले. कोण आला होता त्या फंडगुंडांचे हात धरायला? बिचारी श्रद्धाळू जनता 'लोकमान्य टिळक महाराजकी जय' म्हणतांच आपल्या घासांतला घांस काढून गुंडांच्या झोळ्या भरीतच आहे! तिनें कोठें आजपर्यंत ना म्हटलें आहे, तर फंडगुंडांनीं फंडांचे हंड गडप करण्यास कचरावें? सरकारी पैसा गडप करणाऱ्यावर खटले करण्यासाठीं सरकारपाशीं निदान कायद्याचें तरी एक शस्त्र आहे; पण असहकारितावादी राष्ट्रीय गुंडांच्या स्वराज्यांत सैतानी सरकारचा कायदा मान्य नसल्यामुळें व खुद्द त्यांचाहि त्यासंबंधीं एकदा निर्बंध अस्तित्वांत नसल्यामुळें, फंडगुंडांच्या बंडाला धरबंधच नसला तर कोणालाही आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. गोमागणेश पितळी दरवाज्याचा शिक्का असला कीं चोर देखिल साधू होतो, मग फंडगुंडांवर चढलेले देशभक्तीचे वारूळ निपटून काढणार कोण? सार्वजनिक कार्यासाठीं जमविलेल्या फंडावर उभारलेल्या 'राष्ट्रीय' संस्था संस्थापकाचा मृत्यु होतांच चटकन् 'खासगी मिळकती' कशा होतात, याचा मासला ब्रह्मनाळकर बुवांच्या मुंबईतील कीर्तनालय संस्थेनें नुकताच दाखविल्याचें कुलाबा समाचारकर्त्यांस ९।५।२२ च्या केसरीवरून कळलेंच असेल. टिळकांच्या आशिर्वादाचें राष्ट्रीय सर्टिफिकेट घेऊन कीर्तनालयासाठीं गांवोंगांव फंड जमा करणारे ब्रह्मनाळकर बुवा ब्रह्मीभूत होताच, कीर्तनालयसंस्थेच्या भूताची पुढें वाट काय, असें प्रश्न बुवासाहेबांचें हस्तक वे. सदाशिवशास्त्री भिडे व श्रीयुत केतकर B. A. यांना जनतेनें विचारतांच त्या दोघांनीं केलेला जाहीर खुलासा विचार करण्यासारखा आहे ! बेटे दोघेही आतां ह्मणतात कीं बुवांचा हातपाय होण्यापूर्वीच आह्मीं संस्थेंतून पाय काढलेला आहे आणि आमच्या हाताला कांहींही लागलेलं नाहीं. पायाप्रमाणेंच हात स्वच्छ आहेत. संस्था ही बुवाची खासगी मिळकत आहे. त्यांचे वारस संस्थेचें बारसं घालीत नाहीतर तेरावे घालीत, आह्माला त्याच सुहर सुतक काही नाहीं. झालें. खलास काम. याला ह्मणतात राष्ट्रीय नाटकांचें ट्रान्स्फर सीन? लोकशाही, लोकसत्ता, बायकांचें बंड, मुलांचें बंड, मायेचा पूत, असलीं नाटकें लिहिण्यापेक्षां आमच्या रिकामटेंकड्या लेखणीबहाद्दारांनी फंडगुंडांचें बंड हें नाटक लिहिल्यास असल्या ट्रान्स्फर सीनांचा त्यांना दुष्काळ पडणार नाहीं.

अंबर टिप्स टी

या नांवाचा चहा अलीकडे ''राष्ट्रीय पेय'' पदवीनें मंडित होऊन त्यावर सौ. सरोजिनी नायडु, पिक्थॉल, ब्रेलवी वगैरे जाड्याजाड्या असहकारवादी मंडळींच्या सर्टिफिकीटांचा मुसळधार पाऊस कोसळत आहे. आम्ही स्वत: हा चहा वापरला आहे व तो लिप्टनच्या पिवळ्या लेबली चहापेक्षां नि:संशय उत्कृष्ट आहे. पण येथें या चहावर अभिप्राय द्यावयाचा नाहीं. अंबर टिप्स टी कंपनी 'स्वदेशीं भांडवलावर उभारलेली आहे' व हा चहा हें 'राष्ट्रीय पेय' आहे, या ज्या वलगना लोकमान्य केसरी क्रॉनिकलादि पत्रांतून चालल्या आहेत, त्या त्यांच्या राष्ट्रीय असहकारी बाण्यात कितपत शोभेशा आहेत, याचाच आज विचार कर्तव्य आहे.

जो कोणी सहज या चहा कंपनीच्या उभ्या पारशाजवळील भव्य इमारतीकडे, त्यांच्या त्या टापटिपीकडे, युरपियन कामगारांच्या सुळसुळाटाकडे, त्यांच्या चैनीचें चोज पुरविणाऱ्या बिऱ्हाडांतील विलासी थाटमाटाकडे, त्यांच्या व्यापारी धोरणाच्या पद्धतशीर व्यवस्थेकडे पाहील, त्याला हें सहज उमजून येईल कीं इतक्या सफाईत व इतक्या अल्पावधींत अशा तऱ्हेनें आमचे 'स्वदेशी भांडवलांचे' धंदे जर थाटणें शक्य असेल, तर आणखी स्वराज्य स्वराज्य ह्मणतात तें कोणतें? आम्ही या कंपनीला व त्यांच्या लोकमान्य क्रॉनिकलादि भाटांना आव्हान देतों कीं ही कंपनी 'स्वदेशी भांडवलाची' कशावरून, याचा सप्रमाण पुरावा एकदां पुढें येऊं द्या. ही जर स्वदेशी कंपनी असती तर त्यांत त्या गोऱ्या बायाबुवांचा सुळसुळाट कशाला पाहिजे? स्वदेशीचा मंत्र आतां हिन्दुस्थानभर फैलावल्यामुळें, 'स्वदेशी' शब्दाच्या जाहीरातीनें लोकांना चकविण्याचे धंदे परकीय लोक जर न करतील तर ते 'विलायती' कसले? स्विच्छर्लंडांतलीं घड्याळें इकडे आणून विकणारी लॅमिंग्टन रोडवरील 'स्विस वॉच वर्क्स' कंपनीसुद्धां स्वत:स 'देशी भांडवलानें व देशी लोकांच्या व्यवस्थेखालीं स्थापन झालेली' असा जाहीर पुकारा दररोज लोकमान्य पत्रांत करीत असते. हा प्रकार स्वदेशीचाच मानावयाचा काय? असें असेल तर म. गांधींच्या कोटांफंडांतून गुंडलोकांनीं मोटारी विकण्याचा जो एक धंदा काढल्याचें उघडकीस आलें आहे, तोहि 'स्वदेशी'चाच प्रकार कां समजूं नये? याच नियमानें हिन्दी मजुरांच्या व हिन्दी कामगारांच्याच सहायबळावर चाललेल्या बहुतेक सर्व विलायती कंपन्या 'स्वदेशी' समजण्यास काय हरकत आहे? १९०७-०८ च्या स्वदेशी चळवळीच्या धामधुमींत आम्ही एकदां सफाई फसलों होतों. रस्त्यावर 'स्वदेशी आगपेट्या, विलायतीवर ताण, स्वदेशी आगपेट्या' असें ओरडून एक मुसलमान फेरीवाला भराभर आगपेट्यांची विक्री करीत होता. आम्ही तेथें गेलों व पेटीवर SWADESHI अशीं अक्षरें पाहून एक डझन खरेदीं केलें. घरीं येऊन नीट न्याहाळून पहातों तों पेटीवरील शब्द Swadeshi स्वदेशी असा नसून Swedish स्वीडीश असा आढळला. सारी कल्पनासृष्टी स्वदेशीमय झाल्यामुळें स्वीडीश हा शब्द स्वदेशी असाच डोळ्यांना दिसला व हजारों लोक फसले. सारा नजरबंदीचा खेळ ! आह्माला चहाचें व्यसन फार आहे. ही गोष्ट वाईट असेल; पण दोष कबूल करायला कांहीं हरकत नाहीं. अर्थात् अंबर टिप्स चहासारखा उत्कृष्ट चहा जर आम्हाला सपाटून मिळूं लागला, तर त्यांत चहाबाजांना आनंदच आहे. पण प्रश्न या आनंदाचा नव्हे, चहाच्या उत्कृष्टपणाचाहि नव्हे, तर तत्वाचा आहे. हल्ली केसरीमध्यें या चहाची जी जाहिरात येत असते, त्यांत श्री. सरोजिनी नायडु यांचें एक सर्टिफिकेट मथळ्यावर छापलेलें असतें. त्यांत या कवयित्रीनें या चहाची व त्याच्या देशी भांडवलपणाची चहासारखीच गोड व काव्यमय वाणींत स्ट्राँग चहा केली आहे. या शिवाय पेटीट बोमनजी ब्रेलबी (संपादक क्रॉनिकल) इत्यादि अनेक स्तुतिपाठकांचीं नांवें त्या जाहीरातींत आहेत. चहा उत्तम आहे, याचा आम्हीं मुळींच वाद घालूं इच्छित नाहीं. पण हा कारखाना 'देशी भांडवलाचा' आहे किंवा नाहीं, हें सप्रमाण सिद्ध करण्याची जबाबदारी या स्तुतिपाठकांना आतां टाळतांच यावयाची नाहीं. विशेष आश्चर्याची गोष्ट - खरें पाहिलें तर येथें 'बेशरमपणाची गोष्ट' अशीच शब्द योजना करायला हवी होती- ही कीं हा एवढ्या मोठमोठ्या माणसांनीं व सौ. नायडू ब्रेलबी सारख्या नितांत असहकारितांवाद्यांनीं भाटासारखी स्तुति करून गायिलेला अंबर टिप्स चहा राष्ट्रीय पेय म्हणून पुकारला जात आहे. म. गांधींच्या नांवावर धुडगुस घालणाऱ्या त्यांच्या दे. भ. सैन्यानें सर्व मुंबईकर चहाची बंदी करण्यासाठी केवढ्या प्राणघातक

दंगली केल्या त्या सर्वांना चांगल्या माहीतच आहेत. त्या वेळीं या राष्ट्रीय माकड सैन्यानें मुंबईतील अनेक लहान मोठीं चहाचीं हॉटेलें लुटलीं, त्यांतील मालाची व फर्निचरांची तसनस केली, मालकांस बेदम मारलें, हॉटेलांच्या इमारती जाळण्याचा यत्न केला व त्यावर धोंड्यांचा मारा केला. हें एवढें कशासाठी? तर दारूच्या आधीं चहाचा नायनाट करून त्याच्या कपबशांच्या खैकोळावर स्वराज्य मिळविण्यासाठीं. दादरच्या एका गांवठी महात्म्याच्या आंगांत तर हा चहाचा सैतान इतका बेफाम भडकला होता कीं कीर्तीकरांच्या मैदानांत भरणाऱ्या एका 'राष्ट्रीय' सभेंत या महात्म्यानें चिंतामणराव वैद्यांच्या अध्यक्षतेखालीं चहाबाजांच्या आईमाईचा उद्धारहि करायला कमी केलें नाहीं. मुंबईतला चहा बंद न झाला तर हे गांवठी महात्म्ये अन्नत्याग करणार होते. पुढें त्यांच्या प्रतिज्ञेचें काय झालें, हें दादरकरांना माहीतच आहे. कदाचित् अंबर टिप्स हा राष्ट्रीय पेय ठरल्यामुळें आमचे दादरकर गांवठी महात्म्ये त्याच्या बालद्या ढोंसून आपल्या प्रतिज्ञेचें पारणें फेडीत असतील, कोणी सांगावें ! चहासाठीं एवढी बंडाळी करणाऱ्या असहकारितावाद्यांच्याच पुढाऱ्यांनीं अंबर टिप्स चहाला आतां 'राष्ट्रीय पेय' ठरविण्याचा उपद्व्याप करावा, हें त्यांच्या संप्रदायाच्या आजपर्यंतच्या लौकीकास कितीसें शोभणारें आहे, तें त्यांनींच सांगितलेलें बरें ! आह्मासारख्या अट्टल चहाबाजांना काय, अँबर टिप्स नव्हता, तर लिप्टन ब्रुकबॉन्ड मनोहर होतेच कीं नाहीं! असहकारितावाद्यांना एकाच तोंडानें सर्द गरम हवा सोडण्यास भाग पाडण्याइतका अंबर टिप्स चहा स्ट्राँग आहे खरा !

□□□

लेख

मुळशी आणि राष्ट्रीय

मुळशीपेटा प्रकरणाबद्दल खास माहितीवरून आम्ही आपले स्पष्ट विचार प्रबोधन अंक ३ व ७ मध्यें व्यक्त केले होते व सत्याग्रहाची चळवळ करणाऱ्यांना कांहीं व्यवहार्य सूचनाहि केल्या होत्या. परंतु परंपरेच्या संप्रदायाला अनुसरून, जें करायला हवें तें नको व नको तें मुद्दाम करायचें, या धोरणानें मुळशी प्रकरणाचा बागुलबोवा राष्ट्रीय पक्षानें बराच फुगविला आहे. वाटेल त्या क्षुल्लक बाबींतून भयंकर स्वरूपाची चळवळ निर्माण करणें व पोटभर आरडाओरड करून लोकांची दिशाभूल करणें, या गोष्टी राष्ट्रीय कंपूच्या हातचा मळ आहे. क्षुल्लक पुटकुळीला खाजवून त्याची माकडजखम बनविण्यांत पुण्याची भिक्षुकशाही कोणालाहि हार जाणार नाहीं. अर्थात् मुळशी प्रकरणांत त्यांनीं सत्याग्रहाचा जो राईचा पर्वत केला आहे, त्याची स्पष्ट कल्पना वाचकांना देणें आमचें कर्तव्य आहे. वास्तवीक हें कर्तव्य म्हणजे डोंगर पोंखरून उंदीर काढण्यासारखेंच आहे, पण राष्ट्रीय कंपूनें फुगविलेले फुगे हे फुगेच असतात हें दाखविण्यासाठी डोंगर पोंखरून उंदीरहि न निघाला तरी कांहीं हरकत नाहीं. या बाबतींत टाटा कंपनीचें वकीलपत्र आम्ही घेतलेलें नाहीं, त्यांचा आमचा कांहीं संबंध नाहीं किंवा त्यांच्या हिताहितांत आमच्या हिताहिताची मानगुटी अडकलेली नाहीं. खुद्द मावळ्यांबद्दल पुसाल, तर इतर सामान्य शेतकरी बांधवांबद्दल जी आमची कांहीं भावना आहे तेवढीच त्यांच्यासंबंधी आहे. प्रेमाच्या बाबतींत भरती ओहटीचे राष्ट्रीय फार्स आम्हांला साधणार नाहींत. ऋणको मावळे व धनको ब्राह्मण गुजर यांच्या परस्पर कायदेबाजींत ढवळाढवळ करण्याचा अधिकार कोणालाहि नाहीं. राहतां राहिले सत्याग्रही राष्ट्रीय. त्यांच्याबद्दल मात्र स्पष्ट सूचना करणें प्राप्त आहे.

मावळ्यांची स्थिति व राष्ट्रीय प्रेमाचा पान्हा

मुळशी पेट्यांतल्या शेंकडा ९५ मावळ्यांच्या जमिनी खरेदीगहाणावर ब्राह्मण व गुजर सावकार कधींच गट्ट करून बसले आहेत व आतां तर बहुतेक सावकारांनीं टाटा कंपनीला त्या जमिनी विकून आपला तळीराम गार केला आहे. म्हणजे कायद्यानें सुद्धां मावळ्यांना जमिनीवर मालकी हक्क सांगण्याची सोय नाहीं. जी स्थिति शेतकी जमिनीची तीच रहात्या झोंपड्यांची. राष्ट्रीयांना मावळ्यांच्या प्रेमाचा आतांच एवढा मोठा पान्हां कां फुटला आहे? याचा खरोखर विचार व केला पाहिजे. मावळ्यांची आठवण आज

एकदम त्यांना कशी झाली? आज इतक्या वर्षें त्यांच्या घरांदारांवर व शेतवाडीवर आपल्या जातभाई सावकारांचा चक्रवाढी नांगर बिनधोक फिरत असतांना, हा शिवाजीच्या मावळ्यांचा प्रेमा कोठें ठेंचाळून पडला होता? टाटा प्रकरणामुळें मुळशीला आज राष्ट्रीय प्राण्यांची पार्सलें दररोज भडाभड रवाना होत आहेत; पण या प्रकरणाचा मागमूस नव्हता तेव्हां मुळशींतल्या मावळ्यांची हालहवाल पुसायला कोणकोणते राष्ट्रीय पुढारी कधिं कधिं गेले होते व त्यांनीं मावळ्यांची स्थिति सुधारण्याच्या कायकाय खटपटी केल्या, याचा पुरावा पुढें येत आहे काय? शिवाजीच्या नांवावर जमवून गडप केलेल्या फंडांतली एकादी फुटकी कवडी उगाळून मावळ्यांच्या कपाळीं टिळा लावण्याचें पुण्य राष्ट्रीय कंपूनें मिळविलें आहे काय? टिळक कडोसरी फंड, ज्युबिली फंड, असले लाखों रुपयांचे फंड जमा झाले, पण त्यांतून निदान १०० मावळ्यांच्या जमिनी तरी सावकारी कसाबांच्या ऋणांतून मुक्त करून शिवाजीबद्दल व मावळ्यांबद्दल या राष्ट्रीयांनीं आपलें प्रेम व्यक्त केलें आहे काय? आतां यांना मोठा प्रेमाचा पान्हा फुटला आहे ! शिवाजीबद्दलचें राष्ट्रीयांचें प्रेम किती राष्ट्रीय आहे, हें महाराष्ट्रांत सर्वांना चांगलें माहीत आहे. एवढी यांची परंपरा जर नितांत शिवप्रेमी होती, तर त्याच शिवाजीच्या वंशजाची व छत्रसिंहासनाची राखरांगोळी करतांना त्या प्रेमानें मुळामुठा नदींत जलसमाधी घेतली होती कीं काय? सावकारांचा प्रश्न बाजूला ठेवला, तरी मुळशी प्रकरणापूर्वी अनेक मावळ्यांचीं वतनें भोरच्या भिक्षुक अजगरानें डोळे मिटून मटकावली, त्या वेळी राष्ट्रीय पक्षाचे अध्वर्यु काय शेण्या थापित बसले होते? नुकतेच भाटधरचें धरण बांधलें गेलें. त्यांत कमींत कमी १८२ खेडीं बुडालीं व सहस्रावधि मावळे देशोधडीला लागले. त्या खेड्यांतल्या सर्व जमिनींचे कॉम्पेन्सेशन भोरच्या पंतसचिवानें संथपणें पचविलें. त्यावेळीं हा मावळ्यांचा राष्ट्रीय प्रेमाचा पान्हा कोठें होता? मग आतांच हा मावळ्यांच्या प्रेमाचा आणि शिवाजीच्या अभिमानाचा पान्हा राष्ट्रीयांना अवचित कां फुटला? सारांश मावळ्यांचा सर्वस्वनाश यापूर्वीच होऊन चुकला आहे. जमिनीची खरेदी करूंन चक्रवाढी सुरीनें मावळ्यांची मान सावकारांनीं कापल्यानंतर 'जान किंवा जमीन'चा प्रश्न मूर्खपणाचा आहे. सावकारी कचाट्यांत सांपडल्यामुळें कायद्यानेसुद्धां ते रहात्या घरांत असूनही देशोधडीस लागले आहेत. आणि त्यांच्या दुःस्थितीबद्दल 'मेल्यानंतर वैद्य' म्हणीप्रमाणें राष्ट्रीयांना आलेला प्रेमाचा पान्हा गाळीव नाटकी, शुद्ध दांभिक व अस्सल कारस्थानी आहे.

सत्याग्रह चळवळीचा मालमसाला

आमच्या राष्ट्रीय बंधूंचा एक गुण पहाण्यासारखा आहे. त्यांना नेहमीं कांही ना कांहीं खटपट करण्याची हौस फार. बाळाजीपंत नातूचीच अखंड परंपरा ! काय बेट्याची दांडगी 'एनर्जी' हो. इकडे शनिवार वाड्यावर युनियन जॅक बावटा फडकवून रावबाजीला हद्दपार करतो, इंग्रेजाकडून जहागिरी मिळवितो, तिकडे चिंतामणराव सांगलीकरांना उठवून वेदोक्त पुराणोक्ताची आग भडकवून देतो, इकडे कंपनी सरकारला मथवून प्रतापसिंहावर राजद्रोहाचे किटाळ उठवतो, तों तिकडे खुद्द त्याच्याच भावाच्या हातून छत्रपतीची राजगादी पेटवतो, पुन्हा आपणच दिवाण होतो, जहागिऱ्या उपटतो, पायघड्या चौघड्याच्या सनदा मिळवतो; आणि इतक्या उलाढाली करून पुन्हा शेंडी झटकून मोकळाच्या मोकळा ! भ्रूणहत्या केल्या, स्त्रीहत्या केल्या, शेंकडों खून पाडले, हजारों ब्राह्मणेतरांना भरल्या ताटावरून देशोधडीस लावले, १८ उंट भरून ऐतिहासिक महत्वाचे कागद जाळले, पेशवाईला जिवंत गाडून छत्रपतीचा वंशच्छेद केला व अखेर साताऱ्यांत हिन्दवी स्वराज्याचा मुडदा पाडला. पण त्यांपैकीं

एकादें पातक त्याच्या नांवें चित्रगुप्ताच्या कीर्दीवर खर्ची पडेल तर हराम ! सारा व्यवहार 'परस्पर पावणे तेरा' धोरणाचा !! कांहींहि असो, पुटकुळीला माकडजखम बनविण्याच्या बाबतींत बाळाजीपंत नातू हिंमतवान् चळवळ्ये खरे! त्यांच्या संप्रदायाचा स्वभावसुद्धां फार प्रेमळ. दिवसांतून दोन दोन वेळां त्यांच्या प्रेमाला भरती ओहटी येत असे. सकाळी इंग्रेजांशीं राजनिष्ठ, दुपारीं रावबाजीना धीर देणारे शालशिष्ट तर संध्याकाळीं आप्पासाहेब भोसल्यांचे खासगी सरकारी बाबतींतले वशिष्ट !

प्रस्तुतची सत्याग्रहाची चळवळ चालविणारे नातुसांप्रदायिक आहेत. अर्थात् ती एक बिनतोड परंपराच असल्यामुळें तिच्या धांगडधिंग्याची पावलें ऐतिहासिक सिद्धांतानुरूप पद्धतशीरच पडावी. यांत आश्चर्य नाहीं. एखादी बरी वाईट चळवळ या सांप्रदायिकांनीं हातीं घेतली पुरे कीं तिच्या नगाऱ्याच्या दणक्यांत वाटोळी पृथ्वी चौकोनी झाली तरी दुनियेला दाद लागत नाहीं. सत्याग्रही मंडळींत राष्ट्रीय चित्पावनांचा भरणा विशेष आहे. इतर जातीय 'मांजराच्या डावल्या' फारच थोड्या असून, त्यांचा उपयोग राष्ट्रीय धांगडधिंग्यास 'सार्वत्रिक' 'सार्वजनिक' स्वरूप आणण्याकरितांच केलेला आहे. म. गांधीच्या असहकारी चळवळीला पुण्याचे राष्ट्रीय जरी फारसे बिलगून नव्हते, तरी पिकेटिंग कोटीफंड इ. साधनांच्या धसळामुसळीचा त्यांना बराच विरंगुळा होत असे. परंतु बारडोलीस पिछेहाटीचा बार पडाल्यामुळें असहकांरितेचें मढें डोलींत पडलें व राष्ट्रीयांना धुडगुस घालण्याचें एक साधन नाहींसें झालें पण जात्याच ते कुशाग्र बुद्धीचे असल्यामुळें त्यांनीं चटकन् मुळशीची तांबडी चिंधी हातीं घेऊन, टाटा कंपनीला प्रत्यक्ष व सरकारला अप्रत्यक्ष भेदरविण्याचा उपक्रम सुरूं केला आहे. या उपक्रमाचें नाटक नटवितांना त्यांतल्या नटांना शिवाजीच्या अभिमानाचा उमाळा आणणें व मावळ्यांच्या प्रेमाचा पान्हा टाटाच्या धरणापेक्षांहि तुडुंब भरलेला दाखविणें प्राप्तच आहे. नाटकांत नटानें भूमिकेशी तादात्म्य दाखविलें नाहीं तर तो नट कसचा !

राष्ट्रीय कंपूचें नाट्य बऱ्याच वरच्या दर्जाचें आहे. एकीकडे ब्राह्मणेतरच्या चळवळीचा मुडदा पडतो कधिं व त्यांच्या तेराव्याचे लाडु खातों कधिं, यासाठी तिरडी मडकी जय्यत ठेवून वाट पहात बसलेली त्यांची आतुर मुद्रा पहा, व दुसरीकडे ब्राह्मणेतर मावळ्यांसाठीं तुरुंगांत जाण्याची त्यांची उत्सुकता पहा. दोन परस्परविरुद्ध भावनांचें संमीश्रण एकाच वेळीं करण्याचें कौशल्य हेन्री आयर्विंगलाहि साधलें नाहीं व नसतें. कारण तो राष्ट्रीय नव्हता, सारांश, मुळशींत सध्यां चालूं असलेली राष्ट्रीयांची आगांतुकी उपटसुंभी आहे. येनकेन प्रकारेण देशांत अस्वस्थता माजवून भिक्षुकशाही राजकारणाचे डाव जिंकण्यासाठी या सत्याग्रहाचा पराचा कावळा निर्माण करण्यांत आला आहे. एरवीं श्री. नरसोपंत केळकरासारखे समजूतदार मध्यस्थ-कला-प्रविण गृहस्थ ज्या पक्षाच्या धुरेवर आहेत यांनीं मूग गिळून कां बसावें व सत्याग्रहापर्यंत मजल कां येऊं द्यावी, हें समजत नाहीं. कोणत्याही बाबतींत सत्याग्रह धरण्यापूर्वी प्रतिपक्षियांच्या त्वयांर्ध मयांर्ध समजुतीच्या पायऱ्या ओलांडाव्या लागतात. त्या न ओलांडतां एकदम सत्याग्रह पुकारणें म्हणजे मूर्खपणा नसेल तर वेडेपणा तरी खास. राष्ट्रीय पक्षांतील पुढारी चित्पावनांनीं सध्यां मुळशीची जी आगांतुकी चालविली आहे, ती पाहून सन १८३९ सालच्या सातारा प्रकरणांतील राष्ट्रीय ब्राह्मणांच्या पापाचें माप पदरांत घालतांना पार्लमेंटांत मेजॉर जनरल रॉबर्टसन यांनीं काढलेल्या उद्गारांची आठवण होते. ते उद्गार हेच :- I may add also, that there are no persons so unscrupulous and Brahmins when they have a Brahmanical object to carry. Every thing

which is likely to promote their views, however unprincipled, is then resorted to, for they think that, in such a cause, the end hollows the means. भावार्थ :- मी असेंहि सांगतों कीं एखादा भिक्षुकी हेतु साधण्यासाठीं वाटेल तें करणारे (उलट्या काळजाचे) लोक ब्राह्मणांशिवाय दुसरे सांपडणार नाहींत. ज्या गोष्टीनीं त्यांचा भिक्षुकी उद्देश सिद्ध होण्यासारखा असेल, मग त्या गोष्टी बऱ्या असोत, वाटत असोत, किंवा कशाहि असो, त्याची पर्वा ते कधींच करीत नाहींत. कारण त्यांना माहीत आहे कीं एकदां साध्य साधलें कीं साधनांच्या बऱ्या वाईटपणाची चौकशी कोण मरायला करतो! हा अभिप्राय एक इंग्रज गृहस्थाचा असला, तरी त्यांतला अनुभव महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाचा आहे, हें सागणें नको. मागला इतिहास जरी सोडला तरी राष्ट्रीय पक्षाच्या हातून आजलाहि अशी अनेक कृत्यें होत आहेत कीं त्यांनी स्वदेशाभिमानाचें केवढेंहि बेमालुम सोंग आणलें, शिवाजीबद्दल कितीहि अभिमान दाखविला, मावळ्यांच्या प्रेमाची रडगाणी गाऊन गुजराथी धाटणीचा ऊर कितीहि बडविला, तरी गेल्या १०० वर्षांतल्या त्यांच्या नातुसंप्रदायाच्या प्रवृत्तींत कसलाहि फरक झालेला नाहीं, व तो झाल्याचें प्रत्यंतर पटल्याशिवाय मुळशीसारख्या कोणत्याहि चळवळींतील त्यांच्या कृत्यांवर जनतेचा भरंवसा बसणार नाहीं. मुळशी सत्याग्रह म्हणजे नातुशाही राजकारणाचा डांवपेच आहे. अधिक कांहीं नाहीं. कदाचित् मुळशी सत्याग्रह यशस्वी करून, गांधींच्या सत्याग्रहाच्या अपयशावर पुणेरी मात करून दाखविण्याचा डांव यांत नाही, असेंहि म्हणतां येत नाहीं.

ब्राह्मणेतर संघ स्वस्थ कां ?

यानंतर एक प्रश्न असा उद्भवतो कीं ब्राह्मणेतर व ब्राह्मण या दोन फळ्या आतां अगदीं स्वतंत्र झाल्यानंतर, ब्राह्मणेतर-मावळ्यांकरितां जीव द्यायला ब्राह्मणच पुढें कां? ब्राह्मणेतर स्वस्थ कां? आईपेक्षां मावशीबाईंलाच प्रेमाचा पान्हा अधिक कां फुटला आहे? काय रक्तापेक्षां पाणी घट्ट होऊं लागलें कीं काय? हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. आज ब्राह्मणेतर संघाची घटना एवढी जबरदस्त झालेली आहे कीं तो जें मनांत आणील तें करील. राष्ट्रीय ब्राह्मणांच्या नातुशाही डांवपेचांची पेंकाटें मोडण्यांत आज ब्राह्मणेतर संघ विजयी झालेला आहे. हा संघ राष्ट्रीयांप्रमाणें जातिविशिष्ट तत्वांवर उभारलेला नसल्यामुळें त्यांत खऱ्याखुऱ्या लोकशाहीची शक्ति पूर्ण रसरसूं लागली आहे. असा हा शक्तिमान् संघ मावळ्यांच्या धांवणीला कां धांवत नाहीं? ब्राह्मणेतर प्रातिनिधिक पत्रांकडे पाहिलें, तरी हीच स्थिति ! त्यांना शिवाजीच्या मावळ्यांचा कांहीं अभिमानच नाहीं, कीं शिवाजीचे मावळे त्यांचे कोणीच नव्हते? शिवाय मुळशी सत्याग्रहाचा प्रश्न अखिल भारताचा प्रश्न करण्याचा चंग बांधणाऱ्या सत्याग्रहवाल्यांना काय महाराष्ट्रांतल्या ब्राह्मणेतर संघाचें पाठबळ मिळवितां येऊं नये? ब्राह्मणं ब्राह्मणेतर वाद खडाजंगी सुरू असतां मूठभर राष्ट्रीयांनीं मुळशीकर मावळ्यांचें प्रतिनिधित्व मिरविण्याचा डौल मारावा हें वरवर पाहणाराला देखील चमत्कारिक दिसेल. सारांश ब्राह्मणेतर संघ उदास राहण्याचें कारण स्पष्ट आहे.

सत्याग्रह आणि अत्याचार

मुळशीच्या राष्ट्रीय धामधुमीला सत्याग्रह हें नांवच मुळीं शोभत नाहीं. त्यांत आग्रह असला, तरी सत्य मात्र कुठेंच नाहीं. महात्मा गांधींची सत्याग्रहाची व्याख्या आणि राष्ट्रीयांची चालू धामधूम यांत दक्षिणोत्तर भिन्नता आहे. मुळशीला प्रतिपक्षाकडून होणाऱ्या नानाविध अत्याचारांच्या ज्या हृदयद्रावक बातम्या राष्ट्रीय पत्रांतून हरहमेश प्रसिद्ध होत असतात, त्यांतील अतिशयोक्तीचा भाग गाळूनसुद्धां

कोणालाहि वाईट वाटल्यावाचून राहणार नाहीं; किंबहुना संतापहि येईल. परंतु टाळी एका हातानें वाजत नसते, हें साधें तत्त्व या ठिकाणीं विसरतां कामा नये. अत्याचारास बळी पडलेल्या कांहीं जखमी बायकांमुलांना बरोबर घेऊन सत्याग्रहवाले त्यांचें प्रदर्शन करीत असतात, व अशा जाहिरातीनें लोकांच्या सहानुभूतीचें बरेचसें भांडवल ते फंडाबरोबरच जमा करीत असतात. एकदां सत्याग्रह पुकारल्यावर प्रतिपक्षांकडून होणाऱ्या जुलूम जबरदस्तीचें प्रदर्शन करण्यांत खुद्द सत्याग्रहाच्या तत्त्वालाच बाध येतो, इकडे कोणाचेंच लक्ष नाहीसें दिसतें. आतां तर सत्याग्रहांत मरण्यासाठी मावळ्यांच्या ऐवजीं बाहेरगांवचे कावळेच फार येत आहेत. म्हणजे मावळ्यांच्या खऱ्याखुऱ्या हिताचा प्रश्न मागें पडून मुळशी चळवळ हा एक राजकारणी ढोंगधत्तूरा होऊं पहात आहे. यांत चळवळ्यांचें सत्याग्रही तट्टू जरी कांहीं काळ राजकारणी क्षेत्रांत दुडक्या चालीवर धांवलें, तरी त्याच्या टापांखाली गोरगरीब मावळ्यांची मात्र दुर्दशा होणार यांत संशय नाहीं.

स्वयंभू देवस्थानें

आतां पर्यंत मुळशीप्रकरणाला रंग चढविण्यासाठीं शिवाजीचें नांव, मावळ्यांचें प्रेम, आंबेमोहराचे तांदूळ, वगैरे जिनसांचा मनमुराद उपयोग राष्ट्रीय चळवळ्यांनीं केला. या जिनसांच्या यादींत स्वयंभू देवस्थानांचें आणखी एक खेकटें निर्माण केलेलें आहे. स्वयंभू देवस्थानाचें हें भयकर भूत फार प्राचीन काळापासून महाराष्ट्राच्या बोकांडी बसलें आहे. स्वयंभू देव ह्मणजे मोठा कडकडीत ! पण या कडकडीत देवांना इंग्रजशाहींतसुद्धां गुलामगिरीचें आयुष्य कंठण्यांत शरम वाटेनाशी झाली आहे ! मुळशीतले देव स्वयंभू असल्यामुळें कचकाहून नवसाला पावणारे असले पाहिजेत. कारण बोलून चालून जागृत देवस्थान ! सत्याग्रही लोक मनांतच आणतील आणि या स्वयंभु देवस्थानच्या जागृतपणावर जर त्यांचा भरवंसा असेल, तर त्यांनीं सत्याग्रह करण्याऐवजीं त्या जागृत देवांना डाव्या उजव्या कळ्या लावून कोंबड्या बकऱ्याचा एकदा नवस केला कीं बोल बोलतां टाटा कंपनीचा मुर्दा ! जें काम रुपया सवारुपयांत होणारें आहे, त्या करितां अखिल महाराष्ट्र मुळशी परिषद कशाला, फंड कशाला आणि देवस्थानांची सेन्सस घेण्याची उपटसुंभ शंकराचार्याला यातायात कशाला ! वाईट वाटतें तें हेंच कीं या जागृत देवांचा जागृतपणा कोणीतरी तोंडानें वर्णन करावा लागतो.

टाटाच्या खटपटीची उपयुक्तता

राष्ट्रीय गुंडांनीं मुळशी प्रकरणातला भलतेंच स्वरूप दिल्यामुळें, टाटांच्या खटपटीचा योग्य विचार करण्याइतकी लोकांच्या मनाची स्थिति राहिली नाहीं. प्रस्तुत धरण झाल्यानें मुंबई इलाख्याच्या औद्योगिक जीवनांत एक विलक्षणक्रांति घडून येईल, हें उघड आहे. त्यामुळें मुंबई शहरात बिजलीचा लखलखाट जरी झाला, तरी सामान्यत्वें उपाशी मरणाऱ्या मजुरांच्या पोटापाण्याची सोय विशेष लागून दारिद्र्यांतून डोकें वर काढण्याची त्यांना बरीचशी संधी मिळेल, यांत शंका नाहीं. समजा, उद्यां मुळशीचें धरण झालें नाहीं असें गृहित धरलें तरी आजच्या विपन्नग्रस्त मावळ्यांची आणखी विशेष उन्नति काय होणार, तें सत्याग्रहवाल्यानींच सांगितलेलें बरें. आज हिंदुस्थानाला औद्योगिक बाबतींत इतर राष्ट्रांशी तोंड देण्यासाठीं सुधारलेल्या यांत्रिक शक्तीचेंच साहाय्य घेतलें पाहिजे. आणि या दृष्टीनें टाटास्कीमसारख्या स्कीम्स जितक्या निघतील तितक्या हव्या आहेत. मात्र असें करतांना मुख्य गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे ती हीच, कीं या स्कीम्समध्यें परदेशी भांडवलवाल्यांचा हात मात्र मुळींच नसावा. सत्याग्रहाचा धुडगूस

घालण्याऐवजी राष्ट्रीय प्राण्यांनीं जर खालीलप्रमाणें कांहीं योजना अमलांत आणण्याची खटपट केली असती, तर त्यांच्या राष्ट्रीय कळवळीबदद्दल शंका येण्याचें कोणालाच कारण नव्हतें.

(१) आजपर्यंत हबकलेल्या चक्रवाढी व्याजाचा ढेकर देऊन सावकारांनी कावळ्यांच्या जमिनी मावळ्यांना परत देऊन त्यांना मालक बनविणें.

(२) टाटा कंपनीनें कॉंपेन्सेशनच्या रकमेच्या ऐवजीं आपल्या कारखान्यात भाग मावळ्यांना देऊन त्यांना भागिदार बनविणें.

(३) टाटांनीं आपल्या कारखान्यांत परदेशी भांडवल मुळींच न घेणें. अशा प्रकारची योजना पुण्यास भरलेल्या एका सभेंत श्री. नरसोपंत केळकर यांनीं मांडल्याचें स्मरतें. परंतु निव्वळ हुल्लड करण्यास सोकावलेल्या कांहीं प्रच्छन्न राष्ट्रीयांनीं त्या योजनेचा धिक्कार केला. त्या वेळेपासून श्री. केळकर मुळशी प्रकरणांत उदासीन राहिलेले दिसतात. एखाद्या सभेचें किंवा ठरावाचें सर्क्यूलर त्यांच्याकडे आलें तर फक्त ''पाहिलें. न. चिं. के.'' एवढेंच त्यावर लिहून मोकळे होतात. असो, मावळ्यांना या योजनेप्रमाणें प्रथम जमिनीचे मालक, नंतर टाटा कंपनीचे मालक बनवून पुढें त्याच कारखान्यांत मजुरी करण्याची संधी मिळणें, त्यांच्या सध्यांच्या कर्जबाजारी शेतकरीपणापेक्षां अधिक श्रेयस्कर झालें असतें. परंतु सध्यांच्या चळवळीचा माथेफिरूपणा पाहिला तर तुला ना मला घाल कुत्र्याला, अशा दुर्दशेच्या गर्तेत मावळ्यांचा सर्वस्वनाश आजच होऊन बसला आहे, असें ह्मणावयास हरकत नाहीं.

□□□

अग्रलेख

आर्यांच्या विवाहविधीची चिकित्सा

(लेखांक १ ला)

सामाजिक व धार्मिक सुधारणेचा प्रश्न महाराष्ट्रांत गेल्या ५० वर्षांत जनतेच्या विचारचक्राला क्रान्तीचे धक्के अनेक बाजूंनीं देत आहे. या अवकाशांत या प्रश्नानें फारसें सक्रीय यश जरी मिळविलेलें दिसत नसलें, तरी लोकजागृतीच्या कामीं समाजसुधारकांचे विस्कळीत व एकांगीं प्रयत्न बरेच यशस्वि झालेले आहेत. अलीकडे राजकीय उन्नतीची महत्वाकांक्षा फुरफुरूं लागल्यामुळें आणि राजकीय मोक्ष साधण्यासाठीं सामाजीक व धार्मिक उन्नतीची लोकांत असावी तितकी तयारी मुळींच नसल्यामुळें, सामाजीक व धार्मिक सुधारणेच्या प्रश्नाचा पूर्वी केलेला धिक्कार आज राजकीय चळवळीला उघड माथ्यानें प्रत्यक्ष विरोध करूं लागला आहे. सामाजीक विषमता, धार्मिक गुलामगिरी व अस्पृश्यतेसारखा हिन्दु समाजाच्या व हिन्दु धर्माच्या काळजाला झोंबलेला भयंकर रोग या तीन गोष्टींचा योग्य बंदोबस्त केल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीचें पाऊल कदापिहि पुढें पडणार नाहीं, असें आतां महात्मा गांधीसुद्धां स्पष्ट जाहीर करीत आहेत; आणि म्हणूनच अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न स्वराज्यप्राप्तीच्या प्रश्नाच्या वर, अगदीं सर्व प्रश्नांच्याशिरोभागीं राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांत ते ठेवीत आहेत. तरीहि म. गांधींच्या मिशनपैकीं शुद्ध राजकीय बाबीशिवाय इतर सामाजीक व धार्मिक अनुज्ञांची जाणून बुजून कशी अवज्ञा होत आहे, हें चाणाक्ष वाचकांना स्पष्ट करून सांगायला नको, असें वाटतें. 'परदेशी कपडे जाळा' असा कंठशोष करून गल्लोगल्लीं व रस्तोरस्तीं बरेचसे प्रचारक जरी सध्यां हिंडत आहेत, तरी पण 'अस्पृश्यतेचा नायनाट करा, अवनत बांधवांना समान हक्क द्या' हीं वाक्यें ओरडत अझून कोणी प्रचारक कां बरें बाहेर पडत नाहीं? एवढ्यावरून आतां असें भाकीत करायला कांहीं हरकत नाहीं कीं ज्यांनीं आजपर्यंत सामाजीक व धार्मिक सुधारणांची व सुधारकांची टवाळी करून, शुद्ध लोकछंदानुवर्ती बाण्यानें राजकीय सुधारणांचा प्रश्नच तेवढा उचलून धरला, त्यांनीं देशाचें फार मोठें नुकसान केलें ! राजकीय आकांक्षांचें प्रबोधन करीत असतांच, एकसमयावच्छेदें या लोकछंदानुवर्ती पुढारीबुवांनीं सामाजिक व धार्मिक पुनर्घटनेचा प्रश्न जर तितक्याच हिंमतीनें व नेटानें हातीं घेतला असता, तर आजच्या ऐन आणीबाणीच्या घटकेला साऱ्या राष्ट्राची सर्वांगीण उन्नति झाली असती व महात्मा गांधीसारख्या अलौकिक महात्म्याच्या दिव्य तपश्चर्येचा जोम सामाजिक प्रश्नांकडे व्यर्थ खर्चीं

न पडतां, त्याच्या पुण्याईवर भरतखंड, एक वर्षांतचसें काय, पण एका निमिषार्धांत, स्वयंशासित स्वतंत्र राष्ट्र खास बनलें असतें ! असें झालें असतें आणि तसें झालें असतें, यावर वृथा विचार करून कालक्षेप करीत बसण्यांत आतां कांहीं अर्थ नाहीं. गाढवपणानें केलेल्या घोडचुकांचें परिमार्जन करून, पुढचा मार्ग शहाणपणानें आक्रमण्यासाठीं आतां प्रत्येक देशाभिमान्यानें सज्ज झालें पाहिजे - नव्हे, ताबडतोब प्रत्यक्ष कार्याला सुरुवात केली पाहिजे. सामाजिक आर्धी का राजकीय आर्धी, या वादाला चालू मन्वंतरांत जागा नाहीं. हा शुष्क वाद घालीत बसणाऱ्या वावदूक सुधारकांना श्वसनक्रियेपुरतीही हवा भरतखंडांत आतां शिल्लक नाहीं आणि नुसत्या लंब्याचौड्या राजकीय गप्पा मारून लोकमान्य होऊं पहाणाऱ्या प्राण्यांनाहि अत:पर या भूमींत थारा मिळणार नाहीं. इतकें मात्र सर्वांनीं पूर्ण लक्षांत ठेवावें कीं सामाजीक व धार्मिक पुनर्घटनेबद्दल मुद्दाम दाखविलेली बेपरवाई कर्मसिद्धांतानुसार राष्ट्रीय चळवळींत प्रत्याघाताचे धडके दिल्याशिवाय मुळींच रहाणार नाहीं.

सामाजीक जीवनाचें मर्म विवाह-संस्थेंत आढळतें आणि या संस्थेच्या उन्नत वा अवनत आचरणावरून समाजाच्या उत्कृष्ट वा निकृष्ट स्थितीचें बिनचुक अनुमान ठरवितां येतें. धर्म जसा राष्ट्राच्या संस्कृतीचा द्योतक असतो, तद्वतच विवाह-संस्था ही समाजाच्या संस्कृतीची निश्चित निशाणी होय. ह्मणून या संस्थेचा इतिहास आपण तपशीलवार परीक्षण केल्यास, आर्यकालीन आणि प्रचलित हिन्दुजनांच्या निर्बंधांत केवढा बरा वाईट फरक होत गेला आहे, तो नीट लक्षांत येऊन, आह्मी सामाजीक व धार्मिक दृष्ट्या परिणत होत आहोंत कीं अवनत होत आहोंत याचें प्रत्यंतर आपणांस स्पष्ट पटेल. विवाहसंस्थेचा हा तुलनात्मक अभ्यास क्षणभर दृष्टीआड केला व शुद्ध सारासार विचारानें प्रचलीत वैवाहिक विधीचें आपण निरीक्षण केलें तरी सुद्धां त्याचें विकृत व भ्रष्ट राक्षसी स्वरूप कोणत्याहि मुद्यावर असमर्थनीय ठरेल, यांत मुळींच संदेह नाहीं. सध्यां विवाहविधि हा निव्वळ पोरखेळ, शुद्ध नाटकी फार्स, सट्ट्याचा व्यापार व एकमेकांना पिळून काढणाऱ्या लुटारूंचा सनदशीर धंदा झाला आहे. एकंदर परिस्थितीचें पर्यालोचन केलें ह्मणजे असें प्रथमच स्पष्ट म्हणावयास कांहीं हरकत नाहीं कीं आज आमची जी धार्मिक सामाजिक व राजकीय अवनति स्पष्ट सिद्ध आहे तिचें एक मूळ आमच्या विवाहविधीच्या भ्रष्ट आचरणांतच आहे. आचरणाच्या जोडीनें विचारसरणीहि भ्रष्ट बनल्यामुळें, धार्मिक क्षेत्रांतल्या नि:सत्व दंडधाऱ्यापासून तों मूठभर धान्यासाठीं मोक्षाची अडत्येगिरी करीत भीक मागणाऱ्या महामूर्ख भिक्षुकी मार्तण्डांच्या अकलेचे तारे वारंवार कसे तुटत असतात, बसु-पटेल-गौर बिलांच्या वेळच्या भिक्षुकी शिमग्यांत सर्वांनींच पाहिलेले आहेत व पुढेंहि पाहण्याची संधि मिळणार नाहीं असें नाहीं. तथापि चिकित्सक नवमतवादी प्रवृत्ति आतां जागृत होत आहे, आपल्या धर्माचें संशोधन करण्याची सब्दुद्धि जीव धरीत आहे आणि लोकशाहीच्या कल्पना वातावरणांत भराऱ्या मारून अंतर्बाह्य गुलामगिरीचे जंतू ठिकठिकाणीं ठेंचून जमीनदोस्त करीत आहे, अशा प्रसंगीं विवाहविधीचा साद्यंत इतिहास तरुण भारतापुढें ठेविल्यास अनाठायीं होणार नाहीं अशी आशा आहे. विवाह हा शुद्ध सामाजिक प्रकार आहे. परंतु त्याचें ध्येय व आचरणपद्धति यांचा परिणाम राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नती वा अवनतीपर्यंत जाऊन भिडलेला असतो, ही गोष्ट वाचकांनीं विशेष लक्षांत ठेवली पाहिजे. नवऱ्याला बायको मिळणें व मुलीला नवरा मिळणें, एवढ्याच क्षुद्र विचारांतून विवाहसंस्थेचा जन्म झालेला नाहीं; नव्हे, या हेतूसाठीं विवाहसंस्था मुळीं अस्तित्वांतच आलेली नाहीं. सध्यां मात्र याच क्षुद्र भावनेवर विवाहविधीचे सट्टे सर्रास

एन ४००६--१६

होत असतात. त्यांचें राक्षसी स्वरूप वाचकांच्या नीट ध्यानांत यावें व त्यांनीं विवाहविधींत योग्य ती सुधारणा घडविण्यासाठीं शक्य ते निर्बंध ताबडतोब अंमलांत आणावें, यासाठीं प्रथम

विवाहविधीचीं तीन स्थित्यंतरें

कसकशीं घडून आलीं, याचा त्रोटक इतिहास आपण पाहूं. विवाह संस्था केव्हां व कां अस्तित्वांत आली याचें संशोधन करण्याच्या भानगडींत पडण्याची जरूर नाहीं. ऋग्वेदकालीन आर्यांच्या उपलब्ध इतिहासापासून तों आजदिनतागायतच्या विवाहविधीच्या स्थित्यंतराचा इतिहास समालोचन केला ह्मणजे पुरे. या समालोचनांत विवाहविधीचे नियम (कायदे) व स्त्रियांचा राष्ट्रीय दर्जा यांच्या भरती ओहोटीचें दृश्य चित्र आपणांस स्पष्ट दिसून येईल. ऋग्वेद कालीन् आर्यजनांचें सामाजिक धार्मिक तात्विक आर्थिक राजकीय वैभव अत्यंत उन्नतावस्थेला पोहाचलें होतें. त्याचें वर्णन करून जागा अडविणें बरें नव्हे. ते जगज्जेते होते. ज्या 'वर्ल्ड पॉवर' जगत्साम्राज्याच्या एकमुखी सत्तेसाठीं आज सर्व विद्यमान राष्ट्रें पिसाळलेल्या बोक्यांप्रमाणें एकमेकांच्या उरावर बसत आहेत, ती 'वर्ल्ड पॉवर' आर्यजनांच्या एकमेकांच्या उरावर बसत आहेत, ती 'वर्ल्ड पॉवर' आर्यजनांच्या मुठींत सांठविलेलीं होती. त्या वेळीं स्त्रियांचा दर्जा कसा होता? पुरुष आणि स्त्री, पति व पत्नि यांचे सर्व प्रकारचे अधिकार व हक्क समसमान होते. मुलांप्रमाणें मुलींचेंहि शिक्षण समान दर्जाचें होतं, त्यांच्या शिक्षणक्रमांत कोणत्याहि प्रकारचा भेद नसे. शिक्षणसंपन्न झाल्यानंतर तरुणांप्रमाणें तरुणींनासुद्धां आध्यात्मिक तपस्या, अध्ययन व अध्यापन करण्यासाठीं ब्रह्मचर्यव्रत पाळण्याचील, किंवा विवाह करून गृहस्थाश्रमाची लौकिकी कर्तव्यें लोकसंग्राहक बुद्धीने आचरण्याची पूर्ण मोकळीक असे. आर्यजनांतील तरुण तरुणीची विवाहग्रंथि सध्यांप्रमाणें बळजबरीनें बांधलेली नसे. त्यांच्या परस्पर संमतीशिवाय कांहींहि घडवून आणण्याची प्रत्यक्ष जन्मदात्या आईबापांचीहि छाती नसे. त्यांचा विवाह म्हणजे समानधर्मी समानवृत्तीच्या दोन परस्पराकर्षी प्रणयी जनांचें मधुर मीलन होतें. या संमीलनांत पतिपत्नीच्या प्रापंचिक महत्वाकांक्षा व अध्यात्मज्ञानाची लालसा या दोन तत्वांचा एकजिनसी मिलाफ बेमालुम झालेला असे. तत्कालीन शिक्षणाच्या क्रमांत शारिरीक क्रमावणि, बौद्धिक विकास,. नैतिक प्रबोधन आणि अध्यात्मिक तपस्या इत्यादि सर्व राष्ट्रोद्धारक बाबींकडे पूर्ण लक्ष पुरविण्यांत आलेलें असून अभ्यासक्रमाची रूपरेषा फारच दूरदृष्टीनें रेखाटण्यांत आलेली असे. असल्या शिक्षणक्रमांतून तावून सुलाखून निघालेले तरुण व तरुणी सहाजीकच आपल्या गृहस्थाश्रमाचे सर्व धर्म उत्कृष्ट पाळण्यास समर्थ असत. इतकेंच नव्हे तर लग्न झाल्या घटकेपासून आमरणांत आपापल्या वैयक्तिक व परस्पर जबाबदाऱ्या काय आहेत, याची त्यांना पूर्ण जाणीव शिक्षणक्रमाच्या ओघांतच होत असे. समाजशासनाचे नियमच उदार व्यापक सर्वस्पर्शी आणि बौद्धिक स्वातंत्र्यास पोषक असे असल्यामुळें, तत्कालीन, आर्यजन पूर्ण स्वतंत्र, स्वयंनिर्णयी, मर्द, तेजस्वी, हिंमती, धाडसी, प्रगमनशील, सरदारी बाण्याचे व अध्यात्मज्ञानी असे असल्याची साक्ष शेंकडों शतकांच्या काळाला टक्कर देऊन आज इतिहासांत जिवंत उरली असल्यास त्यांत काय नवल? वशिष्ट वामदेवासारखे ब्रह्मर्षि, इक्ष्वाकु विश्वामित्र जनकासारखे राजर्षि, घोषा गार्गी मैत्रेयी सुलभा यांच्यासारख्या ब्रह्मवादीनी, असलीं रत्नें ज्या काळांत निर्माण झालीं, तो काळ हिंदुस्थानच्या संस्कृतीचा-सुधारणेचा-सुवर्णकाळ मानला गेला आहे.

यानंतर आर्यांच्या राष्ट्रीय चरित्राच्या नाटकांतला दुसरा अंक सुरू होतो. या दुसऱ्या स्थित्यंतर्गत

विवाहाच्या हेतूंत जसा बराच हिणकसपणा घुसला, तसा स्त्रियांचा दर्जाहि बराच कमी ठरला. या देन महत्वाच्या गोष्टींत उतरती कळा लागतांच आर्यवैभवाचें तेजसुद्धां दिवसेंदिवस फिकट पडत चाललें. स्त्रियांचें शिक्षण प्रथम संकुचित करून आस्ते आस्ते त्याची पूर्ण हेळसांड होत गेली आणि अखेर आर्यांच्या बेअक्कलपणाची मजल येथपर्यंत आली कीं स्त्रियांनीं वेदशास्त्रें यांचें अध्ययन मुळींच करूं नये, असले राष्ट्रविघातक निर्बंधच उत्पन्न झाले. शिक्षणाच्या गळचेपीबरोबरच स्त्रियांना ब्रह्मचर्यव्रतानें अविवाहित राहण्याची अथवा स्वत:- पुरुषाशिवाय-अग्निपूजन करण्याची सक्त मनाई अंमलांत आली. पुरुषांपेक्षां बायकांच्या विवाहाची वयमर्यादा संकुचित झाली. बायको ह्मणजे पुरुषाच्या संसाराचा गाडा रेटण्यासाठी घरांत चालून आलेली मदतगार बटकी. तिचा अधिकार पुरुषाला फक्त मदत करण्याचा; यापेक्षां अधिक कांहीं नाहीं. पूर्वींच्या सुवर्णयुगांतील पतिपत्नीच्या समसमान हक्कांची व जबाबदारीची कल्पना या युगांत ठार झाली. पतिपत्नींत जरूर असणाऱ्या समान मनोवृत्तीचा व समान संस्कृतीचा विधिनिषेधच राहिला नसल्यामुळें, विसंवादी व विसंगत संस्कृतीच्या जोडप्यांपासून निर्माण झालेली प्रजा निस्तेज कमताकत बेहिमती अंशी निपजली, अर्थात् त्यांचीं मनें क्षुद्र व संकुचित वृत्तीची आणि रूढिबद्ध बनली. नवीन नवीन आद्यकल्पना चातुर्यानें शोध लावण्याच्या स्वतंत्र विचारशक्तीच्या ऐवजीं व्रतेंवैकल्यादि रूढ मार्गांची यांत्रिक अंधानुकरण प्रवृत्ति बोकाळली. बाबावाक्यंची करंटी प्रभात याच युगांत फटफटली. अंतरीच्या जिवंत विचारांची मुस्कटदाबी करून वरवरच्या बाह्य आचरणाकडे ज्याची त्याची वृत्ती मोकाट सुटली. विश्वव्यापक सर्वोपयोगी नवनवीं सत्यतत्वांचीं प्रमेयें शोधून काढणाऱ्या सुवर्णयुगीन ऋषींची जागा, हरित जैमिनी बादरायण इत्यादि सूत्रकार आचार्यांनीं पटकविली. या सूत्रकारांची कामगिरी एका दृष्टीनें कितीहि प्रशंसनीय असली, तरी श्री. शिवरामपंत परांजपे यांनीं आपल्या 'भीमराव' नाटकांत नायकाच्या तोंडी घातलेल्या पुढील वाक्याप्रमाणेंच ती जवळजवळ होती. भीमराव ह्मणतो ''ज्यांनीं लोकांच्या मनांत नवीन कल्पना भरवून द्यायच्या, त्या ग्रंथकारांकडे पाहिलें तर सगळ्या उष्ट्या पत्रावळी ! जुन्या एकेका ग्रंथावरच त्या मूर्खांच्या शंभर शंभर टीका !!'' ज्या विद्वान् मुत्सद्दी व शौर्यसागर राजर्षींनी आपल्या सर्वांगीण पराक्रमानें साऱ्या त्रिभुवनाला बगलेंत मारून, आर्य संस्कृतीचें आणि आर्यविद्येचें लोण उपलब्ध जगाच्या कोनाकोपऱ्यांत नेऊन भिडविलें, ज्या राजर्षींच्या जागीं टीचभर मर्यादेच्या आपापल्या राज्यांत रूढ नीतीच्या 'बाबावाक्यं' कायद्यांची अंमलबजावणी करणारे परंपराप्रिय राजे आले. ब्रह्मर्षि राजर्षि यांची अशी वासलाद लागतांच, जनतेनेंसुद्धां प्रचलित क्षुद्र व संकुचित वातावरणाचा फायदा घेऊन आपापल्या भोंवती निरनिराळ्या जातीचीं कोंडाळीं निर्माण केली. पूर्वी आर्यजनांत वसत असलेल्या जिवंत राष्ट्रैक्याचा जाणूनबुजून खून पाडला आणि एकाच हाडारक्तामांसाच्या बांधवप्रेमांत विळ्याभोंपळ्याचें कष्टप्रद द्वैत निर्माण केलें.

□□□

एन ४००६--१६अ

लेख

उत्तिष्ठत जाग्रत ! उठा जागे व्हा !!

अमृताची रुची, स्वर्गांतले सौख्य, कामधेनूचें रत्नभांडार आणि कल्पवृक्षाचा इच्छाफलदायी पराक्रम यांच्या कल्पना अनेक पुराणकारांनीं वर्णिल्या, पण त्यांची प्रत्यक्ष प्रचिती, मात्र कोणीहि, खुद्द पुराणकारांनीं सुद्धां, घेतल्याचा दाखला नाही. मानवी जीवनाच्या ओघावर नुसती ओझरती नजर टाकली तरी त्यांत आशेपेक्षां निराशेची शेवाळच जास्त माजलेली. मनुष्यानें सुखाकरितां शांतीकरितां समृद्धीकरितां धडपडत रहावें आणि या तीनही स्थिति निराशेच्या शेवाळीखालीं गुपचुप दडूनच रहाव्या, असला विचित्र अनुभव नसणारा माणूस ह्मणजे प्रदर्शनासाठी पेंडा भरून ठेवण्यालायक चीजच समजली पाहिजे. व्यवसाय कसलाहि असो, त्यांत निराशेचीं ढगारे तेलंगी भिक्षुकांप्रमाणें न बोलावतां आपण होऊन मागणीच्या दसपट पुरवठ्यानें दत्त म्हणून नेहमींच उभीं असतात. अशा प्रसंगीं शिरोभागीं दिलेल्या चित्राप्रमाणें, चैतन्य देवता एकाकी आपल्याजवळ येऊन रहावी, तिनें गोड उत्तेजक वाणीनें 'गड्या उमेदवार तरुण !' अशी हाक मारुन, आशेच्या किरणांचा मूळ सांठाच आपल्याला बिनचूक दाखवून द्यावा आणि गलितधैर्य बनलेल्या आपल्या हृदयांत उत्साहाची फुंकर घालून त्याला तात्काळ हिंमतवान् बनवावें, असला योगायोग कधिं काळीं कोणाला लाभलाच तर त्याची गोडी अमृताला लाजवील, स्वर्गाला खिजवील, कामधेनूला थिजवील आणि कल्पवृक्षाला आपल्या संपन्नतेनें नखशिखान्त भिजवील. आशेचा एक किरण, उपदेशाचा अनुभवसिद्ध एक वळसा आणि कर्तव्य बुद्धीला जागृत करणाऱ्या प्रबोधन शक्तीचा एकच फुंकर, या तीन गोष्टीचा अभाव महत्वाकांक्षी तरुणांच्या साऱ्या हिमतीला असून नसून सारखी करतो. नुसतें आत्म्याचें अस्तित्व एकटें कांही करूं शकत नाही. त्याला पंचतत्वाच्या देहाचें आवरण द्या कीं तात्काळ तो नर किंवा नारीपणानें नारायणपदाचा आक्रम करण्यास सिद्ध होतो. तद्वतच नुसत्या महत्वाकांक्षेची वाफ कितीहि भरपूर असली तरी वरील तीन तत्वांचें कवच जर तिला लाभलें नाही, तर ती वाफ वोरमाफ खर्च होऊन फुकटच जाईल. तरुण तरुणीच्या महत्वाकांक्षांची वाफ अशा रीतीनें फुकट जाऊं देणें हे राष्ट्रहितदृष्ट्याहि फार घातक आहे, हें विचारवंतांस सांगणें नलगे.

विचारांची उत्क्रान्ति होण्यासाठी श्रवण मनन निदिध्यास असा त्रिदळी मंत्र आमच्या आर्य पूर्वजांनीं आम्हांस वंशपरंपरा बहाल केलेला आहे. पैकी उपनयनोत्तर गुरुसंनिध शिक्षणाची पद्धत हद्दपार झाल्यामुळें

श्रवणाची जागा वाचनानें पटकविली आहे आणि गुरुजनांनाहि मुमुक्षु छात्रांसाठी ग्रंथद्वारा आपल्या जिव्हा हजारों मैलपर्यंत लांबविणें भाग पडलें आहे. सध्यां गुरूंची जागा ग्रंथांनी पटकविली आहे आणि विचारक्रान्तीच्या मंदीराच्या पायऱ्यांचा अनुक्रम (१) वाचन (२) मनन आणि (३) निदिध्यास असा लागलेला आहे. अर्थात् ग्रंथकर्तृत्वाचें सामर्थ्य हातीं असणारांवर केवढी जबाबदारी असते आणि निराशेच्या जंगलांत वाट चुकलेल्या उमेदवार तरुणांना त्यांच्या पासून कोणत्या प्रकाशाची अपेक्षा असते, हें वाचकांनीं ताडलेंच असेल. शेजाऱ्यापाजाऱ्याच्या आप्तेष्टांच्या किंवा सनदां उपदेशकांच्या अनुशासनावर सर्वस्वी विसंबून न रहातां, केवळ स्वावलंबनाच्या जोरावर आत्मोद्धार करूं इच्छिणाऱ्या तरुणांना उत्तेजक वाङ्मयाची फार तीक्ष्ण जाणीव भासत असते. कर्तव्याची पावलें अशी टाकूं कीं तशी टाकूं, निरशेच्या गर्द धुक्यांत निष्कारण कोणाशीं टक्कर लागूं नये म्हणून माझ्या हिमतीचा हापटबार येथेंच वाजवूं कीं पुढें कोठें तरी वाजवूं आणि मी तुडवीत आहे ती पाऊल वाट संतमहंतांची आहे कीं चोरलुटारूंची आहे, अशी संशय-कंटक-माला हरदिन हरघडी त्यांच्या पुढें गुहेंत दडलेल्या वाघाप्रमाणें गुर्र गुर्र करून भेडसावीत असते. अशा वेळी प्रत्येक स्वावलंबी तरुण उत्तेजक वाङ्मयासाठी तान्हेलेला असतो व त्याच्या प्रगतीच्या मार्गावर उत्तेजनाचें व उत्साहाचें एकच किरण फेंकणारा चार ओळींचा चिठोरा जरी त्याला हस्तगत झाला तरी त्याची महति त्याला चतुर्वेदांपेक्षां अधिक वाटते. फार काय पण जीं सूत्रें आपण नेहमी वाचतों व भाषणाप्रसंगीं सहजगत्या बोलून जातों, अशा एकेका सूत्राच्या निवळ मनन निदिध्यासानें शेंकडो नर नारायण बनल्याची उदाहरणे पाहूं इच्छिणारांनी 'नोटेबल्स ऑफ ग्रेट ब्रिटन' हा ग्रंथ आढळल्यास पहावा.

आपल्याकडे उत्तेजक सूत्रांचा जरी तुटवडा नसला तरी तीच सूत्रें चटकदार पेहरावांत सुटसुटीत आख्यानांच्या द्वारें मांडणाऱ्या स्फूर्तिदायक वाङ्मयाचा यत्न मात्र मुळीच कोणी केलेला दिसत नाही. यावर आक्षेपक रामायण महाभारताकडे बोट दाखवितील; पण त्यांना आम्ही एवढेंच सांगूं की बुडणारा माणूस 'पोहण्याची कला' या उपयुक्त पुस्तकाच्या दर्शनानें किंवा स्मरणानें वाचत नाही, त्याला तात्कालीक सक्रीय मदतीची अपेक्षा असते. निराशेच्या जंगलांत वाट चुकून हतबुद्ध झालेल्या तरुणाला तात्कालीक उत्तेजनाची आवश्यकता असते, रामायण महाभारताचीं पारायणें करण्याचां मुळींच नसते. त्यांतून या दोन ग्रंथांवर दैवीपणाच्या शेंदराचीं पुटें दाट चढविल्यामुळें प्रत्यक्ष संसारात वावरणारा इसम तात्कालीक स्फूर्तीच्या कणासाठीं या ग्रंथांच्या असंख्य दालनांतून भटक्या मारण्यास केव्हांहि संकोचच बाळगिणार. हे ग्रंथ सहसा प्रत्येक बऱ्यावाईट स्थितीच्या माणसाला स्वाध्यायार्थ सुलभ नसतात; आणि ज्या प्रकारच्या वाङ्मयाबद्दल आमचा विशेष कटाक्ष आहे, ते वाङ्मय रामायण किंवा महाभारतांत मुळींच नाहीं. निराशामग्न तरुणाला, तानाजी पडल्यानंतरचा शेलारमामाचा आवेश, जितका कार्यक्षम बनविण्यास उपयोगी पडतो, तितका रामायणांतला तसलाच एखादा प्रसंग मुळींच पडत नाहीं.

आमच्याकडे निर्माण होणारें कोणतेंहि वाङ्मय घ्या, त्यांत स्माईल्सनें लिहिलेल्या ब्यूटी, थ्रिफ्ट इ. प्रकारचें वाङ्मय मुळींच दिसत नाहीं. बरें, ज्यांनी असल्या कांही ग्रंथांची भाषांतरें केली, त्यांना ती मुळींच साधली नाहींत. सारी येथून तेथून निर्जीव पोंचट व रुक्ष ! उदाहरणार्थ दाभोळकर सीरीजचे ग्रंथ पहा. स्वावलंबी तरुणांना असलें वाङ्मय पाहिजे की त्यांतली एखादीच मथळ्याची ओळ वाचतांच त्याच्या गूढ व सुप्त कर्तबगारीनें टाणकन् उसाळी मारली पाहिजे. हें वाङ्मय भीक मागणाऱ्या साक्षर भिकाऱ्यापासून किंवा मजुरदारांपासून ते उपलब्ध सर्व पदव्या पटकावून बसलेल्या बृहस्पतीपर्यंत सर्वांना सबसारखें स्फूर्तिप्रेरक व

योग्य मार्गदर्शक असलें पाहिजे. याला 'उत्तेजक वाङ्मय' हें नांव असलें तरी त्याच्या उत्तेजनाचा परिणाम माथेफिरूपणा निर्माण करण्यांत होत नसतो. हल्ली कित्येक वर्तमानपत्रांत व मासिकांत 'उत्तेजक' म्हणून जें वाङ्मय प्रसिद्ध होत असतें, तें विचारापेक्षां विकारांना खळबळविण्याचेंच कार्य करितें व त्यापासून तरुणजनांत कर्तबगारीची खरी प्रेरणा उत्पन्न न होतां भरवसाट माथेफिरूपणाच जास्त वाढतो. अर्थात् या वाङ्मयाला 'उत्तेजक वाङ्मय' न म्हणतां माथेफिरू वाङ्मय असेंच म्हटलें पाहिजे. विकार कितीहि क्षुब्ध झाले तरी त्यांच्या उसळीची लाट तात्पुरती असते; पण तेच विचार जर पद्धतशीर मार्गानें परिणत होत गेले तर मनुष्याच्या जीवनांत विलक्षण क्रान्ति घडून, त्याच्या कर्तबगारीचे रंग एका मागून एक उमलूं लागतात. आजपर्यंत प्रसिद्धीस आलेले कर्तबगार लोक विकारी वाङ्मयापेक्षां विचारी वाङ्मयानेंच जगाला दिलेले आहेत. अशा प्रकारचे वाङ्मय इंग्लंडमध्यें प्रथमत:च सुरू करण्याचें पुण्यकार्य पीटर कीरी नामक गृहस्थानें केलें व आमच्या महाराष्ट्रांत तें किर्लोस्कर लक्ष्मणराव यांनीं केलें आहे. पीटर कीरी हे स्वावलंबनानें अत्यंत हीनावस्थेंतून उन्नतावस्थेंत गेलेले कर्मवीर होते. ते हमाली करतां करतां इंग्लंडचे जस्टिस ऑफ पीस झाले. त्यांनी आपल्या कर्मयोगाचा गुरुमंत्र (1) Secret of Success (2) Get on or Get out (3) Success after Failure आणि (4) Do it now या चार सुबोध ग्रंथांत नमूद करून ठेवलेला आहे. हे चार मथळेच इतके मार्गदर्शक आहेत कीं पुस्तक न वाचतांहि हतबुद्ध तरुणाला कार्यक्षम व उत्साही बनविण्यास समर्थ आहेत. आत्मनिरूपणाबद्दल वाचकांची क्षमा मागून एवढेंच सांगतों की पीटर कीरीच्या 'गेट ऑन् ऑर गेट आऊट' या पुस्तकाच्या नुसत्या दर्शनानें प्रस्तुत लेखकाच्या चारित्र्यांत एका भयंकर प्रसंगीं विलक्षण क्रान्ति घडून आली. तो प्रसंगच असा होता कीं धरलें तर चावतें व सोडलें तर पाठी लागतें. अशा वेळी Get on or Get out ही सूचना किती सहाय्यक झाली असेल, याची वाचकांनींच कल्पना करावीं. पीटर कीरीच्या ग्रंथांनीं लक्षावधि बहकलेले तरुण उन्नतीच्या मार्गाला लागल्याची साक्ष खुद्द लंडन टाईम्सनें दिलीं आहे. आह्मी स्वानुभवानें आमच्या सर्व वाचकांना सांगतों कीं काय वाटेल तें करून - तुम्हाला इंग्रजी भाषा येत असेल तर - पीटर कीरीचे वरील ग्रंथ वाचल्याशिवाय मुळींच राहूं नका. तुमच्या जीवनावर दैवी प्रकार पडेल. निराशेनें खचलेली तुमची छाति तठ्ठ फुगून फुरफुरूं लागेल. 'माथेफिरू' वाङ्मयाची तुह्माला बाधा होणार नाहीं आणि तुमचें ध्येय साध्य करण्यासाठीं तुमच्या कर्तबगारीचें योग्य प्रमाणांत अनिर्वचनीय प्रबोधन होईल. ही कामधेनु ताईताची जाहीरात नव्हे, हा प्रबोधनाचा अनुभवजन्य कळकळीचा प्रेम संदेश आहे. हे ग्रंथ बुकसेलरांकडे १२ आण्यापासून १ रुपयापर्यंत विकत मिळतात.

आमचे मराठी वाचक म्हणतील कीं आम्हांला इंग्रजी येत नाहीं तर काय करावें? महाराष्ट्रांत कोणी पीटर कीरी नाहींच कां? आहे. महाराष्ट्रांतहि एक पीटर कीरी आहे. तो सातारा जिल्ह्यांत किर्लोस्करवाडी येथें किर्लोस्कर खबर नांवाचें एक मासिक पुस्तक चालवीत असतो. त्याचें नांव लक्ष्मणराव किर्लोस्कर. पीटर कीरीच्या वाङ्मयाची प्रतिमा हुबेहुब मराठींत वठविण्याच्या कामीं श्रीयुत किर्लोस्करांच्या स्वावलंबनी तडफेनें बरेंच यश मिळविलें आहे. किर्लोस्कर खबर हें मासिक निर्दोष व स्वतंत्र धोरणाचें असून त्यांत स्वावलंबनी मनुष्याच्या निद्रित हिमतीला खबबडून जागें करणारेंच वाङ्मय प्रसिद्ध होत असतें. याची वार्षिक वर्गणी अत्यंत अल्प, अवधी एक रुपया. वाचकांनीं नमुन्याचा अंक मागवून खात्री करावी. किर्लोस्कर खबरनें महाराष्ट्रांत पीटर कीरीचा संप्रदाय निर्माण केल्याबद्दल चालकांचें प्रबोधन अभिनंदन करीत आहे.

□□□

स्फुट विचार

शाबास भगिनींनो शाबास !

कर्मवीर कर्वे यांनीं स्थापन केलेल्या महिला विद्यापीठाच्या जी. ए. (गृहितागमा) च्या उच्च परिक्षेंत यंदा आठ महाराष्ट्र भगिनी उत्तीर्ण झाल्या, याबद्दल प्रबोधनास अत्यानंद होत आहे. या भगिनींत ६ ब्राह्मण भगिनी असून ३ ब्राह्मणेतर आहेत. मराठा व तत्सम जातींतील पुरुषांत शिक्षणाचा प्रसार गोगलगाईच्या गतीनें होत असतां, दोन स्त्रियांनीं, परिस्थितीला न जुमानतां, विद्यार्जनाची उच्च मजल गांठावी, हें कौतुकास्पद आहे. कुमारी सोनुबाई चव्हाण या परीट समाजांतल्या भगिनी असून त्यांच्या घराण्यांत सरस्वतीची भक्ति उत्कट आहे. यांची एक बहीण डॉक्टर आहे व इतर भावंडांचा अभ्यासक्रम नेटानें सुरू आहे. दुसऱ्या विजयाशालिनी भगिनी ह्मणजे आमचे परममित्र सुप्रसिद्ध वेदान्ती हिन्दुमिशनरी डॉक्टर आर. व्ही. खेडकर M. D. यांच्या पत्नि सौ. गंगुबाई खेडकर या होत. यांचा जन्म पुणें येथें १८७८ साली झाला. या कै. प्रसिद्ध रावबहादुर डॉ. विश्राम रामजी घोले यांच्या कन्या या १९११ सालीं डॉ. खेडकर यांच्या बरोबर विलायत व अमेरिकेच्या प्रवासास गेल्या होत्या. तिकडे 'अद्वेत वेदान्त व भगवद्गीता' या विषयांवर त्यांची जवळजवळ पन्नास व्याख्यानें झालीं व रॉचेस्टर रेडिंग आबर्डीन वगैरे शहरीं चर्चमध्यें त्यांना उपासना चालविण्याचा मान अनेकदां मिळाला. एरवी पाहणारांना सौ. गंगुताई इतक्या सुशिक्षित व विद्वान् असतील असें मुळींच दिसत नाही; अगदीं दहाजणीप्रमाणें साध्या भोळ्या दिसतात, परंतु यांचा स्वभाव अत्यंत करारी व निश्चयी आहे. रॉचेस्टर येथें त्यांचें व्याख्यान झाल्यावर त्यांचें अभिनंदन करतांना अनेक युरपियन स्त्रीपुरुषांनीं 'तुह्मी ग्रॅज्युएट आहांत काय?' असें विचारलें. त्यावेळीं सौ. गंगुबाई मॅट्रिकसुद्धां नव्हत्या. 'मी ग्रॅज्युएट नाहीं' हें शल्य त्यांना चैन पडूं देई ना. त्यांनीं आपला मुलांबाळांचा संसार संभाळून मॅट्रिकची परिक्षा दिली व आतां वयाच्या ४० व्या वर्षी त्या जी. ए. झाल्या. सौ. गंगुताईंची निश्चयी प्रवृत्ति अनेक वाचाळ तरुणांनीं विचारांत घेण्यासारखी आहे. जी. ए. करितां त्यांनीं 'धर्म आणि तत्वज्ञान' हा खास विषय घेतला होता. आतां त्या स्त्रीशिक्षणकार्याच्या प्रसाराकडे लक्ष देणार असल्याचें समजतें. शाबास !!

झक मारतात मित्र, वैद्य काय ह्मणतात?

मुंबईंतील एक सुप्रसिद्ध नागरीक व धनशेट शेट रतनसी धरमसी मुरारजी यांनीं मिस मीना रेंडा नांवाच्या एका अमेरिकन कुमारी बरोबर ता. २१ मे १९२२ रोजी विवाह केला. तत्पूर्वी या बाईनें हिंदु मिशनरी सोसायटी मार्फत हिन्दु धर्माची दीक्षा घेतली. या विवाहावर टीका करतांना लोकमान्य दैनिकानें रतनसी शेटचा मिसेस आनी बेझंटच्या संप्रदायाशीं असलेला निकट संबंध आपल्या पिढीजात राष्ट्रीय भाषेंत वर्णन करून, त्यांच्या मोटारगाड्या बेझंटच्या दिमतीस असतात, (केळकर खाडीलकरांच्या नसतात.) बेझंट बाई मुंबईस आल्या ह्मणजे रतनसी शेटच्या पाहुण्या असतात आणि त्यांच्या दुसऱ्या एका अरंडेल नामक शिष्यानें एका 'ब्राह्मण स्त्रीह्याच्या' तरुण मुलीचें (वृद्ध मुलीचें नव्हें !) पाणीग्रहण केलेलें आहे, वगैरे प्रस्तावना केली आहे. असल्या विस्तृत प्रस्तावनेचें कारण एवढेंच की शेट रतनसी हे धुतल्या तांदुळाप्रमाणें अवधूत असलेल्या राष्ट्रीय पक्षांतले नव्हते हें दाखविलें. मिस रेंडा ही रतनसीच्या मुलांची शिक्षक म्हणून आज चार पांच वर्षे त्यांच्या घरी असते. रतनसीची पहिली बायको हयात आहे. पण ती बरेच दिवस आजारी आहे, ही गोष्ट लोकमान्यकर्त्यांना माहित नसावी असें दिसतें. कांहींहि असो, शेट रतनसीनीं मिस रेंडाशीं उघड माथ्यानें विधिशुद्ध विवाह केला. या बद्दल लोकमान्यकर्ते लिहितात ''शेट रतनसींनीं हा विवाह आपल्या या नूतन पत्नीला कै. गजाननराव वैद्यांच्या हिन्दु मिशनरी सोसायटीकडून प्रथम हिंदु करून घेऊन, नंतर त्या सोसायटीनें तयार केलेल्या विधीप्रमाणेंच केला असें समजतें. कै. गजाननराव जिवंत असते तर त्यांनीं मिस मीना रेंडाला हिंदुधर्माची दीक्षा या विवाहाच्या उद्देशानें दिली नसती व असला विवाह आपल्या सोसायटी मार्फत लावलाहि नसता, असा त्यांचा कित्येक मित्रांचा तर्क आहे.'' असला तर्क करणारे वैद्याचे मित्र आपलीं नावें प्रगट करतील, किंवा असें करण्याचें त्यांना धारिष्ट नसल्यास कंबर मोडून हिन्दु मिशनरी साप्ताहिकाच्या फायल्या चाळतील तर आपला तर्क किती मूर्खपणाचा आहे, हें त्यांना तेव्हांच दिसून येईल. वैद्य गेले ह्मणून त्यांचे हिन्दु मिशनरी कार्यविषयक सिद्धांत कांही त्यांच्या बरोबर गेले नाहीत आणि बुरखेबाज मित्रांच्या तर्कावर कार्य चालविण्याइतकी सोसायटीहि दुबळी नाहीं, हें लोकमान्यादि राष्ट्रीय हितचिंतकांनीं लक्षांत ठेवावें. कै. वैद्य जरी अल्पायुषि झाले तरी त्यांनीं हिंदुमिशनरी श्रीसंप्रदायाच्या पुढील अखंड प्रवासासाठी १९४ अंकांत लिहून ठेवलेलें सिद्धांतरूपी वाङ्मय चिरंजीव आहे. तेव्हां रतनसी शेटच्या मिश्रविवाहाची योग्यायोग्यता ठरविण्यासाठीं 'वैद्यांच्या मित्रांचा तर्क' हिंदुमिशनरीला किंवा कोणालाहि विचारांत घेण्याची जरूर नाही. लोकमान्यानें वाटेल तर त्या तर्काचे डोले खुशाल नाचवावें. आपण पदार्थ असें गृहीत धरून चालूं कीं मिस रेंडा व रतनसी शेट यांचा विधिशुद्ध मिश्रविवाह होण्यापूर्वी त्यांचे 'लव्हाळें' होतें. तरीसुद्धा आतां त्यांनी इतर सामाजिक अडचणींना न जुमानतां उघड विवाह केला, यांत त्यांचें नैतिक धैर्यच विशेष व्यक्त होतें; आणि 'अव्यवस्थित व्यवहारापेक्षा व्यवस्थित विवाह बरा' हें कै. गजाननराव यांचें सूत्र येथें स्पष्ट लागूं पडतें. मिश्रविवाहाची व पुनर्विवाहाची ससेहोलपट करण्यांतच वर्णाश्रमधर्माची थोरवी गाणाऱ्यांना हिन्दु समाजांत भयंकर प्रमाणांत माजलेली व्यभिचाराची अनीति पाहवते, पण अव्यवस्थित व्यवहारापेक्षां व्यवस्थित विवाह कोणी केला तर त्यांच्या कपाळाची

शीर ठणठणूं लागते! हिन्दु मिशनरी ५ जुलै १९२० च्या अंकांत कै. वैद्य लिहितात, ''मिश्रविवाह पूर्वी झाले व आतां होत आहेत. हिन्दु समाजाला शास्त्रनामक कायदे करून देणारांना यांतला स्वाभाविकपणा माहीत होता त्यांनीं अनुलोम प्रतिलोम हे अपवाद ठेवले होते. आठ प्रकारचे विवाह मान्य केले होते. ते बंद झाले म्हणून व्यभिचार वाढला. आतांहि हिंदु समाजांत मिश्रविवाह होत आहेत. ते व्यभिचाररूप आहेत. मिश्रविवाह जेथे होणारच असें आम्हांला दिसतें, तेथें आम्ही तो धर्म्य अथवा कायदेशीर व्हावा असें इच्छितों व साह्य करतों. असें साह्य केलें नाहीं तर ते वधुवर व्यभिचारावस्थेंत राहतील. आम्ही साह्य करतों म्हणून वधूवर आमच्याकडे येतात. आमचा व्यवस्थित विवाह करा असें म्हणत ते येतात हें त्यांचे भलेपण होय. यांत समाजाचें कल्याण आहे. वधूवर पति पत्नी होतात व जबाबदारी ओळखून राहतात. व्यभिचारांत स्त्रीला पत्नीचे-धर्मपत्नीचे-अधिकार प्राप्त होत नाहीत. आमच्या पद्धतींत होतात. आमची पद्धत सर्व स्त्रियांना समजावी. कोणत्याहि स्त्रीनें, आमच्या बहिणीनें, कोणा पुरुषापाशी अव्यवसथेनें राहूं नये. तिनें असें म्हणावें की 'तुमच्या संसाराला मान पाहिजे तर मजशीं धर्म्य व कायदेशीर असा विधिविवाह करा व त्याची व्यवस्था लावण्यास रा. वैद्य यांस सांगा; ते आह्मां स्त्रियांची बाजू घेतात व आम्हांला धर्मपत्नीचे अधिकार मिळावे असें इच्छितात.'' असा कायदा असावा कीं पुरुषानें कोणतीही स्त्री विवाहा शिवाय आपल्यापाशीं ठेऊं नये.'' वैद्यांचे हे उद्गार आहेत. आणखी पाहूं इच्छिणारांनीं पैसे खर्चून हिन्दुमिशनरीच्या जुन्या फायल्या विकत घेऊन वाचाव्या. पण, कांहींहि न वाचतां, विचार न करितां, बरळत सुटणाऱ्या काणे वकिलांसारख्या काण्या प्रवृत्तीच्या माणसाशीं हेंगल घालीत कोण बसणार? म्हणे 'वैद्यांच्या मित्रांचा तर्क'! झक मारतात ते मित्र, वैद्य स्वत: काय म्हणतात तें पहा.

आकांडतांडव नको, विवेकानें पहा

रतनसी-रेंडा-विवाहाच्या बाबतींत वरील स्फुट लिहिल्यानंतर आम्ही स्वत: विशेष चौकशी केली. हल्लीं बहुतेक सर्व त्रयस्थ व उदास वृत्तपत्रांनीं या विषयांत बरीच कावकाव चालविलेली आहे आणि 'टिळक' पत्रांत तर 'हिन्दु मिशनरी सोसायटीचा कुण्ठीणपणा'च प्रसिद्ध झाला आहे. सुबोध पत्रिकेला तर ही गोष्ट 'विजय की अध:पात' अशी शंका पडली आहे. 'टिळक' पत्राचा सात्विक त्वेष आम्हाला कौतुकास्पद वाटतो; आणि त्यांनीं आपल्या लेखाचा मथळा जरी अविवेकी घेतला आहे तरी खुद्द लेखांत त्यांनीं हिं. मि. सोसायटी व श्री. सुंदरराव वैद्य या दोन समष्टी-व्यक्तीचें भिन्नत्व स्पष्ट दर्शवून, सोसायटीला दोष न देण्याच्या बाबतींत प्रशंसनीय विवेक दाखविला आहे. परंतु हिं. मि. सो. च्या अस्तित्वापूर्वी रतनसी-रेंडा मासल्याचे अनेक असवर्ण, मिश्र विवाह व विधवा पुनर्विवाह लावण्याचें कार्य करणाऱ्या प्रार्थना समाजानें वधुवरांच्या नैतिक शीलाचें कस्सून ॲनालिसिस केले होतें आणि त्यांचा विवाहपूर्व संबंध जिव्हाळ्याचा किंवा लव्हाळ्याचा मुळींच नव्हता, असें सुबोधपत्रिकाकार छातीला हात लावून सांगायला तयार आहेत काय? अव्ययस्थित व्यवहारांपेक्षां व्यवस्थित विधिशुद्ध

विवाह बरा, हेंच धोरण प्रार्थना समाजानें आज पर्यंत ठेविलें आहे कीं नाहीं? मग आतांच या कोट्या कशा सुचतात?

एरवीच्या साध्या सजातीय विवाहांत सुद्धां अनेक रतनसी रेंडा आह्मी दाखवून देऊं. नव्हे, यापेक्षांहि अत्यंत गलिच्छ अनीतीची लव्हाळीं आज हिन्दु समाजांत सर्वत्र माजलेलीं आहेत. या लव्हाळ्यांचा तीव्र भाषेंत नुसता निषेधच न करतां, त्यांतल्या तरुणांना जाहीर चव्हाट्यावर शंभर शंभर चाबकांचे फटके उडविले पाहिजेत. कारण स्त्रियांना बिघडविण्याच्या कामीं पुरुषच विशेष जबाबदार असतात. असवर्ण व आंतरराष्ट्रीय विवाहांचे आम्ही पुरस्कर्ते असलों तरी रतनसी रेंडा मासाल्याचे विवाह आम्हांलाहि अमान्य आहेत. परंतु व्यभिचारी लव्हाळ्यांत कुझणाऱ्यांना व्यवस्थित विवाहबद्ध होण्याच्या कामीं आपद्धर्म अपवाद किंवा नाइलाज म्हणून मदत करण्यास काकूं करणें केव्हांहि योग्य होणार नाहीं. प्रस्तुत आक्षेपित विवाहविषयी एक दोन भाटिया बांधवांचे असे उद्गार बाहेर पडले कीं 'जो रतनसीए रेंडानें रांड रखेली होत, तो तेमां कांई वांधो नहि थान, मोरारजीना कुटुंबमां थएला पुरुषोओने यूरपीन स्त्रियो पोताना वाहकेसरना बंगलामां कै राखेलीज नथी? घणी. तो पण आ शूं? 'रखेली ठेवलेली पत्करते, पण विवाह नको! जातिशुद्धतेच्या किती या घाणेरड्या कल्पना? सर्वत्र असेंच आहे गुपचुप व्यवहार कोणी केला तरी खुशाल मान्य, पण उघडा उघड विवाह नको.

सजातीय विवाहांत जबाबदार कोण?

रतनसी-रेंडा आंतराष्ट्रीय मिश्रविवाह आहे. पण सजातीय सवर्णीय विवाहांत काय आपल्या भानगडीच नसतात? दोन ताजी उदाहरणें घ्या (१) एक तरुण व तरुणी सुमारें एक वर्ष लहान्यांत. हा लव्हाळ्याचा जिव्हाळा दोघांच्याहि आई बापांना पूर्ण माहीत. साऱ्या चाळींत सर्वांना परिचित. तोंडातोंडी वाङ्मनिश्चय झालेला. परस्पर येणीजाणी मेजवान्या नेहमींच चालत. निसर्गधर्मानुसार विवाहपूर्वीच गर्भधारणाची प्रभा फांकली. मुलीचा बाप घाबरला व मुलाच्या बापाला व्याहीपणाचें शास्त्रोक्त व कायद्योक्त नातें जुळविण्याची निकड करूं लागला. अडला नारायण गाढवाचे पाय धरी. गाढवानें झाडल्या दुगाण्या. मुलाच्या बापानें रामशास्त्र्याच्या निस्पृहपणाची ऐट आणून ठांसून सांगितलें कीं ८०० रुपये हुंडा देत असाल तर पुढीची बात. मुलीच्या बापानें तोंडात मारून घेतल्या आणि कसाबव्याह्याच्या पदरीं आपली नाडलेली पोर ८०० रुपयांच्या वरदक्षिणेसह मुकाट्यानें बांधली. मुलीचा बाप मुंबईस रहात असतो व त्यांचे शायलॉक व्याही कर्जत जंक्शनपासून फार दूर नाहीत; फक्त नंदीचें धरण ओलांडलीं कीं झालें !

(२) या गोष्टींत भट एजंटचा कसायीपणा पहा. एका गृहस्थाची पत्नि वारली. मागें चार पांच लहान मुलें. घरांत दुसरे कोणी नाहीं. पोष्टाची नोकरी. एक दोन भूदेवांना करुणा आली. 'कर्तव्य' आहे कां म्हणून विचारण्याची गरजच नव्हती. वेळेवर दोन घांस मिळण्याची पंचाईत. त्यांत मुलांची कावकाव. कावला बिचारा. दोन तीन भूदेवांनीं एक लग्नाळू मुलगी तिन्ही सांजेच्या मंद प्रकाशांत दाखविली. गरजु माणूस. कशाला पडेल रंगरूपाच्या चौकशींत? होय, म्हणतांच दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं शुभ मंगल

झालें. भटजींनीं 'मुलीच्या बापास हुंडा देण्याकरितां २५० रुपये' घेतले ते परस्पर स्वत:च हबकले. लग्न होऊन १।। महिना झाला न झाला तों पोस्टमास्तरीण बाई पुत्ररत्नंप्रासुता ! बिचाऱ्या पोस्टमास्तरनें पत्रपार्सलांवर मारण्याचा खुंटा कपाळावर कां मारून घेऊं नये? भटजी एजंटांना काय? ते भूदेव, भूवर प्रतिष्ठितपणें मिरवतच आहेत. असली पांच पन्नास उदाहरणें यंदाच्या लग्नसराईत घडलेली आमच्या कानीं आलीं आहेत. यांत कोणीं कोणावर कुण्टीणपणाचा आरोप करायचा?

खरी स्थिति अशी आहे :- रतनसी-रेंडाचें लव्हाळें दोघेहि लपवीत नाहींत. रतनसी हिन्दु धर्म सोडूं इच्छित नाहीत व रेंडालाहि सोडूं चहात नाहींत. गुपचिप व्यवहारांत राहूं इच्छित नाहींत. रतनसीसाठी रेंडा हिन्दु झाली. पुढें विवाहाचा प्रश्न आला. विवाह लावणें हा हिं. मि. सो. चा उद्देश नाही, तरी असले विवाह रजिस्टर झाल्याशिवाय सोसायटी तर्फे विधि करून सोसायटीचें सर्टिफिकेट दिलें जात नाहीं. रतनसीला आपला विवाह रजिस्टर करण्याची पर्वा नव्हती. स्वत:चें लग्न हिन्दु पद्धतीनें व्हावें एवढा मात्र त्यांचा मोठा आग्रह, मग तें कायदेशीर ठरो वा न ठरो. आर्य समाज किंवा प्रार्थना समाज यांचें सहाय्य घेण्याची इच्छा नाहीं. हिं. मि. सो. नें आपल्या जबाबदारीवर हें लग्न लावावें असाहि आग्रह नाहीं. मात्रत सोसायटीनें मान्य केलेल्या विवाहविधीविषयीं त्यानें हट्ट धरला. या विधीनें कोणीहि जाणत्या व्यक्तीनें लग्न लावल्यास त्या दोघींचें समाधान होणार होतें. असें न झाल्यास ते मुसलमान धर्माची दीक्षा घेणार होते. अशा प्रसंगीं स्वतंत्र व्यक्ति या नात्यानें श्री. सुंदरराव वैद्य यांनीं हा विवाहविधि करण्याचें कबूल केलें व रतनसीचा परधर्मप्रवेश टाळला. यांत हिन्दुमिशनरी कार्याची कांहीं अप्रत्यक्ष सेवा जरी त्यांनी केली, तरी या प्रकरणांत सोसायटीचा प्रत्यक्ष संबंध कांहींच नाहीं, असें आम्हाला वाटतें. सोसायटीनें काढलेल्या वैदिक विवाहविधीचा उपयोग वाटेल त्या हिन्दूनें करून घ्यावा, त्यावर सर्व हिन्दूंचा हक्क आहे, असें सोसायटीच्या कॉंग्रेसनें स्पष्ट जाहीर केलेलें आहे. त्याप्रमाणें ठिकठिकाणीं त्याचा उपयोग अनेक हिन्दु बांधव करून घेत आहेत. कै. वैद्य एके ठिकाणी लिहितात ''आम्ही अपद्धर्मी किंवा आपवाद प्रसंगीं व्यवस्था लावून देणारीं माणसें आहों.'' यापेक्षा सुंदरराव वैद्य यांनीं अधिक कांहीं केलें नाही व रतनसीला सोसायटीचें सर्टिफिकेटहि मिळालेलें नाही. विधीचा उपयोग केला म्हणजे सोसायटी जबाबदार कशी ठरते?

कायस्थ प्रभु आणि हुंडा

या अंकापासून हुंडेबाज शायलॉकांची जंत्री बंद करण्याचें ठरविलें आहे. याचें कारण एवढेंच की हुंडानिषेधाचे ठराव एकमतानें पास करणाऱ्या या वाचाळ कायस्थ समाजानें यंदाच्या वर्षी शायलॉकगिरीची अगदीं शिकस्त करून सोडली असून, आमच्याजवळ दीडदोनशें हुंडेबाजांची यादी येऊन धडकली आहे व आणखी दररोज त्यांत भर पडत आहे. अर्थात् ज्ञातीच्या प्रातिनिधिक परिषदेशीं क्रियानष्ट होणाऱ्या या शहाण्यांची नांवें छापण्या इतकी जागा आमच्या जवळ नाहीं. जेथें खुद्द परिषदेचे अध्यक्षच हुंड्याऐवजीं चार हजारांचे 'मुलीच्या आंगावर दागिने' मागण्याइतके कायदेबाज श्रीमंत बनले,

तेथें २१०० आणि २२०० हुंडे हबकणाऱ्या हुंडेबाजांनीं आपल्या पुरुषपणाच्या लिलावाचे धांगडधिंगे कां घालूं नयेत? शिवाय जेथें पुढारी ह्मणून मिरविणाऱ्या धेंडांच्या दांतखिळ्या बसलेल्या आहेत. तेथें आमच्यासारख्या समाज-अमान्य गोमाजीनें तत्वासाठीं दांतकिरकिट्या करण्यांत अर्थच उरला नाही. दारूबाजी इतकेंच हुंडाबाजी हें एक दुर्दैवी व्यसन कायस्थ प्रभु समाजाच्या बोकांडीं बसलें आहे, एवढां खूणगांठ बांधून स्वस्थ बसणेंच बरें. आम्हांला फार आशा होती की हुंडाप्रतिरोधांचें ध्येय पुढें ठेवून निर्माण झालेली 'सी.के.पी. लीग' संस्था या हंगामांत कांहीं प्रत्यक्ष कार्य करण्यास पुढें येईल. परंतु हुंडा न घेण्याच्या शपथ पत्रिकेवर सही करणारे या संस्थेचे अनेक मेंबर व सेक्रेटरी कट्ट्या ॲन्टिहुंडाइटाचे निगरगट्ट हुंडाईट बनल्याचें दिसून येतें. लीगची ही अवस्था, परिषदेची ती अवस्था; एकूण कोणीकडूनहि मोजले तरी गोळा बेरीज शून्यच! एखाद्या परिषदेंत किंवा लीगच्या वार्षिक फराळाच्या सभेंत उंच उंच व्यासपीठावर बसण्यासाठीं शून्यवत् पूज्य पुढाऱ्यांची केवढी गर्दी ! परंतु परिषदेचे किंवा लीगचे ठराव लाथांखालीं तुडविण्याचा हंगाम बेफाम सुरू असतां, एखादा 'पूज्य' पुढारी पुढें सरसावून आपली तत्वनिष्ठा सिद्ध करील तर हराम ! यापेक्षां न्हावी धोबी परिट आह्र्यांची 'पचोत्री' कितीतरी प्रामाणिक, कार्यक्षम आणि तत्वनिष्ठ असते.

आमच्या जवळील जंत्रांवरून हुंड्यांच्या रकमांची जर बेरीज केली तर ती अजमासें एक लाख रुपयापर्यंत भरते. म्हणजे यंदाच्या लग्नसराईत पुत्रविक्रयाच्या व्यापाराची उलाढाल एक लाख रुपयांची झाली. गुपचीप हुंड्यांचे आंकडे यांत अर्थातच नाहींत. एक दोन महिन्याच्या अवधींत एवढा मोठा व्यापार सांपत्तिक ऱ्हास पावलेल्या एकट्या कायस्थ प्रभु समाजांत झाला. यावरून अनेक सिद्धांतांचें ब्रह्मांड मन:चक्षूपुढें उभें रहातें. कसल्याहि समाजकार्यासाठीं फंडाची एक दिडकी देतांना स्वयंसेवकाचे पंधरा हेलपाटे झाल्यावर 'नाहीं हो, इलाज नाहीं' सांगणाऱ्या कायस्थ वीरांनीं हुंडेबाजीच्या बाजारांत दर वर्षी लाख लाख रुपयांचे सट्टे मारावे आणि ठाणा एज्युकेशन सोसायटीला २२ वर्षांत पुरते ५० हजार रुपये मिळूं नयेत, ही स्थिति काय सिद्धांत पटविते? आज कायस्थ समाजांतील हजारों अनाथ विधवा भगिनी मोल मजुरी करीत आहेत. शेंकडों अनाथ कुटुंबांतलीं पोरकीं मुलें देशोधडीस लागून इतर जातीयांच्या खरकट उष्ट्यांवर जगत आहेत, किती तरी उत्साहि तरुणांना शिक्षणासाठीं द्रव्य नसल्यामुळें आपल्या उमेदीची माती करून घ्यावी लागत आहे; आणखी (स्पष्ट लिहितों, राग आला तर चार भाकऱ्या जास्त खा.) वडिलांना हुंडा देण्याचा त्राण नसल्यामुळें प्रौढ कुमारिका करूं नये तें करीत आहेत. अशा स्थितींत स्वत:च्या पुरुषपणाचा विक्रा करणाऱ्या विद्वान् तरुणांनो, तुम्हाला त्या अनाथ भगिनींची, त्या हतभाग्य पोरक्या भावंडांची, त्या निराशाग्रस्त विद्यार्थ्यांची आणि त्या-त्या-काय लिहावें! - त्या 'पिटिएबल' प्रौढ कुमारिकांची कांहींच कां करुणा येऊं नये? अरेरे, तुमची अंत:करणें जर माणसांची असती तर हुंडेबाजीचा असा धुमाकूळ न घालतां आपल्या भावाबहिणीच्या सहाय्यार्थ तुम्हा खास धांवला असता. अनाथ विधवांचा आक्रोश, पोरक्या मुलांच्या किंकाळ्या, विपन्नग्रस्थ उमेदवारांचे उसासे आणि कुमारिकांचे शाप ज्या समाजांत रात्रंदिवस चालूं आहेत, त्या समाजाची उन्नति होणें कदापि शक्य नाहीं.

□□□

आर्यांच्या विवाहविधीची चिकित्सा

(लेखांक २ रा)

मागील लेखांकांत (पृ. १३२) तीन स्थित्यंतरांपैकी दोन वाचकांच्या सेवेला रुजूं झालीं. तिसरें स्थित्यंतर म्हणजे चालूं काळचें. हें तर प्रत्यक्ष आपल्या दृष्टीसमोरचें, त्याचें वर्णन कशाला? असें कांहीं म्हणतील. पण नाकासमोरचें मुळींच न पहाणें हा तर चालूं काळचा विशेष असल्यामुळें शुद्ध विवाहविधी आज कोणत्या अशुद्ध व भ्रष्ट स्थितींत केला जातो, याची जाणीव करून देणें आवश्यक आहे. चालूं काळचा मामला स्मृतिनिर्बंधावर दुगाण्या झाडीत चालतो, तरीहि स्मृतींचे सर्व नियम कोणी पाळतातच असें मात्र मुळींच नाहीं. या युगांत (याला कलीयुग म्हणतात पण वास्तवीक ते भिक्षुकीयुग म्हणजे भीकमाग्यांचें युग आहे.) स्त्रियांचा दर्जा एवढा कवडीमोल झालेला आहे कीं चांगलें चांगले संस्कृत समाज घ्या, त्यांत स्त्रिया म्हणजे कामशांतीचीं स्वाभाविक यंत्रें, पापाच्या खाणी, सर्वच बाबतीत त्याज्य व अनिधिकारी, त्यांना शिक्षण देतां कामां नये व ऐहिक व पारलौकीक बाबतींत त्यांनीं; स्वत: लवमात्र न झगडतां, नुसता पुरुषाच्या हाताला हात लावला ह्मणजे झालें. इकडे स्मृत्यांची घमेंड मारायची आणि तिकडे धडधडीत स्मृतिनियमांच्या उरांवर पाय देऊन बालविवाह ठोठवायचे, विधवा पुनर्विवाहाचे वाभाडे काढायचे, गृहस्थाश्रमाचें पूर्ण शिक्षण मुलांमुलींना न देतां त्यांच्यावर वैधव्याच्या कडकडीत संन्यासवृत्तीची बळजबरी करायची आणि रेम्याडोक्या चिरंजीवावर संसारगाडे अक्कलहुषारीनें राजीखुशीनें हांकण्याची दडपेगिरी चालवावयाची. आजला हिंदुसमाजांत १ वर्षांच्या वयापासून तों १२ वर्षांपर्यंतचीं नवरा बायको बनलेली जोडपीं हवी तेवढी आढळतात. त्या बिचाऱ्या अल्लड बालकांना नवरा म्हणजे काय आणि बायको म्हणजे काय, याची मुळींच कांहीं कल्पना नसते! अशा स्थितींत नवरा मेला तर त्या बालीकेचे धर्माच्या नांवाखालीं कसकसे धिंडवडे काढण्यांत येतात बरें? बेंटिंग साहेबानें सतीचा कायदा केला नसता, तर आज सुद्धां मुंबईच्या सोनापुरांत, पुण्याच्या ओंकारेश्वरांत, वाईच्या कृष्णापात्रांत मेसर्स कुर्तकोटी वैद्य बापट ॲन्ड कोनी कोट्यावधि स्त्रियांना आपल्या नवऱ्यांच्या सरणावर जिवंत जाळण्याची राष्ट्रीय कामगिरी खास बजावली असती. स्त्रियांना मात्र पुनर्विवाहाची बंदी, पण पुरुषांनीं एकामागून एक लागोपाठ १२ बायका केल्या तरी चालतात.

मूळची विवाहाची शुद्ध कल्पना आस्ते आस्ते गढूळ व भ्रष्ट होत गेली व स्त्रियांचा सामाजिक

दर्जा कवडीमोल होत गेला, याचाच परिणाम सांप्रतच्या हिन्दु समाजाकडे सहज नजर टाकल्यास तेव्हांच दिसून येतो. शरीरानें काडीपेहलवान्; रोगी व खुजट; ऐदीपणाची फार आवड; संकुचित मनोवृत्ति; खुळचट देवभोळेपणा, रूढीच्या चक्रांत अडकलेले, जुन्या पुराण्या गोष्टींच्या फुशारक्यांवर स्वत:ची महति गाणारे, ही आजच्या हिन्दूची स्थिति कशानें आलीं? विवाहाच्या शुद्ध हेतूचा विपर्यास आणि स्त्रीवर्गांची पायमल्ली, या मुळेंच. आजचे हिंदु प्राचीन संस्कृतीच्या व सुधारणेच्या केवढ्याहि लंब्याचौड्या गप्पा मारोत, आज त्यांच्यापाशीं कसलीहि संस्कृति उरलेली नाहीं, इतकें मात्र खचित. प्राचीन व मध्ययुगिन ऋषींची जागा सध्यां पोपटपंची भटाभिक्षुकांनीं पटकविलेली आहे. या गध्दद्याना शास्त्र ह्मणजे काय व सत्यशोधन कशाशीं खातात याची दादच नाहीं. नुसतें चकारीचे बैल. आजा गेला त्या वाटेनें बाप गेला आणि बाप गेला ह्मणून हाहि मूर्ख तसाच जांणार. श्रुति ह्मणजे काय, स्मृति ह्मणजे कशी असते, त्यांतल्या उक्तींचा वास्तवीक अर्थ काय, याचा तिळमात्र विचार न करतां, जो भट्ट उठला तो आपला रूढीच्या खुंट्यावर लागला पागोटें गुंडाळायला ! राजकीय दृष्ट्या पाहिलें तर जगाच्या राष्ट्रसंघांत हिंदुस्थानाला कवडीचीहि किंमत नाहीं. लोकसंग्रहाच्या बाजूनें तीच रड. जाती पोटजाती पोटपोटजातींनीं सारा समाज नुसता सडून गेलेला. अशा भयंकर प्रसंगी राष्ट्रकार्यांची संघटित जाणीव उत्पन्न करणे भगीरथाच्याहि सामर्थ्यांची रग जिरविल्याशिवाय रहाणार नाहीं.

विवाहविधि मनुष्याच्या केवळ कामेच्छातृप्तीकरितां नाहीं किंवा पुरुष व स्त्री यांच्या संसारयात्रेच्या कंत्राटासाठीं नाहीं. विवाहविधीशिवाय सुद्धां हीं कर्मे करतां येणें अशक्य नाहीं व कोणी तीं करीत नाही असेंहि नाहीं. अर्थात् यापेक्षा त्यांत कांहींतरी विशेष असले पाहिजे खास. ज्या आर्यांनीं विवाहविधि निर्माण केला जे नेतृत्वाच्या कल्पनेनें नखशिखांत थरथरलेले मर्द होते; साऱ्या दुनियेला पादाक्रांत करूं अशा महत्वाकांक्षेनें क्षणोक्षणीं उसळणारे पौरुषसागर होते आणि नतु एव आर्यस्य दासभाव: जो जो म्हणून आर्य आहे, आर्य म्हणवील, तो कधींहि कोणाचा गुलाम होणार नाहीं, अशा सिद्धांताचे सक्रीय प्रणेते होते. अर्थात् नुसत्या प्रजोत्पदनासाठींच - आणि ती प्रजा म्हणजे आतांच्या हिंदुजनांप्रमाणें परक्यांच्या पखालीचे बैल होण्यासाठीं - त्यांनीं विवाहविधी अस्तित्वांत आणला नाहीं खास. आर्यांच्या विवाहाचा प्रत्यक्ष विशेष हेतु केवळ प्रजोत्पादन हा नसून, सुसंस्कृत व उत्तान बुद्धिमत्तेची मानवजाति निर्माण करून मानवी उत्क्रान्तीला पुढें पुढें रेटीत नेणें हा होय. आर्यांचे आधुनिक वंशज म्हणविणारे हिन्दु हा उत्क्रान्ति-प्रगमनाचा मामला कसा काय वठवीत आहेत, ते त्यांनीं आपल्या मनालाच पुसलेलें बरें !

विवाहाचा हा मुख्य उद्देश त्या विधीच्या मंत्रांतच स्पष्ट केलेला आहे. पण मंत्र म्हणजे पोटभरु भटांचें पोट जाळण्याचें यंत्र बनल्यामुळें कांही तरी चर्पटपंजरीवर सर्रास हिन्दुंचीं लग्नें अशास्त्रीय व बेकायदेशीर पद्धतीनें लागत असतात; आणि ज्यांचें विवाह लागतात त्यांना-वराला व वधूला- त्या मंत्रांची फारशी पर्वाहि वाटत नाहीं, कारण ते त्यांना समजत नाहींत व समजून घेण्याची जरूर भासत नाहीं. कोणीकडून कसे तरी एकदांचें शुभ मंगल साऽऽवधान् धुम धडधड ठोम् झालें की उलगडला सारा कारभार ! वधू तर बिचारी उघडाउघड दाव्याला बांधून आणलेली गायच असते; गाय तरी वेळीं शिंगें हालवील, पण ही मानवी गाय म्हणजे मेणाची पुतळी, जशी वळवाल तशी वळते. पण वराची स्थिति याच्या अगदीं उलट. हा नुसत्या खरोखरीच्या घोड्यावर बसून येतो इतकेंच नव्हे तर, विद्येनें व वरचढपणानें सुद्धां घोड्यावरच

बसलेला असतो. पण तो सुद्धां या मंत्रांच्या अर्थाकडे पहात नाहीं. भटजी सांगेल ती कवाईत, म्हणेल तो मंत्र आणि लावील तें लगीन !

आतां आपण विवाहविधींतील कांहीं मुख्य मुख्य मंत्र घेऊन त्यांतून काय तत्वें निष्पन्न होतात तें पाहूं. पाणिग्रहण हा एक मुख्य भाग आहे. वर वधूचा हात धरून म्हणतो :-

गृभ्णामि ते सुग्रजास्त्वाय
हस्तं मया पत्या जरदृष्टिर्यथाऽस:
भगो अर्यमा सविता पुरंधि-
र्मह्यं त्वा ऽ दुर्गार्हपत्याय देवा: ।।

भावार्थ :- उत्कृष्ट संतति निर्माण व्हावी आणि तूं मजबरोबर वृद्धदशेपर्यंत एकजीव होऊन रहावें, या हेतूनें मी तुझें हें पाणिग्रहण करीत आहे. मग अर्यमा सविता पुरंधि या देवांनीं गृहस्थ धर्माच्या सांगतेकरितां तुझी मला प्राप्ति करून दिलेली आहे.

वरानें वधूचा हात धरून हा मंत्र ह्मणावयाचा असतो. यामंत्रांत विवाहाचा मुख्य उद्देश 'सुप्रजास्त्व' उत्तम संततीची वाढ हा स्पष्ट दिसतो. 'उत्तम संतति' म्हणजे सर्वच बाजूंनीं उत्तम उन्नत अशी संतति, आर्य संतति. आर्य या शब्दांतच सर्व उत्कृष्ट तत्वांचा समावेश झालेला आहे. अर्थात् असली आर्य संतति उत्पन्न होण्यास पतिपत्नीचें अकृत्रिम प्रेम, ऐहिक पारलौकीक कर्तव्याचरणांत दोघांच्या मनोवृत्तीची आत्यंतिक एकतानता, देव मानवसृष्टी व इतर सर्व जीवसृष्टि यांच्या कल्याणासाठीं रात्रंदिवस झटून गृहस्थधर्म प्रामाणिकपणें पार पाडण्याची सचोटी, इत्यादि अनेक धर्म त्यांना प्रत्यक्ष आचारविचारांत भिनवावे लागतात, हें सांगणें नकोच. मनोवृत्तीची ही एक तानता आणि स्वभावधर्माचा हा एकजिनसीपणा कोठचा तरी वर आणि कुठली तरी वधु अशा गंगाजमनी जोडप्याच्या बळजबरीच्या विवाहापासून कदापिहि निर्माण होणें शक्य नाहीं. वधुवरांला स्वयंवराची म्हणजेच स्वयंनिर्णयाची जन्मसिद्ध हक्काची परवानगी दिल्याशिवाय ही स्थिति प्राप्त होणार नाही. प्रस्तुत मंत्रांत आणखी एक विशेष आहे. दुसरे दोन चरण पहा. त्यांत वर वधूला ह्मणतो कीं 'तूं मला देवानें दिलेली आहेस.' प्रत्येक आर्यपुत्रानें हें लक्षांत ठेवावयाचें असतें की पुरुष आणि स्त्री यांचा हा जो पवित्र विवाह संबंध घडून येत असतो, तो देव घडवून आणतात आणि गृहस्थाश्रमाचीं कर्तव्यें सचोटीनें बजावण्यांतच पतिपत्नी मानवजीविताचें एक दैवि कार्य करीत असतात. प्रत्येक विवाहित जोडप्याला जर या भावनेची स्पष्ट कल्पना करून देण्यांत येईल, तर पुष्कळ संसार सुखाचे होतील. वर वधूला आणखी ह्मणतो :-

वीरसूर्देव कामा स्योना शं नो भव ।।

याचा अर्थ :- तूं हिंमतबहाद्दर मर्द अशा संततीला जन्म देणारी माता हो. तूं ईश्वराची भक्ति करणारी हो आणि अशा रीतीनें आपलें दोघांचें कल्याण व सौख्य वृद्धिंगत कर.

यावरून एवढें स्वच्छ दिसतें कीं उत्तम संतति उत्तम संतति ह्मणून वरच्या मंत्रांत जो शब्द आला आहे, त्या संततीचा मुख्य गूण ह्मटला म्हणजे हिंमतबहाद्दरपणा किंवा मर्दपणा हाच असला पाहिजे. हा मर्दपणा अर्थात्

मारीन पन्नग मिं फोडिन शेष टाळू

याच मासाल्याचा असला पाहिजे, हे सांगणें नकोच. ग्रॅज्युएटी निष्क्रीय मर्दपणा हा मर्दपणाच नव्हे.

राष्ट्रांत मर्दपणा असला तर तें कधीहि कोणाचें गुलाम होणार नाहीं. आज हिन्दुराष्ट्र गुलामांचा पांजरापोळ बनलें आहे, गॅज्युएटांचा बाजार आहे, म्हणून तें नामर्द आहे. आर्यांच्या शब्दकोशांत नामर्द हा शब्दच नव्हता. नामर्दाची वीण जर आर्यस्त्रियांच्या पोटीं उत्पन्न झालीं असतीं, तर आर्य हे आर्यच झाले नसते. वराची दुसरी अपेक्षा वधूनें ईश्वर भक्त असावें. देवाला ओळखावें. देव आणि जीव यांतला परस्पर संबंध स्वाध्याय मनन निदिध्यासानें पूर्ण जाणावा. आत्मज्ञान व्यवहारज्ञान मिळवावें आणि स्वत: उध्दरोन जगाला उद्धरावें. किती ही उदात्त भावना ! स्त्रियांबद्दल केवढी ही स्वयंनिर्णयी कळकळ!! नाहींतर आतां. बायको निरक्षरं, अज्ञान, नुसतां लांकडाचा ओंडका का असेना, नवऱ्याच्या हाताला हात लावला कीं झालें. आर्यपुरुष आर्यस्त्रीला सर्व क्षेत्रांत पूर्ण स्वातंत्र्य देऊन, तिच्या ज्ञानाच्या सहकार्याची अपेक्षा करतो. त्याची ही इच्छा असे कीं माझी सहचारिणी ही सर्व गोष्टीत अक्षरश: सहचारिणी असावी. तिनें स्वत: सर्व विद्येचा स्वाध्याय करून माझ्या ज्ञानाबरोबरच प्राविण्याची मजल गांठावी.

आतां यावर अशी शंका येते कीं या मंत्रांतल्या प्रतिज्ञा व अपेक्षा इतक्या गंभीर स्वरूपाच्या आहेत कीं त्या नीट समजण्यासाठीं वधू व वर हीं दोघेही चांगली प्रौढ, समंजस व शिक्षित असली पाहिजेत खास. हे मंत्र कांहीं १०-१२ वर्षांच्या कोंवळ्या अल्लड बालबालिकेसाठी अस्तित्वांत येणें शक्य नाहीं. असें उघड सिद्ध होत असतांहि बालविवाहाची टिमकी पिटणारे लोक गद्धे म्हटले तर त्यांना वास्तवीक राग येण्याचें काय कारण? श्रुति (वेद) प्रणित विवाहविधीचा भावच असा आहे कीं विवाहेच्छु वधु वर मनानें व देहानें चांगले परिपक्व व उन्नत असेच असले पाहिजे. त्यांना विवाहाचा मुख्य उद्देश काय आहे आणि त्याच्या प्रतिज्ञा कसकशा आहेत, याची पूर्ण ओहख पटण्याइतकी त्यांच्या मनाची व देहाची सिद्धता पाहिजे.

□□□

अग्रलेख

क्रिश्चन धर्माचें दिवाळें वाजणार !

बीज आधीं कीं वृक्ष आधीं, हें कोडें उलगडणें जसें कठीण. तसेंच जुनें आधीं कीं नवें आधीं, याचाहि उलगडा तत्वत: लागणें कठीण. वरवर पाहिलें तर ही शंका फोल आहेशी वाटते; परंतु जुन्यांतून नवें जन्माला येतें व कांहीं काळानें तेंच नवें जुनें ठरतें, तेव्हां आधीं कोण आणि मागाहून कोण, हा प्रश्न बीजवृक्ष वादा इतकाच कठीण नव्हे तर काय? जीर्णमतवाद व नवमतवाद हे दोन शब्द आपण नेहमीं व्यवहारांत वापरतों, तेव्हां या दोन वस्तुस्थिति भिन्न आहेत, यांचा परस्पर संबंध कांहींहि नाहीं, अशी आपली कल्पना असते; परंतु जीर्णमतांतूनच नवमत निर्माण होतें आणि काळाच्या ओघाबरोबर भरधांव मजल मारतां मारतां अखेर तेंच नवमत जीर्णमत ठरतें. म्हणजे या दोन स्थिति बाह्यत: कितीहि परस्पर विरोधी दिसल्या किंवा असल्या; तरी तत्वत: त्या अन्योन्यजन्य आहेत हें स्पष्ट सिद्ध होतें. जुन्या नव्याच्या पुनर्जन्म श्रेणीवरच मानवसृष्टीच्या इतिहासाचा चित्रपट आजपर्यंत रंगत आला आहे. भूत वर्तमान आणि भविष्य या तीन काळांचा चुरशीचा तिरंगी सामना चालला आहे असें वाटतें; पण खुद्द काळच जात्या अट्टल नट असल्यामुळें तोच हीं तीन निरनिराळीं सोंगें घेऊन इतिहासाच्या चित्रपटावरील देखावे निरनिराळ्या रंगांत रंगवून मानवांच्या कल्पनेच्या रसिकतेचें कोड पुरवीत असतो. वर्तमानकाळच उद्यां भूत काळ होणार आणि उद्यांचा भविष्यकाळ त्याच क्षणीं वर्तमानकाळाची जागा पटकविणार. सूर्यास्ताचा एकच चमत्कार इतिहास पटाची पट्टी चटकन् मागें सरकवून भूत वर्तमान भविष्याचे काळा पांढरा आणि करडा असे जे तीन निरनिराळे रंग आपल्याला लाखवितो, ते वास्तवीक तीन रंग नसून एकाच रंगाची तीन स्थित्यंतरें होत. मानवी जीवनाचा ओघ काळाच्या ओघावरच दौडीची मजल मारीत असल्यामुळें, त्याच्याहि चरित्रांत क्रान्ति आणि उत्क्रान्ति यांचे अन्योन्यजन्य रंग आलटून पालटून बदलत असतात. उत्क्रान्तीची परासीमा झाली कीं क्रान्तीनें तेथें तात्काळ आपल्या विद्युत्पाताचा कडकडाट केलाच म्हणून समजावें. याच कडकडाटांतून उत्क्रान्तीची नवीन ठिणगी उत्पन्न होते आणि तिच्या प्रकाशाच्या अनुरोधानें मानवी दुनिया पुन्हां आपल्या जीवनक्रमाच्या नव्या रस्त्यावर बेधूम धांव ठोकीत सुटते. दुनियेची ही दौड मानवांच्या विचारशक्तीप्रमाणें बरी वाईट होत असते. विचाराचा पारा ज्या डिग्रीवर चढ उतर करीत असतो, त्याबहरहुकूम आचाराचीहि पावलें खालीं वर पडत असतात. जसा

एन ४००६--१७

विचार तसा आचार. विचाराचा रंग बदलला कीं आचारालासुद्धां आपले ढंग बदलावे लागतात. म्हणूनच प्रत्येक नवगतवद्याची धडपड दुनियेच्या आचारांपेक्षां तिच्या विचारांत क्रान्ति घडवून आणण्यासाठीं फार असते. 'हिन्दुस्थान ही अध्यात्मभूमी आहे, तिला पाश्चात्यांचा जडवाद कधींहि पत्करणार नाहीं' किंवा 'पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम, या दोघींचें संमीलन कदापिहि होणार नाहीं' अशा प्रकारचीं सूत्रें आपण वारंवार ऐकतों व तीं सनातन सत्य ह्मणून आपण मान्यहि करतों. पण खरोखरच हीं सूत्रें सत्य असतील काय? याचा मात्र कोणीं कधींहि विचार करण्याची तसदी घेत नाहीं. हिंदुस्थान अध्यात्मवादी असेल, पण तो जडवादी नव्हतां किंवा होऊं शकणारच नाहीं, याला आधार काय? पाश्चात्य लोक जडवादी, पण ते अध्यात्मवादी होणारच नाहींत,. हें तरी कशावरून? भौगोलीक दृष्ट्या पूर्व ही पूर्व आणि पश्चिम ही पश्चिमच राहिली, तरी त्या दोघींचा विचारविनिमय व आचारसंकर पूर्वीं कधिं झाला नाहीं किंवा पुढें कधिं होणार नाहीं, असे थोडेंच आहे? असलीं विधानें विचारदौर्बल्याची उनाड कारटीं होत. या कारट्यांना काळनिर्मित इतिहास - पटाच्या पुराव्याचें अस्तित्वच माहीत नसतें व कोणीं दाखविलेंच तर तें त्यांना रुचतहि नाहीं. हिंदुस्थान देश त्याच्या जन्मापासून चालूं घटकेपर्यंत एकजात एकरकमी अध्यात्मवादीच असता, तर सर्व जगाच्या इतिहासांत त्याला जें कांहीं राष्ट्रीय अग्रेसरत्वाचें महत्व प्राप्त झालें होतें तें होतेंच ना. एकाच गुणानें एकांगीं परिणत झालेली व्यक्ति, समाज किंवा राष्ट्र साऱ्या जगाच्या संस्कृतीवर आपली छाप कधींहि बसवूं शकत नसतें. स्मरणशक्तीला आत्यंतिक तणावा देऊन मनुष्यांनीं कालोदरांतून उकरून काढलेला ऋग्वेद-कालापासूनचा हिंदुस्थानचा इतिहास पाहिला, तर त्याचा जीवनाचा मसाला पूर्ण जडवादीच होतो, असें आपल्याला आढळून येईल. आर्थिक भावना पूर्णत्वानें रसरसूं लागल्याशिवाय राष्ट्रांत नवचैतन्याची लागवडच होऊं शकत नाहीं, आणि कोणी करूंच ह्मटलें तर निराशावादाच्या विषारी खतामुळें ती जीवहि धरूं शकत नाहीं. भरतखंड जोंपर्यंत आशावादी होतें, आर्थिक वैभवासाठीं त्याची महत्वाकांक्षा फुरफुरत होतो, अध्यात्माच्या जोडीनेंच त्याचा जडवाद जागताज्योत होता, सत्तेचीं लालसा प्रखर होती, लोकसंग्रहाची प्रवृत्ति सद्गुणसंग्रहा इतकीच कर्तव्योन्मुख होती, तोंपर्यंतच सारें जग पादाक्रांत करून धार्मिक आर्थिक व राजकीय बाबतींत तें साऱ्या जगाचें जगद्गुरुत्व पटकविण्यास समर्थ झालें. पूर्व अध्यात्मवादी आणि पश्चिम जडवादी, असल्या विचारशून्य सूत्रपठणांत आनंद मानणाऱ्यांनीं पश्चिमेच्या जगज्जेतृत्वाकडे व पूर्वेच्या (विशेषत: हिंदुस्थानच्या) निर्भेळ गुलामगिरीकडे लक्ष दिलें पाहिजेत. ज्या प्रवृत्तीनें राष्ट्राचा सर्वथैव अध:पात झाला आहे, ती प्रवृत्ति तत्वत: कितीहि गोंडस असली, तरी तिचा धिक्कारच करणें श्रेयस्कर आहे. साऱ्या जागृत व उन्नत जगानें हिंदुस्थानाला वेठीचा बैल समजून त्याच्या पाठीवर आपल्या सत्तेच्या आसुडाचे कोरडे फडाफड उडवावे आणि या बैलानें 'मी अध्यात्मवादी, मी अध्यात्मवादी' अशा वल्गना करीत निमूटपणें त्यांच्या पखाली वहाण्यासाठीं मरमर मरावें; ही परिस्थिति कोणाहि विचारवंतास सहन होणार नाहीं. 'उठा जागे व्हा आणि परमेश्वरानें आपणांस दिलेले वर प्राप्त करून घ्या' हा औपनिषदिक मंत्र, किंवा

हतो वा प्राप्यसि स्वर्गं
जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौंतेय
युद्धाय कृतनिश्चय: ।।

हा खुद्द भारताला दिलेला भगवान् श्रीकृष्णाचा संदेश, आज पश्चिमेनें आपल्या आचरणांत प्रत्यक्ष आणावा; आणि 'कोणी तुझ्या डाव्या थोबाडींत भडकवली तर उजवें मुस्कट पुढें कर' हा येशु क्रिस्ताचा नेभळट उपदेश त्याच भारतानें अक्षरश: पाळावा. ही विचारक्रान्तीची उलटापालट प्रत्यक्ष व्यवहारांत पाहून 'पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम' या सूत्राच्या हटवाद्यांना जर कांहीं बोध घेतां येण्यासारखा नसेल, तर त्यांची विचारशक्ति मेलेली आहे, असेंच म्हणणें प्राप्त पडतें.

हिन्दुधर्म जगांतील सर्व धर्म पंथांची माता, हा इतिहाससिद्ध पुरावा सिद्ध करण्याची खटपट म्हणजे उगवलेल्या सूर्याच्या अस्तित्वाबद्दलची ऐदी बाचाबाच होय. 'हिन्दुधर्म' या नांवानें प्रचलित असलेल्या धर्माचें स्वरूप आजला विकृत किंवा भ्रष्ट असें आढळेल; तथापि तेवढ्यावरून आद्य धर्मतत्वाचा, सनातन सत्याचा, आत्माच नष्ट झाला असें कसें म्हणतां येणार? आणि मोक्षाचा सवदा सवंग करणाऱ्या कडव्या इस्लाम धर्मांत किंवा बुडव्या क्रिस्ती धर्मांत असला कांहीं विपर्यास झालाच नाहीं, असें त्या त्या पंथाचे अध्वर्यु अल्लाची किंवा आकाशांतल्या बापाची शपथ घेऊन सांगायला तयार आहेत कां? मूळ तत्वाचा विपर्यास व्हायचाच. झगझगीत तलवारीवर गंज केव्हांना केव्हां चढणारच. पण असली गंजड तलवारच काय ती साऱ्या जगांत श्रेष्ठ, अशी कोणी घमेंड मारूं नये. अगणित शतकांच्या कालावधींत आद्य हिंदुधर्माचीं अनेक रूपांतरें होत गेलीं. त्याच्या सनातन तत्वाच्या भांडवलावर अनेक पंथसंस्थापकांनीं आपापल्या पंथाचे व्यापार सुरू केले. कांहीं पंथ सगोत्रीय राहिले व कांहींनीं आपलें गोत्र तोडून सवता सुभा उभा केला. या सवत्या सुभ्याच्या दालनांत मुख्यत्वें मुसलमान धर्म व क्रिस्ती धर्म हे दोन पंथ आज चटकन् दिसतात. अर्वाचीन हिन्दुजनांनीं प्राचीन हिन्दु धर्माचा लोकसंग्रहाचा करारी बाणा (Aggressive policy) न पाळल्यामुळें या दोन मिशनरी तडफेच्या धर्मपंथांनीं हिन्दुधर्मावर भयंकर चढाई करून त्याला धुळींत लोळविलें; तथापि हिंदु धर्माचा आत्मा सनातन सत्याचा असल्यामुळे, त्याचा कवची देह जरी सपाटून ठेंचाळला तरी आत्मा शाबूद राहिला. तो रहाणारच; कारण सत्याला मृत्यु नाहीं. सारांश, मूळतत्वापासून निघालेलें वर्तुळ अखेर पुन्हा त्याच ठिकाणीं लवकरच येऊन भिडणार अशीं चिन्हें आज सर्वत्र दिसूं लागलीं आहेत.

गेल्या महायुद्धानें जरी कांहीं विशेष कामगिरी केली असेल तर ती हीच कीं पाश्चात्यांच्या अर्थवादाचें नांक ठेचून त्यांना अध्यात्माची सणसणीत तहान लावली. ही तहान आतां कोण भागविणार? साऱ्या जगाच्या बोडक्यावर बापतिसम्याचें पाणी ओतून मोक्षप्राप्तीचा सौदा पाण्यापेक्षांहि पातळ करणाऱ्या क्रिस्ती धर्माचें तर तिकडे तीन तेरा वाजले ! क्रिस्ती धर्म हें शुद्ध धार्मिक थोतांड असून, वास्तवीक तो राजकारणी डावपेंचाचा सरगांठीचा सांपळा आहे, असें खुद्द क्रिस्तधर्मी मोठमोठे युरपिअन जन बोलत आहेत. येशु क्रिस्ताच्या नांवावर क्रिस्ती धर्मप्रसार करण्यासाठीं साऱ्या जगभर बोकाळलेल्या आकाशांतल्या बापाच्या लेकांचीं मायावी कृष्णकृत्यें आज युरोपमध्यें उघडी नागडी झालेली असून, क्रिस्ताची क्रिश्चॅनिटि निराळी आणि पाद्र्यांची क्रिश्चॅनिटि निराळी, असें अनेक क्रिस्ती धर्ममार्तंड उघड उघड लिहूं बोलूं लागले आहेत. साऱ्या जगांत शांतीचा मुसळधार पाऊस धोंधों पाडण्याची मिजास म ारणाऱ्या क्रिस्ती धर्मानुयायांच्या अङ्ग्यांतल्या युरपिअन अकलेच्या गङ्ग्यांनीं आपल्या रुधिरप्रिय राक्षसी महत्वाकांक्षेसाठीं अखिल मानवी दुनियेची मान तलवारीच्या पाऱ्यावर कशी धरली आहे आणि तोंडांनीं येशोक्त शांतिसूक्तांचे पाठ धडधड चालूं असतांच, यादवीच्या खराट्या कलमानें पृथ्वीचा नकाशा मानवी

एन ४००६--१७अ

रक्तानें बरबटून लालबुंद रंगविण्याचा धूमधडाका कसा चालविला आहे, हें प्रचलीत उलथापालथीचा इतिहास स्पष्ट सांगत आहे. क्रिस्ती धर्म हा मोक्षप्रवर्तक धर्म नसून, गुलामगिरी-प्रवर्तक राजकारण आहे, हा वीस वर्षांपूर्वी कर्नल इंगरसॉलनें दिलेला इषारा आज युरोपखंडाच्या किंबहुना सर्व जगाच्या अनुभवास येत चालला आहे. जेथें जेथें क्रिस्ती धर्म घुसला तेथें तेथें आजला निर्भेळ गुलामगिरीशिवाय कोणताहि मोक्ष दृष्टीस पडत नाहीं. हिंदुधर्मानें लोकसंग्रह केला, नाहीं असें नाहीं. त्याच्या मिशनरी झडपेंत सारें उपलब्ध जग आलें होतं. पण त्यानें कधींहि कोणाला आपलें गुलाम केलें नाहीं. हिंदुधर्म-आद्य श्रुतिप्रणित हिंदुधर्म लोकशाहीचा कट्टा पुरस्कर्ता. त्याचें निशाण जेथें गेलें तेथें स्वातंत्र्याचीं पिकें मनमुराद पिकलीं. हा इतिहासाचा पुरावा मनगटांत जोर असेल त्यानें खोटा पाडून दाखवावा. आर्य धर्माप्रमाणें इस्लाम धर्मसुद्धां गुलामगिरीचा द्वेष्टा आहे. पण क्रिस्ती धर्माचा ढंगच लई न्यारा !

कांहींहि असो, वर्तुळाचें टोंक आतां मूळबिंदूकडे आस्त आस्ते वळूं लागलें आहे. मोठमोठे तत्ववेत्तें आपल्या दूरदर्शी पांडित्याची भविष्याकडे रोंखलेली दुर्बीण भूतकाळाकडे वळवून, वर्तमान काळची पायाखालची माती टणक आहे कीं भुसकी आहे, हें पाहूं लागले आहेत. उत्क्रान्ति-चक्राचा वर्तुळाकार फेरा पुरा झाला कीं त्याबरोबरच क्रिस्ती धर्ममताचें वर्तुळ होणार, हें आतां लक्षावधि विचारी क्रिश्चनांस पटूं लागलें आहे. कित्येकांचा क्रिश्चॅनिटीवरचा उडालेला भाव क्रिस्ताच्या व्यक्तिमाहात्म्या भोवतीं घिरट्या घालीत आहे; तर कित्येक ज्ञानी क्रिस्ती गौतम बुद्धाच्या बौद्ध धर्माचे भोक्ते व चहाते बनत आहेत. मानवी विचाराची ही पलट उलटी वळलेली पाहून, उत्क्रान्ति देवता उलट्या पावलांची डाकिनी आहे कीं काय, असा कित्येकांना भ्रम पडेल. कांही सूत्रभोक्त्या व सूत्र प्रसवत्या तात्विकांना पूर्व ही पूर्वच राहते कीं उद्यां उजाडायच्या आधींच पश्चिम बनते, या धास्तीनें हींवतापहि भरेल. हा प्रकार अद्भुत नाहीं, वास्तवीक आहे. वर्तुळाचा हा फेरा पुरा होत आहे. पृथ्वीची ही प्रदक्षिणा आहे. पुढें पुढें जाताजातांच मूळपदावर येणारी ही उत्क्रान्ति-कथेंतील सनातन हरदाशी आहे.

क्रिस्ती धर्माचे भुसके लड्डु महायुद्धाच्या दणदणाटानें फुटले ही गोष्ट जितकी खरी, तितकीच महायुद्धापूर्वीहि त्याचा भुसकेपणा खुद्द क्रिश्चन मिशनऱ्यांच्या हाताला लागला होता, ही हि गोष्ट खरी. जुलै १९२२ च्या मॉडर्न रिव्यू मासिकांत सुप्रसिद्ध क्रिस्ती मिशनरी सी.एफ. ॲण्ड्र्यूज यांनीं आफ्रिकेंतील सत्याग्रहाच्या वेळचा आपला जुना पत्रव्यवहार क्रमश: प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे. आफ्रिकेंत शिरजोर झालेल्या गोऱ्या क्रिस्त्यांचा वर्णद्वेष प्रत्यक्ष पाहून ॲण्ड्र्यूज साहेबांच्या शुद्धांत:करणांत विचार क्रान्तीचें तुफान माजलें. या तुफानाचा भार हलका करण्यासाठीं त्यांनीं आपले हृद्गत विचार कविकोहीनूर रविंद्रनाथ टागोर यांना अनेक पत्रांतून कळविले होते. आफ्रिकेची सफर करण्यापूर्वी ॲन्ड्र्यूज साहेब कै. गोखल्यांना भेटले असतां, ते स्पष्ट म्हणाले कीं ''ॲन्ड्र्यूज साहेब, तुम्ही आफ्रिकेंत पाऊल ठेवतां क्षणींच तुमच्या क्रिश्चॅनिटीचें तीन तेरा वाजलेले तुम्हाला दिसतील.'' हा अनुभव ॲन्ड्र्यूज साहेबास तेव्हांच आला. क्रिस्ती म्हणविणाऱ्या येशु क्रिस्ताच्या गोऱ्यागोमट्या भक्तांनीं क्रिश्चॅनिटीचे केलेले बीभत्स धिंडवडे पाहून, कोणता शुद्ध भावनेचा क्रिस्ती क्षुब्ध होणार नाहीं? हृदयाची ही क्षुब्धता, मनाची ही तळमळ, विचारांची ही क्रान्ति ॲन्ड्र्यूज साहेबांनीं या पत्रांत स्पष्ट व्यक्त केली आहे. हीं पत्रें ते प्रथम म. गांधींना वाचून दाखवीत व मग कलकत्यास रविंद्रबाबूंकडे रवाना करीत. त्यावेळीं म. गांधींनीं 'हीं पत्रें तीन वर्षेपर्यंत कोठेंहि प्रसिद्ध करूं नका' अशी ॲण्ड्र्यूजना शपथ घातली होती. महात्मा ह्मणाले

''तुम्हाला आलेल्या अनुभवाच्या मुळाशीं जर सत्य असेल तर तें सत्य केव्हांहि प्रकट केलें तरी शिळें होणार नाहीं. सत्य हें सत्यच. त्याला प्रगट होण्याची घाई नसते. तुह्मी हिंदुस्थानांत परत जा, लिहिलेल्या विचारांचें शान्तिनिकेतनच्या शांतिपूर्ण आश्रमांत शांतपणें मनन करा, कांहीं सुधारण्यासारखें असेल तें सुधारा आणि मगे हीं पत्रें प्रसिद्ध करा. पण आतांच त्याची घाई नको. मी सांगतों तीन वर्षें स्वस्थ बसा.'' म. गांधींची ही मुदत केव्हांच संपली. आतां ॲन्ड्र्यूज तीं पत्रें प्रसिद्ध करीत आहेत. या पत्रांचा सारांश पुढच्या अंकीं वाचकांच्या सेवेला रुजू करूं. परंतु तत्पूर्वी ॲन्ड्र्यूज साहेबांच्या विचारक्रान्तीचा सारांश देतों. क्रिस्ती धर्म किती जडवादी, रुधिरप्रिय व वर्णद्वेष्टा बनला आहे, याचें वर्णन करून, ॲन्ड्र्यूज ह्मणतात कीं ''माझी बालंबाल खात्री पटली आहे कीं पाश्चिमात्य मनोवृत्तीला आतां हिंदमातेच्या पवित्र चरणाविना दुसरें तारणच उरलेलें नाहीं. युरोपच्या आंगांवर फदफदलेल्या असंतोषाच्या जखमा दिवसेंदिवस भारीच चिघळूं लागल्या आहेत. त्याची आर्थिक विजयावरची भिस्त बेशिस्त झाली आहे. आमची पाश्चिमात्य क्रिश्चॅनिटी इतकी घाणेरडी झाली आहे कीं तिला पुन्हा एकदां हिंदुस्थानच्या गंगेंत यथास्थित बुचकळून काढण्याचा बाप्तिस्मा दिल्या शिवाय तिला येशुक्रिस्ताच्या नांवाला साजेशोभेसा स्वच्छपणा खास येणार नाहीं.'' अखेर, येशुक्रिस्ताच्या महिम्याची अब्रू काशीची गंगा धुवून शुद्ध करणार आं !!

□□□

अग्रलेख

जगावें कीं मरावें? एवढाच प्रश्न उरला आहे

हिन्दु हिन्दुत्व आणि हिन्दुधर्म यांच्या श्रेष्ठतेच्या दिवाणखानी गप्पा कोणी कितीहि मारो, आज या तीनहि गोष्टींची मान सांपळ्यांत सांपडली आहे. यांच्या पुनरुज्जीवनाच्या आशेचा अंधुकसा उजेडही कोठें दिसत नाहीं. यांच्या जिवंतपणाची धुगधुगी कोठे भासत नाहीं. आणि सार्वराष्ट्रीय राजकारणाच्या अनुरोधानें या तीन स्थिती जिवंत राखण्याइतक्या सक्रीय प्रबोधनाचें चिन्ह कोठेंहि दृक्प्रत्ययास येत नाहीं. वाडवडिलांचे गुण गाऊन तोंडाचा वाचाळ पट्टा चालविणाऱ्या हिन्दु भगिनी बांधवांनो, आज तुमच्या पुढ्यांत वाढून आलेल्या तुमच्याच कृतकर्मांचा जहरी विपाक तुम्हाला दिसत आहे काय? बेशिस्त बेगुमानपणामुळें तुह्मी किती भयंकर कड्याच्या टोंकावर येऊन धडकला आहांत याची तुह्माला दाद आहे काय? एक पाऊल पुढें टाका कीं झालाच तुमचा कपाळमोक्ष. कंटाळा आला तुमच्या त्या हृदयहीन व्याख्यानांचा आणि मानभावी लेखनकुटिलतेचा. हिन्दु समाजाच्या व हिन्दु धर्मांच्या प्रत्यक्ष मानगुटीस बसलेल्या अनेक घोरपडींच्या पकड़ी सोडविण्याचें टाकून, परराष्ट्रांतल्या राजकारणाचीं खरकटीं भांडीं घासण्यांत तुम्हांला अझूनही चिळस उत्पन्न होऊं नये, हा दैवदुर्विपाकाचा व बेशरमपणाचा कडेलोट झाला! आयर्लंडांतील डी. व्हॅलेरा पंधरा दिवस कोठें दडून बसला तर तुह्मांला त्याच्या नांवानें सुतक धरून दिवसांतून दहा वेळ शंख करण्याचें अवसान येतें, पण नरड्याशीं भिडलेला अस्पृश्योद्धाराचा प्रश्न म. गांधीबरोबरच तुरुंगांत डांबून ठेवतांना मात्र तुह्मांला मुळींच दिक्कत वाटत नाहीं. 'तुर्की तहाच्या अटी' वर माथेफोड करणाऱ्या अकलेच्या हिन्दुकांद्यांनों खुद्द हिन्दुस्थानांतल्या हिन्दुस्थानांत हिन्दु धर्मावर होऊं पहाणाऱ्या इस्लामी कुरघोडीच्या टापांचा ध्वनि तुम्हांला ऐकूंच येत नाहीं काय? 'आंगोरा फंडाला मदत करा' ह्मणून लांबलांब जिभा बाहेर काढून, हिन्दु मुसलमान ऐक्याचीं पुराणें झोडणाऱ्या शहाण्या राष्ट्रीयांनो, तुम्ही मोपल्यांच्या बंडावरसुद्धां 'मर्द' पणाची बंडी चढवून, हिन्दु जनांची दिशाभूल करतां, तेव्हां तुह्मांला नांव तरी काय द्यावें? एकीकडे राष्ट्रैक्याचीं पुराणें झोडतां तर दुसरीकडे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचा अग्नि तुम्ही भडकवितां! रशियांतल्या दुष्काळग्रस्तांविषयीं चौपदरी गळा काढून रडतां, पण उपासमारीनें अन्नान्न झालेले लक्षावधि अस्पृश्य व अवनत बांधव भडाभड क्रिस्ती पारध्यांच्या जाळ्यांत आपण होऊन जात असतां, तेवढें मात्र तुमच्या डोळ्यांना दिसत नाहीं आं?

काय तुमच्या डोळ्यांच्या बाहुल्याच उलट्या झाल्या कीं तुमचीं अंत:करणेंच मेलेल्या बोकडाप्रमाणें थंडगार पडलीं? खरा प्रकार तरी काय आहे? इकडे धर्माच्या समानतेच्या पोटभर गप्पा मारतां, तर तिकडे कोल्हापूरच्या अंबाबाईची पूजा एका क्षत्रिय मराठ्यानें केली तेव्हां त्याचा सूड उगविण्यासाठीं इंग्रज अधिकाऱ्यांचे बूट चाटायला धांवतां आणि गोहत्तीच्या नामशूद्रांनीं देवालयांत जाण्याचा हट्ट धरला ह्मणून सरकारच्या मदतीनें त्यांना जेलखान्यांत दडपिण्याचें नीच कृत्य करतां! एकीकडे लोकसंग्रहाच्या गप्पा मारून लोकमान्यतेची टिमकी पिटतां आणि प्रत्यक्ष व्यवहारांत जातिभेदच नव्हे तर जातिद्वेषाचा खेळखंडोबा नाचवितां. स्वराज्याच्या गप्पांनीं अज्ञान व अंधश्रद्धाळु जनतेचे खिसे, सरकारी करांच्या करकरीपेक्षां अधिक बळजबरीनें, पिळून काढतां आणि त्यांवर फंडगुंडांना पोळांप्रमाणें खुशाल चरूं देतां. अशीं एक ना दोन शेंकडों पातकें करण्यास निर्ढावलेली तुमची मनोवृत्ति बेफाम झालेली पाहून, जगावें कीं मरावें? एवढाच प्रश्न सध्यां अल्पसंख्य विचारवंतांच्या हृदयांत खळबळत आहे.

हिन्दु राष्ट्रापुढें प्रामुख्यानें पडलेल्या या प्रश्नांत स्वराज्याचा प्रश्न गौण असून, अस्पृश्योद्धार आणि हिन्दूंचा लोकसंग्रह हेच भाग अत्यंत महत्वाचे आहेत. सद्य:स्थितींत आम्हाला स्वराज्याचें महत्व नाहीं. सद्य:स्थितींत येनकेन प्रकारेण मिळणारें स्वराज्य म्हणजे मूठभर मोठ्या माशांना बाकीच्या अनंत धाकट्या मासोळ्यांना बिगर परवाना गिळण्याचा सनदपट्टाच होय, हे प्रबोधनाच्या पहिल्याच अंकांत काढलेले उद्गार बदलण्याइतकें भरीव कारण अझून कांहींएक घडून आलेलें नाहीं, हें लक्षांत असावें. हिन्दु समाज आज सर्व बाजूंनीं अनंत भेदांच्या वाळवीनीं पोंखरून पोंखरून नुसता नामधारी खोका बनलेला आहे. त्यांच्यात संघशक्ति तर नाहींच नाहीं, पण उरल्या सुरल्या समुदायाला लागलेली ओहटी थांबविण्याची अक्कलहि त्यांत नाहीं. पाश्चात्यांच्या वसाहत-प्रवृत्तीच्या रामगाड्याच्या वाटेवर हिन्दुसमाज म्हणजे एक निकामी प्रेताचें धूड होऊन पडल्यासारखा दिसतो. त्याच्यांत जीव असा कांहींच न उरल्यामुळें, कट्टे लोकसंग्रही इस्लाम व क्रिस्ती आज त्याच्या देहाचे चहूंकडून लचकेच्या लचके तोडीत आहेत. या लचक्यांच्या हिसकाहिसकीमुळें हिंदु समाजांत जी थोडी बहुत हालचाल आहेशी वाटते, ती वास्तवीक जिवंतपणाची हालचाल नसून कुतरतोडीच्या ओढाओढीचा धडपडाट होय. प्रत्यक्ष समाजाच्या देहांत जी कांहीं चेतना असल्याचा भास होतो, ती आत्म्याची चेतना नसून, प्रेतवत् पडलेल्या निष्क्रीय देहांत बेसुमार वावरणाऱ्या धर्ममार्तंडादि जंतुकिड्यांचा किळसवाणा बुंजबुजाट होय. या जंतुकिड्यांचा वळवळाट प्रेताच्या पुनरुज्जीवनसाठीं मुळींच नसतो; फक्त आपलें पोट यथास्थित कसें जळेल, एवढ्याच विवंचनेवर त्यांच्या सर्व हालचाली चालूं असतात. आजच्या हिन्दुसमाजाचें खरेंखुरें चित्र काढायचेंच असलें तर तें असें काढतां येईल. एक मोठा थोरला हाडांचा सांपळा अस्ताव्यस्त पडला आहे. त्याचें मांस ठिकठिकाणीं हाडांच्या आधारानें कसेंबसें चिकटून आहे. सर्वांगावर जातिभेदांचीं पिकलेलीं गळवें असून त्यांतून जातिद्वेषादि भिकार द्वैताची लस पूं व रक्त थबथब गळत आहेत. पोटांतील आंतडीं कुजून प्राणवायूच्या अभावानें सुकी रांठ बनलीं आहेत. हृदयांतच अस्पृश्यतेचें भयंकर करट माजल्यामुळें, त्याची क्रिया केव्हां कटकन् बंद पडेल याचा नेम नाहीं. लिवरला (काळजाला) मुर्दांड भिक्षुकशाही जळवा झोंबल्यामुळें, त्यांच्या दंशांमुळें न्युमोनिया दिवसेंदिवस बळावत आहे. मस्तकांत पौराणिक पापपुण्यांच्या कल्पनांचें भले मोठें छिद्र पडल्यामुळें, मेंदूंत यमपुरींतील बाहुल्यांचा थैथयाट सुरूं आहे. डोळ्यांच्या भगदाडांत वेदोक्त पुराणोक्ताच्या ऊर्फ

ब्राह्मणांच्या जन्मप्राप्त श्रेष्ठतेच्या व ब्राह्मणेतरांच्या जन्मप्राप्त नीचतेच्या भरींव शिसवी खुंट्या जाम ठोकून बसविल्या आहेत. कित्येक तर थेट त्याच्या छातीवर बसून पोटांतील आंतड्यांचा फन्ना उडवीत आहेत. एकीकडे भटांभिक्षुकांना घेऊन डागदार कुर्तकोटी चौपदरी भोकाडा पसरून रडत आहेत. तिकडे डागदार मुंज्यांच्या आंगांत फंडगुंडी मुंजोबा अवतरून, औषधोपचारासाठीं वाग्भटाच्या ऐवजीं देवलभटाच्या स्मृतीचा काढा देऊं, कीं ठणठणीत पन्नास हजार रुपयेच कोळून पाजूं, म्हणून नाकपुरापासून पुण्यपुरापर्यंत धांवपळ करीत आहेत. तों राष्ट्रीय वैदु म्हणतात कीं 'अशानें काय होणार? हा महारोग पेटंट स्वराज्य टॉनिक दिल्याशिवाय साध्य होणार नाहीं. पण तें मिळतें विलायतेला!' यावर बिलबिलीत हाडांचे लिबरल म्हणतात कीं 'अहो, प्रथम निदान हीं गळवें व जखमा तर बुझवा, नुसतें टॉनिक देऊन काय होणार? कोठ्याच फुटला आहे, तेथें अमृत आणलें म्हणून काय होणार? आणि अशा स्थितींत कोणचा शहाणा डॉक्टर तुम्हाला स्वराज्य देणार!' सारांश, नुसती तोंडाची वटवट सुरू असून हातांनीं प्रत्यक्ष कार्य असें कोणीच कांहीं करीत नाहीं. दोषांवर पांघरूण घालून, शालजोडीच्या जरतारी कांठावर किंवा चक्रीदार पगडीच्या झोकानोकावर, हिन्दु धर्माच्या मोठेपणाचीं सुकीं ओली चिपाडें चघळण्यांतच आनंद मानणाऱ्यांना, हिंदु समाजाचें वर रेंखाटलेलें चित्र रुचणार नाहीं, हें आम्ही जाणून आहों; तथापि, आत्मवंचनेचा पडदा दूर सारून कोणी नीट पाहील, तर त्याला आमचें चित्र अतिशयोक्तीचें खास भासणार नाहीं.

महात्मा गांधी (त्यांच्या चरणांला आमचे साष्टांग प्रणिपात असो) यांनीं अत्यंत बिनचूक निदान करून, राष्ट्राच्या अध:पाताचें मर्म अस्पृश्य-वर्गनिर्मितींत स्पष्ट सिद्ध करून दाखविलें. अस्पृश्योद्धार हाच राष्ट्रोद्धार या एका सूत्रांत ब्रह्मांड भरलें आहे; पण लक्षांत घेतो कोण? अस्पृश्योद्धाराच्या प्रश्नाचा विचार करूं इच्छिणारांनीं प्रो. श्रीपाद महादेव भाटे एम. ए. या सज्जन विद्वानानें नुकतेंच प्रसिद्ध केलेलें अस्पृश्य-विचार हें पुस्तक अवश्य वाचावें, अशी हात जोडून प्रार्थना व कळकळीची शिफारस आहे. म. गांधीं जोंपर्यंत मुक्त होते तोंपर्यंत अस्पृश्योद्धाराच्या वलना करणाऱ्या दांभिकांचा सुळसुळाट बराच दिसत होता. पण ते तुरुंगांत बद्ध होतांच तो मामला त्यांच्या बरोबरच तुरुंगांत पडला. कोटी फंड जमविले, लाखों रुपयें फंडगुंडाच्या पोटांत पेटले, अल्लाहो अकबरच्या आरोळ्या मारल्या, सर्व कांहीं दाखवायच्या दांतांना करतां येण्याजोगें तेवढें केलें; पण अखेर काय? शर्यतीचा घोडा ठिकच्या ठिकाणीं !

आतां असें प्रसिद्ध झालें आहे कीं हिन्दु लोक अस्पृश्योद्धार करूं शकत नाहींत म्हणून व अस्पृश्योद्धाराचें कलम राष्ट्रीय सभेच्या उद्देशांत अगदीं वरच्या पायरीवर म. गांधीनीं ठेवलें म्हणून, आमचे इस्लाम भाई तो प्रश्न हातीं घेऊन सोडविणार आहेत. शेंकडों हिंदूंचीं अल्लड पोरें अल्लाहो अकबरच्या आरोळ्या गल्लोगल्लीं मारण्यासाठीं केंकटत फिरविणाऱ्या शहाण्या हिन्दूंनो, शौकतल्ली महमदल्लीच्या नांवाचा कंठशोष करून हिन्दु मुसलमानांच्या ऐक्याचे नाटकी जलसे रस्तोरस्तीं नाचविणाऱ्या लोकमान्य टारगटांनो, आणि भिक्षुकशाही धर्माच्या मढ्याला लोणी चोंपडीत बसणाऱ्या दांभिक धर्ममार्तंडांनो, मुसलमान लोक हिन्दु-अस्पृश्यांचा उद्धार कां करणार, यांतलें मर्म किंवा वर्म ध्यानीं येण्याइतका तुमचा मेंदु ठिकाणावर आहे काय? आजला हिन्दुस्थानांत जी सहा सात कोटी मुसलमानांची लोकसंख्या आहे ती तुमच्याच हिन्दु संघांतील भिक्षुकशाही जुलमाला कंटाळून गेलेल्या अस्पृश्यांच्या इस्लामी

उद्धाराचा परिणाम नव्हे काय? विचार करा, नीट विचार करा, जरा अधिक डोकें खाजवून विचार करा. हृदयाच्या दुटप्पेगिरीचा पडदा टरटरा फाडून खऱ्या हिन्दु भावनेनें, खऱ्या लोकसंग्रही बुद्धीनें व अस्सल राष्ट्रहितदृष्टीनें या नवीन मुकाबल्याचा विचार करा. इस्लाम धर्मबंधु आणि ते हिन्दुधर्मीय अस्पृश्यांचा उद्धार करणार? वाहवा! छान सोय !! मग काय, चोरांच्या हातीं जामदारखानाच्या किल्ल्या देण्यासारखाच हा प्रकार नव्हे तर काय? अस्पृश्यांचा उद्धार करायला मुसलमानच कशाला? क्रिस्ती टोपलें कांहीं मेले नाहींत. जिवंत आहेत. चांगले डोळ्यांत तेल घालून बसले आहेत. नव्हे, हिन्दूंच्या बेदरकार ऐदीपणाचा फायदा घेऊन दरसाल दीडलाख अस्पृश्यांचा ते उद्धार करीतच आहेत. त्यांच्या उद्धाराचा विधि फार सोपा. मुसलमान झाले काय किंवा क्रिस्ती असले काय, त्यांना एक हजार अस्पृश्य हिन्दूंचा उद्धार करायला एक बालदीभर पाणी बस्स होतें आणि त्या पाण्याच्या चुटपुटत्या शिंतोड्यानें पावन झालेला - पिऱ्याम्हाराचा पेद्रु दुमिंग बनलेला-मनुष्य हिन्दूंच्या शंकराचार्यांना सुद्धां स्पृश्य दर्शनीय व भाषणीय असा मान्य होतो. मग उद्यां मुसलमान भाईनीं म. गांधींच्या आज्ञेचे व राष्ट्रीय सभेच्या फर्मानाचे डोले नाचवून, अनेक कोंडनाक कुतुबुद्दीन बनविले, किंवा हजारों रायनाक रणद्दुल्लाखान केले, किंवा आणखी एक पायरी पुढें जाऊन चिंतोपंत वैद्यांच्या निसर्गदत्त टक्कलाचा किंवा डागदार कुर्तकोटींच्या आयत्याच तयार झालेल्या मुंडित शीर्षाचा फायदा घेऊन त्यांना अनुक्रमें टिपटखान व कर्तबअल्ली बनविलें, तर ते डबल स्पृश्य ट्रिबल दर्शनीय व फोरफोल्ड भाषणीय ठरणार नाहींत, असें थोडेंच आहे? डागदार मुंज्यांना तर कांहींच अडचण पडणार नाहीं. त्यांची दाढी आहेच. पंजाबी शिखांच्या कुकरीप्रमाणें संजाबांत त्याची शेंडीची गुप्तगंगा आहे कीं नाहीं संजाब जाणें. परंतु देवलस्मृतीचीं सालपटें काढतां काढतां, अस्पृश्योद्धारक इस्लामांचा बडगा त्यांच्या पाठींत बसून, मुंज्यांचे मुजफरखान बनवायला अल्लाहो अकबराला कांहीं कठीण नाहीं. अशा रीतीनें राष्ट्रीय सभेच्या इस्लामी अनन्य भक्तांनीं म. गांधींचीं पवित्र आज्ञा ह्मणून हिन्दु अस्पृश्यांचा उद्धार करतां करतां, वाढत्या संघशक्तीच्या जोरावर स्पृश्य हिन्दूंनाहि जीर्णोद्धाराचें इस्लामी रेचक देण्याइतका मनाचा उदारपणा विराट स्वरूपाप्रमाणें आक्राळविक्राळ वाढविला, तर इतिहासाच्या पुनरावृत्तीच्या या महापर्वणींत नरमुतात्या नसरुद्दिन, बापटशास्त्री बिस्मिल्लाखान, खाडीलकर खटमल शहा, गंगाधरराव देशपांडे दसपिंडखा व्हायला सिद्ध होतील काय? झालेच पाहिजेत. इस्लामी इंगा जबरदस्त होऊन एकदां का आपला पिंगा घालूं लागला कीं नरसोपंतांची दुटप्पी व्याख्यानें, बापटशास्त्र्यांचा वेदान्त, गंगाधररावांची समेट पुराणें, आणि खाडीलकरांची निषेधाची बोकडी घडक पार कुठच्या कुठें दडून बसेल आणि 'लाय लैलाय्ल लाय' च्या इस्लामी लयकारांत या महाधूर्तांचा आमूलाग्र लय होऊन, त्यांना चांदताऱ्यापुढें नमाज पडतां पडतां 'या अल्ला' ह्मणण्याचा प्रसंग टाळतां येणें दुरापास्त होईल !

मलबारच्या हिन्दुजनांचा प्राणान्तिक घात करणाऱ्या मोपल्यांच्या बण्डाबद्दल आजपर्यंत एकाहि राष्ट्रीय पत्रानें त्वेषाचा सुस्कारा काढलेला नाहीं, ही गोष्ट वाचकांनीं विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. मलबारच्या हिन्दु भगिनी बांधवांसाठीं यांच्या काळजाला लवमात्र कंप सुटत नाहीं. साधा पतितपरावर्तनाचा प्रश्नहि या मुर्दाडांना फंडाच्या हंड्याशिवाय सुटत नाहीं. मुसलमानी बंडखोरांनीं केलेल्या हिन्दु भगिनींच्या बीभत्स धिंडवड्यांबद्दल या वावदुकांनीं कधिं नुसता शाब्दिक निषेध व्यक्त केला नाहीं. अंबाबाईच्या देवळांत मराठा घुसल्याबरोबर सिमल्यापर्यंत बोंब मारण्यासाठीं लांबलांब

होणाऱ्या या स्वराज्य-पंडितांच्या फटकळ जिभल्या, मोपल्यांचा व त्यांना चिथावून देणाऱ्या मुसलमानांचा शाब्दिक निषेध करतांना फाटक्या वहाणांच्या कुझक्या तळवटप्रमाणें ताठर कशा बनल्या? नागपूरच्या हितवाद पत्राचे संपादक श्री. नटेश आप्पाजी द्रवीड नुकतेच मलबारची पहाणी करून परत आले. त्यांनीं हिन्दु मिशनरी सोसायटीच्या नागपूर शाखेमार्फत भरलेल्या जाहीर सभेंत मोपला बंडाच्या कारणांची मीमांसा करतांना (१) खिलापतवाल्यांची चिडखोर व मार्थी भडकविणारीं शिकवणूक व (२) ब्रिटीश राज्य आतां भुसभुशीत झालें आहे, त्याच्या जागीं खिलाफतराज्य आणून स्थापन करावयाचें आहे, अशा गप्पा मलबाराबाहेरच्या इस्लामी चळवळ्यांनीं तेथें जाऊन मोपल्यांच्या डोक्यांत भिनविल्या, अशीं मुख्य दोन कारणें स्पष्ट जाहीर केलीं. यांत आम्हाला कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. इस्लामी मिशनऱ्यांनीं खुद्द इंग्लंड फ्रान्स येथेंहि आपला संघवृद्धीचा वाटेगिरीचा मिशनरी धंदा सध्यां जोरांत चालूं ठेविलेला आहे व अनेक मोठमोठ्या इंग्रज फ्रेंचांना अल्लाच्या मशिदींत खेचण्याचा उपक्रम सुरू केला आहे. मुंबई क्रॉनिकलचे संपादक मार्मड्यूक पिक्थॉल हें याच मिशनरी धामधुमींतलें अल्लाचें पिल्लूं आहे. मुसलमान लोक सांपडेल त्याला मुसलमानी धर्माची दीक्षा देऊन आपला संघ वाढवीत आहेत आणि डागदार मुंजे कुर्तकोटींच्या हातावर पन्नास हजार रुपयांचा फंडगुंडी हंड्याचा डाग दिल्याशिवाय त्यांना पतितपरावर्तनाचें एक पाऊलहिं पुढें टाकतां येत नाहीं. इस्लामी मिशनऱ्यांचा व्याप जर तिकडे बेसुमार वाढला तर इकडच्या हिन्दूंवर प्राणांतिक संकटांची मलबार-परंपरा हां हां ह्मणतां ओढवल्याशिवाय राहणार नाहीं, हें अल्लाहो अकबरच्या किंकाळ्या मारणाऱ्या 'टारगट' हिन्दूंनीं पूर्ण लक्षांत ठेवावें. इस्लामाची कडवी झोप हिंदुस्थानकडे पुन्हां वळत आहे, याकडे सर्व हिन्दूंचें लक्ष वेधणें आमचें कर्तव्य आहे. या झांपेची छाप युरपवर कशी बसत आहे, हें पाहूं इच्छिणारांनीं इस्लाम रिव्यू मासिकाचे अंक Ishaat-I-Islam, Office, Azeez Manzil, Naulakh Post office, Lahore, या पत्यावर मागवून मननपूर्वक वाचावे. मुसलमानांच्या एकीची आम्हाला जरूर आहे, पण ती फक्त राजकीय क्षेत्रांत. इतर क्षेत्रांतहि एखाद्या शौकतल्लीला देव्हाऱ्यांतला बापदेव बनवूं पहाणाऱ्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं वेळ आली म्हणजे एकराष्ट्रीयत्वाच्या पुराणांवर इस्लामी समानधर्मत्वाचें घोडें मात केल्याशिवाय राहणार नाहीं. अर्थात् हिन्दु हिन्दुत्व आणि हिन्दुधर्म या त्रयीला जिवंत राखूं इच्छिणारांनीं जगावें कीं मरावें या प्रश्नाचा आतां काळजीपूर्वक विचार करणें प्राप्त आहें.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

नव्या मनूंतील मराठा

मराठा म्हटलां कीं तो येथून तेथून एकजात 'नांगऱ्या' अशी एक खोडसाळ समजूत महाराष्ट्रांत अझूनंहि प्रचलीत असलेलीं आढळण्यांत येते. विशेषत: खुद्द कै. टिळकांनींच क्षत्रिय मराठ्यांना 'नांगऱ्या' ही पदवी देण्याइतकें मोठे पोट केल्यामुळे मराठ्यांच्या वर्तमान 'जागृति' विरुद्ध ब्र काढण्याची जरी टिळकानुयायांची छाती नाहीं. तरी आधुनिक संस्कृतीनें सज्ज झालेल्या 'नव्या मनूंतील मराठ्यां'ची चैतन्यपूर्ण धडाडी पाहून त्यांच्या पोटांत कालवाकालव नित्य सुरू असते. 'नव्या मनूंतील मराठा' हा श्रीयुत भगवंतराव बळवंत पाळेकर यांच्या कसलेल्या लेखणीनें संपादन होत असलेल्या बडोद्याच्या जागृति साप्ताहिकांतल्या निवडक निबंधांचा उत्कृष्ट संग्रह आहे. या ४५ निबंधांचें स्वरूप व्यापक असून, त्यांतले विचारहि उदार व्यापक व सर्वस्पर्शी आहेत. श्री. पाळेकर यांची लेखनशैली सोपी, सुबोध व ठसठशीत असून, त्यांचे विचार हृदयाच्या कळकळीनें ठिकठिकाणीं प्रफुल्लित झालेले आढळतात. या निबंधमालेंत हीन दीन शेतकऱ्याच्या चंद्रमौळीं झोंपडीपासून तों दिल्लीच्या वरिष्ट कौन्सिलाच्या इंद्रवैभवतुल्य दिवाण-इ-खास पर्यंत सर्व विषयांवरील चिकित्सक विचारांची अभेदभावानें परंतु सडेतोड निस्पृहतेनें ठाकठीक बडदास्त ठेवलेली आहे. कांही निबंध विचारसौष्ठवाबरोबरच बाह्यसौंदर्यानें वाचकांची चित्तवृत्ति संतुष्ट करतात. अस्पृश्यता, कामगार वर्ग, शेतकरी, पतपेढ्या इ. विषयावरील श्री. पाळेकर यांचे विधायक विचार त्या त्या क्षेत्रांतल्या बंधु भगिनींनीं अवश्य वाचावे, अशीं शिफारस आहे. सारांश, 'नव्या मनूंतला मराठा' हा ग्रंथ आब्राह्मण चाण्डाळांना जागृतीचा कांहींतरी नवीन संदेश दिल्याशिवाय खास राहणार नाहीं, असें आम्हाला वाटतें. प्रत्येक महत्वाकांक्षी तरुणानें याचें अध्ययन करावें. प्रस्तावनेंत 'शारदाश्रमवासी' म्हणतात ''सध्यां महाराष्ट्राच्या वांट्यालां खर्डेघाशी व मोलमजुरी हे दोनच धंदे मुख्यत: आलेले आहेत, महाराष्ट्रीयांचा वाचाळपणा वाढत असला तरी त्यांची चोहों बाजूंनीं सारखी पिच्छेहाट होत आहे., या गोष्टीची जाणीव जितक्या त्वरेनें होईल तितकी होणें अवश्य आहे.'' बरोबर ही जाणीव उत्पन्न करण्याइतका हा 'नव्या मनूंतला मराठा' प्रबोधक आहे खास. मात्र जिज्ञासूंनीं दोन रुपयाची मनिऑर्डर पाठवून जागृति कचेरी, रावपुरा, बडोदें येथून ग्रंथ मागवून नीट वाचला पाहिजे.

□□□

निवेदन

आश्रयदात्यांशीं हितगुजाचे बोल

गेल्या पंधरवड्यांत शेंकडो आश्रयदात्यांनी दुसऱ्या वर्षाच्या आश्रयाबदल आश्वासन-पत्रे पाठवून, प्रबोधनावरील आपले प्रेम व्यक्त केले, याबद्दल त्या सज्जनांच्या चरणांना प्रबोधन कृतज्ञ भावनेनें वंदन करीत आहे. आमचे अनेक प्रेमळ आश्रदाते पत्राद्वारें आशीर्वाद पाठवितात. त्या सर्वांना आम्ही एवढेंच सविनय कळवितों कीं प्रत्येकाला व्यक्तीशः कृतज्ञेचीं उत्तरे पाठविणे जरी शक्य नाही, तरी त्यांच्या आशीर्वादाचें कवच घालून द्वितीय वर्षाची कामगिरी अधिक उमेदीनें व धडाडीनें पार पाडण्याची प्रबोधन एकसारखी तयारी करत आहे. सज्जनांच्या आशीर्वादाचा ओघ जसजसा बळावत आहे, तसतशी प्रबोधनाच्या कर्तव्याची स्फूर्तीहि बळावत आहे. कित्येक आश्रयदात्यांनी आमच्या मागणीची किंवा सूचनेची वाट न पाहातां, भडाभड दुसऱ्या वर्षाच्या वर्गण्याहि पाठवून दिल्या आहेत. त्यांचा प्रबोधन ऋणी आहे. परंतु याबाबतींत विनंति करणें प्राप्त आहे. आमच्याकडून मागणी गेल्याशिवाय प्रबोधनाच्या आश्रयदात्यांनी दुसऱ्या वर्षाची वर्गणी आतांच पाठवूं नये. पहिलें वर्ष १ऑक्टोबर १९२२ ला पुरें झालें. योग्य वेळी प्रबोधन विनंति करीलच. आलेल्या आगाऊ वर्गण्या नवीन रजिष्टरांत त्या त्या ग्राहकांच्या नांवे बिनचूक जमा केल्या आहेत.

गेल्या महिन्यात बऱ्याच नवीन आश्रयदात्यांनी प्रबोधनावर आपल्या कृपेची पाखर घातली आहे. या सर्वांना आमचे वंदन असो. या कामीं आमच्या ज्या सहृदय व रसिक बांधवांनी प्रयत्न केले व करत आहेत, त्यांचे आम्ही आभारी आहों. बऱ्याच वर्गणीदारांना प्रबोधन अंक १, २ व ३ मिळालेले नाहींत. त्या बद्दल त्यांना श्री. वसंतविहार कृत पोवाड्यांची एकेक प्रत नजर पाठविली आहेच. आता तर एक ते ६ अंकांच्या प्रति अगदींच खलास झाल्या. तेव्हां नवीन होणाऱ्या वर्गणीदारांना अंक १३ पासूनचे सर्व चालू अंक रु.१-८-० च्या व्हीपीनें पाठविण्याची सुरुवात केली आहे. ग्राहकांना न मिळालेले अंक (१ ते ३) पुढील वर्षी छापल्यावर मोफत पाठविण्याचा संकल्प आहे. याबद्दल सूचना योग्य वेळीं प्रबोधन जाहीर करील.

सर्व आश्रयदात्यांनीं दुसऱ्या वर्षाच्या आश्रयाबद्दल आपापलीं आश्वासनांची पत्रें त्वरीत पाठविण्याची कृपा करावी. ज्यांचें पत्र येणार नाहीं त्यांचें नाव दुसऱ्या वर्षाच्या नोंदबुकांत घालण्याचें धारीष्ट आम्ही

होऊन करणार नाहीं. हा प्रेमाचा व रसिकतेचा प्रश्न आहे, त्यात बळजबरी कशाला? आम्ही लिहिलेल्या ग्रंथांची मागणी बऱ्याच आश्रयदात्यांकडून अलीकडे होत असते. हल्ली भिक्षुकशाहीचें बण्ड किं. दोन रुपये (प्रबोधनाच्या वर्गणीदारांस सवलत व्हीपीनें रु.१-६-०) हेंच पुस्तक विक्रीस शिल्लक आहे. (१) कोदण्डाचा टणत्कार (२) कुमारिकांचे शाप (३) ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास (४०) हिन्दु धर्माचें दिव्य, हीं पुस्तकें मुळींच शिल्लक नाहींत. कुमारिकांचे शाप पुस्तकांच्या कांही थोड्या प्रति वाङ्मय विहार मंडळ, पुणें शहर यांजकडे मिळतील. ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास याच्या अवघ्या पांच प्रति आमच्याकडे शिल्लक आहेत. प्रत्येक प्रतीची किमंत तीन रुपये पडेल. कदाचित् विजयी मराठा कचेरी शुक्रवार पेठ, पुणें शहर यांच्याकडे काही प्रति शिल्लक असतील. आमच्या सर्व ग्रंथांची द्वितीयावृत्ति कधिं निघेल ते आज सांगतां येत नाहीं. शंभर वर्षांपूर्वीचें महाराष्ट्र अथवा हिन्दवी स्वराज्याच्या खुनाचा इतिहास याची जाहिरात नीट न वाचतां कित्येकांनी भराभर 'पुस्तक ताबडतोब व्हीपीनें पाठवा' म्हणून पत्रांचा नुसता वर्षाव चालविला आहे. हा ग्रंथ ऑक्टोबरच्या अखेर अखेर तयार होईल अशी उमेद आहे. पत्रे पाठविणारांची नावें काळजीपूर्वक नोंदवून ठेविलीं आहेत. या ग्रंथाबद्दल प्रबोधनाच्या प्रत्येक अंकांत कांहीं जाहीर सूचना आली आहे कीं काय तें पहात असावें. विशेषतः आजच्या अंकांतील मराठ्यांचा इतिहास फांसावर चढला हा लेख सर्वांनी अगत्य वाचावा. श्री. भावे यांच्या पापाचें माप पदरांत घालणें आम्हांस आतां भागच आहे. अर्थात् आमच्या नवीन पुस्तकाची लांबी रुंदी वाढल्यास ग्रंथ-प्रसिद्धीची मुदतहि कदाचित् थोडी वाढणें शक्य आहे.

प्रबोधन कचेरी.
मिरांडाची चाळ, दादर.

नम्र सेवक,
केशव सीताराम ठाकरे

लेख

मराठ्यांचा इतिहास फांसावर चढला

स्वराज्याच्या, राष्ट्रप्रेमाच्या व स्वातंत्र्याच्या पुराणांना हल्लीं कितीहि कढ आलेला असला आणि त्या कढांत बऱ्याचशा विवेकभ्रष्ट ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांच्या आदरयुक्त प्रेमाचा कढ जरी आटोकाट येत असला, तरी ब्राह्मणेतरांवर आपली कुरघोडी सनातन चिरंजीव करण्याच्या धडपडी ब्राह्मणांनीं, विशेषत: राष्ट्रीय चित्पावनांनीं चालूं क्षणापर्यंत अव्याहत चालविलेल्या आहेत. या त्यांच्या खटपटी कुशाग्र विद्वत्तेच्या पांघरुणाखालीं वाटेल तसल्या कारस्थानांची अंडीं उबवीत् असतात. राष्ट्रीय चित्पवनांचे डांवपेच आतां पुष्कळ चित्पावनेतरांच्या व अनेक विवेकी चित्पावनांच्या ध्यानांत आल्यामुळें, ते सहसा यांच्या तोंडून कोंसळणाऱ्या अद्वैत गटारगंगेच्या लोंढ्यापासून बरेच दूर असतात, हें जरी खरें आहे, तरी त्या गंगेच्या पचनीं पडून राष्ट्रीय चित्पावनांच्या पायांतल्या पायतणाचा मान मिळविण्यासाठीं धाधावलेले शेंकडों शिखंडी आज ब्राह्मणेतरांत सांपडणें अशक्य नाहीं. एकट्या चित्पावनांबद्दल किंवा सर्रास ब्राह्मणांबद्दल जरा कोठें कोणी निषेधाचा ब्र काढला कीं ही अजागळ शिखंडीची जंबुकसेना लगेच कोल्हेकुई करावयास लागते कीं 'हा शुद्ध जातिद्वेष!' पण या विवेकशून्य महामूर्खांना अझून हें उमजत नाहीं कीं ब्राह्मण-ब्राह्मणेरांतील कोणताहि तंटा घेतला तरी त्यांत पहिली आगळीक राष्ट्रीय चित्पावनांचीच असते. त्यांनीं 'अरे' म्हणतांच 'कारे' चा प्रतिध्वनि न काढण्याइतके ब्राह्मणेतर आजच कांहीं षंढ झाले नाहींत. ऑफेन्सिवचें पातक राष्ट्रीय चित्पावनांनीं केल्याशिवाय ब्राह्मणेतरांनीं डिफेन्सिवची सणसणीत खेटरें त्यांना कधींहि हाणलेलीं नाहींत, हें आम्ही सप्रमाण पुराव्यानें वाटेल तसें सिद्ध करून द्यायला तयार आहोंत. चार पांच वर्षांपूर्वीचा कायस्थ प्रभू विरुद्ध भारत इतिहास संशोधक मंडळ हा वाद घ्या, किंवा सध्यां सुरू असलेला चित्पावन बोडस विरुद्ध भंडारी समाज वाद घ्या; यांत पहिली आगळीक कोणाची? हें चित्पावनांच्या पायांतले पायपोस बनलेल्या व घरांत चुलीपाशीं बसून अभेदभावाच्या कहाण्या कुजबुजणाऱ्या नामर्द षंढांनीं कां विचारांत घेऊं नये? भा. इ. सं. मंडळानें राजवाड्यांच्या हस्तें कायस्थ प्रभूंना 'नीच बीजाचे, उलट्या काळजाचे, मराठी साम्राज्याला आग लावणारे' वगैरे ठरविण्याचा पद्धतशीर दस्तऐवजी हलकटपणा केला नसता, तर आह्मालाहि कडकडीत टीकेचा तडाखा मंडळाला भडकविण्याची काय जरूर होती? परंतु आमच्या कोदण्डाचा टणत्कार

होतांच, 'एकानें गाय मारली ह्मणून दुसऱ्यानें वांसरूं कशाला मारावें?' असा आह्मांला साळसूदपणाचा उपदेश करायला पुष्कळ 'नीच बीजाचे, उलट्या काळजाचे, साम्राज्यद्रोही' कायस्थ शिखंडी पुढें आले होते. याच हरामखोरांच्या पगडीशिलेदारपणामुळें मंडळाला अखेरचा पट्ट्याचा हात दाखविण्याचें कार्य ठार झालें आणि कायस्थांच्या 'साम्राज्यद्रोहा'चा पुणेरी चित्पावन ताम्रपट आचंद्रार्क त्यांच्या उरावर थै थै नाचायला जिवंत राहिला. सध्या चित्पावन बोडसानें पेटवून दिलेलें भंडाऱ्यांच्या अस्पृश्यत्वाचें कारस्थान पाहिलें तरी त्यांतहि आगळीक किंवा ऑफेन्सिवचा दोष चित्पावनांकडेच आहे, हें सर्वांनीं नीट लक्षांत ठेवावें. हें प्रकरण एवढें भयंकर माजलें असतांहि राष्ट्रीय पत्रांत त्याचा नुसता नामनिर्देशहि होत नाहीं, याचा ब्राह्मणेरांतील चित्पावनी पायतणांवर कांहींच का उजेड पडूं नये? आमची भंडारी समाजाला आग्रहाची विनंति आहे कीं तुमच्यांतील शालशिष्ट पायतणांची पर्वा न करितां बोडसाला कायद्याचें पाणी दाखविल्याशिवाय सोडूं नका. बाकी, तसें झालें तरी अखेर बोडसाचेंच नांक वर राहणार? कारण यदाकदाचित् या महामहोपाध्यायपुत्राला तुरुंगाच्या पंढरीची वारी करायला लागलीच तर त्याला 'राष्ट्रदेव' मानून पालखी प्रस्तावनेच्या वराती काढायला हे राष्ट्रीय चित्पावन मुळींच कमी करणार नाहींत.

एका तत्ववेत्त्यानें काठेसें लिहिल्याचें स्मरतें कीं ''You kill the history and you kill the man'' इतिहास ठार केला की माणूस मेलाच ! इतिहास हें राष्ट्राचें जीवन आहे. समाजाचा प्राण आहे. हा प्राणच ठेंचला कीं काम झालें. यासाठीच जेते लोक प्रथम जित लोकांच्या इतिहासाचा बालेकिल्ला जमीनदोस्त करतात. ब्राह्मणेतरांना कवडी मोल ठरविण्याची राष्ट्रीय कामगिरी प्रथम भारत इ. सं. मंडळानें आपल्या हातीं घेण्याचा उपक्रम केला. पण त्या कामीं त्यांना हातपाय पोळून घेण्याचा अनवस्था प्रसाद लाभल्यामुळें, त्यांनीं सध्यां तरी या दिग्विजय संपादनाच्या मार्गाचा संन्यास केलेला दिसतो. संन्याशाला शेंडी फुटणार नाहीं असें नाहीं ! सामुदायिक प्रयत्नाला परशुराम यथास्थित न फळल्यामुळें, आतां राष्ट्रीय चित्पावनांनीं व्यक्तिश: तुरळकं हल्ले चढवून ब्राह्मणेतरांच्या इतिहासाचा मुर्दा पाडण्याच्या खटपटी चालूं ठेविल्या आहेत. या कामीं पुण्याच्या पुण्याईचे मुंबईकर, धुळेकर, मिरजकर व ठोकर अभिमानी रात्रंदिवस राष्ट्रीय खस्ता खात आहेत. अस्पृश्योद्धाराच्या वलगना चालल्या असतांना, भंडारी बांधवांना धेडा मांगांच्या पंक्तीला बसविण्याचा बोडसाचा प्रयत्न आणि आतां ठाण्याच्या तळेपाळीवर विद्वत्तेच्या खांबाला 'मराठी दप्तरा'च्या दुसऱ्या रुमालाच्या सरगांठींत मराठ्यांच्या इतिहासाला फांसावर चढविण्याची श्री. विनायक लक्ष्मण भावे यांची कामगिरी, याच खस्तांचें द्योतक आहे. मराठेशाहीचा इतिहास सामान्यत: कितीहि उज्वल असला, कितीहि अभिमानास्पद असला व कितीहि वर्णनीय असला, तर त्यांत चित्पावन पेशव्यांच्या सैतानशाहीची काळीकुट्ट डांबर नखशिखांत भरलेली आहे, हें शल्य चित्पावनांना रात्रंदिवस सलत रहावें, यांत निसर्गविरुद्ध असें कांहीं नाहीं. तेव्हां, येनकेन प्रकारेण हा इतिहास उलटासुलटा कसा करतां येईल, पेशव्यांच्या तोंडाची काजळी ब्राह्मणेतरांच्या बापजाद्यांच्या थोबाडावर बेमालूम कशी डसवतां येईल आणि सर्रास चित्पावनांच्या बोकांडी इतिहास पुराणादि ग्रंथांनी लटकविलेली क्षुद्रोत्पत्तीची घोरपड चित्पावनेतरांच्या गळ्यांत कशी गपचूप घालतां येईल, यावर अनेक विचित्रवीर्य चित्पावन पंडितांच्या अकला अलीकडे भवतिनभवतीचे घाणे हांकीत असतात. याविषयीं सर्व महाराष्ट्रीयांना जाहीर स्पष्टोक्तीचा इषारा देतांना सन १९१९ सालात प्रसिद्ध झालेल्या आमच्या

ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास या ग्रंथांत असे उद्गार काढले होते. ''सध्यां ऐतिहासिक व्यक्त्यांच्या बासिस्म्याचा धुमाकूळ सुरू झाला आहे. सावित्रीबाई ठाणेदारणीला कोणी कायस्थ प्रभू ज्ञातींतून चित्पावन जातींत ढकलीत आहेत; कोणी तिला कादंबरींतील नायिका म्हणत आहेत; कोणी नाना फडणीसाच्या अंत:करणाच्या खाणींतून कोहीनुरांचे ढीगच्या ढीग बाहेर काढीत आहेत; कोणी त्याच्या मनोमयभूमिकेवर नक्षीदार गालीचे पसरण्याच्या गडबडींत आहेत; कोणी गोपिनाथपंत बोकीलाला शिवाजीची चिटणीशी वतनी बहाल देण्याच्या धामधुमींत आहेत; कोणी हेमाडपंतालाहि ब्राह्मणी पोषाख चढविण्याच्या तजविजींत आहेत; तर कोणी मराठ्या आठवल्याला चित्पावनी बासिस्मा देण्याच्या खटपटींत आहेत. असा मोठा ऐतिहासिक क्रांतीचा काळ आलेला आहे. तेव्हां या भानगडींत कायकाय उलाढाल्या होतील तें पाहिलें पाहिजे, न जाणो, उद्यां अफझुलखान हा शिवाजीचा मामा ठरण्याचा बराच संभव आहे; कारण कृष्णानें कंस मामाला ठार मारलें म्हणून; आणि मुरारबाजी हा चित्पावन असल्याचाहि दस्त ऐवजी पुरावा सांपडणार नाहीं कशावरून?'' हे आमचे उद्गार वाचून त्या वेळी दांत काढून हंसणाऱ्यांनीं आतां भाव्यांचा 'दुसरा रुमाल' मुद्दाम डोळे फाडून पहावा, असें आम्ही आवाहन देतों. अफझुलखान शिवाजीचा मामाचसा काय, पण वामनाच्या त्रिपाद पराक्रमाप्रमाणें आमच्या या ठाणेकर लाखापतीचा 'मराठी दप्तर' प्रकाशनाच्या इजा बिजा आणि तिजा रुमालाचें पाऊल महाराष्ट्र इतिहास-सुंदरीच्या उरावर पडतांच, शिवाजी छत्रपतिमहाराज हे चित्पावन जातीचे ठरल्याशिवाय खास रहाणार नाहीत, असें भविष्य आम्ही आजच करून ठेवतों. ठाणेकर वामनानें आपल्या दुसऱ्या पावलांत बाळाजी आवजीला तर बेछुट पहिल्या नंबरचा पागल ठरविला आहे; छत्रपति सातारकरांना राष्ट्रद्रोही ठरवून, तत्कालीन् शहाण्यांनीं प्रतापसिंहासारख्या 'हरामखोरा'ला सातारच्या माळावर एखाद्या झाडाला जिवंत उलटा टांगून कोल्ह्या कुत्र्याकडून कां फाडविला नाही, ह्मणून त्यांच्या नांवानें कडकडा बोटें मोडलीं आहेत; प्रतापसिंहाचे साथीदार क्षत्रिय मराठी व कायस्थ प्रभू यांनींच इंग्रजांशीं घरभेद करून मराठी स्वराज्याचा प्राण घेतला, ह्मणून या लाखापति भाव्यांनीं त्या सर्व मेल्या मुडद्यांच्या खाका वर खेंचून त्यांना ठाण्याच्या तळेपाळीवर 'वन्समोर' फांशीं दिलें आहे; आणि विशेष राष्ट्रीयपणाची नवलाई ह्मणजे-वाचकहो, नीट शुद्धीवर येऊन ऐका-जगांतलें कितवें आश्चर्य कोणास कळे! - नीट शांतपणानें भाव्यांची ही चालूं चातुर्मासांतली कहाणी ऐका-शेवटले रावबाजी हे मोठे धाडसी पराक्रमी राजकारणी व मराठ्यांच्या स्वराज्याकरितां अखेरपर्यंत आपल्या जिवाचें रान करणारे मोठे शूर तलवार बहाद्दर मर्द होते. काय ह्मणतां? विश्वास बसत नाहीं? वाचकहो, भावे तुह्मा आह्मा सर्वांनास मूर्ख ठरवून असें सांगतात कीं रावबाजी स्वत:च रणशूर रणनवरे होते असें नाहीं, तर त्यांची नवरी ऊर्फ बायको-नव्हे, चुकलों रावबाजीची पट्टराणी-ही सुद्धां रणनवऱ्याची रणनवरी होती. त्या हरामखोर प्रतापसिंहानें मराठे व कायस्थ पागलांच्या नादीं लागून महात्मा रावबाजीचा गळा जर कापला नसतां, तर-तर-तर काय आज बहार झाली असती! पुण्याच्या माणकेश्वराचा तंबोरा आज ठाण्याच्या ठाणकेश्वर भाव्यांच्या हातांत आला असता. बोलून चालून इतिहास-संशोधनच तें. मग बाळाची विश्वनाथांचा खापरपणजा शिवाजी महाराजांच्या हाताखाली दसहजारी सुभेदार म्हणून कां उपटूं नये? आणि हबशानें जलसमाधि दिलेला बाळाजीचा भाऊ जानबा भट खुद्द पुण्याचा सुभेदार असल्याचें सिद्ध कां होऊं नये? अस्सल रक्ताच्या अस्सल चित्पावन इतिहास संशोधकांच्या तावडीत सांपडणारे कोणते दस्तऐवजी आजपर्यंत कमअस्सल

ठरले आहेत? एकहि नाहीं. भा. इ. सं. मंडळाच्या चतुर्थ संमेलनवृत्तांतला राजवाड्यांचा दिग्विजयी कायस्थ दीप सुद्धां कम अस्सल ठरवून जिवंत कायस्थांना विझवितां आला नाही. बाकी, कायस्थांत विद्वान इतिहासज्ञांचा कांहीं दुष्काळ पडला नाहीं हो. राजवाडे प्रकरणाच्या वेळीं कायस्थांच्या घरोघरच्या मोलकरणीसुद्धां इतिहाससंशोधक बनल्या होत्या. पण अखेर काय ! त्यांच्या बांगड्यांच्या कणकण किणकिण नादांतच त्या प्रकरणाचें पर्यवसान होऊन, राजवाड्यांच्या निर्बंधाची नथणी एकजात कायस्थ मंदाच्या नाकांत चिरकालची जाऊन बसली ती बसलीच!! भाव्यांच्या दुसऱ्या रुमालाचें बारसें लावायला श्री. दत्तात्रय विष्णु आपट्यांच्या हाताला हात लावायलाहि एक कायस्थ पात्र श्री. भाव्यांना ठाण्याच्या तळेपाळीवर भटकतांना आढळलें. हें पात्र म्हणजे 'प्रभुरत्नमाला' प्रसवून कायस्थांच्या इतिहासाची पातळी भाजी करणारे व 'शिवदिग्विजय्' बखरीचा नैवेद्य बडोदेकर भिक्षुक देवमतेला दाखवून, तिचें मातेरें करणारे राजमान्य राजेश्री सखाराम गणेश मुजुमदार हें होय. पहिल्या रुमालाच्या वेळीं 'अस्सल वर हुकूम' चें सर्टिफिकेट मिळविण्यासाठी श्री. भाव्यांनीं असेच दोन तीन अजागळ निवडून काढले होते. या खेपेस त्यांना बडोदें संस्थानांतील गडावरच्या या मुजुमदार गडकरी कायस्थ पात्राचा लाभ झाला! अलभ्य लाभच म्हणायचा! अर्थात् या अजागळांच्या 'अस्सल कमअस्सल' कागदपत्रांच्या व्याख्या काय असतील त्या असोत. तो विषय पुढील लेखांकांत ठरेल.

श्री. भाव्यांचा 'पहिला रुमाल' असाच अस्सल लेखणीच्या पोटी जन्माला आलेला आहे. त्या वेळी राष्ट्रीय पत्रकारांनीं, आतांच्या लोकमान्य कर्त्याप्रमाणें, त्या रुमालाची तळी आकाशाला भिडे इतकी उंच उचलेली होती. त्यावेळीं आम्ही या रुमालाबद्दल असा स्पष्ट अभिप्राय दिला कीं ''तीन अनभ्यस्त लेखकांनीं पौराणिक धाटणीवर एक बखरवजा लिहिलेलें भारूड ठाणें येथील 'मराठी दप्तरांतील १ ला रुमाल' म्हणून सन १९१७ सालीं प्रसिद्ध झालें आहे. संशोधकानें व प्रकाशकानें या भारुडाचें महत्व प्रस्थापित करण्यासाठीं सर्टिफिकिटांचा वगैरे बराच फार्स केला आहे. परंतु हें भारूड म्हणजे निव्वळ ऐकीव ऐतिहासिक गप्पांचे एक अव्यवस्थित व अविश्वसनीय पोळें आहे. यांत ऐतिहासिक सत्यापेक्षां हरदासी गप्पांचा भरणाच रगड आहे.'' (ग्रामण्य पृ. १३२ फूटनोट.) पुष्कळांना हा आमचा अभिप्राय एरंडेलाप्रमाणें रेचकदाता वाटला व ठाणें पुणें येथील चारपांच कायस्थ चष्मापगडीधरांनीं त्याबद्दल आपली 'कायस्थी नापसंती' झिळमिळ्या फलकावून व्यक्तहि केली. इतक्यांत प्रो. जदुनाथ सरकारचा दंडुका या रुमालावर पडला. 'शिवाजी आणि शिवकाल' या इंग्रजी पुस्तकाच्या ५०२ पृष्ठावर प्रोफेसरांनी स्पष्ट नमूद केलें कीं ''Utterly worthless expansion of Sabhasad with forged letters and imaginary details'' [h| चोपडें बनावट पत्रें आणि काल्पनीक मजकुरानें भरलेलें सभासदी बखरीचें भरंवसाट वाढविलेलें अत्यंत भिकारडें व कवडी किंमतीचें रूप आहें. सोनारानेंच कान टोचल्यामुळें वरील पगडीधरांच्या एका कानावर कलथलेल्या पगड्या लगेच सरळ बसल्या कीं नाहीं, आम्हांस माहीत नाहीं.

श्री. भाव्यांचा हा 'चखोट' ग्रंथ वाचून 'पेशवाई बुडाली' असें म्हणणाऱ्या इसमांची ताबडतोब ठाण्याच्याच वेड्यांच्या आश्रमांत रवानगी करावी लागेल. हा महाग्रंथ ग्रंथकारानें भारत इ. सं. मंडळाच्या एका जबाबदार बैठकींत वाचल्याचें आम्हाला कळतें. ही गोष्ट खरी असेल तर मंडळानें आपला अभिप्राय त्वरित प्रसिद्ध करावा, असा आमचा आग्रह आहे. हिन्दवी स्वराज्याचा खून कोणी पाडला, याचा भरपूर पुरावा महाराष्ट्रापुढें मांडण्यासाठीं शंभर वर्षांपूर्वीचें महाराष्ट्र हा ग्रंथ आम्ही लिहीत आहोंत.

त्यांत भाव्यांच्या रुमालाच्या चिंधड्या उडविण्याइतका दस्तऐवजी पुरावा व विवेचन येईलच. इतिहासाचें क्षेत्र, ब्राह्मणेतरांच्या गफलतीमुळें, जरी राष्ट्रीय चित्पावनांनीं सर केलें असलें, तरी त्यांच्या ऑफेन्सिवल डिफेन्सिवची उलट सलामी न देण्याइतका ब्राह्मणेतर समाज आजच कांही निर्वीर्य झाला नाहीं; किंवा ऐतिहासिक सत्याची निश्चिति चित्पावनांना हस्तगत झालेल्या चिठोऱ्यांवरच ठरण्याचा नाना फडणीशी मामला आज हयात नाहीं, हे त्यांनी पूर्ण लक्षांत ठेवावें. श्री. भाव्यांच्या कलमबहाद्दरी बद्दल शेलापागोट्याचा आहेर पुढील अंकापासून सुरू होईल. आजची ही पहिली सलामी आहे.

□□□

अग्रलेख

कृष्णं वन्दे जगद्गुरुम्

आज गो-कुळांत आनंदीआनीद चालूं आहे. संसारचक्रांत रात्रंदिवस सुरूं असलेल्या आधिव्याधींना दूर लोटून, एक दोन घटकाच कां होईना, आबाल वृद्ध हिन्दुधर्मी नरनारीजन जय कृष्ण कृष्ण जय, जय कृष्ण कृष्ण जय या पुण्य नामस्मरणांत तल्लीन झाले आहेत. आजचा आनंद निर्व्याज. सूर्योदयाबरोबर उमलणाऱ्या कमळाप्रमाणें शुद्ध, सात्विक आणि प्रत्येक मनाची कळी विकसित करणारा हा आनंद बिनतोड आहे. शेंकडों शतकांच्या पूर्वीं भारतीय इतिहासाच्या पृष्ठाला भाग्यवान् करणारी ती श्रीकृष्णजयंति, जणुं काय अगदीं आजच पहिल्यांदा साजरी होत आहे, अशा कल्पनेचा भडक भाविक रंग आजच्या आनंदांत भरपूर मिसळल्यामुळें तर त्याची गोडी गोडपणांत अमृताशीं खात्रीनें स्पर्धा करील. आज कोठेंहि कान द्या, तेथून कृष्ण भगवंताच्या पुण्य नामसंकीर्तनाच्या मुरलीचा मधुर ध्वनि ऐकूं येईल. आज कोठेंहि दृष्टि फेंका, त्या पूर्णावतार परमात्म्याचा जयंत्युत्सव लहान मोठ्या प्रमाणावर साजरा होत असल्याचें डोळ्यांना दिसेल. आसेतुहिमाचल एकूण एक हिन्दू देवमंदिरांत 'गोविंद घ्या हो, गोपाळ घ्या हो' या विशुद्धतम प्रेमाच्या दहिकाल्याची आग्रहाची देवघेव अहमहमिकेनें चालूं आहे. शेंकडों शतकांपूर्वीं श्रीकृष्णानें केलेल्या-केल्या असें सांगितलेल्या-बालक्रीडांच्या नकला कोठें वठविल्या जात आहेत; तर कोठें दहिहंडी फोडून त्याखालीं लहान लहान मुलें 'गोविंदा गोविंदा' कल्होळांत अनुपमेय हर्षाच्या लहरींवर बेभान नाचत आहेत. रासक्रीडेची हुबेहूब नक्कल वठवायला गोपींची मोठी अडचण; पण, कांहीं पुरुषांनाच तात्पुरत्या गोपी मानून, त्यांच्या बरोबर दहा किंवा एकवीस पदरी गोफ टिपऱ्यांच्या ठेक्यावर विणण्यासाठीं कोठें कांहीं नर्तनकुशल बंधू आपल्या लवचिक आंगाच्या वळणदार घडीची कसरत दाखवून प्रेक्षकांना थक्क करीत आहेत; तर कोठें मल्लविद्याविशारद तरुण जवान स्वत:ला श्रीकृष्णाचे खास सवंगडी समजून, अडाखेबाज कुस्त्यांच्या पेंचांनीं आपापल्या आखाड्याचें नाव राखण्यासाठीं हमरीतुमरीच्या दंगलींत दंग झाले आहेत. ठिकठिकाणीं कृष्ण जन्माच्या इतिहासाचें आख्यान लावून, त्यावर गानाभिनयकुशल हरिदास साग्रसंगीत कथेचें व्याख्यान करीत आहेत. आज प्रत्यक्ष आपल्या दृष्टीसमोर श्रीकृष्ण भगवंताचा जन्म झाला आहे, त्याला हरीदास आतां मंगलस्नान घालतील, काजळ तीट उटी लावतील, बाललेणें चढवतील, मग पाळण्यांत घालून त्याला झोंके देतील,

एन ४००६--१८अ

या सर्व गोष्टी आतां आपण पाहून, त्या पाळण्याच्या झोंक्याबरोबरच आनंदाच्या डोल्हाऱ्यांत क्षणभर आपल्या आत्मारामालाहि 'जो जो जो जोरे' करण्याची महापर्वणी साधून घेऊ, म्हणून आबालवृद्ध स्त्रीपुरुष, हरिदासाच्या मुखगंगेंतून स्रवणारा एकेक शब्द कानांच्या ओंजळींत झेलण्यासाठीं आतुरचित्त स्तब्ध बसले आहेत. उघडाउघड ही सारी नक्कल, शुद्ध नाटकांतली बनावट, कल्पनेलाही थांग न लागणाऱ्या अशा प्राचीनतम इतिहासाची नुसती बतावणी. पण काय चमत्कार आहे पहा ! या कृष्णजयंतीच्या प्रसंगीं तें हजारों वर्षाचें जाडजूड कालपटल भक्तांच्या भावनेचा उदय होतांच धुक्याप्रमाणें वितळून नष्ट होतें आणि वर्तमान मानवांच्या मनोवृत्तीचा दुव्वा कृष्णजन्माच्या आद्य दिवसाला बेछुट भिडून, दुनियेच्या जागत्याज्योत भावनेच्या मुर्वतीसाठीं, भूतकाळच वर्तमानाकाळाचें लेणें पांघरून दरसाल उभा ठाकतो ! एकूण भावनेचा पराक्रम विलक्षण खरा. पीतांबराचें गुंडाळें करून त्याचा बनविलेला बाळकृष्ण तो काय, पण त्यालाच पाळण्यांत घालून हरिदास झोंके घालूं लागले व मधूर संगीताच्या गायनांत 'बाळा जो जो रे' हें गीत गाऊन त्याला आळवूं लागले कीं देवळाच्या एका अंधेऱ्या अडचणीच्या जागेंत दाटी करून बसलेल्या आमच्या मातांची, आमच्या भगिनींची चित्तवृत्ति किती उचंबळून येते बरें! स्त्रीजात म्हणजे मातृवात्सल्याचा जिवंत झरा. वयाच्या कमी अधिक प्रमाणानुसार हा झरा सूक्ष्म किंवा प्रौढ झालेला असतो. अर्थात् या वेळीं त्यांची मुखश्री प्रसन्नतेनें डंवरते. त्यांची काया पुत्रवात्सल्यानें रोमांकित होतें. श्रीकृष्ण-भक्तिचा सारा ठेवा त्यांच्या डोळ्यांत एकवटतो व पाळण्याच्या प्रत्येक येरझारी बरोबर त्यांतला एकेक बिंदु त्यांच्या गालावर टिबकतो.

हा प्रकार शेंकडों वर्षें दरसाल नियमित चालला आहे. वर्षातून एक दिवस भक्तिच्या भावनेला कढ येतो व उत्सव-समाप्तीबरोबरच तो थंड होतो. सांप्रतची कृष्णजयंति शुद्ध कवायति आहे. त्यांत भावनावश अज्ञ जनतेला किंचित् काळ जरी उदात्त अशा जीवशिवाच्या साधर्म्याची चुणूक भासते, तरी मानवजातीच्या उत्क्रान्तीसाठीं व राष्ट्रधर्माच्या प्रगल्भतेसाठीं श्रीकृष्ण भगवंतानें धर्मवीर, राष्ट्रवीर आणि पुरुषोत्तम नरवीर अशा तीन निरनिराळ्या भूमिका स्वत:च्या चारित्र्यांत केंद्रीभूत करून धार्मिक, राजकीय आणि सामाजिक बाबतींत, अखिल मानव जातीचें-जगाचें-जगद्गुरुत्व केवढ्या अढळ यशस्वितेनें मिळविलें, याचा मात्र या उत्सव प्रसंगीं कोणी फारसा विचार करीत नाहीं. पुराणकारांनीं आपल्या काव्यमय मेंदूंतून प्रसविलेल्या भागवतांतील श्रीकृष्णचरित्राच्या अतिशयोक्तिपूर्ण बाललीला व यौवनक्रीडा आमच्या पचनीं जशा लवकर पडतात, तशी त्या पुरुषोत्तमाची भारतांतर्गत इतिहासिद्ध राष्ट्रसेवा किंवा जगद्गुरूची गीता-प्रतिपादित प्रबोधनाची दिव्य कामगिरी आमच्या गळीं उतरण्याची मारामार पडते. या दिशेनें कोणी प्रयत्नच करीत नाहीं. आजकालचे हरिदास म्हणजे शुद्ध नर्मदेचे गोटे किंवा ठरावीक परंपरेच्या मागांतले धोटे. मोटेच्या बैलांप्रमाणें पुढें मागें हेलपाटे घालण्यापलीकडच्या अकलेची आणि त्यांची पुरी फारकत. श्रीकृष्ण सवंगड्यांबरोबर खोखोचा खेळ कसा खेळला, याचें साभिनय पोरकट प्रदर्शन करण्याऐवजीं त्या आडाखेबाज मुत्सद्यानें मोठमोठ्या मी मी म्हणणाऱ्या राजकारणपटूंच्या स्वार्थी डांवपेंचावर आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेची मात करून खो कसा घातला, हें या हरिदासांनीं कां सांगूं नये? रासक्रीडेंतील किंवा जलक्रीडेंतील गोपिकांच्या नग्न विहाराच्या घाणेरड्या काल्पनिक गोष्टी रंगवून सांगतांना, स्वत:ला मनोवृत्तीला बीभत्स विकारांच्या खातेऱ्यांत चुबकण्यापेक्षां, गीतेंतील भक्तियोगाच्या रहस्याची निरनिराळीं प्रमेयें हे रंगेल हरिदास जर श्रोत्यांच्या मनांवर बिंबविण्याचा यत्न करतील, तर

कोणी त्यांच्या जिभेला डाग का देणार आहे? उत्सव प्रसंगीं मुद्दाम जमलेल्या कांहीं खेळाडूंकडून दसपदरी गोफ विणण्याचा धांगडधिंगा करण्यापेक्षां, भगवंतानें आपल्या गीतेंत भक्ति, ज्ञान आणि कर्म या तीन योगांचा केलेला राष्ट्रोद्धारक संयोग श्रोत्यांना हरीदारासानें नीट उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला, तर त्या टाळकुट्याला कोणी फांसावर का लटकविणारा आहे? हातांतल्या टाळानें किंवा टिपरीनें, छटाकभार दही आणि गाडगाभर पाणी भरलेली, दहिहंडी फोडून त्या खालीं मुलांना नाचविण्याचा नाचरा प्रकार बंद करून, त्या ऐवजीं कुकल्पनेची हंडी फोडून निश्चित तत्वनिर्णयाचा दुग्धवर्षाव श्रीकृष्णप्रभूनें साऱ्या पृथ्वीवर कसा पाडला, याची विवेकशुद्ध माहिती हरीदास आपल्या श्रोत्यांना सांगण्याचा प्रघात पाडतील तर त्यांचें कोणी डोकें का फोडणार आहे? श्रीकृष्णानें केल्या म्हणून सांगण्यांत येणाऱ्या कृतींच्या नकल्या करण्यांतच जयंत्युत्सवाचें सारसर्वस्व मानणाऱ्यांना भगवंताच्या भारतग्रथिर अनेक पराक्रमांच्या नकला करण्याची छाती कां बरें होऊं नये? भगवंतानें जगाच्या उद्धारार्थ गीता सांगितली, तशी दुसरी एखादी सवाईगीता सांगण्याचें मर्त्य मानवाचें तोंड नसलें तरी, भगवद्गतीचें रहस्य आत्म ोद्धारार्थ आचरणांत आणतांना आपले हातपाय खचित कोणी बांधणारे नाहीं. नकला करूनच उत्सव साजरा करायचा, तर त्या नकला निदान अशा तरी कृत्यांच्या करा कीं तेणेंकरून आत्मोद्धारांतच जगदोद्धाराची गुरुकिल्ली सांपडेल.

आज आपल्यापुढें भागवतांतील व भारतांतील अशीं दोन परस्पर-विरुद्ध श्रीकृष्णाचीं चरित्रचित्रें आहेत. यांपैकीं पहिलें एकांगी व काल्पनीक आहे आणि दुसरें इतिहाससिद्ध असून विवेकबुद्धीला पटणारें आहे. भागवती कृष्णचरित्रांत भिक्षुकशाही मूर्खपणा खच्चून भरला असून, त्याच्या प्रभावाचा पाया अज्ञ जनांच्या अंधश्रद्धेवर उभारलेला आहे; तर भारतांतर्गत श्रीकृष्णचरित्रांत ऐतिहासिक सत्याचें उज्वल तेज अपरंपार झळकत असून, त्याची उभारणी विवेकमान्यतेच्या न्यायनिष्ठूर पायावर झालेली आहे. भागवत ही कादंबरी आहे व भारत हा इतिहास आहे. कादंबऱ्या काल्पनीक अतएव असत्य असतात, इतिहास तपशील-शुद्ध म्हणून सत्य असतो. हा एवढा भेद जर आपण विचारांत घेतला तर बनावट चलनी नाण्याप्रमाणें व्यासाच्या नांवाखालीं दडपलेल्या बोपदेवकृत भागवत कादंबरींतील कृष्णचरित्राचा त्याग करून, कोणीहि विवेकी सज्जन भारतांत उमटलेल्या जगद्गुरू कृष्णाच्या चारित्र्यावर आपली विवेकपूर्ण स्वाध्यायवृत्ति खिळविल्याविना खास राहणार नाहीं. भागवती कृष्णचरित्रानें जनतेच्या अंध:श्रद्धाळू भावनाप्रधान वृत्तीचा भरपूर फायदा घेऊन, भारतवासियांना पुरुषोत्तम श्रीकृष्णाच्या खऱ्या चारित्र्याला सर्वस्वीं पारखें केलें आहे, या मुद्याकडे आतां किती दिवस श्रीकृष्णभक्त डोळेझांक करणार?

श्रीकृष्णाला पूर्णावतार मानतात. त्याला पुरुषोत्तम (Superman) म्हणतात. व्यासासारखे महर्षि त्याला जगद्गुरू असे संबोधून, कृष्णं वन्दे जगद्गुरुम् म्हणून प्रणाम ठोकतात. हिन्दुस्थान स्वत्वपराङ्मुख झाला. स्वातंत्र्यांतून पारदर्शक गुलामगिरींत अवनत झाला. राजकीय अध:पाताच्या जोडीनें त्याच्या समाजघटनेचे राईपेक्षांहि क्षुद्र अशा ठिकऱ्या उडाल्या. त्याच्या तत्वज्ञानाची स्वकीयांनीं हेळसांड केल्यामुळें, क्षुद्र वृत्तीच्या परकीयांनीं त्याच्या विपर्यसावर आपल्या विद्वत्तेची आपल्या विद्वत्तेची कंडु शमवून घेतली. इतकें झालें तरी पुरुषोत्तम श्रीकृष्णाचें जगद्गुरुत्व आजदीनतागायत एकजात विवेकी दुनियेनें मान्य करावें; त्याच्या भगवद्गीतेचीं पारायणें गेल्या महायुद्धप्रसंगीं फ्रान्सच्या समरभूमीवर अनेक इंग्रज, फ्रेंच, जर्मन आणि अमेरिकन लढवय्यांनीं करून, आपल्या चित्ताला प्रसन्नतेचा प्रसाद प्राप्त करून

द्यावा, आणि हजारों चिकित्सक पाश्चिमात्य विवेकवाद्यांनीं सर्व धर्मपंथांचा तुलनात्मक अभ्यास करून, अखेर आमूलाग्र गीतावादी बनावें; हा चमत्कार सर्व हिन्दूंनीं विचार करण्यासारखा आहे. आजला जगद्गुरू श्रीकृष्णाची गीता जगांतील बहुतेक प्रगल्भ भाषांचें लेणें लेवून नऊखंड दुनियेच्या हृदयाला, गूढ तत्वरहस्याच्या निश्चित निर्णयानें, शांत करीत आहे. फ्रान्सांतले फ्रेंचजन आज फ्रेंच भाषेंत गीतेचें अध्ययन करीत आहेत. जर्मनींतले जर्मन आज श्रीकृष्णाच्या गीतामुरलीचें सनातन मंजुळ ध्वनी जर्मन भाषेंत ऐकून आनंदानें डुलत आहेत. डॅन्टेच्या चिरंजीव काव्यवाणीनें सालंकृता केलेल्या इटालियन वाग्देवीलाहि, भगवद्गीतेनें आपल्या अनुपमेय तत्वज्ञानाचे पैंजण तोडे अर्पण करून, जीवशिवाच्या अभेद वाणीचीं गाणीं गात नाचावयास लाविलें आहे. साऱ्या जगाला पुरून उरणाऱ्या इंग्रजी भाषेच्या द्वारें श्रीकृष्णजगद्गुरूंचा गीता-संदेश आज 'पृथिव्यां सर्वमानवा'ची खासगत जहागीर होऊन बसला आहे. या सर्व दिग्विजयाचें श्रेय जर कोणाला असेल तर तें 'जगद्गुरु' म्हणून मिरविणाऱ्या पुडीबहाद्दर मुंडितशीर्ष भिक्षुकाग्रणींना नसून, थिऑसफीकल सोसायटी व कृष्णभक्त मिसेस आनी बेझंट यांच्याकडेच तें बिनचूक जातें, हें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें प्रबोधनाचें कर्तव्य आहे.

जगद्गुरु श्रीकृष्णाच्या गीतारहस्याच्या बिनीच्या भगव्या जरतारी झेंड्यानें आज सर्व विवेकी दुनिया काबीज केली आहे. अल्पसंख्य विवेकी दुनिया हस्तगत करण्याचेंच कार्य मोठें कठीण. बहुसंख्य अविवेकी दुनियेचें पेंढार कितीहि अफाट पसरलेलें असलें, तरी सच्चा रणशूर शिपाई त्याची केव्हांहि क्षिति बाळगीत नाहीं. रानोमाळ भटकणाऱ्या शेंकडों क्षुद्र कोल्हांकडे दुर्लक्ष करून मर्द शिकारी एका वाघासाठींच आपल्या तिरंदाजीचा रोंख सांभाळून जंगल तुडवीत असतो. बाजारबुणग्यांची पर्वा बाजारबुणग्यांनीं करावी. जगज्जेता वीर आपल्या सामन्याच्या समतोल वीराला एकाच शरसंधानानें घायाळ करून चुटकीसरसा त्याच्या साम्राज्याचा अधिपति बनतो. श्रीकृष्णाच्या कर्मज्ञानभक्तिप्रधान गीतेनें याच धोरणानें आजहि सारी दुनिया पादाक्रान्त केली आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. बिनीच्या भगव्या जरतारी झेंड्यानें पुढचा मार्ग तर छान चोखाळून ठेवला आहे. आतां कृष्णानुयायी भारतीयांनीं एकच लगट करून त्या मार्गावर धडाडीची चाल केली, तर कृष्णं वन्दे जगद्गुरुम् या उच्चारासरसे श्रीकृष्ण भगवंताला प्रणिपात करण्यासाठीं अखिल मानव दुनियेचे हात भराभर वर व्हायला अवधि का लागणार आहे?

जगांतील इतर धर्मपंथांचा पाया उपयुक्ततावादा (Utility) वर सजविलेला आहे. जनता निष्क्रीय झाली म्हणून एका महात्म्यानें कर्मयोगाचा संदेश दिला, पण ज्ञान व भक्तीकडे पाहिलें नाहीं. दुसऱ्या महात्म्यानें ज्ञानाचा संदेश जगाला सांगितला, पण भक्तीचा ओलावा आणि कर्माचा कणखरपणा यांचा समन्वय केला नाहीं. तिसऱ्या महात्म्यानें भक्तीचा कर्णा फुंकून साऱ्या जगाला बेभान नाचावयास लाविलें, पण त्याचे कर्म व ज्ञान हे दोन डोळेच फोडून टाकले. याचा परिणाम असा होत गेला व अझूनहि होत आहे कीं जनता कधीं शुद्ध अध्यात्मवादी, कधीं कणखर अर्थवादी व धर्मलंड, कधीं केवळ वावदुक ज्ञानी परंतु शुष्कहृदयी, तर कधीं 'हें खरें का तें खरें' असल्या अनिश्चित संशयवादांत गुरफटलेली, कधीं संन्यासी तर कधीं संसारी, कधीं विचारी तर कधीं विकारी. याचें कारण त्या त्या पंथप्रवर्तक महात्म्याचा (युटिलिटॅरियन) उपयुक्ततावादी बाणा व धोरणाची एकांगी वाढ हें होय. परंतु श्रीकृष्णाचें गीतेंत प्रतिबिंबित झालेलें चारित्र्य, त्याच्या आचाराची व विचाराची परस्पर-संवादी एकतानता आणि मानवी

जीवनाच्या उत्क्रान्तीच्या नानाविध पायऱ्या क्रमवार आंखून देण्याची त्याच्या तत्वज्ञानाची नानारंगी पण एकजिन्सी धाटणी, नीट काळजीपूर्वक स्वाध्यायांत घेतलीं ह्मणजे, भक्तियोगाच्या ओलसर क्षेत्रांत, कर्मयोगाची दणकट लागवड करून, ज्ञानयोगाच्या सर्वस्पर्शीं जीवनानें, मानवांच्या सर्वांगीण उत्क्रान्तीचा मळा चौफेर एकजात एकसारखा पिकविण्याची त्या भगवंताची योगकुशलता, आचरट अहंमन्यांशिवाय, वाटेल त्या विवेकी मुमुक्षूला संशयछिन्न केल्याशिवाय खास रहाणार नाहीं. श्रीकृष्णाचें चारित्र्य एकांगी नव्हे, अनेकांगी आहे. गीतेचें तत्वज्ञान संसाऱ्याला व संन्याशाला, अर्थवाद्याला व ज्ञान्याला, धार्मिकाला व राजकारणी पंडिताला, जाणत्याला व नेणत्याला, सर्वांना पद्धतशीर समभावानें उत्क्रांतीचा मार्ग बिनचूक दाखविणारें सनातन होकायंत्र आहे. श्रीकृष्णाला पूर्णावतार व पुरुषोत्तम म्हणतात कां, याचें कोडें उलगडूं पहाणारांनीं प्रथम या गीता होकायंत्राची यंत्ररचना उलगडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्रीकृष्णानें आपल्या भक्तांना सांगून ठेवलेला संदेश आज आपण कृष्णजयंतीच्या उत्सवकालीं विचारांत घेऊन आचारांत उमटविला पाहिजे. कृष्ण भगवंताच्या जगद्गुरुत्वाची आज जगाला जरुर आहे. चालूं जगांतलीं सामाजिक धार्मिक राजकीय व आंतर्राष्ट्रीय प्रमेयांची अनेक खट्याळ खेंकटों सुव्यवस्थित उत्क्रांतीच्या मार्गावर आणण्यासाठीं श्रीकृष्ण सर्व अनुयायांना हांक मारून संदेश देत आहेत:-

क्लैब्यं मा स्म गम: पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।

क्षुद्रं हृदय दौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।।

हे पृथापुत्रा पार्था, हा निष्क्रीय नामर्दपणा सोडून दे. छे:! माझा भक्त म्हणविणाऱ्याला हा नेमळेपणा मुळींच शोभत नाहीं. दे दूर झुगारून तो मनाचा कमजोरपणा आणि ऊठ दंड थोपटीत जिवंत मर्दाप्रमाणें. भारता, कसल्या भिकारड्या क्षुद्र कल्पनांचा तूं गुलाम बनला आहेस? जा. यच्चावत् जगाच्या कोनाकोपऱ्यांत जाऊन भिडेल इतक्या जोरानें माझ्या गीतेची भक्ति-ज्ञान-कर्म प्रधान संदेशाची तुतारी फुंक. अभेदभावानें त्या माझ्या गीताज्ञानाचा साऱ्या मानवी दुनियेवर मुसळधार पाऊस पाड आणि जातपात, वर्णभेद, देशभेद, राष्ट्रभेद इत्यादि सर्व भेदांचा कंस ठार मारून, सर्वांना

गीतारहस्याचा जाहिरनामा

वाचून दाखीव. सर्व मानवजातींतील व्यक्तिमात्राला ठांसून सांग कीं बाबा, तुझ्यांत पाप नाहीं, तुझ्यांत दु:ख नाहीं, तूं हतबल नाहींस, तूं मर्द आहेस, तूं देवांचा देव शक्तीचा खजिना आहेस, तो तूंच आहेस. ऊठ, जागा हो आणि गीतेच्या प्रकाशानें आत्मज्ञानाची ओळख करून घे. क्लैब्यं मा स्म गम: पार्थ ! प्रिय बंधु भगिनी वाचक जनहो, आज कृष्णजयंतीच्या मंगल कालीं हा दिव्य संदेश येतां जातां दिसेल अशा ठिवकाणीं मोठ्या अक्षरांत लिहून ठेवा. त्याचें क्षणोक्षणीं चिंतन करा म्हणजे लवकरच असा योग येईल कीं याच कृष्णजयंतीच्या दिवशीं जगांत जेथें जेथें म्हणून मानव आहे, तेथून तेथून त्याच्या तोंडून हाच जयजयकार निघेल कीं :-

कृष्णं वन्दे जगद्गुरुम्.

□□□

स्फुट लेख

फर्ग्युसन कॉलेजांतील टिळक मेमोरियल

या विषयीं निषेध प्रदर्शित करणारें एक वाजवी व निस्पृह विचारांचें जाहीर पत्रक आज पुरवणीदाखल वाचकांच्या अवलोकनार्थ सादर करीत आहों. बहुजनसमाजाच्या प्रबुद्धाऽप्रबुद्धतेची किंवा निदान त्याच्या वाजवी मताची पर्वा न करतां, 'सार्वजनिक' पणाच्या गोंडस नांवाखालीं स्वत:च्या मुलांच्या मुंजींना सुद्धां 'सार्वजनिक मुंजी' ठरविणारांनीं, कै. टिळकांना आपल्या अधिकारांत कधींच लोकमान्य ठरविलें आहे. आतां त्यांच्या मृत्युनंतर त्यांना चतुर्भुज शेषशायी भगवान बनविल्यावरसुद्धां, त्यांच्या किरकोळ छोट्या मोठ्या स्मारकांची वास्तवीक जरूरच उरलेली दिसत नाही. देवाला गचांडी देऊन तेथें माणसालाच देव करून थापल्यावर, पुतळे बस्ट तेलीरंगी तसबिरा इत्यादि स्मारकांचा खटाटोप व्यर्थ होय. शिवाजी, बाजीप्रभु, बाजीराव, दत्ताजी शिंदे, झांशीकर लक्ष्मीबाई, दादाभाई, रानडे, तेलंग, गोखले, फिरोजशहा इत्यादि ('राष्ट्रीय' दृष्टीनें) आडुमाडू माणसांनाहि जो देवकळा प्राप्त झाली नाहीं, ती कै. टिळकांच्या नशिबीं चुटकीसरशी बांधल्यावर, त्यांचे पुतळे बस्टादि स्मारक-प्रयोग करणें म्हणजे टिळक भगवंताला शिवाजी बाजीराव दादाभाई प्रभृति 'माणसांच्या' पंक्तीला बसवून त्या देवदेवबाप्पाची विटंबना करण्यासारखें आहे, हें टिळकभक्तांच्या ध्यानांत कसें येत नाहीं, कोण जाणें? गणेशोत्सवाप्रमाणें टिळकभक्तांनीं टिळकोत्सव अंमलांत आणलाच आहे. आतां फक्त देवळांतून जुन्या देवांची हकालपट्टी करून तेथें चतुर्भुज टिळकदेवाची स्थापना करणें व टिळकायण नांवाचा नवीन ग्रंथ रचून त्याच्या 'सार्वजनिक' पारायणाची लोकांवर सभ्य बळजबरी करणें, याच मुख्य पुढील पायऱ्या होत. त्यांचा अवलंब जर टिळक-भक्त करतील, तर आजच्या फर्ग्युसन मेमोरिअल-निषेधकांचीं तोंडें आपोआपच बंद पडतील. चतुर्भुज टिळकदेवाची देवळांत स्थापना करतांना टिळकभक्तांनीं बोरूळच्या पोरखेळाची मात्र आठवण ठेवावी; नाहींतर करायला गेलों देव आणि झालें भलतेंच, असा प्रकार होऊन, देवाच्या पादुका भक्तांच्या पाठींत बसायच्या !

श्री. नाडगौडा, दळवी प्रभृती माजी फर्ग्युसोनियनांच्या निषेधाला प्रत्येक विचारी मनुष्य पाठिंबा दिल्याशिवाय खास रहाणार नाही.

□□□

आई

(मुंबईतील आर्योन्नति मंडळाचे एकनिष्ठ चालक श्रीयुत श्रीपाद केशव नाईक यांच्या खटपटीनें दरसाल साजरा होणाऱ्या 'मातृदिन' उत्सवाचें या अग्रलेखानें प्रबोधन अभिनंदन करीत आहे. हा उत्सव गेल्या २२ ऑगस्ट रोजीं मुंबई, ठाणें वगैरे ठिकाणीं उत्साहानें साजरा करण्यांत आला. - संपादक.)

जग हें जितकें चमत्कारीक आहे, तितकेंच तें चमत्कारपूर्ण आहे. विधात्यानें निर्माण केलेलं विश्व हाच मुळीं कल्पनातीत असा एक चमत्कार आहे आणि विश्वविधात्याच्या करणीवर ताण करून दाखविण्यासाठीं मनुष्यांनींसुद्धां या नानारत्ना वसुंधरेला 'अहं ब्रह्मास्मि' या प्रत्यक्ष जाणिवेनें नाना आश्चर्याणि वसुंधरा बनविण्याची शिकस्त चालविली आहे. कल्पनेच्या समुद्रमंथनांतून निर्माण केलेलीं अनंत चमत्कारिक रत्नें माणसांनीं वसुंधरेच्या या अजब अजायबखान्यांत व्यवस्थित मांडून ठेविलीं आहेत. तीं पाहिलीं कीं आपलें हृदय कौतुकानें भरून येतें. मनोवृत्ति विस्मयानें चकित होते आणि स्तुतीचा निदान एक तरी गोड उद्गार निघावा म्हणून जिव्हा योग्य शब्दयोजनेसाठीं वळवळते, पण 'वाहवा' एवढ्या उद्गारावरच वाक्शक्तीची मजल खुंटल्यामुंळें अखेर हळहळते. अग्र्याचा ताजमहाल, मिसर देशांतले पिरामिड, स्वच्छंद वातावरणाला हुकमी संदेशवाहक बनविणारा मार्कोनिग्राम किंवा बिनतारी टेलीफोन, दूरस्थ किंवा कालवश झालेल्या माणसांची भाषणें व आल्हादकारक गाणीं वाटेल तेव्हां वाटेल तेथें प्रकट करणारा फोनोग्राफ, इत्यादि अनेक मनुष्यनिर्मित चमत्कारांची शाब्दिक संभावना करितांना, हृदयांत उचंबळणाऱ्या कुतूहल लहरींचा थैथयाट व्यक्त करतांना, माणसाची वाक्शक्ति 'वाहवा' या एकाच शब्दोच्चाराच्या उंबरठ्यावर कुंठित होते. निसर्गनिर्मित चमत्कारांविषयींहि हाच प्रकार. उदाहरणार्थ आपण उष:कालचा चमत्कार कवीच्या काव्यमय चष्म्यांतून पहाण्याचा यत्न करूं. एका विशेष चैतन्याच्या अवर्णनीय सुगंधानें ज्याचे अणुरेणू परिमळयुक्त झाले आहेत, असा प्रभातीचा प्रबोधक वातावरणाचा जलधी मंदमंद वायूच्या रहाळ्या मारीत आहे. सृष्टिदेवता त्यांत जलविहार करीत आहे. इतक्यांत 'भगवान् सविता आले की काय?' हें पाहण्यासाठीं तिनें आपला हसरा टवटवीत चेहरा जलपृष्ठावर काढतांच दंवकण तिच्या मस्तकावर मौक्तिकांचा सडा पाडीत आहेत. जलविहारामुळें भिजून चिंब झालेला सृष्टीचा केशकलाप पिळून स्वच्छ पुसण्यासाठीं किरमिजी अरुणाचें रेशमी फर्द उषा

दासीनें झटकन् पुढें करून, दाही दिशा उजळणाऱ्या तेजाचा सुगंधी विश्वंभर धूप सर्वत्र प्रसृत केला आहे. धूपाच्या घमघमाटांत मग्न असतांच, भगवान् सूर्यनारायण आपला एकच हात पुढें करून सृष्टीच्या निटिलावर सुवर्ण कुंकुमाचा रेखीव टिळा रेखीत आहे. बोलबोलतां साऱ्या विश्वाची नजर चुकवून देवीनें भरजरी सहस्ररश्मी पैठणी परिधान केली आहे. अंगावर दिसतो न दिसतो असा विरळ धुक्याचा शालु पांघरला आहे. अवघ्या तीन पावलांत साऱ्या त्रिभुवनाचा आक्रम मरीन, या विजयाकांक्षेनें फुरफुरलेलें आपलें लालबुंद मुखबिंब भगवानजीनें क्षितिजपटलाच्या वर काढतांच, उत्फुल्ल सुमनदलांच्या द्वारें सृष्टी दिव्य स्मितहास्य करीत आहे. आंगावर पांघरलेला धुक्याचा शालू अलगज उडवून आलिंगनासाठीं सवित्यानें पसरलेले विश्वस्पर्शी विशाळ बाहू पाहून, चंडोलादि गायकगण 'आस्ते कदम'च्या ललकाऱ्या तारस्वरांत भिरकावीत आहेत आणि या अतिप्रसंगाचा बोभाटा साऱ्या विश्वांत दुमदुमल्यामुळें सृष्टि देवता विनयाच्या सात्विक मुरडणीनें लाजली आहे. हा सर्व हृदयस्पर्शी चमत्कारीक देखावा पाहून मानवांच्या वाक्शक्तीनें मुग्धतेच्या आड लपून आपल्या अंतस्थ कुतूहलाचें व्यक्तिकरण पाणी भरल्या डोळ्यांनीं करण्यापलीकडे अधिक काय करावें बरें?

मुळीं विश्वविधाताच जर गूढ व अकल्पनीय, तर त्याची विश्वरंगभूमीवर उधळलनेली नाना आश्चर्याणि वसुंधरा तितकीच गूढ व अवर्णनीय कां असूं नये? पण या वसुंधरेच्या चमत्कार-खाणीचाहि गर्व परिहार करणारा एक अद्वितीय चमत्कार आहे. चमत्कार वाटतो तो हाच कीं या चमत्काराचा व प्रत्येक भूतजाताचा अत्यंत निकटचा संबंध असूनसुद्धां त्या चमत्काराचा चमत्कार आम्हांला भासूं नयें, हें किति चमत्कारीक? खरोखर मानवी दुनिया बुद्धिमत्तेच्या चौकसपणाचा कितीहि डौल मिरवो, ती फारच चमत्कारीक खरी. साता समुद्रापलीकडचें दिसतें, पण हाताजवळचें भासतसुद्धां नाहीं. याचें कारण हेंच कीं अतिपरिचयामुळें या विश्वोत्तर चमत्काराची अवज्ञा होणें हा मानवी सृष्टीच्या स्वभाव-धर्म-स्मृतींत गुन्हा मानलेला नाहीं. आग्र्याच्या लोकांना ताजमहालाच्या लोकोत्तरपेक्षां मुषाफरांपासून मिळणाऱ्या कवडी दमडी भिकेचें महत्व फार वाटतें. पंढरपूरच्या बडव्यांना किंवा काशीच्या पंड्यांना विठोबाचें किंवा विरूपाक्षाचें महत्व लवमात्र वाटत नाहीं, त्यांची सारी महत्वाकांक्षा यात्रेकरूंच्या गांठोड्या भोंवतीं आशाळभूत पिशाच्चा प्रमाणें वावरत असते. गंगानदीच्या पावित्र्याच्या महिम्यानें हृदयांत भाविक भावनेचे मळे पिकलेले लोक गांवोंगांवहून धांव घेत काशीला जातात, पण तेच काशीचे लोक त्याच गंगेचा उपयोग नियमीत प्रातर्विधीसाठीं करतात. ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन होवो वा न होवो. पण भारत काळापासून इतिहासप्रसिद्ध असलेला स्यमंतक-कोहीनूर मणि काळानें डोळे मिटण्यापूर्वी निदान एकवार डोळे भरून पहावा, म्हणून आम्हां भारतवासियांची तृष्णा केवढी दांडगी, पण आमच्या पंचम जॉर्ज बादशाहांना हातांतल्या वॉकिंग स्टिक इतकेंच त्याचें महत्व वाटत असावें; याचें कारण अतिपरीचय. या प्रचंड विश्वविस्ताराला प्रकाशित करणाऱ्या तेजोनिधि भास्कराला सुद्धां 'घटकाभर हो बाजूला' असें सांगणारे अशोक प्रतापसिंह ज्ञानेश्वर तुकाराम शिवाजी काय थोडथोडके पुरुषोत्तम सूर्य आपल्यांत चाकून गेले? पण आपलेपणाच्या अतिपरीचयामुळें त्यांच्या महत्वाचे लोकोत्तर चमत्कार त्या वेळीं आपल्या विचारांना शिवलेहि नाहींत.

आई हा एक असा चमत्कार आहे कीं त्याच्या निकट परिचयामुळें त्यांतील गूढ प्रेमाच्या रहस्याचें महत्व आम्हांला वास्तवीक उमजलें तरी समजत नाहीं, उमगलें तरी सांपडत नाहीं व भासलें तरी व्यक्त

करतां येत नाहीं. आई हे दोन स्वर, ही दोन अक्षरें, हा एक सुटसुटित शब्द सोपा दिसतो खरा, पण या दोन अक्षरांच्या इवल्याशा जागेंत सारें विश्व सामावलेलें आहे. या शब्दांत एक विलक्षण जादू आहे. विश्वाच्या आदि अंताची माया या दोन अक्षरी शब्दांतच संकलित झाली आहे. आह्मी माणसें जसजशीं शहाणी होत आहोंत तसतशीं आमची व एका विशिष्ट गोष्टीची फारकत होत चालली आहे. ती गोष्ट म्हटली म्हणजे, एक वाक्यता. चार शहाणी डोकीं एका ठिकाणीं जमलीं आणि त्यांचें एका गोष्टीविषयीं चटकन एकजिनशीं एकमत झालें, ही बाबसुद्धां आतां अघटित चमत्कारांत मोडूं पाहात आहे. परंतु आई ही अशी एक चमत्कारिक बाब आहे, कीं तिच्याविषयीं राष्ट्रभेद, देशभेद, संस्कृतिभेद, व्यक्तिभेद, वर्णभेद, इत्यादि सर्व भेदांचा समूळ छेद होऊन, आई या एकाच शब्दोच्चारानें सर्व मानवी दुंनिया-नव्हे अवघे भूतजात-झटदिशीं प्रेमाच्या एकतान स्थितींत एकमतानें विलीन होते. आईचें प्रेम जात्याच मुळीं अत्यंत मुग्ध असतें. तें सर्वांना भासत असलें, तरी दिसत नाहीं. परमेश्वरानें स्त्रीजातीला बहाल केलेल्या अलौकिक स्निग्धतेच्या सत्वगुणाचा अर्क आईच्या प्रेमांत आत्म्याप्रमाणें रसरसत असतो. आईचें प्रेम आईलाच ठावें, इतरांना-विशेषत: पुरुषांना त्या प्रेमाची खरी कल्पना येणें शक्य नाहीं. त्या दिव्य प्रेमाचें किंचित् उतराई होण्यासाठीं बुद्धिमान् पुरुषांनीं आपल्या निवडक वाक्पुष्पांची आईसाठीं जरी शय्या तयार केली, किंवा मानवी विकारांचे इतर सर्व तिखट रस घटकाभर दूर झुगारून देऊन सात्विकपणाच्या मृदुल एकतानतेनें आपल्या लेखणीला आईच्या प्रेमाचें शब्दचित्र काढण्यासाठीं कितीहि नाचविलें तरी बुद्धिमत्तेची रसाळ ओजस्वी शाई प्यालेलें तें कलम, आई एवढा एकच शब्द लिहून त्याच्यापुढें नकळत पडलेल्या पूर्णविरामांत आपल्या कुंठित मतीचा पूर्ण विराम स्पष्ट व्यक्त करतें. ईश्वरीप्रसादाची सनद पटकावून, कृष्ण भगवंताच्या मुरलीप्रमाणें, साऱ्या जगताला मोहिनी घालणारे, महाकवि कितीक होऊन गेलें. त्यांनीं चंद्रसूर्याला कल्पनेच्या भरारींत हाताबोटांवर नाचविलें, मेरुपर्वताचा घुसळखांब करून शेषाच्या दोरीनें अखिल महासागरांचें मंथन केलें. आकाशांतील तारकांना अलगज उचलून, काव्यांतील नायिकेच्या डोळ्यांत बसविलें. या महाकवींनीं कोठें पर्वतांना व्याख्यानें द्यावयास लाविलीं. नद्यांना गाणीं गावयास भाग पाडलें. गगन-संचारी मेघांना प्रणय पत्रिकांच्या चिटोऱ्यांची ने आण करणारे दूत बनविलें, तर कोठें स्वयंसंचारी वातावरणाला आकाशवाणीचे जलशे नाचविणारे तमासगीर बनविले. परंतु आजपर्यंत आईला काव्याचा विषय केला असतांना 'आई थोर तुझे उपकार' या उद्गारापलीकडे आपल्या निष्णात कल्पनेची भरारी मारण्याचें एकाहि महाकवीला साधलें नाहीं. याचं कारण हेंच, कीं आई व आईचें प्रेम या दोन गोष्टी अत्यंत गूढ व मुग्ध असल्यामुळें नुसत्या विचक्षण मानवी कल्पनेला त्यांचें सांगोपांग आकलन होणें शक्य नसतें. अशा वास्तवीक स्थितींत प्रस्तुत लेखकाच्या दुबळ्या लेखणीनेंहि 'आई थोर तुझे उपकार' या सूत्रानें आईला, आपल्या भारत जननीला आणि त्या दयानिधि जगन्माउलीला, कृतज्ञतेनें तुडुंब भरलेल्या हृदयाला कसेंबसें सांवरून, साष्टांग प्रणिपात घालण्यापलीकडे अधिक काय करणें शक्य आहे?

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसि.

।।वन्दे मातरम्।।

□□□

(लेख)

श्री. विनायक लक्ष्मण भावे यांचें विश्वामित्री इतिहास-संशोधन

(लेखांक १ ला)

लोकाश्रयाच्या अभावीं गतप्राण झालेल्या 'मराठी दप्तर' संस्थेला स्वत:च्या हिमतीवर तशीच फरपटत ओढून तिच्या पोटीं 'दुसऱ्या रुमाला'ची बळजबरीची प्रसूति करणाऱ्या श्री. भाव्यांच्या या नूतन अपत्याला आंगड्या कुंचड्याचा आहेर करण्यापूर्वी, त्यांनीं चित्रमयजगत्‌च्या जुलै १९२२च्या अंकांत पृष्ठ २७८-७९ वर शिवाजीच्या वंशकुळीचें जें चिकित्सापुराण सांगितलें आहे, त्याचा आजच्या अंकीं विचार करण्याचें योजिलें आहे. प्रथमच आम्हीं मोकळ्या मनानें नमूद करून टाकतों कीं, श्री. भावे यांचा व आमचा (राजवाड्यांप्रमाणेंच) कोणत्याहि प्रकारचा वैरभाव नाहीं. त्यांच्या ग्रंथांशिवाय आमचा त्यांना निकट परिचय केव्हांहि झालेला नाहीं; फार काय पण आम्ही - निदान या घटकपर्यंत-कोणीहि परस्परांस पाहिलेलें नाहीं. तेव्हां चिकित्सेच्या कांटेरी समरांगणावर वादविवादाच्या भरांत एकदा कलमी वार जेर झालाच, तर त्याच्याबद्दल कोणी कोणावर द्वेषबुद्धीचा आरोप करण्याला वास्तवीक कांही जागा नाहीं. श्री. भावे यांचा साहित्य व इतिहास विषयक उद्योग प्रशंसनीय आहे. त्यांचा 'नेपोलियन' अझून आमच्या हातीं गवसला नसला, तरी त्यांच्या 'महाराष्ट्र सारस्वत' ग्रंथाचा रसास्वाद आम्ही अत्यंत आनंदानें एक दोन वेळां नव्हे, एकूण आठ वेळां लागोपाठ घेतलेला आहे. परंतु श्री. भावे झाले काय किंवा राजवाडे झाले काय, ते कितीहि प्रबुद्ध व स्वार्थत्यागी इतिहास-साहित्य-संशोधक असले, तरी हातीं सांपडेल त्या भल्या बुऱ्या चिठोऱ्यावर जेव्हां ते आपल्या अकलेला तणावा देऊन विचित्र सिद्धांतांची निष्पत्ति सिद्ध करूं पहातात, तेव्हां मात्र त्यांच्या विद्वत्तेवर पुण्याच्या डेक्कन बँकेचा प्रसंग ओढवतो. याला साधा व्यावहारीक दृष्टांतच द्यायचा तर आम्ही असें ह्मणूं कीं 'मोड तोड तांबा पित्तल' करणारा मारवाडी उद्यां जर मेटल ॲनलायझरचें (धातुसंशोधकाचें) काम करूं लागेल, तर तें जितके हास्यास्पद, क्वचित् तिरस्कारास्पद होईल, तितकेंचि दूषणार्ह कार्य ही भावे ॲन्ड कंपनी ऐतिहासिक गोष्टींची ठरवाठरव करूं लागली म्हणजे घडतें. यापेक्षां ही मंडळी राजवाड्यांच्या खंडांप्रमाणें

जुने कागदपत्र जशाचे तसे नुसते छापून प्रसिद्ध करण्याचाच क्रम ठेवतील, तर त्यांचे उपकार महाराष्ट्र विसरणार नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाचें साहित्यच जेथें अझून पुरें उमगलेलें नाही, तेथें लेकाच्यानों ठाम सिद्धांत कसले ठोकित बसतां? भारत इ.सं.म च्या चतुर्थ सं. वृत्तांतील 'कायस्थदीपा बद्दल' आमचा वाद हाच होता. राजवाड्यांनीं तें जीर्ण गळाठें जसेंच्या तसें प्रसिद्ध केलें असतें तर आम्ही किंवा कोणीहि त्याची दखल केली नसती. सांपडला दस्तऐवज छापला. त्याचें महत्व ज्याचें ते घेतील पारखून. दीपांला दिपवायला प्रदीप काहीं मेला नव्हता. तोहि आणखी छापला असता. पण साहित्यकलेक्टर राजवाडे जेव्हां आपला योग्य अधिकार विसरून त्या गळाठ्याच्या जोरावर इतिहास-डिक्टेटर बनले व कायस्थ प्रभू समाजाला तुम्ही असेच आणि तुम्ही तसेच वगैरे बेजबाबदार वेदान्ती जजमेंट देऊं लागले, तेव्हा त्यांच्या विद्वत्तेला पायबंद लावणें मंडळाला सुद्धां जरूर पडलें. ऐतिहासिक गोष्टींचे सिद्धांत सिद्ध करण्याचें काम ऐतिहासिवक कागदपत्रें हुडकून जमा करण्याइतके खास सोपें नाहीं. तें काम किती कठीण आहे. तें करण्याची पात्रता कोणाला असते, आणि ती पात्रता केव्हां प्राप्त होते, याविषयीं ताळेंबंद नियम खुद्द राजवाडे प्रभृतींनींच वेळोवेळीं अनेक ठिकाणीं व्यक्त केलेले असूनसुद्धां, स्वत:च्या अकलेचा 'दीप' पाजळतांना मात्र त्या नियमांची त्यांना मुळींच आठवण होत नाहीं हें कसें? खुद्द राजवाडेच काय म्हणतात तें पहा. ''एखादी मोडकी तोडकी बखर किंवा फाटकी तुटकी पोथी सांपडली म्हणजे संशोधन झालें, असें समजण्याचा आतां काळ राहिलेला नाहीं.'' (पृ. १९) ''कारागीर कितीही कुशल असो, कितीही नकशी काम करणारा असो, अज्ञांच्या आग्रहानें व स्वत:च्या उतावीळपणानें तुटपुंज्या सामग्रीच्या लेच्यापेच्या जोरावर तो जर इमारत उठवून देण्याची हांव बांधील; तर त्याच्या या प्रयत्नाबद्दल तज्ञांच्या मनांत सकरुण तिरस्कार उत्पन्न होईल. तशांत आहे ती तुटपुंजी सामग्री मुबलक व भरपूर आहे, अशी समजूत स्वत: इतिहासलिलिखिषुच (?) करून घेऊन चालू लागला, तर त्याच्या अज्ञपणाची कमाल झाली समजायाची. त्यांत ही मराठ्यांच्या इतिहासाची रूपरेषा सर्व कळली, नवीन शोधानें फार तर एखाद दुसरी काना कोपऱ्यांतील नवीन बाब कळली तर कळेल अशी भावना एखाद्या लिलिखिषूनें उराशीं धरलीं, तर त्यानें आत्मवंचना करून घेतली, असेंच तज्ञाचें मत पडेल. (इ. ऐ. पृ. २९)

परंतु हाच नियम वारंवार ते दृष्टी आड कसा करतात याचें प्रत्यंतर म्हणजेच त्यांनीं व त्यांच्या पुणेकर धुळेकर ठाणेकर मिरजकर सांप्रदायिकांनीं मराठ्यांच्या इतिहासांतील अनेक गोष्टीचें सिद्धांत ठरविण्याचे केलेले 'राष्ट्रीय' उपद्व्याप पाहिले म्हणून दिसून येते. कोणत्याहि काळाच्या इतिहासाच्या तपशीलाची ठरवाठरव करतांना, तत्कालीन परिस्थिती कशी होती आणि अमूक बाबतींत तत्कालीन् लोकमताचा रंग कसा काय होता, इत्यादि अनेक गोष्टींच्या भूमिकेशी निर्णायकाचें तादात्म्य झाल्याशिवाय त्याला निश्चित निर्णय लावतां येणेंच शक्य नाहीं. बाळाजी आवजीच्या वेळच्या राजनिष्ठेच्या कल्पनांचें स्वरूप सर माधवराव चौबळांच्या आधुनिक कल्पनांच्या चष्म्यांतून पाहून ठरवूं म्हटलें, तर 'तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना' या कव्युक्ती पलीकडे बाळाजीची किंमत अधिक ठरणार नाहीं. आधुनिक राजकीय चळवळींच्या चष्म्यांतून शिवकालीन् चळवळींच्या तपशिलाची ठरवाठरव म्हणजे शुद्ध गाढवपणा नसेल तर निदान वेडेपणा तरी खास होईल. तद्वतच प्रचलित विचारक्रान्तीच्या दृष्टीनें शिवकालीन् ग्रामण्यांच्या तपशीलाचा उहापोह करून निर्णय निश्चितीचा तोरा मिळविणें हा गाळीव

मूर्खपणा होय. कोणतीहि गोष्ट त्रयराशिकाच्या धाटणीवर ठरवूं ह्मटलें तर मोठाच अनवस्था प्रसंग ! पण राजवाडे भावे प्रभृती मंडळी येथून तेथून एकजात त्रयराशिकी. एका बाईला चार मुलें तर पांच बायांना वीस मुलें झालींच पाहिजेत, अशी त्यांच्या विधानांची नेहमीं धाटणी असते. अपवाद, परिस्थिति-भिन्नता इत्यादि गोष्टी विचारांत घेण्याची या शहाण्यांना मुळींच शुद्ध नसते. त्यांची आजपर्यंतची राजवटच अशी कीं आधीं सिद्धांत आणि मग संशोधन अर्थात् निश्चित सिद्धांतासाठी सरळ मजकुरांतून सुद्धां वांकड्या विधानांचे धागे ओढून काढणें. या जिवाजीराव कलमदान्यांच्या 'शाई भरल्या हाताचा मळ' होतो. कायस्थ दीप पाजळतांना, संभाजीनें कायस्थ प्रभूंच्या धार्मिक हक्कांसंबंधी दिलेल्या प्रतिकूल जजमेंटाची लोणकढी थाप जेव्हा राजवाड्यांनीं बिनदिक्कत झोंकून दिली, तेव्हां एका १२ वर्षांच्या पोराच्या गळ्यांत आपण कसली घोरपड लटकवून, आपल्या पोरकटपणाचें प्रदर्शन करीत आहोंत, याचें त्यांना भान राहिलें होतें काय? राजवाड्यांनीं हा पोरकटपणा सुद्धां एका दस्तऐवजाच्या पुण्याईवरच केला होता. नाहीं असें नाहीं. पण तो चिठोरा कितपत विश्वसनीय आहे; तो कोणी कां कशाला लिहून ठेवला आहे; यांतल्या मजकुरांत सुसंगतपणाचें व विसंगतपणाचें प्रमाण किती आहे; बाळाजी आवजीविषयीं 'बाळा परभू नाशिक पंचवटीचा' राहणारा, असलें दिव्य ऐतिहासिक ज्ञान प्रसविणारा लेखक पाजी कीं गाजी; याचा विचार करायला 'इतिहास-संशोधनेश्वर' राजवाड्यांना फुरसत होतीं कुठें? आधीं सिद्धांत मग संशोधन, या राष्ट्रीय सूत्रांबरहुकुम कायस्थांची बदनामी करणारा सांपडेल तो पुरावा त्यांच्या तोंडांवर झुगारून देण्यापलीकडे त्यांना विशेष कांहीं करावयाचेंच नव्हतें. मग या असल्या झटपट रंगारी निर्णयकर्मांत १२ वर्षांचा मराठा संभाजी वेशासंपन्न वांईकर चित्पावन लेल्याचा बाप जरी ठरला तरी राजवाड्यांनीं पर्वा ठेविली नाहीं. (ज्या चिठोऱ्याच्या पुण्याईवर १२ वर्षांच्या संभाजीच्या गळ्यांत कायस्थांच्या धर्मनिर्णयाच्या कमिशनरशिपचें लोढणें राजवाड्यांनीं अडकविलें, तो-चिंतामणराव सांगलीकराच्या 'राष्ट्रीय' (अ) धर्म ग्रंथप्रसूति फॅक्टरींत निपजलेला- 'अस्सल' दस्तऐवज आम्ही आमचे मित्र श्री. वासुदेव सीताराम बेंद्रे मु. पुणे यांच्या मार्फत भारत इ. सं. मंडळास गुदस्त सालीं आहेरादाखल नजर पाठविला आहे. त्याच्या अस्सलपणाचा निर्णय द्यायला मंडळास अझून फुरसद झाल्याचें दिसत नाहीं) या स्वार्थी मानवसृष्टीत परस्परविरुद्ध भावनांच्या झटापटींचे दाखले नेहमीच आढळणार. त्यांतून निश्चित सिद्धांत काढून वास्तवीक परिस्थितीचें रूप निस्पृहपणें जगापुढें मांडण्याचें कर्म फार बिकट आहे. हें न्यायाधीशाचें कर्म बजावणारा असामी रामशास्त्र्याच्या मसाल्याच्या असावा लागतो. इतिहास संशोधनाचा धंदा करणारे आधुनिक राजवाडे भावे देव प्रभृति लोक विद्वत्तेच्या किंवा कार्यैकनिष्ठतेच्या बाबतींत खानदेशी श्रीखंडापेक्षां कितीहि घट्ट असले, तरी पेशव्यांच्या सैतानशाही परंपरेचें रक्त त्यांच्या धमन्यांत सणाणत असल्यामुळें ऐतिहासिवक निर्णयकर्माच्या बाबतींत त्यांची नालायकी इतिहाससिद्ध आहे. त्यांनीं रामशास्त्र्याच्या निस्पृह निर्णय-कौशल्याचा दिमाख चित्पावनेतर अफाट महाराष्ट्रीयपुढें तरी मिरविण्याचें साहस करूं नये. मराठ्यांच्या इतिहासाविषयी या लोकांच्या सिद्धांतांची मराठ्यांना (अखिल चित्पावनेतर महाराष्ट्रीयांना) मुळींच जरूर नाही. उलट सुलट दस्तऐवज नेहमींच सांपडणार. परंतु त्यांच्या अस्सल कम अस्सलपणाचा निर्णय ठरवायला स्वराज्यद्रोही पेशव्यांच्या सांप्रदायिकांनीं विनाकारण आपली हिणकस देशप्रीति जाहीर लिलावांत विक्रीस काढूं नये. जनतेचाच जेथें या लोकांवर सर्व बाबतींत पूर्ण अविश्वास व अनादर, तेथें यांच्या सिद्धांत-कौमुदीचें चोज पुरवायला त्यांच्या

बगलबच्चांशिवाय दुसरा कोण लाभणार? ब्राह्मणेतर दुनियेला पायांतलीं खेटरें ठरविण्यासाठीं खोटे बनावट (अ) धर्मग्रंथ राशीगणति लिहून फैलावा करणारे चिंतामणराव सांगलीकर, निळकंठ शास्त्री थत्ते, मराठ्यांच्या स्वराज्याबरोबरच त्यांच्या इतिहासाची साधनें जाळून पोळून फस्त करणारा बाळाजीपंत नातू, बनावट कारस्थानांची उभारणी बेमालुम करण्यासाठीं खोटे शिक्के सह्या करारनामे वगैरेची पुणेरी टांकसाळ काढणारा बाळकोबा तात्या केळकर, असलीं इरसाल 'राष्ट्रीय' रत्नें ज्या खाणींत पैदा झालीं, त्याच खाणींतल्या बृहस्पतींनीं ऐतिहासिक सिद्धांत-निरुपणाचे खरे राजवाडें हेच असा कितीहि कंठशोष करून दुनियेला चकविण्याचा भाव धरला, तरी त्यांच्या पुरणांवर कोण विश्वास ठेवणार? आजहि दुनियेला झुकविणारें व भविष्यकाळाच्या इतिहासज्ञांची सपशेल दिशाभूल भरणारे वाङ्मय 'राष्ट्रीय' सज्जन निर्माण करीत आहेतच कीं नाहींत ! मिसेस ॲनी बेझंटनें मैत्रेयावताराचा पुकारा करतांच, अवतारकृत्याचा पोरखेळ म्हणून कोलाहल करणारा केसरी आज कै. टिळकांच्या बाबतींत कसले खेळ खेळत आहे? टिळकांच्या एका कल्याणानें तर त्यांना चतुर्भुज विष्णु बनवून पुणेरी पगडी जोड्यासह शेषाच्या उरावर नेऊन बसविलें आहे. आणखी शंभर वर्षांनीं 'टिळकांना दोन हात होते की चार हात होते? टिळक देव कीं माणूस?' असल्या वादविवादावर टिळकांचा शेषशायी फोटो प्रमाणभूत मानून 'ते चार हाताचे ईश्वर होते' असा ऐतिहासिक सिध्दांत त्या वेळचे एखादे भावे किंवा राजवाडे खास ठरवतील. इतकेंच नव्हें तर रामकृष्णादिकांप्रमाणें टिळकमहात्म्याचा पावनपणा सिद्ध करणारा ओवीबद्ध टिळकायण ग्रंथ आजच कोणीतरी खरडीत बसला असेल. इतका भरपूर दस्तऐवजी व फोटोग्राफी पुरावा जरी पुढें आला, तरी भविष्यकाळीं टिळकांचा खराखुरा माणुसपणा सिद्ध करणारा विरोधक त्या वेळीं खात्रीनें अस्तित्वांत असेलच. परंतु राष्ट्रीयांच्या राष्ट्रीय प्रयत्नांचा रोंख मात्र भावी इतिहासाला कसा घोंटाळ्यांत टाकणारा आहे, एवढेंच येथें दिग्दर्शित केलें आहे. भविष्य काळाला ठकविण्याची ज्यांची चतुराई इतकी दूरदृष्टीची, त्यांनींच भूतकालांतल्या गोष्टींना आपल्या कल्पनांचे बरे वाईट रंग फांसटून, तर्काच्या हातबोटावर त्या वाटेल तशा नाचविल्या तर आश्चर्याला जागाच कोठें उरते?

चित्रमय जगतमधिल 'शिवाजीची वंशकुळी' हा लेख श्री. भावे यांनीं 'आधीं सिद्धांत मग संशोधन' याच धोरणानें खरडलेला आहे. शिवाजीला राज्याभिषेकसमयीं ब्राह्मणांकडून जो उपसर्ग पोंचला, त्या विषयीं आधुनिक ब्राह्मणबुवांना हरहमेश लज्जेनें खालीं मान घालण्याचे प्रसंग येतात. विशेषत: सार्वजनिकत्वाच्या ढोंगाखालीं स्वत:च्या तुंबड्या भरण्याचें कार्य साधण्यासाठी राष्ट्रीय ब्राह्मणांनीं जेव्हां शिवाजी-उत्सवाला डोक्यावर घेऊन नाचण्याची सुरवात केली, तेव्हांपासून तरी शिवकालिन ब्राह्मणांच्या कृतघ्नतेचें व शिरजोरपणाचें मोठमोठें काटे राष्ट्रीय चळवळ्यांच्या पायांत विशेष ठळक रीतीनें रुतूं लागले. शिवाजीला विरोध करणाऱ्या ब्राह्मणांच्या उपसर्गाबद्दल स्पष्ट स्पष्ट पुरावे देणारे शेंकडों कागद आजपर्यंत इतके उपलब्ध झालेले आहेत, आणि खुद्द राजवाड्यांनी सुद्धां आपल्या बहुमोल खडांत ते प्रसिद्ध केले आहेत, कीं ब्राह्मणांच्या हरामखोरीचा तो पुरावा उलथून पाडण्यासाठीं शिवभारताचा कर्ता परमानन्द भठचसा काय, पण श्री. भावे यांनी अखिल ब्राह्मण समाजाच्या बेचाळीस पूर्वजांना जरी मदतीला बोलाविलें तरी तो मृत्युलेखा इतकाच अनिवार्य व चिरंजीव राहाणार आहे. तथापि शिवकालीन ब्राह्मणांच्या भिक्षुकशाही शिरजोरपणाच्या धडाडलेल्या होळींवर आपल्या विद्वत्तेच्या उपरण्याचे पांघरूण घालून त्याची धग किंचित थंड पाडण्याचा त्यांनीं प्रस्तुत जो अव्यापारेषु व्यापार केला आहे, तो पाहून

त्यांच्या प्रयत्नाबद्दल जरी एखाद्या राष्ट्रीय प्राण्यानें त्यांचा सकौतुक गौरव केला, तरी साधारण बुद्धिमत्तेचा मनुष्यसुद्धां त्यांची कींव केल्याशिवाय राहणार नाहीं शिवाजी महाराज आणि शिरजोर ब्राह्मणवर्ग यांचा परस्पर संबंध किती 'प्रेमाचा' होता, याविषयींचे पुरावे महाराष्ट्राला आज भाव्यांपासून घ्यावयाचे नाहींत. आज महाराष्ट्रांत असें एकहि सुशिक्षित कुटुंब आढळणार नाहीं कीं ज्याला शिवराज्याभिषेकोत्सव प्रसंगीं ब्राह्मणांनीं धर्माच्या नांवावर खेळलेल्या धुळवड शेणवडीची माहिती नाहीं. परंतु सिद्धांताला संशोधनाचा बाप ठरविणाऱ्या श्री. भाव्यांना हा प्रचलित इतिहास उलथून पाडण्यासाठीं दोन सिद्धांत सिद्ध करावयाचे आहेत आणि म्हणूनच त्या धोरणानें त्यांनीं कांहीं सटरफटर आधार जमा करून आपली विधानें रंगविण्याचा प्रयत्न केला आहे. ते सिद्धांत हेच (१) शिवाजीविरुद्ध ब्राह्मणांनीं कोणतेहि आक्षेप घेतले नाहीत किंवा कसलाहि धार्मिक बखेडा केला नाहीं आणि (२) बाळाजी आवजीनें गागा भट्टाला दक्षिणेंत आणण्याची जी खटपट केली तिची कांही जरूर नव्हती; तो त्या रिकामटेकड्यानें स्वत:च्या स्वार्थासाठी हकनाहक उपद्व्याप केला. सारांश आमचे लेखनकुशल विश्वामित्र ब्राह्मणांच्या थडग्यांवर उमटलेली पागलपणाची सृष्टि अलगज उचलून बाळाजी आवजीच्या थडग्यावर निर्माण करण्याची खटपट करीत आहेत. श्री. भावे ह्मणतात ''बाळाजी आवजींनीं उत्तरेस श्रीक्षेत्र काशी येथें जाऊन मोठ्या मिनत वारीनें गागाभट्टाची समजूत काढून केवळ राज्याभिषेक समारंभासाठी त्यास दक्षिणेंत आणिलें, हें ह्मणणेंहि बरोबर नाहीं.'' याचें कारण ''गागा हा शिवाजी महाराजांच्या जुन्याच परिचयाचा होता,... आणि त्याला आणण्यांत बाळाजी आवजीच्या दगदगीची व श्रमसाहसाची मुळींच अपेक्षा नव्हती.'' भले बहाद्दर ! कलमाच्या एका फटकाऱ्यानें आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व बखरी आणि जस्टिस रानडे तेलंगांपासून तों राजवाडे सरदेसाई सान्यांपर्यंत दरोबस्त इतिहाससंशोधक श्री. भावे यांनी अव्वल नंबरचे पागल ठरविले! याचें नांव इतिहास-संशोधन. याला आधार कशाचा? तर एका शिवभारत नामक पोथीचा. पोथीशिवाय आमच्या चित्पावन संशोधकांच्या अकलेचा 'दीप' कधींच पाजळला जायचा नाहीं. आश्चर्य वाटतें तें हेंच कीं शिवभारतापेक्षांहि शेंकडों कागदपत्रांचे दस्तऐवजी महाभारत ब्राह्मणांच्या उरावर तेव्हां आदळलें असतांहि, त्यांच्या धार्मिक गुंडगिरीची तीव्रता कमी झाली नाहीं, ती आतां भाव्यांनीं परमानंदभटाचें चोपडें उकरून काढलें ह्मणून थोडीच होणार आहे? परमानंद भटाच्या शिवनिष्ठेवर अखिल ब्राह्मणांचीं शिवद्रोहोनं काळी ठिक्कर पडलेलीं तोंडें उजळ होणें शक्य नाहीं. हेंचसें काय, पण गागाभट रायगडास आल्यावरसुद्धां, ''राज्याभिषेकाच्या वेळेस लागणारे मंत्र गागाभट्ट ह्मणेना; सबब राजकीय धोरण त्याजपुढें मांडावें लागलें'' (मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष पृ. १६३) हें कशाचें लक्षण? ''राज्याभिषेकापूर्वी अनेक वर्षे महाराष्ट्रांतील विद्वान् वैदिक ब्राह्मणांस महाराजांचें क्षत्रियत्व पूर्णपणें मान्य होतें'' याचें काय? या प्रकरणाचे इतके मुबलक दस्तऐवजी पुरावे आजपर्यंत प्रसिद्ध झालेले आहेत आणि त्यांत ब्राह्मणांनीं शिवाजीला दिलेल्या कृतघ्नतेच्या उपसर्गाबद्दल इतकी स्पष्टस्पष्ट एकवाक्यता आहे कीं ब्राह्मणांच्या नकली उदारमतवादित्वाचें भाव्याचें हें चित्पावनी पुराण एखादें शेंबडें पोरसुद्धा मान्य करणार नाहीं. भावे म्हणतात, ''मालोजी राजे हे ब्राह्मणांकरवीं आपले घरांत अग्निहोत्र चालवीत, व ब्राह्मण तो विधि यथासांग संपादित असत'' असें शिवभारताच्या १ल्या अध्यायांत म्हटलें आहे. पोथी लिहिणारा शिवनिष्ठ असल्यामुळें, त्याने आपल्या तत्कालीन जातभाईंच्या मताची पर्वा न करितां, शिवाजी महाराजांविषयीं आदर व्यक्त करण्यासाठीं असलें एखादें विधान घुसडलें

असल्यास नवल नाहीं. चिटणीशी बखरींत सुद्धां शिवाजीच्या प्रबुद्धतेची माहिती देतांना षोडश विद्या आणि चौसष्ट कलांची सुप्रसिद्ध यादी मोठ्या भाविकपणानें त्यानें उद्धृत केली आहे. म्हणजे त्यावरून शिवाजी महाराज हे चांगले गाणारे, नाचणारे, जुब्बा खेळणारे होते, असें विधान करणें पोरकट ठरल्याशिवाय कसें राहील. शिवाज मालोजीची पिढी व शिवाजीची पिढी यांत कांही शतक दोनशतकांचें अंतर थोडेंच होतें? मालोजी जर खराच अग्निहोत्री असतां तर शिवाजीवर शूद्रत्वाचें काहूर उठलें तेव्हां चाणाक्ष बाळाजीकडून नुसता नेत्रसंक्षेप होतांच शिवाजीनें आपल्या घरांतून आज्याचें अग्निपात्र आणवून 'क्षत्रियत्वाचा हा घ्या पुरावा' म्हणुन शिरजोर ब्राह्मणांच्या थोबाडावर तें भिरकवण्यास केव्हांहि कमी केलें नसतें; किंवा आपल्या आजाच्या घरांत 'यथासांग अग्निहोत्र' चालविणाऱ्या भटांना तात्काल बोलावून त्यांच्याकडून विरोधी ब्राह्मणबुवांची आहुति त्याच अग्निकुंडात द्यायला खास मागें पुढे पाहिलें नसतें. एवढे मोठे जाडजूड इतिहास-संशोधक आणि त्यांना एवढी साधी गोष्ट उमजूं नये? मालोजीच्या घरांत जर अग्निहोत्र होतें, तर त्याचा मुलगा शहाजी आमरण मुंजीशिवाय कां राहिला आणि राज्याभिषेकाच्या घटकेपर्यंत शिवाजींचीहि मुंज कां झाली नाहीं, याला श्री. भाव्याचें काय उत्तर आहे? खुद्द मालोजीची तरी मुंज झाली होती काय? परंतु शिवाजी महाराजांविरुद्ध ब्राह्मणांच्या बापजाद्यांनीं केलेल्या भिक्षुकशाही बंडाचा अधमपणा झांकण्यासाठीं आणि बाळाजी आवजीच्या कामगिरीला 'कवडीमोल उपद्व्याप' ठरवून त्याला पागल बनविण्यासाठी हे विचित्रवीर्य संशोधक आपल्या अकलेचे तारे कसे तोडतात तें पहा. ''महाराष्ट्र विद्वान भिक्षुकांना महाराजांचें क्षत्रियत्व पूर्णपणें मान्य होतें. तसेंच तें इतर महाराष्ट्र ब्राह्मणांनाही मान्य व मंजूर होतें. इतर ब्राह्मणांना त्याचा प्रत्यय पुरावा रोजच्या रोज दिसत होता. शिवाजी महाराजांनी आपल्या तरवारीनें तें उत्तम प्रकारें शाबित केले होतें. व तशांतूनहि कोणास शंका असल्यास ते वाटेल तेव्हां तें सिद्ध करण्यास आपली तरवार घेऊन तयार असत. हें शाबीत करण्यास कोणाहि मध्यस्थाच्या लटपटीची गरज नव्हती. शिवाजी राजांचें मौजी बंधन राज्याभिषेकापर्यंत केलें गेलें नव्हतें. वयाच्या ४५ व्या वर्षापर्यंत मौंजी बंधन न होणें ही बाब जरा नवलाची असली तरी एकंदरीनें गौण आहे. असल्या सवयींचा दरकार महाराष्ट्रानें केव्हांच केला नाहीं. अिोहो! व शिवाजीचे क्षत्रियत्वाबद्दल संशय दाखवून राज्याभिषेकास अडचणही उभी केली नाहीं.'' मराठे बांधवांनो, विप्रोत्तम भावे यांचें हें अनन्य शिवनिष्ठेचें पुराण ऐकून शिवकालीन् ब्राह्मणांबद्दल तुमची आढी आतां सोडून द्या आणि ती 'उपद्व्यापी मध्यस्थ' बाळाजी आवजी विषयीं अत:पर धरा. इतकेंच नव्हे, तर शिवकालीन ब्राह्मणांच्या या सात्विकतेचें उतरायीं होण्यासाठीं, पुण्याच्या नियोजित शिवाजीस्मारकाच्या शेजारीच अखिल महाराष्ट्रीय ब्राह्मण समाजाच्या वतीनें साळसूदपणाची वकीली करण्यास पुढें सरसावलेल्या या उलट्या बाहुल्याच्या चित्पावन संशोधकासाठीं एक जयस्तंभ उभारा. अत:पर चिटणीस-सांप्रदायिक 'लटपट्या मध्यस्थ' कायस्थांच्या नादीं मुळींच न लागतां, यमाजी शिवदेव, नानाफडणीस, नारायणराव पेशवे, छत्रपतींच्या राजघराण्याची बडदास्त ठेवणारे रावबाजी, बाळाजीपंत नातू, भरदिवसा पुण्याची होळी करणारे महात्मा हरीपंत भावे इत्यादि थोर थोर सात्विक अवतारी पुरुषांच्या 'राष्ट्रीय' वंशजांची कांस धरा. म्हणजे मुळशी पेट्यांतल्या धरणासारख्या अनेक इहलोकच्या वैतरण्या पार पडून, 'राष्ट्रीय' संदेश आहे. हे 'लटपटे मध्यस्थ' कायस्थ तुमचा घात करतील. सात्विकतेचे अर्क जे ब्राह्मण त्यांनीं शिवराज्याभिषेकास मुळींच कांहीं विरोध केला नाहीं. कशावरून म्हणतां?

एन ४००६--१९

कशावरून म्हणजे? अहो, राज्याभिषेक कसा साजरा झाला त्याचा इतिहास पहा. तो पाह्यला फुरसद नसेल तर भाव्यांचा सूत्रात्मक 'राष्ट्रीय' वेदान्त पहा. भावे जेहेते म्हणतात ''त्या उत्सवास समर्थ राम दास स्वामींनीं पूर्ण सहाय्य केलें. मोरोपंतांनी अभिषेक केला. हणमंत्यानीं पवित्र जलसिंचन केलें. गागाभटजींनीं मंत्र म्हटले. व हजारों ब्राह्मणांनीं आशिर्वाद देऊन आपली पूर्ण संमति जाहीर केली.'' घ्या. ब्राह्मणांच्या स्वराज्यप्रेमाचा आणि छत्रपति निष्ठेचा आणखी पुरावा काय पाहिजे? रामदासापासून तों आशीर्वाद द्यायला (भीक मागायला नव्हे !) रायगडावर धांवत पळत आलेल्या पांच हजार भिक्षुकांपर्यंत पाहून घ्या सारे एकजात ब्राह्मण. कायस्थ मराठे प्राणी सारे ठार मेले होते कीं काय नकळे ! पण त्याचाहि खुलासा श्री. भावे येणेंप्रमाणें करतात. ''पण या प्रकरणांत ज्यांस आपला हेतूं कांही साधला नाहीं ते मात्र तोंडानें नुसती वटवट करीत हात चोळीत बसले व राज्याभिषेकाच्या ज्येष्ठ म हिन्याचा त्यांनीं फाल्गुन मास केला.'' चित्पावनी पेंचाची एकच टांग मारतांच शिवाजीचा इतिहास पहा आमच्या भाव्यांनीं कसा उलटा पालटा केला तो ! ज्येष्ठांत फाल्गुन उरकणारे कोण? भाव्यांचे पूर्वज ब्राह्मण तर खास नव्हत; कारण ते सारे राज्याभिषेक विधींत गुंतले होते. कोणी 'पूर्ण सहाय्य' देत होते, कोणी 'जलसिंचन' करीत होते आणि बाकीचे 'आशिर्वाद' घोष करीत होते. अर्थात् असा हा मंगलविधि चालूं असतांना शिमग्याच्या शंखध्वनींत फक्त ब्राह्मणेतर, विशेषत: कायस्थ प्रभू, त्यांतूनहि विशेषत: बाळाजी आवजी चिटणीस हेच काय ते रममाण झाले होते, असा भाव्यांचा राष्ट्रीय सिद्धांत आहे.

इतकें नीच वृत्तीचे बेजबाबदार विधान, राजवाड्यांच्या 'कायस्थदीप' प्रबंधानंतर आज पांच वर्षांनी पुनश्च महाराष्ट्रीयांपुढें येत आहे. ज्येष्ठांतच शिमगा काय, पण बाराहि महिने अष्टौप्रहर ब्राह्मणेतरांच्या नांवानें बोंबाबोंब करण्यास सवकलेल्या या अकलेच्या धसांना, या चित्पावन इतिहास संशोधकांना आम्ही पुनश्च बजावून ठेवलें की अशा प्रकारच्या मल्लीनाथी बुरख्याखालीं प्रत्यक्षाप्रत्यक्ष होणारी बदनामी निमूटपणें सहन करण्याइतका ब्राह्मणेतर समाज आज मेलेला मुडदा नव्हे. बाळाजी आवजीच्या राष्ट्रसेवेला कवडीमोल ठरवून लोणकड्या थापांनी मराठे बांधवांच्या सहानुभूतीला बगलेंत मारण्याचा तुमचा राष्ट्रीय कावा न ओळखण्याइतके तेहि आज भोळसट राहिलेले नाहींत. शिवकालीन ब्राह्मणांच्या हरामखोरपणाचा विस्तार केवळ मराठी दप्तरांतच मर्यादित झालेला नसून, त्याच्या पाळ्यामुळ्या परकीय वखरकारांनीं महाराष्ट्रांतून स्वत: उपटून नेऊन पुराव्यासाठी नीट जपून ठेविल्या आहेत. बाळप्रभू चिटणीसाच्या, किंबहुना तत्कालीन अखिल कायस्थप्रभू समाजाच्या उज्वल पराक्रमानें हतप्रभ ठरलेल्या चित्पावन समाजांतल्या राष्ट्रीय पंडितांनो, बाळप्रभू चिटणीसाच्या घराण्यावर स्वार्थलोलुपतेचा व 'लटपट्या मध्यस्थी' चा म्हणजेच जवळजवळ उपद्व्यापीं कुंठणपणाचा आरोप करण्यापूर्वी दहा अंक मोजून तुमच्या बेजबाबदार कृतघ्न लेखणीचा टांक न तोडाल तर, आम्हां मानवी सल्लागारांच्या शक्ति जरी उद्यां निसर्गधर्मानुरूप थंड पडल्या तरी, शिवरायानें कायस्थांच्या आणि मावळ्यांच्या रक्तानें प्राणप्रतिष्ठा केलेलीं ती महाराष्ट्राची जीवनदेवता तुमच्या जिभलीचे राइराइ टांक तोडल्याशिवाय खास रहाणार नाहीं, हें लक्षांत ठेवा.

□□□

टिपण

शूर वीर प्रभाकर सुळे

लढतां लढतां ठार झालेल्या या तरुण मर्द वीराच्या आत्मयज्ञाचा इतिहास प्रबोधनाच्या १० व्या अंकांत (पृ. ७८-७९) प्रसिद्ध झाला आहे. ज्या दरोडेखारांशी वीर प्रभाकर व त्याचा वडील बंधु गॅलंड बाळाभाई लढले, त्यांना, सेशन जज्ज ऑन. मि. जस्टिस सी. ए. किंकेड यांनीं, जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावली. जजमेंटमध्यें पोलीस इन्स्पेक्टर मेसर्स फेर्न, कर्णिक, गोळे, वागळे आणि राजे यांनीं या जबरदस्त व भयंकर दरोडेखोरांना पकडण्यांत दाखविलेल्या धाडसाची व चतुराईची तारीफ करून, शूर वीर सुळे बंधूंविषयीं खालील प्रमाणें अभिप्राय नमूद केला आहे:-

"I would wish to say a word of praise of the gallantry shown by the Sule Brothers in coming unarmed, as they were, to the help of their neighbour Mohansing Devchand. One of the Prabhakar was foully murdered, and the other Jayaram was severely wounded. I hope that this public expression of the Court's high appreciation of his own and his brother's conduct may in some slight way soothe the grief that he feels at his brother's death." (भावार्थ :- सुळे बंधु नि:शस्त्र असतांहि, त्यांचा शेजारी मोहनसिंग देवचंद याच्या मदतीला धावून जाण्यांत त्यांनीं जें धडाडीचें शौर्य प्रगट केलें, त्याबद्दल मी त्यांना शाबासकी देतों. या बंधूंपैकी प्रभाकर क्रूर रीतीनें ठार मारला गेला व जयराम (बाळाभाई) ला अनेक भयंकर जखमा लागल्या. स्वत:च्या व (कालवश झालेल्या) भावाच्या मर्दुमकीबद्दल या कोर्टानें जाहीर रीतीनें केलेली ही उच्च स्तुति, बंधुवियोगामुळें जयरामाला होणाऱ्या शोकवेदना अत्यल्प प्रमाणांत का होईना, शमविण्यास समर्थ होईल अशी मला आशा आहे.) या पूर्वी मुंबईच्या पोलीस कमिशनच्या हस्तें मुंबई सरकारनें पांचशें रुपयांची थैली व मर्दुमकीचा दाखला (गॅलंट्री सर्टिफिकेट) गॅलंट बाळाभाई यास देऊन, 'मर्दाचा पोवाडा मर्दानें गावा' या नात्यानें आपली रसिकता व्यक्त केलीच होती. आतां सेशन कोर्ट व ज्यूरी यांनीं एकमुखानें या मर्द बंधूंना जाहीर शाबासकी देऊन, त्या रसिकतेची वाजवी योग्यता ठरविली. आता तरी वीर प्रभाकर स्मारकाचा प्रश्न नेटानें सिद्ध करण्याची खटपट तरुण मंडळी करतील, अशी आम्हांला आशा आहे.

□□□

एन ४००६--१९अ

विडंबन

शिवाजी ब्राह्मण होता

(एक नवा ऐतिहासिक शोध.)

(पत्रव्यवहार)

आजकाल ब्राह्मण ब्राह्मणेतर वादात ब्राह्मणेतरांची मुख्य भिस्त श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांवर असते. महाराजांसारखा पराक्रमी व उदारचरित पुरुष गेल्या हजार वर्षांत हिंदुस्थानांत जन्मला नाहीं, ही गोष्ट, कट्ट्या ब्राह्मण्याभिमानी बुजरुकाला देखील कबूल करणें भाग पडतें. महाराजांनीं म्लेंच्छांच्या ताब्यांतून हिंदमाता सोडविली व तिच्या मांडीवर हिंदवी स्वराज्याचें गोंडस बाळ बसविलें ही गोष्ट कोण ना कबूल करूं शकेल? ब्राह्मणांच्या शेंड्या व गाईच्या मुंड्या मुसलमान खाटिकांच्या कात्रींतून वांचविल्यामुळें महाराजांना गोब्राह्मण प्रतिपालक ही पदवी अखिल हिंदुस्थाननें अर्पण केली. ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. तेव्हां ब्राह्मणांची बाजू मजबूत करावयाची असल्यास ब्राह्मणेतरांना असलेला या महापुरूषाचा आधार काढून घेतला पाहिजे. त्या शिवाय ब्राह्मणांना या वादात तरणोपाय नाहीं, अशी आमची खात्री झाली, त्या दिशेनें आम्ही प्रयत्नही करूं लागलों. कारण या महापुरुषाचा मोठेपणा कमी लेखला तर ब्राह्मणच जगांत मूर्ख ठरणार! माझ्यापेक्षां सूर्याचें तेज फार कमी असतें असा काजव्यानें कितीही कंठशोष केला तरी जगावर त्या आरडाओरडीचा परिणाम थोडाच घडणार? सूर्यप्रकाशापेक्षा काजव्यांची लुखलुख श्रेष्ठ असें जग म्हणणें नाही. तसा प्रयत्न आम्ही कट्ट्या धर्मनिष्ट ब्राह्मणांनी केला नाही असें नाहीं. कारण प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तोलहि गळे! रामदास स्वामींना पुढें करून शिवाजी महाराजांना त्यांच्या आड दडविण्याचा आम्ही पुष्कळ प्रयत्न करून पाहिला. प्रसंगी दादोजी कोंडदेवालाही पुढें करून पाहिलें. स्वराज्य स्थापण्याची सर्व करामत समर्थ रामदासांची, शिवाजी केवळ त्या गोष्टींना नाममात्र कारण झाला, असें आम्ही प्रतिपादिलें. परंतु स्वराज्याचा बराचसा विस्तार होण्यापूर्वी छत्रपतींची व समर्थांची भेट देखील झाली नव्हती असें कागदोपत्री सिद्ध झाल्यामुळें, हा उभारलेला वाळूचा मनोरा जमीनदोस्त झाला. दादोजी कोंडदेव हा स्वामिभक्तपरायण असला तरी छत्रपतींच्या स्वराज्य स्थापनेला तो प्रतिकूलच होता. कारण मुसलमानी शक्तीपुढें कांही चालावयाचे नाहीं, उलट जी थोडीबहुत जहागीर होती ती देखील जप्त झाल्याशिवाय राहणार नाहीं, असे त्या बिचाऱ्याला वाटे आणि म्हणून शिवाजी महाराजांच्या पराक्रमाला शक्य तेवढा प्रेमाचा मोडता घालण्याचाच त्यानें प्रयत्न केला.

हे दोन्ही प्रयत्न सपशेल ढांसळून पडल्यामुळें ब्राह्मण्यावर मोठेंच संकट आलें, व ब्राह्मण्यसंरक्षक संस्थांची व त्यांच्या अधिकारीवर्गाची फारच तारांबळ उडाली. अशा संकटांच्या वेळीं धावून गेला नाहीं तर तो ज्ञातिबंधू तरी कसला? यामुळें आम्हीही ब्राह्मणेतरांचा हा प्रमुख आधार कसा डळमळवतां येईल या विचारांस लागलों, आणि प्रयत्नांती परमेश्वर या वचनावर विश्वास ठेवून कार्यालाही लागलों. आम्ही लावलेला ऐतिहासिक शोध अतीशय महत्वाचा असून तो प्रसिद्ध झाल्यावर ब्राह्मण्यसंरक्षकांची बाजू चांगलीच सावरेल असी आमची खात्री आहे. वरच्या फांद्या फुलें खच्ची करण्यापेक्षां मूले कुठारः हा उपाय अधीक परिणामकारक असतो आणि म्हणूनच आम्ही या विषयाच्या मूळालाच हात घातला आहे. आमचा शोध ठाणें येथील प्रसिद्ध चित्पावन इतिहास-संशोधकाला पुराच आवडला असून तो त्यांच्या शिफारसीसह आम्ही पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळाला नजर करतों. या शोधानें ब्राह्मण्याची ध्वजा आणखी कांही काल तरी उंच फडफडत राहील अशी आमची खात्री आहे. वरपांगी जरी आमच्या शोधाशीं त्यांनी सहकार्य दाखवीलें नाहीं, तरी कुठली तरी जुनीपुराणी खरीखोटी दफ्तरें संशोधून ब्राह्मणांचें निष्कारण स्तोम माजविणाऱ्यांना आमच्या या शोधाने मनांत तरी गुदगुल्या होतील आणि म्हणूनच त्यांना आम्ही तो शोध नजर करतों. आम्ही जें हें नवीन ऐतिहासिक सत्य निर्माण केलें आहे, त्याचे पुराव्यासकट माप वाचकांच्या पदरीं खालीं टाकत आहों, त्यावरून या शोधाच्या सत्यतेविषयीं कुठेंच दुमत राहणार नाहीं, अशी आमची खात्री आहे.

आमचा नवा शोध

शिवाजी हा ब्राम्हण होता.

हाच आमच्या ऐतिहासिक संशोधनाचा सिद्धांत! आमचा सिद्धांत ज्या आधारावर बसविला आहे, ते खाली दिले आहेत. तेव्हा वाचकांनी भांबावून न जातां खालीलप्रणाणें वाचून आपली खात्री करून घ्यावी!

(१) शिवाजी हें नांव शंकराच्या नांवावरुन निघालें हें उघड आहे. देवाची पूजा करण्याचा अधिकार मुख्यत: ब्राह्मणांना असल्यामुळें त्यांची देशभक्ति इतरांपेक्षां साहजिकच श्रेष्ठ दर्जाची असणार. पंढरपूर येथें सार्वजनिक कार्य करणारे एक राष्ट्रीय चित्पावन वकील आहेत. त्यांच्या वडलांचें शिवाजी हेंच नांव आहे. या ब्राम्हणी नांवावरून शिवाजी ब्राह्मण असावा असे स्पष्ट दिसतें.

(२) शिवाजीच्या अंगांत संकटाच्या वेळीं तुळजापूरच्या देवीचा संचार होत असे, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. या कलियुगांत माणसांना धर्मा-धर्माचा विधीनिषेध राहिला नाहीं ही गोष्ट खरी असली, तरी देवदेवता खास इतक्या स्वाभिमानशून्य झाल्या नाहींत कीं त्या एखांद्या मराठ्याच्या अंगांत खुशाल संचार करतील. एखादी सटवाई अथवा एखादा म्हसोबा ब्राम्हणेतराशीं क्वचित् सलगी करील. परंतु तुळजापूरचें जागतें दैवत ब्राम्हणाशिवाय दुसऱ्याच्या अंगांत संचार करावयास येणें शक्य नाहीं. वर्णानाम् ब्राम्हणे गुरुः हें स्मृतिवचन देवीला खास माहीत असलें पाहिजे. तेव्हा तपोश्रेष्ठाकडेच जाणार हें उघड आहे. यावरुन शिवाजी ब्राह्मण होता या सिद्धांतास दुजोरा मिळतो.

(३) शिवाजीला 'गो ब्राम्हण प्रतिपालक' अशी पदवी लोकांनी दिली होती. ही गोष्ट महशूर आहे. ब्राम्हणांनी लिहीलेल्या पोथ्यांतून देखील या पदवीनेंच शिवाजीचा उल्लेख होतो. स्वत:च्या पोळीवर तूप ओतून घेण्याची ब्राम्हणी प्रवृत्ती पाहिली. म्हणजे ब्राम्हणाशिवाय इतरांला ते असे गौरवून संबोधतील हें

शक्यच दिसत नाही. यावरून शिवाजी ब्राम्हण होता या सिद्धांताला अधीकच पुष्टी मिळते.

(४) शिवाजी गागाभट्ट या ब्राम्हणानें मंत्रोक्त राज्याभिषेक केला ही ऐतिहासिक गोष्ट घ्या. इंग्रजांचे राज्य झाल्यावर व समता आणि स्वातंत्र्य यांचा या देशांत इतका जयजयकार होत असतां देखील जर कोल्हापूरला ब्राम्हणांकडून वेदोक्ताचे असे धिंडवडे काढले जातात, तर शिवाजीच्या वेळीं ब्राम्हण किती कर्मठ असतील याचें कल्पनेनेंच अनुमान बसवावें. तेव्हां गागाभट्टानें ज्याअर्थी शिवाजीवर मंत्रोक्त अभिषेक केला, त्याअर्थी शिवाजी ब्राह्मण होता ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे. ब्राह्मणाव्यतिरिक्त दुसऱ्यांच्या घरीं ब्राह्मण मंत्रोक्त कर्मे करतील असें प्रतिपादणें हें त्यांच्या आजपर्यंतच्या अनुदारतेच्या लौकिकाला कलंक लावण्यासारखें आहे. यावरून शिवाजी ब्राह्मण होता या सिद्धांताला अधिकच बळकटी येते.

(५) व्युत्पतिशास्त्रानें तर या सिद्धांताला जोरदार परंतु स्वतंत्र पायाभूत असणारें प्रमाण उपलब्ध होतें. 'भोसले' हे शिवाजीचें आडनांव होतें ही गोष्ट प्रसिद्धच आहे. आता व्युत्पतिशास्त्राच्या दृष्टीनें-

(अ) 'भोसले-भोले-भोळे-भोटे-भोट-भाट-भट' असी आडनांव प्रंपरा रूढ होत गेली असावी. नंबर दोन, चार व सहा ही या आडनांवाची विकृत रूपें होत. तीं सोडून दिली म्हणजे 'भोळे, भोट व भट' अशीं तीन आडनांवें उरतात. हीं तिन्हीं आडनांव ब्राम्हणांचेंच असलें पाहिजे, हें उघडच आहे.

(ब) शिवाजीनंतर मराठी साम्राज्याचे वारस ब्राम्हण पेशवे झाले ही ऐतिहासिक गोष्ट सर्वमान्य आहे. पेशव्यांचे आडनांव भट होतें. यावरून भोंसले ब्राह्मण असावेत, असें सिद्ध होतें. कारण भोंसले ब्राह्मण नसते तर ब्राह्मण पेशवे त्यांचे कायदेशीर वारस होणें शक्य नव्हतें. कोल्हापूर व सातारा येथील मराठे अधिपति बाजूस पडून मराठी साम्राज्याची सूत्रें ज्याअर्थी ब्राह्मण पेशव्यांकडे आलीं, त्याअर्थी आमचा सिद्धांत अधीकच द्दढ होता.

या सर्व प्रमाणांवरून आम्ही ठासून असें प्रतिपादन करतों कीं शिवाजी हा ब्राह्मण होता. इतकेंच नव्हे तर तो चित्पावन ब्राह्मण होता, कारण त्याचे वंशज पेशवें हे चित्पावन ब्राह्मण होते.

एक चित्पावन संशोधक

(प्रस्तुत नवा शोध श्री. भावे राजवाडे वगैरे इतिहास संशोधनेश्वरांना अमोल वाटेल असा भरंवसा आहे. या शोधाला त्यांचा आशीर्वाद मिळाल्यास शिवाजीच्या क्षत्रियत्वाचा वाद मूलतःच बंद पडून, शिवाजीचा वंशकुळीच्या पाळ्यामुळ्यांना हुडकिणारांना व बाळाजी विश्वनाथाच्या बापाच्या पळीपंचपात्रीवर सुभेदारीची लष्करी झूल चढविणाऱ्यांना आपल्या संशोधकी विद्वत्तेची अब्रू वाचवल्याबद्दल आनंद होईल. या आनंदांत व्यत्यय येऊं नये म्हणून 'विश्वामित्री इतिहास संशोधनाचा २ रा लेखांक पुढील अंकापर्यंत शिलकी ठेवला आहे.

□□□

अग्रलेख

तुमचा खेळ होतो, पण आमचा जीव जातो !

म. गांधीनीं नऊ महिन्यांत स्वराज्य मिळविण्याची जाहीरात देऊन, असहकारितेचा धांगडधिंगा चालूं केल्यापासून तों त्यांच्या राष्ट्रीय भक्तांनीं खुद्द त्यांनाच गणेशटोपी चढवून गेल्या गणेशोत्सवाचा शिमगा करीपर्यंत, या चळवळीचीं जीं निरनिराळीं आचरट स्थित्यंतरें झालीं, आणि सध्यां राष्ट्रीयांम ध्येंच जो लटुमटूचा ढोंगी पंथभेदाचा शिमगा सुरू आहे, त्याचा इतिहास विचार करण्यासारखा आहे. देशाला स्वराज्य मिळवून देण्याची प्रतिष्ठा मारणारे स्वयंशिष्ट पुढारीबुवाच जेव्हां आपल्या वाणीचे व आचरणाचे रंग घटकोघटकीं सरड्याप्रमाणें बदलतात आणि अल्लड पोरांप्रमाणें एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून धुळवड शेणवडींत गर्क होतात, तेव्हां अंधभक्तीनें अनुयायी बनलेल्या मेंढ्या टाळकऱ्यांची तर विलक्षण गफलत होतेच होते, पण बिचाऱ्या बहुजनसमाजाची मात्र जिवाग्रीं लागण्यासारखी दिशाभूल होते. ज्याला पेशवाईंतील बारभाईंच्या त्रांगड्याचा, किंबहुना अखिल पेशवाई कारस्थानांचा इतिहास साधारण माहीत आहे, त्यांना प्रस्तुतच्या राष्ट्रीयांच्या राष्ट्रीय ढोंग धत्तुऱ्याचें कांहीं आश्चर्य वाटणार नाहीं. उलट, पुनरावृत्तीच्या बाबतींत चंद्रसूर्यग्रहणांप्रमाणेंच इतिहास किती ताळेबंद बिनचूक असतो, याचें प्रत्यंतर पटेल. स्वराज्याची तळमळ एकट्या राष्ट्रीय प्राण्यांनाच काय ती लागलेली आहे आणि इतरांना नाहीं; राष्ट्रीय सांप्रदायीकच तेवढे देशभक्त आणि बाकीचे देशद्रोही; आणि स्पष्टच बोलायचें तर, स्वातंत्र्याच्या किमयेची भट्टी बिनबिघडतां उतरणारे पुणेरी राष्ट्रीय चित्पावन हेच काय ते पट्टीचे जंतरमंतरवाले, आणि बाकीचे सर्व चळवळे व अफाट बहुजनसमाज शुद्ध नंदीबैल; अशा प्रकारच्या उद्गारांना अगर कल्पनांना पैजारांचा आहेर न करण्याइतकी पशुवत् शिथिल वृत्ति आजला खास अस्तित्वांत नाहीं. बहुजनसमाजाला गुलामगिरींत खितपत ठेवणारी नाक्षरता किंवा अशिक्षितता, आस्ते आस्तेच कां होईना, आज साक्षरतेकडून पराभूत होत असल्यामुळें, खऱ्या खोट्याचें परीक्षण करण्याइतकी जागृति आज बरीच थरारलेली आहे. विशेषत: कर्मन्यायानें पेशवाई सांप्रदायिकांची राष्ट्रीय कुकर्मे पाण्यावरील तेलाच्या तवंगाप्रमाणें दिवसेंदिवस स्पष्ट अनुभवास येत चालल्यामुळें, जनतेवरील आपल्या बीर मंत्राची छाप कायम ठेवण्यासाठीं त्यांना आपल्या खटपटींच्या झटापटी अधिकाधिक तीव्रतेनें हंगामी धाटणीवर

चालविणें भाग पडलें आहे. कौन्सिल का न-कौन्सिल, मुळशी सत्याग्रह, पांढरी गांधीटोपी का भगवी गणेशटोपी, इत्यादि मतभेदाचे जे दिखाऊ वाद आज हमरीतुमरीनें रंगांत आले आहेत व आणखीहि येतील, त्यांच्या मुळांशीं राष्ट्रीयांच्या आत्मवर्चस्वाच्या ऱ्हासाची उग्र चिंताच तळतळत आहे. ही एकच खुणगांठ वाचकांनीं बांधली तर वर्तमान आणि भविष्य काळच्या राष्ट्रीय धांगडधिंग्यांची गणितें ते फटाफट सोडवूं शकतील.

असहकारितेची चळवळ काय, किंवा पराचा कावळा केलेली मुळशी धरणाची चळवळ काय, किंवा कौन्सिल-नकौन्सिल धुळवड काय, यांत शहाण्यासुत्र्यांच्या बुद्धिबळाला यथास्थित तणावे मिळून त्यांच्या विद्वत्तेचे किंवा डावपेंचाचे स्नायू-सॅन्डोच्या डंबेल कसरतीप्रमाणें-जरी बळकट व कणखर बनत असले, तरी मल्लांच्या या कसरतीच्या धांगडधिंग्यांत गरीब बिचारी जनता हकनाहक तुडविली जाते, हें विसरून कसें चालेल? केवळ अनाडी जनताच तुडविली जाते असें नव्हे, तर देशाच्या महत्वाकांक्षा ज्यांवर विशेष अवलंबून, तो तरूण विद्यार्थी वर्ग तर जणूं काय या धांगडधिंग्याचें महत्वाचें खाद्य होऊन बसला आहे. सन १९०७-०८ सालच्या बांब प्रकरणापासून तों चालूं असहकाराच्या बंडाळीपर्यंत अप्रबुद्ध तरूण विद्यार्थ्यांच्या आयुष्याच्या झालेल्या मातीचा इतिहास आंगावर शहारे आणण्याइतका भयंकर आहे. या विषयीं आम्हाला जें कांही लिहावयाचें होतें तें प्रबोधनाच्या १६ व्या अंकांत (पृ. १२६ वर) लिहिलेंच आहे. गोरगरीबांच्या भाविक व हतबल मनोवृत्तीचा फायदा घेऊन, त्यांपासून पिळून काढलेल्या पैशाच्या आणि उत्साही तरुणांच्या बिनमोल उमेदीच्या भांडवलावर आपल्या स्वार्थी कारस्थानांचे डोले नाचविणाऱ्या राष्ट्रीय संप्रदायाला वेळींच पायबंद व तोंडबेडी चढविली नाहीं, तर जनतेच्या हालअपेष्टांची वास्तवीक कल्पना करून देणें फार कठीण काम आहे. जहाल राष्ट्रीय सांप्रदायिकांचा वर्तमान धुडगुसाचा इतिहास आणि मयत पेशव्यांच्या सैतानशाहीचा इतिहास, यांतली मूलतत्वें एकच आहेत, इतकें वाचकांनीं नीट लक्षांत ठेविल्यास, एकच उद्देश साधण्यासाठीं निरनिराळ्या हंगामांत देशभक्तीचे निरनिराळे मुखवटे घालण्याचे प्रसंग त्यांच्यावर कां येतात, यांचें कोडें उलगडणें त्यांना कठीण जाणार नाहीं राष्ट्रीय कंपूंत निरनिराळ्या धोरणांची, भिन्नभिन्न मतांची आणि क्वचित् परस्परविरोधी वर्तनाची अनेक माणसें असल्याचें दिसतें. पण हा सर्व वरचा दिखाऊ थाट असून, त्या सर्वांच्या अंतर्यामीचा मसाला एकजात एकाच धोरणाच्या मुसळानें, एकाच सांप्रदायिक मताच्या उखळींत कांडलेला असतो. बाह्यत: राष्ट्रीय ब्राह्मणांच्या कंपूंत आज जरी चहादाणींतलें वादळ उसळलेलें असलें आणि कार्यपद्धतीच्या भिन्न धोरणाची परस्पर झकाझकी उडत असली, तरी अखेर ते सारे एक होऊन ब्राह्मणेतरांवर आपल्या वर्चस्वाची कुर्रघोडी केल्याशिवाय खास रहाणार नाहींत, हें ब्राह्मणेतरांनीं - नव्हे राष्ट्रीयेतर अखिल ब्राह्मण क्षत्रिय वैश्यादिकांनीं खूप ध्यानांत ठेवावें, असा आम चा स्पष्ट इषारा आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर-वाद मिटविण्यासाठीं पंच महाधूर्तांची कंबक्ति (कमिटी) नेमण्याचा पेण परिषदेंत फार्स करणाऱ्या दांभिकांच्या छावणींतूनच आतां 'ब्राह्मणसंघ' घुबडाचे घूत्कार ऐकूं येत आहेत, हें कशाचें लक्षण? या घुबडाचें जातक वर्तवायला पंचांग संशोधन कंबक्तीचा राष्ट्राळुपणा कोळून प्यायलाच नको! राष्ट्रीय भटांचे प्रत्येक राष्ट्रीय कार्य म्हणजे पेशव्यांच्या सैतानशाहीची पुनर्घटना करण्याची धडपड नव्हे, इतका विश्वास बहुजनसमाजांत उत्पन्न करण्यासारखें

त्यांच्या हातून कांहीएक झालेलें नाही. येथून तेथून सारा पंढरपुरी बडव्यांचा सत्यनारायणी धिंगाणा! म. गांधीनीं यच्चावत् जहाल मवाळादि शिष्टांना गुंडाळून ठेऊन, जेव्हां काँग्रेस काबीज केली आणि आपल्या यंग इंडियाच्या बेगुमान बिगुल-ध्वनीनें त्यांच्या कानठाळ्या बरोबरच दांतखिळ्याहि जाम जखडून टाकल्या, त्या वेळची केसरीच्या राष्ट्रीय पक्षाची दुटप्पी तारांबळ, त्यांची 'हायबागिरी'ची वाचाळपंचविशी; 'कोर्ट कौन्सिल शालानाम् बहिष्कारार्थ' त्यांनीं स्फुंदत स्फुंदत खुद्द केसरींत घातलेलें 'समर्पयामि'चें राष्ट्रीय तर्पण; डॉ. कुर्तकोटी सारख्या ग ची पीडा झालेल्या औट घटकेच्या श्री नें 'नॉन्को-ऑप्रेशन म्हणजेच आद्य शंकराचार्याचा अद्वैतवाद' म्हणून झोडलेलीं भिक्षुकशाही पुराणें; आणि सवंग लोकमान्यता मिळविण्यासाठी, काँग्रेसला आशीर्वाद द्यायला धांवण्यांत त्यांनीं आपल्या तनमन धनाचा केलेला भिक्षुकी सात्विकपणाचा आटारेटा, इत्यादि १९२० सालचीं चित्रें काढून पहा; आणि आज राष्ट्रीयांनीं आपल्या पगड्या फिरवून गांधीला चढविलेल्या गणेशटोपीच्या धांगडधिंग्याचीं चालूं चित्रें पहा; म्हणजे स्वराज्याच्या किमयेच्या भट्टींत गोरगरीबांच्या उरल्या सुरल्या सारसर्वस्वाची आहुती देऊन, स्वत:च्या मिशांना राष्टाभिमानाचे पीळ भरणाऱ्या या दांभिक राष्ट्रीयांवर, किंवा साऱ्या लंकेची होरपळ करून अखेर खादींत घुसणाऱ्या गांधींच्या हनुमान पक्षावर अत:पर कितपत भरवंसा ठेवावा, याचा प्रत्येकानं विचारच केला पाहिजे. हा इषारा आम्ही आजच पहिल्यांदा देत आहोंत, असा प्रकार मुळींच नव्हे. प्रबोधनाचा जन्म होण्यापूर्वी सन १९२० च्या डिसेंबरांत पुणें येथील विजयी मराठा पत्रांत 'लोकशाही कीं भिक्षुकशाही?' या मथळ्याखालीं चार अग्रलेख लिहून, बहुजनसमाजाला या धूर्ताग्रजींच्या सरडेगिरी बद्दल स्पष्ट सूचना दिलेली होती. त्या लेखमालेंतील कांहीं उतारे आजच्या अंकांत इतरत्र पुनर्मुद्रित केले आहेत. आम्हांला ज्योतिषशास्त्र अवगत नाहीं, किंवा त्या शास्त्रावर आमचा काडीमात्र विश्वासहि नाहीं. तथापि सन १९२० सालचें आमचें भविष्य सन १९२२ सालांत किती अक्षरश: तंतोतंत खरें ठरलें आहे, तें विचारी वाचकांनीं स्वानुभवानेंच पटवून घेतलेलें बरें.

गेल्या दीडदोन वर्षांच्या असहकारितेच्या बंडाळीच्या काळाचें समालोचन केलें असतां हेंच प्रत्ययास येईल कीं, (१) राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक किंवा कोणत्याहि क्षेत्रांत देशाची कांहीच प्रगति न होतां, उलट विलक्षण पिछेहाट झाली आहे. (२) भोंदु फंडगुंडांना मनमुराद खाद्य मिळाल्यामुळें आणि दीड दमडीच्या खादीच्या पटकुरानें हजारों स्वार्थसाधू दांभिकांना देशभक्त म्हणून मिरविण्याची पर्वणी आल्यामुळें, प्रत्यक्ष क्रियेपेक्षां बेलगाम वाचाळता बरीच बोकाळली आहे. (३) समाजांत एरवीं ज्यांना कोणी पायांतल्या खेटरांशीं उभे करणार नाहीं, असले नीतिभ्रष्ट व ज्ञानभ्रष्ट लोक ठिकठिकाणीं 'पुढारी' 'देशभक्त' 'देशसेवक' इ. भाडोत्री पदव्यांनीं मंडित होऊन सर्वत्र बोकाळल्यामुळें, त्यांच्या गुंडगिरीनें जनतेला असह्य ताप भोगावा लागत आहे. (४) निरनिराळ्या समाजांतील सहानुभूतीचे धागे तटातट तुटून त्यांच्यात परस्पर बेविश्वासाचा तीव्र फैलाव झाला आहे. (५) असहकाराची चळवळ व इतर तज्जन्य चळवळी विचारांपेक्षां केवळ लोकांच्या विकारक्षुब्धतेवरच थरारणाऱ्या असल्यामुळें आणि त्यांचीं सूत्रेंहि दांभिक स्वार्थपरायण बोलघेवड्यांच्या हातीं दिल्यामुळें, सदसद्विवेक बुद्धीशीं प्रतारणा करून वाटेल तेव्हां खोटें बोलण्याची प्रवृत्ति मनस्वी बळावत गेली आहे. (६) तरुणांची स्वाध्याय-प्रवृत्ति नामशेष होऊन, त्यांच्यांत

कान्हेरी व खुदिरामी खुनशीपणा आणि आचरट माथेफिरूपणा बराच जोर धरूं पहात आहे. (७) क्षुल्लक मतभिन्नतेमुळें, इतर प्रामाणिक देशसेवकांचा सांप्रदायिक ताठ्यानें बीभत्स उपमर्द करण्याच्या टिळकी पद्धतीमुळें, राष्ट्रीय पक्षानें शिवराळपणाचें घाणेरडें व्यसन लोकांत रूढ केलें आहे. (८) हिन्दु मुसलमानांची एकी, अस्पृश्योद्धार, वगैरे बाबतींत नुसत्या कोरड्या गप्पा मारणारे लोकच हिन्दु समाजांत ब्राह्मण-ब्राह्मणेतरासारखे दुहीचे वाद दिवसेंदिवस अधिकाधिक चेतवीत आहेत. सारांश, देशभक्तीच्या ढोंगी मुखवट्याखालीं वावरणाऱ्या स्वार्थी गुंडांनीं आज देशाच्या प्रगतीला खीळ घातली असून, जनतेची भयंकर दिशाभूल केलेली आहे. अशा स्थितींत वाटेल तेव्हां पगडी फिरविणारे राष्ट्रीय लोक, किंवा त्यांच्या हंगामीं मतभिन्नत्वाच्या जखमेवर बेइमानाचें पलीस्तर मारून, त्यांच्या धडपडीवर आत्मस्तोमाचे मनोरे सांवरून धरणारे गांधी सांप्रदायिक, कौन्सिलांत गेले काय किंवा न गेले काय, जनहिताच्या बाबतींत दोघेहि हाड्याव्रण आणि गजकर्ण ठरल्यानंतर, जनतेला त्यांचें महत्व सारखेंच आहे.

असहकारितेच्या नॉनव्हायलंट स्थितप्रज्ञ चळवळीच्या पोटीं चौरीचुराचें पायगुणी बाळ पालथें निपजलें, व या बाळानें जन्मतांच देवाज्ञेची सनद आपल्या मातोश्रीच्या हवालीं केली. गांधी कारागृहवासी झाल्यावर त्यांच्या भक्तगणांनीं अस्पृश्योद्धार किती केला, हें अस्पृश्यांच्या चळवळीवरून दिसतच आहे. इंग्रेजांची राज्यसत्ता बोलबोलतां गादीवरून कांबळीवर उतरण्यासाठीं निर्माण झालेली खादी किती पवित्र, शुद्ध, आत्मोद्धारक, स्वराज्यदायक आणि खानदानी असते, हें जगाच्या निदर्शनास आणण्याचें पुण्य बेझवाड्यानेंच घेतलें. हिन्दु-मुसलमान-ऐक्याचा भोपळा मलबारांतल्या मोपल्यांनीं फोडला व परवां मुलतानला त्याचें सांभारें बनविलें गेलें. औद्योगिक क्षेत्रांत चरक्यानें केवढी मजल मारली, हें पहाणारांनीं राष्ट्रीय वर्तमानपत्रांतील भरगच्च रकान्यांकडेच मात्र दृष्टी फेंकावी. स्वराज्यसंपादनार्थ अवश्य लागणाऱ्या सामाजिक एकोप्याचा घट्टपणा अजमावणाऱ्यांनीं ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादांत न घुसतां, आपल्या आसपास थोडी नजर टाकली तरी पुरे. महाराष्ट्राच्या नशिबाच्या मैदानावर एकीचे जलसे करण्यासाठीं 'ब्राह्मणसंघ' लवकरच जन्माला येत आहे; आणि थोड्याच दिवसांत हें राष्ट्रैक्याचें लळीत ब्राह्मण-ब्राह्मणेतरांच्या रक्तांनीं भिजून चिंब सजणार आहे, हें आमचें भविष्य सकृद्दर्शनीं धाडसी दिसलें तर खुशाल दिसो; सर्व राष्ट्रहितेच्छूंनीं तें आपल्या रोजनिशींत अवश्य नमूद करून ठेवावें ! धार्मिक क्षेत्रांत उदारमनस्कतेचें द्रौपदीवस्त्र-हरण कोठपर्यंत आलें, हें पहाणारांनीं, वार्षिक हिंदुधर्मपरिषदेचा शिमगा आणि सात्विकपणाच्या लंब्याचौड्या वल्गना करणारा डॉ. कुर्तकोटींचा पुणेरी स्वधर्म हीं भिक्षुकी पात्रें खुशाल पहावी. झालें बहुतेक सर्व उन्नतीचे टप्पे तर हिंदुस्थानानें गांठलेच. आतां राहतां राहिलें स्वराज्य. राष्ट्रीय लोक कौन्सिलांत घुसलें कीं तेंहि असेंच हस्तगत होणार. अर्थात् त्या स्वराज्याचें स्वरूप कसें काय असणार, याची कल्पना गेल्या गणेशोत्सवांत पुण्यास झालेल्या राष्ट्रीय धुळवडीवरून ज्यांना नीटशी होणार नाहीं, त्यांच्या डोळ्यांत राष्ट्रीयांच्या महात्मेगिरीची धूळ बरीच घुसली असली पाहिजे खास ! शेवटीं इतकेंच स्पष्ट म्हणणें भाग आहे की काल्पनीक लोकमताच्या जोरावर वादविवादाचे दंगे करणाऱ्या कौन्सिल- न कौन्सिलवाल्यांचे बुद्धिमत्तेच्या चतुराईनें एकमेकांस चीत करण्याचे खेळ सुरूं असले, तरी 'तुमचा होतो खेळ पण आमचा जातो जीव' असे उद्गार काढण्याचा प्रसंग आज जनतेवर येऊन पडला

आहे खास.

अशा स्थितींत राष्ट्रीय पक्ष किंवा गांधी पक्ष यांच्या डांवपेंचापासून आपला बचाव कसा करून घ्यावा, हें प्रत्येकानें विचारपूर्वक ठरविण्याची हीच वेळ आहे, एवढा स्पष्ट इषारा देणें आमचें कर्तव्य आहे.

□□□

अग्रलेख

दिग्विजयासाठीं सीमोल्लंघन केलेंच पाहिजे

विश्वाचा हा प्रचंड विस्तार आणि त्यांतील प्रत्येक गोष्टीचा नियमबद्ध जीवनक्रम पाहिला तर आपल्या हेंच प्रत्ययाला येतें कीं तेजोनिधी सूर्यबिंबापासून तों थेट जमिनीवर सरपटणाऱ्या कृमि कीटकापर्यंत सर्वांची गति मर्यादीत झालेली आहे. सूर्याभोंवतीं पद्धतशीर नियमानें प्रदक्षिणा घालणाऱ्या पृथ्वि शनि मंगळादि ग्रहांचें भ्रमणच पहा. अकल्प्य काळापासून आजपर्यंत अगदीं काटेकोर नियमानें त्यांच्या प्रदक्षिणेचा प्रवास यंत्राबरहुकूम बिनहरकत चालला आहे. मानवी जीवनक्रमांतहि जननमरणादि क्रिया अशाच ताळेबंद यांत्रिक पद्धतीनें मर्यादित झालेल्या आहेत. जिकडे पहाल तिकडे मर्यादा व सीमा यांचीं दाट कांटेरी कुंपणें पडलेलीं ! चंद्राची क्षयवृद्धि किंवा रातपाळी दिवसपाळी चुकत नाहीं. सूर्यानें कधिं हक्काची रजा मागितली नाहीं किंवा एक दिवसाची 'कॅज्युअल लीव्ह' त्याला मिळत नाहीं. विश्वयंत्राच्या अमुक चक्राची अमुक अमुक फेऱ्यांची प्रदक्षिणा झाली कीं पठाणी किंवा काश्मिरी औरतांप्रमाणें सूर्याला बुरखा घेतला पाहिजे, किंवा चंद्राने काळी घोंगडी पांघरली पाहिजे, असा वटहुकूम निघाल्यावर सूर्याला किंवा चंद्राला अखिल विश्वांत अपिलाचें कोर्ट लाभत नाहीं. प्राणी जन्माला आला कीं तो यथाकाळीं मेलाच पाहिजे; त्याला सुटकेची सवलत नाहीं. सारांश विश्वांतल्या यच्चावत् गोष्टी ठरावीक सांचाच्या जीवनक्रमांत जाम जखडल्या गेल्या आहेत. कोठें कोणी तसूभर सीमोल्लंघन करूं म्हणेल तर होणेंच नाहीं. विश्वनिर्मित्या चैतन्यशक्तीचा दरारा असा मोठा करडा आहे.

विश्वाचें परिभ्रमण जर एकाद्या गिरणीप्रमाणें साचांतल्या साच्यांत सीमाबद्ध झालें आहे आणि आपली पृथ्वीहि त्या भ्रमणांत गतिबद्ध झालेली आहे, तर तिला नानारत्ना वसुंधरा कोणी बनविली? दिवसेंदिवस पृथिवीतलावर असंख्य लोकोत्तर चमत्कारांची जी कल्पनातीत उत्क्रान्ति होत आली आहे; मानवांनींच शोधून काढलेल्या नवरसांचा मानवी जीवनांत जो नवरंगी परिपाक उतरला आहे आणि सृष्टीविधात्याच्या सृष्टीला बिनतोड तोंड देणारी दुसरी सृष्टी निर्माण करण्यांत मानवांच्या महत्वाकांक्षेच्या ज्या अनंत धडपडी आज मानवी दुनियेच्या चैतन्याला हाताबोटांवर नाचवीत आहेत, त्याला कारण कोण?

कालची दुनिया आज नव्हे, आजची दुनिया उद्यां नव्हे. कलिची कल्पना आज शिळी ठरते, आजच्या कल्पनेला उद्यांची उत्क्रांत कल्पना चारी मुंड्या चीत करते, आंगाला रंग फासून ढोरांचीं

कातडीं पांघरण्यांतच जीवितसौख्याची परमावधि मानणारीं कालचीं राष्ट्रें, आज साऱ्या जगाला पालटून नेकटायचे धडे देणारीं आणि साऱ्या वसुंधरेच्या ज्ञात अज्ञात संपत्तीचे खरे भोक्ते काय ते आह्मी अशा वल्गना करणारीं राष्ट्रें बनतात; तर ऐहिक वैभवाच्या धवलगिरीवर जाऊन आत्मानात्म विचारांची बिकट त्रांगडीं चुटकीसरशीं सोडवून दाखविणारीं प्राचीन राष्ट्रें साऱ्या जगाचे हुकमी हमाल बनतात. ज्यांच्या नाकाचा दांडासुद्धां धड उमटलेला नाहीं, किंवा ज्यांच्या शरीराची उंची चार साडेचार फुटांवर गेलेली नाहीं, असले बुटबैंगण फेंपटे जपानी, लांबटांग्या व लांबनाक्या रशियाचें नाक कापतात; तर इकडे शरीरावयवांच्या पूर्ण वाढींत जगाला हार न जाणाऱ्या हिन्दूंच्या घरांत त्याच फेंपट्या जपानी विप्रांच्या आगपेटीच्या चकमक मंत्रा शिवाय चूल पेटत नाहीं कीं दिवा लागत नाहीं. ऋग्वेदयुगांत पंचमहाभूतांचें केवढें बण्ड ! त्या बेट्यांनीं प्रत्यक्ष परमेश्वराचें सिंहासन पादाक्रांत केलें होतें आणि आपल्या भयंकर स्वरूपांनीं चळचळां कांपावयास लावलेल्या मानवी दुनियेला आपल्या पायाची धूळ चाटावयास लावलें होतें. पण आज? आज काय प्रकार आहे? आज तीच पंचमहाभूतें मानवांच्या हातचे हंटरचे तडाखे खात, निमूटपणें वाटेल तें काम करण्यासाठीं गुलामांपेक्षां गुलाम होऊन बसली आहेत. जो पूर्वी देव म्हणून दुनियेच्या उरावर बसला होता, तोच आज राजमहालापासून शौचकूपापर्यंत त्याच दुनियेचें वाटेल तें काम करणारा हांजीहांजीखोर दास बनला आहे. ज्या गोष्टी पूर्वी अशक्य कोटींत मोडत होत्या आणि शक्य कोटींत मोडल्याच तर अद्भुत चमत्काराची ओढणी घेत असत, त्याच गोष्टी आजच्या शास्त्रीय युगांत पोराटोरांचीं खेळणीं होऊन बसल्या आहेत. हा सर्व चमत्कार कशाचा? मानवी दुनियेच्या एकंदर हालचालींचें निरीक्षण केलें तर असें स्पष्ट दिसून येतें कीं आपल्या शक्तियुक्तीची शिकस्त करून परमेश्वराचें नारायणपद पटकवण्याचा नरांनीं स्पष्टस्पष्ट चंग बांधला आहे. परमेश्वराविरुद्ध मानवांनीं उघड उघड बंडाचें शिंग फुंकलें आहे. विश्वनियामक सीमांचें उल्लंघन करून सृष्टिविषयक प्रचलित कल्पनांच्या रूढींचे तट जमिनदोस्त करण्याचा हा निश्चयी हल्ला आहे. वातावरणाच्या थरांची लांबी रुंदी उंची मोजली, गुरुत्वाकर्षणाचा कायदा कोठवर अंमलांत आहे त्याची पाहणी केली, दुर्बिणीच्या डोळ्यांतून शनि मंगळादि ग्रहांना नेत्रकटाक्षाची मुकी सलामी दिली. येथें मानवी यत्नांच्या झटापटींना सीमेची अटक होते न होते तोंच मार्कोनीच्या बिनतारी यक्षानें आकाश पाताळाला चिमटींत धरून पृथ्वीच्या गोलाची दामटी केली आणि वातावरण गुरुत्वाकर्षणादींच्या सीमांची अटक लाथाडून मंगळावरील रहिवाश्यांशीं प्रत्यक्ष संभाषणाच्या योगाची सिद्धि साधण्यासाठीं कंबर कसली. निसर्गाच्याही नरड्यावर पाय देऊन नरांनीं नारायणपद मिळविण्याचा हा जो खटाटोप चालविला आहे, प्रत्यक्ष मान समाजांत उत्क्रांतीचे आणि अपक्रांतीचे भरती ओहटीचे जे ट्रान्सफर सीन प्रत्यहीं आपल्या दृष्टीला पडत आहेत आणि शास्त्रीय शोधांनीं विश्वाच्या ठरावीक सीमा उल्लंघून प्रत्यक्ष ईश्वराचेंहि सिंहासन डळमळविण्याचा जो यशस्वी बंडाचा हल्ला चढविला आहे, त्याच्या मुळांशीं असें कोणतें चैतन्य आहे, कोणती शक्ति आहे, कोणाचा पराक्रम आहे? जें सीमोल्लंधनाचें धाडस सूर्य करूं शकला नाहीं, चंद्राची छाती झाली नाहीं, विक्रम राजाच्या हातीं तेल्याचा घाणा देणाऱ्या शनि तेल्याचें तोंड नाहीं, किंवा महाक्रूर म्हणून गाजलेल्या मंगळ ग्रहाची माय व्याली नाहीं, तेंच धाडस माणूस करतो, तें कशाच्या जोरावर?

बुद्धिमत्तेच्या जोरावर.

बुद्धिमत्तेच्या प्रचंड शक्तीचा विचार केला तर असेंच ह्मणावें लागतें कीं मनुष्याला ही शक्ति देण्यांत ईश्वरानें मोठीच चूक केली. ईश्वरानें आपल्या नि:श्वासानें सृष्टी निर्माण केली असेल, पण बुद्धिमत्तेचें कवच ल्यालेला मनुष्य सहज फुंकारानें त्याच्या अस्तित्वाचें सिंहासन यथाकाळीं पादाक्रांत केल्याशिवाय खास राहणार नाहीं. बुद्धिमत्तेची प्रचंड शक्ति मनुष्यांत जन्मत:च असल्यामुळें, सीमोल्लंघन हा त्याचा जन्मसिद्ध हक्कच होऊन बसला आहे. याच्याहि पुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं सीमा-मग त्या कशाच्याहि असोत, त्यांचें दास्य जो मान्य करील तो मनुष्यच नव्हे. अटकेला अटकला, सीमेवर कुंठित झाला, निर्बंधांत जखडून पडला, प्रामाण्यांचा गुलाम झाला आणि रूढीच्या उकीरड्यांतला किडा बनला कीं मानवाचा मानवपणा ठार झाला असें खुशाल समजावें. मनुष्य आणि दास्य परस्परविरोधी आहेत. स्वातंत्र्य हा मानवजातीचा प्राण आहे.

दिग्विजयी म्हणून इतिहासांत गाजलेल्या कोणत्याही स्त्री पुरुषाचें चरित्र पहा, त्यांत त्यांनीं रूढ कल्पनांच्या सीमांचे उल्लंघन केल्याचेंच आपल्याला दिसून येईल. हें सीमोल्लंघन करतांना त्यांनीं राजकीय सत्तेच्या स्वार्थी निर्बंधांची पर्वा ठेविली नाहीं, 'ईश्वरप्रणित' 'धर्ममान्य' 'स्मृति पुराणोक्त' इत्यादि मूर्खपणाच्या ग्रंथप्रामाण्यांचा दिमाख चालूं दिला नाहीं, किंवा येनकेनप्रकारणे राजमान्यतेस वा लोकमान्यतेस चढलेल्या महानुभावांच्या 'हीरो वर्शिप' (महात्मेगिरी) च्या मिंधेपणाचे ते शरमिंदे बनले नाहींत. कल्पनेच्या बंदुकींत ठांसलेला बुद्धिमत्तेचा बार उडवितांना, निश्चित तत्वावर रोंखलेलें त्यांचें निशाण अणुमात्र कंप पावलें नाहीं. कोलंबसाच्या वेळीं क्रिस्ती धर्ममार्तंडांचें पृथ्विविषयक ज्ञान अकटोविकटो होतें. 'देव म्हणाला उजेड होवो आणि उजेड झाला.' अशा रीतीनें सहा दिवस जग उत्पन्न करण्याची दगदग करून सातव्या दिवशीं 'प्रभु निजला' या दिव्य धर्मज्ञानप्रणेत्या पाद्रीभटांना पृथ्वी त्रिकोनी आहे, चौकोनी आहे कीं वाटोळी आहे याची मुळीच दाद नव्हती. कोलंबस ज्या वेळीं महासागरोल्लंघनाला सिद्ध झाला, तेव्हां हे रावरंकाच्या 'आत्म्याचे तारक' त्याला गयावया करून म्हणाले ''अरे बाबा, हें कसलें मूर्खपणाचें धाडस तूं आरंभलें आहेस. समुद्राच्या अगदीं कडेवर गेलास तर नरकाच्या दरींत तुझा, तुझ्या गलबताचा आणि परिवाराचा कडेलोट कीं रे होईल !' परन्तु बुद्धीच्या जोरावर रूढ कल्पनांचें धिटाईनें सीमोल्लंघन करण्यास सज्ज झालेल्या त्या नवमतवाद्याला ही बायबलोक्त बाष्कळ गुलामगिरी काय होय? त्यानें कोणाच्याहि निंदा स्तुतीची पर्वा न करतां धडाडीनें आपली गलबतें हांकारलीं आणि अमेरिकेचा शोध लाऊन 'पृथ्वि वाटोळी आहे, क्रिस्ती भटांच्या कल्पनेप्रमाणें सपाट नाहीं' हें प्रत्यक्ष पुराव्यानें सिद्ध केलें. सामाजिक क्षेत्र घ्या, धार्मिक घ्या किंवा राजकीय घ्या, त्यांत आजपर्यंत जी उत्क्रान्ति घडून आलेली आहे, ती धूर्त मुत्सद्यांच्या राजकीय सवलतीनीं किंवा स्वराज्याच्या हप्त्यांनीं नव्हे, जगद्गुरू किंवा पोपासारख्या गुलालगोट्यांच्या श्रुतिस्मृति पुराणोक्तानें नव्हे, वाचीवीर्य पुराणिकांच्या तोंडपाटिलकीमुळें नव्हे, तर स्वतंत्र नवमतवाद्यांच्या महत्वाकांक्षेच्या धडाडीनेंच होय. गौतम बुद्ध, शिकंदर, चंद्रगुप्त मौर्य, अशोक, गॅलिलिओ, न्यूटन, मार्टिन लूथर, सावनारोला, शहाजी राजे, छत्रपती शिवाजी, इत्यादि अनेक पुरुषोत्तमांचीं चरित्रें याच तत्वाचीं द्योतक आहेत.

दिग्विजयाची आकांक्षा नखशिखांत फुरफुरल्या शिवाय सीमोल्लंघनाची बुद्धीच होत नाहीं. जोपर्यंत ही आकांक्षा हिन्दुजनांत फुरफुरत होती, तोंपर्यंत ते स्वातंत्र्याचे भोक्ते व प्रणेते राहिले. जेव्हा दिग्विजयाची

आकांक्षा थंड पडली, तेव्हां पासूनच हिंदूंच्या अधोगतीला सुरवात झाली. सीमोल्लंघनाचा संन्यास करून ते व्यक्ति ग्रंथ व रूढी प्रामाण्यांच्या कच्छपीं लागले आणि अखेर निर्भेळ गुलामगिरीचे जहागीरदार बनले. स्वातंत्र्य किंवा दास्य यांचा गुणधर्मच असा आहे कीं तीं भलत्या नापीक क्षेत्रांत आपण होऊन कधीं जात नाहींत. पण जरा कोठें बुद्धिभ्रंशाच्या उमटलेल्या टांचेच्या खळग्यांत कुकल्पनेचें घाणेरडें पाणी सांचलें कीं गुलामगिरीनें तेथें आपलें बीज पेरलेंच म्हणून समजावें. 'हिंदुमुसलमानकी जय' म्हणून दुटप्पी लुबे लोक कितीहि शंख करोत, हिंदुस्थानच्या प्रगतीला मुसलमानांच्या ऐक्याची आवश्यकता कांहीं विवक्षित मर्यादेपर्यंत असो वा नसो, हिन्दुसाम्राज्य, हिन्दु संस्कृति, हिन्दुस्थान म्हणून कांहीं चीज आहे कीं नाहीं? मुसलमान तरी आले कोठून? हिन्दूंच्या धार्मिक अध:पातांतूनच मुसलमानांची पैदास झाली ना? त्यांतूनच आज क्रिस्त्यांची वीण निपजत आहे. आणि आहे हीच नामर्द स्थिति कायम असेपर्यंत आणखी काय काय चिजा पैदा होतील कोणी सांगावें? अर्थात् हिन्दूंना पुनरुज्जीवनाची जर कांहीं जाणीव उत्पन्न झाली असेल तर त्यांनीं 'हिंन्दु आणि मुसलमान' असली पोरखेळणीं साफ लाथाडून देऊन दिग्विजयाच्या निश्चयानें सीमोल्लंघनाचीच तयारी केली पाहिजे. देवळें जाळणें, मूर्ति फोडणें, बायका भ्रष्ट करणें आणि गाई कापणें वगैरे महमद गझनवी अत्याचार आज १९२२ सालांतहि हिंन्दूच्या नाकाडांवर टिच्चून होत असतां, 'अरे यार मेरा भाई' म्हणून हिन्दूंनींच मुसलमानांच्या दाढ्या कुरवाळणें या स्थितीला बेशरमपणापेक्षां दुसरा निराळा शब्द शब्दकोशांत कदाचित् असेल. मुसलमानांप्रमाणें आजला पारशी, क्रिस्ती, यहुदी आपापले समाजसंघ बळकट बनवीत आहेत. धोतरवाला तात्या म्हणजे त्यांच्या थट्टेचा परसांतला सवंग विषय. वाटेल त्या गुंडानें उठावें, बंदुका झाडाव्या, हिन्दु स्त्रियांचा उपमर्द करावा, वाटेल ते करावें; पण हिन्दुजनांकडे पहावें, तों स्थितप्रज्ञ स्थिति. परवां परेळच्या बाजूला गणेशोत्सवाच्या पंधवड्यांतच पाळीव कुतरड्यांच्या क्षुल्लक भांडणावरून एका पारशी सज्जनानें आपली बंदूक झाडून खुशाल १०-१५ गरीब गिरणीकामगारांना जखमी केल्याचें समजतें. १६ नवंबरच्या दंग्यांत अकरमाशा युरेजियन व अग्निहोत्री पारशी गुंडांनीं पिस्तुलांच्या बेगुमान फैरी झाडल्याचें प्रसिद्धच आहे. त्यांनीं अनंत अनिर्वचनीय अत्याचार केले. पण स्थितप्रज्ञ हिंदुजन ब्र काढतील तर ब्रह्माचीच शपथ! याला गांधीभक्त आत्म्याचा विजय सत्याचा विकास वगैरे काय वाटेल तीं नांवें देवोत; असला विजय आणि विकास शामळू गुजराथेला लखलाभ असो; शिवाजीच्या महाराष्ट्रांत हींच नांवें देण्यांत आलीं, येतात व येतील. सारांश, हिन्दुस्थानांतला इतर हिन्दु समाज वगळून, प्रत्यक्ष माहितीनें, खुद्द महाराष्ट्रापुरतेंच बोललें तर महाराष्ट्रीय हिन्दु समाजाची आजची स्थिति केवीलवाणी झाली आहे. फक्त कींवच करायला कोणी नाहीं !

अखिल हिंदुस्थानच्या राजकीय रुधिराभिसरणाचें मुख्य हृदय महाराष्ट्रच. ही गर्वोक्ती नव्हे. इतिहाससिद्ध प्रतिज्ञेची उक्ति आहे. अर्थात् हिन्दूंच्या दिग्विजयाचा प्रश्न महाराष्ट्रानेंच उचल खाल्ल्या शिवाय रंगारूपास येणें शक्य नाहीं. पण आजचा महाराष्ट्र कसा आहे? काय करीत आहे? राजकीय क्षेत्रांत ढोंगी पुढाऱ्यांच्या सुळसुळाटामुळें तो परप्रत्ययनेय व आत्मवंचक बनला आहे. धार्मिक क्षेत्रांत तो हटवादी मत्सरी आणि स्वार्थपरायण आहे. सामाजिक क्षेत्रांत तर त्याच्या विराट देहाचे राई राई एवढे लचके तुटले आहेत. जातिद्वेषाचा तुफानी झंझावात बेफाम बोकाळल्यामुळें ब्राह्मण-ब्राह्मणेतरा सारखे वाद आज हातघाईवर आले आहेत आणि उद्यां ब्राह्मणसंघाचा जन्म होतांच हें प्रकरण रक्तपातावर

न जावो म्हणजे मिळविली. सातारा नगराकडून मगरूर भिक्षुकशाहीवर झुगारलेली ब्राह्मणेतरांची पाचर परवां खुद्द टिळकांच्या गायकवाड वाड्याच्या छातींत तर बिनचुक जाऊन रुतलीच आहे. सारांश, सांप्रतचा महाराष्ट्र हा शिवाजीचा महाराष्ट्र या नांवाला सर्वथैव अपात्रच नव्हें तर कुपात्र बनलेला आहे.

अशा प्रसंगीं शिवाजीच्या अभिमान्यांनीं पेशव्यांच्या सैतानशाही सांप्रदायिकांना कोंपरखळी मारून दूर बसविलें पाहिजे आणि महाराष्ट्राची अब्रू बचावण्यासाठीं मी मी म्हणून पुढें सरसावलें पाहिजे. असें करतांना कोणी ब्रह्मांडशहाणे तुमच्यावर वाटेल ते कुत्सित आरोप करतील; पण सबंध शरीराच्या हितासाठीं उपायापलिकडे गेलेला एकादा नासका कुसका अवयव छाटून टाकणें हेंच श्रेयस्कर असतें, हें विसरूं नका. छत्रपति शिवाजी महाराजांनीं उभारलेल्या हिंदवी स्वराज्याच्या गडाखालीं स्वार्थी कारस्थानांचा सुरुंग उडवून, त्यांच्या मनोदयाचा भिक्षुकशाहीनें केलेला भंग हें एक महाराष्ट्राच्या हृदयांत नित्य सलणारें शल्य आहे. शिवाजीच्या जातीवंत अभिमान्यांनीं हें शल्य काढण्यासाठीं सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रांत पदोपदीं अडविणाऱ्या सीमांचें उल्लंघन केलें तरच महाराष्ट्राला याउप्पर दिग्विजयाची कांहीं आशा आहे. महाराष्ट्रांत लोकशाही बळावल्याशिवाय हिन्दुस्थानाचा भाग्योदय होणें नाहीं, एवढी खुणगांठ बांधून महाराष्ट्राची चैतन्य देवता हिन्दुस्थानची भाग्यदेवता-ज्याला जशी बुद्धि देईल तसें त्यानें देशोद्धारार्थ दिग्विजयासाठीं सीमोल्लंघन करावें एवढें सांगून प्रबोधनहि दुसऱ्या वर्षाच्या कार्यक्षेत्रांत सीमोल्लंघन करीत आहे.

□□□

निवेदन

हें पुष्प देवा तुजला वहातों

प्रबोधनाचा हा २४ वा अंक, पहिल्या वर्षाच्या अंक-मालचें हें शेवटचें पुष्प, जनतारूप जनार्दनाच्या चरणीं प्रणिपात पूर्वक वाहून, आज विजयादशमीच्या मंगल कालीं प्रबोधन दुसऱ्या वर्षाच्या कर्तव्य क्षेत्रात सीमोल्लंघन करीत आहे. प्रबोधनाचा पहिल्या वर्षाचा जीवनक्रम यशस्वी करण्यासाठी जनीजनार्दनानें नाना विध रूपांनीं जें अवर्णनीय सहाय्य दिलें. त्याची आज वर्ष अखेर नुसती कल्पना केली तर डोळे कृतज्ञतेच्या अश्रूंनीं भरून येतात. प्रिय आश्रयदात्यांनीं वारंवार उत्तेजनच अगणित संदेश पाठवून प्रबोधनांवर केलेल्या अनिर्वचनीय प्रेमानें हृदय तुडंब भरून येतें आणि या सर्व प्रेमळ भगिनी बांधवांचे उपकार-फेडण्याचें तर दूरच राहो ! पण निदान-कोणत्या शब्दांनीं व्यक्त करावे, या विवंचनेंतच ही लेखणी स्तिमित होऊन बसते. कृतज्ञता हा विषयच असा आहे कीं त्याचं शब्दचित्र काढण्याची प्रौढा मिरविणें शुद्ध ढोंगीपणा होय या चित्रलेखाला हृदयांत उचंबळणारा रक्ताचा सांठा अपुरा पडतो. शब्दकोशांत शब्द सांपडत नाहीं बहुश्रुत विद्वत्तेचें इंद्रधनु रंग फिके पडतात आणि अंतस्थ भावनेला व्यक्त करण्यासाठीं बुद्धिमत्तेला जों जों अधिक तणावे द्यावे तों तों अंत:करणांतून निघून कलमाच्या किंवा जिव्हेच्या टोकापर्यंत येऊन भिडलेली विचारवाहिनी टेलीग्राफीक लाईनच थंड पडते. कृतज्ञतेच्या उमाळ्यासारखा डोळ्याच्या ओसरीवर येऊन उभा रहाणारा तो अश्रुबिंदु पहा. किती लहान ! किती सूक्ष्म ! थरथर थरथर कांपतो तरी किती ! पण महाराज, त्यांत ब्रह्मांड भरलें आहे नव्हे, ब्रह्मांडांत जी भावना सतावणार नाहीं. ती त्या हिंदूंत पूर्णत्वानें भरलेली आहे. उपकृत प्राण्याच्या हृदयाचें सिंहासन करून त्यावर उज्वल 'शिणगाराचें लेणें' लेऊन विराजनान झालेली देवी कृतज्ञता पहाणाराला त्या बिंदूंत दिसेल. परमेश्वराच्या कृपेची पांखर पडतांच 'मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरीम्' असा आश्चर्यालाहि आश्चर्यचकित करून सोडणारा चमत्कार घडतो म्हणतात. पण, प्रेमाच्या रज्जूनें बद्ध झालेला उपकार-मेरू हृदयसागरांत घुसळला आणि त्या मंथनांतून निर्माण झालेलें कृतज्ञता-लक्ष्मी-रत्न अश्रुबिंदूंत चमकूं लागलें कीं, काय चमत्कार होतो बरें? वाचाळ मुके होतात, धांवते पांगळे बनतात आणि हुकमी फड्या लेखकांच्या लेखण्या बोलबोलतां कलमदानांत जाऊन लपतात ! अज्ञा अवस्थेंत प्रबोधनानें आपल्या प्रेमळ आश्रयदात्यांविषयी कृतज्ञ भावना कोणत्या मार्गानें व्यक्त

एन ४००६--२०

करावी बरें? या सज्जनांच्या कृपेनें प्रबोधनाला आपला दुबळेपणा भासत नाहीं. एक वर्षाच्या अवधींतच त्याचा आत्मविश्वास कणखर बनविण्यांत या सज्जनांनीं अनेक परीनें उत्तेजन दिलें आहे. त्याचा तपशिल कोठवर द्यावा !

***

वर्तमानपत्राच्या कामीं अनेक सहायकांच्या प्रेमळ व प्रामाणिक सहायाची आवश्यकता असते. मजकूर लिहिण्यापासून तों छापील अंक आश्रयदात्यांच्या हाती पडेपर्यंत अनेक व्यक्तींचे श्रम खर्ची पडत असतात. त्या सर्वांचा नामनिर्देश करून आमची कृतज्ञता व्यक्त करणें कितीहि वाजवी असलें तरी शक्य दिसत नाहीं. प्रबोधनाचें सर्वांगसुंदर मुद्रण व नियमीत प्रकाशन यांचें श्रेय सर्वस्वी, मुंबई वैभव छापखान्यांतील व्यवस्थापक मंडळी व त्यांच्या हाताखालीं प्रामाणिकपणें कामें करणारे कंपॉझिस्ट फोरमंन प्रिंटरादि उत्साही सैनिक, यांनाच आहे. आमच्याकडे कांही नाहीं. या सर्व मित्रमंडळींनीं प्रथम पासून प्रबोधनाला आपलेपणानें वागविण्यांत आणि प्रत्येक अंक उत्तम रीतीनें छापण्यांत जी कळकळ व उत्सुकता दाखविली, तिचे उतराई होण्यास नुसते शब्दलालित्य हा कांहीं पुरेसा आहेस खास नव्हे. या सर्व मित्रमंडळींना प्रबोधनकाराचे साष्टांग प्रणिपात असोत.

***

आज प्रबोधनाचा प्रसार महाराष्ट्रांत बराच झालेला आहे. आश्रयदात्यांची संख्या झपाट्यानें वाढत आहे. चारपांच महिन्यांत पंधरा सोळा अंक काढून एकदम लुप्त होणारीं किंवा कचाप्रमाणें दुसऱ्याच एका नवीन शुक्राचार्य-पत्राच्या पोटांत शिरणारीं अनेक पत्रें आज महाराष्ट्रात निपजूं लागल्यामुळें व्यवसायाच्या दृष्टीनें कोणत्याहि नव्या पत्रावर विश्वास ठेवतांना जनतेनें विश्वासाच्या बाबतींत कद्रुपणा दाखविला तर त्यांत कांही आश्चर्य नाही. परंतु आज जनन आणि उद्यां मरण असले चल चल मदारी डोंबाऱ्याचे खेळ खेळणाऱ्या वृत्तपत्रकारांना, आपल्या कृतीपासून इतर स्वावलंबी व्यवसाय बंधूंना किती बिकट अडचणी सहन कराव्या लागतात, याची नीट कल्पना होईल तो सुदीन ! तथापि जगदीश कृपेनें प्रबोधनाचा नियमित एक वर्षाचा स्वावलंबनयोग महाराष्ट्रीय जनतेच्या विश्वासास पात्र झाला, हाच आमच्या सर्व श्रमांचा परिहार करणारा मोबदला असें आम्हीं समजतों. दुसऱ्या वर्षांच्या सुरवातीलाच वर्गणीदारांची संख्या यथावकाश दिढीदुपटीवर जाणे, व आम्हीं 'थांबा थांबा' असें म्हणत असतांहि अनेक भगिनीबांधवांनी दुसऱ्या वर्षाचीहि वर्गणी आगाऊ पाठवून देणें, या गोष्टी आश्रयदात्यांच्या निर्मळ प्रेमाच्या जशा द्योतक आहेत तशा त्या प्रबोधनावरील त्यांचा दृढविश्वास निश्चयानें व्यक्त करीत आहेत. अशा अनेक रीतीनें उत्तेजित व उपकृत झालेल्या प्रबोधनानें या सर्व सज्जनांना-जनतारूप जनार्दनाला-

।। देवा आतां मी तुज काय देऊं ।।
।। पायांवरी या तव काय ठेऊं ।।
।। हा प्राण माझा तुज दान देतों ।।
।। हें पुष्प देवा तुजला वहातों ।।

या कव्युक्तीनें साष्टांग प्रणिपात घालण्यापलिकडे अधिक काय करतां येणें शक्य आहे बरें ! सर्व सज्जनांचा आशिर्वाद असल्यावर प्रबोधनकाराची ही दुर्बळ लेखणी संघटित प्रतिस्पर्ध्यांच्या

प्रबळ शक्तीला न जुमानतां गुलामगिरी प्रवर्तक मोठमोठ्या शनवार वाड्यांच्या दिल्लीदरवाजांना धडक मारण्याला कधींहि मागें पुढें पाहणार नाहीं.

***

प्रथमाकांत 'प्रबोधनाचें ध्येय' काय आहे., याचें विवेचन करतांना काढलेले उद्गार आज पुनश्च वाचकांच्या नजरेस आणतों. त्यामुळें प्रबोधन द्वारें प्रवचित होणाऱ्या विचारांबद्दल शंकांचें क्षेत्र बरेंच आकुंचित होईल अशी आशा आहे. ते उद्गार हे :- प्रबोधन जितका कट्टा नवमतवादी आहे. तितकाच तो पक्का स्वराज्यवादी आहे. जितका राष्ट्रीय वैभवाचा महत्वाकांक्षी आहे, तितकाच तो सामाजिक व धार्मिक गुलागिरीच्या पुरस्कर्त्यांचा कट्टा द्वेष्टा आहे. महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या कोणत्याहि पक्षाचा प्रबोधन सांप्रदायिक नाहीं, अथवा त्यांच्या मतांचा मिंधा गुलाम नाहीं. प्रबोधन सत्याचा भोक्ता आहे. जेथें जेथें सत्य दिसेल. तेथें तेथें प्रबोधनाचा माथा अत्यंत उत्कट उमाळ्यानें सर्वांच्या आधीं विनम्र होईल. असें करतांना पक्षभेदाची किंवा मतभेदाची कसलीहि अटक त्याला अटक करूं शकणार नाहीं. देशाच्या स्वराज्य-मुमुक्षु अवस्थेंत प्रचलीत चळवळींकडे एका विशिष्ट चिकित्सक दृष्टीनें पाहण्याची एक नवीन दिशा प्रबोधनानें दाखविली आहे. त्यासाठी स्वीकारलेला सत्य प्रतिपादनाचा स्वतंत्र निर्भिड बाणा महाराष्ट्रीय जनतेच्या पचनीं कसा काय पडतो, याची प्रथमत: आह्मांला शंका वाटत होती. परंतु चार पांच अंक निघतात न निघतात, तोंच आश्रयदात्यांच्या वाढत्या संख्येनें त्या शंकेची पूर्ण निवृत्ति झाली. उत्तेजनाचे शेंकडों प्रेमळ संदेश ठिकठिकाणाहून येऊं लागले. एकेका वर्गणीदाराच्या अंकावर वीस ते पंचवीस वाचकांची वाचनपिपासा शांत होत असल्याची अनेक पत्रें येऊं लागलीं. ही एक बाजू झाली. महाराष्ट्रांत प्रबोधनाचें अस्तित्व भासूं लागल्याचे दुसरे अनेक पुरावे येऊं लागले. प्रबोधनाच्या कलमसमशेरीचा मारा मर्मीं लागलेल्या कित्येक 'देश भक्त' 'जवानमर्द ब्राह्मणभाई' कडून शिव्यागाळींचीं व खुनाच्या धमकींचीं पांच सहा पत्रें आलीं. या पत्रांतील भाषेचा नमुना पुण्यास नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवांतल्या राष्ट्रीय शिमग्या सारखाच असे; आणि खुनाची धमकी वासुदेव बळवंती धाटणीची असे. असल्या माथेफिरू धमकावण्यांना काय किंमत द्यायची ती आमच्याप्रमाणें वाचकहि जाणतात. निदान पेशवाई सुरू झाली नाही तोपर्यंत तरी असलीं पत्रें घटकाभर विनोदाला कारणीभूत होतात, नाही असें नाही. ज्याअर्थी अझून आमचा खून झालेला नाहीं, आम्ही जिवंत आहोंत, त्या अर्थी आंग्रेजबहादूरका राज खतम होकर पेशवे बहादूरका राज आया नहीं, ही वाचकांनीं खात्री बाळगावी. तथापि इतका स्पष्ट इशारा देणें प्राप्त आहे कीं असली खुनशी प्रवृत्ति ब्राह्मण तरुणांत विशेष फैलावणें हें देशभक्तीचें चिन्ह, अशी त्या माथेफिरूंची जरी कल्पना असली, तरी ती अत्यंत चिळस आणणारी आहे, हें ब्राह्मण संघवाल्यांनीं वेळींच लक्षांत घेतलें, तर पराचा कावळा केलेल्या सत्यशोधकांच्या किंवा सर्रास ब्राह्मणेतर चळवळींवर खोटे नाटे आरोप करतांना त्यांची मनोदेवता खास मुरडेल. पण मनोदेवता शुद्धीवर असेल तेव्हां !

***

साप्ताहिक प्रबोधन :- या बाबतींत आग्रहाचें उत्तेजन देणारीं सात आठशें आश्रयदात्यांचीं पत्रें आलीं आहेत. प्रबोधनाचें सर्व काम एका हातीं चालत असल्यामुळें कोणत्याहि सूचनेला दृश्य स्वरूप देणें बरेंच अडचणीचें असतें. स्वत:चा स्वतंत्र छापखाना असल्याशिवाय साप्ताहिकाचें काम पद्धतशीर

एन ४००६--२०अ

व नियमित होणें शक्य नाही. शिवाय पत्राच्या ध्येयाचा व विचारसरणीचा झोत कायम राखून नियमित वेळीं काम करणारे मदतनीस लेखक तयार झाले पाहिजेत. अशा अनेक अडचणी आहेत. शिवाय, छापखाना काढणें ही एक बड्या भांडवलाची बाब आहे. आज पंधरा वीस हजार रुपये प्रबोधनकारासारख्या गरीब माणसाला कोण देतो ? नुसत्या अकलेला बाजारांत कांहीं किंमत नाहीं. विशेषत: राष्ट्रीय पक्ष, उदार पक्ष, मजूर पक्ष, इत्यादि अनेक पक्षांच्या पिसाऱ्यांना प्रबोधन चिकटलेलें नसल्यामुळें, तत्तत्पक्षीय गंगाजळीचा एकादा थेंब कधिं चुकूनसुद्धां त्याला लाभणें नाहीं व तो लाभावा अशी प्रबोधनाची इच्छाहि नाहीं. स्वावलंबनाच्या जोरावर आणि सज्जनांचा आशीर्वादावर आमचें सर्व भांडवल उभारलेलें आहे. जनतारूप जनार्दन हांच आमचा देव, त्याच्याच कृपेनें एक वर्षाचा प्रवास प्रबोधनानें पार पडला. प्रबोधन साप्ताहिक व्हावें, अशी त्याची इच्छा असेल तर तीहि पार पडेल. हिंमत आमची, आशीर्वाद सज्जनांचा ! प्रयत्न आम्ही करूं, कर्तृत्वाचें श्रेय जनार्दनाला ! नि:स्वार्थ बुद्धीनें काय करीत असलें म्हणजे कार्याचा वाली हरी कसा असतो, याची प्रचीति गेल्या वर्षांत आम्ही प्रत्यक्ष घेतली आहे. ज्या दिवशीं आमची ही वृत्ति नष्ट होईल, लोकमान्यतेच्या मोहाला बळी पडून सत्याचें उद्घाटन करतांना प्रबोधनकाराची लेखणी ज्या वेळीं मुरडूं लागेल, आणि त्याच्या वर्तनांत खासगी आणि जाहीर असे दुटप्पी वर्तनाचे चोरकप्पे निर्माण होतील, किंवा वाणीप्रमाणें करणी करण्याची त्याची निश्चयी प्रवृत्ति व्यभिचारिणी बनेल, त्याच दिवशीं प्रबोधनकार ठार मेला, असें आमच्या वाचकांनीं समजावें. हें नैतिक भांडवल जों पर्यंत त्याच्याजवळ आहे अशी त्याची खात्री आहे. तो पर्यंत लाखों प्रतिपक्षांनां त्याची लेखणी पुरून उरेल आणि हातीं घेतलेलें कार्य तडीस नेण्याकरितां साप्ताहिक प्रबोधनचसें काय, पण नवमतवादी ग्रंथांचा भरपूर प्रसार करणारा प्रबोधन छापखाना चुटकीसरसा अस्तित्वांत येईल, याचा आम्हांला मुळींच संदेह वाटत नाहीं. प्रिय आश्रयदात्यांना आज एवढेंच सुतोवाच करून ठेवतों कीं छापखान्याच्या बाबतींत एका सज्जन मित्राच्या साहाय्यानें आम्ही खटपट चालविली आहे. आमच्या हातून कांहीं चिरस्मरणीय लोकसेवा व्हावी अशी परमेश्वराची इच्छा असेल आणि आमच्या दुबळ्या खटपटींना आपला सर्वांचा प्रेमाचा पाठिंबा असेल, तर दोन तीन महिन्याच्या अवधींतच प्रबोधन मुद्रणालय स्थापनेचा मंगल संदेश प्रबोधनद्वारें आपल्याला श्रुत होईल.

***

व्यवसायबंधु :- प्रबोधनाचा प्रसार होण्याच्या कामीं जीं अनेक कारणें झालीं त्यांत आमच्या अनेक समान मनोधर्माच्या व्यवसाय बन्धूंनीं केलेली मदत विशेष अभिनंदनीय आहे. प्रबोधनाच्या प्रत्येक अंकांतील निवडक लेखांचे उतारे आपापल्या पत्रांत उध्दृत करून या बांधवांनीं प्रबोधनासारख्या गरीब भावंडाला उत्तेजन देऊन त्याच्या मताचा प्रसार सर्वत्र फैलावला. हें उपकाराचें ऋण फार मोठें आहे. या सर्व बंधूंच्या चरणांना आमचें वंदन असो.

परतभेटीच्या बाबतींत एक दोन पत्रें बाद करितां राष्ट्रीय पत्रांनीं प्रबोधनाला सबंध वर्षांत मुळींच भेट दिली नाहीं. इतकेंच नव्हे तर १ ते ५ अंक पाठविले तरी पोंच देखील घेतली नाहीं. केसरीचेंच उदाहरण घ्या. प्रबोधनाच्या प्रथमांकांत पुरवणी म्हणून पाठविलेल्या पोवाड्याच्या पुस्तकाचें जो केसरी परीक्षण करतो, त्यालाच प्रबोधनाची टीचभर पोंच देतांना चटकन भ्रंश होतो. नागपूरचा महाराष्ट्र दोनतीन वेळां भेटीस आला, आमचीहि परत भेट गेली. पुढें पाहतों तों एकाएकीं भेट बंद ! हीच स्थिति लोकमित्राची.

आमचे २० अंक भेटीस गेले आणि यांचे फक्त दोनच आले. लोकमित्र म्हणविणाराला प्रबोधनाच्या मैत्रीचा एवढा तिटकारा कां? लोकमित्राच्या पंक्तीलाच अरविंद (मुंबई) स्वाध्याय (वाई) वगैरे कांही मंडळी आहे. इन्दुप्रकाश, लोकमान्य व लोकसंग्रह ही तर काय, बडी बडीं दैनिक धेंडें. पंधवड्यांतून एकदां निघणाऱ्या प्रबोधनाची त्यांना कशाला असेल पर्वा? तरीपण दोघेहि समान हक्कांचे मोठे भोक्ते हो. चित्रमयजगत्, नवयुग आणि मनोरंजन यांच्याकडेही प्रबोधनाच्या पांच अंकांनीं भेट दिली. परंतु त्यांच्या दरबारांत दाद लागली नाहीं. कदाचित् प्रबोधनाला प्रतिभेट देणें त्यांना 'बिलो डिग्निटि' वाटलें कीं काय कोण जाणे ! मर्जी त्यांची. यां पेक्षा बुद्धा विविधज्ञान विस्तार बरा. त्यानीं एकदांच जाहीर करून टाकलें आहे, कीं हल्लीं नियतकालिकें फार बोकाळलीं आहेत, त्या सर्वांना एकेक अंक फुकट पाठविणें आम्हांला शक्य नाहीं. म्हणून प्रतिभेटीच्या आज्ञेनें वि. ज्ञा. वि. ला कोणी आपलीं पत्रें पाठवूं नयेत. नुसती पाठविलीं तरी चालतील. जुन्या बाण्याची मंडळी ! ती काय तरुणांना दाद देतात ! सुईच्या अग्रावर संसार करणारे. हिशेबांत एक कवडी इकडची तिकडे होईल. तर विविधज्ञान विस्तार तो कसला ! कांहींहि असो, प्रबोधनाचा पहिल्या वर्षाचा हा शेवटला अंक अभेद भावानें सर्व व्यवसाय बन्धूंच्या चरणसेवेस रुजू होत आहे. ज्या व्यवसाय बंधूंनी प्रबोधनाला वर्षभर नियमित भेट दिली, त्यांचे आम्ही अत्यंत आभारीं आहों.

***

कलमबहाद्दरांच्या क्षमेची याचना :- बऱ्याच ग्रंथकार बंधूंचे ग्रंथ अभिप्रायार्थ येऊन बसले आहेत. कांहींना शेल्यापागोट्याचा आहेर झाला, परंतु अझून बऱ्याच बांधवांच्या आगमनाची नुसती पोंचहि देण्यास सवड झाली नाहीं, याबद्दल प्रथम क्षमेची याचना करणें प्राप्त आहे. या विलंबाला मुख्य कारणे (१) स्थलसंकोच (२) पुस्तक कसेंतरी उलटसुलट पाहून झटपट रंगारी अभिप्राय देण्यांत आम्हांला वाटणार संकोच आणि (३) परीक्षक मंडळाकडून अभिप्राय येण्यास लागणारा विलंब, ही आहेत. हल्लीं बहुतेक सर्व वृत्तपत्रकारांनीं रूढ केलेली ग्रंथपरीक्षणाची झटपट रंगारी पद्धत आम्हांला साफ नापसंत आहे. वर्तमानपत्राचा संपादक झाला म्हणजे सोळा विद्या आणि चौसष्ट कलांचा बृहस्पति झाला असें थोडेंच आहे? पण मौज काय आहे ती पहा. ग्रंथ वाटेल त्या विषयाचा, वाटेल तेवढा मोठा असो, तो या संपादकांच्या हातीं पडतांच त्यावर त्यांचा अभिप्राय झटपट तयार. या पद्धतीमुळें ग्रंथ परीक्षणाचें मार्मिक कौशल्य किंवा निदान वाचकांना थोडक्यांत विषयपरीचय करून देण्याची हातोटी, आजला मराठी नियतकालीकांच्या क्षेत्रांत क्वचितच पाहावयास मिळते. हीहि एक रूढीच बनल्यामुळें तिचा संपूर्ण निरास करणें अवश्य आहे. कोणताहि लहान मोठा ग्रंथ प्रबोधनाच्या भेटीस आला की तो त्या त्या विषयांतील ३-४ तज्ज्ञांकडे अभिप्रायार्थ रवाना होतो; आणि त्यांच्या भिन्न भिन्न मतांचा काळजीपूर्वक समन्वय केल्यावरच प्रबोधनाचा अभिप्राय प्रसिद्ध होतो. या पद्धतीमुळें कोणत्याहि ग्रंथाबदद्दल बरें वाईट मत बनविण्यांत प्रबोधन-वाचकांची दिशाभूल होत नाहीं. प्रबोधनाच्या स्वतंत्र विचारसरणीवर अल्पावधींतच महाराष्ट्रीयांचा जो विश्वास बसला आहे त्याचें मूळ यांतच आहे. असो. पुढील अंकांत शिलकी ग्रंथांचा परिचय वाचकांचा करून देऊं. विलंबाबद्दल कलमबहाद्दर बांधवांनीं आम्हांस क्षमा करावी.

***

आमचा नवीन ऐतिहासिक ग्रंथ :- कोणतेंहि कार्य यथासांग पूर्ण करावें, त्यांत शक्य तोंवर कांही अपूर्णता ठेऊं नये आणि ज्यांच्या सेवेला तें रुजूं करावयाचें त्यांची जिज्ञासा अतृप्त राहूं नये, अशा धोरणानें आजपर्यंत आम्हीं आमच्या ग्रंथलेखनाचें कार्य करीत आलों आहों. शंभर वर्षांपूर्वींचें महाराष्ट्र अथवा हिंदवी स्वराज्याचा खून या ग्रंथाची वार्ता सर्वत्र फैलावतांच ठिकठिकाणांहून जुन्या कागदपत्रांची, पुराव्याच्या ग्रंथांची, रोजनिशांची मदत भरपूर आली आहे. देवच सर्वांच्या मनिं मुखीं उभा राहिला. मात्र अनंत हस्तें कमलावरानें, देतां किती घेशिल दो करानें अशी आमची स्थिति झाली आहे. सर्वच कामें एका हातीं चाललीं आहेत. मदतनिसांचा पूर्ण अभाव. त्यांत आम्ही आजारी पडलों कीं कांही दिवस सर्व कारभार थंड पडतो. गेले आठ दिवस आम्ही छातीच्या विकारानें अत्यवस्थ आजारी पडलों आहों आणि प्रस्तुतचा अंक बिछान्यांत पडल्या पडल्या, छातींत कळा सुरू असतांना व वरचे वर हृदय गति तीव्र (पॅल्पिटशेन) होत असतांना लिहिला गेला आहे. बरें, हातीं आलेले दस्तऐवज तर इतके महत्वाचे आहेत कीं छत्रपति प्रतापसिंहकालीन महाराष्ट्राच्या अंतरगत घडामोडीविषयीं मत्सरी शंकेखोरांची उलटी काळिजें पालथी पाडल्या शिवाय ते खास राहणार नाहींत. म्हणून प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनाला लागणारा विलंब प्रिय आश्रयदाते रसिकपणें क्षम्य मानतील अशी आशा आहे. कागदपत्रांच्या बाबतीत बाळप्रभु चिटणीसाच्या घराण्यांतील बोरगांवचे आमचे प्रिय बंधु श्री. भगवंतराव बळवंतराव चिटणीस यांनीं दिलेली मदत किती बहुमोल आहे, तें ग्रंथ प्रसिद्ध होतांच महाराष्ट्रानेंच ठरविलेलें बरें. श्री. चिटणीस यांच्या चरणांना आमचें वंदन असो.

□□□

प्रबोधन वर्ष २

एकूण अंक २४

पहिला अंक : १६ ऑक्टोबर १९२२

चोविसावा अंक : १ ऑक्टोबर १९२३

लेख

विश्वामित्री इतिहास - संशोधन

(लेखांक २ रा)

ब्राह्मणेतरांचा तेजोभंग करून, विशेषतः क्षत्रिय वैश्यांना शूद्रांच्या कोंडवाड्यांत दडपून आपला वरचढ सवता सुभा प्रस्थापित करण्यासाठी भिक्षुकशाहींने पुराणकाळांत नंदान्तं क्षत्रिय कुलम् म्हणजे नंदानंतर क्षत्रिय वर्ग बी बियाण्यांसकट ठार झाला, असें एक भिक्षुकी सूत्र उत्पन्न केलें. या सूत्राची उत्पत्ति झाल्यानंतरहि अनेक वेळां क्षात्रतेजानें भरतखंडाला गदगदा हालवून सोडलें. तरीसुद्धा चालू घटकेला त्याच सूत्राचें मंडण करून क्षत्रियांच्या अस्तित्वाविरूद्ध कंठशोष करणारे हजारों वे. शा. संपन्न भिक्षुक, शेंकडों विद्वान् चित्पावन व बृहस्पति शंकराचार्य आहेतच. क्षत्रियत्वाचें अस्तित्व वेळोवेळी तें अनेक विवेकी ब्राह्मणांनीहि आपल्या मुर्दाड जातभाईंच्या हुल्लडखोर मतांची पर्वा न करतां, स्पष्टपणें मान्य केल्याचे दाखले इतिहासांत आहेत व आजसुद्धां अनेक सज्जन ब्राह्मण बोलून किंवा लिहून व्यक्त करतात. म्हणजे यावरून असा सिद्धांत काढतां यावयाचा नाही की क्षत्रियांचे अस्तित्व आज सर्रास सर्व ब्राह्मणांना 'पूर्ण मान्य' आहे. अवघे तीन महिन्यांचे तात्पुरतें लष्करी शिक्षण मिळालें असताहि, जर्मन - गरुडाची फ्रान्सवर आलेली भिरीरीची झांप परतविण्यासाठी गेल्या महायुद्धात कोकणांतल्या 'नांगऱ्या' मराठ्या जवानांनी व अस्पृश्य मानलेल्या महारानी अद्‌भुत पराक्रम दाखविला. तो या दर्भसमीधाबहाद्दर भिकमाग्या भिक्षुकांना जरी अवगत नसला, तरी तो महायुद्धाच्या इतिहासांत, फ्रान्स इंग्लंडच्या हृदयांत आणि युरोपियन लढवय्यांच्या डोळ्यांत आदरातिशयाच्या सिंहासनावर विराजमान झाला आहे. पंजाबांतल्या शीखांचा व नेपाळांतल्या गुरख्यांचा लढवय्येपणाबद्दल केवढा बोलबाला! पण पारीसच्या सरहद्दीवर जेव्हा जर्मनांच्या डुकरमुसडांला तोंड देण्याचा प्रसंग येऊन बितला तेव्हा हे शीख आणि गुरखे कसे भेदरले, बिकानेरच्या महाराजांनी 'छत्रपति शिवाजी महाराजांच्या नांवाला तुम्ही काळीमा फांसणार काय?' असा जाठ रजपूत मराठ्यांना सवाल टाकतांच, मेजर डफळ्यांनी सर्रकन् मॅन्यांतून तलवार काढून उंच उभारताच जाठ रजपूत मराठ्यांनी बोलो शिवाजी महाराजकी जय अशी गगनभेदी गर्जना कशी केली आणि पाण्याचा एक घोंटही न पीतां ताबडतोब जर्मनीच्या मोर्च्यावर लांडगेतोडीचा हल्ला चढवून अवघ्या सहा तासांत जर्मन गब्रूंना पारीसपासून ४७ मैलांवर रेटीत नेऊन कसे उध्वस्थ केले. या गोष्टी केसरीच्या महायुद्धवार्तेत किंवा

खाडीलकरांच्या मासीक युद्ध चर्चेच्या चित्रमयजगती श्राद्धविधींत जरी ठळकपणे नमूद नसल्या, तरी त्यांची प्रत्यक्ष परिचयाची साक्ष द्यायला बिकानेरचे रणगाजी महाराज आज हयात आहेत. पेशव्यांच्या सैतानशाहीनें बोथट केलेल्या महाराष्ट्रीय महार मराठ्यादि क्षत्रियांच्या तलवारी कावेबाज इंग्रज कुंफणीनें आर्म्स आक्टाच्या कफणाखाली दफणल्या दिवसांपासून, त्या बिचाऱ्यांच्या सर्व महत्त्वाकांक्षा नांगरांत अडकून राहिल्या. तरी पण वेळ येतांच रक्तांत जिवंत राहिलेल्या क्षात्र तेजाने युरपखंडांत मराठ्यांच्या तलवारीचे पाणी दाखविलें, युरोपियन लढवय्यांच्या तोंडचें पळालेले पाणी आनंदाच्या व विस्मयाच्या अतिरेकानें डोळ्यांतून बाहेर काढलें आणि 'ब्रेव्हो इंडियन टायगर' (जीते रहो हिन्दु-स्थानका शेर) असा प्रशंसेचा जयजयकार आबालवृद्ध युरपियन स्त्रीपुरुषांच्या तोंडी सर्वत्र रूढ केला. क्षात्र गुणकर्मांची ही प्रत्यक्ष जिवंत प्रचीती आजच्या जिवंत ब्राह्मणब्रुवांच्या उघड्या डोळ्यांसमोर असतांहि, त्याच लढवय्या मर्द महारांना अस्पृश्य म्हणायला सर्रास ब्राह्मणांच्या जिव्हा चुकत नाहीतं. कोंकण घाटाघरच्या शिवाजीच्या याच रणधुरंधर मराठे जवानांना संबंध रत्नागिरी जिल्ह्यात श्री. भा बोडसांचा एकहि जातभाई 'शुद्र' अशा शिवा हांसडण्यास अझूनहि शरमत नाही, किंवा शिववंशय करवीरकर छत्रपतींनीं क्षात्रयोचित वेदोक्त धर्माचरणाचा आग्रह धरताच टिळकांपासून तो बोंडसापर्यंत एकजात चित्पावनांच्या अंतकःरणाची होळी पेटल्याशिवाय राहात नाही. मराठे क्षत्रिय कीं शूद्र हा वाद शिवाजीच्या वेळेपासून चालला आहे व नुकतेंच तंजावरच्या कोर्टानें कोल्हापूरच्या महाराजांस शूद्र ठरविलें, तरी तेवढ्यानें लोकांचें समाधान होत नाहीं. (चि. जगत् वर्णव्यवस्था जाने. १९१९) हे ममईच्या बोडसांने काढलेले उद्गार श्री भाव्यांच्या प्रत्यक्ष डोळ्यांत नसलें तरी डोळ्यांखालून खास गेले असले पाहिजेत. या बोडशी उद्गारांचा क्षत्रियत्व पूर्णपणें मान्य आहे' असा भावार्थ निघतो काय? श्री. भाव्यांनी स्पष्ट उत्तर द्यावें. क्षत्रियांच्या क्षात्रवीर्याचा जागताज्योत पुरावा महायुद्धाने ब्राह्मणांच्या छाताडावर प्रत्यक्ष पाय देऊन उभा केला असतांहि चालूं घटकेला क्षत्रियांचे अस्तित्व, विशेषतः मराठ्यांचें क्षत्रियत्व ज्या विद्यमान भावे बोडशी ब्राह्मणांना लवमात्र मान्य होत नाही, त्याच शहाण्या जातीतल्या शहाण्या भाव्यांनी शिवाजीच्या क्षत्रियत्वाचा ''प्रत्यक्ष पुरावा रोजच्या रोज दिसत होता. शिवाजी महाराजांनी आपल्या तलवारांनें तो उत्तम प्रकारें शाबीत केला होता. व तशांतूनहि कोणास शंका असल्यास तो वाटेल, तेव्हां सिद्ध करण्यास आपली लटपटीची गरज नव्हती.'' असली मल्लीनाथी करतांना जनाची नसली तरी निदान मनाची तरी लाज बाळगिली पाहिजे होती. क्षत्रियांनी आपलें क्षात्रतेज आतांप्रमाणेच शिवाकाळांहि जगाला पटवून दिलें होतें. आतांप्रमाणेंच त्यावेळींहि परमानंद भटांसारख्या कांही विवेकी ब्राह्मणांनी क्षत्रियांच्या अस्तित्वाला मान्यता दिली होती. आतां प्रमाणेंच क्षत्रियांच्या क्षत्रवीर्याची तरफदारी करणारे बरेच संस्कृत ग्रंथ त्या वेळीं जिवंत होते. शंकेखोरांचें शंकानिरसन करण्यासाठीं शिवाजी 'तरवार घेऊन तयार असे; आजचे क्षत्रिय महायुद्धांतील जखमा व बिल्ले घेऊन तयार आहेत. आणि आजचा मुर्दाड ब्राह्मण समाज मराठ्यांच्या किंवा अखिल क्षत्रियांच्या उलट्या काळजाचा टिळकीपणा शिवाजीच्या वेळच्या भिक्षुकांत होता, म्हणूनच बाळाजी आवजीला, २० व्या शतकांतल्या ठाणेकर भाव्यांच्या विद्वतेची पर्वा न ठेवता, १७ व्या शतकांतल्या भटांची मगरूरी जिरविण्यासाठी गागाभटाकडून परस्पर पैजारा भडकविण्याची 'लटपटी मध्यस्थगिरी' करावी लागली. शिवाजीच्या क्षत्रियत्वाची साक्ष देणारे

दस्तऐवजी पुरावे व जिवंत माणसे रगड होती. त्यांत दहाबारा विवेकी ब्राह्मणहि असतील. नाही असे राज्याभिषेक प्रकरणी शिवाजीविरुद्ध धर्मद्रोही कृतघ्नतेची बंडाळी ब्राह्मणांनी माजविलीच नाहीं, असल्या चित्पावनी विधानानें शिवकालीन् ब्राह्मणांची काळी तोंडें स्वच्छ करण्यासाठी श्री. भाव्यांच्या प्रस्तुत लेखाशिवाय इतर सर्व उपलब्ध ऐतिहासिक साहित्य जाळून खाक करावें लागेल. शिवाजीच्या व अखिल मराठ्यांच्या क्षत्रियत्वाबद्दल परमानंद कृत शिवभारता शिवाय आणखी शेंकडों दस्त ऐवजी पुरावे अझूनहि सांपडतील. परंतु तेवढ्यानें ब्राह्मणांचा हरामखोरपणा रतिमात्र कमी न होता, उलट एवढ्या समकालीन् जबरदस्त प्रत्यक्ष पुराव्याला विरोध करणारांचा भिक्षुकी गाढवपणा मात्र अधिकाधिक सिद्ध होणार आहे, हें भाव्यांनी खूप ध्यानांत शिवाजीचें क्षत्रियत्व आपापल्या ग्रंथांत नमूद करून ठेवले, हा कांही 'महाराष्ट्रांतील विद्वान् वैदिक ब्राह्मणांस महाराजांचे क्षत्रियत्व पूर्णपणें मान्य होतें'' याचा पुरावा नव्हे. किंवा राज्याभिषेक प्रसंगी मोरोपंत पिंगळे, रघुनाथ पंडीत प्रभृति मुर्दाड भिक्षुकांच्या उपरण्याखाली ब्राह्मणांनी केलेल्या हलकटपणाला खाटा ठरविणारा सिद्धांत नव्हें. महाराष्ट्रांतल्या अखिल दर्भसमीधापटूंना जर भोंसल्यांचे क्षत्रियत्व 'पूर्णपणे मान्य' होतें, तर राज्याभिषेकाचा वेदोक्त विधि करणारा एखादा शंकराचार्य किंवा 'विद्वान ब्राह्मण' त्या वेळी कां पुढें आला नाही? रायगडावर दक्षिणेचे. शेण खायला धावंत पळत गेलेल्या ब्रह्ममुखोत्पन्नांत काय एकहि विद्वानं पुरोहित नसावा? महाराष्ट्र ब्राह्मणांच्या उरावर काशी वा गागा आणून बसविण्याचा काय जरूर होती? का येथले सारे वे. शा संपन्न आणि शंकराचार्य अचानक पटकी येऊन मेले हाते? झालें होतें तरी काय? या प्रश्नांची रोखठाक उत्तरे इतिहासांत नमूद आहेत. इतिहास जरी उद्या मेला किंवा मराठी स्वराज्यप्रमाणेंच नातु सांप्रदायिकांनी ठार मारला, तरी ब्राह्मणांनी शिवाजी महाराजांना दिलेल्या कृतघ्न उपसर्गाच्या तिडका मराठ्यांच्या आणि मराठ्यांच्या आणि कायस्थ प्रभूंच्या रक्तांत वंशपरंपरेने चिरस्थायी होऊन बसल्या आहेत. सडकेवरील खड्याइतके भावे बोडस निर्माण होऊन त्यांनी जरी चित्रमय जगताची सर्व पाने खरडण्याचा राष्ट्रीय पणा जोराने चालू ठेवला, तरी त्या तिडका नष्ट करण्यासाठी ब्रह्मदेवाची पुण्याई सुद्धा पुरी पडणार नाही.

आपण वादार्थ असे गृहीत धरून चालूं की श्री. भाव्यांनी लावलेला शोध अक्षरशः बरोबर, शिवाजीचे क्षत्रियत्व महाराष्ट्रीय ब्राह्मणांना पूर्ण मान्य होतें, आणि त्यांनी राज्याभिषेक प्रसंगी कसलाहि राष्ट्रीयपणा केला नाही. यावर असा प्रश्न साहजिकच उद्भवतो कीं, जर शिवाजीचे (अर्थात आखिल मराठ्यांचें) क्षत्रियत्व महाराष्ट्रीय ब्राह्मणांना जर 'पूर्ण मान्य' होतें, तर त्याच शिवाजीच्या वंशजाचें क्षत्रियत्व त्यांना एकाकी कां अमान्य झालें? छत्रपतींना व सर्रास मराठ्यांना शूद्र शिवी हांसडण्याची त्यांची मर्जी कां लागली? वेदोक्ताच्याऐवजीं पुराणोक्त विधींची त्यांच्यावर बळजबरी कां होऊ लागली? 'क्षत्रिय कुलावंतस' हा छत्रपतीच्या नांवामागें लागणारा मायना बदलून त्या ऐवजी 'भोसले कुलावतंस' हा चित्पावनी मायना कागदोपत्री रूढ करण्याची चिंतामणराव सांगलीकराला अवदसा कां आठवली? श्रीमंत महाराजांची मुंज्य पुराणोक्त विधि करून जाहाली ही गोष्ट तुम्ही फारच उत्तम केली. ''हे सर्टिफिकीट नाना फडणीसानें छत्रपतींच्या चित्पावन जेलरास- 'राजश्री बाबुराव स्वामी'चे शेवेसी' - पाठविले. त्याचा अर्थ काय? नाना फडणीसांने वेदोक्ताऐवजी पुराणोक्त मंत्रांनी छत्रपतींच्या मुंजी तरी होऊं दिल्या, पण रावबाजीनें तर त्याहि अज्जीबात बंद

केल्या*! महाराष्ट्रीय ब्राह्मणांस शिवाजींचें क्षत्रियत्व 'पूर्ण मान्य' असल्याचाच हा दाखला काय? प्रतापसिंह छत्रपतीच्या वेळी मराठ्यांवर ब्राह्मणांनी जी भयंकर प्रामण्याची चढाई केली आणि 'कलींत क्षत्रिय नाही' या मुद्यावर साताऱ्यांत जे भिक्षुकी रणकंदन माजविले, तें याच मान्यतेचें द्योतक काय? शिवाजी जर क्षत्रिय होता, तर त्याचे वंशजच तेवढे शूद्र कसे ठरले? नन्दान्तं क्षत्रिय कुलम् झाल्यावर महाराष्ट्रीय विद्वान दर्भधारकांच्या 'पूर्ण सहाय्याने' शिवाजीला 'क्षात्रधर्मस्य नवावतारः' ठरविलें, मग पुढें कोणान्तं क्षत्रिय-कुलं झालें, ते श्री. भावे सांगूं शकतील काय? कोल्हापूरचा वेदोक्ताचा धुमाकूळ म्हणजे जिवंत ब्राह्मणांच्या राष्ट्रीयपणाचें जिवंत स्मारक. कोल्हापूरच्या शिववंशज छत्रपतींना शूद्र ठरविण्यासाठी मेहरबान भाव्यांच्या जातभाईंनी आपल्या जिवाचें नांव शिवा ठेवण्यांत मुळीच कसूर केलेली नाही. उलट तंजावर प्रकरणांत कोल्हापूरकर छत्रपतींना व सर्व मराठ्यांना मद्रासच्या शूद्र मुदलियर जज्जानें शूद्र ठरविल्याचें ऐकून लोकमान्य लोकश्री महादेव राजाराम बोडस चित्रमय जगतमध्यें आनंदाने टिऱ्या कुटूं लागले! कोल्हापूर वेदोक्त प्रकरणांत राजोपाध्यांना शाहू छत्रपतींनी गचांडी देऊन घरी बसविलें त्याबद्दल ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनी आपल्या 'हिस्टरी ऑफ इन्डियन कास्ट्स्' नामक ग्रंथांत (पृ. ६० फुटनोट) असे गर्वोक्तीचे उद्गार काढले आहेत की, ''पैशाच्या किंवा इतर लोभानें ब्राह्मण लोक वाटेल, ते विधि वाटेल, त्याच्या घरी करण्यास सिद्ध होतील, अशी कोणाची जर समजूत असेल, तर ती साफ चकू आहे. ब्राह्मणाचा स्वत्वाचा अभिमान जेहत्ते काय कथन करावा! काय त्याचें शील, केवढी धर्माचरणाची कडवी शिस्त आणि तीव्र स्वतंत्र निस्पृह बाणा!! आजला सुद्धा अशा एका निस्पृह ब्राह्मणानें आपल्या वंशपरंपरागत चाळीस हजारांच्या जहागिरीवर लाथ मारली, पण शिवाजीच्या वंशजाच्या घराण्यांत वेदोक्त कर्म करण्याचें साफ नाकारलें.'' श्री. भाव्यांना आमचा सरळ सवाल आहे की, आधुनिक विद्वान ब्राह्मणांची ही मुक्ताफळे तुम्हाला काय सिद्धांत पटवीत आहेत? शिवाजी तेवढा क्षत्रिय आणि त्याचे वंशज सातारकर व कोल्हापुरकर छत्रपति मात्र शूद्र, हे त्रांगडे श्री. भाव्यांसारख्या त्रयराशिकी संशोधकांनीच उलगडून दाखविलें बरें. तथापि आम्ही थोडी मदत करतों. शिवाजीचें क्षत्रियत्व मान्य करणाऱ्या तत्कालीन विद्वान महाराष्ट्रीय ब्राह्मणांना जर तुम्हाला स्वराज्यनिष्ठ, शिवप्रेमी व शहाणे ठरविणे असेल, तर त्याच शिवाजीच्या वंशजांना व अखिल मराठ्यांना शूद्र ठरविणाऱ्या पेशव्यांना व आधुनिक विद्वान महाराष्ट्रीय ब्राह्मणांना स्वराज्यद्रोही, छत्रपतिद्रोही व गाढव ठरविण्याचा मॅनिफेस्टो जाहीर करा आणि पेशव्यांची अगर आधुनिक बोडस केतकरादि ब्राह्मण विद्वानांची अब्रू चव्हाट्यावर आणण्याचा निस्पृहपणा जर तुमच्यांत नसेल, तर शिवकालीन ब्राह्मणांच्या इतिहाससिद्ध पाजीपणावर पांघरूण घालण्याचा पाजीपणा करूं नका. बापजाद्यांचा मूर्खपणा बिनशर्त कबूल करा किंवा स्वतःचा मूर्खपणा निस्संकोच कबूल करा, या शिवाय या त्रांगड्याचा तिसरा निर्णय लागणे शक्य नाही.

कायस्थ प्रभु समाजाच्या शिवकालीन राष्ट्रकार्याला व वीर वीरांगनांना कवडीमोल ठरविण्यासाठी, कायस्थांनी लिहून ठेवलेल्या आद्य बखरींना 'खोडसाळ' ठरवून, त्यांची महाराष्ट्रेतिहासिविषयक

---

* सातारेयाचे राजे यांस राज्याभिषेक करावयाच्या पूर्वी मुंज करून मग राज्याभिषेक व्हावा, अशी शिवाजी महाराजांची पासून चाल होती, तो श्रीमंतांनी यावेळेस मना करून मुंज्य केल्याशिवाय राज्याभिषेक केला.
पेशवाईची अखेर. पृ. १४४.

कामगिरी हाणून पाडण्यासाठी आणि एकट्या ब्राह्मणांच्या टाळक्यावर स्वराज्यनाशाचे फुटलेले खापर येनकेन प्रकारेण सर्व ब्राह्मणतेरांच्याहि, विशेषतः कायस्था मराठ्यांच्या बोडक्यावर अलगज ठेवण्यासाठी अलीकडे जे ब्राह्मणी राष्ट्रीय प्रयत्न सुरूं आहेत, त्याचा दृश्य परिणाम श्री. भावे बोडसादिकांच्या लेखांतून प्रकट होत असतो. अर्थात् या प्रयत्नांच्या धामधुमीत बाळप्रभु चिटणीसाच्या निंदेवर शिवकालीन ब्राह्मणांची स्वराज्यनिष्ठा, रंगो बापुजीवर पाखडलेल्या आगींत रावबाजींच्या कर्तबगारी, गागाभट्ट प्रकरणांतल्या कायस्थांच्या खटपटींच्या गाढवपणावर मराठ्यांना कायस्थांविरुद्ध चिथविण्याची राष्ट्रीय पंथ प्रासदिक नातुगिरी, असले प्रकार इतिहास संशोधनांच्या नाकखाली बेफाम बोकाळल्यास आश्चर्य नाही. कृतघ्नता ही राष्ट्रीय चित्पावन ब्राह्मणांच्या जीविताची जीवनदेवता असल्यामुळें, चिटणीशी कलमाच्या फटकाऱ्याच्या पोटी अखिल चित्पावन समाजाचे सामाजिक अस्तित्व व राजकीय भाग्य जन्माला आलें, ही इतिहाससिद्ध गोष्ट आधुनिकांच्या स्मरणांतून नष्ट होऊन, केवळ पेशवे संप्रदायाच्या स्तोमासाठी त्यांनीं बाळ चिटणिसादि प्राचीन पुरस्कर्त्यांवर लाथा झाडल्या, तर त्यात बिघडलें कोठें? शिवाय, सध्यां सुरूं असलेल्या स्वराज्याच्या राष्ट्रीय शिमग्यांत ही पुणेरी ठाणेरी कुत्रीं जर सर्रास ब्राह्मणेतरांवर भुंकण्यास कांकू शिवाय कसा राहील? ब्राह्मणेतरांना स्वराज्यद्रोही ठरविल्याशिवाय ब्राह्मणांची स्वराज्यनिष्ठा प्रस्थापित होणेंच शक्य नाही.

□□□

अग्रलेख

भाऊबिजेची ओवाळणी

सालाबादप्रमाणे अखिल हिन्दु जनता दिवाळीचा दिवाळखोर सण साजरा करण्याच्या धामधुमीत असतांनाच, प्रबोधनाचा २ऱ्या वर्षाचा हा १ ला अंक वाचकाच्या हातीं पडत आहे. उत्सवप्रियता हा मानवी दुनियेचा एक गुणधर्मच आहे. आणि इहलोकाचें आपलें अस्तित्व आनंदमय करण्यासाठी आपणास संसृति-संगरांत ज्या अनंत छोट्यामोठ्या झटापटी कराव्या लागतात, त्यांच्या दगदगीपासून मनाला किंचित्काळ अलिप्त ठेऊन, त्याचा कार्यक्षमतेचा जोम व उत्साह वृद्धिगत करण्यासाठी, थोडा विसावा, थोडी करमणूक, थोडा व्यवसायाचा थारेपालट आवश्यक आहे. मनाला वरचेवर भिन्नभिन्न रसांचा स्वाद घेतां आला नाहीं, तर सदान्‌कदा एकच काम, एकच रस, एकच चिंता अणि आयुष्क्रमाची एकच साचेबंद धाटणी, असल्या एकरंगी एकरशी एकेरी जीवनामुळें मन केव्हां ना केव्हां तरी एकेरीवर आल्याशिवाय राहात नाही. ते वर्दळीवर येऊन बंड करतें. आणि सात्विक रसभिन्नतेचा त्याला योग्य वेळी योग्य पुरवठा न झाल्यामुळें, तें अथवा त्याला कमजोरपणाचा क्षय लागून अखेर तें चैतन्यक्षीण होते. मनाचा दुबळेपणा हा मानवसृष्टीचा ऱ्हास, ही जाणीव मनानेंच मानवाला करून दिल्यामुळें, उत्सवप्रियतेचा गुणधर्म जन्माला आलेला आहे. यानें अनेक उत्सव व सण सर्व काळीं सर्व राष्ट्रांत उत्पन्न केले आहेत. चुकूनसुद्धा कधी एकादा उत्सव न करणारा सुतकी मानव समाज जगाच्या पाठीवर कोठेंही आढळणार नाही. उत्सवाचें स्वरूप कांहींहि असो; रानटी राक्षसी व रुधिराप्रिय कां असेना, पण ते सर्व ठिकाणीं त्या त्या समाजाच्या मनसंस्कृतीप्रमाणें साजरे होतच असतात. नरमासंभक्षक रानटी समाज बलिदानासरखे कांहीतरी अघोरी सण साजरे करून आपल्या रानटी मनाची भिन्न रसलोलुपता तृप्त करीत असतात. सणांचा इतिहास पाहिला, तर असें दिसतें कीं मानांची भिन्न रसास्वाद प्रवृत्ति त्यांत पूर्णत्त्वानें उमटलेली आहे; परंतु मानवस्वभावच असा चमत्कारिक आहे कीं त्याला चैतन्याची वरचेवर टोंचणी जर नसेल, तर कालवशात् तो त्या भिन्नरस प्रवृत्तीलासुद्धा परंपरेचे एकरशी एकमार्गी एकलकोंडें वळण देऊन, तिला मातीमोल करून सोडतो. उत्सवांच्या व सणांच्या कार्यक्रमात असा ठोकळेवजा अंधानुकरणाचा प्रादुर्भाव झाला, क्षणोक्षणीं बदलणाऱ्या कालपटलाच्या भिन्नभिन्न नवदर्शनानरूप नवीन चैतन्याचा संदेश देणारी त्यांची शक्ति मूकं बनली, आणि वाडवडिलांनी घालून दिलेल्या 'बाळबंदी' वळणापलीकडे तसूभरसुद्धा

वळण घेण्याची प्रवृत्ति ठार मेली, की असले उत्सव व सण मानवाच्या मनाला जिवंत ठेवण्याऐवजी गुप्तपणे हळूहळू त्याचा आमूलाग्र उच्छेद करण्यास कारण होत असतात. उत्सवांच्या कार्यक्रमांत व तपशीलांत देश-कालवर्तमानाप्रमाणें चैतन्याचे नवेनवे ताजेतवाने स्फुरण देण्याचें सामर्थ्य जर नष्ट झालें असेल, तर असले मुडदेफराशी उत्सव व सण अजीबाद बंद करणेंच श्रेयस्कर होईल. शरीरावरच्या लाल जखमा पत्करल्या, पण मनाची मान मोडणारा एकही प्रहार - मग तो कितीहि क्षुल्लक असो वा दिसा! सहन करणें हें मनुष्याला नामुष्कीची काजळ फांसणारे आहे. बाह्यांग ठेंचाळलें तर कुछ परवा नहि, पण मन जरा का ठेंचालें कीं अधःपाताचा पाया पडलाच म्हणून समजावें. राष्ट्राचें मन जावत्काळ निर्लेप शाबूद आहे, तावत्काळ स्वातंत्र्याच्या व गुलामगिरीच्या भरती ओहटीच्या लाटा लक्षावधी आल्या आणि गेल्या, तरी त्याची पर्वा नसते. म्हणूनच मनाचा जोरकसपणा अव्यंग राखण्यासाठी मनुष्यांनी आपल्या शक्तीयुक्तीची शिकस्तच केली पाहिजे. मनानेंच मनाच्या जोरकसपणासाठी उत्सव निर्माण केले. अर्थात् हा जोरकसपणाचा पुरवठा करणारें चैतन्य ज्या उत्सवांत उरणार नाही, त्या उत्सवांचा बीमोड करण्याचा अधिकार मनाला खास खास आहे; आणि हा नैसर्गिक अधिकार मन बजावित असतां त्याला माणसांने विरोध करणें म्हणजे 'आम्ही जिवंत रहाण्यास नालायक आहोंत' अशी स्पष्ट कबुली देणेंच होय.

मनाला चैतन्याचा मुबलक पुरवठा होऊन, पाजळलेल्या समशेरी प्रमाणें आपल्या राष्ट्राचें जीवन सदैव तरतरीत व कार्यक्षम रहावे, म्हणून प्राचीन हिन्दुजनांनी सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अनेक सणांची व उत्सवांची निर्मिती केली. कांही काळ या उत्सवांनीं आपल्या जिवंतपणानें हिन्दुराष्ट्राचा जिवंतपणा उचलून धरला. प्रत्येक सणाच्या इतिहासांत त्याचें विवक्षित राष्ट्रकार्य असल्याचें स्पष्ट दिसतें. पण आज स्थिति काय आहे? स्पष्ट बोला. काचरूं नका. निदान, आधींच ठकल्या गेलेल्या मनाला अधिक ठकवूं नका. हिंदुस्थान हें नांव शिल्लक उरलें असलें, तरी हिन्दुंना राष्ट्र उरलेलें नाहीं. 'राष्ट्रीय पक्ष' 'राष्ट्रीय शिक्षण' 'राष्ट्रीय फंड' इत्यादि जे 'राष्ट्रीय' धांगडधिंगे अलीकडे बोकाळलेले आहेत ते शुद्ध नकली आहेत. हिन्दूंना स्वतःचे राष्ट्र असतें, तर ते आज गुलाम दिसले नसते. हिन्दुंचे राष्ट्रीय मन जर जिवंत असतें, तर खुद्द हिन्दुस्थानांतल्या हिन्दुस्थानांत त्यांच्या हिन्दुधर्माची पायमल्ली झाली नसती. 'मुसलमान' हा आगांतुक विषय या भूमींत रुजला नसता, क्रिस्त्यांचा कावा लोकसग्रंहानें सुजला नसता. मोपल्यांच्या गुरकावणीला हिन्दु अदमी बुजला नसता, आया बहिर्णींची प्राणघातक विटंबना उघड्या डोळ्यांनीं पाहुन ढणढणा घोरत निजला नसता, फार काय, पण आज ज्या किळसवाण्या द्वैतानें अखिल हिन्दु समाज आरपार सडून गेला आहे, त्या द्वैतभावाचा काळा पाय या भूमीवर खास रुजला नसता ! ज्यांनीं आपल्या मनाची मुंडीच पिरगाळली, ज्यांचें मनच मेलें आहे, आणि निष्ठुर बेमुर्वतपणामुळें ज्यांचें सामाजिक व धार्मिक जीवन डबक्यांतल्या पाण्याप्रमाणे ठिकच्या ठिकाणीं गोठून कुजलें आहे, अशा वाचीवीर्य परंतु दुबळ्या हिन्दूंच्या उत्सवांत सुद्धां निर्जीवपणा स्पष्ट दिसत आहे. संस्कृति-परीक्षणाच्या ज्या काही - ठळक कसोट्या आहेत, त्या सांप्रतच्या हिन्दूंच्या सर्वांगीण जीवनास लांवल्या, तर आहे त्या गुलाम स्थितीपेक्षां दुसरी निराळी स्थितीच संभवत नाही. अर्थात् गुलाम मनावृत्तीच्या गुलामांच्या उत्सवांत व सणांत मानसिक गुलामगिरीच्या चकारी, वळणाशिवाय दुसरे कोणतें वळण असणार ?

हिन्दूंच्या अनेक सणांत दसरा व दिवाळी (दीपावली) हे दोन सण प्रमुख आहेत. त्यांच्या प्रामुख्याला ऐतिहासिक आधार आहे. एकवेळ हे दोन उत्सव हिन्दुराष्ट्राच्या चैतन्याच्या संवेदना दरसाल इतक्या धडाडीनें

बिनचुक जागृंत करीत असत कीं भारत रामायणादि इतिहासात अजरामर होऊन बसलेल्या भारतीय युद्धांचीं चित्रें याच उत्सवांनीं हातांत राष्ट्राभिमानाचें कलम घेऊन रंगविलीं होतीं. दसऱ्याच्या दिवशीं सीमोल्लंघन करून, पुढील आठ महिन्यांतील नियोजित मोहिमांचें प्रस्थान सीमेवर नेऊन ठेवायचे आणि दिवाळीचा दीपोत्सव करून, घरांतील मातापितरांचे, भगिनींचे, पत्नीचे, गांवकऱ्यांचे, इष्टमित्रांचे सप्रेम आशीर्वाद, प्रणाम किंवा मुजरे घेऊन, रणांगणाकडे फुरफुरत्या उत्साहाने निघून जायचे. थोड्या बहुत फरकानें या दोन उत्सवांचा कार्यक्रम असाच आहे. पैकीं दसरा हा सण : पुरुषांचा आणि दिवाळीत स्त्रियांचें महत्व फार. पुरुषांना आपल्या कर्तबगारीची शस्त्रास्त्रें पाजळण्याची संधि दसरा देतो; दिवाळी येणार-येत आहे-आली, या प्रत्येक शब्दोच्चाराबरोबर आमच्या मातांची भगिनींची गृहिणीची कलाकुशल रसिक अंतःकरणें कारंजी धारे प्रमाणे सोल्हास थुइथुइ नाचूं लागतात. पुरुषांच्या पराक्रमाला स्त्रियांच्या प्रोत्साहनाची काय अवश्यकता आहे, हें दसरा दिवाळीच्या परस्पर संबंधावरून चांगलें व्यक्त होईल. पुरुषांनीं विजयादशमीच्या दिवशीं ज्या महत्वाकांक्षांचें बीजारोपण केलें, त्यांचा राष्ट्राच्या अभ्युदयार्थ गगनचुंबित महावृक्ष बनावा, या कौतुकास्पद इच्छेनें, त्यांच्या उत्साहाची व आनंदाची लाट उसळती ठेवण्यासाठी या दिवाळीच्या सणांत स्त्रिया आपल्या कर्तव्याची शिकस्त करीत असतात. सांप्रत आम्हाला काही महत्वाकांक्षाच उरलेल्या नाहींत. बरें, काही शिल्लक असल्या किंवा नवीन उद्भवल्याच तर त्यांच्या परिपाकाचें विशिष्ट क्षेत्र जें आमचे मन तेंच मुळी ठार मेलेलें. तेव्हां, सीमोलंघन म्हणजे गांवच्या वेशीवर जाऊन हात हालवीत परत येण्याची वेठ, लुटून आणलेलें सोनें म्हणजे आपट्याची पाने, धनत्रयोदशी म्हणजे धण्याचे दाणे बकणायचे, लक्ष्मीपूजन म्हणजे चार दोन रुपयांची पूजा, भाऊ बीज म्हणजे बहिणीच्या घरी जाऊन पोट फुटे तों जेवणे आणि हे दोनहि सण म्हणजे ऋण काढून यथेच्छ खादोडीची हौस आकंठ पुरविण्याचा वार्षिक हंगाम बनल्यामुळें विषाद वाटला नाहीं तरी आश्चर्य वाटतें. सारांश दसरा व दिवाळी या दोन स्फूर्तिदायक उत्सवांतली स्फूर्ति आज साफ नष्ट झाल्यामुळें, अन्नान्न झालेल्या हिन्दूंची मिष्टान्नेच्छा भागविण्याच्या वार्षिक पर्वणी पलीकडे त्यांत कांही विशेष राम उरलेला नाहीं.

स्वराज्य नऊ महिन्यांत मिळते की नऊ दिवसांत मिळतें, हे कांही आम्हांला समजत नाहीं; कारण अझून एखाद्या महात्म्याचा किंवा लोकमान्याचा सांप्रदायिक गंडा मनगटावर चढवून घेण्याची कुबुद्धि आम्हाला झालेली नाहीं. पण एवढें मात्र कोणालाहि दिसेल कीं सध्यां हिन्दुराष्ट्राच्या मनाची घटना आस्ते आस्ते होत आहे. ही मनाच्या घटनेची भट्टी परिपक्व करण्याचें कार्य जशा विविध परस्परविरोधी चळवळी करींत आहेत, तसा काळहि त्याला हातभार लावीत आहे. हिन्दुराष्ट्राच्या गतप्राण मनाचें आज प्रबोधन सुरूं आहे. त्याचे फिकट पडलेले रंग आतां हळुहळू उमलत आहेत. अझून दिल्लीचा पल्ला बराच लांब आहे. जगांत तर राज्यक्रान्तीचा थयथयाट जोरानें सुरू असून, कालचे चक्रवर्ति आज भीक मागत फिरती, असली उलटापालट प्रत्येक क्षणाला हिन्दु मनाच्या अणुरेणूंत उत्क्रान्ति करीत आहे. वंशपरंपरा राजसत्तेवर प्रजासत्ताक पद्धतीने मागेंच मात केली. आज तिच्यावरहि निर्भेळ लोकशाही आपल्या कुदळ कुऱ्हाडींचा मारा करायला सिद्ध झाली आहे. मजुरांनी धनाशेटींच्या पागड्या तुडविण्याची मोहीम मोठ्या नेटानें चालूं केली आहे, तर वर्णश्रेष्ठतेच्या धावपळींत लपून बसलेल्या सोंगाड्या धर्मगुरूंची जनतेनें बेछुट ससेहोलपट चालविली आहे. तात्पर्य, साऱ्या जगाचाच रागरंग जेथें बनियाच्या पागडीप्रमाणें उलटासुलटा झाला आहे, तेथें हिन्दुजनांच्या महत्त्वाकांक्षांचे स्वरूप सद्यःकालानुरूप खास बदललें असलें पाहिजे; आणि हे जर खरें

आहे, व जुन्या सणांच्या जुन्या कार्यक्रमानें नव्या आकांक्षांना चैतन्याची जर कांहींच मदत होत नाहीं, तर त्यांच्या तपशीलांत योग्य तो फेरफार करणें शहाणपणाचें, की बापजाद्यांच्या सीमोल्लंघनकृतीचें नाटकी अंधानुकरण करणे शहाणपणाचें? याचा विचारी सज्जनांनी विचारच करावा.

परवां नरकचतुर्दशीच्या पहाटें सर्व हिन्दुजन तैलाभ्यंग मंगल स्नानें करून शुचिर्भूत होतील. उत्तमोत्तम वस्त्रप्रावरणें पांघरून मिष्टान्नांचें भोजन करतील. इष्टमित्रादि आप्तांना सप्रेम भेटतील. भेटीभवऱ्या पाठवितील आणि आज आपण आनंदातिशयाच्या शिखरावर गेलों, अंतर्बाह्य शुद्ध झालों: अंतर्बाह्य मंगल झालों, अशा खोट्या कल्पनांत मग्न राहतील. या वेळी त्यांना अन्यायपीडित अस्पृश्य बांधवांची आठवण होणार नाही. चुकून माकून एखादा भेटलाच तर त्याच्या सावलीचा 'कडवसा' टाळण्यासाठी कोणी घाणेरड्या गटारावरहि तोल संभाळून उभे राहतील, पण स्पर्श किंवा हस्तंदोलन करणार नाहीत. सर्वत्र मंगल आहे, आनंद आहे, अशा भावनेच्या झोपाळ्यावर हृदय झोके घेत असतांना, एकालाहि हिन्दु समाजांतील दोन कोटी साठ लक्ष निरक्षर बालविधवा भगिनींचा आक्रोश ऐकूं येणार नाहीं. मानवी संसारांत स्त्रियांचें प्राधान्य आदरपूर्वक कबूल करून, त्यांच्या जन्मजात सद्गुणांचें कौतुक करण्यासाठींच दिवाळीचा सण सालोसाल येतो. हिन्दु स्त्रियांची निरक्षता, त्यांचें शोचनीय परावलंबन, भिकारड्या पौराणिक गोष्टीनीं त्याच्या मनावर बसविलेला भोळसट श्रद्धेंचा पगडा, धर्माच्या व शास्त्राच्या नावाखाली त्यांचे निर्दयपणानें होत असलेले धिंडवडे, इत्यादि अमानुष व रानटी समाजालाहि न शोभणारें अमंगल प्रकार नष्ट करण्यासाठी, घातुक रूढीवर हल्ला करण्यास कचरणाऱ्या हिन्दूंनो, दिवाळीच्या मामुली मंगल स्नानानें ही सर्वत्र पसरलेलीं अमंगलें धुऊन जातील, असाच कां तुमचा समज आहे? स्त्रियांच्या निरक्षरतेची व हतबलतेची बेडी अखिल हिन्दु समाजाच्या पायांत पडल्यामुळे, पाणीदार विवाहित तरुणांना सुध्दा आपल्या उमलत्या आकांक्षेचे कोंब स्वत:च्या हाताने उखडावे लागतात. या दशेचा परिणाम राष्ट्राच्या जीवनावर कांहींच का होत नाही ? सट्टेबाजीनें लागणाऱ्या बळजबरीच्या विवाहांतून निघणारें उदास संसाराचें भेसूर स्वर तर तुम्हाला कधीच ऐकू येत नाहीत, मग केवळ अपघातानें वैधव्यांत पडलेल्या अपाप भगिनींचें आंतल्या आंत गुदमरणारें उम्हासे तुमाला कसचे भासणार? धनत्रयोदशीच्या दिवशीं चांदीसोन्याची पूजा बांधता, पण घरांतल्या, शेजारच्या, गांवांतल्या किंवा अखिल राष्ट्रांतल्या या बिनमोल मंगल लक्ष्मीला सांधीकोंपऱ्यांत केरसुणीप्रमाणें डांबून ठेवता! निगर्गट्ट पाषाणहृदयी हिन्दुसमाजा, मंगल स्नानोत्तर देवदर्शनाला देवळांत जातांच या राष्ट्रदेवतांची होणारी ही नानाविध पायमल्ली तुला देवाचें दर्शन खास होऊं देणार नाही. तरूण राष्ट्रभक्तानों, तुमच्या भगिनींच्या सद्गुणराशीची, त्यांच्या उज्वल परंपरेची, त्यांच्या रत्नमोल जीविताची आणि राष्ट्रोद्धारार्थ अवश्य लागणाऱ्या त्यांच्या प्रेमळ व पवित्र सहाय्याची, वाजवी किंमत ठरविण्याचें सामर्थ्य जर तुमच्या आंगांत असेल, त्यांच्या अंत:करणांतून निघणारा एकेक श्वास किती ज्वालामुखींची राखरांगोळी करूं शकेल, याची थोडीफार तुम्हाला कल्पना करतां येत असेल, तर व्यापक दृष्टीनें, उदार मनानें आणि शुद्ध माणुसकीनें या भगिनींना भाऊबिजेची ओवाळणी काय घालावी, याचा विचार तुमचा तुम्हीच ठरवा.

□□□

एन ४००६--२१

टिपण

बाजीप्रभूचा इंग्रजी पोवाडा

वीररत्न बाजीप्रभु देशपांडे यांच्या जगप्रसिद्ध पराकमाचा पोवाडा जगप्रसिद्ध अध्यात्मवादी शाहीर अरविंद बाबू घोष यांनी इंग्रजीत गाइला आहे; हे वृत्त वाचून आमच्या वाचकांना मोठे कौतुक वाटेल खास. आजपर्यंत मराठी भाषेत अनेक कवींनी बाजीचें गुणगायन करून आपल्या काव्य स्फुर्तीचा उमाळा लहान मोठ्या काव्यांत व्यक्त केला. परंतु अध्यात्मसृष्टीच्या सच्चिदानंदांतच नित्य रमणाऱ्या महर्षि अरविंदासारख्या परमहंसालाहि बाजीप्रभूच्या पराक्रमाने आपली रसवंति पुनीत करून घेण्याची स्फूर्ति व्हावी, हे कित्येकांना जरी नवलांतलें नवल वाटत असलें, तरी प्रस्तुतचा पोवाडा वाचून कोणी झाला, तरी हेच उद्गार काढील कीं, 'हे स्वर्गस्थ बाजीप्रभू, स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवि पहा जन्मला.' मर्दानेच मर्दाचा पोवाडा गावा, थोरानेच थोरांची थोरवी सांगावी आणि संतानेच संतांचा संतपणा वर्णावा. प्रस्तुत Baji Prabhou हे इंग्रजी काव्य आर्य ऑफिस पांडीचरी या संस्थेने प्रसिद्ध केले असून, ते १० आणे किंमतीस मुंबईला बहुतेक प्रतिष्ठित बुकसेलरांकडे विकत मिळते. या काव्यांत निरनिराळ्या प्रसंगावर उदात्त विचारांचा पेहराव चढवून अरविंद बाबूंनी ते इतके उठावदार रंगविले आहेत की, वीर करुण भयानक रुद्रादि रसांत वाचकांची वृत्ति चिंब भिजून निघते. उत्कट देशाभिमानाचे वारें शिवकालीन मराठ्यांत किती सूक्ष्मतम अणुरेणूंपर्यंत जाऊन संचरलें होते, या अवर्णनीय स्थितीचे वर्णनीय शब्दचित्र पाहून हृदयांत खेदाच्या व आनंदाच्या परस्परविरुद्ध लाटा एकमेकांवर दणादण आदळू लागतात. याचा एक नमुना वाचकांसाठी खाली उध्दृत करतो. पावनखिंडीच्या नाक्यावर युद्धाचे तोंड लागतांच, शिवाजीने बाजी प्रभूला बोलावण्यासाठी सूर्याजीला पाठविलें. बाजीप्रभू हजर झाला... शिवाजी म्हणतोः

Baji, more than once

In battle thou hast stood, a living shield, Between me and the foe. But more today,

0 Baji, save than any single life,

Thy nation's destiny.

Say with what force thy iron heart can hold

The passage till I come.

यावर तानाजी मालुसऱ्याने शिवाजीला म्हटलें :

Not for this little parpoge was there need To call the Prabhou from bis toil. Enough, Give me five tundred men; I hold the pass Till thy return.

शिवाजीने काही उत्तर दिले नाही. शिवसेवेची ही संधि आपणास मिळत नाही म्हणून तानाजी चिडला व उपरोधाने बोलू लागला:-

What ponders then the hero ? Such a man
of men, he. needs not like us.petty swords
A force behind him, but alone will hold
All Rajasthan and Agra and Cabool
From rise to set.

तानाजीचा गैरसमज घालवून त्याला शांत करण्यासाठी बाजीनें जें उद्गार काढले, त्यांत शिवकालीन मराठ्यांच्या स्वदेशासाठों आत्मसमर्पणाच्या कल्पना कशा होत्या, याचे उत्कृष्ट शब्दचित्र पहा :

"Tanaji Malsure, not in this living net
Of flesh and nerve, nor in the flickering mind
Isaman's manhood seated. God within
Rules us, who in the Brahmin and the dog
Can, it He will, show equal godhead. Not
By men is mightiness achieved; Baji
Or Malsure is but a name, a robe,
And covers One alone. We but employ
Bhavani's strength, who in an arm of flesh
It mighty as in the thunder and the storm.
I ask for fifty swords."And Malsure;
"Well, Baji; I will build thee such a pyre
As man had never yet, when we return;
For all the Deccan brightening shall cry out,
"Baji the Prabhou burns!" And with a smile
The Prabhou answered; "Me thou shalt not burn
For this five feet or more of bone and flesh,
Whether pureflame or Jackals of the hills
Be fattened with its rags, may well concern
Others, not Baji Prabhou."

एखादा मराठी शाहीर या काव्याचा अनुवाद मराठीत करील, तर मराठी वाचकांची उत्तम सोय होईल.

□□□

एन ४००६--२१अ

मृत्युलेख

होळकर सरकार, इकडे लक्ष द्या

कै. राजाराम नारायण गडकरी. प्रबोधनाच्या १७ व्या अंकांत यांच्या मृत्यूची बातमी आह्मी प्रसिद्ध केली. या खेपेस त्यांच्याबद्दल थोडे चार चरित्रात्मक शब्द व्यक्त करीत आहों. कै. राजारामपंत हे जुन्या पद्धतीनें शिकलेले सनदी वकील होते. तथापि मराठी भाषेंतील उपलब्ध बहुतेक वाङ्मय त्यांनी वाचलें होते. त्यांचे विचार जुन्या व नव्याच्या मधोमध समांतर असत, तरी नवमतवादाकडे त्यांची प्रकृति अलीकडे बरीच वळूं लागली होती. विशेषतः प. वा. श्रीशीलनाथजी महाराजांच्या सान्निध्यामुळे त्यांचा बुद्धिविकास व विचार स्वातंत्र्य गेल्या १०-१५ वर्षांत स्पष्ट रीतीने परिणत झालें होतें. मराठी संस्थानें व संस्थानिक यांबद्दल त्यांचा अभिमान कांही विलक्षण असे व ज्या ज्या वेळीं संस्थानिकांच्या सत्तेवर कोठें कांही घोरपड येई, त्या त्या वेळी राजारामपंतांचा सल्ला मध्यहिन्दुस्थानांतल्या कित्येक संस्थानिकांनी अनेक वेळां घेतला. स्वभावानें ते अत्यंत निस्पृह व तापट असत आणि खोट्याची त्यांना अतोनात चीड असे. स्वभावाचें तेज त्यांच्या लेखणींतहि असे. कै. शिवाजीराव होळकरांवर जेव्हां भिक्षुकशाही काहूर उठलें; गुराखी, भूत, विक्षिप्त वगैरे तत्कालीन् भिक्षुकशाही पत्रांनी नानातऱ्हेचीं आचकट विचकट कार्टून चित्रें काढून, महाराजांच्या बदनामीचा डंका चोहींकडे पसरविण्याचा धूमधडाका सुरूं केला आणि खुद्द इंदोरच्या प्रजाजनांचीं - मनें महाराजांविरुद्ध बिथरविणाऱ्या भिक्षुकी गुप्तकटांचा सर्व मध्यहिन्दुस्थानभर सुळसुळाट उडाला, त्या वेळी राजारामपंत आपली लेखणी सरसावून पुढे आले आणि 'बडोदावत्सल' पत्रांत एकामागून एक सणसणीत विस्तृत लेख 'प्र' या सहीने नित्यशः प्रसिद्ध करूं लागलें. या लेखांतल्या बिनतोड विवेचन शैलीने व खऱ्याखुऱ्या गोष्टींच्या स्पष्ट उद्घाटनानें त्यावेळी मध्यहिन्दुस्थानवासी लोकांत मोठी खळबळ उडाली व बडोदावत्सल पत्राचा खपहि बेसुमार वाढला. बडोदावत्सलचा अंक निघायची थांथड, जो तो 'प्र' काय म्हणतो तें वाचण्यास उतावीळ ! 'प्र'च्या सडेतोड लेखमालेनें थोड्याच दिवसांत 'गुराख्या'ला दावणींत बांधून, आवसपुनवेला अवतरणाऱ्या 'भूता'ला गति दिली. भिक्षुकी छावण्यांचे तंबू भराभर उडाले व त्यांचे सिऐडो हा प्रकोण? याचा गुप्तशोध करूं लागले. 'प्र'चे सर्व लेख नंतर सत्यनिरूपण नांवाच्या पुस्तकरूपानें कै. शिवाजीरावांनीं प्रसिद्ध करून मोफत वाटले होते.

रा. ब. भाईसाहेब गुप्त्यांची 'इंदोर प्रकरणाची खरी व दुसरी बाजू' फार मागाहून बाहेर आली. गुप्तेशाहीवर मात करणाऱ्या नानकशाहीने सत्यनिरूपणाच्या प्रति जप्त करवून जाळल्याचे समजते. कांहीहि असो, सत्यनिरूपणाच्या कलमसमशेरीने शिवाजीराव होळकरांच्या नांवलौकिकाचा गड - याच राजारामपंत गडकऱ्यांनी राखला. हाच 'प्र' जर एखादा भटजी असता, तर त्याने शिवाजीराव होळकरांची गांठ घेऊन, त्यांना आपल्या कर्तबगारीचें पुराण सांगून, भरभक्कम दक्षिणा उपटल्याशिवाय सोडली नसती; पण बोलून चालून 'प्र' पडला कायस्थ प्रभु. त्यानें मरे पर्यंत या कामागिरीचा उच्चार केला नाही, तो आज आम्ही करीत आहोंत. ज्या होळकरशाहीच्या इभ्रतीसाठी 'प्र' लेखकाने सतत सहा महिने आपल्या कलमास्त्राचा मारा करून महाराजां विरूद्ध उठलेल्या भिक्षुकी बण्डाच्या नाड्या गर्भांतल्यागर्भांत ठेचल्या, तोच 'प्र', तोच राजाराम नारायण गडकरी, खुद्द इंदोरांत, होळकरांच्या राजधानीत विपन्नावस्थेत दिवस काढून मरतो, हा योगायोग श्रीमन्महाराज तुकोजीराव होळकरांनी अवश्य विचारांत घेण्यासारखा आहे.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

सति द्रौपदी-महाभारताची नायिका

लेखक : श्री. दर्भ. प्रबोधनाच्या १३ व्या अंकांत श्री. वाकसकर कृत 'राधेय कर्ण चरित्र' पुस्तकावर अभिप्राय देताना असे म्हटले होते की, 'महाभारतांतील नायक नायिकांची चरित्र चिकित्सक दृष्टिने विवेचन करून निरनिराळ्या स्वतंत्र ग्रंथांच्या द्वारें लिहिण्याचा कोणी प्रयत्न केला, तर तो वाङ्मय वृद्धीच्या दृष्टीने कौतुकास्पद होईल.' त्याच वेळी, भारतीय कथानकांना स्वतंत्र विचाराची व सुबोध भाषाशैलांची जोड असावी, अशीही सूचना केली होती.

प्रस्तुत पुस्तक पाहून आमची आशा इतक्या लवकर फलद्रूप झाल्याबद्दल आनंद वाटतो. 'जुनी गोष्ट कांहीशी नव्या आवडीच्या चटकदार भाषेंत लिहिण्याची ही खटपट आहे.' असें लेखकानी प्रस्तावनेंतच सांगितलें आहे. श्री. वाकसकरांच्या पुस्तकाला पंतांच्या आर्याभारताचा, तसा प्रस्तुत पुस्तकाला श्रीधराच्या पांडवप्रतापाचा कांहीसा आधार असल्याचेंही लेखक म्हणतात. महाभारतीय माहितीला 'नवी कादंबरी' म्हणून नटविण्याचा प्रयत्न बरा साधला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. अर्थातच कथेची कादंबरी बनताना पर्वाची 'प्रकरणें' होऊन त्यांना 'न्याय की अन्याय?' 'खलबत' 'पुढें काय?' 'छापा' असले चटकदार मथळे मिळणें वाजवी आहे. वर्णनशैलीच्या बाबतीत कित्येक प्रकरणें सुंदर वठली आहेत, तरीपण अतिशयोक्ति व असंभाव्यता यामुळें ठिकठिकाणी रसभंग होतो. स्वभावपरिपोष बरा वठला आहे. नायिकेला हवे तितकें प्राधान्य देण्यात आलें नाही. तरी कुलस्त्री गृहिणी व वीरपत्नी या सर्व दृष्टीनीं द्रौपदीचें स्वभाव चित्र चांगलें रेंखाटलें आहे. मयसभेंत दुर्योधनाच्या फजितीला न हसवतां तीबद्दल उलट खेद प्रदर्शित करावयाला लावून, श्री. दर्भ यांनी आपल्या द्रौपदीला, महाराष्ट्र रंगभूमीवर आजकाल नाचणाऱ्या खाडीलकरांच्या छित्तोर व पोरकट पांचालीपासून, अगदी भिन्न बनविली आहे, हें त्या साध्वीवर त्यांचे उपकारच म्हटले पाहिजेत. जुन्याला नव्याचा पेहेराव चढवितांना कांही लेखन दोष राहिले आहेत. अनुप्रास साधायाच्या हावेने पुष्कळ ठिकाणी भाषेचा सुटसुटीतपणा घालविला आहे, व अर्थहानीची तर कदरच केलेली दिसत नाही. कित्येक ठिकाणीं अर्थाकडे पूर्ण दुर्लक्ष्य करून केवळ त्यांच्या आकाराकडे व नादमाधुर्याकडे पाहूनच शब्दांची योजना केली आहे,

असें दिसतें. व्याकरणदोषही भरपूर आहेत. भाववाचक नामांची तर एक जंगी टांकसाळच उघडली आहे व त्यांतून 'क्षत्रियता' 'तिमिरता' अशी मासलेवाईक कित्येक नाणी पाडलीं आहेत. 'रणपट' 'थिलथिलीत' 'आरंबळत' 'झाकोळलें' 'रुमण्या' असल्या अपरिचित शब्दांचाहि ग्रंथकारानें वाचकांना परिचय करून दिला आहे. असले क्षुल्लक दोष वगळले तर सामान्यतः प्रस्तुत पुस्तक उत्कृष्ट वठलें असून ते आबालतरुणांनी (कारण गचाळ छपाई मुळें वृद्धांनीं वाचणें जवळ जवळ अशक्यच आहे.) वाचण्या सारखें झालें आहे. छापखान्यांतील भूतांचा थयथयाट साऱ्या पुस्तकाला भोंवला आहे. हे पुस्तक मधुकर मासिकाची पुरवणी म्हणून प्रसिद्ध केलेलें आहे. मागविण्याचा पत्ता मधुकर कचेरी, दादर.

बोधामृत

लेखक : रावसाहेब थोरात. नाशिक येथील श्रीउदाजी बोर्डींगचे उत्पादक व चालक. या पुस्तकांत श्री. थोरांत यांची २१ उत्कृष्ट पत्रें छापलीं आहेत. सामान्यतः सार्वजनीक कार्यक्षेत्रांत दिसणाऱ्या मंडळींच्या चारित्र्यांत सार्वजनिक व खासगी असें दोन निरनिराळ्या वर्तनाचे चोरकप्पे असल्याचें आढळून येते. दोन प्रहरची मधुकऱ्यांची ब्याद संभावीतपणाने टाळणारे चिक्कू संसारी लोक जसे एकाच फळीवर 'जेवणाला उशीर आहे' व 'जेवणे होऊन गेली' असा मजकूर पाठपोट लिहून, अन्नार्थी मधुकऱ्याला फळीच्या नुसत्या उलथापालथीने चकवितात, तसलाच कांहीसा प्रकार या चोरकप्पी जनसेवकांचा असतो. पण हा निंद्य प्रकार एखाद्या जनसेवकांत आहे कीं नाहीं, हे बिनचुक हुडकण्याची जागा म्हटली म्हणजे त्याचा खासगी पत्रव्यवहार. मानवाच्या मनाचा खराखुरा रंग यांतच सांपडतो; कारण मन म्हणजेच मानव. मनुष्याचें वास्तवीक स्वभावचित्र त्यानें आपल्या मित्रांना किंवा आप्तेष्टांना धाडलेल्या पत्रांतून जसें स्पष्ट पाह्यला मिळेल, तसें हजारों वाचकांनी वाचण्याकरिता वृत्तपत्रात मुद्दाम जपून लिहिलेल्या लेखांत आढळणें शक्य नाही. हा कस जर बोधामृत पुस्तकाला लावला तर रावसाहेब थोरात हे खासगी व सार्वजनीक बाबतीत शुद्ध एकजिनसी कळकळीनें कार्याकरितांच कार्य करणारे निष्काम कर्मयोगी आहेत, असें मानणें भाग आहे. प्रस्तुत पत्रांत बोधामृत अक्षरशः थबथबत आहे. निकृष्ट जनतेच्या सामाजिक हीन स्थितीनें कळवळणारें श्री. थोरातांचे थोर हृदय पाहूं इच्छिणारांनीं व सार्वजनिक कार्यात यश मिळविण्यासाठी काय काय भांडवल लागतें याचा विश्वसनीय तक्ता अभ्यासणारानीं हें अवघ्या ९ आणे किंमतीचे पुस्तक श्री. दगडु बापूजी शिंदे, फर्ग्युसन कॉलेज, ३२८ भांबुर्डा, पुणे शहर, येथून अवश्य मागवून वाचावें. 'सार्वजनिक संस्था व आप्तेष्ट' 'सार्वजनिक संस्था व कारस्थानें' वगैरे पत्रांतील सात्विक त्वेष व निस्पृहपणा कौतुकास्पद आहे.

भारतीय युवाओंकी शरीररक्षा

लेखक : हिंदी मल्लविद्याविशारद प्रो. माणिकराव. भावी पिढी राष्ट्रसौभाग्यवर्धिनी निर्माण व्हावी, असें इच्छिणारांनी हे पुस्तक प्रत्येक उपनीत बटूकडून अवश्य अध्ययन करवून घ्यावें. यांत प्रो. माणिकरावांच्या वज्रदेही बुद्धीचें व ब्रह्मचर्य तपश्चर्येचे तेज रसरसत असून, व्यायाम आहार विहार शिक्षणक्रम इ. विषयांवरील मार्मिक सूचना त्यांच्या चौकस दृष्टीच्या द्योतक आहेत. पृष्ट संख्या ७०. किं. फक्त ५ आणे. प्रकाशक-जयदेव ब्रदर्स, बडोदें. आमची श्री. वाकसकरांना विनंति आहे कीं त्यांनी या हिंदी पुस्तकाचे मराठीत भाषांतर करून प्रा. माणिकगवांच्या या बहुमोल ज्ञानाचा लाभ महाराष्ट्रीयांना करून देण्याचें पुण्य जोडावें.

उन्नतीचा राजमार्ग

अथवा सत्यशोधक समाजाची तत्त्वें. १९१८ साली जागरूक वर्तमान पत्रांत सत्यशोधक समाजाच्या तत्वांचा विस्तृत उहापोह करणारें तीन वाचनीय व मननीय निबंध प्रसिद्ध झालें होते. त्यांत यथा स्थली तुकारामाचें कांही अभंग, गीतेतील कांही वचनें यांचा उत्कृष्ट समावेश करून श्री. दहीकर यानी हे पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. 'सत्य शोधक' एवढा शब्द कानी पडतांच फटाफट शिंका देणाऱ्या पडसाळलेल्या मंडळींनी हे पुस्तक काळजी पूर्वक वाचल्यास त्यांचे गैरसमजाचें शैल्य खात्रीनें नष्ट होईल. किंमत अवघी चार आणे. पुस्तकाचा कागद मात्र भिकारडा वापरला आहे. मिळण्याचा पत्ता :- श्री. गंगाराम सोनाजी दहीकर-सेक्रेटरी, सत्यशोधक समाज, मु. माना, जि. अकोला, वऱ्हाड.

मूकनायक

कै. गोविंदाग्रज यांनी 'दीडशहाणा' हे टोपण नांव धारण करून सुरूं केलेल्या दीडपानी नाटक 'मालेचें हे दुसरें पुष्प रूढीच्या शिळाछापांत छापिलें आहे, व मनुस्मृतीच्या आक्टान्वयें या नाटकासंबंधी सर्व हक्क हिंदुसमाजासाठी कायमचे राखून ठेविले आहेत.' इवलेशें टिचभर चोपडें, पण त्यांत कै. गोविंदाग्रजानें इतका मार्मिक विनोद खच्चूनभरला आहे की अब्बल पासून अखेर पर्यंत आमची हसून हसून मुरकुंडी वळली आणि दोन तीन ठिकाणी तर हास्याच्या अतिरेकामुळें ठसक्यासरशी उचकीही लागली. हे पुस्तक ज्याच्या वाचनात न येईल तो हतभागी, आणि वाचीत असतांना ज्याचा चेहरा लाकडाच्या ठोकळ्या प्रमाणें राहील त्याला मुक्त किंवा मुर्दा या शिवाय तिसरी उपमा सांपडणार नाही. पोटाची अडीच आण्याची तिकीटें पाठवून वाङ्मय, विहार मंडळ-पुणे शहर, यांच्याकडून पुस्तक अवश्य मागवावें.

□□□

अग्रलेख

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची चिकित्सा

(लेखांक १ ला)

सत्य सदा बोलावे सांग गुरु आणि आपुला बाप।
खोटे भाषण करणे सज्जन म्हणतात हे महा पाप।।

एका सत्याभिमानी आर्यानें केलेली ही आर्या मराठी क्रमिक तिसरें पुस्तक शिकतांना आमच्याप्रमाणे पुष्कळांनीं पाठ केली असेल. सत्य सदा बोलावें, या सामान्य नियमालाहि कांही अपवाद असल्याचें ज्ञान वाढत्या शहाणपणा बरोबर मनुष्याला होतें. पुष्कळ वेळां जाणून बुजून धडधडीत खोटें बोलणें हेंच खरें बोलण्यापेक्षां अधिक श्रेयस्कर ठरतें. उदाहरणार्थ खाटकाच्या हातून पळालेली गाय आपल्या घरघरांत आश्रयार्थ लपली. पाठोपाठ खाटीक येऊन गाईचा तपास करूं लागला. तर अशा वेळी आम्ही गाय पाहिलीच नाही' असे सांगणे, हेच सत्य होय, अशा प्रकारचे कांही दूरदृष्टीचे अपवाद असत्याच्या 'आक्टान्वये' पापी न ठरता शुद्ध सत्याइतकेच पुण्यप्रद व श्रेयस्कर ठरत असतात. सामान्य नियमांना असले अपवाद पुष्कळ असतात, परंतु या अपवादांची उभारणी 'पुष्कळांचे पुष्कळ सुख ' या मुद्यावर झालेली असल्यामुळें ते क्षम्य ठरतात. परंतु मनुष्यांत असलेली स्वार्थबुद्धी अशी कांही विलक्षण लपंडावी आहे कीं ती पुष्कळ वेळां सामान्य नियमापेक्षा अपवादांचेच थेर माजवून, त्यांच्या भडक सफेदीनें स्वार्थ हाच परमार्थ असें मासविण्याचा निंद्य यत्न वारंवार करते. या निंद्य यत्नांचहि जगावर उपकार होतात, नाहीं असें नाहीं. कारण त्यांमुळेंच अल्पसंख्य निस्पृह स्पष्टवक्ते उदयाला येतात आणि आपल्या आत्मयज्ञाच्या उज्वल तेजानें मानवसमाजांत बोकाळलेला स्वार्थाचा बाजार जाळून पोळून खाक करतात. सत्य सदा बोलावें, हे सूत्र सर्वांना मान्य आहे, पण-त्यांत पण परंतुचे अडत्ये आहेत! पण एखादें सत्य जर कडुजहर असेल, बहुजन समाजाला न रुचणारे असेल, अप्रिय असेल, तर ते बोलूच नये, असा शहाण्यासुर्त्या पोक्तांचा पोक्त सल्ला असतो. कट्ट्या निस्पृह सत्यवाद्याला हा पोक्त सल्ला मुळींच मानवत नाहीं. 'जिंकलें सांगावें जनाला, हरलें सांगावें मनाला.' ही बुरखेबानीची मुत्सद्देगिरी त्याला रुचत नाहीं. त्याचा सडेतोड़ आग्रह असा पडतो की 'दुखणे चव्हाट्यावर बांधावं. ' त्याला कोणाचीही भीडमुर्वत नसते. कोणत्याहि राजकीय, सामाजीक वा धार्मिक सत्तेच्या दबकावणीला तो दबकत नाहीं राजमान्यता किंवा लोकमान्यता यांना तो पायांतल्या खेटराची किंमत देतो. लोकांच्या

शिव्याशापाची व बहिष्काराची त्याला लवमात्र क्षिति वाटत नसते. शहाणपणाचा तोरा मिरविणारी सारी दुनिया एकीकडे आणि हा सत्यवादी वेडापीर एकीकडे, अशी वस्तुस्थिति उत्पन्न होऊन, अखेर कोणत्या ना कोणत्या सत्तेच्या रुष्टतेच्या प्रदीप्त यज्ञांत त्याची आहुती पडते. जगांतल्या सत्यवादी वेडेपिरांचा इतिहास सर्वत्र याच तपशीलाचा असतो. ज्या व्यक्तीला राजमान्यता व लोकमान्यता चिकटलेली असेल, तेथें निर्मळ सत्याग्रहाचा-नव्हे, नुसत्या सत्याच्या पुसट चाडीचाहि खडखडाट आहे, असा सिद्धांत खुशाल काढावा. सत्याग्रहाची तलवारीची कसरत कोटींत एखाद्यालाच साधते. सत्याचा जहरी प्याला एखाद्याच्याच पचनी पडतो. म्हणूनच लोकमान्यतेचे व राजमान्यतेचे मुखवटे घालून नाचणाऱ्या महाशयांच्या इभ्रतीसाठी मुत्सद्देगिरी (डिप्लोमसी) जन्माला आलेली आहे. 'सत्याग्रहाचा जन्म उघड्या काळजांतून होतो आणि त्याचा संदेश उघड्या हवेंत उडविलेल्या फटाकड्याप्रमाणें काडकन् आवाज करून पडसाद न देतां तात्काळ नाहींसा होतो. मुत्सद्देगिरीचा जन्म उलट्या काळजाच्या पोटीं होत असल्यामुळें, उपड्या बालदीखालीं वाजविलेल्या डांबरी फटाक्याप्रमाणें तिचा आवाज बराच घुमतो. निर्मेळ सत्यप्रतिपादनाच्या आड प्रत्यक्ष परमेश्वर आला, तरी त्यालाहि लाथ हाणून अप्रिय सत्याची तुतारी फुकण्यास सत्यवादी वीर मागें पुढें पहात नाही. मुत्सद्याचा संसार व अस्तित्व राजमान्यतेच्या व लोकमान्यतेच्या डगरीवर डळमळत असल्यामुळें, वारा वाहील तशी शिडे फडफडऊन उचितानुचिताची थुंकी या घोटावरून त्या बोटावर उडवीत, स्वतःच्या वाणीचा व करणीचा व्यभिचार दुटप्पेगिरीच्या बुरखेबाजीनें कसा तरी झांकावा लागतो. सत्यवाद्याला कोणाची पर्वा नसल्यामुळे शहाण्या जगांत तो मूर्ख ठरतो. मुत्सद्याला अनेकांच्या पर्वा राखण्याच्या पर्वणीला तोंडसारवणीचें तोंड दिल्या शिवाय गत्यंतरच नसल्यामुळें, तो कधिं राजमान्य तर कधिं लोकमान्य बनतो. राष्ट्राच्या किंवा समाजाच्या दोषांवर पांघरूण घालण्याचीं मुत्सद्दी शिकस्त करतो, तर सत्यवादी कोणाच्या भाडभीडेची पर्वा न करता राष्ट्राचे व समाजाचे दोष बेधडक चव्हाट्यावर बांधतो. सत्यवादी आणि मुत्सद्दी या दोघांत एवढा फरक आहे, म्हणूनच सत्यवाद्यांपेक्षां जगांत मुत्सद्यांची खोगीर भरती केव्हांहि अफाट दृष्टीस पडते. मुत्सद्याला तोंडचोमडेपणा प्रिय असतो व सत्यवाद्याला अप्रिय सत्य स्पष्ट सांगणें प्रिय वाटतें.

व्यक्तीच्या चरित्राप्रमाणेंच राष्ट्राच्याहि चरित्रांत असे प्रसंग पुष्कळ वेळां येतात कीं त्या वेळी कळकळीच्या राष्ट्रहितेच्छुनें अप्रिय सत्य स्पष्ट बोलून दाखविणेंच श्रेयस्कर असतें. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाच्या सद्यःस्थितीकडे लक्ष देतां, त्यांतल्या बऱ्यावाईट गोष्टींचें स्पष्ट उद्घाटन करण्याची हीच वेळ आहे, असें आम्हांला वाटतें. म्हणूनच जगांतल्या सत्यवाद्यांच्या उज्वल इतिहासाला प्रणिपात करून, या वादाची चिकित्सा करण्यासाठी ही लेखमाला गुंफण्याचे योजिलें आहे. सत्यतः प्रबोधनाने कोणत्याहि पक्षाचा पक्षपातीपणा व्यक्त केलेला नाही; परंतु सामान्यतः सामाजीक व धार्मिक लोकशाहीच्या पुरस्कारार्थ त्याने भिक्षुकशाहीवर त्वेषांचे हल्ले चढविले आहेत. या कामीं जसा तो कोणाची भीड मुर्वत ठेवणार नाही, तसाच ब्राह्मण किंवा ब्राह्मणेतर संज्ञेने ओळखल्या जाणाऱ्या पक्षांतले दोष शक्य तितक्या स्पष्टोक्तीनें दाखविण्यांत किंचितहि कचरणार नाही, हे सर्वांनीं कृपा करून लक्षांत घ्यावें. प्रस्तुतचा वाद जातिभेदाच्या दृष्टीनें चालविणें केव्हांहि अनुचित आहे-नव्हे, अत्यंत अश्लाघ्य आहे. 'ब्राह्मण तेवढा लुच्चा व हरामखोर' अशा सिद्धांताचें त्रयराशीक मांडणाऱ्या मुत्सद्याला 'नब्राह्मण ह्मणविणारे सर्व समाज साधु संतांचे कळप आहेत' असें प्रत्यक्ष पुराव्याने सिद्ध करण्याची जबाबदारी टाळतां यावयाची नाही.

अर्थात् या वादाची चिकित्सा जन्मप्राप्त जातीच्या अपघात-तत्त्वावर न करतां, सामाजिक, धार्मिक व राजकीय लोकशाही (डिमॉक्रसी) च्या तत्वांवर करणेच योग्य व जरूर आहे. असें करतांना प्रबोधनाची निस्पृहता स्वकीय परकीयांच्या गुणदोष विवेचनांत केव्हांहि 'दावर' गिरी न्यायभ्रष्टतेचा अवलंब करणार नाही. मग कोणाच्या रोषास तो बळी पडला तर काही फिकीर नाही..

प्रस्तुत वादांतील ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हे दोन शब्द आज जरी अत्यंत रूढ होऊन बसले आहेत, तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहिली तर त्यांचा वास्तवीक कांही अर्थच लागत नाही. ब्राह्मण म्हणविणारे सर्व समाज एकीकडे आणि ब्राह्मण न म्हणविणारे सर्व समाज दुसरीकडे, अशी वास्तवीक वस्तुस्थिति मुळींच नाहीं. ब्राह्मणपक्षांत देशस्थ कऱ्हाडे. सारस्वत दैवज्ञ शुक्लयजुर्वेदी इत्यादि अनेक जातीय संघ मुळींच भाग घेत नसून, ते उघड उघड ब्राह्मणेतरांच्या पक्षांशीं विशेष सहानुभूतीने तरी वागतात, किंवा स्पष्ट उदासीनतेने स्वस्थ रहातात. इतकेच नव्हे तर आमचा अनुभव असा आहे की पुष्कळ वेळां ब्राह्मणेतरांच्या सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्याच्या चळवळींत त्यांतल्या बऱ्याच व्यक्त्या सक्रीय माग घेतात. ब्राह्मणेतरांतील मराठे व कायस्थ या दोनच जाती घेतल्या, तर देशस्थ सारस्वतादि ब्राह्मण जातीनी त्यांचा द्वेष केल्याचें क्वचितच आढळून येईल. नित्याच्या व्यवहारांत सुद्धा या दोन ब्राह्मण ब्राह्मणेतर जाती परस्परांत कसलाहि उन्हाळा उत्पन्न न करतां सलोख्याने वागतात. आज शेकडो वर्षे कायस्थ प्रभूचा पुरोहितपणा देशस्थ उर्फ महाराष्ट्र ब्राह्मणांकडे असून धर्माचरणाच्या बाबतीत वेदोक्त पुराणोक्ताचा तंटा त्यांनीं केव्हांहि उपस्थित केल्याचें आढळत नाही. उलट जेव्हां जेव्हां कायस्थ मराठ्यांवर ग्रामण्यांचे चित्पावनी अत्याचार होत गेले तेव्हां तेव्हां या देशस्थांनींच त्यांचा पक्ष सांभाळून धरल्याचे ऐतिहासीक दाखले आहेत. 'देशस्थ पंतप्रतिनिधीच्या पंक्तीला चिटणीस कायस्थाचें ताट' दरसाल कित्येक वर्षे मांडलें जात असे. आजहि कायस्थ किंवा उन्नत मराठ्याशी भोजन प्रसंगी देशस्थ ब्राह्मण फारसा कोंकणस्थी 'विन्टाळ' अगर शिवाशिवीचा तुसडेपणा दाखवीत नाही. सामान्य नियमाला अपवाद असणारच आणि चित्पावनलेल्या देशस्थ भटजीचा नमुना भिक्षुकशाहीच्या प्रदर्शनासाठीं सांपडणारच नाही, असें मुळींच नाही. भिक्षुकशाही मनाचा हलकटपणा प्रत्येक समाजांतल्या थोड्याबहुत व्यक्तींत निसर्गाच्या नियमानें आढळणारच, मग तो समाज ब्राह्मण असो वा ब्राह्मणेतर असो ! सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकून, कधिं जन्मजात क्षात्रवीर्याच्या तर कधिं सत्यशोधक पंथाच्या असिधारासम विवेकवादाच्या जोरावर भिक्षुकशाहीशीं सडेतोड सामना देण्यासाठीं सामुदायिक संघशक्तीनें पुढें सरसावलेला मराठा समाज घ्या; किंवा मानापमानाचा चिमटा न भासण्याइतका बधिर अंत:करणाचा बनलेला निगर्गट्टवाटेल तर स्थितप्रज्ञ म्हणा !-कायस्थ प्रभू समाज घ्या; त्यांत आकुंचित मनोवृत्तीचे चित्पावनी वळणाचे लोकंच नाहींत, असें धाडसी विधान करणारा मनुष्य धाडसी मुत्सद्दीच असला पाहिजे. ज्या भिक्षुकशाही स्मृतिपुराणोक्त मानसिक गुलामगिरी विरुद्ध आमच्या प्रमाणेंच शेकड़ों इतर विवेकवादी कंठशोष करीत आहेत, ज्या गुलामगिरीला हद्दपारच नव्हें तर तिचा चेंदामेंदा करण्यासाठी पुरुषोत्तम ज्योतिबा फुल्यांनी आपला 'इंगर सॉलिक' सत्यशोधक पंथ अस्तित्वात आणला, त्याच गुलामगिरीचे बंध अधिकाधिक घट्ट आंवळण्यांत आपल्या बुद्धिसर्वस्वाची शिकस्त करणारें - 'भटांचे गुलाम 'आज प्रत्येक ब्राह्मण व ब्राह्मणेतर समाजांत शेकडा ९५ तरी खांस सांपडतील. मग नुसत्या 'ब्राह्मण' संज्ञेखाली सामान्यतः

येणाऱ्या सर्व जातींच्या विरुद्ध बंडाचा किंवा विरोधाचा कांगावा करण्यांत मुत्सद्दोगरी असली तरी पुरुषार्थ मात्र खास नव्हे. ब्राह्मण कोण? हा प्रश्नच जेथें अझून सुटलेला नाही आणि 'ब्राह्मण' संज्ञेच्या धर्मशाळेत कोणकोणत्या समाजांच्या पुडीची संभावना होणार, यावरच जेथे रणें माजली आहेत आणि खुद्द ब्राम्हणांब्राम्हणांमध्येंच उच्चनीच. वाचा, अस्सल व प्राचीन अर्वाचीनत्वाच, भयंकर वाद चव्हाट्यावर येत आहे, तेथें ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर ही शब्दयोजना बोला लिहायला सुटसुटीत असली तरी ती अत्यंत बेजबाबदार व अर्थविपर्यासी आहे, हें किंचित् समधात विचारांती वाचकांस पटेल. आमची अशी प्रामाणिक समजूत आहे कीं, ज्या स्मृति पुराणोक्त मानसिक गुलामगिरीनें अखिल हिन्दु समाजाचे सामाजिक व धार्मिक जीवन नासून सडकें बनलें आहे व जिचा परिणाम हिन्दूंच्या राजकीय अधःपातांत झाला आहे आणि त्या गुलामगिरीविरुद्ध जर ब्राह्मणेतर म्हणविणाऱ्या पक्षाचा तीव्र परंतु प्रशसंनीय कटाक्ष आहे, तर या गुलामगिरीचे पुरस्कर्ते जेथें जेथें आढळतील, मग ते ब्राह्मणब्रुव समाजांत असोत, क्षत्रिय म्हणविणाऱ्या जातींत असोत, अगर कोठेंहि असोत, त्या सर्वांची अभेदभावाने एकजात ससेहोलपट करतांना एकाहि सत्यशोधकाची, एकाहि नवमतवाद्याची, एकाहि ब्राह्मणेतराची निस्पृहता लवमात्र बाचकतां कामा नये. उदार धोरणाच्या व्यापक सुधारणेच्या क्षेत्रांत प्रत्यक्ष बाप आडवा आला, तरी कापण्याची ज्याची छाती नसेल, त्यानें समाज किंवा धर्मसुधारणेचा टेंभा मिरवूच नये. भिक्षुकशाही ही भिक्षुकांची जन्मप्राप्त वतनी जहागिर असली, तरी या गुलामगिरी प्रवर्तक संस्थेचे कुळकर्णी वतन अव्याहत चालविणारे 'भटांचे गुलाम' जातोजात पसरलेले आहेत. अर्थात् भिक्षुकशाहीला जमीनदोस्त करतांना, पुरोहितांच्या परंपरेला गचांडी मारतांना, व देव मानवांमधली धार्मिक अडत्येगिरीची सट्टेबाजी निर्मूलन करतांना, ब्राह्मणेतरांतल्या सर्रास 'भटांच्या गुलामांना' अस्सल भिक्षुकांबरोबरच जात्यांत भरडून कां काढू नये ! उघडा उघड भिक्षुक म्हणून मिरविणारा प्राणी परवडला, परंतु आज जातिभेद झुगारणाऱ्या सत्यशोधक पंथाचा अनुयायी, तर उद्या क्षात्र जगद्गुरूउत्पन्न होताच शुद्ध क्षत्रिय मराठा, असली थारेपालट करणारी मंडळी मात्र मुळीच परवडत नाहीत. जीर्णमत असो नाहींतर नवमत असो, सुधारक पंथ असो किंवा दुर्धारक पंथ असो, त्या त्या पंथाचीं तत्वें प्रामाणिकपणें पाळणारे लोक वंद्यच मानले पाहिजेत. मतस्वातंत्र्य हा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे. पण या स्वातंत्र्याच्या सबबीखाली आजजहाल तर उद्या मवाळ, आज एकेश्वरी तर उद्यां नास्तिक, काल सत्यशोधक तर आज क्षात्रजगद्गुरूसाठी झगडणारा जातिमात्र क्षत्रिय मराठा, असली टोलवाटोलवी अत्यंत निंद्य होय. जात्यभिमान पाळावयाचा असेल, त्याने खुशाल निष्कंटक पाळावा आणि आपल्या जातीच्या सर्वांगीण उन्नतीनें इतर विस्कळीत समाजांना अनुकरणीय धडा घालून द्यावा. असल्या प्रामाणिक नरोत्तमाचे पाय दुनिया खास वंदन करील. पण सत्यशोधक समाजासारख्या जातिभेद-निवृत्तीच्या उदार बाण्याच्या संप्रदायाचा अंगिकार केल्यावर त्याच्या तत्वांशी बेमान होऊन धार्मिक अडत्येगिरीचा पुरस्कार करायला जातिमान्यतेचे थेर माजवायचे हा शुद्ध मुत्सद्दीपणा होय. या मुत्सद्दीपणाचीं अस्त्रें प्रस्तुत वादांत कांही काळ जरी टिकाव धरूं शकतील, तरी अखेर ती स्वतःच्याच आंगावर उलटल्याशिवाय राहणार नाहीत, असा कळकळीचा इशारा वेळींच देणं आमचें कर्तव्य आहे. सारांश, इरसाल भिक्षुकशाहीचा दुटप्पी लपंडाव खेळणारे लोक जर खुद्द ब्राह्मणेतरांतच झळकत आहेत, तर ब्राह्मणेतरांनी किंवा उदाहरणार्थ अधिक स्पष्ट म्हणावयाचें तर सत्यशोधकांनी धार्मिक व सामाजीक स्वातंत्र्यास्तव जो झगडा चालविला

आहे, त्याच्या उदार मतांचा पुरस्कार करणारी, ब्राम्हण या सर्वसामान्य नावाखाली मोडणाऱ्या शेकडों जातिसमूहांत एक सुद्धा व्यक्ती आढळणार नाहीं, असे प्रतिपादणें अविचाराचें होईल. ब्राह्मण हटला की, तो येथून तेथून एकजात लुच्चा हरामखोर व गळेकापू मग तो सारस्वत असो, देशस्थ असो, की दैवज्ञ असो, असली विधाने बेजबाबदार लेखक वक्त्यांनाच शोभतात. विशिष्ट घातकी व्यक्तीला किंवा असल्या नाठाळ व्यक्तींच्या बहुसंख्येनें गजबजलेल्या समाजाला सप्रमाण पुरावा पदरीं बांधून बेलाशक टीकेचे रट्टे चढवावे. सरकारच्या १५३ अ ची सुद्धां पर्वा करूं नये. परंतु निव्वळ जातिभेदांच्या मुद्यावर यच्चावत् ब्राह्मणांवर नसते. आरोप लादून, त्यांच्या शुद्ध सहानुभूतीला आंचवणें, हें धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्यांच्या लढाईची बढाई मारणाऱ्या वीरांना मुळींच शोभत नाही.

'तीन वर्षांपूर्वी ब्राह्मणेतरांच्या व सत्यशोधकांच्या चळवळींत जी एक कार्यकनिष्ठा व कर्तृत्वांचा जोम होता, तो आजला मुळीच नाही. पूर्वीचा संघटितपणा आज उरलेला नाही. ब्राह्मणेतर चळवळ कोणती आणि सत्यशोधकांची चळवळ कोणती याचा क्षात्रघोटाळा उडाला आहे. जो उठला तो आज पुढारी बनत आहे. कोणाचा कोणांत मेळ नाही. प्रत्येकाचें निराळेंच पुराण. कोणतेंहि ब्राह्मणेतर पत्र घ्या, त्यात सर्वत्र टिळकी शिमग्याची लाथाळी. पूर्वी ज्या पुढाऱ्यांच्या गळ्यांत पुष्पांचे हाराभर हार भराभर पडत असत. त्यांच्याच गळ्यांत आज शाब्दिक पायतणांच्या माळा पडत असून अनुयायांच्या टीकांच्या बडग्यांनी त्यांची पाठ सपाट होत आहे. पूर्वी ज्या शस्त्रास्त्रांचा मारा करून ब्राह्मणेतर पत्रांनी आपल्या प्रतिपक्षाचा नक्षा उतरला, तींच शस्त्रें आज त्याच ब्राम्हणेतर पक्षातले सैनिक एकमेकांवर झुगारून, स्वपक्षांच्या छावणतींच मदांध यादवीच्या इतिहासाची पुनरावृत्ति रंगवीत आहेत. असल्या ऐन यादवीचा फायदा घेऊन ब्राम्हणसंघाची कल्पना जन्माला आली नसती तरच मोठें आश्चर्य! पण येथेंहि हीच रड. नुसती योजना बाहेर पडते न पडते तों खुद्द ब्राह्मणांतच बारा पुरभय्ये आणि तेरा चुलींचा मामला !!

□□□

लेख

विश्वामित्री इतिहास-संशोधन

लेखांक ३ रा.

शिवकालीन परिस्थितीचा विचार केला कीं हेंच प्रत्ययाला येतें कीं प्रचलीत इस्लामशाहीच्या कडव्या धांगडधिंग्याला चीत करण्यासाठीं शिवाजीनें हिन्दु जनतेच्या हाडीमासीं खिळलेल्या जातिभेदाच्या व वर्णश्रेष्ठतेच्या परस्परदोही तत्वांचा जळफळाट तात्पुरता थोपवून धरून जरी स्वतंत्र स्वराज्याची स्थापना केली, तरी त्या जळफळाटाची नांगी त्याला कायमची मोडतां आली नाहीं. मुसलमान सत्ताधाऱ्यांच्या लाथा खाऊन खाऊन बेजार झालेल्या हिन्दु लोकांनी स्वराज्यस्थापनेच्या पूर्व रंगांत हा जळफळाट जरी फारसा दाखविला नाही, (आणि जेथें सर्वच ब्राम्हण ब्राम्हणेतर इस्लामी जुलमाच्या चुल्हाणांत अभेद भावाने सरपणासारखें जाळलें जात होतें, तेथें वर्णश्रेष्ठतेचें, सामाजिक उच्चनीचतेचे व धार्मिक अधिकार नाधिकाराचे चाळे करण्याची कोणाची प्राज्ञा होती?) तथापि शिवाजीच्या कर्तबगार भवानीनें महाराष्ट्रांत सर्वत्र स्थिरस्थावर करतांच हें जळफळाटाचे तंटे उघड माथ्याने आपला धांगडधिंगा घालूं लागले आणि त्याचें भयंकर पर्यवसान ब्राह्मणांनीं एक मुखानें केलेल्या शिवाजीच्या राज्यारोहण-विरोधांत झाले. वाडवडिलांच्या नावलौकिकाच्या बँकेचें निघालेलें दिवाळें झाकूं पाहणाऱ्या आणि नकली ऐक्याच्या ढोंगी गप्पांवर स्वराज्यप्रेमाचें आधुनिक नाटक वठविणाऱ्या 'महाराष्ट्रातील विद्वान ब्राह्मणांना' या विरोधाच्या घातकीपणाची जरी कल्पना नसली, किंवा असल्यास तो स्पष्ट उच्चारण्याचें नीतिधैर्य त्यांना नसले तरी गो-ब्राह्मण-प्रतिपालनासाठीच आपल्या जीवाचें श्रीफळ राष्ट्रदेवतेच्या चरणी वाहणाऱ्या शिवाजीला ब्राह्मणांनी दिलेल्या भयंकर उपसर्गाचा सूड-अत्यल्प प्रमाणांतच कां होईना !-शिवाजीने घेतल्याशिवाय सोडलेला नाहीं. राष्ट्रस्वातंत्र्याच्या कल्पनेंत शिवाजी कितीहि स्वतंत्र नवमतवादी असला तरी धार्मिक व सामाजिक बाबतीत ब्राह्मणी वर्णश्रेष्ठतेच्या लाघवी जीर्णमताच्या कैचीतून तो मुळींच मुक्त झालेला नव्हता. भिक्षुकशाही वर्णश्रेष्ठतेचा दांभिक दिमाख आज जसा संर्वांगछिन्न होऊन उकीरड्यावर झुगारला गेला आहे, तितकी जागृति शिवकालीं नसल्यामुळें, ब्राह्मणांच्या चाण्डाळ कर्मांकडे सुद्धा बऱ्याच सदयतेनें पहाण्या पलीकडे शिवाजीला विशेष कांही करतांच येणें शक्य नव्हतें. राजकीय क्षेत्रांतल्या उलथापालथीत व्यक्त झालेली त्याची बेगुमान धडाडीची तडफ धार्मिक व सामाजीक क्षेत्रांतल्या भिक्षुकशाही गुंडांच्या गुंडगिरीला आळा घालतांना अगदींच बोथट व हतबुद्ध होत असे. याचें कारण

अर्थात् हेंच कीं शिवाजी काय, बाळ चिटणीस काय किंवा अखिल ब्राह्मणेतर समाज काय, आजच्या छत्रपतींत व ब्राम्हणेतरांत थरारलेल्या प्रबोधनाचीं त्यांना किंचितहि झुळूक लागलेली नव्हती; सर्वजण भिक्षुकी वर्णश्रेष्ठतेच्या भाबड्या कल्पनेच्या चकारींतच चकरा मारीत होते. अशाहि स्थितींत ब्राम्हणांची भिक्षुकी गुंडगिरी वरचढ व उन्मत्त झाली नव्हती, किंवा शिरजोर ब्राम्हणांना दाबांत ठेवण्याचें यत्न शिवाजीनें केलेंच नाहींत,'' असें मात्र मुळींच नव्हें - राज्याभिषेक शके ३ नलनाम संवत्सरे माघ शुक्ल ५ रोजी 'क्षेत्रीय कुलावतंस श्री राजा सिवाजी छत्रपति स्वामी'ने काढललें एक जाहीर फर्मान विचार करण्यासारखे आहे -

''....परंतु लिहिण्याचें कारण की या सरकारांत राज्याभिषेक समई क्षेत्रक्षेत्रादि क्षेत्रस्थ ब्राह्मण बहुत ग्रंथ अनादी सर्व जमा करून धर्मस्थापना जाहली. त्यांत श्री काशी क्षेत्रस्थ सिष्ट ब्राह्मणांत कांही तड पडून हाली ग्रंथ पाहता भटजींकडून तफावत जाहली आहे. ठरले त्याजवरून हली पुन्हा शास्त्री पंडित व मुदसदी व कारकून यास आज्ञा होऊन ज्ञातिविवेक व स्कंद पुराणांतरगत श्याद्रीखंड अदी माहन ग्रंथी निरणय सर्व ज्ञातीविसी जाहले आहेत ते वगैरे सर्व ग्रंथानुमतें व जसें ज़्याचें धर्म अनादी चालत आले त्याप्रमाणें निरवेध चालावें अगर ज्यां ज्यां ज्ञातीस वेदकर्मांचा अधिकार असून येवनी जाहल्यामुलें आथवा ब्राह्मणांनीं काही द्वेषबुद्धीनें शास्त्रांनरूप कर्मे न चालवितां मलीन जाहली असतील ती त्या ज्ञातीचे मंडलीनीं पुरी पाहून ज्याची त्याणी नीट वहिवाट आचरणें. ज्या ज्ञातीत जसी परंपरा चालत आली, त्याप्रमाणे चालवावी. जो कोणी द्वेषबुध्धीने द्रव्ये लोभास्तव ब्राह्मण शास्त्रविरहीत नवीन तंटे करून खलेल करील येविसी त्या ज्ञातीवाले यानीं सरकारांत अर्ज करावा. म्हणजे शास्त्राचे समते व रूढीपरंपरा व ग्रंथ पाहून सरकारातून निरंतर निरमत्छरपणे धर्मस्थापना कोणाचा उजुर न धरीतां परनिष्ट जेव्हांचे तेव्हांच त्वरीत बंदोबस्त होईल. (ग्रामण्यांचा इतिहास. पृ. १५५.)

श्री. भाव्यांच्या उदारमतवादी ब्राह्मणांबद्दल राज्याभिषेकानंतर ३ च्याच वर्षी इतक्या निकराचें फर्मान काढण्याचा शिवाजीवर प्रसंग कां आला, यांत विचारवंतांना अनेक विचारांचें ब्रह्मांड स्पष्ट दिसणारें आहे. या फर्मानाच्या अखेरीस ''हली येवन उतर देसीहून येत आहे. तरी सर्व ज्ञातीने यक दिल राहून कस्त मेहनत करून सरकारची सेवा करून शत्रु पराभवाते न्यावा. यात कल्याण तुमचे सरकारचे ईश्वर करील. जाणिजे.'' या उद्गारावरून ब्राह्मणांची भिक्षुकशाही सामाजीक व धार्मिक कुंपणापुढेंहि सरसावून राजकीय रिंगणांतहि कशी धिंगाणा घालून अडथळे उत्पन्न करीत होती, हें स्पष्ट दिसत आहे. शिवाजीनें अशाहि अवस्थेंत ब्राह्मणांकडे अत्यंत कारुणिक दृष्टीनें पहाण्याची बरीच शिकस्त केल्याचें दिसतें. तथापि गागाभट प्रकरणांत मात्र शिवाजीची समतोल मनोवृत्ती सुद्धां अखेर बिथरली. भावे प्रभृति बृहस्पति समजतात, किंवा भोळ्या भाबड्या लोकांना समजविण्याचा प्रयत्न करतात, तितकें गागाभट प्रकरण सुटसुटीत नव्हे. इतिहास-संशोधनांत हातचलाखी करून बाळाजी विश्वनाथाच्या बापाला पळीपंचपात्रीतून ढाल तलवारीवर नेऊन थापणाऱ्या विद्वानांनी हें पूर्ण लक्षात ठेवावें कीं उद्यां पळपुटा रावबाजी जरी नेपोलियनचा बाप ठरला, तरी गागाभट प्रकरणाची उलथापालथ करतांना ते बिब्याप्रमाणे सर्वांगावर फदफदल्या शिवाय राहणार नाही. काही वर्षांपूर्वी, ''शिवाजीला वेदोक्त राज्याभिषेक केला म्हणून गागाभट शौचकुपांत पडून ठार मेला'' हा नवीन राष्ट्रीय ऐतिहासिक शोध एका विद्वान संशोधकानें प्रसिद्ध केल्याचे श्री. भाव्यांच्या आठवणीत असेलच! असल्या मूर्ख विधानांचा

योग्य तो परामर्ष घेण्यासाठी पायतणे जोडे व फाटकी खेटरें आजच जगांतून कांही नष्ट झालेली नाहीत, परंतु ही विधाने प्रसविणाऱ्या व प्रसिद्ध करणाऱ्या शहाण्यांची मात्र धन्य असो, असेंच कोणी झाला तरी म्हणणार? शिवाजीच्या क्षत्रियत्वाला 'पूर्ण मान्यता' देणाऱ्या ब्रह्ममुखोत्पन्नांना गागाभट प्रकरणांत 'शिवाजीकडून मिळालेलें पारितोषिक तारीख-इ-शिवाजीग्रंथांत खालील प्रमाणें आढळतें :-

''गागाभट बनारसहून आला होता, त्याजकडून शिवाजीनें वेदमंत्र शिकून ब्राह्मणासारखें आचरण करण्यास सुरुवात केली. त्यावरून सर्व ब्राह्मणांनीं गागाभट्टावर बहिष्कार घातला. त्यांवर शिवाजीनें असा हुकूम काढिला कीं, ब्राह्मण हे धर्मगुरु असून वंद्य आहेत; परंतु राज्यांत त्यांस नोकरीस ठेवणें हा धर्माचार नाही. सबब देवार्चना पलिकडे दुसऱ्या कोणत्याही सरकारी कामांत त्यांस नेमण्यांत येऊ नये. ह्या हुकुमानुसार ब्राह्मणांस नोकरीवरून काढून त्यांच्या जागा प्रभूंस देण्यात आल्या. तेव्हा ब्राह्मणांबद्दल मोरोपंताने पुष्कळ रदबदली केली. तो ह्मणाला, 'महाराज आपण म्हणतां हाच खरा मार्ग, परंतु आपल्या खांस नोकरीत एकट्या प्रभूंवर विश्वास ठेवणे वाजवी नाही. त्यामुळें राज्यास हानि, धोका अगर संकट येईल.' शिवाजी बोलला, प्रभूंची जात सर्वथैव विश्वासपात्र आहे. सौदीसारख्या परक्यांनी सुद्धां राजपुरीच्या रक्षणांस प्रभु ठेविले आहेत. ते ती नोकरी विश्वासानें बजावीत असून प्रसंगी आपले प्राण खर्ची घालण्यासहि ते कमी करीत नाहींत.' तेव्हा मोरोपंत निरुत्तर झाला.'' (मराठी रियासत-पृ. ४९४)

हा उतारा बराच महत्वाचा, तसाच मनोरंजकहि आहे. ब्राम्हणांच्या 'येदुक्त' मगरूरपणाबद्दल शिवाजी कितीहि खवळला, आणि आतांच्या ब्रिटीश सत्तेप्रेमाणें ब्राम्हणांना नोकरींत मुळींच न ठेवण्याविषयी त्यानें निर्बंध केला, तरी वर म्हटंल्याप्रमाणे तत्कालीन सारेच लोक भिक्षुकशाही वर्चस्वाच्या चकारींत फिरणारे असल्यामुळें 'ब्राम्हण हे धर्मगुरू असून वंद्य आहेत' ही शिवाजीची भावना ब्राम्हणांना अधिक कांहींच शिक्षा करूं शकली नाही. बाळाजी आवजीसुद्धा याच भावनेच्या चकारींत. भटांच्या गुलामगिरीचा हा ब्रम्हसमंध जर त्याच्या कल्पनेच्या बोकांडी बसलेला नसता, तर शिवराज्याभिषेकसमयीं एका गागाभटाच्या सर्टिफिकेटसाठी त्याने एवढी वणवण केली नसती व मोरोपंत पिंगळ्याच्या ठाणेरी पुणेरी अवतारांकडून आपल्या 'लटपट्या मध्यस्थगिरी'ची एवढी बोंबाबोंबहि करून घेतली नसती! शिवाजी व शिवकालीन् ब्राह्मणेतर जनतेचें हें भिक्षुकी वर्चस्वाचें दास्य पुढें पुढें कमी कमी होत होत, कै. शाहु छत्रपति करवीरकर यांनी त्याला अखेर आज कायमची मूठमाती दिली. खुद्द चिटणीसाच्या वंशातच, १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात, केवढी विचारक्रान्ती झाली होती, हें बळवंतराव मल्हार चिटणीसाच्या खालील उद्गारांवरून दिसून येईल. ''ब्राह्मण आपले कर्म सोडून दुसरियाचे करितात. परंतु ब्राह्मण ज्ञाती सर्वास मान्य व मायपोट सर्वाचे समाधान ठेऊन वाजवी चालवावे ते न करिता आपण सर्वाचीं कर्मे करितात. तीन वर्णीची कर्मे सारी आपण आपला धर्म सोडून करितात. क्षत्रियाचे कर्म शस्त्रधारण वगैरे करितात. ...वैश्याची कर्मे सेतकी उदीम वाणीपणाची दुकाने हेच घालून व व्याज बटा वगैरे ते आपण करितात व शूद्राचे कर्मसुध्धा करून, सिपायास शूद्रासारखी पागोटी बांधून प्यादेगिरी वगैरे नीच कर्मे पतकरून करावयाची. कोणास उपजीविकेस कुटुंब संरक्षणास जागा न ठेविता आपण करावे व जमीन वगैरे इनाम घेते समई भट म्हणवून दानपत्र वंशपरंपरेचे करून घ्यावे. रोजगार व्यापाराचा करावा. भटम्हटले असता रागास यावे. पंत व दरखदार म्हणविले पाहिजे. तीन ज्ञाती व इतर सुद्धा भिकेस लाऊन अति नीच कसबिणीस लावण्या शिकऊन मागे सारंग्या वाजवाव्या. गावे. अशा अनेक तऱ्हा

काय म्हणून उच्चाराव्या'' (ग्रामण्य. पृ. ११९) पोटभरू भिकमाग्या भटाच्या शब्दोच्चारांवर आईबापांची स्वर्गात पाठवणी करण्यास सवकलेल्या गुलाम कायस्थानीं व सर्व ब्राह्मणेतरांनी बळवंतराव चिटणीसाचा हा विस्तृत स्पष्टोक्तीचा जाहिरनामा अवश्य एकदां तरी काळजीपूर्वक वाचावा, अशी शिफारस आहे.

विचारक्रान्तीची ही बाजू सोडून, तारीख-इ-शिवाजीतील 'एकट्या प्रभूवर विश्वास ठेवणे वाजवी नाही. त्यामुळें राज्यास हानी धोका अगर संकट येईल' हें मोरोपंत पिंगळ्याचे भिक्षुकी उद्गार विचार करण्यासारखे आहेत, भारत इतिहास संशोधक मण्डळाच्या मार्फत राजवाड्यांकडून आणि मयत-जिवंत मराठी दप्तर संस्थेच्या मार्फत भाव्यांकडून कायस्थ प्रभूंना स्वराज्यबुडवे ठरविण्याचा जो पद्धतशीर अट्टाहास अलीकडे उपटला आहे, त्याचा हेतू या पिंगळे सूत्रांची साथकर्ता सिद्ध करणें हाच आहे. राजवाड्यांनी 'स्वराज्य जाण्याला याच (कायस्थ प्रभू) लोकांचे तंटे कारणीभूत झाले' असा निष्कर्ष मागेंच जाहीर केला. आज न्हाव्याच्या रुमालाप्रमाणें भाव्यांच्या रुमालातूनहि हेच पिंगळी सिद्धांत झटकून बाहेर पडले आहेत. स्वराज्यसंस्थापक शिवछत्रपतीचा अभिप्राय पहावा तर 'प्रभूंची जात सर्वथैव विश्वासपात्र आहे.' असा पडला. राजवाड्यांचा याज्ञवल्क्य म्हणतो 'कायस्थं नहि विश्वसेत.' कोल्हापूरच्या सत्यशोधकांचाहि अभिप्राय हाच. त्यांनीं तर कायस्थांना आणि सारस्वतांना हद्दपार करण्याची शाहू छत्रपतीकडे डेप्युटेशन पाठऊन 'ठरावाची विनंति' केली होती. तेव्हा प्रश्न हा येतो की कायस्थांना 'सर्वथैव विश्वासपात्र' ठरविणारा शिवाजी मूर्ख, कीं त्यांना रक्तपित्याप्रमाणें 'सर्वथैव त्याज्य' ठरविणारे मोरोपंत पिंगळ्यांचे आधुनिक अवतार राजवाडे भावे प्रभृति डोंबकावळे मूर्ख? हा प्रश्न एखाद्या सर माधवरावांनी किंवा रावबहादुरकी मिरविणाऱ्या खोपकरांनी सोडविण्याची खटपट केली, तर त्यांच्या बहादुरीच्या ब्रीदाचें पातिव्रत्य हिणकस ठरेल, असें वाटत नाही. नुसत्या लॉयल्टीच्या तोंडपाटिलकीला पुसतो कोण?

गागाभट्टप्रकरणांत ब्राह्मणांनी जो खेळखंडोबा केला, त्याच्या पुराव्याच्या पाळ्यामुळ्या फार दूरवर गेलल्या आहेत, असें आम्ही मागील लेखाकांत म्हटलें होतें. प्रो. जदुनाथ सरकार आपल्या शिवाजी आणि शिवकाल' ग्रंथांत (पृ. २७२-२५३) डच रेकॉर्डवरून येणें प्रमाणें माहिती देतात:-

''शिवाजीने असा वाजवी आग्रह धरला कीं क्षत्रिय हे द्विज आहेत व जात्या मी प्रसिद्ध क्षत्रिय असल्यामुळें ब्राह्मणांइतकाच वैदिक मंत्रांवर माझा हक्क आहे; अर्थात् खऱ्या हिंदु राजाला उचित अशा वैदिक मंत्रांनीच माझा उपनयन व राज्यारोहणविधि झाला पाहिजे व ते वैदिक मंत्र मला ऐकू येतील इतक्या मोठ्यानें उच्चारले गेले पाहिजेत. या आग्रहामुळें जमलेल्या ब्राह्मणांत मोठी बंडाळी माजली ते ठासून प्रतिपादन करूं लागले की चालूं युगांत क्षत्रिय मुळीच नाहीत. ब्राह्मणजात हीच एकटी द्विजजात आहे. ब्राह्मणांनी माजविलेल्या या भिक्षुकी बंडाच्या धामधुमीने गागाभट सुद्धां चारीमुंड्या चीत झाला आणि द्विजोचित वैदिक मंत्रांऐवजी त्यानें नवीनच दुंसरे काही मंत्र म्हणून राजाचा उपनयन विधि कसा तरी झापडझोंपड उरकला.'' (T. S. 39-a Dutch Records) चिटणिसी पुरावा 'स्वराज्यबुडव्या' कायस्थांचा पुरावा म्हणून नको, तर नको. हा घ्या डच रेकॉर्डचा पुरावा. स्वदेशांतले स्वकीय ब्राह्मणेतर बखरकार 'ब्राह्मणद्वेष्टे' म्हणून परदेशांतल्या परकीय बखरकारांच्या गळ्याला मिठ्या मारून पहा. आणि प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या खऱ्या गोष्टींचा त्यांचा पुरावा जर स्वदेशी ब्राह्मणेद्वष्ट्यांप्रमाणेंच भावेशाही ब्रह्ममुखोत्पन्नांवर, वरील डच पुराव्याप्रमाणें, लाथाच झाडूं लागला, तर कोणाचा काय इलाज? भिक्षुकी

एन ४००६--२२

चातुर्वर्ण्याशीं अर्थाअर्थी कांही संबंध नसलले परकीय लोकहि जर स्वकीय कायस्थ 'मराठ्यां प्रमाणे, ब्राह्मणांना उठतां बसतां फुटबॉल टांचा हाणूं लागले, तर ब्राह्मणांच्या या लोकोत्तर लोकमान्यतेबद्दल हसावें कीं रडावें, हें आमच्यासारख्या 'स्वराज्यबुडव्यां'ला उमजणें कठीण आहे! 'स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीं लटपटी मध्यस्थगिरी' करून 'राज्याभिषेकाच्या जेष्ठ महिन्यांत फाल्गुन उरकणाऱ्या' चिटणीस सांप्रदायी कायस्थ प्रभूंना वेदोनारायण राजवाडे भावे प्रभृतीनीं 'साम्राज्यद्रोही व स्वराज्यबुडवे' ठरविलेले आहेतच, अर्थात् राष्ट्रीय चित्पावनांत व कायस्थांत आडवा विस्तव जाणें शक्यच नसल्यामुळें ब्राह्मणांविरुद्ध कायस्थांच्या तक्रारींना कवडी किंमत नाहीं, असें गृहीत धरून चालले, तरी या राष्ट्रीय प्राण्यांवर वंगदेशीय प्रो. जदुनाथ सरकार सुद्धां एवढे कां खवळतात आणि शिवकालच्या ब्राह्मणांच्या भिक्षुकशाही बंडावर संतप्त' कलमास्त्राचा मारा? कां करितात, हे एक मोठे कोडेंच म्हटलें पाहिजे. प्रो. सरकारचें नांव काढलें कीं भावे राजवाडे देव कंपूच्या नाकांत झुरळ शिरल्याप्रमाणें होते. असे कां? प्रो. जदुनाथचे किंवा अखिल बंगाल्यांचे पूर्वज, 'स्वराज्य बुडव्या' प्रभु चिटणीसादि कायस्थांप्रमाणे, 'जेष्ठ महिन्यांत फाल्गून' उरकण्यासाठी व 'लटपटी मध्यस्थगिरी' करण्यासाठी तर रायगडावर धांवले नव्हते ना ? मग ते सुद्धां गागाभट प्रकरणांतल्या भिक्षुकी बंडावर एवढें कां तुटून पडतात? कां एकट्या राष्ट्रीय चित्पावनांशिवाय सारी दुनियाच पागल बनली आहे! विचारवंतांनी विचार करावा. आम्ही त्या बाबतीत मदत करावी, तर भारतेतिहास सं. मंडळानें आम्हाला स्वराज्यबुडवेपणाचा शिक्का मारलेला. अर्थात् आम्ही उघडाउघड नालायक!

□□□

स्फुट विचार

दृष्टीकोणाचा एक मासला

कांही दिवसांपूर्वी राष्ट्रीय केसरी आणि क्रॉनिकल यांचें इतकें रहस्य गळत असे कीं त्याच्या खालीं परळ धरायलाच कोणी नव्हते. दोघे इतके एकजीव बनले होते कीं, केसरीनें अन्न खावें आणि क्रॉनिकलनें तें पचवावें. राष्ट्राळु मतांविरुद्ध असणाऱ्या मवाळ ब्राह्मणेतरांदीवर केसरीनें शिव्याश्रापांचा त्रास सोडतांच, लगेच क्रॉनिकलमध्ये त्याला उच्छ्वास बाहेर पडत असे; जणुंकाय दोघेहि महाराष्ट्राच्या नाकाच्या दोन नाकपुड्याच! केसरीने क्रॉनिकलची तळी उचलावी, कॉनिकलने केसरीचा उदो उदो करावा. असा हा कळसुत्री घोड्यांचा धिंगाणा बरेच दिवस चालू होता. सर फेरोजशहा व टिळक यांच्या परस्पर प्रेमाची थोडहि माहिती असणाऱ्या बऱ्याचशा लोकांना, या दोन कठ्ठ्या प्रतिस्पर्ध्याच्या नियतकालिकात वावरणारा हा एकतानेचा तमाशा पाहून आश्चर्य वाटे, कौतुक वाटे, तर कधी खेदहि वाटे. काय झालें कोण जाणे, पण अखेर मुळशी प्रकरणांत रेडा शिंकला आणि क्रॉनिकलच्या तुर्की तट्टूनें सिंहाचे कातडे पांघरलेल्या पुणेरी, घोड्यावर आपल्या दुगाण्या झाडल्या. अर्थात् दोघांची गट्टी फू होऊन ते धुळवड, शेणवड खेळूं लागले. पण शिमगा हा हिन्दूंचा 'राष्ट्रीय' सण असल्यामुळें आणि तो यथासांग यथाविधि वर्षातून केवळ एकदांच नव्हे, तर हरघडी खेळण्यांत केसरीचा राष्ट्रीय संप्रदाय पूर्ण पटाईत असल्यामुळे, तो काय मार्माड्यूक पिक्थाल सारख्या क्रिस्त्यांचा इस्लाम बनलेल्या 'बाटग्या' एडीटराचा 'टारगेपणा' चव्हाट्यावर आणायला सोडतो? केसरीनें आपल्या लेखनास्त्राचा अग्रलेखी मारा करून मारे क्रॉनिकलच्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार केला. आजपर्यंत केसरी मवाळांचा व ब्राम्हणोतरांचा उद्धार करीत असे आणि या उद्धारांतल्या शिमगी वाङ्मयाचा लोकांकडून मोठा सकौतुक गौरव केला जात असे. पण अलीकडे चित्पावनेतर बहुजनसमाजांत अकल्पनीय विचारजागृती झाल्यामुळे केसरी कंपूची टिळकी अस्त्रे आज त्यांच्यावरच उलटली आहेत! केसरीने ता. १८ जुलै १९२२ च्या अंकात 'बाटग्या पत्राची टारगी टीका' खरडतांच त्याच्या मुर्दाड व अधम लेखणीचा सर्वत्र निषेध झाला. त्यावर त्यानें दिलेलें सारवासारवीचें उत्तर सर्वांनी विचार करण्यासारखे आहे. केसरी म्हणतो ''आमच्या अग्रलेखाची भाषा कोणाला कडक वाटेल, कोणाला बाणेदार वाटेल तर कोणाला शिवराळपणाचा हि वाटेल. कारण हा ज्याच्या त्यांच्या प्रकृतीचा व मनोवृत्तीचा प्रश्न आहे.'' भले बहाद्दर ! ही प्रकृतीची व मनोवृत्तीची

एन ४००६--२२अ

दृष्टी स्वपक्षाशिवाय इतरांच्या ग्रंथांकडे व लेखांकडे पहातांना जर केसरी कंपूने ठेवली असती, तर आज त्यांच्या मुर्दाड़पणाचा महाराष्ट्रांत गाजलेला डंका खास गाजला नसता !

लोकसंग्रह की जातिभेद

कै. टिळकांनी लोकसंग्रह केला; लोकांना आपलेसे केलें; म्हणून ते लोकमान्य झाले, अशा प्रकारची टिळकांच्या लोकमान्यत्वाची व्याख्या त्यांचे पट्टशिष्य वारंवार करतात. कै. टिळक हे एक उत्तम पुरुष होऊन गेले, याबद्दल कोणाचाच वाद नाहीं. पण त्यांनी लोकसंग्रह केला, लोकसंग्रह केला, अशा ज्या वल्गना - नित्य ऐकूं येतात, त्या कितपत खऱ्यां आहेत याचा विचार करणें जरूर आहे. नुकतेच श्री. नरसोपंतांनी गंगाधरपंत देशपांड्यांना 'टिळकांनी कर्नाटकांत रोवलेला खांब, अशी पदवी अर्पण केली. 'ठिकठिकाणी उभारलेले असले टिळकांचे खांब, किंवा त्यांनीं गायकवाड वाड्याच्या मठांत पोसलेले विविध दर्जाचे शिष्य पाहिले. तर ते सर्व एकजात एकरकमी ब्राम्हणच कां?- विशेषतः चित्पावनच कां? हा काय योगायोग म्हणावा; नजरचुक म्हणावी कीं लोकसंग्रहाचा कर्मभोग समजावा? ब्राम्हणांशिवाय इतर कोणत्याहि जातीचा पट्टशिष्य निदान मठ्ठशिष्य - टिळकांना; आढळूंच नये; हे मोठें आश्चर्य आहे. त्यांची विद्यमान शिष्यपरंपरा म्हणजे आकाशांतून अवचित खाली पडलेला बृहस्पतींचा तारकापुंज नव्हे. विद्वत्तेच्या देशसेवेच्या आणि कार्येकनिष्ठतेच्या बाबतीत या शिष्यांना बोलबोलतां चीत करणारे लोक, (बिचाऱ्या मागासलेल्या जातींची गोष्ट सोडली तरी) पुढारलेल्या सर्व जातींत टिळकांना हवे तेवढे सांपडले असतें; नाही असे नाही. मग त्यांनी केलेल्या लोकसंग्रहांत अगदी एका पराची चित्पावन पाखरें कशी सांपडली? निःसंशय हा अपघात किंवा चमत्कार नव्हे. आणि यालाच जर लोकसंग्रह म्हणावयाचे असेल, तर ती व्याख्या शुद्ध 'राष्ट्रीय' होय. केसरी पत्राची कचेरी घ्या, टिळक कडोसरी फंडाची पेढी घ्या, पैसा फंड घ्या, शिवाजी फंड घ्या किंवा सबंध गायकवाड वाडा घ्या, त्यांत ब्राह्मणांशिवाय विशेषतः चित्पावनांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि जातीचा एकहि कामगार आढळून येत नाही. छापखान्याच्या कंपाझिटरमजुरांच्या बाबतीत अगदीच नाइलाज म्हणून कांही थोडे ब्राह्मणेतर जातीचे लोक तुरळक तुरळक दिसतात. बाकी सगळीकडे वरपासून खालपर्यंत एकजात पेशवाई सुळसुळाट. यावर कोणी असा आक्षेप घेतील की इतर जातीचे विद्वान लोक टिळक भगवंताच्या चरणरविंदी मिलिंदमान होण्यासाठी आलेच नाहीत तर त्याला टिळकांनी काय करावे? आम्ही खास अनुभवानें आक्षेपकांना बजावून सांगतो की, मार्गाने काम करण्यास आलेल्या अनेक इतर जातीय उमेदवारांना वाटाण्याच्या अक्षता मिळालेल्या आहेत. इतकेंच नव्हे तर, चुकून माकून नेमणूक झाल्यामुळे दोन-तीन दिवस काम केल्यावर जात उघडकीस येतांच त्या उमेदवारांना चंबुगबाळे आटपून घरचा मार्ग धरावा लागला. असली किरकोळ उदाहरणे सोडली तरी नाशिकचे वकील श्री. रामचंद्र गणेश प्रधान हे काही दिवस टिळकांच्या अगदी खिशांत जांऊन बसले होते, हे पुष्कळांना माहीतच आहे. श्री. प्रधान हे अलीकडे जरी लिबरॅलीझमची उदंड पुराणे झोडतात, तरी त्यांचा पूर्वाश्रमीचा राष्ट्रीय

बाणा सर्वश्रुतच आहे. टिळकांच्या खिशांत कायस्थ प्रधान, हा योगायोग कसा काय घडला खिसा जाणे ! पण बोलून चालून तो टिळकांचा खिसा, त्यांत एक कायस्थं जाऊन बसला कैसी, याचे लोकांना आश्चर्य वाटते न वाटते, तोच टिळकांनी झटकला खिसा आणि बिचारा कायस्थ भारतसेवक बाहेर पडला. जशाच्या तसा! विद्वत्तेच्या देशाभिमानाच्या किंवा कर्तबगारीच्या दृष्टीने केळकर खाडीलकरांपेक्षा श्री. प्रधान रतिमात्र हिणकस असतील, असे आम्हाला वाटत नाही. श्री. प्रधानांची मते व टिळकांची पुराणे यांत एका वेळी तरी काही फारसा फरक नव्हता. मग टिळकांच्या लोकसंग्रहाच्या पचनी श्री. प्रधान कां बरें पडूं नयेत? इतर जातीतून असले कितीक प्रधान आले असतील व गेले असतील. पण काय-देवाची करणी पहा, त्यापैकी एकहि इसमाचा टिळकांच्या लोकसंग्रहाला 'विन्टाळ' न होता तो अगदी कमलपत्राप्रमाणें अथपासून इतिपर्यंत इरसाल चित्पावनीच राहावा, हा एक राष्ट्रीय चमत्कारच नव्हे काय? राष्ट्रकार्यात जातिभेद नसावा, असें पुराण वारंवार सांगणाऱ्या शहाण्यांना आमचा स्पष्ट सवाल आहे की हा जातिभेद नव्हे तर काय जातिभेदाचा बाप ?

भारतीय राजमंडळाचा नैतिक अध:पातः

प्रेस ॲक्ट 'खतम्' झाल्यामुळे बेजबाबदार लेखकांना व पत्रकर्त्यांना एक प्रकारे जरी आनंदाचा बेहोष उमाळा आला, तरी प्रामाणीक विचार स्वातंत्र्यावर उगारलेली ही रानटी मनोवृत्तीच्या सत्तामदाची कुऱ्हाड बाजुला सरल्यामुळें पुष्कळ विचारवंतांना उरांवरील धोंड निघाल्याइतका निर्धास्तपणा वाटला, यांत संशय नाही. परंतु जित-जेत्यांच्या परस्पर संबंधाचा सर्व साधारण इतिहास यांना थोडा तरी अवगत असेल, त्यांना असल्या सवलतींच्या भड़क शालजोडी खाली कसकसले पाचपेचांचे चाप उघडून ठेविलेले असतात, याची स्पष्ट अटकळ असते. वरिष्ठ कायदेमंडळाने निषेधपूर्वक झुगारलेल्या, परंतु स्वतःच्या खास अधिकारांत व्हाइसरॉय साहेबांनी पास केलेल्या भारतीय नृपति मंडळाच्या संस्थानी अब्रूचे संरक्षण करणाऱ्या कायद्याचा तपशील, त्याचा हेतू व वाजवी लायकी आज जनजाहीर झालेलीच आहे. प्रस्तुतचा कायदा म्हणजे प्रेसॲक्ट निवृत्तीच्या जरतारी पांघरुणाखालून हळूच उमटलेला लोकशाही तत्वांची मुस्कटदाबी करणारा सोन्याचा चाप होय. या चापाचा धि:कार करणारी लेजिस्लेटिव असेंब्ली, बॉंबे प्रेसिडेन्सी प्रेस असोसिएशन व तत्सम विचारी वृत्तपत्रकार यांचे प्रथम अभिनंदन करणे जरूर आहे. आश्चर्य वाटते ते हेंच का बहुजनसमाजाच्या हिताहिताच्या बारीकसारीक प्रश्नांवर सुद्धा अकांडतांडव करणारी ब्राह्मणेतर पत्रे (एक दोन अपवादखेरीज करून) मात्र या बाबतीत अगदी मूग गिळून बसलीं आहेत. त्यांच्या निस्पृह समतावादाच्या आडे संस्थानिकांची कसली प्रतिष्ठा आड आली आहे न कळे!

वनिया कंपनीच्या पाट्यावरवंट्यांतून कशीबशी निसटून शिल्लक उरलेलीं स्वदेशी राजांची संस्थानें, अस्त पावलेल्या सूर्याचीं शिलकी किरणें म्हणून आम्हाला कितीहि नयनाल्हादक भासत असली, तरी ती म्हणजे धर्मराजाची धर्मनगरें नव्हत. खालसांतल्या ब्रिटीश राज्यकारभाराच्या गांवात मात्र महारवडा असतो. अठराव्या आणि या संस्थानिकांच्या कारभारांत कसलाहि खरकटवाडा नसतो, असें थोडेंच आहे. स्वदेशी संस्थानाचा ज्याला थोडाबहुत परिचय आहे, त्याला तेथल्या झोटींगपाच्छाईची कल्पना करून द्यावयालाच नको. आज खालसातल्या स्वदेशी व परदेशी नोकरशाहीकडून होणाऱ्या निरक्षर दीन दुनियेच्या साध्या माणुसकीच्या हक्कांच्या पायमल्लीची, संस्थानांतल्या साक्षरांच्या मानसिक गुलामगिरीशी

तुलना केली, तर पहिलीला पूर्ण स्वातंत्र्य असें नांव यायला कांही हरकत नाही. संस्थानांसंबंधाने कोणाला कितीहि आपलेपणा वाटला-आणि तो वाटणें निसर्गसिद्धहि आहे-तरी तेथल्या एकतंत्री राज्यव्यवस्थेने निर्माण झालेली प्रजेची हतबुद्धता व मनाची मेंगी वृत्ति हाणून पाडण्यासाठीं लोकशाही विचाराच्या स्पष्टोक्तीचा एकसुद्धा किरण संस्थानीं कुंपणाच्या आंत जाऊं न देण्याची ब्रिटीश सरकारनें काळजी घेणें, हें त्यांच्या दिलदार दोस्तीला कितीहि शोभत असलें, तरी त्यांत आमच्या नरेंद्र मंडळींचा नामर्दपणा आणि नैतिक अधःपात पूर्ण सिद्ध होत आहे, याची जाणीव त्यांना होत असेल काय? स्वदेशी संस्थाने म्हणजे गुराढोरांचे कोंडवाडे किंवा चहूं बाजूंनी कुंपणलेले मेंढवाडे नव्हत. खालसांतील लोकांचा संस्थानी लोकांशी सर्व व्यवहार सरमिसळ झालेला आहे. त्यांच्या हिताहितांचे धागे बिनतोड एकमेकांत गुंतलेले आहेत. नवचैतन्यपूर्ण विचारस्वातंत्र्याच्या लाटा दोघांवर सारखाच उत्क्रान्तिप्रद परिणाम करीत आहेत. ब्रिटीश खालसांत वाटेल त्या अन्यायाबद्दल निदान निषेधाचा आरडा ओरडा करायची तरी मुबलक सवलत आहे; संस्थानी शिराळशेटशाहीत तोंड दाबून बुक्क्यांचा मार कसा मिळतो, हे आज त्रिलोकविश्रुत आहे. खालसाची हद्द सोडून संस्थानी हद्दीत पाऊल टाकतांच, दुधडी फोफावत वहाणाऱ्या चैतन्य गंगेतून आता आपण कुंझकट पाण्याच्या टीचभर डबक्यांत प्रवेश करीत आहोत, अशीच प्रत्येक संस्थानी माणसांची भावना होते. अलीकडे सातारा जिल्ह्यांतील कित्येक ब्राह्मणी संस्थानांत सत्यशोधकांविरुद्ध मुद्दाम उभारलेल्या खटल्यांच्या विस्तृत हकिगती वाचल्या कीं संस्थानी न्यायाचा मासला किती घाशीरामी मसाल्याचा असतो, त्याची- तेव्हांच खात्री पटते. खालसांत थरारलेली राजकीय क्षेत्रांतील लोकशाही संस्थांनी डबक्यांत यदृच्छेनें पडलेल्या बिचाऱ्या बदकांना कधिं लाभेल कोण जाणे; पण सामाजिक व धार्मिक उन्नतीत सुद्धा या महाराष्ट्रीय-विशेषतः ब्राह्मणी संस्थानिकांनी आपल्या प्रजेची केवढी सुधारणा केली आहे ती भागिरथीपट्टी, म्हैसपट्टी, गायपट्टी, क्षारपट्टी, असल्या शेंकडों पक्ष्यांच्या गठ्ठ्यांवरून सहज समजून येणोरें आहे. पठ्ठ्यांची हीं नांवे खालसांतल्या पुष्कळांना अपरिचित असतील. कारण ब्रिटीश सरकार कितीहि 'सैतानी' व प्रजेची आंतडी पिळणारें' असले, तरी विधवा केशवपनाच्या प्रथम प्रसंगावर रूपया दीड रुपया कर बसवून त्या भागिरथी पट्टीनें आपल्या तिजोरीची भर करण्याचा भटी संस्थानी मुत्सद्दीपणा तें शिकलेलें नाही. लिहितांना लेखणी मुरडते व मन शरमते, पण गाई म्हशीच्या फळणावणीवर सुद्धां कर बसविण्यास न शरमणाऱ्या कित्येक शहाण्या संस्थानिकांचा खालसांतल्या वर्तमानपत्राने नुसता उल्लेख करतांच, त्याला प्रस्तुत कायद्याने फांसाची दहशत असावी, हा काय ब्रिटीश स्वातंत्र्यवादाचा नमुना की पेशवाईची पुनर्घटना? हसेबंदीने मिळणाऱ्या स्वराज्य मेजवानीतली ही एक वाढणी मोठी खुसखुशीत खरी ! आतां इतिहास-संशोधन सुद्धा बंदच ठेवलें पाहिजे. कारण, समजा, उद्यां शंकराजी नारायण सचीवाच्या शिवकालीन कारस्थानांचें पृथःकरण करून, एखाद्या आमच्या सारख्यानें 'भोरचे संस्थान ब्राह्मणेतरांच्या घात पातावर उभारलेलें आहे.' असा सिद्धांत कोठे लिहिला की झाली पंतसचीवांची बेअदबी! व्हाइसरॉय साहेबांकडे पंतांनी तोंड वेंगाडतांच लेखकावर 'नरेंद्र अब्रु-संरक्षण' आक्टान्वये खटला! अर्थात् तोफेचें तोंड पत्करलें पण या संस्थानिकांची तोडें नकोत, अशी या अब्रुसंरक्षण कायद्याच्या पात्याची पुण्याई आहे. या अनावश्यक कायद्याने नरेंद्रांना आपल्या अब्रूची चाड आहे, हें जरी सिद्ध होतें. तरी तो अब्रू - गॅसदिव्याच्या मॅटलइतकीच तकलादी आहे, हेंहि स्वच्छ व्यक्त होते, एरवी सार्वभौम मायबाप

सरकारला तिच्या भोंवती या कायद्याच्या काचा बसविण्याची जरूरच पडली नसती. प्रस्तुत अब्रुसंरक्षण कायद्याची दुसरी एक बाजू मोठी विचार करण्यासारखी आहे. संस्थानी रयतेवर एकाद्या संस्थानिकानें जुलम जबरस्ती केली, तर तिच्या धावण्याला धांवण्यास किंवा त्या अन्यायाची तपासपूस करण्यास ब्रिटिश सरकार मात्र बांधलेलें नाहीं; कारण तहनाम्याची कलमेंच तशी कलमी आहेत. पण त्याच अन्यायाबद्दल खालसांतील पत्रांनी जर कांही गवगवा केला, तर त्यांना मात्र कायद्याच्या सुळावर लटकविण्यास केव्हाही तें मागें पुढें पाहणार नाही. संस्थानिक, मग ते ब्राह्मण असोत वा ब्राह्मणेतर असोत, एकतंत्री राज्यसत्तेच्या दर्पानें सर्व संस्थानांचें जीवन सारखेंच दूषित झालेले आहे. ब्राह्मणी संस्थानांत ब्राम्हणेतरांचे हाल कुत्रा खात नसेल, तर ब्राम्हणेतर संस्थानांत ब्राम्हण व तत्सम वर्गाला कुत्र्याप्रमाणें वागविण्यांत येत असेल. एकूण सामान्यतः असे विधान करावयास काही हरकत नाही, की खालसांतल्या सार्वजनिक जीवनांत जो एकप्रकारचा आचार विचाराचा मोकळेपणा ब्रिटिश रयतेला अनुभविण्यास मिळतो तो संस्थानी रयतेच्या नशिबी लागल्याचे आमच्या पाहण्यांत व ऐकण्यांत नाहीं. राजकीय दृष्टीनें संस्थानिकांचे संस्थानी पातिव्रत्य निष्कलंक राखणें ही ब्रिटिश मुत्सद्देगिरी असली, तरी आपल्या संस्थानी रयतेला कोंडवाड्यांतल्या मेंढरांप्रमाणे, खालसांतील बहुजन समाजाच्या विचार-जागृतीपासून अलिप्त ठेवणें, राज्यकारभारांत थरारलेल्या लोकशाहीची त्यांना जाणीवही न होऊं देणे आणि एका स्पेशल कायद्याच्या बुरख्याशिवाय आपलें'प्रेस्टिज' व दरारा टिकणार नाही असें भासविणें, हें नरांतील इंद्र ह्मणून मिरविणाऱ्या आमच्या स्वदेशी राजांना खरोखरच लांछनास्पद आहे. अखिल दुनियेत थरारलेलें नवचैतन्य ब्रिटिश मुलांतून संस्थानी क्षेत्रांतले सर्वांगीण जीवन चेतनापूर्ण करण्यासाठी गिरसप्याच्या धबधब्याप्रमाणे अप्रतिहत कोसळू लागले, तर त्याच्या प्रवाहात आपली सिंहासनें भराभर वाहून जातील, अशी आमच्याच हाडामासा रक्ताच्या राजे लोकांनी कल्पना करणे हे स्वतःच्याच रक्ताशी बेइमान होण्यासारखें नव्हे काय? आम्हाला आशा आहे कीं पुण्यस्मरण शिवाजी महाराजांच्या पायधुळींतून निर्माण झालेले आणि संस्थानी अगर खालसांतील लोकांशी आपलेपणाच्या रक्ताचा प्रत्यक्ष संबंध असलेले सर्व ब्राह्मण ब्राह्मणेतर संस्थानिक या अब्रुसंरक्षक कायद्याचा इनकार करून आपला आपलेपणा कायम राखतील.

□□□

स्फुट विचार

केसरीदादांची कळकळ

आमचे वयोवृद्ध ज्ञानवृद्ध व लोकमान्य ज्येष्ठ बंधु केसरीदादा अलीकडे दोन आठवड्यांपासून प्रबोधनावर प्रतिभेटीची कृपा करूं लागले आहेत, याबद्दल त्यांचे प्रथम आभार मानले पाहिजेत. गेल्या सबंध वर्षांत त्यांनीं जरी आमच्याकडे ढुंकून पाहिलें नाही, तरी अखेर ता. ७-११-२२ च्या अंकांत त्यांनीं प्रबोधनाला आपला सूचनात्मक आशीर्वाद दिला. दादा म्हणतात, ''जातीजातींतील तंटे व मत्सर कमी करण्याकडे संपादकांनीं आपलें लक्ष अधिक पुरविल्यास बरें होईल.'' प्रबोधनांत अलीकडे सुरूं असलेल्या विश्वामित्री इतिहास संशोधन लेखमालेला अनुलक्षून ही सूचना आहे, हे कोणासहि सहज समजण्यासारखे आहे. जातीजातींतल्या तंटे मत्सरांनीं महाराष्ट्राचें अनिर्वचनीय नुकसान झालें आहे, ही जाणीव जितकी केसरीदादांना आहे, त्यापेक्षां शतपट अधिक आम्हांला आहे, ही त्यांनीं खात्री ठेवावी. प्रस्तुतचे केसरीचे संपादक विद्वानाग्रणी, मर्मज्ञ, चिकित्सक, इतिहासज्ञ, उदारमतवादी व समतोल बुद्धीचे आहेत. इतिहास-संशोधनाच्या क्षेत्रांत त्यांचे धूर्त जातभाई जातिमत्सर चेतविण्याचा कसकसला खेळखंडोबा करीत असतात, हें त्यांना प्रत्यक्ष परिचयानें माहीत आहे. असल्या वादांत प्रथम आगळीक कोणाची असते, हेंहि ते पूर्ण जाणतात. राजवाडे प्रकरणांत श्री. केळकरांच्या जाहीर - विनंतीला मान देण्यासाठींच प्रस्तुत लेखकानें आपलें कलम खालीं ठेवल्याचें त्यांना स्मरत असेल. परंतु आघात झाल्यानंतर प्रत्याघाताची उलट सलामी देणाऱ्या प्रबोधनाला मूग गिळून बसण्याचा उपदेश करण्यापेक्षां, केसरीदादांनी प्रथम आगळीक करणाऱ्या मूढांना आपल्या अधिकारयुक्त गर्जनेनें दटाऊन तंटे मत्सराचें मूळच उखडून टाकलें असतें, तर तें त्यांच्या वडीलकीस जास्त शोभून नसतें का दिसलें? कायस्थप्रभु विरुद्ध भारत इतिहास संशोधक मंडळ, भंडारी विरुद्ध बोडस, छत्रपति मराठे कायस्थ विरुद्ध भावे इत्यादि प्रकरणांत तंटामत्सराचें मूळ कोठें आहे, हे न समजण्याइतकी अझन केसरीची साठी बुद्धी नाठी खास झालेली नाहीं. जातिजातींतील तंटे मत्सर वाढविणें किंवा कमी करणें यांपैकीं आमच्या हातीं कांही नाही. आज जर महाराष्ट्रांत जातिमत्सर वाढलेला असेल तर त्याच्या जबाबदारीचा सगळा बोजा केसरी व त्यांचे जातभाई यांच्याच डोक्यावर आहे. प्रथम आघात करणारे तेच. प्रत्याघात नको म्हणण्यापेक्षा आघाताच्याच नरडीला नख देण्याचे धारीष्ठ केसरीनें दाखविलें तर आमच्या सारख्यांना

कोरडा उपदेश करण्याचा प्रसंगच त्याजवर येणार नाहीं. चित्पावनी मर्कटांनी खुशाल वाटेल त्या समाजाच्या वाटेल तशा चेष्टा, उपहास व निर्भत्सना करावी, केसरीनें डोळे मिटून उगाच पंजे चाटीत मौज पहावी आणि आत्मसंरक्षणाकरितां कोणी प्रत्याघात ह्मणून 'शुनः कपाले लगुडप्रहार' चढविला की 'अहो, जातिजातींतील तंटे मत्सर न वाढविण्याकडे विशेष लक्ष द्या' असा साळसूद उपदेश करावा, ही एडीटरी मुत्सद्देगिरी असली, तरी तो शुद्ध दांभिकपणा आहे, हें न समजण्याइतकी महाराष्ट्रीय जनता आज दुधखुळी नाही. आम्हांलाहि या प्रत्याघात-कर्तव्याचा कंटाळा आलेला आहे. पण काय करावें? आमच्या प्रिय वाडवडिलांना उगाच कोणी स्वराज्यबुडवे, अकरमाशे, साम्राज्यद्वेष्टे म्हटलें कीं गप्प वसवत नाहीं, त्याला इलाज काय? केसरी आपली पुण्याई खर्च करून वादाचें मूळच उखडून काढील, तर आमच्यावर फार फार उपकार होतील.

नरेंद्रांच्या अनुसंरक्षणाचा सोपा उपाय

मागील अंकांत संस्थानी व खालसा प्रजेचा व्यवहार कितीहि सरमिसळ झालेला असला, तरी दोघांच्या जीवनात काय भेद आहे, याचा उल्लेख केला होता. संस्थानी प्रजा संस्थानिकांच्या लहरी प्रमाणें वागविली जात असल्यामुळें, खालसापेक्षां तिच्यावर जुलम जबरदस्तीचें प्रसंग वारंवार येतात. हिंदुस्थान सरकार तर्फे प्रस्तुत बिलावर खुलाशाचें भाषण करणाऱ्या मि. थॉम्सन साहेबांनीहि 'काही संस्थानांत बेबंदशाही (मिसरूल) व जुलम जबरदस्ती (ऑप्रेशन) होत असते' याचीं जाणीव स्पष्ट व्यक्त केली. इतकेंच नव्हे तर ते पुढे म्हणाले ''हा आरोप मला नाकारतां येत नाही याची दिलगिरी वाटते आणि माझी खात्री आहे कीं खुद्द संस्थानी नरेंद्रांनाहि हा आरोप खोटा पाडतां यावयाचा नाही.'' अशी उघड उघड वस्तुस्थिति असतां आमच्या दयाळु मायबाप सरकारनें संस्थानी राजांची अब्रु संरक्षण करण्याऐवजी संस्थानी प्रजेच्या अब्रुसंरक्षणाचा कायदा जर निर्माण केला असता, तर बिचाऱ्या गांजलेल्या रयतेनें साम्राज्य सरकारला दुव्वा दिला असता! पण-

व्हाईसरॉय साहेबांच्या खास आशीर्वादानें पास झालेल्या प्रस्तुत कायद्याच्या बुरख्याचा आमच्या नरेंद्र मंडळीनीं स्वीकार करणें अगदींच नामर्दपणाचें ठरेल. कायद्याचा धिःकार करूनहि आपली अब्रु चोख राखण्याचा सोपा उपाय आह्मी त्यांना सुचवितो. त्याचा त्यांनी प्रयोग करून पहावा. येऊन जाऊन संस्थानीं घाशीरामीवर भुंकणारी कुत्रीं म्हणजे खालसांतील वर्तमानपत्रें. ती नेहमी संस्थानांतल्या भल्याबुऱ्या भानगडींचा पराचा कावळा करतात, असा एक ठळक आरोप संस्थानांकडून त्यांच्यावर केला जातो. तीन वर्षांपूर्वी इंदोर संस्थानांत एका ब्राह्मण गृहस्थाच्या तरुण मुलीवर झालेल्या जुलम जबरदस्ती बद्दल बॉंबे क्रॉनिकल पत्रांत बराच मोठा स्फोट झाल्याचें पुष्कळांच्या स्मरणांत असेल. त्या वेळी इंदोरचे नवकोट नारायण सर हुकूमचंदशेट यांनी क्रॉनिकलवर हाच आक्षेप घेतला होता. सर हुकूमचंदनीं आक्षेपकांना टौनहॉलच्या सभेंत येऊन खऱ्या खोट्याचा शहानिशा करण्याचें आव्हान दिलें होते, हा त्यांच्या मनाचा मोठेपणा तर खरा. परंतु पोलीसांविरुद्धच ज्याची फिर्याद त्याला पोलीस

ठाण्यांत कोणता न्याय मिळणार याची कल्पना जशी स्पष्ट असते, तशीच संस्थानाविरुद्ध असलेल्या त्या फिर्यादी गृहस्थाची स्थिति झालेली असावी, असे वाटतें. ते कांहीहि असो ! कर नाही त्याला डर कशाला? आमच्या नरेंद्रांना खरोखरच असें वाटत असेंल कीं खालसांतील वृत्तपत्रें हकनाहक त्यांच्यावर भुंकतात, तर त्यांनी आपल्या संस्थानात छापखान्याची व वृत्रपत्रांची सेना जय्यत तयार करावी. त्यांच्या विचारस्वातंत्र्यावर कसलाही पाटा वरवंटा न ठेवतां, निदान खालसा हद्दी इतकें मुद्रणस्वातंत्र्य त्यांस द्यावें. या व्यवस्थेनें राजा व प्रजा यांचा पूर्ण विचारविनिमय होऊन, त्याचें स्पष्ट चित्र खालसांतल्या लोकांनाहि दिसू लागेल. आलाच कांही वादाचा प्रश्न, तर दोनहि हद्दीतील वृत्तपत्रे घेतील एकमेकांना पाहून तुमच्या संस्थानाच्या रामराज्याला खालसांतील पत्रें रावणराज्य म्हणू लागली, तर त्यांचा समाचार तुमची संस्थानी पत्रें घेतीलच. अशी तोडीस तोड दिली तर त्यांत कांहीं 'रुबाब' राहील, इभ्रत दिसेल. पण हिंदुस्थान सरकारच्या स्पेशल कायद्याची ओढणी घेणें, हें उपयुक्ततावादाच्या दृष्टीनें जरी तुम्हांला प्रस्तुत बरें दिसत असलें, तरी आमच्या स्वदेशी नृपतींच्या आंगांवर ती बुरख्याची ओढणी चढलेली पाहून आम्हा महाराष्ट्रीय लोकांना श्रीशिवदेवाच्या भक्तांना कसेसेंच वाटूं लागेल. 'सूज्ञ असा. जाणिजे. मर्यादेयं विराजते.'

□□□

लेख

विश्वामित्री इतिहास संशोधन

(लेखांक ४ था)

मराठी राज्य टिकाऊ कां झाले नाही? या प्रश्नाची प्रो. सरकारनीं केलेली मीमांसा वाचकांनीं मनन करण्यासारखी आहे. ''१८ व्या शतकांतल्या महाराष्ट्रीय जनतेंत ज्या नैतिक अधःपाताचा प्रसार फैलावला होता, तीच वाळवी शिवकालीं १७ व्या शतकांत सुद्धां अस्तित्वांत होती. शिवाजी आणि पहिला बाजीराव यांच्या विजयामुळें उत्पन्न झालेल्या राष्ट्रवैभवानें व भरभराटीनें दक्षिणेंतील हिन्दु राज्याचा पाया बसला, ही गोष्ट खरी. परंतु त्यामुळें (अप्रत्यक्षपणें) हिन्दु भिक्षुकशाही जोरावर झाली व शिवाजीनें स्थापन केलेल्या नवीन राज्याला तेंच मूळ संकट निर्माण झाले. या वरचढ बनलेल्या भिक्षुकशाहीनें जातिभेदाचीं तीव्रता व वेदोक्त पुराणोक्ताचा तंटा तीक्ष्ण प्रमाणांत वाढविला. याचा परिणाम असा झाला की शिवकालापूर्वी मराठी समाज राजकीय दृष्टया कितीहि हतप्रभ असला, तरी त्याच्या साध्या भोळ्या जीवनक्रमांत एक प्रकारचा समधातपणा होता. त्या समधातपणावरच भिक्षुकशाहीचा आघात झाल्यामुळें, शिवाजीच्या राजकीय विजयांतच त्याच्या ऱ्हासाचें बीज पेरलें गेलें, असें म्हणावें लागतें. स्वातंत्र्यामुळें प्राप्त झालेल्या सत्ता, संपत्ति आणि आबादी मुळें १८ व्या शतकांतल्या मराठ्यांना मुसलमानी छळांचा इतिहास आठवेनासा झाला आणि ते जातिभेदाचें (सामाजिक उलथापालथीचे) खेळ खेळूं लागले. सह्याद्रीच्या पूर्वभागी रहाणारें ब्राम्हण पश्चिमभागी रहाणाऱ्या ब्राम्हणांचा द्वेष करूं लागले. डोंगराळ लत्त्याचें लोक सपाट प्रदेशी राहणाऱ्या आपल्या बांधवांना पाण्यांत पाहूं लागले; कारण, असें करतांना त्यांचे कान उपटणारा शास्ता कोणीच नव्हता. राज्यकारभार ब्राह्मणांच्या हातीं होता, तरी त्याहि ब्राह्मणांचा तिरस्कार करण्यास इतर कारभारी ब्राह्मण लोक मागेंपुढें मुळींच पहात नसत. याचे कारण काय ? तर बाळाजी विश्वनाथ पेशव्याच्या खापरपणज्याचा खापरपणजा कधीकाळी पुणेकर ब्राह्मणांच्या खापरपणजाच्या खापरपणजापेक्षा सामाजिक दृष्टीने हिणकस व निकृष्ट मानला गेला होता. एकीकडे चित्पावनांचा देशस्थ ब्राह्मणांशी प्रामण्याचा झगडा सुरूं आहे. तों दुसरीकडे पेशवे व सुभेदारादि ब्राह्मणांचे चिटणिसादि कायस्थांशी भयंकर द्वेषाचें वादळ माजुन राहिलें. या वादळाची पूर्वचिन्हें खुद्द शिवाजीच्या वेळच्या इतिहासांत सुद्धां स्पष्ट उमटलेली आपणांस दिसतात. फाटाफुटीच्या शेणातूनच जातिभिन्नतेचे किडे उत्पन्न होत असतात. राष्ट्रैक्याला जातिभेद विघातक

होत असतो. अर्थात् शिवाजीच्या हिन्दुस्वराज्याच्या ध्येयांत भिक्षुकशाहीच्या वर्चस्वाला प्राप्त झालेल्या प्राधान्यांतच त्या स्वराज्याच्या मृत्यूचें बीज होतें, असे म्हटल्याशिवाय गत्यंतर नाही.....१९ व्या शतकाच्या अखेरीस, महाराष्ट्रांत राष्ट्रीय चळवळीचा उद्गम होण्यापूर्वी, एखाद्या महाराष्ट्रीय ब्राह्मणाला (चित्पावनाला) कोणी 'मराठा' म्हटलें तर त्यांचें पित्त खवळत असे. गरम होऊन तो लगेच उत्तर देई की 'खबरदार, मी मराठा नव्हे, दक्षिणी ब्राह्मण आहे' ज्या ब्राह्मणांच्या संरक्षणाकरितां व भरभराटीकरितां शिवाजीनें आपला जीव खर्ची घातला, त्याच शिवाजीचा मर्मभेदक उपहास करायला ब्राह्मणांनी मुळींच कमी केलें नाहीं. (पृ. ४८३-४८४) श्री. सरदेसाई आपल्या मराठी रियासतींत (पृ. ५१३) स्पष्टच म्हणतात कीं, 'महाराज गो-ब्राह्मण-प्रतिपालक खरे, तथापि ज्या ब्राह्मणांचा आपल्या पोटापुढें दुसरे कांही दिसत नसे, (असल्या टोळभैरवांची टोळी म्हणजेच ब्राह्मण समाज, हा नियम सनातन दिसतो. सं. प्र.) ते पोटाकरिता महाराजांना सोडून मुसलमानांना जाऊन मिळत.' शिवकालीन ब्राह्मणांच्या उज्वल लोकमान्यतेची हो काळीकुट्ट सफेदी पुसून टाकण्यासाठीं परमानंदभटाच्या चोपड्याची पुण्याई सध्याच्या लोकमतजागृतीच्या हंगामांत श्री. भाव्यांच्या संशोधकी हातचलाखीचा भाव कितपत तेजीला नेईल, त्याचा उलगडा वाचकांनीच करावा.

गागाभट प्रकरणावर प्रोफेसर येणेंप्रमाणे विवेचन करतातः- ''ब्राह्मणांनीं शिवाजीला शूद्र ठरविण्याचा हट्टाग्रह धरतांच शिवाजीने बाळाजी आवजीशी संगनमत केले; याचें कारण बाळाजी हा कायस्थांचा पुढारी होता आणि त्यांच्यावरहि ब्राह्मणांनी ग्रामण्याची घोरपड उभी केली होती. कायस्थांच्या लेखनसामर्थ्याचा आणि बुद्धिप्रभावाचा ब्राह्मणांना मनस्वी हेवा वाटत असे. शिक्षणाच्या आणि सरकारी कामगिरीच्या बाबतीत कायस्थच काय ते त्यांना पुरून उरणारे एकटे प्रतिस्पर्धी होते. अर्थात् भटांना इतर बाबतीत जरी कायस्थांना चीत करण्याचे सामर्थ्य नव्हते, तरी ते शूद्र आहेत व त्यांना वेदोक्ताचा अधिकार नाही, असल्या सबबीवर बाळाजीवर भटांनी ग्रामण्य उभारले व त्यांच्या मुलाच्या मुंजीत विघ्न उपस्थित केले. बाळाजीनें शिवाजीचा कैवार घेऊन गागाभट्टाला आणवून त्याचे क्षत्रियत्व प्रस्थापित केलें. (पृ० ४८४)

बाळाजी शिवाजीचा पक्षपाती म्हणून त्याच्यावर ग्रामण्याचा बाँब फेंकल्यावर, त्यानें मोरोपंत रघुनाथ पंडितादि अहंमन्यांना असा स्पष्ट निरोप पाठविला होता कीं ''कारभार संबंधी द्वेष त्यास कामानिमिते सरकार कल्याणाचीं चाकरी करून आम्हास माजी करून हात दाखवावा. ते सोडून ब्राह्मण्यावर येऊन सांगून पाठविता हे आश्चर्य आहे...नवीन आहे असें नसता कलीत क्षत्रिय नाहीत म्हणता हे रिकामे दात खाऊन अवलक्षण देणे चांगले दिसत नाही...तुम्हीच एक ब्राह्मणांत अध्वर्यु आणि तुमचेच हुकमांत सारे ब्राह्मण आहेत असें नाही. बहुत थोर ब्राह्मण पुष्कळ आहेत. शास्त्रग्रंथ लटके होतील असे घडणार नाही. लटिका कलह वाढऊं नये. (ग्रामण्य पृ. १३-१४) बाळाजीच्या निश्चयी खटपटीला- किंवा भाव्यांच्या चित्पावनी भाषेंत बोलायचें तर-'लटपट्या मध्यस्थी'ला यश येऊन शिवराज्याभिषेक झाल्यावर गागाभटानें लिहिलेल्या कायस्थ प्रदीप ग्रंथांबद्दल लिहितांना प्रो. सरकार म्हणतात, ''पुण्याचे एक ब्राह्मण लेखक मि. राजवाडे यांनीं भारत इ. सं. मंडळाच्या चतुर्थ संमेलन वृत्तांत या ग्रंथाचें संशोधन करण्याच्या सबबीवर कायस्थ समाजावर चीड येण्यासारखा मर्मभेदक हल्ला नुकताच चढविला. अर्थात् कायस्थांकडून त्यांना प्रत्युत्तरेंहि मिळाली. पैकी श्री. के. टी. गुप्ते कृत 'राजवाड्यांची गागाभट्टी' या

पुस्तकांत बुद्धिवादाचा व पुराव्याचा काहीसा प्रयत्न करण्यांत आला आहे; परंतु श्री. के. एस. ठाकरे यांचा कोदण्डाचा टणत्कार मात्र 'सैतानाच्या टाळक्यांत मिस्टनचा सोटा' असाच वठला आहे. या गोष्टी आज २० व्या शतकांत घडत आहेत (हें वाचकांनी लक्षात ठेवावें). इतकें जरी आहे तरी राजवाडे व कोल्हापूरच्या शिववंशज छत्रपतीला शूद्र म्हणणारे प्रो. विजापूरकर हे दोघेहि स्वतःस मोठे नॅशनलिस्ट, इतकेच नव्हे तर शिवप्रेमी सुद्धा म्हणविण्यास दिक्कत बाळगीत नाहीत. (पृ. ४८५) श्री. भाव्यांचेंहि पान या महाशयांच्या पंक्तीला वाढल्यास त्यांची सोंवळी विद्वत्ता ओवळी होणार नाहीं खास. सरते शेवटी, ''जर महाराष्ट्र ब्राह्मण खोटा ब्राह्मणत्वाचा हट्ट धरून क्षत्रियांस लोळविण्यास पहातील, तर जी आमची महाराष्ट्र भूमी आज पर्यंत कधीच तदभिमत दुराग्रही जातिभेदाचें माहेंर झाली नाहीं, ती तशी पुढे होण्याचा संभव नाहीं. तेव्हां क्षत्रियच त्यास उलट लोळवून टाकतील'' या कै. भागवतांच्या उक्तीचा श्री. भावे यांस सप्रेम इषाऱ्यादाखल आहेर करून ही लेखमाला येथे समाप्त करतो.

(श्री, भाव्यांच्या दुसऱ्या रुमालावर इतर बऱ्याच विद्वानांचे लेख बाहेर पडणार असल्याचे समजते. तेव्हां त्याबद्दल सध्या काही दिवस आम्ही मौन धरलेलें बरें. संप्र.)

□□□

लेख

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची चिकित्सा

(लेखांक २ रा)

'' अप्रियस्यापि पथ्यस्य वक्ता श्रोताच दुर्लभः''

लोकशाही, समता वगैरे स्वातंत्र्यदर्शक अनेक शब्द आज बरेच रूढ होऊन, प्रत्येक हिन्दी माणसाच्या ओठांवर सहज लीलेनें जरी नाचत असले, तरी त्यांच्या वास्तवीक स्वरूपाचा तपशील काय आहे, याची स्पष्ट कल्पना फारच थोड्यांना झाली असेल. मुळींच कोणांला नाही, असे म्हटलें तरी फारशी हरकत नाहीं. लोकशाही लोकशाही अशा नुसत्या शब्दांच्या जपणींने कांही लोकशाही थरारत नसते. तिचें बीज रुजण्याइतकी हिंदी राष्ट्राची मनोभूमिका तयार आहे कीं नाहीं, नसल्यास संस्कृतीचा कोणता दोष विशेष आडवा येत आहे आणि हा दोष निर्मूल करतांना आखल राष्ट्राच्या संस्कृतीला कोणते वळण कुशलतेने देणे भाग आहे, या प्रश्नांची मालिका चौकस व व्यापक दृष्टीने सोडविणे प्राप्त आहे. व्यक्तीप्रमाणे राष्ट्राचीहि एक विशेष संस्कृति कल्चर बनलेली असते आणि तिच्या घटना-द्रव्याच्या स्वभावपरिपोषावर कोणतेही तत्व पचनी पडणे वा न पडणे, ही क्रिया घडत असते. हिंदुस्थान देशाच्या राजकीय परिस्थितीचा ऐतिहासीक चित्रपट उलगडून पाहिला, तर प्राचीन काळी ग्रीक राष्ट्रांत परिणत झालेल्या सुप्रसिद्ध डिमॉक्रसीचा (लोकशाहीचा) तिला सांसर्गहि लागलेला दिसत नाही. आमच्याकडील राजसत्ता कांही काळ अमीरी थाटाची (आरिस्टोक्रॅटिक) तर बराच काळ वंशपरंपरा एकमुखी नरेंद्री थाटाची (ऑटोक्रॅटिक) अशीच होत आल्यामुळे, राष्ट्राच्या संस्कृतीलाहि तसेंच विशिष्ट वळण लागले गेलें. यथा राजा तथा प्रजा या म्हणींत सुद्धा हिंदी राष्ट्राच्या संस्कृतीचा विशिष्ट गर्भितार्थ बराच भरलेला आहे. अर्थात् या संस्कृतीच्या पचनी प्रजासत्तावाद (रिपब्लिकॅनिझम्) किंवा लोकशाहीवाद पडता पडतां मूळ संस्कृतीच्या घटनाद्रव्यांत आमूलाग्र उत्क्रांति घडुन येणें अवश्य आहे, हें शांत विचारांती आमच्या विचारी वाचकांस कळून येईल. संस्कृतीचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. नानाविध चळवळींच्या यशायपशाची किल्ली तेथेंच आहे.

'आपण आपणांसी ओळखावें । या नांव ज्ञान' या समर्थांच्या उक्तीत हा संस्कृति-जाणिवेचाच चिमटा घेतलेला आहे. एखादें औषध कितीहि गुणकारी असलें, तरी तें सर्व माणसांना सारख्याच प्रमाणांत हितावह होईलच, असा भरंवसा नाहीं, याचें कारण त्या त्या व्यक्तीच्या प्रकृतीचें-स्वभावधर्माचें प्रमाण,

प्रकृति म्हणजेच संस्कृति, इतकी सामान्य कल्पना आपण घेतली म्हणजे एकच चळवळ हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या प्रांतांत समप्रमाणांत कां यशस्वी होत नाही, या शंकेवरची सर्व पुटें हळुहळूं नाहीशीं होऊन प्रत्येक प्रांताच्या प्रकृति-भिन्नतेचा ऊर्फ संस्कृति-भिन्नतेचा विचार करणें आपणांस भागच पडेल. हिंदुस्थान हा एक देश आहे असें आपण वारंवार बोलतों. त्यावेळी जर्मन देश, इटली देश, फ्रान्स देश, इंग्लंड देश, यांप्रमाणेंच हिंदुस्थान देश अशी आपली भावना असते. हिंदुस्थानचे क्षेत्रफळ, त्याची लोकसंख्या, तिची प्रांतवार झालेली विभागणी, प्रत्येक प्रांताच्या रहिवाशांची शारिरीक मानसिक बौद्धिक भिन्न परिणति, इत्यादि गोष्टींचा विचार केल्यास, आपणांस स्पष्ट कबूल करावें लागेल कीं नानाविध संस्कृतींच्या भिन्न भिन्न लोकसमूहानें गजबजलेलें हिंदुस्थान हें एक केवळ राष्ट्र नव्हे, महा राष्ट्र नव्हे, तर युरप अमेरिकेप्रमाणें एक खंड आहे. या खंडाच्या संस्कृति भिन्नतेचा कांहीहि विचार न करतां वाटेल ती चळवळ सर्वांवर सारखी लादण्याचा उपक्रम हिंदी राष्ट्रनेते आजपर्यंत करीत असल्यामुळेंच कोणतीहि चळवळ येथे चिरस्थायी व टिकाऊ होत नाही. संस्कृति-भिन्नतेच्या या महत्वाच्या प्रश्नाचा नीट अभ्यास होऊन, अनेक प्रांतीय संस्कृतींतील परस्परविरोधी मूलतत्वांचा समन्वय करण्याची इच्छा राष्ट्रनेत्यांत उत्पन्न झाल्याशिवाय, सध्या हिंदुस्थानांत बोकाळलेल्या हिंदु मुसलमान, ब्राह्मण ब्राह्मणेतर, सुधारक सुधारणाद्वेषी इत्यादि चळवळींचा समाधानकारक निर्णय लागणें शक्य दिसत नाही.

उत्तर हिंदुस्थानांत समतावादी आर्यसमाजाचा प्रसार फारच विस्तृत प्रमाणावर झाल्यामुळें, ब्राह्मण ब्राह्मणेतर वादानें तिकडे कधि डोकेंच काढलें नाहीं व आतां हा वाद तिकडे उत्पन्नहि होणें शक्य नाही. महाराष्ट्राप्रमाणें मद्रास इलाख्यांत सुद्धां ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर तंटा आज माजलेला आहे. या दोन ठिकाणच्या तंट्याची कारणें एकच आहेत, असें कोणी विधान केल्यास तें सपशेल चुकीचें ठरल्याशिवाय खास राहाणार नाहीं. येथेहि महाराष्ट्रीय ब्राह्मणेतर आणि मद्रदेशस्थ ब्राह्मणेतर यांच्या भिन्न संस्कृतीचा प्रश्न व धार्मिक सामाजिक जीवनाचा इतिहास विचारांत घेणें अवश्य आहे. कै. डॉक्टर नायरच्या नेतृत्वाखाली मद्राशी ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांशी पद्धतशीर विरोधाची चळवळ कितीहि रंगारूपाला आणली असली, तरी महाराष्ट्रातल्या ब्राह्मणेतरांच्या चळवळीशीं तिचे साम्य कांही क्षुल्लक तपशीलाशी पडलें तर पडेल. तिकडे ब्राह्मण आणि शूद्र अशा दोनच लोकसमूहाचें वेदोक्त अस्तित्व मानले जाते. क्षत्रिय वैश्यांचें उडालेलें तळपट क्षत्रिय वैश्यांनीं बिनशर्त कबूल केलेलें आहे. मद्राशी ब्राह्मण तर एवढे मगरूर घाशीराम आहेत कीं गेली कित्येक शतके त्यांनी ब्राह्मणेतरांना ऊर्फ शूद्रांना पशूपेक्षांहि नीच लेखण्याचा संप्रदाय लोकमान्य करून सोडला आहे. तिकडील ब्राह्मणेतरांचा सामाजिक दर्जा कुत्र्याडुकरांइतका क्षुद्र मानण्याचें भिक्षुकी कारस्थान ब्राह्मणांनी सर्वत्र फैलावल्यामुळें, लक्षावधि ब्राह्मणेतर हिंदु समाजाला व हिंदु धर्माला रामराम ठोकून क्रिस्ती व मुसलमान धर्मात गेले. लोकसंग्रहदृष्ट्या हिंदु राष्ट्राचा एवढा भयंकर घात करूनहि उलट मद्रासची भिक्षुकशाही आपल्या वेदोक्त श्रेष्ठतेचे देव्हारे माजविण्यास अझूनहि तिळमात्र शरमत नाही. अर्थात् अशा अवस्थेंत मद्राशी ब्राह्मणेतरांनी प्रतिकाराची कांहीच हालचाल दाखविली नसती, तर तें खरोखरच पशु वर्गात गणले गेले असते. सारांश, तिकडील ब्राह्मणेतरांची चळवळ शुद्ध प्राणत्राणपरायण आहे. आत्मश्रेष्ठतेसाठीं मद्राशी ब्राह्मणांनीं प्रचलीत केलेल्या प्रत्यक्ष सामाजिक व धार्मिक वर्चस्वाविरुद्ध बंड आहे.

आतां महाराष्ट्रातल्या ब्राह्मणेतरांच्या चळवळीकडे लक्ष द्या. महाराष्ट्राची संस्कृति मद्रास इलाख्याच्या

संस्कृती इतकी कमकुवत व किरकोळ नसल्यामुळें, इकडील ब्राह्मणेतरांचा मद्रासप्रमाणें सामाजिक व धार्मिक अधःपात मुळींच झालेला नाही, असें स्पष्ट दिसून येते. महाराष्ट्रांत भिक्षुकशाही जुलूम कितीहि झालेला असला आणि पौराणिक वाङ्मयप्रसारच्या जोरावर ब्राह्मणेतर जनतेंत मानसिक गुलामगिरीची जाळी कितीहि फैलावलीं असलीं, तरी इकडील क्षत्रिय वर्गानें आपल्या क्षात्रतेजाच्या जोरावर अखिल ब्राह्मणेतरांचा अधःपात वेळोवेळी सांवरून धरण्यास केव्हांहि मागें पाय घेतलेला नाहीं. त्यांनी ब्राह्मणांची गुप्त कारस्थाने ठिकठिकाणी ठेचण्याचें कार्य मोठ्या धडाडीनें वरचेवर केल्यामुळें, मद्रास इतका प्राणत्राणपरायणतेचा दुर्धर प्रसंग महाराष्ट्रीय ब्राह्मणेतरांवर पूर्वी कधिं कोसळला नाही व पुढे कधिं कोसळेल असें तर मुळींच वाटत नाही ! मद्रासच्या ब्राह्मणेतरांत राजकीय हक्कांच्या जाणिवेची अझून प्रभातहि उजाडलेली नाही; परंतु इकडे सामाजिक व धार्मिक हक्कांचीच गोष्ट काय, पण राजकीय क्षेत्रांत सुद्धां क्षत्रियांनी ब्राह्मणी वर्चस्वाला बेगुमान धडाडीच्या टकरा देऊन चींचीं करायला लावल्याशिवाय सोडलेलें नाही, हे पूर्ण लक्षांत ठेऊनच या महाराष्ट्रीय चुरशींतील मूलतत्वांचें आपणास पृथक्करण केलें पाहिजे.

आज महाराष्ट्रांत ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांचा तंटा हातघाईवर आला आहे, ही गोष्ट दोघेहि नाकबूल करीत नाहींत. जगांत थरारलेल्या राष्ट्रस्वातंत्र्याच्या नवजीवनाचा धिःकार करून गुलामगिरीच्या नरकांत कुझत पडण्यास ब्राह्मण नाखूष आहेत आणि ब्राह्मणेतर दिलखूष आहेत, असे मुळीच नाही. दोघेहि हिंदु राष्ट्राचे घटकावयव आहेत आणि त्रयस्थांकडून होणाऱ्या हिंदुराष्ट्राच्या पायमल्लीला एकमुखी विरोध करण्यासाठी त्यांनीं आपापले सर्व मतभेद विसरून एक झालेंच पाहिजें, ही जाणीव दोघांनाहि आहेच. अर्थात् दोघांतली तीव्र चुरस जगाच्या अंतापर्यंत टिकणारी नसून, इतर ऐहिक गोष्टीप्रमाणें तिलाहि अंतकाळ आहेच आहे. क्षुल्लक धर्मभेदानें फाटाफूट पडलेल्या हिंदी हिंदुमुसलमानांच्या तंट्याचा व्याप दिवसेंदिवस भयंकर प्रमाणांत कसा वाढत आहे, याचें 'डेंजर सिग्नल' मोपले-मुलतान-मालेगांवच्या बंडांनीं स्पष्ट दिलेले आहे. खुद्द हिंदु समाजांतच ब्राह्मण ब्राह्मणेतर तंटा भयंकर विकोपास जाण्याच्या ऐन रंगांत, माथेफिरू मुसलमानांनीं जुन्या इतिहासाची पुनरावृत्ति करण्यासाठी, निःशस्त्र व निर्बल हिंदु समाजावर मोपलेशाही बंडाची घोरपड उभी केली, तर त्यांत ब्राह्मणांचा निःपात होऊन ब्राह्मणेतर मात्र त्यांतून आजिबात सुटले जातील, किंवा त्यांना वाचविण्याच्या कामीं इंग्रजी लष्करी सत्तेची पुण्याई बिनचूक धांवून येईल, अशी आशा करण्यास चालू घडीच्या मामल्यांत कसलाहि आधार नाही. आजपर्यंत परचक्रांनी हिंदुस्थानाचें मनमुराद पीठ केले आहे. परचक्रांच्या घरटांत ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर दोघेहि अभेद भावानें सारखेच भरडले गेले आहेत आणि कर्मन्यायानें आज अखिल हिंदु जनता हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत कवडीमोल ठरून, परक्यांच्या पंखाली वाहण्याच्या मजुरदारीपलीकडे तिला कसलीहि किंमत उरलेली नाही, हें ब्राह्मण ब्राह्मणेतरांनी दृष्टीआड करून भागणार नाही. अशा स्थितींत महाराष्ट्रांतील ब्राह्मण ब्राह्मणेतरांच्या तंट्यांतील मूलतत्वांचें कोणाची भाडभीड न धरतां स्पष्ट पृथक्करण केल्याशिवाय गत्यंतरच उरलेलें नाहीं. हें काम होमिओपथिक पद्धतीनें करण्याइतकी वस्तुस्थिति उरलेली नसून, आतां त्यावर सर्जनची तीक्ष्ण धारेचीं नस्तरेंच चालविलीं पाहिजेत. असें करतांना कोणत्याहि पक्षातल्या आरडाओरडीकडे, शिव्याश्रापांकडे, खुनाच्या धमक्यांकडे किंवा प्रत्यक्ष खुनाच्या शक्यतेकडे दुर्लक्ष करून, हिंदु समाजाच्या भावी उत्कर्षासाठी सत्यानरूपणांत प्रबोधनाचें कलम केव्हांहि डगमगणार

नाहीं. यासाठीं महाराष्ट्र देशाच्या संस्कृतीकडे प्रथम वळलें पाहिजे.

महाराष्ट्राच्या प्रवृत्तीची-संस्कृतीची-चिकित्साच करूं म्हटलें तर येथें सर्व बरे वाईट रस अत्यंत उत्कटावस्थेंत आढळतात. ही प्रवृत्ति हिंदुस्थानांतल्या इतर सर्व प्रांतांच्या संस्कृतीपेक्षा फारच निराळ्या व विलक्षण मसाल्याची बनलेली आहे. हींत मानवी जीवनाचे अनेक भले बुरे रस उत्कटत्वानें परिणत झालेले आढळतात. निसर्गाकडे पाहिलें तरी सुद्धां हाच प्रकार. बारा मास हिरव्या गार वनश्रीनें थरारलेल्या प्रदेशालगतच खडकाळ वाळवंटानें कित्येक मैलपर्यंत आपले हातपाय सताड पसरलेले आढळतात. इकडे, भर उन्हाळ्यांत रोंरावत जाणाऱ्या नद्या सागरराजाच्या भेटीसाठीं उत्सुकतम झाल्यामुळें उंचउंच कडेकपारांवरून बेगुमान धडाधड उड्या टाकीत फोंफावत चालल्या आहेत; तों पलीकडे कित्येक डोंगराळ झरे लक्षाधीश श्रीमंताच्या उधळ्या दत्तक पुत्रांप्रमाणे, पावसाळ्यांत जलसमृद्धीचा खळखळाट करून, दसरा दिवाळी होते न होते तोंच पाण्याच्या शुकशुकाटानें सुकेठाक पडून आहेत. उन्हाळ्याच्या ऐन कडाक्यांत सबंध कोंकण आणि घांट यांचे फुटाणे उडत असतांना, महाबळेश्वरावर बर्फाची वृष्टि होत असते. इकडे कोंकणांत तांदुळ नागलीच्या आंबिलीवर दिवस काढणारे शरीरानें दुबळे पण कुशाग्र बुद्धीचे कोंकण्ये आढळतात, तर तिकडे वरघांटी वाडगा वाडगा भिजक्या हरभऱ्याची डाळ खाऊन लेजीमतालीम खेळणारे दणधाकट शरीराचे पण मंद बुद्धीचे घाटी सांपडतात. स्वदेशाकरतां प्राण देणारे येथेंच व स्वतःच्या प्राणासाठी स्वदेशाचा प्राण घेणारेहि येथेंच. स्वराज्यसंस्थापक येथेंच निर्माण झाले व स्वराज्यविध्वंसक अधमाधम येथेंच निपजले. वर्णाश्रमवाद्याच्या ओसरीला ओसरी भिडवून नास्तिक रहातो, तर सरधोपट मार्गी इसमाच्या घरांतच कृष्ण कारस्थानें करणारा खुशाल वावरतो. वडिलांनी घालून दिलेल्या 'बाळबंदी' वळणाचा कित्ता जशाचा तस्सा गिरवीत बसणाऱ्या गतानुगतिक देशस्थाच्या मांडीला मांडी भिडवून बसलेला आंतल्या गांठीचा शुक्ल यजुर्वेदी आढळतो, तर धन्याच्या पायांतल्या पायतणासाठी जीव देणाऱ्या इमानी कायस्थाच्या शेजारींच कुटील कारस्थानांत साऱ्या हिंदुस्थानाला पुरून उरणारा ऊर्ध्वबुद्धि चित्पावन उभा असतो. एकूण, महाराष्ट्रासारखा सर्वरंग परिपूर्ण देश केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, पण अवघ्या दुनियेंत दुसरा सांपडणार नाहीं, असें विधान केल्यास अतिशयोक्तीच्या कलमाखालीं खटला होण्याचा संभव बराच कमी आहे. मानवी संस्कृतीच्या संग्रहालयांतील सर्व रंग अशा रीतीने एकवटलेल्या महाराष्ट्राच्या भिन्नभिन्न किंवा परस्परविरोधी तत्वांचा यथाप्रमाण समन्वय जेव्हां जेव्हां घडून आला, तेव्हां तेव्हांच त्याच्या मर्दुमकीचा व कर्तबगारीचा इतिहास भडक रंगांत रंगून निघालेला आहे. असल्याच समन्वयाच्या कपिलाषष्ठी योगावर विजयानगरच्या स्वतंत्र हिंदुपदपातशाहीची स्थापना झाली व १७ व्या शतकाच्या पूर्वार्धांत आमचा प्राण-आमचा राष्ट्रवीर-आमचा महाराष्ट्रसूर्य शिवाजी सह्याद्रीच्या माथ्यावर जलाल तेजानें चमकूं लागला. या समन्वयाचा विचार ब्राह्मण ब्राह्मणेतर नीट करतील, तर या वादापासून महाराष्ट्राचे होणारे धिंडवडे व भावी विनाश खात्रीनें वाचतील.

महाराष्ट्रांतल्या ब्राह्मणेतर पक्षातर्फे ''आमचा वाद ब्राह्मणांच्या धार्मिक व सामाजिक वर्चस्वाविरुद्ध आहे'' अशाप्रकारचा खुलासा वरचेंवर करण्यांत येत असतो. यांतच वेदोक्त पुराणोक्ताचा समावेश करण्यास काही हरकत नाही. परंतु खरें कारण हें नव्हे. शरसंधानासाठीं योजिलेल्या बाणाला लावलेला हा खोटा पिसारा आहे. हा जर खरा मानावा, तर अखिल ब्राह्मणेतर जनता शुद्ध धर्माचरणांत कांटेकोर मग्न आहे, पदोपदीं धर्मपालनाचे नियम पाळण्यांत येत आहेत आणि धर्मसंरक्षणासाठी तळहातांवर शिरे

एन ४००६--२३

घेऊन सिद्ध झाली आहे, असें विधान मांडणें भाग पडेल. पण वस्तुस्थिति अगदी उलटी आहे. आजचा महाराष्ट्रीय हिंदु समाज केवढा धर्मवान राहिला आहे, श्रुतिस्मृतीचा कैवारी आहे, स्वधर्माचा आभिमानी आहे आणि भगवद्गीताप्रणित लोकसंग्रहाचा पुरस्कर्ता आहे, हें ज्यानें त्यानें स्वतांलाच पुसलेलें बरें. जेथें ब्राह्मणलोकच पुरे धर्मलंड बनलेले आहेत, तेथें ब्राह्मणेतरांची धर्मासक्ति किती तेजस्वी असेल, याची कल्पनाच करावी. धर्मावांचून पूर्वी कधिं काळी कोणाचा जीव गेला असेल, पण आता तरी त्याच्यावांचून जगणारे लोक पृथ्वीच्या पाठीवर रगड आहेत व त्यांत आम्हा हिंदु लोकांचा नंबर पहिला आहे. अर्थात् धर्माची किंमतच इतकी स्वस्त उतरल्यावर धार्मिक स्वातंत्र्याच्या हाका आरोळ्यांना काय महत्व यायचे, ते उघडच होते. सध्यांच्या धर्मलंड युगांत अमुक विधि माझ्याच हातून झाला पाहिजे' अशी दमदाटी करायला भिक्षुकाला तोंडच उरलेलें नाही. त्याला बोलावणें वा न बोलावणें हा ज्याच्या त्याच्या खुषीचा सौदा होऊन बसला आहे. धार्मिक ग्रंथांच्या आधारानें किंवा जन्मप्राप्त वर्णश्रेष्ठतेच्या दिमाखानें 'मी ब्राह्मण, तूं शूद्र' अशी वाचाळपंचविशी करणाऱ्यांची हाडें भरदिवसां पिचून निघत आहेत. अशा स्थितीत धार्मिक स्वातंत्र्य धार्मिक स्वातंत्र्य म्हणतात तें कोणतें? सामाजिक समतेची हीच विल्हेवाट. खुद्द ब्राह्मणेतर असंख्य समाजांत जर उच्च नीचत्वाच्या, कडवट गोडवटाच्या आणि स्पृश्य अस्पृश्यत्वाच्या चढणी उतरणी मनमुराद सर्वत्र आहेत, ब्राह्मण ह्मणविणाऱ्यांत सुद्धां जर याच उंच सखलत्वाचे तंटे हरघडी चालूं आहेत, तर ही सामाजिक समता द्यायची कोणी, घ्यायची कोणी आणि कशी? तेव्हां ब्राह्मणेतरांची ब्राह्मणांविरुद्ध सुरूं असलेली चुरस कांही तरी विशेष निराळ्या स्वरूपाची आहे, यांत संशय नाही. तिचा स्पष्ट उच्चार होणें अशक्य आहे. तो पुढील लेखांकावर ठेऊन सध्यां येथें विराम करणें प्राप्त आहे.

□□□

अग्रलेख

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची चिकित्सा

(लेखांक ३ रा)

ब्राह्मणांचा ब्राह्मणेतरांविरुद्ध झगडा कितीहि प्राचीन असल्याचें एखाद्या संशोधकानें सिद्ध करण्याचा यत्न केला तरी प्रथम इतका भेद स्पष्ट दाखविणें प्राप्त आहे कीं सध्यां महाराष्ट्रांत प्रचलीत असलेल्या झगड्याशी त्याचें कोणत्याहि बाबतींत साम्य नाहीं. ही जर तत्वज्ञानाच्या क्षेत्रांतील किंवा धर्माधर्मांच्या निर्णयांतील चढाओढ असती, तर तिच्याविषयी काही चिंता न लागतां, उलट सर्व जग या चुरशीकडे कौतुकानें पहात रहातें. पण प्रस्तुतचा वाद असला नसून, युद्यमान पक्षांपैकी कोणीतरी एक कायमचा नेस्तनाबूद झाल्याशिवाय हें युद्ध बंद करावयाचे नाही, असा दोघांनीहि जणुं काय चंग बांधल्यासारखा दिसतो. दोघेहि पक्ष आज इतके हट्टास पेटले आहेत कीं युद्धाच्या चकमकींत खुद्द राष्ट्रधर्माचा आणि राष्ट्रसेवेचा जरी होम झाला तरी त्याची कोणालाच पर्वा वाटेनाशीं झाली आहे. विचाराच्या ऐवजी विकाराचेंच प्राबल्य भरंवसाट माजल्यामुळें दोनहि पक्षांतील पुढारी विवेकभ्रष्टतेच्या रिंगणांत गिरक्या मारीत आहेत. ब्राह्मण हे अल्पसंख्य आहेत व ब्राह्मणेतरांचें सैन्यबळ असंख्य आहे. अर्थात आज ना उद्यां ब्राह्मणांना ब्राह्मणेतरांशी तहनामा केल्याशिवाय गत्यंतर नाही, हें अगदीं उघडे गणित आहे. परंतु ब्राह्मण हे जात्याच धूर्ताग्रणि असल्यामुळे, संख्याबलांत उद्यां जरी ते हतवीर्य झाले, तरी बुद्धिबलाच्या डांवपेचांत ते त्या तहनाम्याचीं कलमें उलटी सुलटी करून लॉइड जॉर्जगिरी गाजवायला कमी करणार नाहींत, याकडे ब्राह्मणेतर पुढारी जरूर तें लक्ष देतीलच. वेळ पडेल तसें पडतें घेऊन ऐन मर्मावर झडप घालण्याची कला ब्राह्मणांइतकी कोणासहि अझून साध्य झालेली नाही. बरें, युध्द्यमान पक्षांच्या चकमकीकडे पाहिलें आणि त्यांच्या अस्त्रयोजनेची नीट चांचणी केली, तर आपल्याला असें दिसून येईल की आपला प्रतिपक्षी कोण, याची स्पष्ट व ठळक कल्पना कोणालाच नसल्यामुळें, समोर दिसेल त्याला घायाळ करण्याच्या धामधुमींत जो तो स्वतःच्याच सैनिकांची कुतरतोड करीत सुटला आहे. याचें कारण उघड आहे. ब्राह्मण झाले काय किंवा ब्राह्मणेतर झाले काय, दोघेहि संघ अझून संघटीत नाहींत. या दोन सर्वसामान्य नावाखाली मोडणाऱ्या अनेक भिन्नभिन्न समाजांची धार्मिक सामाजीक किंवा राजकीय बाबतींत मुळीच एकवाक्यता नाहीं. एकवाक्यताचशी काय, परस्परांत असावी तितकी सहानुभूती किंवा आदर नाहीं. अशा अवस्थेंत आपणयुद्ध कोणाशी कां कसें कोठें किती

एन ४००६--२३अ

करावयाचें, या ककारी प्रश्नांबद्दल सर्वत्र अस्पष्ट व संदिग्ध कल्पनांचें काहूर माजले असल्यास नवल तें कसलें ? नुसती ब्राह्मणसंघाची कल्पना निघते न निघते तोंच खुद्द ब्राह्मण म्हणविणाऱ्या अनेक समाजांत लाथाळी सुरू झाली. मग ज्या ब्राह्मणेतर समाजांतील शेंकडा ९५ व्यक्ति अक्षरशत्रू, संघ शिस्तबार संघटीत होण्यासाठीं परिश्रमाची कसोशी किती व्हायला पाहिजे, याची कल्पनाच करावी. जेथें ब्राह्मणेतर संघांत लोकसंग्रहाची जाज्वल्य भावना अझून प्रादुर्भूत झालेली नाही, त्यांत कोणकोणत्या समाजांचा किंवा जातींचा समावेश होणार याची स्पष्ट वाच्यता एकाद्या जबाबदार परिषदेनें केलेली नाहीं आणि कोणत्या 'तंट्याच्या हाडकाकरितां' कोणत्या विशिष्ट ब्राह्मणांविरुद्ध मोहिमेची चढाई कां करावयाची, याचा प्रमाणबद्ध तपशील जनजाहीर झालेला नाहीं, तेथें ब्राह्मणसंघाच्या कल्पनेच्या प्रसूतीलाच एवढी संकटपरंपरा कां ओढवू नयें? सारांश, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हे दोनहि युध्द्यमान पक्ष अत्यंत विस्कळीत व बेशिस्त स्थितीत कसली तरी काही तरी लठ्ठालठ्ठी करण्यास प्रवृत्त झाले आहेत, असें विधान केल्यास फारसें चूक होणार नाहीं.

परंतु परिणाम जर दिसत आहे तर त्याला कांही तरी कारण हें असलेंच पाहिजे खास. ब्राह्मण म्हटला कीं ब्राम्हणेतरांचें विशेषतः या चळवळीला रंगारूपास आणणाऱ्या मराठ्यांचें-पित्त का खवळतें? त्यांच्या भावना एकदम कां भडकतांत? साधा भोळा शेतकरी मावळा, पण तो देखिल हातचा नांगर टाकून अस्तन्या वर कां सरसावतो ! ब्राह्मणांविषयी तिरस्काराची ही तीव्र भावना केवळ सुशिक्षित मराठ्यांपर्यंतच न राहतां, तिच्या लाटा थेट अवनत अस्पृश्यांच्या गरीब झोंपड्यांपर्यंत जाऊन भिडल्या आहेंत. याला काय कारण? काय या सगळ्यांचीच डोकीं बिघडली? जोडा पायाला चावतो कोठें हे त्यांना बिनचूक सांगतां आलें नाहीं, म्हणून जोडा चावतच नाहीं असें कसें म्हणतां येईल? अर्थात् जोडा जर चावत आहे, तर त्याचा बंदोबस्त करण्यासाठी जोड्याची पाटपोट यथास्थित तिंबवून काढणें प्राप्त आहे.

जोडा चावत आहे. चुरशीला भरभक्कम कारण आहे. विरोधाची भूमिका वाजवी आहे. ती कोणती? उत्तर एकाच वाक्यांत देतां येईल. परंतु जरा खुद्द ब्राह्मण नावाखाली मोडणाऱ्या समाजांच्या परस्पर भावनांचा थोडक्यांत आढावा काढून पाहूं. ब्राह्मण समाजांत सारस्वत देशस्थ कऱ्हाडे यजुर्वेदी दैवज्ञ चित्पावन वगैरे शेंकडों जाती मोडतात. त्या सर्वांच्या धार्मिक व सामाजीक जीवनांत कसलाहि एकोपा नाहीं, सहानुभूती नाहीं, कित्येकांमध्यें तर आडवा उभा विस्तवहि जात नाहीं. सारस्वतांचा व चित्पावनांचा 'प्रेम' तर इतका लोकविश्रुत आहे कीं त्याचें प्रत्यंतर पाहूं इच्छिणारांनी एक तर गोमांतकाची सफर करावी, नाहीं तर 'सरस्वति-मंडळ' हें एकच पुस्तक वाचावें. देशस्थ दैवज्ञ यजुर्वेदी गोवर्धनादि जातीं आज जवळ जवळ दोन अडीच शतकें चित्पावनांपासून बऱ्याच फटकून वागतात आणि धार्मिक सामाजीक बाबतींतील त्यांची कडवी चुरस फारशी लोकविश्रुत नसली तरी ग्रंथविश्रुत आहे. विशेष मननीय गोष्ट म्हटली म्हणजे पेशव्यांच्या सर्वसमर्थ बळजबरीमुळें देशस्थांनीं चित्पावनांशी रोटीबेटीव्यवहाराचा मामला जरी सुरू केलां, तरी त्यांनासुद्धां चित्पावनांकडून वरचेवर उपसर्ग पोहचतोच; नव्हे, नित्याच्या व्यवहारांत देशस्थाला वाटाण्याप्रमाणें बाजूला पडण्याचा प्रसंग वरचेंवर येतो. मग, पेशव्यांच्या सत्तेचीं लवमात्र क्षिति न बाळगितां त्यांच्या जातभाईशीं रोटीबेटी व्यवहारांत करसून विरोध करणाऱ्या शुक्ल यजुर्वेद्यांशी चित्पावनांचे कितीसे 'सूत' आहे आणि चालूं घडीच्या

'राष्ट्रीय' विचारविकासांत चित्पावन त्यांची काय बडदास्त ठेवतात, याचें सप्रमाण पुराण आमचें ज्ञानवृद्ध तपस्वी मित्र डॉ. रा. व. पुरुषोत्तमपंत जोशी कोणालाहि खुलासेवार सांगतील. रोटी खाल्ली, बेटी दिली घेतली, तरी देशस्थ तो देशस्थ आणि चित्पावन तो चित्पावन, हा चमत्कार पाहिलाकी 'पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम' या सूत्राची आठवण तर होतेच; परंतु जातिभेद-निर्मूलनांच्या कामीं सहभोजनें आणि मिश्रविवाह या सुचविल्या जाणाऱ्या दोन रामबाण उपायांवरचा विश्वास सुद्धां डळमळूं लागतो. बिचारे दैवज्ञादि विश्वब्राह्मण चित्पावनांशी प्रसंग पाडण्यापूर्वी दहाच्या ऐवजी शंभर अंक असूनहि मोजतात. ते स्वतःला 'ब्राह्मण' म्हणवितात, एवढ्याच सबबीवर पेशवाई सैतानशाहीत त्यांच्यावर झालेल्या जुलमांच्या तिडका त्यांना अझुन येत असतात. सारांश, खुद्द ब्राह्मणांत काय किंवा ब्राह्मणेतरांत काय, प्रत्येक जातीची चित्पावनांविरुद्ध कशाना कशा स्वरूपाची कुरकूर आहेच आहे, ही गोष्ट स्पष्ट उघड बोलायला कांहीं हरकत नाहीं. आज ब्राह्मणेतरांची जी वेडीवांकडी चळवळ सुरू आहे, तीबद्दल बहुतेक चित्पावनेतर ब्राह्मण जाती बऱ्याच जवळच्या सहानुभूतीनें वागतात; नव्हे, पुष्कळ ठिकाणी सक्रीय भाग घेतात. यावरून असा निष्कर्ष काढायला कांहीं हरकत नाहीं की आपण सामान्यतः जिला ब्राह्मण ब्राह्मणेतर चळवळ म्हणतो ती वास्तवीक ब्राह्मण तेवढे एकीकडे व ब्राह्मणेतर तेवढे दुसरीकडे अशा स्वरुपाची नसून, उघड उघड चित्पावन विरुद्ध चित्पावनेतर अशी आहे. अर्थात या तेढीचे मूळ शोधीत शोधीत भूतकाळच्या गडप अंधारांत जाण्याचें निश्चित केलेंच तर तिसरा पेशवा नानासाहेब याच्या कारकीर्दीच्या पुढें पाऊल ठेवण्याची कांहीं जरूरी नाहीं. येथपासून वर्तमानकाळापर्यंतचा महाराष्ट्राच्या नशिबाच्या भरती ओहटीचा चित्रपट पाहतांच, आपल्या चटकन लक्षांत येतें कीं पेशव्यांच्या सैतानशाहीचा वरपगडा झाल्यामुळें चित्पावनेतर इतर सर्व हिंदुसमाजांची सामाजिक व धार्मिक अवनति कितीहि झालेली असली, तरी त्यामुळें झालेल्या आखिल महाराष्ट्राच्या राजकीय अधःपाताचें शल्य चित्पावनेतर समाजांना दिवसें दिवस अधिकाअधिक बोंचीत आहे, आणि प्रस्तुतच्या लढ्यांत हीच राजकीय चुरस विशेष प्रामुख्यानें वावरत आहे, यांत मुळीच शंका नाहीं. या शंकेवरहि कोणी अशी शंका घेतील कीं मराठी स्वराज्याचा नाश होऊं नये पण झाला. कोणी करूं नये पण चित्पावनांनी केला किंवा त्यांच्या राजकारणी वर्चस्वबुद्धीचें पाऊल वांकडें पडल्यामुळें झाला. पण या झाल्या गेल्या गोष्टीचा सूड सध्यांच्या लोकांवर उगविण्यांत काय अर्थ आहें? स्वराज्यनाश करणारें चित्पावन मेले गेले. त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल त्यांच्या वंशजांचा द्वेष करण्यांत काय माणुसकी राहिली? प्रश्न सहेतुक व सरळ दिसतात. पण चित्पावनी मनाची तेढ, त्यांच्या विशिष्ट संस्कृतीची आंतली गांठ, त्यांच्या प्रवृत्तीची वर्चस्वलालसेची कावेबाजी इतकी जबरदस्त आहे, कीं आज रोजच्या व्यवहारांत -सुद्धां तिचा ताप प्रत्येक चित्पावनतेर व्यक्तीला भोगावा लागतो. एकाद्या वीस खोल्यांच्या चाळींत चित्पावनाचें एकच का बिऱ्हाड असेना, तेथली एकी बिघडून कधिंना कधिं तेथें लाथाळीची धुसफुस सुरू व्हायचीच. सरकारी किंवा खासगी कचेऱ्यांत सुद्धां हाचप्रकार. क्लब, लायब्ऱ्या, जिमखाने येथे सुद्धां एकीची बेकी करायला एक चित्पावन व्यक्ति पुरेशी असते. सारांश, हा अनुभव सर्वांना अगदी बिनचूक येत असतो कीं, ज्या ज्या कामांत चित्पावन भट पडला, तेथें बेकींचे लाथाळें माजून त्या कामाचे तीनतेरा झाले नाहीं असें उदाहरण क्वचित. सार्वजनिक संस्थांतील सार्वजनिक स्वरूपाची अनुभवाचीं उदाहरणे कोणला पाहिजे असतील, तर आम्ही द्यायला तयार आहोंत. मग कोणाचीं

नांवे गांवें स्पष्ट उघडकीस आल्यावर नाकाला मिरच्या झोंबल्यास आम्ही जबाबदार नाही. तात्पर्य, रोजच्या सामाजीक व्यवहारापासून तो थेट राजकारणाच्या कांग्रेसी धडपडीपर्यंत ही चित्पावनी मनाची तेढ महाराष्ट्राच्या ऐक्यवर्धनांत वरचेवर संकटें उत्पन्न करीत असल्यामुळे, पूर्वजांच्या कृतपापांवर पडदा सोडूं म्हटले तरी सोडतां येत नाहीं. आमच्या स्पष्टोक्तीचा पुष्कळांना राग येईल; येवो बापडा ! आतां किती दिवस ही चिघळणारी खरूज दडवून ठेवणार? किती दिवस जोड्यांत रुतणारा हा खडा सहन करणार? किती दिवस या प्रत्यक्ष अनुभवाच्या गोष्टी ओठांच्या आंत दडविणार? लहानसहान गावकीच्या प्रकरणापासून तो थेट टिळकांच्या 'राष्ट्रीय' लोकसंग्रहापर्यंत जेथे पहावें तेथे हा चित्पावनी तेढीचा वरपगडा. पूर्वीच्या गोष्टी सोडल्या तरी हिंदुसमाजांत वेदोक्त पुराणोक्ताचें बंड करणारे चित्पावन. छत्रपतीच्या नांवानें कडकडा दांत खाणारे चित्पावन. छत्रपतीला स्वराज्यद्रोही ठरविणारे चित्पावन. मराठ्यांना शुद्र म्हणणारे हेच पेशवेसंप्रदायी. सारस्वतांना पाण्यांत पहाणारे हेच. कायस्थांना अकरमाशे व साम्राज्यद्रोही ठरविणारे हेच. भंडाऱ्यांना अस्पृश्य ठरविणारे हेच. अस्पृश्यांच्या वाढत्या आकांक्षाना दाबून टाकण्यासाठीं वेदान्ताचें टमरेल घेऊन धांवलेलें 'शौचकूपी तोंड'सुद्धां एका चित्पावनाचेंच. गोरगरीबांपासून रुपये चवल्या गोळा करून 'सार्वजनीक'पणाचे उत्सव करून स्वतःची श्रेष्ठता मिरविणारे हेच आणि गुप्तपोलीस खात्यांतहि यांचाच सुळसुळाट. अशा अनेक दृष्टीनीं इतर सर्व हिंदुसमाजाशी तुसडेपणानें वागणाऱ्या या समाजाच्या बुद्धिमान व समंजस पुढाऱ्यांनी वेळीच सावध होऊन या कुप्रसिद्ध तुसड्या वृत्तीची नांगी मोडण्याचा यत्न केला, तर प्रस्तुतचा वाद थोडा बहूत शमण्याचा बराच संभव आहे. नाही तर जसजसा मराठ्यांच्या इतिहासाचा फैलावा होत जाईल, तसतसा या ठळक गोष्टी महाराष्ट्र क्षत्रियांच्या मनांत विशेष वागतील, व त्यामुळें जर ते ब्राह्मणांचा द्वेष अधिक करूं लागले, तर निदान आम्ही तरी त्यांस दोष लाविणार नाहीं. ज्यांचें सर्वस्व आम्ही बुचाटून घेतलें किंवा ज्यांस सर्वस्वी बुडविलें किंवा बुडविण्यासाठीं यत्न केला, त्यांनी जर आमचा द्वेष करूं नये, तर करावा तरी कोणाचा? ही कै. राजाराम शास्त्री भागवतांची स्पष्टोक्ती पुढें मागें सक्रीय व्यक्त झाल्याच्या महापातकांचे ते जबाबदार ठरतील, असा कळकळीचा इषारा आम्ही त्यांना आतांच देऊन ठेवतों.

चित्पावनी मनाची तेढच अशी चमत्कारीक आहे कीं तिचे पाचपेच चित्पावनेतर बहुजनसमाजाच्या वेळींच नीटसे ध्यानांत न आल्यामुळें हिंदुराष्ट्राचा-विशेषतः महाराष्ट्राचा-अधःपात झाला. चित्पावनांनी जेव्हां अवचित पेशवाईचें दिवाळें फुंकलें आणि छत्रपतींच्या पूजनीय तक्तालाहि भडाग्नी दिला, तेव्हांच हे लोक कोणत्या वृत्तीचे आहेत, याची जो तो चौकशी व छाननी करूं लागला. अगदी पहिल्या प्रथम चित्पावनांचा चित्पावनी कावा धडाडीनें कोणी चव्हाट्यावर फोडला असेल, तर आधुनीक विवेकवाद्यांचे अग्रणी कै. रावबहादुर सरदार गोपाळराव हरी देशमुख (लोकहितवादी) यांनी. जातितः हे चित्पावन होते खरे, पण सत्य प्रगट करण्याच्या कामी यांच्या निस्पृहतेला अलीकडच्या काळांत तोड आढळणार नाही. अलीकडे उदारमतवादी व समधात प्रवृत्तीच्या चित्पावन बांधवांचा जो एक अल्पसंख्य परंतु वंदनीय वर्ग स्पष्टपणे निराळाच अस्तित्वात आलेला आहे, त्याचा पाया या पुजनीय लोकहितवादींच्याच 'गोपाळ संप्रदाया'ने घातलेला आहे. याच गोपाळ संप्रदायांत गोपाळ गणेश आगरकर व गोपाळ कृष्ण गोखले हे दोन विवेकवादी व खरे महाराष्ट्रीय ब्राह्मण तारे चमकून गेले. या ताऱ्यांनी आपल्या सर्वस्पर्शी तेजाने उपरीनिर्दिष्ट चित्पावन-प्रवृत्तींचा स्वार्थी कोतेपणा जाळून भस्म केला आणि स्वजातियांच्या बीभत्स

व प्राणघातक निंदेचीं पर्वा न करता त्या प्रवृतीचा राष्ट्रघातकीपणा बेधडक आपल्या वाणी करणीच्या उज्वल समन्वयानें सिद्ध केला. कै. लोकहितवादींचीं सत्यप्रियता म्हणजें केवळ जळती आग होती. आपपर भेदाची पर्वा न करणारी न्यायनिष्ठूर समशेर होती. त्यांची नेमणूक इनाम कमिशनवर झाली, तेव्हा त्यांनी सातारचें सर्व दप्तर चाळलें, आणि आपल्या स्वजातियांनी केलेल्या राष्ट्रघाताचा चिळस पुरावा पाहून ते इतके संतप्त झालें कीं आपल्या एका सुप्रसिद्ध पुस्तकांत त्यांनी स्पष्ट शेरा मारून ठेवला कीं ''ज्या कोणास या हिंदुस्थान देशाची उन्नति व्हावी अशी इच्छा असेल, त्यांनी या चित्पावनांस प्रथम देशाच्या बाहेर पार हुसकून लावलें पाहिजे.'' केवढी ही करडी निस्पृहता! किती तेजस्वी सत्याप्रियता ! लोकहितवादींच्या या शेऱ्याचा अर्थ लाक्षणिक घ्या, नाहींतर अक्षरशः घ्या, चालूं वादांत या अर्थाला सार्थ करण्या इतका त्वेष ब्राह्मणेतरांत, किंबहुना चित्पावनेतरांत भडकावण्याइतकी दुष्ट कृत्यें करण्याची चित्पावनांची खोड लवमात्र कमी झालेली नाही, याचा पुरावा म्हणजेच टिळकांचा राष्ट्रीय पक्ष होय, व याची जाणीव अल्पसंख्य उदारमतवादी, चित्पावन बांधव सुद्धा वेळोवेळीं व्यक्त करतात. लोकहितवादी नंतर कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर (सारस्वत ब्राह्मण) यांनी असे नमूद करून ठेवलें आहें कीं, ''हें चित्पावन लोक मनाचें सरळ नसतात. अल्प स्वल्प स्वार्थासाठी राज्याची राज्यें धुळीस मिळविण्याला मागें पुढें न पाहणारे लोक या जातीमध्यें आजपर्यंत पुष्कळ उत्पन्न झाले, आणि त्यांनी आपले पराक्रम हि त्यारीतीने दाखविले.''चित्पावनी काव्याची ही खोच खुद्द चित्पावनांतीलच अनेक समंजस व विवेकी गृहस्थांनासुद्धा अलीकडे पटत चालली आहे व ते आपल्या जातीच्या या दुष्ट अनुवंशिक संस्कारापासून स्वतःस अलिप्त ठेवण्याचा यत्न करीत असतात, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय; आणि प्रस्तुत वादापासून महाराष्ट्राचा बचाव करण्याच्या कामीं पुढेंमागें पाच उदार मनोवृत्तीच्या सज्जनांचा बराच उपयोग होईल, असे आम्हांला वाटते. चित्पावन-प्रवृत्तीबद्दल निषेधाचे कोणी कांही उद्गार काढले कीं या विवेकी बांधवांना, आपलाहि निष्कारण त्यांत समावेश होत असल्याचा भास होऊन, मरणप्राय दुःख होतें, याची जाणीव आमच्याप्रमाणे प्रत्येक निषेधकाला नाहीं असें मुळींच नाहीं. परंतु सर्वसामान्यतः होणाऱ्या निषेधांत अगर टीकेंत आपला समावेश होतोच, अशी त्यांनी मुळी आपली भावनांच कां करून घ्यावी ? कै. लोकहितवादी सारख्या उदार भावनेच्या महात्म्याला कोणता ब्राह्मणेतर पूज्य मानणार नाही ? आगरकरा सारख्या सुधारकाग्रणीला कोण ब्राह्मणेतर देवाप्रमाणे भजणार नाही ? कै. गोखल्यांच्या सर्वस्पर्शी विवेकी व अस्सल कळकळीच्या राष्ट्रकार्याचे कौतुक कोण करणार नाही ? जो ब्राह्मणेतर पक्ष आज विचार-स्वातंत्र्यासाठी कलम सरसाऊन पुढे सरसावला आहे; जो सत्यशोधक पंथ मानसिक गुलामगिरीच्या बंडाचा चेंदामेंदा करण्यासाठी भिक्षुकशाहीच्या नरड्यावर टांच देऊन उभा आहे, त्यांनी स्वजातीयांचें व स्वपक्षियांचें दोष स्पष्ट निर्भिडतेनें बोलून दाखविणारा लोकहितवादीचा नमुना, अझून महाराष्ट्रीयांना दाखविलेला नाही. अर्थात् जे कांही चित्पावनी मनोवृत्तीचा संन्यास केलेलें तुरळक विवेकी सज्जन ठिकठिकाणीं आहेत, त्यांच्याविषयी आदर किंवा त्यांच्या मतस्वातंत्र्यामुळें चित्पावन समाजानें त्यांच्यावर सुरू ठेविलेला बहिष्कार, आमच्या जाणिवेला स्पर्शच करीतनाही, अशी त्यांची समजूत असेल तर ती अत्यंत गैरसमजूत आहे, असें त्यांना एकदांच आम्हीं प्रेमभावानें सूचवून ठेवतों.

'चित्पावन' हा शब्द एका विशिष्ट समाजाचे जरी नांव आहे, तरी त्याचे पर्यवसान आज एका

विशेष प्रकारच्या संस्कृतींत झालें आहे. हा शब्द एका विशेष घडणीच्या संस्कृतीचा द्योतक बनला आहे. मारवाडी ही एक जात आहे, पण जेव्हां आपण अमका तमका 'मारवाडी' आहे असे म्हणतों, तेव्हां त्या ठिकाणी जातिनिर्देश न करता आपला कटाक्ष संस्कृति-निर्देशावरच असतो. हाच प्रकार येथें. अर्थात् चित्पावन वृत्तीचे लोक खुद्द चित्पावन जातींत शेंकडा ९८ सांपडले तर इतर जातींतहि निदान हजारांत १०-१२ खास सांपडतील. उठल्या सुटल्या अत्युत्कट राजनिष्ठेची घमेंड मारणाऱ्या कायस्थ प्रभू समाजांतल्या निदान दोन तीन कायस्थांनी सातारा प्रकरणांत छत्रपतीची व रंगो बापुजीची मान कापण्याच्या कामीं चित्पावन नातूच्या हाताला हात लावल्याचा सप्रमाण पुरावा आम्हीच पुढें आणणार आहों. कायस्थ किंवा मराठे अगदी धुतल्या तांदळाचे आणि इतर सर्व समाज फोडणीच्या खिचडीचे अशी आमची समजूत नाही. चित्पावन प्रवृत्ति जरा दांडगी व विशेष सकस. शुद्ध ईष्ट इंडिया बनिया कंपनीची सख्खी थोरली बहीण, यांत संशय नाही. इंग्रजलोक आणि चित्पावन लोक यांना श्री. केळकरांनी समगोत्री ठरविल्याचें केसरीच्या वाचकांना आठवत असेल. टिळकांचा मृत्युलेख पहा, (ता. ३ आगस्ट १९२०) त्याच अंकांत श्री. केळकर आपल्या स्वज्ञातीच्या प्रवृत्तीची-बाचकत बाचकतच का होईना-चिकीत्सा करतांना म्हणतात ''ते (चित्पावन) स्वावलंबी, मेहनती, कोठेंहि पुढें घुसणारे, दीर्घ सूचना मनांत असणारे, पण कांही अंशी आपल्या पुरतें पाहणारे; बुद्धिमान पण संकुचित दिलाचे लोक आहेत.'' ही व्याख्या पुष्कळच कांटेकोर आहे. असल्या संस्कृतीने महाराष्ट्रीय समाजांना एकजात चीत करावे आणि आतां बैल पसार झाल्यावर झोपा बांधण्यासाठी चित्पावनेतरांनी आरडाओरडा करावा, यातलें मुख्य तत्व काय, याचा विचार आणखी पंधरा दिवसांनी वाचकांच्या सेवेला रुजू होईल. तोपर्यंत स्पष्टोक्तीबद्दल क्षमस्व!

□□□

अग्रलेख

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची चिकित्सा

(लेखांक ४ था)

सत्ता ही एक विलक्षण स्थिति आहे. ती जितकी चित्ताकर्षक आहे, तितकीच जीविताकर्षकहि आहे. तिच्या अमृतसम गोडींतच हलाहल विषाची नांगी लपून बसलेली असते. सत्तेशिवाय शहाणपणाची शालजोडी आंगावर पांघरली जात नाहीं हें जितकें खरें आहे, तितकेंच सत्तेशिवाय आंगच्या दुर्गुणांचा तवंग उमलून बाहेर काढणारें दुसरें रेचक नाही, हेहि खरें आहे. हातांत सत्ता येतांच इतरांना लत्ता मारण्याची ताकद येते खरी, पण अखेर स्वतः सत्ताधीशांनाच इतरांच्या लत्ता खाऊन असेल नसेल ती बुद्धिमत्ता व मालमत्ता गमाऊन गुलामांचे गुलाम बनावें लागतें. सत्ता शराबा सारखी आहे. नव्हे, ती एक स्वादीष्ट उत्तेजक पण उन्मादकारक अशी शराबच आहे, आणि ती पचनी पाडण्यासाठीं कोठ्याचें आरोग्यहि तसेंच दणकट व खंबीर असावें लागतें. याचें कारण ही सत्ता-शराब अशी चमत्कारिक मादक आहे कीं वेळी दारूचा नाद सुटून सारी माणसे मद्यपान निषेधक बनतील, पण सत्तेच्या लालसेचा मानवी प्रवृत्तीला बसलेला चिकटा इतका जबरदस्त आहे कीं तो जगाच्या अंतापर्यंत निघणें शक्य नाहीं. केवळ तत्त्वज्ञानात मग्न राहणाऱ्या स्थितप्रज्ञांना सत्तेच्या शराबाची तलफ ही चीज काय आहे, याची जरी कांही कल्पना नसली, तरी जो जो ह्मणून मनुष्य आहे-मग तो कसल्याहि स्थितींत असो, त्याच्या कर्तबगारीचें क्षेत्र कितीहि संकुचित असो-तो तो या शराबाच्या एका घोटासाठीं वाटेल त्याच्या नरडीचा घोट घ्यावयाला कमी करणार नाही. जगांतल्या सर्व धडपडी सत्तेसाठी चालल्या आहेत. नवनवे शोध लावून सृष्टीच्या सर्व शक्ती हाताच्या चिमटींत पकडण्याच्या खटपटी सत्तेसाठी चालल्या आहेत. व्यापारांतली चढाओढ सत्तेसाठींच चालली आहे. शिक्षणप्रसाराचा आटारेटा सत्तेसाठींच सुरू असतो. महायुद्धांची रणशिंगें सत्तेची लालसाच फुंकीत असते, आणि समरांगणावर पडलेल्या प्रेतांच्या खचांत आणि रक्तमांसाच्या चिखलांत सत्तेची वर्चस्व-लालसाच कोल्ही कुत्रीं गिधाडांच्या बरोबरीनें सर्वत्र भडकत असतें. मनुष्याला आपला जीव कितीहि प्यारा असला, तरी सत्तेसाठी झगडतांना तो त्या जीवाचीहि पर्वा ठेवीत नाहीं. अब्रूसाठी जीव देणारें लोक असतील, पण सत्तेचा टीचभर तुकडा पदरांत पडत असेल तर अब्रूचीहि पर्वा न करणारें पर्वरदिगार पुष्कळ सांपडतील. दिडकी दिडकीसाठीं जीवाचे रान करणारे लोक, नोकरीत एक इंच बढती मिळत असल, तर पन्नास फूट लांबीत बसतील इतक्या

रुपयांचा होम करायला मागें पुढें पहात नाहीत. मनुष्याला आपली बायका पोरें, आईबाप, भाऊ बहिणी या फार प्रिय असतात, असा सर्वसामान्य नियम आहे; पण सत्तेच्या प्राप्तीसाठी त्यांचे बेधडक खून करणारे लोक जगांत झाले की नाही? रगड झाले व रगड होतील. सारांश, प्राणीमात्राच्या सर्व धडपडींचा इतिहास ही सत्ताप्रियताच रंगवीत आली आहे. सत्तेच्या शराबाच्या गोडीपुढें मोक्षप्राप्तीच्या गोडीलाहि माणसांनी लाथ हाणलेली आहे; मग बिचाऱ्या परमेश्वराची क्षेमकुशलता कोण पुसणार ? इष्काची निशा किंवा शराबाची निशा केव्हां तरी उतरतें आणि दुसरा घोट घेण्यापूर्वी थोडा वेळ तरी माणूस माणुसकींत येतो. पण सत्तेच्या शरांबाचा एकच बिंदु जिभेवर पडतांच, त्याच्या निशेची तार इतकी वाढते, त्याच्या घशाला इतकी कोरड पडते कीं साऱ्या विश्वाचा स्वाहा केला तरी त्याची सत्तेची तहान भागत नाहीं. जॉर्ज वॉशिंग्टन पाणी पाणी करून मेला, पण शिकंदर बादशहा पृथ्वीवर आता जिंकायलाच कांहीं उरले नाही' म्हणून ढसढसा रडत मेला !!

सत्तेसाठी माणसाची एवढी धडपड सुरू असते, म्हणून सत्ताप्राप्ति ही ईश्वरप्राप्ति इतकी कांहीं कठीण नाही. या नाठाळ जगांत सत्तेची प्राप्ति अत्यंत सुलभ आहे. दारू पिणें जितकें सोपें आहें, तितकें ती पचविणें फार कठीण आहे. सत्ता मिळविणें जितके सोपें आहे, तितकेंच ती टिकवणें फार कठीण आहे. सत्तेच्या स्वयंवरांत सरळमार्गी पापभीरूंची डाळ कधींच शिजत नाहीं. ही नवरी उलट्या काळजाच्या उमेदवारांवर बेहोष फिदा असतें. परंतु तिनें एखाद्याला माळ घातली म्हणजे ती त्या प्यार पुरुषाला कायमची काबूंत ठेवता येईलच, असा मात्र भरंवसां नाही. राजाला विष्णूचा अवतार मानण्याची कल्पना, वंशपरंपरेनें राजसत्ता पुढे चालविण्याची वहिवाट, औरस नसला तर दत्तक घेण्याचा परिपाठ इत्यादि प्रकार सत्तेचा कैफ येनकेन प्रकारेंण कसातरीं कायम टिकविण्याचें कृत्रिम प्रकार होत. पण हें टिकाऊ नसतात, हें इतिहासावरून आपणांस खासें शिकतां येतें. सत्ताप्राप्तीसाठी तिच्या नथणींत अडकविण्याच्या गळाला शुद्ध लोकहिताचेंच आमिष लावलेले असतें. पार्लमेंटांत, कॉंग्रेसमध्यें, कौन्सिलांत किंवा मुन्सिपाल्टींत घुसणाऱ्या उमेदवारांची जिव्हा निवडणुकीच्या वेळी साखरेलाही गोडीत जिंकतें. पण पुढे काय दिवे लागतात ते दिसतातच. गेल्या महायुद्धाच्या वेळी सुद्धा जर्मनांनी काय किंवा इंग्रजांनी काय, दोघांनीही याच आमिषाचा उपयोग झुकत्या दुनियेला झुकविली. रामराज्य येणार, आकाशातल्या बापाच्या लेकाचें सत्ययुग सुरूं होणार, गुलाम राष्ट्रे स्वतंत्र होणार, काय वाटेल तें होणार, असल्या जाहिराती फडकवून, युद्धाचार्य विल्सन दीक्षितांनी बुद्धिसागराचें मंथन करून१४ रत्ने बाहेर काढली. पण अखेर काय झाले ! जर्मनीची क्षात्रवृत्ती व अमेरिकनांची मध्यस्थी यांना इंग्रजांच्या धोरणी डांवपेचांच्या प्रवृत्तीने उलटी टांग मारून बोलबोलतां चीत केलें आणि युद्धदिक्षीत विल्सन भटजी चवदाव्या रत्नाची खिरापत खात चतुर्थाश्रमांत प्रविष्ट झाले. हातची सत्ता टिकवावी कंशी याची गुरुकिल्ली आजकाल फक्त इंग्रेजांपाशीच आहे.

सत्तेचा परिणाम सत्ताधीनांवर बरा होवो कीं वाईट होवो, सत्ता मिळविणें आणि ती बराच काळ टिकविणें, याला बुद्धीचे बळ तसेंच असामान्य पाहिजें, यांत शंका नाही. शस्त्रांचें बळ कितीहि प्रचंड असो, अस्त्रांची शक्ती केवढीहि जाज्वल्य असो, कुशाग्र बुद्धिबळाच्या जोरावर त्या दोनहि शक्तींना बसल्या बैठकीवरून कसें चीत करतां येतें, हें गेल्या महायुद्धांत इंग्रेजांनी सर्व जगाच्या निदर्शनास आणलें आहे. ऐदी तत्वविवेचक आणि सत्तेच्या घरटांत दळलें जाणारें बुद्धिहीन गुलाम, या बुद्धिबळाचें

पृथक्करण करून, 'ते स्वार्थानें सडलेलें आहे, त्यांत माणुसकीचा नीचपणा ओतप्रोत भरला आहे,' वगैरे गुलामी रडगाणी खुशाल रडोत; ज्यांना सत्ता टिकवायची असते, ते आपल्या बुद्धिबळाची तेजस्विता बरी किंवा वाईट, सुष्ट किंवा दुष्ट, परोपकारी किंवा जुलमी, वाटेल त्या रंगाची ठेवल्याशिवाय मुळींच राहणार नाहीत. मुळी सत्तेचीच उत्पत्ति जेथें स्वार्थाच्या पोटीं, तेथें सत्ताधीनांच्या पाठीवर उडणारें कोरडे जुलमाच्या ताठ वाखाचे आहेत किंवा लपंडावीच्या राठ सालीचे आहेत, या प्रश्नांची किंमत काय? ज्याच्या हातीं शिकार तो पारधी, हा सनातन सिद्धांतच आहे. मुत्सद्देगिरीच्या बॅन्नेटाच्या टोकाने ३३ कोटी लोकवस्तीच्या 'हिंदुस्थानाला वचकांत ठेवणाऱ्या विदेशी इंग्रजी सत्तेला नांवे ठेवणाऱ्यांच्या स्वदेशी सत्ताबाज पूर्वजांनी तरी हाच सिद्धांत पाळला होता ना? आज इंग्रजांनी बुद्धिबळाच्या डावांत साऱ्या जगावर मात केली आहे. हा बुद्धीच्या वर्चस्वाचा प्रश्न आहे आणि कधीहि कोहि सूर्य न मावळण्याइतका जगाचा भाग त्यांनीं जर आपल्या बुटाच्या टाचेखाली दडपून धरला असेल, तर त्यांच्या बुद्धिबळाचा आक्रम करण्याची कसोशी करायची कीं नुसत्या शिवीगाळीवर आपल्या कमजोर बुद्धीचे समर्थन करावयाचें?

दोढियोनो घी अने घीनो दोढियो करणारें मूठभर इंग्रज व्यापारी येथे येतात काय आणि क्षात्रतेजाची मुत्सद्दीपणाची व तत्वज्ञानाची इमेजास मारणाऱ्या सर्व नरेंद्रांना आणि ब्रह्मेंद्रांना पाटलुणीच्या खिशांत घालून हिंदुस्थानचे मालक बनतात काय! मोठी विचार करण्यासारखी गोष्ट आहे. इतर हजारों जातींप्रमाणे चित्पावनांची एक अप्रसिद्ध जात ती काय आणि अवघ्या पन्नास वर्षांच्या अवधींत कोकणांतून घांटावर येऊन अखिल चित्पावनेतरांपेक्षां शिरजोर होऊन बसते काय ! मोठी विचार करण्यासारखी गोष्ट आहे. अशी कोणती शक्ति यांच्यापाशी होती व आहे कीं जिच्या सहाय्याने ते बळजोर झाले? याला चटकन् असे उत्तर मिळेल कीं -सत्ता. सत्ता ? उत्तर चूक आहे. सत्ता हे साधन आहे, शक्ति नव्हे. बरें, चित्पावनांच्या भाग्योदयापूर्वी चित्पावनेतरांच्या- त्यांतील काही प्रमूख समाजांच्या- हाती सत्ता होती कीं नाही? होती. मग ती गेली कां? ती कोणी हिरावून नेली, या प्रश्नापेक्षा ती त्या प्रमूख समाजांनी कां गमावली? हाच प्रश्न महत्त्वाचा आहे. सत्तेची पायमल्ली करणारें लोक कुटील नीतीचे गड्डे असतील, पण त्या कुटील नीतीला बळी पडण्याइतके त्यांचे प्रतिस्पर्धी नामर्द व बुद्धिहीन कां बनले ? परमेश्वराने या 'हिंदुस्थानच्या साम्राज्याचा ताम्रपट इंग्रजी ताम्रांना अक्षयीचा लिहून दिला नाही' हें खरें असेल, पण इंग्रजांच्या आगमनापूर्वी त्याने एतद्देशीय बहुतेक सर्व प्रमूख समाजांना येथल्या साम्राज्यशकटाचें स्वामित्व देऊन त्यांच्या राजकीय कर्तबगारीची परीक्षा पाहिलेली आहे. मुसलमानांना बादशाहीची संधि दिली, त्यांना सत्ता टिकवतां आली नाहीं. रजपुतांना वाव दिला, त्यांनीं आपण होऊन डाव हुकवला. क्षत्रिय मराठ्यांवर भाग्योदयाची किरणें फेंकली, त्यांना तीं टिकवितां आलीं नाहींत. सारस्वत देशस्थ कायस्थांना राजकारणी बुद्धिबळाच्या पटावर बसवून पद्धतशीर डांव मांडून दिला, त्यांनाहि तो नीटखेळतां आला नाही. शिंदे होळकरांसारखी अप्रसिद्ध घराणीं प्रसिद्धीला आणून त्यांनाहि या साम्राज्याची शर्यत जिंकण्याची संधि दिली, त्यांनीं ती गमावली. चित्पावनांना अत्यंत हुशार समजून त्यांचा सामाजीक, धार्मिक व राजकीय उद्धार केला, त्यांनी सुद्धा अखेर इंग्रेजांपुढे लेंड्या गाळल्या. सारांश, मुसलमानांचा कडवा वाणा, क्षत्रिय मराठ्यांचा तेखदार लढवय्येपणा, देशस्थ ब्राह्मणांची धार्मिक धोरणी दृष्टी, सारस्वतांची मुत्सद्देगिरी, कायस्थ प्रभूंचा असिजीवी मसिजीवी पराक्रम आणि

चित्पावनांची महशूर चाणाक्य नीति, या सर्वांच्या एकीकरणावरहि इंग्रजी बनिया कंपनीच्या मूठभर लोकांनी येथे येऊन नुसत्या तहनाम्यांच्या कागदी घोड्यांच्या टापांची मात करावी, यांत कोणाचें बुद्धिबळ श्रेष्ठ ठरतें बरें? अर्थात् इंग्रजांचे, आणि त्यांच्या खालोखाल चित्पावनांचे. त्यांची बुद्धी बरी कीं वाईट हा मुद्दा गौण आहे; त्यांचें बुद्धीचे बळ विशेष असामान्य आहे, हें विसरून चालणार नाही. हजारों कोशांवरच्या टीचभर बेटांतल्या चिमूटभर इंग्रेजांनी अफाट हिंदुस्थानावर करड्या वचकाची साम्राज्य सत्ता गाजवावी आणि एकट्या चित्पावनांच्या वरचढपणा विरुद्ध अखिल चित्पावनेतर हिंदु समाजांची तक्रार असावी, या दोन गोष्टींत हेंच तत्व आहे कीं वरचढ मंडळीची बुद्धिमत्ता बरीचं वरचढ आहे, आणि तक्रार करणाऱ्यांना तिच्याशी तोंड देता येत नाही. अर्थात् इंग्रेजांच्या घशांतून स्वराज्य काढावयाचें असेल तर ज्या बुद्धिबळाच्या जोरावर त्यांनी आपली सत्ता येथे टिकवून धरली आहे, त्या बुद्धीला पादाक्रांत करण्या इतकी सवाई दिढो इंग्रेजशाही हिंदवासियांनी कमावली पाहिजे. आणि ज्या डावपेचांच्या बुद्धिबळानें चित्पावन चित्पावनेतरांवर हरएक क्षेत्रांत मात करीत आहेत, त्या बुद्धिबळाचें सामर्थ्य चित्पावनेतरांनी दिढी दुपटी कमाऊन त्यांना चीत केलें पाहिजे, हा अगदी सरळ उलगडा आहे.

वरचढ बुद्धिमत्ता आणि हातांत राजकीय सत्ता, या दोन गोष्टींचा संयोग झाला, कीं इतरेजनांना पादाक्रांत करून सत्ता टिकविण्यासाठी वाटेल त्या भल्याबुऱ्या उपायांचा अवलंब करणे, हा मनुष्याचा स्वभावधर्मच आहे. त्याबद्दल कोणी कोणास हसण्याचें किंवा द्वेष करण्याचें कारण नाहीं. हा शर्यतीचा प्रश्न आहे आणि बुद्धिबळाच्या टग् ऑफ वॉरमध्यें विजयी होणारें खेळाडू पराजीत प्रतिस्पर्ध्यांना वाटेल तसें दडपूं लागले तर तेथें 'आत्मवत् सर्व भूतेषु ' असल्या तत्त्वज्ञानाची वकीली राजकारणाच्या किंवा समाजकारणाच्या क्षेत्रांत कोणीहि विचारांत घेत नसतो. मनगटांत जोर असेल, बुद्धीचें तेज जाज्वल्य असेल, कर्तबगारीची धमक जिवंत असेल, डावपेंच लढविण्याची प्रवृत्ति लवचीक असेल, त्याने जगज्जेतृत्वाची महत्वाकांक्षा खुशाल यशस्वी करून दाखवावी. या जगांत मर्दाच्या मर्दुमकीला मरणाचीहि आडकाठी नसतें. अर्थात् जबरदस्त जेत्यांच्या बुद्धिवर्चस्वानें हतवीर्य बनून गुलाम झालेल्यांना, आत्मविश्वासाची कसोशी करून आपापल्या बुद्धीची शक्ति प्रतिस्पर्ध्याच्या बुद्धीला चीत करण्या इतकी प्रखरतम बनविल्याशिवाय मोक्षाचा दुसरा मार्ग लाभणें शक्य नाहीं. अमेरिकेंतल्या गुलाम नियोंच्या उन्नतीचा प्रश्न महात्मा बुकर टी. वाशिंग्टन याने आपल्या समाजाच्या आत्मविकसनानें झटपट कसा सोडवून दाखविला, याचा विचार ब्राह्मणेतर संघाचे पुढारी जर करतील, तर प्रस्तुतच्या वादाकडे सारें जग मोठ्या कुतूहलाने पाहूं लागेल. सत्तेच्या साधनाने शिरजोर झालेल्या प्रतिस्पर्ध्याचा निवळ द्वेष करण्यापेक्षा त्याच्या शिरजोरपणाच्या शक्तींचें पृथःकरण करून त्यांतली उत्कृष्ट उत्कृष्ट तत्त्वें आत्मविकसनार्थ पचनी पाडण्याचा उपक्रम केला, तर कालवशात् गुलामांनाहि स्वातंत्र्याची प्राप्ति होणें अशक्य नाही.

चित्पावन-प्रवृत्तीत कांही दोष असले तर बरेचसे गुणहि आहेत. केवळ एक जात कुटील तत्वांवर एखादा समाज किंवा राष्ट्र आपल्या वर्चस्वाचा वरचढपणा बराच काल टिकवून धरूं शकत नाही. ज्या उत्तम गुणांच्या जोरावर, कुटिल नीतीचें वीष पचनीं पाडून, चित्पावन समाज इतर सर्व हिन्दु समाजापेक्षा आज प्रत्येक क्षेत्रांत आपलें वर्चस्व टिकवून राहिला आहे, ते सद्गुण पचनीं पाडण्याची चित्पावनेतरांनी शिकस्त करणें आवश्यक आहे. 'जातीला जात ओढते' ही म्हण चित्पावनांशिवाय अक्षरशः सार्थ

झालेली इतरत्र आढळत नाही. विशिष्ट कार्यासाठी वैयक्तिक मतभेदांचा संन्यास करून तात्काळ एकवटण्याची शिस्त चित्पावनांपासून इतर समाजांना अजून शिकवयाची आहे. त्यांची लोकसंग्रही दृष्टी वाखाणण्यासारखी असतें. त्यांची माणसांची निवड कसोशीने केली जाते. लाभेल ती सत्ता टिकवून धरण्याची कर्तबगारीची धमक त्यांच्या प्रत्येक व्यक्तीच्या रोमारोमांत भिनलेली असते. यामुळें एखाद्या दर्जावर एखादा चित्पावन जाऊन बसला कीं त्याला तेथून हालविणे कठीण जाते. अधिकाराच्या बळावर स्वजातीची माणसे एखाद्या खात्यांत किंवा संस्थानांत भराभर आणून चिकटविण्याची कसरत सगळ्याच जाती करतात. परंतु योग्य ठिकाणी योग्य माणूस निवडण्याची चित्पावनी दूरदृष्टि सगळ्यांनाच साधत नसल्यामुळे काही वर्षी पूर्वी इंदोर संस्थानांत गुप्तेशाहीचा जो कायस्थी बोजवारा उडाला, तसले प्रसंग वरचेंवर येतात. बौद्धिक क्षेत्रांत पाहिले, तरी हाच प्रकार. आदिमाया युनिव्हर्सिटी आपल्या शिक्षणाचे दूध चित्पावनांना घट्ट, मराठ्यांना आंबट, कायस्थांना पुळपुळीत, जैनलिंगायतांना मळमळीत, अशा भेदभावानें थोडेंच देत असते ? युनिव्हर्सिटीचें शिक्षण म्हणजे मंगलोरी कौलांचा ठरावीक सांचा. त्यांत अमक्याला कमी दाब, तमक्याला जास्त दाब, असें मुळींच नाहीं. परंतु ग्राज्युएटगिरीच्या एकाच भट्टींतून बाहेर पडलेल्या भिन्न भिन्न समाजांतील लोकांची बौद्धिक संस्कृति पहा आणि चित्पावनांतील पदवीधरांच्या कर्तबगारीची सर्वस्पर्शी भरारी पहा ! असा हा ठळक भेद का पडतो, ही विचारांत घेण्यासारखी गोष्ट आहे. वर्तमानपत्रांचे क्षेत्रच घ्या. लोकशिक्षणाच्या या क्षेत्रांत चित्पावन कलमबहाद्दरांनीं आजपर्यंत जी विद्वत्तापूर्ण कर्तबगारी गाजविलेली आहे, त्याच्या शतांशानेंहि लेखणीचा ट्रेडमार्क उराशीं बाळगणाऱ्या कायस्थांच्या हातून झालेली नाहीं. विचारक्रांतीसाठी मुद्रणसाहित्याची जुळवाजुळव करून अनेक ब्राह्मणेतर उत्साही मंडळीनीं वर्तमानपत्रें सुरू केली आहेत; परंतु चित्पावनांप्रमाणें लोकसंग्रही संघटीतपणाची त्यांच्यांत जाणीवच नसल्यामुळें स्वाध्यायशील कसलेल्या एकसूत्री लेखकांच्या अभावी त्या पत्रांच्या ध्येयांची कुतरओढ चाललेली असते. लोकजागृतीसाठी वर्तमानपत्र काढण्यापूर्वी कांही विवक्षित स्वाध्यायाची कमावणी करावी लागते, ही कल्पनाच कोणाच्या कल्पनेला शिवलेली दिसत नाही. श्री. केळकरांच्या व्याख्येप्रमाणें 'चित्पावन कोठेंहि पुढें घुसणारें आहेत.' खरी गोष्ट. बऱ्या वाईट, राष्ट्रीय अराष्ट्रीय, सुधारक दुर्धारक सर्वच बाबतीत ते पुढे घुसणारें आहेत. पण 'पुढे घुसणें' हा कांही दोष नव्हे ! वाटेल तेथें पुढें घुसण्याची धमक आंगी नसेल तर तो समाज व्यक्ति किंवा राष्ट्र मेलेलेंच मानलें पाहिजें. चित्पावन 'पुढे घुसणार' असले तरी त्यांनी इतरांना 'पुढें घुसूं नका' असें कधिं म्हटलें आहे ? एवढे मात्र खरें कीं दुसरा प्रतिस्पर्धी पुढें येत असेल, तर त्याला ऐन वेळीं ते कोपरखळी देतील; पण कोपरखळीला ठोशेंपोळीचा प्रसाद देऊन आपण पुढें कां घुसूं नये? कोणतेंहि क्षेत्र घ्या, आज तेथे चित्पावन पुढें घुसलेले व चित्पावनेतर एकीकडे धुसफसत बसलेले ! हा प्रकार आता बंद झाला पाहिजे. ब्राह्मणेतरांपैकीं आमच्या पूर्ण परिचयाच्या कायस्थ व मराठे समाजांत पुष्कळ विद्वान पदवीधर आतां आढळतात. पण त्यांच्यांत चित्पावनांची पुढें घुसण्याची धडाडी मुळीच नाही. कशाचीच धडाडी नाही. परदेशगमनाचें एकच उदाहरण घ्या. नुकतेच आमचे मित्र श्रीयुत ओक (चित्पावन) व दुसरें एक कायस्थ तरूण श्री. अधिकारी शिक्षणासाठी अनुक्रमें अमेरिकेत व जर्मनीत गेले. पण निवळ प्रवासा पुरतीच रकम जमा होतांच, पुढचा मागचा काही एक विचार न करता, स्वतःच्या कर्तबगारीवर विश्वसून निघून जाण्याची ओकांची धडाडी पहा आणि शिक्षणफंडाची यथास्थित व्यवस्था लागल्यावर पोक्तपणे

बोटीत पाय ठेवणारें कायस्थ विद्यार्थी पहा ! समाजोन्नतीच्या क्षेत्रांतहि चित्पावनांचा संघटीत शिस्तीचा बाणा कसा 'पुढें घुसणारा' असतो, हें मुंबईच्या 'ब्राह्मणसभेची' कामगिरीच दाखविते. ब्राह्मणेतरांच्या समाजोन्नति परिषदांचे ठराव मंडपांतल्या मंडपांत गडप होतात, आणि 'पुढारलेल्या' कायस्थांच्या परिषदेचे ठराव लाथेखाली तुडविण्याचा पुढाकार त्यांचे पुढारीच-खुद्द परिषदेचे अध्यक्षच-घेतात. सारांश चित्पावन समाज आज ज्या अनेक जिवंत तत्वांवर आपलें वर्चस्व इतरांवर टिकवून राहिला आहे, त्या तत्वांचा परिपाक त्यांच्या प्रतिस्पर्ध्यात पूर्ण झाल्याशिवाय बुद्धिबळाच्या हिसकाहिसकींत त्यांचा पाडाव करतां येणें शक्य नाही.

चित्पावन प्रवृत्तींतील कित्येक विशिष्ट कुटील गोष्टींचा दुष्परिणाम महाराष्ट्रीय हिंदु समाजावर झालेला आहे, ही गोष्ट सत्य आहे. या बाबतीत चित्पावनांनी आपल्या वर्तनांत योग्य ती सुधारणा करण्याचा इषारा पूर्वीं आम्हीं दिलाच आहे. परंतु प्रस्तुत वादाचा अखिल हिंदुसमाजाच्या सर्वांगीण उन्नतीच्या व्यापक दृष्टीनें विचार केला, तर हिंदूंच्या प्रत्यक्ष अस्तित्वावरच उठलेल्या अनेक प्रतिस्पर्ध्यांच्या हल्ल्यापासून त्यांचें संरक्षण होण्यासाठी त्या कुटील तत्वांचाहि योग्य प्रमाणांत हिंदु संस्कृतीत मिलाफ होणें अत्यावश्यक आहे. मराठे क्षत्रियांची तडफदार एकमार्गी मुसंडी, देशस्थ सारस्वतांची बुद्धिमान सात्विक वृत्ति, किंवा कायस्थांची दिवाणी लष्करी इमानदारी यांची हिंदुसमाजाच्या व महाराष्ट्राच्या पुनरुज्जीवनार्थ जेवढी जरूर आहे, तेवढीच चित्पावनांच्या उत्तम गुणांबरोबरच त्यांच्या कुटील प्रवृत्तीचीहि आहे. फक्त आजपर्यंत या कुटील नीतीनें त्यांनीं स्वधर्मी स्वकीयांचा घात करण्याचें जे धोरण ठेवले आहे, ते बदललें म्हणजे झालें. हिंदुसमाजाच्या पंचपक्वान्नाच्या ताटांत निरनिराळ्या पक्वानांच्या वाढणीचें प्रमाण आज अजिबात बिघडलें आहे, तें यथाप्रमाण मांडलें पाहिजे. जेथें केशरी भाताची मूद असायची तेथें चित्पावनी चटणीची मूद पडून, केशरी भाताची चिमूट कोंपऱ्यांत पडली आहे. हें चटणीचें प्रमाण चिमटीवर आणण्याची चित्पावनांनी अतःपर शिकस्त केली नाहीं, तर मात्र त्यांना फार जड जाईल.

आपापल्या जातीच्या उन्नतीसाठी प्रत्येक जातीने खुशाल संघटीत चळवळी कराव्या. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर सर्व जातीनी दोन विभागांत एकवटून खुशाल आपापल्या विशिष्ट संस्कृतीच्या आत्माविकसनाच्या भगिरथ खटपटी कराव्या. परंतु या खटपटींच्या धोरणाची दृष्टी हिंदु समाजाच्या व हिंदुराष्ट्राच्या एकमुखी व एकजिनशी पुनरुज्जीवनाकडे रोंखली जाईल, परस्परांच्या भिन्नभिन्न प्रवृत्तींचा योग्य प्रमाणांत विनिमय केला जाईल, तर पुण्यस्मरण शिवरायाच्या महाराष्ट्राच्या तंबोऱ्याच्या विविध तारा आज ज्या भेसुर तान झाल्या आहेत, त्या एकतान होतील आणि ब्राह्मण व ब्राह्मणेतर या भेदाच्या निर्मलनांतून महाराष्ट्राच्या भाग्योदयाची किरणे फांकतील. असा सोन्याचा दिवस शिवरायाच्या पुण्यचरणाच्या प्रसादाने लवकरच उगवो, अशी इच्छा व्यक्त करून, ही स्पष्टोक्तीची लेखमाला येथें समाप्त करतो.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

संधिप्रकाश

लेखक : दत्तात्रेय चिंतामण निजसुरे बी. ए. किं. ५ आणे. नांवावरून ही एखादी कादंबरी असावी, असें वाटण्याचा संभव आहे. पुस्तक उघडतांच मात्र कादंबरी-वाचकांची पूर्ण निराशा होईल. कारण संधिप्रकाश ही एखादी प्रणयकथा नाही, किंवा - उषःकाल सूर्योदयाप्रमाणें राष्ट्राचा दिनचर्येतील एखाद्या प्रसंगाचें चित्र दाखविणारी ऐतिहासिक गोष्टपण नाही. संस्कृत व मराठी भाषेचा सशास्त्र अभ्यास करूं इच्छिणारांना व्याकरणाच्या प्रदेशांत पाऊल टाकतांच ''संधि''चें जें एक काळरान लागतें त्यावर श्री. निजसुरे यांनीं प्रकाश पाडून विद्यार्थ्याचा मार्ग सुलभ केला आहे. इंग्रेजी ४ थ्या इयत्तेपासून संस्कृत दुसरी भाषा घेऊन शिकणारांना हा संधिप्रकाश फारच सुखावह होईल. संधिनियमांचे 'स्वरसंधि' 'विसर्गसंधि' 'व्यजनसंधि' असे पृथक् पृथक् विभाग पाडून इंग्रेजी व मराठी या दोनही भाषेंत त्यांचा स्पष्ट सुबोध व खुलासेवार विचार केला आहे. संस्कृताच्या विद्यार्थ्यांनी हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. मुंबई पुणें व धुळें येथील सर्व बुकसेलर्सकडे मिळेल.

गिरणी कामगार रोजनिशी १९२३

कर्ता, महादेव खेम पालब, एक्साइज ड्यूटी क्लार्क, करीमभाई मिल्स. ही रोजनिशी खरोखरच सार्थनाम आहे. ''गिरणीतील सर्व दर्जाच्या लोकांस अत्यंत उपयुक्त'' च नव्हे तर अगदी अवश्यक अशी वस्तू आहे. रोजनिशीत असणारी पोस्टाविषयी माहिती, लग्नामुंजींचें मुहूर्त, हिंदूंचे सण, सुटीचें दिवस वगैरें सर्वसाधारण माहिती तर यांत आहेच; पण विशेष हे कीं गिरणींतील भिन्न भिन्न खात्यांत काम करणाऱ्या लोकांच्या पगारआकारणीची कोष्टकें, निरनिराळ्या खात्यांत उपयोगी पडणारे नियम, मुंबईतील गिरण्यांचे टेलिफोन नंबर व गिरणीकामगारांस अत्यंत जरूर अशी इतरही पुष्कळ माहिती या रोजनिशीत आहे. कापडाच्या गिरणीत काम करणाऱ्या प्रत्येक मनुष्याने ही रोजनिशी अवश्य जवळ बाळगावी. किंमत कागदी ११ आणे व कापडी १४ आणे. कर्त्याकडे अगर कुणाही पुस्तकवाल्याकडे मिळेल.

□□□

खास पुरवणी

सातारच्या पापग्रहाचे प्रबोधनावर कायस्थी गंडांतर

कारखानीस बंधूंचा ठाकऱ्यांवर हल्ला

सातारच्या शिवाजीउत्सवाचा सूड

सातारचा शिवजयंत्युत्सव कोणी केला?
फर्ग्युसन कॉलेजांतले शहाणे फेलो विष्णु दत्तात्रय कारखानीस म्हणतात
''उनाड हलकट व दारूबाज लोकांनी''
ठाकऱ्यांवर कागदपत्रांचे उभारलेले खोडसाळ काहूर

हल्ल्याच्या वेळी हजर असलेल्या तिऱ्हाईत साक्षीदारांची पत्रें

(प्रास्ताविक खुलासा :- ता. ६ नवंबर १९२२ सोमवार रोजी सकाळी १०।। ते ११ च्या दरम्यान घडलेल्या शोचनीय प्रकारांबद्दल आतांपर्यंत आम्ही मौनच धरले होते. तथापि कारखानीस बंधूंनी केलेल्या वर्तनाचे चित्र जनदेवतेपुढेच न्यायासाठी मांडावे. असा अनेक प्रतिष्ठित सल्लागारांचा सल्ला पडल्यामुळे, प्रथम त्या प्रसंगी हजर असलेल्या तिऱ्हाईत गृहस्थांची पत्रे वाचकांपुढे मांडून, मग आमची विस्तृत कैफियत पुढे दिलेली आहे.

केशव सीताराम ठाकरे.)

एक मासलेवाईक निंद्य प्रकार

श्रीयुत प्रबोधनकर्ते यांसः-

वि. वि. खालील मजकुरांत आपला प्रत्यक्ष संबंध येत असला, तरी ता. ६-११-१९२२ रोजी आमच्या नजरेसमोर घडलेला 'एक मासलेवाईक निंद्य प्रकार' अनेक दृष्टींनी महत्त्वाचा असल्यामुळे, तो

जनजाहीर होणे रास्त आहे. म्हणूनच तो आपण आपल्या पत्राच्या येत्या अंकी प्रसिद्ध करावा अशी विनंति आहे.

गेल्या सोमवारी (ता. ६-११-२२) आम्ही दोघे प्रबोधनांतील कांही लेखांविषयी खुलासा करण्यासाठी प्रबोधनकार श्री. ठाकरे यांच्या भेटीला त्यांच्या स्टडीरूम्स (स्वाध्यायश्रम) मध्ये गेलो. आम्ही आमच्याविषयी कांही बोलणार तो इतक्यांत दोन तरूण गृहस्थ आले. (सातारचे दत्तोपंत कारखानीस यांचे हे दोन मुलगे होत, हे आम्हाला मागाहून समजले.) ठाकरे यांनी शिरस्त्याप्रमाणे त्यांचे आगतस्वागत करून 'काय आज्ञा आहे' असे विचारले. त्यांपैकी एक ''तुमच्यापाशी कारखानीसांकडून आणलेली कांही कागदपत्रे आहेत, ती आम्हांस परत पाहिजेत'' असे म्हणून, ती कशी होती काय होती, याचे वर्णन देऊं लागले. तेव्हां रा. ठाकरे यांनी त्यांना शक्य तितक्या सौम्यपणाने उत्तर दिले की ''आपण मला आश्चर्यात टाकीत आहांत. माझ्याजवळ कारखानीसांचे एकहि चिठोरे नाही; या किंवा कोणत्याहि बाबीत त्यांचा माझा कसलाहि संबंध नाही.'' यावर ते गृहस्थ म्हणाले ''आम्हाला पक्की आठवण आहे की तीन वर्षांपूर्वी ती कागदपत्रे आम्ही तुम्हांला दिली आहेत आणि तुम्ही नाही म्हणतां म्हणजे काय?'' ठाकरे म्हणाले ''तुमच्या स्मरणशक्तीवर इतका जर तुमचा भरंवसा असेल, तर मला असे म्हणणे भाग आहे की you are approaching a wrong party or that you are under some misunderstanding. (तुम्ही भलत्याच माणसाच्या गळी पडत आहांत किंवा तुमचा कांही गैरसमज झालेला असावा.)'' मिसअंडॅर्स्टडिंग् हा शब्द कारखानीसांना अपमानास्पद वाटला. 'गैरसमज' शब्दांत अपमान असतो, हे आम्हाला त्याच वेळी कळले. सदाशीव कारखानीस (धाकटा) एकदम वर्दळीस येऊन ''तुम्ही स्वतःला कोण समजतां? तुमची लायकी काय? विद्वत्ता काय?'' इत्यादी प्रश्न अस्तन्या सरसावीत हातवारे करीत ठाकरे यांस विचारूं लागले. ठाकरे म्हणाले ''मी एक क्षुद्र व्यक्ति असून, माझे ज्ञानहि इंग्रजी दुसरीच्यापुढे नाही मी कांही तुमच्यासारखा ग्रॅज्युएट नाही. पण या गोष्टीचा तुमच्या रागाशी काय संबंध? तुमचा माझेवर कागदपत्राविषयी कांही आक्षेप असेल, तर त्याचे स्पष्ट उत्तर यासकट सात वेळां मी 'नाही' असे दिले. याने तुमचे समाधान होत नसेल, तर ही माझी कागदपत्रांची शेल्फ खुशाल तपासून पहा. आपला माझ्यावर विश्वासच नसेल, तर बोलणेच खुंटले. यापेक्षां मी जास्त कांही बोलूं इच्छित नाही.'' कारखानीस बंधु चिडून म्हणाले की ''आम्हांला ही उठाठेव काय करायची आहे?'' त्यावर पुन्हां ठाकरे म्हणाले की ''आपल्याला ही उठाठेव नको असेल, तर दुसरा कोणी इसम पाठवा. नाही तर तुमचे श्वशूर रावसाहेब पोतनीस (असि. रजिस्ट्रार कोऑपरेटिव सोसायटीज) हे माझे चांगले परिचित आहेत, त्यांना मी आपल्या पुस्तकालयाची झडती घेण्यास सांगतो. यापलीकडे तुमची समजूत कशाने पटेल ती सांगा.'' इतका स्पष्ट व सरळ खुलासा ठाकरे यांनी केला असतांहि, मूळ मुद्दा सोडून जेव्हां दोघेहि कारखानीस बंधु असभ्य व ग्राम्य शब्दांचा ठाकऱ्यांवर मारा करूं लागले, तेव्हां आम्हांला संशयच आला की हे प्रकरण कागदपत्रांचे नसून, दुसरीच कांही तरी भानगड आहे. परंतु इतक्यांत ठाकरेच कारखानीसांना म्हणाले, ''हे पहा मि. कारखानीस, आतां उगीच लपवू नका. तुम्ही एवढ्या जोरजोराने शिरा कां ताणतां ते मी ओळखले. कागदाची मागणी हे निव्वळ ढोंग आहे. गेल्या सातारच्या शिवजयंति उत्सवांत आपल्या वडिलांच्या उत्सवविरोधी कृतीबद्दल तेथल्या लोकांनी व मी भरसभेत जो तीव्र निषेध केला आणि आपल्या २१०० रुपये हुंड्याबद्दल प्रबोधनांत जो रिमार्क

एन ४००६--२४

प्रसिद्ध झाला, त्याचा तुम्हांला सूड उगविणे आहे. खुशाल वाटेल तसे तोंडसुख घ्या.'' यानंतरच्या बंधुद्वयाच्या वर्तनाचे व भाषेचे चित्र उठविणे आमच्या पामर लेखणीला शक्य नाही. इतके ते असभ्य व ग्राम्य बनले. आपण कोण, (थोरले विष्णुपंत कारखानीस हे फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर असतात, असे त्यांनीच म्हटलेले आम्हांला स्मरते.) आपली सभ्यता काय, आहोत कोठे, आजूबाजूला कोणकोण आहेत, वगैरे सर्व गोष्टी विसरून कारखानीस बंधुद्वयांनी केलेला प्रकार अत्यंत किळसवाणा होय. ठाकरे हे उघडाउघड 'कमी शिकलेले' असल्यामुळे त्यांचे 'कल्चर' कमी धरले, तरी ही 'जास्तीत जास्त शिकलेली' ग्रॅज्युएटांची दुक्कल सभ्यपणाला न साजणारे शब्द तोंडावाटे बाहेर काढील, असे आम्हांला स्वप्नहि पडले नव्हते. सातारच्या शिवाजी उत्सवाच्या कार्यकारी मंडळीला 'दारूबाज उनाडटप्पूंची हलकट टोळी' म्हणणे आणि सभ्यपणाने व वाजवी तितक्याच संतापाने. 'तोंड आटपा आणि खोलीतून चालते व्हा' असे ठाकरे यांनी बजावतांच, अस्तन्या वर सरसावून कारखानीसांनी त्यांच्यावर बीभत्स शब्दांची लाखोली वहावी, हाच जर युनिव्हर्सिटीच्या उच्च शिक्षणाचा पराक्रम असेल, तर तो कारखानीस बंधुद्वयानांच लखलाभ असो. चाललेला प्रकार थांबविण्यास ठाकरे यांनी पराकाष्ठा केली व या 'सभ्य' गृहस्थांना कचेरीतून जाण्यास फर्माविले असतांहि, पुनः नरम होऊन लोंबटपणा करण्यास (वडिलांचा अभिमान धरून त्यांचे नुसते नांव काढणाऱ्याच्या नरडीला हात घालणारे) हे सुशिक्षित तरूण तयार झाले हे पाहून आम्हांला फार खेद वाटला. कारखानीसांचा असभ्यपणा सुरू असतां एकदोन दुसरीहि माणसे येऊन गेली, पण त्यांचे बोलणे मुळीच बंद पडेना. आणि एकेरीवर येण्याचे थांबेना. ठाकरे यांनी जशास तसे न्यायाने कारखानीसांच्या बेजबाबदार पद्धतीचा अवलंब केला असता, तर कदाचित् हे प्रकरण चटकन् ठोसाठोशीवर येऊन मिटले असते. पण ठाकरे खरोखरच 'कमी शिकलेले!' अखेर आम्ही मध्यस्थी केली व बंधुद्वयांना निघून जाण्यास विनंती केली. पण तेव्हांसुद्धा आमच्याशी हुजत घेण्यास त्यांनी कमी केले नाही. तिसरे एक गृहस्थ आम्हाप्रमाणेच बाजूला बसले होते, त्यांनीही त्यांच्या असभ्य वर्तनाचा शाब्दिक निषेध करतांच, सदाशीव त्यांच्याशी हमरी तुमरीवर आले. अस्वागत झाले तरी ऐतिहासीक कागदपत्राची तळमळ लागलेले-पण तीन वर्षेपर्यंत झोपी गेलेले-हे ग्रॅज्युएट कायस्थ तरूण ठाकरे यांना पुन्हा भेटून त्यांचा 'पुरा समाचार' घेणार आहेत. रा. ठाकरे हे शरीराने जरी 'एका थापडीचे' असले, तरी झाल्या प्रकाराची पुनरावृत्ति घडून येण्याइतका ब्रिटीश सरकारचा कायदा मात्र 'एका थापडीचा' खास नव्हे; अर्थात् त्या समाचाराचा बंदोबस्त करण्याइतके खंबीर ठाकरे आहेतच. कारखानीसांच्या एकंदर आततायीपणाचा सारांश मात्र ठाकरे यांच्या व्याख्यानाचा व प्रबोधनांतील चिमट्यांचा सूड उगविणे हाच दिसला आणि तसे कारखानीसांतल्या एकाने अप्रत्यक्षपणे कबूलहि केले. दोनचार शिकलेली माणसे व्यवहाराकरितां एके ठिकाणी जमावी आणि त्यांना सभ्यपणाने वागतां येऊं नये, व कांही पुरावा नसतां दुसऱ्यास तुम्ही खोटे बोलतां असे बेधडक म्हणावे, याला काय प्रकार म्हणावा? हे आम्हांला समजत नसल्यामुळेच याला 'एक मासलेवाईक निंद्य प्रकार' म्हटले आहे. प्रबोधनमध्ये रावसाहेब पोतनीस यांकडून २१०० रुपये हुंडा घेणारे असे जे नांव प्रसिद्ध झाले होते, ते यापैकी वडील बंधु विष्णु होत, व धाकटे बंधु सदाशीव अझून अविवाहित आहेत असे कळते. तसेच या वर्षी ब्राह्मणेतर जनतेने साताऱ्याला अननुभूत उत्साहांत श्रीशिवजयंतीचा उत्सव केला. त्यावेळी सातारच्या महाराजांकडे मिरवणुकीसाठी हत्ती घोड्यांची मागणी केली असतां, 'ही सत्यशोधकांची

चळवळ आहे. आजपर्यंत ब्राह्मणांच्या उत्सवाला आपण मदत करीत आलो, यांना हत्ती घोडे सरंजाम देऊं नये' असा सेक्रेटरीच्या अर्जावर शेरा मारणारे सातारचे श्री. दत्तोपंत कारखानीस म्हणून विजयी मराठ्यांत प्रसिद्ध झालेले सद्‌गृहस्थ या तरुणांचे वडील होत. अर्थात या गोष्टी आम्हांला मागाहून कळल्या.

असेहि गृहीत धरून चालूं की कांही ऐतिहासिक कागदपत्रांची राखरांगोळी झाली किंवा कोणाच्या स्वार्थावर कांही भयंकर घाला पडला तरी पण एखाद्या सभ्य गृहस्थाच्या घरी जाऊन तेथे असभ्य वर्तनाची व ग्राम्य शब्दांची बंडाळी करणे, हे निदान ग्रॅज्युएट असणाऱ्या प्रतिष्ठितांना कसे काय शोभत असेल, हे कारखानीसांनी शांत मनानेच आपल्याशी पहावे. सभ्यपणा राखणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे. वसंतसेनेसारखी वेश्या सुद्धां 'श्रेष्ठांची अमर्यादा होईल' म्हणून मरणाच्या दारी असतां सुद्धा ओरडली नाही. मग एखाद्या खऱ्या खोट्या क्षुल्लक चिठोऱ्याकरितां जर आपण आपला सभ्यपणा वेशीवर टांगू लागलो, तर आमचे चारित्र्य ते काय राहिले?

रा. ठाकऱ्यांवरील प्रस्तुत प्रसंग त्यांच्या सातारच्या शिवजयंत्युत्सवांतील स्पष्टोक्तीचे व त्यांच्या प्रबोधनाच्या निर्भीड कामगिरीने आणलेला आहे. अर्थात् त्यांच्यावरील या असभ्य हल्ल्याचा निषेध होणे योग्य आहे.

आपले नम्र

मुंबई ता. ९-११-२२. **विष्णु महादेव राणे**

बी. वी. निकम.

सातारच्या कारखानीसांचे तिरस्करणीय वर्तन

श्री. केशव सीताराम ठाकरे सं. प्रबोधन यांस वि. वि. गेल्या सोमवारी आपल्या कचेरीत कामानिमित्त मी आलो असतां, जो विलक्षण प्रकार माझ्या दृष्टीस पडला आणि ज्या वेळी इतर दोन तिऱ्हाईतांना धरून मी त्याचा तिसरा खास साक्षीदार म्हणूनच तेथे दुर्दैवाने किंवा सुदैवाने हजर होतो, त्या प्रकाराचे वास्तवीक स्वरूप सार्वजनीक महत्त्वाचे आहे. मी स्वतः पाहिलेली हकीकत लोकांपुढे येणे अवश्य आहे. त्या दिवशी कारखानीस ब्रदर्सनी आपल्या उर्मट व बेजबाबदार वर्तनाचा जो घाणेरडा प्रकार दाखविला, त्याचा वास्तवीक परिणाम माझ्या आधी येऊन बसलेल्या अनोळखी दोन गृहस्थांवर काय झाला, ते मी सांगूं शकत नाही. कदाचित् ते आपल्याकडे किंवा इतर दुसऱ्या पत्राकडे या प्रकरणाबद्दल लिहीतील. परंतु मी मात्र खाली जे लिहीत आहे, ते वाटेल तेव्हां, वाटेल त्याच्यापुढे, सरकारी न्यायाधिशापुढेसुद्धा, शपथेवर सांगेन. म्हणून माझी आग्रहाची विनंती आहे की आपण हे सर्व प्रकरण जगापुढे मांडा. कारखानीस ब्रदर्सची त्या दिवशीची वागणूक म्हणजे मला दाट संशय येतो की आपण ब्राह्मणेतर जनतेची ग्रंथद्वारा व प्रबोधनद्वारां निस्पृहपणे जी सेवा चालविली आहे, तिच्या फटकाऱ्याचे तडाखे पाठीवर बसून विव्हळणाऱ्या कांही दुष्टांचा आपल्या कार्याचा परस्पर नाश करण्याचा हा गुप्त कट आहे. हा माझा तर्क आहे. कदाचित तो खोटा ठरेल. पण कारखानीस ब्रदर्सनी सातारच्या शिवाजी उत्सववाल्यांना मोजलेल्या निवडक शिव्या, आपण तेथे व्याख्यान दिलेत त्या 'गाढवपणा' वर त्यांनी

एन ४००६--२४अ

खाल्लेले दांत ओठ आणि हुंडाशायलोकांच्या जंत्रीचा पुनः पुनः उल्लेख करून त्यांनी लाजलज्जेची मर्यादा सोडून केलेले असभ्य भाषेचे प्रदर्शन, इत्यादि सर्व प्रकारांचा नीट शांतपणे विचार केला तर कारखानीसांची कागदपत्रांची सबब शुद्ध लबाडीची हे तेव्हांच समजून आले; नव्हे, संतापाच्या भर रंगात ते ती कबुलीच देऊन चुकले आहेत. ही गोष्ट दुसऱ्या दोघां तिऱ्हाइतांनी त्यांच्या लक्षांत भरविण्याचा प्रयत्न करतांच, त्यांच्या जिभेची टकळी क्षणभर घोटाळल्याचे आम्ही तिघांनीहि पाहिले. असो. मी स्वतः पाहिलेली हकीकत प्रथम लिहितो. आपण ती अवश्य छापा. लोकांना कळूं द्या. मग माझा तर्क बरोबर आहे की चूक आहे, याचा निकाल जनगंगा खास देईल. आपण जनसेवक आहांत, तेव्हा तुमच्यावर कांही दुष्टांनी दुष्ट कारस्थानाचा घाला घातलाच, तर त्याचा योग्य तो विचार करणे व न्याय देणे, जनतारूप जनार्दनाचे काम आहे.

सोमवार ता. ६-११-२२ रोजी १०।। वाजतां मी प्रबोधन कचेरीत आलो. ठाकरे इझिचेअरवर बसले होते. बाजूस दोन अपरिचित गृहस्थ शांत बसले होते. व दुसऱ्या बाजूला दोन तरुण बेफाम भडकलेले हातवारे करीत मोठमोठ्याने बोलत होते. मी आंत येतांच माझ्या कानी त्या तरुणांपैकी मोठ्यांचे खालील शब्द पडले. ''सातारच्या शिवाजी उत्सववाल्यांची प्रतिष्ठा तुम्हांला. काय त्यांची किंमत? चार चौघे उनाडटप्पू, दारुडे, हलकट मिळाले, आणि केला उत्सव. साताऱ्यांत त्यांना खेटराची किंमत नाही.'' हा वाद कसला चालला आहे, हे अपरिचित तरूण एवढे कां भडकले आहेत, दिसतात चांगले सुशिक्षित, पण मुंबईच्या मवाल्यांनाहि साजणार नाहीत, असे शब्द कां उच्चारताहेत आणि मला विशेष चमत्कार वाटला तो हा की ठाकरे (संतापून लाल झालेले दिसत असूनहि) हे सर्व कसे सहन करीत आहेत, याचा मला उलगडा पटेना. बाब कसलीहि असो, पण माझ्या स्वतःच्या खोलीत जर असला मुर्दाडपणा कोणी करता, तर त्याला प्रथम मी जोड्याखाली बदडून हांकून लावला असता. मागाहून ठाकऱ्यांनी खुलासा केला की ''माझ्या कचेरीत नाना ठिकाणचे नाना प्रकारचे लोक येतात. कोणी बरा बोलतो, कोणी वाईटहि बोलतो. आजचा मासला मात्र अगदीच चमत्कारीक. आणि तो माझ्याच जातीच्या ग्रॅज्युएटांकडून घडावा, हेच मला मरणापेक्षां मरण झाले. शिवाय मी हे विसरून चालणार नाही की मी माझ्या कचेरीत आहे. जवळ दोन अपरिचित व्हिजिटर्स बसले आहेत. कारखानीसांच्या असभ्य भाषेला उलट तसलीच जोड देणे किंवा हातघाईवर येणे मला केव्हांहि बरे दिसणार नाही. म्हणून शक्य तितक्या स्पष्टपणे व तीव्रतेने मी त्यांना सरळ भाषेत उत्तरे देण्याचा यत्न केला.'' ठाकऱ्यांचा हा खुलासा त्यांच्या योग्यतेला शोभणारा खरा; परंतु माझ्या स्वतःच्या प्रकृतीला मात्र तो प्रकार तिळमात्र मानवला नसता. असो.

मी येऊन कारखानीसांच्या जवळ बसलो. त्यांची दोघांची अपशब्दाची मर्मभेदक निंदेची आणि ठाकऱ्यांचा पाणउतारा करण्याची बातेरी सारखी झडतच होती. ते कोणत्या मुद्यावर भांडत होते, याचा ठाव ना ठिकाण. परंतु सातारच्या व्याख्यानांत ठाकरे यांनी त्यांच्या वडिलांची केलेली पूजा व हुंडा प्रकरण या दोन मुद्यांवर मात्र त्यांचा कटाक्ष विशेष दिसला. अखेर ठाकरे त्यांना हात जोडून म्हणाले की ''महाराज, झाले एवढे नाटक पुरे झाले. आपल्या खानदानी दृष्टीने मी कितीहि क्षुद्र असलो, तरी यापुढे परिणाम बरा होणार नाही. आपण आतां जा. डोके जरा शांत करा आणि भेटा कधी तरी एखाद्या सभ्य माणसाप्रमाणे.'' मग मीहि मध्ये तोंड घातले व दुसऱ्या दोघां तटस्थ गृहस्थांनीहि तसेच केले.

त्यांनी कारखानीसांना सौम्य शब्दांत बजाऊन सांगितले की ''रावसाहेब, आपण कोठे आहांत, याचा कांही विचार करा. हा तिवाटा नव्हे की तुमचे घरहि नव्हे. अगदी प्रथम पासून आम्ही तुमचे वर्तन पहात आहोत. तुमच्यासारख्या ग्रॅज्युएटांनी तरी एवढे बेताल व्हायला नको होते. आतां तुम्ही येथून जाल तर आमच्यावर उपकार होतील.'' पण एवढ्यावरहि न समजतां हे विद्वान कारखानीस ब्रदर्स आम्हां तिघांवरच उलटले. 'तुम्ही आम्हांलाच असभ्य म्हणतां?' म्हणून पुनः टकळी सुरू झाली. त्यावर आम्ही तिघांनीहि त्यांना ठासून सांगितले की 'तुम्ही अत्यंत बेजबाबदार अश्लील व असभ्य वर्तन केले हे आतांच काय, पण वाटेल तेव्हां वाटेल तेथे स्पष्ट सांगू. तुम्ही आता जाण्यांतच शहाणपणा आहे.'' जेमतेम त्यांना घालविले. माझी खात्री पटली आहे की त्या दिवशी जर ते दोन गृहस्थ (त्यांची माझी ओळख नव्हती व अझूनहि परिचय नाही.) हजर नसते, तर आडदांड कारखानीस ब्रदर्सनी ठाकऱ्यांवर प्राणघातक हल्ला केल्याशिवाय सोडले नसते.

एवढे ठाकऱ्यांवर चवताळण्याचे कारण काय? ठाकऱ्यांचा व त्यांचा फारसा परिचय असल्याचे दिसले नाही. कागदपत्राचे कारण ही नुसती सबब आहे, असे त्यांच्याच मुखांतून बाहेर पडले. आम्हां त्रयस्थांना तर एवढा स्पष्ट उलगडा झाला की गेल्या सातारच्या शिवाजी उत्सवाला (ब्राह्मणेतर पक्षाने केलेल्या) या कारखानीसांच्या वडलांनी कांही चीड येण्यासारखा विरोध केला होता. ब्राह्मणेतर पक्षाच्या सेक्रेटरीने सातारच्या भाऊमहाराजांकडे घोडे हत्ती छत्रपतींच्या पालखीच्या मिरवणुकीसाठी अर्ज करून मागितले होते. त्या अर्जावर 'हे सत्यशोधक आहेत. यांना सरंजाम देऊ नये' अशा अर्थाचा कांही शेरा मारला होता म्हणतात. त्याबद्दल उत्सवाच्या एका सभेत कांही वक्त्यांनी, (कदाचित् आणखी ठाकऱ्यांनी सुद्धा असेल, मला माहीत नाही) व अध्यक्षांनी त्यांच्या वडिलांची यथास्थित पूजा केली म्हणतात. याचा एक सूड आणि या बंधूंपैकी थोरले दिसणारे-जे अगदी छडी सरसाऊन मारायला उठलेले दिसत होते ते-यांनी २१०० का २५०० हुंडा घेतल्यामुळे प्रबोधनांत ठाकरे यांनी त्यांची घेतलेली हजेरी. याचा सूड यापलीकडे कारखानीस ब्रदर्सच्या खुनसटपणाला दुसरा कांही आधार असल्याचे निदान आमच्या प्रत्ययाला आले नाही.

झाला प्रकार अत्यंत शोचनीय. त्याचा सर्वत्र निषेधच होईल. कारखानीस ब्रदर्स मोठ्या खानदानीचे असले, तरी ठाकरेहि कांही अगदी बारदानी नव्हते. शिवाय, बीए पर्यंत शिकलेले व पुण्याच्या एका कॉलेजात प्रोफेसरकी करणारे विद्वानच जर असा आपल्या सारासार बुद्धीचा होम करून, साधारण सभ्यपणाचीहि फारकत करू लागले, तर कायस्थ प्रभू समाजाच्या संस्कृतीबद्दल आम्हां त्रयस्थ जातीयांना कांही शंका आल्या तर त्या गैरवाजवी ठरतील काय? पत्रविस्तार बराच झाला. वर लिहिलेला मजकूर निस्पृहपणाने सत्य स्मरून लिहिला आहे. आणखी खुलासा करण्याची वेळ आली तरीहि तयारी आहे. कळावे.

मुंबई १२-११-२२. **कमळाकर नानाभाई महाजन.**

व्यवस्थापक प्रबोधन यांस -

सा. न. वि. वि. सातारकर कारखानीस बंधूंनी ता. ६/११/२२ रोजी ठाकरे यांच्या कचेरीत जाऊन जो असभ्यपणाचा हल्ला त्यांचेवर केला त्याचा तपशील त्यावेळी हजर असलेल्या तीन सद्गृहस्थांच्या

पत्रावरूनच आपणां सर्वांस समजण्यासारखा आहे. मी स्वतः त्यावेळी तेथे हजर नव्हतो. परंतु हल्ल्याचा निंद्य प्रकार गांवांत पसरतांच त्याची शहानिशा करून घेण्यासाठी जी कांही दहाबारा मंडळी गेली होती त्यांत मात्र मी होतो. त्यावेळच्या त्यांच्या उर्मटपणाबद्दल निषेध करणारे त्या मंडळीचे जे पत्र त्यावर माझी सही आहेच.

परंतु हे पत्र लिहिण्याचे कारण असे की, श्री. रा. रा. दत्तोपंत कारखानीस हे दादर एथे कागदपत्र घेऊन आले असतां त्यांचा व ठाकऱ्यांचा जो भाषणप्रसंग एकदोन वेळच घडून आला त्यावेळी मीहि बरोबर असल्यामुळे खरा प्रकार काय झाला तो मला माहीत असल्यामुळे मी अव्वल साक्षीदार आहे आणि आपण ह्या बाबतीतला जो मजकुर प्रबोधनांत प्रसिद्ध करणार आहांत त्याचे प्रुफ आपण माझ्या अवलोकनार्थ पाठविले ते पहातां आपण लिहिलेला मजकुर व त्यांत उध्दृत केलेली भाषणे ही माझ्या स्मरणशक्तीप्रमाणे हुबेहुब लिहिली गेली आहेत. व लिहिला प्रकार अक्षरशः खरा आहे हे मी प्रतिज्ञेवर सांगण्यास तयार आहे. कळावे लोभ असावा हे वि.

ता. २७/११/२२.

आपला,

मार्तंड आत्माराम शृंगारपुरे.

सातारच्या पापग्रहाचे प्रबोधनावर गंडांतर

गेली १२-१५ वर्षे ग्रंथद्वारा व व्याख्यानद्वारा जशी साधली तशी वेडीवांकडी सेवा जनतेच्या चरणी रुजू करीत आलो. परंतु स्वतःबद्दल, स्वतःच्या खासगी चरित्राबद्दल किंवा संकटांबद्दल चार शब्द लिहिण्याचा दुर्दैवी प्रसंग या लेखणीवर यापूर्वी कधीहि आला नव्हता. आज तो येत आहे. ईश्वरेच्छा! खरे पाहिले तर आम्ही कोणी मोठे पुढारी नाही, की देशभक्तहि नाही. एखाद्या विशिष्ट पक्षाचे सांप्रदायिकहि नाही. कांही रुटुखुटू अभ्यास झालेला, त्यावरून 'जितके कांही आपणांस ठावे' तितके लोकगंगेला अर्पण करून आनंद मानावा, हे आमचे व्यसन. या व्यसनाच्या पायी उदरनिर्वाहाला साधन असलेली 'सोन्यासारखी दोनशेंची सरकारी 'चांदीची' नोकरीसुद्धा सोडली. असल्या व्यक्तीच्या वेड्यावांकड्या सेवेला गोड मानून घेणे, हा लोकगंगामातेचा प्रेमळ पान्हा असला, तरी तेवढ्याने आमच्या खासगी चरित्राच्या किंवा प्रसंगाच्या कथनासाठी आज जगाचे कार्य अडलेले नाही खास. विशेषतः प्रबोधनाच्या ठरावीक जागेत या गोष्टीचा समावेश होणे मुळीच रास्त नसल्यामुळे, ही स्वतंत्र पुरवणी काढली आहे. आज नाइलाजास्तव आत्मकथनाचा प्रसंग आला आहे, त्याची जनार्दनाने क्षमा करावी, अशी प्रथमच याचना करतो.

***

धार्मिक सामाजीक किंवा राजकीय बाबतीत आमच्या निश्चित मतांची ओळख महाराष्ट्राला गेल्या १२ वर्षांत पूर्ण झालेली आहे. प्रबोधनाच्या एक वर्षाच्या कामगिरीने महाराष्ट्रांत व इतरत्र एका विशिष्ट विचारसरणीचा प्रसार केलेला आहे आणि ती विचारसरणी दर पंधरवड्याला कमीत कमी वीस हजार वाचकांच्या मनोवृत्तीला हलवीत असते. प्रबोधनाची कार्यपद्धति सर्वांना सारखीच पसंत पडणे शक्य नाही. आमच्या कांही कांही मतांबद्दल बऱ्याच ठिकाणी गैरसमज आहे, तर पुष्कळ

ठिकाणी त्यांमुळे (यावज्जन्मांत आमची भेट झाली नसतांहि) अनेक मंडळी जवळजवळ आमचे वैरीहि बनले आहेत. कोणी समजत असतात, ते कधीकाळी मुंबईला आले तर मुद्दाम दादरास आम्हाला येऊन भेटतात, मोकळ्या मनाने चर्चा करतात, आणि आपला गैरसमज स्पष्ट व्यक्त करून आमचे मित्र होतात. ज्यांना एवढे उरकत नाही, ते आम्हाला 'स्वराज्यद्रोही, ब्राह्मणद्वेष्टा किंवा जातिद्रोही' वगैरे पदव्यांची खैरात करून स्वस्थ बसतात ज्यांच्या कारस्थानांवर किंवा दुर्वर्तनावर प्रबोधनाची कलम-समशेर बिनचूक मारा करते, ते लोक साहाजीकच प्रबोधनाचा पाडाव कसा होईल, याचे बातबेत ठरवून त्या दिशेने यथाशक्ति व यथामति प्रयत्न करतात. आणि ज्यांच्या प्रत्यक्ष हिताची कांही कामगिरी प्रबोधनाकडून होते, (असल्या बांधवांची संख्या सुदैवाने बरीच आहे) ते उत्तेजनाचे चार गोड शब्द पत्रद्वारे पाठवितात. कांहींचे जे हित तेच कांहींचे अनहित असल्यामुळे, सर्वांना सारखे संतुष्ट करण्याची कला एखाद्या मुत्सद्याला कदाचित् साधेल; आम्हांला ती साधणे शक्य नाही.

***

नोकरी सोडल्यापासून आमच्या दिनचर्येत बराच बदल झाला आहे. आज १४ वर्षे दादरला असतां आमच्या नियुक्त व्यवसायापलीकडे आमचे कधी कोणाकडे फारसे येणे जाणे नाही, व आतां तर 'रेलवेची धांवपळ' अज्जीबात सुटल्यामुळे १५-१५ दिवसांत मुंबईचे दर्शनहि घडत नाही. गेल्या फेब्रुवारीपासून लेखनव्यवसाय मनस्वी वाढला आहे व 'शंभर वर्षांपूर्वीचे महाराष्ट्र' निर्व्यंग स्थितीत कसे बाहेर पडेल, याची धडपड सारखी सुरू आहे. अर्थात् दिवसाचे २४ तास आम्ही आमच्या स्वाध्यायाश्रमांत खरडेधाशी करीत बसलेलो असतो. कोणी येऊन भेटला तर त्याची भेट घ्यायची. यापलीकडे सध्यांच्या दिनचर्येचा कसलाहि कार्यक्रम नाही. पूर्वीहि नव्हता व आतांहि नाही. बड्या छोट्या शिष्टांचे उंबरठे यावज्जन्म आम्ही कधी झिजवले नाहीत. स्वजातीच्या किंवा परजातीच्या शिक्षणविषयक किंवा कसल्याहि संस्थेचा अगर व्यक्तीचा प्रबोधनकार उपकृत नाही. स्वजातियांत मान्यता किंवा धन्यता मिळविण्याचा त्याने कधी प्रयत्न केलेला नाही, किंवा स्वजातियांच्या उत्तेजनावर त्याची लेखनतपश्चर्या चाललेली नाही. आज प्रबोधनाचा जो विस्तृत प्रसार झालेला आहे, त्याला अखिल महाराष्ट्रीय जनतेने अभेद भावाने दिलेले प्रोत्साहनच कारण आहे आणि तिच्याच रसिकतेवर व सक्रीय सहानुभूतीवर प्रबोधनाची लेखणी यथाशक्ति मराठी भाषेची व इतिहासाची सेवा बजावीत आहे. ही कृतज्ञतेची भावना, प्रबोधनकार उद्यां मेला किंवा एखाद्या कारखानीसाच्या सोटेशाहीला बळी पडला, तरी त्याच्या देहरक्षेतूनहि 'माझा रसिक महाराष्ट्र' अशा उमाळ्याच्या आरोळ्या काढल्याशिवाय राहणार नाही. ज्या कोणाला आमची मते व सिद्धांत पटत नसतील, त्यांना आम्ही केव्हांहि झाले तरी हेच सांगणार की 'बाबा, हा प्रयत्न तुझ्याकरितां नाही-

आहे विस्तीर्ण पृथ्वी विविध जन तसे काळ ना ज्यास अंत ।।
त्यामाजी मत्कृतींचा कुणितरि निपजे एक भोक्ता नितांत ।।

प्रबोधन कचेरीत नेहमीच अनेक लोकांची जा ये चालू असते. वर्तमानपत्राची कचेरी जवळ जवळ पोष्टऑफिसासारखीच ह्मटली तरी चालेल. फरक एवढाच की पहिल्यांत १०-१५ मिनिटे इकडच्या तिकडच्या गप्पा मारण्याची सवलत असते. एखादा विद्वान पाहुणा आला तर विचारविनिमयांत उत्कृष्ट

ज्ञानाच्या मेजवानीची चंगळ उडते. असल्या सुप्रसंगाचा फायदा सर्वांना मिळावा, लांबलांबच्या पंडितांचा सर्वांना परिचय व्हावा आणि त्या सन्मान्य पाहुण्यांनाहि दादर येथे एकदोन दिवस रहाण्यास अडचण पडूं नये ह्मणून प्रबोधन कचेरीपासून ५ मिनिटांच्या अंतरावर खांडके बिल्डिंगमध्ये एक ब्लॉक घेऊन तेथे स्वाध्यायाश्रम (Study Rooms) स्थापन केला आहे. तेथे दर रविवारी कोणा तरी विद्वानाचे ललित वाङ्मय, काव्य, इतिहास, समाजसेवा असल्या विषयावर थोडे प्रवचन होत असते. आमची 'व्हिजिटर' मंडळी येथेच येऊन आम्हांस भेटतात, कारण लेखनव्यवसाय रात्रंदिवस येथेच चालत असतो. आजवर अनेक सरस्वतिभक्तांनी, देशसेवकांनी आणि व्यवसायबंधूंनी स्वाध्यायाश्रमांत आपली चरणधूळ झाडून त्याला पवित्र केले आहे. आमच्या अनेक प्रेमळ अस्पृश्य बांधवांनी कितीक वेळां भेटीस येऊन एक आसनावर फराळ करतां करतां हितगुजाच्या चर्चा केल्या आहेत. वऱ्हाड, सोलापूर, सातारा, मावळ कडच्या आमच्या शेतकरी बांधवांनी आमच्या बिऱ्हाडी येऊन महाराष्ट्राच्या भावी वैभवाच्या स्वप्नचित्रांनी आम्हांला गुंग करून सोडलेले आहे. मतभेद असणाऱ्या अनेक ब्राह्मण बांधवांनी मोठ्या कळकळीने कांही मुद्यांवर खडाजंगीचे विद्वत्तापूर्ण वाद केले आहेत. असे अनेक प्रकार नेहमी अनुभवण्यास मिळत असल्यामुळे प्राप्त होणाऱ्या विद्यानंदापुढे आम्हाला ऐहिक ऐश्वर्याच्या बडेजावीची किंमत फुटक्या कवडी इतकीहि न वाटल्यास आश्चर्य कसले?

***

परंतु गेल्या ६ नवंबरला सातारच्या दत्तोपंत कारखानीसांच्या ग्रॅज्युएट चिरंजीवद्वयांनी आमच्या भेटीला येऊन असभ्यपणाचा जो शिमगा केला, तसला अनुभव मात्र आम्हांला पूर्वी कधी आला नाही व निदान तो इतक्या 'सुशिक्षित' समजल्या जाणाऱ्या तरुणांकडून येईल अशी आमची कल्पनाहि नव्हती. झालेला प्रकार शोचनीय तर खराच, पण तो किती किळस आणणारा होता, याचे शब्दचित्र, सुदैवाने त्या वेळी अवचित भेटीस आलेल्या अपरिचित तीन गृहस्थांनी आपण होऊन मुद्दाम प्रसिद्धीकरितां पाठविले नसते, तर आम्ही कदाचित् कारखानीसांसारख्या अप्रबुद्ध क्षुद्र व्यक्तींच्या जाहिरातीच्या या भानगडीत पडलो नसतो. एकंदर प्रकार पाहिला तर या भानगडीच्या मुळांशी प्रबोधनाच्या वाढत्या शक्तीचा खून करण्याचे कांही तरी सातारशाही नातूप्रकरण असावे, हा श्री. महाजन यांना आलेला संशय बराच खरा असावा, असे आम्हांलाहि वाटूं लागले आहे आणि ज्या ज्या सद्गृहस्थांच्या कानांवर कारखानीस बंधूंचा मवालीपणा गेला त्यांनाहि हाच दाट संशय येऊन, हे प्रकरण ताबडतोब जनतेपुढे विचारार्थ ठेवण्याचा त्यांनी आग्रह केला. तत्पूर्वी कारखानीसांनी झाल्या मूर्खपणाबद्दल दिलगिरी व्यक्त करून आपल्या उच्च शिक्षणाची व 'कुलीन' घराण्याच्या उंच जोत्याची इभ्रत राखण्याविषयी योग्य त्या पद्धतशीर मार्गाचा आम्ही अवलंब केला आणि गांवातील कांही मंडळीनींहि त्यांची भेट घेऊन खुलाशाचा यत्न केला. परंतु भेटीस गेलेल्या मंडळीपुढेसुद्धा त्यांनी जो नंगा नाच केला, त्याचेंहि शब्दचित्र या पुढे दिले आहे. अशा स्थितीत या प्रकाराची मुद्देसूद शहानिशा जनतेपुढे मांडून या सातारच्या पापग्रहाला मुक्तीचा मार्ग दाखवून देणे अगदीच अपरिहार्य झाले. स्वतः आमची स्थिति इसापनीतीतील शरविद्ध गरुडाप्रमाणे झाली आहे. छातीत बाण घुसल्याचे दुःख नाही, पण त्या बाणाला लावलेला पिसारा खुद्द आमच्याच पंखांचा असावा, ही गोष्ट विशेष शोचनीय व तितकीच मननीयहि आहे. कायस्थाची मान कापायला कायस्थ, मराठ्याचे नरडे दाबायला मराठा, असले डावपेच मराठेशाहीच्या उत्तर रंगाच्या

इतिहासांत मुबलक सापडतात आणि या विषारी कारस्थानाची बीजे आजपर्यंत सातारच्या पापभूमीतच फोफावल्याचा लौकिक आज दिगंत गाजत आहे. छत्रपति प्रतापसिंहाची मान कापायला त्याचा सख्खा भाऊ शहाजी भोसलाच पुढे सरसावला-घ्या मराठ्याविरुद्ध मराठा. बनावट दस्ताऐवज, खोटे शिक्के मोर्तब करण्याच्या बाळकोबा केळकराच्या गुप्त कटांत आत्माराम लक्ष्मण ऊर्फ आप्पासाहेब शिंदकर हा कायस्थ नराधम सामील. चिटणीसाच्या गळ्याला फांस देणारा आप्पा शिंदकर-घ्या कायस्थाविरुद्ध कायस्थ. सत्तावन सालच्या राष्ट्रस्वातंत्र्याच्या धामधुमीत शिंद्याने विश्वासघात केला असा लोकापवाद आहे. पण ऐन घटकेला, सचीवाशी संगनमत करून, रंगो बापूजी भेटीस आला असतां त्याला खोलीतल्या खोलीत बसल्या बैठकीवर युरपियन सोजीराकडून पकडविण्याचे राष्ट्रघातकी कारस्थान एका शिंदकर नामक कायस्थानेच केले आणि दिल्लीकडे रवाना झालेल्या मराठ्या मावळ्यांच्या सैन्याचा वाटेतच धुव्वा उडविण्याचे पुण्य त्याच नराधमाने मिळविले-घ्या पुन्हा कायस्थाच्या विरुद्ध कायस्थ! आणि काय आश्चर्य ते पहा, हे सगळे दिव्य महात्मे सातारच्या पापभूमीत रुजलेले गाजलेले आणि कुटील कारस्थानांत कुजलेले! आमचे शूरवीर मर्द कारखानीस बंधूहि त्याच हवेत वाढलेले आणि छत्रपतींच्या रक्ताने चिंब भिजलेल्या व भोसले घराण्याच्या प्राणान्तीच्या ऊर्ध्वाने मंतरलेल्या कागदपत्रांच्या गळाठ्यांवर लोळलेले!! अर्थात् त्यांनी केलेले वर्तन परंपरेच्या त्रयराशिकांत किती 'फिट्' बसणारे आहे, याचा विचार जनतेनेच करावा. शिवाय, सध्यां आम्ही प्रतापसिंहकालीन सातारा प्रकरणांतल्या राष्ट्रद्रोह्यांची चरित्रे रंगविण्याच्या कामांत गर्क असल्यामुळे एखाद्या शिंदकराचे वारे कारखानीसांच्या आंगांत संचरले नसते, तर आम्ही लिहीत असलेला इतिहास कदाचित् कादंबरीहि ठरण्याचा बराच संभव होता. पण आता आमची पक्की खात्री झाली की सध्याच्या महाराष्ट्रांत कागदपत्रांबद्दल खोटेनाटे आरोप करणारे सुशिक्षित ग्रॅज्युएट कारखानीस बंधु नमुन्याला आढळतात. तर 'शंभर वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रां'त खोटेनाटे दस्तऐवज करून 'रुपयाला सोळा साक्षीदार' मिळविणारे शिंदकर केळकर हैबती ही खात्रीने काल्पनीक पात्रे नसावी!

***

कागदपत्रांचा आरोप आमच्यावर करतांना ठाकरे व्यक्तीच्या गेल्या २२ वर्षांच्या व्यावहारीक चरित्राच्या प्रत्येक तपशीलावर पितृवत् कळकळीची नजर ठेवणाऱ्या व त्याच्या सर्व कर्तव्यांची पावले पद्धतशीर नियमन करणाऱ्या किती श्रेष्ठ विभूती व सन्माननीय गृहस्थ त्याच्या पाठीशी उभे होते, याची कल्पना अल्लड कारखानीस बंधूंना झाली नाही. ती होऊं नये हे अगदी सहाजीक आहे. ऐषआरामाच्या फाजील लाडांत वाढलेल्या व घोकंपट्टीच्या पुण्याईवर ग्रॅज्युएटगिरीपलीकडे व्यवहारज्ञान नसलेल्या या वीरांना प्रबोधनाच्या शक्तीची कमावणी कोणत्या स्वाध्याय-तपश्चर्येवर झालेली आहे आणि कोणकोणते महात्मे त्याच्या शीलाची व कर्तव्याची तेजस्विता अव्यंग राखण्यासाठी रात्रंदिवस त्याच्या कार्यक्रमावर नजर रोखून बसलेले आहेत, याची काय कल्पना असणार? ठाकऱ्यांचा जन्म अप्रसिद्ध घराण्यांत व दारिद्र्याच्या उकिरड्यांत जरी झालेला असला, तरी कुलीनपणाचा आणि खानदानीचा लटका तोरा मिरविणाऱ्या नामर्दानो, त्यांच्या चारित्र्यावर व शीलावर निंदेचा एकच शिंतोडा उडविण्यासाठी तुम्हांला तुमच्या बेचाळीस बापजाद्यांची पुण्याई सातारच्या चव्हाट्यावर लिलांवाने फुंकावी लागेल, हे लक्षांत ठेवा. आज १४ वर्षे दादरला आम्ही रहात आहोत. सर्व दर्जाच्या श्रेष्ठ कनिष्ठांशी आमचा व्यवहार व

परिचय आहे. आमच्या स्वतंत्र मतांबद्दल पुष्कळांची नापसंती असेल, पण-पण आमच्या शीलावर सद्वर्तनावर किंवा दिनचर्येवर 'चीटींग, फ्रॉड ॲन्ड लाईंग' (ठकबाजी, लुच्चेबाजी आणि असत्य भाषण) यांचा घाणेरडा आरोप करणारी एक तरी व्यक्ति या मुंबईलत्त्याला दाखऊन द्या, नाहीतर आपल्या खानादानीवर आणि कुलीनपणावर रखरखीत निखारे ठेवा. श्रीमंतांच्या कारट्यांना तेवढी अब्रूची चाड असते आणि आमच्यासारख्या दरिद्र्यांना मुळीच नसते, अशी का या थोर श्रीमंती चोचल्यांत वाढलेल्या शहाण्यांची समजूत आहे? रावसाहेब, आपण वटवृक्षासारख्या भव्य मुळांच्या कुळांतल्या दिव्य पारंब्या असलात, तरी एखाद्याच्या शीलावर शिंतोडे उडविण्यापूर्वी निदान जातीच्या इभ्रतीच्या इतिहासाला पाठमोरे होऊ नका. प्रबोधनकाराच्या ऐहिक सर्वस्वाची राखरांगोळी झाली तरी बेहेत्तर, पण त्याच्या जीव की प्राण अशा शीलाला कोणी बोट लावले तर तो आकाशपाताळ दणाणून सोडल्याशिवाय मात्र रहाणार नाही. त्याच्या मतांबद्दल त्याची मनमुराद निंदा करा. त्याच्या कडव्या विचारसरणीचा खुशाल जाहीरसभेत अत्यंत जहाल भाषेत निषेध करा. तो स्पृश्यास्पृश्य भेद मानीत नाही, अस्पृश्याच्या हातचे खातो, सुहेर सुतकासारखे विधी पाळीत नाही, म्हणून त्याला जातिबहिष्कृत करा. तो विधवा पुनर्विवाहाचा कट्टा पुरस्कर्ता किंवा हुंड्याची भाड खाणाऱ्या कॉन्फरन्सद्रोह्यांचा कट्टा द्वेष्टा म्हणून त्याला वाळीत टाका. पण त्याच्या शीलाकडे बोट दाखवाल, त्याच्यावर ठकबाजीचा आणि खोटे बोलण्याचा आरोप कराल, तर प्रबोधनकार ज्या महाराष्ट्रीय जनार्दनाचा बंदा सेवक आहे, तो जनार्दन तुमचा कान पकडून जाब घेतल्याशिवाय सोडणार नाही. सच्छील आणि सद्वर्तन हे आमच्या सर्व चळवळीचे भांडवल आहे, आमचा प्राण आहे, त्या प्राणावर हल्ला करतां काय? कारखानीसंच्या अपशब्दांचा तोफखानी मारा प्रत्यक्ष सुरू असतांना राखलेली स्थितप्रज्ञ स्थिति या विचार व्यक्तिकरणाच्या वेळी राखवत नाही; याबद्दल सज्जनांनी क्षमा करावी. शीलावर आघात करून प्रबोधनकारांचा पाडाव करण्याचे कारस्थान सिद्धीस जाणे शक्य नाही.

***

कागदपत्राच्या आरोपाचा खोडसाळपणा प्रगट करण्यापूर्वी श्री. दत्तोपंत कारखानीस यांचा व आमचा संबंध किती क्षणिक व कसा आला, याची माहिती स्पष्ट जाहीर करणे अवश्य आहे. यांत कांही प्रसिद्ध व मोठमोठ्या गृहस्थांचा नामनिर्देश करणे भाग पडत आहे, याची त्या सज्जनांनी क्षमा करावी अशी हात जोडून प्रार्थना आहे. ज्या गोष्टी प्रसिद्ध झाल्या नसत्या तर जगाचे कांही अडले नसते, त्या आतां स्पष्ट बोलून दाखविण्याचा प्रसंग दुर्दैवाने कारखानीसांनीच आणला म्हणावयास हरकत नाही. कोणी मनुष्य कितीहि मोठा असो, आम्ही होऊच त्याची भेट घेण्याचा किंवा परिचय करण्याचा आजपर्यंत प्रयत्न केला नाही. यदृच्छेने प्रसंगवशात् परिचय झाला तर झाला. अशी आमची एक प्रकारची बेपर्वा प्रवृत्ति आहे आणि आज मुंबईपासून नागपुरापर्यंत आणि इकडे बेळगांवच्या पुढे गोव्यापर्यंत ठिकठिकाणी जे अनेक मोठमोठे ग्रंथकार इतिहासज्ञ कवि देशसेवक पुढारी या गरीब प्रबोधनकाराला आपलेपणाच्या नात्याने वागवितात, त्या सर्वांचा परिचय करून देण्याची पुण्य कामगिरी यदृच्छेनेच केलेली आहे. प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ झाले नसलेले परंतु पत्रद्वारे आपल्या प्रेमरज्जूंतील चैतन्य अखंड ठेवणारे प्रेमळ बांधव सबंध महाराष्ट्रांत शेकडों आहेत. अशा स्थितीत सन १९१८ सालापर्यंत श्रीमंत दत्तोपंत कारखानीस हे कोण आहेत, किती श्रीमंत आहेत, त्यांचा सरकार दरबारी दर्जा काय आहे, त्यांचे

घराणे किती उंच जोत्याचे आहे, त्यांचा जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांचा खजिना केवढा आहे वगैरे गोष्टींची विचारपूस करण्याची आम्हाला कांही पर्वा नव्हती आणि या श्रेष्ठ गृहस्थाची कांही माहितीहि आम्हाला नव्हती. त्या वेळी आम्ही 'ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास' लिहीत होतो. राजवाडे प्रकरणाची शेवटली किंवा उरकिण्याच्या धामधुमीची चळवळ जातीत सुरू होती आणि श्रीमंत द्वारकानाथ राजाराम उर्फ बाळासाहेब वैद्य B. A. L. C. E. J.P. यांच्या अध्यक्षतेखाली एक एक्झिक्युटिव कमिटी स्थापन होऊन, ज्ञानकोशासाठी व राजवाडे प्रकरणासाठी ज्ञातीची ऐतिहासिक माहिती गोळा करण्यासाठी एक प्रश्नावलीचे हस्तपत्रक सर्वत्र प्रसृत करण्यांत आले होते. त्या कमिटीत बरेच सन्मान्य गृहस्थ होते. आमचे त्या वेळचे सहकारी श्री. विनायक सीताराम जयवंत हे सेक्रेटरी होते आणि त्यांनी व आम्ही कोणाकडून कांही कागदपत्रे किंवा माहिती आलीच तर तिची वाजवी किंमत ठरवून, वेळोवेळी श्री. बाळासाहेबांकडे रिपोर्ट करावयाचा, अशी कामे होती. जातीची जागृति हिमालयाच्या बर्फाइतकी जळजळीत असल्यामुळे कोणाकडून कसलेहि चिठोरे आले नाही. उलट १५-२० रुपयांचा पोष्टखर्च झाला तो श्री. जयवंतांनी सहन करून ते स्वस्थ बसले. एक दिवस श्री. बाळासाहेब वैद्यांकडून आम्हाला अशा अर्थाची चिठी आली की ''सातारचे कोणी दत्तोपंत कारखानीस नांवाचे गृहस्थ माझ्या विनंतीवरून कांही जुने कागदपत्र घेऊन आले आहेत. तुम्ही ते जाऊन पहा. आपल्या कार्याला त्यांतले कांही उपयोगी पडण्यासारखे असलेच तर त्यांची एक तपशीलवार यादी करून कागद चार्जमध्ये घ्या व यादी सही करून माझ्याकडे पाठवा ह्मणजे मी ती माझी 'कौंटर सिग्नेचर' करून कारखानीसांना देईन.'' ही चिठ्ठी श्री. मार्तंड आत्माराम शृंगारपुरे घेऊन आले. त्याप्रमाणे रात्री ८।। वाजता आह्मी श्री. शृंगारपुरे, श्री. यशवंतराव राजे व आणखी दोन तीन मंडळी (नांवे आतां स्मरत नाहीत) राऊताच्या वाडीत श्री. दत्तोपंतांच्या भेटीस गेलो. त्यांनी योग्य ते आगतस्वागत केले. आमच्यापूर्वी सरासरी १५-२० मिनिटे श्री. बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी हे येऊन कांही कागदपत्र पहात होते. श्री. दत्तोपंतांनी एकेक पुडके दाखवून यांत अमूक आहे तमूक आहे वगैरे माहिती देण्यास सुरुवात केली. आम्ही त्यांना म्हटले ''हा तर मोठाच संग्रह आहे आणि याचे नुसते वाचनच व्हायला कितीतरी दिवस लागतील. श्री. बाळासाहेब वैद्यांचा मला निरोप आला आहे, त्याप्रमाणे आपल्याला जे कागदपत्र द्यावयाचे असतील, त्याची तपशीलवार याद आपण उद्यांचा दिवस बसून करू. आतां नुसते हे कागदाचे वर्णन ऐकून काय फायदा?'' त्यावर श्री. दत्तोपंत म्हणाले ''माझ्याजवळ कसकसली कागदपत्रे आहेत, हे तुम्हां सर्वांना दाखविण्याकरितांच मी येथे ही घेऊन आलो. आतां ११ च्या गाडीने मी साताऱ्यास परत जाणार. तिकडे गेल्यावर हा गळाटा प्रथम नीट व्यवस्थित 'अरेंज' करतो व महत्वाच्या कागदांच्या नकला तुम्हाला पाठवून देतो. अस्सल कागद मी कधीच कोणाला देत नाही.'' यावर आम्ही 'ठीक आहे. येतो' म्हणून उठलो. श्री. दत्तोपंत म्हणाले ''पण नुसते कागद तर पाहून ठेवा.'' यावर आम्ही स्पष्ट जवाब दिला ''खरे पुसाल तर मी सहसा या जुन्या कागदांच्या लावालावीच्या भानगडीत पडत नाही. कोणी आयता मजकूर शिजवून दिला तर ग्रंथाच्या ताटांत व्यवस्थेने वाढण्याचे काम माझे. मी फक्त वाढप्या आहे, आचारी नव्हे.'' यावर थोडा हास्यविनोद होऊन आम्ही सर्व परत आलो. हा सर्व प्रकार १५-२० मिनिटांतच आटोपला. आम्ही सर्व उभ्याउभ्याच चटकन परतलो कां, याचे मर्म श्री. दत्तोपंतांनी तेव्हांच ताडले. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजतां ते व त्यांचे धाकटे चिरंजीव सदाशीव (वडिलांचे नुसते

नांव घेताच आमची गचांडी पकडणारे मर्द वीर) आमच्या बिऱ्हाडी आले. त्यावेळीहि श्री. शृंगारपुरे हजर होते. ''काल रात्री तुम्ही तसेच तडक परत आलां, तेव्हां तुमचा काही गैरसमज झाला असावा असे मला वाटते. म्हणून रात्री मी निघून न जाता आज राहिलो.'' असा श्री. दत्तोपंतांनी प्रस्ताव केला. आम्ही त्यांना खुलाशाने समजाऊन सांगितले की ''गैरसमजाचे कांहीच कारण नाही. माझा स्वभावच जरा बेपर्वा आहे. त्याचा तुमच्या मनावर कांही भलताच ग्रह झाला असेल तर तो साफ काढून टाका. श्री. वैद्यांच्या निरोपाप्रमाणे तुम्ही यादहि करीत नाही व अस्सल पत्रे देण्याची तुमची वहिवाट नाही आणि ती जबाबदारी मीहि पण घेऊं इच्छित नाही. आपण म्हणतां ''मी नकला पाठऊन देईन.' ठीक आहे. त्या आल्यावर काय उपयोग होईल तो अवश्य करीन.'' यानंतर इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी झाल्यावर श्री. दत्तोपंत आमचा प्रेमाने निरोप घेऊन गेले. बस्स! या दोन वेळच्या भेटीशिवाय त्यांचे व आमचे या घटकेपर्यंत दर्शन नाही मग भाषण कुठले? झालेला मजकूर त्याच दिवशी आम्ही स्वतः श्री. बाळासाहेब वैद्यांच्या बंगल्यावर जाऊन त्यांना श्रुत केला. हा गृहस्थ जुन्या कागदपत्रांचे गाठोडे उरापोटांवर वाहून साताऱ्याहून दादरला आणतो काय आणि 'नुसते दाखविण्यासाठी आणले होते' म्हणून परत नेतो काय, याचे त्यांना फार आश्चर्य वाटले. 'जाऊं द्या. आपल्याला गरज नाही. तुम्ही जा.' असे त्यांनी सांगितले व हे प्रकरण खरे पाहिले तर येथेच समाप्त झाले.

श्री. बाळासाहेब वैद्यांच्या शिफारशीवरून, ते स्वतः सर्व जबाबदारी घेत असतांहि, ज्या गृहस्थाला आमच्यावर विश्वास ठेवणे जड गेले, त्यांच्याकडून कसल्याहि चिठोऱ्याची व कोणत्याहि मदतीची आम्ही कधी अपेक्षाच केली नाही. मात्र त्यांनी दाखविलेल्या अविश्वासाचा अधिक स्पष्ट खुलासा करण्यासाठी आम्ही श्री. दत्तोपंतांना एक सणसणीत पत्र लिहून पाठविले. त्याची नक्कल ठेवलेली नाही. वर घडलेल्या प्रकाराचा सारांश त्यांत लिहून, इतका गैरविश्वास दाखविण्याची कांही आवश्यकता नव्हती वगैरे मजकूर अत्यंत निर्भिडतेने त्यांत लिहिल्याचे खास स्मरते. या एका पत्राशिवाय सबंध कारखानीस घराण्याचा व आमचा दुसरा कांहीएक व्यवहार स्मरत नाही. हे पत्र बाहेर येत असेल, तर आमच्यावर कारखानीसांनी आणलेला कागदपत्राचा आळ किती खोडसाळ व दुष्ट बुद्धीचा आहे. हे तेव्हांच सिद्ध होईल. पण ते बाहेर येणे शक्य दिसत नाही कारण मर्द प्रोफेसर विष्णुपंत कारखानीस (यांची आमची पूर्वी कधी तोंड ओळख सुद्धा नव्हती.) जेव्हां आपल्या भावाच्या स्मरणशक्तीवर फाजील विश्वास ठेऊन, आमच्यावर ठकबाजी व खोटे बोलण्याचा आरोप ठांसून करू लागले, तेव्हां आम्ही त्यांना या पत्राचे स्मरण दिले. फर्ग्युसन कॉलेजात भाषाविषय शिकविणारे हे भाषाशास्त्री आपल्या विद्वत्तेला एकवटून म्हणाले ''ते तुमचे पत्र शौचकूपांत फेकून त्यावर आम्ही सर्व मंडळींनी शौचविधि केला. तीच त्याची किंमत.'' अर्थात् ते पत्र पुढे आणण्यासाठी प्रोफेसर विष्णुपंतांना त्याच शौचकूपांत खोल जावे लागणार आहे, हे उघडच होते.

***

मध्यंतरी तंजावर प्रकरणाच्या बाबतीत कांही ऐतिहासिक व पौराणिक मुद्यांची चर्चा करण्यासाठी कै. शाहु छत्रपति सरकार यांच्या खास आमंत्रणावरून कोल्हापुरास गेलो असतां, दिवाणसाहेब सबनीस यांनी श्री. दत्तोपंतांचे नांव काढले. छत्रपतींनीहि आम्हाला साताऱ्यास जाण्यास सांगितले. दिवाणसाहेबांनी एक सीलबंद प्रस्तावपत्रहि आमच्या हवाली केले. परंतु पूर्वी दादरला घडलेला सर्व प्रकार आम्ही त्यांना निवेदन केला आणि स्पष्ट सांगितले की ''आम्ही होऊन तरी निदान या गृहस्थाची पायरी चढणार नाही.

आपण आपल्या जबाबदारीवर कागदपत्रे मागविलीत तर मी ती पाहीन, यापलीकडे कारखानीसांशी अधिक संबंध मी ठेवूं इच्छित नाही.'' त्यानंतर दोन चार वेळा छत्रपतींनी या सातारच्या कागदपत्रांचा उल्लेख मुंबईस दिवाणसाहेबांच्या समक्ष केला होता, आणि त्यांना ही हकिकत समजल्यावर ते म्हणाले ''दत्तोपंताला असे करण्याचे कारण नव्हते. माझे पत्र घेऊन तुम्ही साताऱ्याला जा. कसा नाही कागद देत ते पहातो.'' यावर पुन्हा आम्ही स्पष्ट नकार दर्शविला व म्हटले ''असल्या बळजबरीच्या मामल्यांत सरकारनी कृपा करून माझा समावेश करू नये. दत्तोपंतांचा व माझा कांही वैरभाव नाही किंवा तंटाभांडण झालेले नाही. आपले पत्र घेऊन गेलो तर कांही हरकत नाही. पण मी असा कोणाची पायरी चढू इच्छित नाही. आजपर्यंत कोणाजवळ कशाकरिता तोंड वेंगाडले नाही, पुढे वेंगाडण्याची इच्छा नाही.'' ही सर्व भाषणे दिवाणसाहेब सबनीसांच्या समक्ष झालेली आहेत. त्यांचा खरेखोटेपणा ते स्पष्ट सांगतील. मात्र पुढे बऱ्याच महिन्यांनी वरील कलमांत उल्लेखिलेल्या आमच्या पत्रासोबत दिवाणसाहेबांचे सीलबंद पत्र आम्ही कारखानीसांकडे पोष्टाने पाठवून दिले. गेल्या जानेवारीत छत्रपतींनी पुन्हा भेटीस बोलावून प्रतापसिंहकालीन ऐतिहासिक चर्चा केली. त्यावेळीहि हाच प्रश्न पुन्हा निघाला होता. सारांश, कारखानीसाकडचे एकहि चिठोरे आम्ही कधी घेतले नाही, ही गोष्ट गेली तीन वर्षे या मोठमोठ्या लोकांत चर्चेचा विषय होऊन राहिलेली होती. पुढे १६ मार्च १९२२ च्या प्रबोधनाच्या ११ व्या अंकांत (पहा पृष्ठ ८६ कालम २) कलमबहाद्दरांस शेलापागोटे या सदराखाली कै. दिघे, धारचे दिवाण यांच्या चरित्रग्रंथाचे परीक्षण करतांना प्रथमच काढलेले उद्गार वाचकांनी विचारांत घेतले तर या भानगडीचा बराच स्पष्ट खुलासा होईल. ते उद्गार हे :- ''ऐतिहासिक वीररत्नांच्या चारित्र्याचे जुनेपुराणे कागद नीट संशोधन करण्याची तर गोष्टच नको, पण संगोपन करण्याच्याहि कामात महाराष्ट्रीय कायस्थ समाज अत्यंत बेदरकार झाला आहे. बरे, ज्यांच्या हाती कांही कागदपत्र यदृच्छेने लागतात ते गव्हाणीतले कुत्रे बनतात. स्वतःला त्या कागदपत्रांचा जीर्णोद्धार करण्याची अक्कल नाही व दुसरा कोणी करीत असेल त्याला ते देण्याची बुद्धी नाही! असली एक दोन कुत्री साताऱ्यास व बडोद्यास सर्वांच्या परिचयाची आहेत. मराठी स्वराज्यांत कायस्थ समाजाने जी विलक्षण कर्तबगारीची कामे केली त्यांच्या जीर्णोद्धाराच्या देवडीवर हकनाहक बसलेली ही कुत्री सणसणीत लगुडप्रहाराने दूर हाकलून घातल्याशिवाय बराचसा महत्वाचा इतिहास उजेडांत येणे दुरापास्त झाले आहे.'' या विचारांतील खोच काय आहे, हे साताऱ्यांतल्या मावळ्यांना सुद्धा त्यावेळी उमगली होती अझूनहि ती ग्रॅज्युएट कारखानीसांना उमगत नसेल, तर त्यांनी सांडूचे ब्रह्मीतेल डोक्यावर घासावे. असो. आणखी एकच मुद्दा सांगून कलम समाप्त करतो. कारखानीसांचा आमच्यावर मर्दपणाचा हल्ला होण्याच्या पूर्वी अजमासे १५-२० दिवस आमचे परममित्र (व विष्णुपंत कारखानीसांचे श्वशुर) रावसाहेब लक्ष्मण सखाराम पोतनीस इ. अ. नेहमीप्रमाणे आमच्या स्वाध्यायाश्रमांत भेटीला आले होते. हाती घेतलेला ऐतिहासिक ग्रंथ कोठपर्यंत आला याची त्यांनी विचारपूस केली. आम्ही त्यांना झालेली तयारी समजाऊन सांगितली. त्यावेळी सुद्धा त्यांना आपल्या व्ह्याह्यांजवळच्या कागदपत्रांचे स्मरण झाले व त्यावर आमचे त्यांचे बरेच संभाषण झाले. प्रस्तुत हल्ल्याच्या बाबतीत रावसाहेबांची स्थिति विलक्षण कोंडमाऱ्याची झाली आहे, हे आम्ही जाणून आहोत. खरे मत द्यावे तर २१०० रुपयाचे जावईबोवा चिरडतात. खोटे सांगणे हे तर निदान रावासाहेबांच्या योग्यतेच्या सज्जन माणसाकडून घडणेच नाही. त्यांची व आमची नेहमीच

बैठक होत असते व गेल्या ३-४ वर्षात दोघांमध्ये जो अनेक विषयांवर विचारविनिमय झाला आहे, त्यावरून तरी ठाकरे 'ठकबाजी लुच्चेगिरी व खोटे' कर्म करणारे आहेत किंवा कसे, या विषयी आपल्या जावईबोवांची ते कानउघडणी करू शकतील. सासऱ्याला जावयाचे कान उपटण्याचा अधिकार खास असतो. या भेटीच्या वेळी रावसाहेबांनी जे उद्गार काढले व वचन दिले ते आम्ही शब्दशः येथे दिले असते. परंतु प्रस्तुत प्रकरणांत त्यांनी न्यूट्रॅलिटी स्वीकारल्यामुळे तितकीच वेळ येईपावेतो आम्हीहि त्या न्यूट्रॅलिटीवरचा पडदा उघडू इच्छित नाही.

***

गेली पंधरा वर्षे आम्ही इतिहासविषयावर चालविलेला व्यासंग ग्रंथरूपाने महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाचा झालेला आहे. त्यावरून कोणालाहि असे आढळून येईल की आम्ही नेहमी छापील आधारांवरच खंडनमंडनाचे कार्य करीत असतो. जुनी कागदपत्रे घेऊन त्यांच्या लावालावीची माथेफोड आम्ही कधीच करीत नाही. कोणी आयता मजकूर दिलाच तर तेवढ्यापुरता अस्सलाशी तरजुमा पहातो. या पलीकडे हस्तलिखितांचा संग्रह करणे किंवा त्यासाठी कोणाचे उंबरठे झिजविणे, ही कामे आमची नव्हेत. सन १९१० पासून आजपर्यंत अनेक सज्जनांनी आम्हांला आपापल्या संग्रहीची शेकडो अस्सल पत्रे आणून दाखविली. कित्येकांनी बरीच छापील ऐतिहासिक पुस्तके 'तुमच्या उपयोगी असतील तर घ्या' म्हणून बक्षिस दिली. या मंडळींची नुसती नांवेच देऊ म्हटले तर एक लांबलचक यादी होईल. तिगस्त साली रावबहादुर डोंगरे यांनी आपला सर्व ऐतिहासिक ग्रंथसंग्रह आमच्या स्वाध्यायाश्रमाला अर्पण केला. ग्रामण्यांचा इतिहास लिहीत असतां तर अनेक दूरदूरच्या भिन्नभिन्न जातीय सज्जनांनी आपण होऊन शेकडो सनदा पत्रे व बखरी आमच्या हवाली केल्या. परंतु त्यांपैकी एकाचाहि आमच्यावर कोणत्याहि प्रकारचा अप्रमाद आलेला नाही. ज्याची वस्तु त्याच्याकडे बिनचूक पोचती झालेली आहे. पुण्याचे 'विश्वब्रह्मवृत्त' मासिकाचे संपादक वे. शा. सं. बाळशास्त्री रावजीशास्त्री क्षीरसागर व सातारचे आमचे परममित्र विश्वब्राह्मण नारायणराव बळवंत वाळवेकर यांच्याकडील कागदपत्रे तर इतकी मौल्यवान् व महत्वाची की जी त्यांनी आपल्या स्वज्ञानियांच्याहि कधी दृष्टीस पडू दिली नाहीत, ती ते स्वतः आमचेकडे घेऊन आले, एक महिनाभर आमचे येथे ठेवली व आम्ही ती त्यांना सुखरूप परत पाठविली. कारखानीस वीरांनो, या गृहस्थांना जाऊन विचारा ठाकरे किती ठकबाज आहेत ते. मुंबईचे सुप्रसिद्ध नागरीक व डॉक्टर फिझिशन श्री. दिनानाथ बाळकृष्ण दांडेकर L. M. S. आज आमचे दीडतपाचे स्नेही आहेत. त्यांनीहि अस्सल सनदापत्रांचा आमच्याशी व्यवहार केला आहे व अनेक ग्रंथहि नजर दिलेले आहेत. श्रीमंतीच्या दिमाखांत सोटेशाही मिरविणाऱ्या कारखानीसपुत्रांनी त्यांना किंवा डॉ. रावबहादुर जोशांना विचारायला जा की ठाकरे यांनी तुमचे कोणकोणते कागदपत्र गिळून टाकले? मॉडर्न रिव्ह्यूतर्फे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'स्टोरी ऑफ सातारा' नामक ग्रंथासाठी आमचे बंगाली मित्र श्री. रामानंद चतर्जी यांची आमची कागदपत्रांची पुष्कळ देवघेव झाली; त्यांचे कोणकोणते कागद आम्ही खाल्ले, ते त्यांना विचारायची तुमची लायकी आहे काय? प्रो. गोविंद गोपाळ टिपनीस हे आज आमचे २० वर्षांचे स्नेही आहेत व ऐतिहासिक शेकडों कागदांची त्यांची आमची देवघेव असते. ठाकऱ्यांवरील ठकबाजीच्या आरोपाचा निषेध करणारा त्यांचा एकच शब्द तुमच्या पत्रावळी एवढ्या विस्तीर्ण घराण्याची कंबर मोडण्यास समर्थ आहे. प्रबोधनकाराची तरूण लेखणी ज्यावेळी प्रथमच

इंदुप्रकाशाच्या कॉलमांत आपली उमेदवारी कसरत करू लागली, त्यावेळी ग्रॅज्युएट कारखानीसांनो तुम्ही शेणांत लोळत असाल. लेखक आणि वक्ता या नात्याने श्री. शेट दामोधर सांवळाराम यंदे ठाकऱ्यांना आज गेली तब्बल २२ वर्षे ओळखत आहेत. तोंड असले तर त्यांना जाऊन विचारा आम्ही किती ठकबाज व खोटे बोलणारे आहोत ते! अशी नुसती यादीच देत बसलो तर लेकाच्यांनो चक्कर येऊन बेशुद्ध पडाल. कशाला मारतां एवढा प्रतिष्ठितपणाचा डौल. हंडाभर हुंड्याच्या प्रमाणावर स्वतःची श्रेष्ठता व विद्वत्तेची डिग्री ठरविणाऱ्या ज्ञानलवदुर्विदग्धांनो, प्रबोधनकाराची मते कशीहि असली, तरी त्याच्या शीलाला लवमात्र कोणी धक्का लावताच सारा महाराष्ट्र त्याला खायला उठेल, याची तुम्हांला कल्पनाहि झालेली नसेल. ज्या साताऱ्यांत तुमचा जन्म गेला तो सातारा तुम्हाला जाब विचारल्याशिवाय सोडील काय? श्रीमंतीच्या वशिल्यावर 'रुपयाचे सोळा साक्षीदार' उबवून काढण्याची कला सातारच्या हवेत चांगली साधते. पण एकांतवासांत लेखनतपश्चर्या करणाऱ्या गरीब प्रबोधनकाराच्या कार्याच्या अभिमानासाठी, मोठमोठ्या सज्जन मित्रांची तर गोष्टच नको, एकजात मराठी रयत विराट स्वरूपाप्रमाणे आ पसरून तुमच्यापुढे उभी राहिल्याशिवाय खास रहाणार नाही, हे ध्यानात ठेवून आपल्या उर्मटपणाचा पारा झीरो डिग्रीवर आणा, अशी आमची प्रेमाची सूचना आहे.

***

विश्वासाने आमच्या ताब्यांत दिलेल्या कागदपत्रांबद्दल एकच गोष्ट सांगून टाकतो. कै. शाहू महाराज छत्रपति यांनी सुमारे दोन वर्षांपूर्वी एक दिवस अवचित एक पेटारा आमच्याकडे पाठवून दिला, आणि एक चिठ्ठी पाठविली की हे धर्मग्रंथ तुमच्या उपयोगी पडण्यासारखे असल्यास ठेवावे. पेटीत सात आठ मोठमोठे हस्तलिखित पुराण ग्रंथ होते, व कांही छापील ग्रंथ होते. हा पेटीचा व्यवहार 'खास हुजूर तर्फे' झालेला असल्यामुळे, छत्रपति आम्ही व पेटी आणणारा या तिघांपेक्षा इतरांना त्याची माहिती असणे शक्यच नाही, आणि हा अस्सल ग्रंथसंग्रह आम्ही कै. छत्रपतींच्या चिठ्ठीप्रमाणे ठेऊन घेतला असता तरी कोणी आमचे कान कापण्यास समर्थ झाला नसता. परंतु ज्या ग्रंथांचा आम्हाला उपयोग होण्यासारखा नाही, तो नुसता जवळ बाळगण्यापेक्षा जिकडच्या तिकडे रवाना केलेला बरा, दुसऱ्या कोणास उपयोगी पडेल, अशी आमची नेहमीचीच पद्धत आहे. त्याप्रमाणे कै. शाहुमहाराजांच्या मृत्यूनंतर गेल्या सप्टेंबर महिन्यांत वे. शा. सं. गुंडोपंत पिशवीकर, श्री. ताम्हनकर स्टेट प्लीडर व श्री. प्रभावळकर हे आमच्या भेटीस आले असतां धार्मिक विषयावर चर्चा झाली. त्या वेळी आठवणीने आम्ही आपण होऊन तो पेटारा त्यांच्या मार्फत कोल्हापुरास रवाना केला. दुर्मिळ धार्मिक ग्रंथ स्वाधीन होतांच आमच्या गुंडोपंतांना अत्यानंद झाला. या गोष्टीची शहानिशा व खरेखोटेपणा सिद्ध करायला उपरिनिर्दीष्ट मित्रमंडळी समर्थ आहेत.

***

क्षणभर असे गृहीत धरले की कारखानीसांच्या भवितव्यतेच्या तंगड्या अज्जीबात मोडण्याइतक्या अत्यंत अत्यंत अत्यंत महत्वाचा एखादा खुद्द परमेश्वरदत्त ताम्रपट आम्ही उकडलेल्या बटाट्याप्रमाणे खाऊन पचविला. सत्यवादी कारखानीस महात्मे त्याची मागणी करण्यासाठी आले असतांना, समजा, आम्ही ती गोष्ट साफ नाकारली. तर त्यांनी मुकाट्याने उठून जायचे व आमच्यावर पुराव्यासह कायदेशीर इलाज करायचा. ते सोडून हुंडा शायलॉकांच्या जंत्रीवर, आमच्या लायकीवर, सातारच्या

शिवाजी उत्सवाच्या मंडळीवर, आमच्या 'गाढवपणाच्या' व्याख्यानावर अपशब्दांची असभ्य लाखोली वाहाण्याचा व हातांतील छड्या परजीत मारामारीची धमकी दाखविण्याचा 'गाढवपणा' करण्याची या ग्रॅज्युएट घोड्यांना काय जरूर? असा सरळ प्रश्न उद्भवतो. कायस्थांच्या मराठ्यांच्या, नव्हे अखिल ब्राह्मणेतरांच्या हितसंबंधाचे जुने ऐतिहासिक महत्वाचे लाखों कागद त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनी आजपर्यंत जाळून पोळून खाक केले आहेत. सातारकर महाराजांच्या ज्या बिनवारशी बेदरकार उकिरड्याच्या अवस्थेत पडलेल्या रेकार्डातून कारखानीसांचा कागदपत्री ऐश्वर्याचा डोला सजलेला आहे, त्या उकिरड्यांतून शेकडों गळाठी आजपर्यंत अनेक कोल्ह्याकुत्र्यांनी पळवून मराठ्यांच्या इतिहासाची मान काय थोडीथोडकी कापली? त्यावेळी या शहाण्यांचा इतिहासप्रेमा काय करीत होता? परंतु कारखानीसांवर इतिहासप्रेमाचा आरोप करणे मूर्खपणाचे ठरेल. त्यांच्या खुनशी संतापाच्या मुळाशी (१) सातारच्या शिवाजी उत्सवांत दहा हजार प्रेक्षकांसमोर उत्सव कमिटीच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या वडिलांची बांधलेली महापूजा आणि (२) हुंडा शायलॉकाच्या जंत्रीत 'दक्षिण प्राईज फेलो निसबत फर्ग्युसन कॉलेज' हुंडेमान्य हुडेश्री विष्णु दत्तात्रय कारखानीस (हुल्लडगिरीच्या दुक्कलीतले वडील) यांची प्रबोधनांत आम्ही दिलेली जाहीरात, ही कारणे मुख्य होती. अर्थात् याचा कांही सूड उगविण्यासाठी प्रबोधनकाराशी भांडण्याचे खुसपट काढायला 'तीन वर्षांपूर्वी दिलेल्या' कागदाच्या चिठोऱ्यांची सबब त्यांना योग्य वाटली आणि तो प्रयोग त्यांनी केला. आश्चर्य वाटते ते हेच की हे सत्यवादी महात्मे तीन वर्षे स्वस्थ कां बसले होते? धाकटे वीर सदाशिवराव नेहमी कधीमधी दादरला आमच्या दृष्टीस पडत आणि अलीकडे तर कित्येक महिने भररस्त्यावरच्या चाळीत बिऱ्हाडहि करून असतात. शेकडो वेळां आंगावरून जातात येतात पण ना कधी भाषण की नमस्कार! मग आतां अचानक 'तीन वर्षांनी' त्यांच्या टाळक्यांत हे चिठोरे कुठून उपटले? त्याचे कारण हेच की हुल्लड करायला 'एकसे दो भले' या न्यायाने ते पुण्याच्या वडील बंधूची दादरला येण्याची वाट पहात होते.

***

आम्ही प्रच्छन्न हुंडाविरोधक, किंबहुना हुंडाविध्वंसक आहोत, हे कोणाला नव्याने सांगणे नको. आमची ही चळवळ सन १९०७ सालच्या ठाण्याच्या कायस्थ परिषदेपासून उघड उघड सुरू आहे. त्या वेळी प्रो. टिपनीसांनी लिहिलेले एका बिकट प्रश्नाचा उलगडा नांवाचे हुंडा विषयाची विस्तृत चर्चा करणारे पुस्तक स्वखर्चाने छापवून त्याच्या शेकडों प्रती फुकट वाटल्या होत्या. तिगस्त सालच्या इंदोरच्या परिषदेने या बाबतीत केलेला ठराव आमच्या हुंडा विध्वंसक संघाने जाहिरात देऊन प्रबोधनांत प्रसिद्ध केलाच आहे. अर्थात् त्या ठरावाची अक्षरशः अंमलबजावणी व्हावी असा सर्व हुंडाविध्वंसेच्छु तरूणांचा आग्रह आहे. या आग्रहासाठी ते मोठ्या छोट्यांची भाडभीड धरू इच्छित नाहीत. सरकारी अधिकाराचे जाडजूड कुंकू लागलेल्या किंवा नावाच्या पुढेमागे पदव्यांच्या शिंगेशेपट्यांचे लटांबर बाळगिणाऱ्या प्रतिष्ठितांची त्यांना पर्वा नाही. ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी सुमारे ५० अनुयायांसह आम्ही 'सोशल बोल्शेविस्ट' बनून पद्धतशीर सामाजिक बंड करणार. या कामी धनाढ्य किंवा ऐश्वर्याढ्य धेंडांची आम्हाला पर्वा नाही. पुढच्या परिषदेत तर हुंड्याची प्रत्यक्षाप्रत्यक्ष शायलॉकगिरी करणारांना आम्ही गचांड्या मारून हाकलून देऊ. बंड करू. तुरुंगात सुद्धा जाऊ. राजकीय उन्नतीसाठी तुरुंगाचे हाल भोगावे लागतात, तर सामाजिक व धार्मिक डिमॉक्रसीसाठीच त्यांचे वावडे

का? हुंड्याच्या प्रघाताला मूठमाती देण्यासाठी आज नवमतवाद्यांची सैन्य भरती होत आहे. हे सर्व हुंडा शायलॉकांनी लक्षात ठेवावे. परिषदेचा ठराव हा आमचा कायदा. बस्स! त्याचा अंमल झालाच पाहिजे. हा अंमल होऊ नये अशी इच्छा असेल, तर ताबडतोब सेंट्रल कमिटीने जाहिरनामा प्रसिद्ध करावा की सदर्हू ठराव करतांना सर्व लोकांनी कांही तरी अंमल केला होता, सबब तो ठराव रद्द समजावा. नाहीतर हुंडाशायलॉकांना जबरदस्त सामाजिक शिक्षा काय करावी याची स्पष्ट वाच्यता होऊं द्या.

***

इंदोरच्या परिषदेत हजर असलेले रावसाहेब पोतनीस यांची हुंडानिषेधाच्या ठरावाला परिषदेत टाळ्या वाजविल्यावर सुद्धा जावई म्हणून हुं. हुं. विष्णुपंत कारखानीस यांना २१०० रुपयाला खरेदी घेतले. त्याची बातमी आमच्या पुण्याच्या बातमीदाराने जशी लिहून पाठविली तशी ती छापली. (पहा पृ. १३४ व्हॉ. १) त्यांत 'कोणच्याशा कॉलेजांत (ब) फेलो' अशी माहिती होती. परंतु कारखानीसांनी त्यांत आपली 'बफेलो' अशी मानखंडना झाल्याचे वाटून, डिफेमेशनच्या फिर्यादीसाठी त्यांनी बऱ्याच पदवीधर कज्जेदलालांचा सल्ला घेतला. हुंड्याचा प्रश्न सार्वत्रिक आहे व हुंडेबाजांना नराधम, नरराक्षस पशू यांपेक्षांहि तीव्रतम शब्दांनी प्रत्येक प्रतिष्ठित समाजसुधारकाने निंदलेले आहे व आणखी निंदतील. हुंडा हबकतांना अखिल ज्ञातीच्या एकमुखी आज्ञेची पायमल्ली होत आहे, तिची मानखंडना होत आहे, याची ज्यांना दिक्कत वाटली नाही, त्यांना-त्यांनीच कल्पनेने बसविलेल्या अर्थाप्रमाणे आणि प्रबोधन कचेरीत तिऱ्हाइतांसमक्ष दाखविलेल्या असभ्यपणामुळे-आतां आमच्याप्रमाणेच अखिल दुनियेने बफेलो म्हटले तर ते फारसे गैरवाजवी होणार नाही. आणि उद्यां या हुंडाविध्वंसक चळवळीत एखादा ठाकरे फांसावर गेला म्हणून ही चळवळ बंद पडेल काय? किंवा येत्या लग्नसराईत ५००० रुपये हुंड्यावर कारखानीसांनी एका धनाढ्य कायदेपंडिताशी ठरलेल्या सोइरिकीविषयी संघामार्फत काहीच बंड होणार नाही, अशी या हुंडेबाजांची समजूत आहे काय? ठाकऱ्यांच्या रक्तासाठी तान्हेलेल्या हुंडेबाजांनो जगातली सगळी कायद्याची पुस्तके कोळून प्या. ठाकरे मेलेल्या रक्तावर जगणारा नव्हे. त्याच्या रक्ताचा एक थेंब जमिनीवर पडतांच त्यांतून शेकडो ठाकरे निर्माण होऊन हुंडाशायलॉकांच्या उरावर थै थै नाचतील. ठाकऱ्यांचा बळी घेऊन हुंडाराक्षस जर समाजांतून साफ नष्ट होत असेल, तर आपली मान फांसावर द्यायला ठाकरे केव्हांहि तयार आहे.

***

कारखानीस बंधूंनी फक्त व्यक्तिशः आमच्यावरच शिव्यांची झोड उठविली असती, तर आम्ही या प्रकरणाला फारसे महत्व दिले नसते. परंतु त्यांनी सातारच्या यंदाच्या शिवजयंत्युत्सवाच्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांवर तोंडसुख घेतल्यामुळे या प्रकरणाचा गंभीरपणा विशेष वाढला. शिवाय आमचे साक्षदारांना सुद्धा याच गोष्टीचा संताप आला, हे त्यांच्या पत्रांत विशेष स्पष्ट झाले आहे. श्री. दत्तोपंत कारखानीसांचा व आमचा तीन वर्षांपूर्वी जो अल्प परिचय झाला, त्यावरून आम्हांला खात्रीपूर्वक वाटते की चिरंजीवांच्या या असभ्य हुल्लडीला त्यांची बिलकूल संमति नसावी किंवा त्याची त्यांना दादहि नसावी आणि झाला प्रकार त्यांच्या कानी पडतांच त्यांना खेदहि वाटल्याशिवाय रहाणार नाही. यंदाच्या वर्षी साताऱ्यास शिवजयंत्युत्सव साजरा करण्याचे ब्राह्मणेतर संघाने निश्चित केले व त्याप्रमाणे तीन दिवस मोठ्या उत्साहाने तो साजराहि केला. त्या वेळी मुख्य वक्ते म्हणून आम्हाला पाचारण्यांत

एन ४००६--२५

येऊन आमची वेडीवांकडी सेवा सातारा जिल्ह्यांतल्या सर्व जातीच्या ब्राह्मण ब्राह्मणेतर बांधवांनी गोड करून घेतली त्याचा समग्र तपशीलाचा रिपोर्ट जून महिन्यांतील विजयी मराठ्याच्या तीन चार अंकांत प्रसिद्ध झालेलाच आहे. आजपर्यंत हा उत्सव ब्राह्मण मंडळीतर्फे साजरा केला जात असे आणि तो किती नामधारी उत्सव होत असे; याची साक्ष ब्राह्मणेतर उत्सवाच्या तिसऱ्या दिवशीच्या समारोप प्रसंगी तेथील वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध सन्माननीय ब्राह्मण वकील रा. घाणेकर यांनी भरसभेत दिली. त्यांच्या भाषणाचा उतारा विजयी मराठ्यावरून येथे उद्धृत करीत आहे. रा. घाणेकर वकील म्हणाले ''मी ब्राह्मण आहे. हा कदाचित् अपराध किंवा दोष असला तर त्याला माझा नाइलाज आहे. मी आज ३५ वर्षे सेक्रेटरी नात्याने ब्राह्मणांतर्फे शिवाजी उत्सव या साताऱ्यांत करीत असतो. उत्सवासाठी गांवांतील तेली तांबोळी वगैरे लोक वर्गण्या देत असत. उत्सवांत कीर्तन प्रवचन असा कार्यक्रम असे. परंतु उत्सवात बंदोबस्ताला येणाऱ्या चारपांच पोलिसांसकट, मी धरून सुद्धा, सात आठ डोक्यांच्या पलीकडे कोणी जमत नसत. रसपानाच्या दिवशी मात्र बरीच मंडळी यायची. (कांही श्रोतेः- ते सर्व ब्राह्मणच.) होय. परंतु आजचा आपला ब्राह्मणेतर संघामार्फत तीन दिवसांचा हा प्रचंड जनसमुदाय व त्यांचा उत्साह पाहून मला आनंदाच्या उकळ्या फुटत आहेत. आम्ही ब्राह्मण लोकांनी परवांच्या दिवशी पाठक हॉलमध्ये कोल्हटकरांचे प्रवचन केले. परंतु तिकडेहि १०।१२ च डोकी. मोठ्या प्रमाणावरचा शिवजयंत्युत्सव सातारा शहरांत हा पहिलाच झाला, असे मी आपल्यासमोर कबूल करितो. मी रा. ठाकरे यांची तीनहि व्याख्याने ऐकली. आम्हा ब्राह्मणांच्या हातून असली घाणेरडी कृत्ये घडलेली आहेत, हे मलासुद्धा माहीत नव्हते. असल्या ब्राह्मणांबद्दल, मग ते पूर्वीचे असोत अगर आतांचे असोत, त्यांचा धिःकारच केला पाहिजे. रा. ठाकरे यांनी एक महत्वाचा इतिहास उजेडांत आणून ब्राह्मणवर्गाची जी कानउघाडणी केली आहे ती सर्व ब्राह्मणांनी अवश्य विचारांत घेऊन आपल्या वर्तनांत सुधारणा करावी, अशी येथे जमलेल्या ब्राह्मण मंडळीस विनंती करून व पुन्हा एकदां आपले आभार मानून मी रजा घेतो.'' प्रस्तुत उत्सवांत छत्रपतींच्या मिरवणुकीसाठी कांही घोडे व हत्ती देण्याबद्दल उत्सवाचे चिटणीस श्री. होनराव यांनी श्रीमंत भाऊसाहेब महाराज यांच्याकडे अर्ज दिला होता. श्री. दत्तोपंत कारखानीस हे महाराजचे चिटणीस असल्यामुळे, त्यांच्याकडे हा अर्ज जातांच ''आजपर्यंत हा उत्सव ब्राह्मण मंडळी करीत असे. त्यांना आपण हत्ती घोडे देत आलो. यंदाचा उत्सव करणारी मंडळी सत्यशोधक आहेत. त्यांना ते देऊ नयेत.'' अशा अर्थाचा शेरा मारून तो अर्ज फेटाळून लावला. अर्थात् उत्सवासाठी अखिल सातारा जिल्ह्यांतून पाखरांप्रमाणे जमा झालेल्या हजारो मावळ्यांचा मोठा निरुत्साह झाला. तथापि त्यांनी ठिकठिकाणची तालमी व गावठी वाद्ये यांचा संग्रह करून शिवरायाची मिरवणूक मोठ्या थाटांत काढली. अखेरच्या दिवशी रावबहादूर भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या प्रचंड सभेत समारोप प्रसंगी श्री. दत्तोपंत कारखानीस व श्रीमंत भाऊसाहेब महाराज यांच्या विरोधाबद्दल कार्यकारी मंडळातील दोघां तिघां वक्त्यांनी निषेधात्मक खरमरीत धुळपट काढली, आणि सभेत तीव्र संतापाचे वातावरण खळबळू लागले. हे प्रकरण विकोपास जाऊ नये म्हणून आम्ही स्वतः पुन्हा उठून खवळलेल्या जनसमूहाचे शांतवन केले. इतकेच नव्हे तर विजयी मराठ्यांचा खास बातमीदार तेथे हजर होता, त्यास उत्सवाचा व आमच्या व्याख्यानांचा रिपोर्ट प्रसिद्धीपूर्वी आमच्याकडे तपासणीसाठी पाठवावा अशी विनंती करून, रिपोर्टाच्या मसुद्यांतील कारखानीसांविषयी असलेली सर्व जळजळीत

भाषणे आम्हीच रिपोर्टातून काढून टाकली व फक्त ''श्री. भाऊराव पाटील यांनी सातारचा शिवद्वेष्टा कायस्थ दत्तोपंत कारखानीस याच्या कार्यविरोधी वर्तनाबद्दल कडकडीत भाषेत निषेध केला.'' एवढेच रिपोर्टराचे वाक्य आम्ही कायम ठेवले. ही एवढी खटपट व छाटाछाटी करण्यांत आमचा उद्देश हाच की गैरसमजाने किंवा कोणाच्या चिथावणीने श्री. दत्तोपंतांच्या हातून जरी कांही चूक झाली तरी त्याची विशेष वाच्यता होऊन प्रकरण विकोपास जाऊ नये. याचे आम्हांला बक्षिस काय? तर त्यांच्या चिरंजीव वीरांची अपशब्दांची लाखोली!

***

सातारा जिल्ह्यांतली ब्राह्मणेतरांची जागृति आज किती विकास पावली आहे, ज्ञानासाठी व आत्मसाक्षात्कारासाठी त्यांच्या आकांक्षा किती फुरफुरल्या आहेत, याची श्री. दत्तोपंतांचा वास्तवीक अटकळ व्हायला पाहिजे होती. तथापि तीन दिवसांचा तो प्रचंड जनसमुदाय पाहून त्यांना आपल्या कृतींची मागाहून लज्जा वाटली असली पाहिजे खास. निदान या लज्जेची जाणीव-अति तीव्र जाणीव श्रीमंत भाऊसाहेब महाराजांना झाली व आमच्या हातून हत्ती घोडे सरंजाम न देण्यांत मोठी चूक झाली' अशी कबूली त्यांनी रावसाहेब पोतनीस यांना दिल्याचे, खुद्द रावसाहेबांनीच आम्हाला परवांच्या भेटीत सांगितले. असा वास्तवीक प्रकार असता, अल्लड कारखानीस बंधूंनी उत्सवाच्या कार्यकर्त्यांना 'उनाड, हलकट व दारूबाजांची टोळी' अशी नांवे ठेवावी! त्यांना मन मानेल तशा शिव्या हासडाव्या!! विवेकभ्रष्टतेची ही कमालमर्यादा होय. ज्या उत्सवाने ब्राह्मणांतर्फे सुद्धा घाणेकरांसारख्या वृद्धाच्याहि डोळ्यांतून आनंदाश्रू काढले, त्याला तरुण कायस्थ कारखानीस बंधूंनों तुम्ही 'हलकट दारुड्यांचा बाजार' म्हणतां, हे ऐकून तुमच्या पूज्य वडिलांना काय वाटेल? ज्यांच्या आश्रयावर तुमच्या घराण्याची छोटी मोठी तैनात चालू आहे, त्या भाऊसाहेब महाराजांना काय वाटेल याचा लवमात्र विचार तुम्हांला सुचूं नये कां? ठाकरे आपल्या स्वाध्यायाश्रमांत जरी एकटा बसलेला तुम्हाला दिसला, तरी शिवजयंत्युत्सवाची नालस्ती करतांना सातारा जिल्ह्यांतल्या दहा हजार ब्राह्मण ब्राह्मणेतर बांधवांचे वीस हजार कान त्याच्या सभोवार टौकारून पसरलेले होते, ते तुम्हांला कसे दिसले नाहीत. अरेरे! कायस्थ तरुणांचा असला अवनत नमुना पाहण्याचा दुर्दैवी प्रसंग, परमेश्वरा, आमच्यावर आणण्यापेक्षा, एखाद्या बहिष्कृत अस्पृश्य घेडा भंग्याच्या जातीत जन्म दिला असतास तर तेथे नातूशाही विषवृक्षाची फळे इतकी माजलेली आढळती ना!

साताऱ्यास झालेले आमचे व्याख्यान विजयी मराठा पत्राने आज अखिल महाराष्ट्रांत सर्वश्रुत केलेच आहे. त्यावरून मावळे शाहीर बांधवांनी रचलेले 'दांगडी चालीचे' पोवाडे आज गरीब शेतकऱ्यांच्या झोपडीत सुद्धा मोठ्या आवेशाने गाइले जात आहेत. मुंबईच्या टिळक पत्राने व्याख्यानांतले अनेक उत्कृष्ट उतारे उद्धृत करून त्यावर प्रशंसेची दोन भावनाप्रधान स्फुटेहि लिहिल्याचे पुष्कळांच्या आठवणीत असेल. पण आमचे ज्ञातिबंधू कारखानीसद्वय त्या व्याख्यानाला 'गाढवपणाचे व्याख्यान' असे सर्टिफिकेट देतात. शक्य आहे. इंग्रजी दोन यत्ता जेमतेम ढवळलेल्या ठाकऱ्याचे व्याख्यान असे असणे शक्य आहे. पण ते सतत तीन दिवस आतुरतेने ऐकणारे दहा हजार श्रोतेसुद्धा तसेच की काय, या प्रश्नाचे उत्तर कारखानीसांनी दिलेले बरे! कारखानीसासारखे कुलीन घरंदाज श्रीमंत खानदानी ग्रॅज्युएट इतिहास संशोधनांत पुढे सरसावले असते, तर आमच्यासारख्या 'गाढवां'ना हा रिकामटेकडा

एन ४००६--२५अ

उपद्व्याप करण्याची कांही आवश्यकता राहिली नसती; आणि आमच्या 'लायकी'ची चौकशी करण्याचा प्रसंगहि त्यांच्यावर आला नसता. खरे पाहिले तर आमची इतिहासविषयक धडपड म्हणजे घरचे खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजण्यासारखे आहे. त्यांत व्यक्तिशः आम्हाला फुटक्या कवडीचाहि लाभ नाही. कायस्थांची जात कायदेपंडितांनी, विद्वानाग्रणींनी, सिंगल डबल ग्रॅज्युएटांनी गजबजून गेली आहे, हे आमच्या प्रमाणेच पुष्कळांना माहीत आहे. पण एवढे मोठे राजवाडे प्रकरण पेटले, त्यावेळी हे कायदेपंडित आणि विद्वान् इतिहासज्ञ कोठे मेले होते? येनकेन प्रकारेण प्रबोधनकाराला खाड्यांत घालण्यासाठी कायद्याचा कीस काढणाऱ्या पंडितांनो, तुमच्या जातीची अब्रू नागवी उघडी चव्हाट्यावर ठेवणारांचे कान उपटतांना तुमच्या बुद्धीला कसल्या महिऱ्या आल्या होत्या? शरिराने पाप्याचा पितर असलेल्या ठाकऱ्याला ठारच करायचा असेल, तर ते काम एकाच थापडीचे आहे. पण पोळाप्रमाणे कमावलेली मस्तीची रगच तुम्हाला जिरवायची असेल, तर आमचे परमस्नेही प्रोफेसर माणिकराव यांच्या आखाड्याच्या देवडीवरचा पोरसुद्धां तुमची इच्छा पूर्ण करील.

***

प्रबोधनाच्या प्रिय आश्रयदात्यांनो, क्षमा करा. प्रत्यक्ष हल्ला झाला तेव्हा सुद्धां जो आमची शांतवृत्ति ढळली नाही, ती या लांबलचक विचार व्यक्तिकरणांत संतप्त झाली, त्याची क्षमा करा. कारखानीस बंधूंनी, कृतकर्माचा शांत चित्ताने विचार करा. तुमचे वर्तन पाहून इतर विवेकी कायस्थ तरूण लाजेने खाली माना घालतील. आपल्या ज्ञातीच्या लौकिकाला, सभ्यतेला पारखे होऊ नका. ब्राह्मणेतरांच्या उन्नतीला असा विरोध करू नका. आणि अखेरची हात जोडून विनवणी हीच की विवेकाने वागून आमच्यासारखा प्रसंग दुसऱ्यावर आणूं नका. सात्विक त्वेषाच्या भरांत सत्यप्रतिपादनार्थ व्यक्त झालेल्या उण्यादुण्या शब्दाची क्षमा करा.

***

दुर्दैवाने घडलेला सारा प्रकार पुराव्यांसह जनतारूप जनार्दनाच्या चरणी विनयपूर्वक ठेवला आहे. जनार्दनाने न्याय द्यावा.

ॐ शांतिः शांतिः शांतिः

ता. क. वरील मजकूर छापून झाल्यावर एका मित्राने आमच्या नजरेस आणले की वडील व धाकट्या कारखानीस बंधूंची नावे उलट सुलट पडलेली असावी. आमचा त्यांचा एवढा दाट परिचय कधी जन्मातच झाला नाही तर मोठा विष्णू की धाकटा विष्णू हे आम्ही निश्चयाने कसे सांगणार?

***

ता. ७-१२-१९२२

प्रस्तुत दुर्दैवी प्रकरणाची आपापसांत सभ्यपणाने समंजस तडजोड व्हावी, यासाठी स्थानिक अनेक सज्जनांनी खटपटी केल्या, आणि एवढ्याचसाठी ही पुरवणी नाइलाजाने आज इतक्या उशीराने प्रसिद्ध करीत आहो. ता. २९-११-२२ रोजी रावसाहेब पोतनीस मुद्दाम आमच्या भेटीस आले. आम्ही सर्व खुलासा केला. त्यावेळी इतरही ७-८ दुसरी मंडळी हजर होती. झाल्या गोष्टीबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला आणि म्हटले ''ही गोष्ट दत्तोपंतांना सुद्धां कळली नसेल. कळल्यावर त्यांना वाईट वाटेल. परंतु त्यांचे किंवा माझे या दोघांवर कांही वजन पडेल असा भरंवसा नाही. शिवाय

त्यांना सल्लागार मोठे चमत्कारीक मिळाले आहेत. तथापि मी अवश्य प्रयत्न करीन.'' कागदपत्रांच्या आरोपाबद्दल रावसाहेब म्हणाले की ''ती नुसती 'लेम एक्सक्यूज' आहे, हे मला माहीत आहे. पण त्यांना (कारखानीस ब्रदर्सना) तुमच्या हुंड्याच्या जंत्रीचा राग आला आहे, इतकेच.'' रावसाहेबांनी केलेला सर्वच खुलासा व त्यांना कारखानीसांनी कळविलेल्या खोडसाळ मजकुराचा आम्ही केलेला खुलासा येथे देण्यांत अर्थ नाही. अखेर आम्ही त्यांना सांगितले की 'यावज्जन्मांत असल्या घाणेरड्या भानगडीत मी कधी गुरफटलो नाही. कारखानीसांवर मी क्रिमिनल ट्रेस्पासची फिर्याद लाऊं शकेन परंतु मी कधी कायदेबाजीचा अवलंब केलेला नाही. कारखानीस श्रीमंत आहेत, तेव्हां कायद्याच्या खऱ्या खोट्या कचाट्यांत एखाद्याचा चेंदामेंदा करणे त्यांच्या हातचा मळ आहे. परंतु सभ्यपणाचा कांही अंश त्यांच्यांत उरला असेल, तर त्यांनी, आपण स्वतः (रा. पोतनीस) बाळासाहेब वैद्य, डॉक्टर बेंद्रे आणि गडकरी वकील यांच्या समक्ष-मी देखील नको-केल्या गोष्टीबद्दल दिलगिरी व्यक्त करावी आणि पुन्हा अशा प्रकारचे वर्तन दुसऱ्या कोणाशी करणार नाही अशी शपथ घ्यावी-ती देखील तोंडी, लेखी नव्हे, म्हणजे झाले.'' रावसाहेब ''फार उत्तम'' म्हणून उठले व 'चार पांच दिवसांत कळवितो' म्हणून प्रेमाने निरोप घेऊन गेले. त्यावर त्यांच्याकडून कांही जवाब नाही व तपास करतां त्यांना विशेष कांही करता येईलसेहि दिसत नाही. अखेर नाइलाज म्हणून आज आमचा खुलासा प्रसिद्ध करीत आहोत.

***

श्रीमंत कारखानीस बंधू श्रीमंत आहेत. त्यांचे नातेवाईकहि श्रीमंत आहेत. श्रीमंतीचा धूर डोळ्यावर असल्यामुळे त्यांना कायद्याच्या खटपटी करणे फारसे कठीण नाही. शिवाय त्यांचा व एका भांडवलवाल्या श्रीमंत कायदेपंडिताशी जिव्हाळ्याचा ऋणानुबंध ठरलेला आहे, तेव्हां आमच्या सारख्या धनहीनाला कायद्याच्या अडकित्यांत सुपारीप्रमाणे फोडणे, ही त्यांची सहजलीला आहे. आजपर्यंत जातींतल्या गर्भश्रीमंतांचा किंवा दर्भश्रीमंतांचा ठाकरे फुटक्या कवडीचा ओशाळा नाही, किंवा त्यांच्या आश्रयाची व आशीर्वादाची त्याने कधी याचना केलेली नाही. अर्थात् त्याचा व त्याने हाती घेतलेल्या प्रबोधन-कार्याचा खून करून, ठाकऱ्यांच्या रक्ताच्या तर्पणावर जर कारखानीसांच्या विद्वत्तेला, इभ्रतीला व नाजूक अब्रूला ऐश्वर्य चढणारे असेल, तर त्यांच्या कायदेबाजीला अडथळा कोणी करावा? प्रबोधनाच्या निःस्पृह विचार-प्रतोदांनी विव्हळ झालेले अनेक कायस्थ व ब्राह्मण मित्र कारखानीसांच्या या राष्ट्रकार्याला सढळ हाताने मदत करतील. आमची आजपर्यंतची वेडीवांकडी लेखनसेवा जर खरोखरच निःस्वार्थ सत्याभिलाषाने चालल्याचे महाराष्ट्रीय जनतेला पटले असेल, तर ती सुद्धां प्रबोधनावर एखादे सातारशाही गंडांतर आलेच तर त्याच्या पाठीशी कां उभी राहणार नाही? प्रबोधनाला खाड्यांत गाडणे हे काम फार सोपे आहे, पण त्यावर उभारले जाणारे कायस्थी थडगे आकाशापर्यंत उंच वाढेल, त्याची मात्र कायदेबाजांनी काळजी घ्यावी.

(स्थानिक व बाहेरगांवच्या ज्या अनेक मोठमोठ्या लोकांच्या कानांवर ही बातमी गेली, त्यांनी कारखानीसांच्या तीव्र निषेधाची पत्रे पाठविली आहेत. ती सध्यां मागे ठेऊन घेतली आहेत. व्य. प्र.)

□□□

अग्रलेख

दुनिया झुकती है!

गेल्या दिसेंबरपासून गोव्यास सेंट फ्रान्सिस झेविअर या क्रिस्ती संताच्या प्रेताचे प्रदर्शन उघडण्यांत आले आहे व ते ७ जानेवारी १९२३ रोजी बंद करण्यांत येईल. लाखो लोक गोव्यांत गचडी करून जमले आहेत. रोज हजारों यात्रेकरू आगबोटी व आगगाड्यांतून धूम धांव ठोकीत पंजीम गांठीत आहेत. दरमाणशी सहा आण्याप्रमाणे डोईपट्टी वसूल करून गोवे सरकार आपली तिजोरी आकंठ भरीत आहे. खानावळवाले, हॉटेलवाले, घरवाले, नाटकवाले, पाद्री, त्यांचे अडत्ये, इत्यादिकांच्या उदरी शनि आल्यामुळे, लक्ष्मीचा वरदहस्त त्यांच्या खिशांवर भरपूर पडला आहे; इतका की पुढे बारा वर्षे गोव्यांत जरी दुर्गादेवी दुष्काळ पडला, तरी यांना तूपसाखरेची मुळीच ददात पडणार नाही. आधी, माणसांचे प्रेत इतक्या वर्षे-इतक्या शतके-टिकणेच शक्य नाही, पण सेंट फ्रान्सिसचे प्रेत मात्र जशाचे तसे टिकलेले, हाच बडा चमत्कार! पुन्हा, त्या चमत्कारावर क्रिस्ती धर्माचे वेष्टण आणि राजसत्तेची भरजरी झूल; मग हा चमत्कारीक चमत्कार पाह्यला सारे हिंदुस्थान गोव्यांत कां कोसळू नये! अमेरिकन, जपानी, फ्रेंच, पोर्च्युगीज लोकसुद्धा धांवून आले आहेत; मग चमत्कारांच्या हुल्लडीला चटकन् फसणारे हिंदु लोकच कां पळत जाणार नाहीत! वरचे खालचे आदले मधले झाडून एक जात हिंदु गेल्या महिनाभर गोव्याची यात्रा करीत आहेत. आजपर्यंत अनेक तऱ्हेची हजारों प्रदर्शने झाली. नाना तऱ्हेचे चमत्कार लोकांनी पाहिले. पण सन १५५२ मध्ये चिनांतल्या कँटन बेटांत मरण पावलेल्या सेंट फ्रान्सिसचे प्रेत आज ३७० वर्षे जशाचे तसे शाबूद रहावे, हा मोठाच विलक्षण चमत्कार होय. एवढा मोठा येशू क्रिस्त झाला, पण त्याचे प्रेत टिकले नाही, किंवा टिकविण्याची 'युगत' कोणी काढली नाही. पण सेंट फ्रांसिसची गोष्ट मात्र कांही और खरी. त्याचे प्रेत जशाचे तस्से. ना त्याला घाण, ना सुरकुती, ना फिकटपणा! अगदी जशाचे तस्से!! सन १८५९ साली या प्रेताचे प्रदर्शन केले होते. तेव्हां सुद्धां अगदी जशाचे तस्सेच! शिवाय या प्रेताचे दर्शन घडल्यामुळे नानाप्रकारचे विलक्षण चमत्कार घडतात. आंधळे डोळस होतात, धडशे आंधळे होतात, लंगडे लांबटांगे बनतात, वांझोट्यांना पोरांची लेंढर लागते, दरिद्री श्रीमान होतात, मुके वाचाळ होतात, अशा अफवा अतोनात पसरल्यामुळे तर मुके आंधळे पांगळे आणि थोटे अशा दुर्बळांची गोव्यांत खेचाखेच उडाली आहे. या धडधाकट व दुर्बळ यात्रेकरूंत सर्व धर्मांचे अनुयायी

आहेत. कॅथलिक क्रिस्तीजनांचा तर हा महोत्सवच. अर्थात् त्यांची गर्दी अतोनात झाल्यास नवल नाही. पण आमच्या हिंदु बांधवांनी मात्र त्यांच्या 'अतोनात' गर्दीला 'मूठभर' ठरविली. दगडधोंड्याला शेंदूर फासलेला हिंदूंचा म्हसोबा जर त्यांच्या नवसाला कचकाऊन पावतो; १९१९ सालांत शीवच्या एका कोळणीने उत्पन्न केलेल्या 'मोठ्या बाया' मुंबईलत्त्याला व खाली सर्व कोंकणभर हुतुतू घालतात व मेलेली 'झाडे' थडग्यांतून जिवंत काढतात; आणि गाभाऱ्यांत पाण्याने कोंडलेली शंकराची पिंडी जर आकाशात बोलबोलता म्हातारीला हरभरे भरडण्यास लावून, मुसळधार पावसाची पृथ्वीवर वृष्टी पाडते; तर ३७० वर्षे टिकलेले सेंट फ्रांसिसचे प्रेत हिंदूंच्या नवसाला कां पावणार नाही? भाव तेथे देव, आणि देव म्हणजे कल्पनेचा कानीन पुत्र. कल्पनेचे मन एखाद्या दगडावर बसले काय, किंवा एखाद्या प्रेताला चिकटले काय, तेथे चुटकीसरसा देव उत्पन्न झालाच पाहिजे. हे 'देवाचे ज्ञान' आमच्यासारख्या चिकित्सकाला कसचे होणार? ते श्रद्धावान् लभते ज्ञानम्च्या शागीर्दांनीच अनुभवावे! श्रद्धावान् हिंदूंनी आजपर्यंत वाटेल त्यात देव उत्पन्न केला. मेल्या माणसांच्या नांवाने चांदी सोन्याचे टांक करून त्यांना देव म्हणून देव्हाऱ्यांत पुजले. मेल्या माणसांच्या दहनभूमीवर किंवा थडग्यांवर छत्र्या बांधून त्यांपुढे कपाळे घासली. विजापूरच्या मुल्कमैदानला सुद्धा पुत्रप्राप्तीचे नवस करून, नवस फळल्यावर तिचे तोंड साखरेच्या गोणीने भरले. पण अस्सल माणसाच्या अस्सल प्रेतांत देव पाहण्याची असली देवलोकची संधी हिंदूंना आजपर्यंत लाभली नव्हती. मग त्यांनी गोव्यास भराभर 'गो अवे' कां करू नये बरे?

क्रिस्ती मिशनऱ्यांच्या ज्या विविध चळवळी या देशांत चालू आहेत, त्यांपासून लोकसंग्रहदृष्ट्या आमचे इतर कितीहि तोटे झाले असले, तरी धर्माकडे चिकित्सेने पाहण्याची एक नवीन दिशा त्यांनी हिंदुजनांस दाखविली यात शंका नाही. हिंदुधर्मात घुसलेल्या मूर्तिपूजेचा निषेध; किंवा भुतांखेतांच्या, दगड धोंड्यांच्या, जिवंत माणसांच्या, झाडापानांच्या ठिकाणी देव मानून त्यांच्या पूजनाचा फोलपणा किंवा मूर्खपणा क्रिस्ती विद्वानांनीच विशेष जोराने प्रतिपादल्यामुळे हिंदु समाजांत नवमतवादाची व जुन्या तत्वाचे सार शोधण्याची प्रवृत्ति फैलावली. आज हिंदु धर्माच्या शुद्ध स्वरूपाचे पुनरुज्जीवन करण्याच्या ज्या चळवळी सुरू आहेत, त्यांची प्रेरणा प्रचलीत अशुद्ध हिंदुधर्मावर झालेल्या व होत असलेल्या क्रिस्ती मिशनऱ्यांच्या हल्ल्यांनीच केलेली आहे. असे असता, त्याच क्रिस्ती धर्मियांकडून, हिंदूंच्या दगडी किंवा लाकडी देवांना हसणाऱ्या क्रिस्त्यांकडून, साधुसंतांच्या समाधीपुढे 'जानबा तुकाराम' करीत नाचणाऱ्या वारकऱ्यांची हेटाळणी करणाऱ्या क्रिस्तभक्तांकडून, एका क्रिस्ती संताच्या

प्रत्यक्ष प्रेताचे प्रदर्शन

भरविण्यांत यावे, त्याच्या अकल्पनीय चमत्कारांचा गवगवा करावा आणि खुद्द येशु क्रिस्ताच्या महात्म्यापेक्षाहि या प्रेताचे धार्मिक महत्व भरंवसाट वाढवावे, हा प्रकार कोणाहि विचारवंताची विचारशक्ति स्तिमित करण्यासारखा नव्हे काय? प्रत्येक धर्मांत पुष्कळ संत महंत झाले. हिंदुधर्माचे शुद्ध स्वरूप जनतेला पटविण्यासाठी हजारो साधुसंतांनी या भरतभूमीवर आपल्या ओजस्वी तपस्सामर्थ्याचा प्रकाश पाडला. क्रिस्ती धर्माचा उत्पादक महात्मा येशु क्रिस्त याचे चारित्र्य तर इतके उज्वल आहे की हिंदूंच्या दशावतार परिषदेत त्याला आकराव्या खुर्चीचा मान द्यायला सर्वपाचक हिंदुधर्म मुळीच कांकू करणार नाही. पण एखाद्या संताच्या प्रेतप्रदर्शनावर त्याच्या विशिष्ट धर्माची महति आकाशाएवढी उंच वाढविण्याची कल्पना धाडसी व नाटकी क्रिस्ती मिशनरी डोक्याला जरी कितीहि शोभली, तरी विवेकी

जनतेला हा 'मिशनरी कावा' अत्यंत किळसवाणा वाटल्याखेरीज खास रहाणार नाही.

सेंट फ्रान्सिस झेविअरचे चरित्र आत्मयज्ञाचे अनुपमेय एकटेच तेजस्वी उदाहरण आहे, असे नव्हे. क्रिस्ती धर्मप्रसारार्थ शेकडो स्वार्थत्यागी क्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या जीवांचे बळी दिलेले आहेत. या आत्मयज्ञांतली त्यांची मानवी सहनशीलतेची परमावधी त्यांच्या हाडवैऱ्यांच्या खुनशीपणालाहि अखेर लज्जित करती झाली. सेंट फ्रांसिस हा जेसुऐट पंथाचा पहिला धाडसी मिशनरी. ''या जगांत परमेश्वराशिवाय मी कोणालाहि भीत नाही'' या ब्रीद वाक्याचा हा कर्मयोगी क्रिस्तीधर्मप्रसारक सन १५४१ मध्ये गोव्यास आला आणि ताबडतोब त्याने ''मूर्तिपूजकांच्या सडणाऱ्या आत्म्यांच्या तारणासाठी'' आपले क्रिस्ती धर्मोपदेशाचे पुण्यकार्य धडाडीने सुरू केले. त्याला एतद्देशीयांची भाषा येत नव्हती, म्हणून 'इंटरप्रिटरां' च्या मध्यस्थांच्या द्वारे त्याने ते काम रेटले. तीन वर्षांच्या अवधीत गोव्यापासून तो थेट कारोमांडेल किनाऱ्यावरील प्रदेशाच्या खेड्यापाड्यांत त्याने 'येशूचा संदेश' प्रसृत केला. खेड्यांत प्रवेश करतांच तो प्रथम घंटा वाजवी. मंडळी जमली की प्रवचने देई. त्याने कांही धार्मिक भाग तामील भाषेत पाठ केलेला असे, तो म्हणून दाखवी आणि जे कोणी स्वसंतोषाने व राजीखुषीने क्रिस्ती धर्मात येऊ इच्छीत, त्यांना तो बाप्तिस्मा देई. हा बाप्तिस्म्याचा धडाका इतका चाले की आशीर्वाद देतांदेतां व प्रार्थना म्हणतां म्हणतां तो अगदी थकून जाई, त्याचे हात लुले पडत आणि तोंडातून शब्दहि उमटत नसे. मध्यस्थाची जरूर पुढे पुढे तर त्याला मुळीच भासली नाही. कारण तो म्हणत असे की "I want no interpreter to baptize infants just born" (नुकत्याच जन्मलेल्या मुलांना बाप्तिस्मा द्यायला भाषेच्या मध्यस्थाची मला जरूर नाही.) अशा रीतीने हजारों खेड्यांतल्या बाटलेल्या लोकांना 'नामधारी क्रिस्ती' बनवून, त्यांच्यातील पाद्र्यांच्या देखरेखीखाली त्यांची पॅरिशे स्थापन केली. सेंट फ्रान्सिन एका ठिकाणी म्हणतो की ''अवघ्या एका महिन्यांत मी दहा हजार हिंदु लोक बाटविले.'' हिंदुस्थानांत असला पराक्रम गाजवून सेंट फ्रान्सिस चीन व जपानकडे वळला आणि तेथे आपला धर्मप्रसाराचा आटारेटा उरकीत असता सन १५५२ मध्ये चीनांतील कान्टन बेटा नजीक तापाने मरण पावला, व तेथेच त्याचे शव पुरले गेले. हिंदुस्थानांत बाटवाबाटवीचा कार्यक्रम सेंट फ्रांसिसला फार सुलभतेने यशस्वी करता आला; कारण सगळेच हिंदु चमत्कारप्रिय. या यशाचे माप असे वर्णन केले आहे :-''१५ लाख मूर्तिपूजक या पवित्र धर्माच्या छायेत आले; खऱ्या देवाच्या मानासाठी ४०००० चर्चमंदीरे उभारली गेली आणि ६००० लीगपर्यंत येशूच्या माहात्म्याचे क्षेत्र वृद्धिंगत पावले.'' जपानांत मात्र सेंट फ्रान्सिसची डाळ फारशी शिजली नाही. कारण ''अखेर जपान्यांना असे स्पष्ट उमजले की युरपियन लोक आणि त्यांचा क्रिस्ती धर्म हे एक असहननीय त्रासाचे लफडे आहे. विशेषतः कॅथॉलिकी क्रिस्तीधर्म म्हणजे फिलिपैन बेटे आधीच गिळून बसलेली स्पॅनिश राजसत्ता व पोप यांच्या राजकीय तृष्णेच्या स्वप्नांवर घातलेला विरळ झगाच होय, अशी त्यांची खात्री पटली.'' (औटलैन्स ऑफ हिस्टरी. एच. जी. वेल्सकृत. पृ. ५४३-५४४) सन १८५९ साली प्रस्तुत प्रेताचे प्रदर्शन करण्यासाठी रेवरंड सीतानो जौ पिरीस, गवर्नदोर आर्चीपिस्कोपल याने ता. २६ नवंबर १८५९ रोजी जे एक सर्क्यूलर पत्र प्रसिद्ध केले त्यांत या दीर्घोद्योगी संताची कामगिरी वर्णन केली आहे, ती अशीः- He preaches the Gospel, sheds light on the truth, and dposits the throne of Christ over the ruins of idolatry, impiety and abomination. [सेंट फ्रान्सिसने येशूचा संदेश प्रवचित

केला, सत्यावर प्रकाश पडला आणि मूर्तिपूजा अधार्मिकपणा आणि बीभत्सपणा यांच्या उकीरड्यावर येशूचे सिंहासन स्थापन केले.] गवर्नदोर साहेबांच्या या उद्गाराचा, म्हणजे मूर्तिपूजा व बीभत्सपणाच्या निषेधाचा आणि प्रस्तुतच्या प्रेतप्रदर्शनाचा कसा काय मेळ घालता येईल तो येवो. प्रेतप्रदर्शन आणि मूर्तिपूजा यांत फरक काय आहे, हे आमच्यासारख्या 'प्रकाशांत नसणाऱ्या' चिकित्सकाला आणि मूर्तिपूजक हिंदूला समजणे कठीणच आहे.

हिंदुलोक जात्याच मोठे चमत्कारीक, म्हणजे चमत्कारप्रिय. या चमत्कार-प्रियतेमुळेच त्यांची स्थिति सध्या चमत्कारीक झाली आहे. त्यांतल्या त्यांत धर्माच्या नांवाने जर कांही चमत्कार होत असेल, तर चांगले शहाणेसुर्ते लोकसुद्धा चमत्कारीक बनतात. गावात एखादा गुरूपदेश देणारा मौला किंवा बुवा आला रे आला की शेजेच्या बायलासुद्धा नवऱ्याला गुंगारा देऊन 'गुरुदत्तारे गुरुदत्ता' करायला त्याच्या गळ्यात पडतात. भगवी कफनी किंवा कांही वैतागी त्यागीपणा असला, मग तर काय त्या बुवाच्या किंवा महात्म्याच्या महात्म्याचा गवगवा काशी ते रामेश्वर माजायचा. इंडिया, १९२१-१९२२ या सरकारी रिपोर्टात संपादक एल. एफ. रशब्रुक विल्यम्स म्हणतात "The European critic must remember that every Hindu, no matter how westernised, ever retains in his heart of hearts a reverence for asceticism. Even educated gentlemen who play a prominent part in public life, cherish before them the idea of worldly renunciation and retirement to the practice of individual austerities. " (p. 34) शहाण्या सुशिक्षितांची ही स्थिति, मग अशिक्षितांनी सुकवून वाळविलेल्या एखाद्या संताच्या प्रेताच्या पायाचे चुंबन घ्यावयास का धावू नये? आजपर्यंत पुष्कळ चमत्कार झाले, पण ३७० वर्षे जश्शाचे तस्से टिकलेले प्रेत हा मोठाच चमत्कार! सर्व तत्ववेत्ते म्हणतात की मानवेतर प्राण्यांच्या मृत देहाचा कशाला ना कशाला उपयोग होतो. गाई म्हशी हरणे वाघांच्या चामड्यांचे जोडे वगैरे होतात. पण माणसाच्या प्रेताचा कांहीहि उपयोग नाही. ते टिकत नाही. म्हणूनच दहन व दफन हे विधि अमलांत आले. पण सेंट फ्रांसिसचे प्रेत मात्र याला एकटेच अपवाद! इजिप्तमध्ये अत्यंत प्राचीन काळी [आर्य संस्कृतीचा उदय होण्यापूर्वी] मोठमोठ्या माणसांची प्रेते कांही विशिष्ट मसाला घालून विशिष्ट प्रकारच्या कपड्यांत घट्ट गुंडाळून ठेवण्याचा प्रघात असे. त्यांना ममी म्हणतात. असली एक ममी बडोद्यास पहावयास ठेवलेली आहे. परंतु ही ममीची कृति इजिप्शन संस्कृतीबरोबरच मेली. तिचा अझून कोणाहि शास्त्रवेत्त्याला थांग लागलेला नाही, किंवा सायन्सचे एवढे मोठमोठाले आश्चर्यजनक शोध लागले व लागत आहेत, तरी मेल्या माणसांची प्रेते जश्शीच्या तश्शी टिकविण्याचा 'फार्म्युला' एकाहि सायंटिस्टाला अझून सापडलेला नाही. शरीरांतले कांही विशेष घाणेरडे भाग काढून टाकून एखादे प्रेत महिना दीडमहिना जेमतेम ठेवता येते; पण ३७० वर्षे दगडा धोंड्याप्रमाणे जश्शाचे तस्से टिकलेले प्रेत फक्त सेंट फ्रान्सिसचेच! हा मोठाच चमत्कार! ज्या लोकांनी या प्रेतांत चमत्कारीक मसाला भरून हा जगाच्या अंतापर्यंत टिकणाऱ्या प्रेताचा चमत्कार निर्माण केला, त्यांच्यापुढे आता या सायंटिस्टांनी बिनशर्त आपला मूर्खपणा कबूल करणे भाग आहे! पण ते तसे करतील असे वाटत नाही आणि जोपर्यंत या प्रेताला धार्मिक माहात्म्याच्या चौकटीत सोवळ्यापणाने ठेवण्यात येत आहे, तोपर्यंत त्यांना तसे करतांहि येणे शक्य नाही. मेलेला माणूस गाडला तर अवघ्या दोन तीन दिवसांतच तो कृमीकीटकांच्या भक्षस्थानी पडतो, असे मुर्देफरास म्हणतात. सेंट फ्रांसिस

चीन देशांत एका भलत्याच अप्रसिद्ध ठिकाणी मेला व त्याचे प्रेत तेथे पुरले गेले. पुढे 'कांही दिवसांनी' (म्हणजे निदान एक वर्षानी तरी असेल. कारण १६ व्या शतकांत दळणवळणाची साधने आतांइतकी झटपट नव्हतीच.) त्याच्या भक्तांनी ते प्रेत गोव्यास मोठ्या सन्मानाने आणले. तेथे ते अझूनपर्यंत जशाचे तस्से आहे. या गोष्टीवर क्रिस्ती धर्ममार्तंडांनी व क्रिस्ती राजसत्तेने धार्मिक चमत्काराचे केवढेहि जाडजूड पांघरूण घातले, तरी सध्याच्या सायंटिफिक युगात यावर अंधश्रद्धाळू भोळसट किंवा धर्मवेडे या महात्म्यांशिवाय इतर कोणीहि विश्वास ठेवणार नाही. सेंट फ्रांसिसच्या चरित्राची माहिती शेकडो इंग्रजी ग्रंथांत आढळते, पण एकाहि 'स्टँडर्ड बुक ऑफ रेफरन्स' मध्ये या प्रेतचमत्काराचा उल्लेख नाही. असे कां व्हावे? बरे, आपण असेहि गृहित धरून चालूं की या संताच्या वेळीच काय ती प्रेते टिकविण्याचा मसाला किंवा युक्ती माहीत असलेली मंडळी चिनांत किंवा गोव्यांत हयात होती. मग या मंडळीची ही युक्ती पुढे एकाकी का नष्ट झाली? चीनदेशात काय कोणी स्मरणीय व पूजनीय संत महंत किंवा बादशाह झालेच नाहीत? आहे का एकाद्याचे असे प्रेत टिकलेले? निदान गोवे प्रांतांत तरी या प्रेतटिकव्या संप्रदायाचा अगदी बीमोड का व्हावा? सेंट फ्रांसिसपेक्षा अधिक स्वार्थत्यागी किंबहुना त्याच्या तोडीचे इतर क्रिस्ती संत शेकडो झाले. राजकीय क्षेत्रात प्रेते टिकविण्याच्या लायकीचे राजपुरुष झाले. मग त्यापैकी एकावरहि या प्रेतटिकव्या मसालावाल्यांची कृपावृष्टी का होऊ नये? राबर्ट ड नोबिली (सन १६०६) या इटालियन कॅथलीक मिशनऱ्याचा आत्मयज्ञ व सेंट फ्रांसिसचे अपुरे कार्य पूर्ण करण्यासाठी त्याने योजिलेली साधने इतकी महत्त्वाची (अर्थात् क्रिस्ती मिशनऱ्यांच्या दृष्टीने) आहेत की त्याचे प्रेत टिकविण्याची खटपट अवश्य व्हायला पाहिजे होती. कोणी म्हणतील की सेंट फ्रांसिस हा दैवी पुरुष असल्यामुळे त्याचे प्रेत कृमी कीटकांना दाद न देतां टिकले. तर त्याला आम्ही सायन्सच्या जोरावर असे ठासून उत्तर देतो की ही गोष्ट नुसती अशक्यच नव्हे तर हास्यास्पद आहे. ही गोष्ट निसर्गाच्या नियमांविरुद्ध आहे. त्याला देवाची म्हणजेच निसर्गाची मुळीच मान्यता नाही. चमत्कारांच्या गप्पांवर भुरळणारे लोक पृथ्वीच्या पाठीवर शेकडा ९८ जरी असले तरी बाकीचे २ विचारसंपन्न लोक या प्रेताच्या प्रदर्शनाला शुद्ध धार्मिक ढोंगधत्तुरा म्हटल्याशिवाय खास राहणार नाहीत. शिवाय क्रिस्ती धर्माच्या कसोटीची अखेर जर असल्या चमत्कारांवरच येऊन बितली असेल, तर रेड्याच वेदवक्तृत्व, तुकोबाच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीतून सुक्याठाक वर येणे, त्याचे सदेह वैकुंठास गमन, गोऱ्या कुंभाराचे मातीत तुडवून मेलेले पोर जिवंत होणे, वगैरे चमत्कारांवर कुत्सित टीकांची झोड उठवून त्यांची टायली करणाऱ्या विद्वान क्रिस्ती पंडितांनी अतःपर जरा बेताबातानेच वागलेले बरे! कारण प्रस्तुत प्रेतप्रदर्शन म्हणजे अशक्य चमत्काराचे खुळसट लोकांना फसविणारे धार्मिक डावपेचांचे जाळे म्हणून मिशनरी लोकांना कितीहि हर्ष वाटत असला, तरी हिंदूंच्या मूर्तिपूजेवर भरंवसाट हल्ले करणाऱ्या 'खऱ्या देवाच्या पवित्र धर्मात' हा एक मूर्तिपूजेचा किळसवाणा प्रकार आहे, हे कबूल केल्याशिवाय त्यांची सुटकाच होत नाही.

हिंदुस्थान क्रिस्तीस्थान करण्यासाठी क्रिस्ती मिशनऱ्यांच्या ज्या नानाविध चळवळी अप्रतिहत चालू आहेत, त्यांपैकीच सेंट फ्रांसिसचे प्रेत हा एक बिनचूक बाण आहे. सेंट फ्रांसिस हा एक क्रिस्ती धर्माला प्रिय व वैद्य असणे सहाजिक आहे. त्यांच्या भावनेला कोणीहि विरोध करणार नाही. पण या महात्म्याने हिंदु समाजाच्या बुडाशी मिशनरी-बाँब् उडवून लोकसंग्रहदृष्ट्या आमच्या हिंदुराष्ट्राचा केवढा घात

केला, याची कल्पना हिंदूंना असू नये, हे मोठे दुर्दैव होय. राजकीय बाजूने आल्फान्सो अलबुकर्कने आणि धार्मिक बाजूने सेंट फ्रांसिसने आमचेच हाडामांसाचे गोवेकर हिंदुबांधव आज आमच्यापासून अलग व परके करण्यात यश मिळविले, याचा, हिंदुजनहो, तुम्हांला थोडा तरी विचार सुचत आहे काय? अहो, या साष्टीकडे तरी लक्ष द्या. हे सगळे डिसोझा आल्मेडा आणि रॉड्रिग्ज आमचेच ना? पण आज काय स्थिति या धर्मांतराने केली आहे? रक्ताला सुद्धा रक्त ओळखीत नाही! उलट सेंट फ्रांसिसने बाटविलेल्या अफाट हिंदू समुदायाच्या इतिहासाला आज 'फाँडेस्ट मेमरी' म्हणून सर्व कॅथलीक क्रिस्तीजन गाऊन नाचत आहेत! सेंट फ्रांसिसने आपले कर्तव्य चोख बजावले, पण तुम्ही?

क्रिस्ती मिशनऱ्यांना आम्ही कधीच दोष देणार नाही. त्यांचे कर्तव्य ते करतात. सेंट फ्रांसिस नंतर, एका झपाट्यांत हजारो लोक बाटविण्याची (मास कॉन्वर्झन) महत्वाकांक्षा बाळगून रॉबर्ट ड नोबिली हा दुसरा कर्मवीर मिशनरी १६०६ मध्ये हिंदुस्थानात आला. त्याने खालच्या हिंदूंना 'उजेडांत' आणण्याची सेंट फ्रांसिसची पद्धत सोडून, वर पासून-म्हणजे ब्राह्मणांपासून सुरुवात केली. त्याने ब्राह्मणी पोषाख केला, त्यांच्या सर्व रितीभाती उचलल्या, गंध भस्म रुद्राक्षादि थाट केला, संध्या होमहवनाची संथा घेतली, एक वर्षभर गवताच्या झोपडीत निवास केला. आस्ते आस्ते ब्राह्मणलोक या आचारशील रॉबर्टभटजीकडे येऊ जाऊ लागले. धार्मिक प्रश्नात्तरे होऊ लागली. त्याने हिंदुधर्माचा व हिंदु कल्पनांचा पूर्ण स्वाध्याय करून, त्या कल्पनांची व क्रिस्ती धर्मकल्पनांची एक समंजसपणाची एकवाक्यतेची साखळी तयार केली. त्याची प्रवचने नेहमी हिंदुधर्माप्रसाराच्या बुरख्याची असत. हिंदु मनाला रुचतील व पचतील अशा कल्पनांची त्यांत तो फोडणी देत असे. त्याने तामीळ भाषेत अनेक ग्रंथ लिहून त्यांत क्रिस्ती व हिंदुधर्माची एकवाक्यता प्रतिपादन केली. त्याने जातिभेदाच्या तत्वाला मुळीच हात लावला नाही किंवा बाटलेल्या हिंदूंनी हिंदुधर्माचे कांही आचार केले तर त्यांना हरकत घेतली नाही. अखेर या पठ्ठ्याने एक देशी भाषेत लिहिलेले पुराण 'प्राचीन ग्रंथ' म्हणून निर्माण केले आणि त्यांत असा आधार दाखविला की जेसुऐट लोक हे ब्रह्मदेवाचे खास औरस वंशज आहेत. येशु क्रिस्ताला ब्रह्मदेवाचा सख्खा मामेभाऊ किंवा विष्णूचा पुतण्या ठरविणाऱ्या या रॉबर्ट भटजींच्या धार्मिक धैर्याची करावी तेवढी तारीफ थोडीच! या खोट्या दस्तऐवजी पुराणाच्या खोटेपणावर शालशिष्टपणाची क्रिस्ती शालजोडी पांघरतांना 'मिशन्स' नामक ग्रंथाचे लेखक लुई क्रीटन म्हणतात. ''हा प्रयत्न पुष्कळांना ठकबाजीचा वाटून ते रॉबर्टला दोष देतील; परंतु हिंदु लोकांना बाटविण्याच्या महत्कार्यात त्याने व त्याच्या अनुयायांनी दाखविलेल्या कळकळीपुढे त्या दोषाची किंमत फोल ठरेल.'' (पृ. २८) कां? आहे का नाही मिशनरी न्यायाचा धारवाडी कांटा? अशी उदाहरणेच देऊ म्हटले तर स्वतंत्र ग्रंथ होईल. तथापि क्रिस्ती मिशनऱ्यांच्या चळवळीची नाना सोंगेढोंगे कशी चालतात, हे अभ्यासणाऱ्या जिज्ञासूंनी Home University of modern knowledge मालेचे Louise Creighton कृत Missions-Their rise & development हे पुस्तक मुद्दाम वाचावे अशी शिफारस आहे. क्रिस्ती मिशनऱ्यांची परोपकारी कृत्ये व त्यांच्यातील कित्येक व्यक्तीचे साधुत्व आम्ही केव्हांहि कमी लेखणार नाही आम्हाला त्याबद्दल अत्यंत आदर वाटतो. परंतु क्रिस्ती मिशनरी चळवळ अथवा क्रिस्ती धर्मप्रसारांच्या त्यांच्या उलाढाली या धार्मिक किंवा शुद्ध अध्यात्मिक मोक्षासाठी नसून, तो एक राजकारणी अवाढव्य सांपळा आहे, अशी आमची पूर्ण खात्री पटलेली आहे. अर्थात् या सापळ्याविषयी सूज्ञ व विचारी हिंदुजनांना वरचेवर

इषारा देणें आमचें काम आहे.

धर्मप्रसारार्थ अमानुष चमत्कारांची कांस धरणे, म्हणजे धर्माची किंमत डोंबाऱ्याच्या पातड्याइतकीच ठरते. बायबलाप्रमाणेच हिंदूंची पुराणे भिक्षुकी डोंबाऱ्यांची पातडी होत. चमत्कारांची धूळ डोळ्यांत फेकून अनाडी जनतेला बुद्धिभ्रष्ट करणे हा शुद्ध अधर्म होय. विवेकशुद्धी व विचारांचा जागरूकपणा तेखदार राखण्यासाठीच धर्म ही संस्था अस्तित्वात आली आहे. ज्या धर्माने मनाचा दुबळेपणा व चिकित्सेचा बोथटपणा वाढतो, तो धर्मच नव्हे. ब्राह्मणाच्या पायाचे घाणेरडे पाणी तीर्थ म्हणून पिणें हे जितकें निंद्य, त्यापेक्षा प्रेताच्या पायाचें चुंबन घेणें हें शतपट चिळसवाणे व निंद्य होय. उद्धरेत् आत्मनात्मानम्. कोणी कोणाचा उद्धारकर्ता नाही. आपला उद्धार आपल्या हाती. हेंच खरें तत्व आहे. सारांश, सेंट फ्रांसिसच्या खऱ्या खोट्या प्रेतप्रदर्शनानें क्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्मप्रसाराची एक मोठी सोपी युक्ती तयार करून ठेवली आहे, यांत मुळीच संशय नाही. अडाणी गोरगरीबांच्या अप्रबुद्ध मनोवृत्तीला फसविण्याचा हा रॉबर्ट ड नोबिलीशाही मिशनरी कावा आहे, इतकेंच तूर्त म्हणणें पुरें.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

वानराचा देव

ले. कृ. गो. किनरे. प्र. वाङ्मयविहार मंडळ, पुणे शहर. किं. अवघी सहा आणे. लहान मुलांकरितां उपदेशपर उत्तेजक वाङ्मय निर्माण करण्यांत श्री. किनऱ्यांची लेखणी वाकबगार दिसते. प्रस्तुत छोटेखानी पुस्तकांत बाल-ब्रह्मचारी बलभीम मारुतीरायाचे चारित्र्य सोप्या रसाळ भाषेत लिहिले आहे. चारित्र्यासाठी रामायणाचा सर्व वृत्तांत थोडक्यात आटोपशीर पण मुद्देसूद येणे भागच होते. लहान मुलांमुलीच्या शिक्षणाची खरीखुरी काळजी असणाऱ्यांनी हा वानराचा देव त्यांच्या हाती अगत्य द्यावा, अशी आमची शिफारस आहे.

सन्मित्र दर्शन आणि नीतिमंजरी

सन्मित्र दर्शन (किं. दीड आणा) आणि नीतिमंजरी (किं. सहा आणे) बालमित्र मालेची ही दोन गोड सुवासिक पुष्पे आमचे मित्र श्री. पारुजी नारायण मिसाळ यांनी गुंफली आहेत. लहान मुलांमुलींना सुबोध व छोट्या तत्वपूर्ण गोष्टींनी रिझविणारी ही माला महाराष्ट्रातल्या प्रत्येक छोट्या शिवाजीच्या व 'चिंगुल्या' जिजाबाईच्या हाती झळकली पाहिजे. माला आश्रयास पात्र आहे, हे निराळे सांगावयास नकोच. पत्ताः- बालसन्मित्र माला, मालवण, जि. रत्नागिरी.

क्षत्रिय वैश्यांचा ब्राह्मणांशी झगडा

ले. व प्र. श्रीयुत काशीराव बापूजी देशमुख, मु. उमरावती (वऱ्हाड). किंमत १२ आणे. क्षत्रिय मराठा समाजात लेखनविषयक आजकाल जी जागृति झाली आहे व जे प्रयत्न चालले आहेत, त्यात श्री. देशमुखांच्या चळवळीचा व लेखनोद्योगाचा नंबर खात्रीने पहिला लागेल. दोन वर्षांपूर्वी नागपूरच्या रिकामटेकड्या तेलंग शास्त्र्यांनी क्षत्रिय वैश्यांच्या बीमोडाचा जो लटका वाद उपस्थित केला होता, त्याला प्रस्तुत पुस्तकद्वारा या क्षत्रिय वीराने सणसणीत फटका लगाऊन शास्त्रीबुवांचे दात घशांत घातले आहेत. उत्तम भाषा, धर्मग्रंथांचे व इतिहासाचे भरपूर आधार, आणि विषयप्रतिपादनाची ठाकठीक शैली, यामुळे हा ग्रंथ सर्वस्वी संग्रहणीय झाला आहे. इतर कोणी जरी नाके मुरडली तरी क्षत्रिय वैश्य जन या पुस्तकाची एकेक तरी प्रत अवश्य संग्रही ठेवतील.

क्षत्रियांची वेदोक्त श्रावणी व श्रावणी पुराण

संपादक श्री. काशीराव बापूजी देशमुख मु. उमरावती. कि. एक रुपया. श्रावणीचा विधि उत्तम ग्रथित झाला आहे. सर्व मंत्र भाषांतरासह व विधी आचरणाच्या सूचनांसह असल्यामुळे पुस्तक पुढे ठेऊन श्रावणी खुशाल चालवावी. धर्मकर्माची तर आवड आहे, पण भिक्षुकशाहीची अडत्येगिरी नको असणाऱ्यांनी हे पुस्तक अवश्य घ्यावे. शेवटी छापलेले मराठी गद्यपद्यात्मक पुराण म्हणजे भिक्षुकशाहीच्या पायातली खेटरे बनलेल्या पोक्तांच्या डोळ्यात चरचरीत अंजनच होय.

महादजी शिंदे आणि नाना फडणीस यांची तुलना

किं. १२ आणे. प्रकाशक :- हरीभाऊ कुशाबा शेरे, ९०१ सदाशीव पेठ, पुणे सिटी. लेखक :- हरिश्चंद्र नारायणराव नवलकर. हे एक जुने कसलेले इतिहासचिकित्सक व लेखक आहेत. यांचा 'ताराबाईसाहेब' हा ऐतिहासिक ग्रंथ सन १८९७ साली आमच्या अभ्यासांत आलेला स्मरतो. काही वर्षांपूर्वी केसरीमध्ये 'नाना आणि महादजी' या मथळ्याची जी विस्तृत लेखमाला प्रसिद्ध झाली, तिचे प्रस्तुतचा ग्रंथ यथाप्रमाण खंडन करीत आहे. केसरीच्या लेखमालेने भानुशाहीच्या जादुगिरीची महाराष्ट्रावर पाडलेली विश्वामित्री मोहनी श्री. नवलकरांनी आपल्या चिकित्सक लेखन कौशल्याने सफाईत झुगारून दिली आहे. महाराष्ट्राचा इतिहास महाराष्ट्रीयांनीच लिहिला पाहिजे, हे सूत्र गोंडस दिसते खरे; पण तो राष्ट्रीय चित्पावनांच्या हाती गेला तर ते माकडाचा देव बनविल्याशिवाय कसे रहात नाहीत, हे या पुस्तकाच्या अभ्यासाने चांगले कळून येईल. ठिकठिकाणी ऐतिहासिक पुरावे भरपूर दिल्यामुळे टीकेचा भारदस्तपणा वाढला आहे. कित्येक उतारे तर इतके महत्वाचे आहेत की ते वाचतांच लोकांच्या पुष्कळशा खोडसाळ समजुती नष्ट होतील व बरेच वाचक ''आँ! अरे हे प्रकरण असे होते काय?'' असा उद्गार काढल्याशिवाय रहाणार नाहीत. पुस्तकाच्या मलपृष्ठावर 'महादजी शिंदे' अक्षरांखाली विद्यमान माधवराव शिंद्यांचा फोटो देण्यांत प्रकाशकाने कसले योजनाचातुर्य दाखविले समजत नाही. कांही तरी चित्र कोठेतरी छापणे बरे नव्हे. पुस्तक सर्वस्वी संग्राह्य, वाचनीय व मननीय असे झाले आहे.

महाराणा प्रतापसिंह

ज्ञानमित्र पुस्तक मालेचे २७ वे पुष्प ले. लक्ष्मण नारायण जोशी. प्रकाशक :- नारायण बळवंत चव्हाण, ४८३ शनिवारपेठ पुणे सिटी. श्री. चव्हाण आपल्या ज्ञानमित्र पुस्तकमालेच्या द्वारे उपयुक्त ज्ञानप्रसाराची कामगिरी बजावीत असतात. प्रस्तुत पुस्तक सुप्रसिद्ध लेखक लक्ष्मणराव जोशी यांनी लिहिले आहे, ही एकच गोष्ट त्याच्या उत्तम अंतरंगाची साक्ष देण्यास पुरेशी आहे. श्री. जोशी हे अष्टपैलू लेखक आहेत. काव्य, नाटक, कादंबरी, निबंध, चर्चा कांहीहि असो, त्या त्या क्षेत्रात श्री. जोशांच्या लेखणीची कांहीतरी ठळक कामगिरी आहेच आहे. मेवाडचा खरा रजपूत, व अजरामर क्षत्रिय, महाराणा प्रतापसिंह याचे विस्तृत चरित्र श्री. जोशांनी मोठ्या कुशलतेने रंगविलेले आहे. ऐतिहासिक सत्याला लवमात्र ढका न लावता रुक्ष इतिहासाला कादंबरीच्या हृदयंगम भाषेत लोकप्रिय कसा करता येतो, हे या पुस्तकाच्या वाचनाने चांगले पटते. पुस्तक संग्राह्य आहे. कि. एक रुपया.

मुंबईच्या कामगार वस्तींतील गलिच्छपणा

सोशल सर्व्हिस लीगच्या आरोग्यखात्याने प्रसिद्ध केलेले हे एक आणा किंमतीचे पुस्तक मुंबईच्या

प्रत्येक रहिवाश्याने मुद्दाम वाचावे, म्हणजे मुंबासुंदरी ही इंद्रपुरी आहे की जिवंत नरकपुरी आहे याचा उलगडा होईल. अज्ञानी किंवा ऐदी भाडेकरी, बेफिकीर व मगरूर घरवाले आणि निष्काळजी मुनिसिपालिटी या त्रिवेणीसंगमांत गरीब व मध्यम वर्गांच्या हालअपेष्टा संतापजनक झालेल्या आहेत. आम्ही स्वतःच गरीब भाडेकरी असल्यामुळे जोडा केठे चावतो हे बिनचूक सांगू शकतो. सध्या कॉर्पोरेशनच्या नवीन निवडणुकीसाठी बरेच जुने नवे नवरदेव लोकहिताची व काँग्रेसच्या पुण्याईची हळद लाऊन दारोदार भटकत आहेत. आता सर्वांना सर्वांचा एवढा कळवळा फुटला आहे की सांगता सोय नाही. पण प्रस्तुत पुस्तकांत प्रसिद्ध केलेला नरकवाडा पाहिला तर आजपर्यंत हे निवडून दिलेले कॉर्पोरेटर्स काय डोळ्यांवर शेण थापून निजले होते की काय, असा आम्ही त्यांना स्पष्ट प्रश्न विचारतो. सोशल सर्व्हिस लीगने या बाबतीत जर पुढाकार घेतला नसता, तर गोरगरीबांच्या हालांची परमावधि कोठे झाली असती, सांगवत नाही. ई एफ व जी वार्डांतल्या मतदारांनी हे पुस्तक व दुसरे स्लमलॅन्ड ऑफ बॉंबे (किं. ४ आणे) हे पुस्तक वाचून कोणाला मते द्यावयाची ती नीट विचारपूर्वक द्यावी. सोशल सर्व्हिस लीगनेहि आपली माणसे या वार्डांत पाठवून, नाक्या नाक्यांवर या पुस्तकांची विक्री करावी, अशी आमची आग्रहाची विनंती आहे.

□□□

अग्रलेख

आत्मविकास आणि संक्रमण

दिसेंबरचा शेवटचा आठवडा म्हणजे परिषदांचा आठवडा बनला आहे. सामाजिक व राजकीय उन्नतीच्या पुराणांचा या आठवड्यांत जसा सुफळ उडतो, तसा सबंध वर्षात उडत नाही. ठरावांच्या जोरावर हिंदुस्थानला स्वातंत्र्य देणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या बड्या नाटकापासून तो थेट समाजोन्नति व शिक्षणोत्तेजक परिषदांच्या लळीतांपर्यंत अखिल हिंदुस्थानांत गाजणारा नाताळ वर्तमानपत्रांच्या रकान्यांतून ठणाणूं लागला की आमच्या सर्वांगीण मोक्षाच्या स्वर्गात दोन बोटेसुद्धा अंतर उरले नाही. असा भास होतो. प्रत्येक परिषदेचा अभिमानी पुरस्कर्ता सगळ्यांना हेच सांगत सुटतो की, यंदाची परिषद फारच ग्रँड झाली बुवा! असा उत्साह पूर्वी कधी कोणी पाहिला नाहीं! परिषदांच्या अध्यक्षांची भाषणें पाहिलीं तरी तींसुद्धां ग्रँडच! प्रत्येकाच्या सहानुभूतीला, आत्मवत् सर्वभूतेषु मनोवृत्तीला, मानवसमाजाच्या उन्नतीविषयीं लागलेल्या तीव्र चिंतेला आणि स्वार्थत्यागाच्या तत्त्वज्ञानाला एवढी अपरंपार भरती आलेली दिसते की त्या महापुरांत हा बेटा अध्यक्ष सुकाठाक बाहेर पडतो कीं त्यांतच गटंकळ्या खाऊन तळाचा ठाव पहातो, अशी विवंचना श्रोत्यांस लागून, कोणी डोळे मिटून स्वस्थ बसतात, कोणी चहा काफी प्राशनांत त्या विवंचनेला बुडवितात, तर कोणी सभामंडपाबाहेर इकडे तिकडे भटक्या मारतात. विषयनियामक बैठकीच्या प्रसंगीं प्रत्येकाच्या आंगांत उन्नतीचें वारें इतकें विलक्षण भरतें कीं ठरावांतील अक्षरांच्या काना मात्रा वेलांट्यावर माजणारी रणें पाहून छापखान्यांतील प्रूफरीडरांनाहि आपल्या चिकित्सक चाणाक्ष दृष्टीबद्दल संशय उत्पन्न होतो. पुढें, ठरावांची मांडणी, पाठपुरवणी, ठिगळ-जोडणी आणि अंमलबजावणीसाठीं कळकळीची विनवणी वगैरे मामुली नाटकी थाट उडवितांना शेंकडों वक्त्यांच्या तोंडून बाहेर पडणारे वक्तृत्वाचे धबधबे पाहून प्रत्येकाला असेंच वाटतें कीं आपल्या समाजाच्या आंगावर उन्नतीचें मांस दीडबोटच नव्हे तर दीड दोन फूट खास चढलें। आभार प्रदर्शनाची लयलूट तर काय मेजवानीच्या खास थाटालाहि गोडींत जिंकते !! असा सर्व 'ग्रँड प्रोग्राम' 'यशस्वी रीतीनें' पार पडून, परिषदेचे यात्रेकरू घरोघर परतले की उन्नतींच्या कल्पना पुढल्या नाताळापर्यंत बेपत्ता होतात. सगळेंच भांडवल जेथें नुसत्या विकाराचें, तेथें विचार तरी कसा पिकणार आणि विकास तो काय होणार?

विकासाला विचारांची आवश्यकता असते, तशी विकारांचीहि असते. बहुजनसमाजाला विकार-क्षुब्धतेचा चिमटा घेतल्याशिवाय यांत चैतन्यं थरारत नाही, ही गोष्ट कितीहि खरी असली, तरी विकारक्षुब्धता हें एक विष आहे, त्यावर विचारजागृतीच्या सात्विक तत्वाचा मारा जर ताबडतोब केला नाहीं, तर तें विष समाजाच्या आंगावर खरजेप्रमाणें फुटून निघतें, हें विसरून चालणार नाहीं. विकार चैतन्योत्पादक असतात आणि विचार विवेकोत्पादक असतात. विकारजागृतीची मात्रा सुईंच्या अग्रानें चाटवणासारखी यायची असते आणि विचारांचा मारा मसाल्याच्या दुधाप्रमाणें जितका अधिक करवेल तितका करावयाचा असतो. भावनावशता मनुष्याला कल्पनेच्या काल्पनीक मनोराज्यांत त्रैलोक्याच्या सिंहासनावर नेऊन बसविते. वाटेल त्या मनोदयाचे खजिने त्याच्या पायांशीं आणून ओतले. प्रत्यक्ष गुलामगिरींतहि क्षणभर त्याला स्वातंत्र्याच्या वलगना करावयास लावते. अज्ञानी दशेंत त्याला ज्ञानीपणाचा अहंकार उत्पन्न करून, पांडित्याच्या गर्वानें तट्ट फुगविते. अशक्तावस्थेंतहि त्याला स्वसामर्थ्यांचे पोवाडे गाण्याची स्फूर्ति देते. मठ्ठ मेंदूंत विलक्षण काव्याचे झरे फोडून, त्याला कवि बनविते. बाजारांत चारदोन आण्याचा व्यवहार करण्याची अक्कल नसली तरी राजकारणावर लंबीचौडी व्याख्यानें देण्याचा हव्यास त्याच्या मेंदूंत खेळविते. भावना हीच मुळीं जात्या चवचाल नटवी असल्यामुळें, आपल्या भक्ताला ती वाटेल त्या रंगांत रंगवून वाटेल तसा नाचविते. भावनेचा दास आपल्या हातांतल्या काठीला शिवाजीची भवानी तलवार समजतो. माथेफिरूपणाचे येणारे झटके, भवानींचा संचार मानतो. जिभेच्या बेजबाबदार टकळीला राजकारणी प्रवचनें समजतो. अत्याचारी व त्रागेखोर वर्तनाला स्वार्थत्याग म्हणतो. हिंदुस्थान जात्याच भावनाप्रधान देश असल्यामुळें, भावनेच्या गुलामांना देवरूपता येण्यास कांहींच अडचण पडत नाहीं. भावनेचें हें नाटक कितीहि रंगले आणि त्याच्या रंगांत भावनेचे गुलाम नखशिखांत कितीहि रंगलें, तरी हा साबणाचा फुगा तेव्हांच फुटतो आणि विकारवशतेच्या धुंदींत घडलेल्या शोचनीय दुष्कृतींच्या इतिहासाशिवाय अखेर कांहिच शिल्लक उरत नाहीं.

विचारलशीतेची स्थिति अशी नसते. विचार डोळस तर विकार आंधळे. विचार प्रत्यक्ष पुराव्याचा हट्ट धरतो, तर विकारांना वाटेल ती भलीबुरी गप्प वेदप्रामाण्य वाटते. विचार इतिहासाचा भोक्ता, तर विकार कादंबरीचा चहाता. विचाराचा निर्णय मंदमति असतो, कारण त्याला खऱ्या खोट्याची निवड अत्यंत कसोशीनें करावयाची असते. विकाराचा निर्णय म्हणजे तडकाफडक; त्या आंधळ्याला खऱ्या खोट्याचा भेदच उमगत नाहीं विचार स्वाध्यायशील, तर विकाराला त्याची पर्वाच नसते. विचार मननाचा मित्र, विकार त्याचा कट्टा वैरी. विचाराच्या जोरावर चाललेल्या चळवळींची प्रगति मंद असली, तरी त्यांचा विजय निश्चित असतो. विकाराच्या भांडवलावर नटविलेल्या चळवळींचा शेवट कसा शोचनीय होतो, हें अभ्यासणाऱ्यांनी गयेच्या राष्ट्रीय सभेचा नाताळ मुद्दाम पहावा. हा नाताळ अवचित घडून आलेला नाहीं. त्याची उभारणी आज दोन चार वर्षे होतच आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा चंग मारणाऱ्या राष्ट्रीय सभेंत, प. वा. दादाभाई नवरोजी, रानडे, रमेशचंद्र दत्त, फिरोजशहा मेहेता इत्यादि विचारवंतांनी पालन केलेल्या देशमुखी संस्थेत विचारशीलतेचा दुर्गादेवी दुष्काळ पडावा, हें विचार-भ्रष्टतेचें लक्षण तर खरेंच, पण त्यांत विचारवशतेचें प्राबल्य महामूर दिसून येतें.

देशांत सुरू असलेल्या नानाविध चळवळींच्या परिणामांचे किंचित् चौकस दृष्टींने निरीक्षण केलें तर चांगल्यापेक्षां वाईट परिणामांचीच संख्या जास्त भरेल. बहुतेक चळवळींनीं विचार-विकसनाकडे

एन ४००६--२६

मुळींच लक्ष न पुरवितां, विकारक्षुब्धतेच्या भांडवलावर आपलें गाडें दडविण्याचा प्रघात ठेविल्यामुळें, भावनावशतेनें बेजबाबदार माथेफिरूपणा बराच प्रचलीत केला आहे. असहकारितेच्या धामधुमींत तर या माथेफिरूपणाचीं भयंकर उदाहरणें हरहमेश पडून आलीं. मोपल्यांचें बंड, मालेगांवचा दंगा, मुंबईतील पिकेटिंग, राजपुत्राचा अवमान, चहप्रतिबंधाच्या मारामाऱ्या इत्यादि प्रकार त्याचेच दाखले होत. चौरीचुऱ्यानें तर पंजाबच्या कत्तलीला पुरेंच लाजविलें. या ठळक परिणामांपेक्षां दुसरे अनेक घोर परिणाम झाले आहेत ते तरुणांच्या बिघडलेल्या भावनांत पहावयास मिळतात. तरुण मंडळी जात्याच फार ग्रहणक्षम प्रवृत्तींचीं असतात. त्यांचा जोम जितका दणकट तितकी त्या जोमाची भूमिका फार नाजूक आणि लवचिक असते. त्यावर जसा परिणाम करावा तसा होतो आणि एकदां परिणाम झाला कीं मग तो वज्रलेप! अलीकडे विकारवशतेच्या तडाक्यांत सांपडून विचारभ्रष्ट झालेली तरुण मंडळी बरीच दृष्टीस पडतात. विकारांच्या खळबळीने त्यांच्या मनोवृत्तींचें चक्र इतकें विसकटलेले दिसतें कीं त्यांना स्वत:चे विचार म्हणून कांही उरलेलेच दिसत नाहीत. निरनिराळ्या पक्षभेदांच्या पत्रांतून घिसाडघाईनं दररोज प्रसिद्ध होणाऱ्या विचारांचे त्यांचे पाठांतर मात्र फारच चांगलें होत असतें; जणूं काय ही मंडळी म्हणजे त्या त्या विवक्षित पत्रांच्या फोनोग्राफच्या बांगड्याच! विवेकच्युत, स्वाध्यायभ्रष्ट व माथेफिरू तरुणांची संख्या अधिक वाढणें हें राष्ट्राच्या अध:पाताचें लक्षण आहे. बरें, कित्येक शहाण्यासुर्त्या पत्रकारांच्या विचारांची दिशा पहावी तर तीसुद्धां जवळ जवळ अशीच. आज सर्वच हिंदुस्थान स्वराज्यमुमुक्षु झाला आहे, ही गोष्ट सत्य आहे. स्वराज्य अमुक एका शहाण्या पक्षाला पाहिजे आणि दुसऱ्या कोणाला नको, असें मुळींच नाहीं. पण स्वराज्याचें वास्तवीक रूप काय, राजकारण कशाशीं खातात, हिंदुस्थान स्वयंशास्ता होण्यापूर्वी त्याच्या कोणकोणत्या अंतर्गत गोष्टींची सुधारणा अवश्य झाली पाहिजे, इत्यादि कसलाहि विचार न करता, उठल्या सुटल्या वाटेल त्यानें 'पॉलिटिक्स'च्या गप्पा झोडाव्या आणि स्वराज्यावर फोनोग्राफी व्याख्यानें झोडावीं ही स्थिति महाराष्ट्रांत अलीकडे बरीच बोकाळली आहे. म. गांधीला असलेच बोलभांड माथेफिरू अनुदायी रगड मिळाल्यामुळें त्यांच्या शुद्ध हेतूंचा अखेर घात झाला. आजला तर असहकारितेचें रूपांतर तीव्र जातिमत्सरांत प्रत्यक्ष झालेलें आहे. सध्यांच्या हिंदी राजकारणाच्या रागरंगानें देशोद्धार होणें शक्य नाही, ही जाणीव पुढारीबुवांना मुळींच नाहीं, असें थोडेंच आहे? पण विकारवशतेचा गुणच मुळीं हट्टवादी असल्यामुळें, उघड्या डोळ्यानें प्राण सोडण्यास ती केव्हांहि नाकबूल नसते. अर्थात् मतभिन्नतेच्या वर्गीकरणाबरहुकूम वर्गमिश्रतेच्या थेरांने हिंदी राजकारणाला पोरकटपणा ठरविण्यास कोणी कां मागें सरावें?

निरनिराळ्या सामाजीक परिषदांकडे लक्ष दिल्यास, त्यांच्याहि हालचाली विचारापेक्षां विकारावरच चाललेल्या दिसतात. समाजोन्नतीची भूक लागली आहे, आकांक्षेची तहान तीव्र झाली आहे, साध्यसाधनासाठीं प्रयत्नांची शिकस्त करण्याची बुद्धि उमलली आहे; परंतु आत्मविकासासाठी अवश्य लागणाऱ्या विचारक्षेत्रांत विकारांचें संक्रमण मात्र अजून झालेलें नाही. विचाराचा परिपाक झाल्याशिवाय आचारांत चैतन्य थरारत नसतें. परिषदेचे ठराव चिटणीसांच्या दप्तरांचें बिऱ्हाड सोडून समाजक्षेत्रांत उघड माथ्यानें जोंपर्यंत कार्य करीत नाहींत, तोंपर्यंत विचाराचा प्रादुर्भावच झालेला नाहीं, असें विधान करावयास हरकत नाहीं. राष्ट्राचा अभ्युदय राष्ट्रांतील प्रत्येक समाजाच्या आत्मविकासानें होत असतो. हा आत्मविकास साधण्यासाठीं प्रत्येक राष्ट्रहितेच्छुनें सामाजीक पुनर्घटनेची दगदग प्रथम केली पाहिजे.

हिंदु मुसलमानांचे दंगे, ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ, अस्पृश्यांचा आक्रोश, इत्यादि प्रकार प्रत्यक्ष दिसत असतांहि, 'सामाजिक आधीं की राजकीय आधीं' हा वाद घालणारा मुत्सद्दी पक्का बिलंदर ढोंगीच असला पाहिजे. कै. टिळकांना सामाजिक जागृतींचा प्रश्न हातीं घेण्यास फुरसद नव्हती, हीं सबब त्यांच्या अदूरदृष्टीवर पांघरूण म्हणून घालण्यांत येत असते; परंतु आज सामाजिक विषमतेनें प्रगट केलेलें भयंकर विराटस्वरूप पाहिलें म्हणजे नुसत्या राजकारणी उलाढालींनें देशांतल्या याबाबत आधीव्याधींचे परिमार्जन होऊं शकत नाहीं, हाच सिद्धांत सिद्ध होतो. कै. टिळकांची राजकारणी देशसेवा जर धवडगिरी एवढी गगनचुंबित झाली, तर आज सामाजीक विषमता शिरजोर होऊन, राजकारणाला कां विरोध करूं लागली? राजकारणी पुण्याईचें फळ असें उलटें सुलटें कां यावें? विचारवंतांनीं विचार करावा. स्वराज्य मिळालें (स्वराज्य म्हणजे काय, याची व्याख्या अझून निश्चित झालेली नाहींच!) स्वराज्य मिळालें कीं हिंदु-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, अस्पृश्योद्धार वगैरे सर्व कटकटी आपोआप बंद पडतील, अशी विधानें अझूनहि मोठमोठ्या दे. भ. च्या जिभल्यांवर व लेखण्यांच्या टोंकावर नाचतांना पाहून, सर्व रोगांवर एकच मलमपट्टी मारणाऱ्या या वैदूंच्या विकारभ्रष्ट माथ्यावर मोहरींचें पलीस्तर मारावेंसें वाटतें. कांही दिवसांपूर्वी, हुंडाप्रघाताचा निषेध करतांना एका लोकमान्य होऊं पहाणाऱ्या व्यवसायबंधूनें अशी मुक्ताफळें गाळलीं की स्वराज्य मिळालें की ही चाल आपोआप नाहींशी होईल. 'राष्ट्रीय' लोक कोठकोठें स्वराज्याची मलमपट्टी चिकटवतील, त्याचा कांहीं नेम नाहीं! ज्यांनां कांही करायला नको त्याला राजकारणाचें कंकण आजकाल हिंदुस्थानांत फार स्वस्त झालें आहे.

सामाजीक परिषदा आणि समाजनेते यांची जबाबदारी मोठी आहे. निरनिराळ्या समाजांच्या आत्मविकासावरच राष्ट्राचा अभ्युदय अवलंबून असल्यामुळें, आपापल्या समाजाच्या सुप्त कर्तबगारीचें प्रबोधन करण्याची त्यांनीं आतां तांतड केली पाहिजे. अखिल हिंदु समाजाची दिनचर्या नानाविध मानसिक दास्याच्या बंधनांनीं जखडबंद बद्ध झालेली आहे. निरनिराळ्या जातींची प्रवृत्ति कितीहि भिन्नरंगी असली, तरी हिंदुसमाजाच्या एकमुखी पुनर्घटनेसाठीं काहीं निश्चित तत्त्वांची एकशक्यता व समरसता निर्माण करण्याचा यत्न अझून कोठेंच झालेला दिसत नाहीं. आज गेलीं २५-३० वर्षे नुसती विचारप्रसाराची बडबड कितीहि झालेली असली, तरी आचारांत चैतन्य ओतण्याचा धडाडीचा प्रयत्न समाजसेवकांकडून न झाल्यामुळें, विचारक्रांतीही बिजली सणाणूं लागलेली नाही. विचारक्रांतीला निदान साक्षरतेची तरी चकमक अवश्य लागते. ही चकमक निर्माण करण्याचे यत्न अझूनहि केवळ शब्दावडंबरांतच गिरक्या मारीत आहेत. विशेष खेदाची गोष्ट होच कीं निरक्षर दीनदुनियेच्या अंत:करणांत ज्ञानाचा प्रकाश पाडण्याचें पुण्यकार्य करुन, तिला आत्मनिर्णयाचा प्रत्यक्ष अनुभव देण्याऐवजीं, तिच्या निरक्षर व हतबल अवस्थेच्या गुलाम-माजविणारे लोक आतांशा तरी बरेच दिसूं लागले आहेत!

प्रत्येक समाजाची कांहीं विशिष्ट संस्कृति असते. कांही ठरीव प्रवृत्ति असते. एक स्वतंत्र इतिहास त्याच्या मागें उभा असतो. या संस्कृतीचा, प्रवृत्तीचा व इतिहासाचा त्या समाजावर एक विशेष परिणाम झालेला असल्यामुळें, प्रत्येक व्यक्तीची अशी ठाम समजूत झालेली असते की या विशिष्ट प्रवृत्तीच्या क्षेत्रांतच माझ्या कर्तबगारीची मर्यादा संकुचित झालेली आहे. हा विचार प्रगत झाल्यामुळें स्वत:च्या वैयक्तिक गुणकर्माचा त्याला विसर पडतो व तो आपल्या प्रवृत्तीच्या विरुध्द अशा स्वजातीय ठरावीक प्रवृत्तीचा रंग आंगीं भिनवण्याचा यत्न करतो. या बळजबरीच्या मामल्यामुळें अनेक तात्त्विक

एन ४००६--२६अ

जीव तामसी बनतात, तामसी जीव सांत्विकपणाचा बुरखा कसाबसा लपेटतात आणि कित्येक राजस प्रवृत्तीचें सोंग आणतात. स्वत:चें गुणकर्म, स्वत:च्या कर्तबगारीची चमक आणि स्वत:च्या प्रवृत्तीचा खरा रंग ओळखण्याची दृष्टीच नष्ट झाल्यामुळें, आत्मविकासाला अवश्यक असणाऱ्या संक्रमणाची धडाडी त्याला साधत नाहीं. समाजांतील व्यक्तींची मनोवृत्ति अशी बोंथट बनतांत, समाजहि हत्बुद्ध स्थितीचा दास बनतो, ही गोष्ट प्रत्येक समाज-सुधारकानें विसरतां कामां नये.

धर्मांच्या नांवाखालीं अनेक खोडसाळ रानटी चाली 'रुढी' म्हणून हिंदुसमाजांत चालूं आहेत. त्यांचा गलिच्छपणा पुष्कळ विचारवंतांना पटलेला असतो; पण त्याविरुद्ध ब्र काढण्याची कोणाला छाति होत नाहीं. फार झालें तर निषेधाचे चार पांच लेख किंवा सात आठ व्याख्यानें खुशाल झोडतील, पण स्वत:वर प्रसंग येतांच, 'वडिलांचें बाळबोध वळण' घटविण्यास त्यांची सद्सद्विवेकबुद्धि न शरमण्याइतकी हतसंज्ञ बनते. सामाजीक, धार्मिक किंवा राजकीय आत्मविकासाला सद्सद्विवेकबुद्धीची ही हतसंज्ञता अत्यंत घातक आहे. एखादी रुढी किंवा आचार हा समाजोन्नतीच्या मुळांशीं वाळवीप्रमाणें पोखरण करीत आहे, ही जाणीव झाल्यावर, त्या रुढीला किंवा आचाराला आमूलाग्र उखडून टाकण्याचा हिय्या मनुष्यानें जर केला नाहीं, तर त्याची माणुसकी राहिली कशांत? बहुजनसमाज हा कोंठेंहि केव्हांही गतानुगतिकच असतो. बहुमताच्या जोरावर किंवा लोकमान्यतेच्या सर्टिफिकीटावर आजपर्यंत एकहि सुधारणा घडून आल्याचा दाखला नाहीं. मानवसमाजाची उत्क्रांति अल्पसंख्य सुधारकांच्या रक्तानें फोंफावते. संक्रमणाचा संदेश हे एक कडुजहर सत्य आहे. तें निर्भीडपणें बोलून दाखविणारी जिव्हा आत्मयज्ञाची भोक्ती पाहिजे. त्याला येशुक्रिस्ताची तडफ पाहिजे. गॅलिलियोचा आत्मविश्वास पाहिजे. लोकहितवादींची स्पष्टोक्ती पाहिजे. रानड्यांची स्थितप्रज्ञ वृत्ति पाहिजे. गोखल्यांचा स्वार्थत्याग व तळमळ पाहिजे. हें बहुमोल भांडवल जो कोणी कमावील, त्यालाच संक्रमणाचा संदेश समजेल, आणि त्यालाच विकार विचार आणि विकास यांचा परस्पर संबंध काय आहे, याचें आत्मज्ञान होईल.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

मराठी गद्याचा इंग्रजी अवतार

अथवा इंग्रजी अमलांतील मराठी गद्य वाक्याचा निबंधमालेपूर्वीचा इतिहास. ले. दत्तो वामन पोतदार, बी.ए. प्रकाशक - ए.पी. बापट ॲन्ड ब्रदर्स, पुणे शहर. किं. २ रुपये. भाषा आणि इतिहास यांचे नातें मायलेकाचें आहे. भाषेच्या पोटीच इतिहासाचा जन्म होत असल्यामुळें, इतिहासाला सुद्धां आपल्या मातेचें -भाषेचें योग्य रीतीनें संगोपन करणें आवश्य आहे. इतर देशी भाषांच्या तुलनेने मराठी भाषेची वाढ कितीही कमजोर असली, तरी या भाषेच्या पाठीमागें एका बलाढ्य राष्ट्रभक्तीचा इतिहास आहे, ही गोष्ट विसरता येत नाही. वाङ्मयवृद्धींत हिंदी व बंगाली भाषा बऱ्याच पुढारलेल्या आहेत, असें म्हणतात. परंतु मराठीप्रमाणें त्यांत स्वराज्यतेजाची चमक किंवा धमक मुळींच नाहीं. मराठें, मराठी भाषा आणि मराठी धौशा या तीनच शब्दांत मराठ्यांचें मराठपण होतें, आहे व पुढेंहि राहील. या तीन स्थित्यंतराचा विचार करणाऱ्याला प्रस्तुतता प्रो. पोतदारांचा ग्रंथ उत्तम मार्गदर्शक झाला आहे. ''ह्या साठ पासष्ठ वर्षांत मराठी काव्य-रत्नाकरामध्ये अवगाहन करून त्यांहून दत्तोपंतांनी हल्लींच्या पिढीस अदृष्टपूर्व आणि अश्रुतपूर्व अशीं ग्रंथरूपी आणि ग्रंथकाररूपी नाना प्रकारची रत्नें काढून ती सामान्य वाचकांस व विशेषत: विद्यार्थी वर्गास अर्पण केली आहेत.'' (रा.ब.साने, प्रस्तावना), प्रो. दत्तोपंत हे चौकस इतिहास-संशोधक आहेत. अर्थात मराठी भाषेची 'इंग्रजी वळणांतली नवशिक्षिता करवीं, बायबलांतील मंत्रांनी झालेली प्राणप्रतिष्ठा' निरूपण करतांना, त्यांच्या संशोधनी तडाक्यांतून बारीक सारीक गोष्टी कोठें एखाद्या बारीकशा आडोशांत लपून राहतील, असें होणेंच नाहीं. सन १८१८ त स्वराज्याचा लय होतो, येथपासून तों. ''१८७४ त मालाकारांची 'ललकारी' होते; व मराठी वाङ्मयाचा जयजयकार होतो; तिकडे नजर जातांच आपापले ग्रंथ खाकोटीस मारून मंडळी धांदलीनें आपापल्या आसनावर बसतात; या 'धीरोध्दत' पुरुषाच्या भाराखाली धरित्री नमते (आयाय्यो!) आणि मराठी वाङ्मयाच्या बादशाही सिंहासनावर ही तरूण मूर्ति अधिष्ठित होते.'' येथपर्यंत प्रो. पोतदारांनी मराठी गद्याचा इतिहास तपशीलानें ग्रथित केला आणि त्या 'धरित्री नमविणाऱ्या धीरोद्धत तरूण मूर्तीला' 'लवून मुजरा करून आणि हा ग्रंथरूप अल्प नजराणा पुढें ठेंवून रुखसत' मागितली आहे.

विस्मरणाच्या काळ्याकुट्ट अन्नाखालीं कालवश होत असलेल्या अनेक ग्रंथांची व ग्रंथकारांची स्मृति प्रो. दत्तोपंतांनी आपल्या जागरुक चिकित्सक व भाषाभिमानी वृत्तीनें घासून पुसून लख्ख केली, हीच आधीं मोठी कौतुकास्पद कामगिरी झाली. परंतु प्रत्येक कामांत दत्तोपंतांची घिसाडघाई असते. भाषण घ्या, व्याख्यान घ्या, शिंदे सरकारची भेट घ्या, मंडळाचा रिपोर्ट छापणें घ्या, पत्रव्यवहार घ्या, काय वाटेल तें घ्या; जिकडे जिकडे घिसाड घाई! तेव्हां ''हा सर्व ग्रंथ दत्तोपंतांनी साऱ्या २०-२२ दिवसांत रात्रंदिवस खपून लिहून व छापूनहि काढिला'' तर त्यांत नवल नाहीं. पण येवढा रात्रीचा दिवस करण्याच्या आट्यारेट्याची धोंड कोणी त्यांच्या मस्तकावर ठेवली न कळे! या घिसाडघाईचा परिणाम असा झाला कीं शांत व संशोधक स्वाध्याशीलतेनें प्रो. दत्तोपंतांनीं कालोदरांतून जीं उत्कृष्ट उत्कृष्ट रत्नें परिश्रमपूर्वक पारखून काढलीं, तीं चांगल्या रेशमी गोफांत गुंफण्याऐवजीं काथ्याच्या दोरखंडांत कशीबशीं दडपून ओंवली गेलीं. ऐतिहासिक महत्त्वाच्या दृष्टीनें या ग्रंथांतल्या माहितीची किंमतच करतां येणार नाहीं, इतकी ती बहुमोल आहे. पण त्या रत्नमोत्यांची मांडणी मात्र दत्तोपंतांना मुळींच साधली नाही. याचें कारण घिसाडघाई. दत्तोपंत पोतदार, मराठी व इतिहासाचे प्रोफेसर, भारत इतिहास संशो. मंडळाचे आत्मे, त्यांचा पहिलाच मराठी ग्रंथ, त्याचें नांवसुद्धां चमत्कारीक! आतां त्यांत काय काय मौजेच्या चिजा पहायला मिळतील म्हणून सारा महाराष्ट्र जों आतुरचित्त होतो, तों अखेर काय? ज्ञानकोशाच्या 'पापेमोगा टोटाटीटू' सूचिग्रंथाचा हा वडील भाऊ! 'येणार येणार'च्या जाहिराती लागाव्या आणि पहिल्याच खेळाला 'गनबा पिढ्यामंदी फ्यास पडल्याती. तवा ह्याच ख्याल ह्येच ठिकानीं ह्येच टिकटावर उंद्या करून दावन्यांत येनार' असा जाहीरनामा थेटरावर दिसावा, त्यांतलीच सारी गत झाली. दत्तोपंत घिसाडघाई टाकतील तर त्यांच्या हातून अनुपमेय बाह्ययेतिहास-सेवा होईल.

प्रो. पोतदारांनी या ग्रंथांत जी माहिती संकलीत केली आहे ती बहुमोल आहे, ही गोष्ट पुन: पुन: उच्चारण्याचा मोह आम्हांला आवरत नाहीं आणि येथेंच या ग्रंथाची उपयुक्तता आहे. कै. चिपळूणकरांचे अनन्यभक्त या नात्यानें प्रो. दत्तोपंतांनी कांही अविवेकी व अदूरदृष्टी विधानें मधून मधून केली आहेत. अर्थात् त्यांना लोकहितवादींची कामगिरी 'टिक टिक' वाटावी; ज्योतिराव फुल्यांच्या गुलामगिरींत हवी ती बाष्फळ विधानें सांपडावी आणि रॉबर्ट नेसबीट कृत 'ब्राह्मणांचे महत्त्व' हें पुस्तक 'त्यांच्या विद्वत्तेचें, शोधक बुद्धीचें व मराठी भाषेच्या उत्तम ज्ञानाचें दर्शक' वाटावें, यांत आश्चर्य नाही. तथापि सर्व दोषांचा पाढा कितीहि मोठा झाला, तरी मराठी भाषेच्या प्रत्येक अभिमान्यानें हा अत्यंत उपयुक्त व ऐतिहासिक महत्त्वाचा ग्रंथ अवश्य स्वाध्यायांत आणावा, अशी आग्रहाची शिफारस केल्यावांचून आम्हाला राहवत नाहीं. ''धर्मोपनिषदांच्या गाईंचें पवित्र काष्मलविनाशक व प्रकृति मधुर पेय म्हणजे आमचें जुनें वाङ्मय. हें श्रुति माउलींचे दिव्य दूध सकाळीं प्यावें; संध्याकाळी पाश्चिमात्य वाङ्मयाच्या 'वाघिणीचे' नव्य व उग्र दूध पोटांत घ्यावें आणि रात्री निजतांना पुन: जुन्या गोदुग्धाचा व अभ्युदय ही दोन्ही ही संपादूं.'' हें प्रो. पोतदारांचें 'प्रिस्क्रिप्शन' प्रबोधन 'व्हेरी स्ट्रॉंग्ली रेकमेंड' करीत आहे.

तारागड

श्री. एकनाथ यादव निफाडकर यांनी रचलेलें हें खंडकाव्य आहे. काव्याची भाषा सरळ व सुबोध आहे, आणि तें समजण्याला अडचण ही पडत नाहीं. प्रस्तावना मात्र, विशेषत: त्यांतील वेदांतीं भाग, आमच्या या मेंदूंत पुन: पुन्हां वाचूनही उतरला नाहीं. प्रस्तावनेंतील त्या भक्ति-ज्ञान-वैराग्याची आणि

मुमुक्षूच्या जिज्ञासेची, वीरनानें शांतेवर केलेल्या बलात्काराची किंवा लीलेला वीरकांतानें झिडकारून तिच्या केलेल्या प्रणयभंगाशी सांगड घालणें आमच्या बुद्धीला साधत नाहीं. यामुळें काव्य आवडूनही कवीच्या अपेक्षेप्रमाणें 'निराशेच्या आशेची कांस धरून सर्व योगांचे एकीकरण करतां आले नाही.' याबद्दल वाईट वाटतें. जे तत्त्वज्ञानी हें काव्य वाचतील त्यांनी जरूर हा प्रयत्न करावा, अशी आमची शिफारस आहे. आमच्यासारखा सामान्य जनांनीं या चक्रव्यूहांत न गुरफटतां घटकाभर करमणूक म्हणून ही छंदोबद्ध गोष्ट वाचावी. दिंडी, साकी, वीणा, आर्या ही वृत्तें प्रसिद्ध टेकाडी गळा नसतांही चांगल्या रीतीनें म्हणतां येतात. यामुळें वाचकांना हा ६५० पायऱ्यांचा चौमजली चबूत्रा चढून जाणें कठीण पडणार नाहीं. पुस्तकाची छपाई साधारण, गेट अप गचाळ, आणि किंमत? ईश्वर जाणें!

काव्यानंद मंजूषा (भाग- ३)

एकवीस नग असलेली ही पेटीही निफाडकरांच्याच मालकीची आहे. गीतेंतील 'यदा यदा हि धर्मस्य-' ही कल्पना -

'जेव्हां जेव्हां भारतभूही पडेल परक्यांच्या हातीं

तेव्हां तेव्हां सोडविण्या तिज शिवबा येइल भूवरती'

निफाडकरांच्या शब्दांत उत्तम खुलतें. अशा ओळीनांच 'राष्ट्रीय' कविता म्हणतां येईल. 'माझें लग्न' या कवितेंत कवीचें कविता-देवीशीं लग्न लागलें आहे असें तोच सांगतो, आणि हे सिद्ध करण्याला जणूं काय

'जरी दाविले पुन्हपुन्हां मी

स्फुरण पावले कुच ते नामी'

ही रात्रीची पडद्यांतील लीला रसिकांच्या समोर उघड्या चवाठ्यावर टाकतो. यांत कदाचित् वेदांत लपला असल्यास उच्च दैविक काव्य म्हणावें लागेल हें आम्हीं जाणतो. होळीमधल्या अश्लील व बीभत्स छकडीला (फेकी) उच्च वेदांती स्वरूप देणें फार सोपें आहे. पुरुष म्हणजे पुरुष व स्त्री म्हणजे प्रकृति, एवढी टीप दिली कीं नखरा म्हणजे माया व संभोग म्हणजे एकरूपता, असे अर्थ कोणत्याही लावणींत लावतां येतात. बाकी, एकंदर कविता एकदां वाचावयास बऱ्या आहेत. आंतील काव्य धोपटमार्गी असून गद्याच्या वळणा वर गेलें असले, तरी त्यांत प्रसंगविशेषीं जोर दिसतो, आणि या काळांत तरी तो प्रत्येकाला पटतो व रुचतो. श्री. माडखोलकर यांनी केशवसुताचा संप्रदाय म्हणून कविवर्य गडकरी, ठोंबरे, टिळक यांचा बहुमानानें उल्लेख करून श्री. निफाडकरांना त्यांत शेवटचा नंबर आपल्या एका लेखांत दिला होता. पण हे तिन्ही कवी हल्लीं दिवंगत झाल्यामुळें आम्ही श्री. निफाडकरांना सांगतों कीं तुमच्या टीकाकाराच्या मतानें देखील केशवसुताच्या गादीवर आज तुम्हीच आहांत. पहिल्या शंकराचार्यांची कांहीं और असली, तरी बाकीच्याचें प्रवचन हिंदू लोक हल्लीं सुद्धां कौतुकानें व थोड्या बहुत आदरानें वाचतात, आणि तसेंच ते तुमचेही वाचतील.

□□□

वर्ष २ : अंक ८ : १ फेब्रुवारी १९२३

अग्रलेख

गोविंदाग्रज शाहीराची कामगिरी

''ठराविकाला लाथ मारुनी नभासही उल्लंघूं. ''

शाहीर हा कवि असतो आणि कवीहि शाहीर असूं शकतो. परंतु कवि म्हणजेच शाहीर आणि शाहीर म्हणजेच कवि असा अर्थ करणे चुकीचें होईल. 'मनींचा भाव' पद्यात्मक भाषेंत व्यक्त करणारा कवि या संज्ञेला पात्र झाला, म्हणजे तो शाहीर होत नाहीं. शाहीरानें पद्याऐवजीं आपल्या हृदयीची तळमळ घोडदौडी गद्यांत जरी व्यक्त केली, तरी त्याच्या कवित्वाविषयीं कोणास संशय येत नाहीं. कवि किंवा शाहीर, दोघेहि कल्पनेच्या विमानांत बसून उंच अंतराळांत सहज लीलेनें स्वच्छंद विहार करतात, सर्वसाधारण माणसांना जे सिद्धांत व प्रमेये बहुशः दिसत नाहीत जनांच्या शाहीरांच्या दृष्टीला तेव्हांच दिसतात आणि त्यांचे संदेश ते आपल्या प्रासादिक वाणीने सर्व जगाला जाहीर करतात. परंतु या संदेशाची भाषा अदूरदृष्टी जगाला समजत नाही. त्या संदेशांचा जन्म ज्या जळजळणाऱ्या हृदयांतून होतो, त्या हृदयाची आंच जगाला भासत नाहीं. शाहीर कवींच्या अंतर्दृष्टींची फेंक जितक्या दूरवर भिरकावली जाते, तितक्या दूर सर्वसाधारण व्यवहारी माणसाची कल्पनाही धांव घेत नाही, मग दृष्टीचा पोंच तर दूरच राहिला! भूतकाळाची पर्वा न करता केवळ वर्तमान काळाच्या दृश्य व्यवहारांतच मग्न रहाणाऱ्या जगाला, शाहीरांची भविष्यकाळाची सूचनावजा स्वप्नचित्रें शुद्ध कादंबऱ्या वाटतात. कोणी त्यांना 'वेड्यांचे बरळणे' मानतात, तर कोणी 'भ्रमिष्टाची बडबड' समजतात.

हर्षशोक हें ज्यां सगळे,
त्यां काय कळे?
त्यां काय वळे?
हंसतिल जरि ते आम्हांला,
भय न धरुं हैं वदण्याला :
व्यर्थी अधिकचि अर्थ वसे,
तो त्यांस दिसे,
ज्यां म्हणति पिसे.

ही 'केशवसुत' शाहीराची स्पष्टोक्ति हेंच पटविते. सुख पाहता जवापाडें, दुःख पवर्ता एवढें' अशा जगांत, आशावादाचे चैतन्य थरारविण्याची कामगिरी कविजन नेहमीच करीत असतात. पर्वता एवढ्या दुःखानें निराशेच्या खोल गर्तेत पडलेल्यांना सुखाचा संदेश देऊन, त्यांना उन्नतीचे शिखर गांठण्याची हिंमत देण्याची कामगिरी आजपर्यंत कविजनच करीत आले आहेत. दुःखपूर्ण संसारांत सुखाची स्थळें बिनचूक दाखवून, आशावादाच्या आग्रहानें जीवशिवाचा आत्मपरिचय कवीच करून देत असतात. वाइटांतून चांगले, अशुभांतुन शुभ आणि संकटांतून हिंमत काढून दाखविण्याचे कौशल्य कवींनाच साधतें. हर्षातिशयाच्या अश्रूंत किंवा पुत्रशोकानें फुटणाच्या हृदयांतून कोसळणाऱ्या आक्रोशांत ईश्वरी लीलेचा महिमा काय आहे आणि मानवांनी या सुखदुःखाच्या भरती ओहटींत आपली जीवन नौका कोणत्या कुशलतेने हांकावी, याची चिकित्सा कवी आपल्या हृदयस्पर्शी भाषेनें सर्वांना सांगतात. अनाथ विधवांवर कोसळलेली एकुलत्या एका पुत्राची मरणापत्ति आज कोट्यवधि लोकांनी कोट्यावधि वेळां पाहिली. पण तसल्याच एका प्रसंगांतून 'राजहंस माझा निजला' हे हृदयभेदक काव्य निर्माण करणे, आणि शोकातिशयानें विवेक व विचारशून्य बनलेल्या आईलाहि भान नसलेल्या विविध भावनांचा भिन्नभिन्न अणुरेणूं स्पष्ट रंगांत व्यक्त करणें, हे काम गोविंदाग्रजासारख्या अभिजात शाहिरी मनोवृत्तीच्या कविश्रेष्ठानेंच पार पाडावें! न देखे रवी, ते देखे कवि, या म्हणीचा गूढार्थ असल्या काव्यांतच दृष्टीस पडतो. घुबडांचा घूत्कार आपण शेकडों वेळां ऐकला, भलत्याच अवेळी कोकिल-कूजन आपल्या कानी पडले, आणि 'पुत्रशोक' करणाऱ्या अभागी आई-बापांचा काळजाचे पाणी पाणी करून टाकणारा आक्रोश हि आपण पुष्कळ प्रसंगी अनुभविला. परंतु या विविध भयंकर प्रसंगांच्या अंतरंगांतूनहि तात्विक रसाची रसगंगा निर्माण करण्याचे कार्य फक्त कविवर्यांच्या त्रिकालभेदी रसवंतीनेंच केलेलें आपणांस आढळून येईल. कविजनांची दृष्टी अशी दिव्य व सूक्ष्म भेदी असल्यामुळे त्यांची वृत्ति व्यवहारी जगाला 'वेडी' किंवा भ्रमिष्ट भासल्यास नवल नाही. व्यवहारी जगाची मनोवृत्ति जगाच्या व्यवहारांत हापटून घोपटून हतसंज्ञ बनलेली असते, तर कविजनांची वृत्ति देहींच विदेही स्थितीचा अनुभव घेण्यांत रंगलेली असते. 'पाण्यामध्यें मासा झोंप घेई कैसा' याचा अनुभव 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे.' कवींचे साम्राज्यच कांहीं और असतें.. यांना स्वतःच्या लौकिकी संसाराची, लोकमताच्या थेराची श्रीमंती गरीबीची, चालीरीतीची किंवा रूढींची, सामाजिक धार्मीक किंवा राजकीय निर्बंधाची, फार काय पण, प्रत्यक्ष सर्वभक्षक काळाचीहि पर्वा नसते.

गाणें माझें काळा ! पाडिल चरचराला भुलावणी.
जो तो होइल ठायिंच वेडा ओळखील ना कुणा कुणी.
अवसानाच्या भरांत घेइन रविचंद्रांची झांज करीं,
दिनरजनीची जोडी ही तव क्षणांत मूर्खा! वांझ तरी.

गोविंदाग्रजानें प्रत्यक्ष काळाला दिलेली ही घमकावणी पाहून व्यवहारदक्ष विचारी जगाला हासू आल्यास हंसावयाला नको. कारण या 'बजावणीं'त 'शक्तिचा हा जोर खरा' काय आहे, हे उमगण्यासाठी व्यवहारी माणसाची व्यवहार - कुशलतेची घमेंड काय होय?

चंद्रसूर्याच्या पापण्या मोजणारे, विजेच्या कडकडाटांत उर्वशीचें नृत्य पहाणारे, झुळझुळणाऱ्या ओढ्यांत किंवा भरंसाट भडकणाऱ्या तुफानी वावटळांत संगीताचे सूर ऐकणारे, मृत्यूतहिं अमृताचा

कारखाना काढणारे, शोकातिरेकाच्या आक्रोशांत शांत संतांप्रमाणे तात्विक चर्चा करणारे आणि उडत्या गरुडाच्या पंखांच्या घुमणाऱ्या ध्वनीत भगवद्गीतिचे श्लोक उमटविणारे कविजन हे शाहीर असतातच असे नव्हे. कवींच्या प्रेमाची मगरमिठी विश्वाला कवटाळूं पहाते. शाहीरांची प्रेमशक्ति जरी तितकीच सामर्थ्यवान् असली, तरी ते तिच्या सामर्थ्य सर्वस्वाची शिकस्त आपल्या विशिष्ट राष्ट्राच्या हिताक्षितिजा पर्यंतच विस्तृत करतात. कवि विश्वाचे प्रेमी, तर शाहीर राष्ट्राचे प्रेमी. आपल्या राष्ट्रांत चैतन्य ओतून त्याच्या उद्धारांतच आपल्या वैयक्तिक उद्धाराचे बीज आहे, ही जाणीव शाहीरांच्या दिव्यदृष्टीत समरस झाल्यामुळे त्यांची वाणी-

अपर सिंधुच्या भव्य बांधवा ! महाराष्ट्र देशा !

सह्याद्रीच्या सख्या ! जिवलगा ! महाराष्ट्र देशा !

असलीं गाणी गुणगुणूं लागते. शाहीरांची दृष्टी जरी आपल्या विवक्षित राष्ट्रापुरतीच संकुचित झालेली व्यवहारी जगाला दिसली, तरी संकुचित संसाऱ्यांनी राष्ट्रांत पेरलेल्या भेदभावनेचा मात्र शाहीराला लव मात्र मुलाजा नसतो. शाहीरांच्या मनोवृत्तीची गंगा इतकी अफाट असते आणि तिचा प्रवाह इतका बेफाम दुथडी फोफावत वहातो की त्यांत कसलाहि छोटाबडा भेद टिकावच धरू शकत नाहीं. भेदांतच अभेदाचें मर्म शाहीर दाखवीत असतात. राष्ट्राच्या प्रकृतीचे निदान ठरविण्याची मुत्सद्दीजन केवढीहि फुशारी मारोत, राष्ट्राच्या भवितव्यतेची कुंडली मांडून मंगलाऽमंगलाची यातायात ज्योतिषीजन खुशाल करोत, किंवा पक्षभेदांच्या खातेऱ्यांत लोळणारे वाक्पंडीत व कलम कसाई लोकमताची वाटेल तशी चाळवाचाळव करोत, शाहीरजन आपल्या दिव्य दृष्टीनें राष्ट्राच्या धमन्यांतील रक्ताचें सूक्ष्म पृथःकरण करून, त्याच्या प्रगतीचा मार्ग अमूक आहे, असे ठासून सांगतात व अखेर शाहीरांचीच वाणी खरी ठरते, अशी इतिहासाची रोखठोक जवानी आहे. कुठल्याहि काळाचा कुठल्याहि राष्ट्राचा इतिहास घ्या, त्याच्या उन्नतीच्या उषःकाळी नृपतीच्या फर्मानाबरोबर, मुत्सद्यांच्या निर्णयाबरोबर, सैनिकांच्या शस्त्रास्त्रांच्या लकाकीबरोबर आणि राष्ट्रातल्या जिवंत माणसांच्या जिवंत महत्वाकांक्षांबरोबर, तत्कालीन राष्ट्र शाहीरांचे ओजस्वी पोवाडे राष्ट्रोद्धाराची लगबग साधण्यासाठी आगाऊच आपल्या दिव्य वाणीचा कर्णा जनांच्या कर्णात घुमवीत असल्याचे दिसून येईल. आमच्या मराठेशाहीची प्राणप्रतिष्ठा शिवबा राजांच्या भवानीने केली, ही इतिहासाच्यावरची नुसती शाब्दिक साक्ष होय. पण हा वरचा पडदा किंचित अंतरंगाचा ठाव पाहूं गेलो, तर चटकन आपल्याला दिसेल की तोरण्यावर स्वातंत्र्यलक्ष्मीचें तोरण चढण्यापूर्वी, शिवाजीचे अंतःकरण तत्कालीन शाहीरांच्या अंतःकरणाशी एकजीव होऊन पोवाड्यांच्या रूपाने त्यांच्या ओठांवर नाचत होते. तें अंतःकरण पोवाड्यांच्या द्वारे अखिल महाराष्ट्राच्या कोनाकोपन्यांत दुमदुमत होते; आणि छत्रपतीच्या भवानीच्या दैवी दिव्य पात्याला अखंड यशश्रीचें पाणी चढवीत होतें. विश्वात्मैक्य भावनेचे कविजन 'आकाशाच्या गालिं गुलाबी लालि निघाली' म्हणून चंद्रसूर्याचे चांदवे 'झुंबर जणुं तटाला' म्हणून खुशाल लटकवून देऊं या; किंवा आकाशगामी मेघांना 'पोष्टमनची ड्यूटी' देऊन चिठ्याचपाट्यांची ने आण करण्यास दामटूं द्या; स्वराज्य स्थापनेसाठीं, कल्पनेच्या असल्या स्वैर विहारापेक्षां :

कुठं ग्येलि तुमची इरसरी । करतां त्ये मोगलाचि चाकरी।।

ग्येलि लाज तुमची काऽऽर ।

थु:त तुमच्या जिनगानीवर ।
तुमच्या आया भैनि संभाळा । का त्या पर
देता मोगलाला । ग्येली लाज तुमची काऽऽर ।
थु:त् तुमच्या जिनगानीवर ।।

असल्याच शाहीरी स्पष्टोक्तिची तडफ राष्ट्राच्या हतबुद्ध व थंडगार पडलेल्या हृदयाला चेतनापूर्ण करण्यास पाहिजे होती. सारांश, शिवाजीची महत्वाकांक्षा, मावळ्यांचा उत्साह, मारूं की मरूंची त्यांची कृतांत-प्रतिज्ञा आणि प्रतापगडच्या भवानीच्या पाषाण मूर्तीतून अखंड वाहणारा स्वातंत्र्य-कल्पनेचा विद्युत्प्रवाह, या सर्वांच्या मुळांशी आमच्या साध्या भोळ्या हेंगाडी शाहीरांचे पोवाडे होते, ही गोष्ट वाचकांनी लक्षांत ठेवली पाहिजे. राष्ट्राचे जीवन कुकल्पनांनी सडलेलें आहे की उन्नत विचारांत बढलेलें आहे, हें राष्ट्र शाहीरांच्या 'पोवाडो-मीटर' वरून खासें समजतें. ऑक्वर्थ शाळीग्राम कृत 'पोवाड्यांचा संग्रह' अथपासून इतिपर्यंत वाचला की मराठेशाहीचा अध:पात कसकसा घडून आला, त्याच्या निरनिराळ्या छटा शाहीरांच्या वाणीत आपल्याला स्पष्ट दिसतात.

गेल्या महिन्याच्या २३ तारखेला कै. गोविंदाग्रजांची पुण्यतिथी अखिल महाराष्ट्रांत मोठ्या अहमहमिकेनें साजरी करण्यांत आली. राष्ट्रकवींचा आणि राष्ट्रशाहीरांचा त्यांच्या मृत्यूनंतर का होईना! सन्मान करण्याची राष्ट्राला बुद्धि होणे, हे एक सुचिन्ह होय. सूर्यास्त झाला, सर्वत्र अंध:कार पडला की मग सूर्याची व त्याच्या प्रकाशाची खरी किंमत कळू लागते. थंडीनें हातपाय गारठले, म्हणजे उन्हाळ्याची आठवण होते. हा मानवी स्वभाव आहे. परंतु 'घरीं कामधेनु । पुढें भीक मागे?' हा महाराष्ट्राचा स्वभाव निदान समर्थ रामदासांना पूर्ण माहीत असावा असे दिसते. गडकरी हयात असेपर्यंत जेवढ्या लोकांना ते परिचित होते, त्यापेक्षां सहस्रपट लोकांशी त्यांच्या 'अकाली' मृत्यूनें त्यांना 'जानी दोस्त' बनविले आहेत. जिवंतपण ते कोण होते, याची जरी कोणी फारशी परवा केली नाही, तरी आज ते दिवंगत झाल्यावर त्यांविषयींचा प्रेमा दाखविण्यासाठी आज शेकडों लोक जवळजवळची नाती उकरून पुढे येत आहेत. शेक्सपियर मेल्यावर त्याच्या सख्या मावशा, मामेबहिणी, चढ़ते व चुलत भाऊ यांची एक मोठी थोरली घोडशाळा अवचित उत्पन्न झाली होती ह्मणतात, त्यांतलाच हा प्रकार. गडकऱ्यांच्या जातभाई कायस्थ प्रभूंना तर आज इतके अलोट प्रेम फुटलें आहे कीं त्यांच्या रसिकतेच्या उमाळ्याचे पर्यवसान अखेर कशांत होते देव जाणे । गडकरी पुण्यास जिवंत वावरत असतांना जातभाईंकडून 'आचरट' या पदवीपेक्षा अधिक मान्यतेचा शब्द त्या महात्म्याला लाभला नाही. सांसारीक बाबतीत एकमेकांना मदत करण्याचे बाळकडू या जातीला पाजण्याचें ब्रह्मदेवच विसरल्यामुळें, गडकऱ्यांविषयी भलभलत्या कुटाळक्यांवर आपली करमणूक करून घेणारे कायस्थ वीर अझून पुण्यास हयात आहेत. इतकेच नव्हे. तर 'अहो, लालजी तुमच्याकडे कांहीं पैसे उसने मागायला आला तर देऊ नकाहो. माझे चार आणे त्याने असेच बुडविले.' अशा प्रकारचे उपद्व्याप करणारे परमात्मे आमच्या चांगले माहितीचे आहेत. पण आज त्यांना गडकऱ्यांविषयी अतोनात प्रेम वाटत आहे. या प्रेमाचा पान्हा त्यांच्या नाट्यकृतीच्या वैभवोदय कालीं जन्माला आला, असे पुसट विधान करायला कांही हरकत नाहीं. काहीहि असो, कै. गोविंदाग्रज हे कवि होते की राष्ट्रशाहीर होते, हें केवळ मूठभर कायस्थ प्रभूंनाच नव्हे, तर अखिल महाराष्ट्राला पटवून देण्याचे कार्य ज्यांच्या मृत्यूनें केलें,

असे ह्मणावयास हरकत नाही. आह्मी एक पाऊल पुढे जाऊन ह्मणतों की कै. गडकऱ्यांच्या शाहिरी संदेशाची आतां नुसती कोठें कळी उमलत आहे. अझून विकासाची बहार तर पुढेंच आहे. जिवंतपणी गडकऱ्यांना तुंकार दाखविणारे सद्‌गृहस्थ ही बहार अनुभवण्यासाठीं तरी निदान 'सहस्रायु भव' अशी आमची काळाजवळ काकुळतीची प्रार्थना आहे.

गडकऱ्यांच्या परिस्थितीचा आणि त्यांच्या वाङमय-संसाराचा तुलनात्मक विचार केला, तर अल्पायुष्यांत भव्य कामगिरी करणाऱ्या या वीराच्या सामर्थ्याची व बुद्धिमत्तेच्या ठेवणीची कल्पना करवत नाही किंमत करण्याचे काम काळावर सोपविलेलें बरें ! साक्षरतेची व प्रगमनशीलतेची घमेंड मारणाऱ्या स्वजातियांच्या आदरास लवमात्र पात्र नसणाऱ्या बहुजन समाजाच्या 'लोकमान्य'तेच्या कल्पनेच्या सांच्यांत चटकन ठाकठीक बसण्याची लवचिक गिरी स्वप्नांत माहीत नसणाऱ्या व तिची पर्वाहि न करणाऱ्या आणि व्यवहारी लोकमताची क्षिति रतिमात्र न बाळगतां, 'जे जें ज्या समयीं मनांत भरलें स्वच्छंद नानास्थळीं' तें मोकळ्या मनानें, कधिं काव्यवाणींत, कधीं विनोदी भाषेत, तर कधिं नाटकांतल्या पात्रांच्या भाषणांत व्यक्त करणाऱ्या गोविंदाग्रजानें स्वतःच्या जीवनाबद्दल असे उद्गार काढले आहेत की -

'यावज्जीवहि 'काय मी' न कळलें आप्तांप्रती नीटसे ।
मित्रांतेंहि कळे न गूढ-नकळे माझे मलाही तसें ।।
अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट तें होईल तूंतेंकसें ? ।
कोठें आणि कधींतरी जगतिं मी होऊन गेलों असें ।।

हे उद्गार वाचावयाला फार सोपे आहेत, समजण्यासहि फारसें कठीण नाहींत, अन्वयार्थाची दगदग कमी, पण-पण त्यांच्या अंतरंगांतल्या तळमळीचा व कार्याकरितांच कार्य करणाऱ्या या कर्मयोग्याभोंवतीं पसरलेल्या परिस्थितीचा अन्वय आणि अर्थ नुसत्या 'दादोबा पांडुरंगी' डोक्याला लागणे शक्य नाही. कै. गडकऱ्यांच्या बुद्धिमत्तेचा विशाळपणा त्यांच्या नानारंगी विशाळ वाङ्‌मयांत अपरंपार भरलेला आहे. नुसत्या दिव्य कल्पनांच्या जोरावर उंच अंतराळांत गरुडाप्रमाणे भराऱ्या मारणारे ते जसे कवि होते, तसे निधड्या छातीने सामाजिक दोषांवर प्रहार करणारे स्पष्ट शाहीर होते. आपत्तीच्या आघातांनी खडपे खडपे उडालेल्या भग्न हृदयांतील करुणरसाची शांतपणाने चिकित्सा करणारे ते जसे स्थितप्रज्ञ तत्वज्ञानी होते, तसे अप्रबुद्ध लहान मुलांच्या भावनेनें व दृष्टीने जगाकडे पहाणारे प्रेमळ प्रेक्षक होते. त्यानीं राजकारणात धर्मकारणांत किंवा समाजकारणांत प्रत्यक्ष कसलाहि भाग न घेतां, एखाद्या कसलेल्या मुत्सद्द्याप्रमाणें राजकीय क्षेत्रांत, मार्टीन लूथरप्रमाणे धर्मक्षेत्रात आणि राममोहन प्रमाणे समाजक्षेत्रांत विचारांच्या चक्राला इतकी विलक्षण गति दिलेली आहे, की त्यांच्या वाङ्‌मयाच्या सांप्रतच्या केवळ प्रसाराचे पर्यवसान जेव्हां जनांच्या प्रत्यक्ष विचारसरणीत होऊं लागेल, तेव्हां वरील तीन क्षेत्रांत झगडणाऱ्या सुधारकांच्या पाठीशीं-निदान महाराष्ट्रांत तरी कै. गोविंदाग्रजाची उज्वल बुद्धिमत्तेची पुण्याई खास उभी राहील! आज घटकेस त्यांच्या काव्यांत चमकणाऱ्या नयनमनोहर शब्दललित्यावर रसिकांची नजर खिळून राहिली आहे. विनोदाने त्यांची मनें कधि हंसत आहेत तर कधि रुसत आहेत. काव्यांत खुलणाऱ्या वत्सल रसाने आमची हृदयें आज भिजून चिंब होत आहेत. कारस्थानी व पाषाणहृदयी नरराक्षसांची अंतःकरणे कोठकोठल्या घाणेरड्या परमाणूंची बनलेली असतात; पतिव्रतांच्या पायाचे तेज

कसकसल्या दिव्य प्रकाश शलाकांनी उज्वल बनतें; व्यसनी माणसाची व्यसनाधीनता कोणकोणत्या विकारसमुच्चयानें त्याला त्या व्यसनाचा गुलाम करते; इत्यादि नाना प्रकारच्या मानव स्वभाव दर्शनाची रंगविलेली प्रमाणबद्ध चित्रें पाहून, वाचकजन आज त्यांच्या नाट्यग्रंथांवर मधुकरांप्रमाणे तुटून पडला आहे. गडकऱ्यांच्या निष्कलंक स्वदेशाभिमानी हृदयांत उचंबळणाऱ्या कडव्या मराठेशाही प्रेमलहरीचा दणदणाट त्यांच्या शाहिरी कवितांत उत्कटत्वानें सणाणलेला पाहून वाचकवृंद कधिं फुरफुरूं लागतो; तोच दुसऱ्या ठिकाणी प्रचलीत सामाजीक व धार्मिक घाणेरड्या रूढीवर या प्रच्छन्न सुधारकानें फडाफड उडवलेले कोरडे खाऊन कुरकुरूं लागतो. परंतु या नानारंगी विचार प्रदर्शनाच्या मुळाशीं संतत धगधगणारी गडकऱ्यांच्या

नवमतवादी हृदयाची तळमळ

मात्र रसिकजनांच्या काळजाला अझून भिडावयाची आहे. हिंदु समाजाची अवनति करणाऱ्या मानसीक दास्याविरुद्ध असणारा त्यांचा कडकडीत कटाक्ष, विनोद उत्प्रेक्षा अलंकार किंवा उपेक्षा यांच्या नयनाल्हादक आवरणांतून जेव्हां उघड्या माथ्यानें बाहेर पडून 'बिलकूल हिंदू'च्या निगर्मट्ट गुलाम वृत्तीवर आपल्या स्पष्टोंक्तीचा बेफाम मारा करील, तेव्हां आजचे गोविंदाग्रजाचे भक्त उद्यां त्यांच्या मतांचें निषेधकहि बनण्याचा संभव आहे. त्यांच्या काव्यनाटकादि विविध वाङमयोपवनांत रसिकतेच्या स्वच्छंद भराऱ्या मारणाऱ्या मृगांची जेवढी दाटी आज सर्वत्र दिसून येत आहे, तेवढे त्यांच्या मतांचे सक्रीय अनुयायी असण्याचा जर खरोखरच संभव असता, तर हिंदुसमाज हा 'अगदीच हिंदु' समाज खास राहिला नसता. महाराष्ट्रांतल्या हिंदुसमाजाच्या मनोवृत्तीची परंपरा जर लक्षांत घेतली, तर असे विधान करावयास काही हरकत नाही, की गोविंदाग्रजाबद्दल त्यांना सध्यां फुटलेला हा प्रेमाचा व रसिकतेचा पान्हा स्मशानवैराग्याची तात्पुरती उमाळ्याची लाट आहे; त्यांच्या नवमतवादी उत्कट भावनांचा प्रत्यक्ष आचरणांत सक्रीय परिपाक करण्याचा निश्चय नव्हे ! सामाजिक आत्मविकसनाची जी तत्त्वें कै. लोकहितवादी आपल्या स्पष्ट गद्य भाषेत सांगून गेले कै. आगरकरांनी जी आपल्या बाणेदार कलमाने सुधारकांतून उधळून दिली; कै. केशवसुतानेंहि ज्यांचा अत्यंत तीव्र काव्य वाणीनें पुनश्च पुनरुच्चार केला, तींच तत्त्वे गोविंदाग्रज आपल्या अभिनव भाषाशैलीने महाराष्ट्राला सांगून गेले अर्थात् एक संप्रदायच आहे; आणि लोकहितवादी किंवा आगरकर यांच्याविषयी महाराष्ट्राच्या भावनेची जर नीट छाननी केली, तर गोविंदाग्रजांबद्दल आज फुरफुरलेली महाराष्ट्रीयांची प्रेमवृति कितपत टिकणे शक्य आहे, याचा तेव्हाच उलगडा होतो. गोविंदाग्रजांचे अनन्य भक्त म्हणविणाऱ्यांना आमचा स्पष्ट सवाल आहे, की त्यांनी आपल्या तेजस्वी वाङ्मयात ग्रथित केलेले सामाजिक सुधारणेचे तेजस्वी विचार प्रत्यक्ष आचरणांत आणून दाखविण्याची तुमची लायकी सिद्ध करून दाखवा आणि मग गडकऱ्यांच्या संप्रदायाचे 'गंडेकरी' व्हा. बोल बोलता वाटे सोपें, करणी करता-! 'मुरलीचा नाद' ऐकून वाटेल ती राधा व हवा तो गोप मोहीत होईल, 'आंधळ्याची माळ' तर आपल्या आंगवळणीच पडली आहे. प्रेमपाठ गाणारे भक्त कॉलेजात रगड भरले आहेत. 'पानपतचा फटका' वाचून 'लटका जाउनि कलह परस्पर एकीचा चटका' लागण्या इतके महाराष्ट्रीय जर 'शहाणे' असते, तर राजकीय क्षेत्रांत माजलेली बजबजपुरी आज दृष्टीस पडती ना! 'दिव्य प्रेमाची जाति' कोणती, हे वाटेल तो आधुनीक शाहीर शाहिरिणी कवितेच्या फवाऱ्यांत आणखीहि गाईल. पण पण गोविंदाग्रजाच्या 'दसऱ्याचे सोनें' सक्रीय

लुटण्यासाठी 'मृत धर्माच्या, दंभाच्या, अहंपणाच्या, सीमांचे उल्लंघन करणारे व 'जुन्या मतांचा कचरा' जाळण्यासाठी, 'नव्या मताचे' कोण कोण राऊत 'खुल्या मनाचा अबलक घोडा' 'उप्लाणी' उडवीत पुढे सरसावतात तें मात्र पाहिलें पाहिजे.

□□□

वर्ष २ : अंक ९ : १६ फेब्रुवारी १९२३

अग्रलेख

कायदेबाजी व कज्जेदलाली

हरिदासाचें मंगलाचरणाचे चऱ्हाट वळून झालें कीं कथेची प्रस्तावना 'सर्व प्राणी जेहत्ते भवसागरांत पडलेले आहेत? या ठरावीक वाक्याने होत असते. भवसागराचें भय काय असेल, आणि त्यांत बुडणाऱ्या मंडळींच्या आचक्यांवर हरीदासांची हरीनामाची जडिबुट्टी कशी काय रामबाण ठरत असेल, त्याचा अनुभव घेणारे खुशाल घेवोत; पण विचारशक्ती शाबूद असलेला आणि विवेकदृष्टी उघडलेला कोणीहि माणूस तो कथेकरी असो, वारकरी असो, नाहीतर धारकरी असो, हेंच म्हणेल कीं 'या हिंदुस्थानांत सर्व प्राणी कज्जेदलालींत ठार बुडाले आहेत.' बुद्धिमत्तेच्या विशेष देणगीमुळे माणूस 'शहाणा सुरता' या पदवीस अधिकारी ठरलेला आहे. आहे. या शहाण्या सुत्र्यांच्या सर्वांगीण जीवनाचा क्रम ताळेबंद चालावा, म्हणून बुद्धीच्या पोटीं कायद्याचा जन्म झाला. या पोराचा जन्म होईपर्यंत आईच्या सत्वस्थ वृत्तीची जगांत कोणालाहि शंका आली नाहीं. पण कायद्यानें जगांत येऊन पहिली किंकाळी फोडली मात्र, तो बुद्धीला भ्रंश होऊन, तिचें पाऊल वांकडें पडूं लागलें. लहानपणी सगळीच पोरें गोजीरवाणी दिसतात. पण वाढत्या वयाबरोबर जन्मजात गुणकर्माला दाढा फुटून, कोणी सज्जन तर कोणी या दुर्जन, कोणी शिवाजी तर कोणी राजबाजी, कोणी तुकाराम तर कोणी नातू, निपजतात. जीवन-निर्बंधासाठी बुद्धीनें कायद्याला जन्म दिला, म्हणून मानवांनी केवढा मोठा उत्सव केला! पण लवकरच पोराचे पाय पाळण्यांत दिसूं लागले. बालपणीं गोंडस दिसणारें हें पोर वाढत्या वयाबरोबर वाढते गुण पाघळूं लागले आणि अखेर मातृघातक्या परशुरामाच्या वळणावर गेलें. मानवी समाजांत दुष्कर्मांचा बीमोड होऊन, सत्कर्मीचे मळे मुबलक पिकावे, हा कायदा निर्माण करण्यांत मानवांचा मूळ हेतु. पण अखेर भरंवशाच्या म्हशीला टोणगा या न्यायानें, सात्विक तत्वांची बाळवाटी चाटतां चाटतां तामसी बनलेल्या कायद्यानें खुद्द मानवांच्या हातीं दुष्कर्मांची नरोटी कशी दिली आहे, याची वाचकांना थोडी माहिती देण्याचा संकल्प केला आहे.

प्रत्येक गोष्टीला बरी आणि वाईट अशा दोन बाजू असतात. मग कायदाच त्याला अपवाद कां असावा? संघटित नियंत्रणाचें महत्व माणसांना पटलें म्हणूनच निर्बंधांची उर्फ कायद्यांची त्यांना जरूर भासली. कायदे उत्पन्न होतांच त्यांचे पद्धतशीर नियमन करण्यासाठी कायदेपंडितांची संस्था

अस्तित्वांत आली. कायदे पंडित बोलून चालून माणसेंच; अर्थात 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या सूत्रानुसार कायद्याच्या सरळ अर्थात् सुद्धा त्यांच्या तरळ मनोवृत्तीचे गरळ पडून अनर्थ व्हायचा, म्हणून निर्बंधावरहि निर्बंध राखण्यासाठी न्यायाधीश व न्याय यांची उत्पत्ति झाली. सारांश, कायद्यांची उत्पत्ति व उद्देश अत्यंत शुद्ध भावानांतूनच अस्तित्वांत आलेलीं आहेत, यांत संशय नाहीं. अर्थात् कायद्यांच्या अंमलबजावणीच्या क्षेत्रांत ज्यांचा ज्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध येत असेल, ती ती मंडळी अत्यंत शुद्ध भावनेचीच असावी, नव्हे असलींच पाहिजेत, अशी अपेक्षा करणें चुकीचें होणार नाही. माणसांचा संसार सुखाचा व्हावा, त्यांनी नीतीच्या उज्वल मार्गानें चालावें, सत्याचा व सत्यप्रीतीचा ऱ्हास किंवा विपर्यास होऊं नये, याच त्या शुद्ध भावना होत. स्वतःच्या वाणीनें व करणीनें या भावनांचा आपण परितोष करूं, असा आत्मविश्वास असलेले लोकच पूर्वी कायदेपंडित बनत असत. परंतु मानवांची बुध्दिमत्ताच चवचाल बनल्यामुळें कायद्याच्या क्षेत्रांत नुसत्या शब्दांटा कीस काढून होत्याचें नव्हतें करून दाखविण्याचे डोंबारी खेळ सुरू झाले आणि वकील किंवा कायदेपंडित म्हणजे शब्दचलाखीनें आंधळ्या न्यायदेवतेच्या डोळ्यांत बिनबोभाट धूळ फेकणारा कसबी प्राणी बनला. कायदा जात्या कितीहि पोलादी अवलादीचा असला, तरी तो एकदां या कायदेपंडितांच्या तडाक्यांत आला पुरे, की त्याची पुर्ण कणीक तिंबून निघते आणि रबरालाहि त्याचा लवचीकपणा पाहून शरम उत्पन्न होते. कायदा कितीहि धोपटमार्गी असला तरी कसबी कायदेपंडित त्याच्या सर्वांगावर चोरवाटा पळवाटांचे जाळें निर्माण करण्यांत कुशल विंजणेराच्या अकलेलाहि ठकवितात. वकीली डांवपेचानें व शब्दलालित्यानें एखाद्या खुनी इसमाला 'निरपराधी' म्हणून कायदेपंडित फांसावरून खुशाल मुक्त करतो. अथवा एखाद्या असाह्य अबलेवर अत्याचार करणाऱ्या हरामखोराला, कायदेबाजींतील ' संशयाचा फायदा ' देऊन, खुशाल निष्कलंक सोडवो. यांत फार झालें तर सत्यान्वेषणापेक्षां वकिलाची कायदेबाजी विशेष हुशार म्हणून यशस्वी झाली, एवढेंच आपण म्हणूं. परंतु त्यामुळे कायद्याचा मुळ हेतू पार पाडला असें होणार नाहीं. कायदेपंडितांनी पोलादी कायद्याला कणकेचा गोळा बनविल्यामुळें, आणि कायदेपंडितांतूनच न्यायाधिशांची पैदास होत असल्यामुळें, कायद्याचा सत्यान्वेषणी बाणा लंजूर पडला व त्याचें रूपांतर आज कायदेबाजींत झालें आहे. पूर्वी कायदेपंडित होण्यासाठीं निसर्गजात गुणकर्मसिध्दिची सनद लागत असे. आतां वकिलांची एक जातच निर्माण झाल्यामुळें, कायदेग्रंथांच्या भट्टींतून पुनर्जन्म घेऊन बाहेर पडणाऱ्या वाटेल त्या गणोबाला वकिलीची सनद मिळूं लागल्यामुळें, कायदेबाजी म्हणजे शुद्ध पोटाचा धंदा होऊन बसला आहे. अर्थात 'एवढी खटपट कशासाठी पोटासाठी?' असल्यामुळें, हव्यास म्हणून, 'फॅशन' म्हणून अथवा नाइलाज म्हणून, पाठीचा कणा मोडून पोटाला येऊन भिडलेला वकिलीचा धंदा चालविण्यासाठीं गिऱ्हाइकांची पैदास करणें कोणालाहि कमप्राप्त झाल्यास नवल तें काय? पोटाशींच प्रश्न भिडल्यावर माणूस कशाची चाड ठेवणार? रोगराईचा हंगाम पिकल्याशिवाय डागदारांचे पोट गप्प बसत नाही; आणि गुन्हांची पैदास मुबलक झाल्याशिवाय खंडोगणति वकीलांचा धंदा जिवंत रहात नाहीं. रोगांच्या सांथीने लोकांचीं तोंडें सुकतात, तर वैद्य डागदारांची खुलतात. कज्जेबाजींनी लोक मणंग भिकारी होतात, तर दरिद्री वकील तात्काळ श्रीमंत बनतात. सारांश कायद्याचा जन्म कितीहि उदात्त तत्वांच्या पोटीं झालेला असला, तरी तो जेव्हां पोट भरण्याची एक कला बनतो, तेव्हां त्याच्या नांवावर वाटेल तें खपतें! आतां, कोणी एखादा धाडशी माणूस स्पष्टोक्तीची विशेष तडफ दाखविण्यासाठीं, जर

असें ह्मणूं लागला कीं आपल्या दवाखान्यांची चलती होण्यासाठी वैद्य डागदार लोक निरनिराळ्या रोगांची पैदास करतात; आणि गांवोगांव धडापासरी बोकाळलेले वकील लोक आपल्या पोटाची यात्रा दुधतुपाच्या वंगणावर यथास्थित चालूं रहावी म्हणून आपल्या कज्जेदलालांमार्फत निरनिराळ्या गुन्ह्यांची पैदास करतात, तर चिडलेल्या वैद्यबुवांचा उलटा हमगर्भ पोहचण्यापूर्वीच, अब्रूदार वकीलांच्या बेअब्रूच्या फिर्यादीचें रेचक त्या धाडशी प्राण्याला मिळाल्याशिवाय खास राहणार नाही. कारण कायदाच पडला तसा! प्रश्न एवढाच उरतो कीं कायद्यांचा मूळ हेतू जो मानवां समाजांतील गुन्हांची प्रवृत्ति कमी करणें, त्यांची नीतीमत्ता वाढविणें, त्यांना सत्त्याची चाड अधिकाधिक लावणें, तो आजपर्यंत कितीसा सिद्धीस गेला आहे? वकीलांची जबरदस्त वाढ गुन्ह्यांच्या जबरदस्त वाढीचेंच प्रमाण मानलें, तर कायद्याला जन्म देऊन माणसांनी आपला जन्म धुळीस मिळविला, असाच निष्कर्ष निघतो.

गुलाम राष्ट्रांत कायदेबाजी व कज्जेदलाली यांचा व्यापार फारच मोठ्या प्रमाणावर चालतो. किंबहुना या व्यापारावरूनच राष्ट्राच्या अधःपाताची व निकृष्ट मनःस्थितीची मोजदाद होते. आजला हिंदुस्थान देश कज्जेदलालीत आकंठ बुडाला असून, कायदेबाजीचें त्याला भयंकर व्यसन लागलें आहे. प्रत्येक गावातल्या दिवाणी खटल्यांची संख्या इतकी विलक्षण फुगलेली आहे, आणि त्यांच्या तक्रारींचें स्वरूप इतक्या क्षुद्रावस्थेला गेले आहे कीं घोड्यांच्या शर्यतीप्रमाणें 'कैफियत कबजा नोटीस डिकी हुकूमनामा जप्ती'चे खेळ खेळण्याचें कोट्यवधि लोकांना व्यसनच जडलें आहे. नुसत्या कोर्टफीला लागणाऱ्या स्टांपापायीं खर्च होणाऱ्या संपत्तीचा उधळपट्टीचा आढावा काढला, तर दारूबाजी पत्करली पण ही कायदेबाजी नको, असें खुद्द कज्जेदलालांनाहि कबूल करावें लागेल. सव्वा रुपयाच्या वर्षासनासाठी किंवा समाईक इस्टेटीतील चारपांचशेंच्या हक्कासाठीं हजारों रुपयांचा कायदेबाजी सट्टा लावणारे लोक लाखों सांपडतात. ही सट्टेबाजी हिंदुस्थानांतल्या प्रत्येक खेड्यापाड्यांत सुद्धां इतकी खोल जाऊन भिडली आहे कीं चार महिने नाइलाजानें शेतकींत गुंतलेले लोक पुढच्या आठमाहींत 'कैफियत कबजा'चे खेळ खेळण्यांत निमग्न असतात. एकट्या भांडकुदळ रत्नागिरी जिल्ह्यांत कायदेबाजीचा व कज्जेदलालीचा व्यापार, मुंबई इलाख्यांतल्या दारूच्या व्यापारापेक्षां दिढी दुपटी चालतो, अशी ख्याती आहे. या कायदेबाजीमुळें लोकांनी आपल्या संपत्तीची, आरोग्याची व नीतीची भयंकर नासाडी करून घेतलेली आहे. वेळीं संपत्ति पुन्हा मिळवितां येईल, पण कायदेबाजीच्या घाणेरड्या व्यसनानें सडलेली नीतिमत्ता सुधारणें फार कठीण आहे. भांडकुदळपणा ही एक फॅश बनल्यामुळें, कायदेबाजीला सहाजीकच व्यापाराचें रूप आलें आणि वकील व त्यांचे कज्जेदलाल हस्तक यांचा गांवोगांव व खेडोखेडीं टोळघाडीप्रमाणें प्रसार झाला. कज्जेदलालांची संस्था किती प्राचीन आहे कोणास ठाऊक, परंतु पुराणांत 'कळीचा नारद' आपल्याला पदोपदीं निदान एकटाच भेटतो. पण हल्लीं कळीच्या नारदांचे पीक या हिंदुस्थानात मुबलक पिकलें आहे. पौराणीक नारद नुसत्या कलागति लावून मजा पाहत असे; पण हे आधुनिक नारद लोकांची नीतिमत्ता बिघडवून त्यांना कलागतीचे गुलाम बनवीत असतात. नारद सृष्टिविधात्या ब्रह्मदेवाचा पुत्र, तर आमचे हे कज्जेदलाल महादेवाचे बाप. आपल्या कलागती मेंदूतून कसल्याकसल्या त्रांगड्याची सृष्टि उबवून काढतील, त्याचा कांहीं नेम नाहीं. धोरणी व धाडशी व्यापाऱ्याप्रमाणें कायदेवाजीचा व्यापार अखंड चालविण्यासाठीं, याची तंगडी त्याच्या गळ्यांत आणि त्याची पागडी तिसऱ्याच्या डोक्यावर घालण्याची त्यांची व्यभिचारी चतुराई पाहिली कीं

एन ४००६--२७

ज्या राष्ट्रांत व समाजांत हे नारद वावरतात त्यांत आणि नरकांत किती इंच अंतर उरलें, एवढाच प्रश्न विचारी डोक्याला त्रस्त करतो. सामाजीक उन्नतीच्या पायावर राष्ट्रोन्नतीचे मंदीर उभारण्याची शिकस्त करणाऱ्या राष्ट्रपुढाऱ्यांनी अस्पृश्यता, ब्राह्मणबाह्मणेतर, हिंदु-मुसलमान वगैरे प्रश्न कालांतराने जरी सफाईत सोडविले, तरी हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या मेंदूला जाऊन भिडलेली कायदेबाजी निस्तरतां निस्तरतां त्यांची हाडे खिळखिळी झाल्याशिवाय खास रहाणार नाहींत, असें आम्हांला वाटते.

आज हिंदुस्थान हें गुलामांचे राष्ट्र आहे. हिंदुस्थानांतले यच्चावत् राहिवाशी गुलाम आहेत. ते स्वतःच्या कुकल्पनांचे दास आहेत, तसे इंग्रेजी राष्ट्राचे जिंकलेले गुलाम आहेत. जगांतली इतर स्वयंशासित राष्ट्र हिंदुस्थानाला 'मनमुराद चरण्याचे एक कुरण' यापेक्षा अधिक कांहीहि महत्व देत नाहींत. हिंदुस्थानच्या रहिवाशाला जगांत कोठेहि कसलाहि मान मिळत नाही; इतकेंच नव्हे तर, खुद्द देशांतल्या देशांत एकमेकांना एकमेकांची पर्वा वाटत नाही. फिजी अंदमान आफ्रिकेत मजुरांचा तुटवडा पडला कीं साऱ्या जगाची नजर चटकन हिंदुस्थानाकडे कां वळते? कारण, 'हिंदुस्थान म्हणजे मजुरांचा देश' ही आमची अब्रू आज चौखंडी दुमदुमलेली आहे. हिंदी माणूस कुठेंहिं जावो, त्याकडे सर्व जग आज धिःकाराने पहातें. साऱ्या जगांत हिंदी माणसाची आज कवडीचीहि किंमत नाही. त्याला कशाचीहि अब्रू नाही. पण कायदेबाजीची धूळवड खेळणारे गुलाम हिंदी लोक अब्रुनुकसानीच्या फिर्यादीवर फिर्यादी इंग्रेजी सरकारांत पेश करतांना पाहिले की त्यांच्या करणीची कींव येते! ज्यांना साऱ्या कोणी कवडिचाही धूप घालत नाहीं, असल्या गुलामांना अब्रुनुकसानीचीच तेवढी जाणीव असते, हा खरोखर मोठा विचार करण्यासारखा चमत्कार नव्हे काय? हिंदी लोकांना अब्रूची चाड असती तर आज दिसते त्यापेक्षां त्यांची स्थिति कांहीं निराळीच असते. गुलामांच्या अब्रूची चाड नपुंसकाच्या वंशवृद्धीइतकीच जगाच्या विश्वासाला पात्र ठरते. पण अब्रुकसानीच्या भरपाईसाठी स्वतःच्या अकलेचीं, पैशाची व अब्रूचीं प्रदर्शनें तिवाठ्यावर उघडणाऱ्या हरीच्या लालांची संख्या पाहिली कीं कायदेबाजी व कज्जेदलालीचें विष हिंदी लोकांत किती भयंकर भिनलें आहे, याची विचारवंतांनींच कल्पना केलेली बरी. विशेषतः हे अब्रूसाठी जीव देणारे गुलाम लोक स्वतःच्या अब्रूच्या किंमतीचा जेव्हां आंकडा ठरवितात, तेव्हां तर त्यांच्या अकलेची किंमत ठरविणे कठीण जातें. प्रत्येक पतिव्रता स्त्रीला आपल्या नवऱ्याचा जीव 'लाखाचा' वाटतो, म्हणून प्रत्येक शहाणा जर एक लाख रुपयासाठी लिलावांत उभा राहिला, तर त्याच्या तोंडांत घालायला शेणाचा तुटवडा खास पडणार नाहीं.

आमच्या हिंदी राष्ट्राच्या गुलामगिरीला जीं अनेक कारणे घडली आहेत व सध्या घडत आहेत, त्यांत कायदेवाजी व कज्जेदलाली हें सर्वांत अत्यंत भयंकर कारण होय. महात्मा गांधीनी कोर्ट-बहिष्काराचा आग्रह धरण्यांत, त्यांच्या हृदयाला याच कज्जेदलालीनें दंश केला. परंतु काहींतरी हुल्लड करण्यांतच गांधींचें अनुयायित्व मिरविणाऱ्यांना नुसता बहिष्कार मात्र दिसला, त्याचें आद्यकारण मुळींच उमगलें नाही, असें म्हणणें भाग पडतें. ११ऑगष्ट १९२०च्या 'यंग इंडिया'त गांधी म्हणतात कीं ''कोणतेंहि सरकार कोर्टाद्वारेच आपली सत्ता प्रस्थापित करतें आणि शाळांमार्फतच कारकुंडे व इतर नोकरांची पैदास करतें. या सूत्रांत विचारांचे विश्व आहे.

कायदेबाजीनें सत्याची चाड ठार मारली आहे, तर कज्जेदलालीनें माणसांच्या माणुसकीवर रखरखीत निखारे ठेवले आहेत. कज्जेदलाली हा एक सभ्य प्रकारचा नैतिक व्यभिचार (Moral prostitution)

आहे. विवेकाचे डोळे फोडणारी सळई आहे. विचाराच्या गळ्याला नख देणारी राक्षसी आहे. समाजांत दुहीचा वणवा अखंड धडाडत ठेवण्याचे दुष्कर्म कायदेबाजीच करीत असते. कज्जेदलालींत मुरलेल्या माणसांना सद्सद्विवेकबुद्धीची नांगी प्रथम मोडून, मग आपल्या धंद्यांत यशाची खात्री बाळगावी लागते. त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्नच कज्जेदलालीवर अवलंबून असल्यामुळे त्यांच्या कारस्थानी मेंदूची भ्रष्टता, इन्फ्ल्युएंझाच्या साथीप्रमाणें सर्वत्र बोकाळलेली आहे.

कायदेबाजी ही लक्षावधि लोकांच्या 'रिकामपणाची कामगिरी' किंवा ऐदी मेंदूचा खेळ होऊन बसला आहे. मानसिक गुलामगिरीचें ती खाद्य आहे. या खाद्याचा नायनाट झाल्याशिवाय, सामाजिक आत्मविकास होणार नाहीं व तो झाल्याशिवाय राष्ट्रोन्नतीची प्रभातही उजडणार नाही. या लेखामुळे सर्व वकील व त्यांचे कज्जेदलाल हस्तक यांचा प्रबोधनावर घुस्सा होण्याचा संभव आहे. पण त्यांना आमची हीच विनंती आहे कीं :

वकीलांच्या पाया माझें दंडवत ।
आपुलालें चित्त शुद्ध करा ।।

□□□

एन ४००६--२७अ

स्फुटविचार

पुराणकारांचे आधुनिक सांप्रदायी

पुराणांतील धर्मकल्पना आणि नीतिमत्तेच्या व्याख्या किती खोडसाळ आहेत, व त्यांचा हिंदुजनांवर केवढा विपरीत परिणाम झालेला आहे, याचें पुराण सांगण्याची जरूरी नाही. पौराणीक भाकडकथांतील उघड दिसणाऱ्या हास्यास्पद व तिरस्करणीय गोष्टींतूनसुद्धां 'वेदांत' काढून दाखविणारे धादांती कितीहि असले, तरी त्या वेदांताची पर्वा करणारी जनता केव्हांहि नव्हती व आतांहि नाही. उघड दिसेल तो अर्थ, मग त्यापासून केवढेहि अनर्थ उद्‌भवले, तरी धर्माच्या सबबीवर ते जनता खुशाल मान्य करते. श्रीकृष्णाची रासलीला घ्या, वामनाचा पराक्रम घ्या, परशुरामाची 'निःक्षत्रीय पृथ्वी'ची राष्ट्रीय कामगिरी घ्या, काय वाटेल तो पौराणीक प्रसंग घ्या, जनता निमूटपणें त्याचा अक्षरशः स्वीकार करते. चिकित्सेचा गंध नाहीं, संशयाची बोली नाही, की शक्याशक्यतेचा विचार नाहीं. यामुळें हिंदुसमाजात फैलावलेल्या मानसिक दास्याचा परिणाम म्हणजेच सध्यांची अवनत व गुलाम बनलेली हिंदु जनता होय. ही स्थिती पालटवण्यासाठीं ठिकठिकाणी अनेक विवेकवादी जन शिकस्तीचा प्रयत्न करीत आहेत. हळूहळू परंतु नेटानें होत असलेल्या विद्याप्रसारामुळें चिकित्सक बुद्धि थोडथोडी जीव धरीत आहे. ज्ञानाला पारखा झालेला स्त्रीवर्ग व इतर मागासलेले समाज, पौराणीक धर्माविषयी कोठें थोडा चिकित्सक संशयी व पृच्छावादी बनतो न बानतो, तोंच पौराणिक शिमग्याची हालतीं चालतीं प्रदर्शने दाखविणारे सिनेमावाले महात्मे पुढें सरसावले आहेत. 'धार्मिक फिल्म' सबबीवर त्यांनी बहुतेक सर्व पुराणांचा उकीरडा उपसण्याची 'पवित्र' कामगिरी मोठ्या अहमहमिकेनें हातीं घेतलीं आहे.

झुकत्या दुनियेला झुकानेवाल्यांचा कधींच दुकाळ पडत नाहीं. विलायती फिल्मांत अचाट धाडसाची कामें अनेक नट करतात. ट्रॅन्सफर सीनचे आश्चर्योत्पादक देखावे दाखविले जातात. ते पाहून प्रेक्षक कित्येक वेळां हतबुद्ध होतो व त्याची कल्पनाशक्ति जंजरहि पडते. हिंदु सिनेमावाल्यांचें व धाडसाचें मोठें हाडवैर! धाडसाचें पीक मानी व स्वतंत्र राष्ट्रांतच पिकतें, ते या दास्यप्रवर्तक हिंदुस्थानांत कोठलें? म्हणून या पवित्र व धार्मिक देशी चित्रपटवाल्यांनी पुराणांची कास धरली आहे. पुराणेंच ती? त्यांत वाटेल ती चीज हटकून सांपडायचीच. अचाट धाडस पाहिजे, उघडा भागवताचें कोठार, आणि खेचा राधा कृष्णाला बाहेर. उत्तान शृंगार हवा, तर दत्तजन्माच्या फिल्ममध्यें पाहून घ्या प्रत्यक्ष नग्न अनुसूया.

ट्रॅन्सफर सीनची इच्छा असेल, तर इंद्र-अहिल्येचा एकांत खुशाल पहा; त्याला गौतमाची सुद्धां आडकाठी नाही. बरें झालें, महाभारतकाळी द्रौपदीची अब्रु कृष्णाजीपंत पटर्वधनानीं राखली; नाहींतर आमच्या देशी सिनेमावाल्यांनीं महाभारताचा आधार दाखवून खुशाल एखादी नग्न गोवेकरीण फिल्ममध्यें नाचविली असती! पुराणांत नमूद केलेले अशक्य चमत्कार प्रत्यक्ष करून दाखविणें मनुष्याला जरी केव्हांहि शक्य नाही, तरी फोटोग्राफीच्या सहायानें वाटेल ती चमत्काराची 'ट्रिक' करणें सिनेमावाल्यांच्या हातचा मळ आहे. त्यामुळें भावनेचे गुलाम झालेल्या हिंदु समाजाला पुराणांतला शिमगा चमत्कारांच्या आकर्षणानें आकंठ गिळण्याचा घाणेरडा प्रघात या पुराणकारांच्या आधुनीक सांप्रदायिकांनी सुरू केलेला पाहून कोणाहि विचारवंतास खेदच वाटला पाहिजे. पुराणांनी आजपर्यंत हिंदूंचा केला तितका उद्धार पुरे झाला! हे आमचे सिनेमाकार मराठ्यांच्या इतिहासांतील कांही निवडक भागाकडे आपली दृष्टी वळवतील, तर ते नरकांत खास जाणार नाहींत!

हुंडाविध्वंसक संघ, दादर

या संघाचा जन्म झाल्यापासून हुंडा शायलोकांच्या चळवळीनें निराळेंच धोरण पत्करलें आहे. पूर्वी लग्नसराईत ठरणाऱ्या सोयरिकी व हुंड्यांचे आंकडे भराभर प्रसिद्ध होत असत; पण आतां हे सर्व व्यवहार अगदीं गपचूप बुरख्यांतल्या बुरख्यांत होऊ लागले आहेत. सभ्य दारूबाज जसे गुप्तपणें दारू ढोसून तोंडाची घाण लपविण्यासाठीं घणे राजीन्याची फक्की मारतात; किंवा रंडीबाज 'मला कोणी पहात तर नाही ना!' या चिंतेने कावरेबावेर होऊन कुंठणखान्याच्या चोरदेवडींत घुसतात; तसलाच कांहीसा प्रकार हुंडेबाजांनी सुरू केला आहे. लग्न ठरविण्याच्या अटींत 'हुंडा दिला घेतला नाहीं. इतर कांही आहेर देणें घेणं हा परस्पर शुद्ध खुषीचा सौदा आहे' ही एक शायलॉकी अट वधुपक्षाच्या माथीं मारण्यात येऊं लागली आहे, इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष हुंडा हबकून 'हुंडा घेतला नाही' अशी धडधडीत खोटी जबानी (लेखी व तोंडी) देण्याइतकी विवेकबुद्धीची मान पिरगाळण्याची संवय हुंडेबाज अवमाधम आंगी बाणण्याची शिकस्त करीत आहेत. हा परिणाम वाईट तर खरा, पण तो क्रमप्राप्त आहे आणि तो घडून येणार नाहीं, अशी संघाची अटकळहि नव्हती. या विषयीं १६ मे १९२२ च्या प्रबोधनांत (पृ. ११८) आम्हीं स्पष्टच इषारा दिला होता कीं ''प्रतिष्ठित 'टेंपरन्सवाले' (मितपानवादी) लोकसुद्धां कॉग्नॅकचीं बुचें खोलीचें दार लावल्यानंतर खोलतात. याच रीतीनें निःशब्द परंतु सक्रीय प्रतिकाराच्या व असहकारितेच्या चळवळीमुळें हुंडेबाज अधम गपचूप हुंडा घेऊं लागले, तरीही ती काय थोडीथोडकी सुधारणा झाली? खबदाडांत मुस्कट फिरवून दारू ढोसणारांना जसें एवढें खास पटलेलें असतें की दारू पिणें हे घोर पातक आहे. तसेंच चोरून हुंडा घेणारांना आपण कसलें भयंकर समाजद्रोजी पातक करीत आहोंत ही जाणीव उत्पन्न झाल्याशिवाय कशी राहीलत्त' आजपर्यंत हुंड्याची भाड खाणारांनी समाजद्रोह केला, आतां गुपचूप हुंडे हबकून धडधडीत खोटें बोलण्याच्या उपक्रमानें ते आत्मद्रोह करीत आहेत. मुलांमुलींच्या विक्रीवर मिळणाऱ्या फुकटाफाकट डबोल्याला लालचटलेली वृत्ति अखेर माणसांची

गाढवें कशी बनविते, याची चित्रें चालूं लग्नसराईच्या व्यापारांत बरीच उघडकीस येणार आहेत.

मिरवणुकींत पोलीस कशाला?

संघाच्या पहिल्या सलामीची समग्र हकिकत स्वतंत्र दिली आहे. संघाची चळवळ होणार अशी खात्री पटतांच श्री. भिसे यांनी नवरदेवाच्या मिरवणुकीचें संरक्षण होण्यासाठीं पोलीसांची सेना जय्यत तयार ठेविली होती. कदाचित् श्री. भिसे हे गर्भश्रीमंत असल्यामुळें ती 'शोभेसाठी' हि हजर असेल. श्रीमंतांच्या श्रीमंतीच्या आवडी नावडी आम्हांसारख्या दरिद्रांना कसच्या कळणार? अर्थात् मिरवणुकीच्या दिमतीला इतक्या पोलीसांची नेमणूक शिरस्त्याप्रमाणें मुंबईच्या किंवा दादरच्या मॅजिस्ट्रेट साहेबांच्या खास परवानगीनेंच झालेली असली पाहिजे. आणि पोलीसपार्टीच्या अवश्यकतेच्या कारणांचेंहि 'आफिडेवीट' श्री. मिशांनी स्वदस्तुर सहीनें लिहून दिलें असेल. श्री. भिसे यांच्या घरचें लग्न हा कांही सार्वजनीक प्रसंग नव्हे, किंवा त्यांची मिरवणूक ही कांही गांधीची रौलट ॲक्ट मिरवणूक नव्हे, तर सार्वजनिक शांततेसाठी लाठीवाल्या पोलीसांची सेना हजर असली पाहिजे. श्री. भिसे व त्यांचे पोलीस त्यांना शांततेची जितकी महति वाटते, त्यापेक्षां शतपट हुंडाविध्वंसक संघाला वाटते, हे श्री. भिसे व पोलीस यांच्या निदर्शनास आत, चांगलेंच आलें असेल. संघाचा जन्म हुंड्याच्या घाणेरड्या सामाजीक रूढीचा विध्वंस करण्याकरितां जरी झालेला आहे, तरी शांततेच्या कायद्यांना धाब्यावर बसविण्याइतका प्रसंग हुंडेबाजांनी अझून तरी त्यांच्यावर आणलेला नाहीं. हुंडा हा सार्वत्रीक रोग आहे. हुंडा हें सामाजीक पाप आहे. हुंडा शहाण्यासुरत्या हिंदु समाजांत लग्नाळू मुलामुलींचा म्हणशी टोणग्यांप्रमाणें प्रत्यक्ष विक्रा करीत आहे. हिंदुं समाजांतील प्रत्येक जातिपरिषदेनें हुंड्याचा तीव्र निषेध केलेला आहे. महाराष्ट्राप्रमाणें बंगाल्यांतहि हुंड्यानें धुडगूस घातला आहे. पूर्व बंगालची हिंदु प्रजा १९१९ ते १९२२ पर्यंत सपाट्यानें ऱ्हास पावल्याबद्दल माडर्न रिव्यूकर्ते जानेवारी १९२२ च्या अंकात सप्रमाण जाहीर करीत आहेत. हा प्रश्न शुद्ध सामाजीक आहे. यांत सरकारचा किंवा पोलीसांचा कांही एक संबंध नसतां, त्यांनी व्यर्थ लूडबूड का करावी? लुडबूड करायचीच असेल, तर एखाद्या श्रीमंत हुंडेबाजाच्या पाठीशी उभे राहण्यापेक्षा निरलस प्रजादक्षैक बुद्धीनें या घाणेरड्या समाजविध्वंसक हुंडा रूढीचें उच्चाटण करणें अशक्य आहे की नाहीं, याचा पुरावा गोळा करण्यासाठी सरकारनें ताबडतोब एक हुंडा कमिशन बसवावें अशी आमची संघाच्या वतीनें हात जोडून प्रार्थना आहे. या कमिशनमुळें तरी आपल्या हिंदु प्रजेची सामाजिक स्थिती कसकसल्या घाणेरड्या प्रकारांनी कुझून सडलेली आहे, याची सरकारला कल्पना होईल. एखादा समाजसुधारक कौन्सिलर हुंड्याचा प्रश्न कायदेकौन्सिलांत आणिल काय? संघाच्या स्वयंसेवकांचे शांत वं मूकवृत्तीचें शिस्तवार वर्तन पाहून श्री. भिसे व त्यांचे पोलीस मित्र तर खूष झालेच असतील, पण हुंडाविध्वंसकांच्या निःशब्द निषेधाने भेदरलेल्या श्री. भिशांना आपल्या हुंडेबाज चिरंजीवांच्या लग्नाच्या मिरवणूकी पोलीसांच्या पहाऱ्यांत मिरवाव्या लागल्या, हा हुंडाविध्वंसक संघाचा मोठाच विजय नव्हे तर काय? आजपर्यंत कायस्थ प्रभूंच्या लग्नांत भटाभिक्षुकांची पार्टी लागत असे,

आतां पोलीसांच्या पार्ट्या लागूं लागल्या! संघाला दोनीहि गोष्टींचा हर्षविषाद कांहींहि नाही.

समाजसुधारक भगिनी बांधवांचें कर्तव्य

प्रचलीत कोणत्याही रूढीविरुद्ध बंड पुकारणारी व्यक्ति अथवा संघ नेहमीच लोकांच्या रोषास बळी पडत असतो. हा सनातन नियम आहे. हुंड्याविरुद्ध सक्रीय विध्वंसनाची प्रत्यक्ष सुरुवात करून हुंडाविध्वंसक संघानें त्या रोषाचा कांटेरी मुकूट आपल्या मस्तकीं धारण केला आहे. संघ कोणाचाहि केव्हाहि व्यक्तिशः द्वेष करीत नाहीं. त्याचा कटाक्ष रूढीविरुद्ध आहे. अर्थात् रूढीच्या गुलामांविरुद्ध जरी त्याच्या चळवळींचा परिणाम होणें क्रमप्राप्त असलें, तरी त्यांच्या हितासाठींच संघ लोकअमान्यतेचें कडुजहर वीष प्यावयास सिद्ध झाला आहे. एवढें साधें तत्व जर ते शांतपणे विचारांत घेतील, तर संघाच्या पुढाऱ्यांवर व्यक्तिद्वेषाचा मारा करतांना त्यांचा हृदयस्थ आत्माराम खात्रीनें संमति देणार नाही. हुंडा हा अखिल हिंदु समाजाचे सामान्य सामाजिक दुखणें आहे. त्याच्या वेदना सर्वांना जाणवतात. त्याविरुद्ध ओरडा आजकालचा नाही. आज ३०-३५ वर्षे हुंड्याच्या उच्चाटनाचे यत्न चालूं आहेत. संघाने रिकामटेंकडा पुढाकार घेऊन विशेष जर काही केलें असेल तर तें हेच की हे घाणेरडे दुखणें चव्हाट्यावर बांधलें. आमची खात्री आहे कीं हुंड्यामुळें प्रत्येक समाजांत वाजलेजीं विषमविवाहाची, अनीतीची व पुत्र कन्यांची म्हशी टोणम्या प्रमाणें होणाऱ्या विक्रीची चाड असलेला प्रत्येक समाजसुधारक संघाच्या या चळवळीला सक्रीय सहानुभूति दाखवील. हा प्रश्न खुद्द सरकारनेंच हाती घेतल्याशिवाय सुटणार नाहीं, हे आम्ही जाणून आहोत. त्या दिशेनें यत्न व्हावा व लोकमत-जागृति व्हावी. म्हणून अखिल भारतीय हिंदु हुंडा विध्वंसक परिषद भरविणें श्रेयस्कर होईल, असें वाटतें. विचारवंत हिंदु भगिनी बांधवांनी याविषयी चर्चा करावी. आमची प्रिय व्यवसाय भगिनी ''हिंदमहिला'' हुंडाविध्वंसनाच्या क्षेत्रांत पुढे सरसावेल काय? कारण, आमच्या सारख्या मल्लांनी कितीहि कुस्त्या मारल्या, तरी 'हिंदमहिला' जेव्हां महिषासुरमर्दिनीचें रूप धारण करील, तेव्हाच हा हुंडा दैत्य रसातळाला जाईल.

माणसांना साधलें नाहीं ते गाढवाला साधलें

हुंड्याच्या घाणेरड्या चालीविरुद्ध आजपर्यंत पुष्कळ जण पुष्कळवेळां बोलले व पुष्कळांनी पुष्कळ लेख लिहिले. परंतु विचारक्रांतीचा जबरदस्त धक्का कोणालाहि देतां आला नाहीं. संघाने निःशब्द मूक निषेध व्यक्त करण्यासाठी काढलेल्या गाढवाच्या मिरवणुकीने हे कार्य चुटकीसरसें केलें. गेल्या आठवड्यांत सबंध मुंबईलत्याच्या लोकांच्या तोंडी हा गाढवाचा विषय सारखा वाजत आहे. हुंड्याच्या निषेधाविषयीं कार्यक्रमाचे स्वरूप कसें असावें या विषयी संघाकडे लेखी व तोंडी सूचना येऊ लागल्या.

'तत्व मान्य पण तपशील अमान्य असल्या' मताचे शिखंडी सुद्धां विघातक आणि विधायक मार्गाचा काथ्याकूट करूं लागले. हुंड्याचा उलट सुलट प्रघात सुरूं असलेल्या सर्व हिंदु समाजांतील निरनिराळ्या जातींतहि हा प्रश्न जारीनें खलबत्यांत घोठला जात आहे. सारांश, विचारक्रांतीचा भोवरा निर्माण करण्यात आणि हुंडेबाजांच्या निद्रिस्थ लज्जेला जागृत करण्यांत जेथें माणसांच्या जिभा व लेखण्या बोथट झाल्या, तेथें गाढव ठरविलेल्या एका पशूनें हुंडानिषेधाची विचारक्रांति चुटकीसरशी करावी, यांत विचार करण्यासारखें काहींच कां नाहीं? प्रो. कार्लेकरांच्या सर्कशीत मागें एकदां शिकविलेल्या गाढवाची कसरत पाहून कै. टिळक म्हणाले होते की ''गाढवानें केलेलीं आजचीं निरनिराळीं कसरतीची कामें पाहून, अतःपर गाढवाला गाढव म्हणणारा माणूसच गाढव ठरण्याचा संभव आहे.'' याच नियमानें सर्वोच्या सद्‌सद्विवेक बुद्धीला हुंडानिषेधाचा चिमटा घेण्यासाठी गाढवाची मिरवणूक काढणाऱ्या हुंडाविध्वंसक संघातल्या पुढाऱ्यांना व तरुण स्वयंसेवकांना गाढव म्हणण्याचा गाढवपणा कोणी हुंडेबाज गाढवांनी जरी केला, तरी प्रत्यक्ष एका गाढवानें निर्माण केलेली विचारजागृति नाकबूल करण्याइतका गाढव माणसांत असेल, असे आम्हांला वाटत नाहीं.

□□□

अग्रलेख

शिमग्याची बोंब

अज्ञान मत्सराची रचोनी होळी । ज्ञानाग्नि घालूनि समूळ जाळी ।। १ ।।
आजुनी कां उगलाची । बोंब पडों दे ऐंक्याची ।। २ ।।
मांदी मेळवा मर्दाची विवेकवाद पसरविण्या ।। ३ ।।
घांवण्या धांवेल भगवंत । पारतंत्र्य-शिमगा निरसिण्या ।। ४ ।।
स्पष्ट प्रबोधनीं मारिली बोंब । अखिल हिंदुजन अभेद व्हावें ।। ५ ।।

शिमग्याची बोंब. छे: काय ही भिकारडी शब्दयोजना! किती असभ्य हे शब्द !! 'मराठी भाषेंत नवनव्या विचारांची भारदस्त भरती करणाऱ्या प्रबोधनकाराला आजच्या अग्रलेखासाठी हा घाणेरडा मथळा घालण्याची कां लहर आली बुवा? अशा प्रकारचे उद्गार आमच्या पुष्कळ वाचकांच्या तोंडून बाहेर पडण्याचा बराच संभव आहे. शिमग्याची बोंब हा शब्दसमूह आम्हांलाहि अत्यंत तापदायक व तिरस्करणीय वाटतो. शिमगा हा शब्दच इतक्या गलिच्छ व बीभत्स परंपरेच्या खातेऱ्यांतला आहे कीं त्याचा नुसता उच्चार होतांच आंगांवर कांटा उभा राहतो. पण प्रबोधनचा आजचा अंक वाचीत असतां, प्रिय वाचकजनहो, आपल्या सभोंवतीं काय काय प्रकार चालले आहेत, याचा आपण यापूर्वी कधिं कस्सून विचार केला असेल काय? धर्माच्या सबबी खाली किती अनिर्वचनीय कुकर्मीच्या राशी घालण्यांत हिंदुजन आज सबंध पंधरवडा गर्क झाले आहेत, याची कोणालाच कशी चिळस उत्पन्न होत नाहीं? कोणालाच कसा त्वेष येत नाहीं? ज्या भिकारड्या धर्मग्रंथांत या अश्लील शिमग्याचें मंडन केलेलें आहे त्या अधर्मग्रंथांची व त्यांच्या पुरस्कर्त्या अधर्ममार्तंडांची होळी पेटविण्यासाठी एकहि महात्मा पुढे सरसाऊं नये काय? उच्चारूं नये असले अश्लील शब्द लहान लहान मुलें प्रत्यक्ष आईबापांच्या समोर बेधडक आज मोठमोठ्याने ओरडत आहेत, आणि एरवीं नीतिमत्तेची जाडजूड पुराणें झोडणारे वयस्क लोकसुद्धा या सर्व गोष्टी आंधळ्या बहिऱ्याप्रमाणें खुशाल चालू देत आहेत.

स्त्रीवर्गाला हा शिमग्याचा पंधरवडा किती जाचक जात असेल, याची कधीं कोणी कल्पनाच केलेली दिसत नाहीं. आमच्या भगिनींकडे-तोंडांतून ब्र काढणें तर राहू द्याच- नुसत्या वांकड्या नजरेनें कोणी पाहतांच, मर्द मराठ्यांच्या आणि मानी रजपुतांच्या सहस्रावधि समशेरी सपासप आपल्या मेणांतून बाहेर

पडत, अशी इतिहासप्रसिद्ध ख्याती, त्याच विनयशील स्त्रीजातीचा किती अमानुष पशु वृत्तीनें आपण या दशदोषपूर्ण शिमग्याच्या पंधरवड्यांत अवमान निर्भत्सना व निंदा करतो, याची हिंदुबांधवांनों, मर्द मराठ्यांनो, अहो मानी रजपुतांनो, तुम्ही जाणीव बाळगिली अहांत काय? चांगले सुशिक्षित (?) ह्मणविणारे लोक सुद्धां, शिमग्याच्या आचरट व अनीतिमान प्रचाराचा तिटकारा व्यक्त करूनहि, पौर्णिमेच्या होळीपुढे 'निदान शास्त्रासाठीं तरी' बीभत्स शब्दप्रयोगासह एकतरी बोंब मारल्याशिवाय मुळींच रहात नाहीत. मानसिक गुलामगिरीचा किती हा करुणाजनक देखावा? तात्पर्य हिंदु धर्माला, हिंदु संस्कृतीला आणि हिंदु समाजाच्या नैतिक स्थैर्याला काळीमा फांसणाऱ्या शिमग्याच्या विरुद्ध तीव्र शब्दांत निषेध करणाऱ्या प्रबोधनानें, अखिल हिंदु समाजाच्या बोकांडी बसलेल्या या अनीतिमान प्रचाराची जाणीव पटवून देतांना 'शिमग्याची बोंब' ही चालू पंधरवड्यांत बोकाळलेली शब्दयोजना अग्रलेखाच्या मथळ्यासाठी घेतल्याबद्दल राग मानण्याचें काय कारण?

हिंदुराष्ट्र आज जागृत झालें आहे. सामाजीक धार्मिक राजकीय क्षेत्रांत लोकशाहीचें पीक पिकविण्यासाठी शेकडों माननीय स्वयंसेवक आज निःस्वार्थ बुद्धीनें झगडत आहेत. हिंदु जनांच्या सुप्त कर्तबगारीचें प्रबोधन करण्यासाठी कित्येक महात्मे त्यांच्या शैक्षणिक व औद्योगीक विकसनाची तनमनधनें शिकस्त करीत आहेत. स्वराज्याच्या प्राप्तीविषयी अहोरात्र हाकाटी सुरू आहे. कोठेंहि पहा, जिकडे तिकडे राष्ट्राच्या विराट आत्म्याचा विकास करण्याच्या खटपटी जारीनें चालल्या आहेत. कार्याची लगबग उडाली आहे. जेवायला फुरसत नाहीं. मरणाची पर्वा नाहीं. राष्ट्राच्या गुलामगिरीच्या पर्वतप्राय दुःखापुढें वैयक्तिक अल्पसुखाची कोणी क्षिति बाळगीत नाहीं. मतभेदांचीं जाळी कितीही अफाट पसरलेलीं असली आणि त्यांची केवढीहि गुंतागुंत झालेलीं असली, तरी कर्तबगार भगिनी बांधव आपापल्या निश्चित दिशेनें कर्तव्य कर्माचा कसोशीनें पाठलाग करीत आहेत. फेरवाले नाफेरवाले प्रागतिक धिम्मेगतिक नवमतवादी झाडून साऱ्यांचा आक्रोश एकच आहे कीं

हिंदुस्थान स्वयंशासित झालें पाहिजे

अहाहा ! किती प्रज्वलीत ही महत्वाकांक्षा. किती गोड ही कल्पना. किती उत्तेजक हे शब्द. हिंदुस्थान स्वयंशासित झालें पाहिजे, हिंदुस्थानांतल्या एकूण एक रहिवाशाच्या पायांतली गुलामगिरीची शृंखला तुटून पडली पाहिजे. तीस कोट हिंदी देशबांधवांना स्वातंत्र्य पाहिजे. जगाच्या राष्ट्रसंघांत हिंदुस्थानाला बरोबरीच्या मानाची खुर्ची मिळावी, हिंदी माणसाचा जगाच्या पाठीवर प्रत्येक ठिकाणी सन्मान व्हावा, त्याला कोणीहि गुलाम, दास, जिंकलेला, नेटीव, निग्गर किंवा असली कोणतीहि शिवी कोणीं हांसडू नये, त्याच्या प्राचीन इतिहासप्रसिद्ध संस्कृतीचा व सर्वप्राचक हिंदु धर्माचा सर्वत्र बोलबाला व्हावा, ही इच्छा आज यच्चावत हिंदी मनुष्यमात्राच्या ओठींपोटी सारखी उचंबळत आहे. स्वातंत्र्यवादी व स्वराज्योन्मुख राष्ट्राच्या आकांक्षांना विरोध करायला प्रत्यक्ष काळाची माय व्याली नाहीं, तर इतर मानवांच्या कारट्यांचें तोंड काय? स्वातंत्र्य हें प्रत्येक भूतमात्राचें जीवन आहे. या जीवनासाठीं माणसांनी आजपर्यंत असंख्य आत्मयज्ञ केले व या पृथ्वीला रुधिराच्या समुद्रांनी अनेक वेळी अवमृत स्नान घातलें. मग हिंदी लोकच त्या जीवनाशिवाय जगण्याइतके नामर्द षंढ व पशू बनले आहेत काय? खचित नाहीं.

परंतु हिंदूंचा हा शिमग्याचा पंधरवडा जर कोणी पाहिला, तर स्वराज्याकरितां आक्रोश करणारे

लोक ते हेच, असें त्याला शपथेवर सांगून सुद्धां पटणार नाहीं. स्वराज्य हा कोणाचाहि जन्मसिद्ध हक्क असला, तरी अनीतिमान राष्ट्रानें स्वातंत्र्याची केव्हांहि अपेक्षाच करूं नये. स्त्रीवर्गाची बीभत्स हेटाळणी करणे हाच धर्म मानणाऱ्या नामर्दीकरितां स्वराज्य ही चीज निर्माण झालेली नव्हे. प्रत्यक्ष धुळीत लोळणे किंवा एकमेकांच्या आंगांवर शेण फेंकणें इत्यादि पशुवत् क्रिया करणाऱ्या मानवी गाढवांकरितां स्वातंत्र्य ही स्थिति अस्तित्वात आलेली नाही. हिंदूंचा शिमगा हा त्यांच्या सामाजीक धार्मिक व नैतिक विकासाचे परिमाण (स्टैंडर्ड) मानलें, तर कोणाच्याहि रागालोभाची पर्वा न करितां, आम्ही स्पष्ट म्हणतों की हिंदुजन हो, आज तुमची जी गुलामगिरी आहे आणि जगांत तुमची जी कवडीमोल अब्रू झालेली आहे, ती योग्यच आहे, तिला तुम्ही सर्वथैव पात्र आहांत आणि तुमच्या जन्मसिद्ध हक्कांचें ऐश्वर्य काय तें इतकेंच! नुसती अनीतीची कल्पना मनांत उद्भवतांच, लोखंडावर चढणाऱ्या गंजाप्रमाणे, तिचा तत्काळ मनावर संस्कार होत असतो. अर्थात् जेथें कल्पनेचे क्षेत्र सोडून चिळस आणणारे आचार व उच्चार बिनअटकाव संबंध पंधरवडा आबालवृद्धांच्या हातातोंडाशीं गांठ घालतात, तेथें त्यांच्या विचारांवर केवढा विपरीत आघात होत असेल बरें? अलीकडे कांहीं विवक्षित राष्ट्रकार्यासाठी अमूक सप्ताह, तमूक दीन, फलाणा पंधरवडा असे दिवस मुक्रर करून, त्या दिवशी राष्ट्रप्रेमी स्वयंसेवक लोकजागृतीचें पुण्यकार्य करीत असतात. अशा स्वयंसेवकांच्या संघांनी हिंदूंच्या नैतिक अब्रूची होळी पेटविणाऱ्या या शिमग्यांतील बीभत्स आचारोच्चारांची कायमची होळी पेटविण्याचें पुण्यकार्य हातांत कां घेऊं नये? शिमग्याला धार्मिक प्रश्न ठरवून काँग्रेस त्याला अस्पृश्य ठरविते, तर सामाजीक परिषदहि त्याच मुद्दयावर त्याच्याशीं असहकारिता करिते. धर्मगुरू तर शुद्ध पुडी आणि पाद्यपूजा बहाद्दर. डॉक्टर कूर्तकोटी हिंदुधर्म परिषदेचे जलसे नाचविण्यांत आणि कोटीलिंगार्चनांत आकंठ बुडालेले! जगद्गुरू ह्मणवून घ्यायला मात्र पाहिजे, पण धर्माचा शिमगा उडाला तरी तिकडे त्यांचे लक्ष मेल्यामारल्या जात नाहीं. अस्पृश्योद्धार, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, वेदोक्त-पुराणोक्तापलीकडे वास्तवीक त्यांनी घातले पाहिजे. अस्पृश्यांचा उद्धार त्यांचा तेच करतील; त्यासाठी स्पृश्यत्वाचा टेंभा मिरवणारांनी व धर्मपरिषदांचीं लळीतें नाचविणारांनी वृथा कंठशोष करण्याचे प्रयोजन नाहीं. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद असाच सुटणार आहे. वेदोक्त-पुराणोक्ताच्या बाबतींत भिक्षुकशाहीच्या निर्णयाला आतां खेटरांची पाद्यपूजा चव्हाट्या चव्हाट्यावर होत असते. इतकी जागृति जरी यदृच्छेनें म्हणा किंवा आत्मप्रेरणेनें म्हणा होत आली आहे, तरी शिमग्याची बोंब मारायला मात्र अखिल हिंदुजनता अगदीं एकरंगी एकशिंगी अभेद भावनेनें कशी फुरफुरते, हा दैवदुर्विलास विचारवंतांना हतबुद्ध करण्या इतका नाठाळ नव्हे काय? विलायती कपड्यांच्या होळ्या झाल्या. नावडत्या सुधारकांच्या नकली प्रेतांच्या होळ्या झाल्या. स्पष्टवक्त्या वर्तमानपत्रांच्या अंकांच्या होळ्या झाल्या. पण या शिमग्याची होळी पेटविणारा महात्मा अझून एकहि पुढें येत नाहीं हें दुःखद आश्चर्य होय. नाहीं म्हणायला मुंबईच्या समाजसेवा संघातर्फे होलिका संमेलनाची चळवळ आज १४-१५ वर्षें खुद्द मुंबईत होत असते. पण या संघाच्या कार्यपद्धतींतच एक ठराविक सांप्रदायिकपणा घुसल्यामुळें, होलिका संमेलनाच्या त्यांच्या चळवळींत अवश्य लागणारी धडाडी व निषेधक बुद्धीची तडफ कांहींच नसते. त्यामुळे हीं संमेलनें म्हणजे वार्षिक कर्तव्याची मामुली प्रदर्शनें, असल्या मासल्याचीं होत असतात. उद्देश उत्तम पण कार्यपद्धति मिळमिळीत.

हिंदुबांधवहो! चक्रमेनीक्रमानें आतां आणखीं १५ दिवसांनी नवीन वर्ष सुरू होणार. नवीन संवत्सराचा

उदय होणार. महात्मा शालीवाहनाच्या नांवानें तुम्ही चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढ्या उभारणार. येणारं वर्षं हिंदुराष्ट्राला सुखाचें जावो, या सदिच्छेनें तुम्ही मिष्टमिष्ट पक्कान्नें करून त्या दिवशी खाणार. पण प्रिय बांधवहो, नवयुगाच्या उष:काली हा शिमग्याचा बीभत्स आचार आचरणें, निदान तुमच्या अंतस्थ आत्मारामाला खरोखरच मानवतें काय? आपले हिंदुराष्ट्र आज कसल्या युगांतराच्या उंबरठ्यावर येऊन उभें राहिलें आहे, याचा थोडा विचार करा. आपल्याला स्वयंशासित व्हावयाचें आहे, तेव्हां प्रसंगावधान, कार्यतत्परता, बौद्धिक तेजस्विता, यांच्या जोडीनेंच आपल्याला मनोनिग्रहाची कसोशी केली पाहिजे. स्वराज्यप्राप्तीची फलश्रुति सात्विक आत्मविकासानेंच पदरांत पडत असते, हें विसरूं नका. शिमग्याच्या अनीतिमान् आचरटपणानें सडकी बनलेली मनें केव्हांहि विकास पांवत नाहींत. हिंदूंच्या पंचांगांत शिमगा घुसल्यामुळेच त्यांच्या राष्ट्रीय व सामाजीक जीवनाची होळी झाली व देशाच्या वैभवाचा शिमगा गाजला. जेथें अखिल हिंदुस्थानाचें गुलामगिरीच्या होळीत सरपण पडलें आहे आणि उद्योगधंदे ठार बुडाल्यामुळे उपासमारीची बोंबाबोंब आसेतुहिमाचल हरदिन हरघडी सारखी ऐकू येत आहे, तेथें धर्माच्या नांवावर कसल्या या होळ्या पेटवतां आणि बीभत्स उच्चारांसह बोंबा मारतां? आज आपणां सर्वांवर अत्यंत बिकट बिकट अशा मोठमोठ्या जबाबदाऱ्या येऊन पडल्या आहेत. आपणांस त्या पार पाडावयाच्या आहेत. हिंदुस्थानाची निरक्षरता नष्ट केली पाहिजे. स्पृश्यास्पृश्य भेद नाहींसा करावयाचा आहे. आपल्या सर्वांगीण गुलामगिरीला आद्यकारण झालेला जातीभेद व तज्जन्य जातीद्वेष हद्दपार करणं अवश्य आहे. हा पुनर्घटनेचा काळ आहे. या वेळी हरएक हिंदी बंधु भगिनीच्या आत्मविकासासाठी आपण एकादिलाने प्रयत्नांची कसोशी केली पाहिजे आणि भविष्यकाळाकडे नजर देऊन मोठ्या घिटाईनें सामाजिक धार्मिक आणि राजकीय जीवनाची छातिठोकपणें पुनर्घटना केली पाहिजे. शिवाजी महाराजांचा अभिमान असणारे, तानाजी मालुसऱ्याचे नांव सांगणारे, बाजीप्रभूचे जातमाई म्हणविणारे, लोकहितवादी आगरकर प्रभृति विवेकवाद्यांचे शागीर्द म्हणविणारे, ज्योतिबा फुल्यांचा किंवा समर्थ रामदासांचा संप्रदाय चालविणारे, टिळक गोखल्यांची कामगिरी पुढे नेणारे, अकबर जहांगिराची परंपरा चहाणारे, सर्व हिंदी बांधव आज धडाडीनें पुढे सरसावले पाहिजेत. आतां वेळ फार थोडा उरला. हा पुनर्घटनेचा अमृतसिद्धि योग गमावतां कामां नये. हा फार क्षणिक आहे. थोड्या वेळांत पुष्कळ कामगिरी करून दाखविण्याचा महाराष्ट्राचा लौकिक आजचा महाराष्ट्र कदापिहि कलंकीत करणार नाही, अशी प्रबोधनाला फार आशा आहे.

आजपर्यंत झाला इतका शिमगा पुरे झाला. या शिमग्याची होळी केल्याशिवाय हिंदवासियांच्या नशिबाची गुलामगिरीची बोंब कधीहि सुटणार नाहीं. शिमगा गाजवायचा असेल, तर एकनाथ महाराजांच्या 'होळी' नामक अभंगांत किंचित् फेरफार करून प्रस्तुत लेखांच्या अग्रभागीं दिलेल्या आधुनिक अभंगाप्रमाणेच गाजवा. थांबा. तो मथळ्याचा अभंग पुन्हां नीट वाचा. त्याचे शांतपणे मनन करा. या क्षणी काही तरी प्रत्यक्ष राष्ट्रकार्य करण्याची प्रतिज्ञा करा. अज्ञान मत्सराची होळी रचून ज्ञानाग्नीनें त्याची राखरांगोळी करायला सर्व भगिनी बांधवांनी अभेद भावानें गांवोगांवच्या तिवाट्या चव्हाट्यावर घांवून आलें पाहिजे. असा हा शिमगा १५ दिवस कशाला? सबंध वर्षभर चालवा. तुमच्या भेदशून्य ऐक्याची बोंब ऐकून क्षीरसागरांत झोपलेला भगवंत खाडकन् जागा होऊंन तुमच्या मायदेशाचा शिणभार उतरण्यासाठी 'गरुडावरि बैसोन' तात्काळ धांवत येईल. एकनाथ स्वामी तुम्हाला हीच ग्वाही

देत आहेत कीं : -

सत्व गांठीं उमगा ।
तेणें सफळ होईल शिमगा ।।
तुम्हीं हेंच गाणे घा ।
तुम्हीं हसू नका हो हंसूं नका ।।

□□□

अग्रलेख

नवमतवादाग्रणी लोकहितवादी
शतसांवत्सरिक स्मरण
(लेखांक १ ला)

आंग्रेज कुंफणी बहाद्दरांच्या हातांवर महाराष्ट्राच्या राजकीय स्वातंत्र्याचें तर्पण सोडून, रावबाजी ब्रह्मावर्ताला रामराम म्हणत बसल्याला पांच वर्षें झालीं होतीं. सातारच्या गादीवर बसविलेल्या प्रतापसिंह छत्रपतीच्या तक्ताखालीं भिक्षुकी कारस्थानाचा बाँब उडवून, सातारा इंग्रजांच्या पचनीं पाडण्यासाठी 'राजनिष्ठ नातू' आपल्या युक्तीजुक्तींची कसोशी करण्यांत गुंग झाला होता. नागपूरच्या भोसल्याने स्वातंत्र्यार्थ अखेरची केलेली उठावणी इंग्रेजांच्या जोरावर सद्दीने उठवणीस आली, त्याच वेळी शिंदे होळकरादि सुभेदार, आपला अखेरीचा थैमान पदोपदी ठेचाळूं लागल्यामुळें, कुंफणीसरकारचे शरमिंदे दोस्त बनले होते. महाराष्ट्रात राज्यक्रांतीचा अपेक्षित स्फोट झाल्यामुळे, नव्याजुन्या मन्वंतराच्या संधिकाळांतल्या घाशीरामींत सर्व रयत बेजार व बेअक्कल बनली होती. कलकत्त्याला मिशनरी कंपूच्या छावण्या कायमच्या बसल्या असून विल्यम कॅरे प्रभृति, एतद्देशीयांच्या भाषांत प्राविण्य पटकवून, त्यांच्या मनाचे किल्ले काबीज करण्यांत गुंतले होते. इंग्रेजांची 'यावनी भाषा' शिकावी की प्राण द्यावा, याची भवति न भवति होत असतांनाच, मिशनऱ्यांच्या शाळांची रोपटी मोठमोठ्या शहरांत जीव धरू लागली होती. कित्येक मिशनरी हिंदुधर्मशास्त्रांच्या अध्ययनांत गर्क झाले होते, तर कित्येक हिंदु क्रिस्ती बायबलाचा काढा उकळवून पचनी पाडण्यांत दंग होते. राजा राममोहनाची वाक्शक्ति व लेखनशक्ति हिंदूंच्या जीर्णमतांविरुद्ध बंड करीत होती, आणि तिचा लोकमत प्रबोधनाचा धौशा विलायतेंत व हिंदुस्थानांत जोरजोरानें घडक्या मारीत होता. राजकीय वैभवाची होळी झाल्यामुळे बसलेल्या दणक्यांत अखिल हिंदुजनता सामाजीक व धार्मिक बाबतीत किंकर्तव्य मूढ बनली होती; तरीहि मृत नवऱ्याच्या प्रेताला त्याची जिवंत बायको बांधून जाळण्याचा 'शुद्ध वैदिक धर्म' पाळण्यांत हिंदूंना कसलीहि शरम वाटत नव्हती. नाना फडणीसाच्या मृत्युयोगावर जन्मलेला मेकॉले तिकडे इंग्लंडांत सर्व विद्यांचा बृहस्पति बनून आपली प्रतापी कलमसमशेर परजीत होता आणि हिंदुस्थानाला

यावयाच्या दिवाणी फौजदारी कायद्याची व शिक्षणाच्या स्वरूपाची घटना मनांतल्या मनांत प्रसवीत होता. १६ वर्षांचा तरणा बांड गॅरिबॉल्डी इटलीच्या स्वातंत्र्याचे डांव हृदय पटावर मांडून खेळत होता, तो अवघी ३ वर्षांची बालिका फ्लोरेन्स नाइटिंगेल ही आपल्या आईचे दुग्धपान करता करतां भूतदयेचीं सनातन तत्त्वें आपल्या रोमारोमांत भिनवीत होती. स्वदेशी सत्तेच्या मातीवर आंग्रेजी सत्तेचें मनोरे ठिकठिकाणी उभारल्यामुळे देशांत एका विशिष्ट प्रकारची स्मशानशांतता जरी नांदत होती, तरी ठग लोकांचा धुडगूस दिवसाढवळ्या सर्वत्र सुरू होता. मात्र तिकडे, पावशतकपर्यंत युरपांत राज्यक्रांतीच्या यज्ञांत शेंकडों नरपुंगवांचे मुकूट वितळून टांकणारा अद्वितीय पुरुषोत्तम नेपोलियन बोनापार्ट हा १८२१ साली सेंट हेलना बेटांत मरण पावल्यामुळें, इंग्रेजांच्या जीवांत थोडा जीव आला होता. कुंफणीच्या कलकत्त्याच्या बड्या हाफीसापासून तों थेट मुंबईच्या छोट्या 'सकटतारी' हाफीसापर्यंत एकजात गोडबोल्या हाफीसरांचा सुळसुळाट उडाला होता. हिंदुलोक अगदींच निःशस्त्र झाले नव्हते; परंतु 'तुह्मी अगदीं नादान व रानटी आहांत, आमच्या शिस्तवार व सुधारलेल्या संघशक्तीपुढे तुमचा टिकाव लागणार नाहीं, आह्मी तुह्मांला सुधारण्याकरितां आलों आहोंत' इत्यादि बाजारगप्पांनी मराठ्यांच्या भाल्यांचे पाणी बोंथट पडलें होतें. परचक्राच्या पहिल्याच यशस्वी दणक्यांत फेंसाळलेला गुलामगिरीचा जहरी प्याला गोडच लागतो! त्याच्या घुटक्यानें महाराष्ट्र बेभान झाला होता आणि आपपर भेदाचा तिळमात्र विचार न करता एकमेकाचे गळे कापून स्वार्थ-नीच वैयक्तिक स्वार्थ साधण्याच्या खटपटी करीत होता. काप गेले, तरी भोकें राहिली होती. स्वराज्य गेलें, तरी त्याचा दिमाख गेला नव्हता. स्वातंत्र्य गेलें, तरी पारतंत्र्याच्या लोखंडी शृंखला अझून चांगल्याशा खळखळूं लागल्या नव्हत्या. पेशवाई गेली, तरी तिनें सर्वत्र बोकाळविलेली ऐदी श्रीमंती कायम होती. राजकारणी उलाढालीचे कंत्राट दयाळू कुंफणी सरकारने आपल्या शिंगावर घेतल्यामुळे, तिकडे कच्छचा राव पदच्युत झाला काय, किंवा एखादा जबरदस्त भोसला तुडविला जाऊन, त्याच्या नागपूरच्या गादीवर एखादें शेबडें पोर बसलें काय, याची दगदग कोणीच करीनासा झाला होता. अशी सर्वत्र परिस्थिति असतां, १८ फेब्रुवारी १८२३ रोजीं आजच्या अग्रलेखाचे नायक कै. सरदार गोपाळराव हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांचा जन्म झाला.

जन्म झाला! यांत विशेष तें काय झालें? त्या वर्षी त्या महिन्यांत त्या दिवशी लक्षावधि जींव जन्माला आले असतील!! खरी गोष्ट. माणसाच्या उज्वल कर्तबगारीनेंच जन्माला महत्व येतें. नराने करणी केली म्हणजे मग तो नारायण होतो. ही नारायण पदाची महति जन्माला येणाऱ्या प्रत्येक जीवाला प्राप्त होत नसते, म्हणूनच या अफाट मानवी दुनियेत कांही थोड्या तुरळकच व्यक्ति इतिहासांत अजरामर होऊन बसतात. सरदार गोपाळराव यांचा जन्म पेशवाई सरदारी घराण्यांत झाला, पण तत्कालीन सरदारी मूर्खपणा त्यांना शिवला नाहीं. ते जात्याच उत्क्रांत जीव असल्यामुळे प्रत्येक गोष्टीकडे पहाण्याची त्यांची दृष्टि स्वातंत्र्यवादी होती. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या सरदारकीचें वतन जरी खालसा झालें, तरी त्यांच्या हृदयाचा सरदारी बाणा लवमात्र ढळला नाहीं; आणि त्यावेळी उपलब्ध असलेलें तुटपुंजे शिक्षण मिळवून स्वस्थ न बसतां, ज्ञानार्जनाची शिकस्त करून, त्यांनी आपल्या देशबांधवांना त्यांच्या खऱ्या परिस्थितीची ओळख करून देण्याचा संकल्प केला, देशकाल वर्तमानाची निर्भीडपणे चिकित्सा केली आणि उत्कट देशाभिमानानें प्रेरीत होऊन त्यांनी देशबांधवांच्या गुणदोषांची स्पष्ट छाननी करण्यांत आपल्या निस्पृहतेची लगाम केव्हांहि खेचून धरली नाही. परिस्थित्यनुसार, पुण्यास मामलतदार कचेरीत

उमेदवारी करता करतो, सन १८४४ साली ते सरदारांच्या एजंट साहेबांच्या कचेरीत जरी सरकारी नोकरमाने झाले, तरी त्यामुळे त्यांची सार्वजनिक लोकहितवादाची महत्त्वाकांक्षा नष्ट झाली नाही. सरकार नोकर बनल्यावर सुद्धा निरलस देशाभिमानानें लोकसेवा कशी उत्कटपणें करता येते, याचे धडे लोकहितवादींच्या चरित्रांत मुबलक आढळतील.

लोकहितवादींचे बालपण व तारुण्य राज्यक्रांतीच्या धामधुमीतच गेल्यामुळे, त्यांच्या चौकस बुद्धिमत्तेवर तिचा बराच परिणाम झाला. चालू १९२३ सालाप्रमाणेच १८२३ सालचें दशक किंवा ५७ सालच्या बंडापर्यंतचे अर्धशतक हिंदुस्थानाला अत्यंत जिकीरीचे गेलें. आतां प्रमाणेंच त्यावेळी अनेक राज्यकर्त्यांचे मुकूट क्रांतियज्ञांत भस्मसात होत होते. शेकडों अमीर फकीर बनत होते. प्रचलीत धर्मकल्पनांतहि क्रांति होऊन, सत्यासत्याची निर्णयशक्ति लंगडी पडली होती. लोकहितवादींच्या २ऱ्याच वर्षी ब्रह्मीयुद्धाची तयारी झाली आणि समुद्रोल्लंघन केलें तर जाती-भ्रष्टतेचे पातक घडणार या सबबीवर २४ ऑक्टोबर १८२४ रोजीं बराकपुरच्या ४७ व्या नेटीव इंफंट्रीच्या लोकांनी बंड केलें. नेहमीप्रमाणे सर्वत्र 'हिंदुधर्मावर संकट' आल्याची बोंबाबोंब माजली. ब्रह्मी युद्धांत कोट्यावधी रुपयांचा व लक्षावधि माणसांचा होम होऊन तें यशस्वी झालें. भरतपूरचा किल्ला कुंफणीसरकारच्या हस्तगत झाला. लोकहितवादी ५ वर्षांचे होईपर्यंत गतधवा अबलांना नवऱ्याच्या प्रेतावर जाळण्याचा धार्मिक मर्दपणा बिनअटकाव सर्वत्र चालूं होता. राजा राममोहन रॉयचा सतीविरुद्ध कंठशोष सारखा सुरू होता. अखेर सन १८२९ साली लॉर्ड विल्यम बेंटिंकनें १७ वा रेग्युलेशन कायदा काढून सतीची चाल- आमच्या सनातन भिक्षुकी धर्मानें अत्यंत उदारपणानें हजारों वर्षें डोळ्यांतील वडसाप्रमाणें बाळगलेली पवित्र धार्मिक चाल-बेकायदा ठरविली. शिव शिव! केवढा तो जबरदस्त आघात आमच्या धर्माच्या मर्मावर पडला !! लोकहितवादीच्या १०व्या वर्षी म्हणजे सन १८३३ सालीं कुंफणी सरकारला विलायतेहून विशेष अधिकारांची तिसरी सनद आली. यानंतर अफगाण युद्ध, म्हैसूर कूर्गच्या नृपतींच्या पदच्युतता वगैरे अनेक गोष्टी अत्यंत महत्वाच्या झाल्या व कुंफणी सरकारच्या राज्यकारभाराचें पर्यवसान सन १८५७ बंडाच्या बोर्यात होण्याचा प्रसंग बितला!

इलेक्ट्रिसिटीच्या डैनामो प्रमाणें परिस्थिती सुद्धां आपल्या बऱ्या-वाईटपणाचे प्रवाह चोहोबाजूला सारखे फेकीत असते. ते प्रवाह हे जबरदस्त असले, तरी हतसंज्ञते विषयी प्रख्या पावलेल्या सर्वसाधारण माणसांवर त्यांचा कांहींच परिणाम होत नाहीं. आत्मविकास झालेल्या मनुष्यांनांच परिस्थितीच्या प्रवाहांची जाणीव होते. माणसं डोळसपणाचा टेंभा पुष्कळच मिरवितात; आजूबाजूच्या परिस्थितीचे संस्कार आकलन करण्याची त्यांची निरीक्षण शक्ति परिणत नसल्यामुळेंच, मानवी दुनियेला 'आंधळ्याची माळका' असें ह्मणतात. संसारी लोकांची रात्र तो संतांचा दिवस. संत जागे असतात, जगाच्या परिस्थितीचें निरीक्षण करित असतात, त्यावेळी सारें जग गाढ झोपी गेलेले असतें. या संतांनाच द्रष्टे (Seers) महात्मे किंवा वीर अशी नावे आहेत. या द्रष्ट्यांना जें बिनचूक दिसतें, तें साध्या माणसांना मुळीं भासत सुद्धा नाहीं; आणि ज्या संसारी माणसे मुद्दाम रेखून पहातात, तिकडे महात्मे जन ढुंकूनही पहात नाहींत. दोघांच्या दृष्टींतच असला दक्षिणोत्तर भेद असल्यामुळे एकट्या दुकट्या द्रष्ट्याचा निरीक्षण-निर्णयाचा संदेश बहुजन समाजाला नीटसा समजतच नाही. यामुळेच प्रत्येक नवमतवादी बहुजन समाजाच्या रोषास प्राप्त झाल्याचा इतिहास पुष्कळ लिहिला गेला आहे. सरदार गोपाळराव देशमुख यांनी तत्कालीन

देशपरिस्थितीचे उत्तम निरीक्षण करून आपल्या कर्तव्याची दिशा ठरविली. महाराष्ट्राचा पराक्रम जसा त्यांच्या दृष्टीसमोर होता, तसा त्यांचा अधःपात त्यांना पदोपदी हिणवीत होता. राज्यक्रांती होऊन मूर्ख पेशवाईच्या ऐवजी शहाणी आंग्लाई जरी आली, तरी महाराष्ट्राची ठेचाळलेली मर्दुमकी अगदींच कांहीं मेली नव्हती. लोकहितवादींनी हे बिनचूक ताडले की काळ बदलला आहे आणि त्याप्रमाणे मर्दुमकीची दिशाहि बदलली पाहिजे. जुन्या पुराण्या कल्पनांवर महाराष्ट्राच्या संसाराचा गाडा चालणे अतःपर शक्य नाहीं. इंग्रेजांबरोबर आलेल्या पाश्चात्य संस्कृतीनें तिळमात्र बिथरून न जातां, धूर्तपणानें आपल्यातल्या चांगल्या गोष्टीचा पुरस्कार व वाईट गोष्टींचा तिरस्कार करून पुढे येणाऱ्या नवमन्वंतराच्या सोसाट्याला तोंड देण्याइतके सर्वांनी कार्यक्षम बनावें, या उद्देशानें बंगाल्यांत ईश्वरचंद्र विद्यासागर, देवेंद्रनाथ टागोर केशव चंद्रसेन नवमत-प्रबोधन करीत होते; आणि आपल्याकडे नाना शंकरशेट, नाना मोरोजी, अण्णासाहेब भिडे व लोकहितवादी हे झगडत होते. पाश्चात्य लोकांच्या विद्या, त्यांच्या सुधारणेच्या कल्पना, त्यांच्या धाडसांचें आद्यबीज, त्यांची स्वातंत्र्यविषयक मतें व स्वार्थत्याग यांची आपल्या लोकांस जाणीव करून देण्यासाठी, सरकारी नोकरीच्या कर्तव्याचा आटारेटा पार पाडीत असतांनाच, पुणे नेटीव जनरल लायब्ररी, ज्ञानप्रकाश व इंदुप्रकाश पत्र, इत्यादि अनेक लोकोपयोगी संस्था स्थापन करून, लोकहितवादी लोकजागृतीसाठीं प्रभाकर नामक वृत्तपत्रांत सार्वजनिक हिताऽहिताची चर्चा करणारी आपली निस्पृह फर्डी लेखणी अखंड चालवीत होते.. याविषयीं ज्ञानप्रकाश (ता. २५-२-२३) म्हणतो, पुणे येथील शाक्त पंथाची माहिती, विधवाविवाहाची चळवळ, शिक्षण देण्याची आवश्यकता, ब्राह्मणी चालीरीतीमुळे सामाजीक चालीरीतींना होणारे अडथळे इत्यादि अनेक लोकोपयोगी विषयांवर गोपाळरावांनी त्या २-३ वर्षांत (१८४७ ते १८४९) शंभरांवर पत्रे लिहिली. लोकहितवादी यांनी एकट्यानें निर्माण केलेलें ऐतिहासीक, चर्चात्मक व नवमतवादी वाङ्मय भाण्डार इतके विस्तृत व व्यापक आहे की सध्यांच्या मुबलक साहित्योपलब्धीच्या काळांतल्या कोणत्याहि साहित्य सेवकास तें त्याच्या कृतीची क्षुद्रता पटविल्याशिवाय रहाणार नाहीं. लोकहितवादींची स्वाध्यायशीलता जितकी दांडगी होती, तितकेंच त्यांचें देशकालपरिस्थितीचे निरीक्षण अत्यंत सूक्ष्म होतें. विसाव्या शतकाच्या चालू पूर्वार्धात जीं सामाजीक व धार्मिक प्रमेयें मोठमोठ्या समाज व धर्म सुधारकांस अझून सुटलेली नाहीत, त्यांवर लोकहितवादीनी १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात निश्चयाने दिलेले निर्णय पाहिले की आह्मी उन्नत होत आहोत की अवनत होत आहोत, हा संशय. उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. लोकहितवादी हे नवमतवादाग्रणी कसे होते, त्यांच्या चारित्र्यांतील विशेष अनुकरणीय भाग कोणते आणि त्यांच्या लोकहितवादाचे रहस्य कशांत होते, याचा उलगडा पुढील लेखांकावरच ठेवणें भाग आहे. कारण आतांपर्यंत. नमनालाच आमचें घडाभर तेल जळालें!

□□□

एन ४००६--२८

लेख

ॲडवोकेट चित्रे यांचा साहेबशाही थैमान

ॲडवोकेट चित्रे हे कोण आहेत, हें महाराष्ट्रांत फारसें कोणाला माहीत नसेल. फार काय पण ज्या कायस्थ प्रभू समाजाच्या पुढारपणाचा मान ते आपणाकडे घेतात, त्या समाजाला सुद्धां 'श्रीयुत आत्माराम अनंतर चित्रे बी.ए. एलेल्बी ॲडवोकेट' या नांवापलीकडे त्यांची फारशी माहिती नाही. तरी पण ते एक विद्वान, श्रीमंत व मानी गृहस्थ असून सरकारी अधिकाराच्या उच्चासनावर आहेत आणि ठाणे एज्यूकेशन सोसायटीचे चेअरमन आहेत. सरकारी अधिकाराच्या, सरकारी पदव्यांच्या आणि श्रीमंतीच्या जोरावर समाजाशीं फटकून वागणाऱ्या, कधिंमधीं एखाद्या सभेच्या प्रसंगी उच्चासनावर पुढारी नात्यानें येऊन बसणाऱ्या आणि एरवींसुद्धां समाजवस्तीपासून अगदीं दूर-पेडररोड, वाळकेश्वर, महालक्ष्मी, पुणा कँटोनमेंट, खडकी, अशा ठिकाणीं-रहाणाऱ्या ज्या कांही बड्याबड्या अस्पृश्य वक्ती कायस्थांत आहेत, त्यांतच उपरोक्त चित्रे साहेब यांचा समावेश होतो. समाजसेवेचा डंका आजकाल सर्वत्र गात आहे आणि तिच्या तपशीलाची भवति न भवतिहि बरीच होत आहे. परंतु समाजाशी सकलाहि संपर्क न ठेवतां, समाजसेवेच्या शेळ्या उंटावरून कशा हांकतां येतात, हें असल्या व्यक्तींच्या उदाहरणावरून खासें दिसून येते. असल्या 'बड्या साहेब' पुढाऱ्यांची सुलतानशाही सामाजिक प्रगतीला आजपर्यंत किती पोषक झाली आहे. हें स्पष्ट सांगण्याचें आज प्रयोजन नाहीं. परंतु श्रीमंतांच्या श्रीमंती गजव्यांतून वेळप्रसंगी खळाळणाऱ्या नाण्यांकडे पाहून समाजांतली आशाळभूतें त्यांच्या बेगडी पुढारपणाचा उदोउदो करण्यास नाखूष नसल्यास, त्यांत मानवी स्वभावाविरुद्ध कांहीच नाहीं. सर्वे गुणाः कांचन माश्रयंते या सनातन नियमान्वयें 'ऑटोमॅटिकली' पुढारपणा प्राप्त झालेल्या या समाज-देवबाप्पांवर कोणाचा दाब असणार? त्यांनी उद्यां समाजक्षेत्रांत वाटेल ती अरेरावी गाजविली, तरी त्यांचे कान कोण उपटणार? येऊन जाऊन वर्तमानपत्रें. पण या सुशिक्षित कायस्थांना स्वजातीचें एकहि पत्र चालविण्याची अक्कल नाहीं, आणि इतर पत्रें यांना उंबरठ्याशी उभी करीत नाहींत. मग या स्वयंमान्य पुढाऱ्यांचा धांगडधिंगा बेगुमानपणें कां थैमान घालणार नाही? कायस्थ समाजाच्या अवनतीच्या मुळाशी इतर कितीहि गोष्टी असल्या तरी ही साहेबशाही आणि सरदारशाही प्रामुख्यानें आहे, ही गोष्ट तरूण पिढीच्या लक्षांत जितकी लवकर येईल तितकी बरी.

गेल्या नाताळांत ठाणें एज्युकेशन सोसायटीची वार्षिक सभा भरली होती. मामुली वहिवाटीप्रमाणें बहुतेक सगळी बडीबडी अस्पृश्य (समाजाशी मिळून मिसळून न वागणारी) कायस्थी धेंडे एकमेकांचा उदो उदो करण्यास मजली होतीं. त्यावेळी सोसायटीचे चेअरमन श्री. चित्रे ॲडवोकेट यांनी आपल्या स्वयंभू अधिकाराच्या जोरावर इंग्रेजी थाटाचा बराच आडदांडपणा आपल्या भाषणांत केल्याचा गवगवा आतां सर्वश्रुत झालाच आहे. श्री. चित्र्यांची थोडीहि माहिती असणाऱ्यांना या आडदांडपणाची कल्पना करून देणें नलगे. श्री. चित्रे हे ॲडवोकेट असल्यामुळें विद्वानांत मोडतात. सपाटून श्रीमंत असल्यामुळें पुढाऱ्यांत गणले जातात. सरकारी नोकरी उच्चाधिकाराची असल्यामुळें ते वजनदारहि मानले जातात. या सर्व अधिकारप्राप्तीला त्यांच्या नखशिखांत साहेबी थाटाच्या आचारविचारांनी तर विशेष पॉलीश चढविल्यामुळें या स्वारीना समाजक्षेत्रांत सर्व लहान थोर भेकड मंडळी बरीच टरकून असतात. परंतु समाजकार्यात हे त्यांचे स्पेशल क्वॉलिफिकेशन्स समाजाला आणि जगाला कांही चाटावयाचे नाहींत. त्यांना मराठी भाषेची अत्यंत चीड आहे. ती भाषा या साहेबांना नामर्द वाटते, गुलामांची भाषा वाटते आणि या गचाळ भाषेंत भाषण करणाऱ्या प्रो. टिपणीसांचा त्यांनी सी.के.पी. लीगच्या वार्षिक सभेंत केलेला अपमान पुष्कळांच्या स्मरणांत आहेच. सोसायटीच्या वार्षिक सभेंत हे साहेब तरुण पिढीवर एकाकी एवढे तुटून पडले की उपरिनिर्दिष्ट अधिकारांशिवाय आणखी कांही नादीरशाही अधिकार सरकारकृपेनें त्यांच्या हातीं असते, तर त्यांनी सध्यांच्या कायस्थ पिढीची सर्रास कत्तल करण्याचा हुकूम कदाचित् फर्मावला असता. हातपाय आपटीत साहेब वदले ""I can boldly say that the present generation is MORALLY DEGENERATED. They are lacking in honesty integrity and sincerity. "

(सध्याची पिढी नीतिभ्रष्ट आहे, हें ठासून सांगण्यास मला मुळीच दिक्कत वाटत नाहीं. प्रामाणिकपणा, सचोटी आणि कळकळ यांचा त्यांना गंधसुद्धा नाहीं.) या 'प्रामाणिक' साहेब बहादुरांचे हे 'सचोटी' बायबल जोरजोरांत चालूं असतांना, तेथें जमलेली इतर पुढारी धेंडे जरी कानांत खुंट्या ठांसून बसली होतीं, तरी तेथें हजर असलेल्या व 'सध्याच्या पिढीत' मोडणाऱ्या अनेक तरुणांना साहेबांचा हा उन्माद संतापकारक वाटल्यास आश्चर्य नाही. या उन्मत्तपणाचा निषेध करणारी बरीच पत्रें आमच्याकडे तरूण मंडळीकडून आलीं आणि अखेर ता. २५-२-२३ रोजीं श्रीयुत केशवराव वैद्य इ.उो. यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई लत्त्याच्या सर्व कॉलेजच्या कायस्थ विद्यार्थ्यांनी व तरूण पदवीधरांनी दादर येथें जंगी जाहीर सभा भरवून आपला सात्विक संताप व्यक्त केला. तरूण पिढी नीतिभ्रष्ट आहे किंवा नाहीं, याचे जजमेंट मागण्यासाठीं ती चित्रे साहेबांच्या कोर्टात कधिं गेली नाहीं. शिवाय सबंध तरूण पिढीला नीतिभ्रष्ट ठरविण्याचा अधिकार ॲडवोकेट चित्र्यांना कसा काय पोंहचतो, हा प्रश्न जरी बाजूला ठेवला, तरी जेथें सबंध तरूण पिढीच्या पिढीची आढी नासकी कुझकी निघाली आहे, तेथें तसल्या पिढांचे पुढारपण स्वीकारणाऱ्या आणि तिच्या शिक्षणासाठी एज्युकेशन सोसायटीची धोंड उरावर बाळगिणाऱ्या शहाण्यांच्या कर्तबगारीचा कमकुवतपणा प्रत्यक्ष सिद्ध होतो त्याची वाट काय? साहेब आणखी दर्पोक्तानें म्हणाले "" I have been serving the society for a number of years and I can clearly notice this difference. I say this boldly again and again and

I care two buttons for any criticism levelled against me by the commnuity " (मी आज कित्येक वर्षे या सोसायटीची (समाजाची?) सेवा करीत आहे. त्यामुळे (तरुणांच्या नीतिभ्रष्टतेचा) हा फरक मला स्पष्ट माझ्यावर कितीहि कडक टीका केली, तरी त्याची मला मुळींच पर्वा नाहीं.) केवढी ही बेपर्वा, काय ही घमेंड, किती हा आतताईपणा, समाजसेवेचा आणि पुढारपणाचा किती हा उन्मत्त तोरा!! पदव्यांच्या, सरकारी अधिकाराच्या आणि श्रीमंतीच्या दिमाखावर सामाजीक क्षेत्रांत पुढारपणाची असली अरेरावी गाजविण्यास सवकलेल्या उन्मत्त लोकांच्या हातांत ठाण्याची एज्युकेशन सोसायटी पडल्यामुळें, तिची कार्यक्षमता किती नादान बनली आहे, हे आम्हीं लवकरच त्यांच्या नवीन रिपोर्टावरून सिद्ध करणार आहोंत. तरूण पिढीला शिव्या देण्यापूर्वी आणि तिच्या प्रामाणिकपणावर व सचोटीवर बेमुर्वतपणानें काळें फांसण्याचा निंद्य व तिरस्करणीय उन्माद दाखविण्यापूर्वी, या साहेब बहादुरानीं व त्यांच्या समोंवार बसलेल्या जबाबदार जडमूढांनी आपल्या पायांखालीं काय जळतें, याचा विचार करावयास पाहिजे होता. 'मी आज कित्येक वर्षे समाजसेवा करीत आहे' अशा वल्गना करणाऱ्या ॲडवोकेट चित्र्यांनी आपल्या दिग्विजयी समाजसेवेचा एखादा जाडजूड रिपोर्ट एकदां प्रसिद्ध केल्याशिवाय स्वार्थत्यागी तात्यासाहेब खारकर कोणीकडे आणि समाजाशीं फटकून वागणारे, तरूण पिढीला अनीतिमत्तेचे सर्टिफिकीट देणारे, आणि आपल्या ठरावीक कंपूपलीकडे जगाची कल्पना नसणारे हे ॲडवोकेट चित्रे कोणीकडे! चित्रे साहेब, अशा उंटावरून शेळ्या हांकून समाजसेवा होत नसते. तुम्ही विद्वान असाल, तर जगाला तुमची विद्वत्ता दाखविण्याची क्षेत्रें सताड मोकळी पडलीं आहेत. आपण उच्चासनावरील सरकारी अधिकारी असाल, तर तेथें खुशाल आपल्या विहित कर्तव्याची शिकस्त करून सरकारच्या गळ्यांतले मेरूमणी व्हा. आपण श्रीमंतींत सवाई टाटा असलात, तर ईश्वर तुम्हांला खुशाल डबल कार्नेजी आणि ट्रिपल लिप्टन बनवो. पण या तीन भांडवलाच्या गुर्मीवर कायस्थ तरुणांना अनीतिमान अप्रामाणिक व असत्यवादी ठरविण्याच्या नसत्या उपद्यापांत पडण्याइतके तुम्ही 'बेपर्वा' होत असाल तर तरूण पिढीचशी काय, अखिल कायस्थ समाज तुमच्या त्या असुरी भांडवलावर विःकारानें थुंकण्यास कमी करणार नाहीं, हें लक्षांत ठेवा.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

सुभाषित-पारिजात

संपादक श्री, लक्ष्मण नारायण जोशी ५४ शुक्रवार, पुणे शहर. प्रस्तुत पुस्तक संस्कृत सुभाषित संग्रहाचें मराठी कविताबद्ध रूपांतर आहे. श्री. जोशी हे कोणत्या दर्जाचे लेखक आहेत, याचा उलगडा प्रबोधनच्या ६ व्या अंकांत (पृ. ४८) त्यांच्यां महाराणा प्रतापसिंह पुस्तकाचे परीक्षणांत केलेला आहे. संस्कृत सुभाषितांचे मराठी रूपांतर करणे हे दिसतें तितकें सोपे काम नव्हे. विशेषेंकरून विशिष्ट शब्दयोजनेंत असणारी मार्मिक अर्थाची मनोहर छटा सुबोध मराठी रूपांतरांत व्यक्त करण्याची चांगल्या कसलेल्या लेखकालाहि साधणें कठीण जातें. श्री. जोशी यांनी प्रस्तुत मराठी रूपांतरांत हा प्रयत्न कितीहि शिकस्तीचा केला असला, तरी संस्कृत-मराठी कोशाच्या मदतीशिवाय त्यांच्या पारिजाताचा सुगंध अनुभविणें रसिकांस जरा जडच जाईल. तथापि संस्कृत भाषेंतील सुभाषित रत्नांचा मराठी वाचकांस परिचय करून देण्याचें कार्य हें पुस्तक उत्तम करील. किंमत १२ आणे मिळण्याचा पत्ता:- लक्ष्मण नारायण गोडबोले बुधवार पेठ, पुणें शहर.

भगवा झेंडा अर्थात् राष्ट्रगीतें

रचणार श्री. वि. ना. खानोलकर कुंभारवाडा, दादर. किं. एक आणा. राष्ट्रगीत म्हणजे काय याचा अर्थ अलीकडे बराच भ्रष्ट झाला आहे. त्यामुळें कवींच्या किंवा शाहीरांच्या सुळसुळाटाबरोबरच कांही ठरावीक शब्दयोजनेंत निर्माण होणाऱ्या प्रत्येक बऱ्या वाईट कविता 'राष्ट्रगीत' सदराखालीं धडापासरी बोकाळू लागल्यास नवल नाहीं. श्री. खानोलकर हे एक उत्साही कळकळीचे लेखक दिसतात. प्रस्तुत पुस्तकांत त्यांनी काही कविता रचलेल्या असल्या तरी ते 'कवि' आहेत, असे म्हणण्याचे धारीष्ट आम्हाला होत नाही. या कविता कविता या संज्ञेस अगदी अपात्र असल्या तरी त्यांत श्री. खानोलकरांच्या शुद्ध हृदयाची तळमळ सर्वत्र व्यक्त झाल्यामुळे त्या एकवार वाचण्यालायख खास आहेत. मद्यपान निषेधाची पद्यें चांगलीं आहेत. परंतु गायनाच्या दृष्टीने गायकाला शब्दांची खेंचाखेच व ओढाताण केल्याशिवाय मात्र भागणार नाही. विटाळ्याची कविता गायनकलेशी नेहमीं सवतिमत्सरानेंच 'फुरफुरत' असते.

मुलांचे लोकमान्य

लेखक श्री. खानोलकर, दादर किं. ४ आणे. या पुस्तकाची कल्पना मोठी सुंदर आहे. यांत कै. बाळ गंगाधर टिळक यांचे त्रोटक चरित्र, श्री. खानोलकरांनी मुद्दाम मुलांकरितां, चांगल्या भाषेत लिहिले आहे. भाषाशैली उत्तम आहे, शुद्ध आहे आणि -भारदस्तहि आहे; आणि आमची खात्री आहे की श्री. खानोलकरांनी आपल्या लेखनव्यवसायाच्या प्रशंसनीय उमेदवारीला स्वाध्यायतपश्चर्येची जोड देतील, तर उत्तम लेखक म्हणून ते पुढें येतील. प्रस्तुत पुस्तकांतली भाषा व विवेचनसरणी 'मुलांना' कितपत समजेल याची शंका आहे; शिवाय 'लहान मुलां' करितां लिहिलेल्या पुस्तकांत स्वराज्याची पात्रता, तुरुंगांत घुसण्याची आवश्यकता, चालू राज्यपद्धतीतील दोष, रिफॉर्म्सचा फोलकटपणा इत्यादि वादग्रस्त मुद्दे व तद्विषयक एककल्ली एकपक्षी विधानें घुसडणें केव्हांहि श्रेयस्कर नाहीं, ही गोष्ट मतप्रसाराच्या भरांत लेखक अगदींच विसरले आहेत. पुस्तक उत्तम वठलें आहे.

कलिका

अरविंद पुष्पमालेचें पाहिलें पुष्प. यांत श्री. भीमराव खंडेराव कोरान्ने यांनी लिहिलेल्या व निरनिराळ्या मासिकात प्रसिद्ध झालेल्या बारा गोष्टी एकत्र केल्या आहेत. गोष्टींची संविधानकें उत्तम साधली आहेत. भाषासरणी साधी सुबोध व गोड आहे. किं. १२ आणे, पता :- अरविंद कार्यालय, मुंबई नं. ४

देवी सुशील

कवि पुरुषोत्तम प्रकाशक डब्ल्यु. डब्ल्यु. रानडे, ६०३ बुधवार, पुणें शहर, पत्निविरही पतीचे उमाळे या छोटेखानी काव्यांत व्यक्त झाले आहेत. कविता बरी आहे, पण ''सौ. प्रमिला ताई'' ला ती अर्पण करतांना सहज ओघानें उमटलेल्या अभंगा इतकी कांही रसाळ व उत्तम नाही.

मराठ्यांचे संग्राम-गीत

किं. ८ आणे. कवि व प्रकाशक दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी, मु. पिंप्राळे, पूर्व खानदेश. श्री. तिवारी हे एक महशूर मराठी कवि असून, त्यांची काव्यवाणी मराठ्यांच्या इतिहासावर अगदीं फिदा झालेली आहे. या इतिहासात असे शेकडों हजारो प्रसंग घडले कीं त्यांच्या कथा काव्यात गा, पोवाड्यांत गा, किंवा साध्या गद्यात सांगा, श्रोत्यांची चित्तवृत्ती तल्लीन होते. असल्या काही प्रसंगांवर श्री तिवारी यांनी मनोरम भाषेत गायिलेली गाणीं या पुस्तकांत एकत्र केली आहेत. तिवारी हे उत्तम कवि आहेत, महाराष्ट्र भाषेवर त्यांचा व्यासंगही उत्तम आहे आणि काव्याकरितां हृदयस्पर्शी ऐतिहासिक प्रसंग निवडण्याची त्यांची हातोटीहि उत्तम आहे. परंतु- या सर्व उत्तम गुणांत एक 'परंतु' आहे. श्री. तिवारी हे गायनकलेत अगदीच अनभिज्ञ दिसतात. कविता म्हटली की तीत स्वरांचा जीव नसेल तर ती सावंतवाडी लाडवांप्रमाणें त्याज्य ठरते, ही महत्त्वाची गोष्ट अलीकडच्या बऱ्याच कवींच्या ध्यानीमनीहि येत नाहीं. नुसत्या उत्तम कल्पना, चांगली भाषाशैली आणि कवींच्या पुढें यमाप्रमाणें दत्त उभी असलेली यमकाची पद्धतशीर जुळणी, एवढ्याच भांडवलावर कवितांची गोडी रसिकांस पटत नाहीं. कविता गाण्याकरितां असते आणि ती गातां आली पाहिजे, शेंकडा ९८ आधुनिक कवि गायनकलेच्या बाबतीत मुक्त असतात. कित्येकांना तर स्वतःची कविता नीट साध्या सुरांत वाचून सुद्धां दाखविता येत नाही. ही स्थिति बरी नव्हे. श्री. आनंदराव टेकाडे कवि असून गाणारे आहेत. त्यांना ध्वनीचें व स्वरांचें सामर्थ्य अवगत आहे. कोणत्या रागाची कोणत्या मनोविकार- दर्शनासाठी योजना करावी. हे त्यांस

समजतें. श्री. तिवारी यांची एकच पेटंट चाल दिसते. ती 'उद्धवा शांतवन कर जा' ही होय. मराठ्यांची संग्राम-गीते आणि त्याला ही दळू माई दळूची रडकी चाल! खासा कारभार !! या रडक्या चालीची अलीकडे जवळ जवळ एक सांथच आलेली दिसते. कां न यावी! मराठ्यांनी पूर्वी कितीहि घनघोर रणसंग्राम केलेले असले, तरी आज ते दळू माई दळूच करीत आहेत, मग त्यांच्या कवनादि असल्या रडक्या बावळट चाली का सुचू नयेत? कवितेचा ध्वनींच असा गंभीर पाहिजे की गायकाच्या मुखांतून पदाचे स्वर निघतांच श्रोत्यांची मने त्या विवक्षित रसाने आपल्याकडे खेचली पाहिजेत. 'मोगल आला चढाई करून। तलवार पुण्यावर धरून' असल्या पोवाड्यांच्या चालींचा तो आवेश कोणीकडे आणि 'उद्धवा शांतवन कर जा रे बाबा' ही बायकी रडकी पुळचट चाल कोणीकडे ! आमची श्री. तिवारींना आग्रहाची विनंति आहे की मराठ्यांची संग्राम-गीतें यापुढे पुळचट चालीवर रचूं नका. या चालीमुळे तुमच्या उज्वल प्रतिमेचें मातेरें केलें आहे. तिवारींच्या काव्यभाषेत एक प्रकारचा जोरकसपणा आहे, शब्दयोजना चातुर्य वाखाणण्यासारखे आहे, परंतु ठिकठिकाणी यतिभंगाच्या खेचाखेचींमुळें वाचकाची (गायकाची तर गोष्टच नको!) ठेंचाळणी होते. ही उदाहरणें घ्या. उद्धवा शांतबनच्या चालीवर खालच्या ओळी कशा म्हणतां येतील, त्याचा वाचकांनीच अनुभव घ्यावा.

*(१) ब्राम्हण*ब्राम्हणेतर वा-मुसलमान हिंदू जैन*

*(२) नीच*वृत्तींनें परहस्तीं-जन्मभूमि केंवी द्यावी.*

*(३) धर्र*मासाठी यज्*जनकें-बळि दिधला स्वप्राणाचा.*

*(४) हीं पात्रांतील पक्*वान्ने-*

पुरें. ही सर्व ठेंचाळण्याची कसरत पदोपदों आढळते. हे दोष दृष्टीआड केले आणि नुसतें काव्य म्हणून ही गीतें वाचलीं, तर ती उत्तम म्हणावयास हरकत नाहीं. श्री. तिवारी यांनी या संग्रामगीतांचा नवीनच प्रघात पाडल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. पण मर्दाचा पोवाडा मर्दानें गावा अशी त्यांची इच्छा असेल, तर त्यांनी मर्द चालीवरचे पोवाडे रचल्यास नामर्द महाराष्ट्रावर त्यांचे बरेंच उपकार होतील.

पोर्तुगेज शिक्षक : - भाग १ ला. लेखक श्री. दत्ताराम वामन नाईक, रायबंदर, गोवा, 'गाष्तु मूय्तु देष्ति लीब्रु' कारण या पुस्तकामुळें वाटेल त्याला 'साबि फालार उ पोर्तुगेज.' किंमत ६ आणे.

पुराणांतील घोटाळे : लेखक श्री. बापुराव संतराम भोईटे. द्वारा विश्वबंधु प्रेस, कोल्हापूर. नावांवरून विषय काय हें सांगणें नको.भिक्षुकशाहीच पायातणांना नालाप्रमाणें चिकटलेला भाविक गुलामांनी हे २ आणें किंमतीचें चोंपडें मुद्दाम वाचावें.

राजनैतिक कारस्थान : अथवा अलीपुर बाँब केसचें रहस्य किं. १२ आणे. हें उत्कृष्ट पुस्तक श्री. शंकर दिनकर करंदीकर यांनी मराठी भाषेंत भाषांतरित केलें आहे. १९०७ सालच्या बंगालच्या बाँबच्या चळवळीत जे अनेक उमेदवार तरूण आपल्या माथेफिरूपणाला बळी पडले, त्यांपैकी 'युगांतर'चा संपादक बाबू उपेंद्रनाथ बंडोपाध्याय कांही दिवसांपूर्वी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून परत आला. त्यानें बंगाली भाषेत अलीपूर बाँब प्रकरणाची कर्मकहाणी लिहून प्रसिद्ध केली. तिच्या हिंदी अनुवादावरून श्री. करंदीकर यांनी हा अत्युतम मराठी अनुवाद लिहिला आहे. लोकमित्राचे मालक श्री. सडेकरांकडून हे पुस्तक आमचेकडे आल्यापासून तें कर्मीत कर्मी ५० वाचकांनी रात्रीचा दिवस करून वाचलें; इतकें

तें हृदयस्पर्शी, विनोदी परंतु उपदेशक वठलें आहे. गेल्यावर्षी प्रबोधनच्या १६ व्या अंकांत (पृ. १२६) आम्ही 'राष्ट्राळलेल्या तरुण विद्यार्थ्यांचा अधःपात' कसा होत आहे, हे स्पष्ट लिहिले होते. ज्यांना आमच्या विधानांची सत्यता पटवून घ्यायची असेल, त्यांनी प्रस्तुत पुस्तक मुद्दाम विकत घेऊन वाचावे. राष्ट्रोद्धाराच्या नांवाखाली अल्लड भावनावश तरुणांच्या मोलवान् जीविताची ती बांबचळवळीत कशी झाली व सध्यांहि मुळशीप्रकरणांत होत आहे, त्याचें चित्र या पुस्तकांत मुद्दाम पहावें. प्रबोधनच्या प्रत्येक वाचकानें या पुस्तकाची मागणी करून ते वाचावें अशी शिफारस आहे. पत्ता : लोकमित्र कचेरी, खानापूर जि. बेळगांव.

□□□

अग्रलेख

नवमतवादाग्रणी लोकहितवादी
(लेखांक २ रा)

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात झालेली महाराष्ट्रांतली राज्यक्रांति ही अपेक्षित राज्यक्रांति होती, असे मागील लेखांकांत म्हटले आहे. कोणतीहि क्रांति केव्हांहि अनपेक्षित नसते. क्रांतीचा स्फोट होण्यापूर्वी अनेक दोषांची कारणपरंपरा कित्येक वर्षे त्या त्या विशेष क्षेत्रांत मानवी जीवनाचे सत्व शोषून घेत असते. कित्येक वेळां हें सत्वशोषण द्रष्ट्या माणसांना स्पष्ट दिसतें व तें थोपविण्यासाठी ते लोकजागृतीची खटपट करतात. परंतु बहुजन समाज - विशेषतः हिंदुसमाज हा नेहमीच अंधानुकरणप्रिय असल्यामुळे, या द्रष्ट्यांना त्याच्या तीव्र उपहासाला पात्र व्हावे लागते. १७ व १८ व्या शतकांतला महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे अखिल भरतखंडाच्या जीवनांतला एक अद्भुत चमत्कार होय. हा चमत्कार जितक्या अकल्पनीय घटनेनें घडला, तितक्याच विलक्षण घटनेनें बिघडला. या इतिहासाचा नुसता पृष्ठभाग पाहून त्याच्या ऱ्हासाची मीसांसा होणार नाही. मराठी स्वराज्याच्या नाशाला जबाबदार म्हणून बऱ्याच इतिहासप्रसिद्ध व्यक्ती आपण नेहमी निंदाप्रचुर चर्चेच्या आखाड्यांत खेचतों; परंतु असे करतांना, अखिल महाराष्ट्रीय समाजपुरुषाच्या आंगांतील नासलेल्या रक्ताच्या परिणामाला त्या दुर्दैवी व्यक्ति कालमानानुसार केवळ निमित्तमात्र होत्या, ही मुख्य तत्वाची गोष्ट आपण विसरतों. महाराष्ट्रांत राज्यक्रांतीचा दणका मोठ्या जोराने बसला; सर्व शहाण्या बुद्धिवंतांचे डोळे उघडे असतांनाच मराठी स्वराज्यानें प्राण सोडला; मराठ्यांची क्षात्रवृत्ति रतिमात्र हिणकस नसतांनाच, शुद्ध मुत्सद्देगिरीनें त्यांच्या पाणीदार भाल्याचें पाणी बोथट पाडले. कां? असें कां झालें? या कां प्रश्नाची चिकित्सा करण्यासाठीं जे अनेक विचारवंत जन सर्व भूत वर्तमान परिस्थितीचा निस्पृहपणे विचार करूं लागले, त्यांत सरदार लोकहितवादी हे अग्रणी होत. पेशवाई जाऊन आंग्लाई आली; बेबंदशाही जाऊन कायदेबाजी आली; मराठ्यांचा दरारा जाऊन इंग्रेजी सुधारणेचा खरारा आला. या नवीन मन्वंतराच्या नवीन वातावरणांत अखिल महाराष्ट्र गुंग होऊन गेला असतांना, सरदार लोकहितवादी महाराष्ट्राच्या गुणदोषाची चिकित्सा करूं लागले. राज्यकारभाराच्या दगदगीचा आणि शांतिमय संरक्षणाचा मक्ता कुंफणी सरकारने घेतल्यामुळे जो उठला तो आपला 'अवघाची संसार सुखाचा करीन। पोरांनी भरीन घर सारें' याच्या भानगडींत गर्क झाला. इंग्रेजी कचेरींत पट्टेवाल्याची नोकरी मिळाली, तरी 'स्वर्गाचें सुख तुच्छ तिजपुढें'

असली भावना उमेदवार तरुणांच्या हृदयांत घर करून बसली होती. स्वतः लोकहितवादी हे सरकारी नोकरच होते. उमेदवारी करतांनाच फावल्या वेळांत त्यांचे वाचन, मनन, निरीक्षण एकसारखे सुरू होते. सन १८५१ साली वांई येथें त्यांना मुन्सफची जागा मिळाली. त्यानंतर इनाम कमिशन, मुंबई ठाणें अहमदनगर अहमदाबाद वगैरे अनेक ठिकाणीं या खात्यांत हुद्याच्या जागा त्यांना मिळाल्या. सरकारी जबाबदारी पार पाडीत असतांनाच, फावल्या वेळांत वा इतिहास, गुजराथचा इतिहास, पृथ्वीराज चव्हाण, लंकेचा इतिहास, निरनिराळ्या ऐतिहासिक गोष्टी वगैरे अनेक आधारभूत ग्रंथ लिहिले. या शिवाय चालूं प्रकरणांवर वृत्तवैभवादि नियतकालिकांत त्यांनी शेकडों लेख लिहिले. लोकहितवादिचे हें लेखन भांडार आतां अगदीच दुर्मिळ झाले आहे. ते ज्यांच्या विवेकी वाचनांत आले त्यांना त्यांच्या सर्वस्पर्शी व व चौकस बुद्धीचे सामर्थ्य पूर्वी पटलें, आतां पटत आहे व पुढेंहि पटेल महाराष्ट्राचा अधः पात कां झाला, याचा निश्चित निर्णय काढण्यासाठीं लोकहितवादींनी हिंदूंच्या सामाजिक, धार्मिक व नैतिक जीवनाचा तुलनात्मक अभ्यास किती कसोशीनें केला, याचें प्रत्यंतर त्यांचा 'स्वाध्याय' नांवाचा एकच ग्रंथ वाचल्यास पटेल. त्यांचे धर्मग्रंथांचे अध्ययन जितकें सूक्ष्म परंतु विस्तृत होतें, तितकीच सामाजीक व नैतिक जीवनाची निरीक्षण-मीमांसा बिनचूक होती. मिश्रविवाह, विधवा पुनर्विवाह, परदेशगमन, पतितपरावर्तन, शक्तिपंथनिषेध, कर्मकांडाचा फोलपणा निरोद्योगप्रवृत्तीचा निषेध वगैरे अनेक राष्ट्रोन्नतिकारक यांनी कोणाची भाडभीड न धरतां प्रगट केलेले विचार आजच्या पट्टीच्या सुधारकांसहि पचनीं पाडतां तिरपीट उडते. लोकहितवादी इंग्रेजी प्रवृत्तीचे होते. ते कोणत्याहि ठिकाणी गेले कीं तेथली सर्व बारीक सारीक लहानमोठी माहिती स्वतः परिश्रमानें मिळवून त्यांच्या नोटस् संग्रहीं ठेवीत व त्यांचा आपल्या ग्रंथ लेखनांत काळजीपूर्वक उपयोग करीत. निर्णयसागर छापखान्यांत हल्ली उपलब्ध असलेली ऐतिहासीक गोष्टी भाग १-२ ही पुस्तकें वाचा म्हणजे आमच्या विधानाची सत्यता पटेल.

शिवछत्रपतीच्या मराठेशाहीचा लोकोत्तर चमत्कार बाद केला की हिंदु लोकांच्या सध्यांच्या पडत्या काळांत, त्यांची समाजस्थिति अधार्मिक कुकल्पनाजन्य मानसिक गुलामगिरीनें आरपार पोंखरली आणि सर्व लोक भिक्षुकशाहीच्या पायांतली पायतणें बनलीं आहेंत हा शोध एकोणिसाव्या शतकांत प्रथम लोकहितवादी यांनीच लावला. गेल्या १५-२० वर्षांत ब्राह्मणेतरांची चळवळ सुरू झाल्यामुळें भिक्षुकशाहीच्या बंडाचें 'वेदोक्त' समर्थन करणारे शहाणे जरी दुर्मिळ झाले आहेत आणि थोडेबहूत आहेत ते भर चव्हाट्यावर शेणमार खात आहेत, तरी खुद्द लोकहितवादींचा काळ विचारांत घेतला तर चहूकडे जीर्णमताभिमानी भिक्षुकशाही टोळभैरवांच्या घनदाट छावण्या पसरल्या असतांना, लोकहितवादींनीं त्यांच्या वाममार्गी आचारविचारांवर बिनमुर्वत निकराचे हल्ले चढविण्यास मुळींच कसर केली नाही. त्यांनी धर्मग्रंथांच्या आधाराने भिक्षुकशाहीविरुद्ध चढविलेले हल्ले परतविण्याला एकहि ब्राह्मणब्रुव धजला नाहीं. उलट तेच हल्ले आतां लेखन व्याख्यानांचे कागदी क्षेत्र सोडून प्रत्यक्ष व्यवहारांत उघडा उघड चालूं आहेत. यावरून त्यांचे निर्णय किती बिनचूक होते, हें सांगणे नकोच. नाहीं म्हणायला, सध्यां महाराष्ट्रांत बोकाळलेल्या बोलभांड राष्ट्रीय पक्षाचे 'विद्वत्ताप्रधान पुढारी' कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी भिक्षुकशाहीच्या वतीनें वकीली करतांना आपल्या 'राष्ट्रीय' भाषेंत लोकहितवादींचा शिमगा करण्याचा पुष्कळ यत्न केला; आणि या शिमग्याच्या भांडवलावर राष्ट्रीय पक्षाच्या प्राणप्रतिष्ठेचा गुढी

पाडवाही मोठ्या थाटमाटांत साजरा झाला. परंतु कालचक्राच्या टाक्यांत राष्ट्रीयांच्या राष्ट्रीय पुराणांच्या चिंधड्या कशा उडत आहेत आणि नवचैतन्याच्या चालू अंमदानींत लोकहितवादींची विवेकी मतें कळत वा न कळत जागृत महाराष्ट्र कशी प्रत्यक्ष आचरणांत आणीत आहे, याचा चालूं इतिहास पाहिला कीं चिपळूणकरांच्या भिक्षुकशाही आकांड तांडवाचा विचार करणें म्हणजे शुद्ध कालापव्यय होय. स्वकीयांचे दोष कोणी निर्भीडपणे दाखविल्यास तो मनुष्य 'राष्ट्रीय' पक्षाच्या भिक्षुकशाही स्वराज्यांत चिपळूणकरी कोडान्वये 'स्वदेशद्रोही' कसा ठरतो हें आजकाल कोणास खुलाशानें सांगायलाच पाहिजे असें नाहीं. अर्थात् भिक्षुकशाहीच्या बंडाविरुद्ध निकराने कलम समशेर उपसणाऱ्या लोकहितवादींना स्वदेशाभिमानाचा खास मक्ता घेतलेल्या चिपळूणकर कंपूने स्वराष्ट्रद्रोही ठरविल्यास आश्चर्य वाटण्याचे काय कारण? यावर लोकहितवादींनी थोडक्यांत समर्पक उत्तर दिलें आहे. (स्वाध्याय पृ. २५६) हे भ्रांत लोक आणखी असेहि म्हणतात की, पाश्चात्यांच्या विद्या व कलाकौशल्य ही आमच्याहून मुळीच वाढली नाहीत. परंतु या व्यर्थ अहंपणानें व अज्ञानाने आपला व्यर्थ स्तोम व उर्मटपणा मात्र दिसून येतो. स्वदेशाभिमान झाला तरी सत्याचा अपलाप करून आपलीच शेखी मिरविणें हें निंद्य आहे. मनुष्यामध्ये गुणग्राहकता आवश्य असावी, व्यर्थाभिमान धरून अज्ञानवृद्धीस मात्र यथास्थित पाठबळ होतें व तेणेंकरून एकंदर देशाचा नाश होतो.'' स्वदेशोन्नतीच्या व स्वदेशाभिमानाच्या चिपळूणकरी भिक्षुकी गप्पा महाराष्ट्राला कितपत हितकारक झाल्या आहेत, हे सध्यांच्या 'राष्ट्रीय' लाथाळ्यांवरून स्पष्ट दिसतच आहे; आणि लोकहितवादींची विवेकी सुधारक मतें महाराष्ट्रांत कशीं फोफावत आहेत हे ब्राह्मण-ब्राह्मणेतर किंवा सत्यशोधक इत्यादि चळवळीवरून खासें दिसून येत आहे. चिपळूणकरांनी ज्यांची ज्यांची आपल्या 'राष्ट्रीय' लेखणीनें टर उडवून आपल्या भिक्षुकी स्वदेशभिमानाचें दुकान थाटलें, त्या त्या नवमतवाद्यांचीच मतें व संप्रदाय चालू घटकेला राष्ट्रोन्नतीची सक्रीय कामगिरी करीत आहेत. ज्योतिराव फुल्यांच्या सत्यशोधक समाजावर या शास्त्रीबुवानीं मनमुराद आग पाखडली. चालू घडीचा मामला कसा काय आहे? 'जोतीचे अरण्यपांडित्य' आज मी म्हणणाच्या भिक्षुकशाही पंडितारण्यांची बत्तिशी गदगदा हालवीत आहे. गोरगरीब बहुजनसमाजांत अलीकडे थरारलेल्या चैतन्याची पुण्याई, लोकमान्य (?) बनविलेल्या चिपळूणकर सांप्रदायी टिळकांच्या वांट्यास येत नसून, 'गांवढळ जोती'च्या सत्यशोधक समाजाकडेच आहे, हे स्पष्ट सांगण्याची आवश्यकता नाही त्याचप्रमाणे आर्यसमाजाचे उत्पादक स्वामी दयानंद सरस्वती यांनाहि 'पागल' बनविण्याच्या कामीं शास्त्रीबुवांची उन्मत्त विद्वत्ता कचरली नाहीं; पण आर्यसमाजाची त्रिलोकविश्रुत कामगिरी आणि हिंदुस्थानाप्रीत्यर्थ दयानंदांच्या शागीर्दीनीं केलेला व करीत असलेला स्वार्थत्याग पाहिला कीं पागलपणाचे हारतुरे काळानें कोणाच्या गळ्यात लटकविले आहेत ते पहाणाराला खास दिसतील. भिक्षुकशाही विरुद्ध टीकेचा भडीमार करणाऱ्या चित्पावन वंशोत्पन्न देशमुख घराण्यांतील लोकहितवादीवर चित्पावनाभिमानी चित्पोळणकरांनीं आपली करडी लेखणी वाटेल तशी चालविली, यांत अवास्तव असें काय झाले? भिक्षुकशाहीबद्दल लोकहितवादी म्हणतात, ''या भटांचा दरारा धर्मसंबंधानें जनमनावर विलक्षण प्रकारचा बसला आहे. त्यास कोणी यत्किंचित चुकलें कीं हें वानर सैन्य चवताळून खाऊं की गिळूं असे करावयास लागतें. यास्तव गृहस्थांनी यांच्या पाशांतून जितकें लौकर मुक्त होता येईल तितके लौकर मुक्त व्हावें या ज्ञानशून्य भटांच्या बंधनात सांपडून पारतंत्र्य जालांत जोपर्यंत लोक गुरफटलेले राहतील तोपर्यंत स्वोन्नति आणि

देशसुधारणा होणार नाही. हे अविचारी भिक्षुक सद्विद्या नदीच्या व सुधारणारूप निर्झरांच्या प्रवाहास मोठा थोरला आणि जबरदस्त सिमेंट केलेला चिरेबंदी बांध आहेत. हा बांध दृढनिश्चय रूप टांकीनें आणि देशोन्नतीच्छारूप हातोडीनें टोले देऊन फोडून काढून त्या नदीला व त्या निर्झराला स्वेच्छेनें आर्यहृद्भूमीच्या विशाल पटांगणावर प्रसरण पाऊं द्यावे व त्यांचे जिकडे तिकडे सुंदर पाट काढून देऊन अपूर्व बागाईत करून द्यावें हेंच सद्य:कालीं आपल्याला भूषणावह आहे.'' (आगम प्रकाश पृ. २०५)

सरदार गोपाळराव देशमुख यांची विद्वत्ता एकदेशी नव्हती. त्यांच्या स्वाध्यायशीलतेची झांप इतकी प्रचंड होती कीं असा एकहि विषय उरला नाहीं की ज्यावर त्यांनीं कांहीं थोडें बहुत लिहिलें नाहीं. सामाजीक व धार्मिक विषयाच्या बरोबरीनेच त्यांनी बहुमोल ऐतिहासिक ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले. ऐतिहासिक कथानकें रंगवितांना ठिकठिकाणी त्यांनी मार्मिक निर्णय काढून अत्यंत स्पष्टोक्तींचे इषारे नमूद करून ठेवले आहेत. पेशवाईच्या उत्तरार्धत बोकाळलेल्या राष्ट्रीय भटशाहीचे स्वरूप आणि रावबाजी, बाळाजीपंत नातू, हरीपंत भावे वगैरे चांडाळांची दुष्कृत्ये यांवर लोकहितवादीनी दिलेले अभिप्राय कडकडीत निस्पृहतेचे आहेत. अलीकडे ठाण्याचे श्रीयुत भावे प्रभृति विद्वान मंडळी रावबाजी नातु प्रभृतींच्या काळ्याकुट्ट कर्मीवर पांघरूण घालून त्यांना नेपोलियन बोनापार्टाच्या पंक्तीला नेऊन बसवीत आहेत; परंतु लोकहितवादीनीं ज्या वेळीं आपले रावबाजी विषयक लेख लिहिले, त्यावेळी तो कांहीं मेला नव्हता. ब्रह्मावर्ताला खुशाल गोकुळ-खेळ खेळत होता आणि त्याच्या दुष्कृत्यांचा महिमा आबाल वृद्धांच्या खास नजरेसमोर होता. रावबाजीचा मृत्यु (१८५२) होण्यापूर्वी चार वर्षे ज्ञानप्रकाश जन्मला होताच (१८४८) आणि स्वतःच्या माहात्म्याबद्दल महाराष्ट्र काय म्हणतो यांविषयी एखादा तरी चुरचुरीत लेख त्या शहाण्याच्या वाचनांत कदाचित् आला असेल. सारांश, लोकहितवादींची महाराष्ट्रेतिहास विषयक लेखन सामग्री व मतें यांचा अधिकार फार मोठा आहे. त्यांच्या सर्व ग्रंथांचे पुनर्मुद्रण होऊन ते सर्व महाराष्ट्रीयांच्या हाती पडल्यास, नवमतवादाच्या प्रचलीत नानाविध चळवळी चैतन्यपूर्ण होतील. हें एक पुण्यकार्य आहे आणि आमचे महाराष्ट्रीय ग्रंथप्रकाशक या बाबतीत अहमहमिकेनें पुढे येतील अशी आम्हांला आशा आहे.

लोकहितवादींचा स्वदेशाभिमान त्यांच्या विविध ग्रंथांत व्यक्त झालेल्या लोकहिताच्या तळमळीवरूनच सिद्ध होतो. हा अभिमान पोकळ नव्हता, आंधळा नव्हता किंवा ओढून ताणून आणलेला चंद्रबळाचा नव्हता. स्वकीयांच्या दोषांवर त्यांनीं कडकडीत टीका केल्या, त्या देशद्रोहीपणामुळें केल्या, किंवा ''स्वजनांविषयीं अवास्तव व अतिरिक्त अनादर वाढविण्यासाठी'' केल्या (प्रोफे. पोतदार.) असें म्हणणे एककल्लीपणाचे किंबहुना मूर्खपणाचे आहे. वाईट गोष्टींचा तिरस्कार व चांगल्या गोष्टींचा पुरस्कार करणें याचें स्वदेशाभिमानाशीं केव्हांहि वाकडें गोत्र नाहीं. लोकहितवादींनी हिंदुजनांच्या ज्या अनेक घाणेरड्या दोषांचे निर्भीडपणे आविष्कारण केले, त्या दोषांपासून अझूनहि हिंदु समाज मुक्त झालेला नाही किंवा भिक्षुकशाही बंडहि असून शमलेले नाही. जातिभेदाची तीव्रता तर दिवसेंदिवस सारखी वाढतच आहे. डॉ. गौरच्या बिलासारख्या किंवा प्रो. लठ्ठ्यांच्या जोशी विलासारख्या सुधारणांनाहि विरोध करणारे पेशवाई मिक्षुक अझून हयात आहेत. सामाजीक व धार्मिक क्षेत्रांत अझूनहि अनंत अत्याचार करणारे भिक्षुकशाही नराधम रगड आहेत. अशा स्थितीत लोकहितवादींनीं या सर्व भानगडींवर शरसंधान रोखून कठोर लेखनाचा मारा केल्यामुळे ते देशद्रोही कसे ठरतात? ज्यांना जनतेचा स्तुतिपाठ गाऊन त्यांच्या

बेताल हुल्लडीवर आपली देभत्वाची नाटकें नाचविण्याची चिपळूणकरी खोड लागली आहे, असल्या सुवर्णसंधी देशाभिमान्यांपेक्षां लोकहित वादींचा स्वदेशाभिमान बराच वरच्या दर्जाचा होता, हे त्यांच्या ग्रंथपरिशीलनानें वाटेल त्या विवेकी माणसाच्या प्रत्ययास येईल, यांत संशय नाही.

सरदार गोपाळरावनीं स्वजनसेवा जितक्या एकनिष्ठेनें बजावली, तितक्याच एकनिष्ठेने त्यांनी सरकारी नोकरीहि केली. सन १८७४ साली पेनशन घेतल्यावरहि त्यांनी रतलाम स्टेटचा कारभार पाहिला. या त्यांच्या कर्तबगारीबद्दल सरकारने त्यांना फर्स्ट क्लास सरदार केलें, जस्टिस ऑफ धी पीसची पदवी दिली आणि कायदे कौन्सिलच्या सदस्याचाहि मान त्यांना मिळाला. पेनशन घेतल्यानंतरहि लेखनद्वारा लोकजागृतीचे त्यांचे काम मृत्यूच्या अखेर घटकेपर्यंत अव्याहत चालूच होते. सध्यांच्या असहकारी वातावरणांत बेफाम बनलेल्या मंडळींना लोकहितवादींच्या शासित शास्त्यांच्या हितार्थ बजावलेल्या समतोल कामगिरीचे रहस्य उमगणे कठीण जाईल. 'नृपति जनपदानां दुर्लभः कार्यकर्ता' या कोटीतील या थोर व्यक्तीचें चारित्र्य नीट उमजण्यास विद्यमान एकाक्ष मंडळींना कदाचित् 'त्यांच्या वंशा जावें' लागेल! चिपळूणकर सांप्रदायी प्रो. दत्तोपंत पोतदार आपल्या अवतारांत, (पृ.८८) म्हणतात : ''आमच्या देशाच्या माहितीसंबंधानें रावबहादुर हे केवळ समुद्र आहेत, असें कै. ओक म्हणतात ते अगदी यथार्थ आहे. त्यांच्या ऐतिहासिक गोष्टी वगैरे लेख वाचले म्हणजे त्यांच्या अफाट माहितीचा अचंबा वाटतो. असे ऐकण्यांत येत आहे कीं (खरें आहे.) रावबहादुर कोठें गेले, कांहीं पाहिलें किंवा कोणी भेटला कीं, लागलीच यांचे गिरमीट सुरू व्हावयाचे व मिळेल ती माहिती काढून टिपणवहींत दाखल व्हावयाची. (यालाच वर आम्ही इंग्रेजी प्रवृत्ति असें म्हटलें आहे.) असा चौकस व साक्षेपी पुरुष फार थोडा आढळण्यांत येतो.''

लोकहितवादी आपल्या वयाच्या ६९ व्या वर्षी ९ ऑक्टोबर सन १८९२ रोजी स्वर्गवासी झाले. त्यांच्यामागे त्यांचे वडील चिरंजीव डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख हे मुंबईंत आपल्या वैद्यकीनें व इतर देश सेवेनें 'भीष्माचार्य' म्हणून प्रसिद्ध आहेत. दुसरे रावबहादुर लक्ष्मणराव गोपाळ देशमुख सी. एस. रिटायर्ड कलेक्टर (पेनशनर) मु. पिंप्री जि. पुणे. यांनी मात्र आपल्या लोकोत्तर वडिलांचा नवमतवाद पुरस्काराचा उद्योग लेखनद्वारा अखंड चालू ठेविला आहे. त्यांनी पुनर्विवाह व मिश्रविवाह विषयांवर दोन उत्तम नाटकें लिहिली आहेत. अन्योन्यदर्शन नामक दोन विद्वत्ताप्रचुर ग्रंथ लिहून त्यांत मोरोपंतांची केकावली व वामन पंडितांचे श्लोक यांतील पुराणमतवादी कल्पनांचा फोलपणा केकेला केका व श्लोकाला श्लोक अशी उलट सलामी देऊन सिद्ध केला आहे. हे दोन ग्रंथ प्रत्येक नवमतवाद्यानें अवश्य स्वाध्यायात आणावे अशी शिफारस आहे. याशिवाय Short Account of India to 1915 या नावाचें एक ऐतिहासिक माहितीनें भरलेलें उत्कृष्ट इंग्रजी पुस्तकही प्रसिद्ध केले आहे. रावबहादुरांची कलमबहाद्दरी लोकहितवादींची आठवण होऊं देत नाहीं खास. असो. विचारी व विवेकी महाराष्ट्र लोकहितवादींच्या ग्रंथभांडाराचा जीर्णोद्धार करून त्यांच्या उत्कृष्ट स्वाभिमानाचे ऋण अल्पश: फेडील, अशी आशा व्यक्त करून रजा घेतों.

□□□

स्फुट विचार

आपला दाम पारखून घ्या

ब्राह्मणांनी ब्राह्मणांचे आणि ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणेतरांचे हित पहावें हें स्वाभाविक आहे. निदान ब्राह्मणेतरांचा हितवाद ब्राह्मणांकडून कदापिहि होणार नाही, असा ब्राह्मणेतरांना अनुभव आल्यामुळे त्यांनी ब्राह्मणांशी असहकारिता पुकारून स्वतःच्या पायांवर उभे राहण्याचा केलेला निश्चय केव्हाही प्रशंसनीयच होय. अर्थात् शिक्षण-खात्यापासून तो कायदे कौन्सिलपर्यंत ब्राह्मणेतरांनी आपले खास ब्राह्मणेतर प्रतिनिधी शक्य तितके अधिक पाठविण्याच्या खटपटी करणे आवश्यक आहे; आणि गेल्या कायदे कौन्सिलाच्या निवडणुकीच्या वेळी या खटपटी, ब्राह्मणांच्या असहकारी सुतकामुळे, बऱ्याच यशस्वी झाल्या. अनेक नब्राह्मण लोक एमेल्सी बनले व ठिकठिकाणी त्यांच्या एमेल्सीपणाचा गौरव भोळ्या भाबड्या ब्राह्मणेतर मतदार रयतेकडून करण्यात किंवा करविण्यांत आला. आतां १९२४ सालीं नवीन निवडणुका होणार, नेहमीच्या प्रघातानुरूप कोणशीळदारीच्या उमेदवारांच्या आत्मकर्तबगारीची पुराणे आतां सर्वत्र बोकाळूं लागतील, वशिल्याची जमवाजमव आणि आग्रहाची देवघेव धूम धडाक्यांत गर्जू लागेल. श्रीमंत उमेदवार आपल्या बेअक्कलपणावर संपत्तीच्या-खैरातीचें दाट पांघरूण घालून, आपली कोणशीळदारीची योग्यता कशीबशीं लोकमान्य ठरवून घेतील. जोपर्यंत रयतेचा शिक्षणसंस्कार प्रगल्भ झाला नाही आणि मतदारांना आपल्या कर्तव्याची व मतदानाची वास्तवीक अटकळ झालेली नाही, तोपर्यंत सुक्या कोणशीळदारीच्या मानपानावर पुढारपणाची नाटकें नटविणारे झब्बू ब्राह्मणेतरांत धडापासरी बोकाळणारच. ब्राह्मणेतर नांवानें ओळखल्या जाणाऱ्या पक्षाचे प्रसिद्ध पुढारी जातिभेदनिषेधावर कितीहि प्रवचनें झोडीत असले, तरी या पक्षांतहि जातिभेदाचे थेर अखेर बोकाळले आहेत. जातवार प्रतिनिधीचे तत्व सद्यःस्थितीत कितीहि आकर्षक दिसत असले, तरी निवळ जातबंधुत्वाच्या गुणावर कौन्सिलात निवडून दिल्या जाणाऱ्या उमेदवारांची लायकी कस्सून पहाण्याचे काम तरी या तत्त्वाच्या पुरस्कर्त्यांनी डोळे झांकून करतां कामां नये, एवढी सूचना देणें प्राप्त आहे. मागल्या निवडणुकीत ब्राह्मणेतर पक्षातर्फे कौन्सिलांत गेलेल्या कोणशीळदारांनी गेल्या तीन वर्षात काय कामगिरी केली, किती वेळा तोंड उघडलें, रयतेचा पक्ष घेऊन बजेटावरील वादविवादांत आपल्या जिवाचे रान किती केलें, कौन्सिलांत किती वेळां हजर राहिले, याचा जबाब ब्राह्मणेतर मतदारसंघानें त्यांना

विचारला पाहिजे व त्यांनी सप्रमाण तो त्यांच्यापुढे जाहीर रीतीनें मांडला पाहिजे. प्रत्येक ब्राह्मणेतर कोणशीळदार सत्याला स्मरून आपल्या कामगिरीचा अहवाल जर जनतेपुढे मांडील, तर आमची खात्री आहे कीं पुढील निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे रहाण्याची त्याला छाती असली तरी तोंड नसेल! ब्राह्मणेतरांनी ब्राह्मण उमेदवारांना मतें देऊं नयेत, हे तत्व आम्हांलाहि मान्य करायला हरकत नाहीं; परंतु ब्राह्मणेतर उमेदवार निवडतांना तरी जातिभेदाचे लटके लचांड उपस्थित करूं नये. अमूक एका विशिष्ट जातीच्या बऱ्याच कोणशीळदारांची कौन्सिलांत नुसती खोगीरभरती केल्याने, ब्राह्मणेतर पक्षाचें कांहींच हित होणार नाहीं, एवढेच नव्हे तर त्या विशिष्ट जातीच्याहि आत्मविकासाला व सर्वांगीण उन्नतीला काही उपयोग होणार नाही, यंदा खतम होणाऱ्या कौन्सिलांतल्या यच्चावत् ब्राह्मणेतरांच्या कौन्सिल-कामगिरीची स्पष्ट चिकित्सा कोणी केल्यास त्याला हेंच कबूल करावें लागेल कीं आपलाच दाम खोटा! परकीय नोकरशाहीशी झगडण्यासाठी असले ढब्बू पाठविण्यापेक्षा जातिभेदाचे घाणेरडें तत्त्व उदार मनाने लाथाडून ब्राह्मणेतरांतील कार्यक्षम विद्वान लोक प्रतिनिधि म्हणून निवडून देणें श्रेयस्कर आहे. कौन्सिलें म्हणजे मानमरातब मिळण्याचा बाजार, एवढीच क्षुद्र कल्पना बाळगणाऱ्या पोषाखी मुखदुर्बळांना निवडून देणे म्हणजे आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेऊन, बिनमोल संधी मातीमोल करण्यासारखे आहे, हे नीट विचारांती उमजण्यास कठीण नाही.

आतां डोळे उघडले

महात्मा गांधींच्या प्रवचनांना भाळून भोळसट हिंदूंनी केलेली 'हिंदु मुसलमानकी जय'ची १९२१-२२ सालांतली हुल्लड आणि सध्यां ठिकठिकाणी मुसलमानांनी हिंदूंवर चालविलेल्या प्राणघातक दंगली, यांचा कोणी विचारवंत नीट विचार करील, तर हिंदु पुढारी किती अदूरदृष्टीचे आहेत हे त्याला समजून येईल. लोकमताला बरें वाईट वळण देण्याचे सामर्थ्य वर्तमानपत्रांच्या हाती; परंतु गांधीमहात्म्याच्या धडाक्यात एकाही असहकारी किंवा राष्ट्रीय पत्राला हिंदुमुसलमानांच्या ऐक्याची स्पष्ट छाननी करण्याची छाती झाली नाही. विकारक्षुब्ध बहुजन समाजाबरोबरच तेहि अल्लाहो अकबरच्या आरोळ्या मारीत होते. मुंबईचा लोकमान्य तर तुर्की प्रश्नावर आणि खिलाफतीच्या खिरापतीवर मंगळवार खेरीज करून दररोज इस्लामी पाट्यावरवंट्याने आपले छाताड शेकून घेत होता. केसरी व तत्पक्षीय पत्रे जात्याच थोडी धोरणी असल्यामुळे वारा वाहील तशी शिडें फडफडवीत होती खरी, तरी त्यांनाहि गांधी मुक्त असे पर्यंत मुसलमानांच्या उर्मठ चळवळी विरुद्ध ब्र काढण्याची छाती झाली नाही. गांधींचा यंग इंडिया व इतर तदनुयायी मराठी पत्रें तर काय विचारतां! हिंदुपणीच मुसलमानपणाचा आत्मपरिचय घेणारी. आता मुल्तान काठेबाड सिधपूर इत्यादि अनेक ठिकाणीं मुसलमानांनी हिंदूंची डोचकी फोडली, देवळें फोडली व बायका भ्रष्ट केल्या, तरी गांधी अनुयायी हिंदु पत्रांच्या आत्मत्वाचा पारा झीरो डिग्री सोडत नाहीं. कशाला सोडील? स्थितप्रज्ञत्वाला पोंहचलेली ही मंडळी! खरे पाहिले तर हिंदु मुसलमानांच्या ऐक्याचा प्रश्न अल्ल हो अकबरच्या आरोळ्यांनी किंवा खिलाफतीच्या भाडोत्री उर बडविण्यानें सुटण्याइतका सोपा

नव्हे, याची जाणीव गांधीसारख्या परमहंसाला झाली नाही तर नाही; पण शहाण्या सुर्त्या लोकमत नियंत्या हिंदु पत्रकारांनाहि होऊं नये, किंवा झाली असल्यास आपले स्पष्ट मत निस्पृहपणे जाहीर करण्याचे धारिष्ट होऊं नये, या मानसिक दौर्बल्याला काय नाव द्यावे! मलबारात मोपल्यांनी खिलाफत स्वराज्याचा हैदोस घातला, त्याच वेळी वास्तवीक हा गांधीप्रणित हिंदु मुसलमान ऐक्याचा भोपळा फुटला. पण त्या वेळी असहकारी व राष्ट्रीय पत्रें मूग गिळून बसली होती व मलबारी अत्याचाराच्या बातम्या खोट्या ठरविण्याची धडपड करीत होती. मोपल्यांच्या बंडावर म. गांधीनी यंग इंडियांत केलेली सारवासारव आज कोणी स्वाभिमानी हिंदु बवाचील, तर त्याला लाजेनें खालीच मान घालावी लागेल. हेच कशाला? खिलाफत, गोवध तुर्की प्रश्न इत्यादीवरचे महात्माजींचे लेख महात्माजींच्या जैनी महात्म्याला कितीहि शोभत असले, तरी त्या लेखांच्या सुरावर निष्कारण केलेल्या बळजबरींच्या शिखंडी नृत्याबद्दल शिवाजीच्या महाराष्ट्रीयांना आता स्वतःच्या मानसीक गुलामगिरीबद्दल चिळसच उत्पन्न झाली पाहिजे. गांधी आपल्या असहकारी चळवळीच्या धुरेवर असेपर्यंत जी राष्ट्रीय पत्र (लोकसंग्रह अपवाद.) मुसलमानांच्या दंगलखोर प्रवृत्ती विरुद्ध एक शब्द काढण्यास धजली नाहीत, तीच पत्रे आता आम्ही प्रथमपासूनच या ऐक्याच्या फोलपणाविषयी ओरडत आहोत असा कांगावा करूं लागली आहेत. काहिही असो, हिंदु पत्रकार आता शुद्धीवर येऊन गांधी भगवंताच्या मुरलींच्या मोहीनीतून मुक्त होत आहेत, ही आनंदाची गोष्ट होय. मुसलमानांच्या एकीच्या वल्गना किती कावेबाज होत्या याचा स्पष्ट खुलासा प्रबोधनाने आपल्या १ ल्या वर्षाच्या दुसऱ्याच अंकांत (१ नवंबर १९२१ पृ. १४) येणें प्रमाणे केला होता- ''हिंदूंच्या बौद्धिक सामर्थ्याचा आपल्या दणकट शरीरसामर्थ्याशी मिलाफ करून घेऊन, या संयुक्त शक्तीच्या जोरावर, स्वराज्याच्या नावाखाली खिलाफतीचे भिजकें कांवळे वाळविण्याची हिन्दी मुसलमान बांधवांनी खटपट चालविली आहे. यानंतर २०व्या अंकांत (पृ.१५५) जगावें की मरावें? आणि २३ व्या अंकांत (पृ.१८०) तुमचा खेळ होतो, पण या दोन अग्रलेखांत हिंदु-मुसलमान प्रश्नाचा शक्य तितक्या स्पष्टोक्तीने दिलेला इषारा प्रबोधनाच्या वाचकांनी मुद्दाम पुन्हा वाचून पहावा अशी विनंति आहे. लवकरच या विषयावर विस्तृत उहापोह करणारा संस्कृतीचा संग्राम हा आमचा ग्रंथ 'नरेंद्र पुस्तकालय, दादर' प्रसिद्ध करणार असल्यामुळे सध्या येथेच विराम घेणें बरें.

□□□

अग्रलेख

शिवछत्रपतींचा लोकसंग्रह

कित्येक *दुष्ट संहारिले । कित्येकास धाक सुटले ।*
कित्येकास आश्रय झाले । शिव कल्याणराजा ।।

महाराष्ट्रांची सद्यःपरिस्थिति कशीहि असो, महाराष्ट्र भूमी स्वराज्याची जन्मभूमी आहे. हिंदु धर्माच्या उत्कर्षासाठी आणि हिंदूंच्या साम्राज्यविषयक आकांक्षेच्या सिद्धीसाठी अनेक पुरुषोत्तमांनी स्वतंत्र साम्राज्य स्थापनेच्या अनेक उलथापालथी या मूमीवर केल्या. भूत कालीन शालीवाहन विक्रमादिकांचा विक्रमशाली वादग्रस्त इतिहास बाद केला, तरी विजयनगराच्या हिंदु साम्राज्य-काळापासून तो तहत शिवाजी महाराजांच्या उदयापर्यंतचा इतिहास हाच सिद्धांत पटवितो. अखिल हिंदुस्थानच्या भिन्नरंगी राजकारणाचीं सर्व सूत्रें आजपर्यंत महाराष्ट्रांतील स्वराज्यप्रणेत्यांनीच हलविली आहेत. दिल्लीची एवढी मोठी जबरदस्त मोंगल बादशाही, पण तिच्याहि राजकारणाला दख्खनच्या हालचालीकडे सतत लक्ष ठेऊन आपल्या धोरणाचीं पावलें जपून टाकावीं लागत. भारतीय महायुद्धापासून भरतखंडाच्या साम्राज्यशक्तीला कीड लागली, असा संशोधकांचा एकमुखी अभिप्राय आहे. हा अभिप्राय निराशावादी मनाने खुशाल डोळे मिटून पत्करला; तरी आशावादी जिवंत मनाचा उत्साह उचलून धरण्याइतका लोकोत्तर नरपुंगवांचा पराक्रम या महाराष्ट्र भूमींतून अगदींच कांहीं बी बियाण्यांसकट नष्ट झाला नाही, याची अनेक प्रत्यंतरें इतिहासांत जिवंत आहेत. विजयनगरचें हिंदुसाम्राज्य जसें अवचित निर्माण झालें तसे अवचित निष्प्राण झाले. शिवाजीचें हिंदवी स्वराज्य ज्या यदृच्छेच्या लहरीनें उत्पन्न झालें, त्याच यदृच्छेच्या पोटांत गडप झालें. स्वराज्यांच्या या उत्पत्ति स्थिति लयाचीं कारणें कोणतीहि असोत; परंतु त्यावरून निदान एवढा सिद्धांत बांधायला कांही हरकत नाहीं कीं हिंदूंची साम्राज्यजेतृत्वाची महत्त्वाकांक्षा, जग समजतें किंवा समजावतें, तितकी काहीं अगदीच ठार मेली नाहीं. भूतकाळाच्या लांबलचक कालावधींत, हिंदूंच्या जिवंतपणाची साक्ष पटविणारे जे अनेक वीर महावीर या महाराष्ट्रभूच्या कुसव्यांत पैदा झाले, त्यात शिवाजी महाराजांची स्मृति 'एवर ग्रीन' (अक्षय ताजी) च उरली आहे. शिवाजी या नावांतच महाराष्ट्राचा स्वभाव व त्याची विशिष्ट कर्तबगारी समावून राहिली आहे. महाराष्ट्र म्हटला की शिवाजीची मूर्ति दिसूं लागते आणि शिवाजीचें स्मरण होताच, भगवंताच्या

एन ४००६--२९

विराट स्वरूपाप्रमाणें, अखिल महाराष्ट्राची स्वराज्याची कर्तबगारी त्यांत स्पष्ट दिसते. शिवाजीचा मराठा या नांवांत अझून कांहींतरी दरारा आहे, कांहीतरी वचक आहे, एका विशेष कर्तबगारीची जिवंत साक्ष आहे. शिवाजीचा मराठा आणि मराठ्यांचा शिवाजी या अन्योन्यावलंबी भावनांत विशेष प्रकारचें चैतन्य होतें-नव्हे, आहे-म्हणूनच युरपमध्ये जर्मनीच्या सवाई सोट्या थैमानाचें महायुद्ध इंग्लंडच्या काळजाला हात घालू लागतांच, शिवाजीच्या मराठ्यांची मदत मागण्यासाठीं शिवराया प्रणिपात करावा ब्रिटानिया आली. ब्रिटानियेच्या या प्राणिपातांत कितीहि कसलेहि राजकारणी डांवपेंच असले, तरी एक गोष्ट या २० व्या शतकांत हडसून खडसून सिद्ध झाली कीं गेल्या महायुद्धांत, सामर्थ्य-संपन्नतेची घमेंड मारणाऱ्या

इंग्लंडची अब्रू शिवाजीच्या मराठ्यांनीं राखली

अर्थात यावरून इतकें सिद्ध होतें की महाराष्ट्राची सध्याची परिस्थिती बाह्यतः कितीहि हल्लाकीची दिसत असली किंवा त्याला स्वतःला तशी खरोखर भासत असली, तरी महाराष्ट्र जावत्काल शिवाजीला विसरला नाहीं, तावत्काल त्याला पुनरुज्जीवनाची आशा खास आहे. या आशेच्या प्रभातीचे प्रबोधक वारें आज सर्वत्र भासत आणि प्रबोधनाचे वाचक आजचा अंक वाचीत असतांनाच महाराष्ट्रांत साजरा होणाऱ्या शिवजयंति उत्सवांत तर या व प्रबोधनाची चिन्हें विशेष स्पष्टतेनें त्यांना दृग्गोचर होतील. प्रसंगी शिवरायानें केवळ आत्मचिंतनानें निर्माण केलेली स्वराज्याची कल्पना सिद्धीस नेण्यासाठी लोकसंग्रहाची लगबग केली, याविषयी थोडक्यांत कांहीं विचार आज व्यक्त केले आहेत.

शिवाजीच्या चरित्राचा विशेष हा कीं त्यांत सर्वत्र अद्भुत रस अपरंपार भरलेला. जें इतरांच्या कल्पनेलाहि शिवलें नाहीं, तेंच नेमके करून दाखविण्यास शिवाजी उद्युक्त होत असे. स्वराज्य-स्थापनेचा त्याचा निश्चय नक्की ठरल्यावर, तो पार पाडण्यासाठीं विद्वान मुत्सद्द्यांनी व तलवार-बहाद्दरांनी गजबजलेल्या मोठमोठ्या श्रीमंत राजधान्यांकडे त्यानें ढुंकूनहि न पाहतां, एकदम खेड्यापाड्यांकडे व दरीखोऱ्यांत रहाणाऱ्या 'गावंढळ' अडाणी (?) शेतकऱ्यांकडे आपली दृष्टि वळविली, यातच त्याच्या मानव स्वभाव निरीक्षण कौशल्याचा अद्भुतपणा दिसून येतो. राष्ट्राचा आत्मा कोठे आहे आणि तो कशा रीतीनें डिवचला असतां तत्काळ जागृत होईल, हें शिवाजीनें बिनचूक अजमावलें आणि त्या अन्वयें मावळांतल्या मावळ्यांची मनें त्यानें प्रथम आकर्षण केलीं. जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा राहराहो शोध घ्यावा । परांतराचा ।। ही लोकसंग्रहाची मख्खी शिवाजींत जन्मजातच होती, असें म्हणावयास हरकत नाही. मुसलमानी वरचढ सत्तेच्या रामरगाड्याखाली हतबुद्ध झालेल्या या कष्टाळू मावळ्यांना स्वराज्याची कल्पना चटकन् पटलीच असेल असें दिसत नाहीं. परंतु राजनिष्ठ देशमुखांना परस्पर धाब्यावर बसविण्यासाठीं शिवाजीनें जेव्हां हरप्रयत्नानें मावळचे देशपांडे बगलेत मारले आणि सारा वसुलीचा विजापुराकडे संतत वहाणारा ओघ झटकन् वळवून त्याला पुण्याची गंगाजळी दाखविली, तेव्हांच त्या इमानी गड्यांना शिवाजींच्या 'श्रेष्ठ धारिष्ठा'ची खात्री पटून ते त्याचे अनुयायी बनले. नुसता लोकसंग्रह- म्हणजे भल्याबुऱ्या सच्च्या कच्च्या अनुयायांचा मेंढरवाडा-आजहि वाटेल तो माणूस करूं शकतो, पण शिवाजी 'आधी केलें, मग सांगितलें' या तत्वांचा कट्टा प्रणेता असल्यामुळे, आत्मविश्वासाच्या जोरावर तो आपल्या कल्पना फटाफट सिद्ध करून दाखऊं लागताच मावळ्यांची स्वराज्यभक्ति खडबडून जागी झाली. आणि तानाजी एसाजी प्रभृती पुढारी मावळ्यांच्या

खास नेतृत्वाखाली ते तळ हातावर घेऊन शिवाजीला सामील झाले. इतक्यांत निश्चित धोरणानुसार किल्ले दाराला वश करून शिवाजीने जेव्हां तोरणा किल्ला सर केला आणि हिंदवी स्वराज्याचे तोरण जाहीर केलें, तेव्हां तर तो त्या इमानी मावळ्यांना प्रत्यक्ष सांबाचा अवतार भासू लागल्यास काय नवल?

शिवाजीच्या लोकसंग्रहाची कसोटी त्याच्या चारित्र्याप्रमार्णेच अद्भुत होती. त्यांत मराठे कायस्थ सारस्वत देशस्थ यजुर्वेदी वगैरे अनेक ब्राह्मण व ब्राह्मणेंतर जातींचा समावेश अत्यंत दूरदृष्टीने करण्यांत आलेला होता. या दूरदृष्टीची चिकित्सा आजच्या जातिभेदाभिमानी करंट्या महाराष्ट्रानें अवश्य विचारांत घेतली पाहिजे. महाराष्ट्राची सामुदायिक म्हणून एक विशेष प्रवृत्ति निश्चित ठरलेली आहे. परंतु या प्रवृत्तींत अनेक महाराष्ट्रीय जातींच्या भिन्नभिन्न प्रवृत्तींचा समप्रमाणांत परिपाक उतरलेला आहे, ही गोष्ट फारच थोड्यांच्या लक्षांत आली असेल. बाह्यतः परस्परविरोधी भावनांवर पोसली जाणारी प्रत्येक जातीची प्रवृत्ति शिवाजीच्या लोकसंग्रहाच्या कक्षेंत येतांच स्वराज्यवर्धक का झाली? कशी झाली? हाच मुख्य महत्वाचा प्रश्न आहे. महाराष्ट्रांतील प्रचलित जातिमेदांची उत्पत्ति कांहीं नवीन नाही. ते जसे आज आहेत, तसेच ते शिवाजीच्याहि वेळी होते. आज प्रत्येक जातीची जी एक विशिष्ट स्वभावप्रवृत्ति पहाण्यांत येते, तशीच ती शिवकालींहि अस्तित्वांत होती. सामाजिक व धार्मिक बाबतींत- आजच्या इतकी स्वयंनिर्णयाची जाणीव नसली तरी परस्पर स्पर्धा होतीच. जन्मसिद्ध जातीच्या व श्रीमंतीच्या उच्चनीचतेचे थेर सर्वत्र रूढ होतेच. समानता जर कशांत असेल तर ती यांतच की सर्व ब्राह्मण ब्राह्मणेतर व श्रीमंत दरिद्री लोक मुसलमानी सत्तेचे गुलाम होते. अशा अवस्थेंत ही भिन्नभिन्न गुणकर्मांची जनता शिवाजीच्या संग्रहांत एकवटली कशी? याला कोणीं असें उत्तर देतील की राजकीय अध:पाताच्या सर्वसामान्य राष्ट्रीय संकटाने त्यांना एकवटले उत्तर चूक आहे. स्वयंनिर्णयाची मुमुक्षावस्था व स्वराज्यप्राप्तीची आशा या बाबतींत आजची परिस्थिति व शिवकालीन परिस्थिति अगदी एकजिनसी असतांनाहि उच्चनीच ब्राह्मण-ब्राह्मणेतरादि भेदांची एकवाक्यता आज कां होत नाही? जनतेच्या राजकीय उद्धाराच्या मार्गात शिक्षणाच्या अभावांची धोंड आज आडवी येत आहे, असे म्हणावें, तर शिवकालीं सर्व महाराष्ट्रीय जनता सर्व विद्यापारंगत बृहस्पति होती कीं काय? सारांश, कसाहि आणि कितीहि विचार केला तरी आजच्या लोकनेत्यांकडून वारंवार पुढें करण्यांत येणारीं वर्तमान लोकसंग्रहाच्या अपयशाचीं कारणें विवेकबुद्धीला मुळींच पटत नाहींत, आणि या कारणांचे मूळ वर्तमान लोकनेत्यांच्या कमकुवत लोकसंग्रही धोरणांत आढळतें.

शिवाजीने आपला लोकसंग्रह जातिभेदाच्या दृष्टीने मुळीच केला नाही. त्याने ब्राह्मणेतर नाना जातींचा जसा परामर्ष घेतला, तसा ब्राह्मण जातींचाहि घेतला. शिवाजीसारख्या राष्ट्रवीराने जातिभेदाच्या क्षुद्र दृष्टीनें लोकसंग्रहाची उलाढाल केली असती, तर आजकालच्या राष्ट्रधुरिणांप्रमाणेच त्याच्या नशिबाला अपयशाचें प्रायश्चित्त खास भोगावें लागलें असतें. पण शिवाजीची मानवस्वभाव निरीक्षण दृष्टि अत्यंत धोरणी व तीक्ष्ण होती. महाराष्ट्रांतील नानाविध ब्राह्मण ब्राह्मणेतर जातींची विशेष स्वभाव प्रवृत्ति काय आहे, त्यांच्यात राष्ट्रोद्धारास उपयोगी पडणारे गुणावगुण कोणते आहेत, त्यांच्या परस्पर स्पर्धेची ठिकाणे कोणती आणि त्यांच्या तद्विषयक भावनांचा कोठेहि खटका उडतां विविध व भिन्नभिन्न गुणकर्मांचा योग्य प्रमाणांत समन्वय कसा करता येईल, याविषयीं शिवाजीने ठरविलेले ठोकताळे अभ्यसनीय

एन ४००६--२९अ

आहेत. शिवाजीनें चिटणीशीचें काम बाळाजीला दिलें, तानाजीला किंवा हंबीररावाला दिलें नाहीं. किल्ल्यांची कारखाननिशी नेहमीं कायस्थ प्रभूंकडेच ठेवली, ती ब्राह्मणांकडे किंवा मराठ्यांकडे दिली नाही. सिंहगडासारख्या मारूं मरूंच्या मुकाबल्यावर तानाजीसारख्या मराठ्या सिंहाची योजना केली, बाळाजी आवजीची केली नाहीं. वकीलातीची गोडबोली कामगिरी नेहमीं ब्राह्मणांकडेच ठेवली. त्या ठिकाणी सीधा मार्गी कडवा मराठा कधिं नेमला नाहीं कायस्थांना सुद्धा नुसती खर्डेघाशीच सांगितली किंवा त्यांनी सर्रास खर्डेघाशीच केली, असेंहि नाही. त्यातल्या प्रमुख व निवडक निवडक व्यक्तींना त्यांच्या त्यांच्या भिन्न भिन्न कर्तबगारीप्रमाणे भिन्न भिन्न कामे सांगितली. विश्वासराव व नानाजीला डिटेक्टिव्हची कामगिरी दिली. महाडचा दादाजी रघुनाथ देशपांडे जात्याच उलट्या काळजाचा; त्याला बेलवाडी प्रकरणांत नेमून, त्याच्या हस्तें स्वजातीय येसप्रभूचा पाडाव करविला. कोणता माणूस कोणत्या कामगिरीला लायक, हें बिनचूक हुडकिण्याची कला शिवाजीला फारच उत्तम अवगत होती. शिद्धी जोहारने पन्हाळ्याला वेढा घालून शिवाजीला घेरलें, त्यावेळीं जे राजकारण लढविलें आणि मुसलमानांच्या अफाट सैन्याच्या हातावर तुरी देऊन शिवाजी सैन्यासह निसटला, त्यांत तानाजीच्या ऐवजीं बाजी प्रभू देशपांड्याच्याच बुद्धिमत्तेवर व शौर्यावर शिवाजीनें भिस्त ठेवण्यात केवढें अद्भुत धोरण स्वीकारलें, याचा शहानिशा अवघ्या सहा तासांच्या अवधींत, बाजी प्रभूंच्या स्वात्मार्पणानेंच पावनखिंडीत सिद्ध झाला. दिल्लीच्या अटकेंत हा मराठ्यांचा सिंह अवरंगजेबानें कोंडला, तेव्हां पेटाऱ्यांतून पळून जाण्याची युक्ति सफाईत पार पाडण्यासाठीं बाळाजी आवजी व प्रतापराव गुजर यांच्या बुद्धिप्रधान बातबेताचा शिवाजीनें असा योग्य परामर्ष घेतला, तसा हिरोजी फर्जंदाच्या निधड्या छातीच्या बिनतोड डांवपेचाचाहि फायदा घेतला. सारांश, स्वराज्य स्थापनेच्या कामीं व्यक्तिमात्राच्या विशेष गुणकर्माचा चाणाक्षपणे उपयोग करून घेतल्यामुळेंच शिवाजीचा लोकसंग्रह यशस्वी झाला. 'उत्कट भव्य तितुकें घ्यावें। मळमळीत अवघेचि त्यागावें' या समर्थोक्तीप्रमाणें शिवाजीनें महाराष्ट्रीय अनेक ब्राह्मण ब्राह्मणेतर जातींच्या राष्ट्रोद्धारक निसर्गजात उत्तम गुणांचा परामर्ष घेतला आणि आपली हिंदवी स्वराज्याची नवमतवादी कल्पना चुटकीसरशी यशस्वी करून दाखविली. हाताचीं बोटें केव्हांहि एकसारखीं नसतात, पण तीच हिंदवी स्वराज्य -ध्येयाच्या तळहाताला चिकटवून, शिवाजीसारख्या 'जबरदस्त खावंदा'च्या कर्तबगार मनगटाशीं एकजीव होतांच, महाराष्ट्रभूजननीच्या मुखांत स्वराज्यांचा गोड घास भरवला गेला.

शिवाजीची हिंदवी स्वराज्याची कल्पना हा एक नवमतवादच होता. राष्ट्रीय जीवनाच्या प्रचलित कल्पनांवर तो एक उघडाउघड हल्ला होता. अर्थात नवमताला जीर्ण मताचा तीव्र प्रतिकार होणे अपरिहार्यच होतें. किंबहुना असल्या प्रतिकाराशिवाय नवचैतन्याच्या प्रसादाला मानवता पात्रच ठरूं नये, असा निसर्गाचा कायदाच आहे. निश्चयांच्या घोड्यावर निश्चित ध्येयाची मांड ठोकून जेव्हां तरुण शिवाजीनें त्याला भरधांव दवडले, त्याच्या खणखणीत कर्तबगारीच्या टापांनी सारा सह्याद्रीच लत्ता दणाणून सोडला, आणि आपल्या नवमतवादाच्या फडफडणाऱ्या निशाणानें इस्लामी राज्यसत्तेच्या छातींत विलक्षण धडकी भरविली तेव्हां त्या सत्तेच्या गुलामगिरींतच ऐहिक मोक्षाचा विश्वास बाळगिणाऱ्या मराठे सरदारशाहीनें त्याला जोराचा प्रतिकार केला. सरदारशाही किंवा अलिकडे बोकाळलेली साहेबशाही केव्हांहि झाली तरी वाईटच. स्वत:च्या ऐश्वर्य-स्थैर्याच्या क्षुद्र कल्पनेच्या कुंपणापलीकडे या सरडोक्यांची धांवच कधिं जायची नाहीं. सरदारशाहीला स्वातंत्र्याची भावना केव्हाही पटायची नाहीं, ही शिवाजीची

बालंबाल खात्री असल्यामुळेंच त्यानें तिला पैजारा दाखवून, गोरगरीब परंतु इमानी मावळ्यांचा पाठिंबा मिळविला. पहिल्या सपाट्यालाच त्यानें संभाजी मोहिमेला प्रत्यक्ष मामाला कैद केल्यामुळें ''प्रत्यक्ष मामाची मर्यादा हा ठेवीत नाहीं. केवळ नीतीने राहील त्याचाच आप्त. वरकडांचा शत्रू. याशीं दुसरा विचार करील, त्याचें शासन करील. आज्ञेंत राहील त्याचा कैवारी. ही शिवप्रतापाची ख्याति सर्वत्र गाजलीच होती. चंद्रराव मोऱ्यासारख्या जाड्या प्रस्थांचा काटा उचकिण्यांत किंवा ''स्वामी (शहाजी) एहि विजापुरी बंद सोशिले त्या कालीं सर्जेराव व खंडोजी खोपडे व बांदल देशमुख यांणी तुसक लोकांसीं मिळून फिसात केली आणि अडचण स्वामीस फार केली'' अशा लोकांना कसल्याहि प्रकारची भाडभीड न धरितां चेचण्यांत शिवाजीनें जे जे उपाय योजिले, त्यांचा विचार 'विघातक व विधायक'चा काथ्याकूट करणाऱ्या शब्दवीरांनी अवश्य करावा. विघातक कार्याच्या नांगराने जनतेची मनोभूमि आरपार नांगरून भुसभुशीत केल्याशिवाय विधायक कार्यक्रामचें बीज तींत पेरतां येणेंच शक्य नाहीं, सनातन तत्व आहे विघातक नांगरणीमुळें मनोभूमिका कांही काळ छिन्नविच्छिन्न स्थितींत दिसते व त्यामुळे परिस्थितीतहि भयंकर घोटाळा माजतो खरा, पण नांगरणीच्या पाठोपाठच विधायक पेरणीची लगबग सहजसिद्धच होत असल्यामुळें घोटाळ्यांतूनच निश्चित संघटनेची उत्पत्ति होते. मराठा सरदारशाहींनें शिवाजीला अगदी अखेरपर्यंत दिलेल्या उपसर्गाचा इतिहास जसा विस्तृत आहे. तसा मनोरंजक आहे. तो जितका उद्वेगकारक आहे, तितका आजच्या घडीला विचारणीय आहे. त्यावरून आपण इतकाच बोध घेऊन पुढें जावें कीं नवमतवादाच्या कोणत्याहि महाराष्ट्रीय चळवळींत परकीयांपेक्षा स्वकीयांच्याच विरोधाला तोंड देतां देतां नवमतवाद्याला आपली सगळी हयात खर्ची घालण्याची परंपरा महाराष्ट्रांत फार जुनी आहे व ती अझून जिवंत आहे.

शिवाजीचा लोकसंग्रह 'यशस्वी झाला' असे वर म्हटलें आहे. तें विधान अक्षरश: खरें असलें तरी त्या यशाला अपयशाचेंहि ग्रहण लागल्याशिवाय राहिलें नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. शिवाजीनें जनतेच्या परस्परविरोधी भावनांचा मोठ्या चातुर्यानें समन्वय करून, स्वराज्याची निर्मिती केली ही गोष्ट खरी, पण राजकीय स्वास्थ्याची थोडीशी फुरसद मिळतांच, त्या भावनांनी शिवाजीच्या हयातींत-प्रत्यक्ष राज्यारोहणाला-बिनमुर्वतीचा विरोध केला. स्वातंत्र्याच्या पुनरुज्जीवनाबरोबरच, लोकसंग्रही तडफीनें पतितपरावर्तनासारखी सुधारणा शिवाजीनें लोकमताची रतिमात्र पर्वा न करता अंमलांत आणली हें खरें असलें, तरी हिंदु समाजाच्या अवनतीला प्रामुख्यानें कारण झालेला जातिभेद व तदनुषंगिक वेदोक्त पुराणोक्तीची जीर्णमताची खेंकटीं चेंचण्यांत शिवाजीने केलेलें दुर्लक्ष त्याला व त्याच्या वंशजांना तर भोवलेंच भोंवलें, पण आजहि त्या खेंकट्यांचा म्हसोबा जबरदस्त माजून वर्तमान ब्राह्मण ब्राह्मणेतरांची हाडें घुसळींत आहे. राजकीय बाबतींत शिवाजी कितीही नवमतवादी असला, तरी सामाजिक व धार्मिक गोष्टींत तो जीर्णमतवादीच राहिला. याचा परिणाम एवढाच झाला कीं जातिभेदांतील राष्ट्रविघातक भावनांचा निरास करण्यांत त्याच्या हातून झालेली कुचराई अखेर त्याला व त्याच्या हिंदवी स्वराज्याला भोंवली. महाराष्ट्रीय समाजपुरुषाच्या अंगावर स्वातंत्र्याचे भरजरी पांघरूण शिवाजीनें घातलें खरें, तथापि त्या पुरुषाच्या आंगांवर बाजलेली जातिद्वेषाची टेंगळें व गळवें फुटून अखेर वाहूं लागलीं व त्यानें पुढें कालवशात महाराष्ट्राच्या राजकीय इभ्रतीचा नायटा केला. राज्याभिषेक प्रसंगीं भिक्षुकशाहीवर मात करण्यासाठीं बाळाजी आवजी व शिवाजी यांनी कितीहि परिश्रम केले असले,

तररी दोघेहि चातुर्वर्ण्याच्या मामुली भ्रामक कल्पनांचे दास असल्यामुळें, राष्ट्रविघातक जातिभेदाचा मुर्दा पाडण्याचें धारिष्ट त्यांना झालें नाहीं. हा विषय फार मोठा आहे. त्याची चर्चा विस्तृत प्रमाणावर झाली पाहिजे. त्याला प्रबोधनाची टीचभरजागा काय पुरणार? तथापि व्यक्त केलेल्या विचारांनी शिवरायाच्या लोकसंग्रहाची छाननी निस्पृहतेनें करण्याची कोणा विद्वान संशोधकास प्रेरणा झाली, तर तेंच प्रस्तुत लेखाचें पारितोषिक होय, असें मानून येथें पूर्णविराम ठोकतों.

□□□

लेख

अद्‌भुतचि कार्य करणे

(राष्ट्रवीर पत्राच्या तृतीय वर्षाच्या खास प्रथम अंकात प्रसिद्ध झालेला श्री. ठाकरे यांचा लेख.)

उत्सवप्रियता हा मानवजातीच्या अनेक गुणधर्मांपैकी एक धर्म आहे. त्यांतल्या त्यांत हिंदुलोक अत्यंत उत्सवप्रिय. उत्साहवर्धक असतात. संसारचक्राच्या करकरीनें त्रस्त झालेली आणि यशापयशाच्या कचाकचींत बधिरलेली मनोवृत्ति, आपल्या ठरावीक दिनचर्येचा चोखाळलेला मार्ग दृष्टीआड करून, नवीन नवीन उत्सव साजरे करून घेत असते. नित्य काही तरी नवें असावें, या साठी मनुष्याच्या मनाची भूक अत्यंत तीव्र असते. आजूबाजूची परिस्थिति कशीहि असो. स्वतःचा संसार सांसारिक आधिव्याधींनी कितीहि पोखरलेला असो, किंवा ज्याच्या बळावर सर्व लहान मोठ्या कर्तबगारीची उमेद अवलंबून असते, त्या मनाला विवंचनेचे शेंकडों विंचू डसलेले असोत, मनुष्य उत्साहवर्धनासाठी उत्सव प्रियतेची शिकस्त केल्याशिवाय मुळीच रहात नाहीं. ही उत्सवप्रियता सुद्धां साळी भोळी नाहीं, अट्टल चोखंदळ आहे. तिला पाहिजे असलेलें नाविन्य पुळपुळीत किंवा मिळमिळित असतां कामा नये. त्यांत काहीतरी अघटित घटना पाहिजे. अकल्पनीय धडाडी पाहिजे. एरव्हीच्या व्यवहारानें मलीन बनलेली चित्तवृत्ति चटकन उद्दीपीत करणारें कांही तरी अद्‌भुत कार्य पाहिजे. अद्‌भुत कार्याशिवाय मनुष्याची मनोवृत्ति प्रसन्न होत नाही. बुद्धिप्रधान माणसें उत्क्रांतितत्वाचे कितीहि गोडवे गावोत, मनुष्याला क्रांतीचा अद्भुत चमत्कार जितका प्रिय आहे, तितका उत्क्रांतीचा मिळमिळीत धिम्मेपणा मुळीच नाही. युद्धामध्ये अनंत अमानुष अत्याचार घडतात व कोट्यवधि माणसाचे बळी पडतात, ही गोष्ट सकृद्दर्शनी वाईट दिसते. धरणीकंपाचा एकच जबरदस्त धक्का बसतो आणि लंडन मुंबईप्रमाणें नखशिखांत नटलेली पाँपी राजधानी निमिषार्धात धरणीत गपकन् ठाय पहाते. निरभ्र आकाशांत बोलबोलता ढगारें जमतात आणि गडगडाटाचा कल्होळ उडाला असतांच विद्युल्लतेचा कडकडाट होतो आणि ध्यानीमनी नसतांना एखादा भव्य राजवाडा वीज पडून भस्मसात होतो. या गोष्टी ऐकून किंवा पाहून मन क्षणभर घाबरेल, नाहीं असें नाहीं; परंतु मानवी मनाच्या प्रवृत्तीची ठेवणच अशी आहे कीं, एखाद्या राजाचा राज्याभिषेक एखाद्या लोकप्रिय वांझोट्या सरदाराला किंवा श्रीमंताला झालेली पुत्रप्राप्ति किंवा दांत विचकल्यामुळें मिळालेल्या मुठभर राजकीय हक्कांची भीक असल्या गोष्टींपेक्षा राज्यक्रांतीचे महायुद्ध, धरणीकंपाचा धडधडाट किंवा अग्नीचा महाप्रलय यांवर ती अधिक प्रेमानें खिळून बसते. याचें कारण मानवी मन

क्रांतिप्रिय आहे. ते उत्क्रांतिक्षम असेल, पण उत्क्रांतिप्रिय मात्र नाही. कारण उत्क्रांतिचा धिम्मेगतिक मिळमिळीतपणा त्याला मानवतच नाही. मनाची क्रांतिप्रियता त्याच्या निसर्गसिद्ध बंडखोरपणात आहे. मनासारखा आडदांड बंडखोर कोणीहि नाही. अर्थात् कोठें काहीं छोटे मोठे बंड झालें कीं, मन लगेच तिकडे उत्साहानें व कौतुकाने टौकारून पाहू लागतें. जगात आजपर्यंत होऊन गेलेल्या सत्वगुणप्रधान साधु तत्त्ववेत्त्यांची आठवण मनाला क्वचितच होते; परंतु बंडखोरांची जंत्री मात्र त्याला जवळ जवळ तोंडपाठच असते, असे म्हणावयास हरकत नाही.

हिंदुची पंचागे म्हणजे सणांची आणि उत्सवांची कोठारे म्हटली तरी चालतील. त्यांतले सगळेच सण क्रांतिकारक असतात असें नाहीं. बहुतेक सगळे खादोडीचेच सण आहेत. नृसिंहजयंती, भीष्माष्टमी, कृष्णजयंती किंवा रामजयंती असे काही थोडे महत्त्वाचे उत्सव आहेत; परंतु ते जवळ जवळ आता कालव्यतित झाल्यामुळें विचारक्रांतीची जिवंत संवेदना निर्माण करण्याची धमक त्यांत उरलेली नाहीं. शिवाय, उत्तरोत्तर चमत्कारीक नाविन्याच्या नव्या नवाईवर बिनशर्त फिदा असणाऱ्या नव्या मनानें तरी या उत्सवांचा काथ्याकूट करून क्रांतिसंदेशाची हुडकाहुडक का करावी? श्रुतीस्मृतींचा जहागीरदारपणा मिरविणाऱ्या हिंदूंच्या पुराणांत व भारतादि इतिहास ग्रंथांत रामकृष्णादिकांसारखे पुरुषोत्तम कितीहि स्मृति-प्रुफ होऊन बसले असले, तरी चालू मन्वंतरांत त्यांच्या चारित्र्यस्मृतीवर सद्भावनेची दोन फुलें वाहून त्यांना भक्तीचा नमस्कार ठोंकण्यापलीकडे नव्या मनूचे मनाला अधिक काही करण्याची प्रेरणा होणें शक्य नाहीं. आजचें मन गतानुगतिक नाही. आजचे मन अंधश्रद्धाळू नाहीं. आजच्या मनाला माणसांचे देव बनलेल्या वीर वीरांगनांची नुसती पूजा बांधून स्वस्थ बसावयाचें नाही. आजचें मन भूतकाळांतील इतिहासाच्या पारायणापेक्षां त्या इतिहासाच्या पुनरावृत्तीसाठीं फुरफुरलेलें आहे. आजचें मन 'थिअरी'त रममाण होणारे नव्हे. त्याला 'प्रॅक्टिस'ची महत्त्वाकांक्षा आहे. आजचें मन कल्पना तरंगांवर वावडींप्रमाणें झुलणारें नसून, व्यवहाराच्या क्षेत्रांत सक्रीय धडाडीनें परिस्थितीशीं सामान्याचे दोन हात करून, आपल्या निश्चित कर्तबगारीचा सोक्षमोक्ष लावून घेण्यास उतावीळ झालें आहे. आजचे मन अद्भुत कार्य करणारें आहे. तें अद्भुत रसाचें भोक्ते आहे. अर्थात श्री शिवरायाचा जयंत्सुत्सव साजरा करण्यासाठीं अखिल हिंदुमात्राचें मन आज एकचित्त कां होऊ नये?

राष्ट्रवीरांच्या जयंत्या ऊर्फ जन्मदिवस साजरे करण्यांत आपण त्यांच्याविषयी आपला आदर व्यक्त करीत असतो. वास्तवीक पाहिलें तर जन्मदिवसाचें महत्त्व विशेष नसतें. राष्ट्राला ललामभूत झालेल्या वीरांच्या अद्भुत पराक्रमामुळेच त्यांच्या जन्मदिवसाला मृत्यूनंतर महत्त्व येते. कर्तबगारीच्या झिलईनें राष्ट्रपुरुषांचा मृत्यू त्यांच्या जन्मदिवसांना तेजस्वी बनवितो आणि म्हणूनच त्या तेजाच्या स्पर्शानें म्हणा किंवा स्मरणानें म्हणा माणसें आपल्या जीवनाला पावन करून घेण्याचा यत्न करतात. तात्पर्य जन्मदिवसाचें वास्तवीक तसे महत्त्व बाळगिण्यासारखे कांही नाहीं. शिवाजी ज्या दिवशी ज्या घटकेला जन्मला, त्याच दिवशीं त्याच घटकेला लक्षावधि इतर जीव खात्रीनें जन्माला आले असतील. मग त्या सर्वांच्या जयंत्या न होतां शिवाजीचीच जयंती आपण कां साजरी करतो? १८व्या व १९व्या शतकांच्या अस्तोदयाच्या मध्यकालीं यूरपांतल्या मगरूर शिराळशेटी राजकर्त्याचे मुकुट क्रांतीच्या भट्टीत घालून वितळविणारा नरपुंगव नेपोलियन जगाच्या स्मरणांतून कधीतरी नाहीसा होईल काय? त्याचें नुसतें स्मरण होतांच त्याच्या वैऱ्यांच्या वंशजांच्या काळजाचा अझूनही थरकांप उडतो. फ्रेंच राष्ट्र त्याचा

मृत्युदिन साजरा करून, त्या उत्सवाने आपल्या राष्ट्रीय जीवनांत उत्साह ओतण्याचा यत्न दरसाल करते. पण ते नेपोलियनची जयंती साजरी करीत नाही. केलीं तर त्यांचा कोणी हात धरणार नाही. हें खरें आहे; आणि नेपोलियनच्या उत्तरायुष्यांतील कल्पनातीत पराक्रमानें त्याच्या जन्माचे, जननांचे व जन्मदिवसाचे पांग फिटले, हेंहि खरें आहे. पण त्याच्या जन्मकाळाच्या परिस्थितीत मानवी मनाला आकर्षण करणारें अद्‌भुत कार्य कोणतें होतें? कांहीहि नव्हतें. म्हणूनच शिवजयंतीइतके नेपोलियन-जयंतीला महत्त्व देण्यास कोणीहि पुढें सरसावत नाही.

कृतघ्न महाराष्ट्र अगदी अलिकडे शिवरायांस आठवूं लागला आहे. जागृत महाराष्ट्र शिवाजीच्या चारित्र्यांतील अद्‌भुतरम्य रसाचा शोध करू लागला आहे. जयंतीप्रमाणेच शिवराज्यारोहणतिथीहि आजचा महाराष्ट्र साजरी करतो. राष्ट्रवीरांचे पद्धतशीर पुण्यस्मरण राष्ट्रीय जीवनास उत्कर्षप्रद होत असतें, हा इतिहासाचा सिध्दांत आहे. मात्र त्या पुण्यस्मरणांत लौकिकी व्यवहाराचा मनाचा कोतेपणा किंवा भेदभावनेचा संकुचितपणा लवमात्र नसावा.

शिवचरित्राचा विशेष काय? अनेक राष्ट्रांत अनेक राष्ट्रवीर झाले. स्वराज्यसंस्थापक झाले. स्वधर्मसंस्थापक झाले. शतकानुशतके गुलामगिरीत पिचत पडलेल्या देशांना स्वयंनिर्णयी करणारे स्वातंत्र्याचे प्रणेते झाले. त्याप्रमाणें महाराष्ट्रांत शिवाजी महाराज निर्माण झाले. मग त्यांत विशेष काय झाले? अमेरिकेत जसा जॉर्ज वॉशिंग्टन, फ्रान्सांत नेपोलियन किंवा इंग्लंडांत ऑलिव्हर कॉम्बेल, तसा महाराष्ट्रात शिवाजी, यांत विशेष काय? हा प्रश्न सरळ आहे आणि त्याला सरळ उत्तर हेंच कीं, 'अद्‌भुताचि कार्य करणें' हें जें 'देणे ईश्वराचे' ते शिवाजीच्या गर्भावस्थेच्या इतिहासापासून तों थेट देहावसनाच्या अखेर क्षणापर्यंत सर्वत्र एकसूत्रतेनें विशेष स्पष्ट व्यक्त झालेलें होतें. शिवचरित्रातला कोणताहि भाग घ्या, त्यांत कांही ना कांही अद्‌भुत चमत्कार आहेच आहे. मातेच्या उदरी वास होताच, महाराष्ट्रांतल्या मराठे सरदारशाहीच्या इभ्रतीचा उन्हाळा माजला आणि तिला शहाजी भोसला, स्वजातीय असूनहि, जळी स्थळी काष्टीं पाषाणी वैऱ्याप्रमाणे दिसू लागला. मुसलमान शहांची लाळ घोटून घोटून स्वतःच्या सरदारकीचें मळमळीत सौभाग्य कसेबसे सावरून धरण्यातच जीवित साफल्याची कमाल मानणारे मराठे सरदार, शहाजीच्या मुत्सद्देगिरीपुढें फिक्के पडले गेले. जिजाबाईंच्या वाढत्या गर्भाच्या पूर्णावस्थेच्या ऐन मुहूर्तावरच, मुसलमान शहांच्या दाढीचे पिढीजात अभिमानी मराठे सरदार, शहाजीची ससेहोलपट करण्यांत दंग झाले होते. शहाजी भोसल्याला सहकुटुंब रसातळाला नेऊन गाडण्यांतच, स्वत:च्या लौकिकी ऐश्वर्याचे झेंडे आकाशाला भिडेइतके उंच वाढतील, असल्या नादान कल्पनातरंगावर तरंगणाऱ्या जाधवराव, शिंदखेडकर, निंबाळकर, मोहिते, माने, शिर्के प्रभृति सरदारांना, जिजामातेच्या उदरांत धमधमणाऱ्या महाराष्ट्राच्या जिवंत चैतन्याची कल्पना कशाने होणार? ज्या मुसलमानशाहीच्या स्थैर्याकरितां आपल्या स्वातंत्र्याचे दिवाळे फुंकण्यासहि ज्या सरदारांना तिळमात्र दिक्कत वाटली नाही, त्याच मुसलमानी सत्तेचें नरडें चेंचणारा राष्ट्रवीर शहाजीराजांचा कुसवा धन्य करणार आहे, याची त्या शुद्ध प्रापंचिकांना कल्पना कशी व्हावी? आज शिवजयंतीचा उत्सव साजरा करण्यासाठी आपण सर्व मोठमोठे प्रोग्राम ठरवितों व पार पाडतों. तारुण्याच्या भर अमदानीत औरंगजेबासारख्या प्रचंड सत्ताधाऱ्याची धांव धुळपट काढणाऱ्या शिवाजीचा जन्मसुद्धां धावपळीच्या धामधुमीतच व्हावा, हे अद्भुतरम्य नवल नव्हे काय? आठ वर्षांचा अल्लड बच्चा तो काय आणि बापाने धरून शिकवून

सवरून नेल्यावरसुद्धां विजापूरच्या दरबारांत शहापुढें कुर्निसात न करतां धि:कारानें ताठ उभा राहातो काय! अद्भुत प्रकार!! पुण्यास परत पाठविल्यावर तरी या मुलानें, इभ्रतदार सरदाराच्या मुलानें, आपल्या बापाच्या तोलामोलास साजे-शोभेशा प्रतिष्ठित बड्यांच्या बड्या मुलांची संगत धरून राह्यचें, त्यानें रानवट व गावंढळ कंक कंक मालुसऱ्यादिकांची सलगी धरली. अद्भुत प्रकार! स्वराज्यस्थापनेची कल्पना ठाम ठरतांच तलवारबहाद्दर अशा सुप्रसिद्ध पुढाऱ्यांची मनें तरी वळविण्याचा या तरुणानें प्रयत्न करावा? तोहि नाही; त्याचा सारा व्यवहार व बातबेत गांवढळ लंगोट्यात. सगळेंच अद्भुत! एखादा किल्ला हस्तगत करावयाचा म्हणजे त्या काळीं ढोंपर ढोंपर रक्ताचा चिखल खर्ची पाडावा लागे; पण शिवाजीनें एक थेंब सुद्धां न गाळतां, तोरण्यावर स्वराज्याचे तोरण अचानक लटकावून दिलें, अद्भुत कार्य! हल्लींचे स्वराज्य मुमुक्षू मोठमोठ्या शहरांत लेक्चरबाजी करतात. शिवाजीने जंगलांच्या आंतड्यांत राहणाऱ्या मावळ्यांत लष्करबाजी फैलावून स्वराज्याचे बियाणे सह्याद्रीच्या पोटांतून बाहेर काढले. विलक्षण अद्भुत चमत्कार! असे किती प्रकार सांगावे. समग्र जीवनचरित्राचे जेथें अद्भुत रंगांत अपरंपार रंगलेले, तेथें 'हा अद्‌भुत चमत्कार पहा आणि तें अद्‌भुत कार्य पहा' असें किती वेळा सांगावें। अफझुलखानाचा वध आणि शाहिस्तेखानाला दिलेला बिनतोड शह ही दोन प्रकरणे म्हणजे शिवाजीच्या अद्‌भुत कर्तबगारीची शिकस्त म्हटली पाहिजे. दुरून डोंगर साजरे या न्यायाने, या दोन्ही प्रकरणांवर कालवशात चढलेल्या कौतुकाच्या भडक रंगाच्या भपकाऱ्यामुळें त्यांतल्या अद्‌भुतपणाची कल्पना यावी तितकी चटकन येत नाहीं; तथापि विचारी दृष्टीने निरीक्षणाची कसोशी केली तर यापेक्षाहि इतर अगणित प्रसंगांत शिवाजी महाराजांचा अद्‌भुतपणा प्रत्ययाला येईल. विशेषतः महाराजांचे राज्यारोहण म्हणजे अनेक अद्भुत रसाचे एक विलक्षण केंद्रच होय. त्यावेळी राजकीय सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत जे जे प्रसंग आले, ते ते केवळ कल्पनातीत. लेच्यापेच्यानें त्या वेळी हातच टेकले असते. पण अद्भुतता हीच ज्याच्या जीवनाची जीवनदेवता, त्या छत्रपतीनीं त्या त्या प्रसंगाचा केवळ अद्‌भुत लीलेनें फडशा पाडला. शिवजयंतीच्या उत्सवापेक्षां शिवराज्याभिषेकोत्सवाला, खरे म्हटले तर, विशेष प्राधान्य दिले पाहिजे, परंतु हा उत्सव महाराष्ट्रांत जेमतेम कसा तरीच पार पाडतात. याचें हेच कारण दिसतें कीं जयंतीच्या उत्सवांत चढाओढा करणाऱ्यांना राज्याभिषेकोत्सवांतलें 'अद्‌भुत कार्य' अझून उमगलेले नाहीं.

शिवाजीच्या चरित्रावर अलीकडे बऱ्याच इतिहासकारांची व संशोधकांची अगदी खुषमर्जी झालेली दिसते. मराठी इतिहासकारांप्रमाणेंच हिंदी, बंगाली, गुजराथी व इंग्रजी इतिहासकारांनीहि शिवचरित्रगायनानें आपली लेखणी पावन करण्याची सुरुवात केली आहे. परंतु या सर्व लेखकांची विवेचनशैली एकाच चकारीची असल्यामुळें चिकित्सक दृष्टीची बरीच उपासमार होते. शिवाजीसारख्या राष्ट्रवीराच्या जीवनात युद्धें, वेढे, तहनामे इत्यादि अनेक राजकीय भानगडी जरी खच्चून भरलेल्या असल्या, तरी निव्वळ तेवढ्यांच्या विस्तृत वर्णनावरून त्याच्या चारित्र्याची व्हावी तितकी चिकित्सा होत नाही. विशेषतः अथेति अद्‌भुतरम्य घटनेनें रंगलेले शिवाजीचें चरित्र अनेकांगी असल्यामुळे सरधोपट एकमार्गी एकाक्ष लेखकांची एककल्ली विधानें त्या आंगांची चर्चा करतांना पुष्कळ वेळां पराचा कावळा करतात. चिकित्सापूर्ण इतिहास लिहिण्याची कला अझुन हिंदुस्थानांत सुरू झालेली नाही. त्यांतल्या त्यांत शिवाजीसारख्या राष्ट्रवीराला जनतेच्या भाविक भावनेनें देवांच्या कोटींत नेऊन

बसविलें की, मग चिकित्सेला आंतल्या गाभाऱ्यात ढुंकून पाहाण्याची सुद्धा सक्त मनाई! राष्ट्रवीराला देव बनवितांच चिकित्सेला अस्पृश्यता प्राप्त झाली तरी परवडली; पण त्या देवाचेंहि दर्शन जातिभेदाच्या क्षुद्र झरोक्यांतूनच घेण्याचा हिंदु अट्टाहास सुरू झाला कीं, मग मात्र बडव्यांचा विठोबा आणि विठोबाचे बडवे असा सावळागोंधळ माजतो.

उत्सव- मग तो जयंतीचा असो, राज्याभिषेकाचा असो, किंवा देहावसानाच्या पुण्यतिथीचा असो- त्याचा राष्ट्राच्या उत्साहवर्धनार्थ उपयोग करून घेण्याचें कार्य बहुत विकट आहे. ज्या राष्ट्रवीराचा आपण उत्सव करतो त्याच्या चारित्र्याची गुरुकिल्ली प्रथम हस्तगत झाल्याशिवाय काम मागणार नाहीं. एखादी लोकोत्तर व्यक्ती 'राष्ट्रवीर' पदवीस चढली की तेथें जातिभेद नाहींसा झालाच पाहिजे. जातिभेदाची दृष्टी ठेवून राष्ट्रवीराचा उत्सव साजरा करतों म्हणणें, हें शुद्ध ढोंग होय. खुद्द शिवाजी किंवा त्याच्या प्रभावळींतील तानाजी, दादजी, बाजी या व्यक्ती 'हिंदु' नजरेनें कोणत्याहि 'जातींच्या' असल्या तरी त्यांचे उत्सव करतांना 'जातीची नजर' ठेवली कीं, फलप्राप्तीची माती हातीं आल्याविना राहणार नाही, अखिल महाराष्ट्राच्या नावलौकिकासाठीं, किंबहुना हिंदूंच्या हिंदुस्थानासाठी ज्यांनी शुद्ध आत्मप्रेरणेनें आत्मार्पण केले, त्यांच्या उज्ज्वल स्मृतीवर जातिभेदांचें लटकें व फोल आवरण घालणें, ह्मणजे त्या थोर महात्म्यांचा धडधडीत उपमर्द होय. शिवाजीनें दख्खनला महाराष्ट्र केले. अर्थात् महाराष्ट्राचा आत्मा शिवाजी आणि शिवाजीचा देह महाराष्ट्र. शिवाजी गुरु आणि महाराष्ट्र शिष्य. शिवाजी सूर्य आणि अखिल महाराष्ट्र त्याची प्रभा. शिवाजी आणि शिवाजीचा महाराष्ट्र हा एक विशेष संप्रदाय आहे. या संप्रदायाची ठळक लक्षणे समर्थ रामदासांनी येणेंप्रमाणे वर्णन केली आहेत :

म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुत दिवसांचे माजलें बंड ।
या कारणें अखंड । सावधान असावें ।।
न्याय नीती विवेक विचार । नाना प्रसंग प्रकार ।
परीक्षणें परांतर । देणें ईश्वराचें ।।
महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें ।।
अद्भुतचि कार्य करणें । देणं ईश्वराचें ।।

महाराष्ट्र जर शिवरायाचा सच्चा शागीर्द ह्मणवितो, तर त्यानें कसल्याहि परिस्थितींत निराश होतां कामां नये. शिवसांप्रदायांत निराशेला थारा नव्हता, आतां नाही व पुढेहि नसेल. शिवाजीचा महाराष्ट्र सावधपणे महायत्न करणारा आहे. समयीं धारिष्ट धरून, वाटेल त्या लहान मोठ्या अरिष्टाची मुंडी मोडून, निधड्या छातीनें अद्भुतचि कार्य करणारा आहे. आसेतुहिमाचल भरतखंडांत महाराष्ट्राच्या वीर्याची परंपरा अगदी स्वतंत्र आहे. तिची प्राणप्रतिष्ठा राष्ट्रवीर शिवाजीच्या हातूनच झाल्यामुळे, 'विवेके विचारें राजकारणें' अंतर कसें शृंगाराचें, आणि अभेद भावानें लोकसंग्रह करून करून नव्या मन्वंतरांच्या प्रत्येक नव्या दर्शनांत शिवरायांच्या 'अद्भुत' संप्रदायाची नवीन कालानुसार पुनर्घटना कशी करावी, हे महाराष्ट्राने विसरता कामा नये. जातिभेदाचे व स्वजातिवर्चस्वाचे शेंकडों विंचू शिवरायांच्या पायाला डसले; परंतु त्यांच्या हृदयात रात्रंदिवस विश्वव्यापी हिंदवी स्वराज्याची भावना जिवंत सणाणत असल्यामुळें त्या क्षुद्र कीटकाच्या वेदना त्यानें पायातल्या पैजारांच्या वर केव्हांच चढू दिल्या नाहीत. कारण :

समया सारिखा समय ये ना । नेम सहसा चाले नां।।

नेम धरितां राजकारणा । अंतर पड़ें ।।
अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें।
हटनिग्रही न पडावें। विवेकी पुरुषें।।
बहुतचि करितां हट । तेथें येऊन पडले तट ।
कोणी एकाचा शेवट । झाला पाहिजे।।
बरें ईश्वर आहे साभिमानी। विशेष तुळजा भवानी।
परंतु विचार पाहोनि। कार्य करणें।।

सध्याच्या निर्नायकी बजबजपुरींत शिवाभिमानी महाराष्ट्रीयांनी या समर्थवचनांचा नीट विचार करावा. शिवरायांनी 'अद्‌भुतचि कार्य करणें' हा पवित्र मंत्र महाराष्ट्राला देऊन ठेवला आहे. महाराष्ट्र अद्‌भुत कार्यांनीच महा-राष्ट्र बनलेला आहे, अद्‌भुत कार्यश्रेणींनीच महाराष्ट्र स्वराज्यजननी या लौकिकाचा वारसदार ह्मणून सुप्रसिद्ध आहे. अखिल हिंदुस्थानाला स्वयंनिर्णयी करण्याचें पुण्य शिवानुयायी महाराष्ट्रीयांच्याच हातीं आहे. आजच्या उत्सव-प्रसंगी ही जाणीव, हा विचार, 'अद्‌भुतचि कार्य करणे' ही जागृति महाराष्ट्रीयांत उत्पन्न होवो! विचारांची शक्ति अद्‌भुत असते कारण :

जेथें बहु विचार, तेथें ईश्वरावतार ।
मागें झाले थोर थोर । धक्के चपेटे सोसोनी ।।

□□□

टिपण

बेळगांवकर बांधवांची सेवा

यंदा श्रीशिवजयंत्युत्सवानिमित्त बेळगांवकर बांधवांची सेवा करण्याचे भाग्य आह्माला लाभले. गुदस्त सालाप्रमाणे यंदाहि कल्याण, पुणे, मुंबई, सासवड, कोल्हापूर, सांगली वगैरे दहा बारा ठिकाणच्या प्रेमळ बांधवांच्या निमंत्रणांना प्रणिपातपूर्वक नकार द्यावा लागला, याचे फार वाईट वाटते. एकाच वेळी एका माणसाला सर्व ठिकाणी हजर रहाणे शक्य नसल्यामुळे वाईट वाटणे सहाजीक आहे. तथापि ठिकठिकाणच्या या सर्व बांधवांच्या प्रेमाच्या आग्रहांतच आम्ही आनंद मानतो. सवडीप्रमाणे सर्वांची सेवा यथाप्रसंग आमच्या हातून घडो! ही सर्व मंडळी समंजस आहेत व प्रबोधनावर त्यांचे निर्व्याज प्रेम आहे. तेव्हा साष्टांग प्रणिपात पूर्वक आम्ही त्यांच्या क्षमेची याचना केल्यास. ते आपल्या प्रेमांत लवमात्र अंतर करणार नाहीत अशी आशा आहे.

बेळगांवकर मराठे बांधवांनी ता. १८, १९ व २० एप्रिल असे तीन दिवस शिवजयंत्युत्सव मोठ्या थाटाने साजरा केला. उत्सवाला ब्राह्मण ब्राह्मणेतर जैन लिंगायत व मुसलमान वगैरे सर्व जातींचे व सर्व मतांचे लोक हजर होते. जयंति-कीर्तन, पोवाडे, वक्तृत्वाची चढाओढ, मेळे वगैरे आकर्षक कार्यक्रमामुळे उत्सव वैभवपूर्ण असाच झाला. १९ तारखेला अश्वारूढ शिवरायांच्या मूर्तीची टोलेजंग मिरवणूक सर्व शहरांत मिरवली. (१) शिवाजी महाराजांचा लोकसंग्रह, (२) स्वराज्य कां गेले? आणि (३) शिवाजी व मुसलमान अशा तीन विषयांवर आम्ही तीन दिवस व्याख्याने दिली. ती यथावकाश राष्ट्रवीर पत्रांत प्रसिद्ध होणार आहेत. तीन दिवस केलेली वेडीवाकडी वाक्सेवा बेळगांवकर बांधवांनी गोड मानून घेतली व प्रेमाचा निरोप दिला, याबद्दल त्यांचे आम्ही प्रणिपातपूर्वक आभार मानतो.

आमच्या तीन दिवसांच्या मुक्कामांत शहापूर, खानापूर वगैरे ठिकाणची बरीच अपरिचित मंडळी प्रेमाने येऊन भेटली व परिचित झाली. विचारविनिमयासारखे सौख्य नाही. 'चिकित्सक' पत्राचे मालक श्री. दत्ताजीराव आबाजीराव सावंत, चवाटगल्लीतील मराठा समाज, गजेंद्रगडकर ब्रदर्स, वगैरे बांधवांनी दाखविलेल्या प्रेमादराची विस्मृति होणे शक्य नाही. 'आभारी आहो' या शब्दांनी सर्व बेळगांवकर बांधवांच्या निर्मल प्रेमाचे उतराई होण्याचा आम्ही कितीहि प्रयत्न केला, तरी तो व्यर्थ आहे. विशेषतः उत्सवाचे कार्यकर्ते श्री. शामराव भोसले, दळवी वकील, बिर्जे मॅजिस्ट्रेट, कांगले साहेब (चिकोडीचे

मामलतदार), श्री. गजेंद्रगडकर इत्यादि बांधवांनी आपलेपणाने आमची जी बडदास्त ठेवली ती केवळ शब्दातीत आहे. सर्वांना आमचा साष्टांग प्रणिपात असो.

सर्वांचा नम्र सेवक

केशव सीताराम ठाकरे.

□□□

अग्रलेख

हिन्दुधर्म नामर्द कां?

स्वार्थाची गुलाम बनलेली मानवी दुनिया प्रगमनशीलतेचा मार्ग आक्रमण्यास कितीहि नाखूष असली, किंवा जुन्यालाच चिकटून रहाण्याचा हट्ट धरून बसलो, तरी काळाच्या फोंफावल्या झपाट्यापुढें तिला नांगी टाकणेंच प्राप्त असते. वीर परिस्थिती निर्माण करतात की परिस्थितीमुळे वीर निर्माण होतात, हा वाद बीजवृक्ष वादा इतकाच अन्योन्यजन्य अतएव गुंतागुंतीचा आहे. परंतु व्यवहार पाहिला तर शेकडा ९९ माणसे-निदान या हिंदुस्थानांतली हिंदु माणसें- कपाळाला हात लावून काळाच्या प्रवाहा बरोबर वहात जाण्यास नाखूष नसतात. हिंदू लोकांइतके निराशावादी लोक जगाच्या पाठीवर कोठेहि नसल्यामुळे आज कित्येक शतके जगांतल्या वरचढ लोकांच्या सत्तेचे चाबूक त्यांच्या पाठीवर फडाडत आहेत. 'तुका म्हणे उगे रहावें । जे जे होईल ते ते पहावें' हा तर त्यांचा जीवनमंत्र. इतर कलांची गोष्ट सोडली तरी डोळे उघडे ठेवून प्राण सोडण्यांत हिंदूंचा आजपर्यंत कोणीहि हात धरला नाही. परिस्थिति कितीहि बदलो, कालचक्राचा सोसाट्याचा वारा कसाहि उलट सुलट वाहा किंवा प्रत्यक्ष मानवी जीवनचर्येंत कसलाहि मवाळपणा जहालपणा येवो, हिंदुलोक मात्र कधीहि बदलावयाचे नाहीत. जणूं काय हिंदुस्थानांतला हिंदु समाज म्हणजे साऱ्या जगाच्या स्थितप्रज्ञत्वाच्या मुरंब्याची राजरोस बरणी! कोणी कोंठूनहि येवो, यांचें घरदार लुटो, बायकापोरांची कत्तल करो, यांना गुलाम हमाल बनवो, काय वाटेल तें करो, हे थेट हिमालयाप्रमाणे थंडगार ! हूं नाहीं चूं नाहीं. ईश्वराने यांना दोनच गाल दिले, नाहींतर कोणी जबरदस्तीने यांच्या एका मुस्कटात लगावतांच यांनी एक सोडून शंभर गाल पुढें केले असते आणि थपडा मारतां मारतां बेजार झालेल्या महामुखावर आत्मविजयाची मात केली असती. परंतु सध्या दोनच गालांवर पडतील तितक्या थपडा शांतपणे साहून, अनेक गाल न दिल्याच्या ईश्वराच्या चुकीचे परिमार्जन हिंदुजन करीत आहेत आणि या पुण्य कार्यात त्यांचे धार्मिक, सामाजिक व राजकीय हिंदु पुढारी कंठरवाने उत्तेजन देत आहेत.

हिंदुलोक 'आम्ही धर्मप्रिय' म्हणून स्वतःची बढाई वारंवार सांगतात. साऱ्या संस्कृत जगाच्या वहातुकीच्या बैलपणाचा बोजा जरी आमच्या डोक्यावर येऊन बसला, तरी आमचे धर्मप्रेम रतिमात्र कमी होणार नाही. ही वल्गना काही आजकालची नव्हे, वरवर पाहणाराला ही धर्मप्रेमाची सबब

शंभर नंबरी दिसेल, पण ती किती हिणकस आहे, बनावट आहे, जर्मन सिल्वरी आहे, हे उमगण्यास कठीण जाणार नाही. ज्या हिंदुधर्मियांनी हिंदुस्थानतल्या हिंदुस्थानांत आपल्याच आंतड्याचे आठ कोट मुसलमान उत्पन्न केले आणि जवळ जवळ तितकेच क्रिस्ती होऊं दिले. त्यांच्या धर्मप्रेमाची थोरवी काय वर्णन करावी! हिंदुच्या सामाजीक संघटनेचे इतके प्राणान्तिक दिवाळें उडालेलें असतांहि धर्माचे आणि संस्कृतीचे चोचले गाणारे जगद्गुरू धर्ममार्तंड, पुढारी आणि वर्तमानपत्रकर्ते लोक अट्टल लफंगे तरी असले पाहिजेत, अथवा हिंदुधर्म तरी नादान असला पाहिजे. निदान त्याला कोणी नादान बनविला तरी असला पाहिजे खास. माणसांच्या नुसत्या पारलौकिक ऐश्वर्याच्या किंवा सुखसमृद्धीच्या केवळ शाब्दिक भांडवलावर ऐहिक व्यवहाराचें गाडें रेटत नाहीं. आत्मानात्मविचारांचा काथ्याकूट करण्यापेक्षां सरळमार्गी व्यवहारी सरळ पृच्छा करतो कीं, 'मी मेलो कीं दुनिया बुडाली' दिसत आहे, तर जिवंतपणी कुत्र्या मांजरांचे जिणे जगून, पारलौकिक सुखासाठीं यातायात मी काय म्हणून करूं? मी मेल्यावर प्रत्यक्ष इंद्राच्या इंद्राणीशी जरी माझें 'शुभलग्न सावधान' व्हावयाचे असले, तरी सध्यां जिवंतपणी मी गुलामगिरीच्या आधिव्याधी काय म्हणून सहन करूं? आणि ज्या धर्माच्या नियंत्रणानें माझें नैतिक, सामाजीक व राजकीय जीवन सिंहाप्रमाणे तेजस्वी न रहातां, मेंढरी गचाळपणाचें बनलें आहे, त्या धर्माची मी कशाला पर्वा बाळगूं? असल्या प्रश्नांची उत्तरें धर्ममार्तंडांनी दिली पाहिजेत. हिंदुधर्माचें वास्तवीक स्वरूप व त्याची व्यवहारकुशल कार्यक्षमता पूर्वी कितीहि तेजस्वी असली, तरी जुन्या पुराण्या लौकिकाच्या इतिहासोच्चाराने त्याच्या प्रचलीत कमकुवत बेकर्तबगारीचें समर्थन करणारे जगद्गुरु (?) व धर्ममार्तंड हे, आमच्या मतें, गाळीव पढतमूर्ख होत. धर्माचें संरक्षण करा' 'धर्मासाठी जीव देण्यास तयार व्हा' असली अनेक वाक्यं आपण नेहमी सहज बोलतों; इतकेच नव्हे तर धर्माला ग्लानी आली, धर्म लुळा पांगळा झाला, की देव स्वतः अवतार घेऊन त्या ग्लानीचे निरसन करतो, अशी आमची बळकट समजूत होऊन बसलेली आहे. ही समजूत जितकी भ्रामक आहे, तितकीच हिंदु मनाच्या कोतेपणाची निदर्शक आहे. धर्म मनुष्यांचे संरक्षण करणार कीं माणसांना धर्माचे संरक्षण करावे लागणार? धर्मरक्षणाचा मामला माणसांवरच असेल, तर धर्माची लायकी घरांतल्या पाळीव कुत्र्यामांजरांपेक्षां विशेष ती काय? धर्माला ग्लानी येते हा कबुली जबाब हेच सुचवितों की धर्माची प्रकृति माणसांच्या प्रकृती प्रमाणेच क्षणभंगुर, अनिश्चित व व्याधिक्षम आहे. जगद्गुरु म्हणविणारे डॉ. कूर्तकोटी हिंदुधर्म परिषदा भरवून हिंदुधर्माला आलेली ग्लानी मैल मेलभर लांब व्याख्यानांचे फवारे सोडून घालविण्याची खटपट करीत आहेत. माणसांच्या ध्यानी मनीहि नसतांना जसा त्याला प्लेग होतो, इन्फ्लुएंझा होतो किंवा न्युमोनिया होतो आणि तो ग्लानी येऊन पडला की मग डॉक्टर लोक औषधोपचाराची लगबग करतात. तसाच प्रकार हिंदू धर्माच्या बाबतींत झाला आहे, अशी डॉ.कूर्तकोटी व त्यांच्या प्रभावळीतील धर्ममार्तंड उनाडटप्पूंची समजूत झालेली दिसते. हिंदु धर्माला न्युमोनिया झाला आहे आणि हे डागदार साहेब त्यांच्या छातीवर हिंदु धर्म परिषदेच्या पलीस्तरांचा शेक करीत आहेत. आह्मी म्हणतो की माणसाप्रमाणेच धर्मालाहि जर प्राणान्तचि रोग होत असेल तर धर्माच्या श्रेष्ठतेचे मर्म कशांत आहे? माणसांप्रमाणे वाटेल तेव्हा ग्लानी येऊन बेशुद्ध पडणारा धर्म आमच्या आत्म्याची उन्नति तरी कसची करणार? आणि असल्या पंगू धर्माचा उदो उदो तरी आम्ही कां करावा म्हणे देव येऊन धर्माची ग्लानी पालवतो! पण धर्माला ग्लानी येते कशी आणि ती आणतो कोण? अर्थात

धर्मसंरक्षणाची जबाबदारी ज्या जगद्गुरू धर्ममार्तंडादि पहारेकऱ्यांवर खास सोपविलेली, ते या बाबतींत सर्वस्वी जबाबदार आहेत. पुण्याच्या सासून इस्पितळाची योजना जिवंत माणसांना विष देऊन ठार मारण्या करता केलेली असावी असे कोणीहि म्हणणार नाही. तेथले सर्जन डॉक्टर्स हे सारे हजाम आहेत असेंहि म्हणतां येत नाहीं. चांगले शास्त्रोपधि कलेंत शेवटच्या पदव्या पटकावलेले पंडीत आहेत. पण चांगल धट्टे कट्टे तरणेबांड अक्कलकोटचे महाराज फत्तेसिंग भोसले सासून हॉस्पिटलांत रोगनिवारणार्थ जातात काय आणि तेथले डॉक्टर त्यांना धडधडीत वीष देतात काय आणि विचारा उमेदवार नृपति जहराची ग्लानी येऊन बोलबोलतां मरतो काय? कोण जबाबदार या खुनाबद्दल? कळत असो वा नकळत असो, जाणतेपणी असो वा नेणतेपणीं असो, आज सासून हॉस्पिटलांतल्या डागदारांच्या हातून अक्कलकोटचे महाराज 'असतां आयुष्य' प्राणास मुकले! या दुर्दैवी गोष्टीला 'रिग्रेटेबल ॲक्सिडेंटल पॉयझनिंग' म्हणा, नाहीतर वेदांतांतल्या कर्मविपाकाची मलमपट्टी त्या डागदार शहाण्यांच्या गाढवपणावर लावा; महाराजांना ग्लानी आली व ते मेले, ही गोष्ट खोटी पडत नाही व तिची जबाबदारी सासून इस्पितळाच्या अधिकाऱ्यांना टाळतां येत नाहीं. याच सिद्धान्तान्वये आम्ही असें स्पष्ट म्हणतों की हिंदु धर्माला जर आज भयंकर ग्लानी आलेली असेल, तर त्याला बेरियम सल्फेटच्या ऐवजी बॅरियम सल्फाईड दिलें गेलें आहे आणि त्याची सर्व जबाबदारी जगद्गुरु व धर्ममार्तंडादिकांवर आहे. आज हिंदुधर्माला ग्लानी आली आहे, तो निष्प्राण पडला आहे, त्याला वेदसुद्धां नीट बोलवत नाहीत, त्याच्या प्रकृतीत बजबजपुरी माजली आहे, हा शंकराचार्याचा कबुलीजबाब आहे आणि असल्या मरूं घातलेल्या धर्मावर धर्मपरिषदेची शेकशेकोटी करण्यांत ते आपल्या जिवाचा आटारेटा करीत आहेत. यावरून बॅरिअम सल्फाईड वीष हिंदुधर्माला आपल्या हातून कळत वा नकळत दिले गेले आहे आणि आता सारें जग आपल्या तोंडांत शेण घालील या भीतीने हे धर्ममार्तंड डागदार शेकशेकोटीचा शेवटचा निर्वाणीचा प्रयत्न करीत आहेत, असाच यावरून निष्कर्ष निघतो. डॉक्टर कुर्तकोटी परिषदेची इंजेक्शने देऊन जगविण्याचा यत्न करीत असलेला धर्म हाच जर खरा हिंदूधर्म असेल, तर त्यांच्या भक्तांनी मायाजालाची आंतडी उगीच तोडीत बसण्यापेक्षा त्याच्या तिरड्यांमडक्याची व्यवस्था लवकर पहावी, अशी आम्ही आपलेपणाच्या दुवाने सूचना देतो, 'पूना ड्रग स्टोअर्स' मधले पौराणिक मिक्षुकशाही बॅरियम सल्फाईड राजकारणाच्या किंवा धर्मकारणाच्या पोटांत गेले की त्याचा मुडदा पडलाच पाहिजे. (न पडेल तर त्याला सासून हॉस्पिटलांत पाठवावा.) सारांश, त्या हिंदुधर्माच्या खुनाची जबाबदारी पुडी बहाद्दर शंकराचार्याच्या मुंडित मस्तकावर आहे आणि त्याबद्दल 'धर्मसंरक्षक' म्हणून हिंदु जनता त्यांना जाब विचारल्याशिवाय सोडणार नाहीं, बाजू अंगावर सणसणीत शेकत आहे, असे पाहून हे धर्ममार्तंड खुनी लोक धर्मरक्षणाची जबाबदारी, लोकशाहीच्या नाटकी भावनेनें, हिंदु समाजावर लोटून, आपण नामानिराळे होण्याचा किंवा फर्लो रजेवर जाण्याचा यत्न करतील तर त्यांना तसे करतां येत नाहीं व जनतेचें करूं देऊं नये. भिक्षुकशाहीच्या उर्मट व बेजबाबदार धर्मडागदारांनीं मानसिक गुलामगिरीच्या दुधांतून हिंदुधर्माला वर्णाश्रमवादी बॅरियम सल्फाईड दिलेलें आहे व तें विष आंगीं भिनल्यामुळे त्याला सध्या प्राणांतीचे आचके येत आहेत. यांत भिक्षुक शाहीच्या कांहीं कारस्थानाचा जनतेला संशय येत असल्यामुळें, या प्रकरणाचा सर्व नवमतवाद्यांनी कस्सून तपास करावा असा आमचा आग्रह आहे. सारांश, विचारवंतांना हें समजलेंच असेल की सध्या हिंदुधर्म ज्या नामर्द भेकड व सहिष्णु स्थितीत

एन ४००६--३०

आहे, ती त्याची वास्तविक मुळीं स्थितीच नव्हे. डॉ. कुर्तकोटी प्रभृति ज्या चातुर्वर्ण्य प्रधान धर्माला जगविण्याचा परिषदी यत्न करीत आहेत, तो मुळीं धर्मच नव्हे, तें धर्माचें लटकें बाहुलें आहे. त्या बाहुल्यासाठी जीव देणें म्हणजे हिंदूंनी आपल्या उरल्या सुरल्या बौद्धिक हिंमतीचे दिवाळे फुंकण्यासारखें आहे. खरा हिंदुधर्म भेकडांचा धर्म नव्हे. खरा हिंदुधर्म; सहिष्णु नव्हे जायेष्णु आहे. खरा हिंदुधर्म शांतिप्रिय नव्हे, संग्रामप्रिय (मिलिटंट) आहे. या संग्रामप्रियतेवर भिक्षुकशाही कुकल्पनांची राख पडलेली आहे. तिला जोरानें फुंकर घालून, हिंदुधर्माचा तो दिव्यात्मा प्रज्वलित करण्याची कामगिरी प्रत्येक जागृत हिंदूला पुढील अंकी दर्शविण्यांत येईल

□□□

स्फुट विचार

सार्वजनिक हिताचा प्रश्न

गेल्या एप्रिलच्या ३ तारखेला औषधाच्या आदलाबदलीमुळे हकनाहक प्राणास मुकलेल्या अक्कलकोटच्या महाराजांची हृदयद्रावक कहाणी आ ज सर्वश्रुत झालीच आहे. महाराष्ट्र एका प्राचीन राजघराण्यातील प्रगमनशील तरणाबांड राज्यकर्ता विषप्रयोग होऊन पुण्याच्या नामांकीत सासून हॉस्पिटलांत ठार मारला जावा, हा 'लॅमेन्टेबल ॲक्सिडेंटल डेथ' (शोचनीय अपघाताचा मृत्यू) तर खराच, पण तेवढ्यावरच आमच्या दुबळ्या व 'अन्सायंटिफिक' मनाची विचारगति थांबणे शक्य नाही. आधीच बहुजन समाज हा अशिक्षित असल्यामुळे आणि मोठमोठ्या इस्पितळांची उपयुक्तता त्याला पटणे कठीण जात असल्यामुळे तो इस्पितळांकडे अत्यंत साशंक दृष्टीनेच पाहत असतो. विशेषतः सन १८९६-९७ सालच्या प्लेगच्या धामधुमीत घडलेल्या इस्पितळी अत्याचारांमुळे हा भ्रम जनतेच्या मनाला अधिकच बिलगून बसलेला आहे. सुशिक्षित अल्पसंख्यांकांनी हा भ्रमनिरास करण्याचे कामी आजपर्यंत बऱ्याच खटपटी केल्या, परंतु 'रोगी इस्पितळांत गेला की मेला' ही बहुजनसमाजाची समजूत अजून आहे तशीच आहे आणि आता तर या अक्कलकोट प्रकरणामुळे अशिक्षित समाजच नव्हे तर सुशिक्षित समाजहि मोठमोठ्या इस्पितळी संस्थाबद्दल जबरदस्त साशंक बनला, तर त्याबद्दल जबाबदार कोण? अक्कलकोटच्या महाराजांविषयीं, सासून हास्पिटलांतले डॉक्टर्स व सर्जन जर इतके निष्काळजी व बेपर्वा, तर इतर गोरगरीब रोग्यांची त्या अरेरावांनी काय बरदास्त ठेवली असेल, आज ठेवीत असतील व पुढे ठेवतील, याचे अनुमान करणें फारसें कठीण नाहीं. प्रस्तुतची थोरा मोठ्यांची अपघात विपत्ति यदृच्छेने बाहेर आल्यामुळे, सासून इस्पितळाच्या मर्दांध कसायांची करणी आज जनजाहीर झाली आणि बहुजन समाजाच्या मनांत सतत वागणाऱ्या इस्पितळाच्या धडकीचा वास्तवीक पुरावा बाहेर पडला. सामान्यतः हिन्दी जनता सहिष्णु असल्यामुळे, अन्याय्य परिस्थितीला टक्कर द्यायला ती सहसा प्रवृत्त होत नाही. परंतु तेवढ्याने अन्याय्य परिस्थितीचे अस्तित्वच नाकबूल केले जातें असें मात्र मुळीच नाही. अक्कलकोटच्या महाराजांची रोगचिकित्सा म्हणजे एखाद्या जडमूढ अडाणी पांडबा भिवबाची इस्पितळी परीक्षा नव्हती. यासाठी सर्जन मॅडॉक्पासून तो पांढरे झगे घालून इतस्ततः वावरणाऱ्या गुलकंदी नर्सिंसपर्यंत सर्वांची मोठी थोरली कमिटी बसली होती, असे ऐकतों. शिवाय सल्फेट आणि

एन ४००६--३०अ

सल्फाईड या दोन द्रव्यांचे गुणधर्म किती भिन्न आहेत, हे सामान्यत्वें जरी आता जगजाहीर झालें आहे, तरी असे म्हणतात की, महाराजांना दिलेले सल्फाईड विष देणाराचे डोळे फुटले असले, किंवा कान लांब झाले असले, तरी ते विष आहे, त्याच्या नाकाला सहज समजले असते. याचे कारण असे म्हणतात की बैरियम सल्फाईड दुधांत किंवा पाण्यांत मिश्र करतांच ते काळे ठिकर पडून त्याला मनस्वी दुर्गंधी सुटते. अर्थात् या विषाचा डोस महाराजांना बिनदिक्कत देणारी मंडळी घ्राणेंद्रियांच्या बाबतीत मुर्देवजा बनलेली असावी असा कोणी तिऱ्हाइतानें सिद्धांत कां काढू नये? प्रस्तुतच्या दुर्देवी प्रसंगाची योग्य ती चौकशी करण्याचे काम सध्या सुरू आहे. त्याचा व्हायचा असेल तो वाजवी निकाल केव्हां तरी होईल, त्यांच्याशी आम्हाला कार्हीहि कर्तव्य नाही. आमचा सवाल फक्त सार्वजनिक हिताहितापुरता आहे. सासून हॉस्पिटल झालें काय, किंवा इतर कोणतेंहि हॉस्पिटल झालें काय, ज्या उद्देशानें त्यांची स्थापना करण्यांत आलेली आहे, ते उद्देश कितपत पार पाडले जात आहेत याची कस्सून चौकशी होणें प्राप्त आहे. सासून इस्पितळांतील रोग्यांच्या सुश्रुषेबद्दल आज पर्यंत बराच गवगवा पुण्यास ऐकूं येत असे. त्याचें प्रत्यंतर किंवा स्फोट अक्कलकोटच्या महाराजांच्या दुर्दैवी अपघाताने झाला. सासून इस्पितळाच्या संस्थापकांना व सरकारला या संस्थेच्या शुद्ध हेतूंबद्दल जर कांही चाड असेल, तर सरकारने लोकनियुक्त प्रतिनिधींचें एक कमिशन नेमून त्याकडून सासून इस्पितळाच्या सर्व कार्यक्रमाची कसून चौकशी करवावी, अशी आमची हट्टाची मागणी आहे. आमची खात्री आहे, की असल्या कमिशनच्या चौकशीमुळें सासून इस्पितळांतील बऱ्याच झोटिंगशाही लफड्यांचा उकीर्डा चव्हाट्यावर आल्याविना रहाणार नाही. शिवाय, सासून हॉस्पिटलांत उपचारासाठीं जाऊन बिनशर्त मरण्याचा प्रसंग आजपर्यंत ज्यांच्यावर आला असेल, त्यांच्या नातेवाईकांनी आणि इतर कोणत्याहि बाबतीत हाल अपेष्टा भोगलेल्यांनी आता उघडपणे पुढे येऊन, सासून हॉस्पिटलांतली घाशारामी पुराव्यानिशी प्रसिद्ध करावी, अशी आमची प्रार्थना आहे. इस्पितळांच्या माणुसकीची सरकारला जर काही चाड वाटत असेल, तर ताबडतोब त्यांनी कमिशन बसवावें आणि जनतेनें या बाबतींत कायदेशीर हट्ट धरल्याशिवाय राहू नये, अशी आमची सूचना आहे.

काटकसरींची कट्यार

हिंदुस्थानच्या प्रजेप्रमाणेंच हिंदुस्थान सरकारहि भणंग भिकारी झाल्यामुळे, सुईच्या अग्रावर राज्याचा संसार करण्यासाठी त्यांनी नेमलेल्या काटकसर कमिटीचा पराक्रम आता सर्वश्रुतच झालेला आहे. ही काटकसरीची कट्यार पोष्टकार्डे व पाकिटे तिकिटांवर फिरून, किंवा नाटके सिनेमांची थेटरें धुंडाळूनच स्वस्थ राहिली नाहीं, तर अखेर खुद्द व्हाइसरॉय साहेबांच्या खास आशीर्वादानें गोरगरीब जनतेस न मिठाला महाग करून, आतां मध्यम वर्गाच्या गरीब कारकुनांच्या पोटावर निर्घृणपणे फिरत आहे. गोरगरीबांच्या पोटांवर बेरोजगारीचा वरवंटा फिरवून सांपत्तिक स्थैर्याची व तज्जन्य सुराज्याची आशा बाळगणाऱ्या सरकारी काटकसऱ्या मुत्सद्यांची महति काय वर्णन करावी! सध्या सरकारी, निम सरकारी,

बिन सरकारी वगैरे सर्व खात्यांतून व कारखान्यांतून हजारों दुर्दैवी शिपुर्डी व कारकुंडी काटकसरीच्या सबबीवर भराभर डिसमिस होऊन घरी माशा मारीत बसली आहेत. परंतु एवढ्या मोठ्या उदार, व्यापक व न्यायी धोरणावर चालविलेल्या काटकसरीची महाकृपा काही बड्या सेक्रेटरीवर, ट्रॅफिक मॅनेजरांवर किंवा असिष्टंट इंजणेरांवर झाल्याचें ऐकिवात नाही, गोऱ्या माणसाला जसा काळा हिंदु अदमी बिनचुक बुझतो, तसा काटकसरीचा काळतोंड्या खराटांहि बुझतो की काय कोण जाणे! कित्येक निम सरकारी हापीसरांना या काटाकाटीचा असा काही और केफ चढला आहे की, नौकरीत अर्धी अधिक हयात खर्ची घातलेल्या शेंकडों 'ओबीडियंट सर्व्हेंटा'ना भराभर गचांड्या मारण्यांत त्यांना आंसुरी परमानंद होत आहे कलमांच्या एकाच फटकाऱ्यानें शेंकडों लोकांच्या पोटांवर बिब्बा ओढण्याची कर्तबगारी म्हणजे काही लहानसहान सत्ता नव्हे! ही सत्ता गाजवितांना आमच्याच काळ्या कातडीच्या कित्येक सुपरदंटांना आणि हेडक्लार्कांना सैतानी सौख्य साम्राज्याच्या सिंहासनावर बसल्याचा भास व्हावा ही काळाची करणी की काळ्याची करणी? बडतर्फीचे हुकूम भराभर सोडण्यांत या बड्या हापीसरांना जरी सत्तेच्या गुदगुल्या होत असल्या, तरी त्या असुरी खेळाचे परिणाम इतरांवर काय होत असतील याची जाणीव त्यांना होत असेल काय? दहा दहा बारा द्वारा वर्षे हाडांची काडे पिचवून नोकरी केल्यावर स्वतःच्या बडतर्फीचा हुकूम स्वतःच टाईप करीत असतांना बिचाऱ्या कुटुंब वत्सल टाइपिस्टाला काय कष्ट होत असतील, त्याची कल्पना त्या हुकुमावर सही खरडणाऱ्याला कशी होणार? जवळ कवडीचाहि संचय नाहीं, (हातातोंडाच्या मिळवणीचीच मारामार, तेथें संचय कसला?) नौकरी -वय गेल्यामुळें इतर कोठेंही नौकरी मिळण्याची आशा नाही. कोठे कांहीं स्वतंत्र धंदा करावा तर अक्कल नाहीं. अक्कल असली तर भांडवल नाहीं. चाकरमानेपेशाचा प्रतिष्ठितपणा (?) अंगींमासीं खिळल्यामुळे काबाडकष्ट करावे तर लोकलज्जा आड येते, लोकलज्जेला झिडकारलें तरी इच्छा असून काबाडकष्टाची संवय नाही, पैची प्राप्ती नाही आणि पदरांत तर दहा माणसाचें पांढरपेशी कुटुंब. अशा अनुकंपनीय अवस्थेत सापडलेल्या हजारों बेरोजगार इभ्रतदार लोकांनी आपल्या चरितार्थाची सोय कशी लावावी, याचे उत्तर एकादा काटकसरपटु हापिसर देऊं शकेल काय? एकट्या मुंबईमध्ये ही बेरोजगार लोकांची संख्या कित्येक हजार तरी असावी असा आमचा अंदाज आहे. अब्रूनें दिवस कसे काढावे ही एकच विवंचना रात्रंदिवस या सर्वांच्या डोळ्यांपुढे उभी आहे. भिडस्तपणानें भूक मारली तरी भूक लागत नाही असें थोडंच आहे? आणि लटक्या प्रतिष्ठितपणाची भीड तरी किती दिवस टिकणार? शिक्षणाच्या थोड्याबहुत परिणामानें फाटलेल्या अब्रूवर व पेटलेल्या पोटावर विवेकाचे कितीहि जाडजूड आवरण घातलें, तरी माध्यान्हीच्या वेळी कच्च्याबच्च्यांच्या भडकणाऱ्या भुकेनें विवेकी माणसांचेहि विचार जर भलतीकडेच भडकले, तर त्यांच्या परिणामांची कल्पना आम्हांला तरी करवत नाही. सर्व असंतोष पत्करले, परंतु पेटलेल्या पोटांच्या ज्वाळा, राजकीय स्थैर्याची पाळेमुळे जाळून खाक केल्याशिवाय राहाणार नाहीत, यांचे प्रत्यंतर काटकसरपटु मुत्सद्यांनी रशियाच्या वर्तमान स्थितीवरून जर न पटेल तर तें त्यांचें आमचें व सर्वांचे खडतर दुर्दैवच होय, असेंच म्हटलें पाहिजे.

हुंड्याची रक्तपिती

हुंडाविध्वंसक संघाने उघड माथ्याने हुंड्याविरुद्ध बंडाचे निशाण उभारल्या दिवसापासून हिंदुसमाजांतील प्रत्येक जातीत ही चळवळ थोड्या फार प्रमाणांत प्रादुर्भूत होऊन, बरेच विवेकी स्त्रीपुरुष हुंडानिषेधाची भाषा स्पष्ट बोलू लागले आहेत, हे सुदैव होय. आघातामुळे प्रत्याघात होणे हे साहजिक असले, तरी हुंड्याचे रक्त पिण्यास लालचटलेल्या अधर्माच्या सर्वांगावर नैतिक रक्तपिती उमटलेली असल्यामुळे, त्यांना उघडाउघड प्रतिकार करण्याचे तोंडच नाही. ते फार फार झाले तर हुंडाविध्वंसकांची मनमुराद निंदा करीत घरोघर जोडे फाडतील, त्यांना कचाट्यांत आणण्यासाठी गुप्त कारस्थाने करतील, वाटेल ते करतील; पण तेवढ्याने हुंडाविध्वंसनाचे पुण्य कार्य कधीहि डळमळणार नाही. हुंडाविध्वंसनाच्या कार्याचा ठिकठिकाणी आता मोठ्याने स्पष्ट उच्चार होऊ लागला आहे आणि हुंड्याची भाड खाणाऱ्या अधर्माची भाषा खोल्यांचे कवाडे लाऊन बुरख्या बुरख्यांतून होऊ लागली आहे. यंदा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत छिंदवाडा येथे मध्यप्रांतीय कायस्थ परिषदेची बैठक झाली, त्यावर नागपूरच्या हितवाद पत्राने एक स्फुट लिहिले आहे. (ता. ११-४-२३). त्या परिषदेत अनेक सामाजीक प्रश्नांवर ठराव करण्यात आले. पैकी सर्वांत अत्यंत महत्वाचा ठराव हुंडाविध्वंसनाचा होता. या ठरावावर रावसाहेब हिरालाल वर्मा यांची विदुषी कन्या कुमारी सीताबाई वर्मा हिने हुंड्याच्या आसुरी परिणामांचे इतक्या कळवळ्याने व सात्विक संतापाने विवेचन केले की 'सर्व सभाजन टपटपा अश्रू ढाळीत होता आणि सर्वांनी उभे राहून हुंड्याच्या प्राणघातक चालीचा विध्वंस करण्याची प्रतिज्ञा केली. [Moved the whole audience to tears and all standing took a vow never to practise the baneful custom]. मराठे व तत्सम जातीत कन्याविक्रयाची घाणेरडी चाल मोडण्याच्या खटपटी सुरू झाल्या आहेत. कांही ब्राह्मण जातींतहि हा प्रकार चालू आहे. सर्वांनी निश्चय केला तर उलट सुलट हुंडाविध्वंसनाचे कार्य तेव्हांच यशस्वी होईल. खरी कळकळ पाहिजे. सुधारणेच्या तोंडपुज्या गप्पा नकोत. पुरुषांना ही अनैतिक पाशवी चाल जर बंद पाडण्याचे सामर्थ्य नसेल, तर भगिनी पुढे सरसावतील आणि हे पुण्य कार्य करतील, अशी आम्हांला आशा आहे. असे झालेच तर त्यांच्याकडून चोळी लुगड्यांचा आणि नथ बांगड्यांचा आहेर नामर्द पुरुषांना होण्याचा बराच संभव आहे. चालू लग्नसराईत अधम हुंडेबाजांच्या कसाबकरणीच्या बऱ्याच मासलेवाईक हकीकती आमच्याकडे आलेल्या आहेत. पुढील अंकी त्यातील काही प्रसिद्ध करू. चालू लग्नसराईत आमची प्रत्येक सुज्ञ कुमारी-भगिनीस हात जोडून प्रार्थना आहे की तिने हुंडेबाज पतीचे पाणिग्रहण मुळीच न करण्याचे नैतिक धैर्य धिटाईने अवश्य दाखवावे. महिषासुर मर्दिनी खवळल्याशिवाय या हुंडाटोणग्याचा बळी पडणार नाही.

□□□

टिपण

फॅशन, प्रतिष्ठा कीं बेशरमपणा?

हुंड्याच्या घाणेरड्या चालीविरुद्ध आजपर्यंत तोंडी व लेखी इतकी हाकाटी झालेली आहे कि ते सर्व लेख, ठराव व व्याख्याने एकत्र केली तर त्यात सर्व हुंडाशायलॉक सहज गाडले जातील. काही हुंडा रक्तपित्ये म्हणतात कीं हुंडा विध्वंसक संघानें आधी कसलीहि सूचना न देता एकदम चढाईचें धोरण पत्करले आहे. या धिम्मेगतिक लफंग्या प्रागतिकांना काय उत्तर द्यावें, हे समजत नाही. अनेक सर्वसामान्य ग्रंथांत या समाजविध्वंसक चालीचा निषेध केलेला आहे. अनेक इभ्रतदार कुमारिकांनी आत्महत्या केलेल्या आहेत. प्रत्येक जातींतील हजारों कुटुंबे भणंग भिकारी होऊन देशोधडीला लागली आहेत. हुंडा देण्याचें पालकांना सामर्थ्य नसल्यामुळे बऱ्याच अविवेकी कुमारिका दिवसाढवळ्या बाटेल ते करीत आहेत, हे प्रकार या शहाण्या बोलघेवड्यांना काय आजपर्यंत दिसलेच नाहीत? कसे दिसतील? यांच्या डोळ्यांत हुंड्याचा वडसच वाढलेला! असो. श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या खास आज्ञेवरून सन १९०४ साली श्री. नारायण केशव अलोनी बी. ए. यांनी लग्नविधि व सोहळे नामक एक महत्वाचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. त्यांत प्रस्तावनेच्या ५-६ पृष्ठावर खालील उद्गार काढलेले आहेत -

''धर्मशास्त्राप्रमाणे पाहूं जातां या ब्राह्म विवाहात कन्यापित्याने वरास आपल्या घरी बोलावून त्यास आपली कन्या यथाशक्ति अलंकृत करून दान करावयाची असते परंतु आज काल जे ब्राह्म विवाह होतात, ते काही तऱ्हेवाईक असतात! त्यांना 'ऋणकोनाम कन्या पिता व धनको नाम वरपिता' या मारवाडी देवघेवींचे स्वरूप असतें! अमुक हुंडा दिलाच पाहिजे, अमकी करणी केलीच पाहिजे. इतक्या जेवणावळी द्याव्या लागतील, इतक्या असामींचा जाण्यायेण्याचा खर्च द्यावा लागेल इत्यादी अटी वर पक्षाकडून कन्या पक्षात घालण्यात येतात आणि हा प्रकार जुन्या, अशिक्षित व न सुधारलेल्या लोकांपेक्षा नव्या सुशिक्षित व सुधारक म्हणविणारा मध्येच फार दिसून येतो त्यांच्यात हुंड्याचे मान मुलांच्या परीक्षा उतरण्या वर चढत जाते! आणि ते एथपर्यंत कीं त्यांच्या पायीं कित्येक मुलींचे बाप कायमचे कर्जबाजारी होऊन संसार सुखास आचवितात. अशा रीतीने केवळ आपमतलबावर नजर ठेवून धर्मनियमांस आणि त्यांतील उदात्त तत्वांस हरताळ फांसणे,

व तीही आपणांस सुशिक्षित आणि सुधारक म्हणविणाऱ्यांनी फांसणे, हे त्यांस मोठे लाजीरवाणे होय! हल्लीच्या ब्राह्मण विवाहाच्या उलट आसूर विवाह असतो. गरिबीमुळे किंवा द्रव्यलोभामुळे पुष्कळ गृहस्थ आपल्या मुली चांगल्या वयात वाढवितात, आणि नंतर त्यांच्या वयाच्या व रूपाच्या मानाने जे कोणी जास्त पैसे देतील अशा गरजू उतार वयाच्या कुरूप किंवा गुणहीन मनुष्यास त्या देऊन टाकितात! आपला तळीराम गार करण्यापुढें आपल्या मुलींच्या कल्याणाची मुळींच क्षिती न बाळगणारे निर्दय आणि अधम लोक हिंदु समाजात कांही थोडे नाहींत. ते आणि त्यांचे कर्म ही दोन्ही आमच्या धर्मशास्त्राने तर निंद्य म्हटलीच आहेत; परंतु कित्येक समाजहितेच्छू कवींनी देखील त्यावर नाटके रचून आबालवृद्धांकडून त्यांची निंदातिरस्कृति करविली आहे. तथापि तेणेकरून कन्याविक्रयाची चाल बंद पडली, अथवा निदान कमी तरी झाली, असें अनुभवास येत नाही. प्रांजलपणे म्हटले असतां, ज्यांत कन्येचा कमी तरी झाली, असे अनुभवास येत नाही. प्रांजळपणे म्हटले असतां, ज्यांत कन्येचा केवळ लिलांब केला जातो, असा आसुरविवाह जितका निंद्य आहे, तितकाच वर सांगितलेला मारवाडी देवघेवाचा ब्राह्मविवाह देखील निंद्यच होय. परंतु आमचे सुधारणांप्रिय देश-बांधव जेव्हा त्या विवाहाचा अपकर्ष आणि या विवाहाचा उत्कर्ष करण्यास प्रवृत्त होतात, तेव्हां त्यांची सुधारणा आपमतलबाची आहे, पक्षपाताची आहे, अथवा मारवाडी काव्याची आहे असे म्हटल्यावांचून राहवत नाही.'' पुढे १३१ पृष्ठावर परभू लोकांचा लग्नविधि याविषयीं प्रस्तुत ग्रंथकार विस्तृत माहिती देताना येणें प्रमाणे उद्गार काढतात कीं, ''यांची लग्नरिती ब्राम्हणांसारखीच आहे. परंतु, तींत वर दक्षिणा अथवा हुंडा, करणी आणि श्रीमंती थाटाचे सोहळे ह्यांचा जो अतिरेक आहे, तो सांगता पुरवत नाही! आणि ह्याच कारणांस्तव ह्यांच्यात मुलाचें व त्यापेक्षांहि मुलीचें लग्न म्हणजे द्रव्याची केवळ उधळपट्टी आणि दारिद्र्यास व संकटांस मुद्दाम पाचारण करणेंच होय! ह्या अंधपरंपरागत रूढीच्या पंकांत फसून ह्यांची शेकडों सुखी कुटुंबें कायमचीं दु:खी झालीं, व होत आहेत! शेकडों मुलींना ऐन तारुण्याच्या भरांत अविवाहित दशेंत राहण्याचा प्रसंग येत आहे, ही गोष्ट मोठी शोचनीय होय!'' अलिकडे वीणारव साप्ताहिकांत भीषण कृत्य हुंडा या नांवाच्या एका कादंबरीची जाहिरात प्रसिद्ध होत असते तींत खालील विचार आढळतात.

''आपल्या समाजांत श्रीमंतापासून तों गरीबांपर्यंत हुंडाशाहीचें प्रस्थ इतकें गर्जत आहे कीं, आजपर्यंत कित्येक मुलींचे बाप भीकेला लागलेले असून, कित्येकांनी आपल्या घरादारांची राखरांगोळी करून घेतली आहे. अशा या हुंडारूपी गुलामविक्रीचा समाजांत संभावितपणाचा बोकाळलेला धंदा होतकरू राष्ट्रभक्तांनी बंद करण्यासाठी कंबर बांधली पाहिजे. हा जर हृदयद्रावक अंगावर शहारे आणणारा धंदा समाजाच्या हातून बंद होणार नाहीं, तर म. गांधीच्या तत्त्वाप्रमाणें स्वराज्यही आपणापासून दूर राहील. तरी राष्ट्रभक्तांनी इकडे दुर्लक्ष न करितां स्वराज्य पाहिजे असेल तर ही रूढी बंद केली पाहिजे, म्हणजे स्वराज्य लांब नाही, आपले जवळच आहे.''

नागपुरास क्षत्रिय माळी समाजाने हुंड्याविरुद्ध बंडाची तयारी नेटानें चालविली असून, त्यांनी ता. २४.३.२३ रोजीं खालील ठराव एकमताने पसार केला आहे. सुशिक्षणाची कोरडी ऐट मारणाऱ्या कायस्थांच्या स्थानिक सभांना हा ठराव कोळून पाजला तर कांही अक्कल येईलसें वाटते -

आजपासून जो मुला-मुलींचा बाप किंवा पालनकर्ता हुंडा (देज) घेईल, त्याचे कार्यात कोणीहि

जाऊं नये, किंवा त्याला कोणतेहि प्रकारचें साह्य करूं नये. तसेंच तो जोपर्यंत घेतलेले हुंड्याचे रुपये पंचाचे समक्ष ज्याचे त्यास परत करणार नाहीं, तोपर्यंत त्यांचेशी कोणी कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवूं नये.

हुंडा निषेधाचे हे जुने नवे किंवा शिळे ताजे विचार समाजांत सर्वत्र ध्वनिप्रतिध्वनि काढित असतांनाहि, हुंडा हबकणाऱ्या नराधमांना कोणी झाला तरी हाच सवाल टाकील, की पशूंनो, ही फॅशन, प्रतिष्ठा की बेशरमपणा?

□□□

अग्रलेख

धर्मच जबरदस्त पाहिजे

जयापजयाच्या आणि स्वातंत्र्य पारतंत्र्याच्या उलथापालथी मानवांच्या संसारांत जगाच्या जन्मापासून कोट्यवधि झाल्या. परंतु या उलथापालथींची गति गेल्या २५ वर्षात अतिशयच तीव्र झालेली आहे. पूर्वी शेंकडों युद्धे झाली, अनेक गुलाम राष्ट्रांनी निर्वाणीचा थैमान करून आपले स्वातंत्र्य प्रस्थापित केलें, कित्येकांना त्यावर बिनशर्त पाणी सोडून इतरांच्या सत्तेखाली आपली मान द्यावी लागली. असे अनेक परिस्थितीचे पालट इतिहासांत आपणाला दिसतात, परंतु हे पालट चालूं मन्वंतरांत इतके झपाझप आपले रंग बदलीत आहेत की त्यापुढे काळाची गतिसुद्धां मागें पडत चालली आहे. पृथ्वीवरील यच्चावत् राष्ट्रांत गेल्या २५ वर्षात जेवढ्या घडामोडी व उलथापालथी झाल्या व सध्या होत आहेत, तेवढ्या त्यापूर्वीच्या हजार दीडहजार वर्षांच्या अवधींतहि झाल्या नाहींत. एक वर्षाच्या अवधींत पृथ्वीगोलाच्या स्वतःभोवतीं सूर्याभोंवतीं जितक्या गिरक्या होतात, त्याच्या दसपट किंवा शतपट स्थित्यंतरांची दर्शनें पृथ्वीवरील राष्ट्रांच्या जीवनांत तितक्या मुदतींत आजकाल घडून येत आहेत. कोठेंहि पहा, एक विशेष जागृति, एक विशेष अहमहमिका, एक अद्भुत चैतन्य सर्व राष्ट्रांत अपरंपार थरारलेलें दिसत आहे. त्यांतल्या त्यांत टेनीसच्या चेंडूप्रमाणे तारी व बिनतारी संदेशवाहक यंत्रांच्या जाळ्यांत पृथ्वीगोलाची टोलवाटोलव अहोरात्र चालू असल्यामुळे तर या चैतन्याच्या ठिणग्या, जरा कोठें कांहीं फट् होतांच, ज्वालामुखींतून रोंरावत बाहेर पडणाऱ्या लाव्हाप्रमाणे, साऱ्या दुनियेवर मुसळधार सडा पाडतात. सध्यां प्रत्येक राष्ट्राची प्रकृति इतकी नाजूक व ग्रहणक्षम बनलेली आहे कीं उत्तर ध्रुवाला पडलेल्या सुईच्या आघाताचे कंप दक्षिण ध्रुवावर खुशाल मोजून घ्यावे. कित्येकांना ही केवळ कविकल्पना किंवा अतिशयोक्ती वाटण्याचा संभव आहे. परंतु इंग्लंड अमेरिकेच्या चांदीच्या किंवा कापसाच्या बाजारभावाचे वातावरण उलट सुलट गोलांट्या उड्या मारीत असल्याची एक क्षुल्लक तार येऊन धडकताच हिंदुस्थानांतल्या व्यापाऱ्यांच्या पागड्या झटाझट- उलट्यापालट्या कशा होतात, याचा अनुभव पुष्कळांना आहे. जी गोष्ट व्यापाराची तीच राजकारणाची आणि तीच धर्मकारणाची. सारांश निरानराळ्या राष्ट्रांचे बाह्यतः कितीहि भिन्न हितसंबंध असले, तरी सर्वांच्या जागृतींत एक विशेष एकसूत्रीपणा सांप्रत आलेला आहे, यांत संशय नाहीं. हें एकसूत्री चैतन्य काय दर्शवितें? पौर्वात्य व

पाश्चिमात्य राष्ट्रांच्या उलाढाल्यांचे तपशिल कितीहि परस्परावरोधी दिसले किंवा असले, तरी त्यांच्या सर्व चैतन्याच्या पाठीशीं जगज्जेतृत्वाची विशाळ महत्वाकांक्षा कडव्या निश्चयाने ताठ उभी राहिलेलीं आहे. या महत्वाकांक्षेची नजर वरवर पहाणाराला जरी गहिरी दिसत असली, तरी ती अंतर्यामी अत्यंत जहरी आहे. उदाहरणार्थ पाश्चात्य राष्ट्रांची सारी धडपड व्यापार उदीमाचीच होते. त्यांच्या पाद्र्यांची गडबड शुद्ध धर्मप्रसाराचीच भासते. पण त्यांच्या तागड्या किंवा बायबलें म्हणजे राजकारणी सांपळे होत, हिंदवासियांना आतां चांगलेंच कळून चुकलें आहे. पूर्वी मुसलमानी रियासतींत इस्लामधर्मप्रसाराच्या पाशवी शक्तीच्या पाशानेंच हिंदूंचा राजकारणी अध:पात झाला; आणि आंता त्याच धोरणानें तुर्की राष्ट्र आपल्या सत्तेचे पाय अंथरुणापलीकडे पसरूं पहात आहे. युरोपांत 'मिलिटंट' इस्लाम धर्माला 'मिलिटंट' क्रिश्चन धर्माशी तोंड द्यायला तोंडच नाहीं म्हटले तरी चालेल; कारण दोघहि तुल्यबली आहेत आणि दोघांचेहि धर्म संग्रामप्रिय व मिशनरी स्पिरीटचे आहेत. अर्थात् ख्रिस्ती राष्ट्रें व इस्लाम राष्ट्रें यांना आपल्या जगज्जेतृत्वाच्या महत्त्वाकांक्षेची खुमखुम जिरवून घेण्याचें बिनवारशी कुरण म्हणजे अवघ्या विस्तीर्ण जगांत एकटे हिंदुस्थानच होय. जगाच्या उलाढालीची गति तीव्रतम करणाऱ्या चैतन्याचें वारें हिंदुस्थानांतहि खेळूं लागलें आहे. स्वयंनिर्णय स्वातंत्र्य स्वराज्य इत्यादि मंत्रांचा उच्चार येथे आतां स्पष्ट होऊं लागला आहे. या राष्ट्राची महत्वाकांक्षा जागृत होऊन, ती अखिल जगाच्या चळवळीकडे टौकारून पहात आहे. परंतु खडकाळ जमिनीवर पर्जन्यवृष्टी कितीहि मुबलक झाली, तरी तेथें पेरलेलें बीज जसें कधींहि उगवत नाहीं, तद्वत हिंदुस्थानांत स्वयंनिर्णयाचें चैतन्य कितीही महामूर वहात असलें, तरी त्याची मनोभूमिकाच अशी टणक व खडकाळ बनली आहे कीं उच्चार झाला तरी आचार त्याच्याकडून घडत नाहीं. याचें कारण हिंदुस्थानाची मनोवृत्ति, विशेषत: हिंदु समाजाची मनोवृत्ति, गुलाम बनलेली आहे. हिंदूंना स्वराज्य पाहिजे. सामाजिक क्षेत्रांत यादवी मत्सर द्वेष व फाटाफुटीची धर्मक्रिडा करणाऱ्या हिंदूंना स्वयंनिर्णयाचा अधिकार पाहिजे. वेदोक्त पुराणोक्त आणि स्पृश्यास्पृश्यत्वाचा वाद घालणाऱ्या हिंदूंना स्वातंत्र्य पाहिजे. सकारण किंवा निष्कारण एकमेकांची हाडें फोडण्यांतच धन्यता मानणाऱ्या हिंदूंना, श्रुति स्मृतींतील मृताक्षरांपुढे पाऊल टाकण्यास न धजणाऱ्या या जातिवंत गुलामांना, परकी इंग्रज सरकारची गुलामगिरी नको आहे. त्यांना स्वराज्य पाहिजे. डॉ. गौरच्या मिश्रविवाह बिलाला, जोशी बिलाला किंवा देवस्थान बिलाला विरोध करणारे प्रगमनशील हिंदु लोकशाहीची पुराणें झोडीत आहेत. मुलतान मलबारच्या मुसलमानांनी त्यांच्या आयाबहिणी बायकांची इज्जत घेतली, कच्च्या बच्च्यांची कत्तल केली आणि हजारो हिंदूंना बळजबरीने बाटविले, तरी नुसती शाब्दिक निषेधहि करण्याची यांची छाती नाहीं. कारण हिंदूंना मुसलमानांच्या खिलाफतीच्या स्वातंत्र्याची झुरणी लागलेली आहे. शंख शंकर पार्वती ॲन्ड को देवांना धाब्यावर बसवून घरांतल्या देव्हाऱ्यांत पैगंबरावतार अल्ली बंधूंची स्थापना केली, आणि गल्लोगल्ली त्यांच्या नांवानें कंठशोष केला. कशाला? तर हें जगाला दाखविण्यासाठीं कीं मोपल्यांनीं हिंदूंवर कितीहि अत्याचार केले, तरी आम्ही वेदान्ती हिंदु मुर्द्याप्रमाणें थंडगार राहूं शकतो! हिंदू धर्माचा लोकसंग्रही बाणा गीताप्रसिद्धच आहे!

राष्ट्राच्या किंवा समाजाच्या संस्कृतीचें प्रमाण धर्माच्या स्वरूपावरून निश्चित होत असतें. हिंदु धर्माचें आजचें स्वरूप भेकड व नामर्द आहे. त्याची विजयाकांक्षा ठार मेलेली आहे. नाना तऱ्हेच्या आक्षेपांची कांटेरी कुंपणें त्याने आपल्या सभोंवार घालून घेतली आहेत. खुद्द हिंदुधर्मियांतच त्यानें सहस्रावधि

उच्चनीचतेचे भेद निर्माण करून हिंदूंच्या ऐक्याची राखरांगोळी केली आहे. प्रचलित हिंदुधर्म इतर धर्मांच्या लाथा खाऊन बेजार झाला असतांहि, स्वकीयांवर उर्मट सुलतानशाही गाजविण्यास त्याला शरम वाटत नाही. कोट्यवधि अनुयायांची संख्या दररोज परधर्मांत जात असतांहि, हिंदुधर्म उलट्या काळजाच्या दिवाळखोर व्यापाऱ्याप्रमाणें स्वतःच्या संस्कृतीच्या भांडवलाच्या टिमक्या पिटण्यास मुळींच कचरत नाहीं. सारांश, स्वयंनिर्णयाचे फवारे सोडणारे नामर्द हिंदु स्वधर्माच्या क्षेत्रांत अत्यंत जुलमी व पाषाणहृदयी वर्तन करीत असतात. ज्यांचा धर्मच मुळीं मानसिक गुलामगिरीप्रवर्तक, जुलमी आणि अन्यायी, त्या हिंदूंत जगज्जेतृत्वाची आकांक्षा कशाने थरारणार? आणि थरारली तरी यशस्वी कशी होणार? हिंदु म्हणतात धर्माचा आणि राजकारणाचा काही संबंध नाही. तरी बरें, भोळसट धर्म भावनांनी रजपुतांच्या शौर्याची अखेर माती केली आणि धार्मिक वर्चस्वासाठींच भिक्षुकशाहीनें मराठी स्वराज्याला जिवंत गाडलें क्रिस्ती आणि इस्लाम धर्मियांनी आपल्या राजकारणी डावपेचांवर धर्माचेच टोपण चढवून, हिंदूंना माती चारली, हा गेल्या पाच सहा शतकांचा अनुभव डोळ्यांपुढे धडधडीत उभा असतो, धर्म आणि राजकारण यांत अस्पृश्यतेचे थेर माजविणाऱ्या धर्ममार्तंडाच्या अकलेची कमालच म्हटली पाहिजे. इतरांनी धर्माच्या सबबीवर हिंदूंची संघशक्ति खुशाल सुरुंग लाऊन उडवावी, त्यांची राज्यसत्ता बळीस मिळवून त्यांना गुलाम बनवावे, वेळोवेळी वाटेल तशी बंडे करून त्यांची घरेंदारें लुटावीं, बायकांची अब्रू घ्यावी, पोरांची कत्तल करावी, आणि षंढ हिंदूंनी 'आमचा धर्म सात्विक, आम्ही सहिष्णु' इत्यादि कोरड्या वल्गना मात्र कराव्या, हें चित्र, विसाव्या शतकांतल्या हिंदूंनो! तुम्हाला पाहवतें तरी कसें? प्रत्येक खऱ्या खोट्या जबरदस्ताच्या सुस्काऱ्याला लेंड्या गाळणाऱ्या हिंदूंच्या हिंदुपणाचे मर्म त्यांच्या धर्माच्या षंढत्वात आहे आणि हिंदूंना माणुसकीची व माणुसकीच्या नैसर्गिक हक्कांची जर कांहीं चाड उरली असेल, तर त्यांनी आपल्या धर्माचे हे षंढत्व तरी नष्ट करावें, नाही तर हा षंढ धर्मच नष्ट करावा! धर्माच्या लोढण्याशिवाय जगणारे पुष्कळ समाज व राष्ट्र जगाच्या पाठीवर स्वयंनिर्णयाचें स्वर्गतुल्य सौख्य अनुभवीत आहेत.

धर्मानें मनुष्य निर्माण केलेला नाहीं. मनुष्यानें धर्माला जन्म दिलेला आहे. अर्थात् धर्माचें कर्तृत्व मनुष्याच्या हाती आहे. धर्माला वाटेल ते वळण देण्याचा अधिकार मनुष्याचा आहे. धर्माला मनुष्यांवर अरेरावी, गाजवितां येत नाहीं. 'युगऱ्हासा नुरूपतः' प्रत्येक नव्या काळाशी समगामी होण्याइतका लवचिकपणा जर धर्मात नसेल, तर तो आणणं मनुष्याचे कर्तव्य आहे, आणि तो येत नसेल तर त्या धर्माला गचांडी देऊन, त्या ऐवजी (धर्मावांचून मनुष्य मरतच असेल तर) नवीन धर्माला जन्म देणं मनुष्याच्या अधिकारांतलें आहे. इसवीसनापूर्वीच्या हजार बाराशे वर्षातल्या कायद्यांची बळजबरी या २० व्या शतकांत धर्म जर मनुष्यावर करीत असेल, तर त्या शिरजोर धर्माला व त्यांच्या पुरस्कर्त्यांना बेधडक फासावर लटकवावे. मनुष्याच्या उफलत्या उत्क्रांत आकाक्षांशीं विरोध करणारा धर्म हा धर्म नसून अधर्मच होय. गुण कर्मदर्शक वर्णभेदावरून जन्मसिद्ध जातिभेदावर पसरलेला धर्म सैतानी धर्म होय. निवळ जन्माच्या अपघातावरून उच्चनीचतेची व स्पृश्यास्पृश्यतेची खेकटीं माजविणारा धर्म गुलामांचा धर्म होय. सामाजीक संघशक्तीला आग लागली असतांहि डोळे मिटून स्वस्थ बसणारा धर्म पशूंचा धर्म होय. आजचा हिंदुधर्म सैतानी आहे. त्याचें नियंत्रण सैतान करीत असतात आणि या सैतानांच्या सुलतानी कायद्यांना गुलाम हिंदू बिनतक्रार मान वाकवीत असतात. स्वतंत्र व्हावयाची इच्छा

आणि पुनर्घटनेची धमक जर हिंदूंना असेल, तर प्रथम त्यांनी आपला हिंदुधर्म प्रयत्नशील, मिलिटंट (संग्रामशील) आणि कट्टा मिशनरी स्पिरीटचा बनवावा. जुन्या पुराण्या श्रुतिस्मृतींच्या चिंध्यांच्या भांडवलावर अत:पर चालूं धकाधकीचा मासला भागणार नाहीं. धर्मांतच साम्राज्य-नेतृत्वाचें वारें सणाणल्याशिवाय नुसत्या स्वराज्याच्या वल्गनांनी काय होणार आहे? जन्मल्यापासून मरेपर्यंत धर्माच्या भल्या बुऱ्या अनुज्ञेप्रमाणें कमी जास्त श्वासोच्छवास करण्याची गुलामगिरी हाडींमासीं खिळलेल्या हिंदूंचा धर्मच जेव्हां मर्द, तापट व संग्रामशील बनेल, तेव्हांच त्यांचें सामाजीक क्षेत्र उज्वल होऊन राजकारणाच्या क्षेत्रांत तो आपल्या प्रतिस्पर्ध्यांशीं सामना देण्यास तुल्यबली होईल. एरवीं कदापि नव्हे.

हिंदु धर्माच्या सात्विकपणाची सोवळी पुराणें शिळोप्याच्या वेळीं कितीहि कर्णमधुर वाटली, तरी आज त्यांचे नुसते कवित्व उरलें आहे. आपल्या अस्तित्वासाठी देशांतल्या देशांत हिंदूंना आज झगडावयाचे नसून, यांना साऱ्या जागृत जगाशीं तोंड देऊन जगावयाचें आहे. हा मुकाबला मोठा बिकट आहे. जबरदस्त असेल त्याचाच टिकाव लागेल, नामर्दीच्या नशिबाची गुलामगिरी चुकावयाची नाहीं. यावेळी मुसलमान हिंदूंच्या उपयोगी पडणार नाहींत; मग ते आतां बाटलेले असोत किंवा पूर्वी बाटलेले असोत. क्रिस्त्यांची अवस्था हीच. जगांतला कुत्रासुद्धा हिंदूंसाठी मरावयास तयार होणार नाही. हिंदूंच्या बेपर्वाईचा फायदा घेऊन इस्लाम आणि क्रिस्ती या दोन जबरदस्त मिशनरी धर्मांनी आधीच आमच्या घरांत चहूंकडून पाखरण घातली आणि आमचेच गोतावळे आमच्याविरुद्ध चालू मुकाबल्यांत उभे केले. परकी शत्रू परवडला पण आपल्याच हाडारक्तामांसाचा नराधम सामन्याला उभा असलेला परवडत नाही. मुसलमानी रियासतींत मुसलमानी सत्तेचे चिरे बाट्या हिंदूंनींच घरभेदाच्या सिमेंटावर येथे चिरस्थायी केले. आजला बाटे क्रिस्ती हेच कर्म करीत आहेत व पुढे करतील. हिंदुधर्मांत प्रतिकाराची तडफ जर जिवंत असती, योग्य प्रसंगी योग्य ते वळण घेण्याचा लवचिकपणा जर असता, आणि पतितपरावर्तनाचसें काय, पण सापडेल त्याला हिंदुत्वाची दीक्षा देण्याचा मिशनरी बाणा जर जागृत असता, तर हिंदुस्थान हे हिंदुस्थानच राहिलें असतें; साष्टीला पाहून कष्टी होण्याची वेळ आली नसती आणि गोमांतक हा गोमांतांतक बनला नसता असता आणि नसता! फुकट आहे हा वाद आता.

धर्मानि केलेला लोकसंग्रह थेट अनुयायांच्या रक्ताला जाऊन भिडतो. राजकारणी लोकसंग्रह कातडीच्या बरोबरच तरंगतो आणि वाटेल तेव्हा त्याच्या लोकसंग्रही प्रवृत्ति कमजोर झाल्यामुळेच हिंदूंचा सर्वांगीण अध:पात झाला आणि आज ते गुलामांपेक्षा गुलाम बनून आत्मविश्वासाला पारखे झाले आहेत. अलीकडच्या काळांत स्वामी दयानंद सरस्वति यांनीं हे मिशनरी स्पिरीट पुनर्जागृत करण्याचा यशस्वी यत्न केला. त्यांच्या आर्यसमाजाची उत्तर हिंदुस्थानांतली कामगिरी आज स्वामी श्रद्धानंदजी शुद्धीसभेच्या द्वारें मोठ्या धडाडीनें पुढें रेटींत आहेत. भगवान श्रीकृष्ण त्यांचे पुण्यकार्य विश्वव्यापी करो.

□□□

स्फुट विचार

प्रतापगडच्या भवानीवर संकट

प्रतापगड आणि भवानी ही महाराष्ट्राची दोन प्रिय दैवते आहेत. या दैवतांचा इतिहास प्रत्यक्ष शिवरायाच्या पुण्यप्रभावशाली हातानें घडलेला असल्यामुळें तर महाराष्ट्राच्या भावना त्यावर मोठ्या ईर्ष्येने केंद्रित होतात. मराठ्यांचा महाराष्ट्र धर्म आणि त्यांचें हिंदवी स्वराज्य आजला जरी शिल्लक उरलेले नसले, तरी त्याच्या पुनरुज्जीवनाच्या महाराष्ट्राच्या मानवी आकांक्षा या दोन दैवतांभोवती रात्रं दिवस घिरट्या घालीत असतात. शिवाजीने प्राणप्रतिष्ठा केलेली, स्वराज्याची जननी-महाराष्ट्राची माता म्हणून त्रिकाळ अखंड पूजलेली आणि समर्थ रामदासांनी वेळोवेळी उमाळ्याची करुणागीतें गाऊन आळविलेली प्रतापगडची भवानी महाराष्ट्राची जीव की प्राण अशी चैतन्यदेवता आहे. अफझुल खानाच्या आश्चर्यकारक मुकाबल्यामुळें खुद्द प्रतापगड म्हणजे एक अवर्णनीय भावनेचें ऐतिहासिक क्षेत्रच बनलेलें आहे, हें खुलाशानें सांगणे नको. अनेक शिवभक्त व इतिहासभक्त वारंवार प्रतापगडच्या दर्शनास मोठ्या भक्तीने जातात आणि २५० वर्षापूर्वीच्या इतिहासाशी तादात्म्यांचा परमानंद भोगून, नाखुषीने परत आपल्या कर्मप्राप्त संसाराकडे वळतात. गेली १५-२० वर्षे मुसलमानांनी प्रतापगडावर अफझुलखानाचा उरूस वगैरे भरविण्याचा नवीनच उपक्रम सुरू केला आहे. अलीकडे तर खुद्द गडावर त्यांनी बरीच वसाहत वाढविली आहे. दररोज खानाच्या थडग्यापाशी चिराख (बत्ति) लावण्यासाठी मुजावराची वगैरे कायमची नेमणूक करण्यांत आलेली असून, आतांशा तर दर पंधरवड्याला बरेच मुसलमान प्रतापगडावर मक्केच्या यात्रेप्रमाणे जात असतात. सारांश, अशी माहिती कळते कीं मुसलमानांनी प्रतापगडावर आपली वस्ती बरीच वाढवून तेथे अफझुलखानाचे बरेंच माहात्म्य सुरू केले आहे. मुसलमानांचा अफझुल खानाविषयीं आदरभाव विशेष वाढल्यास त्यात हिंदूंना वैषम्य वाटण्याचे कारण नाही. त्यांनी त्याला पीर बनविल्यास त्याची पूजा करायला हिंदूंची मनोवृत्ति कधि बाचकणार नाही. आजपर्यंत या देशांत शेकडों पीरांचे माहात्म्य मुसलमानांपेक्षां हिंदूंनीच अधिक वाढविलेलें आहे. पण हिंदू शिवाजीचा उत्सव करतात म्हणून तोडीस तोड देण्यासाठी मुसलमानांनी अफझलखानाच उत्सव सुरू करणे, यांत निवळ धार्मिक भावनेशिवाय अधिक काय आहे, ते कळण्याइतके मात्र हिंदु दुधखुळे नाहीत तद्विषयक पवित्र भावनांच्या आड येण्याचे दुष्कर्म हिंदु तरी निदान केव्हाहि करणार

नाहीत, अर्थात् हिंदूंच्या कांही विशेष स्थानाशी निगडित झालेल्या भावनांना डिवचण्याचे दुष्कर्म मुसलमान करणार नाहीत, अशी त्यांची अपेक्षा असणे सहाजीक आहे, परंतु प्रतापगडावर हल्ली चाललेला प्रकार एका भयंकर भाकिताचा द्योतक आहे कीं काय अशी आम्हाला चिंता व भीति वाटत आहे. मुसलमानांच्या वस्तीचा व उत्सवाचा परीघ वाढता वाढता तो आता थेट भवानीच्या देवळापर्यंत येऊन भिडला आहे, असे समजते. काही दिवसांपूर्वी देवळाच्या सभामंडपाचा काही भाग आग लागून जळाल्याची बातमी आली आहे. हा कदाचित अपघातहि असेल, नाही असे नाही, परंतु भुतकाळांतली तंट्या भांडणांची मढीहि जर वाटेल तेव्हा जिवंत होऊन सैरावैरा नाचतात, तर सध्यां हिंदु मुसलमानांच्या ताणलेल्या भावनांच्या हंगामात असल्या अपघातांनाहि आवृत्तिप्रियतेची मनस्वी लहर लागल्यास, त्याचे परिणाम काय होतील, कोणी सांगावें? उत्तर हिंदुस्थानात सध्या कोठें कोठें मूर्तिभंगाचे गझनवीं प्रकार सुरू झाल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. या दुर्दैवी प्रकारांबद्दल मन खिन्न होत असतांनाच, प्रतापगडावरच्या अपघातांची मजल भवानीच्या थेट गाभाऱ्यापर्यंत किंबहुना मूर्तीपर्यंत जाणार नाही, याची तजवीज करणें महाराष्ट्रीयांचे कर्तव्य आहे. भाव तेथें देव या न्यायाने आजपर्यंत भक्तांच्या धांवण्याला भवानी धांवली; पण आतां भवानीच्या धावण्याला भक्तांनी धांवलें पाहिजे.

श्रद्धानंदांचे शुद्धिकार्य

महर्षि दयानंद सरस्वतीचे सच्चे शिष्य स्वामी श्रद्धानंदजी हे वर्तमान युगांतले कट्टे कर्तबगार आर्य आहेत. आर्य समाजाने उत्तर हिंदुस्थानांत धार्मिक सामाजिक शैक्षणिक व राजकीय क्षेत्रांत विलक्षण चैतन्य थरारून सोडण्याची अभिनंदनीय कामगिरी आज कित्येक वर्षे मोठ्या चिकाटीनें चालविली आहे. या कामीं आर्यसमाजाच्या सर्व कार्यकर्त्यांना अनेक प्राणघातक संकटांत आपल्या जीवाचें दिव्य करून घ्यावें लागलेलें आहे. आर्यसमाजानें पतितपरावर्तनाची चळवळ अनेक वर्षे चालवून आपल्या आर्यसंघाची मजबुती बळकट केलेली आहे आणि राष्ट्रकार्याला वरचेवर विरोध करणाऱ्या जातिभेदाची नांगी मुळांतच चेंचली आहे. यामुळे दक्षिणेइतकी जातिभेदाची पटकी उत्तरेकडे आतां मुळींच नाहीं. मध्यंतरी आपलें आर्यसमाजाचे उद्दिष्ट काय सोडून स्वामी श्रद्धानंदजी 'नऊ महिन्यांत स्वराज्य' मिळविण्याच्या फंदांत पडले होते. पण त्यांना लवकरच उपरति होऊन ते आतां आपल्या वास्तवीक कर्तव्यकर्माच्या क्षेत्रांत 'अर्थ वा साधयेत् देहं वा पातयेत्' तडफीनें शुद्धीचें कार्य करीत आहेत, ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. आतांपर्येत पंधरा सोळा हजार लोकांना त्यांनी हिंदुधर्मात सामील करून घेतले आहेत आणि सात कोटी अस्पृश्यांना स्पृश्य हिंदू केल्याशिवाय मी रहाणार नाही अशी त्यांनी भीष्मप्रतिज्ञा केलेली आहे. मलबारांतहि आर्यसमाजानें शुद्धिकार्य फारच मोठ्या प्रमाणावर केले. या कामी अखिल हिंदु समाजानें स्वामीजींच्या या लोकसंग्रही कार्याला शिकस्तीचें सहाय दिलें पाहिजे. प्रस्तुतचा प्रसंगच असा आहे की या कामीं लवमात्र चाल-ढकल करणें श्रेयस्कर होणार नाही. आर्य समाजाप्रमाणे महाराष्ट्रांतल्या अखिल हिंदु समाजानें आपले सर्व मतभेद बाजूला ठेऊन

पतित-परावर्तनाच्या बाबतींत एकदम एकमुखी चपळाईचे धोरण स्वीकारलें पाहिजे. अहमदनगर, पुणे, सोलापूर, रत्नागिरी वगैरे ठिकाणीं गफलतीनें बाटलेल्या लोकांची संख्या लक्षावधी आहे, महाराष्ट्राला आपल्या इतिहासप्रसिद्ध कर्तबगारीची आणि शिवप्रणित लोकसंग्रही बाण्याची जर कांही चाड ठरली तर पतितपरावर्तनाचें पुण्यकार्य तो मोठ्या धडाडीनें हातीं घेईल अशी आशा आहे.

बागड्यांचा बेगडी मुखवटा

श्री. बागडे हे एक मोठ्ठे गृहस्थ. काजव्याप्रमाणें कांही दिवस चमकून लुप्त झालेल्या 'शिव छत्रपति' दैनिकाचे ते एक संपादक होते. ते नामदारहि आहेत. अर्थात् ते विद्वान नाहीत असें असे कोणी म्हणावें? आणि ज्या अर्थी ते ब्राम्हणेतरांचे पुढारी म्हणून इतस्तत: बागडत असतात त्या अर्थी त्यांनी आपली अक्कल कोठें तरी गहाण टाकली आहे असें तरी म्हणण्याचे कसें धारिष्ट करावें! निदान गेल्या शिवजयंति उत्सवांत त्यांच्या पाघळलेल्या अकलेचे प्रवाह पाहून असें कोणीहि म्हणणार नाही. बागडे आपल्या व्याख्यानांत असें म्हटल्याचें प्रसिद्ध झाले आहे की, महाराष्ट्रांतल्या मराठ्यांच्या पुढें इतर जाती बेडकांप्रमाणें होत. असलें बेजबाबदार विधान करताना बागड्यांना नंदनवनात बागडल्याचा जरी भास झाला असला, तरी त्यामुळें त्यांची स्वत:ची बेगडी विद्वत्ता भर चव्हाट्यावर नागडीउघडी पडली याचें त्यांना भान राहिलें नाहीसें दिसते. जातिभेदाविरुद्ध आदळहापट करणाऱ्या या सोंगाड्या ब्राम्हणेतर पुढाऱ्याला, मराठेतर महाराष्ट्रीय जातींना बेडकाची उपमा दिल्यामुळे, आपण प्रत्यक्ष जातिभेदच नव्हे तर जातिद्वेष माजविण्यास प्रवृत्त होत आहोत, याची मुळींच दख्खल राहिली नाही. बागड्यांचे इतिहास विषयक ज्ञान किति आकटोविकटो आहे, याचें प्रदर्शन 'शिवछत्रपती'च्या पहिल्याच अंकांत थाटले होते. खुद्द बागडे हे जातितः मराठे नव्हत. शिंपी जातीचे गृहस्थ आहेत. मराठेशाहींत मराठ्यांच्या जोडीनें अनेक मराठेतर बेडकांनी स्वराज्याकरितां सर्वस्वावर तुळशीपत्रें ठेवली; परंतु त्यावेळीं कोणत्या शिंप्यांनी त्या आत्मसमर्पणाच्या यज्ञांत आपापल्या आहुती दिल्या, त्याची यादी बागड्यांनी पुढें आणावी, अशी आमची विनंति आहे. महाराष्ट्रांतले मराठे नामर्द आहेत, कुचकामाचे आहेत किंवा बेवकुब आहेत अशा प्रकारचे क्षुद्र उद्गार आजपर्यंत कोणीहि काढलेले नाहींत. महाराष्ट्राच्या क्षात्रतेजाचा अभिमानास्पद पाठकणा मराठा समाजच आहे. मराठ्यांचा भाला आतां युरोपांतहि गाजलेला आहे. परंतु त्या भाल्याला मराठेतर जातींच्या निंदेचें पाणी चढवून स्वत:च्या प्रतिष्ठेचें पाणी पाणीदार बनविण्याचा हा बागड्यांचा यत्न अत्यंत निंद्य व चिळस आणणारा आहे. असल्याच बेजबाबदार बेगडी पुढाऱ्याच्या बेगुमान बरळण्यामुळें ब्राम्हणेतर संघांत तिरस्करणीय जातिद्वेषाचे किडे अलीकडे बुजबुजाट करू लागले आहेत. बागड्यांनी मराठेतर जातींना बेडकांची उपमा देऊन काय सिद्धि मिळविली हें आम्हांसारख्या बेडकांना उमजणें कठीण आहे. मात्र मराठ्यांच्या खांद्याला खांदा भिडवून महाराष्ट्रातल्या लक्षावधि बेडकांनी केलेल्या आत्मयज्ञांत एकहि शिंपी खेंकडा सांपडणार नाही, हें मात्र आम्हीं बागड्यांना बजावून ठेवितों. असल जर्मनसिल्व्हरी तोंडपाटिलकीमुळें मराठेबांधव हुरळून हरभऱ्याच्या झाडावर चढतील, आणि ते या सुई-दोरा बहाद्दराला आपला कुलदेव म्हणून डोक्यावर

घेऊन नाचतील अशी जर बागड्यांची समजूत असेल तर ती फार चुकीची आहे. आजचा जागृत मराठा समाज बागड्यांसारख्या जातिद्वेषप्रसारक कात्रीबहाद्दराच्या ओंजळीने पाणी पिऊं लागेल तर आत्मोद्धाराच्या शर्यतीत तो तोंडघशीं पडल्या शिवाय राहणार नाही. ब्राम्हणेतर संघांत असलेच वेडेबागडे बेगडी पुढारी बरेच बागडत असल्यामुळें त्यांच्या चळवळीची तडफ अलीकडे झीरो डिग्रीकडे कलंडत चाललेली आहे, असा स्पष्ट इशारा देणे आवश्यक आहे. आतां, ब्राम्हणेतर संघात जातिद्वेष बोकाळतो आहे, असें आम्ही एकदा विधान केल्यामुळें नांके फेंदारणाऱ्यांनी श्री. बागड्यांच्या विधानावर थोडा विचार केल्यास बरें!

प्रगमनशीलता मेली नाहीं

कायस्थ प्रभूंच्या गतेतिहासांमुळें हा समाज प्रगमनशीलतेचा पुरस्कर्ता असा त्याचा लौकिक आहे. सद्य:स्थिति याच्या उलट आहे. तथापि प्रगमनशीलतेचा अंकुर अगदींच कांही करपला नाहीं असा प्रत्यय पटविणारीं अनेक उदाहरणे घडून येत आहेत. वैद्य संशोधिक शुद्ध वैदिक विवाह विधीचा पुरस्कार करण्यांत याच समाजानें आघाडी मारिली आहेत. विधवाविवाहाचे बाबतींत नैतिक धैर्यानें अनेक विधुर पुढे येत आहेत. मिश्रविवाहांतसुद्धा हा समाज मागे घेणार नाहीं अशी चिन्हेंहि दिसत आहेत. नुकतेंच श्री. देशमुखांनी विधवाविवाहाचे धारिष्ट केले. गेल्या पंधरवड्यांत आमचे परममित्र श्री. गोविंदराव विनायक ताम्हणे यांनी डॉ. बापूसाहेब वैद्य (श्री बाळासाहेब वैद्य यांचे वडील बंधू) यांची बालविधवा कन्या श्री. रेवूबाईचे पाणिग्रहण केलें. श्री. रेवूबाईंचा प्रथम विवाह वयाच्या दहाव्या वर्षी झाला व दोन महिन्यांच्या अवधींतच त्यांना वैधव्य प्राप्त झालें. असली हजारों उदाहरणे अनेक समाजांत घडली आहेत व घडत आहेत. यासाठीं श्री. ताम्हणे यांच्या मनोधैर्याची अनेक माणसें निश्चयाने पुढें आलीं पाहिजेत. प्रबोधन श्री. ताम्हणे यांचे अभिनंदन करीत आहे. जगदीश त्यांचा नूतन संसार सौख्यपूर्ण करो.

□□□

एन ४००६--३१

अग्रलेख

मन गुलाम म्हणून मानव गुलाम !

हिन्दु जनांची आजची आणि पूर्वीची स्थिती यांत विलक्षण अतंर पडले आहे. पूर्वीचे जेते हिन्दु आज जित झाले आहेत. पूर्वी ते स्वयंनिर्णयी होते, आज खुद्द हिंदुस्थानांत हिंदूना हिंदूच विचारीत नाहीत; मग इतरांची कथा काय? आज ते परदास्य-कर्दमी लोळत आहेत. पूर्वी हिंदूनी व्यापाराच्या जाळ्यांत सारी ज्ञात दुनिया हस्तगत ठेविली होती; आज परदेशांतून आगकाडी आल्याशिवाय त्यांच्या घरांतील चूल पेटत नाही. पूर्वी हिंदू आर्यांनी साऱ्या जगाला धर्म शिकवून आत्मज्ञानाची ओळख पटवून दिली; आज इतर उपऱ्या धर्माच्या परचक्राखाली हिंदुधर्म गतप्राण होऊन पडला आहे. पूर्वी हिंदुजन कट्टे लोकसंग्रही होते. भेटेल त्या मुमुक्षूला उपनयन विधिपूर्वक आपल्या संघांत सामील करून घेत. आजचा अफाट हिंदु समाज ठिकठिकाणच्या भिन्नभिन्न संस्कृतींच्या लोकसंग्रही संगमाचा परिणाम आहे. आह्मीं हिंदुजन अशी समजूत करून चा आहोत की तीनचार हजार वर्षांपूर्वी जसे आह्मी होतो तसेच आज आहों. आमच्या हिंदुत्वाचा पिंड अनेकविध संस्कृतींच्या संमिश्रणाने आहे, ही इतिहास प्रसिद्ध गोष्ट आजच्या आत्मविग्रही हिंदूंच्या गळींच उतरत नाहीं. क्षत्रिय ब्राह्मण वैश्यादि चतुर्वर्गव्यवस्थेत शक बर्बर सिथियन हूणांदिकांनाहि निःसंकोच सामील करून घेणारे हिंदु, आज लक्षावधि जाती पोटजातींच्या भेदाचे व उच्चनीचतेचे आत्मविनाशक खेळ खेळत आहेत. आढळेल त्या परकी संस्कृतीला आत्मसात् करून पचनी पाडण्याची पाचक प्रवृत्ति आज आह्मांला पारखी झालेली आहे. समाजधर्म व विवाहबंधन यांविषयी अनेक खोडसाळ व भ्रष्ट कल्पना प्रसार पावल्यामुळे आर्यांच्या सुप्रसिद्ध प्रजाजनन तत्वाला आजचे आर्य हिंदु सर्वस्वीं मुकले आहेत; आणि त्यामुळे अल्पायुषी, निःशक्त व निर्बुद्ध अशी अनार्य प्रजेची संख्या निष्कारण वाढत आहे. 'अनार्य' म्हणण्याचे कारण न तु एव आर्यस्य दासभावः जो कोणी आर्य असतो तो गुलाम नसतो. आजचे हिंदु जर गुलाम आहेत, तर ते आर्यत्वाला पूर्ण मुकलेले आहेत; आणि त्यामुळे त्यांना आर्य म्हणवून घेण्याचा अधिकार नाही, ते आर्यच नव्हेत. सारांश, आजच्या हिंदूंचा प्रत्येक बाजूने अधःपात व ऱ्हास होत आहे आणि ज्याअर्थी ही जाणीव आता तीव्र होत आहे, त्याअर्थी हिंदूंच्या सर्वांगीण पुनरुज्जीवनासाठी सर्व जागृत हिंदु भगिनी बांधवांनी आपल्या मनाचें प्रबोधन कां करावें याची थोडी रूपरेषा आजच्या लेखांत दाखविण्याचे योजिलें आहे.

आजची घटका मोठी आणीबाणीची आहे. आतां वादविवाद व चर्चा करायला अवकाशच नाहीं. शुभाऽशुभाचा निर्णय ठरविणाऱ्या मुहूर्ताची शोधाशोध करायला आतां मुहूर्त नाही. श्रुतिस्मृतींच्या दाखल्यांवर आता एकाहि हिंदूला टिकाव धरून जगता येणे शक्य नाहीं. चातुर्वर्ण्याची ती कुझकीं पुराणें व प्रवचनें हिंदूंच्या फुटक्या दैवाचे सांधे अतःपर मुळींच जुळवू शकणार नाहीत. शूद्रांनी-गुलामांनी गजबजलेल्या हिंदु समाजाचे पुनरुज्जीवन ब्राह्मण्यसंरक्षणाने होणें नाहीं. ब्राह्मण्य मरून आज इतकी शतके झाली, तरी त्याचे भूत, हिंदु समाजाच्या गळ्यांत अडकविलेला गुलामगिरीचा फांस, असून हे घट्टघट्ट आंवळीतच आहे. ब्राह्मण्य जगेल तर हिंदुत्व ठार मरेल. हिंदुत्व - आर्यांचे आर्यत्व जगावें, नुसत्या कुत्र्या मांजराच्या जिण्याने जगणे नव्हे, 'आर्य कधींहि कुणाचा गुलाम होणार नाहीं' या स्पिरीटनें जगावें, अशी जर जागृत हिंदूची महत्वाकांक्षा असेल, तर ब्राह्मण्याच्या भूताला पहिल्या प्रथम कायमची मूठमाती दिली पाहिजे. ब्राह्मण्य आणि शूद्रत्व या दोन क्षुद्र प्रवृत्तीमुळेच हिंदूंचा आणि त्यांच्या आर्यतेजाचा अधःपात झाला. आतां क्षात्र आणि वैश्य वृत्तीचा भरपूर विकास झाल्या शिवाय हिंदुस्थानचा, हिंदुसमाजाचा आणि हिंदुधर्माचा तरणोपायच नाहीं. ब्राह्मण्याच्या मुंडक्याला शूद्रत्वाचे पाय-तळवे चिकटलेल्या स्मृत्योक्त विराट पुरुषाला जिवंत समाधी देऊन त्या ऐवजी टरारलेल्या मनगटाचे क्षात्र तेज आणि पीळदार मांड्यांचें वैश्य तेज केंद्रित झालेल्या नव्या राष्ट्रदेवाची आपण प्राणप्रतिष्ठा केल्याशिवाय हिंदूंच्या पुनरुज्जीवनाची आशा करणें व्यर्थ आहे.

पुनरुज्जीवनाची आकांक्षा जागृत झालेल्या प्रत्येक व्यक्तीचा, समाजाचा किंवा राष्ट्राचा अधःपात आजपर्यंत आत्मनिरीक्षणानेंच टाळलेला आहे. आत्मनिरीक्षणातच आत्मविकासाची गुरुकिल्ली आहे. मात्र हें निरीक्षण अत्यंत कसोशीने तसेच निस्पृहपणे करावे लागते. त्यांत कोणाची- स्वतःची सुद्धां भीड मुर्वत ठेवता येत नाही. हिंदू समाजाच्या वर्तमान अधःपाताची कारणें शोधीत शोधीत अगदी मुळाशी गेलें की आपल्याला हाच निर्णय द्यावा लागतो कीं या या समाजाची कौटुंबिक स्थिती सर्वस्वी बिघडलेली असून, यांतील प्रत्येक व्यक्तीमात्राचे मन गुलाम बनलेले आहे. ते आपोआप काही कारणांनी बनले असो, वा कोणी मुद्दाम ते तसे बनविलेले असो, हिंदूंच्या मनाची मुंडी पिरगाळलेली दिसत आहे. अशिक्षितांना वगळले तरी शिक्षितांतहि जिवंत मनाच्या अस्तित्वाची चिन्हें दिसून येत नाहींत. दयाळू माबाप इंग्रेज सरकारने उच्च शिक्षणदानाची पाणपोयी उघडल्या दिवसापासून आजदीनतागायत लक्षावधि हिंदु तरुणांनी तींतून धो धो वहाणारे 'वाघिणीचे दूध' घटाघटा प्राशन केलें. सहस्रावधि पदवीधरांची आसेतुहिमाचल गचडीच गचडी उडाली. आजपर्यंत शेकडों लोकांनी स्वातंत्र्यवादाची पुराणें झोडून घसे कोरडे केले. हिंदुस्थानच्या कोंदट हवेत हे वाघिणीचे दूध नीट पचनी पडत नसावे म्हणून कित्येकांनी आंग्ल क्षेत्राच्या व पाताळ लोकच्या वाऱ्या केल्या. फेफट्या जपान्यांच्या कपाळाला कपाळ घासून तरी आपले नाक वर होईल या आशेनें कित्येकांनी त्यांच्याहि शागिर्दीची कसरत केली. मिशाळ जर्मनांशी सलगी करून तरी आपल्या मिशांचे आंकडे वर चढतील या भावनेनें कित्येकांनी बर्लीनपुढे आपलीं मस्तकें लीन केलीं. पण अखेर काय? या सगळ्या सालंकृत पंडितमन्यांच्या कर्तबगारीचा ओघ अखेर सरकारी किंवा निमसरकारी हमालखान्यांकडेच पाघळत गेला? पाश्चात्य पंढरीची वारी करून परत आलेल्या वारकऱ्यांनी प्रथम काही दिवस देशोन्नतीबाबतींत रगड गप्पा झोडल्या कीं पुढें त्यांचें नांवसुद्धा कोठें ऐकू येंत नाहीं. समाजोन्नतीच्या बाबतींत हीच रड.

एन ४००६--३१अ

प्लेटोचे रिपब्लीक चावलें, बर्कचा स्वातंत्र्यवाद गिळला, मेकॉलेला नखशिखांत पचनी पाडला, गिबनला पेपरमिठाप्रमाणें चघळला, इंगरसॉलला आईसक्रीमसारखा मिटका मारीत खाल्ला आणि आर. पी. ए. सीरजच्या लेकी प्रभृतीचा सडेतोड विवेकवाद सुपारीसारखा पुरवून पुरवून बत्तिशीखालीं रगडला, तरी हिंदु हा अखेर कोरडा ठणठणीत 'अगदींच हिंदु' असें कां व्हांवे? अमेरिकेच्या स्वतंत्र वातावरणात असे तोपर्यंत जातिभेदावर गुरगुरणारे आणि स्त्रियांच्या गुलामगिरिविरुद्ध आकांडतांडव करणारे तरुण हिंदु, विद्वत्तेचे सवंग ताम्रपट पटकावून हिंदुस्तानांत परत येतांच जातिभेदच नव्हे तर, जातिद्वेषाचीहि धुळवड खेळतात आणि स्त्रीपुरुषांच्या व्यवहाराकडे 'लिंगायत'दृष्टीनें पहातात! याचें कारण हेच की त्यांच्या मनाची जिवंत संवेदनाच नष्ट झालेली असल्यामुळे त्या गुलाम मनाच्या प्रबोधनाचे कार्य टिकाऊ होत नाहीं. कोणताहि अशिक्षित सुशिक्षित हिंदू घ्या, आकाशांतल्या ग्रहांच्या खऱ्याखोट्या भल्याबुऱ्या दृष्टीला कसायखान्यांतल्या बोकडाप्रमाणें थरथर थरथर कांपत असतो. सामाजिक क्षेत्रांतल्या अन्याय्य जुलमांबद्दल जीर्णमतवाद्यां इतकाच तो उदासीन व बेपर्वा असतो. कसल्याहि सुधारणेविषयी त्याची बालंबाल खात्री पटलेली असली, तरी ती स्वतः आचरणांत आणण्याची त्याला धमक नसते. गोऱ्या-पुढें जसा काळा, तसा बहुजनांच्या रागालोभापुढें तो क्षणोक्षणी लेंड्या गाळीत असतो. आजचा हिंदु स्वराज्याच्या, लोकशाहीच्या किंवा समतावादाच्या कितीहि रगड गप्पा मारो, अंतर्यामी तो क्षुद्र स्वार्थानें सडलेला असल्यामुळें, त्याचें व्यावहारीक वर्तन नेहमी या तीन तत्त्वांशी विरुद्ध असेंच असते. त्यांच्या मुर्दाड मनाला गुप्त किंवा उघड होणारी भ्रूणहत्या खुशाल मानवते, पण बालविधवांच्या पुनर्विवाहाला संमति देववत नाही. जातींच्या उच्चनीचतेची पुराणोक्त मिजास मारणाऱ्या एखाद्या वेदशास्त्रसंपन्नानें आपल्या राखीव प्रेमाची तपेली एखाद्या शूद्रिणीच्या हवालीं केली तरी 'हूं! जग हें असेंच आहे.' एवढ्या उद्गारांवर त्या गोपाळकाल्याकडे दुर्लक्ष करणारे हिंदू मिश्रविवाहाच्या बिलाविरुद्ध बोंबाबोंब करतांना हातातोंडाचीहि पर्वा कशी ठेवीत नाहींत, याचीं नाटकें चालू घडीला सर्वत्र चालूं आहेत. गुलाम हिंदु मनाला व्यभिचार परवडतो पण धडधडीत विवाह मानवत नाहीं. तरीहि 'हिंदूचा विवाह हा संस्कार आहे, करार नाहीं.' अशी त्याची टकळी सुरूं असतेच! विचारांची परासीमा झाली, विवेकाची खात्री पटली, तरी उठवणीस आलेल्या बैलाप्रमाणें आचाराची बैठक हालत नाहीं, याचें मूळ हिंदूंच्या गुलाम मनातच सांपडतें. ओठांत एक आणि पोटांत एक, जनांत एक आणि मनांत एक, अशा आत्मप्रतारणेची हिंदूना जडलेली व्याधि त्यांच्या मनाच्या गुलामगिरीचीच द्योतक आहे. अर्थात् सडक्या मनांत घर करून बसलेल्या शेकडों व्यसनांनी हिंदु समाज आरपार खिळखिळा होऊन बसला, तर त्यात निसर्गाविरुद्ध असें काहींच नाही. प्राचीन इतिहासाच्या हेमगर्भाचें एखादें चाटण कधिंकाळी घडलेंच तर तात्पुरत्या चैतन्याचीं चिन्हें दिसतात, पण तीं टिकाऊ होत नाहीत, आला वारा वारा, गेला वारा, कोण कोणाचा सगा सोयरा? असेंच नेहमीं घडतें. स्थिति अतःपर अशीच ठेवणें हिंदूच्या अस्तित्वाला घातक आहे. मुसलमान समाज कितीहि अशिक्षित व क्षीण संस्कृतीचा असला तरी त्याची संघटना आज जोरावर आहे. पारशी क्रिश्चन यहुदी वगैरे समाज जन्मतः हिंदीच असले तरी त्यांची वटवाघुळवृत्ति केव्हां कोठें भरकटेल याचा नेम नाही. निदान आज तरी ते नोकर-शाहीच्याच बुटांत आपल्या दैवाचे पाय आडकवून बसले आहेत. 'हिंदी देशबंधू' या नात्यानें ते कधीकाळी हिंदूंच्या खांद्याला खांदा भिडवतील ही गोष्ट सध्या तरी अशक्य कोटींतील आहे. तात्पर्य, हिंदूच वर उभे राहतील, आपल्यातल्या भेदांचा

नायनाट करून एकदिल होतील आणि नव्या मनूच्या वाऱ्याप्रमाणे आपल्या धार्मिक सामाजीक व व्यावहारीक वर्तनाची शिडें फिरवतील, तरच त्यांचा तरणोपाय आहे. एरवी, हिंदूचें अस्तित्व आज भयंकर अशा नियतिचक्रांत चुरडून ठार होण्याचा प्रसंग येऊन बेतला आहे, अशी निर्वाणीची हांक मारणें प्रबोधनाचें कर्तव्य आहे. ही हांक कोणाला योग्य वाटो वा अयोग्य वाटो; कटु वाटो वा गोड वाटो; मोकळ्या मनानें हृदयाच्या तिडका हिंदु भगिनी बांधवांना शक्य तितक्या स्पष्टोक्तीनें निवेदन केल्याशिवाय प्रबोधन रहाणार नाहीं. हिंदूंच्या हिंदुत्वावरचा आजचा प्रसंग कितीहि प्राणांतिक असला तरी जगाच्या इतिहासात असले प्रसंग अनेक राष्ट्रांवर आले व गेले. त्या प्रसंगी आपल्या गुलाम मनाचें प्रबोधन त्यांनी कसे केलें, याचा इतिहास आपण पाहिला पाहिजे. अगदीं अलीकडचें जपानचें उदाहरण आपल्या परिचयाचें आहे. त्यावरून हिंदु मनाचे प्रबोधन आपणांस कसें करतां येईल, हें पुढील अंकापासून निवेदन करण्यात येईल.

□□□

स्फुट विचार

कायस्थ-मराठा मिश्रविवाह

गतांकी एका स्फुटांत ध्वनिंत केल्याप्रमाणे एक मिश्रविवाह नुकताच घडून आला. सुप्रसिद्ध कर्ते सुधारक श्री. विठ्ठल गणेश उर्फ माईसाहेब प्रधान M.A. I.T. यांची ज्येष्ठ कन्या कुमारी इंदिराबाई या वधू असून, वराचे नाव श्रीयुत जगन्नाथ शिवराम सावंत असे आहे. वर आणि वधू दोघेही चांगले प्रौढ व सुशिक्षित आहेत. वधूचे शिक्षण इंटरमिजिएट पर्यंत झाले असून, श्री. सावंत हे यंदा बीए (ऑनर्स) च्या परीक्षेला बसले आहेत. हा विवाह गेल्या १७-०४-१९२३ला मुंबई हायकोर्टात सिविल मॅरेज ॲक्टाप्रमाणें रजिष्टर झाला. वधुवरांनी प्रस्तुत सुधारणेच्या क्षेत्रांत मोठ्या निश्चयानें पाऊल टाकण्यांत जें नीतिधैर्य दाखविलें, त्याबद्दल प्रबोधन त्यांना अंतःकरणपूर्वक धन्यवाद देत आहे. जगदीश जगन्नाथ-इंदिरेचा संसार सौख्यानंदपूर्ण करो !

हिंदु समाजांत अनेक सुधारणांची आवश्यकता आहे. त्या घडून याव्या असे पुष्कळ विचारवंत लोक नेहमी मोठ्या आवेशानें बोलतात व लिहितात. परंतु प्रत्यक्ष आचरण करण्यास मात्र कोणी धजत नाही. समाजसुधारकांची 'दिव्यें बोलभांड, राजकीय सुधारकांच्या दिव्यांपेक्षा अत्यंत कठोर व भयंकर असतात. त्यांना तोंड देण्याचे काम निवडक निधड्या छातीच्या निश्चयी स्त्रीपुरुषांशिवाय इतरांकडून होणेच शक्य नाही. अशा निवडक धैर्यवान समाजसुधारकांच्या वर्गात श्री. भाईसाहेब प्रधान यांची गणना पूर्वी झालेली आहे, आणि त्यांनी आजपर्यंत विधवाविवाह व मिश्रविवाह या दोन सुधारणांत प्रत्यक्ष वर्तनाची सक्रीय सुधारणा घडवून आणल्यामुळे त्यांच्याव स्वजाति न परजातियांनी केलेल्या गलिच्छ निंदेच्या हल्ल्यांचा इतिहास लोकविश्रुत आहे. श्री. भाईसाहेबांच्या निंदेचा डंका विशेष जोरजोराने बाजाविण्यांत परजातीयांपेक्षा त्यांच्या स्वजातीयांनीच नव्हे, खुद्द त्यांच्याच हाडा रक्तामासाच्या कुटुंबियांनीच विशेष पुढाकार घेतला होता, हा इतिहास प्रत्येक समाजसुधारकाने काळजीपूर्वक अभ्यास करण्यासारखा आहे. कायस्थ प्रभूंत विधवाविवाहाचा प्रघात नेटाने सुरू करण्याचा अग्रमान जसा भाई साहेबांनी मिळविला, त्याचप्रमाणे हिंदु राष्ट्राच्या ऐक्याला विरोध करणाऱ्या जातिभेदाच्या नरड्यावर टाच देणांच्या मिश्र विवाहाच्या सुधारणेचा अग्रमानहि त्यांनीच मिळविला; आणि आता त्यांच्या सुशिक्षित कन्येनें आपल्या पित्याचे अनुकरण करण्यांत दाखविलेली नैतिक धैर्याची धडाडी पाहून प्रत्येक विवेकी राष्ट्रहितेच्छूचें

अंतःकरण कौतुकानें उचंबळल्याशिवाय खास रहाणार नाही. प्रत्येक सुधारकाच्या सुधारणा प्रियतेंतल्या खऱ्याखोट्या व्रणांवर चोंचा मारून कावकाव करणाऱ्या कावळ्यांच्या कोलाहलाबद्दल अर्थात आमचे कांहीं म्हणणें नाही.

संस्कृतीचा संगम पाहिजे

हिंदु समाजातील जातिभेदाचे परिणाम आज त्यांच्या सर्वांगीण गुलामगिरीला कारण झाले आहेत, ही गोष्ट किंवा नवमतवादी दोघांनाहि पठलेली आहे. जातिभेदांची काटेरी कुंपणें आपल्या भोवती घालून घेऊन, लक्षावधि जाती कुझक्या पाण्याच्या डबक्या प्रमाणे ठिकठिकाणी अलग होऊन पडलेलीं आहेत. बाहेरचें पाणी आंत येता नाही व आंतले पाणी कुझून सुकत आहे. कांही कांही जातींच्या लोकसंख्या पाहिल्या तर हसावें की रडावें हेंच समजत नाहीं. जातीचें नांव पहावें तर थेट सूर्यवंशी आणि चंद्रवंशी; पण या सूर्यचंद्राच्या वंशजांची लोकसंख्या किती ! तर म्हणे १२०० ते १८००!! गुजराथेंत तर काही काही जातीचा व्याप अवघ्या १०-१२ घरांपुरताच आढळतो. विशेषतः हे डबक्यातले बेडूक मामा आपल्या संस्कृतीच्या आणि रक्ताच्या पावित्र्यांच्या जेव्हा वल्गना करतात, तेव्हा मात्र त्यांची कीव येते! सुप्रजाजननशास्त्राविषयी आजचा हिंदु समाज अत्यंत उदास व अज्ञानी आहे. संस्कृतीच्या ब रक्तशुद्धीच्या भलत्याच घाणेरड्या कल्पना त्याच्या पिंडी ब्रह्मांडी झोंबल्यामुळें, तद्विषयक शोध व विचार करण्याची त्याची बुद्धि सर्वस्वी लंगडी पडलेली आहे. गेल्या ३०० वर्षांचाच इतिहास पाहिला तर हिंदुसमाजाच्या शोचनीय फाटाफुटीला व तद्भुत गुलामगिरीला त्यांच्यातील परस्पर भिन्न भिन्न संस्कृतींचा संग्रामच कारण आहे. संस्कृतीचा संगम झाल्याशिवाय राष्ट्रीय सामाजीक व नैतिक गुलामगिरीचा नायनाट होत नसतो, हे तत्त्व कोणाच्या गळी उतरत नसल्यामुळें, सध्या प्रत्येक जातीच्या विवाहबंधनाच्या रीतीभातीचा विचार केला तर म्हणण्यास हरकत नाहीं कीं प्रत्येक वधुवराच्या रक्तांत सख्या भावाबहिणीच्या रक्तापेक्षा विशेषसा काही फरक नसतो. अर्थात् साम्राज्य नेतृत्वाची जी एक विशेष विजयाकांक्षा जिवंत रक्तांत सणसणत असते, ती या मृतरक्तांत शिल्लक उरत नाही. आज राष्ट्रैक्याला व सामाजीक उन्नतीला विरोध करणारा जातिभेद याच नासक्या रक्ताचां एक नायटा आहे. नायटा म्हणण्यापेक्षा खवडा आहे. हा खवडा मिश्रविवाहाशिवाय इतर कोणत्याहि उपायाने नष्ट होणे शक्य नाही, एवढाच इषारा सध्या पुरे. संस्कृति, रक्तशुद्धि हे आजकाल नुसते बोलण्या लिहिण्याचे शब्द होऊन बसले आहेत. वाटेल तो चारगट लेखक व वक्ता त्यांचा मुबलक उपयोग करतो. पण काळजीपूर्वक त्या विषयाचा अभ्यास मात्र कोणी करीत नाहीं. असे होऊं नये. प्रत्येक विवेकी हिंदु सेक्शुओलॉजी व युजेनिक्स या विषयांवर प्रसिद्ध झालेलें व होत असलेले इंग्रजी वाङ्मय नीट मननपूर्वक तुलनात्मक दृष्टीने अभ्यास करील, तर आमच्या विधानांची खरी किंमत व कळकळ त्याच्या प्रत्ययाला येईल.

जातिभेदावर मिश्रविवाहाचाच तोडगा

अखेर लागू पडणार आहे. बेटीव्यवहार व रोटीव्यवहार यांचीहि जरूरी आहे. परन्तु आचाराची गति येथेंच गिरक्या मारीत ठेवणारे लोक प्रागतिक नव्हेत; लफंगे होत. जातिभेद एकदम मोडत नाही, ही गोष्ट कितीहि खरी असली, तरी पोटजाती मोडण्यांच्या कामीहि फारशी प्रगति दिसून येत नाही. खरे म्हणावयाचे तर सध्यां जातिभेदाविरुद्ध कोणी कितीहि निषेध केला, तरी प्रत्येकजण जातिभेदच वृद्धिंगत करीत आहे. एवढा मोठा व्यापक धोरणावर निघालेला ब्राह्मणेतर संघ, पण त्यांतसुद्धा जातिभेदाची खरूज अखेर चिघळू लागलीच, ब्राह्मणांकडे पहावें तरी तीच रड। ब्राह्मणेतर संघाला तोंड देण्यासाठी - अखिल ब्राह्मणजातींची संघटना करण्यास अवतरलेला इस्लामपूरचा ब्राह्मण ज्या अंकांत प्रबोधनावर जातिभेदाच्या दृष्टीचा आरोप करतो याच अंकात पळशे प्रकरणी मुंबईस उद्भवलेल्या ब्राह्मणांतीलच जातिभेदामुळे कष्टी होतो ! सारांश, ब्राम्हण काय किंवा ब्राम्हणेतर काय, दोघेही जातिभेदाच्या नरकांतले किडे बनले आहेत. अस्पृश्योद्धार, जातिभेदनिरास वगैरे शब्द गोरगरीबांना ठकविण्याचे स्वार्थसाधूंचे मंत्र आहेत. प्रत्यक्ष कार्य ब्राम्हण करीत नाहीत आणि ब्राम्हणेतरहि शाब्दिक चर्चेपुढे पाऊल टाकण्यास समर्थ नाहीत, अशा स्थितीत प्रस्तुत घडलेला प्रधान-सावंत विवाह एका नवीन मन्वंतराचा द्योतक होईल, अशी आमची अपेक्षा आहे. मराठा आणि कायस्थप्रभु हे दोन समाज-निदान शिवकाळापासून-बरेच जवळजवळ आले आहेत. त्यांची संस्कृति भिन्न असली, तरी तीत अन्योन्यावलंबित्वाचा प्रागतिक चाणाक्षपणा पुष्कळ आहे. म्हणूनच मराठेशाहीत या दोन समाजांनी एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून राष्ट्रसेवेची पराकाष्ठा केली. मराठ्यात शरीरसामर्थ्य मुबलक, तर कायस्थ बुद्धिसामर्थ्यात समृद्ध; मराठे एकमार्गी तर कायस्थ धूर्त आणि अनेकमार्गी, मराठे फक्त तलवारबहादुर तर कायस्थ कलम-समशेर-प्रवीण दोघांतही निःस्वार्थबुद्धीनें राष्ट्रकार्य करण्याची आवड, या त्यांच्या भिन्न, परन्तु परस्पर-पाचक संस्कृतीमुळेच भटकाळी त्यांच्या हातून अनेक वर्णनीय कार्य झाली व पुढे होतील! अशा या दोन समाजाचे एकीकरण मिश्रविवाहाच्या वाढत्या संख्येने होत गेल्यास हिंदुस्थानाच्या बोकांडी बसलेल्या जातिभेदाचे उच्चाटन करण्याचा अग्रमान हे समाज खात्रीनें पटकवितील यांत मुळींच संदेह नाहीं.

जातिभेद कायम ठेऊन स्वराज्य लाभणार नाहीं

नुकताच पुण्याच्या शिवाजी मंदिरात शिवरायांचा संगमरवरी पुतळा स्थापन करण्यात आला. त्याबद्दल अभिनंदन करतांना मॉडर्न रिव्यूच्या मेच्या अंकांत संपादकांनी प्रो. जदुनाथ सरकारच्या शिवाजी आणि शिवकाल नामक इतिहासातील शिवचरित्र पर काही उतारे उद्धृत करून, 'शिवाजीच्या चरित्रापासून हिंदूंना उपदेश' पर इषाऱ्याचें एक स्फुट लिहिलें आहे. मराठी राज्य कां टिकलें नाहीं? या प्रश्नांची प्रो. जदुनाथांनी केलेली मीमांसा प्रबोधनाच्या चालूं वर्षांच्या ३ऱ्या अंकांत (पृ.१८)

आम्ही प्रसिद्ध केलेली वाचकांना स्मरत असेलच. मॉडर्न रिव्यूकारांनी तोच उतारा रवींद्रनाथ टागोर यांच्या तद्विषयक उद्गारांसह आतां इषाऱ्यादाखल प्रसिद्ध केला आहे. डॉ. टागोर म्हणतात, ''देशावर एका तात्पुरत्या उत्साहाची वावटळ येते आणि आपण कल्पना करतों की देश आतां एकजीव झाला. परंतु आपल्या सामाजिक देहाला पडलेली छिद्रें आणि भेगा आपलें कार्य गुप्तपणें करीतच असतात. अर्थात् (अशा स्थितींत) एकादें उदात्त ध्येय बराच काळ टिकवून धरणें आपल्याला शक्य नसतें. ही छिद्रें आणि भेगा कायम ठेवण्याचा शिवाजीने यत्न केला. आचारभिन्नता आणि जातिभेदामुळे उत्पन्न झालेली सामाजिक उदासीनता हीच ज्या हिंदु समाजाची प्राणज्योति, त्या समाजांला या मोगलांच्या हल्ल्यापासून वांचविण्याची त्यानें उमेद धरली. भिन्नजिनसी समाजाला सर्व हिंदुस्थानभर विजयी करण्याची त्याची इच्छा होती. त्यानें वाळूचे दोर वळले. अशक्याला शक्य करण्याचा (अनाठायीं) यत्न केला. जातीभेदांनी सडलेल्या व आपापसांत धुसफुसणाऱ्या समाजाकडून हिंदुस्थानासारख्या अवाढव्य देशावर स्वराज्य स्थापण्याचे कृत्य कोणत्याहि माणसाला शक्य नाही; इतकेंच नव्हे, तर ते विश्वाच्या नियमांविरुद्धच कर्म आहे.'' यावर खुद्द संपादकीय विचार व्यक्त करताना बाबू रामानंद म्हणतात, ''विधायक कार्यक्रमांत अस्पृश्यता निवारणाची बाब प्रामुख्यानें घालण्यांत श्री. एम. के. गांधी यांनी केवळ माणुसकी किंवा साधुवृत्ति दाखविली असें नव्हे, तर खरीखुरी राजकारणी दूरदृष्टि दाखविली, असें जे आम्ही म्हणतो तें या कारणासाठीच. अस्पृश्यतानिर्दाळणचसें काय पण जातीच्या श्रेष्ठ कनिष्ठपणाच्या समजुतीवर उभारलेल्या झाडून साऱ्या चालीरीती आणि सामाजिक आचारविचाराचें जो कोणी निर्दाळण करील, तोच हिंदूचा तारक होणार आहे.'' विवेकी सज्जनांनी या उद्गारांचा विचार करून आचाराला चालन द्यावे.

हा अखिल हिंदुसमाजाचा रोग आहे

इस्लामपूर जि. सातारा येथील भारतमाता साप्ताहिकांत (२० मे. १९२३) खालील विचार प्रगट आले आहेत.

पुरुषांची रासन्हाणी : दादरचे प्रबोधन पत्र हुंडाराक्षसाचा नायनाट करण्यास अवतीर्ण झाले आहे. हुंड्याबद्दल त्या पत्रानें चालविलेली प्रभुसमाजापुरती का होईना चळवळ अत्यंत जरुरीची आहे, पण त्यांनी ती केवळ प्रभुसमाजापुरतीच न ठेवता सार्वत्रिक करावी अशी आमची सूचना आहे. नुकतेंच एका लग्नांत वरपक्षाकडील पुरुषमंडळी बायकांप्रमाणे रासन्हाण्याचा सोहळा भोगण्यास कमी केलें नाहीं! वधू पक्षाकडील मंडळींनी वरपक्षाची ही हौस बांगड्या भरण्याकरिता कासार बसवून पूर्ण पुरी करावयास पाहिजे होती. पारतंत्र्यपंकांत रुतलेल्या रुतलेल्या हिंदुस्थाना! तुझें दुर्दैवाचे सोहळे अजून पुरे झाले नाहीत काय?''

हुंडा-विध्वंसन हें प्रबोधनाच्या अनेक ध्येयांतले एक ध्येय आहे. केवळ तेवढ्याच कार्यासाठी प्रबोधन अवतीर्ण झालेले नाही, हुंड्याच्या रक्तपिती इतकेच कितीक तरी घाणेरडे सामाजीक रोग

हिंदुसमाजाच्या काळजाला भिनलेले आहेत. त्यांचें उच्चाटन करण्यासाठी एकट्या प्रबोधनांनेंचसें काय, सर्व विवेकी वृत्तपत्रकारांनी, वक्त्यांनी व लेखकांनी एकजुटीने श्रमसाहस केले पाहिजे. हुंड्याचीच गोष्ट घ्या. प्रबोधनाचा अवतार होईपर्यंत काय हा सामाजीक रोगच अस्तित्वांत नव्हता? पण आम्ही हिंदुलोकच असे मुर्दाड व बेपर्वा आहोत की हाताजवळचें कार्य न करता, दूरच्या काल्पनीक हेतूसाठी जिवाचें रान करतों. आजवर सर्व विचारी वृत्तपत्रकारांनी हुंड्याविरुद्ध मोहीम चालूं ठेवली असती, तर कितीतरी कार्य झालें असते. बायकांप्रमाणे रासन्हाण्याची हिजडेगिरी भोगण्याइतके पुरुष रासम, खास बनले नसते! हुंडाविध्वंसक संघाची स्थापना अखिल हिन्दु समाजासाठींच केलेली आहे आणि संघाच्या स्वयंसेवकांत कायस्थ प्रभु तरुणांचा भरणा जरी बराच असला तरी सारस्वत, ब्राह्मण, मराठे, भंडारी वगैरे अनेक जातीच्या तरुणांत त्यांत प्रथमपासूनच समावेश करण्यात आलेला आहे. संघाच्या चळवळीविषयी लागणारी माहिती वाटेल त्या जातीच्या सुधारणेच्छूला पुरविण्यांत आली व येईल. सारांश, संघाने आपल्या कार्याची व्याप्ति एका विशिष्ट जाती पुरतीच आकुंचित ठेवलेली नाही; मात्र आपल्या जातींत ही चळवळ धिटाईनें चालविणारे मर्द तरुण पुढें येतील आणि तिला आमचे सर्व व्यवसायबंधु उत्साहाने हातभार लावतील, तर हुंडाविंध्वसनाचें कार्य बोलबोलतां यशस्वी होईल. सामाजिक सुधारणेला गौण ठरवून राजकीय सुधारणेच्या मार्गे लागल्यामुळे, सध्या अतो भ्रष्टस्ततो भ्रष्ट: अशी स्थिती प्राप्त झालेल्या हिंदुजनांनी अत:पर कल्पनेच्या वावड्या आणि चर्चेचा काथ्याकूट बंद ठेऊन, एकेका सामाजीक रोगाची हकालपट्टी करण्याचें प्रतिज्ञाकंकण हातीं चढवावें. नुसत्या स्वराज्याच्या वल्गनांनी आजपर्यंत कांही झालें नाही व पुढेंहि कांही होणार नाही.

कार्यकुशल श्री. रेलवे-मराठे

'रेलवे-मराठे' हें नांव आमच्या वाचकांना बरेंच चमत्कारीक वाटेल! परंतु सदर्न मराठा रेल्वेच्या कारभाराशी थोडासा परिचय झालेल्या इसमाला श्री. नागेशराव मराठे हे गृहस्थ कोण आहेत, याचा परिचय करून द्यावा लागतोच असे नाही. पुण्यापासून थेट बंगलोरापर्यंत मराठे हे नांव आतां श्रीमंत गरीब सर्व प्रकारच्या रेलवे प्रवाशांना अत्यंत आदरणीय व परिचित असें झालें आहे. म्हणून आम्ही श्री. नागेशरावांना रेलवे-मराठे असें सार्थ नांव दिले आहे. हिंदुस्थानांतल्या रेलवे कंपन्यांचा कारभार किती घाशीरामीनें चालतो, आणि तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना कंपनीच्या नोकरांकडून पदोपदी कसा उपमर्द व त्रास सहन करावा लागतो, याचा इतिहास आतां सर्वश्रुतच आहे या कामी जी.आय. पी.च्या दंडेली विरुद्ध चळवळ करणारे जसे श्री. जावडेकर, तसे सदर्न मराठ्याच्या कच्छपी श्री. नागेशराव मराठे रात्रंदिवस लागलेले असतात. श्री रेल्वे मराठ्यांची कार्यपद्धती इतकी मनमिळाऊ पण चिकाटीची, कायदेबाज पण आदरभावाची आणि विनयशील पण धडाडीची आहे कीं त्यांनी बेळगावास स्थापना केलेल्या रेल्वे मंडळाशीं सहकारिता करणें रेल्वे अधिकाऱ्यांवर अखंडरेल्वेवर तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या अनेक सोयी अप्रत्यक्ष अमलात आलेल्या आहेत व नित्य आणखी येत आहेत. गांव

स्टेशनचे एक्स्टेशनचे काम आज चालू आहे. पाणी पुरवठा सुधारला आहे. शौचकूपांची स्वच्छता झाली आहे. ३च्या वर्गाच्या उतारूंना वेटिंग रूम्समध्ये खुशाल निजतां येतें. (पूर्वी पहारेकरी पोलीस त्यांना रस्त्यावर हुसकून देऊन आपण स्वतः तेथे झोपत असत.) वगैरे पुष्कळ सुधारणा श्री. रेलवे-मराठ्यांच्या खटपटीने होत आहेत. रेलवे-मंडळाला पैशाचा मुबलक पुरवठा होईल, तर रेलवे मराठ्यांची निष्काम कार्यकुशलता अधिकाधिक यशस्वी होईल, हे सांगणे नको. प्रत्येक तिसऱ्या वर्गाच्या उतारूनें आपल्या हितकर्त्या रेल्वे मंडळाच्या फंदाला शक्त्यनुसार हात लावावा, अशी आमची कळकळीची प्रार्थना आहे. दसकी लकडी एकका बोजा!

ब्राह्मणाचा दृष्टिकोन

इस्लामपूर जि. सातारा येथें नवीनच प्रसिद्ध होऊं लागलेल्या ब्राह्मण नामक पत्रिकेंत (वैशाख शके १८४५) 'प्रबोधनकारांची दिशाभूल' प्रसिद्ध झाली आहे. त्याला बेळगांवच्या राष्ट्रवीरानें एका मुद्याबद्दल उत्तरहि दिलें आहे. ब्राम्हणी दृष्टिकोनच असा कांहीं चमत्कारिक की त्यांना सारें जग उलट्या पावलांनी चालत असल्याचे दिसतें. 'सार्वजनिक' संज्ञेखाली ब्राम्हणांनी केलेल्या खटपटींच्या झटापटीत जर ही दृष्टी, तर आता प्रत्यक्ष ब्राम्हणजातिविषयक संघटनेच्या धडपडीत या दृष्टीच्या बाहुल्या अगदीच उलट्या फिरू लागल्यास आश्चर्य मानण्याचे प्रयोजन नाहीं, अर्थात् ब्राह्मणांच्या आक्षेपांना उत्तर देऊन, त्याचा झोपेचे ढोंग केलेल्या इसमाला जागे करण्याच्या समजूत घालण्याचे काम, यातायातीइतकेंच सोपे आहे. परंतु ब्राम्हणपत्रिकेच्या विद्वान संपादकाच्या लोकविश्रुत विद्वत्तेच्या मुर्वतीखातरच आम्ही थोडक्यात प्रत्युत्तर देत आहोत. ब्राम्हणाचा पहिला आक्षेप हा की आम्हांला स्वतंत्र विचार करण्याची पात्रता नाही. सगळा हिंदुसमाजच जेथे गुलाम बनला आहे; परदास्यांत पिचत असतांहि ब्राम्हणांच्या भिक्षुकशाही अरेरावीला जगतां मरता अझूनहि वंगत आहे; आणि खऱ्याखोट्या धर्मग्रंथांतील मृताक्षरांची माझा बेअक्कल मेंढरांप्रमाणे शिरसावंद्य मानीत आहे, तेथें आम्हाला स्वतंत्र विचारसरणी कसची लाभते, आणि गुलाम ब्राम्हण बांधवा तुला तरी स्वतंत्र विचारसरणीचा अधिकार व गर्व कशानें बरें प्राप्त झाला? 'ऐतिहासिक वादविवादांचा जीर्णोद्धार म्हणजे देशांतील दुहींत भर घालण्याचा यत्न' हें सूत्र प्रसविणाऱ्यानें स्वतंत्र विचारसरणीची घमेंड मारणें म्हणजे मूर्खपणा होय असे म्हणण्यास आम्हांस मुळीच शंका वाटत नाही.' विशेषत: माजी सरस्वति मंदिरामार्फत झालेल्या ऐतिहासिक संशोधनाशी स्पृहणीय संबंध असणाऱ्या श्री. मुंडल्यांनीच हे उद्गार काढावे, हें मोठें चमत्कारीक कोडें आहे. वादविवादाविय इतिहास संशोधन होणे नाही आणि त्यामुळे जर देशात दुही माजते तशी ब्राह्मणांची स्वतंत्र विचारसरणीची समजूत असेल, तर ब्राम्हण जातीची संघटना करण्याचे कार्य सध्या बाजूला ठेऊन, त्याने निरतिहास पृथ्वी करण्याची परशुरामी प्रथम उरकून घ्यावी, अशी सूचना करणे प्राप्त आहे. इतिहासच मेला कीं ब्रम्हमुखोत्पन्न ब्राम्हणांच्या पावित्र्याच्या व श्रेष्ठतेच्या विरुद्ध जाण्याची परमेश्वराची छाती नाही, मग मानवांच्या कारट्यांची काय क्षिती? आत्मवर्चस्वाच्या मुर्दाड घमेंडीने आजपर्यंत ब्राम्हणांनीच देशांत दुही माजविलेली आहे. विचाऱ्या इतिहासाने काय

केले? उघड उघड तो मुद्देमालाचा अव्वल साक्षीदार. आजपर्यंत 'इति-ह-आस'असें असें झाले एवढेच तो सांगती, प्रॉटेस्टंट कॅथॉलिकांच्या यादवीचा विस्तृत इतिहास आज सर्वत्र उपलब्ध आहे; मग या दोन पंथांत सध्या युरपमध्ये कोठे बंडाळी कां माजत नाही? क्रिस्ती भिक्षुकशाहीला नेस्तनाबूद करण्यास चिथावणारे बाङ्मय सर्व पाश्चात्य राष्ट्रांत रोजच्या रोज खंडोगणती निर्माण होत आहे. मग त्यांच्या देशांत दुही का माजत नाही? आणि आमच्या इकडे ब्राम्हणांच्या स्मृति पुराणोक्त वर्णाश्रमी भिक्षुकशाहीच्या पदरात इतिहासाने पापाचे माप भरपूर घालतांच मात्र दुहीची आग भडकते, ही 'स्वतंत्र विचारसरणी' ब्राम्हणालाच लखलाभ असो! मराठी स्वराज्याचा घात ब्राम्हणी पेशवाईने केला, हिंदू धर्माला भलतेच किळसवाणे वळण देऊन हिंदू समाजाला भिक्षुकशाहीनें गुलाम बनविले आणि ब्राम्हणांनी आपल्या आत्मवर्चस्वासाठी ब्राह्मणेतरांना अत्यंत तुसडेपणाने वागविले, असा इतिहासाचा सप्रमाण पुरावा पाहून ब्राम्हणांनी काही अक्कल शिकायची की आग लागली! आग लागली! धावा धावा म्हणून बोंबाबोंब करायची? असल्या ढोंगी आरडाओरडीला बुजणारी जनता आता उरलीच नाही, मग उगाच अरण्यरुदनाचे सव्यापसव्य कशाला करता? खुद्द ब्राम्हण पत्रिकेची उत्पत्ति ब्राम्हणेतरांच्या स्वतंत्र विचारसरणीच्या नव्या चैतन्यांतूनच झालेली असून, या कालच्या पोरीने आपल्या जन्मदात्यावरच स्वतंत्र विचारसरणीच्या अभावाचा आक्षेप घ्यावा, हा शुद्ध राष्ट्रीयपणा होय.

चिपळूणकर लोकहितवादी वाद

या वादांत ब्राम्हणानें आज लढविलेलें तत्त्वज्ञान उच्चारण्याची पूर्वी एकाहि जातिवंत ब्राम्हणाला प्रेरणा का झाली नाही, हे कोडे उलगडणे फार कठीण नाही. आजसुद्धा लोकहितवादीच्या 'आत्मनिरीक्षणात्मक जागृती'ला 'टिकटिक' म्हणणारे प्रो. पोतदार खुद्द ब्राम्हण जातीत रगड आहेत, हे श्री. मुंडल्यांनी लक्षात ठेवावें, चिपळूणकर -लोकहितवादीच्या कामगिरीची वास्तविक कल्पना आम्हाला नाही, अशी ब्राम्हणाने उगाच आपली दिशाभूल करून घेतली आहे. मात्र या दोषांची दक्षिणोत्तर ध्रुवाइतकी मतभिन्नता करणारे जर एकाच सत्याची भिन्न भिन्न अंगे वाटत असेल, तर आजचा ब्राम्हणबाम्हणेतर वाद एकाच सत्याच्या दोन भिन्न बाजू आहेत, असे मानण्यास काही हरकत नाही. अर्थात् ब्राम्हण वाजूने ब्राम्हणेतर बाजूला दोष देणे म्हणजे एककल्लीपणा नव्हे त्तर काय एककल्लीपणाचा बाप? चिपळूणकरांनी 'राष्ट्राभिमान जागृत केला.' हे ब्राम्हणांचे विधान कदाचित ब्राम्हण जातीपुरेतें खरे असेल; कारण चिपळूणकरांची राष्ट्राची कल्पना स्वजाति वर्चस्वाच्या कुंपणापलीकडे कधीच गेली नव्हती आणि आजहि त्यांच्या सांप्रदायिकांची गेलेली नाही. स्वजातिवर्चस्वाच्या या भिकारच्या तत्वाविरुद्ध हल्ले चढविणाऱ्या आगरकर, गोखले, राजारामशास्त्री भागवत प्रभृति ब्राम्हणांचा काय सत्कार आजपर्यंत चिपळूणकरी सांप्रदायिकांनी ठेवला, याचा इतिहास पाहिला म्हणजे 'एकाच सत्याची दोन अंगें' मानणाऱ्या तत्त्ववेत्त्यांची कीवच केलेली बरी! आतां, तीच परिस्थिती सध्यां कायम आहे' असें आम्ही कोठें म्हटल्याचे स्मरत नाही, पण ती कायम आहे असें आतां आम्हा किंवा कोणी म्हटल्यास

तो 'कांगावा' नव्हे, हें सिद्ध करण्याचा बोजा आमच्यावर लादण्यापेक्षां, ब्राम्हणानेंच आपल्या डोळ्यांत लोकहितवादींच्या आत्मनिरीक्षणाचें अंजन घालून स्वजातियांच्या उलाढालींचे परीक्षण करावें, म्हणजे वादच मिटला.

जातिभेद टू भिक्षुकशाही ॲन्ड बँक

श्री. मुंडल्यांच्या ब्राम्हण पत्रिकेचा उद्देश कितीहि स्तुत्य असला, तरी जातिभेदाच्या बाबतींत बाबतीत ब्राम्हण आणि ब्राम्हणेतर समाज किती भरकटलेले आहेत, याचा अनुभव अझुन त्यांना यावयाचा आहे. सार्वजनिकत्वाची व्याख्यानें झोडून जसें एकराष्ट्रियत्व साधत नाहीं किंवा स्वराज्यप्राप्ति होणें शक्य नाही, तद्वतच जातिभेदाचा प्रश्न जिभेच्या किंवा लेखणीच्या टोलवाटोलवीने सुटणार नाही. डोळे उघडे ठेवून निस्पृहपणे स्वत:च्या ब्राम्हण समाजाच्या वर्तनाची प्रचीती घ्या आणि मग प्रबोधनकारांवर जातिभेदाच्या दृष्टीचा आरोप करा. ब्राम्हणेतरांची गोष्टच नको; नुसत्या ब्राम्हणब्रुव शेकडों जातींत जातिभेद कसा बोकाळला आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव आमचे प्रियबंधु श्री. मुंडले घेतील, तर त्यांच्या ब्राम्हण पत्रिकेंतच त्यांनी प्रसिद्ध केलेला 'एक विलक्षण गैरसमज' हा केवळ गैरसमज नसून, त्याच्या मुळांशी जातिभेदाच्या अकल्पनीय अशा घाणेरड्या वृत्तीचा चिखल त्यांना लवकरच आढळून येईल तो अनुभव निस्पृहपणानें प्रसिद्ध करा म्हणजे झाले. खुद्द ब्राम्हणांच्याच घरात शोचनीय जातिभेद चिघळत असूनहि, 'प्रबोधनकारांना भिक्षुकशाहीचें बंड आणि जातिभेदाची तीव्रता ही वृद्धिंगत होत आहेत, असा भ्रम झालेला आहे.' हे उद्‌गार ब्राम्हणांच्या तोंडी आहेत म्हणून खासे शोभतात. आंगलट आलेल्या दोषांचे परिमार्जन करतांना विधानांचा व पुराव्याचा खडखडाट उडाला कीं 'ठाकरे जातिभेद माजवीत आहेत' असा कोलाहल माजविणें, एवढेंच शस्त्र आतांच भिक्षुकशाहीच्या हातीं उरले आहे. केसरीकारांनासुद्धा या दिव्यास्त्राशिवाय अधिक जाज्वल्य अस्त्र त्यांच्या शस्त्रागारांत आढळले नाही. बेळगांवच्या गोसेवककारांना आमचीं बेळगावची व्याख्यानेंसुद्धा 'जातिभेद टू भिक्षुकशाही ॲन्ड भिक्षुकशाही टू जातिभेद' अशीच दिसली. मात्र हे स्वत: सगळे वीरपीर जातिभेदाच्या बाबतींत अगदीं धुतल्या तांदळासारखे! अट्टल ढोंगीपणाला यापेक्षां अधिक शिंगे असतात काय? प्रबोधनकारानें कोणाची भीड मुर्वत न धरता भिक्षुकशाहीच्या बंडाचें मडके चातुर्वण्याच्या चौकात आणून फोडले आहे आणि जातिभेदाच्या थैमानालाहि वेळोवेळी चव्हाट्यावर आणून त्याच्या पुरस्कर्त्याच्या बत्तिशा खिळखिळ्या केल्या आहेत. हें सांगायला ब्राम्हण नको आणि गोसेवकही नको. पण जातिभेदच अस्तित्वात नाही; कोठे गुंज मासा उरलाच असेल, तर त्याच्या पराचा कावळा ठाकरे करीत आहेत, असा शंखध्वनी करणाऱ्या पंडितांचा कान पकडून आम्ही विचारतों की शहाण्यांनो, तुमचे बोडस केतकर तेलंग राजवाडे भावे नेहमी काय करीत असतात हो?' 'आज वर्णद्वेषाचे (?) बीज चिपळूणकरांचा राष्ट्रीय पक्ष पेरीत नसून जोतिराव फुल्यांचे अर्धवट शहाणे अनुयायीच ते पाप करीत आहेत असे आपण म्हणतां. खरें असेल कदाचित, जोतिरावचे अनुयायी बोलून चालून 'अर्धवट

शहाणे.' शुद्ध मेंढरें. रानडुकरे. पण भंडाऱ्यांना अस्पृश्य व मराठ्यांना शूद्र ठरविणारे बोडस, गोवर्धनांच्या व पळश्यांच्या ब्राम्हण्यावर शंकेचा मारा करणारे डॉ. केतकर, कायस्थ प्रभुंना अकरमाशे ठरविणारे राजवाडे आणि व्यभिचारी रावबाजीला नेपोलियनच्या पंक्तीला बसवितांना सर्रास मराठे कायस्थांच्या पुज्य पूर्वजांना स्वराज्यद्रोही ठरविणारे भावे या 'अखंड शहाण्यां'चा जातिद्वेष प्रसारक लीला तुम्हाला कधी दिसतच नाहीत की काय? केसरी, गोसेवक मुंडले प्रभृतींनी या बड्या गद्ध्यांचे कान उपटण्याचा कधिं प्रयत्न केला आहे काय? आपला तेवढा बाब्या, लोकांचा कारटा. आज महाराष्ट्रांत प्रचलीत असलेल्या जातिमेदाची तीव्रता हे ब्राम्हणच तीव्रतम करीत आहेत, हें आमच्या ब्राम्हण बांधवांनी नीट लक्ष्यांत ठेऊन, आपल्या वर्तनांत सुधारणा करावी, अशी आमची कळकळीची प्रार्थना आहे. आतां लेखन-पाटिलकी पुरें झाली!

□□□

अग्रलेख

जपान राष्ट्रांचे प्रबोधन
(लेखांक १ ला)

पुराणप्रिय पौर्वात्य राष्ट्रांचे इतिहास म्हणजे चमत्कारांनीं खच्चून भरलेले हिंदूंचें रामायण महाभारतादि इतिहासग्रंथ घ्या किंवा त्यांची पुराणें घ्या, त्यांत असें लक्षावधि चमत्कार नमूद केलेले आढळतात कीं, त्यांची व्युत्पत्ति लावण्याचें काम तितकेंच चमत्कारीक असतें. मेरू पर्वताच्या घुसळ खांबाला शेषाची दोरी लाऊन देवदानवानीं समुद्रमंथन केलें आणि त्या मंथनांतून लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरादि चौदा रत्नें काढलीं कशी? हा चमत्कार कितीहि चमत्कारिक असला तरी अवघ्या ३५ वर्षांच्या अवधींत जपाननें केलेल्या आपल्या राष्ट्रीय प्रबोधनाच्या चमत्कारापुढें तो खास फिका पडेल. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सभेला ३५ वर्षांच्या चळचळीनें जें केवळ विचारांत उमटविता येणार नाहीं, तें तेवढ्या अवधींत जपाननें प्रत्यक्ष करून दाखविलेलें आहे. १९ व्या शतकाची गोष्टच नको; चालूं २० व्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत जपान ही चीज काय आहे, हें फारसे कुणाला माहीत नव्हतें. सन १८५३ सालीं कमाडोर पेरी अमेरिकेची चार चढाऊ गलबतें घेऊन जपानच्या सफरीला गेला, त्यावेळी जपान म्हणजे आजच्या हिंदुस्थानाइतके मानसिक गुलामगिरीत खितपत पडलेलें होतें. फरक एवढाच कीं जपानावर परकीय सत्तेचा वरवंटा नव्हता. जपान स्वतंत्र होता. एक लक्ष साठ हजार चौरस मैलांच्या क्षेत्रांत राहणारे पांच कोटी जपानी जरी स्वतंत्र होत, तरी त्यांच्या स्वातंत्र्याच्या लगामा मूठभर शोगन सरदारशाहीच्या हातीं असल्यामुळें, ते स्वातंत्र्यांतच पारतंत्र्याचे क्लेश भोगीत होते. त्यांचा मिकॅडो बादशहा म्हणजे नुसते कळसूत्री बाहुलें! मगरूर शोगन प्रधान करील ती पूर्वदिशा. जपानच्या सभोंवार अटकेची कुंपण पडलेली. कोणी परदेशांत जायचें नाहीं; कोणा परदेशाला आंत येऊं द्यायचें नाहीं. देशांदेशांतल्या देशांत काय मोडका तोडका व्यापार होईल तो होईल. वहातुकीची साधनें म्हणजे कंठाळी घोडीं आणि डोल्या. आरमार नाहीं कीं लष्कराची शिस्तवार व्यवस्था नाहीं. लष्करी लोकांचीं हत्यारे म्हणजे तीर आणि कमटा. त्यांत तरी कांहीं सुधारणा? हजार वर्षांपूर्वी जसा तो होता तसाच. कमाडार पेरीच्या वेळीं जपान म्हणजे जातीभेदाचा नरकवाडा होता. शोगन, दायमो, सामुरायी आणि इटो ही चातुर्वर्ण्य व्यवस्था, हिंदुस्थानाप्रमाणेंच, जपानच्या रक्तप्राशनाचें काम बिनअटकाव करीत होती. शोगन म्हणजे पेशवे. मिकॅडोलाहि बगलेंत मारून, लष्करी व राजकीय सत्तेचे अधिकारी. दायमो म्हणजे

सरंजामी सरदार. नुसते पोषाखी. स्वत:च्या थाटमाटापलीकडे राष्ट्राला आग लागली तरी यांना पर्वा नसे. तिसरे सामुरायी. कट्टे क्षत्रिय. खास सूर्यवंशी. या बेट्यांना दोन दोन तलवारी आंगावर लटकाऊन भटकण्याची हौस फार. शेतकऱ्यांचा जो एक वर्ग असे, तो व्यापारहि करीत असे. त्याच्या खालचा इटो म्हणजे आपल्याकडचा अस्पृश्य वर्ग. इकडील देवाचे लाडके उच्चवर्णीय लोक अस्पृश्यांची जेवढी बरदास्त ठेवतात, तेवढीच इटोंची संभावना जपानांत होत असे. सारांश, आजची हिंदुस्थानची-विशेषत: हिंदूंची स्थिति आणि पेरीच्या वेळच्या जपान्यांची स्थिति यांत राजकीय, सामाजिक, व धार्मिकदृष्ट्या बराच एकजिनसीपणा दिसून येतो. जपान्यांचा धर्म बौद्ध धर्म. हा हिंदुधर्मांच्याच पोटाचें आंतडें. पूर्वी हा धर्म कितीही उदार व व्यापक असला, तरी अखेर तो आपल्या बापाच्या मारवाडी वळणावर गेलाच. तसें नसतें तर पेरीकालीन जपानी निराशावादाचें व जातिभेदाचे गुलाम खास बनले नसते.

जपान राष्ट्र कित्येक शतकें ज्या स्थितींत होतें, त्याच स्थितींत शेजारचें चीन राष्ट्रहि होतें. पण आजचा जपान पहा आणि चीन पहा. चीनचा पांगुळगाडा अझून खटर्र खटर्र करीतच आहे. टीचभर वाढीचा जपानी शेजारी भर बारा वाजतां हांक मारून कुशींत भाले खुपसतो आहे, तरी या निगर्गट्टाची झोंप उडत नाहीं. जपानचें प्रबोधन म्हणजे साऱ्या जगाला अझून न सुटलेलें एक अत्यंत चमत्कारीक कोडें होऊन बसलें आहे. व्यापाराकरितां जपानांत मोकळीक मिळावी, म्हणून पाश्चात्य गोऱ्या राष्ट्रांचे शेंकडों गुमास्ति जपानचा दरवाजा ठोठाऊन गेले; पण सर्वांना एकजात मज्जाव. १८५३ सालीं कमॉडोर पेरीलाहि हाच जबाब. पण एकच वर्षांत जपानच्या मनोवृत्तींत काय फरक झाला, कसलें चैतन्य उद्‌भवलें, देव जाणें! १८५४ सालीं चिकटमामा पेरी जपानचा दरवाजा ठोठावण्यास येतांच, त्याला दरवाजा सताड उघडा असलेला आढळला आणि त्याला सुस्वागतम्‌ची सलामी मिळाली! अमेरिकेची तागडी जपानांत घुसली. मागोमाग इतर पांढऱ्या पायांचीही दौड टोकियोला भिडली. पण जपानी कचरला नाहीं कीं बावरला नाहीं. त्याच्या मनाचें प्रबोधन विकारजन्य नव्हतें, विचारपूर्ण व आचारशील होतें. गोरा व्यापारी आशिया खंडाच्या इतर भागांत तागडी घेऊन घुसला आणि तेथच्याच रहिवाशांच्या उरावर शिरजोर होऊन बसला. जपानमध्यें सुद्धां आपल्या तागडीच्या तंगड्या याच परंपरेनें पसरल्या गेल्याशिवाय रहाणार नाहींत, ही त्यांची भावना अस्वाभावीक किंवा अस्थानी कोण म्हणेल? ईस्ट इंडिया कंपनीचा हिंदुस्थानांतला पराक्रम जरी जपानला माहीत नव्हता, तरी अवघ्या एकाच वर्षांत, परकीय गोऱ्यांना जपानांत मुक्तद्वार ठेवण्याची त्याची विचारक्रान्ति कोणत्या धोरणी तत्वानें केली, याचा इतिहास आज त्यांचा पराक्रमच सांगत आहे. अमेरिकेच्या सांनिध्यांत जपानी येतांच, त्यानें तिचे सर्व व्यापारी डांवपेंच पचनीं पाडण्याचा आणि अखिल पाश्चात्य गोऱ्या राष्ट्रांच्या सुधारणेलाहि डोईजड होण्याचा कृतसंकल्प केला. नुसतां संकल्प सोडला नाहीं, ठराव पास केले नाहींत, तोंडाची बडबड केली नाहीं, आह्मी काय करणार हें कुडाच्या कारवीला कळलें नाहीं, मुकाट्यानें, एकजुटीनें एकदम कार्याला सुरुवात केली. याचा परिणाम आज जपान राष्ट्राचें सूर्यबिंबांकित निशाण म्हणजे जगांतलें एक प्रचंड अजिंक्य सामर्थ्य झालें आहे आणि आशिया खंडस्थ इतर राष्ट्रें अझून युरपस्थ गोऱ्या व्यापाऱ्यांच्या पदतळीं खुशाल लाथाडलीं जात आहेत, पंथभेद, जातिभेद, धर्मभेद वगैरे भेदांनीं चिडचिडलेला देश परचक्राला तोंड देण्यास केव्हांहि असमर्थच असतो. हिंदुस्थानाची परवशता व आजची त्याची गुलामगिरी त्याच्या तिरस्करणीय बेकीचें निसर्गप्राप्त प्रायश्चित्त आहे. जपाननें परदेशी

व्यापाराला आपला देश मुक्तद्वार ठेवला, पण त्याच्या शाबरी वर्चस्वाचा पगडा मात्र आपल्यावर बसूं न देण्याची प्रथम पासूनच दक्षता ठेवली. पाश्चात्य संस्कृतीचा सांसर्ग घडतांच जपाननें तिला आमूलाग्र पंचनीं पडली. तिला शिरजोर होऊं दिली नाहीं. सहाजीकच याचा परिणाम जपानचा जातिभेद ठार मारण्यांत झाला. जातिभेद हा पौर्वात्य राष्ट्रांचा फार प्राचीन असा प्राणघातक रोग आहे. हिंदुस्थानच्या प्राचीन जगविख्यात ऐश्वर्याची माती जातिभेदानेंच केली आहे. हा इतिहाससिद्ध सिद्धांत डोळ्यांना धडधडीत दिसत असून आणि विवेकालाहि पटला असून हिंदु जनांचें जातिभेदाचें आत्मघातकी प्रेम लवमात्र ओसरूं नये, यावरून मानसिक गुलामगिरींचें जहर आमच्या काळजाला किती आरपार भिनलें आहे तें पहा! जपानच्याहि गळ्यांत जातिभेदाच्या जात्याची तळी कित्येक शतकें अडकलेली होती. परंतु या तळीची तळी उचलल्याशिवाय आपल्या प्रिय राष्ट्राचा भाग्योदय होणार नाहीं, जातिभेद ठार मारला नाहीं तर राष्ट्र ठार मरेल, परदेशी गोऱ्यांच्या बुटाची टांच बनेल, ही जाणीव जपानला प्रथम झाली. त्या अन्वयें या 'उदयोन्मुख सूर्याच्या भूमीं'त नवजीवनाचा नवीन मनु सुरूं होतांच, त्याच्या प्रबोधनाचा पहिला घाव जपानच्या जातिभेदावरच पडला. त्यानें उच्चनीचत्वाचे सर्व भेद तात्काळ झुगारून दिले, अध:पातित (डिप्रेस्ट) वर्गांची अस्पृश्यता काढून टाकून त्याला पूर्ण सामाजिक समान दर्जा दिला आणि राजसत्तेच्या पुनर्घटनेबरोबरच वंशपरंपरा चाललेली सरदारशाही नेस्तनाबूद करून, वैयक्तिक पराक्रमानुसार सर्व लहान मोठ्या कर्तव्याचीं क्षेत्रें अभेद भावानें सर्व जपान्यांना सर्रास मोकळी केली. शतानुशतकें हाडींमासीं खिळलेला जातिभेद आणि तदंगभूत इतर भावना व द्वेष, लेखणीच्या एका फटकाऱ्यानें अगदीं समूळ नाहींशा होतात कशा? हें पुष्कळांना कोडें वाटेल. एकदम समूळ नाहींशा होत नाहींत हें खरें आहे. पण निदान त्या दिशेनें प्रयत्न तरी कोणी केले पाहिजेत कीं नाहीं? निश्चयानें आणि चाणाक्षपणानें केलेले कायदे (सभेतले ठराव नव्हत! कायदे) आस्ते आस्ते शतकानुशतकांचे जातिभेदाचे संस्कार नष्ट करण्यांत कसे यशस्वी होतात आणि जुन्या पिढींतले लोक चोरून मारून जरी जातिभेदाचें शेण खात असले, तरी नवीन पिढी त्यापासून पूर्णपणें अलिप्त राहून एकजीव कशी होऊं शकते, याचा कित्ता जपानपासूनच हिंदुजनांनीं घेतला पाहिजे. जपानी प्रबोधनानें तेथली नवीन पिढी जातिभेदापासून अकलंकीत राखण्याचें कार्य केल्यामुळेंच, त्यांच्यांत एकजिनसी एकीचें चैतन्य सणाणलें आणि जपानच्या राष्ट्रीय आत्मविकासाचें सामर्थ्य रूसो जपानी युद्धांत न भूतो न भविष्यति दणाणालें! आजचा जपानी जात मानीत नाहीं व पाळीतहि नाहीं. आजच्या जपानांत अस्पृश्यता नाहीं. 'शिवशील शिवशीलचा विंटाळ' नाहीं. इटो (अस्पृश्य माणूस) आज जपानांत सापडत नाहीं. बडे बापके बेटे आज आपल्या वतनी सरंजामाला मुकले असून, उदरनिर्वाहार्थ कंबर मोडून प्रामाणीकपणें कामधंदा करीत आहेत. जन्म प्राप्त श्रेष्ठतेचा मुर्दा सन १८७१ सालींच जपाननें गाडला. आजचें जपानी सरदार व जहागीरदार आपल्या कर्तबगारीनें सरदारीचें ऐश्वर्य भोगीत आहेत. पूर्वीचें मिकॅडाचें मेणाचें बाहुलें आज तेज:पुंज व सजीव झालें आहे. जपानचा राजा आज शोगन प्रधानांचा गुलाम नव्हे. स्वत:सिद्ध स्वयंनिर्णयी सम्राट आहे. तो लोकसत्तेचा प्रणेता व पुरस्कर्ता आहे. लोकशाहीच्या वाढत्या भरतींच्या लाटांनीं जन्मप्राप्त वर्चस्वाच्या कल्पना ढांसळल्या आहेत. अतिदरिद्री मजूराचा दर्जा वाढला आहे. आणि परमेश्वर-नियोजित हक्कांची अंमलबजावणी करण्याचें नैतिक धारिष्ट आज प्रत्येक जपानी व्यक्तिमात्रांत उत्पन्न झालें आहे.

एन ४००६--३२

वर सांगितलेली १८५३ ते १८५४ या एकाच वर्षांत झालेली जपानची विचारक्रान्ति विचार करण्यासारखी आहे. तें एक कोडें आहे आणि तें खुद्द जपान्यांनाहि उलगडतां येत नाहीं. १८५३ पर्यंत शेकडों वर्षे जो जपान आपल्याभोंवतीं सोंवळ्याची कुंपण घालून एखाद्या सुतक्याप्रमाणें एकलकोंडा बसला होता, तो अवघ्या एक वर्षांत सोवळ्याचा ओवळा कसा झाला? कसा आणि कां झाला, या प्रश्नाचें उत्तर मिळालें नाहीं, तरी तो तसा झाला ही गोष्ट सत्य आहे. १८५४ सालीं जपाननें आपली एकलकोंडेपणाची अटक झगारून देऊन उपलब्ध जगाशीं मिळून मिसळून वागण्याचा केलेला संकल्प हाच त्याच्या वर्तमान भाग्योदयाचा पाया होय. जपान जगांत मिसळला, जगाशीं त्यानें पूर्ण सहकार केला, पण जगाला आपल्या डोक्यावर बसूं दिले नाहीं; उलट तोच आतां जगाच्या डोक्यावर मिरें वाटीत आहे. हिंदूंच्या पुराणांप्रमाणेंच जपान्यांचीहि पुराणें भरंसाट आत्मस्तोमाचीं आहेत. आमच्या वेदांप्रमाणेंच त्यांच्या पुराणांत वाटेल तें सांपडतें. आमचा इक्ष्वाकू एक हजार वर्षे आयुष्याचा, तर जपान्यांचा एखादा सोटामारू राजा दहा हजार वर्षे आयुष्याचा. हिंदूंप्रमाणेंच जपानीहि आपल्या पौराणिक ऐश्वर्याची मिजास मारीत व गोडवे गात, डबक्यांतल्या बेडकाप्रमाणें उगाच डरांव डरांव करीत पडलेले होते. या बेडुकखाऊंना जोपर्यंत जगाची पर्वा नव्हती तोंपर्यंत जगहि त्यांना विचारीत नव्हते. पण जपान्यांना लवकरच आत्मोध्दाराची जाणीव झाली आणि त्यांनीं आत्मविकासाचा शोधून काढलेला मार्ग आज प्रत्येक स्वातंत्र्येच्छु राष्ट्रांना अनुकरणीय असाच वठला. ही यदृच्छा म्हणा, कीं चमत्कार म्हणा, जपाननें एकदम अफाट जगाच्या कार्यक्षेत्रांत उडी घेतली आणि आत्मोद्धारानेंच राष्ट्रोद्धार केला, हा नवयुगाचा विचारार्ह इतिहास आहे. हिंदुप्रमाणेंच जपानी कट्टे दैववादी व वैराग्यप्रिय होते. पण आज त्यांच्याइतके प्रयत्नवादी साऱ्या जगांत तेच.

हिंदुस्थानांतहि आज नवजीवनाचें वारें खेळूं लागलें आहे. या वाऱ्यांत सध्यां केवळ विकारवशातच प्रधान असून, विचारशीलता व आचारप्रवणता मुळींच नाहीं. हिंदुस्थान हा देश सर्वच बाबतींत अफाट असल्यामुळें, त्याच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न जपानप्रमाणें चुटकीसरसा सुटणारा नव्हे. पुढारी म्हणविणाऱ्यांतहि कार्यशैलीच्या बाबतींत तेहतीस कोटी मतमतांतरें आहेत. प्रत्येक शहाणा पुढारी एका ठरावीक सांप्रदायीक मताच्या साच्यांत अखिल हिंदुस्थानाची मोट दडपिण्याचा यत्न करीत असतो. जातिभेदाचें प्रेम अझून आम्हांला सुटत नाहीं. निराशावाद तर आमच्या पिंडाला झोंबलेला आहे. सांपत्तिक ऱ्हासामुळें सर्वत्र दैन्य व निष्क्रीयता दिसत आहे. अज्ञान व निरक्षतेची त्यांतच भर पडल्यामुळें स्वार्थसाधु लफंगे लोक देशभक्तीच्या पांघरुणाखालीं आपल्याच देशबांधवांच्या माना बेधडक कापून आपला तळीराम गार करीत आहेत. राष्ट्रकार्याच्या नांवानें जमविलेला असा एकहि फंड नाहीं कीं ज्यांत फंडगुंड देशभक्तांनीं लुटालूट केलेली नाहीं. व्यवहारांत पहा कीं, व्यापारांत पहा, हिंदु लोकांची अकीन कमाल कमअस्सल बनली आहे. पूर्वी परचक्रानीं हिन्दुस्थानाला लुटलें; आतां देशांतलेच लठ्ठ किडे लहान किड्यांना गट्ट करित आहेत. स्वार्थत्यागाची पुराणें आणि बंधुप्रेमाची प्रवचनें नुसतीं ऐकून घ्यावीं; प्रत्येक असामी स्वार्थाचा बंदागुलाम आहे. मुळशी सत्याग्रहाच्या नांवावर सुद्धां मुळशीला चमचमींत ब्राह्मणभोजनें झडलीं आणि गांधींच्या कोटी फंडांतून अनेक झीटिंगांनीं आपापलीं पोटें जाळलीं. टीचभर दादरची दादर कॉंग्रेस कमिटी ती काय आणि तिच्या फंडांतून गद्रे का फद्रे नांवाचें भटाचें कारटें साडेपांचशें रुपये घेऊन फरारी होतें काय! अकीन बिघडली. इमान मेलें. स्वार्थ चेवला.

गुलाम मनाच्या स्वैर लीला बेहद्द भडकल्या. हिन्दुस्थानाच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न सर्व बाजूंनीं बिकट बनला आहे. राष्ट्रीय सभेच्या ह्यूम जनकापासून तो महात्मा गांधींपर्यंत अनेक महात्म्यांनीं तारणाची खटपट केली, पण कोणालाहि यावें तसें यश येत नाहीं. उलट लक्षावधि जातींच्या संख्येंतच शेकडों राजकीय सांप्रदायिकांच्या परस्परविरोधी पंथांची भर पडून सर्वत्र बजबजपुरी माजली आहे, आणि हजारों ढोंगी लोक देशसेवेच्या मुखवट्याखालीं गोरगरीबांना पिळून काढण्याचा धंदा राजरोस चालवीत आहे. यांमुळें हिन्दुस्थानांत उत्पन्न झालेलें स्वयंनिर्णयेच्छु प्रबोधन फुकट जात आहे.

नुकतीच अपयशी ठरलेली असहकारवादाची चळवळ आणि जपाननें १८५४ सालीं सुरू केलेली आत्मविकासाची चळवळ यांत गुलामगिरी आणि स्वातंत्र्याइतका भेद आहे. असहकारी चळवळीच्या शिक्षणानें जनतेच्या बुद्धीचा विकास तर झाला नाहींच, पण तिला गुलामगिरींचे आणि एकलकोंड्या तुसडेपणाचें द्वाड वळण लागलें. सर्वत्र व्यक्तिमाहात्म्याचें स्तोम माजून, राष्ट्रीय सभेसारखी खरीखोटी लोकमतनिदर्शक संस्था सुद्धां वेदकाळांतल्या पर्णकुटिकांच्या आणि वल्कलांच्या स्वप्नचित्रांत गुंग होऊन, खादीच्या जोरावर स्वराज्याची गादी मिळविण्याच्या वल्गना करूं लागली. आर्यसंस्कृतीच्या सर्वांगसुंदरतेचे पोवाडे सर्वजण गात सुटले. हिंदुस्थानाला जगाची जरूर नाहीं. त्यानें पाश्चात्य विद्या शिकूं नये. पाश्चात्यांशीं कसलाहि संबंध ठेऊं नये. त्यांची संस्कृती सैतानी. आपण फक्त खादीची लंगोटी लाऊन त्रिकाळ चरका फिरवावा. कौसिलें नकोत, कोर्टे नकोत, शाळा नकोत, परदेशांत हिंदुस्थानविषयक कांहीं चळवळ नको, कांहीं नको. खादी आणि चरका! खादी घालणारा माणूस तेवढा पवित्र हृदयाचा. खादी म्हणजे हृदयाची शुद्धि. अशा थोतांडी वल्गनांचा तो हंगाम होता. अखेर महात्मा गांधींच्या सर्टिफिकीटावर बोकाळलेली सुप्रसिद्ध बेझ वाड्याची खादी अकरमाशी ठरली आणि खादी घालणाऱ्या शेकडों फंडगुंडांची कृष्ण कारस्थानें चव्हाट्यावर आलीं! काहीं दिवसांनीं खादी ड्रेस म्हणजे अट्टल लुच्यांचा युनिफॉर्म न ठरो म्हणजे मिळविली! जपानचा मार्ग याहून अगदींच भिन्न. त्यानें जगाचें सुतक धरलें नाहीं. पाश्चात्यांच्या सैतानी संस्कृतीला तो बाचकला नाहीं. तो आपण होऊन सर्व जगांत मिसळला आणि जगांतील सर्व भल्याबुऱ्या संस्कृतीला त्यानें आपल्या राष्ट्रांत खुशाल वावरूं दिलें. सैतानी इंग्रजी विद्येला त्यानें बहिष्कार घातला नाहीं. इंग्रजांच्या किंवा अमेरिकनांच्या सैतानी यंत्रकलेची त्यानें हैबत खाल्ली नाहीं. उलट पाश्चात्य संस्कृतीला आमूलाग्र पचनीं पाडून, आपल्या विशिष्ट संस्कृतीचा विकास कसा केला, हें पुढील लेखांकांत उदाहरणांसह दाखविण्यांत येईल.

□□□

एन ४००६--३२अ

स्फुट विचार

मद्राशांचा सुळसुळाट

मारुती म्हसोबा मदिरा आणि मारवाडी असे चार मकार कितीक वर्षे महाराष्ट्राच्या बोकांडी बसलेले आहेत. दहा बारा झोंपड्यांचें एखादें खेडें का असेना, तेथें हे चार मकार असायचेच. पैकीं मारुती आणि म्हसोबा कधिमधीं एखादा नारळ व आणाफद्याचा शेंदूर फांसला कीं गप्प बसलात; पण मदिरा व मारवाडी या दोन मकारांचा फांस माणसाच्या मानेला मृत्यूचा फांस पडल्याशिवाय सुटत नाहीं. मारवाडी मदिरेला शिवत नाहीं, पण माणसानें मदिरेची मनधरणी केली कीं त्याच्या सर्वस्वानें मारवाड्याची घरभरणी आपोआप होते. मदिरेचा एकच पेला पोटांत गेला कीं तो माणसाला जसा अखेर बिनशर्त जिवंतपणींच ठार मारतो, तद्वत् मारवाडी कर्जाचा एकच रुपया बिनशर्त वाटेल त्या शहाण्याच्या घरादाराची राखरांगोळी केल्याशिवाय रहात नाहीं. या मकारांत अलीकडे मद्राशी मकाराची पांचवी भर पडली आहे. हल्ली महाराष्ट्रांतल्या पुणे-मुंबईसारख्या शहरांत या मद्राशी नाजुंडारावांचा एवढा भयंकर सुळसुळाट उडालेला आहे कीं सांगता पुरवत नाहीं. दादर माटुंगा व माहीम तर मद्राशांनीं इतकें भरून गेलें आहे कीं नासकें नारींग सहजगत्या घरांतून सडकेवर भिरकावलें तर तें अचूक एखाद्या मद्राशाच्याच आंगावर पडलें पाहिजे. सन १९०९ पर्यंत दादरला मद्राशी वस्ती तुरळक होती. गेल्या १५ वर्षांत ती शेकडा दोनशेंपट वाढली आहे. दररोज २५/२५ मद्राशाची टोळी नियमांत इकडे येतांना पाहिली की असें वाटतें, मद्रास इलाख्यांत काय एखादा भयंकर आजार उद्‌भवला आहे. दुर्गादेवी दुष्काळ बोकाळला आहे कीं प्रजोत्पादनाचा निसर्गाचा नियम भरंसाट बेताल झाला आहे, झालें तरी काय? सगळा इलाखाचा इलाखा इकडे कां जीव घेऊन पळत येत आहे? प्रथम प्रथम हे लोक अशा गप्पा मारीत कीं ते मोठ्या श्रीमंत सावकारांचे बेटे असून बापाशीं किंवा भावांशीं किंवा दुसऱ्या कोणा मण्याशीं पटत नाहीं, म्हणून इकडे आले. पुढें जेव्हां यांच्या टोळ्या भराभर हजारोंनी ट्रेनी भरभरून दादरला उतरूं लागल्या, तेव्हां या बेगडी सावकार पुत्रांच्या गप्पांवर कोणी विश्वास घरी ना! अखेर आतां तर ते स्पष्टच बोलतात कीं मद्रास इलाख्यांत त्यांच्या पोटापाण्याची धड सोयी लागत नसल्यामुळें ते इकडे येतात. एका मद्राशानें आम्हांला उत्तर दिलें की तिकडे ब्राह्मणेतर चळवळ फार जोरांत चालूं असल्यांमुळें सर्व ब्राह्मण इकडे पोट भरण्यासाठीं येत आहेत. कोणी कांहीं कोणी कांही वाटेल तें सांगून

वेळ मारून नेतात. सारांश, मागें १८९६ सालच्या दुष्काळांत जसें काठेवाड्यांचे पेंव महाराष्ट्रांत फुटलें होतें, तसें हें आतां मद्राशीं पेंढार मुंबईच्या व मुंबई इलाख्याच्या बोकांडीं बसलें आहे.

स्थानिक रहिवाशांचा कोंडमारा

बरें, इकडे येणारा मद्राशी तरूण म्हणजे कांही विशेष बुद्धिमत्तेचा बृहस्पति असतो असें मुळींच नाहीं. अगदीं रेम्याडोक्या असतो. विशेष कांहीं असेल तर प्रत्येकजण मात्र शार्टहॅन्डचा थोडा रटफ अभ्यास करून येतो. मद्राशी आणि मारवाडी हे दोघे एकाच गोत्राचे व एकाच सूत्राचे दिसतात. मारवाड्याप्रमाणेंच मद्राशीहि येतो तेव्हां वस्त्रहीन कळाहीन व द्रव्यहीन येतो. त्याची ती लांबलचक शेंडी, ढुंगाचें तें एकच पटकूर, हजामत वाढलेली, हातांत एक लोट्या व एक बारीकसें एखादें गाठोडे, अशी ही स्वारी कोणाचा तरी पत्ता काढीत येते. आम्ही राहतो ती मिरांडाची चाळ म्हणजे पत्ता मिळण्याचें सदर स्टेशन. नंतर एखाद्या खोलींत ही स्वारी घुसते व तास दीड तासाच्या अवधींतच शॉर्ट हॅन्डचे नोटबुक घेऊन किंवा अर्जांची भेंडोळीं खरडीत बसलेली दिसते. मग हजामत वगैरे करून, कोणाचा कोट कोणाची टोपी मिळवून कोणाच्या तरी बरोबर फोर्टांत भटक्या मारायला जाते. एक दोन दिवसांतच स्वारी कोठेंतरी चिकटते. मग आस्ते आस्ते एक दिवस शेंडी गुप्त होते. ढुंगणाचें फडकें जाऊन एक फॅशनेबल पँट येते. कोट स्टॉकिंग्ज बूट नेकष्टाय वगैरे साहित्य पहिल्याच महिन्याच्या पगाराला तयार होऊन स्वारी नखशिखांत बॉम्बेटैप जंटलमन बनते. मग त्याची ऐट, त्याच्या हापिसांतल्या गप्पा, त्याच्या जिभेवर अखंड नाचणारी मुंबईतील कंपन्यांच्या नामावळीची जंत्री, वगैरे थाट कांहीं विचारूं नये! कीटकाचा पतंग व्हायला तरी वेळ लागतो; पण मद्राशी लोट्या बहाद्दराला अपटूडेट जंटलमन बनायला अवघा महिना बस्स होतो. केव्हांहि पहा, दोन चार यंडुगुंडु एकत्र जमलें कीं सारख्या हपीसाच्या अलाउन्साच्या रजेच्या प्रमोशनच्या किंवा नव्या नोकरीच्या गोष्टी! जणुं काय परमेश्वरानें हा प्राणी मुंबईच्या नोकऱ्यासाठींच पैदा केला! मद्राशी लोक मुंबईला येण्यापूर्वी येथें नोकरी करणाऱ्यांचीं कांहीं बूज असे. विशिष्ट कलेच्या माणसालाहि पगार चांगला मिळे. साधारण शॉर्टहॅन्ड शिकलेला माणूस शंभर रुपयांच्या खालीं पगार घेत नसे. पण ही मद्राशी टोळवाड येथें कोसळल्यामुळें सगळाच चिवडा झाला आहे. 'उत्तम शॉर्टहॅन्ड टैपिष्ट ५० रुपयाला पाहिजे' म्हणून आतां जाहिराती लागतात. सारंभातंवर राहणाऱ्या मद्राशांनीं सगळीकडे एकच गर्दी करून नोकरीची किमान किंमत तिरस्करणीय केली आहे. शंभर रुपये पगाराच्या जागेवर ४० रुपयांत संतुष्ट राहणारा मद्राशीं जर न बोलवतां 'याऽऽस साऽऽर' करून दरवाजाशींच भेटतो, तर कंपन्यांना काय? देवच पावला. कमी मजुरीवर पुष्कळ राबणारा बैल कोणाला नको? अशा रीतीनें मुंबईची नोकरदारी मद्राशी पाहुण्यांनीं आज पार बिघडून टाकली आहे. याचा परिणाम येथील स्थाईक व कुटुंबवत्सल नोकरदारींच्या लोकांवर अत्यंत अनिष्ट झाला आहे व नित्य होत आहे. मुंबईला साधारण स्थितींतल्या स्थायिक दक्षिणी हिंदूचा संसार जेमतेम शंभर रुपयांत कसातरी भागतो. मद्राशी सडेसोटाची तीस रुपयांत दिवाळी होते. सगळ्या नोकऱ्यांच्या जागा हेच

अडऊन बसल्यामुळें दक्षिणी संसाऱ्याची तारांबळ अत्यंत करुणास्पद झाली आहे. या गोष्टी कोणी स्पष्ट बोलत नाहींत, पण वस्तुस्थिती काय आहे याची चौकशी करण्याचा प्रसंग आता आला आहे. जी गोष्ट नोकऱ्यांची, तीच राहत्या जागांची. मुंबईस जागांची भाडीं इतकी बेसुमार भडकलीं आहेत कीं ढेंगभर जागेला द्यावे लागणारे रुपये पूर्वी मामलतदाराच्या पगाराला पुरत असत. भाडें कितीहि जबरदस्त असो, नवीन चाळ झाली रे झाली कीं मद्राशी त्यांत घुसलेच. सारेच सडेसोट असल्यामुळें १० बाय १२ च्या दोन खोल्यांच्या गाळ्याला ५० ते ६० रुपये भाडें पडलें, तरी त्यांत १०-१२ टोळभैरव खुशाल घुसतात आणि प्रत्येकाला ५-६ रुपये भाडें पडल्यामुळें कोणाला फारसा चट्टाहि लागत नाहीं. पण चाळींतल्या गाळ्यांचें भाडें दरमहा ४० ते ६० रुपये ठरल्यामुळें आणि तें घरवाल्याला मिळूं लागल्यामुळें इतर हिंदु संसाऱ्याला एक गाळा भाड्यानें घेणें म्हणजे प्राणान्तीचा प्रश्न वाटतो. घरवाल्यांना काय? भाडेकरी मद्राशी असो, नाहींतर महार असो, त्याचे ५०-६० रुपये उकळले म्हणजे झालें! आज मुंबईला जी भाड्यांची भरंसाट चणचण उडाली आहे, तिला कारण ही मद्राशी टोळधाडच होय. एकेका खोलींत दहा दहा पंधरा पंधरा टोळभैरव पडलेले असतात. दादर माटुंगा व माहीम लत्याच्या जागांना पांच वर्षांपूर्वी जें भाडें होतें, तेंच आज या मद्राशी सुळसुळाटामुळें पांचपट वाढलें आहे. याचा परिणाम येथील स्थानिक संसाऱ्यांवर किती भयंकर झालेला आहे, याची कोणी चौकशी करील, किंवा आमचे महाराष्ट्रीय बंधूच आपले तोंड उघडून स्पष्ट बोलूं लागतील, तर आमच्या विधानांची सत्यता प्रगट होईल. मुंबईतला पोटापाण्याचा प्रश्न आतां अगदीं कमालीचा ताणला गेला आहे आणि याला कारण मद्राशांचा सुळसुळाट होय.

मद्राशी आणि महाराष्ट्रीय

आचारविचार किंवा संस्कृति या किंवा कोणत्याहि बाबतींत या दोन समाजांत कसलेंहि साम्य नाहीं. दोघांच्याहि भाषा दक्षिणोत्तर भेदाच्या. मद्राशी लोकांची जेवण्याची विचित्र तऱ्हा, त्यांची चमत्कारीक रहाणी, इत्यादि प्रकार महाराष्ट्रीय आचारविचारांशीं इतके विसदृश व सामन्यत: किळसवाणे असतात कीं यामुळें पुष्कळ वेळां या दोन समाजांतील शेजाऱ्या शेजाऱ्यांत भांडणें लागतात. या लोकांना स्थानिक प्रश्नांबद्दल किंवा इतर कांहीं गोष्टीबद्दल मुळींच कळवळा वाटत नाहीं. ते नेहमी अशा एकलकोंड्या वर्तनानें रहात असतात कीं सर्वसामान्य अडीअडचणीच्या प्रसंगीं सुद्धां त्यांचा पुरस्कार स्थानिक महाराष्ट्रीयांना लाभत नाही. 'मनि इज देअर गॉड' पैसा त्यांचा देव. तो मिळाला कीं त्यांना इतर कोणचीहि पर्वा नसते. सारांश, सर्वच बाबतींत हे लोक महाराष्ट्रीय रहिवाश्यांपासून निसर्गत:च भिन्न असल्यामुळें, त्यांच्या वर्तनांत दिसून येणारा तुसडा एकलकोंडेंपणा आज स्थानिक हिंदूंच्या सामाजीक जीवनांत बेपर्वाईचं बीज पेरण्यास कारण झालेला आहे. या सर्व गोष्टी आम्ही आज १५ वर्षांच्या प्रत्यक्ष स्वानुभवानें लिहीत आहोंत. पुष्कळांना याची प्रचितीहि आलेली असेल; पण तोंड उघडण्याचें धारिष्ट कोणी करीत नाहीं, इतकेंच. सारांश, मद्राशी आणि महाराष्ट्रीय, परिस्थितीच्या दणक्यामुळें एकमेकांच्या

कितीहि सन्निध आले, तरी त्यांच्या सुखदु:खांत किंवा परस्पर प्रेमभावनांत, एकतानता राहूंच द्या, पण एकसूत्रताहि येऊं शकत नाहीं. सर्व गोष्टींचा बारकाईनें विचार केला तर आतां मद्राशी वस्तीची बेसुमार वाढ म्हणजे मुंबईला एक डोईजड परचक्रच होऊन बसलें. आहे, याचा महाराष्ट्रीयांनीं शुद्धीवर येऊन विचार करावा.

मद्राशांचा बोजा मुंबईवर कां?

महाराष्ट्रीय लोक अतिथी-सत्कारांत मोठे कर्ण आहेत. पण या सत्कारपरमावधीनेंच त्यांचा अध:पात झाला आहे व होत आहे. देशबंधुत्वाच्या कथा बोला ऐकायला फार मधुर व रम्य असतात. पण इतर प्रांतस्थांनीं आमच्या ढुंगणाचें वस्त्रहि फेडून नेईपर्यंत आम्ही आमच्या स्वहिताकडे दुर्लक्ष करावें हा कर्णपणा नसून लंबकर्णपणा होय. जपानी लोक अमेरिकेंत घुसतांच त्यांनीं 'यलो पेरील येलो पेरील' म्हणून एकच कोलाहल केला व आतां तर ते हिंदी माणसांनाहि नागरिकत्वाचे हक्क देत नाहींत. इतर सर्व राष्ट्रांत हाच प्रकार. खुद्द मद्रासलाहि हीच स्थिति तिकडे कांहीं नोकरीच्या जागा रिकाम्या असल्या तर प्रथम मद्राशाला निवडणुकीचा चान्स देतात. कोणी इकडून नोकरीसाठीं अर्ज केला तर मद्रास सरकार धडकाऊन उत्तर पाठवितें कीं तुम्ही मुंबई इलाख्यांतले रहिवाशी आहां; त्या सरकारामार्फत तुमचा अर्ज येऊं द्या, मग विचार करूं. आणि इकडे सहस्त्रावधि मद्राशांना मात्र आव जाव घर तुम्हारा! त्यांना कोणी असें विचारीत नाहीं कीं तुम्ही आपला देश सोडून इकडे कां गचडी करतां? मुंबई काय अशी मोठी हजार आंचळांची कामधेनू लागून राहिली आहे कीं ती तुम्हांला, साऱ्या जगाला आणि खुद्द तिच्या पोरांना बिनतक्रार पोसूं शकेल? असेंहि गृहीत धरलें कीं मद्रास इलाख्यांत खायला माती सुद्धां नाहीं. तर ती तेथें उत्पन्न करून आपला इलाखा स्वावलंबी बनविण्याची मद्राशांनीं शिकस्त करावयाची, कीं दुसऱ्या इलाख्यांत जाऊन तेथील रहिवाशांना माती चारावयाची? तात्पर्य, मुंबईत व इलाख्यांत मद्राशांचा सुळसुळाट कसल्याहि कारणामुळें झालेला असो, त्यामुळें येथील स्थायिक महाराष्ट्रीयांच्या सामाजीक व आर्थिक जीवनावर हें एक 'काळें संकट' आलेलें आहे, यांत मुळींच संदेह नाहीं. याचें निराकारण कसें करावें हा प्रश्न सरकारचा व महाराष्ट्रीयांचा आहे, तो ते सोडवितील अशी आशा आहे. सूचना करण्याचं काम आम्हीं केलें आहे. महाराष्ट्रीय कितीहि उदार असले, तरी इतर प्रांतातल्या बेरोजगाऱ्यांची तैनात चालवून स्वत:चें सर्वस्व गमावून बसणें, हा शुद्ध अध:पात आहे.

एक भयंकर देखावा

रविवार ता. २७.५.२३ रोजीं सकाळी ९ वाजतां आम्हांला एक भयंकर देखावा दिसला. आमच्या स्वाध्यायाश्रमाच्या समोरच (खाडके बिल्डिंग नं. ६) एका नवीन घराचा पाया घातला आहे. पाया सुमारें

१ ।। पुरुष खोल खणला आहे. रविवारीं सकाळीं, त्यावर दोन नवीन तट्ट्याच्या हातऱ्यांचें झांकण घातलें व कांही मुसलमान लोक व मजूर आंत शिरले. मागाहून एक लठ्ठ मेंढा मानेला दोरी बांधून एक बोहरी आंत सोडीत असल्याचें आम्ही गॅलरीतून पाहिलें म्हणून मुद्दाम उभे राहिलों. आम्हांला वाटलें कीं या मेंढ्याची कंदुरी करून हे धर्मशील व्हारोजी त्याला चटकन मुक्तीचा मार्ग दाखवितील; आणि आपल्या नवीन घराच्या बांधणीची प्राणप्रतिष्ठा या गरीब प्राण्याच्या प्राणाहुतीनें करतील, पण आमचा तर्क चुकला. या व्हारोजीनें कसलासा धर्मग्रंथ वाचला, त्याचें चुंबन घेतलें, नमस्कार घातला आणि आजुबाजूला कोणी पहात नाहीं, अशी खात्री पटल्यावर त्या गरीब मेंढ्याचें तोंड व हातपाय आवळून त्याला पायांत जिवंत गाडला! वर भराभर दगड माती चुन्याची लोटालोट करून आता पायाच्या उभारणीचे काम मोठ्या नेटानें चालू आहे. घराच्या पायांत जिवंत मेंढा गाडण्याची ही रुढी अत्यंत अमानुष आहे. पण ही रुढी जर खरी ठरत आहे, तर मोठमोठ्या पुलांच्या व धरणांच्या पायांत जिवंत माणसें गाडतात, ही दंतकथा किंवा बाजारगप्प मानण्याचें धैर्य आम्हांला आतां तरी खास होणार नाहीं. सरकारला या बाबतींत कांहींच बंदोबस्त करतां येणार नाहीं काय?

□□□

लेख

जपान राष्ट्राचें प्रबोधन

(लेखांक २ रा)

मनाच्या एकलकोंडेपणाचा संन्यास करून जपाननें पाश्चात्य सुधारक राष्ट्रांशीं पूर्ण सहकार्य केलें आणि त्या सहकारांतून आपल्या आत्मोद्धाराचा चोखट मार्ग शोधून काढला. हें दृश्य कितीहि सुंदर असलें, ही कल्पना कितीहि उत्साहवर्धक असली आणि तिच्या तपशीलाचा अभ्यास कितीहि विचारक्रांतीकारक असला, तरी हिंदुस्थानांत रुजलेल्या असहकारवादाच्या सुतकी वावटळींत या प्रत्यक्ष दृश्यावर विश्वास ठेवण्यास हिंदी मन काचरत असलें, तर त्यांत आश्चर्य नाहीं. फ्री ट्रेड-व्यापाराची मोकळीक हें तत्व दिसण्यांत मोठें गोंडस व बाळसेदार खरें, पण या तत्वाच्या जोरावरच पाश्चात्य मारवाडी, जपानखेरीज करून, इतर सर्व पौर्वात्य राष्ट्रांच्या उरावर मालक म्हणून आज थैथै नाचत आहेत. विशेषत: बोल बोलतां तागडीची तलवार कशी बनते, हा गारुडी चमत्कार हिंदवासियांच्या प्रत्यक्ष अनुभवाचा असल्यामुळें, त्यांची पश्चात्तापित किंवा संतप्त मनोवृत्ति असहकारवादाकडेच वळणें अगदीं सहाजीक आहे. अर्थात जगज्जेतृत्वाच्या गुप्त परंतु रास्त महत्वाकांक्षेने फुरफुरणाऱ्या मतलबी पाश्चात्यांशीं जपाननें केलेला सहकार हें एक मोठें कोडें किंवा अकल्पनीय चमत्कार आहे, असें त्यांना वाटणें अगदीं वाजवी आहे. पाश्चात्यांची जगज्जेतृत्वाची उलाढाल पौर्वात्यांना किंवा हिंदी लोकांना जरी 'सैतानी' वाटत असली, तरी स्वयंनिर्णयाच्या व राष्ट्रीय आत्मविकासाच्या उपयोगीं पडणारे पुष्कळसे गुण या 'सैतांना' पाशीं आहेत, हे नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. सध्याचें युग त्रागेखोर सत्याग्रहाचें नव्हे किंवा परक्यांच्या जबरदस्तीला हातपाय न हालवितां निमूटपणें मान वांकविण्याचें नव्हे. लाला लजपतराय 'आमचें शिक्षण' या निबंधात म्हणतात कीं "This age has no use for meekness and humility or for self-sacrifice in the oriental sense. This is an age of self-assertion. (Evolution of Japan. P 71) (सध्याचें युग बेंगरुळ नम्रतेचें, अपमान सहन करण्याचें किंवा आत्मत्यागाचें मुळींच नव्हे. आमचा आपलेपणा ठणकाऊन प्रस्थापित करण्याचा हा काल आहे.) लजपतरायचा हा सिद्धांत गांधींच्या असहकारी चळवळीच्या प्रमेयांशीं ताडून पहाण्यासारखा आहे. सत्याकरितां आत्मक्लेश भोगणें हा वेदांत कितीहि उज्ज्वल असला तरी व्यवहाराची तोंडमिळवणी त्यानें केव्हांच होणार नाहीं. निमूटपणें आत्मक्लेश भोगून सत्याच्या वेदांती विजयानें पाश्चात्यांच्या व्यापारी

हृदयाला शरमेचें पाणी फुटेल, ही कल्पनाच अत्यंत थिल्लर आहे. त्याचप्रमाणें सर्व जगाला बहिष्कार घालून अखिल हिंदुस्थान सत्याग्रही सुतकांत जरी स्वस्थ बसलें, तरी त्यापासून जगाचें किंवा पाश्चात्य 'सैतानांचें' कांहींही नुकसान होणार नसून, झाला तर हिंदुस्थानाचाच अध:पात अधिक होणार आहे. जपान पाश्चात्यांच्या सैतानीपणाला भ्याला नाहीं. उलट ज्या तत्वांनीं ते सर्व जग पादाक्रांत करीत सुटले आहेत, तीं तत्वेंच पचनीं पाडून त्यांच्यावर त्यानें कुरघोडी करण्याचा निश्चय केला. या निश्चयांतच जपानच्या प्रबोधनाची खरी गुरुकिल्ली आढळते. त्यानें गोरा व्यापारी घरांत घेतला, पण त्याला शिरजोर होऊं दिला नाहीं. त्याच्या सर्व युक्त्याप्रयुक्त्या काळजीपूर्वक अभ्यासिल्या. त्याच्या कलाकौशल्याची नक्कल सुरूं केली. त्याच्या जाहिरातीचा गोडबोलेपणा आंगीं बाणला. सारांश, त्याच्यापासून जितकें शिकतां येण्यासारखें होतें, तितकें सर्व जपान शिकला आणि अखेर स्वावलंबी बनला. आत्मविकास आणि आत्मोद्धार हा सुतकी असहकारवादानें किंवा आत्मसंन्यासी हट्टाग्रहानें होत नसतो, हें जपानच्या उदाहरणावरून स्पष्ट पटतें. इतर पौर्वात्य एशियन राष्ट्रांप्रमाणें जपान स्वत:च्या वेदान्ती अजगरावस्थेचीच घमेंड मारीत राहिला नाहीं. युरपियन व अमेरिकन राष्ट्रें आर्थिक बाबतींत कशीं व कां सुधारलीं? त्यांनीं व्यापाराच्या निमित्तानें तागडींतूनच तलवार कशी नाचविली? त्यांचें सायन्स जगज्जेतृत्वाच्या त्यांच्या महत्वाकांक्षेला कसें पाठबळ देत आहे? त्यांची शिक्षणाची पद्धति व ध्येय कसें काय रेंखाटले आहे? इत्यादि सर्व गोष्टींचा जपाननें आधीं पद्धतशीर विचार केला, निश्चय कायम ठरविला आणि धूर्त बुद्धीनें त्यानें जगाच्या समरांगणांत उडी घेतली. त्यानें पाश्चात्यांना आपल्या घरीं शिक्षणदानार्थ आमंत्रण दिलें. अमेरिकन शिक्षणपटूंनीं जपानची शिक्षणपद्धती हातीं घेतली. फ्रान्सांतल्या फ्रेंच कायदेपटूंनीं जपान राष्ट्राच्या कायद्यांची जुळवाजुळव केली. इंग्लिश लोकांनीं जपानचें आरमार हातीं घेऊन, त्याच्या सुधारणेबरोबरच सनदशीर राजसत्तेचा पाया भरभक्कम करण्याची कामगिरी केली. जर्मनीवर त्यांना लष्करी शिक्षण दिलें आणि दवाखाने कसे स्थापन करावे, औषधयोजना व शस्त्रक्रिया कशी करावी, हें शिकविलें. इतर अनेक पाश्चात्य राष्ट्रांतल्या लोकांनीं व्यापाराची संघटना ठाकठीक बसवून दिली, सुधारलेल्या राष्ट्रांतील समाजसुधारणेंचीं तत्वें त्यांना शिकवलीं व वर्तमानपत्रें तारायंत्रें रेल्वे टपालखातें टांकसाळी इत्यादि सर्व आधुनीक प्रगतिच्या साधनांत जपान्यांना पूर्ण तरबेज केलें. याचा परिणाम असा झाला कीं जपानांत आजला अशी एकहि संस्था नाहीं कीं जिच्यावर आधुनीक प्रगमनशीलतेचा स्पर्श झालेला नाहीं. पाश्चात्यांशीं केलेल्या या सहकारांत जपाननें प्रथमपासूनच फार धूर्तता राखली होती. त्यानें त्यांचे चांगले गुण आपल्या पचनीं पाडण्यासाठीं त्यांच्यापुढें तो विनम्र शिष्याप्रमाणें बसला. पण ही परकीयांची छात्रवृत्ति म्हणजे नाईलाज म्हणून पत्करलेली तात्पुरती आपत्ति आहे, ही त्याची जाणीव अत्यंत स्पष्ट व जागरूक होती. आपल्या राष्ट्राच्या पुनर्घटनेसाठी या परकीय गुरूंनीं जीं जीं कार्ये केली, तीं स्वत: स्वावलंबनानें आपणांस करतां आलीं पाहिजेत, या दृष्टीनें जपाननें आपल्या शिक्षणसंपादनाची कसोशी केली. देशांतल्या देशांत मिळणाऱ्या शिक्षणानेंहि तो संतुष्ट राहिला नाहीं. निवडक निवडक तरुण उमेदवारांच्या टोळ्या जपाननें निरनिराळ्या पाश्चात्य राष्ट्रांत विविध शिक्षणासाठीं भराभर रवाना केल्या. तिकडील शिस्त व कार्याच्या पद्धती नीट शिकून एक टोळी परत आली कीं तिला कामावर लावून ताबडतोब दुसरी टोळी रवाना होत असे. देशांत मिळणारे शिक्षण व परदेशांतून तरबेज होऊन आलेल्या तरुणांची भरती, यांमुळें लवकरच पाश्चात्यांच्या मदतीची जरूरी हळूहळूं कमी होत गेली

आणि अखेर आज जपान आपल्या पाश्चात्य गुरूचा सवाई चेला होऊन बसला आहे. गुरूच्या तंगड्या गुरूच्या गळ्यांत लटकावून आपण नामानिराळा होणाऱ्या चेल्याच्या नीतीविषयीं आज पुष्कळ ऐदी नीतिवेत्ते टीकांची झोड उठवूं शकतील; पण एवढें म्हटलें म्हणजे पुरें कीं आत्मोद्धाराच्या बाबतींत जपाननें पाश्चात्यांच्या नीतितत्त्वांचाच पाश्चात्यांवर प्रयोग करून, पूर्व ही पश्चिमेपेक्षां अगदींच कांहीं बावळट नाहीं, हें पूर्ण सिद्ध केलें.

जपाननें पाश्चात्य सुधारणेचा जरी सर्रास अंगीकार करून तिला पचनीं पाडली, तरी त्यामुळें तो आपल्या नैसर्गिक संस्कृतीला कधींच पारखा झाला नाहीं. उलट, जगाशीं सुतक्याप्रमाणें फटकून वागल्यामुळें त्याच्या बुद्धिमत्तेला आलेलें जाड्या व बोथटपणा पार नाहींसा होऊन, तिला पाणीदार धार लागली. आज अमेरिकेप्रमाणेंच जपानी बुद्धि अनेक प्रकारचे शोध लावण्यांत महशूर आहे. लष्करी व आरमारी खात्याच्या सुधारणेंत जपाननें शेकडों लोकोत्तर शोध लावले आहेत. आरोग्य खातें, शस्त्रक्रिया, वहातुकीची साधनें, लढाऊ जहाजें बांधणें, टारपेडो फेकणें, इत्यादि बाबतींत त्यानें केलेल्या सुधारणा अझून अमेरिका जर्मनीला चकवीत आहेत. जपानी योध्द्याच्या खांद्यावर लटकलेली बंदुक जपानी शोधाची आहे. जपानी लढाऊ तोफा जरी जर्मनीच्या क्रप फॅक्टरींत ओतल्या असलेल्या तरी त्यांचा डिझाईन 'मेड इन जपान' असून त्यांचा शोधक जनरल आरीसाका हा होय. बिनधुराची दारू प्रथम रूसो जपानी युद्धांत जपानी कल्पकतेनेंच प्रसिद्धीस आणली. आतां तर बिनधुराचा कोळसाहि त्यांनीं शोधून काढल्यामुळें, बंबांतून धुराचा लवलेशहि न काढतां जपानी आरमार गनिमाच्या हातावर तुरी ठेऊन भुसकन नजरेसमोरून वाटेल तिकडे निघून जाते. कापरासारखा क्षुल्लक पदार्थ, पण त्याच्यापायीं कोट्यवधि रुपये जपान आज कितीक वर्षे हिंदुस्थानांतून नेत आहे; आणि हिंदुलोक पुण्यपुण्य म्हणून लाखों रुपयांच्या कापराच्या राशी शंकराच्या पिंडीपुढें हकनाहक जाळून हरहर महादेव शंभोऽऽ म्हणून मापटें ठोकीत असतात! जपानी कापराच्या धुरोड्यानें प्रसन्न होणारा शंकर इंग्रजी नोकरशाहीच्या गोत्रांतला असावासा वाटतो. भक्तजनांनींच विचार करावा हें बरें. 'खानदानीपवित्र' खादीपासून तों बिजलीच्या बत्तीपर्यंत येथें येणारा जपानी माल पाहिला की पाश्चात्य सुधारणेचा आपल्या कर्तबगारींत जपाननें किती स्पृहणीय परिपाक केला आहे, तें सांगणें नको. जपाननें आपल्या राष्ट्राच्या पुनर्घटनेंत दाखविलेली ही धडाडी पाहून पाश्चात्य राष्ट्रांनाहि आज मोठी चिंता उत्पन्न झालेली आहे; आणि जगाच्या सुधारणेच्या रामरगाड्यांत आपला टिकाव निभवायचा असेल तर जपानकडे सुधारणेचे धडे गिरविण्यासाठीं धूळपाटी घेऊन धूम ठोकण्याशिवाय त्यांना आतां गत्यंतर उरलेलें नाही. आपली संस्कृति लवमात्र मलीन होऊं न देतां, पाश्चात्य 'सैतानी' सुधारणेचा आत्मा काबीज करण्यांत जपाननें आपल्या राष्ट्रीय शिक्षणाची दिशा कशी ठरविली, याचें पुराण पुढील अंकीं निवेदन करण्यांत येईल.

□□□

स्फुट विचार

साखऱ्या भटाची वानी, अक्षि निरमल गंग्येचं पानी

ब्राह्मणांचा पवित्रपणा आजपर्यंत सर्वांच्या पूर्ण परिचयाचा होता. त्यांचें जन्मप्राप्त बुद्धिवैभव या हिंदुस्थानांत आहे म्हणूनच त्याची अब्रु बचावली आहे. नाहीं तर हरामखोर ब्राह्मणेतरांच्या पापांच्या राशीखालीं शेषाच्या मस्तकाचा चकणाचूर होऊन, हा पृथ्वीचा गोल कोलमडून क्षीरसागरांत कधींच बुडाला असता! आज ब्राह्मण आहेत म्हणून जग जगलें आहे. अर्थात् ब्राह्मणांची निंदा करणें. त्यांच्या ब्रह्मदेवदत्त जन्मप्राप्त महात्म्याला शिव्या देणें आणि त्यांच्या दैवी वर्चस्वाविरुद्ध बंड करणें या गोष्टी ब्राह्मणेतरांना नरकांत नेतील, यांत आम्हांला आतां तरी कांहीं संशय वाटत नाहीं. स्वराज्यद्रोही म्हणजेच भटद्रोही शाहु छत्रपति हल्लीं गौरव नरकांत असल्याची बातमी थोड्या दिवसांपूर्वी दादरच्या 'लोकशाही'च्या एका पवित्रहृदयी भक्तानें प्रसिद्ध केलीच आहें; आणि आतां लवकरच सारे ब्राह्मणद्वेष्टे ब्राह्मणेतर तेथें वसाहतीला जाणार. प्रबोधन, विजयी मराठा, दीनमित्र, सत्यप्रकाशादि सर्व जातिभेद-प्रसारक पत्रांचे संपादक सहकुटुंब सहपरिवारें रौख नरकांत जाणार, त्यांच्या पाठोपाठ अखिल ब्राह्मणेतर जनता नरकांत गेल्याशिवाय हिंदुस्थानाला स्वराज्य मिळणार नाहीं. ब्राह्मणद्वेषाची आतां अगदी परमावधि झाली. आंतां लवकरच जगबुड होणार किंवा पंढरपुरच्या इंटुब्बाचे देऊळच एटना ज्वालामुखीचें रौद्र रूप धारण करून या ब्राह्मणेतर कुतरड्यांची राखरांगोळी करणार! ब्राह्मणाचा देह जसा पवित्र तशी त्याची वानीबी लइ ग्वाड पघा. त्यांतल्या त्यांत तो ब्राह्मण जर साखऱ्या असला, मग तर काय विचारूंच नका. जशी करणी तशी वाणी. पवित्र उदार तेजस्वी आणि गोड, अशा सर्वांगपावन ब्राह्मणांना शिव्या देणें, त्यांच्या भूदेवत्वाविरुद्ध लेख लिहिणें, जलसे करणें, व्याख्यानें देणें, अरेरेरेरे, अधमाधम ब्राह्मणेतरांनों अभिमानी, ब्राह्मणाचें सनदशीर पाठीराखे, ब्राह्मणसंरक्षक ब्रिटिश सरकार व त्याची इमानी नोकरशाही आज तुमची जरी कांहीं दखल घेत नसली, तरी 'प्रामाणीक कुत्र्यां' नो तुम्हाला लवकरच रौख नरकांत वसाहतीला पाठविण्याची व्यवस्था ब्राह्मण्य-संरक्षक परिषदेकडून करण्यांत आली आहे. ब्राह्मणांचा द्वेष करतां काय? त्यांना शिव्या देतां काय? अरे 'प्रामाणीक कुत्र्यां'नो ब्राह्मण म्हणजे परमेश्वराचा बाप. त्याच्या पायाच्या आंगठ्यांत आंगठा दाखवावा आणि तुम्ही तो गुपचूप चघळावा. हाच तुमचा अधिकार, हेच तुमचें कर्तव्य आणि तेंच तुमचें स्वराज्य.

एवढा मोठ्ठा धर्मराजा होऊन गेला, पण 'ब्राह्मणं मम दैवतम्' चीच बोंब मारीत अखेर नरकांत गेला ना! ब्राह्मणांचा द्वेष करणें फार वाईट. त्यांनीं रंडीबाजी केलीं; फंडीबाजी केलीं; जोडेबुट पायतणांची दुकानें काढलीं. ब्राह्मणेतरांना नीच बाजाचे, स्वराज्यद्रोही, अस्पृश्य, गाढव, कुत्री, काय वाटेल त्या शिव्या दिल्या, तरी बाबांनो, त्या आशीर्वाद समजून, त्या पवित्रदेही भूदेवांचा लवमात्र उपमर्द करूं नका. तुम्हां 'प्रामाणीक कुत्र्यांची' ब्राह्मणेतर चळवळ उपटण्यापूर्वी या महाराष्ट्रांत जातिभेद तरी होता कां? सर्वत्र रामराज्य होते. अहो एवढे मोठे तुमचे जे जिंजीवाले राजाराम छत्रपति ब्राह्मणांबद्दल काय उद्धार काढीत असत, माहीत आहे? हे महाराष्ट्र राज देवाब्राह्मणांचे आहे. आणि तुम्ही या भूदेवांना शिव्या देता? जातिभेद माजविता? ब्राह्मणांच्या स्वराज्याला विरोध करता? नरकांत जाल. आजपर्यंत ब्राह्मणांच्या उदारपणामुळेंच तुम्हा जिवंत राहिला आहा. आतां महाराष्ट्रांतल्या अखिल ब्राह्मणानें, सुप्रसिद्ध पालखीवाले विनायक बावा (?) साखऱ्यांच्या थोबाडांतून-नव्हे, चुकलों मुखगंगेतून अखिल ब्राह्मणेतरांना ब्राह्मण्यप्राप्तांकरितां ब्राह्मण्यसंरक्षक परिषदेकडे अर्ज लिहिले होते, तें समजत नाहीं. पण विनायक बुवा साखरे म्हणाले कीं, ''गुणकर्मविभागश:नें ब्राह्मण्य ठरविणें शक्य नाहीं, तें जन्मावरूनच ठरविलें पाहिजे. ब्राह्मणेतर मंडळी कितीहि विद्या शिकली किंवा ब्राह्मणाप्रमाणें आचरण करूं लागली तरी ती ब्राह्मण होणार नाहींत. कुत्रें हें कितीहि प्रामाणिक असलें तरी तें कुत्रेंच, त्याला फार झालें तर प्रामाणिक कुत्रें म्हणतां येईल, पण त्याला मनुष्य म्हणतां येणार नाहीं.'' किती गोड ही वाणी. किती थोर हें ब्राह्मणी हृदय. किती जाज्वल्य हा वेदांत झक मारते भगवद्गीता यापुढें. आम्ही तर मोहून गेलों. या वेदांतांत ब्राह्मणेतरांचा शिवराळपणा नाहीं, जलशांतला बीभत्सपणा नाहीं, जातिभेद तर नाहींच नाहीं, कांऽऽहीं नाहीं. शुद्ध पुण्याच्या शुक्रवारांतली गंगा! अखिल ब्राह्मणेतर 'कुत्रीं' तर शिकलेले ब्राह्मणेतर 'प्रामाणिक कुत्रीं'. केवढें हें भिक्षुकशाही प्रसंगावधान! महाराष्ट्रांतल्या ब्राह्मण्याचा हा उत्कृष्ट नमुना पाहून आम्ही तर थक्क झालों. असला हा नमुना चिरंजीव रहावा म्हणून आमचा सर्व ब्राह्मण बांधवांना आग्रहाची विनंती आहे की विनायक बुवा साखरे मेले कीं त्यांच्या प्रेताचें दहन किंवा दफन न करता त्यांच्या शरीरांतली नाशिवंत आंतडी स्पिरीटमध्ये घालून केसरीच्या अजायबखान्यांत ठेवावी आणि त्यांच्या प्रेतांत सर्व 'राष्ट्रीय' पत्रांचे व मासिकांचे अंक कोंबून, तें आळंदीस सर्व भटाभिमानी ब्राह्मणेतर कुत्र्यांच्या मोक्षप्राप्तर्थ एखाद्या तिवाठ्यावर 'राष्ट्रीय' देऊळ बांधून त्यांत दर्शनासाठीं ठेवावें? देऊळच्या देऊळ आणि बडवेगिरीची किफायत, हा कांही लहानसान फायदा नव्हे. ब्राह्मण टिकविण्याचा हाच एक मार्ग आहे. ज्या ज्या ब्राह्मणेतर पत्रांनीं ब्रह्म-अवलाद साखऱ्यांच्या पवित्र थोबाडाचा निषेध केला आहे व करतील, ते सारे नरकांत जाणार व जातील. ब्राह्मणांचा द्वेष केला म्हणून शाहू छत्रपति नरकांत गेल्याची बातमी दादरच्या लोकशाहींत पुराव्यासह प्रसिद्ध झालेलीच आहे. 'भिक्षुकशाहींचें बण्ड' लिहिणारे प्रबोधनचे संपादक श्री. ठाकरे लवकरच कुंभिपाक नरकांत जाणार असल्याचें भविष्य धुळ्याच्या एका लोकमान्य भटानें केलें आहे. या सर्व गोष्टी ब्राह्मणेतर प्रामाणिक 'कुत्र्यां'नी लक्षांत ठेऊन, इरसाल पवित्र ब्राह्मणांच्या पुराणोक्त पाद्यपूजेची लगबग करावी.

अनुभव घ्या कीं विचार एकच

मेलेल्या ब्राह्मण्याचें संरक्षण करण्यासाठीं उपस्थित झालेल्या ब्राह्मण्य संरक्षक परिषदेचा बोजवारा उडाल्याचें वृत्त आतां सर्वश्रुत झालेंच आहे. हें असें झालें नसतें तरच मोठे आश्चर्य होतें. गुदस्त सालीं या परिषदेला आम्हीं 'राष्ट्रघातक्यांचें परिषद ऊर्फ भिक्षुकशाहींचें बण्ड' असें म्हटलें होतें; पण यंदाच्या प्रकारावरून हा नुसता 'गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ' ठरला आहे. यावर आमचे ब्राह्मण बंधु काय विचार प्रगट करतात, तें पाहून मग आम्हाला काहीं लिहिणें प्राप्त असेल तर लिहूं. मात्र आमचे प्रियबंधु 'स्वधर्म' कार पूर्वी एकदां आमच्यावर गुरगुरले होते, तरी या परिषद प्रकरणांत ते आतां प्रबोधनाचीच भाषा बोलूं लागले आहेत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पतितपरावर्तनाच्या बाबतींत कै. गजानन वैद्यांना बहिष्कार घालण्यास उद्युक्त होणारा स्वधर्म आतां तर सवाई हिंदुमिशनरी बनला आहे, ही विचारक्रांति कौतुकास्पद व विचारार्ह आहे. ता. ७ जूनच्या अग्रलेखांत स्वधर्मकारांनीं कबूल केलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे या सभेच्या मुळांशीं ब्राह्मणसंरक्षणाचा शुद्ध हेतू नसून सत्यशोधक समाजानें थप्पड मारल्यामुळें त्याच्या प्रतिकारार्थ निघालेली ही चळवळ होय. जगांत स्वातंत्र्याचीं व समानतेची खरी तेजस्वी तत्त्वें प्रचलित होऊं लागलीं व आजपर्यंत पायांखालीं दाबून ठेवलेले गुलाम जर आपल्या श्रृंखला तोडण्याच्या मार्गाला लागले, तर अनियंत्रित सत्तेला लालचावलेल्या कोणत्याहि जुलुमी संत्ताधाऱ्याच्या छातींत भयानें धडकी भरणारच. नेपोलियनची वाटर्लूला वासलात लावल्यानंतर युरोपमधील राजांनीं एकत्र जमून आपला एक 'Holy League' 'पवित्र संघ' निर्माण केला होता. पण तो खरोखर आपली जुलमी सिंहासनें पुनरपि फ्रेंच राज्यक्रांतीसारख्या स्फोटांनीं डळमळूं नयेत व आपली वतनदारी तशीच अवाधित चिरंतन चालूं रहावी एवढ्याकरितां निर्मिलेला (Unholy League) 'अपवित्र संघ' होता. त्याचप्रमाणें आपली 'भिक्षुकशाही' अशीच अबाधित चालावी एवढ्याकरितां चाललेल्या या ढोंगी धडपडी आहेत. पण जेथें आज प्रत्यहि राजकीय व धार्मिक मुकुट स्वयंनिर्णयाच्या चुल्हाणांत भराभर वितळून जात आहेत, तेथें असल्या कुजक्या प्रयत्नांचा काय निभाव लागणार? 'ब्राह्मण आईबापांचा मुलगा तो ब्राह्मण' असला पोरकट ठराव या परिषदेंत पसार झाला आहे. ह्या असल्या बेगडी ब्राह्मण्याला जगाच्या बाजारांत नासके म्हणून आज कोणी विचाराना, तेव्हां त्याचें संरक्षण करण्याची ही एवढी धडपड.. जन्मजात उच्चनीचतेच्या पायावर उभारलेल्या धर्माला कोणीहि धर्म म्हणत नाहीं. मेवाडचे राजाधिराज सर नारसिंहजी यांच्या नेतृत्वाखालीं आठ हजार रजपूत प्रतिनिधींनीं ''यह निश्चय किया किं शुद्ध किये गये मलकाना आपना भाई स्वीकार किये जाय''- आजपासून शुद्ध केलेले रजपूत आपले बंधू झाले ही एकमतानें केलेली घोषणा ज्या न्यायी उदारतेनें केली व याची प्रत्यक्ष साक्ष म्हणून त्यांच्याबरोबर गुडगुडीपान केलें, त्याला धर्म म्हणत असतात. ही जाणीव या बेगडी ब्राह्मणांस जितक्या लवकर होईल तितकें बरें.

सुप्रसिद्ध पुराणमतवादी बापटशास्त्री यांच्या नेतृत्वाखालीं भरलेल्या गेल्या यावर्षीच्या पंढरपूरच्या परिषदेवर लिहितांना 'ब्राह्मण कोण!' याची आम्ही मीमांसा केली होती. ब्राह्मण्याबद्दल व क्षत्रियत्वाबद्दल आमच्या ज्या कल्पना आहेत त्या आम्ही तेथें (प्रबोधन वर्ष १ पृ. २४) नमूद केलेल्याच आहेत. तेव्हा पुन: त्याचा उच्चार करण्याचें कारण नाहीं. परंतु आम्हाला शेवटीं एकच नमूद करावयाचें आहे

कीं, स्वधर्माचा ता. ७ जूनचा अंक पाहिल्यास -धर्मकार डॉ. कुर्तकोटी आतां प्रबोधनाचीच भाषा बोलूं लागले आहेत हें कुणालाहि सहज दिसून येईल. व हळूं हळूं सर्वांनाच येन केन मार्गेण तेथेंच द्यावें लागेल अशी आमची खात्री आहे.

जातिभेदाचा एक अजब मसाला

स्वराज्य, स्वातंत्र्य, एकराष्ट्रीयत्व यांच्या आवाजाचा ध्वनि प्रतिध्वनि एकसारखा देशांतून कल्लोळ माजवीत असतां जातीभेदाचा खवीस ब्राह्मणांच्या अंगांत कसा संचार करीत असतो याचें एक अजब उदाहरण गेल्या महिन्याच्या मॉडर्न रिव्ह्यूंत गेलेले आहे. त्यावरून शिक्षणाच्या कार्यातसुद्धां एखाद्या कॉलेजच्या प्रिन्सिपलच्या जागेसंबंधीच्या प्रश्नाच्या वेळीं देखील हा घातकी सर्प गरळ ओकण्यास कमी करीत नाहीं हें स्पष्ट दिसून येईल. कलकत्त्याच्या सुप्रसिद्ध स्वीकृत कॉलेजच्या प्रिन्सिपलची जागा लवकरच रिकामी होणार आहे. जागेवर सर्वदृष्टीनें प्रो. सुरेंद्रनाथ गुप्त या महाशयांचाच जास्त हक्क पोहोंचतो, व त्या मानास ते सर्वथैव पात्र आहेत. हे कलकत्ता व केंब्रिज येथील एम.ए.पी.एच.डी. असून संस्कृत वाङ्मय व भाषा यांत अत्यंत परिणत झालेले आहेत. त्यांचे पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचें ज्ञान अत्यंत गाढ असून, त्यांच्या 'भारतीय तत्त्वज्ञाचा इतिहास' या ग्रंथांची इंग्लंड, जर्मनी, फ्रांस, रशिया इत्यादि देशांतील तज्ज्ञांकडून वाहवा झालेली आहे. परंतु या सर्व गुणांवर पाणी पाडणारा त्यांच्या अंगीं एक अभिजात दोष उत्पन्न झालेला आहे. तो म्हणजे ते जातीनें वैश्य आहेत. तेव्हां ती जागा त्यांना मिळूं नये अशी तेथील 'भिक्षुकशाही'नें खटपट चालविलेली आहे व ती त्यांची खटपट सफल होणारसें दिसतें. प्रो. कॉवेलसारखे परकीय धर्माचे गृहस्थ त्या जागेवर बसलेले चालतात. परंतु आपल्यांतीलच पण जन्मानें ब्राह्मण नसलेला आम्हाला चालत नाहीं. पण जेथें

''समानतेच्या मारी बाता
वरच्या लत्ता झेलित माथां
सर्वेच खालीं झाडी लाथा
न ती निवारी, न ही आंवरी''

असले बेशरमी हैवान चहूंकडेच पसरलेले असल्यावर त्याला बंगल्यांत तरी अपवाद कसा सांपडणार? पुण्यांत एकाद्या हौदावर रक्तानें हात माखलेला खाटीक पाणी घेण्यास गेला तरी आमच्या दे. भ. (?) लवाट्यांचा धर्म आणि दाढी जेथल्या तेथें स्थिर रहाते. पण तेथेंच स्वच्छतेची काळजी घेतल्यानंतर सुद्धां एखादा अस्पृश्य बांधव जाईल म्हटल्यास हेच दे. भ. दाढी उपटून थयथय नाचूं लागतात. आणि तरी सुद्धां स्वराज्य स्वातंत्र्य यांच्या नांवानें लवाटे बेंबींच्या देठापासून किंकाळ्या फोडीतच असतात. हा अगदीं ताजा अनुभव आहे. आंग्लजातीय म्हणूनच एखाद्या प्रोफेसराची नेमणूक हिंदी प्रोफेसराला बाजूस सारून सरकारनें केली म्हणजे जी तोंडे मारे एकच गिल्ला करतात, तींच तोंडें असले फूत्कार बाहेर टाकतात हें ध्यांनांत ठेवण्यासारखें आहे.

लोकमान्य निफाडकर पागल बनले

गेल्या महिन्यांत इगतपुरीच्या वाङ्मयोद्यानांत (?) रहाणारे श्रीयुत दिगंबर एकनाथ केंडे यांचा प्रबोधनकारांचा पक्षपात या मथळ्याचा एक लेख आमच्याकडे आला होता. त्या लेखाला मागील अंकीं उत्तर देऊन निकालांत काढला. पण आतां तोच लेख धुळ्याच्या लोकमान्य नामक 'राष्ट्रीय पक्षाच्या राजकीय मासिकां'त श्रीयुत केंडे यांनीं आपल्या पत्नीच्या नांवानें प्रसिद्ध केला आहे व त्या मासिकाचे संपादक श्रीयुत निफाडकर 'या विदुषीला उत्तर द्या' म्हणून लांभ जीभ काढून आम्हांला विनवीत आहेत. 'आपल्या विचारांना वाटेल त्या 'राष्ट्रीय' पत्रांत अग्रलेखाचा मान मिळेल.'' हें आमचें श्री. केंड्यांना दिलेलें उत्तर धुळ्याच्या लोकमान्य पेठेंतल्या लोकमान्य मासिकाच्या लोकमान्य निफाडकरांनीं खरें केलें, याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहों. 'राष्ट्रीय पक्षाच्या राजकीय मासिका'ला शोभेसाच तो लेख आहे. कांहीं महिन्यांपूर्वी श्री. केंडे यांनीं 'भिक्षुक शाहीचें बंड' पुस्तक मागविलें. त्याची पोंच देणाऱ्या पत्रांतच त्यांनीं म्हटलें होतें कीं ''आम्ही या पुस्तकावर सणसणीत टीका करणार आहो.'' प्रबोधनाच्या दणक्यानें संतापलेली मंडळी गतवर्षी प्रबोधनकाराला खुनाच्या धमक्यांचीं पत्रें पाठवीत होती. यंदा पोरकट शिव्यागाळीचे लेख व कविता पाठवितात. तथापि, इरसाल हुंडेबाज कायस्थां इतक्या शिव्या देण्याची धाटणी अझून इरसाल ब्राह्मणांना साधलेली नाही. प्रबोधनाची विचारसरणी ज्यांना पसंत नाहीं, तींत ज्यांना ब्राह्मणद्वेषापेक्षां अधिक उपयुक्त कांहीं आढळत नाहीं आणि प्रबोधनाच्या अस्तित्वामुळेंच महाराष्ट्रांत जातिभेदाचा धुमाकूळ माजला आहे अशी ज्यांची कांविळी दृष्टी आहे, त्यांनीं प्रबोधनावर शिखंडी शरसंधान रोंखण्यांपेक्षां प्रत्यक्ष देशहिताचें काहीं कार्य करून दाखवावें हें बरें. आजपर्यंत बायकांच्या नांवानें स्वत: रचलेल्या कविता प्रसिद्ध करणारे कवि-नवरे आमच्या पहाण्यांत व ऐकण्यांत होते; पण स्वत:चा लेख पत्नीच्या नांवानें प्रसिद्ध करण्याचें श्री. केंडे यांचें धारीष्ट पाहून आम्हाला फार लज्जा वाटली. जो लेख प्रबोधनाकडे नवऱ्याच्या नांवानें येतो, तोच लोकमान्यांत पत्नीच्या नांवानें, त्यांत चुडेकाकणाची क्षुल्लक भर घालून, जशाचा तसा प्रसिद्ध होतो! काय हा नामर्दपणा, किती हा मानसिक अत:पात आणि कसला हा आचरटपणा! दिगंबररावजी, आपल्यासारख्या वाङ्मयोद्यानांत राहणाऱ्या विचारवंताला पत्नीच्या नांवाचा बुरखा घेण्याची ही कुबुद्धि कां आठवली? अहो, त्या आमच्या निष्पाप भगिनीच्या नांवाखालीं अत्यंत आचरट विचारांचें प्रदर्शन थाटतांना, आपण जरा भाषेच्या व अलंकाराच्या सभ्यतेकडे तरी लक्ष पुरवायचें होतें. एका वाक्याखेरीज, संबंध लेखांत पुरुषी क्रियापदांच्या तांड्याकडे सुद्धां तुमचें लक्ष जाऊं नये? महाराष्ट्राचा विदुषीवर्ग आजच इतका उद्दाम व बेमर्वत झाला नाहीं कीं जो असले लेख खरडून आपल्या सुप्रसिद्ध शालीनतेची माती करील! प्रबोधनाला किंवा ठाकऱ्यांना नुसत्या शिव्याच द्यायच्या, तर त्याला भांडवल फार थोंडे लागतें. तें तुमच्यापाशीं आहेच. पण त्यासाठीं बिचाऱ्या पत्नीच्या नथींतून तीर कशाला मारता?

बरें, त्या लोकमान्य मासिकाच्या 'राष्ट्रीय' संपादकाला तरी कांही अक्कल! प्रबोधनाचें श्राद्ध घालणारा वाटेल तो लेख व कविता येण्याचा अवकाश, वाटेल तो 'राष्ट्रीय' पत्रकार ठाकऱ्यांच्या नांवानें क्षौर करील. मग निफाडकर तर काय, 'राष्ट्रीय' मिठांत मुरलेलें कागदी लिंबू! जात्या बिलबिलीत पण टणकपणाची ऐट

किती! लेख बाईनें लिहिला आहे कीं बुवानें लिहिला आहे. हेंहि ज्याला नीट समजत नाहीं, त्याच्या नशिबीं टिळकांच्या बडवेगिरीची घंटा लागली आहे ती यथाक्रमच आहे. म्हणे 'विदुषीला उत्तर द्या'. आमच्या भगिनींच्या चरणावर मस्तक ठेऊन, त्यांच्या शंका कुशंकांचें निरसन करण्यांत प्रबोधनाला अत्यानंद वाटेल. पण, अहो फर्डे एडीटर, हो विदुषी नव्हे. हा प्रसिद्धीकरितां धाधावलेला विदुषक आहे. शिखंडी पुढें येतांच भीष्माचार्याची सुद्धां गाळण उडाली. मग आमची कथा काय? शिखंडीला प्रबोधन प्रत्युत्तर देत नसतो.

निष्ठेचे धिंडवडे

शिवकालापासून तों प्रतापसिंहाच्या मृत्यूबरोबरच शिवशाहीचा अंत होईपर्यंत कायस्थ प्रभु स्वराज्यनिष्ठ म्हणवीत असत आणि त्यांच्या कर्तबगारीमुळें सारें जगहि त्यांना स्वराज्यनिष्ठ मानीत असे. शिवशाहीच्या उतरत्या कळे बरोबरच या निष्ठेच्या भावनेला हळूं हळूं ओहटी लागली. तींत त्यांचें स्वत्व धुपून गेलें आणि नुसतें राजनिष्ठत्व शिल्लक उरलें. स्वराज्यनिष्ठेला स्वराज्याचें प्रत्यक्ष अस्तित्व असावे लागतें. राजनिष्ठेचें तसें नाहीं. राजनिष्ठेचें दुकान उघडाउघडा बिनभांडवली. त्यांत तत्वनिष्ठेची मांडणी आणि प्रदर्शनाचा थाटमाट नुसत्या शाब्दिक फूत्कारावरच होत असल्यामुळें, राजनिष्ठेचें सोंग वाटेल त्याला वाटेल तेव्हां नटवितां येतें. स्वराज्यनिष्ठेला स्वत:चें राज्य लागतें पण राजनिष्ठेला नुसता कोणी तरी राजा किंवा राजसत्ता असली म्हणजे झालें. मग तो राजा स्वकीय असो वा परकीय असो. भला असो वा बुरा असो. भाकर घालील तो मालक, त्याच्याकरितां भुंकायचें, त्याच्या निष्ठेला जागायचे, ही जी श्वानाची वृत्ति तीच राजनिष्ठेंत समाविष्ट झालेली आहे, असें विधान केल्यास तें खोटें पाडणें अट्टल राजनिष्ठालाहि बरेंच कठीण जाईल. हें विचार सुचण्याचें कारण बाजीप्रभु देशपांड्यांच्या चारित्र्यावर प्रवचनें झोडणार बहुतेक सर्व कलामबहाद्दर व वाक्पटु त्यावर स्वामीनिष्ठेचा आरोप करतात. बाजीप्रभु जर स्वामीनिष्ठ असता तर मुसलमान स्वामीचा त्यानें त्याग कशाला केला असता? स्वामीच्या बऱ्या वाईटपणावर झुलणारी निष्ठा ही निष्ठाच नव्हें. बाजीप्रभु शिवाजीला सामील झाला तो स्वराज्यनिष्ठेसाठीं, स्वामीनिष्ठेनें नव्हे. खुद्ध शिवाजीनें आपलें व्यक्तिमहात्म्य कधीं वाढविलें नाहीं आणि त्याच्या इमानी अनुयायांनीं स्वराज्याच्या अधिष्ठानाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि भावनेनें शिवाजीकडे पाहिलें नाहीं. शिवाजीपासून तों थेट त्याच्या समाधीवर समाधी घेणाऱ्या कुत्र्यापर्यंत सर्व शिवानुयायीं स्वराज्यभक्त स्वराज्यनिष्ठ होते. बाजीप्रभूचा आत्मयज्ञ स्वराज्यनिष्ठेसाठींच झाला. स्वराज्याचा प्राण स्वराज्याची आधिदेवता शिवाजी. त्या प्राणासाठीं प्राण दिला, यांत स्वामी निष्ठा नसून स्वराज्यनिष्ठाच विशेष होती, हेंच विचारांतीं कबूल करावें लागेल. पण पूर्वजांवर स्वामीनिष्ठेचा लटका आरोप करून, स्वत:च्या कुलुंग्या नोकरपेशाचें व मेल्या मनाचें समर्थन करणाऱ्या स्वराज्यपराङ्मुख कायस्थांना हा विचार कसचा मानवतो? बाजीप्रभु स्वामीनिष्ठ म्हणून आम्हीहि स्वामिनिष्ठ, अशी ही वकीली विचारसरणी आहे. बाजीप्रभू स्वराज्यनिष्ठ होता. यापुढें त्याला स्वामीनिष्ठा श्वानविष्टेप्रमाणें वाटली, म्हणूनच तो शिवाजीला सामील झाला, हेंच त्याच्या चारित्र्याचें खरें मर्म आहे.

एन ४००६--३३

बाजीप्रभूंची पुण्यतिथी

गेल्या २९ मे १९२३ राजीं पुणें व तळें (कुलाबा) येथें वीररत्न बाजीप्रभु देशपांड्यांची पुण्यतिथी साजरी करण्यांत आली. दादरला मात्र या वर्षी सर्वत्र सुतक दिसलें. गुदस्त सालीं कायस्थांच्या स्थानिक सभेनें पुढाकर घेऊन, गोविंदाग्रज मंडळाच्या मदतीनें, केलेला तो टोलेजंग सार्वजनीक उत्सव आणि यंदाची सभेची सुतकी वृत्ति पाहून, सभेचीच पुण्यतिथी करण्याचा प्रसंग लवकर येतो कीं काय, अशी चिन्हें दिसत आहेत. एका चिटणीसाला सभेच्या जगड्व्याळ प्रचंड कार्याचा भार वहातां येणार नाहीं म्हणून मदतीला दोन चिटणीस आहेत. शिवाय मॅनेजिंग कमिट्या, उत्सव कमिट्या वगैरे घोडशाळा आहेतच. परंतु एकालाहि या वार्षिक उत्सवाची कळकळ असूं नयें, हें कशाचें लक्षण? मोठ्या मंडळींनीं जरी अशा रीतीनें आपली अजगरावस्था व्यक्त केली, तरी मिरांडाची चाळ, राऊत वाडी येथील कांही लहान लहान मुलांनीं कांही तरुणांच्या सहाय्यानें ६ जूनला श्रीशिवराज्याभिषेकोत्सव व बाजीप्रभु पुण्यतिथी श्री. कोर्लेकर वकील यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी केली, हें त्यांस खरोखर भूषणावह आहे. मोठ्या कार्यकर्त्या स्थानिक सभावाल्यांच्या तोंडांत लहान मुलांनी घातलेल्या शेणानें तरी त्यांच्यांत काहीं चैतन्य आलें व आमचे इतिहासाभ्यासी प्रियबंधु बाप्पासाहेब बेंद्रे यांनीं निश्चित केलेल्या तिथीला (१३ जुलै) जरी सभेनें उत्सव केला, तरी ती मेली नाहीं. एवढी तरी जगाची खात्री पटेल, ज्यांना आपल्या 'बापा'ची पर्वा नाहीं, त्यांना जगानें तरी काय म्हणून माणसांत गणावें? इतर सामाजीक सुधारणा जळोत, पण पूज्य पूर्वजांची स्मृति वर्षांतून निदान एकदां तरी साजरी करण्याची यांना बुद्धि नसावी? आमच्या कानीं असा एक ऐदी आक्षेप आला आहे कीं हीं उत्सवाची धोंड श्री. ठाकरे चिटणीस असतांना सभेच्या गळ्यांत बळेंच अडकविण्यांत आली. ही आक्षेप खरा मानला तरी त्यांत ठाकरे यांनीं काय वाईट केलें? उत्सव बाजीप्रभु देशपांड्यांचाच ना? आफ्रिकेंतल्या एखाद्या शिष्याचा, रावबाजीचा, बाळाजीपंत नातूचा किंवा एखाद्या बेरडा रामोशाचा उत्सव तर नाहींना ठाकऱ्यांनीं या सोंवळ्या सभाबाईच्या उरावर लादला? बाजीप्रभूचा, शिवराज्याभिषेकाचा किंवा तानाजीचा सार्वजनीक उत्सव करण्यांत पुढाकार घेणें ही गोष्ट सभेच्या चालकांना किंवा सर्रास कायस्थांना 'धाड' वाटत असेल, तर ते कायस्थ प्रभूच नव्हतं. असल्या पुण्यात्म्यांचे-नरवीरांचे-अरे मुर्दांडानों, तुमच्या बापांचे उत्सव तुम्हांला 'धोंड' वाटतात काय? नाहींतर एरवीं तरी काय असे समाजसेवेचे दिवे हीं स्थानिक सभा लावीत असते? जिवंतपणाची साक्ष पटवा, नाहींतर सभेची तिरडी तरी काढा.

जातिविशिष्ट पत्रकारांस एक सूचना

जातिभेद केव्हां आणि कशानें कष्ट होणार असेल तो असो, आज हिंदु समाजांत अनेक जाती आहेत आणि त्यांत उन्नतीची आकांक्षा उद्भवली आहे, ही गोष्ट सत्य आहे. उन्नति म्हणजे काय व ती

कशी साधावी, याची स्पष्ट कल्पना जरी कोणास नसली तरी प्रत्येकजण 'उन्नति उन्नति' या मंत्राचा जप करीत असतो. जातिभेदाच्या दुर्बिणीतून न पाहतां, प्रत्येक जात हा एक संघ आहे व अशा अनेक संघांची एकसमयावच्छेदें सर्वांगीण परिणति होणें हाच अखिल हिंदु समाजाचा आत्मोद्धार, या कल्पनेनें पाहिलें, तर जातिविशिष्ट नियतकालिकें निघतील तितकीं अवश्य पाहिजेत. आज सर्व जातींची संस्कृति आणि प्रकृति एकाच मापाची नाहीं. शिवाय त्यांचे परस्परांतील भेद, भावना, चुरशी अनंत आहेत. त्या सर्व व्यक्त झाल्याशिवाय त्यांचा निरास होणें शक्य नाहीं आणि हिंदु समाजघटनेच्या कार्याची निश्चित रूपरेषाहि आंखतां यावयाची नाहीं; प्रत्यक्ष कार्य तर दूरच राहिलें. या कामीं जातिविशिष्ठ पत्रांचा उपयोग फार बिनमोल होणार आहे. अलीकडे असलीं पत्रें बऱ्याच जाती प्रसिद्ध करूं लागल्या आहेत. सांवता माळी, वंजारी, तेली, कासार, सोनार, भंडारी, शिंपी, न्हावी वगैरे दहाबारा जातींचीं जातिविशिष्ट पत्रें सध्यां जोमांत चालूं आहेत. अस्पृश्य बांधवहि एकदोन पत्रें प्रसिद्ध करतात. ब्राह्मणांतहि गोवर्धनांचें संजीवन, शुल्क यजुर्वेद्यांचें त्रैमासिक आणि सारस्वतांचें एक मासिक, याशिवाय अलीकडे श्री. मुंडल्यांची ब्राह्मण पत्रिका निघूं लागली आहे. हे सर्व प्रयत्न अत्यंत श्लाघनीय होत. या जातिविशिष्ट पत्रांत वास्तवीक त्या त्या जातींच्या उत्क्रांत किंवा अपक्रांत स्थितीचें प्रामाणीक चित्र उमटलेलें असलें पाहिजे. म्हणजे अखिल हिंदु समाजघटनेचे प्रयत्न करणाऱ्यांना आपल्या कार्याची दिशा ठरविणें सोपें पडेल. परंतु बऱ्याच पत्रांची कार्यपद्धत अशी दिसत नाहीं. कित्येक उगाच कवितांची बाडें छापतात. कांहीं काल्पनीक कादंबऱ्यांवर भर देतात. कांही चुटक्यांनीच आपलीं पानें भरून काढतात. कांही निष्कारण वेदान्ताच्या पाल्हाळांतच रममाण होतात. कित्येक केनिया वसाहतीवर प्रवचनें झोडतात, तर काहीं रूरच्या जर्मन गळचेपीबद्दल उगाच कांहीं तरीं भारूड प्रसवितात. जणूं काय त्यांच्या जातींचें पुनरुज्जीवन केनियाच्या व रूरच्या दैवांत अडकून बसलें आहे! कित्येक संपादक आपली विद्वत्ता दाखविण्यासाठीं विनाकारण अशा कांहीं तरी भलत्याच विषयावर फर्डेबाजी करतात कीं, तो विषय त्या विशिष्ट जातींतील एकाहि माणसास नीटसा समजणेंच शक्य नसतें. म्हणजे याचा परिणाम असा होतो कीं, दुखतें पोटांत आणि पायाला मलमपट्टी! मासिक किंवा साप्ताहिक काढलेंच पाहिजे म्हणून काढणें व काढल्यावर उगाच इकडच्या तिकडच्या भारुडानें भरून काढणें बरें नव्हे. आपल्या जातीची शैक्षणिक, औद्योगिक, आर्थिक, सामाजीक व धार्मिक परिस्थिती काय आहे. तद्विषयक कोणकोणत्या चळवळी जातींत चालू आहेत, अनुकूलता किती, विरोध किती, आपला इतिहास काय वगैरे सर्व बाबी जातिविशिष्ट पत्रांतून प्रामाणिकपणें प्रसिद्ध होत जातील, तर इतर सर्वजातींना आपापल्या चळवळींची पावलें टाकताना व प्रसंगी एकमेकांस सहाय करण्यास फार सोयीचें पडेल. विशेषत: अखिल हिंदु समाजाच्या पुनर्घटनेस असलीच चर्चा फार फायदेशीर होईल. सर्व बांधवांनीं या सूचनेचा विचार करावा अशी विनंती आहे.

□□□

एन ४००६--३३अ

अग्रलेख

जपान राष्ट्राचें प्रबोधन

(लेखांक ३ रा)

सार्वजनिक शिक्षणप्रसारांत अखिल आशिया खंडांत आज जपाननें स्पृहणीय आघाडी मारली आहे. सन १८७१ पर्यंत ज्या जपानांत अज्ञानाचें सैतानी राज्य होतें, तेथें आज य:कश्चित् रिकशावाला माणूस सुद्धां वर्तमानपत्रें धडधड वाचतो व प्रचलीत सर्व विषयांवर मुद्देसूद बुद्धिवाद करतो! जपाननें अवघ्या ३०-३५ वर्षांत आपल्या राष्ट्रांतील निरक्षरतेचें उच्चाटन कसें केलें, हा मुद्दा विचारार्ह आहे. जपान हें स्वतंत्र राजसत्तात्मक राष्ट्र असल्यामुळें, तेथल्या सरकारनें कोट्यवधि रुपयांचा खजिना मोकळा केला; परंतु गुलाम हिंदुस्थानांत सरकार परकें असल्यामुळें, शिक्षणाच्या प्रसारांत या देशाची प्रगति होणें शक्य नाहीं, असा कोटीक्रम पुढें येण्याचा संभव आहे. त्याचा येथेंच खुलासा केला पाहिजे. हिंदुस्थान शिक्षणाच्या बाबतीत अगदींच मागसलेला आहे. ५ खेड्यांपैकीं चार खेड्यांत मुळीं शाळाच नसते. शेंकडा १० पुरुष आणि शेंकडा १ पेक्षां कमी स्त्रिया साक्षर आहेत. लहान मुलांमुलींच्या शिक्षणाचें प्रमाण शेकडां १/८ तरी पडेल कीं नाहीं याची शंकाच आहे. पांचकोटी वस्तीच्या जपानांत तेथले सरकार दरसाल ५० लाख पौंड खर्च करतें. ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या चोवीस कोट प्रजेच्या शिक्षणासाठीं दयाळू मा. बाप इंग्रेज सरकार अवघ्या १५ लाख पौंडाचा स्वार्थ त्याग करतें. 'राजा लुटी जरी प्रजाजनाला! माता कापी निज बाळाला' अशा प्रसंगीं 'शरण कुणा जावें' हें रडगाणें गात बसण्याचें हें युग नव्हे. परकी सरकार हें बोलून चालून परकी. त्यात आंतड्याचा कळवळा येणेंच शक्य नाहीं व तशी कोणी अपेक्षाहि करूं नये. पण सरकार परकी असलें तरी हिंदी लोकांनी स्वावलंबनाच्या जोरावर शिक्षणप्रसारार्थ आजपर्यंत कितिसे प्रयत्न केले आहेत? ज्या राष्ट्राला अवघ्या ३० दिवसांत एक कोटी रुपयांचा फंड जमवितां येतो, जेथें दानधर्माची प्रवृत्ति रयतेंत अझून तीव्र आहे आणि शिक्षणासाठीं सर्व दीन प्रजा व्याकूळ झाली आहे, तेथें सार्वत्रिक शिक्षणाचे स्वतंत्र यत्न होऊं नयेत, हें काय? पदवीधरांची संख्या इतकी भरंवसाट वाढली असूनहि, खेड्यापाड्यांत शिक्षणदानाचें कार्य करण्याऐवजीं, जो उठला तो सरकारी नोकरीच्या तबेल्यांत घुसतो! फंड जमवायचे कशाला? तर कारस्थानी गुंडांचीं पोटें जाळायला! चळवळ कसलीहि असो, तिचा सारा वावदुकी मारा मोठमोठ्या शहरांतून! फंडासाठीं चळवळीचा मारा मात्र खेडोपाडीं, पण फंडांची वासलाद लागते शहरांत, 'राष्ट्रीय' शिक्षणाचा गाजावाजा

अलीकडे ठिकठिकाणी बराच ऐकूं पण त्याची काय दुर्दशा आहे हें, लोकविश्रुत आहेच. सारांश, सरकारी मदतीची अपेक्षा न करतां, केवळ स्वावलंबनाच्या तत्त्वावर, तें सोंवळे 'राष्ट्रीय' शिक्षण कांहीं दिवस मरूं द्या, निदान सार्वत्रिक साक्षरतेची चळवळ हिंदुस्थानांत यशस्वी होणें मुळीच दुरापास्त नाहीं. पण आमच्या फंडगुंडी प्रवृत्ति आणि स्वार्थी भावना नष्ट होतील तेव्हा नां? येथली कोणतीही चळवळ कोणीहि प्रामाणिकपणानें व शुद्ध उद्देशानें चालवीत नाहींत. त्यांत कांहीं ना काहीं डांवपेच, फंडगुंडीपणा, कारस्थान, जातिभेद हे प्रकार असायचेच. मग शिक्षणच तेवढें त्याला अपवाद काय म्हणून? शिवाय, हरएक कामांत सरकारी कृपेच्या कुबड्यांवर टेकण्याची द्वाड खोड आमच्या आंगीं भिनल्यामुळें, स्वतंत्र प्रयत्नांचें पर्यवसान अखेर 'ग्रँट इन एड'च्या बासिस्म्यांत व्हायला मुळींच वेळ लागत नाही. तरी देखील, स्वराज्य स्वातंत्र्य असहकार यांच्या व्याख्यानांचा धूमधडाका सारखा चालूं असतोच!

सन १८७१ साली जपाननें शिक्षणप्रसाराचा प्रश्न हातीं घेतला. त्या वेळी सरकारनें असा जाहीरनामा काढला कीं 'यापुढें कोणत्याहि खेड्यांत अशिक्षित कुटुंब आणि कोणत्याहि कुटुंबात अशिक्षित मनुष्य केव्हांहि आढळतां कामां नये.' जाहीरनामा अक्षरश: अंमलांत आला. निरक्षतेची अशा रीतीनें हकालपट्टी झाल्यानंतर, सन १८९४-९५ सालीं जपानच्या शिक्षणयुगाचें दुसरें मन्वंतर सुरूं झालें. या वर्षी अवचित चीन-जपान युद्धाचा मुकाबला आला. सायंकाळीं वृक्षलतेवर दिसणारी चिमुकली कळी केवळ एका रात्रींत उमलून तिचें प्रात:काळीं जसें टवटवीत गेंददार फुल बनते, तद्वतच या चीन-जपान युद्धाच्या प्रगतीबरोबर बरोबर जपानी राष्ट्राचें मन एकूण एक बाबतींत प्रबुद्ध होत गेले. परिस्थितीचा धक्का बसल्याशिवाय गति मिळत नाहीं आणि गतीला प्रयत्नांचें व कार्यकुशलतेचें बळ मिळाल्याशिवाय प्रगति होत नाहीं. प्रस्तुत युद्धाचें तोंड लागतांच जपान खडबडीत जागा झाला. त्याचा लढवय्येपणा कसाला लागला. युद्धविषयक शस्त्रास्त्रांतली उणीव त्याला दिसून आली. आपले राष्ट्र स्वतंत्र व जिवंत राखण्यासाठीं बुद्धिवर्धक शिक्षणाच्या जोडीनेंच पौरुषत्व-पोषक युद्धकलेची आपण कसोशी केली पाहिजे, ही त्याला जाणीव झाली; आणि त्याप्रमाणें त्यानें केलेले प्रयत्न दिवसेंदिवस इतक्या विलक्षण प्रमाणांत वृद्धिंगत होत गेले कीं गेल्या रूसो जपानी युद्धांत आरमारी व लष्करी सामर्थ्यांत जपान ह्मणजे पाश्चात्यांना एक 'भयंकर बागुलबोवा' होऊन बसला आहे. गेल्या युरपियन महायुद्धांत तर जपाननें एकहि फुसका बार न काढतां, केवळ या 'बागुलबोवा'च्या सुक्या दमधाटीवर ब्रिटीश सिंहाकडून घरजांवयांसारखे आपले हातपाय रगडून घेतले! जपानच्या श्रेष्ठतेचा हा चमत्कार अद्भुत तर खराच. पण तो खरोखर केवळ प्रयत्नवादानेंच घडून आला काय? प्रयत्नांची पराकाष्ठा होऊनहि यशाची झुळूक न आलेली अपयशी कार्ये पुष्कळ आढळतील. मग या चमत्काराचें बीज कशांत आहे? पुनरुज्जीवनाच्या जपानच्या कल्पना काय सुरुवातीपासूनच स्पष्ट व निश्चित असाव्या? असल्यास त्याचें कारण काय? निवळ पाश्चिमात्य शिक्षणाचा, सुधारणेचा, सायन्सचा आणि राजकारणी डिप्लोमसीचा धडा तंतोतंत गिरवला, त्यांची शस्त्रास्त्रसामुग्री जय्यत तयार ठेवली, आणि त्यांचें पत्करलें म्हणजे हा एवढा अकल्प चमत्कार घडून येईल? केवळ अनुकरणप्रियता ही काहीं यशांची गुरुकिल्ली नव्हे, आणि गुरुप्राप्त ज्ञानाची बांधलेली शिदोरी कांही जन्माला पुरत नाहीं, किंवा तिच्या जोरावर गुरूच्या तंगड्या गुरूच्या गळ्यांत घालून शिष्याला शिरजोर होतां येत नाहीं. मग या चमत्काराचें कोडें कसें सुटणार? तें डॉकर इनाझो निटोबी या विद्वान गृहस्थानें आपल्या बुशिडो (जपानचा आत्मा) नामक ग्रंथांत फार खुलाशानें सोडवून

दाखविलें आहे. डॉ. निटोबी म्हणतात, ''जेव्हां आमचा देश आम्ही परकी व्यापाराला मुक्तद्वार केला, जिकडे तिकडे अर्वाचीन सुधारणांचा व साधनांचा प्रसार केला, पाश्चात्य ज्ञानाचा व सायन्सचा अभ्यास धडाक्यानें चालविला, त्यावेळीं नुसती व्यापारधंद्याची वाढ किंवा गजांत लक्ष्मीची प्राप्ति हें कांहीं आमचें मुख्य ध्येय नव्हतें. पाश्चात्यांची ती शुद्ध आंधळी नक्कल होती असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. पण आमचें जपान राष्ट्र म्हणजे जगांतल्या इतर सर्व राष्ट्रांपुढें दर्यामि खसखस आहे, नुसती परसांतली भाजी आहे, क्षुद्र माणसांचा क्षुल्लक देश, आहे, अशा प्रसृत झालेल्या वल्गनांमुळें आमच्या पिढीजाद राष्ट्रीय इभ्रतीचा पाणउतारा कसा नष्ट करतां येईल, या विवंचनेचें ध्येय प्रामुख्यानें आमच्या डोळ्यांसमोर होतें. सांपत्तिक किंवा औद्योगिक पुनरुज्जीवनाचे प्रश्न मागाहून उत्पन्न झाले; आधीं नव्हते. कांहीं असें म्हणतात कीं जपाननें चीनशीं केलेलं युद्ध मुराटा गन्स आणि क्रप कॅनन्सच्या जोरावर जिंकलें. कांही म्हणतात कीं आधुनिक ज्ञानाच्या बळावर तें यशस्वी केलें. यांत सत्य असलें, तर तें अर्धवट सत्य होय. खरी वस्तुस्थिति अशी नाहीं. उत्तम कारागिरानें बनविलेला पियानो असला, म्हणून त्यांतून गंधर्वाचें गाणें काय आपोआप निघत असतें? पियानो वाजविणाराच पट्टीचा कुशल असल्याशिवाय काय होणार? तोफाच जर लढाया जिंकूं शकत असतील, तर लुई नेपोलियनाच्या मिट्रेल्यू तोफांनीं प्रुशियनांचा धुव्वा कां उडविला नाहीं? किंवा स्पॅनियार्डाच्या मॉझर तोफांनीं फिलिपिनो लोकांना पादाक्रांत कां केलें नाहीं? तेखदार शस्त्रास्त्रांचा कितीहि पुरवठा असला तरी आत्मचैतन्याचा स्फुल्लिंगच भडकल्या शिवाय कांहीं कार्य होत नाहीं. तोफा कितीहि उत्तम घडणीच्या असल्या आणि बंदुका कितीहि झटपट मोडणीच्या असल्या, तरी त्या आपण होऊन कधीं उडत नाहींत आणि शिक्षणपद्धत कितीहि सुधारलेली असली तरी त्यामुळें नामर्दाचा मर्द बनत नाहीं. असें होणेंच शक्य नाहीं. यालूच्या कांठीं, कोरियांत आणि मांचुरियांत आमच्या जपानानें जो दिग्विजय गाजविला, त्याला कारण कोण? आमच्या दिव्य व पूज्य पूर्वजांचे आत्मे. हे आत्मे आमच्या हाताला धरून पराक्रम करवीत होते. आमच्या हृदयांत चैतन्य पसरीत होते. आमचे ते क्षात्रमूर्ती पूर्वज मृत नव्हत. जागतेज्योत आहेत. पाहाणाराला स्पष्ट दिसतात. जपानी मनुष्य कितीहि सुधारलेला असो, त्याच्या सुधारणेचें कवच फोडा कीं आंत अस्सल सामुरायी क्षत्रियत्वाचा आत्मा प्रगट झालच पाहिजे. त्याच्या मनांत एखाद्या नवविचाराचें बीज पेरणें झाल्यास, युगानुयुगांच्या संस्काराची त्याची मनोभूमिका तुम्हांला खोलवर नांगरून पोंखरावी लागेल, नाहींतर पोपटपंचीपलीकडे अधिक फळाची आशा त्याच्याकडून करण्यांत अर्थ नाहीं.''

जपान्यांचा गतेतिहास थेट पौराणिकी वळणाचा असूनहि त्यांचा पूर्वजाभिमान किती जाज्वल्य आहे तो पहा; आणि आमच्या भरतखंडांत- विशेषत: महाराष्ट्रांत-शिवाजी तानाजी बाजी दत्ताजी लक्ष्मीबाई सारखे वीर व वीरांगनांचा इतिहास काल पुरवाचा ताजा तडफडीत असून त्यांच्या नांवावर फंडबाजी करण्यापलिकडे आमच्या मनाची मजल जाऊं नये हें दुर्दैवच नव्हे तर काय?

स्वराष्ट्राचा अभिमान केवळ नुसत्या साक्षरतेनें किंवा नुसत्या पूर्वजप्रेमानें उत्पन्न होत नसून, त्यांचें अद्वैती एकीकरण व्हावें लागतें, हें यावरून स्पष्ट होत आहे. स्वत:च्या व राष्ट्राच्या इभ्रतीबद्दलच्या जपान्यांच्या कल्पना अत्यंत तीक्ष्ण आहेत व त्यामुळें इतर राष्ट्रें त्यांवर आत्मप्रौढीचा व पोंकळ डौलाचा आरोप करतात. त्यांचा स्वावलंबी बाणा इतका जोरावर आहे कीं पूर्वीं इंग्रजांशीं केलेल्या तहनाम्यामुळें योकोहामाला राहिलेली ब्रिटीश रेजिमेंट म्हणजे 'आपल्या राष्ट्रीय इभ्रतीवरचा कलंक' असें

त्यांना वाटे. प्रत्येकाला आपापल्या बुद्धीच्या मगदुराप्रमाणें राष्ट्रसेवा कशी करतां येईल हें काळजीपूर्वक शिकविण्याकडे त्यांच्या शिक्षणपद्धतीचें धोरण होतें. कायद्यांची व राज्यव्यवस्थेची मांडणी पाश्चात्य पद्धतीवर आंखण्यांत, जपान्यांचा मुख्य उद्देश हा होता कीं आपल्या वाजवी अधिकारांचीं पाश्चात्यांना जाणीव होण्यांत अडचण पडूं नये आणि त्यांनीं आपल्या राष्ट्रसंघांत जपानला समान दर्जाचा मान बिनतक्रार द्यावा.

अखिल राष्ट्राला साक्षर करतांच त्याच्या सर्वांगीण सौभाग्यमंदिराचा कळस लागलाच चढतो असें नाहीं. परंतु राष्ट्राला चिरकाल स्वतंत्र व स्वावलंबी बनविण्याचा पाया राष्ट्रांतील एकूण एक व्यक्तिमात्राच्या साक्षरतेनेंच बसविला जातो, हें अर्वाचीन काळांत जपानच्या प्रबोधनानें प्रत्यक्ष दाखविलें आहे. जपानी मुलांच्या शिक्षणाची सुरुवात 'किंडरगार्डन' पद्धतीनें होते. हें शिक्षण सर्वस्वीं स्त्रियांच्याच हातीं सोंपविलें असल्यामुळें नैसर्गिक जिव्हाळ्याच्या जोरावर त्याची प्रगति चांगली होते. तीन ते सहा वर्षांची जपानी बचडीं खेळतां खेळतां ३-४ वर्षांत खडाखड लिहूं वाचूं लागतात. विद्या घमघम येण्यासाठीं छमछम छडीचे तडाखे हातापाठीवर उमटलेच पाहिजेत, असा हिंदी शिक्षणजेलखान्याचा नियम जपानांत नसल्यामुळें, लहानपणच्या मोकळ्या मनाच्या टवटवीत कळ्या निष्कारण कोमेजून किंवा करपून न जातां, शाळेच्या स्वच्छंद वातावरणांत जपानी मुलांमुलींचे स्वभाव दिलदार, धाडसी व स्वातंत्र्यप्रिय बनत जातात. पूर्वी किंडरगार्टनचें सामान जपानला जर्मनी पुरवीत असे. आतां त्यासाठीं शेकडो स्वतंत्र जपानी कारखाने हा माल तयार करून पुरवीत असतात. १८९० सालीं सक्तीचें शिक्षण सुरूं झाले व १९०० सालीं तें जपान राष्ट्रांत मोफत केलें. निरक्षर टोणपा किंवा निरुद्योगी भटक्या आज जपानांत सहसा आढळत नाहीं. हिंदुस्थानांत सुराज्याची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठीं आमच्या दयाळू इंग्रज सरकारनें सर्व देशभर रेलवेची जाळीं विणलीं. जपाननें आपल्या भाग्योदयासाठीं सर्व देशभर साक्षरतेचा प्रसार केला. मावशीच्या आणि आईच्या प्रेमांत केवढा हा भेद! साक्षरतेनेंच माणसाला माणुसकीची ओळख पडते. निरक्षर माणसें आणि दगडधोंडे यांत जिवंतपणापेक्षां अधिक कांहींहि भेद नाही. असल्या २२-२३ कोटी दगडधोंड्यांवर राज्य करणाऱ्यांना 'खूप शर्तींची' आणि 'मर्दुमकीची' शेखी मिरवितांना लज्जाच वाटली पाहिजे. जपाननें मुलांमुलींच्या शिक्षणाची एकदम एकत्र सुरुवात करून, पुरुष-शिक्षण आधीं का स्त्रीशिक्षण आधीं, या वादाची नांगीच मोडून टाकली. पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांसाठीं प्राथमिक मध्यम व उच्च शिक्षणाची सोय जपाननें केल्यामुळें, निरक्षर व अडाणी मातेच्या कुसव्याकडे बोट दाखवून आपल्या निर्बुद्धतेची सारवासारव करण्याचा प्रसंग कोणत्याहि आधुनिक जपान्यावर येत नाहीं. सरकारी मदतीशिवाय चालणाऱ्या पुरुषांच्या व स्त्रियांच्या शाळा कॉलेजें व युनिवर्सिट्या जपानांत पुष्कळ आहेत. टेटसुगाकन व शुकियो येथल्या युनिवर्सिट्या तत्वज्ञान व धर्म शिकविण्यांत नावाजलेल्या आहेत. याशिवाय क्रिस मिशनऱ्यांनीं थोड्या शाळा चालविलेल्या आहेतच. उच्च शिक्षणाच्या धोरणांविषयी स्वतंत्र लेखच लिहावयाचा असल्यामुळें येथे मौन धरलें आहे. जपानी शिक्षणपद्धतींत 'धार्मिक' म्हणजे धर्म विषयक शिक्षण मुळींच दिलें जात नाहीं. जपानी लोक जात्याच संसारी व ऐहिक स्वराज्याचे (प्रपंचाचे) भोक्ते असल्यामुळें, धर्म विषयक काथ्याकुटाकडे त्यांचें लक्ष वेधत नाहीं. त्यांना त्याची फारशी पर्वा नाहीं धर्मशील (?) हिंदुजनांप्रमाणें त्यांना मृत्युनंतरच्या मोक्षाची काळजी नाहीं. ते 'याच जन्मीं याच डोळां' ऐहिक साम्राज्याचे भोक्ते आहेत. पूर्वी एकदां रोमन

कॅथलिकांवर त्यांची करडी नजर होती, पण आतां ते इतर धर्मपंथांविषयी सहिष्णु आहेत. क्रिस्त्यांची बाटवाबाटवी यथातथाच चालते तथापि कोणी महामूर्खांनें धर्मांतर केलेंच, तर त्याला समाज किंवा कुटुंब बहिष्कृत मानीत नाहींत. पंचे उपरणी पागोट्याच्या घरांत राहील एक हॅट पाटलुण्या! त्यांत काय? एवढीच त्यांची भावना असते.

जपानचा धर्मलंडपणा पाहून क्रिस्ती धर्ममार्तंडांच्या आंतड्यांना पीळ पडतात. धार्मिक भावनेशिवाय जपानचें हें एवढें मोठें ऐश्वर्य अखेर मातीला मिळेल, अशी त्यांना भीती वाटत असते आणि कित्येक दिवाणखानी तत्ववेत्ते सुद्धां या भीतीची कधिमधीं री ओढतात. आशिया खंडांतल्या इतर धर्मभीरू राष्ट्रांची आज काय दैन्यावस्था धर्मशीलतेनें केलेली आहे, ती पाहिली, म्हणजे आमरण गुलामगिरींत पिचविणाऱ्या धर्मशीलतेपेक्षां, स्वैर फोंफावणाऱ्या स्वातंत्र्याच्या प्रभंजनांत आपल्या शक्तियुक्तीची कसरत करतांना आड न येणारा धर्मलंडपणा पत्करला, असें वाटूं लागतें; आणि स्वराष्ट्राच्या प्रगतींसाठीं धर्माचे पायबंध लाथाडण्यांत जपाननें दाखविलेल्या धैर्याबद्दल त्याचें अभिनंदन करावेंसें वाटतें. चातुर्वर्ण्यांचा आमूलाग्र होळीनंतरच ज्या जपाननें आपल्या राष्ट्राच्या प्रबोधनाची रंगपंचमी साजरी केली, त्याच्या अभिनव पुनरुज्जीवनाच्या गुडीपाडव्याचें तोरण हें धर्मविषयक गुलामगिरीचें मरण कां ठरू नये? धार्मिक गुलामगिरींत आडकलेल्या एशियाटिक इतर गुलाम राष्ट्रांपैकीं हिंदुस्थानाविषयीं कौंट ओकुमा यांनीं काढलेले उद्धार प्रत्येक स्वराज्यवादी हिंदूनें विचारांत घेऊन आचारांत उमटविण्यासारखे आहेत. कौंट म्हणतात ''हिंदुस्थानची आजची दैन्यावस्था त्याच्या निराशावादी धर्माचें फळ आहे. हा धर्म उठल्या सुटल्या कपाळाला हात लावण्याचें मात्र छान शिकवतो. सुदैवानें आमचा जपान असल्या धर्मापासून अलिप्त राहिला! आमची धार्मिक सहिष्णुता पहा आणि धर्माच्या नांवावर नित्य चाललेले तुमच्या हिंदुस्थानांतील तंटे बखेडे व यादव्या पहा. (Hindoostan cannot achieve what Nippon has attained until the Hindoostanees cast aside their bigotry.) हिंदुस्थानी लोकांनीं आपल्या म ास्तकातले धर्मवेड सफाई घालविल्याशिवाय, जपानला प्राप्त झालेली सिद्धी हिंदुस्थानाला लाभणें शक्य नाहीं.

□□□

वर्ष २ : अंक २० : १ ऑगस्ट १९२३

निवेदन

हितगुजाचे बोल

आजचा हा प्रबोधनाचा २ऱ्या वर्षाचा २० वा अंक. आणखी ४ अंक आश्रयदात्यांच्या चरणसेचेला रुजूं झाले की चालूं वर्षाच्या जबाबदारींतून आम्ही मुक्त होऊं. यंदा प्रबोधनाचा प्रसार पुषकळच झाला असून, त्याच्या ठरावीक आठ पानाचें क्षेत्र अपुरें पडूं लागलें आहे. आजपर्यंत कोणत्याहि तऱ्हेची भीड घालून वर्गणीदार मिळविण्याचा मामुली उपक्रम आम्ही केव्हांहि न केल्यामुळें, आमचा प्रत्येक आश्रयदाता स्वयंप्रेरणेनें प्रबोधनाला 'आपला' म्हणविण्यास पुढें आलेला आहे. बुद्धिविकास करणाऱ्या अनेक विषयांचा प्रबोधनांत समावेश करून त्याची उपयुक्तता कशी वाढवितां येईल, याच्या शेंकडों सूचना रसिकांकडून आल्या. परंतु स्वतंत्र छापखान्याची सोय होईपर्यंत मनांतले मांडे मनांत कुसकरण्या शिवाय आम्हालाहि कांहीं मार्ग दिसेना. मध्यंतरी एका उदारधी मित्राच्या आश्रयानें हा उपक्रम सिद्धीला गेला होता. परंतु तेथेंहि दुर्दैवाच्या दिव्यांत आम्हाला पोळून घ्यावें लागलें. छापखाना स्थापन होऊन अवघा दीड-महिना होतो न होतो तों आमचा प्रियमित्र अवचित मरण पावला आणि त्याच्या पोरसवधा क्षुद्रवृत्ति वारसांशीं कसल्याहि तऱ्हेची हेंगल घालीत न बसतां, बसला तितका सांपत्तिक चट्ठा निमूट सोसून, मित्राच्या मृत्यूच्या पांचव्या दिवशींच छापखान्याला रामराम ठोकून घरी स्वस्थ बसलों. यंदाचें वर्ष दिव्यानुभवाचें आहे. परमेश्वर आम्हाला सर्वतोपरीं कसाला लाऊन पहात आहे आणि अगदीं ऐन संकटाच्या क्षणाला या दुबळ्या प्रबोधनाला चटकन हात देऊन प्रगतीच्या मार्गावर धूम धांव ठोकण्याचें सामर्थ्य देत आहे. जग हें कौतुकानें भरलें आहे. परंतु चोहों बाजूला निराशेचा गर्द अंध:कार दाटला आहे; संकटांचा अनन्वित दणदणाट सुरू आहे; मानसिक व्यग्रतेच्या वेदना कमी, म्हणून शारीरिक व्यथेची त्यांत भर पडत आहे. निंदकांच्या कृष्णजिव्हेची कृष्ण कारस्थानें काळीकुट्ट वठणार नाहींत म्हणूनच कीं काय, एकाच हाडारक्ताचे सगेसोयरे त्या उलट्या काळजाच्या कारस्थानांत आपल्याही बुद्धिसर्वस्वाची काजळी मिसळीत आहेत; अशा अवस्थेंत चटकन लख्ख प्रकाश पडावा आणि नजरेला उत्साहपूर्ण परिस्थितांची चैतन्याची ज्योत दिसावी, हें ईश्वरी कृपेचें प्रत्यक्ष चिन्ह नव्हे तर काय? ईश्वरी लीलेच्या कौतुकाचा हा दुर्मिळ अनुभव भोगण्याचें भाग्य प्रबोधनाला लाभलें आहे. संकटांचे हे महदुपकार आहेत. संकटांमुळेंच परमेश्वराची कृपादृष्टि आपल्याकडे वळते आणि आपण परमेश्वराभिमुख

बनतों. त्या सुखसोहळ्यापुढें इतर ऐहिक लाभांच्या परवडी काय होतं! सारांश, कळविण्यास आनंद व अभिमान वाटतो की प्रबोधनाच्या मार्गक्रमणांत संकटांचे खांचखळगे जरी नानाविध आले, गेले व सध्यां आहेत, तरी त्याच्या प्रगतीचा व लोकप्रियतेचा वेग अप्रतिहत वाढत्या प्रमाणावर आहे. प्रबोधनकरितां स्वतंत्र छापखान्याची व्यवस्था बहुतेक जुळून आली आहे आणि तिसऱ्या वर्षाचा पहिला सोळा पानांचा अंक त्यांतच मुद्रित होऊन प्रिय वाचकांच्या चरणसेवेला रुजूं होईल.

तिसऱ्या वर्षांची सुधारणा : आगाऊ अघळपघळ वचनें देऊन, मग सबबींची हुज्जत घालण्याचा प्रसंग प्रबोधनाला नको आहे. साधारण रूपरेषाच द्यायची तर एवढें सांगता येईल की प्रबोधनाची उपयुक्तता व आवश्यकता वाढविण्यासाठीं १) दुप्पट पृष्टें वाढविणें, २) अग्रलेख व स्फुट विचारांना ८ पृष्टें, ३) युरोपियन व अमेरिकन पत्रांतील उत्तम लेखांचा 'विचार-परिचय' २ पृष्टें, ४) स्वतंत्र विचारांच्या लेखकांचे विविध लेख, २ पृष्टें ५) वाङ्मय-परिचय (कलमबहाद्दरांस शेला पागोटें), कविता, पत्रव्यवहार वगैरे २ पृष्टें, अशी मांडणी करण्याचें ठरविलें आहे. अर्थात या वाढत्या सेवेच्या मानानें प्रबोधनाची वर्गणीची भूक थोडी वाढल्यास, तो न्याय्य आहे, असेंच रसिकांस वाटेल, याचा खुलासा २४ व्या अंकीं स्पष्ट व विस्तृत करण्यांत येईल. प्रबोधनाचें अंतरंग शक्य तितकें ओजस्वी व विचारपरिपूर्ण करण्यासाठीं, अनेक कसलेल्या विद्वान लेखकांचा संपादकगणांत समावेश करण्यांत आलेला आहे.

१०० वर्षांपूर्वीचा महाराज

हा ऐतिहासिक ग्रंथ कधीं प्रसिद्ध होणार? याची विचारणा करणारीं शेकडों पत्रें आतांपर्यंत आली. त्याबद्दल खुलासा येणें प्रमाणें. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे महाराष्ट्राच्या एका जिव्हाळ्याच्या व महत्त्वाच्या बाबीचा इतिहास. इतिहासाचें लेखन म्हणजे मोठी जबाबदारी कादंबरीप्रमाणें तें झटपट उरकतां येत नाही. सिद्धांताच्या चार ओळी लिहिण्यासाठी चारचार रात्री जागून, जुन्या कागदपत्रांच्या मोडी अरण्यांत वावरावें लागतें. प्रस्तुत ग्रंथाच्या बाबतींत आतांपर्यंत इतकी विस्तृत सामग्री हातीं आली आहे आणि लेखनाची मर्यादा इतकी वाढली आहे की आमचा पूर्वीचा सर्व अंदाज आज रद्द होऊन बसला आहे. छत्रपति प्रतापसिंह व रंगो बापूजी यांच्या चरित्राविषयीं आतांपर्यंत ज्या ज्या उतावळ्या लेखकांनी चुटपुट्या माहितीवर लेख लिहिण्याचें धाडस केलें, त्यांना प्रस्तुत ग्रंथांतल्या पुराव्यानें स्वत:च्या धाडसाबद्दल शरम वाटेल. हिंदवी स्वराज्याचा खून आणि रंगो बापुजीची स्वराज्यविषयक कामगिरी हा विषय प्रथम दिसला तितका सुटसुटीत व सोपा नव्हे, अशी आम्हांला पूर्ण प्रचिती आली. कोठचा भाग ठेवावा आणि कोणचा वगळावा, अशा गोंधळांत कांही महिनें मनोवृत्ति गिरक्या मारीत होती. अखेर, काय वाटेल तें होवो, हातीं आलेलें सर्व साहित्य प्रसिद्ध करून टाकण्याचेंच निश्चित केलें. प्रतापसिंहाच्या पदच्युतीला कारण झालेलें भिक्षुकी कारस्थान बोरघाटाच्या वरच्याच प्रदेशांत असावें, असा साधारण तर्क होता. पण हीं सातारा पुण्याची कारस्थानी लफडी दादर माहीमच्या भिकी सोनारणीच्या खोपट्यापर्यंत पसरलेली होती. सिद्धांताला सिद्धांत खोडीत चालला, पुराव्यावर पुरावा वाढत गेला आणि ग्रंथ अंदाजा बाहेर वाढला. कोणतेंहि कार्य सप्रमाण व सर्वांगपूर्ण झालें म्हणजे बरें. त्यासाठीं विलंबाचा दोष आला तरी पत्करला. आतां स्वतंत्र छापखान्याची सोय होत आहे. सर्व साहित्य ठाकठीक जमलें कीं हा ग्रंथ स्वत:च्या खास देखरेखीखालीं दिसेंबर

पर्यंत छापून प्रसिद्ध करण्याची उमेद बाळगिली आहे. पूर्वी ज्यांनीं १ रुपया भरून नांवें नोंदविली होतीं, त्यांना मागेच स्वाध्याय संदेश पुस्तकाची एकेक प्रत पाठवून त्यांचा हिशोब फेड केला आहे. कांही थोड्या वर्गणीदारांचे १२ आणे जमा आहेत, ते पुढील वर्षाच्या वर्गणींत किंवा ग्रंथाच्या नवीन ठरणाऱ्या सवलतींत वळते होतील. विलंबाबद्दल सज्जनांच्या क्षमेची याचना करतों.

एक कटु कर्तव्य : आज दुसरीकडे प्रबोधनाची वर्गणी बुडविणाऱ्यांची नांवें प्रसिद्ध केली आहेत. नियतकालिकांची वर्गणी बुडविणें हें एक महाराष्ट्रांतले फार जुनें व्यसन आहे. गुदस्तसालीं गोव्याकडच्या वर्गणीदारांनीं आम्हांला चांगलाच हात दाखविल्यामुळें, यंदापासून आगाऊ पैसे भरणाऱ्याचेंच तेवढें स्वागत केलें. स्वयंसेवक, भारत मित्र इ. भारदस्त मासिकांचीहि गोवेकरांच्या वर्गणी-बुडवेपणाबद्दल ओरड आहे. पुष्कळ पत्रें आपण होऊन लोकांच्या गळ्यांत पडतात आणि अखेर त्यांनीं वर्गणी नाकारली कीं धुसफुसत स्वस्थ बसतात. आम्ही प्रथमपासूनच या गळेपडूपणाच्या विरुद्ध. फार झालें तर कोणाच्या सांगण्यावरून नमुन्याचा अंक व जाहिराती पाठवितों. पण मुद्दाम आपण होऊन कोणाचेंहि नांव नोंदवीत नसतों. प्रस्तुत यादींतील बरीच मंडळी गुदस्त सालापासून वर्गणीदार होती. त्यांना दुसऱ्या वर्षी प्रबोधन नको होतें तर दोन दिडक्याच्या कार्डानें कळविलें असतें म्हणजे ठीक होतें. तें न करतां डोळे मिटून दहा दहा बारा बारा अंक घ्यायचे आणि व्हीपी आली की 'रिफ्युज्ड' शेऱ्यानें परत पाठवायची, हा कोठच्या गांवचा सभ्यपणा? घेतलेल्या अंकांचीहि किंमत द्यायची नाहीं? हा अनागोंदी कारभार प्रबोधनाला साफ नापसंत आहे. केल्या कामाचें दाम देणें हा सरळ व्यवहार. काम नापसंत, घेऊ नका. वर्गणीदार आणि नियतकालिकें यांचा संबंध पिता-पुत्रवत् शुद्ध प्रेमाच. आपण राघूला खायला घालावें, बोलायला शिकवावें आणि तो बोलू लागला कीं त्याचें आपणच कौतुक करावें, असला हा स्निग्ध प्रेमसंबंध त्यात जरी कांही जण राघूला दाणापाण्याच्या ऐवजीं उपाशी मारण्याचा चंग बांधू लागले. तर त्या पांखरानें त्यांच्या नांवानें किंकाळ्या का मारू नयें? सज्जनांनींच त्या स्थितीचा विचार करावा. कोणत्याहि बाबतींत रोखठोक व्यवहार असला की प्रेमांत अंतर पडत नाहीं.

□□□

लेख

जपान राष्ट्राचें प्रबोधन
(लेखांक ४ था)

''जपान राष्ट्राचा दर्जा आणि इभ्रत सर्वांत श्रेष्ठ करण्यासाठीं, जगाच्या कोनाकोपऱ्यात मिळणारें शिक्षण व ज्ञान आपण प्राप्त करून घेण्यासाठीं कंबरा कसल्या पाहिजेत.''

जपानचे माजी मिकॅडो.

एखाद्या राष्ट्राची संस्कृति धर्म आचार विचार व राजकीय परिस्थिती कितीहि बलवत्तर किंवा भिन्न असो, त्याला दुहीचा न्युमोनिया जडला कीं त्याला पादाक्रांत करणें दुसऱ्या धूर्त व डोळस राष्ट्राला फारसें कठीण जात नाहीं. वाटेल ती परकी राजसत्ता त्याच्या वर्मी काळजाला अचूक चिमटा घेऊन, त्याच्या मानगुटीच्या हाडाचा सांधा बोल बोलतां खिळखिळा करील. सत्ता स्थापन करण्याचें काम जरी सोपें असलें, तरी ती अप्रतिहत व अव्याहत टिकवून धरण्याचे काम अतिशय कष्टसाध्य असतें. कोणत्याहि राष्ट्राला गुलाम करणें सोपें असतें, पण त्याला गुलामगिरींत कायमचे टिकवून धरण्यासाठी जेत्यांना आपल्या युक्तिसर्वस्वाची कसोशी खर्ची घालावी लागते. अर्थात यासाठीं राजकारणी धोरणाची गिरणी बिनतक्रार चालण्यासाठीं, राज्यकारभाराचीं लहान मोठी अधिकारी-यंत्रें पराजीत लोकांतनच निवडणें आणि त्याच्या द्वारेंच आपल्या ठरावीक राजकारणी डावपेचांची निरनिराळीं वळणें जित राष्ट्राच्या आंगवळणीं पाडणें, ही 'परस्पर पावणेतेरा' ची पॉलिसी धूर्त जेते अंमलांत आणीत असतात. बेबंदशाही ही एक दुतोंडी पूतना राक्षसी आहे. तिचें थैमानी नृत्य भर रंगांत आलें कीं एका तोंडानें ती स्वराज्य-नाशाच्या भाकिताच्या कर्कश किंकाळ्या मारीत असते, तर दुसऱ्या तोंडानें 'मला कोणी सुराज्याची घोटभर सुरा पाजा हो!' म्हणून आक्रोश करीत असते. अशावेळीं त्रयस्थ धूर्त राष्ट्रें सुराज्याच्या मादक दारूनें त्या राक्षसिणीचें थोबाड बंद करून, तिच्या पायांना पायबेडी ठोकतात आणि त्या बेबंद राष्ट्रावर आपल्या राजसत्तेचा खोगीर चढवितात राज्यक्रांतीच्या धामधुमींत लोकांच्या प्रक्षुब्ध मनोवृत्ति आपल्या काबूंत घेण्यासाठीं सुराज्याच्या अभिवचनासारखी आईसक्रीम प्लेट त्रिभुवनांत मिळावयाची नाहीं. गोडच्या गोड, थंडगार आणि दिसण्यांत भपकेदार! त्यांतल्या त्यांत हा आईस्क्रीम शिक्षणदानाच्या नक्षीदार बर्शीतून देण्याचें कोणी आमिष दाखविलेंच तर मग काय विचारता? तो दाता म्हणचे दुसरा परमेश्वरच!

(बेबंद मराठशाहीची मुंडी मोडून, जरी पटक्याच्या बुरुजावर जेव्हां आंग्लाईचा युनियन जॅक बावटा फडकविण्याचा योग इंग्रेज यांना सुराज्याच्या अभिवचनाबरोबरच उच्च शिक्षणदानाचें सक्रिय आमिष दाखविलें.) इंग्रेजी शिक्षणामुळें साऱ्या उपलब्ध जगांतलें ज्ञान आमच्या हातांत आंवळ्या प्रमाणें येणार, या कल्पनेंत आमची मनोवृत्ति गुंगल्यामुळें, आह्मी आमच्या हातांतल्या जन्मदत्त स्वराज्याच्या कोहळ्यावर पाणी सोडतांना डोळ्यांतून पाणी सुद्धां गाळलें नाही. सुराज्याच्या जोडीनेंच सुशिक्षणाच्या पाणपोया उघडण्याचा इंग्रेजी उपक्रम पाहून, आम्हांला इंग्रेज माणूस हा जळम ाणूस नसून देवमाणूस आहे, असें वाटूं लागलें. लागोपाठ मेहनती परंतु मतलबी क्रिस्ती मिशनऱ्यांनीं मुद्रणयंत्राच्या जोरावर आमच्या शिक्षणाप्रीत्यर्थ ज्या शेंकडो उलाढाली केल्या, त्या प्रत्यक्ष पाहून या देवमाणसांविषयी आमची भक्ति रबराप्रमाणें लांबरुंद तणावत गेली. इंग्रेजी विद्या ही जात्याच 'वाघिणीचें दूध' असल्यामुळें, तिच्या प्रत्येक घोटाबरोबर आमच्या आकांक्षा भराभर थरारुं लागल्या. शाळा हायस्कुलें कॉलेजें लायब्ऱ्या छापखाने वर्तमानपत्रें मारे सगळ्यांचा धूमधडाका उडाला. हायस्कूल कॉलेजांतून यशस्वी होऊन बाहेर पडलेल्या पदवीधरांची सरकार दरबारीं मानमान्यता बरीच वाढल्यामुळें, त्यांची लोकमान्यताहि प्रतिष्ठेच्या ताजव्यांत समतोल ठरली, इंग्रेजी शिक्षणामुळें एतद्देशीय तरुणांची विचारसृष्टी बरीच व्यापक व विकसित झाली, ही गोष्ट कोणीहि कृतज्ञपणें कबूल करण्यास कांकूं करणार नाहीं, अशी खात्री आहे. पण शिक्षणदानाचा एवढा मोठा उपद्वाप करून त्याची अखेर फळश्रुति काय? या प्रश्नाला उत्तर कांही नाहीं. शंभर वर्षांपूर्वी आमची जी स्थितींत पोपटपंचीपेक्षां कसलाहि फरक नाहीं. उलट, आज आमचें सुशिक्षित जिणें आमच्याच देशांत कुत्र्याच्या मोतीनेंहि विकत घेण्यास कोणी गिऱ्हाईक नाहीं. शंभर वर्षांपूर्वी बेबंद महाराष्ट्रीय कितीहि अशिक्षित असले, तरी त्यांची राज्यकारणी महत्वाकांक्षा व स्वराज्याची धमक ठार मेलेली नव्हती. महादजी शिंद्याची व हॉवर्डच्या टेक्स्ट बुकांची जरी आमरण गांठ पडली नव्हती, तरी आपल्या मराठी सैन्याला पाश्चिमात्य हडेल हप्पी शिकविणाऱ्या डिबॉइन साहेबाला नजरेच्या जरबेनें उठाबशा काढायला लावण्याचें त्याचें सामर्थ्य जिवंत होतें. नाना फडणीस जरी ग्रॅज्युएट नसला, तरी मॅलेट साहेबाच्या कारस्थानाच्या उडत्या पांखरांचीं पिसें तो बिनचूक मोजीत असे. त्यावेळच्या बळवंतराव मल्हार चिटणीसाचें अध्ययन अर्ल ऑफ विंटर्टन इतकें जरी नव्हतें. तरी स्वराज्याच्या अस्तसमयीच्या अंधारांत तहनाम्यांतल्या वेलांट्या मात्रांवर कुरकुर लेखणी चालवून अलपिष्टनालाहि कुरकुर करावयास लावल्याशिवाय त्यानें सोडलें नाहीं. या गोष्टी जरी सोडल्या तरी शंभर वर्षांपूर्वीचे अशिक्षित महाराष्ट्रीय, फोनोग्राफे पंडित आणि आडमुठे व्यापारी निदान उपासमारीला तरी पारखे होते. आजच्या सुशिक्षितांची काय अवस्था आहे? सरकारी युनिव्हर्सिट्यांच्या गिरण्यांतून पिचून निघालेल्या पदवीधरांच्या योगक्षेमाची तरी सरकारनें काय व्यवस्था ठेवली आहे? सबघोडे बारा टक्के या न्यायानें ३-४ चोपड्या पालथ्या उलथ्या घालणाऱ्यांच्या जोडीनच बी.ए.एम.ए. आणि एलेल्बी आपल्या टीचभर पोटाच्या योगक्षेमासाठीं अर्जाची भेंडोळीं घेऊन भटकत असतात. धंदेशिक्षणवाल्या बी.एजी., बी.एस्सी., बी. कॉम. पदवीधरांची हीच स्थिती! पदवी ही जर लायकीची कसोटी, तर हे एवढे सारे पदवीधर नालायक कसे? नालायक नव्हते, तर त्यांना प्रतिष्ठीतपणें ५०-६० रुपड्यांचीहि नोकरी कोठें मिळू नये? आणि यदाकदाचित मिळालीच. तर पदवीची किंमत काय इतकीच? बरे, नोकऱ्या मिळविणें हें कांहीं युनिव्हर्सिटीच्या ईश्वरी शिक्षणाचें ध्येय नाहीं, हा वेदांत

खरा मानावा, तर या शिक्षणांत असें काय मोंठें चैतन्य रडत आहे कीं प्रत्येक पदवीधर म्हणजे स्वतंत्र वृत्तीनें लाथ मारीत तेथें पाणी काढणारा प्रतिसृष्टीकर्ता विश्वामित्र बनतो?

आंग्लाईच्या मुहूर्तमेढीला शेंकडों इंग्रेजी अधिकाऱ्यांनीं असे तोंडी व लेखी उद्गार काढले होतें कीं 'तुम्हां हिंदी लोकांवर आम्हांला कांहीं कायमचें राज्य चालावायचें नाहीं. स्वराज्य चालविण्याच्या लायकीचें ज्ञान आम्हीं तुम्हाला दिलें व तुम्हीं आपल्या देशाचा कारभार उत्तम रीतीनें पाहूं लागला कीं चाललोंच आम्ही आमच्या देशीं परत!'' या आशीर्वादानें सबंध देश हुरळून गेला आणि स्वराज्याच्या लायकीचें ज्ञान मिळविण्यासाठीं लक्षावधि तरूण आंग्लप्रणित उच्च शिक्षणाच्या भट्टींत घुसले. आज गेली शंभरांवर वर्षे या भट्टीचा कारखाना चालूं आहे, पण स्वराज्याची नालायकी किंवा आमचे पूज्यपाद स्वराज्य-गुरूजी दोहोंपैकी कोणीहि आम्हांला सोडीत नाहीं. जपाननें अवघ्या ३५ वर्षांत शिक्षणाच्या जोरावर केलेली राष्ट्रोन्नति आणि आमच्या दयाळू माबाप सरकारनें तब्बल १०० वर्षांत केलेली आमची सर्वांगीण प्रगति, या दोन चित्रांच्या तुलनेंत विचारांचे ब्रह्मांड भरलें आहे. सन १८७१ पर्यंत तिरकमठा धनुकलीवर निर्वाह करणारें चिमुकलें जपान, शिक्षणप्रसाराच्या जोरावर अवघ्या ३५ वर्षांत साऱ्या जगाला डोईजड होऊन बसतें काय; आणि, आंग्लोच्च शिक्षणाचे परमावधीचे धडे तब्बल १०० वर्षे घटवून घट्ट करणाऱ्या हिंदुस्थानाचें पोट हिंदुस्थानालाच जड होऊन रहातें काय! इतक्या अवधींत आंग्ल शिक्षणाच्या भट्टींतून लक्षावधि पदवीधरांची सेना निर्माण झाली. हजारों हिंदी अधिकाऱ्यांनीं इंग्रेजी राज्यव्यवस्थेचें शकट जबाबदारीनें उत्कृष्ट चालवून दाखविलें, शेंकडों हिंदी बृहस्पतीनीं इंग्रजी मुत्सद्यांना व पंडितांना बौद्धिक श्रेष्ठत्वांत चारी मुंड्या चीत केले. तरी देखील आमच्या स्वराज्याच्या नालायकीची टकळी इंग्रेजी राज्यकर्त्यांच्या जिभेवर अझून नृत्याची कसरत करीत आहे ती आहेच! नालायक हिंदूंना तब्बल शंभर वर्षांतहि लायक बनविण्यांत सर्वस्वीं नालायक ठरलेली इंग्रेजी शिक्षणपद्धति कोठेंहि चुकत असो, त्याचा खल आज येथें करण्यास स्थल नाहीं; एवढें मात्र खरें कीं शिक्षकानेंच परीक्षकाचे अधिकार आपल्याकडे राखून ठेवले कीं विद्यार्थ्यांचे मरण कसें ओढवतें, याचा हा एक ठळक मासला आहे.

अवघ्या थोड्या वर्षांत लोकोत्तर पुनरुज्जीवनाची धडाडी मारण्यांत ज्या शिक्षणपद्धतीची निवड जपानी मनोवृत्तीनें केली, तिची मि. हेनरी डायर आपल्या दाय निप्पोन नामक ग्रंथांत (पृष्ठ ४९-५०) येणेंप्रमाणें मीमांसा करतात.- ''जपाननें अल्पावधींत केलेल्या लोकोत्तर राष्ट्रोन्नतीचीं कारणें थोडक्यांत अशीं देतां येतील. त्यांचा मुख्य गुण म्हटला म्हणजे तीव्र स्वराज्यनिष्ठा (इंटेन्स लॉयल्टी). या स्वराज्य-निष्ठेच्या पायीं ते वाटेल तो स्वार्थत्याग करतील. फार काय, पण स्वदेशाच्या इभ्रतीसाठी स्वप्राणावरहि निखारे ठेवण्यास मागेंपुढें पाहणार नाहींत. त्यांची बुद्धिमत्ताहि फार वरिष्ठ दर्जाची असल्यामुळें, आपल्या आकांक्षाना मूर्तस्वरूप देण्यासाठीं ते वाटेल ती आधुनिक विद्या व शास्त्र पचनीं पाडण्यास अहमहमिकेनं पुढें सरसावतात. जपानी लोक तीक्ष्ण दूरदृष्टीचे व धोरणी आहेत. त्यामुळें शांतीच्या व युद्धाच्या काळीं वाटेल तें धाडसी कार्य ते अंगावर घेऊन इतक्या कुशलतेनें व सफाईनें पार पाडतात की सारें शास्त्रीय जग तोंडांत बोट घालतें. पौर्वात्य कल्पना जरी त्यांच्या रोमारोमांत भिनलेल्या असल्या, तरी पाश्चिमा कल्पनांचा उत्तमोत्तम भाग त्यांनीं अगदीं आत्मसात् करून टाक आहे. त्यामुळें आजचा जपान म्हणजे उत्तमोत्तम पूर्व-पश्चिम कल्पनांचा प्रयागच म्हटला तरी चालेल.''

कनफ्युशियस नामक तत्ववेत्ता म्हणतो `Learning with out thought is labour lost; thought without learning is perilous.' (भावार्थ - विचारशून्य शिक्षण म्हणजे काळाचा अपव्यय आणि शिक्षणशून्य विचार म्हणजे अनर्थाची परमावधि होय.) हिंदुस्थानाची शिक्षणपद्धति यांपैकीं कोणत्या तरी एका सांच्यांत-किंबहुना दोहोंतहि- अगदीं फिट् बसेल! या शिक्षणानें सारें भरतखंड कारकून आणि मजूरमय बनवून सोडले आहे. पूर्वी हिंदुस्थान तत्ववेत्त्यांचा, लढवय्यांचा आणि धाडसी वैश्यांचा देश होता. आज तो सुशिक्षित कारकुंडी आणि अडाणी मजुरांची वखार बनला आहे. याचा सारांश हाच निघतो कीं हिंदी शिक्षणखात्यानें आज शंभरावर वर्षे झगडून सारा देश परप्रत्ययनेय व परावलंबी कारकुनी विणीनें गच्च भरून सोडला! आतां जपानचें शिक्षणविषयक धोरण पहा. सन १८७१ सालीं शिक्षणखातें निर्माण होतांच, १८७२ च्या ऑगस्टांत प्रसिद्ध झालेल्या बादशाही फर्मानांत हे उद्धार होते. ''विजयशाली जीविताला ज्ञानप्राप्तीची आवश्यकता आहे. आपली रोजची दिनचर्या सुखावह व्हावी आणि उच्च दर्जाचे कामदार शेतकरी व्यापारी कारागीर वैद्य इ. निर्माण व्हावे, यासाठीं लागणारें सर्व प्रकारचें ज्ञान शिक्षणामुळेंच प्राप्त करून घ्यावयाचें आहे. आपल्या देशांत शाळा सुरू होऊन पुष्कळ काळ लोटला. परंतु शेतकरी कारागीर व व्यापारी, फार काय पण आमचा स्त्री वर्ग यांना शिक्षणाचा अधिकारच नाहीं, अशा तऱ्हेचे गैरसमज आमच्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या डोक्यांत भरले आहेत. उच्च वर्गांतल्या जपान्यांची तऱ्हा कांही वेगळीच. त्यांचा बहुतेक वेळ कविता रचण्याकडे, सुत्रांचीं काव्यमय बाडें प्रसविण्याकडे किंवा अशाच दुसऱ्या ऐदी ज्ञानार्जनाकडे फुकट जात आहे. परंतु आत्मोन्नति व राष्ट्रोन्नतीला सहायभूत होणाऱ्या ज्ञानप्राप्तीकडे त्यांचें लक्ष मुळींच जात नाहीं. आतां आपलें शिक्षण खातें उत्तम पायाशुद्ध स्थापन झालें आहे व अभ्यासक्रमाची व्यवस्था राष्ट्रहितदृष्ट्या सुधारून ठाकठीक ठरविली आहे. आतां शिक्षणाचा प्रसार अशा रीतीनें करण्यांत येईल कीं यापुढें कोणत्याहि खेड्यांत अशिक्षित कुटुंब आणि कोणत्याहि कुटुंबांत अशिक्षित मनुष्य केव्हांहि आढळतां कामां नये. आजपर्यंत सुशिक्षित झालेल्या जपान्यांना योगक्षेमार्थ सरकारच्या तोंडाकडे पहाण्याची सवय लागलेली दिसते. ही सवय चुकीची आहे. आतांपासून प्रत्येक जपानी मनुष्यानें अशाच प्रकारचें शिक्षण घेऊन ज्ञान संपादन करावें की त्या ज्ञानाच्या जोरावर त्याला स्वत:च्या कर्तबगारीनें स्वतंत्र्य उपजीविका करतां येईल.'' स्वदेशाभिमानाची ज्योत जपानी व्यक्ति मात्राच्या हृदयांत अखंड तेवत राहील, अशा धोरणाचा मसाला जरी जपानी शिक्षण पद्धतींत उत्कृष्ट घातला गेला, तरी तिचा आस्वाद घेणारा जगाच्या कोणत्याहि व्यवहारांत लेचापेचा किंवा पुस्तकधोक्या निपजूंच नये, अशी खास अभ्यासक्रमाची योजना केली गेली. सुरुवातीला काही वर्ष डॉ. डेविड मरे हे शिक्षणखात्याचे सल्लागार होते. हे गृहस्थ जन्मानें स्कॉट परत शिक्षणानें अमेरिकन होते. त्यांनी प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण अमेरिकन धर्तीवर चालविलें. निरनिराळ्या विषयांच्या कॉलेजांवर निरनिराळ्या युरपियन राष्ट्रांतल्या तज्ज्ञांची योजना केली. आरमारी व शेतकी या कॉलेजांवर ब्रिटीश मेडीकल कॉलेजांवर जर्मन एंजिनियरिंगवर थोडे ब्रिटीश व बरेचसे स्कॉट; चित्रकलेशी प्रोफेसरांची निवडणूक होती. अर्थात् हा एक भिन्न भिन्न संस्कृतीचा संमिश्र माराच होता. पण विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं जपानी विद्यार्थी यापैकी कोणत्याहि संस्कृतीच्या वळणाची आंधळी नक्कल करीत बसले नाहींत. प्रत्येकांत आढळणारा उत्तम गुण आपल्या पचनीं पाडून, या संस्कृतीच्या मिश्रणांतूनच, आपल्या राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाला उपयोगी पडेल अशी एक निराळी

संघटना त्यांनीं कमाऊन काढली. विशेष प्रकारासाठीं परदेशगमनाचें धोरण अलिकडच्या काळांत जपानइतकें दुसरे कोणी विशेष धडाडीनें दाखविलेलेंच नाहीं. मात्र स्वदेशगमनानंतर प्रत्येक विद्यापटूनें आपापल्या कलेचा सक्रीय यशस्वी प्रयोग करून दाखविल्याशिवाय त्याच्या डिप्लोम्याची किंमत चिवड्याच्या पुडीच्या रद्दी इतकीहि कोणी मानीत नाहीं. आजला अशी एकही विद्या, एकही शास्त्र व एकहि कला शिल्लक राहिलेली नाहीं, कीं जी जपानी तरुणांनी हस्तगत केलेली नाहीं. जपानच्या या लोकोत्तर प्रबोधनाचा दणका पाश्चिमात्त्य घाशीरामांवर केवढा बसला आहे, त्याचें प्रत्यंतरात्मक एक अवतरण देऊन, या लेखमालेची समाप्ति करतों. सन १९०३ सालीं इंग्लंडांत ब्रिटिश असोसिएशनची एक सभा येथें भरली होती. त्या वेळीं अध्यक्ष सर नॉर्मन लॉक्यर हे 'धी इन्फ्ल्युएन्स ऑफ ब्रेन पॉवर ऑन हिस्टरी' या विषयावर बोलतांना जपानच्या प्रबोधनाकडे वळले. अनेक जपानी आश्चर्यांचा उल्लेख केल्यावर ते म्हणाले, ''या सर्व आश्चर्यांवर ताण म्हणजे जपाननें - एखाद्या युद्धानंतर नव्हे, पण एका भावी युद्धासाठीं- तयारी करण्यांत दाखविलेलें अलौकिक बुद्धिश्रेष्ठत्व. आतां आपल्यापुढें मुख्य प्रश्न हाच आहे कीं आपल्याला खाशी थप्पड बसेपर्यंत आपण हात जोडून बसणार आणि मग फ्रान्स प्रुशियाप्रमाणें धांवाधांव करणार? कीं, जपानचा कित्ता आपल्या डोळ्यांमुढे ठेवून पुढें लवकरच ओढवणाऱ्या व्यापारी महायुद्धाला तोंड देण्यासाठीं बुद्धिश्रेष्ठत्वाची लगबग करणार?''

□□□

अग्रलेख

‘राष्ट्रीय’ निशाणाचा हट्टाग्रह
(लेखांक १ ला)

राजद्रोह सिद्ध करणारीं आणि हजारों स्त्रीपुरुषांना राजद्रोहाच्या आरोपावरून तुरुंगात पाठविणारीं कितीहि लवचिक व लांबरुंद कलमें इंडियन पिनल कोडांत असो, एक गोष्ट अगदीं स्पष्ट दिसतें कीं हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांविषयीं हिंदी प्रजाजनांच्या मनांत सध्यां कसल्याहि प्रकारचा आदर किंवा प्रेम वसत नाहीं. सुराज्यव्यवस्थेसाठीं प्रजेनें कायद्यांचा आदर ठेवावा, हें तत्व सर्वमान्य आहे. परकी अंमलांतल्या सुराज्याप्रमाणेंच स्वयंनिर्णयी स्वराज्यांतहि ‘कायद्यांचा आदर’ राज्यव्यवस्थेसाठीं अवश्य लागतो. परंतु कायदेच जुलमी बनले, किंवा त्यांची अंमलबजावणी जुलमी मनोवृत्तीनें होऊं लागली कीं हा आदर नष्ट होतो; आणि शासित शास्त्यांत अहिनकुलवत् विरोधाचा झगडा सुरू होतो. या झगड्यांनाच ‘स्वातंत्र्याच्या लढाया’ असें नांव इतिहासांत प्राप्त झालेलें आहे. राजसत्ता स्वकीय असो वा परकीय असो, प्रजाहितवर्धना ऐवजीं कायदेच जुलमांचा खेळखंडोबा करूं लागले कीं त्या सत्तेला अवमानित जनता निकराची ठोकर देऊन नेस्तनाबूद करते, असा इतिहासाचा सिद्धांत आहे. हिंदुस्थानावरील इंग्रजी राज्यकारभाराचे उद्देश कितीहि उदात्त व निर्मळ असले, तरी गेल्या २५ वर्षांतल्या त्याच्या नोकरशाहीचा धांगडधिंगा पाहिला तर इतकेंच दिसून येतें कीं हिंदुस्थानांत असंतोष प्रसृत करून हिंदी लोकांना राजद्रोहाचें खरें खोटें बाळकडू जर कोणी पाजलें असेल, तर तें ब्रिटिश नोकरशाहीनेंच होय. सन १८९६ सालीं येनकेन प्रकारे कै. टिळकांच्या स्पष्टोक्तीला तोंडबेडी चढविण्यासाठीं राजद्रोही १२४ कलमाच्या ‘अबकड’ची मारुतीची शेपटी लांबलचक कोणी वाढविली? नोकरशाहीनेंच. तत्पूर्वी ‘राजद्रोह’ हा शब्द फारसा कोणाला माहित नव्हता. आणि शब्दकोशांत किंवा इतिहासांत तो असलाच. तरी त्याच्या व्याप्तीची व्याख्या निरंत क्षितिजाइतकी सर्वस्पर्शी व सर्वव्यापी आहे, ही जाणीव चांगल्या चांगल्या शहाण्यासुर्त्या कायदेपटूंनाहि त्याच वेळीं प्रथम लक्षांत आली. ब्रिटिश राज्यातल्या वाटेल तसल्या क्रूरकर्म्याचा पाया फ्रेंचभूमीला लागतांच, तो ब्रिटिश शासनाच्या पाशांतून पूर्ण मुक्त होतो. या आंतरराष्ट्रीय ‘कायदेशीर’ तत्वावर, बॅरिस्टर सावकाराच्या धाडसामुळें, ब्रिटिश न्यायदेवतेनें केलेली पुरवणीवजा फूटनोटीची मलखाशी इंडियन पिनल कोडांतच फार छान शोभते! ज्या वेशांत रोजद्रोह शाबीत धरण्याची व्याख्या डोळे मिचकावण्यापर्यंत (Signs) ताणलेली आहे, त्या देशांत राजनिष्ठेच्या

एन ४००६--३४

सदराखालीं स्थावर जंगमानैकी कोणकोणत्या वस्तू व प्राणी येऊं शकतात, हें ठरविण्याचें कार्य उत्तर ध्रुवाच्या शोधापेक्षांहि कठीण आहे. इंग्रजी नोकरशाहीनें इंडियन पीनल कोडांतल्या कांहीं ठराविक कलमांची अलीकडे इतकी अवलक्षणी ओढाताण चालविली आहे आणि 'राज्यकर्त्यांचे जातभाई' म्हणून स्वत:च्या 'इज्झती'साठीं प्रत्यक्ष न्यायबुद्धीची इज्जत घेण्याचा जो पोरकट धंदा सुरू केला आहे, तो पाहून कोणाहि पट्टीच्या विवेकी मनुष्याचें पित्त खवळून गेल्यास फारसें चमत्कारिक होणार नाहीं. अव्वल इंग्रेजी अमदानींतल्या इंग्रेजी कारभाऱ्यांचा कारभार बऱ्याच समतोल बुद्धीनें होत असे. परंतु अलीकडे विलायतेंतल्या स्टेट सेक्रेटरी पासून तों थेट अगदीं खालच्या कलेक्टर मामलेदारापर्यंतच्या स्वदेशी विदेशी नोकरांची कार्यपद्धत पाहिली की ब्रिटीश मुत्सद्देगिरीचें दिवाळें वाजलें कीं काय? अशी शंका येऊं लागते. नाहींतर, इं. पि. कोडातल्या कांही ठरावीक कलमांना आपल्या चिडखोर अकलेचें कलम करून काल्पनीक राजद्रोहाचेंच व बंडखोरपणाचें पीक मुबलक पिकविणाऱ्या घाशीरामी नोकरांना ब्रिटीश पार्लमेंटने इकडे खचित पाठविलें नसतें! आजच्या भारतीय असंतोषाला मूळ कारण सत्वगुणप्रधान भाविक हिंदी जनता नसून अरेरावीला सवकलेली इंग्रेजी नोकरशाहीच त्याला जबाबदार आहे, हे - इतर गोष्टी वगळल्या तरी चालू नागपूरच्या निशाणाच्या सरकारी अत्याचारानें स्पष्ट सिद्ध होत आहे. एक कसलें तरी रंगीबेरंगी फडकें तें काय आणि तें नाचविणाऱ्या लोकांना मध्यप्रांतीय नोकरशाही भराभर उचलून तुरुंगात टाकते काय! ही काय कायदेबाजी, मुत्सद्दीपणा कीं राजकारणी शहाणपणा? 'जॉन बुल'ला बुझविणारी 'तांबडी चिंधी' कोणती हें मध्यप्रांताच्या गोऱ्या नोकरशाहीनें अचूक हूडकून काढल्याबद्दल तिला विजयहास्याच्या उकळ्यावर उकळ्या फुटत असल्या, तरी इवल्याशा फडक्याच्या फडफडण्यानें जमीनदोस्त होण्याइतकी हिंदुस्थानातील ब्रिटीश राज्यसत्ता आरपार भुसभुशीत झाली किं काय, असा प्रश्न इंग्लंडच्या प्रबळ प्रतिस्पर्धी राष्ट्रांनीं त्याला विचारल्यास काय उत्तर देईल? त्या वेळीं या मध्यप्रांतीय अरेरावांची 'सार्वजनिक शांती'ची व्याख्या व स्वत:च्या इज्झतीचे पोवाडे होमगव्हर्नमेंटच्या इज्झतीची अब्रू सांवरूं शकतील काय? ब्रिटन लोक आपल्या राष्ट्राच्या प्रकृतीचें दिग्दर्शन सिंहाच्या चित्राने करीत असतात. 'ब्रिटीश लायन' हा त्यांच्या मोठ्या अभिमानाचा शब्द. परंतु या ब्रिटिश सिंहाच्या एतद्देशीय प्रतिनिधींनी नागपूरच्या निशाणाच्या बाबतींत जें धरपकडीचें सत्र सुरूं केलें आहे, तें सिंहप्रकृतीचें नसून, 'आर्धीच मर्कट' या कव्युक्तीच्या सदरांतच पडतें. सारांश, प्रस्तुत क्षुल्लक गोष्टीला विनाकारण फाजील महत्त्व देण्यांत मध्यप्रांतीय नोकरशाहीच प्रामुख्यानें जबाबदार आहे. कांही मूठभर भावनावश चळवळ्यांनीं कसल्या तरी निशाणाला 'राष्ट्रीय'त्वाचा शेंदूर फांसून नाचण्यास प्रवृत्त व्हावें आणि सरकारच्या सर्वसमर्थ नोकरशाहीनें त्या शेंदराला बुझून चौखूर उधळून सापडेल त्याला गिरफदार करीत सुटावें, हीच जर ब्रिटीश राजनीति असेल, तर ती आतां अत्यंत हिणकस व कमअस्सल बनली आहे, असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं.

प्रस्तुत निशाण हें मुळीं हिंदुस्थान राष्ट्राचें निशाणच नव्हे. 'राष्ट्रीय' हा शब्द आजकाल इतका सवंग झाला आहे कीं वाटेल तो वाटेल तेथें त्याची योजना करतो. राष्ट्रीय पेयापासून तों राष्ट्रीय विड्या पायतणांपर्यंत या शब्दाची धिंडका निघालेली वर्तमानपत्री जाहीरातींत दिसून येते. हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे, ही जाणीव यच्चावत् हिंदवासियांच्या रोमारोमांत भिनली आहे, असें वाटेल तर लेक्चरें झोडतांना किंवा लेख खरडतांना हवें तर खुशाल बरळा. एकराष्ट्रीयत्व आणि हिंदुस्थान या गोष्टी पूर्व पश्चिमे

इतक्याच परस्परांशीं अझून पारख्या आहेत. सतराशें छपन्न जातींचा चिवडा ज्या राष्ट्रांत हरदिन हरघडी एकमेकांच्या उरावर बसत आहे, त्यावर एक राष्ट्रीयत्वाचा आरोप करणें, हा शुद्ध दांभिकपणा आहे. हिंदुस्थान एकजीव नाहीं, एकराष्ट्र नाहीं, किंवा स्वतंत्रहि नाहीं. हें गुलाम राष्ट्र आहे. गुलामांनीं कोठलें आणलें हें राष्ट्रीय निशाण? हें 'राष्ट्रीय' कशावरून? याचा इतिहास काय? कोठें कोणी केव्हां व कां हा राष्ट्रीय निशाणाचा डिझाईन पास केला? काशी ते रामेश्वर एकजात हिंदी माणसाच्या मनोवृत्ति थरारून जातील, असें काय माहात्म्य या फडक्यांत भरलें आहे? असा कोणता उज्वल स्वातंत्र्याचा इतिहास त्याच्या मागें उभा आहे कीं निशाण पहातांच सर्व जनतेची वृत्ति अभेद व्हावी; तिचें मन फुरफुरूं लागावें आणि त्याच्या अब्रूपुढें स्वप्राणाची किंमत क:पदार्थ वाटावी?

प्रस्तुतच्या 'राष्ट्रीय' नामधारी निशाणांत एक तांबडा, एक हिरवा व एक पांढरा असे तीन पट्टे असून, त्यावर गांधीप्रणित चरक्याचें चित्र काढलेलें आहे. याचा अर्थ निशाणवाले असा करतात. तांबडा रंग हिंदूंचा, हिरवा मुसलमानांचा आणि पांढरा उरलेल्या इतर सर्व हिन्दी समाजांचा; या सर्वांच्या एकीला चरक्याची, जोड देऊन हिंदुस्थान स्वतंत्र होणार! या कल्पनेचा तथ्यांश पाहण्यापूर्वी प्रस्तुत निशाणाची घटना कसकशी होत आली तें पाहूं. सन १९१७ सालापर्यंत राष्ट्रीय निशाणाची कल्पना मुळींच अस्तित्वात नव्हती. कधिंमधी भगवा झेंडा किंवा जरीपटका एखाद्या सार्वजनीक गणेशोत्सवांत किंवा दसऱ्याच्या सीमोल्लंघनांत वगैरे दृष्टीला पडे. परंतु हिंदुस्थानच्या वर्तमान एकीकरणाच्या स्वप्नानुसार कसल्याहि राष्ट्रैक्यसूचक निशाणाचा जन्म झालेला नव्हता. १९९७ च्या जुलै महिन्यांत मद्रास सरकारनें मिसेस आनी बेझंटबाई, श्री. आरंडेलं व वाडिया यांना अटक करून उटकमंडच्या गुलीस्तान नामक मठांत बंदिस्थ केलें. त्यावेळीं बेझंटबाईची होमरूल लीगची कल्पना अखिल हिंदुस्थान मोठ्या आतुरतेनें पचनीं पाडूं लागला होता. उटकमंडला जातांच या तीन बंदिवान विभूतीनीं हिरवें व तांबडें रेशमी फर्दाचें एक निशाण

इंडियन होमरूल फ्लॅग

या नावांने गुलीस्थान झोंपडीवर चढविलें. प्रस्तुतच्या 'राष्ट्रीय' निशाणाची जननी मिसेस बेझंटबाई असून, त्याच्या उत्पत्तीचा इतिहास हा असा आहे. यानंतर हें हिरवें-तांबडें रेशमी निशाण सर्वत्र बरेंच बोकाळलें. होमरूल डायऱ्या, शर्टाचीं बटनें, नेकटाय, लॉकेट्स वगैरे शेंकडों वस्तूंवर हा हिरवा-तांबडा रंग झळकूं लागला. या दोन रंगांत हिंदु आणि मुसलमान या प्रमुख समाजांचा अंतर्भाव होतो; परंतु होम रूल मिळवायचें तें निर्मेळ स्वराज्य का ब्रिटीश एंपायरमध्यें अंतर्भूत स्वराज्य, हा वादाचा प्रश्न लवकरच उपस्थित झाला. यावर कै.टिळकांनी या हिरव्या-तांबड्या निशाणाच्या एका कोपऱ्यांत ब्रिटीशांचा युनियन जॅक बावटा रंगविण्याची कल्पना काढून ती प्रत्यक्ष अंमलांत आणली. स्वराज्य निशाणाच्या परिवर्तनाची ही दुसरी पायरी. पाठोपाठ या तिरंगी निशाणावर बरेचसे पांढरे पट्टे; चांदतारा व स्वस्तिक हीं चिन्हें चमकूं लागलीं. टिळकांच्या निधन कालापर्यंत होमरूलचें निशाण रशमी फर्दाचें व असल्या चिन्हांचें होतें. पुढें टिळकांच्या अस्तसमयीं उदय पावलेले महात्मा गांधी आपली खादी व चरका घेऊन पुढें सरसावले. खादी-चरका चळवळींचें पर्यवसान आज कशांत झालें आहे, तें सांगण्याची जरूर नाहीं. पण तिनें उपरोक्त निशाणाच्या रेशमी कपड्याचें युनियन जॅकच्या चित्रासह उच्चाटन करून, त्यावर चरक्याला प्रस्थापित केलें आहे. निशाणाची ही चवथीं बदल आहे. पुष्कळ वेळां नुसत्या

पांढऱ्या खादीवर चरक्याचें ओबड धोबड चित्र असलेलें फडकें सुद्धां 'राष्ट्रीय' निशाण म्हणून मिरविलें जातें. सारांश, हिंदुस्थानच्या एकराष्ट्रीयत्वाचें व स्वराज्यप्राप्तीचें निदर्शक असें कसलेंहि निशाण अझून निश्चित झालेलें नाहीं किंवा प्रस्तुतच्या 'राष्ट्रीय' निशाणाला राष्ट्रीय सभेनें किंवा यच्चावत् हिंदी जनतेनें एकमताची एकमुखी मान्यता दिलेली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. निशाणाच्या परिवर्तनाच्या प्रत्येक पायरींत कोणातरी एका तात्पुरत्या लोकप्रिय व्यक्तीचें व्यक्तित्व आढळतें, त्यांत समष्टीला-जनतेच्या एकमुखी आकांक्षेला-मुळींच स्थळ नाहीं. आनी बेझंट, टिळक आणि गांधी या तीनहि व्यक्ति एकेक वेळ लोकप्रियतेच्या धवलगिरीवर जरी गेल्या, तरी त्यांचें लोकनेतृत्व क्षणिक व तात्पुरतें ठरलें गेलें. अर्थात त्यांच्या औट घटकेच्या वैयक्तिक माहात्म्याच्या रंगाचा शिडकाव 'राष्ट्रीय' ब्रुव निशाणांत कितीहि उमटलेला असला, तरी तो काळाशीं टक्कर देऊन यच्चावत् जनतेच्या मनोभावना काबीज करण्यास कमजोर ठरला आहे. राष्ट्राचीं निशाणें व्यक्तींच्या लहरींतून निर्माण होत नसतात. त्यांच्या अस्तित्वाच्या मागें अद्भुतरम्य अशा स्वातंत्र्याच्या झटापटींचा जाज्वल्य व जागरूक इतिहास उभा असतो. मराठ्यांचा भगवा झेंडा या एका उद्गारांतच जी विलक्षण जादू भरली आहे, ती या 'राष्ट्रीय' निशाणांत मुळींच नाहीं. भगवा झेंडा महाराष्ट्रांतल्या मराठ्यांचा असला, तरी त्याच्या पराक्रमाचा धौशा पूर्वेस बंगाल्यापर्यंत, उत्तरेस थेट अटकेपर्यंत आणि दक्षिणेस सेतुबंध रामेश्वरापर्यंत दणाणलेला आहे. गेल्या युरपियन महायुद्धांत ब्रिटीशांच्या युनियन जॅकची पुण्याई वांझोटी ठरल्यावर, जर्मनीच्या जबड्यांत पारीसची आहुती पडण्याच्या ऐन प्रसंगी, शिवाजी महाराज की जय आणि भगव्या झेंड्याचें दर्शन, या दोन गोष्टीनींच मराठ्यांच्या फलटणी जर्मन गब्रूंना अवघ्या ८ तासांत ३५ मैल मागें रेटीत पुढें घुसल्या. मराठशाहींत भगव्या झेंड्याखालीं मुसलमान फलटणीसुद्धां इमानें इतबारें लढत असत. भगवा झेंडा आणि जरीपटका या महाराष्ट्रीय निशाणांत हिंदु मुसलमान, ब्राह्मण ब्राह्मणेतर, किंवा स्पृशाऽस्पृश्य असा कसलाहि भेद नव्हता. हिंदवी स्वराज्य या व्यापक भावनेचें तें भेदशून्य चिन्ह होतें. सध्यांच्या निशाणांत भेदांचा रंग स्पष्ट दाखविला असून, त्यांवर ऐक्याचा लटका आरोप करण्यांत आलेला आहे. तांबडा आणि हिरवा रंग जरी गळ्यांत गळा घालून शेजारीं बसलेले दिसतात, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत हिंदु आणि मुसलामानांचें काय प्रेम व किती आदर (गेल्या बक्रीदच्या दिवशीं मुंबईस मदनपुऱ्यांत मुसलमानांनी शेंकडों गाईंची कुरबानी केल्याचें आम्ही स्वत: राणे ब्रदर्सच्या मोटारींतून फिरून प्रत्यक्ष पाहिलें. तरी देखील दांभिक दे. भ. हिंदूंनी त्यांच्या अहिंसेची थोरवी गाण्यांत कमतरता केली नाहीं, की सायंकाळी 'राष्ट्रीय' व 'खिलाफत' निशाणांची मिरवणूक नाचविण्यास कमी केलें नाही. शेळपटपणाला आणखी शिंगें कसलीं असतात?) पाघळत आहे, तें पहाणारांना खास दिसत आहे. विशेषत: प्रस्तुत निशाणावर काढलेलें चरक्याचें चित्र अत्यंत आक्षेपार्ह आहे. खादीचें स्वराज्य आज सर्वांनीं अनुभविलेंच आहे. चरका हें गांधी भगवंताचे सुदर्शन चक्र असलें, तरी हिंदुस्थानाच्या गुलामगिरीवर तें रामबाण औषध आहे, या शामळू तत्वावर खुद्द मोठमोठ्या पुढारी ब्रुवांतच मतभेद व अविश्वास, तेथें चरक्याचें महात्म्य अखिल हिंदी जनतेला पूर्ण मान्य आहे, असें म्हणणें शुद्ध दांभिकपणा होय. चरक्याची घरघर गांधी भक्तांच्या चर्पटपंजरींत जरी मनमुराद बोकाळली होती, तरी चरक्याच्या वेदांताला कोणीहि मान्यता दिलेली नाहीं आणि चरक्याच्या चित्रांत कसलेंहि चैतन्य नाहीं कीं ज्यामुळें 'राष्ट्रीय' झेंड्यावर त्याची योजना झाल्यामुळें जनतेच्या मनोवृत्ति उचंबळून जातील. चरक्यांत फार झालें तर व्यक्तिमाहात्म्य

असेल; पण तें मानसिक दास्यसूचक असल्यामुळें 'राष्ट्रीय' झेंड्यावरची त्याची योजना सर्वमान्य होणें शक्य नाहीं. निदान, शिवाजी महाराजांच्या भगव्या झेंड्याचा अभिमानी महाराष्ट्र या शामळू चरक्याचें माहात्म्य केव्हांहि कबूल करणार नाहीं. ज्या निशाणांत आमच्या शिवाजी महाराजांची स्मृति नाहीं, तें बेझंटप्रणीत असो, टिळकमान्य असो, नाहीं तर गांधीमंत्रित असो, त्याला महाराष्ट्र केव्हांहि कसलीहि मान्यता देणार नाहीं आणि आज देतहि नाहीं. तात्पर्य, प्रस्तुतचा 'राष्ट्रीय' झेंडा हें एक कांही तरी रंगीबेरंगी फडकें आहे, यापेक्षां त्याची किंमत अधिक नाहीं. असलीं हीं हजारों फडकीं गेल्या १८ तारखेला सर्व मुंबई इलाखाभर गांधी भक्तांनीं फडफडविलीं; पण त्यामुळें मुंबई सरकारची सत्ता तिळमात्र गडबडली नाहीं किंवा चरकास्वराज्याचा तिला शहहि लागला नाहीं. मग नागपूरच्या मध्यप्रांतीय सरकारलाच त्यामुळें आपल्या झटपट उच्चाटनाचा संशय कां यावा, हें एक कोडेंच म्हटलें पाहिजे!

असा. प्रस्तुतच्या 'राष्ट्रीय' निशाणासाठीं जी १५०० मंडळी तुरुंगांत गेली. त्यांच्या सत्याग्रहाची मीमांसा पुढील लेखकांत करण्यांत येईल. नुकतांच मध्यप्रांतीय कौन्सिलनें निशाण-प्रतिकाराचा हुकूम रद्द करण्याचा आणि बंदिवानांना मुक्त करण्याचा ठराव पास केला आहे. सत्याग्रही लोक हा आपल्या 'सत्याग्रहाचा विजय' मानीत आहेत. परंतु हा कौन्सिलचा विजय आहे, असहकारितेचा नव्हे कीं सत्याग्रहाचाही नव्हे! असल्या गोष्टी कौंसिलद्वारेंच घडवून आणावयाच्या असतात, हें प्रबोधनाच्या वाचकांना तरी सांगायला नको.

□□□

एन ४००६--३५

अग्रलेख

'राष्ट्रीय' निशाणाचा हट्टाग्रह
(लेखांक २ रा)

हिंदुस्थानच्या स्वराज्यविषयक जागृतीचा इतिहास स्थूल मानानें पाहिला तर त्याचा धागा थेट १८५७ सालापर्यंत नेऊन भिडवितां येईल, परंतु तद्विषयक आकांक्षांना मूर्त स्वरूप देण्याच्या अटीतटी-खटपटी वास्तवीक शांतिब्रह्म (पीसमेकर) सम्राट सप्तम एडवर्ड साहेबांच्या कारकीर्दीत सुरू झाल्या. सन १९०७-०८ सालापासून तों आज दीनपर्यंत हिंदी राजकारणाचा चित्रपट आपल्या स्मृतिदीपापुढें धरून खेळविला, तर गेल्या १६ वर्षांत अनेक अकल्पनीय चमत्कारश्रेणीनीं आमचे जीवन नुसतें फुलून निघालेले दिसेल. इतके महत्त्वाचे भयंकर दिव्याचे प्रसंग इतक्या अल्पावधीत भोगण्याचें बरें वाईट भाग्य आजपर्यंत कोणत्याहि नशिबांत लिहिलेलें इतिहासांत आढळत नाहीं. हिंदी राजकारणाच्या समरभूमीवर शास्त्रास्त्रसंपन्न ब्रिटीश सरकार आणि सर्वस्वी हातबल अशी अफाट नि:शस्त्र हिंदी जनता, असा विषम परिस्थितीच्या प्रतिस्पर्ध्यांचा झगडा आज चालूं आहे. युध्यमान पक्षांत ही विलक्षण विषमता असूनहि अत्याचार रक्तपात व प्राण बलिदान यांच्या अमानुष दिव्यांत होरपळून घेण्याचें भाग्य हिंदी जनतेनें पत्करल्यामुळें प्रस्तुतचा चित्रपट आपल्या लालभडक रंगानें, भूगोलाच्या नकाशावरील ब्रिटीश टेरीटरीच्या लाल रंगाशीं, जणूं काय तीव्र स्पर्धाच करीत आहे कीं काय, असा आपल्याला भास होतो. युद्ध- मग तें प्रत्यक्ष शस्त्रास्त्रांचें असो, कीं नीतिविषयक काथ्याकुटाचें (कौन्स्टिट्युशनल) शब्दावडंबराचें असो, तें जर स्वातंत्र्यार्थ असेल, तर त्यांतहि रक्तपात अत्याचार व खून हे प्रकार घडून येतात, एवढें मात्र यावरून सिद्ध होतें. अर्थात, या प्रकारांची पुण्याई शस्त्रास्त्रसंपन्न प्रतिस्पर्ध्याच्याच जमेला लिहिल्याशिवाय चित्रगुप्ताचाहि इलाज नसतो, हें न सांगतांहि कळण्यासारखें आहे. हिंदी राजकारण जात्या शांत प्रवृत्तीचें व नि:शस्त्र असूनहि त्याचें जीवन मानवी रक्ताने बरबटलें गेलें. हजारों व्यक्तींनीं स्वराज्याच्या आकांक्षेच्या स्थंडिलावर आपल्या बहुमोल प्याऱ्या प्राणाच्या आहुति दिल्या. कित्येकांनीं कारागृहवासांतच आपल्या उमेदी आयुष्याची माती करून घेतली. कित्येक निवडक निवडक बृहस्पतितुल्य पुढाऱ्यांच्या अमानुष हाल अपेष्टांनीं साऱ्या जगाची सद्सद्विवेक बुद्धि ढळढळा रडावयास लावली. पुरुषांच्या जोडीनें स्त्रियांनीहि पाशवी अत्याचाराच्या यज्ञांत हिंदवी शौर्यानें उड्या घेतल्या. हिंदी राजकारणाच्या बाह्यांगावरील हे देखावे कितीहि खेदजनक, कौतुकास्पद किंवा कल्पनारम्य असले, तरी

त्याच्या अंतरंगाचें चैतन्य बाह्यांगाइतकेंच समरस किंवा परिणत झालेलें आहे, असें म्हणतां येत नाहीं. उप्पर तो और बनी है, अंदरकी बात खुदा जाने!

हिन्दी राजकारणी चळवळींचा धौशा कितीहि मोठमोठ्या धडाक्यानें गर्जत असला, तरी तो नुसता वरवरचा बुडबुडा आहे. चटकन् फुगून फटकन् फुटणाऱ्या भावनावशतेचा फुगा आहे. किंबहुना भावनावशता हेंच आमच्या सर्व चळवळींचें भांडवल आहे. कांहींतरी कोठेंतरी हुल्लड करायला मिळाली कीं आमच्या चळवळी तेव्हांच जन्मतात; तेवढा हंगाम गेला कीं खलास! त्यांत व्यावहारीक दक्षता, व्यापक धोरणी दृष्टीचा पोच, अस्सल आस्थेची आंच, किंवा एकसूत्रीपणा कधींहि मिळावयाचा नाहीं. दहांचे दहा विचार, दहा पंथ आणि दहा दिशांना दहा तोंडें असें कोणी चित्र काढलें तर तें हिन्दी राजकारणाचा ट्रेडमार्क म्हणून साऱ्या जगांत बिनतक्रार ओळखलें जाईल, यांत मुळींच शंका नाहीं. आमचा स्वार्थत्याग सुद्धां उदात्त भावनेच्या पोटचा नसतो; माथेफिरूपणा आणि भावनाप्रधान हुल्लड यांचीच त्यांत भरपूर सरमिसळ झालेली असते. बंगाली बांबगोळ्यांचा इतिहास जेव्हां घडत होता, तेव्हां अखिल राष्ट्राची मनोभावना इतकी विलक्षण माथेफिरू बनली होती कीं आणखी एक अर्धा झडन खुदीराम बोस उपटले कीं स्वराज्य पायाशीं चालत आलेंच, असेंच ज्याला त्याला वाटे. जणूं काय बांबगोळ्याच्या स्फोटांतूनच स्वराज्य उत्पन्न व्हावयाचें होतें! स्वदेशी चळवळीच्या धामधुमींत असें वाटूं लागलें कीं आपण नुसता स्वदेशीब्रुव कपडा वापरला कीं इंग्रेजी नोकरशाहीचा मुर्दा पडलाच! गांधींच्या खादीमाहात्म्याचाहि प्रकार तोच. सारांश, येथून तेथून एकजात माथेफिरूपणाचा आणि त्राग्याचा प्रकार! १९०७-०८ सालच्या त्रागेखोर चळवळींत लक्षावधि तरुणांचा किती शोचनीय अध:पात झाला, याविषयीं प्रबोधनानें या पूर्वी अत्यंत स्पष्टोक्तीचे पुरावे प्रसिद्ध केल्याचें वाचकांस अवगत असेलच. खुद्द बंगालविषयीं डॉ. रवींद्रनाथ टागोर यांनी आपला अभिप्राय सत्याची हाक या निबंधांत व्यक्त केलाच आहे. (पहा प्रबोधन, वर्ष १ लें, पृ. २७) त्यांत तें म्हणतात कीं ''जेथें मुळांतच कांहीं राजकारण नाहीं, तेथें राज्यक्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न, म्हणजे गांवाचा ठाव ठिकाण नसतांनाच प्रवासाला निघण्यासारखें आहे. आणि चुकीचा मार्ग सुगम व अगदीं जवळचा असा जरी भासत असला तरी त्या मार्गानें गेल्यास आपण उद्दीष्ट स्थलीं तर पोचणार नाहींच, पण उगाच पायांना मात्र शीण दिल्यासारखें होईल.'' सारांश, आमच्या सर्व चळवळी 'घरांत नाहीं तुरी आणि भट भटणीला मारी' या म्हणीचेंच प्रत्यंतर पटवीत असतात.

बंगाली धामधुमीपासून त्राग्याचें एक अवलक्षणी फिसाट हिंदी राजकारणाच्या चळवळींत घुसलें आहे. या फिसाटाच्या उन्मादांत घडणारे अत्याचार स्वार्थत्याग म्हणून गणले जातात. या त्राग्याचा भोंवरा वाढतां वाढतां आज त्याला सत्याग्रहाचें, आत्मत्यागाचें संन्यासाचें किंवा असहकारी सुतकी वृत्तीचें नेभळट स्वरूप प्राप्त झालें आहे. माथेफिरूपणाशिवाय त्रागा उत्पन्नच होऊं शकत नाहीं, आणि तरुण मंडळीं जात्याच उत्पन्नच होऊं शकत नाहीं, आणि तरुण मंडळी जात्याच भावनावश असल्यामुळें त्यांना त्राग्याचा उन्माद तात्कळ मानवतो. अर्थात, त्राग्याच्या तत्वावर राजकारणी चळवळींचें धोंडें दामटणाऱ्या मंडळींना आपल्या भांडवलाची पुंजी विकारवश तरुणांच्या संग्रहानेंच सजवावी लागते. चालूं घटकेला सत्याग्रही सैनिकांचा भरणा शाळा कॉलेजं सोडलेल्या त्रागेखोर भटक्यांतून आणि 'राष्ट्रीय' शिक्षणाच्या पाठशाळातूनच विशेष होत असतो, हें लोकावश्रुतच आहे.

एन ४००६--३५

जणूं काय 'राष्ट्रीय' शिक्षणाच्या पाठशाळा म्हणजे त्रागेखोर उनाडटप्पूंच्या वखारीच बनल्या आहेत. सत्याग्रह म्हणजे कसल्याहि प्रकारचा प्रतिकार न करतां, आत्मक्लेशानें प्रतिस्पर्ध्याच्या आत्म्याला जिंकणें, अशी सत्याग्रहाची व्याख्या प्रसिद्ध झाली आहे. वेदांती हिंदुस्थानाला हा 'आत्म्याचा वेदांत' कां मानवूं नये? ब्रिटिश सत्तेला चारी मुंड्या चीत करण्यासाठीं स्वत:ची मुंडी कापून पुढें सरसावलेल्या सत्याग्रहाला- या आत्मिक वेदांताला हें तरी कसें कळावें कीं ब्रिटिश सत्तेला जर आत्माच नाहीं तर तूं जिंकणार तरी कोणाला आणि कसें? ब्रिटीश सत्ता म्हणजे एक पद्धतशीर साचेबंद यंत्राची गिरणी. ठरावीक चक्रें ठरावीक गतीनें फिरत असतात. एखादें चक्र-मग तें अस्सल ब्रिटीश असो, वा निर्भेळ हिन्दी असो- त्या गतीच्या आड आलें कीं त्याचे दांत तुटलेच! अशा या बिन आत्म्याच्या राज्यपद्धतीला पायबंद लावण्याची शेखी त्रागेखोर सत्याग्रहानें मिरविणें, या सारखें हास्यास्पद लळीत हेंच! असहकारिता, सत्याग्रह आणि कायदेभंग या गांधीप्रणीत त्रयींत सणाणणारी त्राग्याची वृत्ति आज सर्वत्र बरीच फैलावली आहे. या त्रयीचे पुरस्कर्ते अनत्याचाराचें कितीहि जाडजूड पांघरूण पांघरीत असले, तरी त्रागा हा चीजच अशी आहे का ती अत्याचाराकडे विकारवश जनतेला प्रवृत्त केल्याशिवाय रहातच नाहीं. याची उदाहरणें नुकतींच आपल्या डोळ्यांसमोर अनेक घडलीं. शिवाय, बेजबाबदार लेखन वक्तृत्वानें जेथें माथेफिरू तरुणांची संख्या दिवसेंदिवस भरंसाट फुगत चालली आहे, तेथें नागपूरच्या हुल्लडींसाठी अप्रबद्ध त्रागेखोरांची उणीव कशाला पडेल? मुळशीच्या किंवा नागपूरच्या सत्याग्रहांत भाग घेणाऱ्या तरुणांच्या कौटुंबिक व सामाजिक दर्जांचें पृथ:करण हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊं शकेल. प्रत्येकानें आपापल्या क्षेत्रांतल्या सत्याग्रही व्यक्तींचीं चारित्र्येंच विचारांत घ्यावीं म्हणजे झालें! अभ्यासक्रम सुटल्यामुळें किंवा सोडल्यामुळें उनाड बनलेल्या; दुर्वर्तनामुळें कौटुंबिक आश्रयाला मुकलेल्या; कोठें कांहीं केलेलीं लफडीं आंगावर शेकल्यामुळें सामाजिक विश्वासास कुपात्र ठरलेल्या; बेजबाबदार वाङ्मयाच्या अभ्यासानें माथीं भडकून 'कुछ पर्वा नहीं' बनलेल्या आणि गैरसमुजतीनेंच कां होईना पण एकदां तुरुंगाची हवा खाऊन आलेल्या तरुणांचाच भरणा सत्याग्रहांत बराच दिसतो. 'तुरुंगांत जाणें हीच स्वराज्यप्राप्तीचीं लक्षणें' असली व्याख्या जर जबाबदार पुढारीच करूं लागले, तर असल्या विकारवश तरुणांनीं वाटेल त्या भल्याबुऱ्या हुल्लडींत उडी घेण्यास कां कचरावें? सत्याग्रहाच्या शुद्ध तत्वावर पूर्ण विश्वास ठेऊन कार्येकनिष्ठेनें आत्मत्याग करणारे सत्याग्रही मुळींच नाहींत, असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. हाताची बोटें मोजण्यास पुरतील इतके कांही आहेत. परंतु उपरिनिर्दिष्ट मसाल्याच्या माणसांच्या मिसळीनें उनाडटप्पूहि देशभक्त, खोट्या चेकांचा व्यापारीहि देशभक्त, घरच्या दारिद्र्याची वखवख बापट महर्षीच्या ५० रुपयांच्या आगाऊ भत्त्यानें बुझविणारा भाडोत्री सत्याग्रहीहि देशभक्त, एकदां तुरुंगाची चटक़ लागल्यावर वाटेल तेव्हां वाटेल तितक्या वेळ 'स्वराज्याश्रमा'ची वारी करणाराहि देशभक्त, आणि हे चार दोन तत्वनिष्ठ सत्याग्रही, असा हा पुणेरी नागपुरी चावटांची चिळस आणणारा चिडखोर चिवडा बनला आहे. टिळक आगरकरांच्या पूर्व अमदानींत तुरुंगात जाणें हें एक खरोखरीचें श्रेष्ठ धारिष्ठ्य होतें, यांत संशय नाहीं. पण आज आपण होऊन तुरुंगांत घुसणाऱ्या हुल्लडखोरांच्या पदरीं जर कोणी शहाणा तेंच श्रेष्ठ धारिष्ट बांधू म्हणेल, तर त्याच्या धारिष्टाची कमालच म्हटली पाहिजे. टिळकांच्या लोकप्रियतेच्या प्राप्तीसाठीं बऱ्याच दे. भ. लेखकांनीं आपल्या बेजबाबदार लेखणीच्या टोकावर बसून तुरुंगाच्या महायात्रेचे योग साधले, पण अखेर श्रेष्ठ धारिष्ट्याच्या भाग्याच्या

बाबतींत एकटे टिळकच काय ते अनामिकावत् ठरले; बाकीच्या एरा गाबाळांची आजची दिनचर्या काय आहे ती सर्वांना दिसतच आहे. आगबोटीच्या फूड दीडफूट व्यासाच्या भोकांतून आपला पीळदार देहाचा पिंड झट्दिशीं बाहेर काढून बहाड दर्यांत धडाड उडी टाकून, पट्टीच्या पोहणाऱ्याच्याहि मुसकटांत मारील अशा तीव्र वेगानें पोहत जाण्याचें कोठें ते बॅरिस्टर सावरकरांचें श्रेष्ठ धारिष्ट; आणि कोठें धरणाच्या धोंड्याला हात लावतांच 'चलो' म्हणून डुरकणाऱ्या शिपायाच्या बरोबर हासत खिदळत तुरुंगांत जाण्याचें या सत्याग्रही माथेफिरूचें भ्रष्ट धारिष्ट?

माथेफिरूपणाच्या चळवळींचें प्रायश्चित आज हजारों बंगाली तरूण भोगीत आहेत. त्यांच्या विद्वत्तेची, महत्त्वाकांक्षेची व उमेदीची माती झाली आहे. पुष्कळांच्या कुटुंबियांनीं जरी त्यांना आश्रय दिलेला आहे, तरी ते जवळ जवळ समाजबहिष्कृताप्रमाणें आपलें एकलकोंडें आयुष्य कसेंबसें कंठीत आहेत. ज्या पुढाऱ्यांच्या लांबरुंद पाटावाच्या ज्वलज्जहाल भडक लेखन व्याख्यानांनीं ते आत्मत्याग करण्यास प्रवृत्त झाले, ते पुढारीहि आज त्यांना जोड्याशीं उभे करीत नाहींत (पहा प्रबोधन वर्ष १ लें, पृ. १२६, 'राष्ट्राळलेल्या तरुणांचा अध:पात') तुरुंगांतल्या वारीमुळें लोकमान्यतेचा शेंदूर आपल्या आंगावर चढतो असा मोह या अप्रबुद्ध तरुणांना होणें शक्य आहे; परंतु या मोहामुळें आपलें सर्व भावीजीवन असून नसून सारखें होतें, याची जाणीव त्यांना आधीं होत नाहीं, किंवा कोणी करूनहि देत नाहीं. हुल्लडीच्या भर रंगांत त्यांच्या स्वार्थत्यागाचे (?) पोवाडे गाणारे शाहीर जरी बरेच बोकाळतात, तरी त्याचा रंग ओसरतांच या तरुणांच्या भावी जीवनाची स्मृति कोणासहि रहात नाहीं. समाज सुद्धां त्यांची पर्वा करीत नाहीं; त्यांच्याकडे नेंहमी साशंक दृष्टीनेंच पहातो. शिवाय, एकदां तुरुंगातला अनुभव घेऊन मनुष्य बाहेर पडला कीं त्याच्यांत एक प्रकारची बेपर्वाई संचरते. 'एकदां तुरुंगांतून जाऊन आलो, आणखी हजार वेळां जाईन, त्यांत काय आहे?' अशी त्याची प्रवृत्ति प्रमत्त होते. तो जवळ जवळ 'जेल बर्ड'च बनतो. अर्थात् प्रथम जरी बेगडी देशभक्तीच्या किंवा माथेफिरू सत्याग्रहाच्या मिषानें तो तुरुंगात गेलेला असतो, तरी पुढें प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देतांना वाटेल तें घाणेरडें कृत्य करून तुरुंगांत घुसायला त्याची मनोवृत्ति बाचकत नाहीं. या पर्यवसानापर्यंत गेलेलीं कांहीं उदाहरणें इकडे घडूं लागली आहेंत. अर्थात् असल्या तरुणांची संख्या समाजांत वाढणें हें, हुल्लडखोरांच्या दृष्टीनें स्वराज्य अधिक जवळ येण्याचें लक्षण असलें, तरी तें नैतिक व सामाजिकदृष्ट्या अत्यंत भयंकर आहे, एवढा इषारा देणें जरूर आहे. उमेदवार तरुणांच्या हिंमतीचा व विकारवशतेचा सध्या होत असलेला अध:पात महाराष्ट्राला जाणवल्या शिवाय राहणार नाहीं. एवढीं सूचना करून, 'राष्ट्रीय' निशाणाच्या हट्टाग्रहाची ही मीमांसा येथें समाप्त करतों.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरांस शेलापागोटें

शांतिनिकेतन माला

या मालेचे दोन भाग अभिप्रायार्थ येऊन बरेच दिवस झाले. यांत डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या निवडक लेखांचें मराठी भाषांतर येत असतें. मालेचे लेखक कोणी 'सरस्वतिनंदन' असून प्रकाशकाचा पत्ता 'प्रो. शांतिनिकेतन, ४८३ शनवार, पुणें सिटी' असा आहे. रवींद्रनाथांच्या ओजस्वी प्रासादिक वाणीचें मराठींत यथातथ्य प्रतिबिंब वठविण्यासाठीं सरस्वतिनंदनापेक्षां विशेष अधिकाराचा भाषांतरकार पुढें आला असता तर बरें झालें असतें, असें आम्हांला वाटतें. तथापि अगदीच कांही नाहीं त्यापेक्षां प्रस्तुतचा प्रयत्न अभिनंदनीय नाहीं असें कोण म्हणेल?

जलसा शिक्षक

लेखक व प्रकाशक श्री. भाऊ रामचंद्र पाटोळे, मुक्काम भिलवडी जिल्हा सातारा; किंमत एक रुपया. श्रीयुत पाटोळे यांचा सत्यशोधक जलसा गुदस्तसालीं आम्हीं स्वत: पाहिला होता. तो आम्हांला अत्यंत आवडला. अज्ञान व निरक्षर जनतेला जागृत करण्याच्या कामीं जलसा हें किती विलक्षण सामर्थ्यवान् साधन झालें आहे हें प्रत्यक्ष जलसा पाहिल्याशिवाय उमगणार नाहीं. श्री. भाऊराव हे उत्तम कवि आहेत. मराठी भाषा शुद्ध व अस्खलीत बोलतात. ते सुरेल गवई असून त्यांची प्रवचनशक्ति तडफदार परिणामकारक आहे. यामुळें त्यांचे जलसे अशिक्षिताप्रमाणें सुशिक्षितांनाहि आवडतात. सत्यशोधक जलसा म्हणजे नुसता भटांच्या आईमाईचा उद्धार, अशी ज्यांची कुकल्पना झाली असेल, किंवा कोणी करून दिली असेल त्यांनीं हें पुस्तक मुद्दाम वाचावें व आपला भ्रमनिरास करून घ्यावा, अशी आमची आग्रहाची शिफारस आहे. यांत विद्येचें महत्त्व, शेतकऱ्यांची दैना, मद्यपान निषेध, कन्याविक्रय, हुंड्याचे अनिष्ट परिणाम, हिंदु विधवांची कर्मकहाणी इत्यादि एकोणीस विषयांवर मार्मिक आख्यानें आहेत. एक दोन मुद्द्याबद्दल आमचा मतभेद असला, तरी प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करून श्री. भाऊराव पाटोळे यांनीं सत्यशोधक जलशाविषयीं लोकमताला अनुकूल वळण देण्याचें श्रेय संपादन केलें आहे, यांत मुळींच शंका नाहीं.

गणपतराव-चरित्र

लेखक श्री. लक्ष्मण नारायण जोशी, प्रकाशक वाङ्मयविहार मंडळ, पुणें. किंमत दीड रुपया. श्री. जोशी यांनी प्रस्तुतचा ग्रंथ लिहून नाट्यविषयक वाङ्मयांत चांगलीच भर घातली आहे. नाटकी वातावरणांत लेखक हे एक जुनें बुद्धुक असल्यामुळें आणि प्रत्येक लहानमोठ्या हकीगतींची टिपणें जेव्हांच्या तेव्हां करून ठेवण्याची त्यांची प्रशंसनीय प्रवृत्ती असल्यामुळें, गद्यनटाचार्य कै. गणपतराव जोशी यांच्या चरित्राचा व तदनुषंगिक अखिल महाराष्ट्रीय नाट्यप्रदेशाचा तपशीलवार निकाशा त्यांना रेखाटतां आला. भाषाशैली कादंबरीप्रमाणे चटकदार व प्रवाही आहे. कित्येक प्रसिद्ध व्यक्तींच्या छायाचित्रमुद्रणानें विवेचनाची गोडी विशेष स्वादिष्ट बनली आहे. परंतु आत्मश्लाघेच्या पांचट भांडवलावर शाहुनगरवाडी मंडळी व्यतिरिक्त इतर एकजात नाट्यसंस्थांवर व नटांवर कुत्सित निंदेचा भडिमार करून प्रस्तुत चरित्राची उठावणी करण्याचा श्री. जोश्यांचा प्रयत्न केवळ पोरकटच नव्हे तर अश्लाघ्य आहे.

ब्राह्मणेतर व मराठे

यांच्या चळवळीचा पूर्वेतिहास आणि मराठ्यांची पूर्वपीठिका. लेखक व प्रकाशक श्री. सीताराम रघुनाथ तारकुंडे; मुक्काम हडपसर, किंमत एक रुपया. प्रस्तुत पुस्तक श्री. तारकुंडे यांनी मोठ्या परिश्रम पूर्वक लिहिलें आहे. यांत सत्यशोधक समाजाचे उत्पादक कै. ज्योतिराव फुले आणि त्यांचे सहकारी मित्र यांचा विस्तृत इतिहास तपशीलवार दिलेला असून, सत्यशोधक मताच्या मूलतत्त्वाचा प्रसार करण्यासाठीं त्यांनी अनेक आपत्तींना तोंड देऊन कोणकोणते प्रयत्न केले, याची मनोरंजक माहिती १३७ पृष्ठांपैकी अवघ्या ३७ पृष्ठांतच देऊन संपूर्ण केली आहे. बाकीच्या १०० पृष्ठांत मराठेशाहीचा इतिहास संक्षेपानें व निस्पृहपणानें निवेदन केला आहे. १२१ पृष्ठापासून हल्लींचे मराठे या मथळ्याखालीं दिलेली माहिती माननीय आहे.

आर्यस्त्री प्रबोधमाला

लेखिका श्रीमती सौ. सरस्वतिबाई गाडगीळ, सांगली. मुंबईची हिंद महिला, हिंदकुमारी आणि प्रस्तुतची आर्यस्त्री प्रबोधमाला पाहिली की, आमच्या महाराष्ट्रीय भगिनीसमाजांत नवमन्वंतराच्या प्रबोधनाचें वारे कधी खेळूं लागलें आहे याची साक्ष तेव्हांच पटते. मुंबई पुण्यासारख्या सर्वप्रकारच्या चळवळीच्या केंद्रस्थानींच या प्रबोधनाचा प्रादुर्भाव झाला आहे असें नव्हें तर सांगलीसारख्या सांधीकोपऱ्याच्या ठिकाणींहि आज त्याचा प्रतिध्वनी उमटत आहे, ही अत्यंत आशाजनक स्थिति होय. या दृष्टीनें सांगलीतल्या एका ओबडधोबड छापखान्यांत कशीतरी झापडझोपड करून छापलेल्या या मालेच्या छोटेखानी पुस्तकाकडे कौतुकानें पहात राहिल्याशिवाय राहवत नाहीं. मालेच्या प्रत्येक पुष्याची किंमत त्याच्या अंतर्गत सुवासाच्या मानानें अवधी एक आणा म्हणजे कांहीच नाहीं. अशा ह्या पुष्पांचा गजरा आमच्या प्रत्येक भगिनीनें आपल्या मस्तकीं धारण करण्याचा निश्चय केला, तर सौ. सरस्वतीबाईंच्या श्रमाचें चीज होईल.

न पटणारी गोष्ट उर्फ चित्तशुद्धि

ले. नारायण हरी आपटे, प्रकाशक-वाङ्मयविहार मंडळ-पुणें ही एक 'स्वतंत्र सामाजिक कादंबरी आहे. आज सामाजिक क्रांतीच्या उष:कालांत खडबडून जागे झालेल्या नवमन्वंतराच्या समाजघटकांनां हीं गोष्ट न पटणारी आहे, असें आम्हाला तरी वाटत नाहीं. मात्र रूढिबद्ध समाजाच्या म्हाताऱ्या

अवशेषांकडे लक्ष देतांच या नावाची सार्थकता ताबडतोब पटते. गोष्टींतील पात्रें ही समाजांत पावलोपावलीं आढळणारीं, अगदीं आपल्या ओळखीची अशी आहेत. काकासाहेब इनामदार समाजांत आहेत. गंगूकाकी बहुतेक प्रत्येकाच्या माहितीच्या आहेत. मुंबई पुण्यांत भटकताना शेंकडों मिस्टर पंडितराव दररोज दिसतील. पंडितरावांच्या इतके मुबलक नसले, तरी विश्वनाथरावहि आजच्या समाजांत आहेत; चित्रा थोड्या आहेत. नीरा त्याहूनहि थोड्या आहेत, मग त्या गोष्टीचा असामान्यपणा कशांत आहे? पात्रांत खास नाही. चित्तशुद्धींत आहे, विलक्षण कौशल्यानें घडवून आणिलेली, काकासाहेबांची चित्तशुद्धि हीच या गोष्टीचें सर्वस्व आहे. पात्रांचा स्वभाव परिपोष उत्कृष्ट आहें, परस्परपरिणाम बहारीचा आहे. प्रसंगनिर्मिति कुशल आहे, व एकंदरींत गोष्ट परिणामकारक आहे; सर्व आहे. पण- पण गोष्ट वाचून झाल्यावर वाईट वाटतें, तें काकासाहेबांच्या मृत्यूबद्दल नाहीं, नीरेच्या करुणकहाणीबद्दल नाहीं! वाईट वाटतें तें प्रभावशाली लेखकाच्या प्रमादाबद्दल!

साधारण विचार करण्याची ज्याला शक्ति आहे, आणि न्यायान्यायाची ज्याला चाड आहे, अशा प्रत्येक मनुष्याला उघड उघड दिसणारा अन्याय हा केव्हांना केव्हां तरी तिरस्करणीय वाटणारच, आणि न्याय पटणारच! पण लेखन-भाषण-कृतिद्वारा, न पटणाऱ्या गोष्टी समाजाला पटवून देण्याचा ज्यांचा ईश्वरी अधिकार, त्यांची कामगिरी याच्या पलिकडची असते. रूढीनें अशी कित्येक बंधनें निर्माण केलीं आहेत, कीं जीं दिसावयास अत्यंत मोहक, साधारण मनुष्याची भुलावणी करणारी पण फुंकर मारून रक्त शोषण करणाऱ्या वादळाप्रमाणें भयंकर आहेत. त्यांच्या भुलावणीस बळी न पडणें, त्यांच्या भयंकरपणाची जाणीव स्वत:स व दुसऱ्यास करून देणें, हें असामान्य लेखकाचे काम आहे. आपण एक प्रामाणिक विचार करणारा आणि एक असामान्य उदाहरण घेऊं! 'एक सामान्य पण विचार करणारा आणि एक असामान्य असे दोघेजण प्रवास करीत आहेत, व मार्ग विचारण्याकरितां समोरून येणाऱ्या एका धोंगडीवाल्या मनुष्याजवळ ते जातात, तो चटकन बाजूला सरतो व सांगतो ''महाराज शिवाल! मी महार आहे!''

पण मनुष्य म्हणतो ''कांहीं हरकत नाहीं, आम्हाला चालतें!'' पण पुढें गेल्यावर आपल्या असामान्य सोबत्याला म्हणतो ''किती विनयशील होता बिचारा! आपण होऊन बाजूला झाला!'' पण सोबती म्हणतो ''बाबा तुला जे चांगले दिसतें तेंच फार घातुक आहे; उघड उघड वाईट म्हणून दिसणाऱ्या वाईट गोष्टी लवकरच नाहींशा होतील, पण ज्यांना चांगल्याचा मुलामा दिला आहे अशा वाईट गोष्टी नाहींशा होणें कठीण!''

तात्पर्य काय कीं; साधारण मनुष्याला अस्पृश्यता वाईट, हें कळतें. तरी पण तिच्या पालनांतील चांगुलपणाच्या भुलावणींतून तो सुटत नाही!

हीच गोष्ट हिंदु स्त्रियांच्या सौभाग्य-चिन्हांची मात्र अधिक म्हणून अधिक मोहक म्हणून भयंकर! सौभाग्यचिन्हे असावीत हें गैर नाही. त्याविषयी प्रेम व आदर ही आवश्यक आहे. पण एक सिद्धांत नेहमीं पुढें राहिला पाहिजे; ''पति-म्हणून -सौभाग्य- चिन्हें!'' ''सौभाग्य चिन्हें-म्हणून पति!'' असा त्याचा विपर्यास होता कामा नये! कसा कां असेना मेला, पण कुंकवाला आधार आहे ना? ही हिंदु स्त्रीवर्गातील प्रचलित समजूत या विपर्यासांचा परिणाम आहे. 'कुंकवाला आधार' या विलक्षण मानसिक बादशाहतीपुढें नसून किती स्त्रिया नवऱ्याच्या नांवाखाली वाटेल तो अन्याय सहन करावयास तयार

असतात. ''सुवासिनी'' व्हावयास पाहिजे म्हणूनच किती कुमारिका वाटेल त्या आजोबाला पति म्हणावयास तयार होतात? या चमत्कारिक बंधनानें हिंदू स्त्रियांच्या मनाची अशी विलक्षण पकड घेतली आहे कीं, ''पतिनिधनसमयी त्या नवऱ्यापेक्षां कुंकवाकरितांच जास्त रडतात'' असले अचरट विधान केल्यासहि विचारांतीं त्यांत सत्यता आढळून येईल. या बाबतीतील नीरेचे चित्त अगदीं यथार्थ आहे! व यथार्थ चित्रलेखनाबद्दल लेखक स्तुतीस पात्र आहे. पण वाईट येवढेंच कीं तो स्वत:च त्या मोहिनीस बळी पडला आहे!

कुणी म्हणतील की या बंधनाच्या फाजील पालनांतच हिंदु स्त्रियांचा विनय व सालसपणा दिसून येतो!

□□□

(शा.म.मु.) एन ४००६--३६ (११००--९-२०२१)

अग्रलेख

इतिहासाची पुनरावृत्ति

मनुष्य इतिहास घडवीत असतो आणि इतिहास मनुष्यांना घडवीत असतों, असें परस्परांचें हें नातें विचारी जनांना क्षणभर तरी कुतूहलोत्पादक वाटल्याशिवाय राहत नाहीं. जात्याच मनुष्य हा प्रगमनशील असल्यामुळें, इतिहासाला सुद्धां कधीं क्रान्तीच्या तर कधिं उत्क्रान्तीच्या निसरड्या कड्यांवरून भरधांव उड्या घेत, त्याच्या प्रगतीशीं समगामी रहाणें भागच पडतें. अंधाराचें युग, लोखंडाचें युग, तांब्याचें युग आणि पुढें कधिं काळीं- पण निश्चयानें- येणारें सुवर्णयुग असे विद्वानांनीं पाडलेले निरनिराळे कालविभाग विचारांत घेतले, तरी हेंच तत्व पटतें कीं मनुष्य हा दिवसेंदिवस उन्नत होत आहे. त्याचे आचार विचार बदलत आहेत. त्याच्या कल्पनेची फेंक भविष्यकाळाच्या खोल उदरांत अत्यंत दूरवर घुसून जात आहे. त्याच्या आचार व विचारांच्या सुधारणेप्रमाणें आसपासची परिस्थिती व दुनिया खडाखड आपल्या बाह्यांगांवरील जुन्या कवचांचा त्याग करून नवीन लेणें पांघरीत आहेत. गारगोट्यांच्या शस्त्रांनीं लढणारा, अंगाला रंग फासून कातडी पांघरणारा, किंवा मुंबईतून कलकत्त्याचा प्रवास डोलींत अगर पालखींत बसून करणारा प्राणी सध्यांच्या मन्वतरांत फक्त चित्रांतच पहावयास मिळेल. फार काय, पण ज्या भाल्याच्या फेकीबद्दल आणि भीमथडी घोड्यांच्या दौडीबद्दल महाराष्ट्राच्या मराठ्यांचा पराक्रम अटकेच्या किल्ल्यांत आणि कलकत्याच्या फोर्टात अझून आपल्या धौशाचा प्रतिध्वनि सांजसकाळ घुमवीत आहे, त्या मराठ्यांच्याहि शौर्याची अब्रू अत:पर या घोड्याभाल्यांच्या हातीं राहिलेली नाहीं; इतकें जग पुढें गेलें आहे, किंवा मानवांनीं त्याला पुढें रेटीत नेलें आहे. आजच्या लढवय्या मराठ्याच्या पराक्रमाचें वर्म त्याच्या वाडवडिलार्जित ढाल तलवारींत राहिलें नसून, त्याच्या भविष्यकालीन पुनरुज्जीवनाच्या आकांक्षा टॉर्पेडो हॉवित्झरभोंवतीं मोठ्या आतुरतेनें घिरट्या घालीत असतात. साऱ्या जगाच्या प्रागतिक चळवळीच्या आकाशाला गवसणी घालण्यापेक्षां, आपल्या हिंदुस्थानांतल्या चळवळींचा सन १८५७ पासून पुढील इतिहासच पाहिलेला बरा. सत्तावनचें बंड, राणीचा जाहीरनामा, युनिव्हर्सिट्याची स्थापना, स्थानिक स्वराज्याचे अधिकार, येथपासून तों परवांच्या मॉटफर्ड रिफॉर्मनें दिलेल्या 'लिटल पार्लमेंट'च्या अधिकारापर्यंतचा इतिहास विहंगम दृष्टीनें जरी पाहिला, तरी आपणांस असें दिसून येईल कीं आम्ही हिंदी जन आणि आमची कनवाळू राज्यकर्ती इंग्रजी नोकरशाही दोघेहि मोक्षमंदिराकडे झपाट्यानें चाललों

आहोंत? नोकरशाहीचे म्होरक्ये व्हाईसरॉय गव्हर्नरादि देवबाप्यांची देववाणीच नुसती जेहत्ते श्रवण केली, तर आपल्याला असाहि भास होतो कीं पंजाबांत आमच्या आयाबहिणींचा बीभत्स निर्भत्सना होणें, पुढाऱ्यांची मान सुळाच्या टोंकावर लटकत रहाणें, नरमांस भक्षकांच्या अंधाऱ्या युगालाहि लाजविणारे अत्याचार प्रतिष्ठित नागरिकांवर होणें, वगैरे कायदेबाजाचे अनर्थ म्हणजेच स्वराज्य कीं काय? मानवांची प्रगमनशीलता म्हणतात ती ही कीं काय? युरपियन महायुद्धाच्या अंजनानें बदललेला 'दृष्टिकोन' तो हाच कीं काय? असे नाना प्रकारचे 'कां'चे प्रश्न आपल्या विचारक्षेत्रांत तुफान करतात आणि आमचे मेहेरबान व्हॉईसरॉय लॉर्ड रेडिंगसाहेबांच्या त्रैलोक्यनिनादित 'न्यायबुद्धी'ची चिकित्सा करण्यास प्रत्येक व्यक्तीच्या मनोवृत्तीला जबरीनें भाग पाडतात. या परस्पर-विरोधी निरनिराळ्या देखाव्यांत अलीकडे हिंदी राजकारणाच्या क्षेत्रांत अकल्पनीय घटनेनें घडून येणारे कांहीं ठळक ठळक ट्रान्स्फर सीन पाहिले कीं मन बावरतें, वृत्ति घाबरते, आणि प्रत्यक्ष स्थितप्रज्ञाचीहि समाधी ढासळते! नाना तऱ्हेचे शास्त्रीय शोध व्यक्त होत आहेत; तत्वज्ञानाची भरारी नरांतला नारायण हुडकिण्यासाठीं साऱ्या त्रिभुवनाला ठेंगणे करीत आहे; मानवसमाजांतील निर्वंग ऐक्याची प्रस्थापना व्हावी एतदर्थ 'मेणाहुनि मऊ' असलेले अनेक 'विष्णुदास' चर्मभिन्नतेची साक्ष पटविणारे रंग साफ पुसून टांकण्यासाठी 'कठीण वज्रास भेदूं' अशा पोलादी निश्चयानें कार्य करीत आहेत; नानाविध ज्ञानाचा प्रसार मनुष्यमात्राच्या बुद्धीला रुचेल व पचेल इतकी आंच देऊन तिला प्रगल्भतेचा व विश्वात्मैक्य भावनेचा 'शिणगार' चढवीत आहे; टीचभर जमिनीच्या स्वामित्वासाठी कोट्यावधि लोकांच्या प्राणाहुतीवर युद्धांचे अमानुष जलसे नाचविणारे रणगाजीसुद्धां युद्धांच्या कल्पनेचेंच उच्चाटन करण्यास सिद्ध झाले आहेत; आणि आम्हां मानवांचें मन अंधाऱ्या युगांतल्या रानटी प्रवृत्तीपासून सहस्रपट उन्नत व उत्क्रांत होत होत, आम्ही आज सुवर्णयुगाच्या देवडीच्या छायेपर्यंत येऊन भिडलों आहोंत, अशींच भावना प्रत्येक सुसंस्कृत मनुष्याच्या सद्‌सद्विवेक बुद्धीला खात्रीची ग्वाही देत आहे. अशा स्थितींत मनुष्याच्या अकलेनें अवाचित गोलांटी उडी मारून २० च्या शतकांत १७ व्या शतकांतला खेळखंडोबा माजविला, कीं एकजात प्रबुद्ध अप्रबुद्ध व्यक्तिमात्राला जोराचा धक्का बसतो. प्रथमच मुंबईपुण्यास जाणाऱ्या खेडवळाची बोरघाटांच्या रिवर्सिंगवर जशी चमत्कारिक मन:स्थिती होते, तशी या धक्क्याच्या विलक्षण अनुभवानेंहि होते; आणि काळ उलट्या पावलानें चालत आहे कीं प्रगमनशीलतेच्या गाडींत अखिल मानवी दुनियाच उलटें तोंड करून बसली आहे? याची आपल्या विचारांत कालवाकालव सुरू होते. तत्ववेत्त्यांनीं या गोलांटी उडीला 'इतिहासाची पुनरावृत्ति' असें कितीहि गोंडस नांव दिलें, तरी तेवढ्यानें चिकित्सक मनाचें समाधान होत नाहीं. उलट समाधानार्थ पुढें केलेल्या विधानांमुळें त्याच्या 'कां?' कां? ची कावकाव भीमाच्या भुकेप्रमाणें भरंसाट वाढतच जाते.

प्रस्तुत विचार सुचण्याचें कारण नाभा संस्थानच्या लोकप्रिय व स्वदेशाभिमानी अधिपतींचा राज्यसंन्यास हें होय. परवापर्यंत संस्थानबुडव्या लॉर्ड डलहौसीची कारकीर्द म्हणजे भूतकाळच्या इतिहासांतील एक गोष्ट म्हणून समजली जात असे. 'आत्मसंतोषानें, राजीखुषीनें, अक्कलहुषारीनें' लिहून दिलेल्या स्वराज्याच्या राजीनाम्याचा इतिहास महाराष्ट्रात सातारा शहरीं अवघ्या १०० वर्षापूर्वींच घडल्यामुळें, तद्विषयक लोकांची आठवण कितीहि ताजी हिरवीगार असली, तरी तोहि आज 'एक जुनी ऐतिहासिक गोष्ट'च बनलेला आहे. क्रिस्ती मिशनऱ्यांचे गावें प्रांतांतील व मलबारांतील अमानुष

एन ४००६--३६अ

अत्याचार, ब्राह्मणेतरांच्या आंगांवर उकळती तेलें ओतण्याचा पेशवाई वेदोक्त धर्म, ईस्ट इंडिया बनिया कंपनीच्या राजकारणी लांड्यालबाड्या व त्याचें सत्तावनच्या बंडांत झालेलें निश्चित पर्यवसान, इत्यादि गोष्टी वाचून किंवा ऐकून संतप्त झालेलें मन, 'या साऱ्या गतकालच्या गोष्टी! आतां त्यांचें काय आहे? आतां जग बरेंच सुधारलें आहे, या विचारानें शांत होते न होतें, तोंच पंजाबच्या नाभा संस्थानांत सातारच्या छत्रपति प्रतापसिंहाच्या चरित्रेतिहासाची पुनरावृत्ति व्हावी, ही गोष्ट कोणाहि प्रागतिक ठेवणीच्या मनाला निरुत्साही करणारी आहे, यांत शंका नाहीं. राणीच्या जाहीरनाम्यापासून हिंदी संस्थानीक हे जरी सरकारदरबारीं व कागदोपत्रीं साम्राज्यसरकारचे 'जानी दोस्त' म्हणून गणले जातात, तरी त्यांची वास्तवीक स्थिती ताटाखालच्या मांजरांपेक्षां बरीच परतंत्र आहे. ब्रिटीश सिंहांच्या पंजांतलीं नोकरशाही नखें आंत किती जातात व बाहेर किती निघतात, इकडे एकसारखी नजर ठेऊन त्या बिचाऱ्यांना आपल्या हुकमी निष्ठेच्या व प्रेमाच्या भरत्या ओहट्या चटचट पालटाव्या लागतात. ब्रिटीश कॉन्स्टिट्यूशनच्या राजकारणी गिरणींत यच्चावत हिंदी संस्थानिकांचें पीठ पाडून, हिंदुस्थान द्वीपकल्पाचा वा नकाशा आसेतुहिमाचल लालभडक आंग्ल रंगानें रंगवून सोडण्याचा बूट लॉर्ड डलहौसीबरोबरच दफणल्यामुळें खालसांतील लोकशाही जागृत लोकशाही आणि अरेरांवीला सवकलेली नोकरशाही यांच्यामधील झगड्यांतल्या 'बफरा'च्या ठिकाणीं हिंदी संस्थानिकांची सांप्रत झालेली आहे, असें वर्तमान परिस्थितीवरून स्पष्ट दिसून येतें. 'शिवाय नरेंद्रअब्रु-संरक्षण' कायद्यानें तर हा ग्रह विशेषच बळकट केला म्हणावयास हरकत नाहीं. सारांश, ब्रिटिश सरकार आणि संस्थानिक मांजरें यांचें नातें पोट आणि अवयवांपेक्षा अधिक अभेदाचें असतांहि, वर्तमान उत्क्रान्त राजकारणाच्या हंगामात सातारच्या मराठी स्वराज्य-संन्यासाच्या गतेतिहासाचें भूत अचानक पंजाबच्या नाभीकमलांत उपटावें, या चमत्काराच्या मुळांत चमत्कारिक चमत्कार भरले असतील, कोणी सांगावें?

कारणें कांहींहि असोत, त्याची चर्चा करणें आतां बेकायदेशीर ठरलें आहे. परंतु परिणामावरून, नाभाधिपतीच्या पूर्वचरित्रावरून आणि त्यांच्या पदच्युतीनंतर खवळलेल्या त्यांच्या प्रजामतावरून या कारणांची अटकळ न होण्याइतके हिंदी लोक अगदींच कांही जडमूढ दगडधोंडे नव्हत! शेंकडों वृत्रपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या महाराजांच्या राज्यसंन्यासाच्या करुण कहाण्या वाचल्या कीं, हृदय उद्वेगाने भरून येतें. सातारच्या शेवटच्या छत्रपति प्रतापसिंहाच्या उचलबांगडीची संक्षिप्त करूण कहाणी पूर्वी विजयी मराठा पत्रानें व आता स्वाध्याय-संदेश ग्रंथाने महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत नेऊन भिडविली आहेच. त्या कहाणीवर शाहीरांनीं रचलेले पोवाडे सबंध सातारा जिल्ह्यांतल्या आबालवृद्धांना नित्य परिचयाचे होऊन बसले आहेत. वाचकांनीं पुन्हा एकदां तो इतिहास वाचावा आणि नाभाच्या महाराजांच्या राज्यसंन्यासाचा हृदयद्रावक तपशील त्यांशी ताडून पहावा, म्हणजे इतिहासाची ही पुनरावृत्ति किती बालंबाल बिनचुक घडून आली आहे, याचें त्यांना दु:खांतहि कौतुक वाटेल. या नाभा नाटकांत बाळाजीपंत नातू, चिंतामणराव सांगलीकर, बाळकोबा केळकर, अप्पा शिंदकर, सखाराम महाजनी, भाऊ लेले वगैरे स्वराज्यद्रोही प्राचीन पात्रांच्या भूमिका कोणी कोणी घेतलेल्या आहेत, हें आपणासं आज कळणें कठीण आहे. कुछ हर्जा नहिं। काळाच्या पोटांत कांहींहि दडून रहात नसतें. आज नाहीं उद्यां, शंभर वर्षांनीं, केव्हांतरी हीं पात्रें पुराव्यानिशी उकीरड्यावर आल्याशिवाय थोडीच राहतात? आपल्यालाहि आज त्यांच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. हेलेच्या धूमकेतूप्रमाणें इतिहासाची पुनरावृत्ति कशी

होते आणि त्यापासून विचारांना काय वाचा फुटते, एवढेंच वास्तवीक आपणांस पहावयाचें आहे.

प्रसिद्ध झालेल्या हकीगतीवरून एक गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येते कीं, नाभाधिपतीच्या राज्यसंन्यासाला साम्राज्यसरकारच्या दृष्टीनें कोणतीहि 'कॉन्फिडेन्शल' कारणें असलीं, तरी महाराजांचा जाज्वल्य स्वदेशाभिमान अखेर त्यांना भोंवला! ज्या गुणाला इंग्लंडमध्यें 'पेट्रिऑटिझम' म्हणून विशेष किंमत येते, तोच गुण हिंदुस्थानांत पातक म्हणून गणला जातो. जगांत गुलामगिरीच्या खातेऱ्यांत लोळणारीं अनेक राष्ट्रें असतील. किंबहुना असोहि कांही देश किंवा समाज असतील कीं ज्यांची उत्पत्तीहि गुलामगिरींत आणि स्थितीहि गुलामगिरीचीच. असल्या समाजाभोंवतीं स्वातंत्र्याचें वातावरण कितीहि घनदाट घुमत असलें, तरी जन्मत:च त्याचा गंध त्यांना नसल्यामुळें, त्यांच्या स्वातंत्र्यविषयक आकांक्षा फारशा उमलण्याचा संभवच कमी. दुसरे, आयर्लंड सारखे स्वराज्याकांक्षी भांडकुदळ किंवा बंडखोर (?) देश विचारांत घेतले तरी, पूर्वी कधिंकाळी त्यांनीं अर्धवट स्वराज्याचा उपभोग घेतला असला तरी साम्राज्यसत्तेचा त्यांना आजपर्यंत चुकतामाकता स्पर्शहि झालेला दिसत नाहीं. अर्थात् स्वातंत्र्यार्थ चाललेल्या त्यांच्या वर्तमान धडपडींचा मसाला अर्वाचीन वातावरणांत जन्मलेला आहे. हिंदुस्थानची स्थिति अशी नव्हे! धर्मकारण असो, समाजकारण असो किंवा राजकारण असो, त्या सर्वांचें मूळ मायपोट हिंदुस्थान. या सर्व क्षेत्रांत त्यानें गेलीं कित्येक शतकें साम्राज्यसत्ता गाजविलेली आहे. प्राचीन काळचा इतिहास दृष्टिआड केला तरी आम्हीं स्वराज्यपराङ्मुख होऊन बसल्याला कांहीं फार दिवस झाले नाहींत! अहो, काय सांगावें, आमच्या परमप्रिय भारतमातेच्या कपाळावरच्या पुसलेल्या स्वातंत्र्य-तिलकाचा डागसुद्धां अझून बुझालेला नाहीं, तर त्या स्वराज्याचा आमची आठवण कशानें बुझणार आणि कोणता मायचा लेक ती आमच्या हृत्पटलावरून खोडून टाकणार? मायभूमीचें प्रेम, स्वराज्याची लालसा आणि स्वातंत्र्याची आवड या भावना निसर्गदत्त असतात. त्या कोणत्या शिकवणीनें उत्पन्न होत नाहींत किंवा कोणाच्या दटावणीनें दबल्या जात नाहींत. स्वदेश ही चीजच अशी आहे कीं तद्विषयक अभिमान कोणत्याहि शिरजोर सत्तेच्या डुरकणीनें रेसभर वचकणार नाहीं. स्वदेशाभिमानाची ही भावना म्हणजे प्रत्यक्ष ईश्वरी चैतन्याचा स्फुल्लिंग! व्यक्तीं गुलाम झाली किंवा वेळीं फांसावर चढली तरी तिचें हृदय आमरण स्वतंत्रच राहतें. याचें कारण स्वातंत्र्याचा ईश्वरी ठेवा. प्रत्येक व्यक्तिमात्राच्या अंतर्यामीं घमघमत असतो. म्हणूनच तत्वज्ञानी जन वारंवार सांगत असतात कीं स्वातंत्र्याचें आद्यबीज 'तुझें आहे तुजपाशीं । परि तूं जागा चुकलाशी' आणि ही जागा म्हणजे प्रत्येकाचें हृदय. स्वदेशाभिमानाचा दर्या हृदयांत अपरंपार खवळल्याशिवाय माणूस माणुसकीला पात्र ठरत नाहीं आणि राष्ट्रोद्धाराचीं जगड्व्याळ कार्यहि त्याच्या हातून घडत नाहींत. हिंदवी स्वराज्याचा पाया प्रथम शिवरायाच्या हृदयांत पडला आणि मग त्याचा प्रतिध्वनि सह्याद्रीच्या आसमंतांत प्रत्यक्ष उमटला. प्रत्येक स्वराज्य-संस्थापकाची हीच स्थिति, मग तो विल्यम घी काँकरर असो, हँडपन असो, क्रॉमवेल असो, जॉर्ज वॉशिंग्टन असो, बाबर असो, हैदरअल्ली असो, किंवा पंजाबचा सिंह राणा रणजितसिंग असो. स्वातंत्र्याचे हे स्वयंभू प्रणेते स्वत:च्या सर्वस्वावर तुळशीपत्र ठेवतात आणि आपल्या हृदयाचा कोट फोडून स्वदेशाभिमानाच्या उसळत्या गंगेला दाही दिशा मनमुराद मोकळी सोडतात. राष्ट्रांतील व्यक्तिमात्राच्या हृत्प्रदेशीं या रोंरावत भरधांव सुटलेल्या गंगा जलाचा एक शिंतोडा पडतांच सारें राष्ट्र चैतन्यपूर्ण होतें. अशा अवस्थेंत स्वराज्य स्वराज्य म्हणजे केवळ एका फुंकराचा परिणाम बनल्यास त्यांत आश्चर्य तें कसलें? अर्थात्

स्वदेशाभिमान ही चीज प्रस्तुतच्या हिंदुस्थानांत महापातकांच्या सदरांत पडलेली आढळल्यास, इतर कोणास नवल वाटलें तरी, आम्हांला वाटणार नाही.

पंजाबांत अकाली शिखांची एक विशिष्ट प्रकारची चळवळ जन्माला आलेली आहे, आणि ती 'राजद्रोही' आहे, असा सरकारचा तीव्र आक्षेप असल्याचें ऐकतों. इतकेंच नव्हे, तर त्या चळवळीचा म्होरक्या करमसिंग याला नुकतांच गोळी घालून ठार मारला व त्याच्या साथीदारांना पकडण्यांत आलें आहे. आम्हीं या चळवळीच्या तपशीलाचा अझून मुळींच काहीं अभ्यास केलेला नाहीं; तेव्हां त्याबद्दल एक अक्षरहि उच्चारण्याचा आम्हाला अधिकार नाहीं. फक्त इतिहासाची पुनरावृत्ति कशी होत आहे, एवढेंच त्रयस्थ प्रेक्षकांच्या दृष्टीनें पाहणें आहे. नाभाच्या महाराजांचा या अकाली चळवळींशीं संबंध आहे, असें प्रसिद्ध झालें आहे. महाराजांनीं साम्राज्य सरकारला गेल्या महायुद्धांत आत्मस्फूर्तीनें केलेली करोडों रुपयांची व इतर युद्धविषयक साहित्याची मदत विचारांत घेतली, तर त्यांच्यावर आलेला प्रस्तुतचा राजद्रोहाचा आरोप म्हणजे इतिहासाच्या पुनरावृत्तीइतका किंवा ब्रह्म-मायेच्या जादूइतकाच गौडबंगाली वाटल्याशिवाय रहात नाही. सातारच्या प्रतापसिंह छत्रपतीची व बनिया कंपनीची दोस्ती अशीच जीवश्च कण्ठश्च होती. अलपिष्टणासारख्याची त्या वेळची नुसती धूळभेटीची सरबराई म्हणजे आजच्या बड्या लाटसाहेबांचा बडा खानाच म्हटला तरी चालेल पण छत्रपतींनी ब्राह्मणेतरांच्या सामाजीक व धार्मिक स्वातंत्र्याच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न हातीं घेतला. त्यामुळें भिक्षुकशाहीच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. अखेर बनिया कंपनीचे बूट चघळून महाराष्ट्रीय ब्रह्मवृंदानें छत्रपतीवर राजद्रोहाचा आरोप सिद्ध करविला, त्यांचें नाभाधिपतीप्रमाणेंच उच्चाटन केलें आणि हिंदवी स्वराज्याचा खून पाडून आपलें वेदोक्त कारस्थान यशस्वी केलें! या गोष्टीला जवळजवळ शंभर वर्षे होत आलीं. एवढ्या काळांत मानवांशीं प्रगमनशीलतेंत केवढी लांबवर भरारी मारली. तरी देखिल 'येरे माझ्या मागल्या' या म्हणीप्रमाणें मानवी स्वार्थबुद्धीनें आणि सत्तामदानें जुन्या बड्याची पुन्हां तंतोंतंत घोटाळणी करण्यास प्रवृत्त व्हावें, ही काळाची करणी कीं करणीचा काळ? प्रस्तुतच्या नाभा प्रकरणाच्या खऱ्या खोट्या बाजू कांहींहि असोत, बरोबर शंभर वर्षांनी घडून आलेली ही इतिहासाची पुनरावृत्ति विचारशील मनाला अनेक सनातन तत्वांची ओळख पटविण्यासाठींच आहे, यांत कांहीं संदेह नाहीं.

□□□

अग्रलेख

सार्वजनिक धंद्यांचें आणि व्यवसायांचें अमेरिकन आचार-नीतिशास्त्र

शास्त्रीय शोध आणि यांत्रिक प्रगति या गोष्टींना इतर सर्व गोष्टींप्रमाणेंच बरी आणि वाईट अशा दोन बाजू आहेत. प्रत्येक गोष्ट अथवा स्थिति कांहीं उत्तम व उपयुक्त गुणांबरोबरच बऱ्याच अवगुणांचीहि द्योतक ठरते. सर्वगुणसंपन्न आणि अवगुणविरहित असा मनुष्यप्राणी जसा कधींच सांपडणें शक्य नाहीं, तद्वतच दोष नाहीं असा शोध, सुधारणा किंवा कसलीहि वस्तु या जगांत आढळावयाची नाहीं. मानवांची जन्मजात प्रगमनशीलता दोषांचें परिमार्जन करून, निर्दोष सद्गुणांची व सदुपयुक्ततेची परमावधि साधण्याची शिकस्त करीतच असते. परंतु प्रत्येक अधिभौतिक सुधारणांकडे दोषैकदृष्टीनें पहाण्याचीच ज्यांची प्रवृत्ति, त्यांच्या स्वभावाला औषधच नाहीं. टेलीग्राफीची संदेशवाहिनी तीव्र शक्ति मानवांच्या संसारांत किती तरी सदुपयोगी ठरली आहे. परंतु हेंच तारायंत्र वेळीं सत्ताधीशांच्या हातीं प्रजेची मुस्कटदाबी करणारें बिनमोल शस्त्र ठरतें. जी सुरी बंदिवानाचे बंद तोडून त्याला बंधमुक्त करूं शकते, तीच वाटेल त्याची मान कापण्यास बिनशर्त कामीं येते. ही उपयोग दुरुपयोगाची शक्यता प्रत्येक ऐहिक वस्तुजाताच्या नशिबीं लागलेलीच आहे. शास्त्रीय शोधांनीं आणि यांत्रिक प्रगतीनें मानवी संसारांत कृत्रिमपणाचा रोग फैलावून त्याला निसर्गाशीं पारखा केला आहे, हा आरोप जितका खरा आहे, त्यापेक्षां त्यांनीं मानवांच्या वाढत्या आकांक्षा उचलून धरून, त्यांच्या सौख्यसाधनांची समृद्धी सहजसिद्ध व सहजसुलभ करण्याचा चंग बांधला आहे-नव्हे, त्यांत बहुतेक पूर्ण यश मिळविलें आहे, ही गोष्ट शतपट खरी आहे. ज्यांचें हृदय वैराग्य व आत्मत्याग यांनी चिंब भिजून, डोळ्यांवर नैराश्यवादाची बुरशी चढलेली आहे, त्यांच्याकरितां या शास्त्रीय शोधांनीं व यांत्रिक प्रगतीनें मुळींच जन्म घेतलेला नाहीं. ते संसारीं कर्मयोग्यांसाठीं आहेत; त्रागेखोर उदास संन्याशांकरितां नव्हतं. संन्याशांसाठीं निर्जन अरण्यें आणि ओसाड गुहा जगाच्या सात अष्टमांश भागावर अझून सताड मोकळ्या पडलेल्या आहेत. त्यांनी तिकडे खुशाल आपल्या वसाहती स्थापन कराव्या.

शास्त्रीय शोध जसजसे लागत गेले व जात आहेत तसतसे नवीन निरनिराळे धंदे व व्यवसाय जन्माला आले व येत आहेत. घड्याळांची कल्पनाच जोंवर नव्हती, तोंवर घड्याळजीचा धंदा काळाच्या गर्भातच दडून होता. मोटारनें आपल्या अवताराचें शिंग फुकतांच, मोटर एंजिनिअर्सचा धंदा दत्त म्हणून उभा

ठाकला. घरोघरीं बोकाळलेल्या आणि एका म्हणीच्या स्वरूपांत स्मारक झालेल्या मातीच्या चुलींची उचलबांगडी करणारी स्टव्ह फोंफों करीत स्वयंपाक गृहांत शिरतांच, स्टव्हरिपेरीवाल्यांनीं बाजार फुलून गेला. हिंदुस्थानांत अंधश्रद्ध दैववादी कपाळकरंट्यांची लोकसंख्या जबरदस्त आहे, म्हणूनच कामधेनु ताईतवाल्यांचीं उखळें पांढरीं होत आहेत. शिक्षणसंस्कारानें लोकजागृतीचा ज्वालामुखी धुमसूं लागतांच, त्याच्या आत्मतेजाचा उपयोग मानवतेच्या कल्याणाकरितां व्हावा, त्यांत एकसूत्रीपणा असावा, आणि इतर सर्व सामर्थ्याची व शक्तीची माता जी मानवी मनोवृत्ति ती देखिल विवक्षित पद्धतीनें नियंत्रित करावी, या कल्पनेच्या पोटींच वर्तमानपत्रांचा व ग्रंथांचा उदय झाला. निसर्गाच्या आचार-स्मृतीचे निर्बंध जाणूनबुजून किंवा चुकून माकून अवमानिल्यामुळें खवळलेल्या रोगांच्या टोळधाडीपासून प्राणीमात्रांचा बचाव करण्यासाठीं वैद्यकशास्त्रानें आपली धन्वंतरी ढाल पुढें करतांच वैद्यराजांची संस्था अस्तित्वांत आली आणि वाढत्यां शोधांच्या आधुनिक प्रवाहांतच वैद्यबुवांचें आयुर्वेदी भस्म धुतलें जाऊन, त्यांचा थर्मामीटर स्टेथॉस्कोपवाला डॉक्टर बनला आहे. केवळ आपल्या हिंदुस्थानापुरतेंच बोलावयाचें तर सुधारणारत प्रागतिक पाश्चिमात्यांच्या निकट संसर्गानें व विचारविनिमयानें शंभर वर्षांपूर्वी आपल्या सोंवळ्या व शूचिर्भूत हिंदु कल्पनेला कधींहि न शिवलेल्या शेंकडों आधिभौतिक सुधारणा व तज्जन्न धंदेवाईक व व्यवसायी लोक यांची सर्वत्र गचडीच गचडी उडालेली आहे. आपल्या वेदांत आगगाड्या तारायंत्रें, मोटारीचें वंगण, पियर्स सोपच्या वड्या, राकेल तेल वगैरे जिनसा खचून भरल्याचें वेदांती लोक सांगतात. सर्वांभूतीं आत्मा पहाणाऱ्या मंडळींना वेदांत तरी या गोष्टी का दिसूं नयेत? एवढी गोष्ट मात्र खरी कीं या सर्व पाश्चिमात्य सुधारणा आमच्यावर लादल्या गेल्या आहेत. दूरदर्शीपणानें किंवा प्रगमनशीलतेच्या आत्मस्फूर्तीनें आम्हीं त्यांचा स्वीकार केलेला नाही. अशा या बळजबरीच्या मामल्याच्या देशांत जर या निरनिराळ्या अर्वाचीन धंद्यांची व व्यवसायांची गचडी, तर खुद्द त्यांच्या जन्मभूमींत यांची केवढी दाटी असेल याची कल्पना करायला खुशाल त्रयराशिक मांडून पहावें. कोणत्याहि व्यवसायाचीं व धंद्यांची मूलतत्वे अत्यंत पवित्र व उदार भावनेचीच असतात. पण त्यांच्या वाढीबरोबरच त्या भावनेचा खून पाडणारे दोष उघडमाथ्यानें त्यांत घुसतात. इतकेंच नव्हे, तर त्या धंद्यालाच माणसाचें पोट येऊन चिकटलें कीं मग मात्र अनवस्था प्रसंग गुदरतो! वैद्यकीय जन्म किती परोपकारी व दयामय भावनेंतून झाला आहे बरें? पण व्हिजिट-फीची जाडजूड रक्कम आधीं हातांत पडल्याशिवाय रोग्याकडे ढुंकून न पाहाणारे व छोट्या बड्या पैदाशीच्या प्रमाणावर औषधयोजनेची छोटीबडी बरदास्त ठेवणारे पाजी डॉक्टर नरपशू व्यवहारांत आपणांस आढळतातच ना? जी गोष्ट डॉक्टरांची तीच वकिलांची. वर्तमानपत्रांचा उद्देश व त्यांच्या संपादकांवर असलेली जबाबदारी, या बाबतींतहि असाच शुद्ध हेतूंचा विपर्यास किती होत असतो आणि मानवी स्वार्थी प्रवृत्ति धंदेगिरीच्या बेताल मदानें बेफाम होऊन, अखेर त्या उच्च भावनांची माती कशी करते, हें पहाण्यास महाराष्ट्रांत रगड दाखले मिळतील. इतर चळवळींचीं क्षेत्रें सोंडलीं आणि एकट्या वर्तमानपत्राचेंच क्षेत्र घेतलें, तरी त्यांच्या धंदेगिरीला व भ्रष्ट नीतीला आळा घालण्याचा प्रश्न अलीकडे पुष्कळांच्या मनांत उद्भवूं लागला आहे. ज्याच्या हातांत शिकार तो पारधी, या लौकिकी म्हणीप्रमाणें ज्याच्या हातीं वर्तमानपत्र तो दे. भ., विद्वत्तेचा अर्क, लोकाग्रणी अशा सांचेवजा वेडगळ कल्पनांचा फैलावा झाल्यामुळें, लोकमत नियंत्रणाच्या या पवित्र क्षेत्रांत शेंकडों अनधिकाऱ्यांचा सुळसुळाट उडाला आहे व त्याचीं कटु फळें सहनशील हिंदी जनता बिनबोभाट

चाखीत आहे. सहनशीलतेलाहि कांहीं मर्यादा ही असणारच; आणि कोणताहि धंदा अगर व्यवसाय आपल्या उत्पत्तिकाळच्या उच्चध्येयापासून परङ्मुख होत चालला कीं त्याला पायबेडी चढविण्यासाठीं दुसऱ्या एखाद्या नियंत्रित शक्तीची आराधना करावयाला मानव उद्युक्त होतोच होतो. सारांश, मानवी उत्क्रांतीचें उच्च ध्येय साधण्यासाठीं मानव एखादी शक्ति निर्माण करतो, आणि ती त्याच्या काबूंतून निसटून बेताल बनूं लागली कीं तिची नांगी मोडण्यासाठीं तोच दुसऱ्या प्रतिशक्तीला प्रसवतो, हा एक सनातन नियम दिसतो.

अमेरिका म्हणजे प्रगमनशीलतेचें मोहरघर. कल्पकतेच्या बाबतींत अमेरिकेनें ब्रिटीश सिंहाची व जर्मन गरुडाची पुरी खोड मोडलेली आहे. अशा या सुधारक अमेरिकेनें निरनिराळ्या धंद्यांना व व्यवसायांना ताळेबंद नीतिरत ठेवण्याची एक मोठी चळवळ सुरू केली असून, अमेरिकन ॲकॅडमी ऑफ पोलिटिकल अँड सोशल सायन्स नामक संस्थेनें या चळवळीची धुरा पत्करली आहे. या संस्थेचा पत्ता 39th Street and woodland avenue, philadelphia असा आहे. सन १९१९ सालीं डिट्रॉय येथें इन्टरप्रोफेशनल कॉन्फरन्स भरली होती. तिच्या ठरावाप्रमाणें सर्व प्रकारच्या धंदेवाल्यांची एक व्यवस्थित कमिटी स्थापन झाली असून, त्यांच्या द्वारें एका नवीन स्मृतिशास्त्राची रचना करण्यांत आलेली आहे. त्याची तपशीलवार माहिती प्रस्तुत ॲकॅडमीच्या 'धी ॲनल्स' नामक मासिकाच्या १९२२ मेच्या अंकांत आलेली आहे. संपादक मि. क्लाइड एल् किंग् यांच्या या आधुनिक स्मृतिशास्त्राच्या प्रस्तावनेचा सारांश प्रबोधनाच्या प्रिय वाचकांच्या सेवेला आज रुजूं होत आहे.

''सामाजिक निर्बंधाचें योग्य रीतीनें परिपालन होण्यासाठीं आचारधर्माचें कांहीं तरी स्मृतिशास्त्र आवश्यक आहे. हल्लीं प्रत्येक धंद्याचा आणि व्यवसायाचा असा कांहीं सांवळा गोंधळ उडाला आहे कीं अमुक एका धंदेवाल्यानें केलेला धंदा लोकहिताच्या व्यापक दृष्टीनें, निदान त्याच्या गिऱ्हाइकाच्या हिताच्या दृष्टीनें योग्य केला कीं अयोग्य केला, हें अजमाऊन पहाण्याचें जनतेपाशीं मुळींच कांहीं साधन नाहीं. प्रत्येक धंद्यांतल्या दोष दाखविणें फार सोपें आहे. पण त्या दोषांची योग्य छाननी करण्यासाठीं, वैद्याची बिंगें वैद्यच सांगे आणि वकिलाचा कावा वकिलासच ठावा, या न्यायाची कांस धरली पाहिजे. धंदा जितका श्रेष्ठ प्रतीचा, तितक्या जोराचा संघटित प्रयत्न करून, केवळ समव्यवसायी एकमेकांशीं कसें वागतात एवढेंच पाहून भागावयाचें नाहीं, तर त्या धंद्याच्या पद्धतीचा अखिल मानवसमाजाच्या अभ्युदयार्थ काय परिणाम होंत आहे. हें पहाण्याची लोकांत जिज्ञासा उत्पन्न केली पाहिजे. प्रत्येक धंद्याचें ध्येय नुसतें गाडाभर पैसे कमविणें हें नाहीं; त्यामुळें जनसेवा किती घडली हेंच पाहिलें पाहिजे. एखाद्या धंद्यामुळें सामाजिक अनहित होत आहे, असें दृष्टोत्पत्तीस येताच त्या धंदेवाल्याला उखडून टाकण्याचा जनतेकडून संघटित प्रयत्न झाला पाहिजे. प्रत्येक धंद्याची विधायक ध्येयदृष्टी जनतेचें सुख हीच असली पाहिजे. प्रत्येकानें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं मी जो धंदा किंवा व्यवसाय करित आहे, त्याचा पाया पूर्वी युगानुयुगें शास्त्रसेवा केलेल्या असंख्य पूर्वजांच्या श्रमांवरच उभारलेला आहे. अगदीं परवांपर्यंत तरी व्यापारधंदा म्हणजे निवळ स्वतांचें पोट भरण्याचें साधनच समजलें जात असे. धंद्याचें नीतिशास्त्र म्हणजे शुद्ध व्यापारी देवघेव- मग ती कशी कां होईना! विकणारानें वाटेल तसें विकावें, गिऱ्हाइकानें परवडेल तर घ्यावें. पण आतां आधुनिक वहातुकीच्या साधनांनीं हा मनु साफ बदलला आहे. कॅलिफोर्नियाची नारिंगें फिलाडेलफियाचें मार्केट पहातात, तर डिट्रॉयच्या मोटर गाड्या

अखिल पौर्वात्यखंडांत विकल्या जातात. जाहिरातींच्या द्वारें वाटेल तो कारखानादार आपला माल वाटेल त्या अनोळखी गिऱ्हाइकाला विकूं शकतो. या टेलिफोनच्या मनूंत सौदाविक्रीची कंत्राटेंसुद्धां एकमेकांचें तोंड न पाहतां नुसत्या तोंडच्या शब्दानें ठरली जातात. वस्तु तयार होण्याच्या पूर्वीच तिच्या किंमती आगाऊ जाहीर कराव्या लागतात. सारांश सर्व व्यापार आज माणसाच्या विश्वासावर चालला आहे. 'बोललेली जबान लिहिलेल्या दस्ताऐवजाइतकीच कायम' या जुन्या म्हणीला आतां नवीन स्वरूप आलेलें आहे. भावाच्या विलक्षण चढपडीमुळें नुकत्याच उडालेल्या हजारों ठरलेल्या कंत्राटांच्या धडपडीनें व्यापारी क्षेत्रांत पतीची म्हणजे विश्वासाची अत्यंत जरूरी भासूं लागली. यावेळीं माणसाची जबान किती कवडीमोल आहे. याचा सर्व व्यापारी वर्गाला चांगलाच कटू अनुभव आला. आजच्या अर्वाचीन व्यापारांत विश्वासाला फार महत्त्व आलें आहे. सन १९२० सालीं अमेरिकन व्यापाराची जी भयंकर कुचंबणा झाली त्याला कारण व्यापारी लोकांची जबान खोटी हें होय. आजच्या व्यापाराचें क्षेत्र प्रामाणिक विश्वासाच्या जोरावर दाहींदिशांना विस्तृत पसरलेलें आहे. आणि प्रत्येक धंदेवाला जर जनहिताच्या व्यापक दृष्टीनें आपल्या धंद्याचें पावित्र कायम ठेवील तर जगाच्या सौख्य व शांतीच्या कल्पना प्रत्यक्ष फलद्रुप होण्यास त्यामुळें पुष्कळच साहाय्य होईल.''

वरील उद्गारावरून अमेरिकेंत चाललेल्या एका विशिष्ट चळवळीची वाचकांस बरीच कल्पना येईल अशी आशा आहे. या चळवळींत सर्व प्रकारच्या धंदेवाईकांनी मोठ्या ईर्षेनें भाग घेतलेला आहे. आणि प्रत्येक धंद्याच्या व व्यवसायाच्या आचारधर्माचे त्यांनीं ठरविलेले नियम जसे विचारार्ह आहेत तसेच अनुकरणीयहि आहेत. त्यांचा थोडथोडा परिचय यथावकाश वाचकांना श्रुत करण्यांत येईल, येवढें सांगून प्रबोधनाच्या दुसऱ्या वर्षाच्या कामगिरीचें भरतवाक्य करतों आणि तिसऱ्या वर्षाचा विजयादशमीचा पहिला अंक स्वत:च्या स्वतंत्र मुद्रणालयांत मुद्रीत करण्याच्या खटपटीस लागतों.

□□□

पुस्तक परिचय

कलमबहाद्दरास शेलापागोटें

अभिनव-प्रभु-रत्न-माला

पुष्प दुसरें। राममारुती महाराज - ओवीबद्ध-चरित्रें । हरी रामचंद्र पाठक करें । लिहोनी पूर्ण जाहजें ।। १ ।। भास्करराव ताम्हणे प्रस्तावना-लेखक । सरस्वती मुद्रणालयाचे घवगे मुद्रक । विनायक सिताराम जयवंत प्रकाशक । छापून प्रसिद्ध केलें पैं ।। २ ।। यावरी अभिप्राय काय द्यावा । द्यावा किंवा न द्यावा । दिल्यास तो कसा असावा । हें न कळे आम्हांसी ।। ३ ।। पुस्तकाची पृष्टें ऐंशी पुरती । ओवीबद्ध चरित्र आणि आरती । महाराजांचें छायाचित्र वरती । चार आण्यांत मिळतसे ।। ४ ।। कागद आहे आपला असाच । छपाईही नाहीं विशेष । परी पुस्तकाचा आकार असे साच । छोटा आणि सुंदर ।। ५ ।। संतलीलामृतपद्धतीनें । चरित्र लिहिलें लेखकानें । भक्तांनी वाचल्यास भक्तीनें । खास जातील गुरुलोका ।। ६ ।। भाषा किंवा काव्यशक्ती ।। याची लेखकास दिसे विरक्ती । म्हणोनी भाषाभिज्ञांप्रती । निरुपयोगी झालेंसे ।। ७ ।। तरी वाचका तुजलागुन । तारानाथ सांगे प्रमाण । असलास जरी सुजाण । चार आणे वांचवावे ।। ८ ।।

□□□

निवेदन

हे पुष्प देवा तुजला वहातों

योगक्षेमं वहाम्यहम्

परमेश्वरानें दिलेल्या बुद्धीचा व लेखनसामर्थ्याचा उपयोग यथाशक्ति व यथामति जनजागृतीसाठीं करावा, खऱ्याखुऱ्या हिंदी राष्ट्रीय विकासाला सहायभूत होणाऱ्या चिकित्सक व सूक्ष्मान्वेषी विचार शीलतेचा सर्वत्र प्रसार करावा आणि मोठमोठ्या राष्ट्रसेवक ऐरावतांच्या पाठोपाठच क्षुल्लक कीटकानेंहि आपल्या अल्प सामर्थ्यानुसार आपल्या देशाच्या वर्तमान प्रबोधनांत भाग घ्यावा, या सदिच्छेनें दोन वर्षांपूर्वी या दुबळ्या जनसेवकांने हातीं लेखणी घेतली व प्रबोधनद्वारा जनसेवेचा श्रीगणेशा काढला. कोणत्याहि पक्षाचा अथवा संप्रदायाचा हातांत गंडा नाहीं, धंद्याच्या दृष्टींनें आवश्यक लागणाऱ्या सांपत्तिक सहायाची सोय नाहीं, पक्षभेद व जातिभेद यांतच गुरफटलेल्या परंतु नि:संशय विद्वान् अशा देशबांधवांची आमच्या निश्चित मतांविषयीं सहानुभूति नाहीं, किंवा प्रबोधनाच्या कार्यांत प्रत्यक्ष सहाय्य देणारा एकहि मित्र किंवा आप्तेष्ट जवळ नाहीं, अशा चमत्कारीक परिस्थितींत, केवळ कार्याची आवड एवढ्याच भांडवलावर, या पामरानें हातीं धरलेली लेखणी ज्या भगवान श्रीकृष्णानें सतत दोन वर्षे नियमितपणें सेवारत ठेवली, त्या परमात्म्याची लीला आणि मातृवात्सल्यवत् प्रेमा कोणत्या शब्दानें व्यक्त करावा? जो मूळचाच अवर्णनीय, त्याचें वर्णन कोणी करावें? त्या दयासागर चिच्छक्तीला अनन्यभावें साष्टांग प्रणिपात असोत. देवा, अशक्य गोष्टी तुझ्याच कृपेनें शक्य झाल्या. जनतेच्या मनिंमुखी उभा राहून, तिच्या करवीं प्रबोधनाला आपल्या स्वतंत्र विचारसरणीचा संदेश महाराष्ट्रांत चौफेर नेऊन भिडविण्याचें सामर्थ्य, देवा, तूंच देऊन आपल्या जनार्दन नावाची सार्थकता केलीस. गेले सालीं आधिभौतिक अनेक तापसहस्रांनीं प्रबोधनकारावर हल्ला केला. स्वावलंबनाचें निर्दय तप आचरीत असतांना, अनेक वेळां ब्रीदाचीहि कसोटी लागली. दोन तीन वेळां प्राणान्तिक अवस्थेचीं गंडांतरें आलीं. ऑगष्टच्या ९ तारखेला हा तुझा दुबळा सेवक प्रत्यक्ष मृत्यूच्या जबड्यांतच तब्बल १२ तास धडपडत होता. अशी संकटपरंपरेची कहाणी कोठवर लांबवावी? या सर्व प्रसंगीं, भगवंता, तुझ्या प्रेमळ कृपाकटाक्षानें वेळोवेळीं कल्पनातींत घटनेनें त्या नानाविध संकटांचा फडशा पडला, आणि प्रबोधनाचा दुसऱ्या वर्षाचा प्रवास यशस्वी झाला. गेलें दुसरें वर्ष प्रबोधनाला जसें अत्यंत आणिबाणीचें गेलें, तसेंच

त्याच्या कार्याच्या व प्रसाराच्या बाबतींत तें अत्यंत आशाजनक उत्तेजनाचेंहि झालें. इतर सर्व वर्तमानपत्रांपेक्षां प्रबोधनाची कार्यपद्धति व मतें हीं अगदींच भिन्न असल्यामुळें; लोकाभिरुचीला निराळेंच विचारक्षम वळण देण्याचें काम रोठ्या सुपारीपेक्षांहि कठीण आहे. असल्यास नवल नाहीं. परंतु पहिल्या वर्षांप्रमाणें या दुसऱ्याहि वर्षी महाराष्ट्रीय जनतेनें प्रबोधनाच्या कार्यशैलीची व विचारसरणीची मान्यता दर्शविणारी शेंकडों उत्तेजनपर पत्रें पाठवून, त्याला आपल्या उदार आश्रयानें उपकृत करून ठेविलें आहे. अनेक वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध सज्जन अभेद भावानें प्रबोधनाच्या कार्यक्रमाकडे लक्ष पुरवूं लागले आहेत. पूर्वी प्रबोधनाला बाचकणारे किंवा त्याविषयीं शंका कुशंकांनीं ग्रस्त असलेले स्वाध्यायशील तरुण विद्यार्थी व पदवीधर आतां त्याच्या कार्याची धुरा प्रत्यक्ष वाहण्यासाठीं अहमहमिकेंने पुढें आले आहेत. खेड्यापाड्यांतले बांधवसुद्धां प्रबोधनावर एवढें अकृत्रिम प्रेम ठेवीत असतात कीं कांहीं कारणांमुळें प्रबोधनाच्या हजेरीला एकदोन दिवस उशीर लागतांच, 'प्रबोधन केव्हां निघणार? त्या पृच्छेच्या पत्रांचें टपाल सारखें सुरूं होतें. ज्या ज्या उदारधी गृहस्थांनीं आत्मस्फूर्तीनें रोख रकमा पाठऊन किंवा कॉलेजें व मोफत वाचनालयांसाठीं वर्गण्या भरून प्रबोधनाला सक्रीय उत्तेजन दिलें, त्यांचे आभार शब्दातीत आहेत. सारांश प्रबोधनावर अप्रत्यक्ष व त्याच्या संपादकावर प्रत्यक्ष जरी अनेक संकटांनी गेल्या वर्षी शेंकडों प्राणघातक हल्ले चढविले, तरी जनतारूप जनार्दनाच्या अकृत्रिम उदार मनोभावनेमुळेंच, ही सेवापुण्याची २४ वी पाकळी, त्याच्या चरणीं प्रणिपातपूर्वक वाहून, तिसऱ्या वर्षाच्या कार्यक्षेत्रांत तो मोठ्या उमेदीने व आनंदानें प्रवेश करीत आहे. सर्व सज्जन आश्रयदात्यांनीं प्रबोधनावर शुक्लेंदुवत् प्रेमाची पांखर घालून, त्याची वेडीवांकडी सेवा व बोबडे बोल गोड मानून घ्यावे, अशी विनयपूर्वक प्रार्थना आहे.

प्रबोधनाचें स्थलांतर

Our happiness is in the power ofone, Who can bring it about a thousand unforeseen ways, that mock our foresight. (भावार्थ : आपल्या सुखाची सर्व सूत्रें परमेश्वराधीन असतात; आणि हीं सुखें तो अशा कांहीं अघटित घटनेनें घडवून आणतो, कीं त्यापुढें आम्हा मानवांचा दूरदर्शीपणा वायफळ ठरतो.) ही गोल्डस्मिथच्या व्हिकार ऑफ वेकफील्डची उक्ती आहे. आमच्या जीवनक्रमांत या 'अघटित घटने'चा अनुभव घेण्याचे आजपर्यंत शेंकडों अनुभव आले व पुढें येतील. मनुष्यानें विहित कर्म निर्हेतुक बुद्धीनें परंतु कुशलतेनें आचरावें आणि यशापयशाचा प्रश्न परमेश्वरावर सोपवावा. भगवद्गीतेच्या कर्मयोगशास्त्राचा हाच सिद्धांत आहे. प्रबोधनाची प्रिय जन्मभूती दादर. तेथून त्याचें सातारारोडवर प्रयाण होणें; तेथें त्याच्या तिसऱ्या वर्षाचा कार्यक्रम वाढत्या प्रमाणांत, इंग्रजी व मराठी या दोन भाषांत, स्वतंत्र छापखान्याच्याद्वारें सुरू होणें आणि महाराष्ट्राच्या नाजूक केंद्रस्थानीं प्रबोधनाची मुख्य कचेरी स्थापन होणे, ही सर्व अक्षरश: अकल्पित घटना, अवघ्या ३० मिनिटांच्या आंत जुळून आली, याचें आमच्याप्रमाणेंच आमच्या आश्रयदात्यांनाहि आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. हा परमेश्वरी योगायोग नव्हे तर काय? हा कसा घडून आला, हे आम्हाला एक कोडें पडले आहे. पण तो आज प्रत्यक्ष घडला आहे, ही गोष्ट मात्र खरी. आम्हीं स्वत: सप्टेंबरच्या पहिल्याच आठवड्यांत सातारा रोड (पाडळी व्हिलेज) येथें येऊन झालों व छापखान्याच्या मांडामांडीला लागलों. प्रबोधनाचा पुढचा (३ वर्षाचा १ ला) अंक आमच्या सातारा प्रिंटिंग वर्क्समध्ये प्रसिद्ध होईल. आमच्या आश्रयदात्यांनीं यापुढें पत्रव्यवहार करतांना कृपा करून खालील दोन गोष्टीकडे अवश्य लक्ष द्यावें. (१) फक्त प्रबोधन

पाक्षिकाबद्दलचा सर्व प्रकारचा पत्रव्यवहार, लेख, वर्गण्या वगैरे व्यवस्थापक प्रबोधन कचेरी, सातारा रोड, या पत्त्यावर पाठविणें; आणि (२) आमच्या ग्रंथांच्या मागणीबद्दल किंवा तद्विषयक पत्रव्यवहार व्यवस्थापक, प्रबोधन (मुंबई शाखा) कचेरी, २० मिरांडाची चाळ, दादर. मुंबई नं. १४ या पत्त्यावर पाठविणें. दादर कचेरींत प्रबोधन पाक्षिकाबद्दल किंवा सातारा रोड कचेरींत आमच्या ग्रंथांबद्दल, असा उलट पत्रव्यवहार होऊं न देण्याची कृपा करून खबरदारी घ्यावी, अशी विनंती आहे.

तिसऱ्या वर्षाची सुधारणा

छापखान्याची नीट व्यवस्थित मांडणी व्हायला अझूनहि एक महिना लागेल. तथापि पहिला सोळा पानी अंक नियमीत दसऱ्याच्या दिवशीं आश्रयदात्यांच्या चरणसेवेला रुजूं होईल. प्रबोधनद्वारा जनसेवा करण्यासाठीं अनेक विचारी व विद्वान लेखक स्वयंसेवेच्या स्फूर्तीनें पुढें आले आहेत. प्रबोधनामध्ये काही थोडा इंग्रजी मजकूर असल्यास विचारविनिमयाचें क्षेत्र बरेंच विस्तृत होईल, अशा पुष्कळांच्या सूचना आल्यामुळे ती योजना पुढील अंकापासून अंमलांत आणण्याचें योजिलें आहे. या शिवाय मराठी कालमांत अनेक उपयुक्त व विचार क्रांतीकारक लेखांची चित्ताकर्षक निवड व मांडणी करून, प्रबोधनाची उपयुक्तता व आवश्यकता वृद्धिंगत करण्याचा कसोशीचा यत्न करण्यांत येईल. या वाढत्या व्यापामुळें वर्गणीचीहि भूक थोडीशी वाढल्यास आमचे रसिक आश्रयदाते रागावणार नाहींत, अशी आशा आहे. नवीन वर्षापासून प्रबोधनाची वर्गणी ट. हां. सह फक्त तीन रुपये ठरविली आहे. तरी सर्व आश्रयदात्यांनी ती पहिला अंक हातीं मिळतांच मनिऑर्डरीनें पाठविण्याची करावी, अशी प्रार्थना आहे.

दादरकरांचा निरोप

दादर ही प्रबोधनाची जन्मभूमि. आमचीहि दादरास १३ वर्षे वस्ति. त्यामुळें दादरविषयीं निसर्गत:च आम्हांला एक प्रकारचें प्रेम व अभिमान वाटत आहे. व्यवहारपरत्वें आम्ही या पुढें कोठेंहि असलों तरी 'माझें दादर' ही प्रेमाची भावना आमच्या मृत्यूपळापर्यंत रतिमात्र कमी होणार नाहीं. तेथील अनेक सार्वजनिक संस्थांशीं व व्यक्तींशीं आमचा अत्यंत जिव्हाळ्याचा ऋणानुबंध आहे. अनेक सर्वजातीय प्रियमित्र पाठच्या भावांपेक्षाहि ठाकरे व्यक्तीसाठी जिवास जीव देणारे आहेत. आम्हांवर व आमच्या कार्यांवर काळजीपूर्वक नजर ठेवणारे आणि अडीअडचणीच्या प्रसंगीं आत्मप्रेरणेनें धांवून येणारे कित्येक वजनदार लोकनेते आहेत. अशा अनेक रीतीच्या निष्कपट गोतावळ्यामुळें, दादर म्हणजे आमचें प्रिय माहेरघर, अशी आमची भावनाच बनली आहे. हें माहेरघर सोडतांना आणि तेथल्या आबालवृद्ध भगिनीबांधवांचा निरोप घेतांना, आम्हीं लहान मुलाप्रमाणें अश्रू ढाळले! सन १८९२ सालापासून आम्ही पुष्कळ देशाटन केलें व व्यवहारपरत्वें स्थलांतरेंहि केलीं; आमची जन्मभूमि पनवेल सोडल्यालाहि आज १५-१६ वर्षे झालीं; परंतु वियोगजन्य दु:खाचा खरा अनुभव सर्व आयुष्यांत आम्हांला दादरनें दिला. अवचित बेतामुळें निघण्याची घाई झाली व आमच्या प्रयाणाची बातमी पुष्कळांना कळली नाहीं. यामुळें त्यांचा हिरमोड झाला, तथापि बातमी मिळतांच मुंबई, ठाणें, कुर्ला, माटुंगा वगैरे ठिकाणचे बांधव स्टेशनवर आम्हांला हस्तांदोलन करण्यासाठीं धांवत आले, त्यांचे आम्ही फार आभारी आहों. त्याचप्रमाणे वाग्विहार समिती, दादर मित्रमंडळ, स्वाध्यायश्रम, बालमंडळ आणि हुंडाविध्वंसक संघ इत्यादि संस्थांनी पानसुपारीच्या द्वारें व रौप्यकरंडकाच्या आहेरानें व्यक्त केलेल्या प्रेमाबद्दल आम्ही त्यांचे सदैव ऋणी राहूं इच्छितों. मुंबईलत्त्याच्या सर्व भगिनीबांधवांनीं प्रबोधनावर आपल्या प्रेमाची

छाया अविच्छिन्न ठेऊन, या पामराच्या हातून अखंड सेवा घ्यावी अशी हात जोडून प्रार्थना आहे. मतभिन्नतेच्या आणि नवमतवादाच्या रंगभूमीवर प्रबोधन आणि ठाकरे यांच्या वाग्लेखनसमशेरीच्या फटक्यांनीं घायाळ झालेल्या बांधवांजवळहि आमची प्रेमाची याचना आहे. विहित कर्तव्यकर्माच्या क्षेत्रांत मतभिन्नतेमुळें, बांधवांनों, आमचे तुमचे विरोधाचे कितीहि खटके उडाले, तरी आपलें परस्पर ध्येय एकजिनशीच आहे, हें विसरूं नको आणि आपणहि प्रबोधनावर निर्व्याज प्रेमाची छत्री धरा, अशी प्रार्थना करून सर्वांचा प्रेमानें निरोप घेतों. जगदीश सर्वांना चिरायु राष्ट्रसेवक करो!

मुंबईवैभव छापखाना

प्रबोधनाची उत्तम छपाई व त्याचा नियमितपणा यांबद्दल धन्यतेचीं शेंकडों पत्रें गेल्या दोन वर्षांत आलीं. परंतु या धन्यतेचें श्रेय आमच्याकडे मुळींच नसून, त्या अभिनंदनीय यशाचा वांटा मुंबईवैभवचें मॅनेजर श्रीयुत सिद्धये व त्यांचे फोरमन कंपाझिटरादि मदतगारांकडेच जातो. या वर्षी अत्यंत शोकजनक घडलेली गोष्ट म्हणजे प्रबोधनाचे चहाते व मुंबई वैभवचे असि. मॅनेजर श्री. लोटलीकर या तरुणाचा अपमृत्यू ही होय. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो! या सर्व मित्रमंडळींनीं प्रथम पासून प्रबोधनाला आपलेपणानें वागवून त्याला कायमचें ऋणी करून ठेविलें आहे; आणि आज जरी व्यावहारिकदृष्ट्या मुंबईवैभव व प्रबोधन यांचा संबंध सुटत असला, तरी प्रेमाचा संबंध मात्र चिरकाल कायमचा राहणार आहे, या भावनेमुळेंच प्रबोधन आपल्या प्रिय मुद्रणालयाचा वियोग सहन करण्यास शक्य होत आहे. सर्वांचे आम्ही मन:पूर्वक आभार मानतों.

व्यवसाय बंधू

ज्या ज्या बांधवांनीं प्रबोधनाला नियमित प्रतिभेट दिली, त्यांचे आम्ही फार फार आभारी आहों. पुष्कळांनीं अभिप्रायार्थ केलेली विनंती प्रबोधनानें अंमलांत आणली नाहीं, म्हणून त्यांचा आमच्यावर रोष असेल. परस्परांनीं एकमेकांवर अभिप्राय देणें, हा एक शिरस्ता होऊन बसला आहे खरा. त्यामुळें परस्परांची जाहिरातहि दिल्याचे पुण्य लागतें, हीहि गोष्ट खरी. निदान पोंच तरी देणें योग्य आहे. कांहींची पोंच वेळोवेळीं प्रबोधनानें दिलेलीं आहेच. मात्र अभिप्राय कोणाहि व्यवसाय बंधुवर यावयाचा नाहीं, असें १ ल्या वर्षाच्या १ ल्या अंकांत लिहिलेलें आमचें मत अझून कायम आहे. प्रबोधनावरहि अभिप्राय देण्याच्या भानगडींत कोणी पडूं नये. आमचे अंक प्रणितापूर्वक प्रतिभेटींसाठीं जातात; अभिप्रायासाठीं नव्हे. सर्व व्यवसाय बंधूंनी प्रबोधनाला प्रतिभेट देण्याचे अंक यापुढें संपादक प्रबोधन, सातारा रोड या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी, अशी विनंती आहे.

प्रबोधनाचें ध्येय

प्रबोधनाचें स्थलांतर त्याच्या मतांतरास कारण होणार कीं काय? अशी शंका कदाचित कित्येकांस येणें शक्य आहे. त्यांच्या दिलदिलाशासाठीं थोडासा खुलासा करणें अप्रस्तुत होणार नाहीं. ज्यांनी प्रबोधनांच्या हातांत हात घालून नियमीत स्वाध्यायशीलतेनें गेलीं दोन वर्षे प्रवास केला आहे, त्यांना त्याच्या विवक्षित मताभिमानाची पकड किती दांगडी आहे याची जाणीव करून देणें नलगे स्थलांतराचा उद्देश शब्द व्यावहारिक आहे. त्याचा प्रबोधनाच्या मतस्वातंत्र्यावर किंवा ध्येयावर कसलाहि परिणाम व्हावयाचा नाहीं, ही सर्वांनीं खात्री ठेवावी, प्रबोधन जितका कट्टा नवमतवादी आहे. तितकाच तो पक्का स्वराज्यवादी आहे. जितका राष्ट्रीय वैभवाचा महत्त्वाकांक्षी आहे. तितकाच तो सामाजिक व धार्मिक

गुलामगिरीच्या पुरस्कर्त्यांचा कट्टा द्वेष्टा आहे. महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या कोणत्याहि पक्षांचा प्रबोधन सांप्रदायिक नाहीं, अथवा त्यांच्या मतांचा मिंधा गुलाम नाहीं. प्रबोधन सत्याचा भोक्ता आहे. जेथें जेथें सत्य दिसेल, तेथें तेथे प्रबोधनाचा माथा अत्यंत उत्कट उमाळ्यानें सर्वांच्या आधी विनम्र होईल.

पहिल्या वर्षाच्या प्रथमांकांत प्रबोधनानें काढलेलें हे उद्धार त्याच्या कर्तव्याची पावलें सदैव नियंत्रित करीत राहतील. देशाच्या कानाकोपऱ्यांत जरा कोठें फट झालें की त्यावर चुटकीसारखें डझनवारी कालमांचे लेख खरडण्याचें काम प्रबोधनाचे नव्हें. ठिकठिकाणची बातमीपत्रें किंवा वर्तमानसारें देण्यासाठी प्रबोधनाचा जन्म नव्ह. तें काम आमच्यापेक्षा आमची इतर भांवडें उत्कृष्टपणें मार पाडीत असतातच. देशाच्या परिस्थितीचे रंग आतांशा इतके झपाझप बदलत आहेत, कीं कोणता रंग खरा आणि कोणता खोटा, हें निश्चयानें सांगणेंसुद्धा धाडसाचें होऊन बसलें आहे. अशा अवस्थेंत प्रत्येक महत्त्वाच्या परिस्थितीकडे चिकित्सक दृष्टीनें पाहून निश्चित विचाराची निष्पत्ति कशी करावी याची दिशा दाखविण्याचे कार्यच आजपर्यंत प्रबोधन करीत आलेलें आहे, आणि हेंच त्याचें धोरण पुढेंही अबाधित राहील.

मोफत वाचनालयें

यावर्षी ठिकठिकाणाच्या मोफत वाचनालयांकरिता व प्रामाणिक स्वयंसेवकांकरितां एकूण ५० अंक वर्षभर मोफत पाठविले. मोफत वाचनालयाची संख्या महाराष्ट्रांत इतकी भयंकर वाढलेली आहे कीं, नुसत्या संख्येवरूनच साक्षरतेच्या प्रगतीचें अनुमान काढूं म्हटलें तर ती एक भयंकर चूक होईल. वीसपंचवीस ठिकाणच्या मोफत वाचनालयांचा आम्हांला असा चमत्कारीक अनुभव आला की कोणीतरी एक उपटसुंभ उठतो, एखाद्या मोफत वाचनालयाचें नांव घेतो आणि वर्तमानपत्रकर्त्यांना फुकट अंक पाठविण्याबद्दल पत्रें पाठवितो. फुकटाफाटक बरींच वर्तमानपत्रें मिळविण्याचा असला धंदा करणाऱ्या लोकांनीं मोफत वाचनालयावरील आमचा विश्वास साफ नष्ट केला आहे. अशा परिस्थितींत मोफत वाचनालयांना कांही सवलतीनें प्रबोधन पाठविण्याचें आम्हीं ठरविलें आहे. उत्तरासाठीं तिकिट अगर कार्ड पाठवून अटींचा खुलासा मागविल्यास पाठवूं.

सर्व सज्जनांचा आश्रयाबद्दल पुन्हा एकदा आभार मानतो आणि प्रबोधनावर आपलें प्रेम वृद्धिंगत ठेवा या कळकळीच्या विनंतीतच या आत्मनिवेदनाची समाप्ति करितों.

□□□


प्रबोधन

PRABODHAN :—A Fortnightly Journal devoted to the Social, Religious and Moral Regeneration of the Hindu Society.

INDIAN RATIONALISTIC SOCIETY

MANOHAR COMPANY

महाराष्ट्राच्या संदर्भात काही चर्चा सुरू असल्यास 'पुरोगामी महाराष्ट्र' हा शब्दप्रयोग हमखास केला जातो. हा पुरोगामी महाराष्ट्र आभाळातून पडला नाही. त्याला पुरोगामी बनवण्याच्या प्रक्रियेत काही विचारवंतांची आयुष्ये खर्ची पडली आहेत. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परंपरेत असणारे अखेरचे नाव म्हणजे अर्थातच केशव सीताराम ठाकरे हे होय. ठाकरे यांनी ज्या माध्यमातून हे कार्य केले त्याचे नाव 'प्रबोधन'. म्हणून तर ठाकरे यांची प्रबोधनकार ठाकरे अशी ओळखच निर्माण झाली. 'प्रबोधन' या नियतकालिकाचा पहिला अंक मुंबईहून १६ ऑक्टोबर १९२१ या दिवशी प्रसिद्ध झाला. म्हणजेच २०२०-२१ हे 'प्रबोधन'चे शताब्दी वर्ष होय. या शताब्दीच्या निमित्ताने सचिन परब यांनी संपादित केलेला 'प्रबोधन'मधील प्रबोधनकार' हा त्रिखंडात्मक ग्रंथ वाचकांना सुपूर्द करण्यात 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'स कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत आहे.

डॉ. सदानंद मोरे

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ